सातपाटील
कुलवृत्तांत
रंगनाथ पठारे

VISIT…

सातपाटील कुलवृत्तांत

रंगनाथ पठारे

Copyright © 2019 **Rangnath Pathare**

All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed, or transmitted in any form or by any means, including photocopying, recording, or other electronic or mechanical methods, without

the prior written permission of the publisher.

ISBN : **978-93-86909-20-6**

Any references to historical events, real people, or real places are used fictitiously. Names, characters, and places are products of the author's imagination.

Front Cover Image Design By Artist
Prabhakar Kolte

Printed by **Smita Printer, Pune**
First Printed 20 July 2019
Second Printed 15 December 2019

Publisher -
Shabdalaya Prakashan
'Shabdalaya', Ward No. 7,
Shrirampur, Dist - Ahmednagar,
Maharashtra State
Pin Code - 413709
Contact - +91 9822525444 / +91 9822008796
www.shabdalaya.com

आभार
सयाजी शिंदे
राजन गवस
अभिजित पठारे

जगण्यातील
अपरिमित
सुंदर निवांतपण
देणाऱ्या
प्रवरा नदी
आणि
संगमनेरास...

'तुम्हाला हा विधी का करायचा आहे?' 'आई-वडिलांनी सांगितले म्हणून.' 'म्हणजे तुम्हाला यात तथ्य वाटत नाही.' 'नाही.' 'तरीही करता? केवळ आई-वडिलांनी सांगितले म्हणून?' 'हो. त्यांना बरे वाटेल म्हणून. मी देव मानत नाही. तो नाहीय अशी माझी खात्री आहे. तरीही मी देवळात गेलो की देवाला नमस्कार करतो. ते सोबत असलेल्यांच्या भावना दुखू नयेत म्हणून. त्यांना बरे वाटावे म्हणून. आई-वडील तर मला सगळ्यात निकटचे. त्यांना बरे वाटेल असे वागणे तर मला भागच आहे ना!' 'तुम्हाला जे वाटते ते तुम्ही इतरांना सांगत का नाही?' 'कंटाळा येतो.' 'आपल्याला जे पटत नाही ते करणे हे स्वतःशी प्रतारणा करणे होय.' 'जाणतेपणी मी ते कायम करत आलोय.आपल्या हिंदू असण्यात ती उत्तम सोय आहे. पूजापाठ करा किंवा करू नका. देव माना किंवा मानू नका. तरीही तुम्ही हिंदू असू आणि राहू शकता. इतर धर्मात ती सोय नाही. तिकडे तुम्ही कराराने बांधलेले असता. माझ्यासारख्यासाठी हा अत्यंत सोयीचा धर्म आहे. जगण्या-वागण्याचे इतके स्वातंत्र्य आणखी कुठेही नाही.' 'पाखंडी आहात आपण.' 'तरीही हिंदूच ना!' 'पाखंडी आहात तर किमान तसे वागा तरी.' 'सांगितले ना, कंटाळा येतो. त्यापेक्षा वरवर असे रीतीरिवाज पाळणे आणि आत मुक्त, स्वतंत्र असणे मी सोयीचे मानतो.'

'अंतःकरणात श्रद्धा नसताना हा विधी आपण केलात तर त्याचे फळ आपणास लाभणार नाही.' 'नाही लाभूद्या. ती अपेक्षाच नाही. आई-वडिलांना बरे वाटले की पुरे.' 'जन्म आणि मरण यांच्याविषयी आपल्या कल्पना काय आहेत?' 'आपल्या जन्माआधीचे आणि मरणानंतरचे आपल्याला ठाम असे काहीही माहीत नसते. म्हणजे ते योगवशिष्टादी पोथ्यापासून ते हल्लीचे अमेरिकन योगगुरू दीपक चोप्रा आणि अध्येमध्ये वेद, पुराणे, ब्राह्मण्ये, आरण्यके, उपनिषदे असे पुष्कळांनी पुष्कळ सांगितलेले असते. खेरीज अनेकांचे अनेक जन्मांआधीचे आणि मरणानंतरचे पुष्कळ अनुभव आपण वाचलेले असतात. चौऱ्यांशी लक्ष योनींच्या फेऱ्यांचा अविश्वसनीय आकडा आपण ऐकलेला असतो. म्हणजे त्या तितक्याच का याचे काहीही गणित आपल्याला माहीत नसते ; कळतही नसते. एकूणात, जन्माआधीचे आणि मरणानंतरचे आपल्या अस्तित्वाचे ठाम असे काहीही आपल्याला सांगता येत नाही, ही मनुष्ये म्हणून आपली मर्यादा. पण समजा, पस्तीसशे ॲमस्ट्रॉंग युनिट ते सात हजार ॲमस्ट्रॉंग युनिट तरंगलांबी ही आपल्या दृष्टीची सरासरी मर्यादा असते, हे विज्ञान आपल्याला सांगते. एक ॲमस्ट्रॉंग युनिट म्हणजे एका मिलीमीटरचा कोट्यांश; त्याचा एक कोटीवा भाग. म्हणजे साधारणतः जांभळा ते लाल यांच्या मधले रंग आपल्याला दिसतात किंवा पाहता येतात. पण त्यांच्या अल्याड आणि पल्याडच्या रंगस्वरूप तरंगाचे अस्तित्व ते डोळ्यांनी दिसत नसतानाही, त्यांच्या परिणामांच्या स्वरूपात आपल्याला ठाऊक असते. क्ष-किरण, गॅमा-किरण असतात, ते आपल्याला दिसत नाहीत, तरी ते असतात आणि त्यांचा आपण वापर सुद्धा करतो. अल्ट्राव्हायोलेट- म्हणजे जांभळ्याच्या आधीचे आणि इन्फ्रारेड - म्हणजे लालच्या पल्याडचे- किरण आपल्याला दिसत नसले तरी ते असतात हे अनुभवाने आपल्याला माहीत असते. तीच गोष्ट आपल्या ऐकण्याच्या क्षमतेची. साधारणतः वीस हट्र्झ ते वीस हजार हट्र्झ या कंप्रतेची कंपने आपण ऐकू शकतो. त्यांच्या अल्याड आणि पल्याड कंपने असतात, हेही असेच अनुभवसिद्ध आहे. थोडक्यात असे की पंचेन्द्रियांनी आपण जे अनुभवू

शकतो त्याला मर्यादा असतात. पण अस्तित्व त्याच्या अल्याड आणि पल्याड असते हे मनुष्ये म्हणून आपण जाणतो आणि तशा कंपनांचा उपयोग सुद्धा करतो. म्हणजे आपल्या अनुभव क्षमतेच्या अल्याड आणि पल्याड सुद्धा कंपनांच्या वर्णफलकाचे अस्तित्व असते हे आपल्याला समजलेले आहे. हेच सारे मानवी अस्तित्वाला लागू केले की जन्म आणि मरण यांच्या अलीकडे आणि पलीकडे अस्तित्व असेल असा अंदाज करणे शक्य आहे. ते कसे असेल हे आपल्याला कळत नाही, ही पुन्हा आपली एक मर्यादा. पण समजा, एक असा कोणता तरी उंबरा म्हणा वा उंबरठा ओलांडला की जन्म आणि त्यासारखाच आणखी एक ओलांडला की मृत्यू, असे मानणे शक्य आहे. पहिल्या वेळी आपण प्राण आपल्या आत घेतो, म्हणून जन्मतो आणि दुसऱ्या वेळी तो आत घेण्याची क्षमता हरपून आपण त्याला मुकतो, म्हणून मरतो असे आपण म्हणतो. या युक्तिवादात गूढ असे काहीही नाही, असे मी मानतो. पृथ्वीवरील हवा आत घेण्याची क्षमता मिळविणे हा जन्म आणि ती गमावणे हा मृत्यू, इतके ते सरळ आहे. या पृथ्वीवर वावरणारे आपले शरीर मर्त्य आहे. आत्मा शरीरात प्रवेश करतो आणि शरीराला प्राण आत घेण्याची क्षमता देऊन जन्माला घालतो. आपला या पृथ्वीवरला कार्यकाळ संपला असे आत्म्याला वाटले की तो निघून जातो, तेव्हा प्राण आत घेण्याची शरीराची क्षमता संपते आणि मरण येते. म्हणजे जन्मते आणि मरते ते शरीर. आत्मा मरत नाही. तो कायमच अस्तित्वात असतो. त्याच्या आपल्या आयुष्याच्या अल्याड आणि पल्याडची स्थिती आपल्याला समजत नाही, ही आपली मर्यादा. पण मग आत्मा म्हणजे उर्जात्मक अस्तित्व आणि त्याचे शरीरात असणे हे भौतिक अस्तित्व. हा अस्तित्वाचा द्वंद्वात्मक आविष्कार विज्ञानात प्रतिष्ठित आहे. उर्जा अविनाशी आहे, तिचे आविष्कार फार तर बदलतात पण ती संपत नाही, नाहीशी होत नाही, असेही विज्ञान- अजून तरी- मानते. उर्जा भौतिक वस्त्र पांघरते आणि झुगारूनही देते. या पांघरणे आणि झुगारून देणे, यांच्या मधला आपल्या भौतिक जीवनाचा प्रवास, म्हणजे आपला जीवनकाळ. कदाचित या अल्याड आणि पल्याडच्या आत्म्याच्या नजरेत- म्हणजे आपल्या अविनाशी उर्जात्मक अस्तित्वाच्या नजरेत- आपले जीवन हा मृत्यू सुद्धा असेल. अमुक एक शंभर वर्षे जगला म्हणजे आत्म्याच्या नजरेत तो शंभर वर्षे मेला, असेही असू शकते. आकलनाचा पवित्रा बदलला की स्थितीचे अर्थ बदलतात ; बदलू शकतात, असे आपण म्हणायचे.'

'अरे व्वा!' 'ठीक आहे.' 'दंभ फार आहे तुमच्यात.' 'तो नसेल असे मला वाटते. पण तुम्ही तुमचे निरीक्षण नोंदवायला स्वतंत्र आहात.' 'मानवी शरीराविषयी तुम्ही काय सांगाल?' 'या पृथ्वीलोकात जगताना मनुष्ये म्हणून आपण आपल्या शरीराच्या माध्यमातूनच विचार करतो; असंख्य कृती करतो. मेंदू, हृदय, काळीज असे आपले अवयव एकेक किंवा एकत्र घेऊन विचार करतो. मन नावाच्या अमूर्त आणि काल्पनिक अवयवाला त्यासाठी आपण जन्माला घालतो. आपण आपल्या शरीराला आपल्या पूर्वजांच्या शरीरांशी जोडतो. आपल्या शरीराला 'आपण' समजून त्याचा जेनेटिक इतिहास मांडतो. आपल्या भौतिक जगण्यात तो गैर म्हणता यायचा नाही. सरळच की आपल्याला आपले शरीर हे आपल्या पूर्वजांकडून मिळालेले असते. आपल्याला जन्माला घालणारे आई आणि वडील प्रत्येकी भला मोठा जेनेटिक इतिहास घेऊन येत एकमेकात मिसळून एक नवा वेगळाच जेनेटिक

नकाशा आपल्याला प्रदान करतात. सध्या २०१९ मध्ये पृथ्वीवरील मानवी संख्या सातशे एकाहत्तर कोटी सेहेचाळीस लाख समजा; आहे तर त्यात कोणतीही दोन मनुष्ये एकमेकांसारखी नाहीत, हे अद्‌भूत या जेनेटिक नकाशातून आपल्याला समजते आणि एरवीही दिसते. स्त्री-पुरुषांच्या एकाच जोडीतून विस्तार होत आपण इतके सारे अस्तित्वात आलेलो असलो तरी एक प्रजाती म्हणून आपण सारे एक आहोत अशी भ्रातृभावाची भावना आपल्यात नसते. ती तशी असावी, रुजावी म्हणून आपल्या अनेक शहाण्या पूर्वजांनी पुष्कळ प्रयत्न केलेले असतात, तरीही ती नसते. याचे कारण आपल्यात उतरलेले अस्तित्वाचे भय आणि असुरक्षिततेची भावना. पृथ्वीवर जगताना या बाबी जन्मापासून मरणापर्यंत व्यक्तिगत आणि सामुहिक पातळीवर कायम असतात. त्यापोटी आपण धर्म, वंश, भाषा, भूगोल, रंग, असाधारण हानिकारक शस्त्रे; अशा अनेक संरक्षक भिंती उभारत, स्वतःला सुरक्षित करताना इतरांचा विच्छेद केलेला आहे. मानवी प्रजाती अस्तित्वात आल्यापासूनचे ते भले थोरले झाड- त्याच्या अनेक फांद्या आपण तोडल्या आहेत, तरीही वाढत आहे. हे असे अनंत काळ अर्थातच होणार नाही. या पृथ्वीवर कोणतीही प्रजाती अस्तित्वात आली की तिला कधी ना कधी संपावे हे लागतेच. तसेच मनुष्यांचे कधी ना कधी होणारच आहे. ३८० कोटी वर्षांआधीपासून पृथ्वीवर सजीव प्रजाती अस्तित्वात आलेल्या आहेत. त्यातल्या ९०% टक्के आज नाहीशा झालेल्या आहेत. आधुनिक मानव दोन लाख वर्षांआधी इथे अस्तित्वात आलेला आहे. तो आधीच्या सगळ्या जीवांपेक्षा अधिक बुद्धिमान आहे. या त्याच्या वैशिष्ट्यामुळे मानवी प्रजाती स्वतःचा विनाश लवकर ओढून घेऊ शकते, कदाचित तो लांबवू शकते किंवा तो विनाश थांबवू सुद्धा शकते. 'सांगण्याचा कंटाळा येतो म्हणता आणि पुष्कळ बोलता.' 'आपण मला डिवचलेत.' 'म्हणजे, डिवचले की बोलता.' 'नेहमीच ते होत असेल असे नाही.' 'कधी होते?'

'आपणासारखे लोक भेटले की होत असेल.' 'आपले ज्ञान आणि आकलन यांच्यापुढे मी दिङ्‌मूढ झालोय. 'आपण बोलता त्यातील उपरोध मला दिसतो. पण म्हणून मी माझे म्हणणे बदलणार नाही.' 'उपरोध नाही. मी खरोखरीच चकित झालोय.' 'ठीक.' 'तुम्हाला तुमचे पूर्वज कुठवर माहीत आहेत? त्यांची नावे माहीत आहेत? मंत्रोच्चार करताना तशा सुताच्या गाठी मारत जाव्या लागतील.' 'मला माहीत आहेत. माझ्याकडे आमच्या वंशवृक्षाचे झाडच आहे.' 'कुठपर्यंत?' 'सातशे वर्षे जुने.' 'काय, सांगताय काय?' 'सांगतो ना! तुम्हाला आणि ऐकणार असतील त्या सगळ्यांना सुद्धा...'

श्रीपती

आधी काळ सांगतो. कारण गोष्टी काळात घडत असतात. माणसांचं आयुष्य सामान्यतः ज्या वेगात वाहतं, त्या वेगाच्या नजरेत काळ हा स्थळापासून सुटा, स्वतंत्र आणि सार्वभौम म्हणता येईल असा असतो. त्याच्यावर भूमीचा अधिकार चालत नाही, या अर्थाने तो सार्वभौम. तो त्याच्या मर्जीनेच फक्त वाहतो. गोष्टीला स्थळही

आवश्यकच असतं. स्थळ आणि काळ यांच्या चार मितीच्या अवकाशात गोष्ट घडत असते. स्थळाच्या तीन मिती आणि काळाची एक. तरीही, गोष्टीला नियत करण्यात ही काळाची मिती सर्वात प्रमाथी. म्हणून आधी काळ सांगतो.

१२८९ मध्ये अल्लाउद्दिन खिलजी याने पैठणवर स्वारी केली होती. तोवर रामदेवराव जाधव दक्षिणापंथाचा सम्राट होता. पण त्याची राजवट आधीच खिळखिळी झाली होती. स्वतः रामदेवराव लढवय्या नव्हता आणि राजकारणाचा वकूब त्याच्याकडे कमीच होता. भरीत भर म्हणून तो लंपट देखील होता. त्याच्या आधी महादेव जाधवाच्या काळातच प्रधान हेमाद्री उर्फ हेमाडपंत याने 'चर्तुवर्गचिंतामणी' नावाचा ग्रंथ रचला होता. त्यामुळे व्रते, उद्यापने यांचा सुळसुळाट झालेला होता. त्याचा उपद्रव ब्राह्मणेतर जनसामान्यांस अतोनात होऊ लागला होता. रामदेवराव जाधवाच्या कारकिर्दीत हा प्रक्षोभ फार वाढीला लागला होता. महानुभाव चक्रधर यांनी अशा गोष्टी फोलकट असल्याचे प्रतिपादन केले. त्याला प्रचंड प्रतिसाद सामान्य माणसांनी दिला. अनेक राजस्त्रिया सुद्धा स्वेच्छेने उघड वा गुप्तपणे चक्रधरस्वामींच्या शिष्या झाल्या. देवतांच्या अर्चनेने मिळणारे पुण्य दुय्यम दर्जाचे आहे. त्याची गरजच नाही. तुम्ही मला अनुसरा. असे त्यांचे म्हणणे होते. ते लोकांना सोपे वाटे आणि पटे. परिणामी अनेकांनी देवळांमधील रुद्रलिंगे उपटून फेकली. या अधर्म्य कृत्यांचे खापर ब्राह्मणांनी राजावर फोडले. त्याचा राग येऊन रामदेवराव जाधवाने अनेक ब्राह्मणांस ठार केले. याचा परिणाम म्हणून अनेक सनातनधर्मी क्षत्रिय राजापासून फुटून निघाले. ब्राह्मण तर राजाच्या विरुद्ध होतेच. हरिहरादी देव रामदेवावर कोपले आणि वसिष्टादि गुरूंनी त्याच्या दरबाराचा त्याग केला. पिढीजात क्षत्रिय आणि ब्राह्मण यांनी असा बहिष्कार टाकल्यावर रामदेवरावाने पातेणे उर्फ पाठारे जातीचे लोक आणि पळशे ब्राह्मण यांच्या सहाय्याने राज्यशकट कसाबसा चालू ठेवला. पातेणे हे जातीने जरी क्षत्रिय होते तरी धंद्याने प्रत्येनस् व प्रतिहारी म्हणजे पोलीस व रखवालदार होते. उच्च सेनापतित्व करण्याचे कसब त्यांना नवीन होते. पळशे ब्राह्मण हे पलाश ब्राह्मण. मगध देशचे. परके. त्यांची मुळे इथे रुजलेली नव्हती. एकूणात तो तो धंदा करण्यास अपात्र अशा लोकांना सोबत घेऊन रामदेव राज्य करत होता. राजयंत्र खिळखिळे झालेले होते. मांडलिक सम्राटाला किंमत देईनासे झाले होते. १२८९ मध्ये अल्लाउद्दिन खिलजी याने पैठणवर स्वारी केली त्यावेळी अशी परिस्थिती होती. या स्वारीत रामदेवराव आणि त्याचे पातेणे सरदार यांचा पराभव झाला. जबर खंडणी घेऊन अल्लाउद्दिन परत गेला. यानंतर सहा वर्षांनी म्हणजे १२९५ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीवर दुसरी स्वारी केली. तोवर रामदेवाचे राजयंत्र आणखी जास्त खिळखिळे झालेले होते. म्हणून अल्लाउदिनाने, यावेळी दाती तृण धरून शरण यावे अशा अर्थाची पत्रे किल्ल्यात पाठवली. त्यास रामदेवाने जुमानले नाही. युद्ध झाले. त्यात हसन आणि हुसेन हे खिलजीचे पुत्र कामी आले. तरीही अंततः तो विजयी झाला आणि चिकार लूट आणि खंडणी घेऊन परतला. यानंतर रामदेव केवळ नामधारी उरला. खिलजीने त्याचा नूर इतका उतरविला की तो स्वतःच करभार देणारा क्षुद्र मांडलिक म्हणून केवळ उरला होता. अल्लाउद्दिनाची ही देवगिरीवरची दुसरी स्वारी होण्याच्या आधी साधारण एक वर्ष म्हणजे साधारणतः १२९४ च्या सुमाराला रामदेवाचा एक पुत्र बिंबदेव जाधव याने त्याच्या काही पातेणे सरदारांसह कोकणात मोठी

सेना पाठविली होती. रामदेवराव यास एकूण पुत्र चार. थोरल्या शंकरदेव याची स्थापना त्याने प्रतिष्ठान उर्फ पैठण येथे केली होती. दुसरा केशवदेव देवगिरीस होता. तिसरा बिंबदेव हा उदगीर प्रांती होता. आणि सगळ्यात धाकटा प्रतापशा अलंदपूरपाटण येथे हेमाडपंत याच्यासह होता. राज्याची याप्रकारे घडी बसवून स्वतः रामदेव आलटून पालटून पैठण आणि देवगिरी येथे असे. या साऱ्या व्यवस्थेच्या अल्लाउद्दिन खिलजीने चिंधड्या उडविल्या होत्या. कारण ही व्यवस्थाच मुळात अनुभवी योद्धे आणि शासक यांच्या अभावात पळसे आणि पातेणे यांच्या फोलकट आधारावर उभी होती. या पार्श्वभूमीवर बिंबदेव जाधव हा चलाख आणि प्रतिभावानच म्हटला पाहिजे. अल्लाउद्दिन खिलजीची पैठणवरील स्वारी त्याने अनुभवली होती. ती अखेरची असणार नाही हे त्याला कळले होते. आपल्या पित्याच्या राजयंत्राचा त्याच्यापुढे टिकाव लागणार नाही याचाही अंदाज त्याला आला असेल. आपल्याला स्वतःसाठी आणि शक्य झाल्यास देवगिरीच्या रक्षणासाठी सुद्धा अधिक स्पेस-कॅलक्युलेटेड रिट्रीट साठी का होईना- आवश्यक आहे, हे त्याने जाणले असेल. कोकणातील शिलाहारांची सत्ता खिळखिळी झाल्याचा अहवाल त्याने घेतला असेल. तिथले बाकीचे रांगडे लोक आपल्या युद्धाचा फारसा अनुभव नसलेल्या सैन्यासमोर देखील टिकाव धरू शकणार नाहीत, हे त्याला जाणवले असेल. किंवा कदाचित खिलजीने पराभूत केलेल्या रामदेव जाधवाची सुद्धा ती चाल असेल. अल्लाउदिनाने देवगिरीवर चाल केली तेव्हा बिंबदेव उदगीरास होता. तिथून त्याने गुजरातेच्या बाजूने स्वारी करून सालेरमोलेर, नंदुरबार, वडानगरपर्यंत चाल करून ठाणे-कोकणात प्रवेश केला. गुजरातेत जाऊन देवगिरीवर चालून आलेल्या खिलजीस गुजरातेतून माळव्याच्या बाजूने पायबंद देण्याचा बिंबदेवाचा हेतू असावा. त्याचा हा डाव ओळखून खिलजी देवगिरीहून चपळतेने निघाला आणि त्याने आपला रस्ता बदलला. त्यामुळे माळव्याकडे जाण्याचे रहित करून बिंबदेव ठाणे-कोकणात घुसला. तिथे नागरशाचा पुत्र त्रिपुरकुमुर यास खाली रेटून १२९६ मध्ये माहीम येथे राजधानी करून बिंबदेवाने आपल्या पातेणे सरदारांची माहीम बेटात स्थापना केली. तिथे बिंबदेवाने नऊ वर्षे राज्य केले. बिंबदेवाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र प्रतापशा जाधव गादीवर आला. सुमारे ३७ वर्षे जाधवांचे राज्य कोकणप्रांती होते. नागरशा आणि त्याचे पुत्र त्रिपुरकुमुर व केशवदेव यांनी ते १३३३ मध्ये संपवले. तिकडे रामदेवराव जाधव १३११ त वारला. खिलजी याने १३१९ मध्ये देवगिरीची सद्दी कायमची संपवली..

हे सगळे इतिहासाच्या दप्तरात सटीक उपलब्ध आहे. आपल्या कथेसाठीचा काळ अल्लाउदिनाच्या पैठणवरील स्वारीच्या आगेमागे म्हणजे १२८९ च्या सुमाराला सुरू होतो. आणि तो बिंबदेव जाधव याची माहीम येथे स्थापना झाल्यानंतर म्हणजे १२९६ नंतर काहीसा रेंगाळत संपतो. आपल्या कथेचा नायक आहे, शिरपती. तो पातेणा, पैठणजवळच्या डोंगरकिनी नामक गावात राहणारा. आपण पातेणे किंवा पाठारे आहोत ते त्याला माहीत नाहीय. त्या गावात सगळेच पातेणे. उरलेले लोहार, सुतार, कुंभार, चांभार असे काही लोक. गावाची स्थापनाच मुळी एका पातेण्याने केलेली. जात म्हणून वेगळी माहिती असण्याची गरजच तितकी नव्हती. त्याच्या गावातून तो दुसऱ्यांदा बाहेर पडला तेव्हा त्याला ते एका किरवंताकडून योगायोगाने समजले. पहिल्यांदा तो घोडेस्वार होऊन

बाहेर पडला ते अल्लाउद्दिन खिलजीच्या पैठणवरील स्वारीत, खिलजीच्या बाजूने लढण्यासाठी. लढाईला जा, लूट घेऊन ये असे त्याच्या बापाने त्याला बजावून बजावून सांगितले म्हणून. दुसऱ्यांदा तो बाहेर पडला ते काही दिवसांनी पैठण नगरी पाहण्यासाठी. तिसऱ्यांदा मात्र तो कायमसाठीच बाहेर पडला. चार-दोन रोजांसाठी डोंगरकिनीला आला-गेला असेलही कदाचित, पण त्याचे कायमचे राहण्याचे ठिकाण किंवा त्याचे एकूण सगळे जगणेच बदलले. शिरपतीच्या जगण्याच्या गोष्टीसाठी स्थळ-काळाचा इतका अवकाश पुरेसा आहे.

1

शिरपती चार-चौघांसारखाच होता. म्हटलं तर थोडासा वेगळा.दोन तीनशे वस्तीच्या लहान गावात राहणारी माणसं एकमेकांपेक्षा कितीशी वेगळी असणार? कळत्या वयाचा होण्याच्या किती तरी आधीपासून तो मेंडका म्हणजे मेंढपाळ होता. त्यांच्या सहवासातच त्याचा अधिकांश वेळ जात असे. तसं चार-चौघांसारखं त्याचं लग्न सुद्धा झालेलं होतं आणि त्याला एक तीन-चार वर्ष वयाचा मुलगा सुद्धा होता. ते असतंच. त्यात वेगळं ते काय? पण शिरपती अंगयष्टीने रगदार होता, अत्यंत बळकट होता. अर्थात त्याचीही त्याला खास अशी जाणीव नव्हती. म्हणजे असं की तरुण वयात रग ही असतेच. आणि बालपणीपासून मेंढीच्या दुधाचा अंतर्भाव त्याच्या खाण्यात स्वाभाविकपणेच होता. ते दूध गोडसर आणि एडक्यासारखी ताकद देणारं असतंच. पचविण्याची क्षमता तेवढी हवी. त्याच्यात ती परंपरेनं आलेली होती. दुपारच्या जेवणाला नुसती भाकरी असली की त्याचं भागे. सोबतीला दुभत्या मेंढीचं ताजं दूध नेहमीच मुबलक उपलब्ध असे. दूध काढायच्या तांब्यातच भाकरी कुस्करायची आणि तयार झालेला मऊ काला आनंदाने ओरपायचा. ब्रम्हानंदच केवळ! भाकरी नसेल तर नुसत्या दुधावर काम चालून जात असे. दूध काढण्यासाठी भांडे नसले तर तो सरळ मेंढीच्या कुशीत शिरून तिच्या सडांना तोंड लावत असे. अशा रीतीने तो दुग्धपान करत असताना त्याच्या मेंढ्या सुद्धा आनंदाने शांत उभ्या राहत असत. त्याच्या आणि त्यांच्यामधल्या नात्यात ही प्रौढ समज नेहमीच होती. त्यांच्या कोवळ्या कोकरांना शिरपती ज्या प्रेमाने हातांनी धरून आपल्या छातीशी घेत असे, गोंजारत असे, ते त्या मेंढ्यांच्या वत्सल नजरेतून सुटण्याजोगे नसे. त्यांना बोलता येत नसले तरी त्याच्या तोंडातून निघणाऱ्या आवाजाचा अर्थ लावण्यात त्या वाकबगार होत्या. त्यांच्यासोबत त्याला करमे. त्यांना सोडून राहण्याची वेळ सहसा त्याच्यावर आलेली

नव्हती. एकदा फक्त दिल्ली नावाच्या त्याने न पाहिलेल्या, न ऐकलेल्या गावाचा एक राजा अलोदिन खिलची म्हणून होता, तो पैठणच्या राज्यावर चढाई करण्यासाठी आला असताना त्याच्या बापाने त्याच्यासाठी घोडा पैदा करून देऊन त्याला लढाईवर पाठवले होते. अलोदिन खिलचीच्या बाजूने लढण्यासाठी. त्यात त्याचे काही महिने व्यर्थ गेले. तलवारबाजी, दांडपट्टा चालविणे, भालाफेक करणे या गोष्टी खेळाचा भागच असत संध्याकाळच्या. लेजीम खेळणे जसे नैसर्गिक तशाच या गोष्टी. पण लढाईची भानगड त्याला तितकी आवडली नव्हती. माणसांचं माणसांशी काहीही वैर नसताना, अगदी ओळखदेख नसताना असं एकमेकांवर चालून जायचं आणि मारायचं हा खेळ त्याला मंजूर नव्हता. आणि लुटालूट तर बिलकूल नामंजूर होती त्याला. त्या घाबरलेल्या बाया, लहानी मुलं; त्या तशा मनाला विव्हल करणाऱ्या हवेत कोणाचं काही लुटायचं हे त्याला महाभयंकर वाटलं होतं. तिथं एके ठिकाणी बाईवर बळजोरी करणाऱ्या त्याच्या बाजूच्या पुरुषाला त्यानं चांगलंच बदडून काढलं होतं. घरी परतला तेव्हा त्यानं काहीच लूट आणलेली नाही, हे त्याच्या बापाच्या लक्षात आलं आणि बापानं त्याला बदडून काढलं होतं. तेव्हाच, याच्यानंतर कधीही लढाईला जायचं नाही असं शिरपतीनं मनातल्या मनात ठरवून टाकलं होतं. त्याच्या बापाच्या नजरेत सारं सरळ होतं. लूट आणायची नाही तर लढाईला जाण्यात काय मतलब? तिथं जायचं म्हणजे एकतर लढता लढता मरायचं किंवा लूट घेऊन परतायचं, असं ठरलेलं असतंय. बापानं हे त्याला बजावून बजावून सांगितलेलं होतं. तरीही शिरपतीला ते जमलं नाही. त्याच्या बापानंच मुळात ठरवून टाकलं की अशा नादान मुलाला पुन्हा लढाईला पाठवायचं नाही. अशा आतबट्ट्याच्या व्यवहाराचा काय उपयोग? घोड्याची खची सुद्धा अंगावर आली, याला काय म्हणायचं? मेला असता एकवेळ तर खास काही बिघडलं नसतं. त्याच्या बापाचा वसबूड थोडाच झाला असता? वसबूड म्हणजे वंशाचं संपणं. तो नसता झाला. त्याच्या बापाला आणखी मुलं होती. आणि आणखी होण्याची संधी सुद्धा सहज होती. शिरपतीचा वेल सुद्धा त्याच्या मुलाच्या रूपाने होताच. हिशेब साधा होता: तो मेला असता तर खास काय बिघडलं नसतं. पण मिळकतच आणायची नाही याला काय अर्थ? शिरपतीला हा साधा हिशेब समजला नव्हता. त्याच्या ही साधी गोष्ट लक्षात आली नव्हती. तो मनाने एखाद्या एडक्यासारखा सरळमार्गी, आदबशीर आणि शांत स्वभावाचा होता. त्याला त्याच्या बापाचा तरी काय इलाज? त्याच्या या अशा स्वभावामुळेच त्याची पुढच्या काळात एडके नावाच्या उदगीरच्या बिंबदेव राजाच्या एका सरदाराच्या हाताखालील दुसऱ्या ओळीतल्या मानकऱ्याशी भेट झाली आणि त्याचं आयुष्य बदललं असं सुद्धा म्हणता येईल. अर्थात शिरपतीचा एडक्यासारखा स्वभाव आणि मानकऱ्याचं आडनाव यात अतयं योगायोगाखेरीज दुसरं नातं सांगता येणार नाही.

ज्या गावात शिरपती राहात होता, ते गाव राजाच्या राजधानी पासून म्हणजे पैठणपासून सत्तावीस योजने दूर होतं. त्या काळाच्या हिशेबानं हे अंतर काही कमी नव्हतं. आणि डोंगराळ मुलुखात होतं हे गाव. कमी पावसाचं. मेंढ्या पाळणं हाच सगळयात किफायतशीर धंदा होता. बाकी शेती जमेल तशी. आणि लढाया होत तेव्हा काही लूट आणता आली तर नशीब फळफळण्याची संधी देखील असे. पुष्कळ तरुण मुली

राजधानीच्या नगरात मानकरी लोकांच्या घरी कुणबिणी म्हणून काम करत. त्यातल्या काही पैका घेऊन गावी परतत आणि लगीन-याव करत सुद्धा. पण त्यांच्या कुटुंबांना प्रतिष्ठा नसे. त्यांना दासी-बटक्यांची अवलाद म्हणून ओळखलं जाई. पण पैक्याच्या जोरावर ही अवलाद काही काळातच बाकी सगळ्यात सोयीस्करपणे मिसळून जात असे. अर्थात कुणबीण म्हणून काम करणाऱ्या मुलीच सहसा परतत नसत. नगरातील मानकऱ्यांच्या घरातलं सुखोप्याचं जिणं सोडून कोण कशासाठी गावात माती खायला येणार? गावाचं नाव डोंगरकिनी. लढाईचा तो महिन्या-दोन महिन्यांचा काळ वगळला तर शिरपतीचं जन्मापासूनचं सारं आयुष्य याच गावात सुखासमाधानात साजरं झालेलं होतं. मेंढ्यांच्या सहवासातच जगण्याचा आनंद शोधणाऱ्या त्या सरळमागी माणसाची जगण्यापासून आणखी कसलीही अपेक्षाच नव्हती. तो अगदी सुखी होता. एखाद्या दणकट एडक्यासारखा नैसर्गिकपणेच सुखी होता. त्याची बायको यमी ही त्याच गावातली होती. शहाणी होण्याच्या आतच तिचं शिरपतीशी लग्न झालं होतं आणि तशाच स्थितीत त्याच्या शय्येत तिला जावं लागलं होतं. त्याविषयी तिची तक्रार अजिबात नव्हती. तसा रिवाजच होता. तिचा शिरपतीवर खूप जीव होता. पण तो शब्दात व्यक्त करण्याची संधी तिला नव्हती. कधी व्यक्त करणार? भेट फक्त शय्येत. तिथं शब्दाविण संवाद. तरीही त्या संवादातून ती तिला जे व्यक्त करायचं ते करत असे. आणि ते त्याच्यापर्यंत पोहोचत देखील असे. शय्या जवळपास रोजचीच असे. पण एक मुलगा होऊन चार वर्ष लोटली तरी तिला दिवस गेलेले नव्हते. एकूण सगळ्या तरुण आणि प्रौढ बाया दीड-दोन वर्षांच्या अंतराने बिनचूक बाळंत होत असताना हिला मात्र काहीही होत नव्हते. अर्थात त्याविषयी कोणाची तक्रार सुद्धा नव्हती. बाईचा पाळणा जितका लांबचा तितकी तिची संतती रगदार निपजणार असा संकेत रूढ होता. 'कशी मेंढीवानी रगील ह्ये रांड', तिची सासू कौतुकाने म्हणत असे. खरं तर ती या तिच्या सासूसारखीच होती.

सासूचा स्वतःचा पाळणा तरुण वयात सहा वर्षांचा होता. नंतर तो पाच, चार असा बारीक होत गेला होता. वय वाढलं की रग कमी होत जाते, त्याचा परिणाम. तरीही तिला चार मुलं झालेली होती. त्यातलं एकही दगावलेलं नव्हतं. शिरपती थोरला. धाकटे दोन भाऊ. आणि सगळ्यात धाकटी एक लेक होती. यात आणखी भर पडण्याची मजबूत शक्यता होतीच होती. यमी खरोखरच एखाद्या मेंढीसारखी बळकट आणि आज्ञाधारक होती. शब्दांचा निष्कारण व्यय तिच्या स्वभावात नव्हता. नाही म्हणणे तिला माहीत नव्हते. एखाद्या सुनेच्या ठिकाणी यापेक्षा आणखी काय हवे?

गावात सगळेच कुणबी. कुणबिक हीच वहिवाट होती. जोडीला गाया, मेंढ्या पाळायचा रिवाज होता. सुतार, लोहार, कुंभार, चांभार, न्हावी यांसारख्या जातींची गरजेपुरती वस्ती होती. शेतीला पूरक आणि शेतकऱ्यांच्या जीवनव्यवहारासाठी गरजेचे ते ते होते. साळी, कोष्टी नव्हते. आपल्या घोंगड्या आणि वाकळी शेतकऱ्यांनी स्वतःच विणायच्या, असा रिवाज होता. लंगोटी आणि कोपरी असा पोशाख. त्यासाठीचे कापड कोणत्या तरी दुसऱ्या साळी-कोष्ट्यांच्या गावातून आणावे लागे. मुंडासी असत. पायात खेटरं घालायचा रिवाज होता. आणि या सगळ्या वस्तू फाटून चिरगुटाच्या अवस्थेला पोहोचल्यावर सुद्धा शिवून, सांदून वापरल्या जात. कारण त्यांची दुर्मिळता आणि त्यांचं महाग असणं. वर्षातून

एकदा करवसुलीसाठी कोणी तरी जाडा, शेंडी राखलेला माणूस येत असे. त्याचा पोशाख वेगळा असे. डोक्यावर पगडी, ओठांवर झुबकेदार मिशा, कानात सोन्याची भिकबाळी, अंगात बाराबंदी आणि कमरेला धोतर. खेरीज अंगावर सोडलेले मोकळे उपरणे सुद्धा असे. त्याची खेटर मऊसूत आणि भरपूर तेल दिलेली चमकदार असत. तो भरपूर माल, धान्य, तेल, डाळी, कठान-निठान असे गाड्यांवर लादून घेऊन जात असे. तो मानकरी यांचा माणूस आहे, अशी दबल्या आवाजात चर्चा असे. मानकरी हे गावचे मालक. अशा अनेक गावांचे ते मालक होते. त्यांना कुणीही पाहिलेले नव्हते. पाटलांनी कदाचित पाहिलेले असेल. त्यांच्या त्या माणसासमोर अगदी लवून वागायचा रिवाज होता. पाटील जिथं त्याच्या समोर कराकरा लवत असे, तिथं बाकीच्यांचा प्रश्नच नव्हता. पुरेसा कर भरला नाही की त्या जाड्या शेंडीवाल्याचे पित्त खवळत असे. एकदा अशाच एका कर देऊ शकत नसलेल्या कुणब्याला त्याने सर्वांसमक्ष चाबकाने फोडून काढले होते. कुणब्याची पाठ रक्ताळली होती. आणि ते करता करता घामाघूम होऊन चक्कर येऊन तो जाडा शेंडीवाला खाली पडला असताना मार खाणाऱ्या कुणब्याने आदबीने त्याच्या जवळ जात त्याला उठवले आणि त्याचा दूर पडलेला चाबूक त्याच्या हाती दिला होता. आणि स्वतः आधी जसा जमिनीवर पालथा झोपलेला होता तसा पुन्हा मार खाण्याच्या बेताने झोपला होता. हे असे कसे असू शकते किंवा कधीही न दिसणारा आणि वावरात न राबणारा एखादा माणूस मालक कसा असू शकतो, मानकरी कसा होतो, असे प्रश्न शिरपतीच्या मनाला कधी शिवले सुद्धा नव्हते. जन्मणे, जगणे, शेतात राबणे किंवा मेंढ्या वळणे जसे नैसर्गिक तसेच हे त्याच्यासाठी होते.

अलोदिन खिलचीच्या बाजूने लढण्यासाठी शिरपती जेव्हा पैठण नगरीत शिरला तेव्हा मात्र त्याला आश्चर्याचे अनेक धक्के बसले होते. आयुष्यात पहिल्यांदा तो एक नगरी बघत होता. तिथं रामदेव नावाचा कोणी तरी खूप मालदार राजा राहत आहे, अशी आधीच खिलचीच्या सैन्यात चर्चा होती. तिथं दाबजोर लूट तर मिळेलच, पण तिथल्या बायाही फार नामांकित असल्याची बोलवा होती. त्या कशाही असल्या तरी त्याचं काय असा प्रश्न शिरपतीला पडला होता. पण तो त्यानं मनात ठेवला होता. खेरीज काही काही लोक फार वेगळ्याच न कळणाऱ्या भाषेत बोलत असल्याचं त्याला जाणवलं होतं. त्या परक्या मुलखातल्या दिल्लीकडच्या लोकांची भाषा वेगळी आहे असं एकजण म्हणाला, ते त्याला पटलं होतं. शिरपती पैठण नगरीजवळ आला तेव्हा त्याला आधी तिथली तटबंदी दिसली. ती अत्यंत भव्य आणि त्याने कधीही न पाहिलेली होती. आतली घरं एकेक अगदी सुंदर मजल्या-मजल्यांची, रंगवलेल्या भिंती, मोठाल्या खिडक्या, नक्षीचे दरवाजे, प्रशस्त ओटे, रुंद रस्ते, दिव्यांचे खांब, देवालये, दीपमाळा, उद्याने आणि माणसे, हत्ती, तलवारी, सगळे चमकदार. त्याला वाटलं, हे देवानी स्वतः साठी बांधलेले नगर आहे. कारण एका फिरस्त्याने देवनगरीचे केलेले वर्णन त्याने ऐकलेले होते. अर्थात ते तसे नाही हे त्याला लगेच कळले होते. देवांनी जगावं तशा वैभवात जगणारी ती तुपट अंगांची माणसं फारच फुसकी होती. इतक्या उत्तम स्थितीत राहणारी ती माणसं अगदीच भेकड होती. त्यांना शस्त्रं चालवता येत नव्हती. ज्या काहींना ते जमत होते, त्यांचा सहज पाडाव झाला होता. ते मारले गेले होते किंवा पळून गेले होते. खिलचीच्या सैन्यातले काही मेले होते. पण

त्याचा विजय झाला होता. रामदेव राजा शरण आला होता. सोने-नाणे, जड-जवाहीर अशी प्रचंड लूट आणि खंडणी खिलचीला मिळाली होती. खेरीज त्याच्या सैन्यानेही भरपूर लूट केली होती. रस्त्याने येताना आसपासच्या खेड्यात लुटालूट करायची नाही अशी खिलचीची सक्त ताकीद होती. पण तिथे, त्या पराभूत नगरीत त्याने आपल्या सैन्याला मोकळे सोडले होते. तिथं उडालेला हाहा:कार, आया-बायांचं किंचाळणं, त्यांची काढली गेलेली धिंड, घरात घुसून केले गेलेले बलात्कार या सगळ्यांमुळं शिरपती मनानं लढण्याला विटला होता. तिथून तो परतला तेव्हा मनात आधी तो हाहाःकार जास्त राहिला. खेरीज त्या नगरीचं वैभवही राहिलं. म्हणूनच पुन्हा एकदा तो पैठण नगरीस गेला होता. पुन्हा एकदा ती पाहण्यासाठी. लढाईनंतर कदाचित पाच-सहा महिन्यांनी. तिथं जाण्यासाठी त्यानं पाटलाच्या पोराला त्या नगरीचं वर्णन ऐकवलं होतं. तुला मी सगळं दाखवतो असं आमिष पुढं केलं होतं. आणि त्या पोराचा एक चांगला पोशाख स्वतःसाठी तात्पुरता कबूल करून घेतला होता. त्याला दिसलं की, त्या सहा महिन्यात किंवा जो काही वेळ गेला असेल त्यात ती नगरी पुन्हा जशीच्या तशी झाली होती. त्या दोघांनाही माहीत नसलेल्या अनेक गोष्टी त्यांनी यावेळी पाहिल्या. तुदिलतनू बामण, पूजा-अर्चा, व्रते-उद्यापने, मिष्टान्नभोजने यांची रेलचेल होती. सहा महिन्यांआधी उडालेल्या हाहाःकाराच्या कोणत्याही खुणा तिथं शिल्लक नव्हत्या. पाटलाच्या मुलाने गावच्या मालकांचे नाव सांगून चौकशी करत त्यांच्या घराचा पत्ता सुद्धा शोधला. तिथल्या चाकरांनी त्यांची व्यवस्था एका धर्मशाळेत केली. कुणब्यांसाठीची ती धर्मशाळा यथातथाच होती. पण तीही त्यांना आरामदायी वाटली. काहीही कष्ट न करता अन्न मिळणे यासारखी त्यांना सर्वस्वी अपरिचित असलेली चैन तिथं होती. तिथून परतल्यावर गावी शिरपतीला आपल्या बापाची बोलणी खावी लागली. माराचे बोलण्यावर निभावले हेही कमी नव्हते. बापानं वृत्तात समजावून घेतला. पोरगा नजर उघडी करून आला, याचं त्याला बरं वाटलं. म्हणाला, 'आता नायी सांगतानी आसं जायाचं नायी. त्या मेंढ्या पक त्यांची किती बेंबळ झाली. त्यानला आमचा आनभाव नायी, तुपला लळा हाये. ही बात निदानशिनी डोक्यात घ्यायची व्हती त्वा.'

शिरपतीची नजर उघडी झाली होती, असं म्हणायला नक्कीच वाव होता. त्याच्या मेंडक्या नजरेत ती नगरी, तिथली माणसं, त्यांच्या हवेल्या; हे सगळं डोळे दिपवून टाकणारंच होतं. पण त्या कुणब्यांच्या धर्मशाळेत आणि इतरत्र त्याला आणखी पुष्कळ माहिती मिळाली होती. ती सगळीच त्याला नवी होती आणि त्याच्या मनाला गोंधळात टाकणारे अनेक परस्परविरोधी अभिप्राय त्यात होते. दिल्लीचा अलोदिन खिलची आला आणि ती नगरी लुटून गेला याचे कारण रामदेव राजाचा एक परधान हेमाडी नावाचा बामण होता, असा एक अभिप्राय होता. या परधानाने चक्रधर महात्मा नावाच्या साधू-पुरुषाचा छळ केला. त्याचा मारेकरी घालून दिवसाढवळ्या खून केला.त्या पापामुळे हे असे सुखाच्या जागी दुःखाचे दिवस आले आहेत. आणि हे देशाच्या लुटीचे असे जे झाले ते पुन्हा पुन्हा होत राहणार आहे. राजाने फार पाप केले आहे. अलोदिन परत येईल आणि हे राज्य बुडवून टाकील असा त्यांचा पक्का होरा होता. काहींच्या मते हेमाडी बामण हा मोठा ज्ञानी आणि जुन्या धर्माचा अभिमानी होता. त्याने अनेक ग्रंथ लिवलेले आहेत. पूजा-अर्चा, होमहवन यांचा तो अभिमानी आहे. बामणांना भरपूर दानदक्षिणा दिली की पुण्य असते,

यात खोटे ते काय? बामण खुद देव असतात. त्यात काय खोटं हाये काय? ह्यो चक्रधर महात्मा आपला जुना धरम बुडवायला निघाला होता, त्याचा बंदोबस्त हेमाडीनी क्याला, याच्यात त्याची चुकी काय झाली? आवो,त्यो चक्रधर महात्मा दिसायला लई छाकटा होता. निस्त्या बाया काय पण गडीमाणसं सुद्दा पाघळायचे त्याला पघून. राजाच्या दरबाराचे समदे लोकं त्याच्या भजनी लागले होते. त्यांच्या बायका सुद्दा जायच्या. खुद हेमाडी परधानाची एक बाईल व्हती-त्यानी टाखून धिल्यासारकीच व्हती ती. तर अचानिक त्याच्या मनात तिच्या इखी भावना जागी झाली. तेव्हा त्यानी तिला खोंदूखोंदू इचारलं, का आसं आस्तानी आसं कसं झालं? तव्हा ती म्हनली का म्या महात्म्याच्या तोंडातला नागवेलीच्या पानाचा उष्टा इडा खाल्ला. याच्यानी आस करता आस झाल. आता, तुम्ही सांगा, याच्यानी मानसाचं टकुरं फिरन का हाईन? आणखी काहींच्या मते, चक्रधर महात्मा चांगला माणूस व्हता. त्यो दिसायला गोमटा होता, याला त्याचा काय इलाज? पण त्यो सोपा धरम सांगत व्हता. पूजापाठ, दक्षिणा, निवदबोणे यांची गरज नायी. बामणांला दान देऊन पुण्य मिळत नायी. देवाच्या संबुर समदे सारके हायेत. चक्रधर महात्मा स्वोता खुद देव होता आन त्यो माणसाच्या जल्माला आल्याला व्हता. यान्ही कैक त्याची चोंगी कापली तर ती परत जागच्या जागी जावून बसायची. मंत्रं घातले, भानामती केली. कायच उपेग झाला नायी. मंग यांनी त्याला कापला. तरी त्यो मेला नायी. गपचिप उठून त्यो तिकडं वरलीकडल्या मुलखाला गेला. त्याला बोल्हावनं आल्याबिगर त्यो जात नायी. त्या अलोदिन राजाला सुद्दा त्यानीच पाठुल्ला आसल. काहींचं म्हणणं असं होतं की, हा रामदेव काही फार चांगला राजा नाहीय. याच्या आंधी महादेव नावाचा राजा व्हता. त्यो याचा चुलता व्हता. ह्यो नाच्ये लोकांचा पोशाक केलेली टोळी घेऊन त्याच्या दरबारात घुसला. आन ऐन वेळेला तलवारी काढूनसनी यानी गादी ताब्यात घेतली. राजा महादेवाचा आमणदेव म्हणून एक मुलगा व्हता. यानी त्याचे डोळे उपसून कहाडले. ह्या काय पुण्याच्या गोष्टी हायेत? आन ह्यो हेमाडी पंडित बामण याच्या संगतीच व्हता. त्याचीच आक्कल व्हती समद्यात. त्यो महादेव राजाच्या चाकरीत आधी व्हता ना! त्याच्यानीच ह्या बामणाला परधान क्याल्याला हाये. ह्या दोघांची सांगड व्हती. आन ह्यो रामदेव काय राज्य चालितो? त्याचे रंगढंग चाल्लेत. लोकांचं त्याला कायच घ्यानंद्यानं नायी. लढाई करनारे मोठमोठे शेनापती, आक्कलवान बामणं याला सोडून गेलेत. हायेत ते समदे पलशे आन पाताने. ते काय करणार? त्यो अलोदिन राजा आला आन यान्ला पार उताने च्या पाताने करून गेला.

ही सारी चर्चा आणि मतमतांतरं शिरपतीसाठी नवी होती. त्या सा-यात त्याची केवळ एक श्रोता हीच भूमिका कायम राहिली. त्याला हे कोणतेच लोक माहीत नव्हते. हेमाडी पंडित बामण, रामदेव राजा यांना त्याने पाहिलेलं नव्हतं. अलोदिन राजाच्या बाजूनी तो लढला होता. पण त्यालाही त्यानं लांबून पाहिलं होतं. चक्रधर महात्मा यांच्या कहाण्या मात्र त्यानं ऐकलेल्या होत्या. तो मोठा सत्पुरुष होता, असं त्यानं ऐकलेलं होतं. त्याच्या सारख्या सत्पुरुषाचा असा छळ केला गेला, हे चांगलं झालं नाही, असंच त्याला वाटलं. पण तेही त्यानं स्वतःशी ठेवलं. एके दिवशी त्याला एक बामण भेटला. झालं असं की, तो गंगा गोदावरीच्या काठी महादेवाच्या देवळात-तिथल्या सभामंडपात-बसला होता. तिथं संथ

वाहणारी नदी, काठांवर उभी निरगुडीची बेटं, रिठे-करंजीची आणि बेल-कवठाची झाडं, त्या पल्याडची आंबा, चिंच, लिंब, बाभळीची झाडं. मोठंच प्रसन्न वाटत होतं त्याला. नदीकाठी घाट आणि ओटे बांधलेले होते. कळकट लाल रेशमी वस्त्र नेसलेला आणि डोईला शेंडी राखलेला एक काटकुळा इसम एका ओट्याजवळ उभा होता. आणखी एक काळा तगडा माणूस त्याच्या शरीराला न शोभणाऱ्या नम्रतेने तिथं लाकडाचे फोडलेले तुकडे आणून टाकत होता. ते चंदनी लाकूड आहे, हे शिरपतीने सहज ओळखलं. त्याचा गंध त्याच्या पर्यंत पोहोचला होता ना! बामणात मयत झाली का त्यांना चंदनाच्या चितेत जाळतात, असं शिरपती ऐकून होता. नदीकाठी आणि महादेवासमोर ओटा म्हणजे ही मयतीचीच जागा हे त्याच्या लक्षात आलं. त्यानं बामणांची मयत कधी पाहिलेली नव्हती. हळूहळू लोक जमू लागले.

नंतर चार खांदेकरी आणि एक मडकं धरी असे नेहमीचे लोक आणि त्यांच्या सोबत आणखी बरेच लोक आले. आवाज, गलका मात्र अजिबात नव्हता. कारण त्यात एकही बाईमाणूस नव्हतं. ह्या लोकांच्यात बाईमाणसं मयतीला येत नाहीत, असं दिसतं, त्याच्या मनात आलं. बाईमाणसांबिगर मयतीला शोभा नाही असा त्याचा खासगी अभिप्राय पडला. च्यायसका, रडणं-गागणं, इवाळणं; काय सुदिक नायी. निस्ती मुक्याची मयत बामणांची; त्याला वाटलं. पण ते तसं नव्हतं, हे थोड्याच वेळात त्याच्या लक्षात आलं. कळकट लाल कापडातला तो शेडीवाला माणूस खड्या आवाजात काय तरी म्हणू लागला. इकडं त्या दुसऱ्या काळ्या तगड्या माणसानं चंदनी चिता कधीचीच रचून ठेवलेली होती आणि काही एक अंतर राखून तो उभा होता. इथं शिरपती जरा गोंधळला. मयत आलीय, चिता रचून झालीय, तर मयत त्याच्याव ठिवून आगीन का देत नायीत हे लोकं ; त्याला प्रश्न पडला. तो शेंडीवाला काय तरी मंत्र म्हणत होता आणि बाकीचे लोक शांत बसून होते. आणि हे असं किती तरी वेळ चालू राहिलं. शेवटी अगदी कंटाळून गेला शिरपती तेव्हा त्या शेंडीवाल्याने त्याच्या समोरचा अग्नी सिद्ध केला. मग आणखी कोणी तरी त्या मयताच्या तोंडाला तो लावला. नंतर इतरत्र. चिता पेटली. कवटी फुटल्याचा आवाज ऐकल्यावर लोक उठले आणि हळूहळू पांगले. तो काळा तगडा माणूस अंतर राखून चितेचं राखण करीत असल्यासारखा बसून राहिला. काटकुळ्या शेंडीवाल्यानं नदीत डुबकी घेतली. ते करताना देखील तो तोंडाने काही तरी म्हणत होताच.नंतर तो देवळाकडे चालत आला.

"काय रे? काय करतोहेस?' शेंडीवाल्यानं शिरपतीला विचारलं. आवाज खजीतला होता. इतक्या काटकुळ्या शरीराला न शोभणारा. 'काय नायी बुवा. सुक्षम बसलो देवाच्या दारी.' शिरपतीची घाबरगुंडी उडाली होती. 'सुक्षेम आहेस हे तर दिसतंच आहे. वेगळाच दिसतोस तू. इतक्या निवांतपणे स्मशानात बसलेला तुझ्यासारखा माणूस मी पाहिलेला नाहीय.' शेंडीवाला हसला. शिरपतीच्या जीवात जीव आला. 'देवाच्या दारी दीपमाळ आसू नायतं मसनवटा- येऊन एकच.' तो म्हणाला.

'हुशार दिसतोस.कोणत्या गावचा? इथला नक्कीच नाहीस.' 'डोंगरकिनी म्हनून गाव हाये. बारीकसं. तिथुल्ला हाये मी.' 'डोंगरकिनी?अरे डोंगरकिनी म्हणजे आता ज्यांचा अंत्यविधी झाला त्यांचंच गाव. त्यांच्याच मालकीचं. तुला माहीत नाही?' 'नाय बॉ-' 'तेही खरंच म्हणा. ते कधीही तुझ्या गावी आलेले नसतील. आणि एरवीही तुझा कशाला संबंध

येणार अशा मोठ्या लोकांशी ; नाहीका?' 'एक माणूस येतो दर वर्षी-' 'तो यांचा माणूस. त्याला ते काम नेमून दिलेलं असतं. अशी खूप गावं यांच्या मालकीची आहेत. आता ती त्यांच्या मुलांच्या मालकीची होतील. राजा रामदेवाची कृपा आहे. ब्राह्मणांना दानधर्म करण्यात त्याचा हात धरणार या पृथ्वीवर कोणीही नाही. तशी काही पातकंही झालीत राजाकडून. म्हणजे बाकी काहीही केलं असतं तरी चाललं असतं. पण ब्रह्महत्या म्हणजे घोर पातक. त्याला क्षमा नाही. ती त्यानं आततायीपणे केली. वेदांनी उक्त केलेला धर्म टिकला पाहिजे, असंच ते सांगत होते. त्यात गैर ते काय होतं? पण तेव्हा रामदेवाला आपला तोल सांभाळता आला नाही. सगळे विद्वान ब्राह्मण सोडून गेलेत त्याला. आणि वैदिक धर्माभिमानी क्षत्रिय सुद्धा. या अल्लाउद्दिन खिलजीच्या स्वारीनंतर आता त्याच्या ते लक्षात आलंय, हे त्यातल्या त्यात बरं. ते सुद्धा प्रधान हेमचंद्रानं लक्षात आणून दिलंय म्हणून. बाकी सगळे पळशे ब्राह्मण अन पाठारे लोक- अरे पण तू सुद्धा पाठारेच आहेस ना! म्हणजे पाठारे काही वाईट लोक नाहीत. क्षत्रियच आहेत. पण आचार क्षत्रियांचे नाहीत. आता तुझंच घे, आहे का यज्ञोपवित तुझ्या अंगावर?' 'ते काय आस्तंय?' 'ते हे.' आपल्या यज्ञोपवीतावरून हात फिरवत त्यांनी दाखवलं. 'जानवं हाये ते.तुमच्या बामण लोकांचं आसतंय-' 'अरे! क्षत्रियांनी सुद्धा उपचारपूर्वक परिधान करायचं असतं ते. तुम्हाला तुमचा धर्म माहीत नाही. त्याला कोण काय करणार?'

'मपला काय समंद? मी तर मेंडका.' 'हीच तर गंमत आहे.अरे बाबा, तुझं सगळं गावच मुळात पाठारे जातीच्या लोकांचं आहे, हे तुला माहीत नसेल, पण मला आहे. आणि पाठारे सारे क्षत्रिय आहेत. तुम्ही ते संस्कार सोडलेत, ही गोष्ट खरी, पण रामदेवाचं राज्य आज तुम्हा लोकांच्या बळावरच चालू आहे.'

'आपल्याला तर काय कळानी झालंय बॉ. बरं, हे- ज्यांची मयत झाली ते तुमचे नाथेवाईक-'

'छे, छे रे बाबा ते माझे यजमान. ते उच्च कुलीन ब्राह्मण. मी किरवंत."

'ते काय आस्तंय?' "तुझा हा प्रश्न मोठा छान आहेय रे! नाव काय तुझं? मला आवडलास तू?' 'शिरपती.' 'श्रीपती-असं बघ, म्हणजे मी सगळं सांगतो तुला.' शेंडीवाल्या काटकुळ्या किरवंताने त्याच्या शेजारी बैठकच मारली. 'पन मपलं नाव तर शिरपती-' 'असूदे, असूदे- तर त्याचं असं आहे श्रीपती, नाही शिरपती....' त्या शेंडीवाल्या काटकुळ्या किरवंत भटजीचं नाव अंबादास. सगळे त्याला सहसा दासोभट म्हणतात. कुलीन ब्राह्मणांच्या अंत्यविधीसाठी किरवंतांची योजना असते. म्हणजे ते ब्राह्मणच. पण हलक्या जातीचे. त्याचं दुःख भटाला आहे. पण आपण जे बदलू शकत नाही, त्याचा मनःपूर्वक स्वीकार करणं त्याला श्रेयस्कर वाटतं. वेदकाल किवा त्याच्या आधीपासून हे असंच चालत आलंय आणि याच्या बळावरच आपले लोक टिकून राहिले आहेत, असं त्याचं म्हणणं. जन्मानुसार आपल्या वाट्याला जे कर्म आलंय, ते लीनबुद्धीने आचरल्यास पुढचा जन्म मानवी प्रजातीत आणि श्रेष्ठ आचारांती कुलीन ब्राह्मण ज्ञातीत मिळू शकतो, ही दासोभटजीची श्रद्धा आहे.

मागच्या जन्मी माझ्याकडून काहीतरी कुकर्म घडलं, म्हणून मी या जन्मी किरवंत झालो आहे. समोर बसलेला तो मसणजोगी ज्ञातीतला बळकट माणूस बघितलास, त्याच्याकडं उत्तम शरीर आहे. पण ते फक्त सेवेच्या उपयोगाचं. याला त्याचा किंवा आणखी कोणाचा

काहीही इलाज नाहीय. तू क्षत्रिय म्हणून जन्माला आलास. पण त्याचे संस्कार नाहीत. सबब तू शूद्र. अर्थात सध्या तुम्हाला असं म्हणण्याची कोणाचीही प्राज्ञा नाहीय, तो भाग वेगळा. पण, तुला सांगतो, या पृथ्वीवर ब्राह्मण म्हणून जन्माला येणं यापरतं भाग्य नाहीय. ते भूलोकीचे देवच असतात. त्यांची सेवा करणं, त्यांना दान करणं हे सर्वोच्च पुण्य. त्या पुण्यामुळेच हे भूमंडळ स्थिर आहे. अन्यथा त्याची कधीच वाट लागली असती. हा चक्रधर पाखंडी होता. त्याच्या बोलण्याने प्रभावित होऊन लोकांनी देवळातली रुद्रलिंगे उपसून फेकली कैक ठिकाणी. केवढा अनर्थ! केवढा अधर्म! ब्राह्मणांना दान करण्याने पुण्य मिळत नाही म्हणायचा. राजाच्या दरबारातले मानकरी त्याच्या कच्छपी लागले. राजस्त्रिया त्याला भजू लागल्या. तो आपला धर्मच संपवायला निघाला होता. त्याला संपवणं आवश्यक होतं. असे पाखंडी खूप वेळा होऊन गेलेत. तरीही आपला वैदिक धर्म टिकला आहे....'दासोभट अखंड विनाविक्षेप बोलत राहिला. इतका सश्रद्ध श्रोता त्याला याच्या आधी कधी मिळाला सुद्धा नसेल.

दासोभटाने सांगितलं ते सगळं शिरपतीला कळलं, असं अर्थातच नव्हतं. पण त्याच्या मनातली बरीवाईट; जी काही असेल ती तळमळ त्याच्यापर्यंत नक्कीच पोहोचली. देवधर्म, रीतीरिवाज, जी काही आपल्या पूर्वजांनी घालून दिलेली रेघ आहे, ती राहिली पाहिजे, असंच त्याचं म्हणणं. ते शिरपतीला पटलं. देवच देवळातून फेकाटून द्यायचा ही चक्रधर महात्म्याची रीत त्याच्या मनाला पटली नाही. आवो, देव नायी म्हंजी पाउस नायी. मंग मेंढ्यांनी काय खावा? आन माणसांनी कसं जगावा? ही उलटी गोष्ट कायीच कामाची नायी, असा त्याचा खासगी अभिप्राय पडला. मुख्य म्हणजे त्या दोघांची त्या एका भेटीतच चांगली मैत्री झाली. बाकी पाठारे अन क्षत्रिय, राजधर्म, यज्ञोपवित या गोष्टी त्याच्या डोक्यावरून गेल्या. छ्या, छ्या, आपुन मेंडके. जे हाये ते बरुबर हाये. भटाच्या बाडा भटाला लखलाभ. पन मानुस मातर एकदम भारी, शिरपतीला वाटलं. या प्रतिष्ठान नगरीत पुन्हा आलास को अवश्य भेट. अन तुला चालणार असेल तर माझ्याकडे राहायला ये. दासोभट म्हणाला. न चलायचं काय कारन? शिरपतीच्या मनात आलं. ते त्यानं बोलून सुद्धा दाखवलं. अरे बाबा, तुम्ही क्षत्रिय. आम्ही ब्राह्मण असलो तरी किरवंत. तुमच्या पुढे हलके!

'छ्या, छ्या आमच्या गावात तशी भास नायी,' शिरपती म्हणाला.

2

शिरपती पैठणहून डोंगरकिनीला परतला आणि त्याचा नित्यक्रम आधीच्या पानावरून पुढच्या पानावर सुरळीत सुरू झाला. ज्ञानात भर पडली. पण ती केवळ माहितीची होती. त्याच्या जगण्यात त्यामुळं काय फरक पडणार? कधी तरी त्याला दासोभटाची

आठवण येई. पण तेही काय खास नव्हतं. तो आणि त्याच्या मेंढ्या हीच त्याची खरी आणि रोकठोक दुनिया होती. आणि त्याच्यासाठी ते फार आनंदाचं होतं. मेंढ्यांशी होणारा रोजचा संवाद त्याच्यासाठी अनमोल होता. अगदी गावातली माणसं, संभाषणं, रीतीभाती, शेतीवाडी या सुद्धा त्याच्यासाठी दूरच्या गोष्टी होत्या. तशा वेळा आल्यास शब्दांचा मितव्यय करण्यावर त्याचा भर असे. अगदी शेतकामात सुद्धा त्याचा जीव रमत नसे. रानातलं खुरटं गवत, मेंढ्यांच्या सुबक हालचाली, त्यांचं निर्भर चरणं, जन्मणारी कोकरं, त्यांची देखभाल, संध्याकाळी सगळ्यांना परत आणून त्यांना वाडग्यात कोंडणं. बस्स... सुख म्हणजे यापेक्षा अधिक काय असू शकतं? दुनियेच्या अंतापर्यंतचं समजा सोडा, पण त्याच्या स्वतःच्या मृत्यूपर्यंत हे असंच चालू राहिलं असतं तरी त्याला त्याची हरकत नव्हती. किंबहुना हे असंच असणार, हे त्यानं गृहीतच धरलेलं होतं.

पण ते तसं झालं नाही. ते तसं व्हायचं नव्हतं. एक वळण आलं. अन ते इतक्या हळुवारपणे आलं की त्यातून आपलं जगणंच बदलणार आहे याची पुसटशी चाहूल सुद्धा त्याला लागली नाही. घडलं ते अगदी साधं, काहीसं वेधक होतं. त्यातून खास काही निष्पन्न होईल असं ते नव्हतं. झालं असं की एक दिवस तो नेहमीसारखा आपल्या मेंढ्या घेऊन रानात गेलेला होता. दिवस उन्हाळ्याचे होते. दुपारची वेळ असल्यानं सूर्य आग ओकत होता. शिरपती एका झुडुपाच्या सावलीच्या आसऱ्यानं पहुडला होता. मेंढ्या सुद्धा खुरट्या गवताला शोधताना जमिनीच्या तापानं नाक तोंड पोळून भेंडाळून गेल्यासारख्या इथंतिथं घोळके करून बसलेल्या होत्या. अगदी वारासुद्धा स्तब्ध होता. दूर डोंगरांच्या रांगात उन्हाच्या हलत्या लाटा सहज दिसत होत्या. पण त्या पाहण्याइतका तवाका ना मेंढ्यांमध्ये उरला होता ना शिरपतीत. अशा बव्हंशी स्तब्ध चित्रात दूरवरून थोडीशी हालचाल दिसली, तेव्हा उन्हात होणारा भास म्हणून त्यानं त्याकड दुलेक्ष केल. पण हलणारं जे काही होतं ते जसजसं निकट येऊ लागलं, तसतसा तो भास नाहीय हे स्पष्ट होऊ लागलं. हलते आकार स्पष्ट होऊ लागले. शिरपतीच्या लक्षात आलं, की तो एक मेणा होता. उघड्या अंगाने त्याला तोलून धरत चार भोई चालत होते. नंग्या तलवारी हातात धरून पुढे दोन आणि मागे दोन असे सैनिकवजा मनुष्य जबाबदारीने चालत होते. सरळच होतं. कोणातरी मानकऱ्याची घरची माणसं-बाईमाणूस आत बसलेलं असणार. जातात ते लोक असे रस्त्यानं.शिरपतीला वाटलं, पण इतक्या उन्हात ते सहसा जात नाहीत. त्याच्या मनात आलं, इतक्या जलदीचं काय निघालं आसन बॉ? पन जाउंद्या, आपल्याला काय त्याचं? त्यांच्या रस्त्यांनी ते जातीन. तरीही अंग आवरून तो उठून बसला. पण मग त्याच्या विखरून बसलेल्या मेंढ्यांच्या कळपाच्या अगदी जवळ येऊन मेणा थांबला. इतकेच नाही तर मेंढ्यांचा एक जथा ज्या खुरट्या सावलीला बसलेला होता, तिथंच त्या भोयांनी तो टेकवला, म्हणून मेंढ्या तिथून हलल्या. तलवारी हाती घेतलेले ते चार लोक चारी बाजूंनी मेण्याकडे पाठ करून उभे राहिले. भोई चालत जाऊन दूर अंतरावर थांबले.हे चाललंय काय, हा मेणा अशा आडरानात का थांबलाय? शिरपतीला कळेना. भरीत भर म्हणजे कापडात झाकलेलं काहीतरी हातात धरून एक बाई तिथून निघालेली त्याला दिसली. आणि भयंकर म्हणजे ती त्याच्याच दिशेने येतेय हे त्याला जाणवलं. अरे बापरे! ही मोठ्या घरची बाई इकडं कशासाठी येतेय? शिरपतीनं स्वतःकडं पाहिलं. अंगात बंडी अन कमरेला

लंगोटी. त्याचा नेहमीचा पोशाख. उन्हापासून डोकं राखण्यासाठी एक चिंध्यावजा मुंडासं त्यानं सोबत आणलेलं होतं. ते त्यानं कसंबसं भराभर कमरेला गुंडाळलं. तो उठून उभा राहिला. त्या बाईच्या हातात लहानसं बाळ होतं, हे त्याच्या लक्षात आलं. तो पुढे झाला आणि त्याने सरळ तिच्यासमोर दंडवत घातला. मोठ्या घरचं बाईमाणूस. रीतच होती तशी.

'उठ, उठ. त्याची गरज नाहीय. मालकीण तिकडं मेण्यात बसलेली
आहे.' बाई म्हणाली.

'मंग तुम्ही-'

'मी दासी आहे त्यांची. गाव किती दूर आहे इथून? पाणी मिळेल
इथं कुठं?'

'ते तिकडं गाव.' शिरपतीने हाताने संकेत केला. दूरच होतं ते.
रानापासून जितकं दूर असावं तितकं.

'पानी पन लांबच हाये. कोनाला- बाळ आज्यारी हाये?' 'आमच्याकडं पाणी नाहीय.'

'मी लगीच घेऊन येतो. तुमी बसा इथं जराशिक सावलीला.' म्हणत
शिरपती हातात चरवी घेऊन पळत निघाला.

उन्ह होतं. घाईत पायात पायताण घालायचं राहून गेलं होतं. नाहीतरी पळताना त्याची अडचणच झाली असती. कमरेला गुंडाळलेलं मुंडासं मध्ये मध्ये येऊ लागलं. ते त्यानं सुरक्षित अंतरावर आल्यावर काढून टाकलं. पाय पोळत होते. पण त्याला त्याची तमा नव्हती. इतकं लहान बाळ. उन्हात तहानलेलं. अगदी सुकलेलं दिसत होतं. दुखुदुखूच आसनार. पळ शिरपती पळ.

तो पाणी घेऊन घामाघूम तिच्यासमोर उभा राहिला. ती त्या बाळाचं डोकं हलके हलके थोपटत होती. तिनं नजर उचलताच त्याची नजर झुकली.दासी-बटकी होती म्हणून काय झालं? परकी बाईच होती ना! तिनं पाण्यात बोट घालून हलक्या हातानं बाळाच्या ओठावर फिरवलं. त्याचे ओठ विलगले. ते क्षीण हसलं. त्याच्या ओठाशी पाण्याचे थेंब धरताच ते चुटूचुटू चाटू लागलं.

'दूध मिळेल थोडं ? त्याला भूक पण लागलीय.'।

'त्याला काय तोटा? कैक दुभत्या मेंढ्या हायेत. पण त्याला चलन
का ते? त्याची आई-'

'त्याची आई मेण्यात बसलीय. ह्या मोठ्या लोकात बाया त्यांच्या बाळांना अंगावर पाजीत नाहीत. अन हे बाळ कोणत्याही दाईच्या बोंडाला तोंड लावायला तयार नाहीय. कैक चार-पाच दाया झाल्या. कापसाच्या बोळयानं मी गायीचं थोडं पाजतेय.'

'दाई कोण आसतीय?' 'गरीब ओली बाळंतीण. तिनं पाजायचं असतं.' 'आन तिच्या स्वोताच्या बाळाला?'

'त्याचा कोण विचार करतंय? ते जाउदे. मला जरा दूध दे
याच्यासाठी.'

'जरा कशापायी, आख्खी चरवी भरून देतो. मंग पाजा कापसाच्या
बोळयानी.' शिरपती उठला आणि मेंढ्यात शिरला.

"ए ऽऽ टिक्के ऽऽ चाल इकडं व्हय.' त्यानं आवाज दिला. तर लगेच ती टिक्की नावाची मेंढी आज्ञाधारकपणे त्याच्या निकट येऊन उभी राहिली. बाळाला मांडीवर घेऊन सावलीत बसलेली ती दासी स्त्री बघत होती. 'हा ऽऽ, चाल इकडं मपल्यासंगती.', तो म्हणाला आणि मेंढी त्याच्यासोबत चालू लागली.ती रंगानं काळी आणि प्रौढ होती अन तिच्या कपाळावर पांढरा टिक्का होता. म्हणून ती टिक्की. शिरपती सावलीत येऊन उभा राहिला. टिक्की त्याच्या शेजारी. त्यानं चरवीतल्या पाण्यानं तिची कास स्वच्छ धुवून काढली. टिक्की शांत उभी होती. ती स्त्री अचंब्यानं बघत होती. त्यानं तिच्या सडांना हात घालून धारा काढायला सुरुवात केली. टिक्की समझदारपणे उभी होती. त्याची त्या स्त्रीशी नजरानजर झाली. तो बारीकसं हसत म्हणाला, 'लय

समाजिक हाये आमची टिक्की.

"तुझ्या बाकीच्या मेंढ्याही अशाच आहेत?' तिनं विचारलं. 'आशाच हायेत. पन इकत्या आनभाविक नायीत. ही वयस्कार हाये. आन इचं दूद पन लय ग्वाड. तुमच्या बाळाला आवडन.' हे बोलताना शिरपतीला आठवलं, आपण कैक वेळा या टिक्कीच्या सडांना तोंड लावून दूध प्यालेलो आहोत. त्याला वाटलं, या बाळाला सुद्धा ती तसं नक्कीच पाजील. अन तसं त्यानं केलं तर ते सगळ्यात चांगलं. दूध ओढताना बाळाच्या गळयाच्या शिरा मोकळ्या होतील.

'तुम्ही बाळाला मपल्याकडं देता? मी त्याला सरळ ह्या टिक्कीच्या सडाला लावून पघतो. ती कायच आडचन नायी. तसं केलं त बाळाला ज्यास चांगलं. पघा बॉ-'

बाईचा बाळावर जीव होता. ती त्याची आई नव्हती अन दाई सुद्धा नव्हती. पण त्याची देखभाल करत असताना तिचा त्याच्यावर जीव जडलेला होता. पुरेसं दूध पोटात जात नसल्यानं बाळ आजारलेलं होतं. त्याच्या हट्टीपणाचं कोणालाही काही कळेनासं झालेलं होतं. अगदी वैद्यांनी त्याच्यापुढं हात टेकले होते. ते जिवंत होतं पण नाजूक होतं. हे काहीही सांगायची ती वेळ नव्हती. आणि सांगितलं तरी शिरपती त्यात काय करणार? त्यापेक्षा काय हरकत आहे? होऊन होऊन काय होईल? वाईट तर काहीच नाही. प्यायचं नसेल तर बाळ पिणार नाही. संपला प्रश्न. ती मेंढी आणि तो मेंढका यांच्यामधल्या नात्याचा चमत्कार ती समोर अनुभवत होती. तिनं एकवार समोर दूर असलेल्या मेण्याकडं नजर टाकली. मेणा स्थिर होता. शिपाई स्थिर होते. भोई आणखी दूर उभे होते. इतक्या दूर काय चाललंय ते स्पष्ट काय दिसणार? आणि दिसलं तरी वेळ नेता येईल मारून.

'हां, घे. बघ जमलं तर.' ती तातडीच्या स्वरात म्हणाली.

मेंढीच्या नवजात किंवा अगदी लहानग्या कोकराला तो जितक्या प्रेमानं आपल्या छातीशी धरत असे तितक्याच प्रेमानं त्यानं त्या बाळाला जवळ घेतलं आणि आधी त्याला टिक्कीच्या तोंडासमोर धरलं. आपल्याला काय करायचं आहे हे तिला कळावं म्हणून कदाचित. टिक्कीनं आपलं नाक पुढं करून बाळाचा वास घेतला. बाळाच्या डोईवरून हलकेच हात फिरवत, त्याला गोंजारत त्यानं त्याला तिच्या आचळांजवळ नेलं. एका हातानं हलकेच तिचं एक सड त्याच्या ओठांजवळ नेलं. टिक्की मेनकाशी होती. लोडथानी नव्हती. बाळानं एकवार डोळे उघडले. ते सूक्ष्म हसलं आणि डोळे झाकून त्यानं स्तनपान सुरू केलं. टिक्की शांत स्तब्ध स्वतःच्या कोकराला स्तनपान देत असल्यासारखी उभी होती.

आणि जागत्या डोळयांनी चमत्कार अनुभवताना त्या स्त्रीची छाती तटतटून आली होती.

शिरपतीच्या नजरेत सुद्धा तो चमत्कारच होता. बाळाचं मनसोक्त दुग्धपान झाल्यावर त्यानं बाळाला त्या स्त्रीच्या हवाली केलं. टिक्कीच्या डोक्यावर मायेनं हात फिरवला. आणि पुन्हा आणखी दूध काढण्यासाठी तो बसला. मेंढीच्या कासेत दूध असून असून ते किती असणार? पण बाळाचं पिऊन झाल्यावरही बरंच निघालं ते. टिक्कीचा अपवादात्मक आणि समजूतदार पान्हा. दुसरं काय? आणखी एखाद्या मेंढीला आणून चरवी भरावी, की एवढंच ठीक राहील? भेसळ नको, बाळानं हे प्यायलंय तर हेच द्यावं.

'बास का?' त्यानं विचारलं. 'हां, पुष्कळ झालं. चल.' 'मी येऊ मेण्यापर्यंत, चरवी घेऊन?' 'चल.'

ती खड्या पहाऱ्यात आत गेली. तलवारधारी भावविहीन मुद्रेने उभे होते.शिरपतीला त्यांची भीती वाटली नाही. काय चाललंय हे त्यांनाही दिसतच होतं की! चेहऱ्यावर भाव उमटू न देता जगणं हा त्यांच्या कामाचा भागच असतो. आत मालकीण बसलेली असणार. मघाशी आपण चुकून दासीला दंडवत घातला. आता आतली मालकीण आपल्याला दिसत नसली तरी ती आपल्याला बघत असणार. चला, तिला दंडवत घालू आणि निघू, असा विचार करत त्यानं जमिनीवर लोळण घेतली. आणि उठून बंडी-लंगोटीसह

आल्या पावली तो परत निघाला.

'अरे ए ऽऽ...', त्याच्या पाठीवर हाक आदळली.

त्याचं नाव त्या दासीला माहीत नव्हतं. घडलेल्या प्रसंगात नावांच्या

देवाण-घेवाणीची गरजच पडलेली नव्हती.

'काय?' तो थबकला.

'मालकीणबाईंनी हे दिलंय तुला.' तिनं तिच्या हातातलं नाणं

त्याच्यासमोर धरलं.

'छ्याऽऽ, छ्याऽऽ आज्याबात नायी. ते काय इषयच नायी.' 'घे. अरे, त्यांना वाईट वाटेल.'

'वाटूंदे.' तो वळला. मेण्याकडं तोंड करून त्यानं हात जोडले आणि आपल्या मेंढ्यांच्या कळपाचा रस्ता धरला.

जे झालं ते इतकं वेधक होतं की एरवी कोणाशीही फारसं न बोलणारा शिरपती गप्प राहू शकला नाही. रात्री त्याला जेवू घालणाऱ्या, त्याला ते वाढणाऱ्या त्याच्या आईला त्यानं ते यथासांग आणि रंगवून रंगवून सांगितलं. त्याची बायको यमी ते कानांमध्ये प्राण आणून ऐकत असणार याची त्याला खात्री होती. त्याची आई त्याच्या बापाला हे सगळं सांगणार याची त्याला खात्री होती. पण तो जे सांगत होता, त्याचं त्याच्या आईला काडीचंही आश्चर्य वाटलं नाही, तिनं तसं म्हटलं किंवा दाखवलं नाही, याच्यामुळं तो खटू झाला. टिक्कीचं त्याच्याशी वागणं त्याच्या आईला आश्चर्यकारक कसं वाटणार? कारण मेंढरांशी त्याचं असलेलं नातं त्याच्या आईला अजिबातही अपरिचित नव्हतं. आणि बाकी ते मेण्यातली बाई, ती दासी किंवा बटकी-ते काय, येत जात असतातच. आपल्या भाबड्या मुलानं त्या बाईनं देऊ केलेलं नाणं खुशाल नाकारलं, याचं त्या माऊलीला अधिक दुःख वाटलं. ते किती किमती असणार याचा ती केवळ अंदाज करू शकत होती. ते असं दवडणं गरीबाला परवडणारं नव्हे, हे तिला कळत होतं. पण ती तसं बोलली नाही, हा तिचा

चांगुलपणा. हे काहीही आपल्या नवऱ्याला, म्हणजे शिरपतीच्या बापाला सांगायचे नाही असं त्या माऊलीन ठरवून टाकलं. कारण तसं केलं तर तो या पोराला बोल लावणार, कदाचित त्याच्या अंगावर हात टाकणार अशी शक्यता तिच्या मनात उगवली होती. यमी अबोल. ती कुठं बोलणार? पण मनातल्या मनात तिला वाटलं, हा असा पुरुष आपला नवरा आहे, ही किती श्रेष्ठ गोष्ट आहे. अर्थात तेही या शब्दात नव्हत. तिला त्याचा अभिमान वाटला, जो कायम अव्यक्त राहणार होता. सासू-सासऱ्यांदेखत नवऱ्याच्या समोर जायचं नाही, शय्येत सुद्धा त्याच्याशी बोलायचं नाही, हा रिवाज ती पाळणार होती. तरीही तिला जे वाटतं ते शय्येतल्या अबोल स्पर्शातून त्याच्यापर्यंत पोहोचेल याची तिला खात्री होती. आणि ती तिच्यासाठी अतीव समाधानाची गोष्ट होती. पण शिरपती त्याच्यापुरता या अनुभवानं इतका खट्ट झाला की आणखी कोणाशी ते बोलायचं नाही, असं त्यानं तात्काळ ठरवून टाकलं. एरवीही स्वतःच्या गोष्टी इतरांना सांगणं, हा त्याचा स्वभाव नव्हता. त्याच्या मेंढ्या ह्याच त्याच्या हृदयाच्या सगळ्यात निकटच्या. त्यांच्याशी संवाद हा त्याच्यासाठी परमोच्च आनंद. दुसऱ्या दिवशी आणि पुढचे अनेक दिवस, त्या दिवशी तू किती छान वागलीस असं तो टिक्कीला अनेक प्रकारे शब्दांमधून, स्पर्शामधून सांगत राहिला. स्वतःचा आनंद वाटून घेण्याचं समाधान त्यात त्याला पुरेपूर मिळालं, हे थोडकं नव्हे. ते घेऊन आयुष्य पुढे नेत राहाणं यातच जगण्याचा खरा आनंद असतो. जगण्यातली श्रीशिल्लक होण्याइतक्या सुंदर गोष्टी असतात त्या. पण ते सगळं नंतर. शिरपतीच्या जगण्यात त्याच्या नकळत काळाची एक गुठळी होऊन गेली होती. ती इतकी हळुवार होती की ती तशी झालीय हे त्याला जाणवलं सुद्धा नाही. एक वळण आलं होतं. ते त्याला जाणवलं नाही. सहसा कोणालाही ते जाणवत नाही. शिरपती तर बिलकूल सीधा माणूस. त्याला कुठून ते जाणवणार? पण मग एके दिवशी गावात तो दरवर्षी येणारा तुंदिलतनू भिकबाळी घालणारा बामण उगवला. वसुलीला येणारा, मानकरी यांचा माणूस. आणि तो अवेळी उगवला. सुगी संपली की तो यायचा. तो येऊन गेल्याला फार दिवस झालेले नव्हते. या भाजणाऱ्या उन्हाच्या काळात तो कधीही आलेला नव्हता.तो घोड्यावर बसून आला आणि सोबत आणखी एका घोडेस्वाराला घेऊन आला. साहजिकच सगळ्या गावाचा थरकाप झाला की बुवा हे आहे काय? हा कोणतं संकट घेऊन आलाय? तो आला आणि पाटलाला म्हणाला, आपल्या गावात मेंडके किती? असतील त्या सगळ्यांना बोलवा. मेंढपाळ एकूण सात-आठच होते. ते सगळे जमले. त्यात शिरपती अर्थातच होता.

'आठ दिवसांआधी रस्त्याने जाणाऱ्या मेण्यातील लहान बाळाला
तुमच्यापैकी कोणी दूध पाजलं?' त्यानं खणखणीत स्वरात विचारलं.

सर्वत्र स्तब्धता. हवा सुद्धा हलत नव्हती. मेंढपाळ आणि बाकी बघ्ये सगळे गप्प. कोणीच पाजलेलं नव्हतं, शिरपतीखेरीज. ते एकमेकांच्या तोंडाकडं बघू लागले. शिरपतीचं हृदय लक्कन हललं. बाळाला काही त्रास झाला? ते गेलं? अरे, पण त्यानं तर किती चुरूचुरू पिलं दूध.

'दुपारच्या वेळी त्या मेण्यातल्या बाळाचं तोंड थेट मेंढीच्या सडाला लावून कोणी दूध पाजलं?' बामणाचा पुन्हा खणखणीत स्वर. मेंडके गप्प. शिरपती गप्प. झालं काय बाळाला?

'हे बघा, घाबरू नका. ज्यांच्या बाळाला दूध पाजण्यात आलं, ते मानकरी आपल्या मालकांच्या निकटचे मित्र आहेत. ते बाळ दुखणाईत होतं. पण या दुधानं त्याच्या प्रकृतीत खूप फरक पडलाय. एका चरवीत आणखी दूध तुमच्यापैकी ज्या कोणी दिलंत ते दोन दिवसांआधी संपलं.' बामण मऊ स्वरात म्हणाला.

'अरे ती चरवी आण रे इकडे.' त्यानं त्याच्या सोबत आलेल्या

घोडेस्वाराला संकेत केला.

शिरपतीचा जीव भांड्यात पडला. चरवी पाहताच तिथं असलेला त्याचा बाप जोरात ओरडला, 'ही तं आमचीच हये.'

'तुझी आहे काय? तूच पाजलंस दूध त्या बाळाला?'

'नाय बॉ. आमचा ल्योक मेंडका हये. त्यो काय उभा तिथं. काऽऽ रंऽऽ ए शिरप्याऽऽ बोलायला कोन्ही त्वांड धरलं तुपल्यावालं? मला सुद्दा काय

सांगातलं नाय काय, का आसं करतानी आसं झालं.'

बाप खूष झाला होता. एवढा मोठा बामण, त्याला पाटील सुद्दा टरकतोय, त्यो सांगतो का आसं करतानी आसं. समदं गाव नावजिन याला. आन ह्यो बयताड्या खुशाल ठोंब्यासारका उभा. आरे, चार पैशांच्या

बक्षिसीसाठी तरी बोल चटाक्कीनी, बाप मनातल्या मनात करवादला.

'नाव काय तुझं?' "शिरपती नाव हये त्याचं.' त्याच्या बापानं तत्पर उताविळीनं माहिती

दिली.

'त्याला बोलू दे.' बामणाच्या स्वरातलं वजन वाढलं. 'शिरपती.'

'हां, तर श्रीपती, तू फारच चांगला माणूस दिसतोस. त्या दिवशी

मानकरीण बाईंनी देऊ केलेली सोन्याची मोहोर सुद्धा तू नाकारलीस.'

'आराऽऽ रााऽऽ, हात तुह्याय्ये सका तुह्येऽऽ,' शिरपतीचा बाप

मनातल्या मनात कळवळला.

शिरपतीला दासोभटाची आठवण झाली. त्यानेही आपला अशाच नावानं उल्लेख केला होता, हे त्याला आठवलं. या बामण लोकांच्या बोलण्यात तशी रीतच आसन, त्याच्या मनात आलं. गावात त्याची आई तोंड भरून त्याला शिरपती म्हणत असे. बाप शिरप्या आणि बाकी लोक शिरपा किंवा शिरप्या.

'ती काय तेवढी भारी गोष्ट नव्हती.' शिरपती मृदू स्वरात म्हणाला.

'असूदे, असूदे. हे बघ श्रीपती, मी मालकांच्या आज्ञेनुसार इथं आलोय. मला त्यांनी तुला घेऊन यायला सांगितलंय. हा घोडा तुझा आहे. तुझ्यासाठी पोशाख दिलेला आहे. माझ्यासोबत आलेला हा मुलगा इथं नवा घोडा पैदा करून तुझ्या मेंढीला घेऊन येईल. मानकऱ्यांना त्यांच्या बाळासाठी ती हवी आहे. आपले मालक तुझ्या मेंढीसकट तुला त्यांना भेट करणार आहेत. याच्या नंतर तू मानकरी यांच्या सेवेत रुजू होणार आहेस. अशा मोठ्या लोकांच्या निकट राहण्याची संधी तुमच्यासारख्या गावढ्या लोकांना सहज नसते, याची तुला कल्पना असेल किंवा नसेल, पण मला ती आहे.

तू हा तुझा भाग्योदय आहे असंच समज. आणि हे तुझे वडील-त्यांच्यासाठी आपल्या

मालकांनी या पाच मोहोरा दिलेल्या आहेत.' बामणाचा स्वर ठाम
पण मधाळ होता.

बामनानं तो रंगीत बटवा पुढं करताच शिरपतीचा बाप टुण्णकन उडी मारून पुढे झेपावला. कशाला, कशाला म्हणत शिरपती ते नाकारील या भीतीनं. मालकाची आज्ञा आहे, शिरप्याचं नशीब फळफळलंय. समदं बराबर.त्याच्यात खोट नायी. पन माव्हं काय? मला काय मिळन? असा विचार बामणाच बोलण ऐकत असताना त्याच्या मनात उगवलाच होता. सोन्याच्या पाच मोहोरा म्हणजे फार मोठी गोष्ट. याला म्हणतात नशीब.

शिरप्या तुझं चांगलं व्हतंय. पण त्याच्या संगतीनी तू आमचं सुद्दा चांगलं करून रायलास. काय तर पळीभर दूद पाजलं आसन त्वा त्या पोराला! वाहव्वा जी व्वा!

शिरपतीच्या बापानं बटवा हातात घेऊन बामणाला दंडवत घातला.

'घरी जाऊन तुला आणखी काही घ्यायचं असेल, आईला, बायको
मुलांना भेटायचं असेल, ते करून ये इथं.'

'आवो पन ती टिक्की नायी ना यायची दुसऱ्यासंगती.' शिरपती हळूच म्हणाला.

'ही टिक्की कोण? तिचा काय संबंध?'

'मपल्या मेंढीचं नाव हये ते. तिचंच दूद पाजलं व्हतं त्या बाळाला. ती दुसऱ्यासंगती येणार नायी. आन दुभती हाये ती. तिचं कोकरू लहानं हाये. त्याला घ्यावा लागन.'

'असं का? मग कसं करतोस?'

'मीच घेतो संगती तिला घोड्यावर. तिला माघ पाटकुळी बांधीन
आन कोकराला मोहं पोटाजवळ धोतरात बांधीन अजात.'

'जमेल असं?' 'नायी जमाया काय हये त्याच्यात?' 'ठीक आहे मग.'

3

'मा नकऱ्यांचे नाव केशीराज. उपनाम एडके. ज्ञाती ब्राह्मण, देशस्थ यजुर्वेदी. मूळ क्षेत्र साहाज्यापूर. गोत्र शौनल्य. यांना प्रतिष्ठान नगरीतील विद्यमान अधिपती, सम्राट रामदेवाचे थोरले पुत्र, शंकरदेव जाधव यांच्या कारभारात स्थान नाहीय. काही काळासाठी ते इथे आले असावेत. आपले तृतीय पुत्र बिंबदेव जाधव यांची योजना सम्राटाने उदगीर प्रांती केलेली आहे. तिथे त्यांचे एक क्षत्रिय पाठारे ज्ञातीचे सरदार विद्रुमसेन नामे आहेत. त्यांच्या पत्नीचे नाव गोदावरी असून ते वशिष्ट गोत्री आहेत. त्यांचे उपनाम वाराढकर असे आहे. केशीराज एडके यांचे वडील या सरदार विद्रुमसेन यांच्या दरबारातील दुसऱ्या रांगेतील मानकरी आहेत. म्हणजे मानाने ते तसे अव्वल नसतीलही कदाचित, पण मला जे माहीत आहे त्यानुसार ते कधीही पहिल्या रांगेत जाऊ शकतात. ते ब्राह्मण आहेत. मानकरी आहेत. पहिली सार्वकालिक महत्त्वाची गोष्ट आणि दुसरी सुद्धा

कोणत्याही आयुष्यात महत्त्वाचीच. पहिली स्थिर. दुसरी बदलती. त्यांच्या संपर्कात येणं हे तुझ्यासाठी उत्तम भाग्ययोगाचं लक्षण आहे...' शिरपतीला हे सांगणार कोण? सरळच आहे. प्रतिष्ठान नगरीतील त्याचा एकमेव मित्र आणि हितचिंतक दासोभट. किरवंत दासोभट. धर्मशास्त्रापासून दुनियेच्या सगळ्या व्यवहारापर्यंत इतके ज्ञान आणि माहिती असलेला माणूस शिरपतीनं याच्या आधी पाहिलेला नव्हता. प्रतिष्ठान नगरीत येऊन त्याची व्यवस्था लागल्यावर मिळालेल्या पहिल्या संधीला साधत तो त्यांना भेटला होता.

तो तिथं पोहोचण्याच्या आत त्याची सगळी व्यवस्था लागली होती. तो, त्याची टिक्की, तिचं कोकरू यांची व्यवस्था नगरीलगतच्या एका शेतात करण्यात आली होती. ते शेत नदीकिनाऱ्यापासून फारसं दूर नव्हतं. तिथं हिरवा चारा मुबलक. पण मेंढीच्या तो तितकासा कामाचा नसतो. म्हणजे, ती तो खाते, नाही असं नाही. पण तिला खरी रुची असते ती खुरट्या चाऱ्यात. त्यातल्या अगदी कोरड्या गवतास अग्रक्रम. किंचित हिरवा असल्यास हरकत नाही. जास्त हिरवा क्वचित चालतोही. पण त्याच्या अधिकच्या वारंवार मात्रेने बुळकांडी लागण्याच्या शक्यता वाढतात. हे सगळं त्याला त्या दासीला तिचं नाव सरसोती. मुळची वरंगळ देशीच्या एका लहान्या गावातली. तेलंग कुणबी. आपलं नाव सरस्वती आहे, असं तिनं कितीही सांगितलं तरी त्याला ते उच्चारता येईना. म्हणून सरसोती. शिवाय सरसोती हे नाव त्याच्या ओळखीचं देखील होतं. तर तिला मेंढीच्या आहारविहाराविषयी सांगावं लागलं. कारण एडके मानकरी यांच्या घराशी तीच त्याचा एकमेव संपर्क होती. त्यांना किंवा त्यांच्या घरातल्या आणखी कोणालाही त्यानं पाहिलेलं नव्हतं. ते नगरीत कुठं राहतात, हेही त्याला माहीत नव्हतं. डोंगरकिनीहून घोड्यावर बसून जाड्या भिकबाळीवाल्या बामणासोबत तो सरळ या शेतात आला होता. हे शेत आपल्या मालकांचं आहे. इथं तुझी सगळी सोय करण्यात येईल. जितके दिवस इथं असशील तितके दिवस सारं बिनबोभाट मिळेल. मानकऱ्यांचं सध्याचं काम आणि ते सांगतील ते कोणतंही काम व्यवस्थित कर. त्यात आपल्या मालकांना आनंद आहे आणि त्यातच तुझं कल्याण आहे... अशा प्रकारे आदेश, उपदेश देऊन बामण गेला होता. दुसऱ्या दिवसापासून सरसोती. ती बाळाला घेऊन येई. त्यास टिक्कीचे मुक्त स्तनपान. तेही दोहोकडून आनंदाचे. क्षुधेची भावना होताच बाळाचा रुदनस्वर असे. एरवी खेळणे. सरस्वती दिवसभर तिथेच. मोकळ्या वेळात शिरपतीशी गप्पा. तिच्या बाजूने अधिक. त्याच्याकडून कमी. निदान सुरुवातीला. नंतर भीड चेपल्यावर त्याच्याकडूनही प्रश्न असत. रात्री उशिरा ती जात असे. तेही सुरुवातीस. नंतर असे की बाळास रात्री क्षुधेची भावना झाल्यास उपाय काय, म्हणून रात्रीस तिचा तिथेच निवास. तिला जाण्यायेण्यासाठी मेणा असे. तो आपल्यासारख्या शूद्र दासीसाठी नव्हे, मानकरी यांच्या पुत्रासाठी आहे, हे तिने स्पष्ट केले आणि ते शिरपतीस पटले. अर्थात दासी-बटकीच्या मानाने तिच्या ठायी आत्मविश्वास अधिक आहे, असा त्याचा समज झाला. स्वतंत्र आणि स्वतःच्या काबूत असण्याचं बाई माणसाच्या ठिकाणी क्वचितच दिसणारं तेज तिच्यात होतं. तिच्याशी बोलता-वागताना जपून नम्रतेनं ते केलं पाहिजे हे त्याच्या अनाघ्रात गावठी शहाणपणातून त्याला उमजलं. समोरच्याशी गोड बोलताना सुद्धा त्याला काही एका अंतरावर राखण्याची विद्या तिच्या ठायी होती. एक बाईमाणूस म्हणून मोठ्या लोकांच्या दुनियेत वावरताना तिनं ही विद्या मिळवली असेल

असं त्याच्या मनात आलं. ते त्याच्यासाठी त्रासदायक नव्हतं. सरळ साधा मेंडका गडी. बायकोशी होणाऱ्या नियमित शय्येची आठवण त्याला अर्थातच होई. पण तिच्या जागी आणखी कोणाची कल्पनाही न करण्याइतका तो सीधा होता. तिला ते जाणवलं आणि त्याच्याशी ती अधिक मोकळेपणाने आणि विश्वासाने वागू लागली. तिचा मेणा कधीही येई आणि जाई. हळूहळू टिक्कीला बाळासोबत सरसोतीचीही सवय झाली. सगळ्या गोष्टी यथासांग मार्गी लागल्या. बाळास मनसोक्त दुग्धपान देऊन टिक्की आपल्या कोकरास पुरेसे दूध देऊ शके. तीस ओल्या चाऱ्याची मात्रा अधिक होऊ नये म्हणून कोरडे गवत, कठान-निठान म्हणजे मठ आणि हुलग्याचा पाचोळा ; असे देण्यात येऊ लागले. आपल्या कळपापासून आपण तुटलो आहोत या भावनेचा टिक्कीस त्रास होई. पण तो तर शिरपतीस सुद्धा होतच होता की! त्याने तिला त्या दोघांना समजत असलेल्या भाषेत ते सांगितले. आणि त्या शहाण्या पोक्त मेंढीस ते पटले देखील. आपण एक प्रकारचे राजकर्तव्य निभावत आहोत, यास वेगळा इलाज नाहीय, हे त्याने तिला समजावले. ते तिला समजले. सरसोती, तिच्या सोबतचे बाळ, ती स्वतः, तिचे कोकरू असा आता एक छोटा कळप तयार झाला होता. आणि शिरपती तर होताच. अत्यंत समजुतीने ती जगत होती. आपण एका वेगळ्या दुनियेत आलो आहोत आणि जे आपण जगतो आहोत ते आपले कर्तव्य आहे, हे तिने जाणले. डोंगरकिनीतील आपल्या कळपाच्या आठवणींचे कढ तिने शिरपतीसारखेच मन घट्ट करत दाबले. आपल्या कोकराला जितक्या प्रेमाने ती पाजत असे तितक्याच प्रेमाने बाळासही. त्याच्या ओठांच्या स्पर्शाने तिला आणखी वेगळा प्रसन्न पान्हा फुटे. या नव्या टिक्की दाईचे दूध पिऊन ते एडक्यांचे बाळ निरोगी, रगदार, बाळसेदार दिसू लागले.

असे सगळे जमल्यावर सरसोतीला सांगून आणि सवड काढून दासोभट यांना भेटणे शिरपतीस शक्य झाले. आणि तिथूनच असाधारण माहितीचे स्त्रोत त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा रस्ता खुला झाला. संधी असेल तेव्हा त्यांच्याकडे जाणे आणि ते बोलतील ते ऐकणे हा त्याचा उद्योग झाला. ते सांगत ते सगळे त्याला कळे असे नाही. पण ते आवडत मात्र असे. त्यांच्याकडे कायम मुक्तद्वार होते त्याच्यासाठी. एकदा असाच तो गेला तर त्यांनी वेगळाच विषय उपस्थित केला. म्हणाले, अरे श्रीपती, मध्यंतरी मी नेवासे नामक ग्रामी जाऊन आलो. बऱ्याच दिवसांपासून कानावर होतं. म्हटलं, बघून यावं प्रत्यक्ष. तिथे

ज्ञानेश्वर नावाचा एक कोवळा मुलगा भगवद्गीतेवरील टीका प्राकृत भाषेत सांगतो असं ऐकलं होतं. बराच काळ प्रतिकूलताच होती मनात. एक तर सरळच की ज्ञानी असालच तुम्ही तर संस्कृतात टीका करा ना, असं. प्राकृतात ती करून काय मिळणार? आपल्या गावढ्या लोकांना त्याचा काय उपयोग? ज्ञानाच्या अर्जनासाठी बुद्धीची काही एक किमान तयारी लागते. ती त्यांची नसते. मग कशासाठी पालथ्या घड्यावर पाणी घालायचं, हे मनात. खेरीज ती सगळी संन्याशाची मुलं. हा ज्ञानेश्वर, त्याच्या थोरला निवृत्ती, आणि याच्या धाकटी आणखी दोन भावंडं; सोपान आणि मुक्ता. यांचे वडील विठ्ठलपंत जावळे यांनी एकदा संन्यास घेतला. मग तो मोडून लग्न केलं. आणि ही चार पोरं झाली त्यांना. अधर्मच ना! ब्रह्मवृंद त्या मुलांना आपल्या ज्ञातीत कसा घेणार? जास्ती करून मानसिक छळ झाला त्यांचा. नंतर विठ्ठलपंतांनी सपत्नीक आत्महत्या केली. म्हणजे सगळीकडून बेजबाबदार रे हा विठ्ठलपंत. आधी संन्यास, मग लग्न, पोरं, आत्महत्या, सगळंच. नंतर मी

विचार केला, ती जन्माला आली यात त्या पोरांचा काय दोष? संन्याशाची मुलं म्हणून लोक त्यांची हेटाळणी करत असताना देखील त्यांनी ज्ञानार्जन सोडलं नाही. आणि आता आपल्या थोरल्या भावालाच गुरुस्थानी ठेऊन हा मुलगा गीतेचं निरूपण प्राकृतात करतोय...

याच्यावर शिरपती काय अभिप्राय देणार? एक तर दासोभटाची भाषा कळायला अवघड. ऐकून थोडी थोडी समजायला लागलेली, ऐकत राहावी अशी वाटणारी पण अधिकांश अगम्य.

'त्याच्याइखी तुम्हाला काय वाटातं?' शिरपतीनं सावध प्रश्न टाकला. 'कशाविषयी?' 'हा ज्यो कोण पोऱ्या गिन्यान सांगतो-'

'अरे, तेजस्वी आहे मुलगा. मी गेलो तेव्हा तो तिथे एका देवळात एका खांबाशी बसलेला होता. समोर श्रोते. सगळी तुझ्यासारखी माणसं. वेगवेगळ्या वयांची. तल्लीन झालेले होते सगळे. मी गेलो, बसलो, कोणीही माझ्याकडे लक्ष दिलं नाही. थोडा राग आला. खालच्या प्रतीचा असलो तरी ब्राह्मणच आहे ना मी. पण त्याचं निरूपण इतकं सुंदर होतं म्हणून सांगू-मीही तल्लीन होऊन गेलो. इतक्या सुंदर प्राकृतात काव्य रचता येतं, काव्यार्थ सांगता येतो-'

"ते काय आसतंय?'

'अरे, मूळ संस्कृतात आहे ते प्राकृतात- म्हणजे तू आणि मी ज्या भाषेत बोलतो तिच्यात तो सगळं सांगतो. निरूपण करतो. तशी तुझी भाषा गावठी आहे, पण तीही प्राकृतच आहे. मुख्य म्हणजे या धर्मव्यवस्थेनं त्याला वाळीत टाकलेलं. तरीही उत्तम अध्ययन करून प्राकृतात शास्त्रार्थ करणं, ही मला मोठी गोष्ट वाटते. नंतर मी त्याच्याशी आणखी बोललो. त्यानं मला खूप अंतर्मुख केलं. स्वतःविषयी विचार करायला प्रवृत्त केलं. हा चक्रधर महात्म्यापेक्षा वेगळा आहे.'

इतक्या अवघड गोष्टींविषयी सहसा दासोभट बोलत नसे. हा जो कोणी ज्ञानेश्वर आहे, त्यानं बामणाला बरंच मऊ करून टाकलंय असं शिरपतीला त्याच्या नैसर्गिक गावठी शहाणपणातून वाटलं. ज्ञान गावठी भाषेत गावठी माणसाला देता येऊ शकतं, हे बामणाला त्यानं पटवून दिलं, ही साधी गोष्ट नव्हती. बामणाला आधी ती बिलकूल पटत नव्हती. आता तो मऊ

आला होता.

एके दिवशी मानकरी केशीराज एडके स्वतः ज्या मळयात म्हणा वा शेतात शिरपती राहात होता तिथं आले. अचानक आले. दोन गोष्टी बऱ्या झाल्या. एक, ते आले तेव्हा शिरपती तिथं होता. त्यामुळं ते आले अन तो तिथं नाही, असं झालं नाही. दुसरं, सरसोती सुद्धा तिथंच होती. त्यामुळं, ते कोण हे तात्काळ तिनं त्याला सांगितलं. त्यामुळं ते घोड्यावरून पायउतार होताच तो त्यांच्यासमोर गेला आणि त्यानं त्यांना दंडवत घातला.

'कोण, श्रीपतीच ना?' 'हां.' तो उठून उभा राहताना म्हणाला.

"अरे, तुझ्या भेटीला यायला मला थोडा उशीर झाला. राजकारणाची

कामं क्लिष्ट आणि कटकटीची.'

'आसं कसं? निरोप आला असता तर मीच आलो असतो. बळंच

कसं येनार?'

'असूदे बाबा. फार मोठं काम केलंय तू आमच्यासाठी. आमचा दुखुदुखू करणारा कुलदीपक बरा केलास. आता तो आमच्या कुळीला शोभणारा चांगला एडक्यासारखा होईल यात अजिबातही शंका नाही. आणि तूही चांगलाच तगडा आहेस एखाद्या एडक्यासारखा. छान, छान. चल, बघू आपण तुझी ती मेंढी. माझ्या बाळाला जीवन दिलंय तिनं. गंमत आहे! मी,

माझं बाळ, तू, तुझी मेंढी आपण सगळे एकाच कुळीतले-' ते मोकळे हसले आणि त्यांनी त्याच्या पाठीवर हात थोपटला. तो त्याला मऊ आणि थुलथुलीत वाटला. मानकरी वयाने चाळीशीच्या घरात होते. मध्यम उंची, फुसकी फोपशी वाटेल इतकी गुटगुटीत देहयष्टी, गव्हाळ वर्ण आणि आनंदी चेहरा.

शिरपतीला फार बरं, अगदी हलकं वाटलं. अचानक त्यांच्या येण्यानं जो दाब त्याच्या मनावर आला होता तो त्यांच्या सहज वागण्यानं उतरला.

टिक्कीला पाहिल्यावर ते म्हणाले, 'ही आपली खरी कुलदेवता. मेष. ही आपली सगळयांची रास.'

'कशी काय?'

'अरे मेष म्हणजे मेंढी. आम्ही एडके लोक तर सरळच या देवतेचे पुत्र.एडका म्हणजे मेंढा. आता तुही आमच्यातलाच झालास. तुही तिच्याच दुधावर पोसला असशील. आम्ही तिला विसरलो होतो. तू आणि आमच्या बाळानं आम्हाला तिच्या-आमच्या नात्याची जाणीव करून दिली.'

'वय झालं आता तिचं.'

'ते आहेच. पण किती समजूतीनं तिचा कळप सोडून इथं राहिलीय

ती आपल्यासाठी.'

'समजदार हाये ती. मी सांगितलं आन तिनी समजून घेतलं.'

'तू सांगितलंस? तिला कळते तुझी भाषा?' मानकरी गडगडाट करत

हसू लागले.

"हां. मेंढ्यात रायलो ना कायम. त्याच्यानी-' शिरपती अर्धवट

गोंधळून जात म्हणाला.

'शक्य आहे बाबा, शक्य आहे. पण विशेष आहे ते. आश्चर्य वाटण्याजोगंच आहे ते' मानकरी त्याच्या पाठीवर हलकी थाप देत म्हणाले, 'माझ्या मनात एक कल्पना- म्हणजे, आत्ता, या क्षणीच माझ्या ते मनात

आलंय. बघ तुला कितपत पटतं ते.'

'त्याचा प्रस्नच नायी. आपण जे सांगाल ते करीन.'

'असं बघ, ही मेंढी-काय नाव म्हणालास? टिक्की, हां, तर ही टिक्की

तुझ्याशिवाय इथं राहू शकते?'

'आंधी नसती राहिली, पण आता हाईल. सरसोती आन बाळ असल्यावर हाईन. त्यांची चांगली वळक झालीय. तिच्या कोकराइतकाच बाळात जीव हाये तिचा. सरसोतीला पण चांगली ओळखीती ती. आन मी पण सांगन तसं तिला.'

'हां, ते आहेच. विसरलो ते मी. तू सांगितल्यावर जमेल ते.' मानकरी

हलकेच हसत म्हणाले, 'तू आमच्या वाड्याच्या देवडीवर पहारा करू शकतोस? चांगला तगडा आहेस. शस्त्रविद्या जाणत असशीलच. प्रतिष्ठान नगरीत वातावरण तितकं ठीक उरलेलं नाहीय. अस्थिरता आणि धोकेबाजी वाढलीय.'

'आपण सांगशाल तसं करीन.' 'वाटलंच मला. पाठारे आहेस, तगडा आहेस. ज्यांच्यासाठी मी काम करतो, ते राजे विद्रमसेन सुद्धा पाठारे क्षत्रियच आहेत. यादवांच्या या राज्याची धुराच मुळात तुम्हा मंडळींच्या खांद्यावर आहे. बाकी पुष्कळ ब्राह्मण आणि क्षत्रिय सोडून गेलेत. अर्थात त्यात आणखी बऱ्याच गोष्टी आहेत. असूदेत, ये उद्या वाड्यावर.'

4

देवडीवरचा पहारेकरी म्हणजे दारवठेकर. जाधवांच्या एका प्रतिष्ठित राजधानीतील एका मानकऱ्याच्या वाड्याच्या प्रवेशद्वाराची देवडी. राजकीय हालचालींचा एका बारका का होईना दारवठा. राजकीय हालचालीत शिरपतीला रस नव्हता. निदान सुरुवातीला काहीच कळायचं नाही. पण काहीही असलं तरी तुम्ही तुमचे कान झाकून नाही घेऊ शकत. आणि बोलणाऱ्याचं तोंडही बंद नाही करू शकत. त्यामुळं ऐकत राहाणं. काम काही खास आनंदाचं नव्हतं. दिवसभर एकाच जागी बसायचं. आल्या गेल्यावर नजर ठेवायची. अनोळखी व्यक्तीला नीट चौकशी केल्यावरच आत पाठवायचं. आधी नाव, गाव, दर्जा याची चौकशी करायची. कामाचं स्वरूप विचारायचं.आत जाऊन वर्दी द्यायची. परवानगी असेल तरच आत पाठवायचं. कधी कधी मानकरी आत असले तरी ते आत नाहीत म्हणून सांगायच. कारण मानकऱ्यांचा तसा आदेश असायचा. असे प्रसंग फार येत नसत. त्यामुळं नुसतं बसून राहाणं.कंटाळयानं जांभया येत. कोणाशी संभाषण सहसा नसे. आधी निदान मेंढ्या होत्या. अखेर किमान नुसती टिक्की होती. आता तीही नव्हती. कधी तरी तो शेतात चक्कर टाकून तिला भेटत असे. आणि सांगत असे की, आता आपले काम बदलले आहे. इलाज नाही. आणि ती प्रौढ समजदार मेंढी तेही समजून घेत असे. तिला तरी दुसरा काय इलाज होता? माणसांशी संभाषणात त्याला खास रुची आधीपासूनच नव्हती. असती तरी माणसे मुळात फार कमी भेटत. रस्त्यात दासी-बटकी दर्जाच्या बाया दिसत. बायकोची आठवण होई. लहान मुलांची आठवण येई. पण सांगणार कोणाला? रस्त्यात वेगवेगळ्या श्रेणीचे पुरुष दिसत. संभाषण नसे. उमाजी नावाचा दुसरा एक दारवठेकर होता. उरलेल्या बारा तासांसाठीचा. तो फार बोलका होता. शिरपती नाईलाज होऊन ऐकण्याचे काम करीत असे. नंतर हळूहळू त्याला उमाजीच्या बोलण्यात रस वाटू लागला. नगरीतील स्थिती फार बिघडलेली आहे असं उमाजीचं म्हणणं. इथं जो तो हाती मिळेल ते

घेऊन पोबारा करायच्या तयारीत आहे, असं तो सांगे. अनेक शिष्ट ब्राह्मण अल्लाउद्दिन खिलजीशी संधान बांधून आहेत, त्याला ते सगळी माहिती पुरवत आहेत. त्याने कधी यावे याचे सल्ले देताहेत. सुरक्षिततेचा भाग म्हणून अनेकांची कुटुंबे प्रतिष्ठान सोडण्याच्या तयारीत आहेत. व्रते, जप-जाप्य, अनुष्ठाने अशी सगळी सोंगे चालू आहेत. गणिकांच्या हवेल्या रात्री गजबजलेल्या दिसतात. संगीताचे उत्सव, वसंतोत्सव असे सगळे यथासांग चालू आहे. पण हे सगळे फार पोकळ आहे. अनेक प्रकारची राजकारणे आणि खलबते सगळ्या गढ्यांमध्ये चालू आहेत. गणिकांच्या हवेल्यातही खलबते चालू आहेत. हे राज्य बुडणार याच्याविषयी सगळ्यांची खात्री झालेली आहे. राजा शंकरदेव ते बुडू नये यासाठी फार प्रयत्नशील आहे. पण आभाळच जिथं फाटायला आलंय तिथं तो तरी काय करणार? रामदेव महाराज इथं आणि देवगिरी असं येत-जात असतात. ते मनातून हताश आहेत. चंद्रसेना नावाची एक नावाजलेली गणिका आहे. तिने इथून निघून कोणासोबत जायचं याविषयी अनेक मतं आणि पवित्रे आहेत....

'आणि तुला सांगू का,' शिरपतीच्या कानाशी लागत अगदी चोरट्या आवाजात एकदा उमाजी म्हणाला, 'आपले एडके मानकरी सुद्धा या चंद्रसेनेच्या राजकारणात आहेत.'

'छेऽऽ, छेऽऽ'

'अरे असंच चालतं या मोठ्या लोकांचं. मी असं ऐकलंय की आपल्या मानक-यांचे मालक सरदार विद्रूमसेन यांना या चंद्रसेनेची अतोनात चाह आहे. त्यासाठी मानकरी इथे ठिय्या देऊन बसले आहेत. कुणी म्हणतात, उदगीर प्रांती गादीवर असलेले बिंबदेव महाराज यांनाच तिच्यात रस आहे.आणि सरदार विद्रूमसेन यांच्यावर ते काम सोपविण्यात आलेलं आहे. म्हणून मानकरी इथं आहेत.'

'अरे पण एका बाईसाठी हे राजे लोक इतके उल्लू होत असतील असं मला वाटत नाही- मग ती किती का देखणी असेना! लोक काय मनाला वाटंल ते बोलत्यात.'

'मला तर वाटतं की, ती या सगळ्यांना ठेंगा देऊन सरळ आरामशीर अल्लाउदिनाच्या सोबत निघून जाईल. अशा हुशार नारी सगळ्यात शक्तिमान नरालाच वश होतात. दुनियेचा तो नियमच आहे.'

'जाऊंदे. आपल्याला काय?'

'आपल्याला कायच नाही. कोणीही राजा झाला तरी आपल्याला

काय फरक पडतो?'

हे गणिकांचं वगैरे सोडलं तरी वातावरण एकूण बिघडलेलं आहे, हे शिरपतीला सुद्धा जाणवू लागलं होतं. उमाजी बोलत होता, त्या उजेडात ते तसं वाटत असेल असं आधी शिरपतीला वाटत होतं. पण मग दासोभटाचा अभिप्राय सुद्धा फार वेगळा नव्हता. राज्य बुडण्याच्या मार्गावर आहे आणि ते तसे होणार आहे, याची उरलेले ब्राह्मण, क्षत्रिय यांना खात्री झालेली आहे. ते आपल्या आपल्या व्यवस्था करत आहेत. नवी संधाने बांधत आहेत. चक्रधर योग्य तेच सांगत होता,असे मला वाटू लागलेले आहे. गरिबांना जगणे असह्य झालेले आहे. राजयंत्राविषयी त्यांना कुठून प्रेम वाटणार? बाकी श्रीमंतांना कोणाचाच धाक उरलेला नाहीय. खिलजीच्या एका हल्ल्याने स्थिती एकदम पालटून गेलेली आहे. आधीच सगळे पोखरलेले होते. खिलजीच्या विजयाने सगळ्यांची खात्री होऊन गेलेली आहे, सगळे

उघड झाले आहे....असं दासोभट सुद्धा बोलत असे.

"कोणीही राजा झाला तरी आपल्याला काय फरोक?' शिरपतीनं

उमाजीकडून ऐकलेलं वाक्य एकदा त्यांच्यासमोर टाकलं.

'बरोबर आहे तुझं. कोणीही राजा झाला तरी तुझ्या गावाची मालकी आज आहे त्याच ब्राह्मणाकडं राहील. ते जुळवून घेतात कशाशीही. खरं तर निमंत्रकच असतात ते. आपलं वैदिक धर्माभिमानी राज्य जाऊन यावनी धर्माचं राज्य येईल, त्याची सुद्धा या लोकांना चाड नाहीय. जीवाची काहिली होते रे श्रीपती! ब्राह्मण आणि ब्राह्मण्य यांच्याविषयी माझा अभिमान आणि आदर संपलाय अगदी. आता हे अल्लाची पूजा करायला सुद्धा तयार होतील. अल्लोपनिषद लिहितील.'

'ते काय यागळं असतंय?' 'हो. म्लेंच्छ लोकांचा धर्म वेगळा आहे.' 'कोणते लोक?' 'अवैदिक. म्लेंच्छ. यवन.' 'होऊ देत. जे व्हायचंय ते काय चुकत नायी.'

'खरं आहे. हताशपणे बघत राहणेच आपल्यासारख्या लोकांच्या हाती आहे.' जरा थांबून दासोभट म्हणाले, 'एक तुला सांगायचं राहिलंय. मी थोडं अंगलक्षणहोराशास्त्र जाणतो. या तुझ्या एडके मानकऱ्याला पाहिलं, तेव्हा माझ्या जे मनात आलं, ते चमत्कारिक आहे. ते मी तुला आज सांगत नाही. कधी तरी सांगेन मात्र. सध्यापुरतं इतकंच सांगतो की, त्याच्या मनात प्रचंड घालमेल आणि उलघाल असेल. माझा होरा खरा असेल तर तो कधीही इथून गायब होऊ शकतो. अर्थात, असं कदाचित नसेल सुद्धा. शास्त्रांना मर्यादा असतात. आणि होरा हा होरा असल्यानं चुकूसुद्धा शकतो. तरीही मनात आलं ते तुला सांगणं मी आवश्यक मानतो.'

'आपल्यासारक्या- म्हंजे माझ्यासारक्या हलक्या-लोकांना काय

तरास त्याचा? ती मोठ्या लोकांची कामं.'

'ते ही खरंच. पण तू माझा मित्र. म्हणून राहावलं नाही सांगितल्याशिवाय.' दासोभट म्हणाले.

एके दिवशी शिरपती नेहमीसारखा दारवठ्यावर बसलेला असताना एक माणूस आला. तगडा आणि तेजस्वी होता तो. त्याने शिरपतीकडं पाहून न पाहिल्यासारखं केलं आणि तो सरळ आत निघाला. कोणी तरी मोठ्या घरचा माणूस असावा. पण म्हणून सरळ आत कसा जाऊ द्यायचा? कमरेला कट्यार लटकलेली होती. आधी ती काढून घ्यावी लागणार होती. मानकरी यांची तशी आज्ञा होती. कोणीही असो, अनोळखी असेल तर नाव-गाव विचारायचं, कामाचं स्वरूप विचारायचं, अंगावर शस्त्र असेल तर काढून घ्यायचं. आणि आत येऊन सांगायचं. नंतर आज्ञा मिळेल त्याप्रमाणे कृती. शिरपती आडवा झाला.

'कोन आलंय म्हणून सांगायचं महाराज? आपन इथं थांबा. मी आत

जावून मानकरी- मालकांना सांगून येतो.'

'अरे! मला अडवतोस? तुझा मानकरी आमच्या दरबारातला मानकरी आहे, समजलास? पण ठीक आहे. तू तुझं कर्तव्य बजावतो आहेस. हे घे.' म्हणत आणि आत्मविश्वासपूर्वक हसत त्या माणसानं एक सोन्याची मोहोर त्याच्या समोर धरली. अनाहूतपणे शिरपतीनं ती घेतली. तोवर तो थेट निघाला सुद्धा.

'आरे पण-तुमी आसानच. पण मी इथं दाराचं राखण करायला हाये ना! मानकरी यांचा

चाकर हाये. आन तुपल्यापशी तलवार हाये. काही म्हनता काही झालं तर मपल्यावर टेपूर-' असं मनातल्या मनात म्हणत शिरपती धावला.

'याची काय गरज नाही महाराज.' म्हणत त्यानं ती मोहोर त्या
माणसाच्या समोर धरली.

"अरे असूदेत. आम्ही दिलीय. ती आम्ही परत घेणार नाही. आमच्या
चाकराचा चाकर तू. राहूदेत."

'नाय पन ती तलवार तुम्हाला काढून द्यावा लागन महाराज. आन मी
लगीच आत जावून सांगतो ना. काय नाव सांगायचं?'

"तू या सहस्त्रसेनाला अडवतोस? विद्रूमसेनांच्या धाकट्या भावाला?'

'आवो, तुमच्यासारके इतके मोठे मानसं आशे एकट्यानी येत नाहीत. आणि येनार आसले तरी आंधी कोनीतरी सांगायला येतं. रीतच हाये तशी.'

"तू मला रीत सांगणार? एडक्याचा यःकश्चित चाकर? दारवठेकर?
बराच टणक दिसतोस.'

'काहीही म्हना महाराज, तुम्हाला आयकावाच लागन. आन मी आत
जावून लगीच येतो. आन ती तलवार पण काढून द्यावा लागती.'

पुढं जे काही झालं ते क्षणार्धात झालं. त्या माणसानं तलवार म्यानातून काढली आणि घे म्हणत थेट घाव शिरपतीच्या डोक्यात घातला. केवळ प्रतिक्षिप्त क्रिया आणि असाधारण चापल्य आणि काही अंशी कदाचित त्याचं प्राक्तन यांच्या बळावर शिरपतीने तो वार चुकवला आणि लगेच त्या माणसाचं मनगट दाबून त्यानं ती तलवार हिसकून घेत त्याच्यावर वार केला. थेट मानेवर. तो इतका शक्तिशाली होता आणि ती तलवारही कदाचित इतकी धारदार होती की त्या माणसाचं शीर एकाच घावात त्याच्या धडापासून वेगळं झालं. हे सगळं इतकं अचानक झालं आणि त्याची निष्पत्ती इतकी अमानुष समोर दिसली की सर्वांगी थरथरत शिरपती मटकन खाली बसला.आपण हे काय करून बसलो, हा कोण माणूस, आणि त्याच ते अचानक घाव घालणं ; इथं त्याचं शीर धडावेगळं झालंय. त्या जागी आपलं झालं असतं.शिरपतीनं डोळ्यांवर हात घेत ते मिटून घेतले. तो स्फुदून स्फुदून रडू लागला. डोळे मिटण्याआधी त्यानं त्या माणसाचं शीर पाहिलं होतं. त्याचे डोळे उघडे होते. आणि ते त्याच्याच पाय झटकत्या शरीराकडे बघत होते. त्या भयाण दृश्यामुळेच कदाचित त्यानं डोळे मिटून घेतले होते. आणि तो रडत होता. नंतरचं त्याला अंधुक आठवतं. ते अशासाठी की त्याचे डोळे मिटलेले होते. आणि तो भयाण अपराध केल्याच्या अमानुष गुंगीत होता. पण या प्रसंगाच्या अनेक आवृत्यांच्या जाळ्यांमधून तो कधीही सुटणार नव्हता. खरं म्हणजे त्याने आपल्याला नकळत फक्त स्वतःला वाचविण्याचा प्रयत्न केलेला होता.आणि त्या धडपडीच्या परिणामी तो माणूस स्वतःचे शीर धडावेगळे होऊन हातपाय खरडत होता. आपणच आपलं पाय झटकतं शरीर पाहात आहोत, आपण अपराध केलेला आहे, या जाणीवेतून त्याला कधीही मुक्ती मिळणार नव्हती. मेला तो सुटलेला होता. जिवंत होता तो अडकला होता. त्याच्या अंधुक आठवणीप्रमाणे नंतर आरडाओरडा झाला. लोक जमा झाले. कोणीतरी त्याला तिथून उचललं. त्याचे डोळे त्यावेळीही मिटलेले होते. हृदय असाधारण मार्दवाने रडत होतं. जो

मेला तो मेला होता आणि जो जगला तोही मेलाच होता. तो त्याच्या मरणासह जिवंत होता. मारण्याच्या वेदनेतून मरेपर्यंत त्याची कधीही सुटका होणार नव्हती. आणि स्वतःच्या मरण्याच्या अनुभवाच्या अंतिम क्षणी देखील त्याला ते आठवणार होतं. पाय झटकतं शरीर आणि त्याच्याकडं पाहणारे अमानुष उघडे नेत्र. त्याचा ते कायम पिच्छा पुरवणार होते.

"काय हो! किती अमानुष घाव! एका झटक्यात शीर तोडलं!'

'कसली ताकद असते या गावठी लोकात! फार ताकदवान आहे हा श्रीपती. अक्कल आहे का तुला, काय केलंस तू? विद्रूमसेनांच्या भावाला मारलंस. ठार केलंस.'

'तुला कल्पना नाही. तू काय केलंस याची.'

कोणीतरी त्याला कुठंतरी आत घेऊन गेलं. एकाकी जागेत एकांतात मुबलक रडण्यासाठी. ते अमानुष डोळे आणि ते शरीर. त्या झटकत्या पायांनी पृथ्वी खोदत तिचा मध्य गाठला असता आणि तिथल्या उष्णतेने ते पाय पुन्हा पोळत राहिले असते. खरं तर तोच पृथ्वीच्या गाभ्याशी पोहोचून पोळत होता. त्याचे डोळे सताड उघडे त्याच्याकडे बघत होते. जीवाची तगमग आणि काहिली होत होती. आणि मग मानकरी आले. म्हणाले, यानंतर तू दारवठेकर नाहीस. माझ्यावरचा घाव तू स्वतःवर झेललास. माझं मरण स्वतःवर घेऊन शौर्याने जिवंत राहिलास. आता तू माझा शरीररक्षक. सतत माझ्यासोबत राहायचंस. घाबरू नकोस. विद्रूमसेन महाराजांना काय सांगायचं ते मी सांगेन. राजकारण फार गुंतागुंतीचं असतं. ते रक्ताच्या नात्यांना जुमानत नाही. राजयंत्र जटील असतं. तू माझ्या आयुष्याच्या परीक्षेला उतरला आहेस. आता तुझ्या रुंद शक्तीचं कवच सतत माझ्याभोवती पांघरायचंस. आणि कशाचीही चिंता करायची नाही. पुढचं माझं जे काही आयुष्य असेल ते तू मला दिलं आहेस. मी ते कधीही विसरणार नाही.

काही दिवसातच त्याची बायको यमी आणि त्याची दोन मुलं यांना प्रतिष्ठानमध्ये आणण्यात आलं. श्रीपती आणि त्याच्या या कुटुंबाची राहण्याची व्यवस्था करण्यात आली. आपल्या नवऱ्याशी थेट समोरासमोर बोलता येण्याची अशी संधी प्राप्त झाल्यामुळं यमीला इतकं खुळावल्यासारखं झालं की बरेच दिवस तिला काही बोलताच येईना. शिरपती खूश होता. नियमित शय्येच्या सोयीमुळे. ते ही संभाषणच होतं. पण वेगळ्या प्रकारचं. बाकी शाब्दिक उद्योगात त्याला रस नव्हता. त्याची भूक त्याला नव्हती. जुजबी संभाषण अर्थातच सुरू झालं. पण मानसिक आणि भावनिक अंगाने मेंढ्यांशी होणाऱ्या संभाषणात त्याला ज्या दर्जाचा आनंद मिळे तो दर्जा माणसांशी -त्याच्या पत्नीसकट सगळ्या माणसांशी- संपर्क करण्यात, त्याला कधीही मिळाला नाही, पुढे कधीतरी कदाचित त्याला तो मिळणार होता. पण हे पुष्कळ नंतरचं. या घटनेनंतरचे कैक दिवस त्याला आतल्या आत स्वत:शी बोलण्याची सवय जडू लागली होती. सहस्त्रसेनाचा त्याच्या हातून झालेला मृत्यू त्याच्या मनाचा पिच्छा सोडत नव्हता. उमाजी म्हणाला, सोत्ताला वाचवायचं म्हणून त्याला तू मारलंस, लई चांगलं केलंस. अन आत्ता मानकऱ्यांचा सगळ्यात जवळचा माणूस झालास. त्याचा शरीररक्षक. तुला ते सोबत उदगीरला घेऊन जातील. जिथं जातील तिथं तुला नेतील. आम्ही अशेच सडत राहणार इथं. दैव उदंड झालंय तुझ्यावर. केशीराज एडके यांच्या परिवारात आणि निकटवर्तीयात शिरपतीच्या रूपाने एका जिवंत दंतकथेची

सुरुवात झाली होती. त्याच्या आणि सहस्त्रसेन यांच्यामधल्या त्या काही पळांच्या झटापटीच्या माणसांगणिक वेगवेगळ्या आवृत्या तयार होत होत्या. आणि कालानुरूप त्यांची वर्णने सतत प्रवाही राहणार होती. सरसोती एकदा त्याला म्हणाली, 'श्रीपती, तू आता मोठा माणूस झालास. या गरीब दासीला विसरू नकोस.'

'याच्यात काय महात्म्य आहे सरसोती? मी माझा जीव वाचवला. पण त्या बिचाऱ्याचा गेला. मला त्याची लय हळहळ लागती.' शिरपती म्हणाला.

'कशाला हळहळ करतोस? तू स्वतःचा जीव तर वाचवलास आणि मानकरी मालकांचा सुद्धा. ही फार मोठी गोष्ट झाली. अरे बाबा, समदे नावाजित्यात तुला. मानकऱ्यांनी स्वतः मालकीणबाईंना सांगतलं. मला त्या म्हणे का एकदा बघायचंय मला या श्रीपतीला. माझ्या भेटीला आण त्याला.'

'आपण कसं जाणार त्यांच्यासंबुर?' 'वेडाच आहेस. तू थोडाच त्यांना बघणार आहेस? त्या तुला बघतील. करते मी ते. मानकरी-मालकांना विचारून करते, मग तर झालं? काय?'

ती भेटही होऊन गेली. सरळच की भेट नाही म्हणता यायचं तिला. त्याला सरसोती घेऊन गेली. त्याला एका पडद्यासमोर उभं करण्यात आलं. थोडा वेळ त्याला खास काही वाटलं नाही. पण जसजसा वेळ जाऊ लागला तसंतसं त्याला चमत्कारिक मूर्ख असं वाटू लागलं. हसू फुटलं आणि ते ओठांवर यायला लागल. मालकीण आपल्याला पडद्याआडून बघतेय याच भान असल्यामुळं तो ते दाबू लागला. ते उत्तरोत्तर कठीण होऊ लागलं. आपण एक प्रसिद्ध घोडा किंवा तशाच प्रकारचा एक पाळीव प्राणी आहोत आणि तो बघण्याचा हक्क मालकीण बजावते आहे असं त्याच्या मनात येत होतं. पण मग प्राणी तर मालकाकडं थेट बघू शकतो. आपल्याला तीही परवानगी नाहीय. आपण फक्त वस्तू व्हायचं आणि तसं झालोत म्हणून आतल्या आत हसायचं. तेही ओठांवर दिसू द्यायचं नाही. कठीण कसरत आहे. पण ती करणं भाग आहे....मग कल्पांतातून यावी तशी सरसोती तिथं आली आणि सुगंधी दुधाचा पेला तिनं त्याच्या हाती सोपवला.

'किती वेळ?' त्यानं खुणेनंच तिला विचारलं. इथल्या हवेच्या

वजनात शब्दांचा उच्चार देखील अशक्य आहे, असं त्याला वाटलं.

'दूध घेतलं की निघायचं.' ती प्रकट म्हणाली, 'मी सोडते तुला बाहेर.'

ते म्हशीचं सुगंधी दूध त्याला आवडलं नाही. पण सुटका झाली ही काही कमी श्रेष्ठ गोष्ट नव्हती.

आता मानकरी यांचा शरीरक्षक शिरपती. वाड्यातून ते बाहेर पडले की तो सतत सोबत. सतत सावध आणि सज्ज. उजव्या हाताचा पंजा तलवारीच्या मुठीशी जाण्यासाठी कायम सज्ज. नजर ससाण्यासारखी भिरभिरती. चेहरा निर्विकार. जे काम आपण करतो ते आपली जगण्याची आणि वागण्याची पद्धत ठरवतं. अनेक मानकरी मंडळींच्या वाड्यात, सरदार लोकांच्या गढ्यात आणि पुष्कळदा गणिकांच्या प्रासादात जाणे होई. मानकरी सुरक्षित राहतील असं अंतर ठेऊन उभं राहायचं. सज्ज. संभाषणात रस घ्यायचा नाही. काही ऐकू आल्यास ते तसं दाखवायचं नाही. चेहरा दगडी निर्विकार. जवळ यायचं किंवा अधिक अंतरावर उभं राहायचं याविषयी कधी कधी मानकरी खुणेनं सुचवत. कुठं कसं वागायचं हे सरावानं माहीत झाल्यावर त्याची फारशी गरज उरली नाही. पण सावध

सततच राहावं लागायचं. त्याचा ताण यायचा. सगळ्यात जास्त ताप गणिकांच्या प्रासादात होई. तिथला दारवठेकर आत प्रवेश देताना सगळ्यांची शस्त्रे काढून घेई. शरीररक्षकांची सुद्धा. आणि त्यांना मंडपाच्या बाहेर उभं राहावं लागे. मंडपाच्या छताला झुंबरे लटकलेली असत आणि भिंतींवर अनेक सुंदर मुद्रात नर्तिका चितारलेल्या असत. पण ते पाहणार किती? अन मुळात ते शरीररक्षकाचं काम नसतं. त्याला ती संधी नसते. एडके मानकरी यांच्यासारखे अनेक लोक तिथे नुसतेच बसलेले असत. गणिका तिच्या मनाला वाटेल तेव्हा प्रकट होई. ती आली की सगळ्या शरीररक्षकांनी मंडपाकडं पाठ करून उभं राहायचं. अशा ठिकाणी आपलं काम काय हे अनेकदा शिरपतीला कळायचं नाही. पण म्हणून त्यानं ते मानकऱ्यांना विचारलं नाही. मुळात गणिकांच्या प्रासादात हे मानकरी लोक कोणतं राजकारण करतात हेच त्याला कळायचं नाही. अनेक नर्तिका येत, गाणी-बजावणी होत. ते बघायची सोय नसली तरी कानावर पडे सगळे. पाठ करून नुसतंच उभं राहण्यामुळं पाय भरून येत. कसली गाणी ऐकणार? शेजारी त्याच्यासारखे लोक उभे असत. पण तिथं एकमेकांशी न बोलण्याचा अलिखित नियम होता. त्यातही काहीजण खुणांनी एकमेकांशी बोलत. त्या सहजी न संपणाऱ्या खड्या शिक्षेत तोच त्यातल्या त्या काहींना निवारा होता. याउलट मानकरी आणि सरदार यांच्या वाड्यागढ्यांवर तुलनेनं मोकळं वातावरण असे. शस्त्रं तिथंही काढून घेतलीच जात असत. पण बाकी छान मोकळं वातावरण असे. अर्थात तिथंही शिरपती कोणाशी फारसा बोलत नसे. तो त्याचा स्वभाव. पण बाकी शरीररक्षक त्याच्याशी आदरपूर्वक वागत. ज्या पद्धतीने त्यानं सहस्रसेनाला मारलं त्याच्या अनेक भुमका आणि वाचनं त्यांच्याकडं होती. शिरपतीला प्रश्न पडत. वरवर जे दिसत आहे त्याच्या आत खूप हालचाली चालू आहेत याचे मनात येई. या नगरीचे इथले सगळे जे आहे ते संपणार आहे, हे सगळे मोठे लोक इथून उठून कुठे तरी जाणार आहेत, असे त्याच्या मनात येई. ही भूमी अस्वस्थ आहे, हे लोक त्यातून रस्ता काढण्याऐवजी इथून पळण्याच्या तयारीत आहेत. पण ज्यांना पळणे शक्य नाही त्यांचे काय? की ज्यांना पळणे शक्य नाही त्यांना कशाचीच भीती नसते? की त्यांच्याकडे गमावण्यासारखे काहीच नसते? की काहीही झाले तरी त्यांना काहीच फरक पडत नाही? उमाजीला किंवा दासोभटाला काही गोष्टी विचाराव्यात, असं त्याच्या मनात अनेकदा येई. त्यानं ते केलं नाही. दासोभट वैतागलेला असे. त्याच्या विचारात आणि आचारात टोकाचा बदल होत होता किंवा होऊ घातला होता. त्याच्या भूमिकाच बदलत चालल्या होत्या. वैदिक धर्म लयाला जाण्याच्याच लायकीचा आहे. कारण तो ब्राह्मण लोकांच्या दावणीला बांधला गेलेला आहे. हे लोक आपमतलबी आणि पळपुटे आहेत. किंवा त्यांना या धर्माशी काहीही देणेघेणे उरलेले नाहीय. क्षुद्र स्वार्थापल्याड त्यांना काहीच दिसत नाही. यांनी महात्मा चक्रधर गिळला आणि हे ज्ञानेश्वराला देखील गिळून टाकतील, अशा अनेक गोष्टी तो आधी चर्चेत कुठलाही संदर्भ नसताना बोलत असे. याच्यावर काही प्रतिक्रिया देण्याचे शिरपतीच्या मनात येई. पण दासोभटाचा आवेश बघून ते मनातच मावळत असे.

एके दिवशी एडके मानकरी स्वतः होऊन त्याच्याशी बोलले. म्हणाले, 'श्रीपती, तू भला आणि माझा विश्वासू माणूस आहेस. तू सतत माझ्या सोबत असतोस. आज मी केवळ तुझ्यामुळं जिवंत आहे, जे मी कधीही विसरू शकणार नाही. तू आजवर मला काहीही

विचारलेले नाहीस. तुझ्या मनात अनेक प्रश्न असतील. हा सहस्रसेन कोण होता? तो माझ्या जीवावर का उठला होता? मी इतक्या अनेक ठिकाणी का जातो? तिथं कोणत्या चर्चा चालतात? मी गणिकांच्या प्रासादात का जातो? इतक्या अपमानास्पद प्रकारे तिथं का थांबतो? गाणी-बजावणी ऐकण्याच्या करमणुकीसाठी की त्यांच्या सहवासाची चाह मला असते? सगळ्याच गोष्टी थेट अशा मी तुला सांगू शकणार नाही. पण जे शक्य आहे ते आणि जिथवर शक्य आहे तितके सांगतो.'

याच्यावर बोलण्यासारखं काही नव्हतं आणि तशी रीतही नव्हती. मानकऱ्यांना प्रश्न विचारायचा नाही. त्यांनी प्रश्न विचारला तर उत्तर द्यायचं अशी रीत. आता काही स्वतः होऊन सांगणार आहात आपण तर सांगा. आणि त्यासाठी परवानगी थोडीच मागताय आपण? मी ऐकावं अशी आज्ञा आहे. ऐकतो. असं मनातल्या मनात. प्रत्यक्षात शिरपती शंभ. गप्प.

'मी सरदार विद्रुमसेन यांचा सेवक. ते उदगीरचे राजे बिंबदेव यांचे सेवक. माझ्यावर त्यांनी काही एक कार्य सोपविलेले असल्याने मी जाधवरायांच्या या मुख्य राजधानीत आलोय. महाराज रामदेवरायांना चार पुत्र आहेत, हे तू जाणतोस. राजे बिंबदेव तृतीय पुत्र आहेत. खिलजीच्या स्वारीनंतर आपल्या दक्षिण देशाचे राजकारण आमूलाग्र म्हणजे अगदी मुळापासून बदलून गेलेले आहे. माझ्यावर जे काम सोपविलेले आहे त्याच्या संदर्भात मी इथे आलेलो आहे. त्यासाठी भेटीगाठी. आता काळच असा आला आहे की गणिका सामर्थ्यवान झाल्या आहेत. राजयंत्राच्या अव्वल वर्तुळात असलेले सगळे लोक तिथे जातात. सगळया महत्त्वाच्या घडामोडींच्या बातम्या तिथे मिळतात. आणि त्या काढणे कुशलतेने करावे लागते. त्यासाठी अनेक अपमान गिळावे लागतात. मी माझ्या स्वामींसाठी काम करतो. तर ते माझे कर्तव्यच आहे ना! सहस्रसेन यास ते आवडत नव्हते किंवा मान्य नव्हते. त्याने मला पुष्कळ वेळा तसे सांगून पाहिले. मी ऐकतच नाही, कुठल्याही आमिषाला बधत नाही, हे लक्षात आल्यावर त्याने मला संपवायचा पर्याय निवडला. त्यात त्याला यश आलं नाही. त्याचा बळी गेला, तो तुझ्या जागरुकतेमुळं. मी सरदार विद्रुमसेनांना सर्व कळवलेलं आहे.'

शिरपती शंभ. गप्प. 'तुला काही विचारायचं असेल तर तू विचारू शकतोस.' 'नाही.' 'काहीच नाही?' 'नाही.'

'यासाठी तू मला आवडतोस. तू प्रश्न विचारत नाहीस. आणि कोणतंही काम सहज अंगीकारतोस. तू माझ्या बाळाला जीवन दिलंस. तू मला वाचवलस.आता एक अवघड जबाबदारी मला तुझ्यावर टाकायचा आहे.'

'मी काय करायचं आहे?' 'तू माझं कुटुंब घेऊन वांबोरीला जायचं आहे.' 'वांबोरी?'

'ते आमच्या देशमुखीच्या गावांपैकी एक गाव आहे. तिथं आमची गढी आहे. येणाऱ्या काळात कुटुंबासाठी मला ते सुरक्षित ठिकाण वाटतं. इथून सुमारे पन्नास योजने दूर. रस्त्यात पुंड, लुटारू यांचा उपद्रव असतो. तुझ्यासोबत शस्त्रधारी माणसं असतील. पण मुख्य जबाबदारी तुझी असेल. तू जाशील तर मला काहीही चिंता उरणार नाही.'

'आणि आपण स्वतः? आपण का येत नाही? आपल्या सुरक्षेचं

काय?'

'मी थोडा नंतर येईन. कुटुंब सुरक्षित पोहोचलं की इथल्या अनेक गोष्टी मला निचितीने करता येतील. आणि मी स्वतःची काळजी घेईनच.

त्याचा विचार नको करूस. काही एक प्रमाणात धोका पत्करणं ही

माझ्या कामाची आणि इथल्या राजकारणाची गरज आहे. तो पत्करणं हे माझं कर्तव्यच आहे.आपल्या सगळयांना ते करावंच लागतं. तू तुझं कर्तव्य केलेलं आहेस.'

हे अवघड आहे आणि यात आपल्या जीवाला धोका आहे असं

शिरपतीच्या अजिबातही मनात आलं नाही.

'जाशील तू?' 'जाईन. कधी जायचंय?'

'महिन्याभराने निघायचंय. शुक्ल पक्ष असेल. रात्रीचा प्रवास शक्यतो टाळायचा. पण आलीच वेळ थोडीफार तर चांदणं असेल. एवढ्या काळात तुला स्वतःची तयारी करता येईल. तेवढा अवधी त्यासाठी पुरेसा आहे.'

'माझी कसली तयारी?'

'तुझी म्हणजे एकूण प्रवासाची. शस्त्रं, घोडे, माणसं, मेणे, मुक्कामाची ठिकाणं आणि संबंधित सगळया गोष्टी. मी करतोच आहे सगळं. पण तुझ्यापरीनं तुही कर. पण एक गोष्ट लक्षात घे, मी तुझ्याखेरीज कोणावरही विश्वास टाकू शकत नाही. तू माझ्यासाठी फार केलं आहेस. म्हणूनच हे काम करायला माझ्यासाठी तूच एकमेव भरवशाचा मनुष्य आहेस. या कसोटीच्या काळात मी फक्त तुझ्यावर विश्वास टाकू शकतो. तुझी पत्नी आणि मुलांनाही सोबत घेऊन जायचं आहेस तू.'

'जाईन मी.' शिरपती म्हणाला.

सोबत हत्यारबंद लोक असतील. तरीही बाया आणि मुलं यांना न्यायचं म्हणजे जबाबदारीचं काम. मालकीणबाई असतील. प्रवासात त्यांची सुरक्षा तर आहेच आणि व्यवस्था सुद्धा नीट बघावी लागेल. सरसोतीला विचारून ते करता येईल. पुंड, लुटारूंचा धोका आपल्यासारख्याला नसतो. कोणी लुटावं असं आपल्याकडं काही नसतं. त्यामुळं आपल्या ते डोक्यातही येत नाही. पण आता ते लक्षात घ्यावं लागेल. मालकिणीला विश्वासानं सांभाळून न्यावं लागेल. म्हणून तर ते आपल्यावर सोपवण्यात आलेलं आहे. बाकी माणसं मानकरी देतीलच. उमाजीचं नाव आपल्याकडून सुचवायचं? तो अनुभवी आणि सरळ मनाचा आहे. त्याला पुष्कळ गोष्टी माहीत असतात, ज्या आपल्याला नसतात. त्या गावगप्पा सुद्धा असू शकतात. पण त्या त्याच्यापर्यंत पोहोचतात तरी. आपल्यापर्यंत तसेही होत नाही. आणि वेळ-प्रसंगी आपल्यासोबत आपल्या विश्वासाचा किमान एखादा तरी माणूस पाहिजेच. आपण सांगू मानकऱ्यांना तसं. किंवा तेच कदाचित म्हणतील, तुझ्या विश्वासाची कोणी माणसं तुला घ्यायची असतील तर घे. त्या वेळी बघू. उमाजी आधीच म्हणाला होता, हे राज्य बुडण्याच्या मार्गावर आहे, हे लोक इथून सुरक्षित दुसरीकडे जाण्याच्या तयारीत आहेत. खरंच दिसतंय ते. मानकरी कुटुंब हलवताहेत हा त्याचा स्पष्ट पुरावा. काय करावं? उमाजीशी बोलावं? की दासोभटांशी? बस्स. दोघेच तर आहेत... दोन-तीन दिवस उलटसुलट विचार केल्यावर तो उमाजीशी बोलला. असं असं आहे आणि अशी अशी जबाबदारी माझ्यावर टाकणार आहेत इत्यादी.

'मी म्हणत होतो ना तुला! हे सगळे लोक इथून निसटायच्या तयारीत आहेत. अर्थात

मानकरी तिकडं उदगीरला जाणार असतील. तरी पण कुटुंब त्या देशमुखीच्या गावाला का? सरळ आहे. इथं कोणालाच सुरक्षित वाटत नाहीय. म्हणजे या मोठ्या लोकांचं म्हणतोय मी. तुझ्यावर ही फार मोठी जबाबदारी होईल. त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षेसाठी कदाचित तुला ते त्या गावालाच ठेवतील असं मला दिसतंय. शरीररक्षक आणखी कोणीही मिळेल. पण तुझ्यासारखा ताकदवान आणि विश्वासू माणूस सहजी नाही मिळणार त्यांना.' उमाजी म्हणाला.

'तू येऊ शकशील सोबत? त्यांना विचारू संधी मिळाली तर?'

'अवश्य येईन. तू असल्यावर कसली डर? नुसतं तुझ्या हाताखाली तुझ्या आज्ञेत राहाणं चालेल मला. वयानी माझ्यापेक्षा लहान असलास तरी

आता तू वरच्या पातळीला गेलास.'

"असं काही नाही रे. काम हे काम असतं. पातळीच्या गोष्टी

कशाला?'

'एक तुला सांगतो शिरपती- तुझ्या ध्यानात आलेलं नसेल कदाचित. पण तुझं काम फार जोखमीचं आहे. मी मघाशी म्हणालो तसं, तुला आणि तुझ्यासोबतच्या माणसांना बरेच दिवस बहुतेक त्या देशमुखीच्या गावातच राहावं लागेल. मालकिणींची सुरक्षा करण्यासाठी. मानकरी तसं तुला नंतर सांगू शकतात. राजा बिंबदेवाने पुष्कळ सैन्य आधीच कोकणात पाठवलंय अशी बोलवा आहे. आणि ते स्वतः सुद्धा तिकडं जाण्याच्या तयारीत आहेत, अशा बातम्या आहेत. अशा सगळ्या बातम्या आता गणिकांपासून गणंगापर्यंत कुठंही कानावर येतात. ते जावूदेत. पण याचा अर्थ, एडके मानकरीसुद्धा जाऊ शकतात त्यांच्या सरदारासोबत. ते तुला त्या देशमुखीच्या गावालाच ठेवतील असा माझा अंदाज आहे. आणि ते काही महिन्यापासून काही वर्षांपर्यंत असू शकतं.'

'याच्यात मी काय करू शकतो? त्यांची आज्ञा तर पाळावीच लागेल

ना!'

'ते बरोबर. म्हणून आधीच तू तुझ्या मनाची तयारी कर, असं मी

म्हणतोय.'

'सांगतील ते काम करायचं. हाये काय त्याच्यात?'

'अरे, पण मालकिणीची ठेप ठिवायची तर तुला तिला भेटायला

लागणार, तिच्याशी बोलावा लागणार.'

'का बरं- दासी हायेत ना. आन समजा आली वेळ तशी तर त्यात

काय झालं?'

'तुझ्या ध्यानात कसं येत नाही? तुझ्यासारखा मेंढीच्या दुधावर पोसलेला तगडा गोरागोमटा माणूस. बाईचं मन पाकळू शकतं. तिचा पुरुष दूर आणि समोर सतत तू. आणि तू पण हाडामांसाचा माणूसच हायेस. तुझं-'

"भलतंच काय बोलतोस? तुझ्या हे मनातच कसं येऊ शकतं?' 'मानकरी- मालकांच्या मनात ते येऊ शकतं.' 'कसं येईल? माझ्यावर विश्वास आहे त्याचा.'

'आहे ना, आज आहे ना- मी नाही कुठं म्हणतोय? पण जसजसा वेळ जाईल आणि दूरदेशीचा मुक्काम वाढेल तसतसं किल्मिष उगवू शकतं. तुझ्याविषयी बरं न वाटणारा

एखादा कोणी मानकरी- मालकांचे कान भरू शकतो, काहीही झालं नाही तरी. ही मला जास्त मोठी जोखीम वाटतेय. मी तुझ्यापेक्षा अधिक उन्हाळे पावसाळे पाहिलेत अन मी तुझा मित्र आहे हे लक्षात घे.'

'तो विषयच नाही. याच्यात मार्ग काय मग? सांगितलेलं काम तर करावाच लागन.'

"लगेच याचा विचार करायची गरज नाही. पण हे लक्षात घेतलं पाहिजे.'

'बरोबर. तुला सोबत घेण्याचा आग्रहच धरतो मी. म्हणजे सांगशील तरी नीट त्या त्या वेळेला.'

नंतरच्या काही दिवसात अनेक वेळा उमाजीचं सांगणं शिरपतीला आठवे. त्याची तर्कबुद्धी आणि दूरवरचं पाहण्याची क्षमता यांचं मनात येई. काहीही निर्णय घेताना स्वतःला केंद्रस्थानी ठेऊन घेणं योग्य. आंधळा आज्ञाधारकपणा उपयोगाचा नाही, याची त्याला पहिल्यांदा जाणीव झाली. आजवरच्या आपल्या जगण्यात आपल्याला कोणत्याही गुंतागुंतीच्या प्रश्नांना सामोरं जावं लागलेलं नाहीय. एका लहान्या गावात मेंढ्यांच्या सहवासात आपण आनंदात जगलो. भोवताली माणसं होती तरी त्यांच्या भानगडीत आपल्याला सहसा पडावं लागलं नाही. ही दुनिया प्रामुख्याने माणसांची आहे, याची जाणीव आता अंगी बाणवली पाहिजे. बाकी प्राणी, वनस्पती असतातच.पण त्या दुय्यम. माणूस केंद्र. त्यांच्यात वावरताना अधिक जागरूकपणे विचार करावा लागतो. उमाजीला सहज जे जाणवलं, त्याचं काहीही आधी आपल्या मनात आलेलं नव्हतं. माणसांच्या या दुनियेत टिकून राहण्यासाठी त्याला नेहमी सावध राहावं लागलं असेल. आपणही यापुढं नीट विचार केला पाहिजे.

आवई अशी उठली की खिलजी आलाय. मोठं सैन्य घेऊन आलाय. दोन दिवसांच्या मजलीच्या अंतरावर तळ ठोकून बसलाय. पळापळ झाली. अनेक लोक कुटुंब-कबिल्यासह पळाले. याच्या आधीही अशा भुमका उठल्या होत्या आणि पळापळ झाली होती. आणि काही दिवसांनी लोक परत आले होते. ह्या वेळी जरा वेगळं घडलं. लोक पळाले. राजा शंकरदेव याने शहराच्या भोवती सैनिकांची तटबंदी उभी केली होती. त्या सैनिकांनी पळणाऱ्या लोकांना पकडलं. आणि कैद केलं. नंतर लहान मुलं आणि बायकांना सोडून देण्यात आलं. पण पुरुषांना कैदेत ठेवण्यात आलं. ते सगळे मोठे आणि प्रतिष्ठित लोक होते. व्यापारी, पेढीवाले, राजदरबारी संपर्क ठेऊन हुशारीने वरच्या वर पैसा कमावणारे लोक, पुराणिक, उपाध्याय असे ते होते. काही सरदार दर्जाचे लोकही त्यांच्यात होते. या सगळ्यात एडके मानकरीसुद्धा गायब झाले होते. पण ते एकटेच गायब झाले होते. त्यांची पत्नी, मुलगा तर वाड्यात होतेच पण दास-दासीसुद्धा होत्या. कोणीही पळून गेलेलं नव्हतं आणि एडके मानकरीच तेवढे गायब होते. काही गुप्त राजकारणासाठी कुठं गेले आणि केवळ योग म्हणून या पळाच्या वेळी गायब झाले असं काही झालं होतं का? पण मग शिरपतीला का सोबत नेलं नव्हतं त्यांनी? की त्याच्या पासूनही ते गुप्त ठेवायचं होतं त्यांना? शिरपती हे विचारणार कोणाला? सरसोतीला विचारलं, तर म्हणाली, काहीच समजत नाही. मालकीण गप्प आहेत. आपण त्यांना कसं विचारणार? त्यांनी स्वतः होऊन विषय काढला

तरच काही कळू शकतं. त्या काहीच बोलत नाहीयेत.

वाड्यात कोणी येत-जात नव्हतं. दिवसा-रात्रीचे दारवठेकर जांभया देत देवडीत बसत. आत सतत शुकशुकाट. शिरपतीला तर काहीच काम

नसे.ज्याच्या शरीराचं राखण करायचं तोच गायब होता. एक दिवस उमाजी म्हणाला, 'मानकरी-मालक कैदेत असतील असं तुझ्या मनात नाही येत?'

'येतं.'

'म्हंजे पळून नसतीन गेले ते. बायको-मुलाला घरी टाखून कशाला

पळतील समजा-'

'तेच ना!' 'ते नेमके पळणाऱ्या लोकात अडकले.'

'आता तुरुंगात कोण जाऊन बघणार? आपल्या सारख्याला कोण

जाऊ देतो तिथं?'

'तुझा तो भट- त्याला विचार. काही मार्ग असला तर सांगेल तुला

तो.'

'कोण? दासोभट- हां, विचारता येईल त्याला. पण परस्पर आपण असा उद्योग कसा करायचा? मालकीण काय म्हणेल? तिला काय वाटेल? कदाचित तिलाच खरं काय ते माहिती असेल. म्हणूनच ती गप्प आणि शांत असेल.'

'हां. ते बी खरंच.'

काय करायचं याचं काहीच शिरपतीला ठरवता येईना. त्याची मनः स्थिती फार चमत्कारिक झाली. अखेर दासोभटाकडं त्यानं विषय काढला. पण मानकरी यांचं नाव टाळून. 'अरे ते सगळे मातलेले लोभी आणि भामटे लोक.तेच पळून जातात ना! त्यांना कैद केलंय राजानं यात गैर ते काय? अरे, चांगले चाबकाखालून काढले पाहिजे एकेकाला.' भट त्वेषाने म्हणाला, 'तू आणि मी का पळून जात नाही. उद्या तो खिलजी आला की त्याच्या समोर

लोंडा घोळायला हेच लोक पुढे सरसावतील. बघत राहा तू.'

नंतर बराच वेळ तो नुसताच बसून राहिला. मनात घुटमळत.

जुळवाजुळव करत.

'मला आमच्या मानकरी- मालकांची काळजी लागून राहिलीय.' धीर

करून शिरपती म्हणाला.

'का? त्यांचं काय?' 'त्यांचा पत्ताच नाहीय.' 'काय सांगतोस? कधीपासून? आणि त्यांचं कुटुंब?'

'हेच ते खिलचीची अवाई उठली तव्हापसून गायप. काय कळानी

झालंय.कुटुंब इथंच हाये.'

'अरे! गेला तो, संधी साधून पळाला त्याच्या लोकात. मी म्हणालो होतो तुला ते-' असं उत्स्फुर्तपणे बोलत असताना भटाने स्वतःला अचानक थांबवलं.

'पण त्यांचे लोक तर इथंच राहिलेत.'

'खरं आहे तू म्हणतोस ते. काही गुप्त राजकारणासाठी गेले असतील. येतील परत.' दासोभटाने स्वतःला सावरलं. आपल्या मनात जे आलंय ते विपरीत आहे अशा भावनेनं.

'माझा एक जोडीदार म्हणतो- म्हणजे चुकूनच झालं असंल तसं, की बुवा- त्यानला पकडून ठेवलं आसंल का या गडबडीत? आणि आसलं तर

आपल्याला पत्ता कसा लागणार?'

'कठीण आहे ते. पण प्रयत्न करतो मी तुझ्यासाठी.' 'त्याच्यासाठीच आलो होतो मी. पण म्हणायला जीभच रेटाना.' 'ते बरोबर आहे. मी बघतो, सांगतो तुला.' भट म्हणाला.

दासोभटाकडून परतल्यावर काही दिवस वाट पाहण्यात गेले. चार दिवसांनी लगेच त्यांच्याकडं जाणं योग्य नव्हतं. काही कळलं असतं तर त्याचा निरोप आला असता किंवा तो स्वतः भेटायला आला असता. असे आठ-दहा दिवस लोटल्यावर मात्र शिरपती पुन्हा भटाच्या घरी गेला. तेव्हा भटाने सांगितलं की, 'मानकरी पकडले गेलेले नाहीत हे नक्की. पण बाकी त्यांचा तपास मात्र लागत नाहीय.'

'याच्यात मी काय करावं आसं तुमाला वाटतं?' शिरपतीने विचारलं.

'तू काय करणार? थांब आणि वाट बघ. त्याच्या पाठी आता त्याच्या स्त्रीनं काही ना काही निर्णय घेतला पाहिजे.' शिरपतीला भटाच्या स्वरात एक चमत्कारिक कोरडेपणा जाणवला. आणि तो त्याला अनाकलनीय वाटला.

'म्हनजे?'

"अरे बाबा ती त्याची पत्नी. तिला काही ना काही माहीत असेलच.

दुसरा कोण काय करू शकतो याच्यात?'

शिरपती गप्प राहिला.

'मला कुठं काही समजलं तर मी ते तुला सांगेन, इतकंच आता मी तुला सांगू शकतो. आणि काळजी करू नकोस. तू याला जबाबबदार थोडाच

आहेस? काही तरी होईलच.'

आणि लवकरच ते झालं. म्हणजे अगदीच काहीही घडत नसण्याच्या

यातनामय स्तब्धतेत कृतीच्या मागणीचा बारकासा कंप झाला. शिरपतीच्या मनात गच्च भरलेला बांध फुटण्याची भावना झाली.

एके दिवशी सरसोती म्हणाली, 'मालकीणबाईंनी बोलावलंय.'

मग तेच आतल्या घरात जाणं. पडद्यासमोर उभं राहाणं. पण यावेळी मालकिणीचा स्वर कानावर आला. धारदार आणि कोमल. पुरुषार्थाचा स्वर. पुरुष म्हणजे आत्मा. आत्मिक बळाचा स्वर. दुःखाच्या आणि वंचनेच्या पलीकडचा. शिरपतीला वाटलं, बाई रगदार आहे. आपण काय करत आहोत आणि आपल्याला काय करायचं आहे यावर हिची पूर्ण सत्ता आहे. ही कोणावरही अवलंबून नाही आणि ही कोणाच्याही वळचणीला पडणारी नव्हे. अशी स्त्री आपल्याला माहीत नाहीय. पण मोठ्या लोकात अशा बाया

असतीलही कदाचित. ही आहे, म्हणजे अशा असतीलच.

'गणिका चंद्रसेनेचा प्रासाद तुला माहीत आहे?'

'हो.'

'सरस्वती एक संदूक तुझ्याकडे देईल. ती तिच्याकडं पोहोचवायची.' 'पोहोचवतो.' 'ती तिच्याच हातात पडेल याची खात्री करायची.' 'करतो.' 'इतर कोणालाही हे कळता कामा नाही.' 'कळणार नाही.' 'ठीक. ये तू.'

हे काम जोखमीचं आहे आणि यातील गोपनीयता सगळ्यात महत्त्वाची आहे, ही गोष्ट शिरपतीच्या तात्काळ लक्षात आली. प्रश्न अर्थातच उगवले मनात. गणिका चंद्रसेना आणि मालकीण यांचा काय संबंध? मानकरी मालक यांच्या गायब होण्याशी या संदुकीच्या चंद्रसेनेकडं जाण्याचा काही संबंध असू शकतो? मानकरी चंद्रसेनेकडं जात होते हे त्याला माहीत होतं. पण मग ते मालकिणीला आधी माहीत होतं? पण तिच्याकडं तर किती तरी लोक जात असतात. ती या नगरीतील सगळ्यात प्रतिष्ठित गणिका आहे. अलोदिन खिलची आला तर ती त्याच्यासोबत जाईल असं उमाजी म्हणतो. स्वतःच्या सुरक्षिततेसाठी कैक बड्या लोकांनी तिच्याशी संधान बांधलेलं आहे. पण या गणिकेची आणि मालकिणीची ओळख कशी? हे काय गौडबंगाल आहे? तिला ही संदुक कशासाठी द्यायची? काय असेल यात? दासोभट म्हणाला होता, मालकिणीनं निर्णय घेतला पाहिजे. तिला काही ना काही माहीत असणार. काय असेल? सालं, मानलं पाहिजे भटाला. काहीही असो. कोणाशीही न बोलता काम करावं हे सगळ्यात योग्य. पण मग हे चंद्रसेनेच्या हाती द्यायचं तर कसं आणि केव्हा? ती प्रत्यक्ष समोर कशी भेटणार आपल्याला? कोणत्या वेळी जावं? कोणाशी बोलावं? ....शिरपती विचार करत होता. त्याने चंद्रसेनेच्या प्रासादाच्या भोवताली तीन-चार खेपा टाकल्या. तिथल्या एका दारवठेकराच्या सुद्धा ते लक्षात आलं. कारण अखेर त्यानंच शिरपतीला संकेत करत आपल्याकड बोलावलं. 'मी ओळखतो तुला. तू आलेला आहेस इथं. सहस्त्रसेनाला एका घावात धडावेगळं करणाऱ्या तुला सगळेच ओळखतात. तू इथं येतोस आणि दूर थांबून निघून जातोस, ते का? तुला काय हवंय?' शिरपतीला धीर आला. त्याचं प्रस्तावनेचं काम अनायासेच होऊन गेलं. म्हणाला, 'माझं एक फार महत्त्वाचं काम आहे. आणि ते थेट तुझ्या मालाकिणीशी आहे. मला तिची भेट हवी आहे. मला एक वस्तू तिला द्यायची आहे. आणि ती थेट तिच्या हाती द्यायची आहे. पण आता ही इतकी मोठी बाई मला कशी आणि कधी भेट देणार याची चिंता मला लागून राहिलेली आहे. मला काहीच मागे सुचत नाही.'

'समजा मी ती तिला दिली तर? म्हणजे मी खात्री देतो तुला की मी
नक्की देईन.'

'नाही. म्हणजे तू ते करशील यावर माझा विश्वास आहे. पण मी
स्वतः ती द्यावी असं मला सांगण्यात आलेलं आहे."

'तशी भेट मिळणं कठीण आहे रे मित्रा. इथं सगळं कनक, नाम आणि पद यांचं चालतं. तुझ्या-माझ्या सारख्याकडं या कोणत्याच गोष्टी
नाहीत.'

शिरपतीला काहीच सुचेना. तो नुसताच शुंभासारखा उभा राहिला. मग त्याला वाटलं, याला आपण काही धन देऊ केलं तर? 'माझ्याजवळ फार काही नाही. पण मी तुला थोडं काही माझ्या या कामासाठी देऊ शकेन.' तो चाचरत म्हणाला.

दारवठेकर हसला. म्हणाला, "तुझा स्वरच सांगतोय, तू अशी गोष्ट आयुष्यात कधीही केलेली नाहीस. आणि तू देणार काय अन मी घेणार काय मित्रा! आपण एकमेकांचे एक. काय घेतो आणि देतो? हे बघ, ते मला काहीच नको. तू असं कर. तू उद्या संध्याकाळी म्हणजे तिसऱ्या प्रहरी इथं ये. त्यावेळी वर्दळ नसते. मालकिणीची मर्जी असेल तर होऊन

जाईल भेट.

तिसऱ्याप्रहरी त्या तयार असतात. मी सांगेन आत जाऊन. बघू, जमलं तर तुझं नशीब.'

आणि दुसऱ्या दिवसाच्या तिसऱ्याप्रहरी त्याचं नशीब खरंच फळफळलं.लाल रुमालात गुंडाळलेली ती चपटी संदुक काळजीपूर्वक सोबत घेऊन तो पोहोचला तेव्हा त्याला बघून प्रासादाच्या प्रवेशदारीचा दारवठेकर संकेतखुणेचं हसला. आतल्या कोणाला तरी तिथं उभं करून आणि शिरपतीलाही तिथंच थांबायला सांगून तो आत गेला. पुराणिकाने सांगितलेल्या कहाण्यांमधील भव्य प्रासादांची त्याला आठवण झाली. इथं तो याआधी अनेकदा आलेला होता. पण इतका निवांतपणा त्याच्या अनुभवाला कधीच आलेला नव्हता. सजे, गवाक्षं, हंड्या, झुंबरं आणि आतल्या हवेत तरंगणारा जाई, केवडा अशा फुलांची आठवण देणारा सुखद शीतल मंद गंध. धन-संपत्ती इथं उतू चाललेली नाहीय. ती इथं सुखानं नांदतेय; त्याच्या मनात आलं. गणिका या केवळ देह विकणाऱ्या वारांगना किंवा वारयोषिता नव्हेत. त्या सौंदर्यवती तर असतातच. पण त्या सोबतीनं त्या चतुर असतात, अनेक विद्या आणि कलांमध्ये पारंगत असतात. गायन, वादन, नर्तन यांच्या सोबतीनं अगदी राजनीतीसकट कोणत्याही विषयानुषंगाने सहज संभाषण करण्यात त्या वाकबगार असतात, असं त्यानं दासोभटाकडून ऐकलेलं होतं. चंद्रसेना ही या नगरीतली सर्वश्रेष्ठ गणिका. तिच्याजवळ हे सगळं ओतप्रोत असणार हे सरळच होतं.

'नशीबवान आहेस मित्रा. चल माझ्यासोबत.' जरा वेळानं आतून

आलेला दारवठेकर म्हणाला.

बरीच दालनं ओलांडत ते चालत गेले. तिथल्या वास्तुसौष्ठवाकडं आता शिरपतीचं लक्ष नव्हतं. रुमालातल्या संदुकीत त्याचं मन एकाग्र झालेलं होतं.अखेर एका दालनात एका भल्या मोठ्या पडद्यासमोर ते उभे राहिले. अशा ठिकाणी पडद्याकडं न बघण्याचा संकेत शिरपतीला अंगभूत शहाणपणाने माहीत झालेला होता. पडद्यासमोर उभे राहण्याची ही त्याची तिसरी वेळ होती. अर्थात त्यानं तसं केलं असतं तरी त्याला काहीही दिसलं नसतं, हा भाग वेगळा. पण तसं केलं तर आतल्या माणसाचं आपल्याविषयीचं मत कलुषित होऊ शकतं, हे त्याला समजत होतं.

'आण.' आतून आज्ञा झाली. 'दे माझ्याकडं.' जोडीदाराने संकेत केला. 'अरे, पण माझ्या हातानं-' शिरपतीच्या तोंडातून शब्द फुटेना. चंद्रसेना आतून बघत असणार. जोडीदाराचा हात समोर खडा. संदूक घेण्यासाठी. इतक्या जवळ येऊनही प्रत्यक्ष हातात नाहीच का देता येणार?

'दे त्याच्याकडं.' आतून आज्ञा. आता इलाजच खुंटला.

जोडीदाराने रुमाल घेतला आणि गुडघ्यांवर बसत काळजीपूर्वक पडद्याखालून आत सरकवला. आत आणखी कोणीतरी तो उचलून आणखी कोणाला तरी दिला. एखाद्या दासीने चंद्रसेनेला दिला. वेगळं काय असणार?

'काळजी करू नकोस. हे तू मला थेट दिलेलं आहेस असं खुशाल त्यांना सांग. कारण ते तू केलेलंच आहेस. अन दोन दिवसांनी याच वेळेला ये परत.' जरा वेळाने आतून आश्वासक स्वर आला. संदूक उघडून खूण पटल्याची ओळख. आणि जवळिकीचा स्वर. शिरपतीची अस्वस्थता

किमान पातळीला उतरली.

'चल.' दारवठेकर जोडीदाराने संकेत केला.

'धन्यवाद मित्रा. दोन दिवसांनी याच वेळेला भेटू परत.' शिरपती

प्रवेशद्वारी निरोपाचं म्हणाला.

'तुझं काम झालं याचा आनंद आहे. मी ते करू शकलो याचाही.'

दारवठेकर म्हणाला.

सगळंच गूढ होतं. पण गुप्तता महत्त्वाची होती. काही तरी घडत होतं खास. सरसोतीला कितपत माहीत असेल? संदुक तर तिनंच त्याच्याकडं दिली होती. कोणाला द्यायची हे माहीत असेल तिला? त्या पाठीमागचं कारण? संदुकीत काय होतं ते माहीत असेल तिला? थेट न विचारता झुडपाभोवती धोपटायची विद्या आता काही अंशी त्यानं आत्मसात केली होती. पण ती त्याच्यापेक्षा कैक चतुर आणि अनुभवी. हसत म्हणाली, 'असेलही मला माहीत. पण ते मी तुला का सांगावं?' तो विरमून म्हणाला, 'नायी नायी. मला ते नव्हतं विचारायचं?'

'नसेल ना! पण माझ्या मनात आलं ते मी का नाही बोलायचं?'

पुन्हा तेच स्वच्छ हसणं.

'हात जोडतो बाई. चुकी झाली.'

'असुदे असुदे.' ती म्हणाली, 'कान उघडे ठेवून तोंड बंद ठेवणं आपल्या सारख्यासाठी नेहमीच सोयीचं, हे ध्यानात ठेव. आणि दुसरं एक. यापुढं मला सरस्वतीच म्हणायचं. बोलण्यात बदल होतोच आहे तुझ्या. त्याच्यावर मेहनत घे. म्हणजे गावठी असण्यात गैर आहे फार, असं मला नाही म्हणायचं. पण आपल्याला जिथं वावरायचं तिथली भाषा आलीच पाहिजे, असं नाही का?'

'कान उघडे ठेवून तोंड बंद.' त्यानं हसत स्वतःच्या कानांच्या पाळ्या

अंगठे आणि शेजारच्या बोटांच्या चिमटीत धरल्या.

दोन दिवसांनी पुन्हा प्रवेशद्वार. दारवठेकर. स्मितांची देवघेव. दालनं ओलांडणं. पडद्यासमोरची स्तब्धता. मग पडद्याखालून रुमालासह संदूक हलकेच अल्याड. घेऊन जा. दोन शब्दांचे एक वाक्य. चल. जोडीदारानं खुणावलं. पुन्हा इकडं येऊन सरस्वतीस सूचन. इकडील पडदा. आतून एकाच शब्दाचं प्रश्नार्थक वाक्य. 'आणलंस?' उत्तर, 'हो.'

'सरस्वतीकडं दे.' पुढची आज्ञा. दिलं. पण ते तर मी एरवीही दिलंच असतं. बोलायचं नाही. कान उघडे ठेवून तोंड बंद. वेळ संपली. चला, हला आता.

चार दिवसांनी पुन्हा पडद्यासमोर पाचारण. आतून स्थिर स्वरलयीत

आदेशवजा घोषणा.

'आणखी आठ दिवसांनी आपण वांबोरी येथे जाण्यासाठी निघणार आहोत. वांबोरी हे आमच्या देशमुखीचे गाव आहे. प्रवासासाठी सहा ते आठ दिवस लागतील. रस्त्याने मुक्कामाच्या व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. मेण्यात माझ्यासोबत बाळ आणि सरस्वती असेल. मेणा वाहण्यासाठी आठ भोई असतील. ते प्रत्येक वेळी चार असे आलटून पालटून काम करत राहतील. तू चार उत्तम शस्त्रसज्ज घोडेस्वार निवडायचे आहेत. मेण्याभोवती ते चौघे चालत राहतील. तुझा घोडा सर्वात पुढे असेल. तुझ्यापाठी या चार स्वारांच्या मध्ये

मेणा घेतलेले भोई चालतील. वांबोरी येथे आमचे तिडके नावाचे पाटील आहेत. त्यांना आमचा वाडा साफसूफ करून घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच आवश्यक त्या वस्तू आणून त्या तयार ठेवण्यास सांगितले आहे. वाड्यात कामासाठी स्थानिक स्त्री-पुरुष मिळतील. त्याची तात्पुरती व्यवस्था पाटील करतील. आपल्या सोबत येणारे भोई आणि घोडेस्वार यांच्या तात्पुरत्या राहण्याची व्यवस्था करण्यास सांगण्यात आलेलं आहे.कायम स्वरूपी व्यवस्था नंतर होईल. या सगळ्यांची बायका-मुलं आणण्याची व्यवस्था नंतर लगेच काही दिवसात करण्यात येईल. या दृष्टीने तयार असणारे घोडेस्वार आणि भोई तू निवडायचे आहेत. भोई कदाचित परत आले तरी चालतील. ते त्यांनी त्यांच्या इच्छेनुरूप ठरवावे. पण शस्त्रे चालविण्यात पारंगत असलेले आणि उत्तम घोडेस्वारी करणारे चार लोक तू निवडायचे आहेत. त्यांनी तिकडेच स्थलांतरित व्हावे, तिकडे स्थाईक व्हावे अशी अपेक्षा आहे. तशी समज त्यांना देण्यात यावी. तुझी बायको

आणि मुलं नंतर बाकी सगळ्यांसोबत येतील. आपली टिक्की मेंढी आणि तिचं कोकरू, जे आता चांगलंच मोठं झालेलं आहे ते तुझ्या इतर मेंढ्यांच्या कळपासोबत नंतर येईल.तुझे आई आणि वडील कळप घेऊन येतील. त्यांना तसं सांगण्यात आलेलं आहे. आणि ते आनंदाने त्यासाठी तयार आहेत. त्यांना तिकडे राहण्यासाठी घर आणि कसण्यासाठी शेतजमीन देण्यात येईल. मेंढ्यांसाठी खुरटं गवत आणि कोरडी हवा त्या परिसरात भरपूर आहे.'

घोषणेनंतर स्तब्धता. अगदी पडदाही स्थिर. आणि श्रीपती एकटाच समोर.अगदी सरस्वतीची सुद्धा चाहूल नाही. ती कुठे असेल, इथे असेल की नसेल; काहीच पत्ता नाही.

'काही प्रश्न?'

आहे. प्रश्न आहे. एकच आहे, पण आहे. म्हणजे आपण उत्तमच सगळं ठरवलेलं आहे. नियोजनात मुंगीला देखील शिरायला वाव नाही. घोडेस्वार आणि भोई निवडण्यास मला सांगून माझ्यावर आपण विश्वासच प्रकट केलेला आहे. माझ्या बायको-मुलांचा, आई-वडिलांचा आमच्या मेंढ्यांसकट उत्तम विचार केलेला आहे. तक्रारीला जागाच नाहीय. पण प्रश्न आहे. एकच आहे.एडके मानकरी- मालक कुठे आहेत? आणि त्याच्यातून फुटणारे आणखी प्रश्न अर्थातच तयार होतात. कुठे गेले आहेत? कधी येणार आहेत ? संदुकीत काय संदेश होता? कोणत्या माहितीच्या उजेडात हा वांबोरीस जाण्याचा निर्णय होतोय? आणि हा कायम स्वरूपाचा, किमान दीर्घ पल्ल्याच्या मुक्कामाचा निर्णय होतोय तर उदगीर येथील विद्रुमसेन महाराज यांना कळविण्यात आलेले आहे काय?

'काही प्रश्न ?' पडद्यापल्याडून पुन्हा प्रश्न. जरा धारदार स्वर. 'नाहीत.' तो म्हणाला. सरस्वती म्हणाली होती, ‘कान उघडे ठेवून तोंड बंद.' बस्स. काहीही प्रश्न नाहीत.

वांबोरी हे सहज समोर येणाऱ्या चार गावांसारखं गाव नव्हतं. गावचा पाटील बामण. तिडके. त्यांचा मोठा वाडा होता. एडके देशमुखांचा वाडा त्याच्या शेजारीच आणि साहजिकच अधिक मोठा होता. मात्र तो जास्त जुना होता. काही जण असं सांगतात की, मुळात देशमुखांचा हा वाडा एका धनगराने बांधलेला होता. या गावाची वसतीच मुळात त्या धनगराच्या पूर्वजापासून सुरू झालेली होती. या भागातलं रान तोडून त्यानंच इथं वसती घातली होती. प्रतिष्ठान, देवगिरी अशा ठिकाणी जाधव राजांचा अंमल सुरू होण्याच्या कैक आधीच्या या गोष्टी आहेत. त्या लोकांच्या पाच-सहा पिढ्या इथं नांदताना त्यांची खूप भरभराट झाली. सहाव्या पिढीतल्या माणसानं हा वाडा बांधला. आणि पुढच्या पिढीला त्यांचा वसबूड झाला. म्हणजे वंश थांबला, बुडाला. या अपशकुनाचा धसका घेऊन त्या वाड्यातले सगळेच हे गाव सोडून गेले. नंतर इथं राहणारे सगळेच लोक एकापाठोपाठ एक असे निघून गेले. ते कुठं गेले, त्यांचं काय झालं याविषयी दंतकथाच फक्त शिल्लक आहेत. पण त्यांच्यापैकी कोणीही इकडं परत आलं नाही, ही वस्तुस्थिती. त्यामुळं हे गाव खूप काळ ओस पडलेलं होतं. नंतर, बऱ्याच काळानंतर तिडके यांच्या एका पूर्वजाला या गावाची पाटीलकी देण्यात आली. या ओसाड गावाची पाटीलकी तिडके याने मोठ्या हिमतीने स्वीकारली. त्याने कुणबी आणून वसवले. गावाच्या जुन्या तटबंदीची डागडुजी करून घेतली.त्यासाठी आणलेले कारागीर गावात सामावून घेतले. कुणब्यांच्या सोयीसाठी अलुते-बलुते आणले. काळी पिकांनी नटत राहिली आणि पांढरीत घरं बांधली गेली. पाण्याच्या बारवा, देवळं असंही बांधलं गेलं. या गावात नवी-जुनी खूप देवळं आहेत. नव्या हेमाडपंती शैलीत सुद्धा काही बांधलेली आहेत. अनेक उदमी व्यापारी इथं सुखाने राहतात. आसपासच्या परिसरातच नव्हे तर बऱ्याच दूरपर्यंत त्यांचा व्यापार चालतो. असं एकूण हे गाव पुन्हा भरभराटीला आलं. पुढे महादेवराय जाधवाच्या कारकिर्दीत एडके यांच्या त्या काळातील पूर्वजाला - म्हणजे बहुधा केशीराज एडके यांच्या आजोबाला- जी देशमुखी मिळाली, त्यात हे गाव म्हणजे वांबोरी आलं. ते इकडं आले असता त्यांना इथला माहौल अन विशेष करून हा मोठा वाडा फार आवडला. त्यांनी तिडके पाटील यांना त्याची डागडुजी करायला सांगितली. तेव्हा तिडके यांनी त्याची कुळकथा देशमुखांना सांगितली, की राजे, असं करता असं आहे. आपण ठरवा. आपला निर्णय झाला की डागडुजी अवश्य होईल.देशमुखांनी थेट श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून तेथील विख्यात भटजी शेंडेशास्त्री यांना पाचारण करून वास्तूची खातरजमा करवून घेतली आणि तिची शांती करवून घेतली. तसेच स्वतः श्रीक्षेत्री जावून शास्त्रीजींच्या मार्गदर्शनाखाली नारायण नागबळीचा विधी करून घेतला. देणगी, दक्षिणायोगे भटजी यांस विशेष संतुष्ट केले. यापुढे आपण तिथे संतोषाने राहावे यात खोट नाही, असा आशीर्वाद त्यांनी दिला. तेव्हापासून या गावी या वाड्यात अधूनमधून आवर्जून वसती करून राहण्याचा एडके देशमुखांचा रिवाज आहे. इथे राहून जी एक प्रसन्नता मिळते, ती बाकी कारभारासाठी उत्तम बळ पुरवते असा त्यांचा समज आहे. त्यांच्या कुटुंबियांचा अभिप्रायही वेगळा नसतो. अर्थात गाव आलं की गावगप्पा असतातच. देशमुख गावात राहतो किती? वर्षातून सरासरी समजा महिनाभर. बाकी वेळा गाव त्याच्या स्वतःच्या मर्जीनंच जगतं ना! दबत्या आवाजात प्रसृत असलेली एक गप अशी आहे की हे एडके-देशमुख मुळात त्या जुन्या गाव

सोडून गेलेल्या धनगरांचे वंशजच आहेत. ते स्वतःला बामण म्हणवतात, ते ठीक आहे. पण मुळात ते धनगरच. एडके असं नाव बामणात कधी असतं का? आवो, शेळीचा जसा बोकड तसा मेंढीचा एडका. मेंढ्या तर धनगरच पाळतात ना! याच्यावर काही असं म्हणतात की बाबा, असं काही नाही. कुणबी सुद्धा मेंढ्या पाळतात. याच्यावर आधीचा म्हणतो, पाळतात ना. पण ते देखील चार पिढ्यानंतर धनगरच होतात. जो जसा धंदा करतो, ते त्याला नाव. कुणबी, धनगर कायच फरक नाही. तरीही कुणब्याला कुणबी आणि धनगराला धनगरच म्हणतात. आणि धनगराचा बामण कधीच होत नाही.पण हे झाले. असा अभिप्राय देऊन तो हसतो. पण असं हे इतकंच असतं. अन तेही दबत्या सुरात. चाललंच आहे. राजालाही त्याच्या पाठी गजा म्हणणारे असतात! असोत, असोत.

मालकीणबाई- आता त्या देशमुखीण- आल्या. आणि लख्ख केलेल्या त्यांच्या वाड्यात राहू लागल्या. बराच काळ रिकामा असलेला वाडा नांदू लागला. घोडेस्वार रहिवसले. त्यांची कुटुंबं आली. त्यांची व्यवस्था लागली. भोई परतले. त्यांना इथं रोजगार दिसेना. राजधानीत तो कायम. म्हणून गेले.इथं देशमुखीणीला कधी मधी लागले तर भरपूर मिळू शकत होते.

गरीब कुणबी कोणत्याही कामासाठी कायम तत्पर असतात. आणि त्यांच्या अंगी ताकदही अतोनात असते. इतक्या हलाखीत जगताना ती त्यांच्यात कुठून उरते ते तो एकटा परमेश्वरच जाणे. बाकी श्रीपतीच्या आईवडिलांसोबत मेंढ्या आल्या. त्यांनी शेतात वसती करणं पसंत केलं. श्रीपती, त्याच्या बायको आणि मुलांसोबत गावात राहू लागला. देशमुखांच्या वाड्यावर दिवसातून एकदा ठरल्या वेळी पडद्यासमोर लवून नमस्कार करणे आणि काही प्रश्न विचारले गेल्यास त्यांची उत्तरे देणे, काही कामगिरी सांगितली गेल्यास ती पार पाडणे इतकंच काम. पण तेही फारसं नसे. असलंच तर अगदी किरकोळ असे. तरीही देशमुखीण त्याला बराच वेळ बसवून घेत असे आणि बोलत असे. तिच्यासाठी तो सगळ्यात विश्वासाचा माणूस होता. ती बाई मोकळेपणाने बोलणार कोणाशी? आणि बाकी कोणी सहजी तिला भेटू शकायचं नाही ना! मग, गाव कसं वाटतं? सगळ्यांची व्यवस्था लागली ना? इथपासून ते, लोक काय म्हणतात? तुझी बायको-मुलं इथं आनंदात आहेत ना? तुझे आई-बाबा काय म्हणतात? असे प्रश्न. मग कधी तरी, अरे! छानच आहे की तुझी बायको. आली होती इथं. म्हणजे मीच बोलावलं होतं तिला. ही अशी सगळी एकेरी वाहतूक. प्रश्न तिचे. उत्तरं श्रीपतीनं द्यायची. याने प्रश्न विचारायचे नाहीत. तिच्या प्रश्नांसाठी त्याचे कान उघडे, प्रश्नांसाठी त्याचं तोंड बंद. गावात लोकांना प्रश्न पडला होता. तो देशमुखीणीच्या लवाजम्याला आधीपासून पडलेला आणि कोणालाही सहज पडेल असाच होता तो प्रश्न. देशमुख कुठं आहेत, कधी येणार आहेत? श्रीपतीलाही होतेच प्रश्न. इकड येण्याच नक्की झाल्यावर साहजिकच तो दासोभटाला भेटला होता आणि त्याला ही बातमी दिली होती. तो म्हणाला, मी सांगितलं होतं ना तुला- त्या बाईला नक्कीच माहीत असणार. त्याची बायको आहे ती. घेईल ती योग्य तो निर्णय. तो कुठं गेलाय हे तिला कळलंय आणि तिनं निर्णय घेतलाय. ही माहिती चंद्रसेनेच्या संदुकीतून आली असणार हे श्रीपतीच्या लक्षात आलं. ते काही त्यानं भटाला सांगितलं नाही. पण प्रश्न उरलाच. कुठं गेले असतील? कधी येणार आहेत? उमाजी एकदा म्हणाला होता, मानकरी मालकांना

देवादिकांचा लय नाद. ह्या सगळ्या गडबडीत गपचिप कोणच्या तीर्थाला तर नसतीन ना गेले? श्रीपतीला वाटलं, गेलेही असतील. पण असं न सांगता सवरता? भरल्या प्रपंचाचा त्याग करून? ते आठवून हिय्या करून त्यानं भटाला विचारलं, कुठं गेले असतील? त्यांना देवधर्माचा लय नाद होता असं म्हणतात. साधू-संतांचा सहवास आवडायचा त्यांना अन त्यांना दानधर्म करायचे खूप. मी ऐकलेलं आहे. नक्की माहीत नाही. तुमी एकदा म्हणाले, तो त्याच्या लोकात गेला असेल. अन थांबलात. कोण असतील हे लोक? सिद्ध? योगी? तुमचं शास्तर काय सांगातं? भट हसला. म्हणाला, काहीही शास्त्र न वाचता तुला किती रे सहज समजतं? म्हणूनच मी तुला सांगत नव्हतो. तुझ्या बरोबर लक्षात आलंय. म्हणजे तीच शक्यता मला दिसतेय. कुटुंबाचा त्याग करून माणूस परमेश्वराच्या शोधातच जाऊ शकतो ना! आणखी कुठं जाणार? आणि याच्याही पल्याड काही असेल तर ते त्याच्या गृहिणीलाच माहीत, असं नाही का! तरीही हे भटाला म्हणायचं नाहीय. त्याचा होरा आणखी वेगळा असावा, याच्या पल्याडचं काही तरी त्याच्या मनात असावं, असा श्रीपतीला संशय होता. तो आपल्यापासून काहीतरी लपवतोय अशी त्याची भावना झाली. त्याच्या मनातलं आपल्याला सांगणं कदाचित त्याला सोयीचं वाटत नसेल, असंही. पण यापेक्षा अधिक भटाला टोकणं शक्यही नव्हतं. पण भट स्वतःच अधिक मोकळा झाल्यासारखा नंतर म्हणाला, तू तिकडे गेल्यावर स्थिरस्थावर झालास की मी आलोच समज तुझ्या भेटीला. नाही तरी मला नेवाश्याला यायचंच आहे. त्या ज्ञानदेवाचा परिसर निदान नीट पाहीन म्हणतो. अन मला ब्राह्मणाला काय, खांद्याला पडशी लटकावली की निघालो. म्हणजे कुलीन ब्राह्मण मला कितीही हलके समजत असले तरी आपल्या खेड्यांमधले गावंढे लोक मला फार प्रेम देतात. त्यांना असले फरक समजत नाहीत. यज्ञोपवीत घातलेला आणि बामणी बोलणारा कोणीही त्यांच्या नजरेत देवच. या भाबड्या माणसांना आपले हे कुलीन ब्राह्मण कायम लुटत आले. तरी ते त्यांना देवच समजतात. या कर्मास काय म्हणावे? याला कधी ना कधी छेद मिळाला पाहिजे. पण नजीकच्या भविष्यात मला ते शक्य दिसत नाही. अस्तु.ते काहीही असो, मी तुझ्या भेटीस येईन ही काळ्या दगडावरची रेघ समज. ते सगळं ठीक होतं. पण मूळ प्रश्नाचं काय? तो तसाच त्याच्या मनात अनुत्तरीत राहिला होता, त्याचं काय?

इथं सोबत आणलेल्या घोडेस्वारात उमाजी होता. त्याच्यासकट त्या चौघा घोडेस्वारांना शेजारच्या डोंगरगणच्या शिवारात राने तोडून जमिनी वहिवाटीला आणायचं काम दिलेलं होतं. तिकडच्या डोंगरात वाघांचा आणि सिद्ध साधूंचा संचार असे. अगदी पायथ्याशी असलं तरी डोंगरांच्या जवळचं रान होतं ते. तिकडं सहसा माणसं फिरकत नसत. पण त्या दांडग्या लोकांनी ती हिंमत केली होती. त्यांच्या सोबतीनं भीती चेपून गावातले आणि आसपासचे बरेच कुणबी तिकडं कामाला जाऊ लागले होते. सगळे असे सगळीकडे चालू असताना तो प्रश्न सगळ्यांच्या मनात कायम होता. देशमुखीण एकटीच कशी आली? देशमुख का आले नाहीत? ते कुठं गेले? मग कोणीतरी म्हणालं की बुवा, ते संसाराचा त्याग करून दूरदेशी निघून गेले. देशमुखीणीला न सांगता गेले. सांगितलं असतं तर तिनं त्यांना जाऊन का दिलं असतं? वैराग्य मनात उत्पन्न झालं की असंच करतात माणसं. त्याला इलाज नसतो. फार जुन्या काळी राजघराण्यात जन्मलेला

सिद्धार्थ गौतम असाच गेला होता म्हणे. ईश्वराचा तो नववा अवतार असं पुराणिक सांगतात, तोच तो. देवच होता मुळात. पण माणसाच्या जल्माला आला होता. तसंच हे. आणि देशमुखांच्या मनात देवाचं फार होतं. जन्माष्टमीचा केवढा उत्सव करायचे वाड्यावर? आणि नाचायचे स्वतः कृष्ण होऊन, गोपी होऊन सुद्धा. किती सुंदर नाचायचे गोपी होऊन सुद्धा. गडी अन बाई कसला फरकच नाही. सगळं एकातलं एक. आपण तो फरक करतो. देवाला गडी काय अन बाई काय, काहीच फरक नाही. त्याच वेळेला आपल्याला कळायला पाहिजे होतं. ईश्वराच्या चरणी लळा लागला की माणूस इथला उरतच नाही. गावात सगळ्यात जास्त वयस्कर असलेली गुरवाची म्हातारी म्हणाली, आरे बाबांनो, ते खरंच देवाचं लेकरू रे. देवाघरचंच होतं. देवाच्या पायाशी गेलं. आता आपलं नशीब आसलं तर देव होऊन आपल्याला दिसणार. कंधी बी देवळात आला का पहिला बहिरोबाच्या पायी माथा टेकणार अन मंग मला म्हतारीला दंडवत घालणार. मला तव्हाय पन वाटायचं का साक्षात देवच आपल्याला दंडवत घालितो. माघल्या जल्माचं पुन्य आसन कायतरी. पावन झाले मी. देशमुखांच्या वाड्यात कुणबीण म्हणून काम करणारी एक बाई म्हणाली, मी देशमुखीन बायला साक्षात पाह्यलंय. तुम्हाला तिचं नख सुदिक दिसलं नसन. काय रूप हाये बायाहो! आक्षी आसं का सूये म्हनतो उगवू नायी आन चंद्र म्हनतो मावळू नायी. केवढी भाग्याची बाई, साक्षात देवासंगती सौंसार केला तिनी. आन ते समजातं तिला. देसमुक गेला पन बाईचं हारीक जसंच्या तसं हाये. मी सांगातलं का बाई देसमुक देवमानूस व्हन्यासाटी गेले पन तुमच्या पोटी कोंब ठिऊन गेले. त लय नाजूक हसल्या त्याच्याव. पाटलीण म्हणाली. असं नाहीय हां. मी कैकदा मांडीला मांडी लावून बसलेय त्यांच्या. सुंदर आहेतच त्या. मितभाषी आहेत. विचारलं सुद्धा मी त्यांना ; कधी यायचेत देशमुख? तर म्हणाल्या, पुरुष त्यांचे निर्णय आपल्याला विचारून का घेतात? आले की आपले समजायचं. मग आणखी कोण तरी बाई म्हणाली, ही पाटलीण लय तोऱ्याची. आवं ती कुळंबीण देसमुकीनीला आंघुळ सुदिक घालिती. देसमुकांच्या बाया स्वोताच्या हातानी आंघुळ करित्या का? तव्हा तिनी जसं पायलं का मांडीला मांडी लावूनसनी इनी? आन देसमुकीनीला इचारलं मनी- दाताड तरी उचकाटत आसन का इचं तिच्या सामनी? अशी अनेक माणसं आणि त्यांचे अनेक अभिप्राय. सगळ्याचा उगम जास्ती करून डोंगरगणच्या रानात. तिथं रान तोडताना, तोडलेल्या फांद्या वाहताना, दगड उचलताना कष्टकऱ्यांना करमणूक नको? तिथून निघालेल्या धारा घरोघरी जात. घरात आणि बाहेर फिरत तिथल्या तिथल्या प्रतिभेच्या मगदुरानुसार अनेक रुपं घेत. श्रीपतीच्या कानांपर्यंत हे अर्थातच जाई. मानकरी संसाराचा त्याग करून निघून गेले अशी गप सोडणारा उमाजीच असावा असा श्रीपतीचा होरा होता. कारण उमाजीचाच तसा होरा होता आणि ते त्यानं श्रीपतीला आधीही सांगितलेलं होतं. पण म्हणून त्यानं ते उमाजीला उजगारलं नाही.आणि मालकीणबाईच्या कानावरही घातलं नाही. एरवीही त्यांनी स्वतः होऊन काही विचारलं तरच उत्तर द्यायचा त्याचा रिवाज होता. काहीच नसण्यापेक्षा ही निरुपद्रवी गप तशी सोयीस्करच होती. आलेच मानकरी तर त्यांचं ते काय सांगतीलच. येत नाहीत तोवर असा समज पसरणं खास गैर नाही, असं त्याला वाटलं. काही दिवसांनी कोणाला तरी पडलेलं एक स्वप्न प्रसृत झालं: देशमुख चालत होते. भोवताली पळणाऱ्या

लोकांचा माहौल. घोड्यांवरून, गाड्यांमधून, रथांमधून. मुला-बाळांसह. कुटुंबासह. सैनिक त्या लोकांना अडवत होते. अन या सगळ्या गर्दीत देशमुख एकटेच पायी चालले होते. त्यांना त्या सैनिकांनी पाहिलं. त्यांनी विचारलं. कोण, कुठे चालला आहात? देशमुखांनी थेट समोर निर्देश केला. म्हणाले, तिकडं. पहाटेची वेळ होती.तिकडे रथ उभा होता. त्याच्यावर भगवा ध्वज फडकत होता. वाद्ये वाजत होती. भगव्या पोशाखातील असंख्य स्त्रीपुरुष उभे होते. देशमुख म्हणाले, मी त्यांच्यात चाललो आहे. ते लोक मला घ्यायला आलेले आहेत. तुम्हाला मला अडवायचे असेल तर मी थांबतो. त्या लोकांना तसे सांगा. सैनिक म्हणाले, खिलजी येतोय म्हणून पळताय? देशमुख म्हणाले, त्यांना विचारा. ते हिमालयाच्या पायथ्यापासून इथपर्यंत चालत आलेले आहेत. सैनिक म्हणाले, ते तर धर्मध्वज घेऊन आलेत. त्यांना कसे विचारणार? त्यापेक्षा आपणच जा. आम्ही खिलजीच्या भीतीने पळणाऱ्या लोकांना अडवत आहोत. विरागी साधूंच्या सेवकांना कसलीच बंदी नाही. देशमुख सगळ्या सैनिकांसमोर शांतपणे निघून गेले. ज्यांना दिसले त्यांनी त्यांना आदराने वंदन केले. या स्वप्नाच्या अनेक आवृत्त्या अनेक प्रकारे भर घातली जावून पसरत राहिल्या.देशमुखांविषयीच्या भक्तीचा ज्वर वाढत होता. हे सगळे असं कुठे जाणार याचा कोणालाही अंदाज नव्हता. पसारा वाढत चालला होता. पण त्यात उपद्रव करण्याजोगं अजूनही काही नव्हतं. पण मग एक दिवस आणखी कोणाला तरी आणखी एक स्वप्न पडलं. देशमुखांचे आजोबाच आले थेट त्याच्या स्वप्नात. आजोबा देशमुख आता जिवंत नाहीत. पण कोणाच्या स्वप्नात जायला त्यांना कोण अटकाव करणार? किंवा कोणालाही कोणत्याही स्वप्नापासून आणखी कोण कसं अडवणार? ते ज्याचं त्याचं खासगी आणि स्वायत्त जग असतं. तर हे आजोबा देशमुख त्या माणसाच्या स्वप्नात आले आणि म्हणाले, काय रे तुम्ही लोक! ते दूरचे लोक थेट हिमालय पर्वतातून आले आणि माझ्या नातवाला देव करण्यासाठी घेऊन गेले. त्यांना ते कळलं. माणसांमधूनच देव निर्माण होतो ना! राम, कृष्ण, बुद्ध ; सगळी माणसंच होती. पण ती त्यांच्या कर्तबगारीने देवाच्या पदवीला पोहोचली. किंवा माणसांच्या जन्माला आलेले ते मुळातले देवच होते. तिच गोष्ट माझ्या नातवाची आहे. मी इथं स्वर्गात राहतो, म्हणून हे मला माहीत आहे. अरे, तुम्ही त्याचं साधं देऊळ सुद्धा बांधायचा विचार करत नाही आहात. किती करंटे आहात! देऊळ बांधा आणि पुण्याचे वाटेकरी व्हा. अन तुमच्या गावाचं नाव किती वाढेल याचा काही विचार करता की नाही? हे स्वप्न पसरलं. ते आणखी कितिकांच्या मनात भिनू लागलं. कैकांना अनेक खुणा सांगितल्या गेल्या. खुणेच्या अशा वस्तू बाकीच्यांना दाखविल्या गेल्या. आणि देवळाच्या मागणीनं जोर धरला. आरे बाबा त्यो म्हतारा इकत्या लोकांच्या सपनात येतो आन खुना बी सांगतो समद्या, तरी तुम्ही झोपात्या खुशालवानी. आसा किती पैका लागतो देऊळ बांधाया? इकते समदे हायेत देवळ, त्यात आनखी एकाचं काय वझ व्हईन का काय आपल्याला? उलट सोभा वाढन आनखी गावाची. असा सार्वत्रिक अभिप्रायाचा साधारण लघुतम साधारण विभाजक. मग म्हणाले, पाटलाला सांगा. पंच मंडळी बोलवा. शहाणे सवरते म्हतारे बोलवा. एकमेकात इचार करा. असे सारे झाले. विचार ठरला. मग कोणीतरी म्हणालं, देसमुकीन बायला सांगातलं पायजे ना! आणखी कोणीतरी म्हणालं, पाटलानी सांगावा. आनखी कोन सांगनार? पाटील म्हणाला, बाईंचा कारभारी आहे

श्रीपती. त्याला सांगू. एरवीही मला त्यांची भेट हवी असेल तर त्याच्याकडूनच जावं लागतं.

श्रीपतीने ते केलं. तो नेहमीसारखा मालकिणीच्या भेटीला गेला. विचारल्या गेलेल्या प्रश्नांना उत्तरं दिली. प्रश्न आता नाहीतरी कमी कमीच होत चाललेले होते. त्या काहीबाही बोलत, ते ऐकावे म्हणा किंवा ऐकत राहावे लागे. अर्थात त्यात ताप काही नव्हता. ते त्याला आवडत असे. पण तेही आपल्या चेहऱ्यावर दाखवायचं नाही, अशी शिस्त त्यानं स्वतःला लावून घेतलेली होती. तो जरी बाईला बघत नसला तरी ती त्याला कायमच बघू शकत होती ना! त्या दिवशी शिरस्ता मोडून आपल्याला काही सांगायचं आहे असा प्रस्ताव त्यानं मांडला. तेव्हा बाई अगदी आनंदून किणकिणतं हसत म्हणाल्या, अरे वा! आज पहिल्यांदाच तुला स्वतः होऊन मला काही सांगायचं आहे. छान, छान. अवश्य सांग. त्यावर त्यानं हलकेच लोकांना पडत असलेली स्वप्नं, त्यांचा प्रसार, गावातल्या लोकांची झालेली बैठक आणि ठराव असं एकेक सांगितलं. मानकरी-मालकांचं देऊळ बांधायचा ठराव झालाय. हे अखेरचं वाक्य त्यानं उच्चारल्यासरशी पडदा फर्रकन उघडला

आणि अतोनात अस्वस्थ अशा त्या थेट त्याच्या समोर उभ्या ठाकल्या.

'देऊळ ऽऽऽ? काय चाललंय काय? काही अक्कल आहे का या

लोकांना?'

अरे बापरे! आपण बाईला पहिल्यांदाच पाहिलंय अन तेही अशा

संतप्त अवतारात. अचानक हे असं काय झालंय?

श्रीपती चाचरत म्हणाला, "पाटील म्हणाले, बाईंना माहिती द्यायला

पाहिजे.'

त्या तशाच उभ्या थरथरत होत्या. मग भानावर येऊन त्यांनी स्वतःच पडदा सरकवला. नंतर त्या त्यांच्या जागेवर जाऊन बसल्या

असाव्यात.

'अचानक हे अंगावर आलं आणि तोल गेला माझा.' जरा वेळानं त्या पुष्कळच शांत स्वरात म्हणाल्या. अस्वस्थता शिल्लक होतीच. पण त्यांनी लगेचच स्वतःवर ताबा मिळवला होता.

'असं बघ श्रीपती, ते कुठं आहेत, काय करताहेत, हे कुणालाही माहीत नाही. अगदी मलाही नाही. कुणाला तरी काही तरी स्वप्न पडतं अन त्याचा दुखण्याची एखादी लागण लागल्यासारखा प्रसार होतो. अन त्याचा ज्वर इतका वाढतो की थेट देऊळ? मला ते जरा चमत्कारिक वाटतं. म्हणजे मूर्खपणाचंच वाटतं. आणि जिवंत माणसाचं देऊळ कधी बांधतात का? असं कोणाचं बांधलेलं तुला माहीत आहे का?'

'माहीत नाही. पण लोकांची भावना आहे.' श्रीपती हळूच म्हणाला.

मानकरी-मालक काय करताहेत, कुठं आहेत हे कोणालाही माहीत नाही.पण तुम्हाला ते माहीत नाही, हे काही खरं नाही. चंद्रसेनेकडून रुमालातल्या संदुकीतून ती माहिती तुमच्यापर्यंत पोहोचली आहे, हे मला माहीत आहे.त्या नंतरच तुम्ही इकडं येण्याचा निर्णय घेतलाय. इतकं मला कळतंय हे तुम्ही जाणता. अर्थात तुम्हाला जे माहीत आहे, ते कोणालाही माहीत नाहीय. मलाही नाही. तुम्हाला विचारणार कोण? उमाजी किंवा

आणखी कोणी तरी गप सोडून दिली आणि बघता बघता तिचा पर्वत झालाय. अर्थात मानकरी-मालकांनी कुठं असावं हा त्यांचा प्रश्न आहे. त्याची माहिती कोणाला द्यावी न द्यावी हा तुमचा प्रश्न आहे. पण या देऊळ बांधण्याच्या कल्पनेनं इतकं अस्वस्थ व्हावं असं काय आहे त्यात? अन अशा बाबतीत लोकांना तुमची परवानगी घेतली पाहिजे असं थोडंच आहे? आणि विरोध करायचा असेल त्याला तरी कसा करणार आहात तुम्ही? नका बांधू

असं कोणत्या तोंडानं सांगणार? आणि का सांगणार?

'असुदेत. तू माझ्या कानावर घातलं आहेस असं सांग पाटलांना.

आणि माझं हे असं धक्का बसणं तू तुझ्याजवळच ठेवशील.'

'ठेवीन.' श्रीपती नेहमीसारखाच संक्षिप्त.

'आज दोन गोष्टी पहिल्यांदाच घडल्या. तू पहिल्यांदाच स्वतः होऊन मला काही सांगितलंस आणि मी पहिल्यांदा तुला दिसले. हे तू नेहमी करत जा. अन मीही याउप्पर तुझ्यासमोर पडदा पाळणार नाही.'

'नाही, असं नको. म्हणजे मी सांगत जाईन-'

'कारे? तुला त्रास व्हावा इतकी काही मी असुंदर किंवा भेसूर

चेहऱ्याची बाई नाहीय.' त्या हसल्या.

'तसं नाही. रीत-' 'ठीक आहे. मी काय ते ठरवीन.' पुन्हा करारी आणि निर्णायक स्वर.

तिथून परतताना आणि नंतरही त्याच्या मनात अनेक प्रश्न उमटत, रेंगाळत राहिले. देऊळ बांधण्याच्या उल्लेखासरशी बाईचा जो प्रक्षोभ झाला तो नैसर्गिक होता. नंतर त्यांनी सावरलं स्वतःला. ते कृत्रिम. ते करावंच लागतं. पण हा नैसर्गिक प्रक्षोभ कशामुळं? संदुकीतून कोणती माहिती आलेली असेल? देवळाच्या कल्पनेला पूर्ण छेद देणारं काही असेल का ते? काय असेल? कोणाला विचारणार? सरस्वतीला विचारायचं तर ऐकायला लागणार पुन्हा तोच संदेश: कान उघडे, तोंड बंद. आज्ञा ऐका. विचारू नका. जाऊदेत. पण क्षणभरच बाई दिसली- अगदी क्षणभर. बाईमाणसाकडं जास्त वेळ कसं पाहणार? लगेच मान झुकवून उभा राहिला होता तो त्या निमिषात ती जी काही दिसली ती अगदीच कोवळी, अगदी नवोढा असावी अशी वाटली. मानकरी-मालक चांगलेच प्रौढ होते. चाळीशीच्या आसपासचे दिसणारे. गोलमटोल. थुलथुलीत. त्यांचा हात मऊ आणि गुबगुबीत होता. ही चवळीच्या शेंगेसारखी दिसणारी पोरगी त्यांची मुलगी म्हणून खुशाल शोभली असती. अर्थात अशा लोकांना काय ; कोणत्याही वयात कोणतीही बायको मिळवता येत असेल. मनगटाला मनगट जुळण्याची अट त्यांना नाही. ही अगदीच कोवळी मुलगी. विशीतली असेल-नसेल. म्हणजे आपल्या पेक्षाही बरीच लहान. की नीटनेटक्या राहणाऱ्या सुखोप्यातल्या माणसांचं वय हळूहळू वाढतं, असं काही असेल का? शक्य आहे. असेल. आणि आवाजात अधिकाराची चमक आहेच ना! वेगळेच असतात हे लोक. वेगळयाच पद्धतीने वाढवत असतील त्यांना त्यांचे आईबाप. चला, आपल्याला काय? ज्याचं त्याच्याजवळ. आपण कुणबी लोक. मेंढरांसारखे जन्म घेतो आणि त्यांच्यासारखेच वाढतो. मेंढीच्या कोकराला मिळणारं प्रेम आपल्यासारख्यांसाठी पुरेसं असतं. टिक्कीचं कोकरू आणि आपण. एकातले

एक. एकच.

नंतरचे काही दिवस मौनाचे. भेदणारा पडदा हटलेला नव्हता. ठरलेल्या वेळी जाणे, बसणे आणि परतणे. संभाषण शून्य. कसलीही विचारपूस, चौकशी होत नव्हती. तोही स्वतः होऊन काही सांगत नव्हता. आणि सांगण्यासारखं खास काही नव्हतंही. पण बाईचं मौन त्याला भीतीदायक वाटत होतं. तिच्या मनात काय चाललंय याचा पत्ता लागत नव्हता. लोकांच्या नजरेत तो तिच्या सगळ्यात जवळचा. तिनंच तसा सगळ्यांचा समज करून दिलेला होता. पैठणहून येतानाच ते अघोषितपणे निश्चित झालं होतं. अन इथं आल्यावर स्पष्ट. हा माणूस तुमच्या-माझ्यातला दुवा आहे, असं सगळ्यांना तिच्या वागण्यातून लक्षात आलं होतं. अगदी पाटलाला सुद्धा त्याच्या करवीच तिची भेट मिळण्यासाठी विचारावं लागे. अन ती त्याच्याशी अगदी मोकळेपणाने बोलत असे, त्याला विचारत असे. पण या देवळाच्या बातमीनंतर सारं बदललं. बाईच्या मनाचं बेट आतून बंद झालं. त्याचा कधीही स्फोट होऊ शकतो, असं त्याला सतत वाटत राही. तोही मूक झाला होता. घरातही गप्प बसून असे. एरवीही तो जास्त बोलणाऱ्यातला नव्हता. पण पोराबाळांशी खेळायचा थोडाफार. तेही बंद. घुम्यासारखा बसून राही. त्याच्या बायकोच्या ते लक्षात आलं. ती बिचारी त्याला काय विचारणार? पण तिच्या ते लक्षात आलंय हे त्याच्या लक्षात आलं आणि तो घरात थांबेनासा झाला. मळ्यात आईवडिलांकडे जाई. मेंढ्यात जाई. डोंगरगणच्या शिवारात जाई. पण सगळीकडं त्याचं घुमेपण त्याच्या अंगावर येई. हे सगळे लोक काही ना काही काम करताहेत. आपण एकटेच बिनकामाचे आहोत. अन हे फार चुकीचं, मूर्ख आहे, असं त्याला वाटे. अशात एके दिवशी ठरलेल्या वेळी तो वाड्यावर गेलाच नाही. प्रहर उलटायच्या आत वाड्यातून निरोप आला. बोलावलंय.

'बैस श्रीपती.'

किती दिवसांनी ऐकले शब्द. एकेक दिवस हजार दिवसांइतका मोठा

होतो कधी कधी. गेले काही दिवस असे होते.

'आला नाहीस, म्हणून बोलावलं.'

नाही आलो. मुद्दाम नाही आलो की ठरवून? काय समजत नाही. डोकं चिनभिन होऊन गेलंय. येऊन तरी काय? यायचं, बसायचं अन जायचं.

'बोलणार नाहीयेस का?' 'नाही, असं कसं-' 'नाराज आहेस?' 'नाही, नाही.' 'श्रीपती, गेले काही दिवस मी विचार करतेय-'

कसला विचार? देवळाचा? तुमच्या कोणत्याही प्रकारच्या आक्षेपांना

लोक जुमानणार नाहीत. आणि आक्षेप घेणारच कसा मुळात? संदुकीतलं सत्य मला सांगायचा विचार करताय? मला त्याच्याविषयी कुतूहल आहे. पण ते कळलंच पाहिजे असं मला वाटत नाही. राहूद्या की तुमचं तुमच्या पाशी.

'कसला विचार करतेय हे विचारणार नाहीस?' 'सांगा.' 'मी इथून बाहेर पडायचा विचार करतेय.' का? कुठं जाणार? कशासाठी? परत कधी येणार?

'तुझ्या मनात प्रश्न असतीलच. तू ते विचारत नाहीय्येस. ते गृहीत धरून मी सांगते. समज की, का जायचंय? उत्तर : मला इथं थांबणं अशक्य होत चाललंय. या देऊळ प्रकरणी मी अस्वस्थ आहे. त्याचं कारण विचारशील तर ते मी आज तुला सांगू शकत नाही. भविष्यात कधी सांगू शकेन याची खात्री नाही. अर्थात सांगेन अशी शक्यता देखील आहे.

पण शक्यताच फक्त. कुठं जायचंय? ते मी निश्चित ठरवलेलं नाहीय. परत कधी येणार? कदाचित एखाद्या महिन्यात, कदाचित वर्षेही जातील. कदाचित परत येणं अशक्यही होऊन बसेल.'

'असं कसं? अन एकट्याच जाणार?'

'हां, हे छान. प्रश्न केलास तू. एकटीच नाही जाणार. तुला घेऊन जाणार सोबत. मला शरीररक्षक हवाच ना सोबत. आपण दोघे जाणार.

आणखी कोणीही आपल्यासोबत असणार नाही.'

'असं कसं करता येईल? लोक-'

'-काय म्हणतील असंच ना? लोक म्हणतील, देशमुखीण गेली

पळून तिच्या चाकरासोबत, असंच ना म्हणायचंय तुला? म्हणजे, ती तिच्या जारासोबत पळून गेली असंच म्हणतील; खरं तर,' बाई हसत म्हणाल्या, 'मी विचार केलाय अन करतेय त्याच्यावर. असा काही आरोप तुझ्यावर नाही होता कामा. त्याच्यासाठी काही तरी समर्पक निमित्त शोधीन मी. पण तुला एकट्यालाच सोबत घेण्याबाबत मात्र ठाम आहे मी. यायचं की नाही हा निर्णय तुझा. किती दिवस माझ्या सोबत राहायचं हाही निर्णय कायम तुझाच असेल. कंटाळलास की ये परत. मी बांधून थोडीच ठेवणार तुला? तुला तुझी बायको-मुलं आहेत, आईवडिल आहेत. तू नाही आलास तर मी एकटी जाईन. आणखी कोणालाही सोबत घेणार नाही. म्हणजे आणखी कोणीही मला माझ्यासोबत नकोय. माझ्या मुलाची काळजी मला नाही. सरस्वती आहे. तो जवळपास तिचाच मुलगा असल्यासारखा आहे. मला अडविणारे कोणतेही पाश नाहीत. तुला आहेत. जमेल की नाही हे लगेच सांगायची आवश्यकता नाही. विचार करण्यासाठी वेळ घे. किती वेळ पाहिजे तुला? एक महिना चालेल? तेवढ्यात सांग. मी पुन्हा विचारणार नाही. तेवढ्या काळात तू काही बोलला नाहीस याच्याविषयी तर मी समजून चालेन की तुला जमत नाहीय. आणि निघून जाईन मी. तोवर ठरलेल्या वेळी इथं येत जा मात्र. बोलावणं करायची पाळी नको आणू.'

'येत जाईन. पण जाण्याऐवजी वेगळा काहीच पर्याय नाहीय?' 'मी खूप विचार केलाय. माझं जाणं नक्की आहे. तुझ्यावर सक्ती

नाहीय.'

'अवघड आहे.' 'तुझ्यासाठी खरंच ते तसं आहे. मी ते जास्तीत जास्त सोपं करायचा प्रयत्न करीन. लोकांना ते सांगताना तुला मान खाली घालावी लागणार नाही असं बघेन. तरीही ते अवघड असं उरेलच. न येण्याचा पर्याय तुझ्यासाठी कायम खुला असेलच. आणि आलास सोबत तरी कुठूनही कधीही परत येण्याचाही.'

'उदगीर प्रांती मानकरी-मालक यांचे वडील असतात असं ऐकलंय.

त्यांना कितपत-'

'इकडं येण्याचा निर्णय घेताना सोनाजीरावांना कल्पना दिलेली आहे. ते एडके यांचे वडील. ते खरे मानकरी. सरदार विद्रूमसेन यांच्या दरबारी ते असतात. एडके निघून गेल्याचं त्यांना कळवून त्यांच्या सांगण्यावरूनच मी इकडं आलेली आहे. इथून बाहेर पडताना सुद्धा त्यांना ते कळेल अशी व्यवस्था मी करीन. मात्र परवानगी नाही मागणार

त्यांची. तो माझाच आणि केवळ माझाच निर्णय असेल.'

इतकी तिन्हाईत असतात नाती? सासऱ्याचा नावाने उल्लेख, नवऱ्याचा

फक्त एडके? निदान सासरा, नवरा असं या मोठ्या लोकात ज्या पद्धतीनं म्हणतात ते-तसं तरी? सगळं इतकं कोरडं का वाटतंय आपल्याला?

'ठीक. ये आता. आणि येत जा. नेहमीच्या व्यवहाराच्या बाहेरच माझं असं कदाचित काही मी तुला सांगत जाईन. माझ्यासोबत यायचं की नाही, याचा निर्णय घ्यायला तुला कदाचित ते उपयोगाचं सुद्धा असेल.'

6

'श्रीपती, तुला कुतूहल असेल-नसेल; मला माहीत नाही. पण मला हे तुला सांगायचंय. फार काही महत्त्वाचं नाहीय ते. तरीसुद्धा बोलायचंय. तसा, संवादासाठी तू काही आदर्श माणूस नाहीयेस. कारण तू प्रश्न उपस्थित करत नाहीस. पण ठीक आहे. कधी तरी वाटेल तसं तुला. त्यासाठी चाकर-मालक ही भावना संपायला हवी. ते सोपं नसतं हे मला समजतं. माझ्या सोबत यायला तयार झालास आणि राहिलास तर संपेल ती. बघू आपण. पण इथं आज तुझ्याइतकं जवळचं मला कोणीही नाही. मी असं म्हणाले म्हणून संकोच वाटून घेऊ नकोस. मी मनापासून म्हणतेय. कधी तरी पटेल तुला. असूदे. प्रस्तावना फार झाली. असं बघ;

माझा जन्म एका दशग्रंथी ब्राह्मणाच्या घरात झाला. साहजिकच विद्येची परंपरा होती. या यादव राजांच्या राजवटींमध्ये विद्वान ब्राह्मणांना अन्नोदकाची चिंता उरणार नाही याची काळजी नेहमीच घेतली गेलीय. आम्हाला ती नव्हती. घरात विपुल ग्रंथ होते. तेच धन. रामायण, महाभारत यांच्यापासून ते चारही वेद, उपनिषदे, ब्राह्मणे, आरण्यके, अनेक प्रकारच्या संहिता असं सगळं होतं. बुद्ध, महावीर, चार्वाक अशांचं आणि त्यांच्या विषयीचं वाङ्मय भरपूर होतं. अगदी लहान वयात हा ठेवा माझ्या पुढ्यात आला. आणि अधाशी माणसासारखा मी तो वाचून काढला. माझे वडील चार्वाकपंथी आहेत. आई मात्र उपास-तापास, पूजा-अर्चा, व्रत-वैकल्ये करणारी आहे. वडिलांनी तिला कधीच विरोध केला नाही. पण म्हणून स्वतःच्या मतांशी त्यांनी तडजोडीही केल्या नाहीत. हेमाद्री पंडिताशी त्यांचे कैक वाद झाले. पण त्यांनी आपली भूमिका सोडली नाही. साहजिकच ते अडगळीत राहतील अशी काळजी हेमपंडितानं कायम घेतली. पण त्याच्यापेक्षा जास्त तो काही करू शकला नाही. ब्रह्महत्या हे घोर पातक ना! तशा काही झाल्या म्हणून खिलजी-प्रकोप आला असं ब्राह्मणांचं म्हणणं. ते काय खरं नाही. अरे! एक शूद्र माणूस राजासाठी राखलेल्या तळयातलं पाणी प्याला. त्याला शिक्षा देहदंड. का? तिथं कैक जनावरं पाणी पित असतील. त्यांना शिक्षा नाही. अन एक माणूस ते पाणी केवळ त्याला तहान लागली म्हणून प्याला. तर त्याला मरणाची शिक्षा. हे काय आहे? माणसांना साधं माणसांसारखं तुम्ही वागवत नाही.कदाचित त्याच्यामुळंच खिलजीला संधी मिळाली असं म्हणावं लागेल. किंवा तेच जास्ती खरं आहे. तुमच्यात इतका भेद आहे तर इतरांना संधी मिळणारच ना! म्हणून मला माझ्या वडिलांची भूमिका पटते. आणि ती केवळ माझ्या वडिलांची आहे म्हणून नाही. मी माझ्या वाचनातून त्या निर्णयाला आलेली आहे. अरे! स्वर्गात गेल्यावर किंवा पुढच्या

जन्मात अमुक अमुक लाभ मिळेल म्हणून या जन्मात असं असं करा. हे दान करा,

ते उपास करा. हा काय प्रकार आहे? मुळात स्वर्ग आहे की नाही, पुनर्जन्म आहे की नाही; कशाचाच पत्ता नाही. ते दोन्हीही नाहीत असं मला वाटतं, ते आणखी वेगळं.पण या जन्मात अशा प्रकारे देहाचे हाल का करून घ्यायचे? का पुरोहितांची धन करत राहायची? अरे, या भानगडी याच लोकांनी स्वतः च्या स्वार्थासाठी निर्माण केल्या. हेमाद्री पंडित त्यांचा शिरोमणी. त्याचा 'चतुर्वर्गचिंतामणी' नावाचा ग्रंथ आहे. त्यात सगळ्या या लुटालूट करण्याच्या कृती दिलेल्या आहेत. तुला हे काहीच माहीत नसेल. शिकायची, वाचायची संधीच नसेल तर कुठून माहीत होणार? ही लुटालूट, जाच, बंधनं यालाच वैतागलेत ना लोक. म्हणून तर महात्मा चक्रधराला इतका प्रतिसाद मिळालाय आणि मिळतोय. अन त्याला मारलं तरी मिळतोय. काय सांगितलं त्यांनी? या देवदेवता अन पूजाअर्चा-होमहवन यांची काहीही गरज नाही. त्यातून फारसं पुण्य लाभत नाही. किंवा काहीच मिळत नाही. इतक्या देवतांची गरजच नाही. देव एकच आहे आणि तो मी आहे. मला अनुसरा. फार हिंमत लागते स्वतःला देव म्हणवून घ्यायला. आपण देव नाही आहोत हे त्याला कळत असेल. अगदी देव नसतोच हेही माहीत असेल.पण अज्ञजनांना सर्व प्रकारच्या जाचांमधून मुक्ती देण्यासाठी तसं म्हणणं आवश्यक आहे असं त्याला वाटलं असेल. काय असेल ते असो. गेले लोक त्याच्या मागे. हेमपंडितानं त्याचा आधी छळ करवला. अन नंतर जाहीर खून करवला. पण म्हणून चक्रधराचा

विचार संपेल का? तर अजिबातही नाही.'

'माझा एक मित्र आहे. दासोभट नावाचा. पैठणला असतो. तो असंच काय काय बोलत असतो. म्हणजे आधी तो जुन्या मताचा होता. पण

हळूहळू त्याच्यात बदल होत गेलाय.'

"अरे वा! तू बोललास. प्रश्न नाही विचारला तरी किमान मत व्यक्त

केलंस. छान. छान. काय करतो हा दासोभट?'

'बामणच आहे. पण हलक्या जातीचा. ते फक्त बामणांचे

अंत्यसंस्काराचे विधी करतात.'

'म्हणजे किरवंत.' 'हां.' 'इकडं आला तो तर घेऊन ये माझ्या भेटीला. मला आवडेल.'

'येईन म्हणाला होता. आला तर घेऊन येईन.'

'तर, मी तुला सांगत होते- अगदी नाकळतं वय सोडलं तर मी कधीही देव-देवतांची पूजा केली नाही. लहान वयात आईच्या सोबतीनं जे काही केलं असेल तेवढंच. नंतर देवळात जाण्याच्या वेळा अर्थातच आल्या. मी तिथं हातही जोडले. पण केवळ नाईलाज होऊन. इतरांची मनं दुखू नयेत म्हणून.अन आता हे लोक एडकेंच्या नावानं देऊळ बांधताहेत. तिथं तर मला मुख्य पुजारीण व्हावं लागेल. अनायासे बामणीण आहेच मी अन त्यांची बायको सुद्धा. माझं ते कर्तव्य असेल आणि हक्कही. फार भयंकर हक्क आहे हा. सारखा मला चिणत राहणारा. रोज जाऊन दर्शन घ्यायचं, पूजापाठ करायचा. श्रेष्ठ साध्वी. पतिपरायण स्त्री. गतभर्तृका. आयुष्याच्या अंतापर्यंत माझी त्यातून सुटका नाही. तुला काय वाटतं? हे असं मी करत राहायचं का कायम?'

'निघून जाण्यानं कशी सुटका होईल?'

'नाही होणार. परत येणार असले तर यातून सुटका नाही. पण मोकळ्या हवेत श्वास तर घेता येईल. सुचेल सुद्धा काही मार्ग त्यातून. अन नाहीच सुचला तर न परतण्याचा ठाम निर्णय सुद्धा घेऊ शकेन मी.'

'मला समजत नाही. काय कराल? कुठं जाणार? मी काही तुमच्या इतका विचारी नाही. म्हणजे अजिबातच नाही. पण तुम्ही अशा गेलात तर तुमच्या सगळ्या कुळीच्या नावाचं काय होईल, याचा विचार करणं आवश्यक.'

'खरं आहे. त्याला मी कारणीभूत व्हावं अशी माझी इच्छा नाहीय. पण नको असलेला पूजापाठ करत रोज तनमनानं कणाकणानं मरत राहणंही मला शक्य नाहीय श्रीपती.'

श्रीपतीला वाटतं, बाई म्हणतेय त्यात दम आहे. जी गोष्ट आपल्याला मान्य नाही, ती करत जगत राहाणं त्रासाचंच असेल. पटत नसलेली गोष्ट सारखी करत राहाणं हे रोज डोक्याला खिळा ठोकून घेण्यासारखं आहे. हे अपमान गिळत जगण्यासारखं आहे. त्याला आठवतं: डोंगरकिनीला नागपंचमीला झोंब्या खेळल्या जायच्या. पंचक्रोशीतली पोराटोरांसकट सगळी तरणी, म्हातारी माणसं एकत्र जमायची. झोंब्या खेळण्यासाठी. जुना रिवाज होता. गावागावात चढाओढ असायची. काहीही इनाम किंवा बक्षीस नसायचं. अगदी शेला-पागोटं सुद्धा द्यायचे नाहीत. तरीही इरीशिरीनी म्हणजे वीरश्रीने झोंब्या खेळल्या जायच्या. गावांच्या इभ्रतीचा-मानापमानाचा प्रश्न असायचा. एका वर्षी अशीच त्याची झोंबी शेजारच्या गावच्या एका तरण्या पोराशी लागली. श्रीपती चांगला खेळणारा गडी. तसे सगळेच खेळतात. पण हा मेंढीच्या दुधावरचा जबर ताकदवान म्हणून सगळ्यांना माहित. ते चांग्या नावाचं धनगराचं पोर छडीसारखं चपळ लवलवित होतं. पण श्रीपती आपल्या ताकदीच्या जोरावर त्याला हरवणार असाच सगळ्यांचा होरा होता. शड्डु ठोकले गेले.झोंबी सुरू झाली. आणि काही कळायच्या आत त्या पोरानं याला आभाळ दाखवलं. सगळ्यांनी त्याची हुर्यो उडवली. सगळे जेत्याच्या बाजूचे असतात. हरणारा एकटा एकाकी असतो. अगदी त्याचा बाप सुद्धा म्हणाला,

'ह्याऽऽत तुह्याय्ये तुह्येऽऽ यावसक पॉर तुपल्याच्यानी ठ्यापलं नायी.' ही हार श्रीपतीच्या जिव्हारी लागली होती. नंतरचं त्याचं सगळं वर्ष त्या पोरावर खार खाऊन तयारी करण्यात गेलं. पुढच्या नागपंचमीला त्यांची लागलीच. कोणीच ते विसरलेलं नव्हतं. एकमेकांना भिडल्याबरोबर श्रीपतीनं चांग्याला धरून आणून खाली घेतलं आणि घोळस घोळस घोळसलं. चांगलंच घामटं काढलं त्याचं.एका क्षणी त्यानं त्याला उचललं. अन खाली सोडणार त्याला तर पडताना त्यानं याच्या गळ्यात पायांची आकडी घातली. अन झटका देऊन याची मान अशी दाबली की प्राणच कोंडला. मनाचा सगळा जोर एकवटून प्राणाची बाजी लावून श्रीपतीनं त्याची आकडी सोडवली अन पुढच्या क्षणी त्याला आभाळ दाखवलं. श्रीपतीला ते आठवतं. त्या जिंकण्यापेक्षा त्याआधीचं ते सगळं वर्ष आठवतं. ते अपमान गिळत जगणं आठवतं. पण आता त्याला वाटतं, समजा त्या वेळीही आपण जिंकलो नसतो तर काय झालं असतं? जखम जिव्हारी लागून राहिली असती. पण मनाची समजूत घातलीच असती आपण कशी ना कशी, कधी ना कधी. की, बाबा असतो शेराला सव्वा शेर. त्याला काय करणार? स्वीकारावंच लागतं जे आहे ते. समोर येईल ते स्वीकारणं याच प्रकारे आजवर आपण जगत आलोय. मनाला आपण तितकं महत्वच कधी

दिलेलं नाहीय. जनावर -मग ती पाळीव असोत की रानटी- पडेल त्या परिस्थितीशी जशी जुळवून घेतात. तसेच आपण. उन, वारा, पाऊस, थंडी; सगळयांशी जुळवून घेतच जगावं लागतं त्यांना. मन असेलच त्यांना. पण ते झोपलेलंच असेल जवळपास. आपल्यासारखं. अन आपण निदान आज जितका विचार करतोय तो त्यांना कधीच जमत नसेल.हे बामण लोक काय काय वाचतात अन विचार करतात. वाचण्यामुळं मन जागं होत असेल अन सतत जागं राहत असेल. नाय तर समजा आली रोज पूजापाठ करायची पाळी तरी काय हरकत आहे? तुमचं मन त्यात गुंतलेल नसेल तर त्याला यातना कशा होतील? तसा व्यायाम शिकवा मनाला.त्याच्यात असून नसल्यासारखं करायचं. आहे काय त्यात? देवळात गेलात तर लोकांची मनं दुखू नयेत म्हणून तुम्ही आजही ते करता असं म्हणताच आहात ना! थोडं पुढं जावून रोज करा. अन रोज करावंच लागेल ते असंही नाही. तुम्ही मालकीण आहात. तुम्ही नियम करू शकता, बदलू शकता. तुम्हाला कोण काय बोलणार? लोक हे देऊळ त्यांच्यासाठी बांधताहेत. तुमच्यासाठी नाही. तुम्ही रोज जाऊन पूजापाठ करावा, असं कोण कशाला म्हणेल? अन आलीच पाळी तर तुम्ही तुमच्या नवऱ्याच्याच मूर्तीची पूजा करणार ना! श्रीपतीला वाटतं, बाईच्या मनात आपल्या नवऱ्याबद्दल मायाच नाही. एडके! असा इतका तिन्हाईत उल्लेख? इतकं कोरडेपण? शेजेचा संसार सुखाचा होत नसेल? असं कसं? एक बाळ आहे तुम्हाला. साडेतीन-चार वर्ष वयाचं. मानकरी-मालक किती आनंदानं बोलले आपल्याशी पहिल्याच भेटीत. ठीक आहे. तुमच्या वयात अंतर असेल जास्त. पण ते कैकांच असतं तुमच्या लोकात. संसार होतोय ना! हे बाळ आहे की त्याची खूण. तरीही माया का नाही? मानकरी गायब झाले तरी बाई इतकी घट्ट कशी? आणि आता जायचंय म्हणतेय. कुठं जाणार? माहीत नाही. किती दिवस जाणार? माहीत नाही. परत येणार की नाही? सांगता येणार नाही. हे आहे काय? ही अशी अंधारात उडी घालण्याचा कड्यावर का उभी राहिलीय? तू आलास सोबत तर ठीक. नाही आलास तर मी एकटी जाईन. आणखी कोणालाही नेणार नाही. का? मीच का? ठीक आहे माझ्यावर भरोसा आहे तुझा. अन तू आलास सोबत तरी तुझ्यावर कसलीही सक्ती नाहीय. तू कधीही परत येऊ शकतोस. आणि काय सांगू परत आल्यावर लोकांना? तू कुठं गेलीस म्हणून सांगू? एकट्या बाईसोबत मी जाऊच कसा मुळात? फक्त दोघंच आपण. तू आणि मी. अन लोकांना काय सांगायचं? मी माझ्या बायकोला काय सांगायचं? बायकोला सांगावं तर लागेलच ना! अन खरं तेच सांगावं लागेल. मालकिणीसोबत जातोय. कशासाठी जातोय? माहीत नाही. कधी परत येणार? सांगता येणार नाही. काय वाटणार तिला? पळून जायला निघालास का तिच्या बरोबर? मालकीण असली म्हणून काय झालं? तरणीताठी बाई. बामनाची. अप्सरेसारखी देखणी. असं म्हणणार नाही समजा यमी. पण तिच्या मनात येईलच की! तिच्याच काय, कोणाच्याही मनात येईल. कोणाकोणाचं तोंड धरणार आपण? परत येऊन कोणत्या तोंडानं राहणार इथं किंवा आणखी कुठ? अहो बाई, ही बायको सोडून जाईल मला. तरणी आहे ती. तिला सहज नवरा मिळंल. पण माझी पोरं दुसऱ्याच्या पोटाखाली जातील, त्याचं काय? अन मुळात माझी बाईल मला आवडती; त्याचं काय?

'आपली ही जी सरस्वती आहे ना श्रीपती, ती माझी बालमैत्रीण. तिचे आईबाबा तेलंगदेशचे. तेलंगी कुणबी. माझ्या आईचं लग्न झालं माझ्या बाबांबरोबर, तेव्हा आईसोबत

ते आले. त्या आधी ते आईच्या माहेरी कामास होते. ते अजूनही माझ्या आईबाबांसोबत राहतात. सरस्वती माझ्यापेक्षा दोनेक वर्षांनी मोठी. आमच्या घरात वाढल्यानं अक्षरओळख आहे तिला. पण जास्त काही केलं, वाचलं नाही तिनं. संधी होती. नाही केलं. परंपरा नाही वगैरे ते आहेच. तरीही होऊ शकलं असतं. त्याला कशाला पाहिजे परंपरा? वातावरण असलं की झालं. ते होतं. खुलं होतं सगळं. कसलाही अटकाव नव्हता. पण नाही झालं. मात्र ब्राह्मणी रीतीरिवाज, भाषा; सगळं आत्मसात केलेलं आहे तिनं. अन पहिल्यापासून आता आहे तशी हसरी आणि निष्कपट आहे ती. बोलते कमी. पण तिला सगळं कळतं. मला तर कधी कधी वाटतं, तिला पुष्कळ गोष्टी अंतर्ज्ञानानं समजतात. किंवा काहीतरी वेगळं, सहावं इंद्रिय आहे तिच्याजवळ. लग्नानंतर मी एडक्यांच्या घरी यायचं ठरल्यावर म्हणाली, मी रोहिणीसोबत जाणार. रोहिणी हे माझं नाव. सगळे तिला म्हणाले, तिच्याबरोबर कशाला? तिच्यापेक्षा मोठी आहेस तू. तुझं लग्न व्हायचंय. ते करून देऊ आम्ही. नंतर तुझा नवरा-तुझ्या सासरचे म्हणतील तिथं जा. ही म्हणाली, मला लग्नच करायचं नाही. मला रोहिणी सोबत जायचंय. हट्टच धरून बसली. अखेर बाबा म्हणाले, जावूद्या तिला. नंतर रोहिणीच बघेल तिच्या लग्नाचं. इकडं आल्यावर सुरुवातीला मी प्रयत्न करून पाहिले. खूप सांगितलं. तिचा ठेका एकच. मला लग्न नको. म्हटलं, का नको? सुरुवातीला गप्प बसायची. एकदा स्पष्टपणे म्हणाली, मला पुरुषाच्या सहवासाची भावनाच नाहीय. ते तिचं सांगणं इतकं प्रांजळ आणि स्वच्छ होतं अन बोलताना तिचे डोळे इतके नितळ होते की मला ते थेट पटलं.त्याच्यानंतर मी तो विषय कधीच छेडला नाही. आपल्या उग्रसेनाचं सगळं तीच करते. उग्रसेन हा तुझ्या त्या टिक्की नावाच्या मेंढीच्या दुधानं जिवंत राहिलेला अन आता चांगला गुटगुटीत झालेला माझा बाळ. मी नुसती नावाला त्याची आई आहे. मी फक्त जन्मदात्री. तिनंच वाढवलंय त्याला. आईनं आपल्या बाळाला जे दूध पाजायचं असतं, तेही त्याला मिळालं नाही माझ्याकडून. आलंच नाही. पान्हा फुटलाच नाही. अन मी मात्र याच सरस्वतीच्या आईच्या स्तनांचं दूध पिऊन वाढले. माझ्या आईचं माझ्यासारखंच होतं. असं हजारात एखाद्याचं असतं म्हणतात. मी माझ्या आईचा वसा चालवलाय म्हणायचा. सरस्वतीचा धाकटा भाऊ माझ्या आगेमागेच जन्मलेला. तिच्या आईला स्तन्य भरपूर. मला सगळं भरपूर मिळालं. अन वाटीत काढून चमच्यानं नाही. थेट स्तनांना लुचून. आधी आईनं जरा कुरकुर केली म्हणतात. कुणबिणीच्या स्तनाला प्यायचं म्हणून. पण बाबांच्या एकाच सज्जड कटाक्षामुळं ती गप्प झाली म्हणतात. अन बदलत गेली तीही नंतर पुष्कळ. म्हणजे पूजाअर्चा वगैरे, ते सारं राहिलं कायम. पण शिवाशिव नाही उरली. अन काय रे आपला धर्म; मेंढीला शिवलं तर चालतं, माणसाच्या स्पर्शाचा मात्र विटाळ! मी बामणीण एका कुणबिणीचं स्तन्य पिऊन वाढले. अन माझं बाळ तर थेट मेंढीचं स्तन्य प्यालं अन दुखण्यातून उठलं. आता यात मी सरस्वतीच्या भावाच्या हक्काच्या दुधात वाटेकरी झाले, त्याचा हक्क मी लुटला किंवा माझ्या बाळानं टिक्कीच्या कोकराच्या हक्काच्या दुधावर डल्ला मारला असंही म्हणता येईल. पण असतंच रे असं. कुठं ना कुठं डल्ला मारता आल्याखेरीज जगता न येणं हा माणसाच्या जगण्याचा सारांश असतो. जगणं अन जगू देणं इतकंच आपल्याला करता येतं. ती माणूस म्हणून आपली मयादा. तिला माणुसकी असं गोड नाव द्यायचं. बाकी आहे काय?

तुझ्याकडून आल्यावर सरस्वतीनं मला सगळं रंगवून रंगवून सांगितलं. विशेषतः तू त्याला थेट त्या टिक्कीच्या सडांनाच लावलंस ते अन हाही जसा आईच्या स्तनाना लुचाव तसा चुरूचुरू प्यायला लागला खुशाल. आणखी बरंच सांगितलंय बरं का. तुझी लंगोटी. तुझं पळणं. तुझं दंडवत घालणं. हसली फार सांगताना. आधी तिलाच दंडवत घातलास. अन तिनं सांगितलं की मी दासी आहे. मालकीण तिकडं मेण्यात. तर सोडायला आल्यावर पुन्हा मेण्याकडं बघत दंडवत घातलास. फार निर्मळ आहेस तू श्रीपती. या लबाड 'चतुर्वर्गचितामणी' पल्याड आपली सगळी दुनिया भल्या माणसांचीच आहे. फक्त त्यांना ते कळत नाही. अन यांना ते त्यांना कळू द्यायचं नाहीय. अशा अंतरात खिलजीला आपोआप जागा होते रे. असंच होत राहिलंय कायम इतिहासात आणि भविष्यात सुद्धा तसं झालं पुन्हा तर असंच होणार पुन्हा पुन्हा. आणि त्या दिवशी मी त्या मेण्यात नव्हते बरं का! अन सरस्वती सुद्धा कशी आणि का आली तिकडं; कळत नाही. हे तिचं सहावं अदृश्य इंद्रिय समजायच. दुसर काय?'

हे असं रोज काही ना काही बाईचं सुरू. किती सांगू अन किती नको असं तिला झालेलं. अन ते छानच वाटत होतं त्याला. पण माझे बाई, तुझ्या जाण्याचं काय? त्या निश्चयापासून तू हलत नाहीयेस. मी करू काय? एकदा ती म्हणाली, 'श्रीपती, आपण समजा असं सांगितलं ह्या लोकांना, की एडके तपश्चर्येला बसलेत हरिश्चंद्र गडाच्या कोकणकड्यावर. अन त्यांनी मला भेटीला बोलावलंय, एकटीनं यायला सांगितलंय, म्हणून मी जातेय तर?'

'कुठं आहे हा गड?'

'देशाच्या पश्चिम टोकाला. तिथून पुढं अपरांत देश सुरू होतो. अन

तो कडा दुर्लंघ्य भीषण आहे. केवळ तपस्वीच तिथं राहू शकतात.'

'कशासाठी भेटीला बोलावलंय तुम्हाला?' 'देऊळ बांधलं जातंय असं अंतर्ज्ञानानं समजलंय त्यांना.' 'मग?'

'मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी स्वतःचे प्राण अंशतः घेऊन

येण्यासाठी बोलावलंय असं.'

'ते काय असतं?'

'मूर्ती म्हणजे फक्त दगड. त्यात प्राण फुकला पाहिजे ना! त्यासाठी मंत्र असतात. ते म्हटले की प्राणप्रतिष्ठा होते असा संकेत आहे. इथं ते जिवंत असताना त्यांची बायको स्वतः त्यांचे प्राण अंशतः घेऊन येणार. मग ती

प्राणप्रतिष्ठा सर्वोत्तम होईल ना!'

'लोकांना कळतं हे?' 'पाटील बामण आहे. त्याला कळतं. तो सांगेल लोकांना.'

'पण हे खोटं आहे. असं काही नाहीय्ये प्रत्यक्षात. त्याचा पडताळा

घ्यायला कोणी आलं तर?'

'दाट रान आहे. अवघड कडे आहेत. रानटी श्वापदं आहेत. अन कितीही शोधलं तरी एडके तिथं नाहीच आहेत ना! अन मीही तिकडं जाणार नाही.'

'हे इतकं सगळं खोटं करायचं कशासाठी?'

'प्रश्न तो नाहीय. मला जायचंय हे निश्चित. कशासाठी हे माझं

माझ्याजवळ. लोकांना विश्वास वाटेल असं कारण आपण शोधतोय.'

"जायचंच तर मग थेट हिमालयात जा ना! त्या हरिश्चन्द्राच्या
डोंगरावर तरी कशाला?'
'हां, हिमालयाच्या शिवालिक टेकड्यात.' 'मला ते माहित नाही.'
'मलाही नाही. पण हिमालय प्रचंड आहे. शिवालिक रांगांविषयी मी ऐकलेलं आहे. त्या प्रदीर्घ आहेत. त्यात कोणाला शोधणं केवळ अशक्य आहे. एडके तिकडं तपश्चर्येला बसलेले आहेत. तिकडं मी जाणार आहे. केवळ ते अंतर्ज्ञानानं ओळखतील म्हणून मला त्यांना शोधणं शक्य आहे. अन त्यांनी कटाक्षानं मला एकटीलाच भेटीला बोलावलंय. पण इतका लांबचा प्रवास. कोणी तरी सोबतीला पाहिजे. म्हणून मी श्रीपतीला घेऊन जाणार
आहे. अर्थात त्यांना भेटेल मी एकटीच. पण तिथवर सोबत हवीच ना!'
'तिथवरच न्यायचं तर एकटा माणूसच का? मोठा लवाजमा, सुरक्षारक्षकांचा ताफा असं का नको?'
'मोठा लवाजमा असला की धोका वाढतो. एखाद्या-दोन माणसांकडं
कोणाचं लक्ष जात नाही.'
'पण श्रीपतीच का? आणखी कोणी चालणार नाही का?'
'चालू शकतो. पण माझा त्याच्यावरच भरवसा आहे. तो असला की
मला सुरक्षित वाटेल.'
'अन नसला तर?' 'मी एकटी जाईन.' 'कशासाठी पळताय? कशापासून पळताय?'
"प्रश्न तो नाहीय. म्हणजे आहे कदाचित. किंवा नक्कीच आहे. ते मी तुला सांगेन कदाचित. किंवा नाही सुद्धा सांगणार. तो तुझ्या-माझ्यातला प्रश्न. आपण, लोकांना काय सांगणं उचित वाटेल याचं बोलतोय. त्यात काही छिद्र दिसत असेल तर सांग.'
'मी कशासाठी येऊ?'
'तो तुझा प्रश्न. तुझ्यावर सक्ती नाहीय. आलास तर ठीक. नाही आलास तर मी एकटी जाईन. लोकांना मी जे सांगू पाहतेय त्यात छिद्र दिसतंय का सांग.'
'सोनाजीराव मानकऱ्यांना काय सांगणार?' 'ते जमेल. त्यात अडचण नाही, आणखी बोल.'
'पण मुळात हे असं का करायचं? त्यातून काय साधणार? बाहेर
पडण्यासाठी अगदी भक्कम कारण देता आलं, तरी काय साधणार?'
'पुन्हा पुन्हा येतोस मूळ प्रश्नाशी. काय साधेल, माहीत नाही. मला मोकळा श्वास हवा आहे. तो घेताना तू सोबत असल्यास उत्तम, नसल्यास ठीक. पण असावास अशी मनापासून इच्छा आहे.'
श्रीपतीला वाटतं, करायचं काय या बाईचं? तिचा ठेका सोडायला काही केल्या तयार नाहीय ती. जायचंय हे नक्की. आणि विचार करून. गावाला पटलं पाहिजे. सासरच्या नावाला डंख लागायला नको. सारखा तोच विचार करतेय ती. योजना अशी अशी आहे. दिसतंय का तुला काही छिद्र? दिसत असेल तर मोकळेपणी सांग. त्यासाठीच तर सांगतेय ना तुला. पाहिजे त्या शंका काढ. उत्तरं देते. दुरुस्त्या करते. अगं बाई, मी काय करू पण? तो तुझा प्रश्न. आलास, आनंद. नाही आलास, सक्ती नाही. येणार असशील तर ते सुकर होण्यासाठी मदतच करीन. काय मदत? ते तुझं ठरल्यावर बघू.तू यायचं म्हणालास की

दुसऱ्या दिवशी आपण लगेच निघू असं थोडंच आहे? करता येईल विचार समोर येईल त्या त्या वेळेला. बाई अगदी टणाटण लाह्या फुटाव्या तशी बोलती. श्रीपतीला वाटतं, आपण यमीशी बोललं पाहिजे. अचानक सांगितलं तर ते अंगावर येईल तिच्या. त्यापेक्षा आधीच थोडं अंधुक अंधुक सांगायचं. असं असं चाललंय. म्हणजे नक्की काहीच नाही. पण बाईचं चाललंय. आपल्याला अंदाज येईल. तिला नाही म्हणता येणार नाही, असं काही सांगायचा विचार करता येईल. त्यातूनही निब्बर लागली तर कठीण

आहे.

एक दिवस केली त्यानं हिंमत. म्हणाला, असं असं. 'कव्हा जानार?' 'महिन्या-दोन महिन्यानी.' 'कुढं जानार?' 'लांब तिकडं हिमालय पर्बत.' 'त्यो कुढं आस्तोय?'

'लांब तिकडं-ते पोथ्या वाचतानी पुरानिक नाय का सांगत का देव

लोकं रहात्यात तिथं.'

'आन परबत म्हंजी काय आसतंय?' 'लय मोठाले डोंगर आसत्यात.' 'आन इक्तया लांब काह्यासाटी जाती ती?' 'तिचा नवरा गेल्याला हाये तिकडं. त्याला भेटाया.' 'त्यो काय करितो तिथं?'

'तप करितो. त्याचं देऊळ बांधायचा नाय का ठराव झाला

गावकऱ्यांचा.'

'आन किती दिस लागात्या तिकडं जायाला आन येयाला?' 'लागतेन समजा वरीस दोन वरीस.'

'इक्तं लांब जायाचं-लहान लेकरू घेऊन. किती हाल त्या

बाळाचे.

'त्याला इथंच ठिवून जायाचं म्हनती.'

'हां, आसं कंधी व्हतं का? इक्ते लोकं संगती न्हेती आन लेकरू इथं

ठिवूनसनी जायाचं-सोभातं का तिला?'

'येकलीच जायाचं म्हनती, घोड्याव बसूनसनी.'

'हां, इक्ती मोठ्या घरची बाई. देसमुकीन. आशा बाया येकल्या येकल्या जात्यात का कव्हा? आपली कुनब्याची बाई सुदिक नायी जायाची. तुमी जाऊ देशान का मला आसं?'

'आगं त्योच त प्रस्न हाये. तिला येकलीला कसी जावून देयाची?' 'म्हनले का तुमी?' 'म्हनलो.' 'मंग?' 'म्हने, चाल मंग तू मपल्यासंगती.' 'म्हंजी ती येकली आन तुमी येकले आसं?' 'आसंच म्हनायचं.' 'हां, आसं कव्हा झालंय? श्यान घालतीन म्हनावा लॉक तोंडात.'

यमीच्या या अखेरच्या अभिप्रायानंतर श्रीपतीची बोलतीच बंद झाली तात्काळ. एके काळी त्याच्याशी साधं बोलायला टरकणारी त्याची बायको आता इतकं थेट बोलू लागली होती. अन त्यात तिची काय चूक? कोणीही हेच बोलणार. ती तर आपली बायको. श्रीपतीला वाटतं, बाई जे चित्र आपल्यासमोर उभं करते, त्यात तेव्हा प्रश्न दिसत नाहीत. आपल्या बायकोला इतक्या हलक्या हातांनी सांगितलं तरी पहिला तोंडात शेणाचा दणका! त्यामुळं एकटी जा किंवा मला सोबत घेऊन जा. त्याला शेण खाणंच म्हटलं जाईल.तेव्हा माझे बाई! इथं राहूनच काय तो मोकळा श्वास घ्यायचा तो घे.

अशात एक दिवस दासोभट आला. नेवासे करून आला होता. पण ज्ञानदेवाची भेट

नव्हती झाली. ती भावंडे आता तिथून बाहेर पडली होती. ते सारे कुठे जाणार होते याची कोणालाही माहिती नव्हती. बालवयातच विरागी झालेल्या आपल्या भावंडांना घेऊन निवृत्तीनाथ देशांतराला गेले होते. त्यांना बांधून ठेवणारं कुठंच काहीही उरलेलं नव्हतं. नेवाश्यातला पैसाचा खांब पोरका झाला होता. त्यामुळं त्या खांबाला नमस्कार करून दासोभट इकडं श्रीपतीच्या भेटीला आला होता. सांगितलेलंच होतं त्यानं आधी. अन निवांत होताच स्वाभाविकपणे बाईंचा विषय निघाला. श्रीपतीने सांगितलं, त्या असं असं म्हणताहेत. कारण असं असं आहे. आलास तर सोबत ये म्हणतात. येण्याची सक्ती नाही म्हणतात. परत येईन की नाही, सांगता येणार नाही म्हणतात. शब्दही न बोलता दासोभटानं शांतपणे ते ऐकून घेतलं. नंतर डोळे मिटून तो बराच वेळ ध्यान करत असल्यासारखा

बसून राहिला. बऱ्याच वेळानं डोळे उघडून म्हणाला, 'तू सांगतोस असं असेल तर तिला निघून जाण्याखेरीज पर्याय नाहीय. गेली की ती परत येणार

नाही.'

'अरे बापरे! सांगताय काय?' 'तिला परतीचा मार्ग दिसणं कठीण आहे.'

'अन सोबत कोणाला घ्यायला तयार नाहीय. एकटी घोड्यावर स्वार होईन अन जाईन म्हणते. असं कसं जावू द्यायचं तिला? सांगितलं तर म्हणते, तू ये. तू नसलास येणार तर कोणीही नको. असं कधी होतं का? माझं समजा सोडा, पण तिचं, त्या सगळ्या कुटुंबाचंच नाव धुळीला मिळेल.'

'ती म्हणते तशी एकटी गेली तरी ते होणारच आहे. काहीही सबबी सांगू देत तिने. लोक चाणाक्ष असतात. त्यातला वाईट भाग असा को तिला वेगळा रस्ता नाहीय-नसावा.'

'असं का म्हणता? ह्या विषयी बोलताना तुम्ही मला याच्या आधी सुद्धा कोड्यात टाकलेलं आहे. असं वाटतं की तुम्हाला काही तरी माहीत

आहे, कळलेलं आहे अन ते तुम्ही माझ्यापासून लपवता आहात.'

'शक्य आहे. म्हणजे तुला तसं वाटणं शक्य आहे. कारण तू चाणाक्ष आहेस. औपचारिक शिक्षण भले झालेलं नसेल तुझं. पण अंगभूत चाणाक्षपण अतोनात आहे तुझ्याकडं. सांगतो तुला. मला काही गोष्टी जाणवतात. आता तू जे सांगितलंस त्यावरून माझा होरा खरा असण्याची शक्यता आहे असंही मला वाटतं. तरीही ते मी तुला सांगणार नाही. कारण

त्याची जरुरी नाही.' दासोभट गंभीर स्वरात म्हणाला.

अरे बाबा, मित्र आहेस ना माझा! तरीही सांगत नाहीस. होरा असेल

तर असुदेत ना. चुकीचा ठरणार असेल तर ठरू देत. पण मला सांग.

'अन हे देवळाचं कवतिक निघालं, तिथून सगळा घोळ सुरू झाला.'

श्रीपती म्हणाला.

'अगदी बरोबर. अशा बाबतीत लोकभावना तीव्र असतात. लोकांना

थांबवणार कसं?'

'आणि कारणच नाही ना काही.' दासोभट गप्प झाला. 'मी काय करावं?' जरा वेळानं श्रीपतीने विचारलं. 'कशाचं?' 'तिच्याबरोबर जाण्याविषयी.'

'जायचं असेल तर कायम तिच्यासोबत राहण्याची मनाची तयारी ठेवावी लागेल.

तुलाही परतीचा रस्ता उरणार नाही. तुमचे संबंध कसे आहेत त्यावरून ठरव. तू माझा मित्र आहेस आणि स्पष्ट विचारलं आहेस म्हणून स्पष्ट सांगितलं. आणखी स्पष्ट बोलतो. तुझे आणि तिचे निकटचे संबंध आहेत का? म्हणजे तुमचे शारीर संबंध-'

'असं कसं-'

'थांब. मला अडवू नकोस. आधीच सांगितलं-आपण मित्र आहोत म्हणून मोकळेपणा हवा. तर, तुमच्यामध्ये शारीर निकटता असेल, ती होण्याची शक्यता असेल, ती तुम्हाला सुरक्षितपणे सुरू ठेवायची असेल तर मी वेगळा सल्ला देईन. ती नसेल आणि केवळ कर्तव्यभावनेपोटी तू जाण्याचा विचार करत असशील तर मी वेगळे सांगेन. तुमच्यामध्ये निकटता असणं मी समजू शकतो. तू तगडा देखणा आहेस. कोणत्याही स्त्रीला हवासा वाटण्याजोगा आहेस. इतक्या सहवासात भावनिक निकटता येणे शक्य असते. तीच पुढे शारीरिक अंगाने जात असते. तिच्या बाजूने वेगळ्या काही गरजा, भुका असू शकतात. तसे असेल आणि तुम्हाला त्याच्या परिणामी संतती होणे टाळायचे असेल तर त्यासाठी मी मदत करीन. सुश्रुत नावाचा एक श्रेष्ठ शल्यविशारद प्राचीन काळी या भरतखंडात होऊन गेला. त्याची तंत्रे आत्मसात केलेला एक शल्यविशारद प्रतिष्ठान नगरीत आहे. अंडगोलांकडून निघणाऱ्या शुक्राणूवाहक नलिकांना बारकासा छेद देऊन त्यांचा प्रवाह थांबविण्याचे शल्यकर्म तो यशस्वीपणे करतो. त्यामुळे सहवासात मिळणारा आनंद उणावत नाही आणि संतती होण्याची शक्यताही उरत नाही.'

'तुम्ही काय सांगताय ते सगळं मला समजलंय असं मी म्हणणार नाही. पण माझे-तिचे संबंध मालकीण आणि चाकर याच प्रकारचे आहेत. वेगळं काहीच नाहीय. मला तिच्याबद्दल आदर आहे, तिची काळजी वाटते हे मात्र खरं.'

'तुला तिच्यासोबत जायचंय?' 'वाटतं तसं.'

'परतीची वाट उरणार नाही. आज निकटता नसेल तरी उद्या निर्माण होणार नाही असं सांगता येणार नाही. माणसांची मनं फार अचपळ असतात. तुम्ही दोघेही तरुण, निरोगी आहात. अगदी निश्चयपूर्वक जरी तुम्ही नाही आलात निकट तरी लोक तसेच समजतील. मी मघाशी सांगितलं, ते शल्यकर्म त्यात उपयोगाचं नाहीय. लोकांना, अगदी तुझ्या पत्नीला सुद्धा तुला ठोस पुरावा द्यावा लागेल.'

'कसा देता येईल?'

"ते फार अघोरी कर्म आहे. त्यानंतर तुला स्त्रीशी शय्या करता येणार
नाही.'

'बापरे!'

दासोभटानं ते सांगितलं. 'प्राचीन काळापासून चालत आलेली एक प्रथा आहे. अजूनही ती तुरळक कुठे कुठे चालू असेल. राजाने किंवा उच्चवर्गीय कोणीही त्याच्या चाकरास त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या स्त्रीचा कोणत्याही प्रकारे प्रतिपाळ करायला सांगितलं असेल तर ते चाकर स्वतःस खच्ची करून घेत असत. तसे करून आपल्या निष्ठेची आणि आदर्श गुलामीची ग्वाही देत असत. कोणत्याही राजाचा राणीवसा असतो. तिथं राण्या राहतात. राण्या, उपस्त्रिया, दासी अशांचा नित्य दरवळ असतो तिथं. पण तिथले सुरक्षारक्षक मात्र पुरुषच असतात. ते शरीराने अत्यंत दणकट असतात. त्या सगळ्यांना

खच्ची केलेलं असतं. ती तिथल्या कामाची पूर्वअटच असते. त्यांच्या डोळयात नुसतं आपण पाहिलं तरी ते खच्ची असल्याचं लक्षात येतं. ते डोळे निस्तेज आणि दुनियेतला रस मुळातून हरवलेले असतात. सहवासाची क्षमता असूनही स्वतःच्या इच्छेनं ब्रह्मचर्य पालन करणं वेगळं आणि तुमच्या इच्छेविरुद्ध किंवा तिचा विचार न करता खच्ची होऊन जगणं वेगळं. पहिल्या प्रकारात शारीर उर्जेचा प्रकाश शरीराच्या आत फाकून त्याची प्रभा माणसाच्या शरीरावर दिसते. दुसऱ्यात जो धक्का ते कर्म होताना बसतो त्याच्यामुळं निर्माणक्षम उर्जा कायमची खच्ची होते आणि जगण्यातला प्रकाश कायमचा नाहीसा होतो. डोळे निस्तेज होतात. कितीही सुकरतेने खच्चीकरण केलं तरी ते यातनामयच असतं. मुख्य म्हणजे माणसाचं माणूस असणंच संपतं. आदर्श यंत्र, आदर्श गुलाम हेच जगणं उरतं. तरीही माणसं जगतात हे पाशवी वास्तव. अन अशा गोष्टीचं गौरवीकरण करणारेही

असतात.'

दासोभट हे माणसाच्या खच्चीकरणाचं बोलत असताना श्रीपतीला आंडील गोन्ह्याला बडवताना पाहिल्याचं आठवतं : पुढच्या पायांच्या आत आणि मागच्या पायांच्या आत पाठीवरून वाखाच्या एकाच दणकट दोराने गुंडाळून, ती पायांमध्ये गुंतवून दोन्ही बाजूंनी दोन दिशांना दोघांनी ओढत खाली पाडणं. हे सुलभ होण्यासाठी मध्ये उभ्या राहणाऱ्यांनी त्याला ढकलणं, आणखी पाय बांधणं, शिंगांना दोर लावणं. अन नंतर त्याच्या अत्यंत सुदृढ, पौरुषयुक्त वृषणाखाली मऊ काही तरी ठेवून त्यास हळद आणि तूप चोळणं. वरून पुन्हा मऊ फडकं लावणं. आणि अखेर शेतात खळं करताना भुई धोपटण्यासाठी वापरतात तशा धोपटण्याचा एकच शक्तिशाली सराईत फटका त्या वृषणावर. वेदना व्यक्त करण्यासाठी तोंड उघडण्यास किंवा कोणत्याही हालचालींना वाव नाही. डोळे असतात. ते पाझरतात. बस्स. आणखी काही नाही. समजदार पूर्ण बैल. गुलाम. कामाचा. प्रेमाचा. नीट वागल्यास अधून मधून पाठ थोपटली जाईल. तेव्हा कातडी थरथरली पाहिजे. धन्यास आनंद होतो. दिले ते खावे-प्यावे. काम नाही केल्यास शेपटी पिळली जाईल, पाठीवर चाबकाचे फटके बसतील. श्रीपतीला आता आणखी आठवतं: आधी जेव्हा ते त्याच्याभोवती कासरा गुंडाळत असतात, तेव्हा त्याचा प्रतिकार असतोच. पण तो थोडा, लटका म्हणावा असा. कारण ज्यान त्याला आजवर पाळलेलं असतं तो त्यांच्यात असतो. अन त्याच्यावर त्याचा विश्वास असतो. हा काही तरी खेळ चालू आहे अन त्यात आपल्याला सहभागी व्हायचं आहे असंच त्याला वाटत असतं. खाली पाडून अंडगोलांना तूप चोळलं जाईपर्यंत तो खूष असतो. अन अखेरी वृषण फोडलं गेल्यावर हतबलतेचं, गुलामीचं घोर ज्ञान होऊन तो पूर्ण बैल बनतो. खच्ची केलेला माणूस आणि बैल; काहीच फरक नाही.

'असा मूर्खपणा तू करू नयेस, तू तिच्यासोबत न जाणंच युक्त.'

दासोभट म्हणाला.

इतका स्पष्ट अभिप्राय देऊन दासोभट थांबला.

'मी तुमच्याविषयी बाईशी बोललो होतो.' जरा वेळानं श्रीपती

म्हणाला.

'काय?'

'ती मला पुष्कळ काय काय सांगत असते. तेव्हा एकदा म्हणालो,

माझे एक मित्र आहेत. त्यांची मतं जवळजवळ तुमच्यासारखीच आहेत. तो कोणी तरी चार्वाक नावाचा माणूस होऊन गेला ना जुन्या काळी-'

'-श्रीपती, तू या बाईच्या फार निकट गेलेला आहेस. म्हणजे ती चांगलीच असेल, त्याविषयी माझ्या मनात किंतु नाही. पण विस्तवाजवळ लोणी नेलं की ते विरघळणार हा निसर्गाचा नियम आहे.'

'तुम्हाला वाटतंय तसं नाहीय काही. तुम्ही काळजी नका करू. मी तुमच्याबद्दल बोललो तर म्हणाली, इकडं आले तर भेटीला घेऊन ये त्यांना. मला आवडेल म्हणाली.'

'छे! छे! मी कशाला भेटू तिला? मी तुझा मित्र आहे. तुला भेटायला

आलो. ती झाली. बाईंना माझे प्रणाम सांग.'

'का हो?'

'कारण असं काही नाही. मला तिला भेटायचं नाहीय.' दासोभटानं

निक्षून सांगितलं.

चार दिवस राहून दासोभट निघून गेला. जाताना म्हणाला,

स्वतःची काळजी घे. नीट राहा. तो होता त्या दिवसातही श्रीपती ठरल्या वेळी वाड्यावर जावून बाईला भेटतच होता. अन बाई बोलत होती.

नंतरही ते चालूच होतं. भटाच्या येण्याचं त्यानं तिला सांगितलं नाही. तो भेटणारच नव्हता तिला, तर ते सांगण्यात काही अर्थ नव्हता. दासोभटाचं तिला न भेटणं त्याला कळत नव्हतं. इतकी किरकोळ गोष्ट. ठाम नाकारलं. आणि निघताना पुन्हा ते काळजी घे, नीट राहा. मनापासूनच होतं ते. काय समजायचं? त्यापेक्षाही, श्रीपती, तू त्या बाईच्या फार निकट गेलेला आहेस... विस्तवाजवळ लोणी नेलं की ते विरघळणार हा निसर्गाचा नियम आहे. असं तो का म्हणाला असेल? एकूणात असं की, आपण बाईच्या जास्त जवळ गेलोय किवा बाई आपल्या जवळ येऊ पाहतेय असा त्याचा तर्क छे! छे! बाई कोण, आपण कोण- याचा तरी विचार करायचा ना! श्रीपती ते तात्काळ मनातून झटकतो. पण भटाच्या तर्काचं धुकं मनात तरंगत राहायचं थांबत नाही. देवळाची बातमी ऐकल्यावर पडदा सरकवून ती समोर आली होती. आपल्यालाही आश्चर्य वाटलं होतं. पण ते तितकंच. नंतर नाही. अजूनही पडदा आहे. बाईला आपल्याशी बोलायला आवडतं. आपल्यालाही ऐकायला आवडतं. पण मर्यादा ठेवूनच वागते ना ती! अन पुष्कळ काय काय सांगत राहते. तिनं स्वतः वाचलेलं आहे. आपलं सगळं ऐकीव. एकदा म्हणाली, तुला अहिल्येची गोष्ट माहीत आहे? म्हटलं, हां. ती गौतम ऋषीची बायको. फार सुंदर होती. अगदी देवांचा राजा इंद्र- त्याचा सुद्धा तिच्यावर डोळा होता. एकदा गौतम ऋषी जवळच्या तळयात अंघोळीला गेला तर इंद्राने गौतमाच्या रूपात येऊन तिच्याशी संबंध केला. अन ते ऋषी आले अंघोळ करून तेव्हा सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. मग त्यांनी इंद्राला शाप दिला अन अहिल्येलाही. म्हणाला, तूही या पापात सहभागी झालीस. आता या क्षणी तू शिळा होऊन पडशील. ती म्हणाली, माझी काय चूक नाही. मी त्याला तुम्हीच समजले. ऋषी म्हणाले, ठीक, नकळत तुझ्याकडून झालंय.पुढं त्रेता युगात रामचंद्र नावाचा राजा काही कारणाने वनवासी होईल. तेव्हा त्याचा तुला स्पर्श झाला की तू पवित्र आणि साक्षात जिवंत होशील. गोष्ट ऐकल्यावर बाई बांगड्या किणकिणतात तशी हसली. म्हणाली, छान

सांगतोस की गोष्ट. अन चांगलं माहीत आहे तुला. ऐकलं की उत्तम ध्यानात ठेवतोस. कधी कोणा पुराणिकाने सांगितलेली असेल. आता, मी तुला सांगते: मुळातली गोष्ट अशी नाहीय. ती रामायणाच्या पुष्कळ आधी रचल्या गेलेल्या 'बृहद्कथामंजिरी' नावाच्या ग्रंथात आहे. गौतम ऋषी अंघोळीला गेला आणि संधी साधून इंद्र आणि अहिल्या एकत्र आले. इंद्राचा तिच्यावर डोळा होता. पण तिलाही तो आवडलेला होता. सहमतीनेच ते झालं. ऋषी आल्याची चाहूल लागताच तिनं इंद्राला तात्पुरतं मांजर करून टाकलं. किंवा त्यानं ते रूप घेतलं. सगळा प्रकार ऋषीच्या लगेच ध्यानात आला. त्याने मांजराकडं बघत तिला विचारलं, 'हे काय आहे?' ती म्हणाली, मज्यार म्हणजे मांजर. ऋषी म्हणाला, हां हां, त्वद्न्जार. म्हणजे तुझा जार. ज्याच्याशी तू जारकर्म केलंस तो. तर अशा प्रक्षिप्त होतात गोष्टी. म्हणजे काय, इंद्र लंपट. पण अहिल्या साध्वी. ती बिचारी फसली, असा देखावा. प्रत्यक्षात इंद्र लंपट असेलच. पण अहिल्येला सुद्धा त्याच्याशी एकशय्या हवी होती. आणि ते स्वाभाविक सुद्धा असेल.अरे, ती राजकन्या. त्याच वैभवात लहानाची मोठी झालेली. बापानं तिचं लग्न वनात राहणाऱ्या या ज्ञानी ऋषीशी लावलं. तेव्हा रीत होती तशी. ती नांदत होती नीट निमूट. पण त्या राठ, जटाधारी, मिशाळ, घुरट ऋषीसोबत नांदताना तिला त्या देखण्या राजपुरुषाविषयी मोह वाटला असेल हे अधिक स्वाभाविक.

श्रीपतीला अनेक गोष्टी तर माहीतच नसायच्या. त्याही बाई सांगायची. तुळशीवृंदावनाची गोष्ट सांगताना म्हणाली, 'वृंदा ही जरासंधाची बायको. अतिशय सुंदर आणि पतिपरायण बाई होती. भीमाची ताकद वापरून कृष्णाने त्याचा संहार केला. अन वृंदेला म्हणाला, आता चल माझ्यासोबत. माझी पत्नी हो. ती पतिव्रता म्हणाली, नाही. मी नाही येणार. पण कृष्ण सोडतो कसला? म्हणाला, माझ्यासोबत आलीस तर साऱ्या भारतवषोतल्या सुवासिनी पिढ्यान्पिढ्या तुझी पूजा करतील. तुळशीची झाडं लावतील. त्यांना वृंदावनं म्हणतील. गोड गोड बोलून भुलवली तिला. अशाच अनेक रीतीने त्यानं सोळा हजार बायका केल्या. अन हा आपला पूज्य देव. काय असतं, जो जिंकतो ना, इतिहास त्याच्या बाजूला असतो. तो सांगेल ते खरं. सांगणारा जिंकणाऱ्याच्याच बाजूचा असतो. खरं म्हणजे जिंकणारा आणि हरणारा यांच्यात अगदी थोडं अंतर असतं. कौरव आणि पांडव यांच्या बळात फार अंतर नव्हतं. कौरव अधिक बलशाली होते, खरं सांगायचं तर. पण प्रत्येक ठिकाणी जिंकताना कृष्णाने कपटनीती वापरली आणि पांडव जिंकले. अन सोळा हजार बायका रे! सोळा सहस्त्र नारी भोगूनही तो ब्रह्मचारी! वा रे वा! अन कितीदा वाट्याला आला असेल तो त्या प्रत्येकीच्या? अपमानच केला त्यानं त्या बायकांचा. आणि नंतर तेव्हाचा सगळ्यात मोठा धनुर्धर अर्जुन ; त्याच्या संरक्षणाखाली या बायकांना घेऊन चालला असताना कैक वन्य पुरुषांनी त्यांच्यातल्या कैकांना पळवलं. त्याला कुठं त्यांना सांभाळता आलं? अन मुळात त्याच अगदी आनंदानं पळून गेल्या असतील, त्याचं काय ? नाममात्र स्पर्श झालेल्या किंवा अगदी अस्पर्श असलेल्या त्यांनी स्वतः च्या इच्छेनं केलं असेल ते.'

बाईच्या अशा कितीतरी गोष्टी. कितीतरी गोष्टी त्याला नव्यानं कळत होत्या. आपल्याला सांगितल्या गेलेल्या गोष्टींवर डोळे झाकून विश्वास ठेवायचा नाही. त्यांच्यात वेगळा अर्थ असू शकतो. आपल्याला तो लावता आला पाहिजे. एकच गोष्ट थोड्या वेगळ्या

नजरेने पाहिली तर वेगळी दिसू शकते.हे सारं त्याला नवीन होतं. आणि त्याला ते आवडत होतं. एकदा तर बाईनं अगदी तीन-चार पिढ्यांच्या आधी जवळच्या एका देशात प्रत्यक्ष घडलेली गोष्ट सांगितली ती अशी: अतिशय सुखी लोकांचा देश होता. राजधानीच्या भोवती तटबंदी होती. रक्षणासाठी प्रबळ सैन्य होतं. आणि शहरात आत रुंद रस्ते, भव्य प्रासाद होते. कालवे होते. उत्तम अन्नधान्य, भाजीपाला, फळफळावळ आसपासच्या प्रदेशातून येत होता. तिथले वणिक अतोनात धनसंपन्न होते. व्रते-उपासना, कमेकाड; सगळे सतत चालू असे. ब्राह्मण, पुराणिक, पुरोहित असे सगळे तृप्त. आणि राजा तर सगळयांचा स्वामी. अतोनात ऐश्वर्य. इंद्राचे वैभव असावे तसे. आणि राणीवसा सुद्धा त्याला शोभेल असा प्रचंड होता. त्याच्या सैन्यबळाचा धाक सर्वदूर होता. त्यामुळं तिथं कितीतरी वर्षात युद्धाची वेळच आली नव्हती. पण अशी समृद्धीच मुळी कोणा न कोणा धाडशी राजाला लालचावतेच ना! तर असा एक दूर देशीचा अविंध राजा होता. त्यानं याच्या तटबंदीच्या नगरीला वेढा घातला. याच्या प्रबळ सैन्याने त्या सैन्याला पिटाळून लावायचा बराच प्रयत्न केला. त्याची पुष्कळ हानी सुद्धा केली. पण वेढा उठला नाही. नाकेबंदी सुरू राहिली. असे अनेक दिवस लोटल्यावर आतला दाणागोटा संपत आला. रत्न-माणकं कितीही असली तरी खायला काही नसेल तर काय करणार? वेढा घालणारा रत्न-माणकांना अन जडजवाहिराला बधेना. त्याला आता पुरतं राज्यच हवं होतं. मग आतल्या राजानं ठरवलं की असं उपाशी मरण्यापेक्षा लढून मरू. तशी अखेरची लढाई करण्याच्या आधी तिथं एक प्रथा होती. म्हणजे प्रथा असेल अथवा नसेल सुद्धा. पण त्या राजाने ठरवलं. की बाबा, या अखेरच्या लढाईआधी आपल्या सगळया राण्यांना आपण स्वतः मारून टाकायचं. त्या शत्रूच्या हाती पडायला नकोत. राणीवशात माहिती देण्यात आली. सगळयांनी उत्तम वस्त्रे-प्रावरणे लेऊन ह्या ह्या वेळी तिथल्या पटांगणात एकत्र यायचं. राण्या ओळीने उभ्या राहतील. राजा एकेकीची पूजा करून तिचे दर्शन घेऊन स्वतः तलवारीने तिचा शिरच्छेद करील. त्यासाठी प्रत्येक राणीच्या शेजारी तलवार घेऊन तिची दासी उभी असेल. ती राजाच्या हाती तलवार देईल. कोण काय बोलणार? राजाज्ञाच ती. आणि परपुरुषाच्या हाती पडण्यापेक्षा स्वतःच्या स्वामीच्या हातून मृत्यू स्वीकारणं म्हणजे स्वर्गाचा रस्ता मोकळा. सगळयांना मान्यच होतं ते. पण एक वेगळी निघाली. तिने विचार केला की युद्धात हा हरतोय. मी नाही. मी का मरू? मी जगेन आणि लढेन सुद्धा. लढताना मरेन सुद्धा. मला मारण्याचा याला काय अधिकार? तिने निर्णय घेतला की हा मला मारायला येईल तेव्हा, त्याच्या आधी मीच याला मारेन. अन तिनं मनाशी ठरवलं की हे कोणाशी म्हणजे कोणत्याही राणीशी बोलायचं नाही. त्याचा उपयोग नाही. तिनं तिच्या दासीला विश्वासात घेतलं. म्हणाली, माझ्यासाठी स्वतःचा जीव पणाला लावायला तयार आहेस? दासी म्हणाली, नाहीतरी माझ्या जीवाची कितीशी किंमत? तुम्ही मला इतकं दिलंय. तुमच्यासाठी करीन सांगाल तसं. राणी म्हणाली, तू माझ्या शेजारीच उभी असशील. राजा जेव्हा माझं दर्शन घेण्यासाठी वाकेल तेव्हा तुझ्या हातातली तलवार तू मला द्यायचीस. ती घेऊन मी राजाचा शिरच्छेद करीन. माझा प्रयत्न फसणार नाही. पण फसला तर माझ्यासोबत तुलाही मरावं लागेल. राणीच्या या विचाराने दासीच्या मनाचा थरकाप उडाला. एवढ्या सगळया वैभवाच्या स्वामीला ही मारणार? राणी म्हणाली,

घाबरू नकोस. तुला मरावं लागणार नाही. मी माझं काम यशस्वी करीन. आणि नंतरचं सुद्धा सांभाळीन. आणि तू ती माझ्या हाती देतेस असं तरी कशाला? मी ती हिसकून घेईन. फक्त प्रतिकार करायचा नाहीस. तसा लटका प्रयत्न केल्यासारखं कर. म्हणजे तुझा काहीच अपराध नाही, असं दिसेल. दासी तयार झाली. राणी म्हणाली, आता हे आणखी कोणाशी बोलू नकोस. कारण त्याच्यामुळे माझा प्राण सत्वर घेतला जाईलच. पण तुझाही जाईल हे नक्की. दुसऱ्या दिवशी राजा राणीवशात आला. सोबत राणीवशातले मोजके खच्ची रक्षक होते. तेच असत तिथं. ताकदवान पण खच्ची. इतरांना तिथं जाता यायचं नाही. राण्या ओळीने उभ्या होत्या. शेजारी मोठ्या तबकावर लाल वस्त्र आणि त्याच्यावर आडवी मांडलेली तलवार घेऊन त्यांच्या दासी. राजा एकेकीसमोर जाऊन राणीचे पाय धुवून त्यांच्या पायांना हात लावून नमस्कार करी. राणी झूकून मान पूढे करून उभी राही. अन हा घाव घालून तिचा शिरच्छेद करी. असं करता करता हिची पाळी आली. राजा नमस्कारासाठी वाकला तेव्हा विजेच्या चपळाईने हिने दासीकडची तलवार हिसकवली अन राजाच्या मानेवर ती पूर्ण शक्तीने चालवून त्याचाच शिरच्छेद केला. इतकं अनपेक्षित होतं आणि क्षणार्धात झालं ते. खच्ची थिजले. वीर्य नसलेले दास बिचारे. तसं होणारच. अनेक दासींच्या हातातली तबकं निसटून त्यावरच्या तलवारी खाली पडल्या. जिवंत असलेल्या राण्या हादरून गेल्या. हिने भराभर आज्ञा सोडल्या. तलवारी टाकून दासी डावीकडे एकत्र उभ्या राहा. राण्या उजवीकडे एकत्र. खच्ची तलवारी टाकून समोर दूर अंतरावर. आता या क्षणापासून मी इथली आणि या राज्याची स्वामिनी. त्याचं काय करायचं ते मी ठरवीन. तिचा आवेशच असा होता की सगळ्यांना ते पटलं. तिथून ती निघाली ते थेट राजाच्या सिंहासनावर जाऊन बसली. तिथून तिनं आज्ञा सोडली. सगळ्या मोर्त्यांवरील सैनिकांनो, शस्त्रे टाका. नगरीच्या वेशीचा दरवाजा उघडा. तिथे टळटळीत पांढरे निशाण लावा. यानंतर अन्नपाण्यावाचून कोणी मरणार नाही याची ग्वाही मी देते. त्या अविध देशीच्या राजाला सगळी माहिती समजली. तो आत आला.त्यानं तिला सन्मानानं वागवलं. तिच्या धैर्याची प्रशंसा केली. कोणत्याही प्रकारे लुटालूट केली नाही. खंडणी घेतली पण तिचं राज्य तिच्याकडेच ठेवलं. गोष्ट सांगून झाल्यावर बाई म्हणाली, श्रीपती, तुला कदाचित हा त्या राणीने तिच्या नवऱ्याशी केलेला द्रोह वाटत असेल, विश्वासघात वाटत असेल. मला तसं अजिबातही वाटत नाही. असं बघ, रानात वाघिणी किंवा सिंहिणी कळप करून राहतात. त्यांच्यात स्वामी म्हणून एक नर असतो. तो शक्तिशाली असतो. पण शिकार त्याच करतात. त्यांनी ती केली की खाण्याचा पहिला मान त्या नराचा. कारण तो त्यांचा स्वामी आणि रक्षक. तरुण नर त्या कळपात तयार झाले तर ते त्याला आव्हान देतात किंवा तिथून निघून जातात. बाहेरचा कोणी ताकदवान नर याला आव्हान द्यायला आला तर या माद्या आपल्या नराला मदत सुद्धा करतात. पण तो समजा हरला तर त्या या नवीन जेत्या नराच्या अधीन होतात. या राणीने याच्यापेक्षा वेगळं काय केलं? तिनं निमुटपणे मरून जायचं नाकारलं. तिला मारायला निघालेल्या त्याला तिनं मारलं. अविंध राजानं तिला सन्मानानं वागवलं, हे त्याचं मोठेपण. श्रीपती काहीच बोलला नाही. त्याला प्रतिष्ठानमध्ये चंद्रलेखेविषयी जे बोललं जात असे त्याची आठवण झाली. तिने खिलजीच्या माणसांशी संधान बांधलेले आहे. तो जिंकणार आहे, हे तिला माहीत

आहे. अन गणिका काय; जो जेता असतो, त्याच्याच सोबत
जातात, असं म्हणत लोक.
कितीही आणि कसाही विचार केला तरी बाईच्या बोलण्याचा
कसलाही गैर अर्थ श्रीपतीला लावता यायचा नाही. तिला आपण आवडत असूही कदाचित-किंवा आवडतोच आहोत. आपल्यालाही ती आवडते. पण ती निर्मळ आहे. या दुनियेत आजच्या घडीला आपणच तिच्या सगळ्यात जास्त निकटचे आहोत, हे खरं आहे. तिचा नवरा गायब झालेला आहे. तो कुठं गेलेला आहे, हे कदाचित तिला माहित असेल. लोकभावना जी झालीय की तो तप करायला गेलेला आहे, ते कदाचित तसं नसेल सुद्धा. पण ही स्त्री लटपटलेली नाहीय. ती खंबीर आहे. जे काही झालं आहे ते तिनं शांतपणे स्वीकारलं आहे. तिच्या मनाच्या आतल्या कप्प्यात जखमा असतीलही. पण त्या बाहेर अजिबातही दिसू न देण्याची क्षमता तिच्यात आहे. फक्त हे जे निघून जायचं तिनं मनात घेतलं आहे, ते आपल्याला कळत नाही. न पळताही जगणं शक्य आहे, हे तिच्या लक्षात कसं येत नाही? अन जाणार कुठं ही एकटी बाई? आपण काय करायचं? तिच्या सोबत जायचं? कसं? किती दिवस? काय अर्थ काढतील लोक? अन आपली बायको? तिनं काय उत्तरं द्यायची लोकांना? अन तिनंच मुळात का विश्वास ठेवावा आपल्यावर? बाईसोबत जावूनही तिचं नाव नीट राहील, याच्यासाठी काय करायचं? दासोभटाचा प्रश्न बिनतोड होता. श्रीपतीला काहीच सुचत नव्हतं.

7

गुंता सुटण्यासाठी मुळात तो वाढावा लागतो. अन तो सोडविण्यासाठी सतत प्रयत्न करावे लागतात. मग कधीतरी असा एक क्षण येतो की, अरे! हे आपल्या लक्षात कसं आलं नाही? इतकी सोपी गोष्ट! अर्थात काही योग आणि योगायोग असतातच. ते केवळ गुंतेच निर्माण करू शकतात. आणि तो सुटण्याच्या शक्यताही त्यातूनच निर्माण होऊ शकतात. म्हणजे मुळात ते सगळं स्वायत्तच असतं. माणसं निष्कारण स्वतःकडं श्रेय घेतात. काळ वाहता वाहता खेळत असतो, खरं तर.

झालं असं की दासोभट म्हणाला ते यमीनं ऐकलं. म्हणजे सगळंच नाही. पण तिला ताप होण्याइतपत तिनं खासच ऐकलं. विश्वासार्हतेसाठी अघोरी कर्म करावं लागेल. तुझे अंडगोल काढावे किंवा ठेचावे लागतील. त्यातून तू दुनियेला आणि तुझ्या बायकोला खात्रीने सांगू शकशील की बाबा मी या स्त्रीशी कोणतंही कुकर्म केलेलं नाही. ही स्त्री पवित्र आहे. पुढचा जो भाग होता; म्हणजे, तू तिच्यासोबत न जाणेच युक्त. हे दासोभटाचं तिला ऐकायला मिळालं नाही. त्या सुमाराला तिला काहीतरी न टाळण्याजोगं काम निघालं असेल. घरात अशा कैक गोष्टी असतात. उतू जाणाऱ्या दुधापासून ते आक्रोश करणाऱ्या

बाळायंत. बाईमाणसाला सगळीकड लक्ष द्यावं लागतं. अर्थात ते ऐकूनही तिला काही फरक पडला नसता. आपल्या नवऱ्याला ती उत्तम ओळखून होती. तो काहीही करू शकतो, याची तिला जाणीव होती. लई येड्या बोड्याचं हाये ते. ती स्वतःशीच म्हणाली. जराशी हसली सुद्धा. तिच्याशी ज्या प्रकारे आणि जितकं समरसून तो रत व्हायचा, ते तिला आठवलं म्हणून. पण त्यापेक्षाही ती अधिक घाबरलो. हा माणूस काहीही करू शकतो. हा चांगला आहे. आणि ह्याचं हे चांगुलपण कोणत्याही थराला जावू शकतं, हे तिला जाणवलं. दासोभट गेल्यावर काही दिवस मोठ्या मुष्किलीने ती गप्प राहिली. पण अखेर अनावर होऊन तिनं त्याला थेट विचारलं.

'त्यो बामण म्हणत व्हता तशी गोस्ट करतान का काय तुमी?' 'कोनची गोस्ट?' 'त्या बाईसंगती जानार?' 'परसंग पडला त जावा लागन.' 'दोरी तोडून?'

तिला आंडदोरी म्हणायचं होतं. वृषणात निर्माण झालेलं वीर्य शिस्नाकडे नेणारी नलिका तुम्ही कायमची तोडून घेणार आहात काय? की बैलाचे वृषण फोडतात तसे तुमचे फोडून घेणार आहात? अशा प्रकारची भाषा तिला माहीत नव्हती. पण ती जे बोलली ते त्याला त्वरित समजलं. 'परसंग पडला तर तेय बी करावा लागन.' तो म्हणाला.

तो हे कदाचित सहज म्हणाला असेल. कदाचित तिच्या मनाची तयारी करण्यासाठी सुद्धा. तो तितकंच बोलला आणि थांबला. पण तिच्या मनात सगळं सुरू झालं. हा मुळात जातो कशाला एकटा तिच्यासंगती? तू मस कितीबी चांगला आसला तरी दुन्या बोलायची हानार हाये का? आंड ठेसून घेतो तिच्यासाटी? आन मपलं काय करितो? आरे वाघासारका बाप्या तू. आंड ठेसून निस्ता बैल व्हशीन. मंग मी काय गोखाड करायची का? कोनच्या गू-घानीत लोटितो मला? आता बोलू कोनाला आन सांगू कोनाला ? ह्या यड्याबंबाड्या संगती बोलून त कायच उपेग नायी. भिताडावर धडका घेन्यासारकं हाये ते. मंग कोनासंगती बोलायची ही बात? दुसऱ्या बाया-बाप्ये यांच्यासंगती बोलून उपेग नायी. निस्कारनी ठ्या ठ्या व्हयाचं काम. येक करता दुसरंच काय तरी निगायचं. मनाच्या या घालमेलीनं तिला थेट बाईकडं नेलं. देशमुखीण बाईकडं. तिनं तिला थेट सगळं सांगितलं. आसं करतानी आसं म्हनतो मपला नवरा. पटातं का तुमाला, सांगा. न्ह्या ना तुमच्यासंगती. मी नाय म्हनत नायी. मपला इस्वास हाये त्याच्याव आन तुमच्याव पन. लय आदर धरितो त्यो तुमचा. पन म्हनून आसा आघुरीपना करायचा? खुशाल आंदोर तोडाया निघाला ह्यो बाप्या. काय तरी तोड काढा मालकीनबाई. मी पदर पसरती.

देशमुखीण एकदम गप्प झाली. आपल्या हाताची मूठ तोंडावर धरून

स्तब्ध बसली.

'लगेच बोलावते मी श्रीपतीला. थांब तू इथंच- किंवा नको. तू जा.

मी बोलावते त्याला आणि सांगते. काळजी करू नकोस. थेट माझ्याकडं सांगायला आलीस हे बरं केलंस. आणखी कोणाशी बोललेली नाहीयेस ना?' तिनं तोंडावरचा हात काढून शांत स्वरात यमीला सांगितलं आणि विचारलं.

'नायी.' 'समजदार आहेस.'

यमी गप्प उभी. बाई आपल्या नवऱ्याला हा अघोरीपणा करण्यापासून परावृत्त करील याची खात्री पटलेली. पण हलवून हलवून जात्याचा खुंटा बळकट करावा तशा आशेने उभी

राहिलेली. समजदार होती ती. ते तिलाही माहीत होतं. म्हणून तर थेट मालकिणीकडं आली होती.

'करते मी सगळं नीट. आणि तो शब्द कोणता वापरलास तू- काय

तोडायला निघाला तो म्हणालीस?'

'आंदोर.' जरा थांबून यमी म्हणाली आणि लाजली.

'शब्द छान आहे. मला माहीत नव्हता म्हणून विचारलं.' किंचित हसत देशमुखीण म्हणाली, 'ये आता. निर्धास्त राहा. मी बोलावून घेते त्याला.'

बाई विचार करत बसली, की बाबा, काय माणूस आहे हा श्रीपती. आपल्यासोबत यायचं तर हा स्वतःला खच्ची करून घ्यायला निघालाय! याला काय म्हणायचं? याला किती माहीत आहे आपल्याबद्दल? आपल्या नावाला कलंक लागू नये म्हणून हा या थराला जायला निघालाय? मुळात हा सोबतच हवा कशाला आपल्याला? तुला जायचंय निघून तर जा ना बाई तू. हा कशाला पाहिजे सोबत तुला? मग तिला वाटलं, आपल्याला त्याची सवय झालीय. पण म्हणजे मी त्याला असं वापरायचं? अन खरं तर मी गुंतत चाललेय त्याच्यात. म्हणजे प्रेमच असं नाही-नसेल. छान, निर्मळ, गावरान आहे तो. सणसणीत पुरुष. आणि संयमी. काही तरी असं आहे त्याच्यात की ज्याच्यामुळं तो त्याच्या भावनांना स्वतःच्या आत परावर्तित करून त्या प्रकाशात सुखानं राहू शकतो. त्याला कदाचित हे दिसत नसेल पण ते आपल्याला जाणवतं. त्याच्या सोबत असणं आपल्याला आवडतं.आपण सांगत असलेल्या अनेक गोष्टी किती उत्सुकतेनं आणि असोशीनं ऐकत असतो. अन हल्ली मोकळेपणी प्रश्न सुद्धा विचारतो. आधी साहजिकच बुजरेपणा होता थोडा. तो कमी झालाय. तरीही तो बरोबरीच्या नात्यानं नाही वागत. तेही साहजिकच. दुसऱ्या कोणत्याही पुरुषानं आपल्याकडून इतक्या निकटतेनंतर स्वतःच्या बाजून अधिक प्रयत्न खासच केला असता. यान नाही केला. पद, दजी अशा गोष्टी स्त्री-पुरुष नात्यात दुय्यम व्हाव्यात इतक्या अंतरावर आल्यावरही याची प्रज्ञा स्थिर आहे. पण मी का त्याला या इतक्या निकटच्या अंतरावर आणते आहे? मी गुंतलेय त्याच्यात? नाही. असं नाहीय. तो मला त्याच्यात गुंतूच देत नाहीय. मला तो आवडतो. पण मग आपल्या आवडीसाठी त्याला स्वतःला खच्ची होऊ द्यायचं? अजिबात नाही. कदापीही नाही.

श्रीपती आला. पडद्यासमोर बसला.

'हां, काय श्रीपती घेतलास तू निर्णय? महिना होऊन गेलाय मी तुला सांगून.तुझ्याकडून काहीच प्रस्ताव नाहीय, म्हणजे तुला यायला जमणार नाही, असं मी गृहीत धरायचं आणि तुला काही विचारायचं नाही, असं मी म्हणाले होते. तरीही विचारतेय.' बाईचा स्वर एकदम शांत. माहितीच्या उजेडाची कसलीही चिन्हे त्यात नाहीत.

श्रीपती गप्प राहिला. तरीही का विचारता, असं काही तो म्हणू शकत

नव्हता.

'काय करावं समजत नाही.' 'कशाचं? स्पष्ट बोल.' 'हेच-तुमच्यासोबत येण्याचं- न येण्याचं.' 'निर्णय होत नाही?' 'समजत नाही.'

'पण मी तर ऐकलंय की तू निर्णय घेतला आहेस.' इथं श्रीपती

डुचमळला.काही तरी घडलंय हे त्याला जाणवलं.

'नाही, असं काही-' "मग तुझी बायको खोटं का सांगतेय मला?' 'काय म्हणाली? कधी भेटली?'

'आत्ताच भेटून गेली. म्हणाली, तुझा निर्णय झाला आहे. माझ्या शुद्धतेची दुनियेला अन तुझ्या एकनिष्ठेची तुझ्या बायकोला खात्री पटावी म्हणून तू स्वतःला खच्ची करून घेणार आहेस.'

'वेळ आली तर तसंही करावं लागेल असं म्हणालो होतो.' 'म्हणजे तिच्या मनाची तयारी करतो आहेस तू.' 'असं माझ्या नकळत किंवा कळून-सवरून सुद्धा असेल मनात.'

'इतका मोठा त्याग करण्यासारखं असं काय पाहिलंस माझ्यात? अन तू तसं केलंस म्हणून दुनिया बोलायची थोडीच थांबणार आहे? काय काय आणि किती लोकांना दाखवशील आणि सांगशील? हे बघ श्रीपती, हा काही मार्ग नाही. तू असं केलेलं मला चालणार नाही. अन मीच मुळात तुला म्हणाले की मी एकटी जाणार आहे. आलास तर तू एकटा सोबत असशील तर चालेल. कशासाठी पाहिजेस तू एकटा मला? तुला हे खुपलं नाही? आपण दोघंही तरुण आहोत. सोबत राहिलो तर काय करू, काय होईल याच्या शक्यतांचा विचार तू केला नाहीस? तुझ्या काहीच मनात आलं नाही? माणसाच्या मनातल्या भावना, रक्तातले स्राव जात-पात मालक चाकर ; कशालाही जुमानत नसतात, हे का तुला माहीत नाही? मी तुला ये म्हणतेय म्हणजे मला तुझ्या सहवासाचा मोह वाटतो हे तुझ्या लक्षात आलं नाही? की ते लक्षात घेऊनच तू या भयंकर निर्णयाशी आलायस?'

श्रीपतीला काहीच बोलता येईना.

'मी काय म्हणतेय श्रीपती?'

'मी इतका खोल विचार केलेला नाही.' श्रीपती हळूच म्हणाला. दासोभट बोलला होता, ते त्याला आठवलं. तुझ्या मनात नसेल- किंवा तुला जाणवत नसेल काही- पण तू तिच्या फार निकट गेलेला आहेस. विस्तवाजवळ लोणी नेलं की विरघळणारच ते.

'फार चांगला आहेस तू श्रीपती. माणसानं इतकं चांगलं असणं सुद्धा

ठीक नाही, अजिबात ठीक नाही,' बाई शांत स्वरात म्हणाली, 'आता असं कर.हा पडदा तुझ्या हातानं बाजूला कर. अन आत माझ्याजवळ येऊन बैस. मला तुझ्यासमोर कोणताही पडदा पाळायचा नाहीय.

'नको, नको- म्हणजे पुन्हा तेच. दासोभट तेच म्हणाला-'

'-कोण हा भट? तुझ्यावर फार प्रभाव दिसतो त्याचा. म्हणजे चांगलाच असेल तो. असूदे. मला तुला माझ्याविषयी सगळं सांगायचंय. अन कोणताही आडपडदा न ठेवता सांगायचंय. मी तुला न सांगितलेलं खूप आहे. ते सगळं मी सांगणार आहे. त्यासाठी हा पडदा ओलांडून तुला यावंच

लागेल. नाहीतर मी ते सांगणार कशी?' बाई प्रसन्न हसली.

'तरीही आज नको.'

'का? मनाची तयारी होत नाहीय? ठीक. उद्या ये. मनाची तयारी करून ये. मला तुझ्याविषयी किती आदर वाटतो हे कदाचित मला तुला पुरेसं सांगता आलेलं नसेल, मला तुझ्याकडून काहीही नकोय, मला तुझ्याइतकं संयमी आणि समजदार होण्याचं बळ मिळण्यासाठी प्रार्थना कर फार तर. अन हा आंदोर तोडायचा- हा शब्द मला तुझ्या

बायकोकडून समजला. छान शब्द आहे. पण हा- विचार मनातून काढून टाक. तसं केलंस तर मी तुला भेटणार नाही, म्हणजे तू मला साधं पाहू देखील शकणार नाहीस, इतकं तुला मी खात्रीने सांगेन. स्वतः ला आहे तसा ठेवूनच तू मला मदत करण्याचा विचार करू शकतोस. आंदोर तोडून नाही. मुळात मला तुझी मदत नकोच आहे. तू माझ्यासोबत जितका आणि जसा आहेस तितका मला पुरेसा आहेस. पण आंदोर तोडून आलास तर तू माझा कोणीही नाहीस, हे ध्यानात ठेव. तुझी बायको मला भेटली याची जाणीव तू तिला देणार नाहीयेस. समजलं?'

8

'आता मी सांगते तुला माझ्याबद्दल. वडील दशग्रंथी ब्राह्मण, चार्वाकपंथी हे सांगितलंय. आई जुन्या वळणाची पण पुष्कळ बदलली हेही सांगितलंय. सरळच की मी अगदी मोकळ्या वातावरणात वाढले. मनसोक्त खालं-पिल्लं, रानात भटकले, भरपूर वाचलं. फार धनवान होते वडील असं नव्हतं. पण सुखानं जगण्यासाठी कशाचीच कमतरता नव्हती. गाभुळत्या वयात जे बदल होतात तेही मी आनंदाने अनुभवले. अन एकाला बघितल्या क्षणी धाडकन त्याच्या प्रेमात सुद्धा पडले. तो माझ्या वडिलांना भेटायला आला होता. त्याला पाहिलं अन माझ्या हृदयातल्या सशाच्या पिल्लानं सण्णकन उडी मारली आतल्या आत. इतकं की गलितगात्र होणं काय असतं, ते मी पहिल्यांदा अनुभवलं. त्याला बसायला सांगून वडिलांना बोलवायला मी आत गेले अन त्यांना निरोप सांगून तिथंच बसून राहिले. त्यात कोणाला वावग वाटलं किंवा दिसलं नाही. पण माझं काय झालं ते मला कळत होतं. अर्थात इतक्या सगळ्यात सुद्धा मी बाहेर बैठकीत चक्कर टाकून त्याला परत एकदा पाहून घेतलं. तर पुन्हा ते सशाचं पिल्लू उसळलंच. म्हटलं, आटोपलं आपलं. संपलं. ह्या माणसाला पकडण्यावाचून आपल्याला पर्याय नाही. त्याच्या ते लक्षात आलं नाही. साहजिकच होतं. पण मी पुढाकार घेऊन त्याला जाणीव करून दिली. ती झाल्यावर मात्र तो चकित झाला. इतकी धाडशी आणि बेधडक मुलगी त्यानं पाहिलेलीच नसेल ना! अन नसतातच अशा मुली. फार वाकत, दबत आणि दबकत मोठं व्हावं लागतं त्यांना. मी वेगळी होते. अन ते मला माहीत होतं. मी दिसायला जशी आहे तशी आहे. म्हणजे सुंदरच वाटते सगळ्यांना. पण तसं जे काही असेल तसं दिसण्यात माझ्या स्वभावाचा वाटा जरा अधिक आहे, असं

मला वाटतं. माझं मोकळं वागणं माझ्या दिसण्याला अधिक आकर्षक करतं. जे करावंसं वाटतं, ते करायला मी कधीही कचरले नाही. जगण्यातल्या अनुभवांनी आता मी जरा संयमी झाले असेन. तेव्हा नव्हते. तो माणूस मला आवडला. मी त्याचा पिच्छा पुरवला. ते त्याला इतकं आवडलं की त्यालाही माझ्या खेरीज काही सुचेनासं झालं. त्या वर्षीच्या वसंतोत्सवात आम्ही शरीराने एकत्र आलो. काहीही न ठरवता ते झालं.

मनाने झालोच होतो आधी एक. आमच्या मनात वसंत फुललेलाच होता कधीपासून. बाहेरचा वसंतोत्सव हे केवळ निमित्त. मनात भीती अन पापाची जाणीव नव्हती. मग समजलं की त्याचं लग्न झालेलं आहे. त्यानंच सांगितलं. मन जरा दुखलं. पण म्हटलं असूदे की. मी दुसरी होऊन राहीन त्याची. मुख्य म्हणजे त्यानं ते स्वतः होऊन सांगितलं. एकत्र येण्याच्या आधी सांगितलं. मी तर प्रेमानं आंधळी झाले होते. अन पुरुष करू शकतो ना अनेक बायका. बाईनं अनेक नवरे करायचा काळ महाभारतासोबत संपलाच जवळपास. तेही खरं नाही, खरं तर. हिमालयाच्या डोंगर रांगातल्या अनेक भागात ही प्रथा अजूनही आहे. दक्षिणेतल्या मल्याळी लोकात बऱ्याच ठिकाणी ती आहे असं मी ऐकलंय. आपल्याकडं ते नाहीय. प्रश्न हा असा मुळात नव्हताच. नवरा, बायको, लग्न ; असं तितकं नव्हतं डोक्यात. एक धुंदी होती. माझ्या बाजूनं ते प्रेम होतं की फक्त शारीर आकर्षण? तो विचार करायला सुद्धा सवड नव्हती. त्याची जात वेगळी होती. ते जाहीर होतं. राजा बिंबदेवाचे सरदार होते ते लोक. अर्थातच पाठारे. तुझ्या जातीचे.प्रेमाच्या आकर्षणाचं जहर देश करताना जात कुठं बघतं? पण माझी पाळी चुकली अन या साऱ्या अन अशा- म्हणजे लग्न, जात, लोक काय म्हणतील, आई-बाबांचं काय करायचं- अनेक गोष्टी मनात आल्या. वसंतोत्सवानंतर आम्ही नंतर चार-सहा वेळा एकत्र आलो असू. तेवढ्यात हे पाळी बंद होण्याचं झालं. हे त्याला सांगणं भाग होतं. चौकशी केली तर म्हणाले, राजा बिंबदेवाने अपरांत देशी काही सैन्यदल पाठविले आहे. त्यातल्या प्रमुख सरदारात त्याचा समावेश आहे. म्हटलं, कधी परततील? म्हणाले, सांगता येत नाही. किमान दोन वर्षे तरी लागतील. कदाचित जास्तच. तिकडची व्यवस्था लावताना राजे बिंबदेव त्यांना तिथेच देशमुखीची नेमणूक देऊ शकतात. म्हणजे बघ! तो निघून गेला. काही वर्षांसाठी किंवा कायमचा. मला साधं भेटला सुद्धा नाही.काही सांगितलं सुद्धा नाही. अन इकडं माझ्या कुशीत त्याचा गर्भ. मी अगदी वेडीपिशी झाले. कोणाशी बोलायचं, काय अन कसं बोलायचं? असं कोणी नव्हतंच. आत्महत्येचे विचार मनात यायला लागले. दुसरा इलाजच दिसेना. मी अबोल, एकलकोंडी होऊन आतल्या आत स्वतःच्या मनाला कुरतडत होते. तेवढ्यात हे एडके मंडळींचं स्थळ आलं. सोनाजीराव वडिलांच्या भेटीला आले. त्यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे केशीराज एडके यांच्यासाठी मला मागणी घातली. एडके मंडळी नामांकित. सरदार विद्रुमसेन यांच्या पदरी असलेले मानकरी. म्हणाले, मुलगा वयाने थोडा मोठा आहे. बाकी प्रश्न नाहीत. तशी रीत नसूनही वडिलांनी मला विचारलं. मी काय सांगणार? मी तर सवत्स धेनु. माझं वत्स माझ्या कुशीत होतं अजून. पण होतंच ना! अन फक्त मलाच ते माहीत. हे असं कोणाला कसं चालणार? म्हटलं, मला त्या उपवधू मुलाशी बोलायला मिळणं कितपत शक्य आहे? वडील म्हणाले, असं कधी चालतं का? अन त्याची गरज सुद्धा नाहीय. तुला काही माहिती हवी असेल तर मला सांग. मी ती काढून आणतो. बाकी हे

लोक चांगले आहेत, हे मी तुला नक्की सांगेन. मी गप्प झाले. पण मग दैव असं की चारच दिवसांनी वडिलांनी मला सांगितलं, की मुलगा तुला भेटू इच्छितोय. मी त्याला अनुमती दिलीय. भेट अर्थातच आपल्या घरी होईल. हे असं लग्नाच्या आधी रीत म्हणून शक्यच नसतं. प्रेमलग्न असेल तर गोष्ट वेगळी. इथं तसं काहीच नव्हतं. माझ्या वडिलांमुळे ते शक्य झालं. मी ठाम ठरवलं होतं की आपण त्या मुलाला खरं काय ते सांगायचं. लपवून काही उपयोगही नव्हता. नंतर ते झाकून थोडंच राहणार होतं? आधीच सांगणं म्हणजे लग्न मोडणं आणि बभ्रा होणं. त्यासाठी मी मनाची तयारी केली होती. काही दिवसांनी मी हे कोणाहीपासून लपवून ठेवू शकणार नव्हते. निमित्ताने ते आधी होतंय तर ते बरंच आहे असं मला वाटत होतं. नंतर स्वतःला संपवणं एवढाच रस्ता माझ्यासाठी शिल्लक असणार होता. मी तशी मनाची तयारी केली होती. बारकं कुतूहल एकच होतं. हा एडके मुलगा कशासाठी मला भेटू इच्छित होता? पण म्हटलं,ते कळेलच तो आल्यावर. तो आला. वडिलांनी उत्तम व्यवस्था केलेली होती. आईला हे पसंत पडणार नाही म्हणून पुढच्या बैठकीची जागा त्यांनी निवडली होती. त्यांच्याकडे माणसांची ये-जा कायम असे. त्यात कोण, काय, कशाला आला; कोण चौकशी करतो? आई बैठकीत कधीही यायची नाही. अन माझा सगळीकडे मुक्त वावर असे. आमची व्यवस्था लावून वडील वाड्याच्या दरवाजाशी गेले. आणि दारवठेकराच्या भूमिकेत बसले. त्यांना भेटायला येणाऱ्यांसाठी ते सोयीचेच होते. एडके म्हणाले, मी आपणास आता जे सांगणार आहे, ते आपणाखेरीज कोणी ऐकू नये अशी माझी इच्छा आहे. तसे शक्य आहे काय? म्हटलं, माझ्या वडिलांची व्यवस्था चोख असते. चोरून ऐकण्याची पद्धत आणि कुतूहल आमच्या घरात नाही. म्हणाले, मी आपणास जे सांगणार आहे त्याच्या परिणामी आपण माझ्याशी विवाहास नकार देणार हे निःसंशय. तरीही मी ते आपणास सांगणार आहे. फक्त नकार कळविताना मी सांगितले त्या कारणासाठी नकार कळवू नका. तसे वचन आपण मजला द्या. ते पाळायचे की नाही, हे तुमच्यावर अवलंबून आहे. पण आजवर जे नकार आले, त्या सगळयांनी ते पाळले आहे. कदाचित माझ्या प्रामाणिक निवेदनामुळे, कदाचित दयेपोटी, अनुकंपा वाटून त्यांनी तसे केले असेल. असो. पती म्हणून मी आपणास स्वीकाराई वाटत नाही, असे आपण सांगू शकता. एकतर ते पटण्याजोगे आहे. माझी अंगयष्टी, वय, एकूण दिसणेच कोणालाही अनुकूल वाटण्याजोगे नाहीय. त्याच्यामुळे मीही ते समजून घेईन. या उलट खरे कारण आपण सांगितले आणि ते माझ्या वडिलांना कळले तर त्यांना होणाऱ्या दुःखाची मी कल्पनाच करू शकत नाही. म्हणून मी ही विनंती आपणास करत आहे. म्हटलं, सांगा. मी योग्य ते करीन. म्हणाले, माझे वडील विवाहाचे प्रस्ताव आणतात आणि मी त्यास नकार देऊ शकत नाही. पण वास्तव असे आहे की मला संसारात मुळी रसच नाहीय. म्हटलं, काय ते स्पष्ट सांगा. कारण हे तर तुम्ही स्वतःच्या वडिलांना सुद्धा सांगू शकता. म्हणाले, मला स्त्रीशी संसार करणं शक्य नाही. मी कोणत्याही स्त्रीला अपेक्षित सुख देऊ शकत नाही.

'अरे बाप रे!' इतका वेळ शब्दही न बोलता ऐकत असलेल्या श्रीपतीच्या तोंडातून निसटलं.

'मला सुद्धा धक्काच बसला त्यावेळी. पण तो त्यांच्या तृतीयपंथी

असण्यापेक्षा त्याची इतकी स्पष्ट कबुली एका अनोळखी मुलीसमोर देण्यामुळं अधिक

बसला. मनात आलं, हे या भल्या माणसानं आणखी किती तरी वेळा केलं असेल. त्यासाठीची जोखीम प्रत्येक वेळी पत्करलेली असेल. ते म्हणाले तशी खरंच अनुकंपा दाटून आली मनात. दुसरीकडं त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी आश्चर्य आणि आदर दाटला. त्यांना कोणाची फसवणूक नव्हती करायची. त्यासाठी स्वतःची मानहानी, मानखंडना होण्याचा धोका ते पत्करत होते. मी म्हटलं, मला चालेल. आता धक्का बसायची पाळी त्यांची होती. म्हणाले, चालेल ? कसं काय? तुम्ही तरुण आहात. सुंदर आहात. तुम्ही कशासाठी स्वतःला आयुष्यभर जाळणाऱ्या आगीत कळून-सवरून उडी घेताहात? म्हटलं, मी आत्महत्या करणार होते. पण मला तुमच्या प्रस्तावात जगण्याचा रस्ता दिसतो. माझ्यासोबत माझ्या कुशीतला गर्भ सुद्धा त्याचा अपराध नसताना मरेल. तुमचा प्रस्ताव मी स्वीकारला तर त्याला जीवन तरी दिसेल. अर्थात ते तुम्हाला चालणार असेल तर. मग मी त्यांना माझ्या अवस्थेबद्दल सांगितलं. ज्या कोणामुळं आणि अर्थात माझ्यामुळं झालंय तेही सांगितलं. तो लवकर परत येण्याची शक्यता नाही. कदाचित तो कधीच येणार नाही. अन मी मात्र अडकून बसलेय. हे मी कोणाशीही बोललेली नाहीय.

बोलणं शक्यच नाहीय. तुम्ही इतक्या प्रामाणिकपणे स्वतःविषयी सांगितलंत, म्हणून मला तुम्हाला हे सांगण्याचा धीर आला. एडके त्याला ओळखत होते. राजकीय परिस्थिती त्यांना उत्तम माहीत होती. म्हणाले, हा वेगळाच मुद्दा उपस्थित झालाय. मी गोंधळून गेलोय. या क्षणी मी ठाम काहीच सांगू शकत नाही.विचार करून कळवतो. माझा निर्णय सकारात्मक असण्याची शक्यता

अधिक आहे, इतकं तूर्तास सांगतो.'

दोनच दिवसांनी त्यांचा होकार आला. लग्न उत्तम झालं. दोनेक महिन्यांनी सोनाजीरावांनी आम्हाला प्रतिष्ठान नगरीस पाठवलं. त्याच्या आधी माझ्या लक्षात आलं की सोनाजीराव सगळं जाणून होते. आपला मुलगा माणसात नाही, हे त्यांना माहीत होतं. कसंही करून त्याचं लग्न व्हावं असं त्यांना वाटत होतं. होणाऱ्या सुनेच्या धुपत जाणाऱ्या आयुष्याचं काय करायचं याचा त्यांनी काय विचार केला असेल; माहीत नाही. कदाचित ती सहन करील. कदाचित ती पळून जाईल. कदाचित पळून जाण्याच्या आधी तिला मारून टाकता येईल, कदाचित तशी नुसती धमकी देऊन तिला राहायला लावता येईल, असा पुष्कळ शक्यतांचा विचार त्यांनी केला असेल. पण मी त्यांना आयती मिळाले. सवत्स धेनू. त्यांच्या सगळ्या प्रश्नांचं परिपूर्ण उत्तर. कदाचित मी कशी अडकलेली आहे हेही त्यांना त्यावेळी माहीत असेल. संधी साधूनच त्यांनी प्रस्ताव दिला असेल. अत्यंत मुरब्बी माणूस आहे हा सोनाजीराव. अत्यंत मुरब्बी माणूस. लग्नानंतर आम्हाला प्रतिष्ठानला पाठविण्याची चाल सुद्धा त्याची साक्ष म्हणता येईल. लग्नानंतर आठ महिन्यात बाळाचा जन्म. होऊ शकतं ना! पण उदगीरला असतो तर त्यावर निष्कारण चर्चा-विवाद झाले असते. ते टाळण्यासाठी आम्हाला सुरक्षित इकडं ठेवलं. या सगळ्यात सरस्वती कायम माझ्यासोबत राहिली. तिने मला कधीही काहीही विचारलेलं नाहीय. पण तिला सारं म्हणजे सारं माहीत असेल. मी तुला आधी सांगितलंय ना! कुणालाही काहीही न विचारता सगळं समजण्याची एक अतींद्रिय क्षमता तिच्यापाशी आहे, असं मला वाटतं. अतींद्रिय म्हणजे इंद्रियांच्या पलीकडच्या. स्वतःतल्या शारीर वासनांचा त्याग करता आल्यामुळे

किंवा त्यांना उलट्या फिरवून आत वळवता आल्यामुळे तिला ते साध्य झालं असेल असा माझा कयास आहे. हे असं तिच्या नकळत झालेलं सुद्धा असेल. ती अजूनही माझ्यासाठी एक गूढ आहे. अन तिच्याखेरीज मी स्वतःची कल्पना सुद्धा करू शकत नाही. वज्रसेन आठ-दहा महिन्यांचा असल्यापासून तू आमच्या सोबत आहेस. त्यामुळं पुढचं सगळं तुला माहीत आहे, असं मी म्हणू शकणार नाही.

पुष्कळ गोष्टी तुझ्या समोर घडलेल्या आहेत. पण त्यांचे अर्थ तुला लागत नसतील.'

'पण आता तुम्ही एकट्या निघून जाणार तर सरस्वती कशी असेल

सोबत?'

'म्हणून तर मी तुला सोबत चल म्हणतेय. कारण तिला बाळासाठी थांबणं गरजेचं आहे. अन तुझ्यात आणि तिच्यात मी काहीच फरक करत नाही. तुही तिच्यासारखाच आहेस.'

'म्हणजे?'

'तुझ्याकडं सुद्धा मी म्हणते तसं आत वळवलेलं काहीतरी आहे.

तुही मला तिच्याइतकाच गूढ वाटतोस.'

'काय समजत नाही.'

'समजतं, पण ते तू शब्दात व्यक्त करत नाहीस. नसूदेत. पण तुझ्यासमोर घडलेल्या सगळ्या गोष्टींचे अर्थ तुला लागतात का सांग. नसतील तर विचार.'

'दोन प्रश्न आहेत. मानकरी नेमके गेले कुठं? आणि गणिका चंद्रसेनेशी तुमची ओळख कशी? म्हणजे तुम्ही सांगितलंच पाहिजे असं नाही. पण

'का नाही सांगणार? जरूर सांगेन. सगळं तुला सांगायचं असं ठरवलंय तर हे का नाही? थोडी आधीपासून सुरुवात करते. आम्ही प्रतिष्ठानला येऊन दोन महिने जेमतेम लोटले असतील तेवढ्यात सहस्त्रसेन आला.

'सहस्त्रसेन? म्हणजे मी-'

'अरे विसरलेच मी. ज्याच्या मी आधी तुडुंब प्रेमात पडले होते तो हाच.तुला सगळं सांगायचं म्हणता म्हणता असं काहीतरी हातचं राहूनच जातं.'

'म्हणजे जो माझ्या हातून मारला गेला तो तुमचा प्रेमी- अरेऽऽ रेऽऽ

हे काय होऊन गेलं माझ्या हातून!'

'मला बोलूदे आधी. अन मरणाचं काय- तो नसता मेला तर तू मेला असतास. तीच शक्यता जास्त होती. शस्त्र त्याच्याजवळ होतं. ते त्यानं उगारलं सुद्धा होतं. पण घाव वाचवून तू ते हिसकावलंस. अन उलट वार केलास. तुझं चापल्य आणि समयसूचकता यांच्यामुळं तू वाचलास. सहस्त्रसेन निकराला आलेला होता. तो मला उचलून नेण्यासाठी आलेला होता. त्यासाठी काहीही करायची त्याची तयारी होती-'

'-आणि माझ्या हातून मरण आलं त्याला. तुम्ही किती संतापला असाल

'-सांगते. सहस्त्रसेन अपरांत देशीच गेला होता. पण तीनेक महिन्यांनी परतला.काय झालं ते त्याला समजलं. तो थेट प्रतिष्ठानला आला अन मला भेटला. म्हणाला, असं कसं केलंस तू? म्हटलं, बाबा, माझ्या कुशीत स्वतः चा कोंभ ठेवून गेलास तू. मला काहीही न सांगता. मी चौकशा केल्या. लोक म्हणाले, दोन वर्षे लागतील. काही म्हणाले, कदाचित तिकडेच रहिवसतील. मला आत्महत्येखेरीज पर्याय उरलेला नव्हता. या लोकांनी मला

सगळयासकट स्वीकारलंय. म्हणाला, पण आता मी आलोय ना. म्हटलं, आलायस. पण ती वेळ गेली. मी आता काहीच करू शकत नाही. एडके मंडळींच्या विश्वासाचा घात मी नाही करणार. तू मला सोबत घेऊन जावू शकत होतास, किमान भेटून जावू शकत होतास. काढला असता काही मार्ग. एखाद्या परक्या मुलखात अनामिक होऊन राहिले असते तुझी वाट बघत. ते तू काहीही केलं नाहीस. आता मला परतीचा रस्ता नाहीय. म्हणाला, मला तातडीने जाण्याची सक्ती करण्यात आली. तितका वेळच दिला नाही सरदार विद्रुमसेन यांनी. आता लक्षात येतंय, हे षड्यंत्र होतं. सोनाजी एडकेनं रचलेलं. स्वतःच्या पांग्या मुलासाठी. मी तेव्हा त्याला म्हटलं, असेल सुद्धा. पण आता मला परतीचा रस्ता नाहीय. तू याउप्पर मला भेटण्याचा प्रयत्न करू नकोस. त्यावेळी तो गेला. पण नंतर त्याचे निरोप येत राहिले. मी तुला घ्यायला येणार आहे. मी एडकेशी बोलतोय. मला कशाचीही पर्वा नाहीय. होणारं बाळ आपलं आहे. मी कशालाच प्रतिसाद दिला नाही. बाळाचा जन्म झाला. त्याचं नाव मी वज्रसेन ठेवलं. तेही त्याला समजलं. त्यामुळही त्याच्या आशा पल्लवित झाल्या असतील कदाचित. तो एडक्यांना भेटला असेल अनेकदा. कारण एकदा ते म्हणाले, तू सहस्त्रसेनाकडे जाशील? म्हटलं, तो विषय माझ्यासाठी संपलेला आहे. तुम्ही प्रामाणिक आहात. तुम्ही मला सगळ्यासकट समजावून घेतलंय. मी तुमच्याशी प्रतारणा करणार नाही. एडक्यांनी नंतर शब्दानंही मला यासंबंधानं विचारलं नाही. पण मनातून ते दहशतीखाली असतील, असावेतच. त्याच सुमाराला त्यांनी तुझी दारवठेकर म्हणून नेमणूक केली. मला म्हणाले, आता मी एक अतिशय ताकदवान माणूस देवडीवर ठेवलाय. मला त्यामुळं पुष्कळ सुरक्षित वाटतंय. आपल्या बाळाला ज्यानं वाचवलं तोच आहे हा. सगळं माहीत असूनही ते बाळाला स्वतःचंच समजत होते.

अन त्यात खोट नव्हती. आणि मग त्या घातक दिवशी तो आला' 'तुम्हाला माहीत होतं?'

'होतं आणि नव्हतंही. कारण मी येतोय, तुला उचलून नेण्यासाठी येतोय, अशा प्रकारचे त्याचे निरोप आधी अनेकदा आलेले होते. पण तो आलेला नव्हता. त्या दिवशी तो खरेच आला. आणि तुझ्या हातून मेला.'

'तसं झालं नसतं तर?'

'काहीही होऊ शकत होतं. तो जीवावर उदार होऊन आलेला होता असं माझ्या मनात येतं. त्यामुळं माझं मन कधी कधी व्याकूळ होतं. पण विचार करते तेव्हा वाटत, आमच्या नात्याला काहीच भवितव्य उरलेलं नव्हतं. त्या दिवशी तो काहीही करू शकत होता. एडक्यांना तर त्याने मारलंच असतं. काहीही अपराध नसताना त्यांचा बळी गेला असता. आणखी जो जो कोणी आडवा आला असता त्याचा बळी गेला असता. फार मोठं हत्याकांड रोखलं गेलं तुझ्यामुळं त्यादिवशी. मोठा अनर्थ झाला असता. अन नंतर त्याच्या-माझ्या नात्याला कोणतं नाव उरलं असतं? जगण्याचं असंच असतं रे श्रीपती, एखाद्या क्षणी काही असं निसटून जातं की काही केल्या ते पुन्हा जोडता येत नाही. तरीही सहस्त्रसेनासारखी उत्कट माणसं या दुनियेत असतात, जी ते जोडायचा प्राणांतिक प्रयत्न करत असतात.'

'त्याच्याविषयी अजूनही मऊ जागा आहे तुमच्या मनात. म्हणजे

माझा किती तिरस्कार वाटत असेल तुम्हाला. आणि तरीही तुम्ही-'

'आपल्या हातात नसतंच रे काही. आपल्याला वाटतं, आपण यंव

ठरवतो अन त्यंव करतो. पण आपण कोणत्या तरी न दिसणाऱ्या शक्तीच्या हातचं खेळणं असतो फक्त. खोटं कशाला सांगू? त्याच्याविषयी मऊ कोपरा उरलेला आहेच मनात. माझ्यासाठीच मेला ना तो! पण जे झालं ते माझ्यामुळं झालं असं जास्त वाटतं. मुळात मी त्याच्या प्रेमात पडले नसते तर हे काहीच झालं नसतं. पण अशा जर-तरच्या गोष्टींना काहीच अर्थ नसतो. आपल्या इच्छेनं काहीही घडत नाही. घडण्यावर आपली सत्ता नसतेच अजिबात. अन तुझ्याविषयी तिरस्कार? अजिबात नाही. तसं असतं तर मी तुला इतकं जवळ कसं येऊ दिलं असतं? तुला काहीच माहीत नव्हतं. तुझा काहीच अपराध नव्हता. कर्तव्य म्हणून आणि त्याच्यापेक्षाही स्वतःचा जीव वाचविण्यासाठी तू त्याला मारलंस. तुझ्या हातून त्याचं मरण सटवीनं लिहिलेलं होतं असं म्हणायचं. अर्थात हे मी आत्ता म्हणतेय. त्यावेळी मी भांबावून गेलेली होते. अनेक उलटसुलट भावना मनात होत्या. त्यात सहस्त्रसेनासारख्या माणसाकडून शस्त्र हिसकावून त्याला मारणारा माणूस आहे तरी कसा, ही कदाचित विकृत अशी भावना सुद्धा होती. म्हणून मी सरस्वतीकरवी तुला बोलावून बघून घेतलं होतं, हे तुला आठवत असेल. तू स्वतःला बिलकूल अपराधी मानू नकोस. मी रानातल्या वाघांचं एकदा तुला सांगितलंय. वाघ असेल किंवा सिंह. फरक काही नाही. मी आधी म्हणाले तसं, बाहेरचा वाघ जेव्हा स्वामित्वाची लढाई करण्यासाठी रानाच्या एखाद्या पट्ट्यात येतो, तेव्हा वाघिणी आपल्या नराच्या बाजूने लढतात, प्रतिकार करतात. तो काहीसा प्रतिकात्मक असतो. पण असतो. पण या नरांच्या युद्धात त्यांचा नर पराभूत झाला तर त्या नव्या जेत्या नराच स्वामित्व मान्य करतात. माणूस हा माणूस असल्यान जरा वेगळा असला तरी मुळात फार फरक नाहीय. इथं मी सहस्त्रसेनाची वाघीण नव्हते. किंवा काही अंशी होते, असं म्हणू. पण तू काही मला मिळविण्यासाठी त्याच्याशी लढला नाहीस. मग मी तुझा तिरस्कार कशासाठी करू?'

'तरीही माझ्या हातून त्याचा मृत्यू झाला, हे कुठं तरी असेलच मनात.'

'काळ आणि आपलं जगणं, एकमेकांविषयीची वाढती समज पुष्कळ

गोष्टी बदलून टाकतात श्रीपती.'

''काय समजत नाही.'

'न समजू देत. पण आयुष्यात अनेकदा अनेक गोष्टींवर झाकणं घालून

जगावं लागतं माणसांना, हे तर तू मान्य करशील.'

'पण झाकणाखाली असतंच ना ते!' 'का रे? मत्सर वाटतो तुला? अरे तो मेलाय.' 'अन माझ्या हातून मेलाय.'

'मत्सर वाटतो? माझ्या प्रेमात पडला आहेस की काय?' बाई

खळखळून हसली.

'प्रेम नाही. तुमच्या दुःखाला कारण झालो म्हणून दुःख होतंय.'

'नको करूस. मी त्या दुःखाच्या कैक पल्याड पोहोचले आहे. आणि हे असं भलतीकडे न्यायचं नाही आपण. नंतरचं तुला जाणून घ्यायचंय ना? तू विचारलेलं. एडके कुठं गेले आणि चंद्रसेनेची अन माझी कशी ओळख?'

'होय.'

'सांगते. असं बघ:सहस्त्रसेन मेला तेव्हा एडके खूप घाबरून गेले. सरदार विद्रुमसेनांचा भाऊ होता तो. अन आपल्या घरात मारला गेला होता. मला म्हणाले, काय करायचं? म्हटलं, सोनाजीरावांना कळवा. ते योग्य ते करतील. आणि तसंच झालं. सोनाजीरावांचा निरोप आला. योग्य ते करण्यात आलेलं आहे. काळजी नसावी. काय झालं असेल; माहीत नाही. कदाचित आपला धाकटा भाऊ विद्रुमसेनांनाही नकोसा झालेला असेल. मी ते सांगू शकत नाही. पण काही दिवसातच सगळी सामसूम झाली. तिथं प्रतिष्ठान मध्ये एडके काय करत होते, हे मला माहीत नव्हतं. ते जाणून घेण्याची उत्सुकता सुद्धा नव्हती. आम्ही नावालाच पती-पत्नी होतो. बाकी आमच्यात काहीच नव्हतं हे सरळच. एक माणूस म्हणून ते माझ्याशी चांगलंच वागत होते. त्यांच्यात न्यून होतं. पण ते त्यांनी माझ्यापासून लपवलेलं नव्हतं. तक्रारीला काहीच जागा नव्हती. सहस्त्रसेन मेला आणि ते अधिक निश्चिंत झाले. शिवाय त्यानंतर तू त्यांचा शरीररक्षक झालास. त्यामुळं अधिकच. या सा-यात मी कुठेही नव्हते अन मला त्याच्याशी कर्तव्य सुद्धा नव्हतं. पण एके दिवशी लाल रुमालाखाली झाकलेलं एक तबक घेऊन एक माणूस आला. म्हणाला, हे मानकरी-मालकांना द्यायचं आहे. थेट त्यांच्या हाती द्यावं, असं मला सांगण्यात आलेलं आहे. तर, एडके तेव्हा वाड्यात नव्हते. सरस्वती त्या माणसाला म्हणाली, मालक नाहीत आता इथं. पण मालकीण आहेत. त्यांना दिलं तर चालेल? थोडा वेळ तो दुरध्यात पडला. मग म्हणाला, चालेल. पण त्यांना ते मानकरी यांना तातडीनं द्यायला सांगा. यात आहे काय ते मला माहीत नाही. फार जोखमीच आणि महत्वाच असेल हे. सरस्वतीनं विचारलं, कोणाकडून आलंय? तर म्हणाला, ते मी सांगू शकत नाही. मानकरी-मालकांच्या लक्षात ते येईल असं मला सांगण्यात आलेलं आहे. इतक्या सगळ्यानंतर मला राहावलं नाही. मी ते उघडलं. त्यात संदेश होता- 'आपण माझ्याकडे येता. मला छान वाटतं. पण माझी कांक्षा बाळगावी अशी आपली स्थिती नाहीय, हे माझ्या कधीचंच लक्षात आलंय. तरीही आपण का येत असता याचं कुतूहल होतं. मग लक्षात आलं की माझ्याकडे येत असलेल्या काही किन्नर जातीच्या लोकांनी आपलं लक्ष वेधून घेतलेलं आहे. मी चौकशी केलीय. आपण चांगल्या प्रसिद्ध घराण्यातील आहात. म्हणून आपणास सांगते. हे लोक अल्लाउद्दिन खिलजीचे हस्तक आहेत. मला त्यांच्यापासून धोका नाहीय. पण एरवी ते धोकादायक आहेत. सध्या इथल्या राज्यव्यवस्थेत जे डाव-प्रतिडाव चालू आहेत, त्याच्याशी त्यांचा संबंध आहे. इथले सगळे व्यवहार त्या आणि तशा अनेक लोकांनी पोखरलेले आहेत. यात आपण हकनाक बळी जावू नये. या लोकांपासून दूर राहावे. आपल्याविषयी वाटणा-या आस्थेपोटी मी हे आपणास कळवते आहे. याची कुठे वाच्यता आपण करणार नाही अशी खात्री वाटते - चंद्रसेना.'।

मला धक्का नाही बसला वाचून. एडकेंची स्थिती मला माहीत होती. मला काळजी वाटली. दुःख झालं. अन्यायच झालेला असतो रे अशा माणसांवर. त्यांच्यासाठी जे स्वाभाविक असतं, ते इतरांना अस्वाभाविक वाटतं. आपण असे असे आहोत याविषयी वाटणा-या लज्जेच्या दडपणाखाली सतत जगावं लागतं. स्वाभाविक ओढ दाबून टाकत जगावं लागतं. मी मला मिळालेल्या माहितीच्या उजेडात काहीही करू शकत नव्हते. त्यांच्यासाठीचा निरोप त्यांना मिळणं आवश्यक होतं. मला का आणि कसं वाटलं, कोण जाणे- मी तसंच एक तबक आणि तसाच लाल रुमाल सरस्वतीकरवी मागवून घेतला. अन

त्यात ते त्यांना तिच्याच करवी दिलं. त्याचं काय करायचं ते त्यांचं त्यांनी ठरवावं. मी मला काही माहीत आहे, असं दाखवलं नाही. त्यांच्या वागण्यातही काही बदल मला दिसला नाही. एकदा म्हणाले, इथली परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चाललीय. आपल्याला कदाचित इथून बाहेर जावं लागेल. म्हटलं, तुम्हाला योग्य वाटेल तसं करा. म्हणाले, वांबोरी नावाचं आपल्या देशमुखीचं एक गाव आहे. इथून पुरेसं दूर आणि सुरक्षित आहे. तिथं आपला मोठा वाडा आहे. तिकडे जावू. म्हटलं, ठीक. बाकी खास असं बोलणं नाही झालं. ही चंद्रसेना कोण हे अर्थातच मला माहीत नव्हतं. विचारणार कोणाला? अर्थात सरस्वतीला. आणखी कोणाला? माहिती काढून म्हणाली, ही या शहरातली सर्वात प्रसिद्ध गणिका आहे. त्या पत्रातल्या माहितीशी त्याचा मेळ बसला. मला फार आदर वाटला त्या स्त्रीबद्दल. इतकी हिंमत आणि इतकं चांगुलपण एका गणिकेच्या ठायी असण्याची मी कल्पनाच करू शकत नव्हते ना! पण बाकी थांबलं तिथंच सगळं. करण्यासारखं नव्हतंच आणखी काही. मला एडकेंबद्दल काळजी वाटे. आणि त्यात मी अधिक काहीच करू शकत नव्हते. माझ्याशी ते बोलले असते तर कदाचित मीही बोलले असते त्यांच्याशी.पण स्वतः होऊन मी काय करू शकत होते? अन अखेर खिलजी आल्याची भूमका उठली. लोक पळू लागले. त्यात एडके गायब झाले. मी वाट पाहिली. चौकशा केल्या. कुठेच थांग लागेना. मग तुला बोलावलं. तिच्याकडं जायला सांगितलं. लिहिलं: मी एडके यांची पत्नी. तुम्ही त्यांना पाठविलेलं पत्र मी वाचलेलं आहे. तुमचा भलेपणा माझ्यापर्यंत पोहोचलेला आहे. मला आपली दया आणि अनुकंपा नकोय. मी स्वतःला दुर्देवी मानत नाही. तुम्ही मला माझ्या बहिणीसारख्या आहात. मला फक्त ते कुठं गेलेत हे शक्य असल्यास सांगा. त्यामुळे मला माझ्या भवितव्यासंबंधी निर्णय घेता येईल. तिनं ते सांगितलं. एडके त्या किन्नर लोकांसोबत निघून गेलेत. मी त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. मी

अपेशी झाले. तू हिमतीची आहेस. निर्णय घे.

'मी शांतपणे विचार केला. एडकेंचं काही चुकलं असं मला वाटत नाही. तो मुळातच बिचारा किन्नर जीव. मोठ्या मुश्किलीनं तो तसा नसल्याची भूमिका पार पाडत जगत होता. त्यातून सुटला बिचारा. मला एडकेंचा राग नाही आला. पण आता मला निर्णय घेणं भाग होतं. ते मी एकेक करत नीट घेतले. तुला सांगितलं. सोनाजीरावांना कळवलं. मी वांबोरीला जातेय असं सांगितलं. जाऊ का, असं नाही विचारलं. जातेय म्हणून सांगितलं. असं काहीतरी होईल याची धास्ती बाळगून जगत होताच तो चतुर म्हातारा. म्हणाला, 'मूठ झाकलेली ठेवशील तर फार उपकार होतील.' म्हटलं, 'तुमच्यावर उपकार करण्यासाठीच जन्म आहे माझा. मी अवश्य ते करीन. अन खरेच मी ते करीन. पण आता हे देवळाचं इथं निघालंय. उद्या हा तपस्या करणारा किन्नर इथं त्याच्या साथीदारांसोबत नाचत नाचत स्त्रीवेशात दाखल झाला तर मी हे देऊळ आणि पूजा-अर्चा यांचं काय करू? मूठ झाकलेली कशी ठेवू? मी इथं कशी राहू; तू मला सांग.'

___ 'काय सांगू? नुसतं ऐकून सुद्धा दमलोय मी. थकलंय मन माझं.

तुम्ही तर हे सगळं जगलात, जगत आहात.'

'मला तुझी सहानुभूती, दया नकोय.' 'मी ते करणार नाही. माझी तशी पात्रता नाही, इतकं मला समजतं.' 'मला तसं नाही म्हणायचंय.' 'मी उद्या नेहमीच्या वेळी भेटायला

येतो. आत्ता मी खूप थकलोय.'

9

इतक्या बारक्या वयात किती आयुष्य जगलीय ही बाई, श्रीपतीला वाटतं, आपल्यासारखं सरळसोट आयुष्य जगलेला माणूस याची कल्पना सुद्धा करू शकत नाही. पण ही कुठंच अडकून पडलेली नाहीय. ही फार हिमतीने आयुष्यातल्या प्रश्नांना सामोरी गेलीय. त्या तुलनेत हा देवळाचा प्रश्न इतका का अवघड आहे? तो निकालात काढता आला तर? हे देऊळ बांधलंच जाणार नसेल तर? काहीही करून ते थांबवता आलं तर? देऊळ बांधलं जाणं मूर्खपणाचं आहे हे निर्विवाद. अरे! आपण या दिशेने कधी विचारच केलेला नाहीय. कारण आपल्याला पुरेशी माहितीच नव्हती. श्रीपतीला वाटतं, समस्येचं मूळ निकाली काढण्याचं आधी आपल्या डोक्यात कसं आलं नाही? हे सगळं सुरू कुठून झालं? कदाचित उमाजीपासून. त्यालाच विचारत असतील ना डोंगरगणच्या शिवारात काम करत असणारे लोक. काम करताना किंवा इतर वेळी सुद्धा. एडके मानकऱ्यांना त्यातल्या त्यात जवळून ओळखणारा अन माहिती घेण्यासाठी उपलब्ध तोच होता. आपल्याला किंवा बाईला कोण कसं विचारणार? अन कुतूहल तर असेलच सगळयांना. आणि उमाजी जे म्हणाला असेल ते मनापासून. त्यात त्याची गैरभावना थोडीच असेल? म्हणून तर अंदाज येऊनही आपण त्याच्याकडं दुर्लक्ष केलं. माहितीचा एखादा असा खिळा लोकांच्या डोक्यात बसला की सोयीचंच असतं, असं आपल्यालाही वाटलं. बाईला हे माहीत नाही. आपणही तिला सांगितलेलं नाहीय. पण मानकरी यांचं शारीर वेगळेपण आपल्यालाही माहीत नव्हतं. असं कधी जाणवलंच नाही. लक्षातच आलं नाही. श्रीपतीला दासोभटाची आठवण होते. तो वेळोवेळी जे सांगत होता आणि सांगायचं टाळत होता ते हेच. अंगलक्षणहोराशास्त्र. एक शब्द म्हणून एकत्र उच्चार करायला सुद्धा कठीण. बाईच बरोबर आहे. जो त्याच्या किन्नर जातीच्या लोकांसोबत निघून गेलेला आहे, तो तप करायला गेलेला आहे असं समजणं, त्याचं देऊळ बांधणं हास्यास्पद आहे. मानकरी परत येणार नाहीत. बाई तसं म्हणत असली तरी. किंवा तिलाही खात्री असेल त्याची. पण

जे चाललं आहे, ते सहन करणं तिला शक्य नसेल हे समजण्यासारखं आहे. श्रीपतीला वाटतं, आपल्याला प्रश्नाचं मूळ माहीत आहे, त्याची अंगे आणि उपांगे माहीत आहेत. आपल्याला उत्तर सापडलंच पाहिजे.

दुसऱ्या दिवशी नेहमीच्या वेळी श्रीपती वाड्यावर गेला. म्हणाला,

'आपण हे देऊळ बांधणं मुळातून थांबवलं तर?'

'कसं?' 'उदगीरहून थोरले मानकरी यांचं तसं पत्र आणलं तर?'

'अरे व्वा! तुझ्या हे कसं डोक्यात आलं? मला कसं नाही सुचलं? केवढा बुद्धिमान आहेस श्रीपती! सोनाजीराव आनंदाने देतील आपल्याला पाहिजे तसं पत्र. त्यांची मूठ झाकलेली ठेवतोय आपण. पण हे मला का सुचलं नाही?'

'चिंभावून जातं मन.' 'म्हणजे काय?'

'भांबावून जातं. काहीच सुचत नाही, असं होतं. तुमचं तसं झालं. मी त्याच्या बाहेर. मला सुचलं. त्यात काय विशेष नाही. माझा एक मित्र आहे. आपल्यासोबत प्रतिष्ठानहून मी आणलेला एक घोडेस्वार. उमाजी त्याचं नाव. मानकरी तप करायला गेले ही बातमी त्यानंच सोडली असेल असा माझा कयास आहे. मी त्याच्याशी बोलतो. त्याला आपण पाठवू. एक किंवा दोन महिन्यांनी तो परत येईल. आणि पत्र थेट पाटलालाच देईल. की बाबा, असं असं माझ्या ऐकण्यात आलंय. ते करू नका. माझा मुलगा ईश्वराशी लळा लागल्यानं दूर हिमालयात गेलाय. तो संसाराच्या पार गेलाय. तो ईश्वराच्या पायांशी बसलाय. देऊळ बांधून तुम्ही त्याला ईश्वर बनवू नका. त्याच्या तपश्चर्येत त्यामुळे बाधा येईल. माझी सून तिथं आहे. तिलाच त्याच्या ठिकाणी समजा. आणि सुखाने जगा. म्हणजे तुमच्या भाषेत तयार करा ते.'

'काही आवश्यकता नाही. तुझी भाषा पुरेशी चांगली आणि चिरेबंद

आहे.'

'ह्या उमाजीने थोरल्या मालकांकडे गेलंच पाहिजे असं नाही. तो इथून जाईल अन महिन्या-दोन महिन्यात परत येऊन पाटलाला पत्र देईल. सही

आणि शिक्का आपणच तयार करायचा.'

'भरपूर विचार केलेला आहेस तू. पण तो सोनाजीरावांकडे गेला तरी

अडचण येणार नाही. ते आपल्याला हवं ते करतील.'

'ती जोखीम तरी का घ्यायची आपण? त्याची गरज नाही. उद्या

त्यांना कळलं तरी ते वेगळं थोडंच बोलणार?'

'छान, छान. तू तर चांगलाच मुरब्बी राजकारणी झालायस श्रीपती.'

'आणखी काही सुचतं तुम्हाला याच्यात? कुठंच काही छिद्र आपल्या

योजनेत राहायला नको म्हणून विचारतो.'

'तुझा माणूस विश्वासू आहे?'

'आपल्यासाठी तो काहीही करील, याची खात्री आहे मला. अन त्यालाही हे सगळं काय आहे, ते मी सांगणार नाही. तो पत्र सोबत घेऊन जाईल आणि दोनेक महिन्यांनी परत येऊन पाटलाला पत्र देईल. सगळं झाल्यावर फार तर मी त्याला सांगेन, की बाबा, आपल्याला हे देऊळ बांधणं बंद करायचं होतं, म्हणून आपण हा उद्योग केलाय. तेही त्यानं

विचारलं तर. तो काहीही विचारणारच नाही मुळात. उद्या समजा तो काही बोलू लागतोय असं वाटलं तर मी त्याला न बोलणं त्याच्या हिताचं आहे, याची समज देईन. नाहीच ऐकलं तर त्याची जी व्यवस्था करावी लागेल ती करीन. अर्थात तशी वेळ येणारच नाही. तो मला चांगला ओळखतो.'

'कर, कर तुझ्या डोक्यात आहे तसं. पण श्रीपती या सगळ्यात तू माझ्यासोबत पळून जाण्याची किंवा मला पळवून नेण्याची संधी दवडतो

आहेस असं नाही वाटत तुला?' बाई खट्याळ हसत म्हणाली.

'बिलकूल नाही. मी माझा आंदोर तोडून घेण्याच्या शक्यतेपासून

वाचवतोय स्वतःला.' श्रीपती म्हणाला आणि गोड हसला.

10

'अहो श्रीपतीजी, एक नवीच समस्या उभी राहिलीय हो.' तिडके पाटील श्रीपतीला म्हणाले.

'का हो,काय झालंय?' 'थोरल्या देशमुखांचा संदेश आलाय. आपल्यासाठी ती राजाज्ञाच आहे.'

'काय?' 'देऊळ बांधण्याचा विचार करू नका, असं म्हणताहेत.' 'अरे बाप रे!'

'अहो, हो ना! लोक इतके उत्साहात आहेत. काय करायचं आता? आपल्याकडं उमाजी रहाणे म्हणून एकजण आहेत. ते उदगीरला गेले होते.

त्यांच्यासोबत संदेश आलाय. त्यांना देशमुख म्हणाले, हे पाटलांना द्या. मी वाचलंय. काय करायचं ते समजत नाही. वाड्यावर देशमुखबाईंना सांगितलं पाहिजे ना? तुम्हाला काय वाटतं?'

तिडके-पाटील ज्ञातीने ब्राह्मण. त्यांना देशमुखबाईंचा हा गावठी सचिव बिलकूल रुचत नाहीय. देशमुखबाई आणि आपण यात असा कोणी मध्यस्थ कारभारी असणे त्यांना मनातून रुचत नाही. त्यामुळं पाटीलकीच्या आपल्या पदाचा अवमान होतो अशी त्यांची प्रांजळ धारणा. ते पाटील आहेत तर कारभारी असणं हा त्यांचा पदसिद्ध अधिकारच आहे अशी त्यांची धारणा फार चुकीची म्हणता यावयाची नाही. रीत तशीच असते. म्हणून यात ह्या तगड्या गावठी बंब्याचं काय काम, असं त्यांना अंतःकरणापासून वाटतं. पण देशमुखीणीनं आल्यापासून हा मध्ये असेल

याची जाणीव करून दिलेली.त्यामुळं उपाय नसतो वेगळा त्यांच्या हाती. ह्या गावढ्या पाठारे मनुष्यास उपाय नसल्याने सांभाळून घ्यावं लागतं त्यांना.

मनाचा चेंदामेंदा होतो, तरी सांभाळावं लागतं सगळं.

'काहीही असलं तरी आपल्याला हे बाईंना सांगावं तर लागेलच.'

श्रीपती.

'तेच म्हणतो मी.' "सांगतो मी त्यांना.'

तेच ते. हा सांगणार. मग आपल्याला परवानगी. अन हल्ली याच्याशी पडदाही पाळत नाहीत म्हणे. सरळ शेजारी बसून गुजगोष्टी करतात. याच्याशी संगनमत करून देशमुखीणीनं नवऱ्याचा काटा सुद्धा काढला असेल ; सांगता येत नाही. तो थुलथुलीत नवरा हिला आवडत नसेल बहुतेक. किंवा नक्कीच. बाई फार सुंदर आहे म्हणतात. हाही चांगला गोमटा, तगडा आणि सणसणीत

आहे. तिला आवडलेला दिसतो. असं तिडके-पाटील स्वतःशी.

'कधी?'

'आजच जमवूया. उशीर कशाला? आत्ता लगेचही जावू शकतो आपण.पण बाईंनी समजा नकार दिला लगेच भेटायला तर अपमान होऊ शकतो तुमचा. मला ते आवडणार नाही. म्हणून आधी मी कानावर घालतो. कसं?'

ठीक आहे बाबा. फार काळजी घेतोस माझ्या मानापमानाची, पाटलांच्या मनात येतं. पण आधीचे अनुभव आठवतात. अन त्यांना ते पटतं. किमान दोन तरी वेळा असं झालेलं आहे. सुरुवातीच्या काळात. उत्साहात वाड्यावर गेले. भेट मागितली. कामात आहेत, सांगण्यात आलं. श्रीपतीजींना विचारून या, असा सल्ला देण्यात आला. आणखी एकदाही असाच अनुभव. त्यानंतर पाटलांनी धडा घेतला. भेटायचे झाल्यास या पाठारे बंब्यास विचारणे.

भेट झाली. संदेश वाचण्यासाठी देण्यात आला. पडद्याआडून देशमुखीण खणखणीत स्वरात म्हणाल्या, 'माझ्या श्वशुरांची इच्छा ही

माझ्यासाठी शिरसावंद्य आज्ञा आहे. योग्य ती कार्यवाही करा.'

'अवश्य करतो. नाहीतरी मला स्वतःला हे अगदी सुरुवातीपासून मान्यच नव्हतं. जिवंत माणसाचं देऊळ बांधतात का कधी? पण कोणाला साक्षात्कार होतात, कोणाला स्वप्नं पडतात, कोणाच्या अंगात येतं; सगळ्या भाकड गोष्टी. तरीही गाव आहे. लोकभावना सांभाळाव्या लागतात. म्हणून जरा गप्प राहिलो'

'-या आता. लोकांना समजावून सांगा.'

"होय बाईसाहेब.' म्हणत तटकन उठले पाटील. पडद्याला मुजरा

केला आणि बाहेर.

हे असं कायम. रेंगाळून देणे, विचारविनिमय करणे नाही. त्यासाठी पाटील नाही. एका ज्ञातीचे असूनही नाही. त्यासाठी हा पाठारे बंब्या. आपल्याशी नम्रतेनंच वागतो तो. पण त्याच्या नम्रतेत सुद्धा एक दरारा आहे. तो नुसता समोर दिसला तरी आपण अस्वस्थ होतो. अन या देशमुखीणीला मात्र तोच आवडतो. उगीच का बसते त्याला शेजारी घेऊन? शिवाय असं कुठं बोलायची सुद्धा चोरी. आपली पाटीलकी, आपलं वतन ; सगळं झटक्यात काढून घेऊ शकते ती. अन ते सगळं या श्रीपतीला देऊ शकते. आणखी त्यांचे

तिकडून आलेले घोडेस्वार, तेही इथं रहिवसलेले आहेतच. त्यामुळं झुकून नम्र होऊन, तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करणं अधिक उचित आणि लाभप्रद.

श्रीपतीशी सुद्धा नम्र गोष्टी करत पाटील प्रस्थान करते झाले.

11

'तर मग तू आता मला इथून बाहेर पडून देणार नाहीयेस.' 'म्हणजे काय?' 'अरे, मी शोधला होता मार्ग. तू मोडता घातलास.' 'असं कसं बोलता?'

'आता हे वांबोरी गाव, हा वाडा हेच माझं आयुष्य असणार ना! त्यातल्या त्यात तू रोज येणार, भेटणार, बोलणार; एवढीच रोजच्या दिवसातील सुंदर गोष्ट. अरे, चांगलं भटकलो असतो दुनियाभर. तुला माहीत नाही, मी फक्त मेण्यात बसणारी बाई नव्हे. मी शस्त्रविद्या उत्तम जाणते. घोडेस्वारी करू शकते. काय काय ठरवलं होतं मी! खूप स्वप्नं पाहिली होती. पुरुषाचा पोशाख करायचा. दोन मित्रांसारखं कुठंही भटकायचं. निवाऱ्याला एकत्रच उतरायचं. दोघंच असलो की मी पुरुषाचा वेष उतरवून ठेवणार. आपण छान एकमेकांशी गप्पा करायच्या. सहवासाने आपण एकमेकांचे होऊन गेलोच असतो. हिमालयात व्यास नदीच्या उगमापासून जवळ एका ठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत, असं मी ऐकलेलं आहे. तिथं एक झोपडी बांधून राहायचं. फक्त तू आणि मी. तू शिकार करून आणायची अन मी ती तुझ्यासाठी शिजवायची. तिथल्या चांदण्यात फिरायला जायचं आणि भुसभुशीत बर्फच्या उबदार गारठ्यात फतकल मारून बसायचं. मग तू म्हणशील, की अगं तुला पडसं होईल. मग मी हसून म्हणेन की, होऊदे ना. तुलाही देईन मी ते थोडं-'

'काय समजानी झालंय.'

'सगळं समजतं तुला. बोलत नाहीस फक्त. काय रे यायचं नव्हतं का

तुला माझ्यासोबत? मी सांगितल्या त्या गोष्टी नव्हत्या येत तुझ्या मनात?'

"त्या नाही तशा. तसं घडू नये म्हणूनच मी-'

"स्वतःला खच्ची करायला निघाला होतास. फार ओढाळ असतं ना रे माणसाचं मन. किती कठीण असतं एकाच वेळी माणूस असणं आणि मुळातून प्राणी असणं! तू कसा सावरतोस तोल?'

'समजत नाही.'

'हे बरं आहे तुझं. अधिक बोलायची वेळ आली की समजत नाही

म्हणून मोकळा.'

'तसंच असतं ना ते.'

'तुला सांगते, कसं असतं ते. आपले पढिक ज्ञानाची परंपरा असलेले लोक जे असतात ना, त्या लोकांना खूप शब्द माहीत असतात. त्यांना जे जे वाटतं ते ते जवळपास सगळं त्यांना शब्दात सांगता येतं. स्पष्ट नसेल तर आडवळणानं सांगता येतं. थट्टामस्करीचा पवित्रा घेऊन सांगता येतं.सरळ, वाकड्या, तिरक्या अशा कोणत्या ना कोणत्या मार्गाने ते आपल्या हातांशी असलेला शब्दांचा रथ नेऊ शकतात. बाकीचे आपले साधे लोक.श्रवणभक्ती करण्याचीच फक्त संधी असलेले. नेहमीच्या जगण्यासाठी त्यांना फार

शब्दांची गरज नसते. जे असतात तेवढ्यावर त्यांचं उत्तम भागतं. त्याच्या पल्याड ज्या भावना असतात, त्या ते शब्दात व्यक्तच करत नाहीत. पण त्या त्यांनाही असतात.'

'इतकं तर समजतं तर मग कशाला-'

'समजतं म्हणजे तुझ्यामुळं समजायला लागलंय. एरवी हे माझ्या डोक्यातच आलं नसतं. पण श्रीपती, मी असंच कायम तुझ्यावर अवलंबून राहायचं का?

'कसं काय?' 'अरे, मी कायम स्वतंत्र जगलेली आहे. मी कधीही कोणावरही अवलंबून राहिलेली नाहीय. सहस्रसेनावर मी अवलंबून राहिले नाही. मी माझा रस्ता शोधला. एडके यांच्यावर सुद्धा मी अवलंबून नव्हते कधीच. मी कायम माझे निर्णय स्वतः घेतले. पण आता या देवळाच्या प्रश्नात तू सांगितलंस. अन ते इतकं पूर्ण होतं की मला काहीच करावं लागलं नाही. तुझ्यावर अवलंबून राहिले अन ते झालं.'

'तुम्ही कधीही कोणावरही अवलंबून नव्हता. कधीही असणार नाही

आहात.'

'पण तू लावू शकतोस ना मला तशी सवय.' 'ती लागणार नाही याची मी काळजी घेईन.' 'म्हणजे पुन्हा तेच. काळजी तू घेणार. मी अवलंबून.'

'तुम्ही मला आवडता. मी माझी पायरी कधीही सोडणार नाही.

यापेक्षा मला काहीही म्हणायचं नाहीय.'

'पण मला काही म्हणायचं असेल तर?' 'तुम्ही ते म्हणायचं नाही.' 'का?' 'ती मर्यादा तुम्ही धरली तरच मी माझ्या पायरीवर असण्याची शोभा.' 'हे असं तुला कुठून कळतं श्रीपती?' 'माहीत नाही.' 'काय समजानी झालंय, असं नाही म्हणालास.' 'समजतं. माहीत नाही.' 'किती प्रेम करतोस रे बायकोवर!' 'माहीत नाही.' 'चांगली एखाद्या बळकट मेंढीसारखी सुंदर आहे तुझी बायको.' 'माहीत नाही.'

'श्रीपती, असा कधी प्रसंग आलाय का तुझ्या आयुष्यात- की समजा तू एखाद्या टोकावर, जगण्या-मरण्याच्या सीमेवर आहेस, अतोनात वेदना सोसतो आहेस, अन तरीही तू स्वतःच्या इच्छेच्या बळकट ताकदीवर जिवंत आहेस अन त्या क्षणी तुला असं वाटतंय की तू मरतो आहेस अन तरीही तू खूप आनंदात आहेस. आणि अखेर जिंकला आहेस. काय असतं असं आपल्या आत? जे प्राणांतिक ताकदीनं आपल्या अटींवर सुद्धा आपल्याला जिवंत ठेवतं? इच्छाशक्तीचं असं कोणतं रूप असतं ते? आपल्या इच्छा, भावना, वासना यांचं दमन करायचं अन तरी ते आनंदमय करायचं, असं कसं करता येतं?'

'किती अवघड बोलता? मला खरंच समजत नाही. दासोभट अशा प्रश्नांची उत्तरं देऊ शकतो. असे प्रश्न तुम्हाला किंवा त्याच्यासारख्या माणसाला पडू शकतात. इतक्या किचकट गोष्टींचा मी विचारही करू शकत नाही.'

'दासोभट म्हणजे तुझा तो किरवंत मित्र. पण तो आता नाहीय. अन त्याला मी हे विचारणार सुद्धा नाही. हे माझे प्रश्न आहेत. अन ते तुझ्या माझ्या संबंधातले आहेत.'

'मला खरंच समजत नाही. पण तुम्ही म्हणता ते मला समजत असेल तर असा एक अनुभव मला आहे. गावी डोंगरकिनीला आमच्याकडं नागपंचमीला झोंब्या होत असत. म्हणजे ज्याला तुम्ही मल्लयुद्ध म्हणता ते. आसपासच्या चारसहा गावातली माणसं एकत्र जमत. लहान-मोठे, अगदी

वयस्क लोक सुद्धा एकमेकांशी लढत असत. तसा रिवाज आहे. बाकी सगळं खेळीमेळीत.पण तरुण पोरात इरीशिरी फार असे. आणि प्रत्येक गावाचा मान सुद्धा अशा तरुण मुलांच्या झोंब्यात पणाला लागत असे. अशात एके वर्षी माझी झोंबी शेजारच्या गावातल्या एका धनगराच्या पोराशी लावली गेली. ते पोरगं माझ्यापेक्षा वयानं थोडंफार लहानच पण फार चपळ आणि बिजलीच्या वेगानं लढणारं होतं. मला ते माहीत होतं. पण माझ्या अंगात जास्त ताकद होती. मी त्याची ती बिजली मोडून काढू शकेन याची मला आणि माझ्या गावातल्या सगळ्यांना खात्री होती. माझ्यासमोर तो फारच कोवळा आणि किरकोळ दिसत होता. पण लढतीला सुरुवात झाली अन अगदी थोड्याच वेळात त्यानं खरोखरीच बिजलीच्या चपळतेनं माझं अवजड आणि ताकदवान धूड उचलून मला आभाळ दाखवलं. हे इतकं झटक्यात झालं की मला काही कळलंच नाही. टाळ्यांचा कडकडाट झाला. आरडाओरडा अन जल्लोष. मी अत्यंत दुःखी आणि हताश होतो. त्या क्षणी माझ्या गावातले कोणीही माझ्यासोबत नव्हते. माझ्या वडिलांनी सुद्धा मला डागण्या देण्यातून सोडलं नाही. आरे, यावढा बैलासारकं खातो, मोकार मेंढीचं दूद पेतो. एडक्यासारका माजलाय नुसता. ते एवढूसं प्वॉर. त्यांनी तुला चीत मारलं. हॅत तुह्याय्येऽऽ तुहेऽऽ ते म्हणाले. मी तिथून बाहेर पडलो. मला फार एकटं वाटत होतं. कोणीही माझ्यासोबत माझ्या बाजूनं नव्हतं. मी सगळ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरवलं होतं. मी माझ्यापेक्षा कमी ताकदीच्या पोराशी हरलो होतो. मी माझ्या गावाला अपमानित केलं होतं. मी अतोनात लजित झालो होतो.

मी मनानं गोठून गेलो होतो. यानंतर माझी त्या मुलाशी एक वर्षाने गाठ पडणार होती.ती नक्कीच पडणार होती. लोक त्या अपेक्षेने विचार करणार हे नक्की होतं. मी नकार दिला, माघार घेतली तर माझी तर नाचक्की होणारच होती पण गावाचीही नाचक्की होणार होती. मी केवळ ती झोंबी डोळ्यासमोर ठेवून तयारी करत राहिलो होतो. मुळात माझ्या अंगी ताकद होती. पण ती आणखी वाढावी म्हणून मी खूप तयारी करत होतो. मला आणखी काहीही दिसत नव्हतं.जोर, बैठका, झाडाला लटकवलेला नाडा चढून जाणं आणि उतरणं, मल्लखांब करणं, गदा फिरवणं, दगडांचे गोळे उचलणं, एकाच वेळी लागोपाठ दहा-दहा मुलांशी लढून दम जिरवणं; मला आणखी काही दिसतच नव्हतं. तो पराभव माझ्या जिव्हारी लागला होता. मी अगदी खार खाऊन होतो त्याच्यावर-'

'-खार कशासाठी खायचा?'

'तसं म्हणण्याची पद्धत आहे. चिडणं, रागावणं, त्वेषानं काही वाटणं

म्हणजे खार खाणं.'

'बरं, बरं. बोल.'

'पुढच्या वर्षी आमची झोंबी लागली. मी शड्डू ठोकला. त्या आवाजानं तिथल्या हवेत थरकापाचे कंप उसळले. मी ते त्या मुलाच्या डोळ्यात पाहिलं. माझं शरीर पोलादाच्या कांबीसारखं चकाकताना त्यानं पाहिलं. मी शांत दिसत होतो. पण मी त्वेषानं उसळत होतो. ते सारं मी त्या मुलाच्या डोळ्यात पाहिलं. लढताना आत्मविश्वास फार महत्त्वाचा असतो. समोरच्याचा आत्मविश्वास डळमळीत करणं हे पहिलं काम असतं. अन तरीही आपण गाफील राहायचं नसतं. त्याला डळमळीत करून सुद्धा मी बिलकूलही गाफील

नव्हतो. सलामी झाल्यासरशी झटका देऊन मी त्याला खाली खेचलं. अन सणसणीत सवारी भरली. हे म्हणजे वरून दाबणं आणि घोळसत त्याला ढिला करत राहाणं. मी ते सगळं आधीच ठरवलेलं होतं. सापाला शेपटीला धरून आपटलं की त्याचे मणके ढिले होतात. अन नंतर सोडलं की त्याला सहजी हालचाल करता येत नाही व मारणं सोपं होऊन जातं, त्यासारखंच हे असतं. मी त्याला घोळसत होतो आणि ढिला करत होतो. तो कैक चपळ होता. पण माझ्या ताकदीपुढे तो काहीच करू शकत नव्हता. लोक ओरडत होते पण माझं तिकडं कुठंही लक्ष नव्हतं. याच सगळ्या लोकांनी माझी हुर्यो उडवलेली होती. आणि ती वर्षभर माझ्या कानात आणि मनात साचून तिचा पर्वत झालेला होता. मला जिंकायचं होतं. मला निर्णायक जिंकायचं होतं. मला त्याचा चोळामेळा करून त्याची मोळी माझ्या डोक्यावरून खाली सोडायची होती. मी त्याला त्याची सगळी ताकद संपलेल्या मोळीच्या अवस्थेला आणलं आणि ती जाणीव होताच उचलून त्याला डोक्यावर घेतलं.आता गलितगात्र झालेल्या त्याला फक्त खाली सोडणं आणि त्याच्या छातीवर स्वार होणं बाकी होतं. मी निर्णायक विजयाच्या अगदी निकट पोहोचलो होतो. आता त्यात काहीही बदल होण्याची शक्यता नव्हती. पण मी त्याला उचलून डोक्यावर घेतलं त्या क्षणी त्यानं सगळी ताकद एकवटून वरच्यावर विजेच्या वेगानं हवेत पलटी खाल्ली अन माझ्या गळ्यात त्याच्या पायांची आकडी टाकत खाली झोल दिला. मी जमिनीवर पालथा आदळलो. पण माझी मान त्याच्या पायांच्या भक्कम पकडीत अडकली. त्या क्षणी टाळयांचा कडकडाट झालेला मी ऐकला. जिंकण्याच्या ऐन क्षणी मी त्याच्या सापळयात अडकलो.आता त्याला संधी आली होती. माझी मान दाबून माझा श्वास कोंडायचा डाव त्यानं टाकला होता. हातांपेक्षा पायांमध्ये कितीतरी जास्त ताकद असते. तिथले स्नायू मोठे असतात. ती पकड सुटण अशक्यच असत. माझा श्वास कोडला होता. आता मी खाली हात आपटणं आणि आपला पराभव मान्य करण इतकच बाकी होतं. त्यात काहीही बदल होण्याची शक्यता नव्हती. त्याची पकड अत्यंत मजबूत होती. श्वास बंद होऊन मरणं किंवा तसं होण्याआधी हात जमिनीवर आपटून पराभव स्वीकारणं एवढंच माझ्या हाती होतं. त्या क्षणी काही तरी गरम, अत्यंत उष्ण असं काहीतरी माझ्या मनात उगवलं. त्याला काय म्हणायचं, हे मला सांगता येणार नाही. माझा श्वास कोंडला होता आणि ते गरम काहीतरी माझ्या आत उगवलं होतं. मी संपलोय अशा जाणिवेनं कदाचित पळभरासाठी त्याची पकड सैल झाली. त्याच क्षणी मी त्याच्या पकडीतून मोकळा झालो आणि पालथा असलेल्या त्याच्यावर पुन्हा स्वार झालो. पुढचं काहीच कठीण नव्हतं. आम्ही दोघेही थकलेलो होतो. तो नक्कीच माझ्यापेक्षा जास्त थकलेला होता. मी त्याच्या मानेवर डावा कोपरा दाबून उजवा हात त्याच्या पोटाखाली घातला अन त्याला उचलून चित केलं. या विजयापेक्षा मला जास्त आठवते ती त्याच्या मांड्यांची माझ्या मानेवर बसलेली जीवघेणी पकड आणि मरणाच्या वेदना सोसताना माझ्यात उगवलेलं उष्ण इच्छेचं ते द्रव्य.'

'असाधारण. सुंदर.' बाई म्हणाली.

मग बराच वेळ ती निःस्तब्ध बसून राहिली. श्रीपती सुद्धा त्या

अनुभवातून परत प्रवास करताना दमून गप्प झाला.

'मला तुझ्याकडून जे शिकायचंय ते हेच. ही असाधारण इच्छाशक्ती.

मग कोणत्याही प्रकारचं दमन मला आनंदमय करून घेता येईल. आणि मी ते करीन. संयमात दमन असतंच रे. पण ते आनंदमय करता आलं पाहिजे. आपल्या दृढतेचा कोमल प्रकाश आपल्या अंतरंगात पसरवून त्यात जगता आलं पाहिजे. मोह, आसक्ती असं सगळं त्या उजेडात वितळवून टाकता आलं पाहिजे. तुझ्या सोबतीच्या बळावर मी ते नक्कीच करीन. काय समजतंय

ना?'

श्रीपती बराच वेळ काही बोलला नाही. मग म्हणाला, 'काय समजानी झालंय.' आणि गोड मुग्ध हसला.

◆ ◆ ◆

साहेबराव

मलिक अहमद निजाम शहाने इ.स.१४९० मध्ये अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना केली. अहमदनगर शहर त्यानेच वसविले. याचे पूर्वज मूळचे हिंदू ब्राह्मण होते आणि ते मराठवाड्यातील पाथ्री येथे राहणारे होते. याच्या नंतर बुहाण निजामशहा पहिला, हुसेन निजामशहा पहिला असे राज्यकर्ते झाले. त्यांच्या नंतर मुर्तजा निजामशहा हा १५६५ मध्ये गादीवर आला. त्यावेळी तो अल्पवयी होता. म्हणून त्याची आई खूनजा हुमायून हिने सुमारे सहा वर्षे त्याच्या वतीने राज्यकारभार केला. १५६९ मध्ये मुर्तजाने त्याच्या आईस कैद करून राज्यशकट आपल्या हाती घेतला. त्याने एकंदर २४ वर्षे आणि काही महिने राज्य केले. 'गुलशने-ई इब्राहिमी' या ग्रंथाचा लेखक फरिश्ता त्याचा उल्लेख दिवाणा अथवा वेडा निजामशहा असा करतो. मुर्तजा वृत्तीने क्रूर नक्कीच होता. उदाहरणार्थ, एकदा राजवाड्यातील सईस, डांग वगैरे खालच्या दर्जाच्या नोकरांपैकी एकजणास त्याने जनानखान्यातून बाहेर येताना पाहिले. त्याला त्याचा काही वेगळाच संशय आला. त्याने वेडाच्या म्हणा वा रागाच्या लहरीत अशा सर्व नोकरांची कत्तल करण्याचा हुकूम दिला. त्यासरशी शेकडो सईस, डांग, दिवटे अशा अनुचरांची कत्तल करण्यात आली. अशी आणखी उदाहरणे पुष्कळ सांगता येतील. पण फरिश्त्याने त्याच्या विषयी बाकी जे लिहिले आहे, ते वाचून तो वेडा नसून जरा अधिक उत्कट वृत्तीचा असावा असे वाटते. 'अहमदनगरची निजामशाही' या ग्रंथात सय्यदअली याने त्याच्याविषयी दिलेला अभिप्राय असा : न्यायबुद्धी, शौर्य आणि औदार्य या तिन्ही गुणांनी मुर्तजा परिपूर्ण होता. त्याच्या न्यायप्रियतेमुळे राज्यातील चोर, डाकू, लुटारू इत्यादींच्या कृत्यांना आळा बसला. त्याने इतका दानधर्म केला की त्याचा खजिना रिकामा होऊन गेला. काही विद्वानांच्या मते मुर्तजा हा वेडा होता. परंतु त्याची तीक्ष्णबुद्धी आणि धर्मशास्त्रातील गती

पाहता तो बुद्धिमान, समजूतदार आणि शहाणा होता असेच म्हणावे लागेल. सय्यदअली तबातबाई हा अहमदनगरच्या निजामशाहीचा आश्रित होता. त्याने बुन्हाण-ई-मासीर' नावाचा ग्रंथ लिहिलेला आहे.

मुर्तजाचे अनेक युद्धांमधील कर्तृत्व आणि धडाडी, राज्यकारभाराचे धोरण आणि न्यायप्रियता लक्षात घेता सय्यदअलीचा अभिप्राय योग्य वाटतो. मात्र त्याच्या एका उल्लेखनीय आवडीमुळे त्याची कर्तबगारी फार डागाळल्याचे दिसते. ती आवड किंवा चाहत म्हणजे गुदामैथुनाची हवस. आधी साहिबखान आणि नंतर फत्तेशहा अशा नावाच्या दोन सुंदरगुलामांच्या चाहतीत त्याच्या बुद्धीस आणि कर्तृत्वास कायमच फार मोठे ग्रहण लागलेले राहिले. साहिबाखानाच्या नादाने मुर्तजा इतका चाळावला की त्याला जवळजवळ वेड लागल्यासारखे झाले. चंगीझखान नावाचा त्याचा एक वजीर होता. जो अत्यंत निष्ठावान, पराक्रमी आणि धुरंधर होता. साहिबाखानाच्या नादाने मुर्तजाने त्याला विषप्राशन करण्यास भाग पाडले. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या निष्ठेची आणि प्रामाणिकपणाची त्याला खात्री पटली. त्यामुळे मुर्तजास फार दुःख झाले. इतके की काही काळ राज्याची सूत्रे त्याने पैगंबरांचा वंशज असलेल्या काजीबेग याच्या हाती दिली. आणि स्वतः बेहिश्तबाग येथील राजवाड्यात राहू लागला. तिथे साहिबखान याचेखेरीज कोणासही प्रवेश नसे. सुलतानाने साहिबखानास काहीही शिक्षा केली नाही. सुलतानाच्या मर्जीतला असल्याने त्याचे प्रस्थ वाढतेच राहिले. त्याचे मित्र, नातेवाईक यांना अनेक जहागिऱ्या देण्यात आल्या होत्या. विदेशी- म्हणजे इराणी, तुर्क, अरब-मुसलमान विरुद्ध दक्षिणी आणि हबशी मुसलमान असे सरदारांचे दोन प्रबळ गट निजामशाहीत असत. साहिबखान दुसऱ्या गटाचा होता. विदेशी मुसलमान तुम्हाला सत्तेतून हटविण्याच्या उद्योगात आहेत असे त्याने सुलतानाला पटविले. सुलतानाने त्यांना पकडण्याचा सपाटा लावला. त्यामुळे घाबरून त्यांच्यातील अनेक आदिलशाहीत पळून गेले. बाकी कैक मारले गेले. साहिबखान मद्यधुंद होऊन हत्तीवर बसून अहमदनगरच्या रस्त्यावरून डुरकत हिंडे. देखणी मुले आणि मुली यांना पकडून तो त्यांच्याशी उघड अश्लील चाळे करत असे. मीर मेहदी नावाच्या एका उच्चकुलीन सरदाराची मुलगी याचप्रकारे त्याने पकडून नेली होती. वकील आणि पेशवा असलेल्या काजीबेगच्या विरोधात त्याने सुलतानाचे कान फुकले. सुलतानाने त्यास काढून टाकून हद्दपार केले. त्यानंतर विदेशी मुसलमानांची प्रचंड प्रमाणावर कत्तल करण्यात आली. बहरीखान नावाच्या सरदाराच्या मुलीस त्याने स्वतःसाठी मागणी घातली. खानाने त्यास नकार देताच साहिबखानाने त्याच्यावर हल्ला केला. तेव्हा त्यास जालना येथे पळून जावे लागले होते. साहिबखानाच्या सहकाऱ्यांमध्ये तीन हजार हलकट दक्षिणी लोकांचा भरणा होता. गलिच्छ हेतू मनात धरून ते आईबापांपासून अनेकदा मुलांना जबरदस्तीने पळवून नेत. साहिबखान अनेकदा सुलतानावर रुसून अहमदनगर सोडून जाई. अन एखाद्या प्रेयसीच्या पाठी प्रियकराने जावे तसा सुलतान त्याच्या पाठी रानोमाळ, गावोगाव पळत राही. सुलतान आपल्या पूर्ण कबजात सापडल्याची खात्री पटल्यावर त्याने कहरच केला. स्वतःला सुलतान समजून त्याने जहागिरी देण्यास सुरुवात केली. राजधानीमध्ये कत्तली घडवून आणल्या आणि सर्वत्र हाहाःकार उडवून दिला. पुढे सय्यद मुर्तजाखान नावाच्या एका परदेशी सरदाराने अत्यंत

हुशारीने साहिबखानाचा वध घडवून आणला. पुढे सलाबतखान याने हुशारीने कारभारावर ताबा मिळवून मुख्य वजीर म्हणून राज्य केले. आणि लोकांस परमसंतोष दिला. अहमदनगरच्या पूर्वेस टेकडीवर असलेल्या वास्तूला 'चांदबीबीचा महाल' म्हटले जाते. ती वस्तुतः सलाबतखानाची कबर होय. यानंतर सुलतान फतेशहा नावाच्या आणखी एका नर्तकाच्या नादास लागला. त्याने सुलतानाकडून मोठमोठ्या जमिनी आपल्या नावे करून घेतल्या. खेरीज सुलतानाने त्याच्यावर शाही जामदारखान्यातील जडजवाहिराची मुक्तहस्ताने खैरात केली. नंतर आपला मुलगा मिरान हुसेन आपल्याला सिंहासनावरून ओढून काढण्याच्या बेतात आहे, असा समज करून घेऊन सुलतानाने त्यास ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यातून फतेशहाच्या मदतीने राजपुत्र निसटला. नंतर मिरान हुसेन यानेच आपल्या बापाला म्हणजे सुलतानाला मारून टाकले आणि स्वतः गादीवर बसला. निजामशाही राजवटीत आणि एकूण दक्षिणी मुसलमान राजवटीत देशी आणि परदेशी मुसलमान असे परस्परविरोधी गट असत. परदेशी मुसलमानात इराण, तुर्कस्तान, अफगानिस्तान, अरबस्तान आणि हबसाण म्हणजे ॲबिसिनिया किंवा हल्लीचे इथिओपिया येथील मुसलमानांचा भरणा असे. हबशी हे दक्षिणी मुसलमानांच्या गटात असत. खेरीज मराठा सरदार सुद्धा असत. जाधवराव, भोसले, घोरपडे, डफळे, माने अशा काही सरदारांचे उल्लेख निजामशाही आणि आदिलशाहीत आढळतात. त्यांच्या आणि मुसलमानांच्या संपर्कातून दखनी नावाची भाषा-विशेषकरून आदिलशाही, कुतुबशाही, बरीदशाही येथे उदयाला आली. ती पर्शियन आणि मराठी यांच्या संकरातून निर्माण झाली. या भाषेत उत्तम रचना निर्माण झाल्या होत्या. हल्ली महाराष्ट्र आणि दक्षिणेतील सर्व राज्यात मुसलमान जी भाषा बोलतात ती या दखनीचा अवशेष होय. या काळात मराठे लोक येकंगबाजी आणि दोअंगबाजी या तलवारीच्या खेळात फार निष्णात असत. ज्यावेळी एकच तलवार किंवा काठीचा उपयोग केला जातो त्यास येकंगबाजी असे म्हणत. आणि ज्यावेळी ढाल अथवा एकेका हातात एक अशा दोन तलवारीचा उपयोग केला जातो त्यास दोअंगबाजी असे म्हणत. या खेळात मराठ्यांइतके वाकबगार कोणीही नसे, असे इतिहासकार सांगतात. मराठा तरुण पंधरा वर्षांचा झाला आहे आणि तो तलवारबहाद्दर नाही, अशी गोष्ट फार क्वचित आढळून येई. मराठ्यांच्या अंगी वसत असलेल्या या गुणांचा उपयोग त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी करून मलिक अंबर या हबशी गुलामाने अहमदनगरच्या निजामशाहीच्या कारभारात अव्वलस्थानी आल्यावर एकप्रकारे मराठा राज्याची मानसिक आणि भावनिक पायाभरणी केली, असे अनेक विद्वान म्हणतात. पुढच्या दोनेक पिढ्यात उदयाला आलेल्या शिवाजीराजाने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठ्यांच्या राज्याचा प्रत्यक्ष पाया घातला, हे ऐतिहासिक वास्तव सर्वांना माहीत आहे.

आपल्या कथानकाचा काळ हा साहिबखानाच्या सुलतानावरील कबज्याचा काळ होय. या काळात सलाबतखान हा मुख्य वजार नव्हता. पण त्याच्या कर्तबगारीमुळे काजीबेग याने त्यास बरीच मोकळीक दिलेली होती. आणि तोही आपले काम चोख बजावत होता. त्यामुळे सुलतानाची त्याच्यावर मर्जी होती. साहिबखानास ते रुचत नसे. पण राज्य ठीक चालणे सुलतानासाठी आवश्यक होते. ती काळजी घेण्याचा त्याचा कायम प्रयत्न असे. त्यात सलाबतखान महत्त्वाचा होता. त्याचवेळी आपल्या प्रियपात्रास जपण्याची कसरत

सुलतानास करावी लागत असे. म्हणूनच बेतालपणे जहागिरी देण्याच्या त्याच्या कर्तुकी तो सहन करीत असे. आणि हे प्रकार मर्यादेबाहेर गेले की सलाबतखानाकरवी तो त्याचा बंदोबस्त करून घेत असे. यात साहिबखान रुसला की त्याच्यापाठी धावणे, असा त्याचा रिवाज असे. अशाच एका प्रकरणी साहिबखान याने हनाफी पंथाच्या चार अफगाण पठाणांकडून राजधानी अहमदनगरमध्ये काही अरब, तुर्की आणि इराणी मुसलमानांच्या हत्या घडवून आणल्या. आणि त्याची बक्षिसी म्हणून त्यांना राहुरी, वांबोरी, डोंगरगण परिसरात जहागिऱ्या दिल्या. हे पठाण अगदी नृशंस आणि जुलमी होते. अहमदनगर परिसरातल्या या गावांना युद्धाची झळ सहसा नसे. आपल्या राजधानीच्या निकट शत्रूला येऊ न देता सुलतान आपल्या मुलुखातील प्रजेला कायम जपत असे, हे तर आहेच. पण शत्रूसुद्धा आल्यास गावांना लुटून त्यांचा विरोध पत्करण्यापेक्षा त्यांना त्रास न देता पाण्याच्या सोयीने आपल्या सैन्याची मांडणी करणे पसंत करत असे. सैन्यास जे लागते ते योग्य दाम देऊन विकत घेण्याकडे त्याचा कल असे. पण या पठाणांना या परिसरात जहागिऱ्या मिळाल्यानंतर लोकांची परिस्थिती बदलली. साहिबखानाच्या सावलीखाली पठाणांनी जुलूम करायला सुरुवात केली. पठाण सारे एकजात उंच आणि तगडे होते. महसुलाच्या वसुलीसाठी ते अगदी रानटी पद्धती वापरत असत. आणि रानातून हिरवा चारा खुडून न्यावा तसे बायाबापड्या आणि कोवळ्या मुलांना उचलून नेत असत. त्यांच्या अंगातील आडमाप ताकदीच्या दंतकथाही या परिसरात अस्ताव्यस्त पसरल्या होत्या. कोणाचेही मुंडके आपल्या काखेत आवळून ते त्याचा जीव घेऊ शकत अशी बोलवा होती. आणि त्यांच्याविरुद्ध तक्रार करण्याची अजिबातही सोय नव्हती, हे लोकांना कळून चुकले होते. ज्यांनी तसे प्रयत्न केले त्यांना साहिबखानाने परस्पर यमसदनी पाठविले होते. साहिबखान सुलतानाचे प्रिय पात्र होता. त्यामुळे त्याचे काहीही वाकडे करण्याची हिंमत कोणीही करत नव्हते. आपले कथानक सुरू होते ते या पार्श्वभूमीवर.

1

या काळी वांबोरी गावाची पाटीलकी एडके यांच्या घराण्यात होती. असे सांगतात की, एके काळी एडके यांच्याकडे वांबोरीच्या परिसरातील अनेक गावांची देशमुखी होती. आणि तिडके हे गावाचे पाटील होते. ही दोन्ही घराणी ज्ञातीने ब्राह्मण होती आणि त्यांचे एकमेकात सोयीरसंबंध पूर्वापार होते. एडके यांचा एक जुना वाडा होता. तो आता जवळपास जमीनदोस्त झालेला होता. तिथे बोरीबाभळीची अनेक झाडे उगवून वाढलेली होती. ही जागा हागणदारी म्हणून जास्त करून वापरली जात असे. एडके दुसऱ्या एके

ठिकाणी घर करून राहात असत. आपल्या जुन्या देशमुखीचा एडके यांस अभिमान होता, असेच म्हणावे लागेल. कारण ब्राह्मण असूनही ते भिक्षुकी करत नव्हते. त्यांचे सोयरे असल्याने तिडकेही स्वतःस उंच कुळीचे मानत. आणि तेही भिक्षुकी करत नव्हते. त्यासाठी शेजारच्या गावातून एक ब्राह्मण कुटुंब काही पिढ्यांआधी खास आणून इथे वसविण्यात आलेले होते. असे सांगतात की, बऱ्याच जुन्याकाळी वज्रसेन नावाचा इथल्या एडके घराण्याचा मूळपुरुष आपल्या देशमुखीच्या वतनावर इथे राहण्यासाठी आला. हे घराणे मूळचे पैठण येथील असल्याचे सांगितले जाई. तिडके आणि एडके ही दोन्ही सुस्थितीतील जमीनदार घराणी होती, असे म्हणायला हरकत नाही. गावात अठरापगडजातीचे लोक राहात असत. बहुसंख्या साहजिकच मराठे लोकांची होती. शुकरे, शितोळे, चौथे, राहणे, पठारे अशा आडनावांचे मराठे होते. बाकी आडनावे अर्थातच होती. आपल्या कथानकासाठीही इतकीच महत्त्वाची, म्हणून त्यांचा उल्लेख केला. या पाच मराठा घराण्यांचे आणखी एक वैशिष्ट्य सांगता येईल. त्याला खात्रीशीर प्रमाण नाहीय. पण असे सांगतात की, वज्रसेन एडके जेव्हा इथे राहण्यास आले तेव्हा पैठणहून त्यांनी त्यांच्या पदरी असलेल्या ह्या पाच मराठा घराण्यांच्या मूळपुरुषांना आपल्यासोबत आणले. त्यांना या परिसरात जमिनी इनाम दिल्या. हे अगदी खरे की यांच्याकडे मोठाल्या जमिनी होत्या. पण शेती करण्याकडे त्यांचा खास कल नव्हता. निदान या घराण्यातील तरुण मुलांबाबत असे हमखास म्हणता येई. ते येकंगबाजी आणि दोअंगबाजी या तलवार चालविण्याच्या प्रकारात वाकबगार होतेच. कुस्ती, लेझीम खेळणे, दांडपट्टा चालविणे, काठी चालविणे यातही ते वाकबगार होते. आणि घोडेसवारी करण्यात सुद्धा त्यांचा हात धरणारे फार कमी लोक असत. हे मराठे मुळात एक जात नव्हते. पण हळूहळू ते एकमेकात सोयीरसंबंध करून मिसळून गेलेले होते. उदाहरणार्थ असे सांगतात की, पठारे हे मुळात एक स्वतंत्र जात होते. देवगिरीच्या जाधवांच्या राजवटीत ते क्षत्रियकर्म करणारे होते. त्यांच्यातले जे बिंबदेव जाधवांसोबत कोकणात गेले, त्यांची एक स्वतंत्र जात झाली. ते प्रभुपदी पावले आणि त्यांची पाठारेप्रभू अशी जात तयार झाली. बाकी महाराष्ट्रात जे पठारे उरले ते मराठे लोकात मिसळून गेले. त्यांना आता आपल्या वेगळेपणाची स्मृती उरलेली नव्हती. हे असे कायम होत राहिलेले आहे. समजा की भांड आणि दांगट ह्या वेगळ्या जाती होत्या. त्यांच्यातले काही मराठे लोकात मिसळून गेले. उरले ते स्वतंत्र जात म्हणून राहिले. किंवा माने नावाची एक स्वतंत्र जात होती. ती मराठे लोकात मिसळून गेली. उरलेले माने एक जात म्हणून विदभोत अजूनही आहेत. असे बाकी एकूण शहाण्णव कुळी म्हटल्या जाणाऱ्या बहुतेक मराठ्यांसंबंधी सांगता येईल. पण हे सगळे पुष्कळ नंतरचे. पुढच्या काळात म्हणजे अव्वल इंग्रजी आमदानीतील एक विद्वान विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी मराठा लोकांस उघड्या तोंडाची जात म्हटले, ते हेटाळणीच्या स्वरात म्हटले असले तरी ते योग्यच आहे. ह्या पुष्कळ पुढच्या गोष्टी आता करण्यापेक्षा वर्तमानावर लक्ष ठेवणे योग्य. प्रस्तुत वर्तमानात वांबोरीतील हे सात आडनावाचे लोक आपल्या कथानकासाठी महत्त्वाचे. त्यातील दोन ब्राह्मण आणि बाकी पाच मराठे. तलवारबाजी आणि घोडेसवारीची खुमखुमी असलेले. संधी मिळेल तेव्हा घोड्यावर स्वार होऊन मुलुखगिरी करणारे. विशेषतः त्यांच्यातल्या तरुणांची हीच पसंती. अशी संधी नसेल तेव्हा नाईलाज होऊन

शेतात राबणे असा त्यांचा क्रम असे. मुलुखगिरीला संधी सहसा असेच. युद्धे सहसा कायम होत. निजामशाही, आदिलशाही, इमादशाही, बरीदशाही, कुतुबशाही अशा पाच शाह्यांची राज्ये दक्षिणेत होती. दिल्लीला अकबर हा मुघल बादशहा होता. निजामशाहीच्या वरच्या अंगाला बहाणपूर ही राजधानी असलेल्या फारुकी राजांची राजवट होती. ती खास प्रभावी नसली तरी ती होती हे ऐतिहासिक सत्य. यात कोणाचे कोणाशी कधी समीकरण जुळेल आणि कधी तुटेल याचा भरवसा नसे. त्यामुळे युद्धे कायम आणि शांतता हा अपवाद अशी परिस्थिती असे. यात निजामशाही आणि आदिलशाही ह्या प्रबळ सत्ता. संधी आणि सोय याचा हिशेब करून कोणाच्या तरी बाजूने लढणे आणि लूट मिळविणे हा मुख्य धंदा अशा तरुण मराठे लोकांचा असे. साहजिकच घरातील वयस्क का लोकांचा यास विरोध नसे. उलट त्यास उत्तेजनच असे. आपला मुलगा मुलूखगिरी करतो, घोड्यावर स्वार होऊन तलवार गाजवतो, याचा त्यांना अभिमानच असे. अगदी त्यास ते करताना मृत्यू आल्यास देखील ते मोठेपणाचे लक्षण मानले जात असे. अशा दोन ब्राह्मण आणि पाच मराठे यांच्या घरातल्या अशा सात तरुण मुलांपासून ही गोष्ट सुरू होते. त्यात आपल्या कथेच्या केंद्रस्थानी पठारे या आडनावाचा तरुण आहे. त्याचे नाव साहेबराव. बाकीच्यांनाही नावे आहेत. पण गोष्टीत अधिक घोळ होण्याचे टाळण्यासाठी त्यांचा सरळ आडनावाने निर्देश करू. फक्त साहेबराव याचा नावाने निर्देश करू. तोही जरूर असेल तेव्हा आणि तिथे. मात्र याचा अर्थ असा नव्हे की तो सगळ्यात महत्त्वाचा. आणि बाकीचे बिनमहत्त्वाचे. खरेतर सुरुवात झाली तेव्हा बाकीचे सगळे त्याच्यापेक्षा कैक अधिक महत्त्वाचे होते. आणि कायमच ते अधिक महत्त्वाचे राहिले. पण कथेत जे घडले त्यात त्याची कथा पुढे जाते, इतकेच त्याचे महत्त्व. साहेबराव याचे नाव हे असे असले तरी त्याच्या मित्रात त्याला कोणीही साहेबराव म्हणत नसे. त्याचा बापही त्याला त्या नावाने पुकारत नसे. त्याची आई एकमेव अशी माणूस होती की ती त्यास सायबराऊ म्हणत असे. बाकी लोक त्यास सायबू किंवा सायब्या म्हणत असत किंवा थेट पठाऱ्या असंही कधी कधी. याचप्रकारे त्याचा बाप सुद्धा त्याला वेगवेगळ्या मनःस्थितीत सायबू किंवा सायब्या अशा नावांनी पुकारत असे. या सात तरुणांचे प्रत्येकी काही एक वैशिष्ट्य होते.त्याचा निर्देश कथेत पुढे येईलच.

तर झाले असे की एडके पाटलाच्या घरातील एक दहा अकरा वर्षे वयाची अत्यंत सुंदर मुलगी पठाणांनी उचलून नेली. असे काही पहिल्यांदा घडले होते असे नव्हे. आसपासच्या अनेक गावात अशा घटना घडल्याचे पुष्कळांनी ऐकलेले होते. साहिबखान नावाचे मुर्तजा निजामशहाचे एक प्रिय पात्र होते. आणि कोवळ्या सुंदर मुलांना आणि मुलींना धश्चोटपणे उचलून नेण्याच्या त्याच्या कर्तुकीच्या कथा सर्वदूर पसरलेल्या होत्या. त्याबाबत काहीही करता येणे शक्य नाही असा एकूण समज असे. साहिबखान याच्या नादास लागणे म्हणजे थेट सुलतान मुर्तजा याच्याशी पंगा घेणे, असा समज होता. कोण नादी लागणार? हे पठाण हे साहिबखान याचेच लोक, हे सगळ्यांना माहीत. ते जबर ताकदवान म्हणून विख्यात. कोणालाही काखेत पकडून केवळ हाताच्या ताकदीने दम कोंडून ते मारू शकत, असे त्यांच्याबाबत बोलले जाई. पण आता हे वांबोरीत प्रत्यक्ष घडले. खुद्द पाटलाच्या मुलीला पठाण घेऊन गेले. घटना घडली त्यादिवशी पाटलाच्या घरातील सगळे गडीबायांसकट

शेतात गेलेले होते. घरातील स्त्री-पुरुष शेतात प्रत्यक्ष काम सहसा करीत नसत. पण वावरात काढणी चालू होती म्हणून सगळे हौसेने मळ्यात गेले होते. एरवी कामावर गडी असत. म्हातारे पाटील एकटे देखरेखीसाठी पुरेसे असत. ज्वारीच्या काटणीचे काम चालू होते. सकाळचा प्रहर-दीडप्रहर काम हाणून सगळी माणसे आंब्याच्या सावलीला बसून निवांत जेवत होती. त्या सुमाराला पठाण वावटळीसारखे घोड्यांवरून आले आणि लांडग्याने कोकरू उचलावे तसे त्या पोरीस उचलून घेऊन गेले. अगदी एका क्षणात पोरगी आत्ता इथे होती आणि आत्ता ती नाहीय असे होऊन गेले. प्रतिकार करण्याचे भान सुद्धा कोणास झाले नाही. अन करायचा तरी तो कसा केला असता त्यांनी? सगळी गरीब कष्टकरी माणसे. बाकी घरातल्या बाया आणि म्हातारे पाटील. पठाण आडमाप ताकदीचे, शस्त्रसज्ज. वावटळीसारखे आले आणि सावज उचलून त्याच तहेने दिसेनासे झाले. ते कोण होते हे सुद्धा पुष्कळ नंतर लक्षात आले. इतके उंच, तगडे लोक. ऐकीव गोष्टींच्या उजेडात सगळे सगळ्यांना लख्ख झाले. एकच हाहाःकार उडाला. तिथून गावात आले तर समजले की आधी ते पाटलाच्या वाड्यावर चालून गेलेले होते. तिथून मळ्यात गेले होते. संध्याकाळपर्यंत गावभर बातमी झाली. जिकडे तिकडे तीच चर्चा. काहीही करता येणे शक्य नव्हते. पठाणांची दहशत जबर. पाटलाचा तरुण मुलगा विजापूरच्या आदिलशाहीत होता. तिकडे कुठेतरी लढाईत. एडके आणि तिडके तिकडेच. त्यांच्यापर्यंत बातमी गेल्यावर दोघेही तडक परतले. तरुण लढाऊ पोरे. पण पठाणांच्या ताकदीपुढे करणार काय? अस्मानी आणि सुलतानी. त्यांचा प्रतिकार कसा करणार? दात-मुठी खाऊन त्वेष व्यक्त करणे आणि मूग गिळून हात चोळत बसणे.

'असं चालणार नाही,' तिडके म्हणाला, 'जीव गेला अगदी तरी

बेहत्तर. असा अपमान सहन करत जगत राहण्यापेक्षा मेलेलं काय वाईट?'

'म्हणजे काय? आत्महत्या करायची?' एडके.

'नाही रे. फुकटात जीव का गमवायचा? आपण महाटे लोक. मेलो तरी दुसऱ्याचा जीव घेण्याच्या कोशिशीत मरू.' तिडके म्हणाला. एडकेची ही देखणी बहीण त्याची बाईल होणार होती. तसे ठरलेले होते.

तिला पठाणांनी उचलून नेल्यामुळे त्याच्या मनात सगळीकडे आगीचा डोंब उसळलेला होता.

'आपण कसे पुरे पडणार पठाणांना? त्यांच्या ताकदीविषयी आपण ऐकून होतो. आता गावातल्या लोकांनी पाहिलंय त्यांना. त्यांच्यापुढे आपण कसे टिकणार? नुसती आंधळी कोशिश काय उपयोगाची? लढायचं तर जिंकण्यासाठीच, असं मनात पाहिजे. अगदी घात घालून एखाद्याला कदाचित आपण मारू सुद्धा. पण बाकीचे उरतील ते आपला खातमा केल्याखेरीज नक्कीच राहणार नाहीत. तो साहिबखान हांडगा- त्याची तीन हजारांची फौज घेऊन तोआपल्या सगळ्या गावाची राखरांगोळी केल्याबिगर राहणार नाही.'

'हांडगा नसेल तो रे. सुलतानाला त्याचा बोचा प्यार. पण म्हणून तो हांडगा असेलच असं नाही. मी तर ऐकलंय की त्याला बायको आहे. अन कोणातरी एका सरदाराच्या पोरीला त्यानं स्वतःसाठी मागणी देखील घातली होती.'

'असेल नाहीतर नसेल. माझी बहीण उचलून नेलीय साल्यांनी. ती कुठं असेल, कशा

परिस्थितीत असेल, याची नुसती कल्पना केली तरी जीवाची आग आग होतेय रे!'

'आपल्या आणखी दोस्तांना आपल्यासोबत घेतलं तर?'

'कोणाला? आणि का येतील ते? का निष्कारण स्वतःचा जीव गमवायला तयार होतील? तुझं ठीक आहे. माझी बहीण तुला देण्याचं नक्की झालेलं होतं -'

'होतील रे. आपल्या गावाचं नाक कापलं गेलंय."

'बघ तू. प्रयत्न कर. तू करतोस तर मीही करतो. बघूया, काहीच न

करण्यापेक्षा-' एडके म्हणाला.

दोघांनीही प्रयत्न केले. त्यांना जे हवे होते, त्यांच्यातला फक्त एक गावात हजर होता. बाकीचे असेच इकडेतिकडे घोड्यावर स्वार होऊन मुलूखगिरीस गेलेले. रहाणे आणि शितोळे निजामशाही फौजेत होते. ते इमादशाहीच्या हद्दीत बाळापूर भागात होते. चौथे आणि शुकरे बरीदशाहीच्या फौजेत गुलबर्गा परिसरात होते. त्यांना निरोप गेले आणि मुख्य म्हणजे ते आले. पठारे, रहाणे, चौथे, शितोळे आणि शुकरे. सगळे साधारण एकाच शिणेचे. सतरा-अठराच्या घरात. पठारे त्यांच्यात जरा लहान. तो गावातच होता. तलवारबाजी, घोडेस्वारी, काठी चालविणे, दांडपट्टा खेळणे, भालाफेक, लेजीम, कुस्ती यात सगळे वाकबगार. पण प्रत्येकाचे काही एक वैशिष्ट्य होते. शितोळे हा बुटका, काटक आणि टणक डोक्याचा होता. डोक्याने धडक मारून कोणालाही आडवे पाडण्यात वाकबगार होता. त्याची त्या बाबतीतली क्षमता केवळ असाधारण होती. डुक्करमुसंडी मारून कोणालाही तो नमवत असे. त्याचे खरे आडनाव शुकरे किंवा डुकरे असायला हवे होते. कारण शुकर म्हणजे डुक्कर. याच्या उलट शुकरे हा काळा, आडमाप अंगाचा, बुटकाच पण अंगी असाधारण ताकद असलेला होता. संधी मिळाल्यास तलवारीच्या एका घावात कोणाचीही खांडोळी करण्याची क्षमता त्याच्यात होती. रहाणे हाही बुटका पण सडपातळ आणि अत्यंत चपळ होता. बिजलीच्या वेगाने हालचाली करण्यात त्याचा हात धरणारे कोणीही नव्हते. चौथे उंच, तगडा आणि अंगी बैलाचे बळ असलेला होता. तिडकेचा लढाईचा त्वेष सर्वोत्कट होता. आपल्या अंगी जितकी क्षमता आहे, त्यापेक्षा कितीतरी अधिक अवसान प्रकट करून प्रतिस्पर्ध्याला लढतीच्या आधी गहाळ करण्याचे वेगळेच मनोबल त्याच्या ठायी होते. एडके काठी चालविण्यात सगळ्यात जास्त वाकबगार होता. त्याची काठी फिरत असताना त्याच्यापर्यंत पोहोचणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे होते. पठारे हा पठाणांसारखा असाधारण उंच, नाकीडोळी त्यांच्या सारखाच गोरागोमटा आणि तगडा होता. त्याच्या डोळ्यांची बुबुळे अपवादात्मक पाचूच्या रंगाची, अफगाण किंवा मूर जातीच्या लोकांसारखी होती. आपल्या अंगी असलेल्या बळाचे ज्ञान त्याला नव्हते. कारण त्याला बाकी सगळ्यांच्या मानाने युद्धाचा अनुभव कमी होता. किंबहुना युद्ध करणे हे निष्कारण असते, अशी त्याची अंगभूत धारणा होती. मनाने तो काहीसा भित्रा होता, असेच म्हणावे लागेल. तरीही त्याला मसलतीत घेण्याचे एडके आणि तिडके यांनी ठरविले होते. कारण तो गावात होता आणि सगळ्यांच्या आधी तो त्यांच्या मनाशी आला. शिवाय जगण्याची कांक्षा आणि मरणाचे भय हे सुद्धा युद्धात जिंकण्याचे एक अस्त्र असते, हे त्यांना माहीत होते. जीवाचे दोस्त गोळा करणे हा मुख्य उद्देश होता. त्यांच्यातला अंगार तिडके याने उत्तम चेतविला.

पठाण ताकदवान आहेत. त्यांना माज चढलाय. त्यांनी आपलं नाक कापलंय. गावच्या पाटलाची मुलगी दिवसाढवळ्या उचलून नेतात म्हणजे काय? आपण बांगड्या भरून बसणार आहोत काय? हांडग्या साहिबाखानानं यांना इथं वतनं दिलीत. सुलतानाला हांडगा प्यार. पण आपण काही करू शकत नाही, असं नाही. आपण सगळे एकत्र आलो तर आपण पठाणांना नमवू शकतो. त्यांचा खातमा करू शकतो.तो आपल्याला करायचा आहे. अरे! आपण म-हाटे लोक. बुटके आहोत म्हणून काय झालं? चित्त्यासारखे चपळ आहोत. पठाणांच्या अंगी रेड्याचं बळ असेल. आपल्या अंगी चित्त्याचं. रानात चित्ते रेड्याची शिकार कशी करतात, माहीत आहे ना! एकत्र येऊन करतात. एकास एक असे त्याच्या नादी ते लागत नाहीत. एकत्र असले तरी समोरून सहसा थांबत नाहीत. समोर रेडा एका धडकेत त्यांना मारू शकतो किंवा आपल्या शिंगात अडकवून उचलून फेकू शकतो. एखादा हुलकावणी देण्यापुरता अन तोही थोडा वेळ समोर थांबतो. बाकीचे मागून झोंबतात. अगदी वर चढतात. आपल्यालाही असंच करावं लागणार आहे.पठाणांना एकेकटं पाडून, पकडून मारावं लागेल. वाघ जसा अचानक हल्ला करतो, त्याच्या भक्ष्याला बेसावध ठेवून ; तसा हल्ला आपल्याला करायचा आहे.

'आरे पण आसे एकटे कसे सापडायचे ते? आपल्याला मस वाटन,

पन काह्यासाटी राहातीन येकले येकले?'

'आरे राहातीन ना. रातूनद्याह्या संगती थोडेच राहातेत ते?' 'आपुन समजा मारला योक. त बाकीचे सावद होणारच.'

'होऊ दे ना. ते होणारच. आपण त्यांना सापडणार नाही अशी जागा आपल्या छपण्यासाठी निवडू. डोंगरगणच्या घाटात निबिड अरण्य आहे. डोंगरकपारी आहेत. गुहा आहेत. वाघांचा संचार असतो तिथं. सिद्ध, नाथ आणि महानुभाव पंथाचे साधू सोडून तिथं माणसं कधीही जात नाहीत. तेही एका वेळी जेमतेम चार-दोन असतात. कधीकधी तर तेही नसतात. आपण तिथं छपून राहू. दाणागोटासोबत नेऊ. रानातली फळं खाऊ अन राहू. सगळी व्यवस्था आधीच करू.'

'आन आय-बापानला सांगायचं काय?'

'ए सायब्या ऽऽ! इतकी साधी गोष्ट. लढाईला चाललोय म्हणून सांगायचं. त्याच्यात काय कठीण? आणि शितोळे, धडक तू मारायची पठाणाला. भिंत सुद्धा धडक मारून पाडण्याइतकं टणक आहे तुझं डोकं.'

'मारीन ना मी. पण पठाण खाली पडल्यावर लगेच तलवारीचे घाव

घाला. नाहीतर तिथंच मी मेलो आसं व्हईन.'

'घालणार रे आम्ही. जीवाला जीव देणारे आपण सगळे. आणि धडक मागून द्यायची आहे. समोरून नाही. बाकी त्या त्या वेळी जसं असेल तसं सावध राहून करायचं.' बात पक्की झाली अन एकेदिवशी सातही जण गायब झाले. अरे, पण गेले कुठं? कायनू बुवा, लढाईला जायचं म्हनत व्हते. आरे पन घोडी तं ज्याची त्याची घरीच हाये. मंग काय झालं? ती काय बजारात मिळत नाईत? आरे पन एक्याच दिशी समदे? आरे, जीवाचे मैतर हायेत. गेले आस्तीन. काय तरी टावूक दिसला आसन कुढं तरी. गेले आस्तीन. तरनी प्वॉरं हाईत. अशा चर्चा होत राहिल्या काही दिवस अन हळूहळू थंडावल्या. पाटलाच्या घरात सुतकी

वातावरण होतं. स्वतःची बहीण पठाणांनी उचलून नेली असताना आपल्या दिवट्याला मुलूखगिरी सुचावी याचे पाटलांना अतोनात दुःख होई. पण कोणाला सांगणार ते. आपल्या हृदयातलं कुरूप आपलं आपल्यालाच सांभाळावं लागतं ना! बाकीच्यांना देखील वाईट वाटत असतं.पण काहीही झालं तरी परदुःख शीतल, असं म्हणतातच ना! अशी कैक तरणी पोरं आणि पोरी पठाणांनी अनेक ठिकाणांहून उचलून नेली होती. कैक ठिकाणी त्यांनी लोकांना माना मुरगळून मारल्याच्या गोष्टी आम होत्या. हवेत स्तब्ध दहशतीचा गारवा भरून राहिलेला होता. अशातच एके दिवशी बातमी आली की एका पठाणाला खडांबे गावाच्या शिवारात मारून टाकण्यात आलंय. भयंकर गोष्ट होती. इतक्या ताकदवान सरदाराला मारून टाकलं गेलं होतं. बातमी आल्यासरशी पाटलाच्या मनात या सात पोरांचं आलं. हा यांचाच उद्योग असावा असं. नगरहून सुलतानाचे लोक तपासासाठी आले. वांबोरी, खडांबे, ब्राह्मणी अशा आसपासच्या सगळ्या गावात चौकशी. कोण काय सांगणार? कोणालाही काहीच माहीत नव्हतं. पण वांबोरीच्या पाटलाची पोर उचलून नेण्यात आली होती, हे वास्तव सगळ्यांना माहीत होतं. पाटलाचा पोरगा गायब होता. तो कुठं गेलेला होता? पाटील म्हणाले, आदिलशाहीत लढतो तो. त्याची बहीण तुमच्या लोकांनी उचलून नेली होती, तेव्हा आला होता. नंतर परत गेला. माझी लेक परत करा. मी तक्रार घेऊन सुलतानाला भेटणार आहे. तपासकरी जरा चपापले. म्हणाले, पाटील, तुला हे माहीत आहे की सुलतान कोणालाही भेटत नाही. अन ज्यानी तुझी पोर नेली त्याच्यासाठी सुलतान इतका पागल आहे की, सगळं पटूनही तो काहीच करणार नाही. आम्हाला सुद्धा अशा गोष्टी पटत नाहीत. कोणीच काही करू शकत नाही. इतकं बोलून तपासकरी परतले. अर्थात खबरे सोडलेले होतेच त्यांनी. अशा गोष्टी जाहीर थोड्याच करायच्या असतात? झालं असं की या सातजणांनी डोंगरगणच्या घाटात जागा नक्की करून मुक्काम तिथं हलवला. आणि बातम्या घेत सावजाची वाट बघत राहिले. खबरे त्यांनीही सोडलेले होते. अन रात्रीच्या अंधाराच्या आश्रयानं तेही फिरत होते. त्यांना खबर लागली की एक पठाण खडांबे-खुर्द येथील शाहवलीच्या दर्याला भेट देण्यासाठी आलेला आहे. अन चार तास झाले तरी तो तिथून हललेला नाहीय. अन तिथून तो हलणार हे नक्की. कारण तिथं मुक्काम थोडाच करणार तो? त्यामुळं, काय करायचं ते बघा. खबरी अधिक काय सांगणार? पक्की खबर दिली. ती त्याची मर्यादा. आणखी माहिती हवी असेल, तर घेऊन येतो. तुमची थांबायची तयारी असेल तर बघा. म्हणाले, आणखी काही नको. म्हणाले, वाट बघू. घाटात मारू. मग म्हणाले, कशाला वेळ बर्बाद करता? घोड्यावर स्वार होऊ. रस्त्यात गाठू. हल्ल्याची जागा शोधायला अधिक संधी मिळेल. घाटात कदाचित शेवटची संधी असेल. पण त्याच्या आधी मिळाली ती तर का सोडा? हां, हे जास्ती बरोबर. चला. सावध

राहायचं. त्या त्या वेळी निर्णय करायचे.

हे खडांबे गावात पोहोचले. दर्यात शिरले. पठाण बसलेला होता. या सगळ्यांनी दर्याशी माथा टेकवला. पठाणाला कुर्निसात केला. थोडे रेंगाळले. पठाणाच्या मनात कसलीही आशंका उत्पन्न होण्याचं काहीही कारण नव्हतं. तो निवांत होता. खानसाहब यहाँ अक्सर आया करते है. हाजी शाहवलीखानसाहब के पुरखे है. वो अल्लाउद्दिन खिलजी के जमाने मे आये थे. यही उनका इंतकाल हुआ था. तिथला पुजारी सदृश्य इसम यांना म्हणाला. यांनी

खानसाहेबांना पुन्हा कुर्निसात केला आणि बाहेर पडले. अधिक चर्चा झाल्या. पठाण आता येईलच. संधी मिळेल तिथं ती साधायची. रस्त्यात झाडाझुडुपांच्या आधाराने दबा धरून बसले सातीजण.लांबून पठाणाचा घोडा दौडत येताना दिसला, तसा एडके रस्त्यात आडवा उभा राहिला. हात वर करून लक्ष वेधत, पुन्हा खाली वाकत कुर्निसात करत राहिला. पठाणाने घोड्याची गती कमी केली. एडकेच्या अगदी समोर त्याने घोडा थांबवला.

'क्या है?' 'माझी भैन. मेरा भैन.' एडके कुर्निसात करत म्हणाला. 'क्या हुवा? अभी तो मिला था ना दर्गे में.' 'मेरा भैन. भागलिया.' पुन्हा कुर्निसात. 'क्या बोलता? क्या है, समझता नही', म्हणत पठाण खाली उतरला.

तो उतरल्यासरशी उरलेले सहा धावले. अचानक असं झाल्याने पठाण तात्काळ सावध झाला. त्याने कमरेशी असलेल्या म्यानातून झटकन तलवार उपसली. एडके पठाणासमोरून त्वरित बाजूला झाला. तलवारीच्या टप्प्याच्या बाहेर. आणि हाती तलवार घेतलेल्या स्थितीत पठाण असतानाच त्याला पाठीमागून शितोळेची धडक बसली. पठाण कोसळला. त्याक्षणी त्याच्या पाठीवर तलवारीचे सपासप वार झाले. पण तेवढ्यातही तो उताणा होऊन उठून बसला. एवढेच नाही तर हाती तलवार घेऊन उभा सुद्धा राहिला. त्याच्या अंगातून वाहणाऱ्या रक्तामुळे त्याचा अंगरखा आणि तुमान भिजू लागली. रक्त जमिनीवर सांडू लागले. त्याने एकवार सारीकडे पाहिले. घेरला गेल्याच्या जाणिवेतून आपला अंत जवळ आल्याचे त्याच्या लक्षात आले. तरीही न डगमगता तो उभा होता. हे सगळे त्याच्यापासून अंतर राखून उभे होते. घायाळ केलेल्या शिकारीभोवती उभे राहावेत तसे. पठाण गळाठत चाललाय, तरीही तो तलवार फेकू सुद्धा शकतो म्हणून ते सावध होते. तेवढ्यात शुकरे याने संधी साधली. पठाणाच्या मागून बरगड्यांच्या खालून खुपसलेली त्याची तलवार थेट त्याच्या पोटातून समोर आली. पठाण कोसळला. नंतर घावांची निर्दय बरसात. त्यातही पठाण हात प्रश्नार्थक उंचावत होता. 'क्यों, क्यों?' 'मेरा भैन, मेरा भैन,' एडके घाव घालत म्हणत होता. उंचावलेले हात पेलणे अशक्य झाल्यावर पठाणाचे हातही जमिनीवर कोसळले. मान वाकडी करत त्याने प्राण सोडला. त्वरित तीरासारखे घोडे फेकत सातहीजण तिथून फरार झाले.

सुलतान स्वतः राज्याच्या रोजच्या कारभारात लक्ष घालत नसे.तरीही एकूण हालहवाल काय आहे याच्यावर त्याचे लक्ष असे. त्याने नेमलेला वकील आणि पेशवा आसदखान सारे बघत असे. तो वेळोवेळी सुलतानास अहवाल देई. सुलतान बेहिश्त-बागेतील राजवाड्यात एकटाच राहात असे. तिथे त्याचे प्रियपात्र असलेल्या साहिबखान याचे खेरीज कोणासही सहसा प्रवेश नसे. पण आता हा जो पठाण मारला गेला तो खुद्द साहिबखानाचा माणूस. खबर त्याच्या कडूनच थेट सुलतानास पोहोचली. त्याने पेशव्यास बोलावून घेतले. मारेकऱ्याचा तपास लावून त्याच्या मुसक्या आवळून त्याला दरबारी पेश करण्याचे फर्मान सोडले. मग समजले की मारेकरी एक नाहीय. अनेक असावेत. फार बुऱ्या त-हेने पठाणाला कुचलण्यात आलेलं आहे. ठीक आहे. ढूंढो. आसदखानाने सलाबतखान नावाच्या त्याच्या विश्वासू अधिकाऱ्यावर ही जबाबदारी सोपवली. पठाण साहिबखानाचा माणूस. सलाबतखानास त्याचा सुलतानावर असलेला प्रभाव रुचत नसे. आपली हवस भागविण्यासाठी सुलतानास जे वाटते ते त्याने अवश्य करावे. पण त्याचा राज्याच्या

कारभारावर परिणाम होऊ नये, असे त्याला वाटे. पण तो होत होता. आणि त्यात कोणालाही काहीही करता येत नव्हते. खुद्द सुलतान ज्याचा चाहता, त्याला कोण हात लावणार? अर्थात राजयंत्रणेतला कोणत्याही पातळीवरचा अधिकारी मारला जाणे ही गंभीरच गोष्ट होती. सलाबतखानाने तपास सुरू केला. साहिबखान यानेही त्याची माणसे तपासावर सोडलेली होती. सलाबतखानाची माणसे दर्यापर्यंत पोहोचली. पुजारी म्हणाला, सात आदमी थे. लेकीन अच्छे लोगा लगे वो. त्याने त्यांची आठवणपूर्वक माहिती सांगितली. साहिबखानाच्या लोकांनी त्याच्या आणखी पुढे जाऊन माहिती मिळवली. म्हणाले, पठाणांनी वांबोरीच्या पाटलाची पोर काही दिवसांआधी उचलून नेली होती. साहिबखानाने उरलेल्या तीन पठाणांना बोलावून घेतलं. म्हणाला, पाटलाची उचललेली पोर कुठंय? ते एका सुरात म्हणाले, अशी कोणतीही पोर आम्ही उचललेली नाहीय. ते आणखी कोणी केलेलं असेल. आम्हाला माहीत नाहीय. झालं असं होतं की पोरगी उचलली आणि त्यांच्यातल्या एकाच्या घरी ठेवायला तात्पुरती दिली. तेव्हा दुसऱ्या दिवशी तो बाकीच्यांना म्हणाला, ही पोर माझ्या धाकट्या बीबीला आवडलीय. खूप मासूम आहे, असं तिचं म्हणणं. तिला माझ्याकडे राहू द्या. साहिबखानाच्या जनान्यासाठी आपण दुसरी एखादी मुलगी बघू. माझ्यावर इतकी मेहेरबानी करा. तर बाकीचे म्हणाले, असंच असेल तर चालेल. आपल्याला काय; आपण आणखी एखादी उचलू आणि त्याला देऊ. दिलेल्या शब्दाचे पठाणांना फार महत्त्व. त्यासाठी जान द्यायला सुद्धा ते तयार असतात. म्हणून म्हणाले, पाटलाची पोर आम्ही उचललेली नाहीय. सलाबतखान त्याच्या माणसांकरवी वांबोरीपर्यंत पोहोचला. पण त्याच्यानंतर त्याचा रस्ता ठप्प झाला. त्या गावातल्या माणसांचे ओठ घट्ट मिटलेले राहिले. तरीही त्या गावातले कोणीतरी मारेकरी असतील या अंदाजापर्यंत तो पोहोचला. साहिबखानही तिथवर पोहोचलेला होता. दोघांच्याही माणसांनी पाटलाचे ओठ उघडण्याचा खूप प्रयत्न केला. पाटील म्हणाला, माझी पोरगी नेलीय. मला न्याय द्या. साहिबखान यास त्यात रस नव्हता. सलाबतखानास होता. पण दोघांनाही मारेकरी सापडत नव्हते. पोरगीही सापडत नव्हती. आदिलशाही, बरीदशाही, इमामशाही, कुतुबशाही अशी सगळीकडे माणसे गेली. पण वांबोरीतून गेलेल्या तरुणांचा कुठेही छडा लागत नव्हता. अन तो दोघांनाही लागत नव्हता. लोकांचे ओठ घट्ट मिटलेले होते. असेच दिवस चाललेले होते. माहितीची कोंडी फुटत नव्हती. उभी आडवी माहिती घेतल्यावर तिन्ही पठाणांची खात्री झाली की, हे काम वांबोरीच्या पाटलाचंच. त्यानंच आपल्या दोस्ताला मारलंय. मारेकरी जे कोणी असतील ते असतील. पण ते त्याचे लोक आहेत हे खास. त्याला गाठून मऊ केलं की रस्ता दिसेल. त्याचं तोंड उचकटलं पाहिजे. नाहीतर आज त्याला मारलंय. उद्या आपली पाळी निश्चित आहे. अर्थात मरणाला घाबरतो तो पठाण कसला? पण आपल्या दोस्ताच्या मारेकऱ्यांचा तलास लावून त्यांचा खातमा करायच्या विचाराने ते अधीर झाले होते. त्यांनी ठरवलं, आपण थेट पाटलाच्या वाड्यावर जायचं. आणि फक्त तिघांनीच जायचं.

ते वांबोरीला गेले. पाटलाला म्हणाले, आमच्या दोस्ताला तुझ्या लोकांनी मारलंय. ते कोण कोण आहेत, ते सांग. पाटील म्हणाला, त्याला कोणी मारलंय हे मला माहीत नाही. पण माझी पोर माझ्या डोळ्यादेखत तुम्ही उचलून नेलीत, ती माझी मला द्या. पठाण

म्हणाले, तुझी पोर खुशाल आहे. ती देतो. नावं सांग. पाटील म्हणाला, आवं खरंच माहीत नाही, तर काय सांगू? तुम्हाला काय वाटतं, मी घडावलं ते? आवो, तुमच्या सारक्या लोकांशी झट्या घ्यायचा विचार मीच काय, आख्या सलतनीत आज कोणी करू सकत नाही. पठाण म्हणाले, तुझा पोरगा कुठंय? पाटील म्हणाला, गेला आसन लढाईवर. मला तरी तसंच सांगितलंय त्यानी. कोणाच्या फौजेत, ते माहीत नाही. गावातली अशी बरीच तरणी पोरं जातच आस्तेत कुठं ना कुठं मुलूखगिरीला. पण स्वतःची भैन तुम्ही लोकांनी उचलल्याचं माहीत असतानी माझ्या पोऱ्याला मुलूखगिरी सुसती याची मलाच चंडाळी आलीय. माझी पोर आणून द्या. लय मेहरबानकी होईल.

सामोपचाराने हे होणार नाही याचा अंदाज पठाणांना होताच. उलट पोरगी परत करण्याचं त्याचं टुमणं आणखी वाजायला लागलं. पठाण म्हणाले, तू तुझ्या जिनगानीत कधी पाहिले नसशील इतके पैसे देतो. नावं सांग. पाटील म्हणाला, आवो, खरंच माहीत नाही, तर काय सांगू? पैसे काय नको हायेत का मला? पठाण म्हणाले, तुझा पोरगा त्याच्यात असेल समजा, तरी त्याला आपण सोडून देऊ. नावं सांग. पाटील म्हणाला, आवो, खरंच माहीत नाही. कशाचाच उपयोग होत नाही असं दिसल्यावर पठाण खवळले. त्यांचा नेहमीचा रौद्र अवतार धारण करत म्हणाले, पाटील तुला तुझी जिंदगी प्यारी असेलच. पाटील म्हणाला, 'आवो मस प्यारी हाये. पन ती तुमच्या हातात गेलीय ना!'

एक यःकश्चित पाटील आपल्याशी न डरता असा बोलू शकतो. ठीक आहे आपण त्याची पोर नेली- तरीही ही हिंमत! एका तरण्याबांड, रगदार पठाणाचं डोकंच सटकलं. म्यानातली तलवार उपसत त्याने पाटलावर झेप घेतली. मोठ्या मुष्किलीने बाकी दोघांनी त्याला आवरलं. ते म्हणाले, 'ह्या वेळेला सोडतो आम्ही तुला. आम्हाला माहिती पाहिजे. तुला खतम करण्याची तमन्ना नाहीय. चार दिवसांनी आम्ही येऊ. तोवर विचार करून ठेव. तपास करून ठेव. अन तरीही नाहीच सांगितलं तर तुझ्यासकट तुझ्या साऱ्या गावाचा खातमा करून टाकू. राखरांगोळी करून टाकू. अन हे तू गावातल्या सगळ्या लोकांना सांगून ठेव.'

पठाण तिथून बाहेर आले आणि घोड्यावर बसून परत निघाले. दरम्यान पठाण वांबोरीच्या शिवाराच्या आसपास दिसताच एका खबऱ्यानं सुसाट डोंगरगणच्या रानाकडं जावून बातमी पोहोचती केली. म्हणाले, 'साले एक्या वक्ताला तिन्हीच्या तिन्ही? आपल्याला ठेपायाचे नाईत. लय बाजिंदी जात. आन ताकतिनी येकदम राकीस. काय तरी युगत करावा लागतो. अपुन येकदम झोंबलो अन तलवारीची खनाखनी केली तरी सुद्दा दमछाकीला ते जडच पडतीन. काय करावा?'

"हे पघा मी सांगतो. घाटात आडवायचं. माघच्या वक्ताला क्याल तसंच. येक जन त्यांला बोलन्यात आडकवनार. बाकीचे तीन तीन आशे दोन्ही अंगाला दबा धरून बसतीन. आन एक्याच वखताला दोन्हीकून भाले फेकायचे. जाग्याव गारद झाले पायजेत. आन मंग तलवारीतं हायेतच...'

जातिवंत अरबी घोड्यांवर स्वार झालेले पठाण, टापांचा आवाज आणि उठणारा फुफाटा जवळ येत चालला तशी रस्त्यात उभ्या चौथे याच्या हृदयातली धडधड वाढू लागली. हे असं मध्ये उभं राहून पठाणांना अडवायचं युक्तीचं काम त्याच्यासाठी अवघड

होतं. विशेषतः बोलणं, बोलण्यात अडकवणं. तो स्वतःच मुळात कमी बोलणारा होता. कृतीवर भरोसा ठेवणं त्याला सोयीचं वाटे. पण हे शाब्दिक कृतीचं काम त्याला सांगण्यात आलेलं होतं. कारण भालाफेकीत तो तितका पारंगत नव्हता असं बाकीच्यांचं मत पडलं. तेही त्याला तितकं मान्य नव्हतं. कमसीकम पठारेला तरी तो नक्कीच भारी होता. अन बाकीचे सारे- विशेषकरून तिडके आणि एडके त्याला म्हणजे पठारेला निष्कारण जास्त जपतात, असा त्याचा ग्रह झाला होता. पण त्यानं आपलं हे मत कोणाही जवळ प्रकट केलेलं नव्हतं. शिवाय पठारे जरा लहानच आहे तर त्याला जपणं योग्यच आहे, असं त्यालाही स्वतःशी वाटतच होतं.

घोडे कासराभर अंतरावर आल्यासरशी उंच, तगडा, अंगी बैलाचे बळ असलेला चौथे पुन्हा पुन्हा कुर्निसात करत आपल्या बेंगरूळ आवाजात ओरडला,

'खबर है हुजूऽऽ र, खबर है मालिऽऽ क' तो हे पुन्हा पुन्हा कुर्निसात करत म्हणत राहिला. पठाणांचे घोडे त्याच्या निकट येऊन थबकले. 'क्या खबर है? और यहाँ क्या कर रहा है तू?' 'वो लोक मारतीन मेरेकू. म्हनून यहा-' 'कौन मारेगा?' 'वो पाटील मारेगा. वांबोरी पाटील.' 'उसका क्या?' 'उसनेच मारून टाखला पठान हुजूर.'

पठाण एकमेकात बोलत राहिले. ते त्यांच्या मातृभाषेत- पश्तु भाषेत बोलत होते.

'तू चल हमारे साथ. बैठ मेरे साथ.' एका पठाणाने हाताने संकेत केला.

'मी क्या करिंगा? नको, नको. मै तर खबर-बक्षीस. वो पाटील मेरे का पन मारून टाकतो.'

'वही तो. चल, चल जल्दी. बक्षीश मिलेगा.'

'नको, नको.' म्हणत चौथे बाजूला पळाला. त्याला पकडण्यासाठी पठाणांनी घोडे वळवले. त्याच क्षणी मोजून सहा भाले सणाणत त्याच्या दिशेने आले. त्यातल्या दोघांना ते वर्मी बसले. पण तिसऱ्याच्या अगदी जवळून भाला पुढे गेला. भाला घुसला म्हणून लगेच पठाण कोसळले असं झालं नाही. पण जखमी तर झालेच होते ते. त्यांचे घोडे सुद्धा जखमी झाले होते. प्रसंग ओळखून तिसऱ्याने आपला घोडा सोडला. त्याचा तो घोडाही जखमी झालेलाच होता. पण धन्याने टाच लावताच तो निघाला. पुढे कुठेतरी दमछाक होऊन तो कोसळला देखील असता. पण जीवात जीव आहे तोवर आज्ञेसरशी धावण्याची शिकवण त्याला मिळालेली होती.

'एऽऽ सायब्या घोडा घे तुझा अन सूट त्याच्या माघं. आडव त्याला. आम्ही येतो मागोमाग.' एडके म्हणाला, अन चौथ्याऽऽ घे तुझी तलवार. चल.'

चौथे त्या पाच जणांना सामील होण्याच्या आधी सायबू घोड्यावर स्वार झाला आणि सुसाट सुटला. त्याच्याआधी एडकेची आज्ञा ऐकताना, आवो, पन मी कसं काय? असं तो तोंडातल्या तोंडात म्हणाला. पण ते स्वतः त्याच्या खेरीज कोणालाही ऐकायला आलं नाही. घोडा सुटल्यावर मात्र ती डुचमळ संपली. हवा कापत घोडा दौडत होता तसतसं त्याचं मन लख्ख होत होतं. पठाणाचा अरबी घोडा कुठेही दृष्टीस येत नव्हता. पण कुठंतरी तो सापडेल हे नक्की होतं. त्याचा घोडा जखमी झालेला होता. त्याची दमछाक होणारच होती. रस्ता मैदानी होता. लांबवर नजर पोहोचत होती. पण पठाणाचा घोडा दिसत नव्हता. अखेर बेहिश्त बागेच्या अर्धा कोस अल्याड रस्त्याच्या बाजूला कोसळलेला

पठाणाचा घोडा दिसला. रक्त आणि घामाच्या थारोळ्यात तो जेमतेम मान धरून बसलेला होता. पठाण त्याचं मस्तक कुरवाळत होता. शत्रू आपल्या मागावर आला म्हणून पठाण घाबरला नाही. उठला आणि परजत्या तलवारीसह तो त्याला सामोरा गेला. त्याचं ते अवसान बघून घोड्यावर स्वार असूनही सायबूच काळीज हलल. पण क्षणभरच. पुढच्या क्षणी घोडा भरधाव सोडत जवळ जाऊन त्याने पठाणावर वार केला. तो पठाणाने सहज चुकवला. अननुभवी पोऱ्या दिसतोय, हे पठाणाच्या त्वरित लक्षात आलं. तरीही त्याला हूल देऊन पळणं शक्य उरलेलं नव्हतं. तो घोड्यावर होता. बाकीचे लोक येण्याच्या आत या पोऱ्याचा खातमा करून, किमानपक्षी त्याला घायाळ करून पळ काढला तरच जीव वाचण्याची शक्यता आहे, हे त्यानं जाणलं. पण तेही समोरासमोर लढूनच शक्य होतं. ते तातडीने करणं गरजेचं होतं. दुसऱ्या वेळी घोडा निकट आला त्याक्षणी पठाणाने शत्रूचा वार तर चुकवलाच पण त्याच ओघात घोड्याचा पाय सापकन काढला. त्यामुळ घोडा पुढे जाऊन कोसळला आणि त्याच्यावर स्वार असलेला सायबू देखील जमिनीवर आला. तो गडबडीने उठून उभा राहिस्तोवर पठाण त्याच्या निकट पोहोचला. आणि तलवारींची खणाखणी सुरू झाली. तिथं पठाणाच्या लक्षात आलं की, पोऱ्या कोवळा दिसतोय पण तो तलवारबाजीत पारंगत आहे. हा सहजी सापडण्याजोगा नाहीय. त्याला दमवणे आणि त्याच्या हालचालीत सुस्ती आली की संधी साधणे इतकेच आपल्या हाती आहे. घाव घालणे, चुकवणे, पुन्हा वार करणे याचे कितीतरी पवित्रे दोघांनीही आजमावले. पण नुसता खणखणाट होत होता. दोघेही अत्यंत चपळ आणि येकंगबाजीत तोडीस तोड होते. दोघांच्याही अंगावर जखम तर सोडा, साधा ओरखडा सुद्धा उमटलेला नव्हता. तशात उरलेल्यांचे घोडे निकट आल्याची चाहूल लागली तेव्हा दोघाही योद्धयांची एकाग्रता पळभर ढळली, त्यात पठाणाची अधिक. त्याच्या छातीच्या डाव्या बाजूला वार पडला. पण पुढच्याच क्षणी त्यानेही सायबूच्या उजव्या बरगडीची साल काढली. हे दृष्य पाहून वांबोरीचे ते सहा वीर क्षणभर दिडमूढच झाले. कोवळा सायबू पठाणाशी समोरासमोर तोडीस तोड लढत होता. तरीही हे परवडणारे नव्हते. आता पठाणानेही पळून जाण्याचा विचार सोडला. लढता लढता मरणे हीच गती आपल्याला उरलेली आहे, हे त्याने ओळखले. तो अधिक त्वेषाने तलवार चालवू लागला. सायबू दमत चालल्याची चिन्हे दिसू लागली. पण आता भोवताली आणखी सहा लांडगे होते. ते संधी शोधत होते. बिजलीसारख्या वेगाने चाललेल्या त्या खणाखणीत शिरताना चुकून आपल्या मित्रावर घाव पडायला नको म्हणून सावधानी बाळगणे त्यांना आवश्यक होते. तलवारबाजांची लय लक्षात घेऊन एका क्षणी डोळ्याचे पाते लवायच्या आत संधी साधत शितोळे याने पठाणास धडक दिली आणि तो पडत असतानाच शुकरे आणि चौथे यांच्या तलवारीचे घाव त्याच्या पाठीवर बसले. वेदनेने तो उताणा झाला तेव्हा उरावर घाव. त्याच्या छातीवर पाय देऊन एडकेनं विचारलं, माजी भैन किदर? हाच प्रश्न काही वेळाआधी त्याने घाटात मारलेल्या दोन्ही पठाणांना विचारला होता. त्यांच्याकडून काहीही माहिती मिळाली नव्हती. किंवा काही सांगण्याच्या, बोलण्याच्या परिस्थितीत कदाचित ते उरलेले नव्हते. हा अजून होता. एडके पुन्हा पुन्हा विचारत होता, 'माजी भैन किदर?' पठाण काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होता. पण त्याच्या अंगात तितकी ताकद कदाचित उरली नव्हती.

अगदी जोराचा प्रयत्न करून एकदा तो म्हणाला, 'मेरा घर- मेरा बिबी का...' तिडकेनं त्याला लाथ घातली. 'तुझं घर अन तुझी बिबी यांचं आम्हाला काय घेणंय?' तो म्हणाला. भराभर सगळे घोड्यावर स्वार झाले. जखमी सायबूला शुकरे याने आपल्यासोबत आपल्या घोड्यावर घेतलं. ते टोळधाडीसारखे आले आणि तसेच नाहीसे झाले. भरदिवसा सुलतानाच्या राजवाड्यापासून अर्ध्या कोसावर त्यांनी अखेरचा पठाण मारला आणि ते त्यांच्या गुहेत जावून बसले.

हा सगळा साहिबखान राजधानी अहमदनगरमध्ये घालत असलेल्या धुमाकुळीचा काळ. मद्यधुंद अवस्थेत हत्तीवर बसून अहमदनगरच्या रस्त्यांवरून तो बेतालपणे हिंडत असे. देखणी पोरे-पोरी यांच्याशी भररस्त्यात असभ्य चाळे करत असे. तो सुलतानाचे प्रियपात्र असल्याने त्याच्या विरुद्ध कोणीच तक्रार करू शकत नव्हते. वजीर व पेशवा असलेल्या काझी बेग याच्या विरुद्ध त्याने सुलतानाचे कान फुकले. सुलतानाने त्यास काढून टाकून त्याच्या जागी आसदखान यास वकील आणि पेशवा म्हणून नेमले. साहिबखान याने परदेशी मुसलमान सरदारांचा संहार घडवून आणला. त्यांच्यातले बरेच बरीदशाही, आदिलशाहीत पळून गेले. सुलतानाने त्यांना पळून जावू दिले,एवढेच नाही तर काहींना आसरा दिला म्हणून रुसून जावून साहिबखान परांडा येथे पळून गेला. तो तिथून काही केल्या परतेना. आणि सुलतानास त्याचे वाचून गमेना. त्याने परतण्यासाठी सुलतानास तीन अटी घातल्या. सय्यद मुर्तजाखान आणि त्याचे इतर परदेशी मुसलमान ; ज्यांना सुलतानाने आसरा दिलेला आहे, त्यांना त्याने मारून टाकावे. सलाबतखान यास दरबारातून काढून टाकावे. आणि तिसरे, अहमदनगर येथून पळालेल्या अनेक परदेशी मुसलमानांनी बिदर येथे आश्रय घेतलेला आहे. त्या राज्यावर सुलतानाने हल्ला करावा व ते राज्य जिंकावे. आपल्या राज्याच्या सुरक्षिततेसाठी सुलतानास पहिली अट मान्य करणे शक्य नव्हते. पण त्याने सलाबतखान यास दरबारातून काढून बीड येथे पाठविले. आणि आपल्या फौजेसह बिदरवर मोहीम काढली. त्यात त्याला कुतुबशहाने साथ दिली. साहजिकच बरीदशहाने आदिलशाहीकडे मदतीची याचना केली. नंतर प्रत्यक्ष लढाई न करता बरीदशहा सुलतानास शरण आला. ते काही साहिबखानास रुचले नाही. कारण तिथे आश्रयास गेलेल्या परदेशी मुसलमानांचा खातमा झालाच नाही. त्यामुळे सुलतानाच्या मिन्नतवाऱ्यांना अजिबातही दाद न देता तो उदगीर येथे आपल्या जहागिरीत निघून गेला. अखेर नवा पेशवा व वकील आसदखान आणि काही परदेशी मुसलमान सरदार यांच्या सल्ल्यावरून सुलतानाने आपल्या या प्रिय पात्राविरुद्ध मोहीम आखली. दरम्यान साहिबखान याने बहिरीखान किझीबलाश नावाच्या सरदाराकडे स्वतःसाठी त्याची मुलगी मागितली. त्यास नकार मिळताच त्याने त्याच्यावर हल्ला केला. त्यातून बहिरीखान पळाला आणि जालन्यास गेला. सुलतानाच्या फौजेतील परदेशी मुसलमानांचा नेता सय्यद मुर्तजाखान याच्या सूचनेवरून त्याच्या काही अनुयायांनी साहिबखानाच्या गोटात प्रवेश केला आणि त्याचा गळा दाबून त्यांनी त्यास मारून टाकले. साहिबखान याने सुलतानाच्या फौजेवर हल्ला केला आणि त्यात तो मारला गेला, असे सुलतानास सांगितले गेले. आपल्या प्रियपात्राच्या मृत्यूने सुलतान अत्यंत कष्टी झाला. अनेक वेळा तात्पुरता होत असे तसा तो विरक्त झाला. राज्याच्या कारभारापासून दूर झाला.

सुलतान उद्गीरहून कंधार येथे गेला. राज्यकारभारातून त्याने अंग काढले. त्यामुळे सुलतानाचा मृत्यू झाल्याच्या अफवा उठल्या. त्याचा धाकटा भाऊ बुन्हाण निजाम शहा लोहगड येथे कैदेत होता. तेथील कोतवाल जुझारखान याने त्यास मुक्त करून त्यास स्वतःची मुलगी दिली. आणि जुन्नर येथे त्यास नेऊन तो सुलतान असल्याचे जाहीर केले. बुन्हाणने त्याच्या फौजेसह अहमदनगरकडे कूच केले. हे कळल्यावर सुलतानाने पेशवा आसदखान यास आधी अहमदनगरला फौजेसह पाठविले. तो बुन्हाणच्या जेमतेम एक दिवस आधी अहमदनगरास पोहोचला. नंतर काही दिवसांनी सुलतान अहमदनगरला पोहोचला. आपल्या मृत्यूची बातमी चुकीची आहे, हे सिद्ध करण्यासाठी त्याने स्वतःची शहरातून मिरवणूक काढली. दरम्यान साहिबखान याचा मृत्यू झाल्याने अनेक परदेशी मुसलमान सरदार प्रकट झाले आणि सुलतानाला सामील झाले. त्यांचा नेता सलाबतखान यास सुलतानाने पुन्हा पाचारण केले. बुन्हाण शहाच्या लोकांना जेव्हा सुलतान जिवंत आहे हे कळले, तेव्हा ते त्यास सोडून गेले. जुझारखान मारला गेला. बुन्हाण पळून विजापूरास गेला. सुलतानाचे वेडेचार थांबले नाही. तो कधी राज्य त्यागाच्या गोष्टी करी, कधी मक्केस जाण्याच्या गोष्टी करी. त्याच्या वेडेपणाच्या आवरणाखाली त्याची हुषारी मात्र कायम होती. त्याने आसदखानाच्या जागी शाह हैदर याची नेमणूक केली. त्याने सूत्रे हाती येताच परदेशी सरदारांची राजधानीतून हकालपट्टी केली. त्यांना सरहद्दींचे रक्षण करण्याच्या मिषाने बुहाणपूरकडे पाठविले. आसदखान यास दौलताबाद येथे पाठविले. शाह हैदर याचे हाती निरंकुश सत्ता आली. तो उद्दामपणे वागू लागला. सुलतान त्यास अधूनमधून टोकत असे. पण त्याचा उपयोग होईना. सुलतानाने गुपचूप दौलताबादेस प्रयाण केले. तिथे त्यास सलाबतखान येऊन मिळाला. तिथे दरबार भरवून सुलतानाने आसदखान यास पुन्हा वकील आणि पेशवा म्हणून नियुक्त केले. सलाबतखान आपल्यासोबत असेल तर आपण हे स्वीकारू, असे आसदखान म्हणाला. त्यानंतर सुलतान अहमदनगरला एका राजवाड्यात एकटा राहून वाचन करीत असे. तिथे त्याचे नवीन प्रियपात्र फत्तेशहा याच्याखेरीज कोणालाही प्रवेश नसे. अपवाद आसदखान आणि सलाबतखान यांचा. अर्थात तेही फत्तेशाहाच्या द्वाराच सुलतानास भेटत. आणि राज्यकारभार चालवत. नंतर सारा कारभार सलाबतखानाच्या ताब्यात आला व त्याने तो उत्तम केला. आपल्या कथेत पहिला पठाण मारला गेला तेव्हा साहिबखान अहमदनगर येथे होता. नंतर तो परांडा व तिथून उदगीरला गेला. तिथून सलाबतखान यास बीड येथे पाठविण्याची व्यवस्था त्याने केली. पुढे तो मारला गेला आणि सलाबतखान सत्तेत आला. हा सगळा मधला काळ हे वांबोरीचे सात मराठे चारही पठाणांना मारून डोंगरगणच्या रानातल्या गुहेत होते. इतक्या सगळ्या धामधुमीत त्यांच्या कारनाम्याकडे कोणाचे ही तितके लक्ष गेले नव्हते. पण सलाबतखान त्यावर लक्ष ठेऊन होता. अर्थात ते तितकेच. कारण तोही आता दरबारात नव्हता. पण साहिबखानाचा मृत्यू आणि नंतरच्या घटनांनी त्याला पुन्हा दरबारात प्रवेश मिळाला. तोही अधिक अधिकारासह.

ते गुहेत पुन्हा शिरल्यावर आधी काही दिवस जल्लोषात गेले. यानी काय केलं, त्यानी काय केलं, असं एकमेकांचं गुणगान. पण ते किती दिवस पुरणार? एकमेकांच्या इतकं निकट राहताना एकमेकांच्या अनेक बऱ्या-वाईट गोष्टी दिसतात, समजतात. समोर कसलंही ध्येय

नसताना वाईट म्हणा वा चुकीच्या गोष्टी जास्त दिसतात आणि खुपतात सुद्धा. पठाणांना मारायची खुमखुमी होती. ती जिरली. पाटलाची पोर सापडण्याची शक्यता नव्हती. आणि सापडून तरी काय? तिचं जे करायचं ते त्या हैवानांनी केलंच असेल. पठाणांचा सूड उगवला इतकाच काय तो आनंद. पोरीला शोधायचा विचार त्यांनी सोडून दिला होता. उरली एकच गती. सापडू नये म्हणून छपून राहणे. ते किती दिवस करावे लागेल याचा काहीच अंदाज कोणालाही नव्हता. हळूहळू एक प्रकारचा वैताग तिथल्या हवेत दरवळू लागला. कोणीतरी मोठ्याने घोरायचा आणि बाकीच्यांची झोप खराब करायचा. आणखी कोणीतरी भयंकर पादायचा आणि बाकीच्यांच्या नाकातले केस जळायची वेळ आणायचा. आणखी एकजण भयंकर खादाड्या होता. आणखी एकजण खूप गदळ राहायचा. खरं म्हणजे कमीअधिक प्रमाणात ते सगळेच हे असे होते. अन ते एकमेकांना खादाड्या, पादऱ्या, शेंबड्या, ढोल्या, बोंबीलभिक्या, खंदाडगचक्या अशा शेलक्या विशेषणांनी पुकारू लागले. हे फार चुकीचं होतंय, असं कमीअधिक प्रमाणात वेळोवेळी सगळयांनाच जाणवे. यातून मार्ग काढायला हवा हेही. ते बाहेरच्या बातम्या घेत होते. लपूनछपून अधूनमधून रात्री आपापल्या घरी जावून येत होते. सायबू आणि तिडके सोडले तर बाकीच्यांची लग्ने झालेली होती. बायकांना भेटल्याखेरीज कसं राहवणार त्यांना? तरणेबांड गडी होते. सायबू त्याच्या घरी गेला नव्हता. एडके जवळ त्याच्यासाठी निरोप आला. एकदा येऊन जा म्हणून. बापाने त्याचे लग्न निश्चित केले होते. पण हा उद्योग करून त्याने सगळे अनिश्चित आणि अधांतरी करून टाकले होते. मुलगीकडचे लोक किती काळ थांबून राहणार? घरी गेलो की आपला बाप आपल्याला वाजवणार, या भीतीने सायबू घरी जायचे टाळत होता. ह्या सातजणांनीच हा उद्योग केल्याचे गावात सगळीकडे माहीत झालेले होते. लोकांना या पोरांविषयी अभिमानच वाटत होता. त्याविषयी कोणी कोणाशी बोलत नव्हते इतकेच. पण कधी ना कधी ते कुठून ना कुठून उघड होणारच होते. इतक्या सगळया लोकात एखादा कुणीतरी पचकणारच आणि खबरे तर होतेच सारीकडे. आणि ते झाले की मृत्यूदंड हमखास. सुलतान मुर्तजा निजाम शहा त्यासाठी माहीर होता. नुसत्या संशयावरून त्याने कित्येकांना यमसदनाला पाठविल्याच्या कैक वार्ता हवेत कायम असत.

साहिबखान मारला गेला आहे आणि सलाबतखान सत्तेत मोठ्या जागी आला आहे. सुलतान कोणत्यातरी राजवाड्यात एकटाच राहतो. आसदखान आणि सलाबतखान हेच कारभार चालवतात. अशा खबरा लागल्यावर रहाणेच्या मनात रस्ता उगवला. आपण मारले ते पठाण साहिबखान याचे. सलाबतखानास तो आवडत नव्हता. आपण काही जिंदगीभर छपून राहू शकत नाही. कधी ना कधी हे उघड होणारच. त्यापेक्षा स्वतः होऊन सलाबतखानासमोर हजर झालो आणि अशाअशा कारणाने असंअसं केलं असं सांगितलं तर? त्याचा सावधपणे अंदाज घेतला तर? तसा विचार करणं नक्कीच शक्य होतं. शितोळे आणि राहणे यांनी निजामशाही फौजेत नोकरी केलेली होती. ज्याच्याकडून आपण सलाबतखानापर्यंत पोहोचू शकू, असा एक दवा रहाणेला माहीत होता. किंबहुना त्याच्या हाताखालीच त्याने काम केलेले होते. त्याचे नाव होते दौलतखान. अनेक लढायात त्याने खानाचा विश्वास मिळवलेला होता.

रहाणेला वाटलं, सगळयांशी बोलावं का? त्याने विचार केला आणि ठरवलं की नको.

सगळे म्हणतील, तू स्वतः होऊन आम्हाला मरणाच्या खाईत लोटतो आहेस. मरण तर आहेच अखेर. पण ते यायचं तेव्हा येईल. तोवर जमेल तसं जगायला काय हरकत? किंबहुना तेच योग्य. मग त्याला वाटलं, शितोळेशी बोलावं? त्याने विचार केला आणि ठरवलं की तेही नको. त्याला नाही पटलं तर तोही बाकीच्यांशी बोलणार. नकोच ते.

एका रात्री रहाणे घरी जाण्याच्या मिषाने बाहेर पडला ते थेट अहमदनगरला दौलतखान याच्या घरी पोहोचला. रात्री इतक्या उशिरा आणि आधी काहीच न कळवता तो गेला तरी त्याला भेट मिळाली. खान सुखाने शराब पित बसला होता. आणि चांगल्या मनःस्थितीत होता. मग काय, कसं काय, तू दीड वर्षांआधी गेलास ते आज उगवतो आहेस, मला वाटलं आणखी कुठं अधिक कमाई असणाऱ्या ठिकाणी गेलास. अरे अधिक कमाई तर मीच मिळवून दिली असती तुला. मधल्या बिदरच्या मोहिमेत लढाई न करता आपल्या लोकांना फार चांगली कमाई झाली. तू काय करत होतास, काय करतोस? खानाने प्रश्नांची सरबत्ती केली.

'गावीच होतो. आमच्याकडे काही पठाण जहागीरदारांनी फार जुलूम चालवला होता. वडील म्हातारे झालेले. घरी लहान्या बहिणी-बाळा. त्यांना

आधार देण्यासाठी थांबलो.'

'अरे हां, ते चार पठाण-त्यांची कतल झाली ना. मी ऐकलंय. पण कतल करणारे सापडले नाहीत अजून. बराच वख्त झाला. त्याचा तपासही तितका जोर लावून होत नसेल म्हणा. ते त्या हरामजाद्या साहिबखानाचे लोक होते. त्याचा खातमा झाला म्हणून आम्ही लोक जरा निवांत झालोत. आता सगळा कारोबार आसदखान आणि सलाबतखान यांच्या ताब्यात.

'का बरं? सुलतान स्वतः नाही बघत? ते तर मालिक आहेत.'

आहेत ना. मालिक तेच. पण होतं असं त्यांचं अधूनमधून. ते आता राजवाड्यात एकटेच राहतात. वाचत बसतात. नवीन एक पात्र आहे फत्तेशहा नावाचं. ते असतं सोबत. गरज असेल तेव्हा हे दोघे त्याच्याच परवानगीने सुलतानाला भेटतात. तुला तर माहीत आहे, सलाबतखान आपले मालिक-'

'म्हणून तर आलोय तुम्हाला भेटायला.' "मतलब?'

'पठाणांना ज्यांनी मारलंय ते लोक मला माहीत आहेत. आमच्या गावात सगळयांना माहीत आहेत. अर्थात पुरावा कोणाकडंच नाहीय. पण माहीत आहेत. कुणी ते बोलत नाही. कारण पठाणांच्या जुलमातून त्या लोकांनी आपली सुटकाच केलीय, अशी लोकांची भावना आहे. ते लोक पकडले गेले तर त्यांना सजा होईल. लोकांच्या मनाला ठेच बसेल. अर्थात सुलतानाच्या हुकमापुढे कोण काय करू शकतो, म्हणा?'

'याच्यात मी काय करू शकतो?'

'त्या सातजणांना सजा काय करायची ती करा; पण त्यांची जान वाचवा. ती वाचविण्यासाठी काहीतरी युगत करा अशी माझी आपल्याकडे अर्जी आहे. हुजूर तशी नुसती जुबान देत असतील तरी मी त्यांची नावं आणि

ठिकाणा सांगेन.'

'सात? सात लोग आहेत इतकं नेमकं कसं तुला माहित?'

'कारण मी स्वतःच त्यांच्यातला एक आहे.'

दौलतखानाला शराब चढली होती. तरीही त्याच्या लक्षात आलं की ह्या मामल्याविषयी नंतर बोललं पाहिजे. त्यानं रहाणेला मुक्कामी ठेवून घेतलं. दुसऱ्या दिवशी त्याच्याकडून खरं खरं ते सगळं काढून घेतलं. अन् म्हणाला, 'तू आता माझ्याकडे राहाणं अधिक शहाणपणाचं होईल. मी काय तुला कैद करत नाहीय. पण पळालास तर आमचे लोक येतील आणि तुला दरबारात हाजीर करतील. तुझ्याकडून नावं घेतील, बाकीच्यांना पकडून आणतील आणि तिथंच तुमचा फैसला होईल. अन् फैसला सजा-ए-मौतच. यात काहीच फरक होणार नाही. त्यापेक्षा तू माझ्याकडं राहा. मी विचार करतो. काय तरकीब सापडते का बघतो. नायतरी ते साहिबखानाचेच लोग होते. तो आमच्या लोगांच्या जानच्या पाठी हैवानासारखा लागलेला होता. आम्हाला त्याच्या लोगांच्या कायच प्यार नाही. पण मला सोचलं पाहिजे. आता इतकीच जुबान मी तुला देऊ शकतो. तुला जे करायचं ते करायला तू मुख्त्यार आहेस.' रहाणे थांबला. तेच सोयीचं होतं. खरंतर तेवढा एकच पर्याय त्याला उपलब्ध होता. आधी त्याला वाटलं, डोंगरगणला जावून आपल्या दोस्तांना काय झालं ते सांगावं. पण त्यातही आता अर्थ उरला नव्हता. कोणीही ते समजून घेतलं नसतं. आपण गायब झालो म्हणून आपल्या नावाने ते बोंबा मारणार हे तर नक्की. दौलतखानाशी बोलून आपण सगळ्यांसाठी एक हिशेबशीर जोखीम पत्करलेली आहे. तो दगा करील असं वाटत नाही. पण काहीही होऊ शकतं. पण ते तर काहीच न करताही होऊ शकतं. त्यामुळं, व्हायचं ते होईल. त्याचा विचार करण्यात आता मतलब नाही.

दौलतखानाचं ऐकून घेतल्यावर बाकी काहीही प्रतिक्रिया न देता सलाबतखान याने फर्मावलं, तुझ्याकडचा माणूस माझ्याकडे पाठव. मी बोलावलं की भेटीला ये. दौलतखान मनातून टरकला. त्याला वाटलं, आपण मोठ्या अपेक्षेने गेलो. सगळं खरं खरं ते सांगितलं. आपली अपेक्षा मोठ्या नजाकतीने पेश केली. अन् शेवटी सामोरी आली ती फक्त दोन वाक्यं. तुझ्याकडचा माणूस माझ्याकडे पाठव. मी बोलावलं की भेटीला ये. सांगितलं तेवढं करायचं आणि गप्प राहायचं. त्यानंही मग रहाणेला संक्षिप्तपणे सांगितलं, तुला खानसाहेबांनी बोलावलं आहे.

सलाबतखानाने झटपट हालचाली केल्या. रहाणेकडून माहिती मिळताच डोंगरगणच्या घाटात माणसं पाठवली. सहाही जणांना जेरबंद केलं. काहीही न विचारता त्यांना भरपूर चोप देऊन मऊ केलं. त्याच्यानंतर विचारलं. माहिती मिळाल्यावर काय झालं असेल आणि कसं याचा खानाला उत्तम अंदाज आला. त्याने रहाणेला त्या सहाजणात मिसळू दिलं नाही. त्याने आपला पत्ता दौलतखानाला दिला हे त्यांना कळणारच. आणि ते समजल्यावर ते त्याला जिवंत ठेवणार नाहीत, हे सरळच होतं. दौलतखानाला बोलावून त्यानं सांगितलं, तुझा माणूस माझ्याकडं राहील. तू या सहा जणातला एकजण तुझ्याकडं घेऊन जा. बाकी पाच बीडला जातील. तिथं ते घोड्यांना खरारा करतील. त्यांची निगा राखतील. आवश्यक तेव्हा लष्कराची भांडी घासतील. पाच एकत्र राहू शकतात. सहा नाही. हाताला किंवा पायाला पाच बोटं असतात. सहा नव्हेत. पाच नैसर्गिक आहे. तसेच एक किंवा दोन नैसर्गिक. माणूस एक असतो. त्याला दोन दोन हात, पाय, डोळे, नाकपुड्या, ओठ, कान, असे शिवलेले असतात. माणूस नसणं म्हणजे शून्य. माणूस असणं म्हणजे एक. माणूस एक

असतो तेव्हा सगळीकडे दोन एकत्र शिवलेला असतो. म्हणून एक, दोन, पाच हे नैसर्गिक. तिथं तोल असतो. दौलतखानाला ते नीट समजलं नाही. पण त्याने एक निवडला. त्यासाठी त्याने खास विचार नाही केला. पण सहज कोणीतरी निवडायचा म्हणून त्याने सायबू निवडला. अंततः रहाणे सलाबतखानाकडे, सायबू दौलतखानाकडे आणि बाकीचे बीडला अशी विभागणी झाली. सांगितलेले काम नीट करा. त्यात कुचराई केलीत तर डोळे काढले जातील, खाल उतरवली जाईल, जिवंतपणी तुमचे मांस कोल्ह्याकुत्र्यांना खाऊ घातले जाईल. नीट वागाल तर काय करायचं त्याचा फैसला मी करीन, सलाबतखान म्हणाला. त्या सगळ्यांचं पुढे काय होणार हे अर्थातच दौलतखानाला समजलं नाही. तो विचारुही शकत नव्हता. सलाबतखानाने त्याचा विचार केलेला होता. पण तो कोणाला सांगायला बांधलेला थोडाच होता? सायबूसकट सहाही जणांना रहाणे दिसला नाही. तरीही त्याच्याचमुळे आपण पकडलो गेलो आहोत आणि मरणाच्या दारात उभे आहोत, हे त्यांना जाणवलं. गायब झालेला रहाणेच फितूर झाला, हे त्यांना इतर कोणी सांगण्याची गरज थोडीच होती? ते त्यांच्या जगण्यात अधांतरी उभे होते. आणि रहाणे हा एकच शत्रू त्यांना दिसत होता. पण ते काहीही करू शकत नव्हते. सांगितलेलं काम नीट करत जगण्याच्या आकांक्षा बाळगायच्या एवढंच त्यांच्या हाती होतं. रहाणे आणि सायबू काही वेगळा विचार करू शकत होते, असं थोडंच होतं? आपापल्या जागी अधांतरी कण्हत जगणं इतकंच त्यांच्या हाती होतं.

सलाबतखान दौलतखानाला म्हणाला, 'यांचा निवाडा त्यांना सुलतानाकडे नेण्याऐवजी मीच केला आहे, हे तुला सांगण्याची जरुरत नाही. तरीही सांगतो. आसदखानाशी बोलून यांच्या गावासकट यांच्या भागातल्या बाकी गावांची जागीर मी माझ्या नावावर करून घेतली आहे. त्यामुळे माझ्या जागीरमध्ये मीच निवाडा करणार, हे सरळ आहे. यांची सजा कधी संपेल हे मी ठरवीन. पण हे मी तुझ्यासाठी करतोय हे ध्यानात घे. अन मोठा चालाक आहेस तू. जो पोऱ्या तू खुदसाठी निवडलास तो फार होनहार आहे. तो अकेला एका पठाणाशी लडला होता. एक अकेला म-हाटा बच्चा कोणाशी पन लडने की हिंमत रखतो. ये सभी ऐसे ही है. आपल्याला सुकून मंदी जिंदगी बितवायची आसल तर यानला निस्कारनी दर्द नाय पहुचवायचा. पन म्हनून आपला रौब टिकवायचा नाई आसं नाई. आपुन लोगांनी ये बाते खयालमंदी रखली पायजे. हे पठाण लोग तितके बुरे न होते. पन त्या हलकट साहिबखानच्या नादाला लागून त्यांनी खराब गोष्टी केल्या.'

आपल्याला मारून टाकलेलं नाहीय. इथं फौजेत घोड्यांची देखभाल म्हणजे फार हलकं काम नाहीय. भांडी घासावी लागणं बेकारच आहे. पण अगदी मेहेतर लोकांचं काम सुद्धा करायला लावू शकत होते ते. तसं झालेलं नाहीय. आपली सुटका कधी होईल ते माहीत नाहीय. होईलच अशी कसलीच खात्री नाही. अन झालंय ते साला हरामी रहाणेच्या फितुरीमुळं. तो फितूर झाला अन हे आपल्या नशिबी आलं. तो गायब होतो अन दोन दिवसात आपल्या सगळ्यांना एकाच वेळी कैद केलं जातं याचा अर्थ वेगळा असूच शकत नाही. जगलो वाचलो तर त्याचा निकाल करायचाच. त्याच्यातून त्या हराम्याची काही झालं तरी सुटका नाही. आपण सुटलो की त्याचा खातमा ठरलेलाच. त्यात काहीही केल्या बदल होणार नाही... बीडला फौजेसाठी कामे करताना ते पाचजण स्वतःशी आणि

एकमेकात बोलत असत. त्वेषाच्या भावनेत भांडी अगदी स्वच्छ होत तर घोड्यांना अंमळ जास्ती खरारा होई आणि ते नाखुषीच्या हालचाली करत. म्हणून ते घोड्यांना चोंभाळत आणि त्यांना अधिक प्रेम दाखवत. त्यांच्यासाठी अधिक चांगल्या तोबऱ्याची तजवीज करत. पण रहाणे विषयीच्या त्यांच्या भावना काही केल्या थंड होत नसत. इकडे, अश्वपरीक्षण आणि प्रशिक्षण यात रहाणे वाकबगार आहे, असं दौलतखानाने सांगितलं म्हणून सलाबतखानाने त्याची आधी नीट परीक्षा केली आणि त्याला त्याच कामावर रुजू केलं. तर सायबूविषयी दौलतखानाला जी मालूमात सलाबतखानाकडून झाली त्यामुळे त्याने त्याला अनेक प्रकारे जोखून-पारखून आपल्या खाजगीत खिदमदगार म्हणून कायम केलं.

त्या सातही जणांचं पाच अधिक एक अधिक एक असं आपापल्या जागी चाललेलं होतं. वेगळं काहीही घडत नव्हतं. हे असं किती काळ चालणार हे कोणालाही कळत नव्हतं. बीडमधल्या पाचातल्या चौघांना गावाच्या, त्यांच्या बायकांच्या आठवणी येत. पण त्याही क्षीण होत चालल्या होत्या. दिवसभर श्रम इतके होत की भुईला पाठ टेकल्यासरशी झोप लागे. अगदी स्वप्न पडण्याइतकी फुरसद सुद्धा मनास सापडणे कठीण होई. रहाणेचा बव्हंशी सगळा वेळ सलाबतखानाच्या घोड्यांच्या पागेत जाई. उरलेला विचार करणे आणि सुटकेचे स्वप्न पाहणे. आणि सुटकेचा कोणताही रस्ता दृष्टीपथात येत नव्हता. या सगळ्यांच्या तुलनेत सायबू मोकळा होता. त्याची नीट पारख केल्यावर दौलतखानाने त्याला आपला द्वारपाल करून टाकलं. खानाच्या हवेलीच्या प्रवेशद्वारी देवडीत तो असे. तो कुठल्याही अर्थाने कैदी उरला नव्हता. पण पळून जाण्याचा विचार त्याच्या मनालाही शिवत नव्हता. हे लोक आपल्याला अगदी नरकातून सुद्धा शोधून आणतील आणि आपली खांडोळी करतील. त्यांच्या कलाने राहात आहोत म्हणून ते आपल्याला सुखाने जगू देताहेत हे काय कमी झालं, असा सुज्ञ विचार तो करत असे. खान त्याला कधीही बोलावत असे. म्हणून त्याला खानापासून हाकेच्या अंतरावर सतत जागरूक राहावे लागत असे. आठ-पंधरा दिवसांनी आलटून-पालटून कधी दिवसा तर कधी रात्री अशा त्याच्या कामाच्या वेळा असत. दिवसाच्या तुलनेत रात्री अधिक निवांत असे. खान हाक मारील अशी शक्यता सहसा नसे. तरीही कायम जागसूद राहावे लागे. अन रात्री पहारा केल्यावर दिवसा झोप घेता येई असेही नसे. थोडा तसा प्रयत्न केला तर जमे तसे. पण थोडाच वेळ. उरलेल्या वेळेत तो खानाच्या बागेत काम करत बसे. ते काम त्याच्या आवडीचे होते. त्याने त्या बागेचा चेहराच पालटून टाकला होता. त्यामुळेही खान त्याच्यावर खूष होता. एके दिवशी तो असाच बागेत काम करण्यात रमलेला असताना अचानक त्याला एक पडदानशीन स्त्री त्याच्या जवळ उभी राहिलेली दिसली. तो दचकला. त्याहीपेक्षा घाबरला. एकमेकांना अनोळखी असलेले जनाना आणि मर्दाना यांनी बागेत भेटण्याचा रिवाज नाहीय. हवेलीतला जनाना बागेत येणार असेल तर आधी पुष्कळ इंतजाम करावा लागतो. सगळ्या पुरुषांना हाकलतात. मग जनानखान्याचे खच्ची रक्षक येतात. सगळी खात्री झाली की त्यांचा प्रवेश होतो. ते कोणाही पुरुषाला बघायला मिळत नाही. अन इथं ही बाई भरदिवसा खुशाल आलीय? नुसत्या एवढ्यावरून खान कापून काढील आपल्याला. तो तिथून उठून पळून जाण्याच्या बेतात असताना ती म्हणाली,

'सायबू दादा तू मला ओळखलं नाहीस?'

अरे बापरे! थेट म-हाटी? पण ओळखणार कसं? संपूर्ण पडद्यात झाकलेल्या स्त्रीला तुम्ही कसं ओळखणार? आवाजात अंधूक ओळख उमटली. पण अंधूकच. मग चेहऱ्यावरचा पडदा किंचित बाजूला करत ती म्हणाली, 'आरे मी गीता नाय का पाटलाची.'

पठाणांनी उचललेली पाटलाची गीता. मुसलमान झालीय की काय?

तिच्यामुळं काय काय झालंय, तिला कितीक माहीत असेल?

'तू कशी काय इथं? जा जा लवकर. कोणी पाहिलं तर कापून

टाकतील मला.'

'जाते, पण लवकर भेट मला. मी इंतजाम करते. मालकनला सांगूनच आली होती मी इकडं. काय काय झालं त्याची बरीच मालुमात हाये मला', असं म्हणून ती पडद्यातली गीता तिथून निघून गेली.

दिवसाढवळ्या स्वप्न पडावं तशी ती आली आणि ते संपावं तशी ती गेली. अर्थात ते स्वप्न नव्हतं आणि त्याच्या सांगण्यावरूनच ती गेली होती. तो घाबरलाय हे लक्षात घेऊन गेली होती. एकाच वेळी अनेक गोष्टी त्याच्या मनात उतरल्या. ती जिवंत होती आणि गोषात होती. ती इथे कशी आली? तिची भाषा बरीच बदलली होती. ती कुठे राहात होती? तिला मुसलमान करण्यात आलं होतं? ती कोणत्या मालकनची दासी होती की काय? कोण असेल ही मालकन? दौलतखानाची बिबी? की आणखी कोणी? तिनं आज पहिल्यांदा पाहिलंय आपल्याला की आधी अनेक वेळा? अन तिला बरंच सगळं कसं काय माहीत? अन ती भेटीचा इंतजाम कसा काय करणार होती? अन केला समजा तिनं तरी तिला भेटणं कितपत योग्य? ह्या मुसलमानात बाया गैर मर्दाना भेटत नाहीत, हे तिला माहीत नाही काय? इथल्या लोकांच्या नजरेत मी तिच्यासाठी गैरमर्दच ना! आश्चर्य, भीती, कुतूहल अशा सगळ्याच गोष्टी एकाच वेळी त्याच्या मनात नाचू लागल्या.

काही दिवसांनी खानाने त्याला बोलावून घेतलं. त्यात नवीन काहीच नव्हतं. अनेकदा बोलावून खान त्याला हुकूम सोडत असे. कधी शाब्बासी देत असे. त्यादिवशी त्याचा नूर वेगळा होता.

'क्यूं बे, बगीचे में काम करायची नौटंकी करतो अन काय गुल

खिलाता तू?' तो ढाण्या वाघासारखा खर्जात गुरगुरला.

'मैंने कुचच नायी क्यालं. ते बाईच आली तिथं.' त्याला तात्काळ

संदर्भ लागला.

"ऐसा होता क्या कभी? इस हवेली में रहनेवाली कोई औरत अशीच

खुद होऊन अकेली आती उधर? कितनी बार मिला उसको?'

'नाही, नाही-एकदाच-' तो भयंकर घाबरला. त्याला बोलताच

येईना.

'अरे, कौन हाये रे तिकडे? मेरी शमशीर लावो जरा. इसका फैसला

मी खुदच करतो.' खानाने डरकाळी फोडली.

'माजा कायच कुसूर नायी हुजूर. ती खुद चालत आली तिथं. अन म्हनली, मी पाटलाची लेक. मीच सांगातलं तिला का बाई, दफा हो. समजलं तर हुजूर कापून टाकतील मला-

आन आता तीच बारी आली.' त्याने खानासमोर सपशेल लोटांगण घातलं. आणि खानाच्या

डरकाळीचं रूपांतर हास्याच्या गडगडाटात झालं. 'उठ, उठ. मला मालुमात हाये समदी.' खान प्रेमपूर्वक म्हणाला.

त्यानं सायबूला शांत स्वरात सगळं सांगितलं. 'माझ्या तिसऱ्या बिबीची खास मैत्रीण आहे आर्याना नावाची. ती विधवा आहे. जे चार पठाण तुम्ही मारलेत त्यांच्यापैकी बहरामखान म्हणून एक होता. त्याची ही बिबी. खूब खुबसुरत म्हणून महशूर आहे. पण तितकीच ती पाक उसूलची आहे. म्हणून तिच्या नादाला कोणी लागत नाही. मी सुद्धा तिची सुरत पाहिलेली नाहीय. माझी ही तिसरी बिबी मला फार प्यार आहे. आर्याना तिची सहेली. ती माझ्या या बिबीच्या भेटीला आलेली असताना तिच्या एका दासीनं तुला बागेत काम करताना पाहिलं. अन तुला पहचानलं. मंग रीतसर तिच्या मालकनची परवानगी घेऊन ती तुझ्या भेटीला बगीच्यामंदी आली होती. मी अधिक माहिती घेतली. ती दासी तुमच्या गावच्या पटेलची लडकी आहे. तिलाच त्या लोकांनी उचलून आणलं होतं. मंग तिला आर्यानाने ठेवून घेतलं असेल. मला अधिक माहिती नाही. त्याची जरुरत नाही. पण या दासीवर तिच्या मालकनची मर्जी खूब बहाल आहे. ही पटेलची लडकी तुला भेटू चाहते. त्याच्यासाठी माझ्या या प्याऱ्या बिबीला तिच्या मालकन आर्याना हिनं पेशकश केली. ती मी नाकारू शकत नाही. सगळा इंतजाम माझ्या बिबीने करून ठेवलेला आहे. तुझ्यासोबत एक आदमी येईल. उसके साथ जायाचं अन काम होताच उसके साथच वापस येयाचं. दगा तो तू नाही करेगा. फीर भी आदमी हाथियार साथ लेके येईल इतना मला तुला सांगितला पाहिजे.'

तिथं पाटलाच्या गीताने तिची कहाणी सांगितली. म्हणाली, पठाण मला घेऊन आले. त्यांच्यातल्या एकाच्या घरी त्यांनी मला आणलं. ते दीदीचं घर. तिचं नाव आर्याना बेगम. ती माझी मालकन हाये. पण मी तिला दीदी म्हणायचं असा तिचा मला हुकूम आहे. दीदी म्हनजे भैन. मोठी भैन. तिनं मला सांभाळलंय. धाकट्या भैनीसारखं जपलंय. म्हणून मी एकदम पाक राहिलेय. पण तुम्ही लोकांनी माझ्यासाठी सगळ्या पठाणांना मारून टाकलंय. त्यात दीदीचा शौहरपण गुजरला. आता तुमचं काय होणार हे जसं मला माहीत नाही, तसंच माझं काय होणार हे ही मला माहीत नाही. दीदी म्हणते, तू फिकीर करायची नाही. मी तुझी भैन. पण मला आपल्या गावाची, आई-बाबांची खूप आठवण येती. दीदी मला कधीतरी तिकडं नेऊन सोडील असं म्हणते. पण अजून तशी परिस्थिती आली नाही असं ती सांगते. तिचा मरद तुमच्याशी लडता लडता मेला. बेहिस्त बागेच्या बाहेर अर्ध्या कोसावर ज्याला तुम्ही मारलंत तो तिचा शौहर. त्या दिवशी मी दीदीसोबत तिकडे आले अन सबागती मी तुला बघितलं. मी दीदीला म्हनलं, हा बगीच्यामंदी काम करतोय तो माजा भाऊ आहे. मी त्याला भेटू का? तर म्हणाली, जा. अन आताचा सगळा इंतजाम तिनंच केलाय. तुम्ही लोकांनी तिच्या शौहरला मारून टाकलंय हे माहीत असून सुद्धा तिनं मला तुला भेटायची परवानगी दिली. तुमाला सगळ्यांना पकडलं आहे काय? अन बाकीचे कुठं कुठं आहेत? मला खबर आहे. पण पुरती नाही.'

सायबूच्या मनात आलं, बेहिस्त बागेच्या बाहेर अर्ध्या कोसावर तर आपणच त्या पठाणाशी लढलो होतो. लय जबरी गडी होता. आपले साथीदार वेळेवर आले नसते तर

त्यानं लोळवलंच असतं आपल्याला. लढाईत त्याला इलाज नसतो. कोणीतरी एकजण हरतो किंवा थेट मरतो. पठाण ताकदवान होता. उमरीनं मोठा होता. निब्बर तगडा होता. तो पुरता घायाळ झाला असताना एडके त्याला विचारत होता, माजी भैन किदर? तर त्याला बोलताच येत नव्हतं. एक जोराचा प्रयत्न करून तो म्हणाला, मेरा घर- मेरा बिबीका...त्यावर तिडकेनं त्याला लाथ घातली अन म्हणाला, तुझं घर अन तुझी बिबी याचं आम्हाला काय घेणंय. अचानक सायबूला जाणवलं की पठाण हे सांगत होता की, तुझी बहीण माझ्या घरी माझ्या बिबीसोबत सुखरूप आहे...! हे लक्षात आलं आणि तो शहारून गेला. पठाण भ्यालेला थोडाच होता? स्वतःचं मरण समोर ठाकलं असताना ज्याप्रकारे तो वागला, ते केवळ आणि केवळ क्षात्र वृत्तीचंच लक्षण होतं. आणि आपण लोकांनी त्याला लाथ घातली. तो उमदा माणूस होता. आपण

कायर.

सायबू म्हणाला, "बाकीचे कुठं आहेत हे मला माहीत नाही. आधी रहाणे गायब झाला. तो कुठं आहे, काहीच पत्ता नाही. त्यानेच आमचा ठिकाणा ह्या लोकांला दिला असेल. आम्हाला पकडलं. आम्ही अडकलो. त्यात मला एकट्याला इथं दौलतखानाकडं ठेवलंय. बाकीचेही असेच ठिकठिकाणी असतील. त्यांचं काहीच माहीत नाही.आणखी काय शिक्षा असेल, माहीत नाही. पुढं काय होणार, काहीच माहीत नाही.'

ती म्हणाली, 'मला काहीच समजत नाही. त्या लोकांनी मला उचललं. पण त्यांनी माझ्याशी बुरा बर्ताव केला नाही. तुम्ही लोकांनी त्यांना मारून टाकल. ते तुम्ही माझ्यासाठी केल. त्यात तुम्ही चूक नाही केली. पण ते वाटतात तितके खराब लोक नव्हते. तुम्हाला कायच माहीत नव्हतं तर तुम्ही तरी काय करणार? त्या लोकांची चूक झाली. त्याचं फळ त्यांना मिळालं. पण यात त्यांच्या बायकांचा काय अपराध? तरीही त्या विधवा झाल्याच ना! दीदी खूप शांत स्वभावाची आहे. अन मला वाटतं की ती खूप अस्वस्थ आहे. कारण मला माहीत नाहीत. मला ती दिसत नाहीत. मला सगळं बिघडून गेलेलं आणि चुकीचं दिसतं. आणि मला त्याची जबाबदारी कोणावर टाकता येत नाही. सगळेच चूक आणि सगळेच बरोबर. बाकी कायच नाही. पण तू निदान मला दिसलास अन भेटलास हे माझं नशीब. पुढे काय होईल, हे जसं तुला माहीत नाही तसंच मलाही माहीत नाही. निरोप

दिला की येत जा. बाकी मागणं नाही.'

गीताला भेटून आल्यावर काही दिवस सायबूला फार उदास वाटलं. मरणाच्या दारात उभा असताना पठाण तुझी बहीण माझ्या घरी माझ्या बिबीसोबत सुखरूप आहे म्हणत होता. आणि प्रतिसाद म्हणून त्याला लाथा बसल्या. काय नशीब असतं एकेकाचं. त्याला रक्तबंबाळ पठाणाचे बोलण्याच्या प्रयत्नांचे दृश्य आठवे. मनात येई, तिच्या नवऱ्याला आम्ही मारलंय हे माहीत असताना त्याची विधवा मला गीताला भेटू देते. काय वाटत असेल तिला? आपल्याला पाहिलं असेल तिनं? पाहिल्यावर काय मनात आलं असेल तिच्या? किंवा पाहिलं नसेल सुद्धा. ती शक्यता केव्हाही जास्त. बाई मोठी सत्शील आहे, असं खान उगीच का सांगत होता? पठाण वयाने मोठा होता. पस्तीसच्या घरात. बाईही मोठीच असेल. पण गीता तर तिला दीदी म्हणते. म्हणजे मोठी बहीण. म्हणजे फार वयस्क

नसेल. किंवा पठाणाला अनेक बायका असतील. ही त्यांच्यातली एक असेल. त्या लोकात असतं तसं.

नंतर अनेक वेळा गीताचा निरोप आला की त्या हवेलीत जाणं होई. तिच्याशी बोलणं होई. पण जुजबीपणा पल्याड ते जाणं मुष्कील होत असे. अचानक भेटीचा थरार संपला होता. त्या पोरीशी अधिक काय बोलणार? किंवा ती तरी याच्याशी काय बोलणार? एका रात्री त्याला स्वप्न पडलं. ते अशा चमत्कारिक स्थितीत की तो स्वप्नात आहे, हे त्याला कळत होतं. म्हणजे तो स्वप्नात होता आणि ते त्याला कळत होतं. तो हवेलीतून परतत होता. रस्त्यात अनेक गढ्या आणि हवेल्या. घोडागाड्या होत्या. स्वप्नसुंदर दिव्यांची आतषबाजी होती. सुखद गारवा होता. सीना नदीच्या पाण्याचा आणि तिच्या काठच्या गवताचा वास होता. माझी दीदी हल्ली खूप अस्वस्थ असते, असे गीताचे बोल मनात रेंगाळत होते. तेवढ्यात कुणाची तरी थाप

त्याच्या खांद्यावर पडली. कोण? तो त्वरित वळला.

'अरे, मला पहचानलं नाहीस? मी बहरामखान. आपण

एकमेकांशी लडलो होतो.'

'हो,पण तुम्ही तर मेलेला आहात ना!'

'आसं काय नसतं. मानुस काय येकदम मुर्दा होत नायी. म्हनजे तो गुजरतो पन उरतो. म्हंजे तो असतो पन दिसत नसतो. म्हंजे तो असतो पन सारका सारका दिसत नसतो. अन मेल्यावर लगेच जन्नतमंदी अगर जहन्नममंदी जात नसतो तो. पन येकदम हल्लक होऊन कोनाला कायम न दिसता तो इथेच रहात असतो. मी तरी आजून गेलेला नाय.'

'का बरं?'

'ते मला कसा समजनार? काय तरी चाहत उरलेली असते तर ते

रोकत आसंल. मी रुकलोय. माझं सरील गेलं पन मी हाये.'

'असं कधी असतं का? आपण मेलो की संपलो असं मी ऐकलंय.

तुम्ही कशासाठी अडकलाय?'

'मी आत्ताच माज्या बेगमला मिलून आलो. ती खूब भली औरत हाये. जवान आनिक खुबसुरत हाये. पन हालमंदी ती खूप पिडलेली असते.'

'का?'

'माजा छोटा भाई तिला चाहतो. त्याला तिच्याशी निकाह करायचाय.' 'मग? तुमच्यात तर रिवाजच असतो ना तसा?' 'तिला ते नकोय.' 'का?'

'तिला तो आवडत नाहीय. मला पन ते जचनार नाही. तो बुरा

आदमी हाये. मी आत्ताच तिला सांगून आलो.'

'काय?'

'मी तिला सांगितला,जो म-हाटा बच्चा मेरे साथ लडा, उसके साथ तू निकाह कर. बडा होनहार और तेज है वो. दिखने में अपनी अफगाण कौम

का ही लगता है. कम से कम एक बार देखले उसको.'

'असं कधी झालंय खानसाब? तुम्ही पठाण आम्ही म-हाटा. आन आम्ही लोकांनी तुम्हाला मारून टाकलं. लाथा घातल्या. तुमच्या मनात किती शिकवा असायला पाहिजे

आमच्याबद्दल. अन माझ्या घरचे लोक कसे तयार होतील अशा गोष्टीला? अन तुमच्या बिबीनं तरी का करावं असं?'

'अरे वो कुच नही. लडाई-झगडे में वो होता ही रहता है. अगर तू मरता तो वही सुलूक मैं तेरे साथ भी करता. मर जाने के बाद इतनी समझ तो आती ही है. इतनी छोटी उम्र मे लडा बडी बहादुरी से तू. थोडी हिंमत कर. मियां अन बिबी राजी असेल तर सब हो सकता है. जन्नत की हूर मिल जायेगी तुझे. और सुकून आ जायेगा मेरे दिल को.'

'छे! छे! मी स्वप्नात आहे अन तुम्ही मेलेला आहात. हे असं प्रत्यक्षात होत नसतं.'

आपण स्वप्नात आहोत, हे सायबूला याच्या आधीच अर्धवटपणे कळत होत. पण या टप्प्यावर ते त्याला अधिक स्पष्ट जाणवलं. तो पूर्ण जागा झाला. आणि त्या स्वप्नाचा विचार करत बसला. कळत-नकळत जागेपणी आपण ज्या गोष्टींचा विचार करतो, त्या झोपेतही सोबत असतात.झोपेत आपण त्यांची स्वप्नं बघत असतो. त्यांना आपल्या सोयीच्या करतो. खानाच्या बहादुरीबद्दल आपल्याला आदर वाटतो. तसे त्यालाही आपल्याबद्दल कौतुक वाटले असणार हा आपला होरा. त्याच्या बायकोच्या सौंदर्याविषयी आपण ऐकलेलं. इतक्या वेळा आपण तिच्या घरी गेलो तर तिचं नखही आपल्याला दिसलेलं नाही. गीता म्हणते, ती अस्वस्थ असते. आपल्याला आपल्या नकळत कुतूहल असेल. स्वप्नात हे सगळं एकत्र येऊन त्याची गोष्ट झाली तयार. अन काय पण गोष्ट! खानाच्या बिबीविषयी असली चाहत बिलकुल नाहीय मनात. की आहे आपल्या नकळत? पण हे फारच येडपटपणाचं आहे. स्वप्नापुरतं ठीक आहे. बाकी त्याला काहीही अर्थ नाही.

एकदा असाच तो रंगून जाऊन बागेत काम करत बसलेला असताना दौलतखानाची हाक आली. तो लगबगीने उठला आणि तरातरा चालत खानासमोर हजर होऊन त्याने त्याला कुर्निसात केला. अन ते करता करता त्याला दिसलं की पाटील तिथं खानाच्या शेजारी बसलेले आहेत. त्याला खरेच वाटेना. संथ वाहत्या काळाच्या काहीही न घडत्या वर्तमानाला अचानक गुठळी बसली आणि तो थांबलाच. त्याचा विश्वासच बसेना. मग झपकन पुढे होऊन त्यानं त्यांचे पाय धरले. त्याच्या पाठीत हलकेच थोपटत पाटील म्हणाले, चल सायबू. मी तुला घरी न्यायला आलोय. वजीर साहेबांनी दयाळू होऊन तुमची सुटका केलीय. खानसाहेबांनी

सुद्धा परवानगी दिलीय.'

'माझं त्यात काय नाही. वजीर साहेब का हुक्म झाला. आपन त्याचे

पाबंद.'

'मला वजीर साहेबांनी सगळं सांगितलंय. या पोरांची सुटका व्हावी यासाठी तुम्ही काय कोशिश केलीत ते सारं मला समजलंय. हुजुरांचा शुक्रिया अदा करावा तितका कमती पडेल.'

___'कुछ नाही. इतना तो एक दुसरे के लिये करना ही पड़ता है. यही

इन्सानियत है.'

'खूप खूप आभार खान साहेब.' पाटलांनी खानाला हात जोडले

आणि सायबूला म्हणाले, चल आवर तुझं. निघायचंय आपल्याला."

खानाला पुन्हा पुन्हा कुर्निसात करत सायबू बाहेर पडला.

सलाबतखान आता वजीर झाला होता. या पोरांना अटक करून आणि शिक्षा फर्मावून दोन-अडीच वर्षे लोटलेली होती. पोरांना त्यांच्या चुकीची जाणीव करून द्यायची आणि मोकळं करायचं असा निर्णय त्यानं आधीच घेतलेला होता. आता ती वेळ आलीय असं त्याला वाटलं आणि त्यानं पाटलाला बोलावलं. या मुलांनी कोणत्या दर्जाचा गुन्हा केलेला आहे, हे त्यानं पाटलाला दणकट करड्या स्वरात सुनावलं. अशा गुन्ह्याला आपल्या सलतनीत मृत्यूदंडाखेरीज दुसरी सजा नाहीय, याची जाणीव दिली. म्हणाला, मी सगळी माहिती घेतली. त्यांना सुलतानाच्या तर्फे सजा फर्मावली. पण सजेच्या काळातील त्यांचा बर्ताव आणि त्यांची उमर खयालमंदी घेऊन मी आता त्यांची सुटका करायचं ठरवलंय. तुमचा इलाका माझी खुदची जागीर आहे. म्हणून मी असा निवाडा करू शकतो. मी हे सुलतानापर्यंत जाऊ दिलेलं नाहीय. का की तुम्ही माझे लोग आहात. पन म्हनून तुम्हाला सरकारचे मनुष्यांची जिंदगी खतम करण्याचा बिलकुल हक नाहीय, हे कायम खयालमंदी ठेवा. हे ह्या पोरांना बजावून सांगायचा जिम्मा तुमचा. तुम्ही वडील आहात. पाटील सद्गदीत झाला. म्हणाला, 'मी पुष्कळ आयुष्य पाहिलंय. ह्या पोरांची डोचकी कापली जाणार याच्यात मला तिळभर सुद्धा संशय नव्हता. हुजुरांचे फार फार उपकार आहेत. केवळ आपल्यामुळेच या पोरांचे प्राण वाचले आहेत, याची मला जाणीव आहे.'

नंतर सलाबतखानानं कोण कोण कुठं कुठं आहेत, ते कसे गावी येतील, पाटलाची लेक कुठं आहे आणि कशी पाक सुखरूप आहे, हे सांगितलं. रहाणे किती समंजसपणे वागला, दौलतखानानं काय केलं, ते सांगितलं. अशा सगळ्या गोष्टी बैजवार सांगितल्यावर तो म्हणाला, सल्तनत आखिर रयतेच्या पाठिंब्याच्या बळावरच खडी असते. रयतेला सुकून नसेल तर सल्तनतीचा पाया डळमळीत होतो. तुम्ही समंजसपणे वागा. सल्तनत तुमच्या पाठीशी राहील. न्याय मागण्यासाठी रात्री-बेरात्री कधीही माझ्या हवेलीच्या दरवाजावर थाप मारा. पण या पोरांनी जी चुकीची बात केली ती पुन्हा नाही झाली पाहिजे. तसं झाल्यास अजिबातही गय केली जाणार नाही, हे त्यांना सांगा आणि तुम्हीही ध्यानात ठेवा.'

पाटील सायबूला घेऊन वांबोरीला पोहोचले. चार दिवसांनी बीडवरून बाकीचे पाचजण आले. रहाणे नव्हता. त्याचा पत्ता कोणालाच नव्हता. लोक विचारायचे, की बाबा सगळे आले. तो कुठं गायब झाला? ते पाचजण म्हणाले, सायब्या तू कुढं होता? सायबूनं सांगितलं. गीता पठाणाच्या घरी

आहे, हेही सांगितलं. ती पाक आणि सुखरूप आहे, हेही सांगितलं.

'आरं मंग तिला सोडीत का नायीत?' 'ते पाटलाला इचारा.' 'आन रहान्या? फरार झाला का म्याला त्यो?' 'मला खरंच पत्त्या नायी. पाटलाला इचारा.'

त्यांनी विचारलं. इतर लोकांनी विचारलं. रहाणेचं विचारलं. गीताचं विचारलं. पाटील म्हणाला, सगळं ठीक होईल. त्या त्या गोष्टीचा वखोत असतोय. रहाणे जिंदा आहे. गीता सुखरूप आहे. तुम्ही सगळे काळाच्या दाढेतून परत आलात. आनंद करा. रहाणेचे आईवडील, त्याची बायको पाटलाला भेटले. पाटील म्हणाला, काळजी करू नका. माझ्यावर भरवसा ठेवा. पाटलीण म्हणाली, समद्या दुनियेचं ठीक झालं. पण माझी लेक नाही आली. कशाचा आनंद करायचा? तुम्हाला काही काळीज आहे की नाही? पाटील

म्हणाला, आहे आहे. पण मी सरकारी हुकमाचा ताबेदार आहे. त्या त्या गोष्टीचा वखोत असतोय. काळजी नको करू. सायबू म्हणाला, पाटीलकाका, तुम्ही मला घेऊन आले. अन स्वोत्ताच्या लेकीला खुशाल तिथंच मांघ ठेवून आले. आवो तिच्या पायी त समदं रामायन झालं. पाटील म्हणाला, समदं येवस्तीत होईल सायबू. त्या त्या गोष्टीचा वखोत आसतोय.

लोक म्हणाले, आसन ना वखोत. आमी कुढं नायी म्हनतोय? पन त्यो येनार कव्हा, ते त सांगा.

ते सांगण्यासाठी एका संध्याकाळी पाटलांनी लोकांना विठोबाच्या देवळा समोरच्या पटांगणात जमा व्हायला सांगितलं. लोकांना कुतूहल. बाया-बाप्ये, पोरं-टोरं झाडून सारे गोळा झाले. पाटील म्हणाला, 'लोक हो! गेले काही दिवस आपण सगळे मला अनेक प्रश्न विचारत आहात. अन सगळयांना मी सांगत आलोय की त्या त्या गोष्टीची वेळ यावी लागते. त्या गोष्टी आता जमून आल्या आहेत. रहाणे यांचा मुलगा उद्या येईल. माझी लेक सुद्धा इतमामात येईल. पांडुरंगाची फार मोठी कृपा आहे की, ती सुखरूप आहे. आपला सायबू अनेकवेळा तिला भेटलेला आहे. ह्या सात पोरांनी जी काय गोष्ट केली ती त्यांना हमखास मरणाच्या दारात नेणारी होती. त्यांनी ते माझ्या लेकीसाठी केलं. गावाच्या नावासाठी केलं. आपण महाटे लोक. बामण असा का कुणबी असा; आपण सगळे म-हाटे. कोणी डिवचलं की खवळून उठणारे. माझ्या लेकीला पठाणांनी उचलून नेलं. ती चुकीचीच बात होती. पण त्याच्यासाठी त्यांचा खातमा करणं ही सुद्धा चुकीचीच गोष्ट होती. तरुण पोरांचं रघात गरम आसतंय. त्यांनी ते केलं. त्याच्यात ते सापडणार अन त्यांना सुळावर चढवणार हे माहीत असून सुद्धा त्यांनी ते केलं. सुलतानाकडं अर्जी करून न्याय मागण्याचे ते दिवस नव्हते. पण आता दिवस पालटले आहेत. सलाबतखान हुजूर हे आता वजीर आहेत. सगळा कारभार त्यांच्याच हातात आहे. ते दयाळू आहेत. आपल्या वांबोरीच्या आसपासच्या सत्तावीस गावांची जहागीर सुद्धा आता त्यांच्या नावे आहे. ते फार दयाळू आहेत. त्यांच्या कृपेमुळेच आपली पोरे सुखरूप आपल्या घरी परतली आहेत. मलाही आपल्या इतकाच आनंद झालेला आहे. तो मी आता आपल्यात वाटत आहे. लोकहो, या गावाची पाटीलकी पिढ्यान्पिढ्या आमच्या एडके घराण्यात आहे. असं सांगतात की एकेकाळी आमच्या पूर्वजांची देशमुखी सुद्धा इकडं होती. असेलही. पण काळ बसून राहत नाही. त्याच्या विषयी माझी तक्रार पण नाही. आज माझ्या मुलासकट या सात पोरांनी जी हिंमत माझ्या लेकीसाठी दाखवली, तिला तोड नाही. त्याची आठवण म्हणून याच्या उप्पर इथली पाटीलकी आळीपाळीने या सात घराण्यात दिली जाईल, असं मी जाहीर सांगतो. या सात घराण्यात इथली पाटीलकी सारखा हिस्सा करून वाटली जाईल. उरेल तो भाग विठोबाच्या पायी ठेवायचा असं मी म्हणतो. मंजूर आहे तुम्हाला?'

क्षणभर सगळे स्तब्ध झाले. स्वतः होऊन कोणी अशी स्वतःची पाटीलकी सोडतो? लोकांचा विश्वासच बसेना. म-हाट्यांना पाटीलकी अतोनात प्यार. अन पाटील इथं ती सोडायला समजा नाही तरी ती वाटायला निघाले खुशाल! विश्वास वाटेना. पण खुद्द पाटीलच ते सांगत होते. अन त्याच्यापाठीचं कारण उदात्त होतं. लोकांनी फेटे हवेत उडवले. वाहव्वा! वाहव्वाजी वा!, भले पाटील! वा! याला म्हंतेत माणूस. अशा किंवा यासारख्या उद्गारांसकट फेटे नाचत राहिले.

जरा वेळ गेल्यावर एकजण म्हणाला, 'तुम्हाला आसं कसं करता
येईन? त्यो त सरकारचा हुकुम असतोय.'
दुसरा म्हणाला, 'रहानेनी गद्दारी केली. त्याला कसी काय पाटीलकी देता?'
आणखी एकजण म्हणाला, 'हे आसं म्हंजी आशी रूढ आपन आपल्या महाट देशामंदी कुढं आयकल्याली नायी. आसं सात पाटलांचं
गाव आपल्यातरी आईकन्यामंदी नायी. हे कसं काय चलनार?'
पाटील म्हणाले, 'आणखी कोणाला काही म्हणायचंय? विचारायचंय? 'इचारूना. पन आता यावढ्याचं त सांगा.' कोणीतरी म्हणालं.

'सांगतो. सल्तनतीचे वजीर हुजूर यांची परवानगी मी आधीच घेतलेली आहे. आधी ते तयार नव्हते. म्हणत होते, सल्तनतीच्या सरदारांना मारण्याची बक्षिसी म्हणून तुम्ही असं करता असा त्याचा अर्थ होईल. मी म्हणालो, हुजूर जी चुकीची गोष्ट करायची ती आमच्या पोरांनी केलेलीच आहे. त्यासाठी आपणास उचित वाटली ती सजाही आपण केलेली आहे. आता मी जे करू चाहतोय त्यानं गावात एकोपा वाढेल. याच्या पुढे एकोप्याने आम्ही आपल्या हुकुमाचे ताबेदार असू. आपली परवानगी नसेल तर हे होणार नाही. हा अगदी साध्या मानाचा प्रश्न आहे. बाकी त्यात काही नाही. आम्हा लोकांना त्याचे महत्त्व असते. त्यांनी मोठ्या मनाने ती परवानगी दिलीय. आता ही गोष्ट खरीच आहे की सात घराण्यात पाटीलकी वाटलेलं असं गाव आपल्या महाट देशात दुसरं नाही. मला पण ते माहीत नाही. पण नसुद्या ना! आपल्या वांबोरी गावाचीही एक वेगळी ओळख सगळ्या मुलखात उद्या झाली तर बिघडलं कुठं? आता विषय राहिला रहाणे यांच्या मुलाचा. तुम्हा कोणालाही माहीत नाही ती गोष्ट मला माहीत आहे. ती खुद्द वजीरसाहेब हुजूर यांनी मला सांगितलेली आहे. या रहाणे याच्या शांतपणे विचार करण्यामुळं, त्याने दाखवलेल्या धैर्यामुळं ह्या सगळ्या मुलांची मृत्यूदंडाची शिक्षा टळली आहे. तो गद्दार नाहीय. त्याच्यामुळं बाकीचे पकडले गेले ही गोष्ट खरी आहे. पण त्याच्याच मुळं ते सगळे वाचले आहेत, ही गोष्ट अधिक खरी आहे. त्याच्यासाठी खरं तर त्याला पाटीलकीचा अधिकचा हिस्सा द्यायला पाहिजे. पण तो विठ्ठलाला द्यावा असं मी सुचवलं. कारण यात कोणाला लहान-मोठं करायला नको. तुम्ही माझ्यावर भरवसा ठेवा. मी खरं तेच सांगतोय. आणि ते खुद्द वजीरसाहेबांकडून माझ्याकडं आलेलं आहे. राहता राहिलेला आणि तुम्ही कोणीही न विचारलेला प्रश्न. माझ्या लेकीचं काय? ती कुठं आहे आणि ती आज आपल्यात का नाहीय? मी आधी सांगितलंय की आपला सायबू तिला अनेकदा भेटलेला आहे. ती सुखरूप आहे आणि ती अगदी पाक आहे. ज्या पठाणांना ह्या पोरांनी मारलं, त्यांच्यापैकी एकाच्या बायकोनं तिला स्वतःची धाकटी बहीण असल्यासारखं सांभाळलं आहे. आणि आपला सायबू तिला, त्याच्या बहिणीला स्वतः घेऊन येणार आहे. तसं ठरलेलं आहे.'

सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळाल्यामुळं गावकरी खूश झाले. फक्त सायबू या अनपेक्षित प्रस्तावामुळं जरा गोंधळून गेला. आपण तिला भेटलो, भेटत होतो ही गोष्ट खरी. पण तिला आणायला आपणच का गेलं पाहिजे, हे त्याला कळेना. पाटील म्हणाले, सायबू, तू उद्या सकाळी मला भेट. मी तुला सगळं सांगतो. सायबू दुसऱ्या दिवशी पाटलांना भेटला. ते म्हणाले, थोडासाक गुताडा आहे सायबू. काय आहे, ती बेगम गीताला आपली बहीण मानत

असली तरी नेमाने ती तिची दासीच आहे ना! वजीर साहेबहुजुरांनी तिला माझ्यासोबत पाठविण्याची कोशिश केली. पण बेगम म्हणाली, मी तिला तिच्या भावासोबत सोडीन. वजीरसाहेब म्हणाले सुद्धा तिला, हे तिचे वडील आहेत. तर ती म्हणाली, ते कोणीही असु द्या. मी तिला तिच्या त्या भावासोबतच पाठविन, जो तिला इथं भेटत होता. वजीरसाहेब म्हणाले, तिच्या दासीला मुक्त करायचा अधिकार फक्त तिचा आहे. ती म्हणते तसं करा. गोष्ट किरकोळ आहे. पण आपल्याला काय फरक पडतो?'

'पण आसं का? मला समजानी झालंय.'

'मलापण समजत नाहीय. आपल्याला तिची सुटका होण्याशी कारण. गीता सुद्धा म्हणाली, सायबूदादाला पाठवा. आता जा तू. घेऊन ये तिला.'

ही अट चमत्कारिक होती. सायबूला गोंधळात टाकणारी होती. पण एकतर पाटलाची आज्ञा. अन त्यानंही विचार केला की आणखी एकदा त्या घरी जाण्यानं आपल्याला काय फरक पडतो? तो बैलगाडी घेऊन गेला. आल्याची वर्दी दिली. सांगितल्या ठिकाणी जावून बसला. हे नेहमीचंच होतं. पण यानंतर घडलं ते अनपेक्षित होतं. तिथं गीता येण्याऐवजी दुसरीच एक स्त्री हजर झाली. मुख्य म्हणजे तिने गोषा पांघरलेला नव्हता. तिला पाहिल्यासरशी सायबू त्याच्या नकळत तटकन उभा राहिला. नजरा नजर झाली. ती तरुण आणि असाधारण लावण्यवती होती. नजरेला नजर भिडली तेव्हा ती थेट त्याच्या डोळ्यात घुसली, त्याच्या डोळ्यांच्या अगदी तळाशी उतरली. तिथून एक अकल्पनीय उजेड त्याच्या मनभर फाकला आणि त्यापुढे तो त्याच्या शरीरभर पांगला. अगदी त्याच्या स्तनाग्रांना सुद्धा तो उजेड जाणवला आणि तिथं हुळहुळ झाली. अगदी क्षणात हे झालं. त्यानं त्याची नजर हटवली.

'मैंने आपको कई दफा देखा है. आप मुझे पहली बार देख रहे हो.'

'माफ करा. माझी गलती झाली.' तो तिच्याकडे न पाहता म्हणाला.

'आपकी क्या गलती?' 'मैं गलत जागी थांबलो.' | "बिलकुल नही. आप सही जगह है.' 'मैंने आपल्या नजरेला नजर धिली.'

'तो क्या हुवा? नजर तो नजर से मिलाने के लिये ही होती है ना!

आप आपकी नजर क्यूं हटा रहे हो?'

ती हसली. बांगड्या किणकिणाव्यात तशी हसली. 'माझी ती औकात नाही.' तो गोंधळून म्हणाला.

'लेकीन मुझे तो लगता है की वो है. वरना मैं आपके सामने हिजाब

लिये बिना क्यूं आती?'

सायबू गप्प झाला. "अच्छा, आप लेके जावो गीता को. लेकीन बाद में कभी आपके जीने चाहा तो आप हम से मिलने आवोगे?'

सायबू गप्प. 'जाने के पहले एकबार हमसे नजर मिलाओगे?'

त्याची नजर उठेना. हिंमतच होईना. ती पुन्हा हसली. म्हणाली,

'ठीक है. मुझे यकीन है, आप जरूर आवोगे. मै राह देखुंगी. ज्यादा देर मत करना.

ती आत गेली. त्याच्या मनभर आणि अंगभर तो नजरेचा उजेड आणि तिचे शब्द खुळखुळत राहिले. तिची पुन्हा भेट होईस्तोवर ते तसेच खुळखुळत राहणार होते. कदाचित

आयुष्यभर हे असंच चालू राहणार होतं. त्याचं भविष्य त्याला माहीत नव्हतं. तसं ते कोणालाच माहीत नसतं. पण या क्षणापासून तो आतल्याआत अशा एका वेगळ्या दुनियेत पोहोचला होता की तिथं तिच्याशिवाय कोणीही नव्हतं. मनाच्या बाहेर तर तो नेहमीच्या दुनियेतच होता, पण आतल्याआत एका अनुभूत सुंदर दुनियेत शिरला होता. त्याच्या बारक्या आयुष्यात त्यानं इतकी देखणी स्त्री पाहिलेली नव्हती. सौंदर्य पाहणाऱ्याच्या नजरेत असतं, हे खरंच. पण ते तितकंच नसेल कदाचित. ते पाहणाऱ्याच्या नजरेच्या तळात घुसल्यावर त्याची जी प्रभा तिथं फाकत असेल तेव्हा येणारा प्रत्यय ते ठरवत असेल. अन कोणी कोणाच्या नजरेच्या तळात सहजी उतरत नसतं. त्या स्त्रीचं सारं अस्तित्वच त्याच्या नजरेत खोल उतरलं होतं. अन तिथं उजेड फाकवून त्यानं त्याला पिसं लावायला सुरुवात केली होती. अन हे पिसं हळूहळू वाढत जावून त्याचा भला मोठा वृक्ष त्याच्या मनात उगवणार होता. ती नजर इतकी प्रमाथी होती की त्याची याआधी त्यानं कल्पना सुद्धा केलेली नव्हती. असा अनुभव याच्या आधी कधी त्याला आलेलाच नव्हता. रस्त्यानं गीताच्या शब्दांचा अखंड चिवचिवाट, रस्त्यातल्या दगडांवर त्यांच्या बैलगाडीच्या चाकांचा खडखडाट, मधूनच इथूनतिथून येणाऱ्या गाण्यांच्या लकेरी, त्याचं यंत्रवत गाडी हाकणं, या सगळ्या भौतिक घडामोडीत तो स्वतः आतल्याआत एका अनुभूत हवेत पोहोत होता. ती सारी हवा एका तीव्र कोमल नजरेच्या बाणाने बाधित झालेली होती. तिच्या डोळ्यांची बुबुळं त्याच्या सारखीच अपवादात्मक अशा पाचूच्या रंगाची होती. या अशा सारखेपणामुळेच कदाचित त्यांच्या नजरांचा पूल बांधला जाणं सुलभ झालं असेल.

वांबोरीला सातही जणांच्या घरी सगळा आनंदीआनंद होता. सात घरांना पाटीलकी मिळाली होती. सायबूसाठी नवीन सोयरिका बघण्यास जोमाने सुरुवात झाली होती. अमक्या गावची तमक्याची मुलगी अन तमक्या गावची धमक्याची मुलगी, अशा चर्चा घरात चालू होत्या. मुलगी पाहण्यासाठी घरचे लोक ठिकठिकाणी जात होते. आणि त्याला पाहण्यासाठी अनेकजण येत होते. तो अत्यंत अस्वस्थ होता. त्याला ते डोळे आठवत. तो प्रसंग, ते संभाषण त्याच्या मनाच्या प्रांगणात दरवळत राही. त्याचे काय करायचे हे त्याला समजत नसे. अन त्याविषयी कोणाशी बोलणेही शक्य नव्हते. घरातली लगीनघाई त्याला अडवता येत नव्हती. अडवण्यासाठीची सबब त्याला सापडत नव्हती. मुळात ती का आणि कशासाठी अडवायची हेच त्याला कळत नव्हते. मुझे यकीन है, आप जरूर आवोगे. मै राह देखुंगी. ज्यादा देर मत करना. त्याला आठवे. कशी काय खात्री वाटली असेल तिला? अन करायचं काय जाऊन? आपण काय लग्न करणार थोडेच तिच्याशी? किंवा ती आपल्याशी? ती पठाण, आपण महाटे. अशी सोयरिक होत नाही. अन ती आधी लगन झालेली. तिचा नवरा आपल्या हातून मेलेला. असा विचार तिच्या मनात असणं कसं शक्य आहे? मला यकीन आहे की तू येशील. येऊन काय करू माझे बाई! अन तू तरी कशासाठी मला हाका मारतेस? ज्या हाकांना ओ देणं मला शक्य नाही त्या माझ्यापर्यंत का येताहेत? हा कोणता नाद तू माझ्यापाठी लावला आहेस? हे गाव, ही माणसं, जगण्याची सगळी राहरीत सोडून तुझ्याकडे येऊन मी काय करू? नजरेच्या एका तीरासरशी तू मला घायाळ केलं आहेस. माझ्या या घायाळ मनाचं मी काय करू?

दरम्यान एडके-पाटलाच्या गीताची वेगळीच समस्या तयार झाली होती. ती घरी

आली तेव्हा त्यांच्या घरात आनंदीआनंद झाला, ही गोष्ट खरी. पण काही दिवसातच वातावरण बदललं. एकतर तिडकेनं तिच्याशी लग्न करायला नकार दिला. म्हणाला, एवढे दिवस ही पठाणाच्या घरात राहिली. ती पवित्र राहिली असेल कशावरून? मग त्याच्या घरचेही तसेच म्हणू लागले. नंतर गावातले लोकही तसेच बोलू लागले. ज्या मुलीसाठी या पोरांनी चार पठाण मारले, ती सुखरूप घरी आली, तेव्हा अशा शंका-कुशंका.

'आवो, ती मस चांगली आसन. म्हंजी कोण ती तिला संबाळनारी मुसलमानिन म्हंतो मी. पन ते मुसलमान लोकं. ते अशा कामात लय हलकट. ते काय सोडित्यात आशी कवळी पोर!'

'आवो, पन ती सांगती ना, का मला धाकल्या भैनीवानी संबाळलं त्या मुसलमाननिनी.'

'मंग ती काय सांगनार, का आसं करता आसं झालं म्हनूनसनी? खुद

स्वोता व्हऊन कोनी बोलत असतं का आशा गोष्टी?'

'आवो, मस ती सीतामाय रावणाच्या राज्यामंदी एवढी चांगली राह्यली. तरी लोकांनी संशय घ्यायचा सोडला का? म्हनलाच ना कोन त्यो कोळी का धोबी? का बॉ आसं करतानी आसं कसं? आन ती त राजाची रानी व्हती.'

'आवो पन त्यो आपला त्यो सायबू, त्यो पठाऱ्याचा ल्योक सांगतो ना त्यो त भेटत व्हता ना तिला. त्यो खुद सांगतो का तिला धाकल्या भैनीवानी संबाळलं त्या बाईनी म्हनूनसनी.'

'ते हाये ना. पन त्यो काय राखान व्हता का काय तिला रातीन

देह्या?'

"म्हंजी आता त्या पोरीनी काय करायचं?'

"ते काय आपल्याला समजत नायी. हे कलयुग. त्याच्यात काय बोलावा? पण आशा पोरीसंगती समजून-उमजून कोनी लगन करीन आसं महाकठीन.'

सायबूने तिडकेला सांगायचा प्रयत्न केला. तो सायबूवर तडकला. म्हणाला, "दुसऱ्याला सांगणं सोपं आसतंय. तुझ्यावर अशी वेळ आली असती तर समजलं असतं.' सायबू म्हणाला, "पन तिच्यासाटीच आपन ह्या समद्या गोष्टी केल्या. आन आता ती पाकसुरत आलोय तर आपन आशा वातो करतोय.' 'चांगली पाकसुरत आहे ना! मुसलमानाचं पाणी पिऊन टरारून आलीय. एवढंच वाटत असंल तर तूच कर तिच्या संगती लगन.' याच्यावर सायबूची बोलतीच बंद झाली. बामण अन महाटी अशी सोयरिक कशी होणार? अशा गोष्टीला कोणीच तयार होत नसतं. शिवाय गीता सायबूला खरोखरीच बहिणीसारखी होती. तिची आधी तिडकेशी सोयरिक ठरलेली होती. आता तो नाही होऊन पडला होता. सायबू पाटलांना भेटला. ते म्हणाले, 'हे असं होणारच. जनरीत आपल्याला ओलांडता येत नाही. इतका बभ्रा झाल्यावर माझ्या लेकीचं लग्न होणार नाही असं मलाही वाटतं. तिला आयुष्यभर कुंवार राहायला लागणार असं दिसतंय. तेही समजा मी समजून घेईन. पण आता माझ्या घरात आमच्या घरातल्या, नात्यातल्या बायका तिला आडपडद्याने खोदून खोदून नाही नाही ते विचारतात, तेव्हा तिचा चेहरा जो फाटतो तो मला बघवत नाही. आधी ती सरळपणाने उत्साहाने सांगायची.

आता ती बोलत नाही. बाहेरचं कोणी आल्यास त्यांच्याशी बोलायचं टाळते.

पण बायका तिचा पिच्छा सोडत नाहीत. मला याचा खूप त्रास होतो. अन मी काहीही

करू शकत नाही. ती खूप घुमी झालीय. तिचं काय होणार हे मला कळत नाही...' बोलता बोलता पाटलांचे डोळे भरून आले. हा एवढा कर्तबगार माणूस. गावचा पाटील. पण दुनियेच्या रीतिरिवाजांसमोर तोही हतबल झाला होता.

अखेर पाटलांची समस्या गीतानेच सोडवली. पाटलांची म्हणा किंवा त्यांच्या नातेवाइकांची किंवा साऱ्या गावाची सुद्धा. गीता थेट नाहिशीच झाली. फरार झाली. कैक शोध घेतले गेले. विहिरी-बारवा तपासल्या गेल्या. गावोगावच्या नातेवाईकांकडे निरोप गेले. कुठेच काही धागा लागला नाही. शोध संपला. शोधात मुळात जीवच नव्हता असं कित्येकांचं म्हणणं. पाटीलही घुम्यासारखे बसून राहू लागले. फारच कोणी विचारलं तर म्हणायचे, गेली ती. तिचं नशीब तिच्यासंगती. आपण तरी काय करणार? हळूहळू लोक म्हणायला लागले की पाटलाची अडचण सोडवली बिचारीनी. आवो चिमनीला पकडून टोच्या मारल्यावानी बोलायचे लोकं. ती पोर किती सह्यन करनार? आन राहिली आसती तरी लगीन झालंच नसतं तिचं. मंग काय करती राहून? आज समजा आईबाप हायेत तव्हर समजा चाललं आसतं आसं तसं. पन ते काय जल्माला पुरत नायीत. मंग भाऊ-भावाजयांनला काय घ्यानं आसतंय? आवो केरसुनी बरी आशीच तन्हा झाली आसती तिची. त्याच्या परिस झालं ते झ्याक झालं. येहर बारव नाही जवळ केली तिनी. कुठं गेली आसन तिथं सुखानी राहू बिचारी. गीताच्या चारित्र्याविषयी शंका उपस्थित करणारे हेच लोक. ते तरी काय करणार? रीतिरिवाजांनी, समजुतींनी बांधलेले असतात तेही. नंतर हेही हळूहळू थांबलं. तेच तेच किती चावणार? कैक घडत असतं भोवताली आणि प्रपंचही असतोच ज्याला त्याला. गेला तो जातो. दुनिया चालू राहती. सायबूला वाटलं, पठाणाच्या घरी गेली असेल का? पाटलांनी चौकशी केली असेल का? आणखी कोणाच्या मनात असं आलं नाही का? तो पाटलांना भेटला. मनातलं बोलून दाखवलं. पाटील म्हणाले, नाही चौकशी केली. तो म्हणाला, "मी जावून बघून येऊ?' म्हणाले, 'काय उपयोग? समजा असली तिथं तर असु दे. इथल्यापेक्षा बरं. नसली तर तिचं नशीब. तू तिला शोधायला तिथं जाऊ नकोस. अन ही गोष्ट कोणासंगती बोलू सुद्धा नकोस.' सायबूला वाटलं, आपल्या मनात आलंय तेच पाटलांच्या सुद्धा मनात आलंय. पण त्यांना ती माहिती नकोय. तिथं असली तरी तिला आणून तरी काय करणार? त्यापेक्षा असेल तिथं तर राहू दे सुखानं. इथं तिला जागाच उरलेली नाहीय. आपण तिला मेलो अन ती आपल्याला मेली हा पवित्रा पाटलांना जास्ती सोयीस्कर. स्वतःच्या लेकीच्या बाबतीत सुद्धा माणसाला कसा दगड ठेवावा लागतो मनावर! सायबूला वाटलं, काय साली बाईमाणसाची जिनगानी आस्तीय. ती मुसलमानाच्या घरी राहिली म्हणजे बाटली. तिचं चारित्र्य संपलं. पण समजा आपण इतके दिवस तसं राहिलो तरी आपल्यात कायच खोट नाही. मग त्याला वाटलं, तिला शोधायचं निमित्त करून त्या पठाण बाईच्या घरी जायला काय हरकत आहे? आपलं हृदय सारखं डहळत असलेली ती पठाणबाई दिसेल. आपले डोळे निवतील. पण त्याच्या पुढं काय? मुझे यकीन है, आप जरूर आवोगे. मला यायचंय. पण येऊन काय करू? आणि न येऊन तरी किती डहुळत राहू या हृदयाला? घरचे लोक सोयरिकी आणतात. त्याचं काय करू? तुला कसा विसरू? तुझ्या डोळ्यांमधल्या हाकेचं काय करू? माझ्या हृदयात तेवत असलेल्या दिव्याचं काय करू? तिचं दिसणं, तिची नजर, तिथं बांधलेला पूल; त्याच्यापुढं

सगळी दुनिया फिजूल होती त्याच्यासाठी. ती कोण, तू कोण ; सगळं फिजूल. असं माझं कधीही झालेलं नाहीय. जो माझ्याकडून मारला गेलेला आहे, त्याची ती विधवा आहे. त्यानं माझ्या स्वप्नात येऊन मला तिच्याशी निकाह करायला सांगितलं आहे. तिनं तिच्या नजरेतून, तिच्या शब्दांमधून थेट आमंत्रण दिलेलं आहे. भ्याड माणसा, तू कशाची वाट बघत आहेस? मैं आपकी राह देखंगी. ज्यादा देर मत करना. घरात, गावात, मळ्यात, वावरात; सारीकड तो काहीही करत असताना, कशात ना कशात मन गुतवत असताना ती अचानक समोर यायची. अगदी दिवसाढवळ्या स्वप्नात असल्यासारखं व्हायचं. वावरात खो-्यानं वरंभा फोडून पाण्यासाठी बारं दिलं, तर तिथं ती उभी. विठोबाच्या देवळात देवाला प्रदक्षिणा घालताना सोबत चालत हजर ती. मित्राशी काहीबाही बोलताना थेट मधेच उभी. आई जेवायला वाढतेय, तिथं ती शेजारी बसून गप्पा करायला लागलेली. एकटा असताना समजा ठीक. सावरता यायचं. पण इतर कोणी असताना काय? आरं झालंय काय तुला? तुपलं ध्यान हाये कुढं? तुपलं डोसकं ठिकाण्याव हाये का नायी? असल्या अनेक प्रश्नांना सामोरं जावं लागे. कोणाला संशय यावा असं त्यात काही नसे. पण थातूरमातूर बोलून त्याला वेळ मारून न्यावी लागे. पाठलाग काही केल्या सुटत नव्हता. ती त्याच्या मनातून हटत नव्हती. ते त्याला

आवडत नव्हतं, असं थोडंच होतं? पण त्याचं काय करायचं, हे त्याला काही केल्या समजत नव्हतं. एका संध्याकाळी त्याला जेवायला वाढताना हारकल्या नजरेने त्याची आई म्हणाली, 'जमली बरं का सायबराऊ तुपली सोयरिक. ते आकुळनेरचे लोकं आल्तेना आपल्याकं पंधरा दिसाआंधी, त्यांची पोर पघून आलेत तुपला बाप आन चुलता. येकदम चंद्रावानी पोर हाये म्हनी. आन मानसयबी वानकी हायेत. देसमुक घराना हाये. महाट मोळ्याचे लोकं हैती. त मंग सोयरिक जमवूनच परत आलेत तुपला बाप आन चुलता. आता, मपले भाऊ रुसतेनच ना, का बाबा आम्हाला कसं काय न्ह्यालं नायी आमच्या भाशाची सोयरिक जमवायला? त त्यानला घेऊन जावाच लागातंय परत. तशी बोली करूनच आलेत हे दोघं. पन ते फकस्ती रिवाज पाळायचा म्हनून. समदी पटापटी आंधीच झाल्याली हाये.' त्याच्या आईला किती बोलू आणि किती नको असं झालेलं होतं. जमली बरं का तुपली सोयरिक, असं आई बोलल्यासरशी त्याला ठसका आला होता. त्यानं मोठ्या मुश्किलीने तो दाबला. तो दाबताना त्याच्या डोळ्यामधून पाणी आल. आणि कानामधून वाफा बाहेर पडल्या. त्या माउलीच तिकड लक्षच नव्हतं. स्वतःला सावरत तो गप्प बसला. 'तुपलं ध्यान कुन्हिकं हाये? भाकर का खाईना झालाय?' आई म्हणाली तेव्हा तो अधिक सावरून बसला अन त्यानं नांगर धरायला उशीर झाल्यासारखे भराभर मोठमोठाले घास तोंडात कोंबायला सुरवात केली. 'आरं नीट निगुतीनी खावा. आसा काय वाघ माघ लागल्यावानी खाऊन व्हायला. आन ते लोक म्हनत व्हते का वाघाचा बच्चाच जावाई मिळाला आम्हाला. येवढा मोठा पठाण येकल्यानी मारला आन तेयबी ख-्याची लढाई खेळून.' त्याच्या आईला खूप आनंद झालेला होता. आपल्या लेकाला तो झालेला असणार हे तिनं गृहीत धरलेलं होतं. तिचा मुलगा आता लग्नाचा बाप्या, पुरा पुरुस झालेला होता. अशा बाबतीतला आपल्याला झालेला आनंद पुरुष व्यक्त करीत नाहीत पण त्यांना तो झालेला असतो, हे तिला माहीत होतं.

ताटात हात धुऊन त्यानं त्याचं अंथरुण-पांघरुणाचं गाठोडं उचललं आणि तो झोपण्यासाठी घरासमोरच्या ओट्यावर त्याच्या नेहमीच्या जागी गेला. पण तो तिथं झोपला नाही. सगळीकडे सामसूम झाल्याचा अंदाज घेऊन मध्यरात्रीच्या सुमाराला तो तिथून गायब झाला.

तो तिच्या घरी पोहोचला आणि तिच्या ताब्यात गेला. तसा आधीच तो गेलेला होता. तिच्याखेरीज त्याला काहीच सुचत नव्हतं आणि दिसतही नव्हतं. तरीही ते फक्त आपल्याला वाटणारं, एकतर्फी असं काही आहे अशा आशंका मनात असत. पण यावेळी तो तिथं गेला आणि पुन्हा नजरानजर झाली तेव्हाच त्याला जाणवलं, आपलं आता नवं आयुष्य सुरू झालंय. अन त्याच्यावर याच्यापुढं कायम तिचाच ताबा राहणार आहे. पण ते त्याला अंगावर येणारं वाटलं नाही. सुखद वाटलं. जगलेलं सारं आयुष्य, आई-वडील, मित्र, प्रेमाची माणसं असं सारं त्याक्षणी पुसलं गेलं. तो एक नवाच माणूस झाला. एक नवा पुरुष. तिचा पुरुष. त्याच्यावर तिची सत्ता. फक्त तिचीच सत्ता. एका आधी कधीही न अनुभवलेल्या विलक्षण मोहिनीनं; तिच्या प्रभेनं बाकी सगळ्या गोष्टी निष्प्रभ झाल्या. म्हणाली, 'आता तुला मी इथं बंदिस्त करून ठेवणार आहे. आपल्याला अनेक गोष्टी उरकायच्या आहेत. त्या उरकल्या की आपण इथून बाहेर पडणार आहोत. मी सारं नीट करीन. तू कशाचीही काळजी करायची नाही. आपल्याला कशाचीही कमतरता भासणार नाही.' तिच्या पुष्कळ गोष्टी हळूहळू त्याला माहीत झाल्या. ती बहरामखानाची दुसरी बिबी होती. ती त्याच्यापेक्षा वयाने जराशी मोठीच होती. तिला बहरामखानापासून झालेला एक मुलगा होता. त्याचं नाव आर्यन. आर्यानाचा मुलगा आर्यन. तो चार-साडेचार वर्षे वयाचा होता. तिला एक थोरली सवत होती. पण बहरामखान याने जमवलेली सारी संपत्ती हिच्याच ताब्यात होती. या सगळ्या माहितीमुळं तो मुळीही विचलित झाला नाही. उलट त्यानं तिला त्याला पडलेलं स्वप्न सांगितलं. बहरामखान त्याच्या स्वप्नात आल्याचं सांगितलं. तो काय म्हणाला तेही. तिनंही तिचं सांगितलं. ती म्हणाली, 'ते स्वप्न होतं की सत्य, हे आजही तिला समजत नाही. मेल्यावरही तिचा शौहर तिची इतकी काळजी करतो याचं काय करायचं हे तिला कळतच नाही. इतकं कोणी कोणावर कसं प्रेम करू शकतं, याचा उलगडाच तिला करता येत नाही. आपल्या नवऱ्यानं स्वप्नात येऊन आपल्याला हे सांगावं अन आपणही वेड्यासारखं त्याला मारणाऱ्या पुरुषाच्या प्रेमात पडावं, या असाधारण वास्तवाचं काय करायचं अन ते काहीच नाकारता येत नाही हे आणखीनच. एखाद्या वाघिणीनं आपला वाघ गमवावा अन त्याला मारणाऱ्या दुसऱ्या तरण्या वाघाचं स्वामित्व तिनं स्वीकारावं असं ते होतं. पण मग माणसात आणि श्वापदांच्यात काहीच का फरक नसतो? अर्थात इतका सगळा विचार करायला त्यांना सवडच नव्हती. विशेषतः तिला अजिबातही नव्हती. तिच्या समोर तिचे म्हणून काही तातडीचे प्रश्न होते. त्यांची कौशल्याने हाताळणी करणे तिला अधिक गरजेचे होते. तिचा दीर हातपाय धुवून तिच्यापाठी लागलेला होता. परंपरेने त्याचा तिच्यावर हक्क होता, असं त्याचं म्हणणं. तिला सावली देणं, तिला आपल्या पंखाखाली घेणं, ही त्याची जबाबदारी आहे, असं तो म्हणत होता. रिवाजानुसार त्यात चूक काहीच नव्हतं. कोणीही तसंच म्हणालं असतं. पण तिला ती सावली नको होती. म्हणून ती त्याला झुलवत होती. मी

तुमचीच आहे. तुमच्याखेरीज आता मला या दुनियेत कोण आहे? तुम्ही मला आसरा देताय, हा तुमच्या दिलाचा मोठेपणाच आहे. पण मला थोडा अवकाश द्या. माझे शौहर, तुमचे बडे भाईजान हल्लीच अल्लाचे प्यारे झाले आहेत. मी त्या दुःखात आहे. मला त्यातून बाहेर पडण्याची संधी द्या. त्यासाठी वेळ द्या. आपण लगेच निकाह केला तर ते जनरीतीला सुद्धा धरून होणार नाही. आपल्या दोघांनाही लोक दूषणे देतील.... अशा शब्दात ती त्याला आवाहन करत असे. पण तेही किती काळ करायचे याला मर्यादा होत्या. ती या दीराला चांगलीच ओळखत होती. त्याला चार बायका होत्या. आणखी एक कोवळा खच्ची पोऱ्या स्वतःची हवस भागविण्यासाठी त्यानं पाळलेला होता. असं करणाऱ्या पुरुषांविषयी तिला फार नफरत वाटत असे. ते सगळं अत्यंत गलिच्छ वाटत असे. शिवाय तो अतोनात दारुडा होता. अन त्याच्या साध्या वागण्या बोलण्यात सुद्धा असभ्यता दिसत असे. त्याच्या नजरेत वासनेची एक घाणेरडी लाळ सतत टपकत असल्याची जाणवत असे. अशा माणसाच्या शय्येत जाण्याच्या कल्पनेने सुद्धा तिच्या अंगाला कापरं सुटत असे. तिची सवत हा तिच्या जीवाला असणारा आणखी एक घोर होता. या तिच्या थोरल्या सवतीला मूलबाळ होईना म्हणून तिच्या संमतीने बहरामखानाने तिच्याशी निकाहनामा केला होता. पण म्हणून त्याने या आपल्या आधीच्या बायकोला टाकलं नव्हतं. जिला मूलबाळ होत नाही तिला कोणाच्याच नजरेत काहीच किंमत नसते. पण हिला त्याच्या मनात होती. अन नंतर आर्यानाच्या मनातही. ही सवत फार मृदू स्वभावाची स्त्री होती. आर्यानाला बाळ झाल्यावर तिला त्याचा अजिबातही दुस्वास वाटला नव्हता. आपली किंमत आता संपली, आता सगळी सत्ता ह्या धाकट्या सवतीकडे जाणार, हे लक्षात येऊनही तिच्या वागण्यात तसूभर सुद्धा बदल झालेला नव्हता. उलट आपल्यालाच बाळ झालंय अशा रीतीने ती वागत होती. सत्ता आर्यानाच्या हाती गेली असे तर झालेच. पण त्यातून त्या दोघींच्या नात्यात काहीही फरक पडला नव्हता. याचे कारण आर्याना हिचा स्वभाव आणि तिला आपल्या थोरल्या सवतीबद्दल वाटणारे ममत्व. पण आता समजा आर्याना हिच्या दीराने तिच्याशी निकाह लावला किंवा त्याला चकवून तिने आणखी कोणाशी निकाह केला तर या सवतबाईचं काय होणार याची चिंता तिला लागलेली होती. कारण तिच्याशी कोणीही निकाह लावण्याची शक्यता नव्हती. जिला मूलबाळ होऊ शकत नव्हतं, तिला त्या दुनियेत शून्यवत किंमत होती. मग भले ती केवळ तिशीची का असेना!

त्या घरात गेल्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी सायबूला पाटलाची गीता तिथं दिसली. त्याचं त्याला मुळीच आश्चर्य वाटलं नाही. गीता म्हणाली, "सायबूदादा, मला मरायचं होतं. मी प्रयत्न सुद्धा केले. पण ऐनवेळी भीती वाटायची. मग एवढा एकच रस्ता उरला आणि मी इकडं निघून आले. दीदीला सांगितलं. म्हणाली, "मला नाही तरी तुला पाठवायचंच नव्हतं तिकडं. पण तुझ्या आईवडलांचा विचार करून मी माझं मन कठोर केलं. आता तू स्वतः होऊन आली आहेस. मला खूप छान वाटतय. तुझ्यासारखी सहेली मला कायम सोबत हवी. कायमच कदाचित तुला जमणार नाही. पण पुढचं पुढं बघू. तू जितका काळ माझ्यासोबत असशील तितकी तू मला हवी आहेस. अन तो तुझा भाऊ सुद्धा आपल्यासोबत राहायला येईल. होना! तिनी मला इतक्या ठाम आवाजात ते सांगितलं. आन सायबूदादा, तिचा तुझ्यावर खूप जीव जडलेला आहे. मला हे सगळं आधीच माहीत

होतं. मी ते तुझ्याशी बोलले नाही. अशा तिच्या वाटण्याला काहीच रस्ता नाही असं मला वाटत होतं. पण बघ, तो निघालाच. तू स्वतःच्या पावलांनी चालत तिच्याकडे आलास..' गीता आनंदात होती. काहीशी दबलेली होती. पण आनंदात होती. आपल्याला कुणी पाहील, ओळखील आणि ते वांबोरीला कळवलं जाईल, असं तिला वाटत होतं. त्याच्या तिच्यावर होणाऱ्या परिणामांची तिला फारशी फिकीर नव्हती. पण आपल्यामुळं आपल्या साऱ्या घराची होणारी बेअब्रू! ती चिंता तिला अधिक सतावत होती. तितकं तिनं सायबूला सांगितलं. त्याच्या तिथं येण्यानं तिच्या मनाला उभारीच आली. आधारच वाटला तिला. पण आता आणखी एक नवीच बदनामीची बात तिच्या मनात उगवली होती. आपण पळून आलो. नंतर सायबू आला. म्हणजे ठरवून आपण अन तो एका पाठोपाठ असे नाहीसे झालो. याचा गावात वेगळाच तर्क लढवला जाईल. एकमेकांसोबत ते पळून गेले असं लोक म्हणतील. कोणीतरी तसं म्हणेल. किंवा बरेचजण म्हणतील. ते आपल्या घरापर्यंत जाईल. मोठीच बेअब्रू होईल. त्याचं तिला किंवा सायबूला काहीच करता येणार नाही. हे ती त्याला काहीच म्हणाली नाही.

आर्यानाचा नवरा अल्लाचा प्यारा होऊन आता तीनेक वर्षे लोटली होती. प्रिय पतीच्या निधनाच्या दुःखाचे निमित्त सांगून दीराला झुलविणे आता तिला अशक्य झाले होते. ती तसे करत आहे याची त्याला खात्री झाली होती. आता तो आक्रमक पवित्र्यात होता. तो काहीही करू शकत होता. तिथे येऊन तो तिला थेट उचलून नेऊ शकत होता. अन त्याच्या तशा कृतीला कोणीही आक्षेप घेऊ शकलं नसतं. आर्यानाने तातडीने निर्णय घेतले. कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी काहीही होऊ शकतं, हे तिला दिसत होतं. तिनं सायबूला सांगितलं, 'आपण लवकरच इथून बाहेर पडणार आहोत. इथून कायमचे निघून जाणार आहोत. ते आपल्याला लपूनछपून करायचं आहे. अन ते नुसतं तू महाटा अन मी मुसलमानीन अशासाठी नाही. ते आहेच. दुनियेला हे कसं चालेल? पण ते चालेल अशी परिस्थिती आपण निर्माण करू. मी ते सारं करीन. तुला स्वप्नात समजलं ते खरं आहे. माझा दीर माझ्यावर टपलेला आहे. त्याला आता मी टाळू शकत नाही. तू आता सतत माझ्याभोवती असायचंस. सतत शस्त्रसज्ज असायचंस. म्हणजे मीही तशी काही कमी नाही. मीही सतत सावध आणि सज्ज आहे. मला सगळ्या प्रकारची शस्त्रं चालविता येतात. स्वतःची काळजी घ्यायला मी समर्थ आहे. अन आता भोवताली तुझ्या असण्याचं भक्कम कवच आहे. म्हणून मी पुष्कळ आत्मविश्वासाने निर्णय घेऊ शकते. आपण कुठे जाणार, कुठे राहणार, काय करणार, या सगळ्याचा मी विचार केलेला आहे. गेले एवढे दिवस तेच करत आलेय मी. बाकी कशाचीही फिकीर तू करायची नाही. आपल्याला कधीही कमी पडणार नाही इतका पैसा आपल्याकडं आहे. येणाऱ्या काळात सगळं मी करीन. पण माझा चेहरा याच्या नंतर दुनियेच्या समोर कधीच खुला होणार नाही. तो फक्त तुझ्यासाठी खुला असेल. मी जे जे करीन त्याचा चेहरा तू असशील. ते तूच करतो आहेस असं दुनियेला दिसेल. आणि ते तसंच असतं ना! तुझं अन माझं वेगळं असं याच्यानंतर काहीच असणार नाही. जे जे माझं आहे ते सगळं तुझं. मी माझ्या सगळ्या असण्यासकट तुझी. आणि फक्त तुझी. आपण आपली एक नवी दुनिया उभारू. कुठं फसलो तरी एकत्र फसू. अर्थात तशी वेळच येणार नाही याची मला खात्री आहे. मी योग्य त्या ठिकाणी योग्य तितका पैका पेरलेला आहे.

सगळी गुप्तता पाळली आणि सांभाळली जाईल याची खात्री करून घेतलेली आहे. तपशील मी तुला सांगणार नाही. कारण त्याची गरज नाही. पण निजामशाहीच्या राजयंत्रातील अगदी शक्तिशाली आणि जबाबदार लोक आपण सुरक्षित या राज्याच्या बाहेर जाऊ याची काळजी घेणार आहेत, इतकंच सांगते.'

सायबू याच्यावर काय बोलणार? मुळात तो स्वतःच एका अगम्य आणि अतयं अशा कैफात सापडलेला होता. त्यानं स्वतः होऊन ते पसंत केलेलं होतं. त्यानं फार विचार केलेला नव्हताच मुळी. बेधडक उडी त्याची त्यानेच घेतलेली होती. काळ, रीतीरिवाज, जात, धर्म, परंपरा अशा साऱ्या गोष्टी त्या कैफात धूसर झालेल्या होत्या. त्यानं स्वतःला तिच्यावर सोपवून टाकलेलं होतं. तो कशालाही तयार होता. ती एक असाधारण सुंदर स्त्री होती. इतकं सुंदर असं आणखी काही त्याच्या नजरेनं पाहिलेलं नव्हतं. ती त्याच्या डोळ्यांच्या तळात प्रवेशून तिथं एका गाभ्याशी ठाण मांडून घट्ट बसलेली होती. आणि ते त्याला फार सुखद वाटत होतं. त्या सुखाच्या कैफासाठी तो काहीही करायला तयार होता. तिनं तिच्या डोळ्यांमधून त्याला स्वतःकडे खेचलं होतं. तिने भलं खेचलं असेल. पण प्रतिसाद तर त्यानंच दिला होता. आणि तो संपूर्ण होता. त्यानं हातचं काहीही राखून ठेवलेलं नव्हतं. आता तिच्याखेरीज कोणतीही दुनिया त्याच्यासाठी उरलेली नव्हती. तो आणखी कशाचीही फिकीर करणार नव्हता. आपलं वर्तमान तिच्याभोवती पांघरून त्यानं आपलं असलं नसलेलं सारं भविष्य तिच्या सोबतीसाठी वाहिलेलं होतं. त्याची कशालाच ना नव्हती.

ज्या रात्री ते निघाले त्याच्या जेमतेम काही तास आधी आर्यानानं तिच्या सवतीला बोलावून घेतलं. म्हणाली, 'काही तासांनी मी बाहेर पडतेय. कायमची. बोंबाबोंब होईल. घाबरू नकोस. तुला काहीच माहीत नाहीये. मी कुठं जातेय हे मी तुलाही सांगणार नाही. पण तुला विचारलं कोणी तर माहीत नाही, इतकंच सांग. त्याच्यावर कोणाचाही सहज विश्वास बसेल. अन मुळात तुला ते माहीत नाहीच आहे. मला तुझी काळजी आहे. तुझ्याशी निकाह लावायच्या भानगडीत कोणीही पडणार नाही. तसे कोणी म्हणाले तरी त्या मोहात पडू नकोस. तू काही दिवसांनी तुझ्या माहेरी जा. तुला तुझ्या माहेरच्या लोकांवर अवलंबून राहण्याची पाळी येणार नाही. मी तशी व्यवस्था करीन. आणि कायम करत राहीन. मी जो पैसा तुला देत राहीन तो कधीही कोणाच्याही ताब्यात द्यायचा नाही. भाऊ, बहिणी गोडीगुलाबी लावतील. त्याला बधायचं नाही. तू आहेस तोवर मी तुझी काळजी घेईन. फक्त हुशारीने राहा. मी कितीही दूर आणि कुठे ही असले तरी माझी तुझ्यावर नजर असेल. तुला तिथे राहणे असह्य आणि अशक्य होतेय असं कधीही मला जाणवलं तर मी तुला माझ्यासोबत राहण्यासाठी नेईन याची खात्री असू दे.'

हे सगळं नुसतं ऐकताना सुद्धा त्या सीध्यासाध्या सवतबाईच्या अंगाला कापरं भरलं. तिचे हातपाय लटलट कापू लागले. बोलण्याचा प्रयत्न करताना शब्द लटपटू लागले. आर्याना म्हणाली, 'घाबरू नकोस. माझी काळजी करू नकोस. मी का जातेय हे तुला कळतंय. मी स्वतःची काळजी घेईन. मी घोडेस्वारी करते आणि मला तलवार चांगली चालविता येते, हे तुला माहीत आहे. मी सगळी व्यवस्था केलेली आहे. मी सुखरूप असल्याचा निरोप तुला तुझ्या माहेरी मिळेल. मी निघतेय हे तू कोणाला सांगणार

नाहीयेस. ते तू करू शकणार नाहीस असा बंदोबस्त मी केलेला आहे, हेही मी तुला सांगते. त्याची खरे तर गरज नाही. पण मी या घडीला कोणावरही विश्वास ठेवण्याच्या मनःस्थितीत नाहीय. अगदी तुझ्यावर सुद्धा. पण तुला धीर देणं, सांभाळणं ही माझी जबाबदारी आहे, असं मी मानते. तुझ्या मनाचं कोमलपण, तुझ्या स्वभावातलं चांगुलपण मी अनुभवलेलं आहे. मी तुला कायमच जपत राहीन.'

2

नवा देश. नवी जागा. पुणे गाव आदिलशाहीत होता. तिथं एक कोठी राहायला घेतली. कायमसाठी नव्हे. तात्पुरती. आर्यानाने ठरवलं, यापुढं आपण अफगाण नाही. आपण मन्हाटा. म-हाटा लोकांचे रीतिरिवाज तिला थोडेफार माहीत होते. पण आता गीता होती सगळं सांगायला

आणि शिकवायला. देश, भाषा, रुढी, परंपरा असं सगळं. आर्याना हे नाव मराठीत आहे? नाही? पण तुम्ही तर आर्य वंशाचे मानता ना स्वतःला? आम्ही अफगाण आर्य आहोत. इराणपासून हिंदुस्तानपर्यंत. पण आता मी म-हाटा. ते आर्य आहेत की नाहीत? तुला माहीत नाही? ठीक आहे. माझं नाव काय ठेवूया? काय म्हणालीस? आरेना!

आरेनाबाई! माझी हरकत नाही. मला फरक पडत नाही. महाटा वाटतं ना ते? मग प्रश्न मिटला. आता मी आरेना. म्हणजे आपला आर्यन झाला आरेन. काय म्हणालीस? आरेनराव? ते कशाला? मोठ्या लोकांच्या नावापुढं राव जोडायची पद्धत आहे? ठीक ठीक. आणखी काय म्हणालीस? बम्मन असेल तर पंत जोडायचं असतं. बरं बरं. तू बम्मन आहेस म्हणून ते तुला माहीत असेल. पण आता आम्ही मन्हाटा तर तू पण म-हाटाच. तू गीताबाई. तू मला दीदी नाही म्हणायचं म्हणतेस? का? म-हाटी जुबानमंदी बडी बहनला काय बोलतात? ताई? ठीक ठीक. तू मला ताई म्हणायचं. अन मी तुला? गीता. फक्त गीऽऽता. बरं. छान. छान. आन सायबूचं नाव काय म्हणालीस? सायबराव? साहेबराव? साहेबराव पठारे. पण आता आपण सगळंच बदलतो आहोत ना! हे पठारे कशाला ठेवायचं? तू ते काय बोलली होतीस ना की तुझ्या वालीदनी पटेलकी सात लोकांच्यात देऊन टाकली. सात पटेल. काय म्हणालीस? पटेल नाही? मग? पाटील. हां हां पाटील. सातपाटील. आपण आता तेच नाव घ्यायचं. आरेनाबाई साहेबराव सातपाटील. आरेनराव साहेबराव सातपाटील. खूब चांगला वाटतो. त्याची वालिदा त्याला काय म्हणून पुकारते? वालिदा म्हणजे आईच म्हणतात ना? त्याची आई त्याला काय म्हणून पुकारते? सायबराऊ? मी पण तसंच पुकारलं तर चालेल? नाही चालणार? का? शौहरला त्याचं नाव घेऊन पुकारायचा रिवाज नाही? बरं बरं. मग कसं पुकारायचं? काय म्हणालीस, अहोऽऽ? हे काय असतं? बाईनी शौहरला इतकंच म्हणायचं असतं? ठीक ठीक. अन शौहरला म-हाटीत काय

बोलतात? नौरा? हसू नकोस. काय म्हणतात? नवरा. नवरा. अरे नवरा इकडं ये, असं म्हटलं तर चालेल? पुन्हा हसायला लागलीस. बघ. बघ. चांगली फोडून काढीन तुलाऽऽ. ठीक आहे, फक्त पुकारायचं, अहोऽऽ. चालेल? किंवा काय चालेल म्हणालीस? अहो पाटील, जरा इकडं या. बरं बरं. जमेल मला. हे मला जसं शिकवलं तसं सायबूला पण शिकवायचं. तुझ्याशी बोलताना मी त्याचं नाव बोललं तर चालेल ना? त्याची जुबान जरा देहाती आहे. त्याला शिकवायला पाहिजे. आता तो मोठा माणूस आहे. साहेबराव सातपाटील. आता साहेबराव सातपाटीलच सगळं करणार. आपण दोघी पडद्याच्या आत.'

साहेबराव यांची सगळीकडून शिकवणी चालू होती. आरेना एकीकडे त्याला हजारो आदेश द्यायची अन शय्येत इतकं अनोखं सुख द्यायची की सगळे आदेश त्याला वंद्य. इतकं विरघळल्यावर माणसाचं दुसरं काय होणार?

शय्येतल्या सुखातल्या विश्रब्ध अंतरात ती सांगायची, "तू आता मोठा पटेल. नाही नाही मोठा पाटील. याच्यापुढं सातपाटील. साहेबराव सातपाटील. तू काही साधासीधा असामी नव्हेस. तू तुझी देहाती म-हाटी थोडी बदल. फार नाही, पण थोडी. म-हाटा सरदार लोग बोलतात तितकी बोलायची. बम्मन जैसी नको. तू माझा पाटील, माझा प्यारा. तू माझा नवरा आहेस. तसा वाग. मी तुझी पाटलीण. सातपाटलीण. आरेनाबाई सातपाटलीण. अफगाण आणि महाटा. फार काय बदल नाही. मी सांगते तसं करायचं. गीता तुला म-हाटी सांगेल. ती बोलायची. आपल्याला एक मुलगा आहे. त्याचं नाव आरेन. आरेनराव. आणखी मुलं अल्लाहच्या फजले करम से आपल्याला होतीलच. अल्लाह म्हणजे देव. ईश्वर. भगवान. त्याच्या आशीर्वादाने होतील. ती होईपर्यंत हा आहेच. चालेल ना? समजतो ना तुला? मी सगळा महाटी धरम शिकतो. गीता आहे. ती आपल्याला शिकवते. आता, इथला एक जागीरदार आहे. नाव इम्रानखान. मी त्याला ओळखते. त्यालाही मी कदाचित माहीत असेन. पण मी त्याच्या समोर जाणार नाही. मी अफगाण. पण माझा जन्म विजापुरात. आदिलशाही मुलुख. जा. ओळख करून घे. भेट. गाव बसवतो सांग. मुलुख मांग. तुला तो नाही म्हणणार नाही. त्यांना रान तोडून गाव बसवायचा असतो. त्याचा त्यानला फायदा असतो. तू सांग. त्याला भेटायचं. एक रानाचा मुलुख मांगायचा. तिथं आपण आपलं गाव बसवायचं. आपली गढी बांधायची. पैसा आहे. मला तू खूप आवडतो. इश्क अतोनात आहे. तुला आहे ना? मी दिवानी आहे तुझी. पण अशी दिवानगी नुसती आपल्याला चालायची नाही. मी तुझ्यासाठी पागल आहे. तू पण माझ्यासाठी पागल असायच. पण बाकी कामात पगलापण चालत नाही. ते गाव मंदी मोठी गढी बांधायची. तुला ते घोरपडे, जाधवराव, डफळे आशे म-हाटा सरदार लोक आदिलशाही मुलुखमंदी असतात, ते माहीत हायेत ना? नसेल तर माहीत करून घे. आपन तसाच राहायचा आहे. मोठ्ठी गढी. मोठ्ठा गाव. बाकी समंद पाठीमागे येते. तू माझा नवरा. मी तुझी पाटलीण. आता अफगाण नाही. महाटा पाटलीण. काय समजतो ना तुला? आन ते महाटा सरदार लोगांच्या बिबीपण गोषा वापरतात. म्हणजे कायच सवाल नाय. आपन तसाच करायचा.' आरेनाची शिकवणी ही अशी अन गीताची पुन्हा चालूच. साहेबरावाच्या भाषेचा ढंग बदलण्यासाठी. ते काही चारदोन दिवसात होणारं काम नव्हे. पण चालू होतं. त्याच्या लक्षात येत नव्हतं, पण गीता आता अधिक मोकळी, अधिक आनंदात होती. बंदिस्त मोठा

वाडा होता. पाण्यासाठी आड होता. सगळ्या कामांसाठी चाकर होते. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे कशाहीसाठी कुठेही जाण्याची, बाहेर पडण्याची गरज नव्हती. अगदीच वेळ पडली तर गोषा. गीतासाठी काम एकच. आरेनाताई हिला मराठी भाषा, रीतिरिवाज असं शिकवायचं. रामायण, महाभारतातील गोष्टी सांगायच्या. शिवपार्वतीच्या गोष्टी सांगायच्या. सणवार, व्रते, उद्यापने, वस्त्रप्रावरणे, दागदागिने, नथ, जोडवी, मंगळसूत्र, पैंजण, उपासाच्या तिथी आणि त्यांचे लाभ, मराठा लोकांची जातीव्यवस्था असं दिसेल ते आणि सुचेल ते. ही सतत चालणारी गोष्ट. तिचा ना आरेनाला कंटाळा असे ना गीताला.

साहेबराव त्या इम्रानखान नामक पुणे प्रांताच्या जहागिरदाराला भेटला. म्हणाला, असं करता असं. मुलुख द्या. गाव वसवतो. आता हे जहागीरदार म्हणजे पहुंचे हुये लोक असतात. रानं तोडून गावं त्यांनाही वसवायचीच असतात. मुलुख वाढतो, माणूसबळ वाढतं. महसूल वाढतो. पण म्हणून ते लोक काही या गोष्टी वाटायला बसलेले नसतात. त्यांना माणस पारखावी लागतात. कोणाही सोम्यागोम्याला ते देत नाहीत.

'कुठून आलास?' 'निजामशाहीतून आलो. सध्या आपल्या पुणे गांवी राहतो.' 'निजामशाहीत कुठे होतास? तिकडून का आलास?' 'होतो तिथे होतो. मला आता त्याची आठवण नको.'

'का?' 'मी पळून आलोय. मला मागचं सगळं विसरायचं आहे.' 'पैका आहे?' 'आहे. आणि चोरीचा नाही.' 'का आलास?' 'सांगितलंच पाहिजे?' 'पाहिजे.' 'मी महाटा. एका बामणाच्या पोरीला घेऊन पळून आलो.'

साहेबराव फटकन खोटं बोलला. त्याक्षणी त्याला ते सुचलं. बरोबर की चूक याचा विचार करायला सवडच नव्हती. यानंतर जे बोलला त्याला चिकटून राहाणं जरूर होतं. काम झालं तर आरेनाला ते सांगणं भाग होतं. पण तो नंतरचा मुद्दा.

'असं, असं. बम्मनची छोकरी.'

'नाव काय?' 'कोणाचं? माझं की छोकरीचं?' 'हुशार आहेस. छोकरीचं नाव नको. तुझं सांग.' 'साहेबराव सातपाटील.' 'म-हाटा आहेस. लडाकू असशीलच.'

'एकंगबाजी अन दोअंगबाजी. काठी चालवतो. घोडेस्वारी करतो.

बंदूक तितकी चालवलेली नाही.'

'हत्यार देतो. लडतोस?' 'बिलकूल.'

खानाने भिडू दिला. लडाई लावली. पाच मिनिटात त्याच्या ध्यानी आलं की हा असली लडाकू आहे. म्हणाला, 'थांब, थांब. लडाकू आहेस. पण तू तो अफगाण दिसतोस. बिलकुल हमारे माफिक. सच बोल.

महाटाच ना?'

'बिलकूल सच. धोती फेडून दाखवतो.'

'जरूर नाही. तुला गाव दिला. इथून चार कोशांवर खराडी नावाचा

बंजर मुलूक आहे. समदे दगड आणि काटवन. काटवन समजतो ना?'

'बिलकूल समजतो. मुलूख कसाही चालेल. वहिवाटीला आणतो. ते हुजूर नी पाहिलं की फैसला करावा. त्याच्याआधी मी शब्दही बोलणार नाही.

आणखी काहीही मागणार नाही.'

परतताना साहेबरावाच्या मनात आलं, काम फत्ते झालं. पण खोटं बोलावं लागलं. गीताला समजलं तर काय वाटेल तिला? अचानक असं खोटं बोलावं असं का वाटलं आपल्याला? काहीही ठरवलेलं नव्हतं. तरीही झटकन आपण म्हणालो, बामणाची पोरगी घेऊन पळून आलो. का? मग त्याला वाटलं, त्या त्या वेळी आपण जे काही करतो, ते त्या त्या वेळी अचानक केलं असं जे आपल्याला वाटतं ते तितकं खरं नसेल सुद्धा. जहागीरदार अफगाण. तो आरेनाच्या ओळखीचा. तिला तो ओळखत सुद्धा असेल. तिला मध्ये आणायचं नाही, असं आपल्या नकळत आपल्याला वाटलं, यात गैर नाही. आणि गीताच्या पाठोपाठ आपण वांबोरीतून नाहीसे झालो तर लोकात बोलवा उठली असेलच. ते खरं नाही, हे आपल्याला माहीत आणि गीताला माहीत. पण लोकांचं तोंड कोण धरणार? ते तसं म्हणतच असतील. गीता ते बोलत नाही. पण तिच्याही मनात येतच असणार. ती मुलगी आपल्याला भैनीसारखी आहे, ती आपली बहीणच आहे, यात आपल्या मनात काहीच खोट नाही. नाईलाज होऊन कधीकधी असं करावं लागतं. त्याला इलाज नसतो. वाड्यावर परतल्यावर त्याने - वाड्याला आरेना आधी कोठी म्हणायची. गीताने सांगितलं, 'कोठी नाही वाडा.' आता तीही वाडा म्हणते- आरेनाला सगळा वृत्तांत दिला. जहागिरदाराने परीक्षा केली. प्रश्न विचारले. खराडी म्हणून बंजर काटवन मुलूख दिला आहे. फक्त बामणाच्या पोरीसोबत पळून आलोय असं खोटं बोललोय. आरेना काही वेळ स्तब्ध राहिली. मग म्हणाली, माझ्या अपेक्षेपेक्षा चतुर निघाला आहेस तू. पुढचं पुढं बघू. सध्या गीताला काही सांगू नकोस. त्या त्या वेळेला बघू.

खराडी म्हणजे सगळं रान. खरोखरीच बंजर. बोरी, बाभळी आणि कडुलिंब ही झाडं. बाकी तरवड, शेर, निवडुंग, केकताड असं आणि मुख्य म्हणजे कुसळं. अतोनात कुसळं अन वाळलेलं खुरटं गवत. अधूनमधून सराटे, काटी इंद्रावन असे वेल. प्रचंड काळे पाषाण जिकडे तिकडे विखुरलेले. काही आटलेले ओढे आणि त्यांच्या काठांवर सुकलेल्या निरगुडींच्या रांगा. रानजनावरं थोडीफार असतीलच. कितीही कठीण परिस्थितीत ती असतातच. अन जगण्यासाठी माणसांना सहजी न दिसण्याची खबरदारी त्यांना घ्यावीच लागते. पण एकूण तो सगळा मुलूख पाहून साहेबरावचं मन उदास झालं. या अशा रानात आपण काय करणार, कसं गाव वसवणार? कोण येईल इथं? अन जहागिरदाराला तर मोठ्या झोकात आपण म्हणालो, मुलूख कसाही चालेल. वहिवाटीला आणतो. त्या संध्याकाळी तो घरी गेला तेव्हा साहजिकच तो गप्प गप्प होता. काय बोलणार? काय सांगणार? आरेना जाणती. नुसती त्याच्यापेक्षा वयाने मोठी नव्हे. छान गप्प बसली तीही. एकांतात आल्यावर म्हणाली, 'काळजीत दिसतोस. ती करू नकोस. मी आहे ना तुझ्यासोबत. आपण वाळवंटात उद्यान फुलवू. माझ्या आयुष्याच्या वाळूत तू ते फुलवलं आहेस. माझ्या वाट्याला आलं तितकं प्रेम तर कोणाच्याही वाट्याला आलेलं नसेल. तुझ्या अंगी देण्याची खूप ताकद आहे. मी आहे ना तुझ्यासोबत.' तिनं त्याला स्पर्श केला आणि त्याच्या पाठीवर थोपटलं. त्याक्षणी त्याला त्याचे वडील सांगायचे त्या गोष्टी आठवल्या. त्याच्या पूर्वजांना डोंगरगणचं रान इनामात मिळालं होतं तेव्हा तिथं अशीच परिस्थिती होती. नुसतंच रान आणि रखरख. मग त्यांनी कसे बंधारे घातले, ओढे मोकळे केले. रानात पाणी बांधलं. रखरखीत दुनियेत हिरवाई आणली. आणि हिरवाईतून निळा आणली. निळा

आणणं म्हणजे तेज आणणं. त्याला वाटलं, हे तेज आपणही खराडीच्या रानात नक्की आणू. तो मोकळा झाला. त्यानं त्याला जे दिसलं, वाटलं ते तिला सांगितलं. मनातली नाराजी सांगितली. तिच्या शब्दांनी आणि स्नेहल स्पर्शाने आलेला धीर सांगितला. वडिलांच्या गोष्टी सांगितल्या. स्पर्श, प्रेम आणि वाहत्या स्नेहल प्रवाही ओलीतून तो सशक्त झाला. म्हणाला, 'तू आणि मी मिळून तिथं आपण आपला स्वर्ग उभारू. मोठा वाडा बांधू. तटबंदी घालू. माणसं गोळा करू. तिथलं पाणी बांधून रखरखीत रानात हिरवी दुनिया उभी करू.' तिनं आणखी काहीही न बोलता त्याच्या पाठीवरून हात फिरवला. त्या स्पर्शात विरघळताना त्याला वाटलं, हे सगळं इतकं शक्य आहे तर उगीच काळजी का करायची? आरेना आहे म्हणजे सगळी दुनिया आहे. सगळं शक्य आहे. नुसतं शक्य नाही. ते नक्की होणार आहे. आपली सगळी दुनिया ह्या स्त्रीने इतकी सुंदर केलेली आहे तर त्या उजेडात आपण जे काही करू त्यात सुंदर वास्तवाखेरीज बाकी काही निर्माणच होऊ शकत नाही. या स्त्रीचा स्पर्श मला झालेला आहे. तिचे श्वासोच्छवास माझ्या श्वासोच्छवासात मिसळतात. एक कोमल गंध नाकाशी येतो आणि सगळ्या शरीरभर दाटतो. मला कशाचीही भीती नाही. ही दुनिया फार कोमल सुंदर आहे. मी हात घालीन तिथं पाणी काढीन. कारण ही माझ्या आत आहे. ती मी आहे. मी ती झालेलो आहे. तर मी कशाची काळजी का करायची? आणि हा फक्त प्रेमाचा कैफ नाही. जगणं हा मुळातच कैफ असतो. तो वाट्याला यायला हवा. दिसायला हवा. आपण कोरड्या ऋतूत हे खराडी गाव पाहिलंय. पावसात ते वेगळं असेल. ठिकठिकाणी पाणी बांधलं की ते आणखी वेगळं होईल. तो तिला त्याची स्वप्नं सांगत राहिला. ती त्याला हलकेच थोपटत राहिली.

रात्री त्याला जे जसं वाटलं ते तितकं तसं दुसऱ्या दिवशी सकाळी वाटलं नाही. म्हणजे तो अगदीच उदास होता असं नव्हे. पण विचार करत होता. तो विचार करत करत मुठा नदीच्या काठावरील एका विठ्ठल मंदिराच्या सभामंडपात जाऊन बसला. नदीकाठचा मोकळा वारा होता. स्वच्छ सूर्यप्रकाशातल्या खेळत्या हवेत समोर काळा विठोबा त्याच्या नेहमीच्या पवित्र्यात उभा होता. शेजारी रुक्मिणी. पंढरपूर वगळता इतर सारीकडे ते शेजारी एकत्र गुण्यागोविंदाने उभे असतात. तिथं मात्र तिनं त्याच्यापासून फारकत घेतलेली आहे. का घेतली असेल? कशावरून झगडा झाला असेल? असला काहीबाही विचार तो करत असताना वारकरी शैलीतला गंध टिळा लावलेले एक वयस्क गृहस्थ तिथं आले. मोठ्याने घंटा वाजवत त्यांनी विठू नामाचा गजर केला आणि उंबरा ओलांडत गाभाऱ्यात जाऊन विठोबा-रखुमाईसमोर लोटांगण घातलं. रोजचा परिपाठ असेल त्यांचा. सगळं यथासांग उरकून ते बाहेर आले आणि सभामंडपात एका खांबाला टेकून निवांत बसले.

'कोन गावचे पाव्हने म्हणायचे?' 'इथं पुण्यातच राहतो.' 'इकडं भांबुर्यात काय काम घेऊन आले?' 'सह्याज- आलो देवाच्या दारी.' 'पुण्यात कुठशिक रहाता?' 'जोगेश्वरीच्या तकडं.' 'लय लांबची वाट केली.' 'आलो. चालत चालत.'

हे वारकरी शैलीचे गृहस्थ भांबुर्डा गावचे पाटील. शिवरामबुवा बहिरट. बहिरट-पाटील. पाटलांनी शांतपणाने धोरणा-धोरणाने साहेबरावाची सगळी माहिती घेतली. नाव साहेबराव सातपाटील. तो निजामशाहीतून अलीकडेच इकडे आलेला आहे. त्याला

खराडीच्या रानात गाव वसवायचं आहे. ते रान त्याला फार रखरखीत वाटलेलं आहे. तिथं पाणी कितपत निघेल अन कितपत टिकवून बांधता येईल याच्याविषयी तो साशंक आहे. पोरगा होनहार दिसतो असं पाटलांचं खासगी मत झालं. सगळं ऐकून घेतल्यावर ते म्हणाले, "सकाळी सकाळी देवाच्या दारी काय आच्यांब्याची गोठ म्हणायची, आवो पाच सालाआधी आमीच त्यो इचार केला व्हता. जागीरदाराची परवानको घेतली. समदी यवजाना बईजवार केली. पन आखीर पैक्यात आडकलो. त्याच्या पुढं कायच इलाज चालला नाही. आता तुमी करीत असतान तर आपून सांगू ना तुमाला. आपून दोघं संगतीनी जाऊ. पघू. तिथं जाग्याव आम्ही काय यवाजलं व्हतं ते दाखवतो. त्याच्यात डोकं घालून तुमी आनखी भर घाला. गाव एकदम चांगलं बसातंय तिथं. पैक्याची आडचन नसन तर कायच सवाल नायी. साहेबरावला वाटलं, सकाळी सकाळी शिवरामबुवांच्या रूपाने देवच भेटला आपल्याला. नाही तरी विठोबाच्या देवळातच त्याला ते भेटले होते. विठोबानीच आपल्याला बोलावलं आणि त्यांची भेट घालून दिली अशी त्याची भावना झाली.

दुसऱ्या दिवशी ते खराडीच्या रानात गेले आणि खूळ लागल्यासारखे नंतरचे अनेक दिवस जातच राहिले. सगळं रान फिरून, एकेका जागेची तपशीलवार झडती घेत, शिवरामबुवांनी साहेबरावला कुठं कुठं काय काय आणि कसं कसं करता येईल ते सांगितलं. 'रानात काहीच वाया जात नाही. काटवन तोडून गंज घालायचा. उतारांना आळा घालण्यासाठी मोठाले दगड शेजारी बसवत ताली बांधायच्या. आज आपल्याला समदी रखरख दिसती. पन पाउसकाळात कैक पानी आसतंय. ते वाहून जाऊ द्यायचं नाही. समदं कोंडून ठिवायचं. ताली बांधल्यावर साचलेलं पाणी निघून जाण्यासाठी त्यांची तोंडं बांधायची. तिथून ते ओढ्यात आलं का बांध हायेतच. ओढ्याला ठिकठिकाणी आडवायचं. पाणी जिरेल असं बघायचं. पाणी आपल्या शिवारातून हालू द्यायचं नाही. जाग्याव जिरवत राहायचं. खोंगळी-खांगळी रुंद करायच्या. त्यांच्या दोन्ही बाजूंनी आंबा, चिंच, जांभळी यांची रोपं टाकायची. बोर, लिंब, बाभळ ही या रानाची सोभा हाये. त्याला राहू द्यायचं. अगदी गरज पडली तरच तोडायचं. झाडं आसली का पावसाचं मान पडतं राहातंय. येहरी खांदायच्या. कोरड्या लागल्या तरी डरायचं काम नाही. चारेक सालात त्यांच्यात पाणी येतंय. आन देवाची मर्जी आसंल तर काही काही जागी आजच पाणी लागतंय पघा. आता, गाव बसवायचं म्हंजी गावाला समदे लोकं लागतेत. शेतीच्या वहितीला कुणबी लागतेत, तशेच बाकी समदे कारूनारू लागतेत. ते बराबर त्यांच्या हिसाबानी जमा व्हतेत. नईच आले त त्यांला आपन आन्हायचं. त्याच्यात पाटलाला कमीपणा नसतोय. गावाची जागा आन शिवाराची जागा यांच्यात फरोक आस्तोय. पिक निघण्यासारखा नसलेला खडकाळ पट्टा गावासाठी राखायचा. माझ्या मनात व्हता त्यो तुमाला दाखवून देतो. उप्पर तुमची मर्जी. एकदम मस्त वट्यासारकी ही जागा हाये मदभागी. त्याच्या मदभागी तुमचा वाडा उठवायचा. त्याच्याभवती बाकीचे लोकं. मजुरीला माणसांची कायच कमती पडत नायी. कामाचा रोज रोख मिळाला का लोकांची खुशी रहाती. वाडा बांधायचा म्हनलं का कारागीर आले. गवंडी, सुतार, लोहार. बाकीचे गोळा व्हतेत आपसूक. काम दिसायला लागलं का लोकं तुमच्या माघं लागतीन. एकीकडं रान तोडायचं आन दुसरीकडं वाडा बांधायला सुरुवात करायची. एखांद्या येहरीला पानी

लागलं तर सोन्यापरीस पिवळं. नाय त काय तरी तोड काढू.'

साहेबरावचा दिनक्रम जवळपास ठरल्यासारखा झाला होता. रोज सकाळी उठलं अन आवरलं की बैलगाडी जुपायची आणि विठोबाच्या देवळात जाऊन हजर व्हायचं. शिवरामबुवा त्यांच्या ठरलेल्या वेळेला दर्शनासाठी येत असत. तिथून दोघे गाडीत बसले का खराडी. काटवन काढण्यासाठीची माणसं, विहिरी खांदणारी माणसं, शिवार तयार करणारी, वाड्याचा पाया घेणारी माणसं ; अशा सगळ्या वेगवेगळ्या टोळ्या होत्या. हे सगळं एक-दोन दिवसात अर्थातच झालेलं नव्हतं. लागतील तशी माणसं हुडकून, ठरवाठरवी करून आणावी लागलेली होती. शिवरामबुवा होते म्हणून सगळं जमत होतं. भांबुडाच्या पंचक्रोशीत त्यांचं नाव होतं, त्यांचा धाक होता आणि मुख्य म्हणजे त्यांच्याविषयी आदर होता. कामे करताना लोकांना साहेबरावच्या वर्तणुकीचा अनुभव यायचा. वेळच्या वेळेला ठरलेलं वेतन. सहाळ-गहाळ वागणं-बोलणं. मोठ्या उंच कुळीचा माणूस हाये. ते पघितलं तरी समजातं. पण वागणं अज्याबात फुगिरीचं नायी. पाटीलबाबा उगंच नव्हते सांगत. असा साधारण अभिप्राय त्याच्याविषयी सारीकडे होता. पाटीलबाबा म्हणजे शिवरामबुवा. ते आपल्या घरचं स्वतःचंच काम असल्यासारखे सगळं करत होते. त्यांच्या मनातलं स्वप्न आकार घेतानाचा कैफ अनुभवत होते. साहेबरावला जसं देवानेच आपल्याशी पाटील बाबांची भेट घालून दिली असं वाटत होतं, तसंच पाटलांची ही विठोबानेच आपल्याला हे काम सांगितलेलं आहे अशी मनोमन भावना होती. साहेबराव रोजचा अहवाल आरेनाला देत होता. नदीकाठच्या देवळातल्या पाटलांच्या भेटीपासून ते रोजच्या भेटीगाठी, खराडीत चालू असणारी कामे, तिथे भेटणारी माणसे, त्यांचे जगणे-वागणे असे पुष्कळ आणि नियमित. पाटलांचे तर अगदी अर्कचित्र रोजच्या रोज तिच्या समोर रेखाटले जाई. रोज काही ना काही वेगळे आणि अधिकचे असेच. ते तिच्या मनावर इतके बिंबलेले होते की रोजच तिच्या मनात या शिवरामबुवा पाटलाला बघायची, भेटायची इच्छा होई. पण ते कसं शक्य होतं? तिला तर आपला चेहरा साहेबराव खेरीज आणखी कोणालाही दाखवायचा नव्हता. पण म्हणून काय झालं? ती तर त्यांना पाहू शकत होती. पडद्याच्या आडून त्यांच्याशी बोलू सुद्धा शकत होती. आपण तितकं सहज मराठीत बोलू शकू की नाही याविषयी अजून ती जरा दुविधेत होती. किंवा आपल्या मराठीला अजूनही पश्तो आणि दखनीचा वास येतो, असं तिला वाटत होतं. तिनं गीताला एकदा विचारलं सुद्धा. म्हणजे असं की, 'आता मी कितपत चांगलं मराठी बोलतेय?' गीता म्हणाली, 'पुष्कळच चांगलं. पण मराठ्याची बाईल आणखी वेगळ्या झोकात बोलते. तू एका बामणीनीकडून ही भाषा शिकते आहेस. इथं जातीनुसार भाषा बदलते. त्यासाठी तुला सायबूदादाचीच जास्त मदत होईल. अन त्याला आणखी वेळ लागेल.' म्हणून पाटीलबाबा यांना घरी बोलावणं, त्यांना किमान पडद्याच्या आडून पाहणं अशा स्वतःच्या मनातल्या भावनेवर तिने लगाम लावला होता. साहेबराव रोज ज्या विठोबाच्या देवळात जातो, तो देव कोण, त्याचं मराठी लोकांना महत्त्व काय, याची माहिती मात्र तिने भरपूर मिळवली होती. त्या देवळात गीताला घेऊन कधीतरी जायचं असं तिने ठरवलं होतं. तिने घरात सारा माहौल जसा मराठी ठेवला होता, तशी भाषाही फक्त मराठी राहील असं पाहिलं होतं. पण स्वतः ती फक्त तीनच माणसांशी बोलू शकत होती. गीता, साहेबराव

आणि आरेन. बाकी कामाला येणाऱ्या बायांना आतल्या घरात प्रवेशबंदी होती. संपर्कबंदी होती. आधी त्या बायांना ते विचित्र वाटे. पण त्यांनीही ती सवय करून घेतली होती. शिवाय गीता समोर येत होतीच. तीच साहेबरावची बायको आहे, असं त्यांना वाटत होतं. तिलाच ते मालकीण समजत आणि त्याप्रकारे तिच्याशी वागत. गीताला ते कळे आणि जरा विचित्र वाटे. पण याला काही इलाज नाही असेही तिला पटत असे. सैपाक गीता आणि स्वतः आरेना मिळून करत असत. गीता बामणीन. तिचा सैपाक मिळमिळीत. तशी अहमदनगरला आरेनाच्या सोबत इतकी राहिल्यामुळे तिला सगळं माहीत झालेलं होतं. पण तिला सामिष पदार्थ वर्ण. अन साहेबरावाला आपला अफगाणी शैलीचा सैपाक आवडतो असं आरेनाच्या लक्षात आलं.खाण्यातली रसिकता साहेबरावच्या ठिकाणी फारशी नव्हती. मराठा जातीतल्या लोकांना आमटी -ज्याला ते खळगोट म्हणतात ती- सगळ्यात जास्त प्रिय असते हे तिला पटलं. आमटी आणि भाकरी किंवा साधं दूध आणि भाकरी असं त्याला पुरेसं होई. तिनं स्वतः याची सवय करून घेतली. पण तिच्या आवडीचे अनेक अन्नपदार्थही तिने त्याला खाऊ घातले. ते सारे तो विशेष आवडीने खातो असं तिच्या लक्षात आलं. खाणं रसिकतेनं खायचं असतं हे मराठ्यांना सहसा माहीत नसतं. ते पोट भरण्यासाठीच फक्त खातात. साहेबरावही तसाच होता. पोटाची पिशवी भरण्यासाठी समोर येईल ते भराभर खाणं अशी त्याची सवय होती. आधी आरेनाला आश्चर्य वाटे. खाणं कसं रसिकतेने खायचं हे तिनं त्याला न दुखावता शिकवायचे प्रयत्न केले. तो आता हळूहळू बदलत होता. घरातल्या मराठी माहौलचा सगळ्यात जास्त जाच आरेनला होत होता. आईच्या गर्भ पिशवीत असल्यापासून ते थेट आत्तापर्यंत, म्हणजे पाच वर्षे वयाचा होईपर्यंत त्याच्या मेंदूत फक्त पुश्तु आणि थोडंबहुत दखनी भाषेचं संचित तयार झालेलं होतं. आणि आता अचानक घरात ह्या म-हाटी भाषा आणि रीतिरिवाज यांचा

माहौल सुरू झाला होता. तो मुलगा फार गोंधळून गेलेला होता. पण होत असलेल्या बदलाला धैर्याने सामोरे जाणं त्याला भाग पडत होतं. ते तो करत होता. त्याबाबत गीता जशी आरेनाची गुरू होती, तशीच आरेनचीही. तिने ते करत राहायचं अशी आरेनाची सख्त ताकीद होती. अडखळत धडपडत तो अफगाण पोरगा नवं म-हाटा वळण गिरवत होता. साहेबरावाला बाप म्हणून स्वीकारताना त्याला फारशी अडचण आली नाही. पण हा भाषेचा गोंधळ त्याला त्रस्त करत होता. या त्रासावर स्वार होणं त्याला भाग होतं.

पाटीलबाबा आणि साहेबराव यांच्यात एक नवं नातं रुजत चाललेलं होतं. ते जवळपास बाप आणि मुलगा यांच्यात असतं तसं होत चाललेलं होतं. हा साहेबराव आपल्या मुलांपेक्षा फार कर्तबगार आणि हिंमतबाज माणूस आहे याबद्दल पाटलांच्या मनात यत्किंचितही शंका उरलेली नव्हती. ते त्याला स्वतःच्या घरी घेऊन जात आणि आपल्या मुलांना हा तुमचा सगळ्यात धाकटा पण तुमच्या सगळ्यांपेक्षा कर्तबगार असलेला भाऊ आहे असं सांगत. पाटील त्यांच्या वयाच्या साठीत होते. त्यांना तीन मुलं आणि एक मुलगी. सगळे साहेबरावापेक्षा मोठे. त्यांचा चारचौघांसारखा सुखी म्हणता येईल, असा प्रपंच होता. मुलगी पाषाण येथील शितोळे यांच्यात दिलेली होती. त्यांची मुले सगळी इमाने इतबारे शेती हाकणारी होती. जगण्यात फार मोठ्या आकांक्षा नसलेले ते सीधेसाधे लोक होते. पाटलांमधली हिंमत आणि स्वप्न पाहण्याची वृत्ती त्यांच्या ठायी नव्हती. ती

त्यांच्यात नव्हती म्हणून पाटील दुःखी होते असं नव्हे. पण कोणात तरी ती असती तर त्यांना ते आवडलं असतं. अन आता साहेबरावाच्या रूपाने त्यांना असा धर्माचा मुलगा मिळाला होता. त्यांची त्याच्या विषयी तशीच भावना होती. पाटलांच्या मनात आपल्याविषयी ही भावना आहे, हे साहेबरावला फार सुखाचं वाटत होतं. पण मग तो त्यांना अजूनही आपल्या घरी घेऊन गेलेला नव्हता. ते कसं करायचं आणि पाटलांना आपल्याविषयी काय, कितपत आणि कसं सांगायचं, हा प्रश्न त्याच्यासमोर होता. त्याविषयी त्याच्या मनात अनेकदा विचार चालत. काय सांगावे आणि कसे सांगावे, हे सांगावे की ते सांगावे, असे बऱ्याच प्रकारे तो विचार करत असे. त्यांच्याशी काही ना काही प्रमाणात खोटे बोलावे लागेल यात वाद नव्हता. आपण एका अफगाण सरदाराची बायको तिच्या मुलासोबत घेऊन या मुलुखात आलो आहोत, असं सांगणं अशक्यच होतं. जहागीरदाराला, आपण एका बामणाच्या पोरीला पळवून घेऊन इथं आल्याचं, त्यानं सांगितलेलंच होतं. खोटं बोलणं आणि मनातल्या मनात त्याचा जाच सहन करीत जगणं आता आपल्याला भागच आहे. पण ते सावधपणाने करणं सुद्धा आवश्यक आहे हे तो जाणून होता. अधिक विचार न करता येईल त्या परिस्थितीला सामोरं जाणं इतकंच तो करू शकत होता. पाटलांना जे सांगायचं त्यात असत्य कमीत कमी असावं असं त्याला वाटत होतं. त्या देवमाणसाशी खोटं बोलावं लागण्याची कल्पना त्याला ताप देत होती. पण काहीतरी सांगणं, ते पटण्याजोगं असणं आणि जास्तीत जास्त खरं असणं त्याच्यासाठी गरजेचं होतं. विशेष म्हणजे पाटलांनी त्याला अधिक काही कधीही विचारलेलं नव्हतं. त्यांच्यासाठी त्याचं मराठा असणं स्वयंस्पष्ट होतं. रीतभात, बोलण्या-वागण्याची पद्धत यातून ते स्पष्ट होत होतं. तो निजामशाहीतून इकडं आलेला होता हे त्यानं त्यांना पहिल्या भेटीतच सांगितलेलं होतं. पण मग कोणत्या गावाहून आला, इकडेच कसा आला हे काहीही त्यांनी त्याला विचारलेलं नव्हतं. नशीब काढण्यासाठी माणसं कुठूनही कुठेही जाऊ शकतात हे त्यांनी गृहीत धरलेलं होतं. तो इतक्या वेळा त्यांच्या घरी गेला होता. पण त्यांनी कधीही त्याच्या घरी जाण्याची इच्छा- सरळ काय पण आडवळणाने सुद्धा-व्यक्त केलेली नव्हती.

एके दिवशी मनातल्या मनात सगळी तयारी करून त्यानं त्यांना सांगितलं. म्हणाला, जहागिरदाराला मी सांगितलंय की मी बामनाची पोर घेऊन निजामशाहीतून इकडं पळून आलो. पण ती बात खोटी. म्हणजे बामनाची पोर माझ्यासोबत आहे ही बात खरी. पण ती मला सख्ख्या बहिणीसारखी आहे. दुसरा काहीच इलाज उरला नाही म्हणून ती आमच्यासोबत आहे. नंतर त्यानं गीताची सगळी गोष्ट जवळपास घडली तशी खरी सांगितली. ती मुसलमान सरदाराच्या घरात राहिली म्हणून तिचं ठरलेलं लग्न मोडलं. नाही नाही ते प्रश्न विचारून जवळच्या नातेवाइकांसकट सगळ्यांनी तिला तिचा जीव नकोसा केला. तिनं जीव द्यायचे प्रयत्न सुद्धा केले. आम्ही इकडं यायचं ठरल्यावर माझी होणारी बाईल तिला म्हणाली, तू चल आमच्यासोबत. ते सगळं आम्ही हुषारीने केलं. आधी ती गावातून बेपत्ता झाली. आठ दिवसांनी मी फरार झालो. गावात भूमका हीच असणार की बाबा, सायबू बामनाच्या पोरीला घेऊन पळाला. त्याला काय इलाज नाही. पण तिचा जीव तर वाचला. राह्यली माझ्या बायलीची बात. तिला मातर खरोखरच पळवून आणलंय मी. आमचा जीव होता एकमेकांवर. पण तिचं लग्न दुसरीकडं ठरलं. ती

देसमुखांच्या खानोट्याची. लांब तिकडं देऊळगावराजा म्हणून गाव आहे; तिथली आहे ती. ती म्हणाली, तू मला पळवून ने. नाहीतर मी जीव देईन हे नक्की. दुसरा इलाजच नव्हता. आलो पळून. पैका मला एका लढाईत गावला. नायतं एवढा पैका आपल्या कुनबिकीत काह्यानी मिळतो? आशी समदी बात. आता ते देशमुक लोकं आन तिचा त्यो होऊ घातलेला नवरा आमच्या माघावर कधीपन येऊ सकतात. म्हणून ती म्हने का मी आता कायम पडद्याच्या आत. मी कोनाला सुद्धा भेटणार नायी. इतक्या बारी तुमच्याकं आलो. पन तुमाला घरी बोलावलं नायी, याच्यापाठी अशा गोष्टी हायेत.

पाटीलबाबांनी मध्ये काहीही न विचारता सगळं ऐकून घेतलं. नंतर

बराच वेळ थांबून म्हणाले,

'सायबराऊऽऽ त्या सात लोकात तू व्हता?' 'होतो.' 'म्हंजी ती बामनाची पोर तुपल्या गावची.'

'हां, पाटीलबाबा. आमच्या गावच्या पाटलाची लेक ती. नाव गीता. पाटील बामन. त्या पाटलानी त्यांची पाटीलकी सात कुळीत वाटून धिली. त्यात आमचं घर एक.'

'म्हणून तू सातपाटील. मुळची कुळी वायली आसन.' 'हां. नाव सांगू? नाव, गाव समदं -'

'नको. काय जरूर नायी. सायबराऊ तुपल्या मानसाचं नाव काय? म्हंजी जी पोर तुपल्या संगती आली, तिचं नाव काय? बायलीचं नाव आसं इचारायची पद्दत नायी. पण समज की बाप लेकाला इचारतो-'

माणस म्हणजे पत्नी. बायको. बायकोला माणसं म्हणण्याची पद्धत फार जुनी.

'तिचं नाव आरेना. आरेनाबाई. आन पोराचं नाव आरेन. आरेनराव.

आईवरून लेकाचं नाव. तिनीच ठुलं. आपुन त्याच्यात नायी.'

'ह्या देसमुक लोकांची नावं आलकच आस्त्यात च्याऽऽयसका. बाईचं आसं नाव आपुन त आईकल्यालं नायी कव्हा. पन आस्तेत पुष्कळ. आता आमचे हे पाषाणचे जावई. शितोळे. ते देसमुकच हायेत. नाव मायती हाये का? त्यांचं नाव हाये, रुस्तमराव. एकदम मुसलमानी वाटातं ना! आन आशेच ते समदे कंठाजी, सुलतानजी, तुरकमानजी, उदेभानजी आशा नावाचे लोकं. आपले देवादिकांचे एवढे नावं. पण त्यानला ते आठवत नायीत. ह्या देसमुक्या ह्या मुसलमान राजांनीच धिल्याना ह्यानला. तव्हा ते त्यांचेच नावं घेतेत, आसंच आसन. दुसरं हाये काय? जुन्या जमान्यात कुढं देसमुक्या व्हत्या?'

'ते तुमालाच मायती पाटीलबाबा. पन हे लढाईत पैका घावल्याची बात तुमाला पटली नसन. म्हंजी तुमच्या मनाला ती बरी लागली नसन. आशे लुटून आणल्याले पैशे. तुमी वारकरी मानुस. तुमी बोलले नसले तरी-'

'ह्ये पक सायबराऊ. आपन म-हाट लोकं. आपल्या ह्या मुलखामंदी दगडधोंडे सोडून कायच सापडत नायी. येक कोकणचा देस सोडला त पाऊस पान्याची कायमची हलाखी. आन तिथं तरी काय ; पडातं ते समदं वाहून जातंय. मी कैक मुलुक हिंडलो. वर गुजरातमंदी गेलो आन खाली कर्नाट देसमंदीपन गेलो. दारका पाह्यली आन अनेगोंदी पन पाह्यली. ते देसमंदी समदीकं मोकार पानी आन लोन्यावानी माती. झाडझाडोऱ्याच्या सावलीचा जिमिनीला कायम आल्हाद. इथं च्यायसका आपन कायम भुक्याल्याले. आन जगायचं तर आस्तंच ना! मंग काय करणार मानूस? महाट्याच्या घरात पोर पैदा झालं का लढाया

शिकातं. का? टिकाव धराया दुसरं सादनच नायी. रानात वाघांचे बछडे सुद्दा आशेच धराधरी करून शिकात्यात. लांब काह्याला, कुत्र्यांची पिल्लं अशीच लहानपनीपसून शिकात्यात. आपण महाट लोक त्याच जातीचे समजायचे. घोड्यावर बसून शिलंगणाचं सोनं लुटायला भायेर पडायचा रिवाज आपला देस सोडून आनखी कुढंच नायी. आरे आज समदे हे मुसलमान राजे आलेत. पन लढनारे लोकं कोनचे हायेत? समदे महाटे जिकडंतिकडं. आंधी समदे म-हाटेच राजे व्हते ना! आन उंद्या कव्हाना कव्हा महाटा राजा व्हनारच हाये, त्याच्यात मला शंक्या नायी. आरे ह्यो इठुबा पंढरपूराचा, त्यो सुदिक आपल्या लोकांनी कर्नाट देसमधून लुटून आनला. अनेगोंदी मंदी लय मोठं देऊळ हाये त्याचं. आता, जिथं देव सुद्दा आपल्याला लुटून आन्हावा लागतोय तिथं बाकीच्या गोष्टींची काय बात? हां, आता, दुसऱ्याचं वढून आनायचं म्हंजी चांगलं नायीच हाये. वंगाळच काम हाये ते. पन त्याच्याबिगर टिकाव नायी असा हा आपला मुलुक. पांडुरंगानी ह्या मुलखात आपल्याला जल्म धिला तव्हाच परवानकी देऊन टाकली का बाबा गरज पडली का बस घोड्यावर आन आन तुला पायजे ते. आन ती काय सोपी बात आसती का? कैक मरतेत. जित्ता राहातो त्यो सांगतो गोस्टी. याच्यात जास्तीत जास्त आपण काय करू सकतो? का बाबा ज्यो खुद लुटारू हाये त्याला लुट. गरीबानला नको. निस्कारणी कोनाला मारू नको. बाईबापड्यांची आबरू लुटू नको. लेकराबाळांवर हात टाकू नको.'

'आज मपल्या मनाला लय चैन आली ; तुमाला सांगतो, पाटीलबाबा. आता मी तुमाला मोकळ्या मनानी घरी घेऊन जाईन. आरेना दुसऱ्यांच्या संबुर येत नायी. तुमी मला परके नायी. तिच्या संगती तुमच्याबद्दल मी रोज बोलत असतो. तेवढी एकच बात आपन तिच्या मर्जीवर सोडू. चालन ना?'

'का नायी चालनार? तुपलं जे जे जसं जसं आसन ते तसं मला चालनार सायबराऊ.'

दोन दिवसांनी साहेबराव पाटीलबाबांना आपल्या घरी घेऊन गेला. आधीच सगळी तयारी केलेली होती. पाटीलबाबांशी काय बोलणं झालं, त्यानं त्यांना काय सांगितलं हे आरेना आणि गीताला सविस्तर सांगितलं. अन छानच झालं सगळं. गीतानेच केलं. ती समोर आली तेव्हा ती बामनीन आहे, हे सांगायची गरजच पडली नाही. बामनांच्या बाया डोक्यावर पदर घेत नाहीत. गीताचा ही नव्हता. तिच्या बोलण्या-वागण्यात साधेपणा आणि मोकळेपणा होता. आरेना चिकाच्या पडद्याआडून सगळं बघत होती, ऐकत होती. अघळपघळ झुबकेदार मिशा असलेला वारकरीपंथी पाटीलबाबा तिलाही आवडला. आरेन एकदा बाहेर आला आणि साहेबरावाच्या गळ्यात पडून पाटीलबाबांना नीट बघून गेला. 'चांगलं हिरदार पोरगं हाये. आक्षी पठानावानी दिसातं.' ते कौतुकापोटी सबागती बोलून गेले तेव्हा साहेबरावाचं काळीज लक्कन हललं. पण पाटलांचा अभिप्राय निर्विष आणि निरागस होता. त्यांच्या मनात आलं ते ते बोलून गेले, याच्या पल्याड त्यात काहीही नव्हतं. क्षणभर भांड्याबाहेर निघालेला त्याचा जीव पुन्हा अलगद भांड्यात पडला. निघताना पडद्यापल्याडून आरेना म्हणाली, 'थांबा हां.' ते इतक्या अस्खलित महाटी वळणात की साहेबराव सुद्धा चकित झाला. ती बाहेर आली. महाटमोळ्या पद्धतीचं नऊवारी लुगडं नेसलेली. अंगभर पांघरलेला पदर डोईवरून घेतलेला. डाव्या हातानं तो गुंडाळलेला ठेवत पाटीलबाबांच्या समोर झुकून तिनं झोकात कुर्निसात केला.

'चांगलं हाये. आसीरवाद हायेत.' ते हात उंचावून म्हणाले.

बाहेर पडल्यावर ते हसत हसत म्हणाले, "तू काहीय म्हन सायबराऊ; पन ह्या देसमुक लोकांचं वळान आलकच. आपल्या कुणब्यांच्या बाया पाया पडात्या तव्हा गुडघे टेकून तुमच्या पायांवर डोकं खरुखरीचं घाशित्या. पन यांचं कामच न्यारं. त्या तुमाला शिवणार नायीत. सुलतानाच्या दरबारामंदी लोकं त्याला कुर्निसात करित्या तशा ह्या बाया आपल्या संबुर करित्या. समदं मुसलमानी वळान. तरी बरं, मुसलमानात पाया पडायची रीत नायी. चांगली हायेत हां तुपल्यावाली मानसं. समदं देसमुकी वळान. एक ना एक दिवस ही बाईल तुला पन देसमुक केल्याबिगर राहायची नायी, मी सांगून ठुतो तुला.'

आरेनानं साहेबरावला बाटलीत बंद करून आणावा तसा इकडं आदिलशाहीत आणला होता. तिच्याकडं असलेलं सगळं त्याला देऊ केलेलं होतं. कायावाचामने आणि धने ते एकमेकांचे एक झालेले होते. तो कधीही तिच्या शब्दाबाहेर गेलेला नव्हता. ती म्हणेल ते आणि तसं. शय्येत सुद्धा तीच पुढाकार घ्यायची. त्याचं नवखेपण घालवायला दुसरा मार्ग नव्हता. शरीरांच्या एकत्र येण्यात इतकं सुख असतं हे त्याला मुळी माहीतच नव्हतं. ती ज्ञातास्वाद. समझदार अफगाण मादी. तिने हळुवारपणे त्याच्यातल्या पुरुषाला सुख शिकवलं. त्याच्या नकळत त्याच्यासोबत आलेल्या त्याच्या कामसंचितातल्या स्त्रिया तर कायमच स्वतःला दुय्यम राखत हालचाल न करणाऱ्या. ही स्वतः पुढाकार घेणारी स्त्री होती. आणि हलकेच शिकवणारी सुद्धा होती. या सुखाने त्याच्यातला आत्मविश्वास वाढत होता. भरभरून द्या आणि देता त्यापेक्षा कितीतरी अधिक घ्या, असा तो सुखाचा व्यवहार होता. त्याच्यामुळं झालं असं की आता तो स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायला लागला होता. आरेनाला एकीकडे ते आवडत होतं आणि दुसरीकडे तिला त्याचा त्रास सुद्धा होत होता. जहागीरदार इम्रानखानाला त्यानं जे सांगितलं ते त्यानं तिला विचारून नाही सांगितलं. त्यानं सांगितलं आणि नंतर तिला सांगितलं. पाटीलबाबांना त्यानं जे सांगितलं, ते स्वतः विचार करून सांगितलं. नंतर तिला सांगितलं. हे त्याचं असं करणं त्याचा आत्मविश्वास वाढल्याचं द्योतक होतं आणि तिच्या नजरेत ते छान सुद्धा होतं. पण मग आपला पुरुष आपल्या पकडीतून निसटेल की काय याची काळजी सुद्धा तिला वाटत होती. ती एक बुद्धिमान स्त्री होती आणि आपल्या पुरुषावर तिचं असाधारण प्रेम होतं. त्यामुळं अशा प्रश्नांचा सामना तिचा तिलाच करावा लागणार होता. ती डोळ्यात तेल घालून म्हणा वा घारीच्या नजरेने सगळ्यावर लक्ष ठेवून होती.

खराडीच्या रानातलं काम जोसात चाललेलं होतं. साहेबरावला वेगळं काही सुचत नव्हतं आणि पाटीलबाबांनाही. 'असं पक सायबराऊ, मपला समदा परपंच करून झाला. लेकरंबाळं हायेत. ते त्यांचा गाडा हाकीतेत. हे एवढं एक सपान म्या पाहिलं व्हतं. ते रायलं आसं वाटलं. पन तेवढ्यात धर्माचा लेक होऊन तू आला. मी इथं येतो म्हंजी तुपल्यावर उपकार करितो आसं कायच नायी. मी खुद स्वोतासाटी येतो. आरे, सपान हाये त मानुस हाये. नायतर जिनगानीला काय आरथ रहातोय, तू सांग?' असं पाटील बाबा म्हणायचे. साहेबराव काय सांगणार? या परक्या मुलखात केवळ विठोबाच्या कृपेनेच आपल्याला हा असा भक्कम धर्माचा बाप मिळालाय म्हणून त्याला कृतज्ञ वाटायचं. आपल्या आईवडिलांची आठवण त्याला कधीकधी येई. पण या आयुष्यात आपल्याला आता त्यांना

बघण्याची संधी नाही, असं मनातले हे कधीकधी उकळणारे कढ दाबत तो स्वतःला बजावत असे.

असं हे सगळं व्यवस्थित बिनबोभाट चाललेलं होतं. इम्रानखान जहागिरदार एकदा खराडीत येऊन बघून गेला. कामाच्या गतीवर खूष झाला तो. साहेबरावला जवळ घेऊन त्याची पाठ थोपटली त्यानं. पण हे असं इतकं सरळ सारं सुफळ संपूर्ण सहजी होत नाही. ते गोष्टींमध्ये होत नाही आणि जीवनामध्येही होत नाही. आपण पुढे जात असतो तेव्हा आपल्यापुरतं आपण सगळं ठीक केलेलं आहे असं आपल्याला वाटत असतं. पण आपल्या नकळत कैक धागे आपण मागे सोडलेले असतात. त्यांना कोणाच्या दुखऱ्या नसांशी जोडलं गेलेलं असल्यास ते बळकट होऊन कोणत्याही टप्प्यावर तुमच्यासमोर धडकण्याची क्षमता आणि शक्यता राखून असतात. वांबोरीतून गीता नाहीशी झाल्यावर काही काळ उलटसुलट चर्चा झाल्या. पण अखेर त्यांचा स्वर गीताच्या बाजूचाच झाला. की बाबा, 'ती पोर गायब झाली अन तिने साऱ्यांचेच प्रश्न सोडवून टाकले. दुसरा रस्ताच नव्हता बिचारीला. पण नंतर काही दिवसांनी सायबू गायब झाला. आवो लगीन ठरलं आस्तानी त्यो फरार झाला. आंधी पाटलाची पोर फरार आन तिच्यापाठी ह्यो. याच्यात काय समजायच आपन? आवो ते तिकडं नगरामंदी व्हते तव्हाच जुळल्यालं व्हतं त्यांच्यावालं. इथी राहून कायच नसतं जुळलं ना! ही बामण त्यो म-हाटी. गेले पळून. जावू दे, च्यायसका पाटलाच्या घराचं नाक दुसऱ्या वक्काला कापलं त्या कार्टीनी. आन पाटलाचा भरुसा किती त्याच्यावर. भैनीला आणायला भाऊ पाठितो म्हनी नगराला. भैनभैन करीत चिकाटला तिला. आन ती पोर यच्यायसका लई, खाली मुंडी न पाताळधुंडी बिट्या.' पाटलाचा मुलगा जरा गरम रक्त असलेला होता. ते साहजिकच होतं. पण इथं आता त्याच्याकडं काहीच पुरावा नव्हता. अन शोधून तरी आता काय करणार? त्यापेक्षा, ती आम्हाला मेली आन आम्ही तिला, असं म्हणणं त्यानं सोयीचं मानलं. आणि तो सरळ लढाईवर निघून गेला. गीताशी लग्न करायला नकार दिलेल्या तिडकेला ती गायब झाल्याचं कळल्यावर आधी थोडं वाईट वाटलं. नंतर सायबू फरार झाल्याच्या वार्तेनं विशेषतः त्यामुळे उठलेल्या भूमकांनी सायबूचा त्याला राग आला. पण त्यानेही, आपला तिच्याशी काय संबंध म्हणत काखा उघड्या करण्याची चाल घेतली. मग लोक तरी किती काळ ते लावून धरणार? राहता राहिले सायबूचे आईवडील अन एडके-पाटील. आपल्या पोराने आपल्या तोंडाला काळोखी फासली अशी भावना होऊन सायबूच्या घरचे सारेच इतरांना टाळू लागले. नंतर गावातलं घर सोडून मळ्यातल्या वस्तीवर राहायला गेले. कोणाची एक नको आन दोन नको. कोणाचं तोंडच बघायला नको. काय सामानसुमान लागलं तर चोरट्यासारखं गावात जायचं आन लगालगा घेऊन यायचं. 'माजा सायबराऊऽऽ आसा कसा कुढं निघूनसनी गेलाऽऽ' म्हणत आई एकटीशी मुळूमुळू रडत बसायची. आधी बाप नुसतंच बघायचा. त्याचीही भावना तशीच होती. पण गडीमाणसाला रडता येत असतं का? काही काळाने तो बायकोवर डाफरू लागला. 'चिप्प. च्यायसका, त्यो काय लहान लेकरू हाये का? चांगला मोठा ठेंगडा ल्योक तुपल्यावाला. त्याला कोणी पळवून न्ह्यालं का काय? स्वोताच्या पायांनी निघून गेलाय. आपल्या आयबापाचा जिम्मा त्याला काय वाटला नायी. त्याच्यासाठी रडायचं नायी. मुस्काड फोडीन पुन्हा रडतांनी दिसली तर.' आईला आपलं

दुःख आपल्या काळजात ठेवायची सवय करावी लागली. काळ हेच औषध. ते तिला जमू लागलं. नंतर वडील आणि घरातले बाकीचे हळूहळू निर्दावले. म्हणायला लागले, आमच्या पोरानी बामनाची पोर पळावली कशावरून? आन समजा आसलं तसं तर त्याच्यात आम्ही काय करणार? वडील म्हणायचे, आवो हातातोंडाशी आलेला आमचा पोरगा गायब झाला आमच्या म्हतारपणी. आमचं दुख आम्हाला ठावं. आम्ही काय म्हणून तोंड लपवायचं? एडके-पाटलांचं थोडं वेगळं होतं. गीता गायब झाली आणि कुठंही सापडेनाशी झाली तेव्हा त्यांचं मन शांत झालं. ते त्यांनी कोणाला बोलून दाखवलं नाही. त्यांना ती कुठे गेली असेल याचा अंदाज आला होता. ते त्यांना कोणालाही बोलून दाखवायचं नव्हतं. घरात त्यांची पत्नी जवळपास मुकी झाल्यासारखी गप्प झाली. त्यात ते काहीच करू शकत नव्हते. आपल्या मनातलं ते पत्नीशी सुद्धा बोलू इच्छित नव्हते. माहिती करून घ्यायचीच नाही. जिथं असेल तिथं सुखी असो बिचारी. तिला सापडून तरी आता काय करणार? पण मग सायबू जेव्हा त्यांना भेटला आणि त्यानेही तिला पठाणांच्या घरी शोधायचा सल्ला दिला तेव्हा त्यांना जरा धक्का बसला. आपल्याला आला तोच अंदाज या पोराला आलाय अशा भावनेतून. पण मग त्यांनी तशी काहीच उत्सुकता दाखवली नाही म्हणून सायबूही गप्प बसला. त्यामुळं तो विषय तिथंच संपला. पण मग सायबू स्वतःच गायब झाला आणि ते दोघे पळून गेल्याच्या अफवा जोरदार झाल्या, तेव्हा पाटलांना कानकोंडं झाल्यासारखं वाटलं. मनात वाटलं, हे असं शक्य आहे. त्यांच्या भेटीगाठी आधी नगरला होत होत्या. बाई आणि गड्याचं मन जडायला जातीचा अडसर येत नाही. तरुण वयात सारासार विचार कमीच असतो. ती गेली अन नंतर तो गायब झाला याचा वेगळा काही अर्थ असूच शकत नाही. पण मग ते गीताच्या बाजूने विचार करायचे. मुसलमानाच्या घरात ती राहिली म्हणून तिडके यांच्या पोराने तिच्याशी लग्न करायला नकार दिला. आणखी कुठे सोयरिकीचा विचार करायचा तर सगळ्या नातेवाइकांमध्ये ठ्याऽऽ ठ्याऽऽ झालेली. कोणच तयार होईना. उलट नात्यातल्या बाया कुशल विचारायच्या निमित्ताने येऊन त्या पोरीला वैदू लोक उंदराला शेपटी धरून विस्तवावर भाजतात तशा भाजू लागल्या होत्या. सायबू तिला घेऊन गायब झाला असेल तर त्याचं मन मोठं मानायला पाहिजे आपण. त्याला तर त्याच्या जातीत पाहिजे तितक्या पोरी मिळाल्या असत्या. त्याचं लग्नही ठरलं होतं. इतका तगडा, देखणा, गोरागोमटा मुलगा. गीता त्याच्या तुलनेत तितकी देखणी म्हणता यायची नाही. त्यानं तिच्यासाठी आपल्या जातीगोताचा त्याग केला. आपल्या आईबाप, भावंडांचा त्याग केला. ही फार मोठी गोष्ट. मनात येणारं हे असं ते कोणाशी बोलू मात्र शकत नव्हते. नंतर एकदा असेच नगरला गेले असताना त्यांना समजलं को ज्या पठाणबाईकडे गीता गेली असेल असं आपल्याला वाटलं होतं, ती बाई तिच्या मुलखाला निघून गेलेली होती. एकानं सांगितलं, तिचा नवरा मेला. इथं राहून ती काय करणार होती? गेली तिच्या मुलखाला निघून. आणखी एकजण आवाज बारीक करत म्हणाला, तिच्या दीराचा डोळा तिच्यावर होता. अन तिला ते नको होतं. म्हणून याचा डोळा चुकवून ती तिच्या मुलखाला गेली. तिकडं तिचे आईबाप मालदार आणि रगदार आहेत. ते तिचं तिला पाहिजे तसं लग्न लावून सुद्धा देतील. किंवा तेच इकडं येऊन तिला घेऊन गेले असतील. आणखी एकजण म्हणाला, हे मुळात सलाबतखान वजीरसाहेब यांना विचारूनच

झालं आहे. त्यांच्या परवानगी शिवाय इथलं झाडाचं पान तरी हलतं का? पाटलांनी अधिक चौकशी केली नाही. आपली लेक त्या पठाणबाईसोबत तिच्या मुलखाला गेली याची त्यांना खात्री झाली. त्यांना खूप बरं वाटलं. सायबूसारख्या सत्शील मुलाविषयी आपण निदान काही काळ तरी चुकीचा विचार केला, याचं त्यांना वाईट वाटलं. आता, याच्या उप्पर सायबू का आणि कुठं निघून गेला, हा प्रश्न अनुत्तरीतच राहिला. वेगळी काही शक्यता त्यांच्या डोक्यातच आली नाही.

नंतर, सायबूने माझ्या पोरीला पळवून नेलेलं नाही, असं ते उजळ माथ्याने लोकांना सांगू लागले. म्हणायचे, 'गीता या मुलखात नाहीय याची मला खात्री आहे. मी ती करून घेतलीय. अन सायबू तिच्यासोबत नाहीय. ती कुठं आहे, हे मला माहीत नाही. पण ती जिवंत असावी असं वाटतं. आता तिला शोधून, इथं आणून, मी तरी काय करणार? त्यापेक्षा ती जिथं असेल तिथं सुखी राहो अशी कामना करायची. पण सायबू कुठं गेलाय हे आपण शोधायला पाहिजे. त्याला बिचाऱ्याला आपण हकनाक बदनाम करीत आहोत.' आता, पाटीलच खुद्द असं म्हणायला लागले म्हणल्यावर लोक तरी काय म्हणणार? त्यांचीच काही तक्रार नसेल सायबूबद्दल, तर बाकीच्यांची का असावी? अन हे सगळं नाहीतरी पुष्कळ मागे पडलेलं. करमणुकीला आणखी विषय असतातच. पण म्हणाले, 'हां, सायबूचा तलास खरंच लावायला पाहिजे. पण ते त्याच्या घरच्यांनी करावं. बाकीच्यांना त्याची रग लागायचं काय काम? अन तो काय बाईमाणूस थोडाच आहे की त्याला कोणी पळवून नेईल? स्वतःच्या पायांनी गेलाय तर तसाच येईल की परत. आता, लढाईवर पुष्कळ पोरं जातातच की. परत आली की चांगली कमाई घेऊन येतात. नायी आली परत तर समजायचं आपण का आली कामाला. गेली मरून. आशे कैक जातातच ना! सायबू सुद्धा असाच गेला असेल कुठं. येईल परत. किंवा आणेल कोणीतरी त्याची बातमी. त्याच्या आईबापाला राहवत नसेल तर त्यांनी काढावी माहिती. आपल्याला काय?' पाटलांची मनःस्थिती अशी आहे याचा अंदाज आल्यावर सायबूचे वडील स्वतः होऊन त्यांना भेटायला गेले. म्हणाले, 'सायबू गेला आसंल कुढं तर येईलच कव्हा तरी परत. पण त्याच्यावरचं किटाळ गेलं याचा आम्हाला आनंद हाये. ते तुम्ही घालवलंत, हे महात्म्याचं हाये. आवो त्यो गडीमानूस, त्यो आला त आपला आन नायी आला तरी आपला. पण त्यो तुमच्या लेकीला घेऊन पळून गेल्याची बात आमच्या दिलाला लय लागली. ते नायी आसं तुमी मनता ते लय आदिक. लय उपकार. आमाला पाटीलकी धिलती ती समजा नका देऊ. पन आमाला ह्या दोसातून भायेर काहाडलं, याच्या उप्पर मोठी बात नायी. पाटील म्हणाले, मी जी पाटीलकी वाटली तिच्यात आता फरक नाही. पण सायबू लय चांगला पोरगा. त्याचा आपण तलास लावू.' सायबूचे वडील म्हणाले, 'त्याच्या आयच्या डोळयांच्या पान्याला खळ नायी. निस्ता जिंदा हाये आसं समाजलं

तरी बास. तुमी मोठे मानसं. तुमी कायतरी युगत करा.'

वांबोरीत असं सगळं झालं असलं तरी आणखी धागे होतेच ना! सायबूचा नसला तरी आरेनाचा तलास लावण्यासाठी अतोनात खळलेला माणूस नगरमध्ये होताच होता. तिचा म्हणायचा तर पूर्वाश्रमीचा दीर. गुरबतखान. बहरामखान याचा धाकटा भाऊ. आपल्याला दोन वर्षे झुलवत ठेऊन अखेर झुकांडी देऊन ही खव्याच्या वडीसारखी बाई अजात निघून

गेली ही बात त्याच्या दिलात बाणासारखी घुसून राहिलेली होती. त्या वेदनेनं तो कायमच विव्हल झालेला होता. तिचा तलास लावण्यासाठी तो तळमळत होता. निजामशाहीसकट दख्खनच्या सगळ्या शाह्या, खानदेशची फारुकी राजवट, गुजरात ते दिल्ली ते थेट अफगानिस्तान अशी सगळीकडे तपास लावण्यासाठीची यंत्रणा त्याने कामाला लावली होती. तो हट्टाला पेटला होता. एक यःकश्चित स्त्री या पद्धतीने आपल्या हातांवर तुरी देऊन निसटते, याने त्याचं मस्तक खवळून उठलं होतं. तिला शोधण्यासाठी तो जंगजंग पछाडत होता. अन इतक्या प्रयत्नांनी सुद्धा काहीच हाती लागत नसल्याने तो आणखी हट्टाला पेटला जात होता. त्याच्या इच्छा-आकांक्षांचा घनघोर चेंदामेंदा करून ती निसटली होती. तिला शोधायची आणि आपल्या अंगाखाली आणायची, एवढ्या एकाच हवसने त्याचं मन आणि भान व्यापून गेलेलं होतं. फसवलं गेल्याची भावना त्याला सतत डंख करत राही. अन दंशाच्या त्या असाधारण विखारात जगताना फक्त तिला शोधण्याच्या इच्छेत त्याच्या साऱ्या जगण्याचा संकोच झाला होता. दारूचे बुधले, त्याच्या स्त्रिया, कोवळी पोरं; कोणी कोणीही त्याचं आता समाधान करू शकत नव्हतं. त्याच्या तिच्या विषयीच्या भावनेची घनता स्फोटक आर्ततेला पोहोचली होती, इतकी की कोणत्याही क्षणी त्याच्या मेंदूच्या चिंध्या होऊ घातलेल्या होत्या.

खराडीला मध्याशी साहेबरावची गढी, त्याच्याभोवती आखलेलं गाव आणि त्याच्या भोवताली गावकूस असं गावाचं काम यांनी चांगला वेग घेतला होता. एक दिवस असेच साहेबराव आणि पाटीलबाबा गावकुसाच्या कामाची पाहणी करीत एका लिंबाच्या झाडाखाली उभे होते. समोर काम चालू होतं.

'पाटीलबाबा चार दिसाआधी काही महारांचे लोकं मला भेटले. म्हणाले, इथं भायेर आम्हाला राहायला जागा द्या. तीन चार कुटुंबं हायेत म्हणाले.'

'आत्ता संबुर काम करतेत त्यांच्यातलेच ना?' 'हां. त्यानला पाहिल्यावरच आठवन झाली मला.'

'आरे, हे त कायच नायी. मी त्यानला एकामेकीत ह्या भायेरच्या जागा वाटनीच्या गोष्टी करतानी आईकलंय.'

"तुमी बोलले नायी मला. पण आसं कसं? आपन परवानकी देण्याच्या आंधीच?'

'परवानकी काह्याची? त्यांचा हाक्कच आस्तोय त्यो. आन महारांच्या

वळचनीला मांग सुद्दा चारदोन येतेनच.'

'आसं कसं? मंग परवानकी काह्याला माघातेत ?' 'ते आपलं साक्षीमारग म्हनून.'

साहेबरावला कळेना. तो जरा वेळ गप्प राहिला. पाटीलबाबा फोडून सांगतीलच म्हणून.

'आसं पक सायबराऊ, हे लोकं मुळातले इथले वतनदार. म्हनजे महारांची हीच लोक आपल्या कामाव का आली? बाकीचे महार का नायी आले? त त्यांच्यात आतल्याआत ठराव आस्तोय. ज्यांच्या वतनात गाव वसत आसन त्यांनीच तिथं जायाचं. ते त्यांचं एकमेकीत मायती आसतंय. तू म्हनशीन का बोवा, हे त्यांचं वतन कसं काय? हे त समदं रान हाये. झागीरादारानी ते तोडून गाव बसवायला मला धिलंय. ते बराबरच हाये. पन गाव बसलं की महारकीचं वतन म्हणून ह्येच येनार. त्यांच्यात त्यो ठराव आस्तोय. आन आसं पक.

आपला हा म-हाट मुलुख. महार नायी आसं दाखव तू मला या आपल्या मुलखामंदी. जिथवर महार तिथवर महाटदेस आसं उगच नायी म्हनत. जे काय आसन ते पांडुरंगाला ठावकी, पन मला कव्हा कव्हा वाटातं हे महार लोकंच ह्या महाटदेसचे मुळातले वतनदार आस्तीन. म्हंजी योक आंदास म्हनतोय मी.'

'गाव तिथं महारवाडा आस्तोय ही बात खरीच हाये समजा-' 'म्हंजी आपल्या ह्या गावाला महार लागतेन ही बात तुला पटली.' 'हां.' 'त मंग हेच महार तुपल्यावाले. दुसरे येनार नायीत. तू कितीबी कोशिश कर. येनार नायीत. आले तर त्यानला यांच्याशी लढाई करावा लागन. ते जितले समजा तर आनखी दुसरे त्यांच्या संगती लढायला येनार. त्याच्यामुळी ह्येच आपले आशी बात जास्त सोयीची. आपल्याला याच्यात कायच तोटा नायी. ते येशीच्या भायेर राहनार. आन तुपल्या गावाचं राखन करनार. कुनबीकीच्या वहिवाटीसाटी बाकीचे आते-बलुते आपल्याला लागातेत. सोनार, शिपी समज; काही डागडागीने, कापडं याच्यासाटी. सुतार, लव्हार, चांभार, कुंभार, तांबट, शिपी, कासार आशे कैक. ते समदे तुपल्या परवानकीनी येनार. पन महारांची बात आलक. ते गावात वसती माघत नायीत. ते तुपले राखनदार. ते येशीच्या भायेर राहनार. येसकरीचा हाक माघनार. आरे, लय गाताडी जात ती. लढाईला आशील म-हाट्यावानी. थोडसाक भामटेपना त्यांच्यात बी आस्तोय. पाटील म्हनून आपन त्यो वळखून राहायचं. म्हंजी समजा, मासकांड त्यानला लय प्यार. त समज लय दिस जनावर नायी म्यालं गावात. त ते बराबर मारित्यात. औषद राहातं त्यांच्यापशी. आन आशाच कुनब्याच मारित्यात का ज्यो त्यानला बरं पघत नायी. आन आपल्याला येऊन सांगात्यात का आसं करता आसं. बाकी जास भामटेपना नायी त्यांच्यात. राहता रायले मांग. ते कुठूनबी येत्यात. पन यांच्या परवानकिनी. यांच्या वळचनीला ते

हात्यात. हे त्यानला आपल्यापक्षी हालके मानित्यात.'

'सांगतो त्यानला राहा म्हणून. आन कोणते मांग आणायचे ते त्यांनी

आणावेत असं.'

'येक बात तुला सांगातो सायबराऊ. बरीच जुनी गोस्ट हाये.

आमचं म्हतारं खपलं. त मंग सांगावा देवाच लागातो ना जल्दिनी. त महारवाड्याकं गेलो. त तिथं जाग्याव कोनच नव्हतं. योक दिसला. म्हनला, मी भायेरगावचा अमक्यातमक्याचा पाव्हना हाये. इथुल्ले समदे हाडकीच्या रानात गेलेत. त म्हनलं, मी गावचा पाटील हाये. आशी आशी मयत आमच्या घरात झाली. त्याचा सांगावा जल्दीनी द्यायाचा हाये. त तू जा. त तो जोहार करून म्हने, मी नायी जावू सकत. ते त्यांचं काम हाये. ह्या गावातल्या महार मानक-यांचं. त्यानला पटायचं नायी. मला आला राग. पाटलाला उलटूनसनी बोलतो, सरळ नायी म्हनतो म्हंजी काय? म्हनलं, तुला जायाचं नायी हे सांग. त म्हने, पाटील, तसं आज्याबात नायी. पन ते गागतीन. म्हनलं, ते मपल्या गावचे लोकं. त्यांचं मी पघून घेईन. हे जल्दीचं काम. त म्हने, तुम्ही म्हनता त जातो. नायी कसा म्हनू? पन ते कायी म्हनले त मला संबाळून घ्या. त ते गेलं. समदे नाथेवाईक, पै पाहुने जमा झाले. आन मयत निघायच्या वक्ताला ह्ये आमच्या गावाचे महारं त्या पाव्हन्याला धोपटीत धोपटीत आमच्या दारात हजर झाले. दारात मयत आन यांचा ह्यो कालवा.

म्हनलं, काय झालं? त म्हने ह्यो कसा काय गेला? म्हनलं, तुमी कोनच जाग्याव नव्हते. म्याच त्याला सांगातलं. म्हनले, तुमी सांगातलं तरी यानी आमाला येऊनसनी सांगायचं. ते आमचं काम. म्हनलं, बाबांनो मपली चुकी झाली. त्याला मारू नका. त म्हने तुमाच्याकून समजा चुकलं, पन याला हाक नायीना चुकी करायचा. तव्हा तुला सांगतो, पाटील आसून म्या हात जोडले, दादापुता करीत त्यांची समजूत घातली. आशे हे लोकं. सोयरा आसला तरी आपल्या हादीत त्याला घुसून देत नायीत. लय निकरट जात. आन लढायला लय तिखाट. तुला आत्ता दावतोः पाटीलबाबानी

आवाज दिला. म्हणाले, 'ये पो हावो, दोघं-चौघं या रं इकडं.'

त्यांना आधी कळले नाही. ते गोंधळले. आणखी एकदा पुकारल्यावर

ते आले. येऊन समोर उभे राहिले.

'काठी चालवता?' पाटीलबाबांनी सवाल केला. चालवत होतेच

सगळे. ते एकमेकांच्या तोंडाकडे बघू लागले.

'कोन कोन?' त्यांनी विचारलं. 'येतंय.' ते खाल मानेने म्हणाले. 'काठ्या आना. आन दोघंजन चालवा.'

त्यांनी आणल्या. त्यांनी चालवल्या. कामाने थकलेले होते. पण हुरुपाने चालवल्या. वेगात विजेच्या चपळाईने चालवल्या. वीरांच्या जोषात चालवल्या. ते असाधारण त्वेषाने चालवत होते. जोश आणि चपळाई; कशातच कमी नव्हती.

'पाह्यलं सायबराऊ, कशात कमी हायेत का सांग?' त्यांनी

साहेबरावला विचारलं.

'कुढं शिकला रे पोव्हावो?' त्यांनी त्या तरुणांना विचारलं.

'आशेऽऽच.' ते लाजत म्हणाले. 'तलवारीचे एकंग दोअंग करित्या?' 'हां.' 'ते कुढं शिकले?' 'आशेच. जुनी मानसं दावित्यात.' 'पाह्यलं, निस्ते गानी-बजावनी करणारे लोकं नायीयेत हे. ह्या दोघांना तुपल्या वाड्याच्या दारवठ्यावर राखनाला घे. नायतरी आपली गढी झाल्यावर लागतीनच ते. तेवढीच सवय होऊन जाईन त्यानला.' पाटीलबाबा म्हणाले.

साहेबरावनं ते ऐकलं आणि तसं केलं. त्या पोरांची नावं सिदनाक आणि लुमनाक. त्यांना त्यानं देवडीवर पहारेकरी म्हणून नेमून टाकलं. बारा तास हा अन बारा तास तो. चोवीस घंटे कडेकोट पहारा. काय करायचं, कसं करायचं हे समजाऊन दिलं.

तिकडं अहमदनगर शहरी गुरबतखान पठाण आरेनाच्या पळून जाण्यानं बेचैन होता, त्याला अखेर तलास लागला की ती नेमकी गेली कुठं. तिला शोधण्यासाठी त्यानं जे जे केलं, त्यात अखेर ज्या लोकांना आरेनाने लाच देऊन सुरक्षित पलायन केलं होतं, त्या लोकांपर्यंत गुरबत त्याच रस्त्याने पोहोचला. त्याला पक्का धागा लागला की ती आदिलशाहीत पळून गेलीय आणि पुणे शहरात एका वाड्यात बंदोबस्ताने राहतेय. तो त्याचा बंदोबस्त घेऊन खुद्द दस्तूर पुणे शहरी आला आणि एक वाडा राहण्यासाठी घेऊन राहू लागला. तिथं खबरे सोडले तेव्हा त्याला माहिती मिळाली की, या शहरात नवीन आलेला कोणीतरी सातपाटील नावाचा बड़ा माणूस आहे. तो आपण निजामशाहीतून आलेलो आहोत असं सांगतो. त्यानं इम्रानखान जागीरदार साहबहुजूर यांच्याकडून परवानगी घेऊन खराडी नावाच्या बंजर मुलखात गाव उभारण्याचा उद्योग चालवला आहे. त्याची आणखी

माहिती नाहीय. एक जनाना बटकी अन एक मर्दाना अंगरक्षकसोबत घेऊन आरेना पळाली अशी खबर होती. तो इसम हा सातपाटीलच आहे, या निष्कर्षाप्रत गुरबत आला होता. तो कोण, कुठला याची माहिती घेण्यासाठी अहमदनगरला आणखी दाम खर्च करून त्याने माणसं सोडलेली होती. पण अशा नावाचे कोणीही लोक निजामशाहीच्या हद्दीत राहात नाहीत अशी माहिती त्याला मिळाली होती. तिकडे खबरे त्यांची कामं करीतच होते. आणि पुण्यातही त्याने आणखी माणसं सोडली. त्यात काही बाया होत्या. काम एकच. तिला प्रत्यक्ष बघून खात्री करायची आणि ती झाली की रीतसर तिचा ताबा घ्यायचा. त्याच्यासाठी हा परका मुलुख होता. थेट धडक देणं त्याच्यासाठी सोयीचं नव्हतं. पक्की खबर लागली की थेट इम्रानखान जहागिरदार याला भेटायचं आणि सांगायचं की असं करता असं. तो गुरबतच्या ओळखीचा होता. बडे भाईजान बहरामखान यांच्यामुळेच प्रामुख्याने ती पहचान होती. मुख्य म्हणजे इम्रानखानही अफगाण होता. नेमकी माहिती मिळाली की सावज अज्जात टप्प्यात आणून त्याची गठडी वळणं नक्कीच शक्य होतं. एकदा ताब्यात आली की बस खवाही खवा. दिल खोलून हवस भागवायची. त्या लालसेनेच तर तो पेटलेला होता. एखाद्या बाईने आपल्याला ढाक लावण्याइतकं दुःख पुरुषाला आणखी कशाचंही नसतं. विशेषकरून त्याला तिची हवस असेल तर. दुनियेतल्या सगळ्या प्रलयंकारी घडामोडींना अशीच तर निमित्तं असतात. गुरबतला अर्थातच त्यांच्याशी काहीही घेणंदेणं नव्हतं. त्याला त्याची हक्काची स्त्री हवी होती. तिने लावलेल्या ढाकेने तो चारीमुंड्या चित झाला होता. पण ती तात्पुरती हार होती. अंतिम विजय आपलाच आहे आणि आपण तिच्यावर मनमुराद सवारी भरू अशी स्वप्ने तो बघत होता.

त्यांच्या पूर्तीसाठी तो इथवर पोहोचलेला होता.

तिला बघायचं तर काहीना काही निमित्ताने आत, त्याच्या वाड्यात घुसायला मिळायला हव. गुरबत स्वतः ते करू शकत नव्हता.

ओळख-पाळख नसताना ते कसं करणार? पण त्याचे लोक होते. ते तिथं पाळत ठेवू शकत होते. ती त्यांनी ठेवली. मिळत होती ती माहिती साधारणतः अशीः तिथून आत-बाहेर करणारा एकच इसम, तो म्हणजे साहेबराव सातपाटील. त्यांच्याकडं कुणीही येत-जात नाही. साहेबराव याचा भांबुर्डे येथील पाटील शिवरामबुवा बहिरट यांच्याशी खास दोस्ताना दिसतो. ते खराडी येथील शिवारात जवळजवळ रोज सोबत असतात. साहेबरावच्या घरात एक लहान मुलगा असावा. तो कधीकधी बाहेर दिसतो. त्याच्याशी दोस्ती करण्याचे प्रयत्न झाले आहेत. पण तो फारच टणक आणि अनोळखी माणसाशी संपर्क न करणारा आहे. देवडीवर पहारेकरी असतो. वर्दी दिल्याखेरीज कोणालाही आत जाता येत नाही. एकदा रात्री उशिरा एक मेणा दाराशी आला होता. त्यात बसून दोन बाया आणि एक मुलगा बाहेर पडले होते. ते नदीकाठच्या विठ्ठल मंदिरात गेले होते. बाया पडद्यात होत्या. त्या मेण्यातून उतरल्या आणि मंदिरात गेल्या. दर्शन करून, पुन्हा मेण्यात बसून, गेल्या तशाच परतल्या. घरकाम करणाऱ्या बाया आहेत. धुणे-भांडी, झाडलोट, वाणसामान, भाजीपाला यांची ने-आण या बायाच करतात. त्या म्हणतात, तिथं आत मालकीणबाई आहे. ती बामण असावी असा त्यांचा होरा आहे. मालक तर मराठा दिसतो. मग मालकीण बामण कशी, असा प्रश्न पडतो. पण तसा प्रश्न त्या करत नाहीत. अन ती

मालकीण सुद्धा कामाशी काम अशी वागते. घराच्या आतल्या भागात या बायांना प्रवेश नाही.

गुरबत म्हणाला, काम करणाऱ्या बायांना फितवा. त्यांना नाकारताच येणार नाही अशी बिदागी देऊ करा. मग ते जमविण्यात आलं. घरी पाहुणे येणं, आजार अशा सबबी. आणि भायेरवास होणं म्हणजे पाळी आलेली असणं तर हक्काच्या रजेस उत्तम निमित्त. त्यावेळी बदली म्हणून आपल्या बाया टाका. आपल्याला काय माहिती पाहिजे हे त्यांना सांगा. तसं करण्यात आलं. शिकवलेल्या बाया जात. संपर्काचे प्रयत्न करीत. बक्षिसाची लालूच मोठी होती. त्यामुळं कोशिश रगडून. समोर गीता यायची. येता-जाता कामे करता निर्हेतुक भासणारी जवळीकीची भाष्ये तिलाच ऐकावी लागत. 'आगं बयाऽऽ बयाऽऽ क्याव्हढं काम चालल्यालं हाये खराडीला म्या पघितलंना एक्या दिशी. किती पैका लागत आसन. तुमी कोनच्या मुलुकमंदी व्हत्या बाई ? आन तुमचा वापर समदा बामनावानी. झागीरदार घराना आसन. आन सैपाक तुमी खुदच्या हातानी करित्या? मी लई चांगला सैपाक करिती. एकदा खाऊनसनी त पघा. बाई, तुमची आंगलट येकदम बारकाट. पन ल्योक मातर दुहेरी हाडाचा हाये. लई वानकं हाये. बापावं गेला आसन. पन बोलत आज्याबात नायी. का बरं? आन बाई, तुमची आंघुळ तुमी खुद स्वोता करित्या? आमच्याकं आशी चाल नायी. मोठ्या घरच्या बायकांला आंघुळ आमच्या सारक्या घालित्यात इकडं. तुमाला पन घालीन मी. लय चांगली चोळूनचाळून घालिते मी. पार लहान बाळ जसं आंघुळ घातल्यावर बाळात्यामंदी गुरगुटून झोपातं ना तशा मोठ्या घरच्या बाया झोपात्यात म्या आंघुळ घातल्यावर... अशा जवळीकीच्या भाष्यांच्या तन्हा असत. हे विक्षेपकारी अर्थातच असे. पण की बुवा, असतात बाया. नाहीतरी बदलीवरच येतात त्या. त्यांच्या सगळयाच प्रश्नांची उत्तरं द्यायला आपण काही बांधलेल्या नसतो, अशी गीता स्वतःची समजूत करून घेत असे. पण मग बदली येणाऱ्या सगळयाच बाया अधिक चौकस आहेत. त्यांना त्यांचे काम नीट करता येत नाही. त्या नेहमी काम करणाऱ्या असतील अशा वाटत नाहीत. अन त्या सगळयाच जास्ती प्रश्न करणाऱ्या आहेत. अन हल्ली आपल्या नेहमीच्या बाया जास्ती सुट्टीला जायला लागलेल्या आहेत, अशा अनेक गोष्टी तिच्या लक्षात आल्या. आणि एके दिवशी एक बाई म्हणाली, 'कावो बाई, तुमच्या संगती तुमची मोठी भैन आस्ती. तिला बोलवा ना. मपली वळख व्हइन. मोठ्या घरच्या लोकांची वळख कुढं कामाला येईन ; सांगता येत नायी.'

'कोणती मोठी बहीण?' 'ती हाये म्हनी, पन संबुर येत नायी.' 'अशी कोणी बहीण नाहीय माझी. तुला कोणी सांगितलं?'

'सांगितलं आसं नायी, पन मला आपलं वाटलं.'

'मग ती आहे म्हणे, असं कसं म्हणतेस? आणि तुला तुझ्या कामाशी मतलब. फाजील चौकशा कोणी करायला सांगितल्या तुला?'

'आवो, राग नका धरू. मलाच वाटलं आसं. म्हंजी कोनी तरी आत हाये, ते आपल्याला पघातं. पन आपल्याला त दिसत नायी, आशी बात मपल्या मनात आली. आम्ही कामकरी लोकं. मानसासाटी मानसालाच कढ येती ना! काय आज्यारी आस्ती का तुमची भैन?'

ह्या प्रसंगानंतर गीता सावध झाली. बदली येणाऱ्या ह्या सगळया बाया अधिक चौकस

आहेत, हे तिच्या लक्षात आलं. तिनं हे आरेनाला तर सांगितलंच. पण नेहमीच्या कामाच्या बायांना एकत्र करून तिनं त्यांची चांगलीच खरडपट्टी काढली. 'ह्या कोण बाया आहेत? तुम्ही हल्ली इतक्या सुट्टीवर का जायला लागल्या आहात? तुम्हाला कामाची गरज आहे की नाही? तुम्ही कामाशी काम असं व्यवस्थित वागता. ह्या बाया इतके प्रश्न का विचारतात? त्या तुम्हाला कुठं भेटल्या? त्या तुमच्या ओळखीच्या आहेत? कोण आहेत ह्या? हे मला मालकांना सांगावं लागेल. काही खोटंनाटं करत असाल तर ते तुम्हाला महागात पडेल. तुम्हाला इथंच काय, पण कुठंही काम मिळणार नाही, असं होईल. चालेल तुम्हाला? तुम्ही गरीब आहात. पण म्हणून याप्रकारे आम्हाला फसवण्याचा तुम्हाला काहीही अधिकार नाही. ते तुम्हाला जड जाईल. मालक कसे आहेत, त्यांची ताकद काय आहे, हे तुम्हाला माहीत आहे की नाही? तुम्हाला कुठंही काम तर मिळणारच नाही. पण तुमच्या नवऱ्यांना सुद्धा कुठच थारा मिळणार नाही. अन्नअन्न करून मरायच आहे का तुम्हाला? लेकराबाळांना उपाशी मारायचंय? बघा, विचार करा. खरं काय ते सांगा. अजूनही वेळ गेलेली नाहीय....' गीताच्या या सरबत्तीनंतर त्या बाया नरम आल्या. म्हणाल्या, 'आमची कायच चूक नाही. आम्ही असं करायचं, असं आम्हाला सांगण्यात आलंय.' गीता म्हणाली, 'कोणी सांगतं अन तुम्ही ऐकता असं कसं होईल? तुम्हाला त्यांनी किती पैका दिला?' बायांनी सांगितलं, 'इतका इतका.' म्हणाल्या, 'आम्हाला आता भीती वाटायला लागलीय. तिकडून ते अन इकडून तुम्ही. आम्ही कैचीत सापडलो आहोत. आम्ही काय करायचं?' अन त्या रडायला लागल्या. गीता म्हणाली, 'रडू नका. घाबरू नका. तुम्ही कामावर येत चला. बदली देऊ नका. त्या बाया कोण, त्यांना कोणी पाठवलं, याची माहिती घ्या. मला सांगा.' त्यांनी त्या बायांना सांगितलं. 'मालकिणीला संशय आलाय. तुम्ही आता येऊ नका.' त्या म्हणाल्या, 'ठीक आहे. आम्ही येत नाही. पण आम्हाला पाहिजे ती माहिती द्या. ती तुम्हीच मिळवा. तुम्हाला मोठी बक्षिसी मिळेल.'

ह्या पोरखेळात खास मतलब नाहीय असं गुरबतखानाच्या लक्षात आलं. आपणच थेट या सातपाटलाशी ओळख काढली पाहिजे, दोस्ती वाढवून त्याच्या काळजात हात घालून माहिती मिळविण्याची कोशिश केली पाहिजे असं त्याच्या मनानं घेतलं. एके दिवशी आपला लवाजमा सोबत घेऊन तो थेट खराडीला कामाच्या जागी पोहोचला. खान घोड्यावरून उतरला तेव्हा त्याच्या सोबतच्या एकानं लगेच पुढे होऊन आदबीने त्याच्या घोड्याचा लगाम हाती धरला. यात खास असं काही नाही, हे सगळं नेहमीचं आहे -आणि ते काही खोटं नव्हतं- अशा झोकात खान साहेबराव आणि पाटीलबाबा बसले होते तिकडं निघाला तेव्हा आपसूकच ते दोघेही उठून त्यांच्या जागी उभे राहिले. की बाबा कोणीतरी मोठा असामी आहे म्हणून आणि एरवीही एक सौजन्य म्हणून. शिष्टाचार पुरे करून ते एकमेकांच्या शेजारी बसले.

खान म्हणाला, 'बरेच दिवस आपल्याविषयी ऐकून होतो. अन आपल्याला भेटायची उत्सुकता होती. पण जानपहचान नाही, म्हणून इलाज चालेना. आज ठरवलं की नसेना का पहचान, जाऊन भेटू सरळ. म्हणजे होईल ती आणि कदाचित दोस्ताना सुद्धा होऊ शकतो. मी असं ऐकलंय की आपण निजामशाही मुलखातून आलेला आहात. मीही तिकडूनच आलोय. जावळीच्या चंद्रराव मोरे यांच्या जागीरमध्ये माझे लोक एक नवे गाव बसवत

आहेत.' याच्यावर बोलण्यासारखं खास काही नव्हतं आणि एरवीही साहेबराव फार बोलणाऱ्यातला नव्हताच. शिष्टाचाराचं एक स्मित लावून धरत तो म्हणाला, 'चांगलं झालं. आपण आले. त्यामुळं ओळख झाली.' मग खानाने पाटीलबाबांविषयी विचारलं. ते बाबांनी स्वतःच सांगितलं. खान म्हणाला, 'आपल्या मुलखात चाललेला गोंधळ तुम्हाला माहीतच असेल. सगळं फार अस्थिर आहे. आपला मुलगा मिरान हुसेन आपल्याला सिंहासनावरून ओढून काढण्याच्या खटपटीत आहे असा संशय घेऊन सुलतान मूर्तजाने त्याला ठार मारण्याची कोशिश केली. पण वजीर सलाबतखान यांच्यामुळं ती नाकाम झाली. काही दिवसांनी सुलतानाने वजीर सलाबतखान यांना कैद करून दंडाराजापुरीच्या किल्ल्यात पाठवलं. आणि मिझ महंमद तकी याला वजीर नेमलं. आणि पुन्हा मिरान हुसेनला मारायची कोशिश केली. त्यात सुलतानाचे प्रियपात्र फतेशहा याने हुसेनला वाचवलं. नंतर मिरान हुसेन याने आपल्या वृद्ध बापाला म्हणजे सुलतानाला उकळत्या पाण्याचे वाफारे येणाऱ्या हमामखान्यात कोंडून मारलं. आता तो सुलतान आहे. पण त्याची सत्ता फार काळ टिकेल अशी परिस्थिती नाहीय. त्या गोंधळाला कंटाळूनच मी इकडं येण्याचा निर्णय घेतला. इथे आदिलशाहीत स्थैर्य आहे.'

या सुलतान अन त्याचे लोक; असल्या घडामोडींमध्ये ना साहेबरावला रस होता ना त्यांची त्याला माहिती होती. खानाच्या निवेदनावर मूढपणे मुंडी हलवणे एवढेच काम त्याला उरले. ते तो करत होता.

'निजामशाही मुल्कमंदी कोनच्या गावचे म्हनायचे पाटीलसाहब?' खानाने आता थेट विचारलं.

साहेबराव चमकला. हा प्रश्न पाटीलबाबांनी सुद्धा कधी त्याला विचारला नव्हता.

'नायी. आमचे बडे भाईजान होते ना- अल्लाहचे प्यारे झालेत आता ते- त्यांची एक जागीर डोंगरगन नामचे गावच्या मुल्कमंदी होती. तशी तुमची

तिकडं आनिक होती काय असा-'

साहेबराव आणखी चमकला. हा बहरामखानाचा भाऊ तर नाही? त्याच्या मनात उमटलं आणि अंगातून शिरशिरी सरसरून गेली. स्वतःला सावरत त्यानं खानाचा चेहरा न्याहाळला. भावांमध्ये काहीना काही साम्य आढळतंच. पण बहरामखानाचा चेहराच मुळात त्याला कुठं आठवत होता? त्याने प्रयत्नाने तो आठवला. सत्यातला, स्वप्नातला. पण हा वेगळाच होता त्याच्यापेक्षा. तरीही सावधगिरी बाळगायची म्हणून तो म्हणाला,

'आवो आम्ही कुणबी लोकं. म-हाटे. मुलुकगिरी करितो. पन झागीर नायी. पार तिकडं लांब डोंगरकिनी म्हणून गाव हाये आमचं. ते तुमाला ठावकी सुद्दा नसन. इक्तं ते बारकुटं. तिकडं खडकीच्या नजिक हाये समजा.'

'अच्छा. अच्छा.'

आता, हे डोंगरकिनी गाव कुठून आलं? साहेबरावला वांबोरी नावाच्या गावाचा उच्चार करायचा नव्हता. मग? मग डोंगरकिनी. ह्या गावाचं नाव त्यानं ऐकलेलं होतं. त्याच्या वडिलांकडून. त्यांनी त्यांच्या वाडवडिलांकडून. त्या गावाहून आपला मूळपुरुष वांबोरीला आलेला आहे असं त्यांच्या कुटुंबात प्रवाहित होत आलेलं होतं. ते गाव कुठं होतं, ते साहेबरावला माहीत नव्हतं. मग दिलं ठोकून. खडकीजवळ. उद्या आपला वंशाचा वेल इथं

विस्तारला तर आपले वंशजही सांगतीलच ना,की आमचा पूर्वज वांबोरीहून इथं आला.

खान आणखी जरा वेळ थांबला. निघताना म्हणाला, 'चलो पाटीलसाहब. कधीतरी या आमच्या गरीबखान्यात पायधूळ झाडण्यासाठी.'

तो गेल्यावर पाटीलबाबा म्हणाले, 'कायतरी यागळं हाये सायबराऊ. ह्यो मनुष्य मला चांगला नायी वाटला.'

घरी गेल्यावर रात्री साहेबरावानं नेहमी रोज काय झालं ते सांगायचा तशी आजच्या दिवसातली ठळक गोष्ट म्हणून खानाच्या भेटीची बातमी आरेनाला सांगितली. तो माणूस पाटीलबाबांना चांगला वाटला नाही अन तो आपल्याला निजामशाहीतल्या कोणत्या गावाहून आलास असं विचारत होता. तेव्हा आपण डोंगरकिनी नावाच्या गावाहून आलोय असं त्याला सांगितलं. डोंगरकिनी हे आमच्या पूर्वजांचं गाव, असा सगळा वृत्तांत त्यानं तिला दिला. तिनं विचारलं, त्याचा हुलिया कसा होता? त्यानं सांगितलं. म्हणाली, 'तो नक्कीच गुरबतखान. माझ्या पाठलागावर आलाय तो इथं. पण मी डरत नाही त्याला. तू सोबत आहेस तर मला कोणाची भीती? पण तू काळजी घे. तुला बाहेर पडावं लागतं. सावधानी बाळग.' मग तिनं घरात बदली म्हणून येणाऱ्या बायांची, गीताला आलेल्या संशयाची आणि त्यांनी केलेल्या कारवाईची सगळी बात त्याला सांगितली. म्हणाली, 'त्या त्यानंच पाठवलेल्या बाया. आम्ही त्यांचा बंदोबस्त केलाय. तरीही आपण काळजी घेतली पाहिजे.'

असे दिवस चालले होते. भीतीच्या सावटाखालीच, पण ठीक चालले होते. ते सारेजण आपापल्या परीने काळजी घेतच होते. गुरबतच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी साहेबरावने माणसं नेमली होती. डोळ्यात तेल घालून आणि वर वर वेगळं काहीच नाही असं दाखवत ते सारे जगत होते. साहेबराव बाहेर पडताना जंबिया आणि वाघनखं सोबत बाळगायला विसरत नसे. देवडीतल्या सिदनाक आणि लुमनाक यांना सख्त ताकीद होती की आत वर्दी देऊन परवानगी घेतल्याखेरीज कोणालाही आत घ्यायचं नाही. आरेना बाहेर पडत नव्हती. आता गीतानेही ते पूर्ण बंद केलं. काम करणाऱ्या बायांना घराच्या आतल्या भागात आधीच प्रवेश नव्हता. आता त्याची अधिक कडक अंमलबजावणी होऊ लागली.

एके दिवशी संध्याकाळी साहेबराव घरी आला. नेहमीप्रमाणे गीता सामोरी आली. ते ठीक. पण आत गेल्यावर आरेना त्याला दिसेना. आरेनही दिसेना. त्यानं सगळीकडं फिरून पाहिलं. आधी असं की बुवा असेल कुठंतरी. घरातच तर असते ना ती. मुख्य म्हणजे गीता छान नेहमीची होती. विपरीत काही घडलं असण्याची शक्यताच नव्हती. पण मग आरेना सापडेना म्हणून हळूहळू विपरीत काही घडल्याच्या शक्यतेने त्याच्या मनाचा कब्जा घेतला. गीताला माहीत नसेल, तिला अंधारात ठेऊन गुरबतनं आरेनाला आरेनसकट उचलली की काय? माझी सारी दुनियाच मला पारखी झालीय की काय? घाबरून त्यानं गीताला गाठलं. विस्कटत्या आवाजात तो म्हणाला, 'आरेना कुठंय? आरेन कुठंय?' ती शांत स्वरात म्हणाली, 'कुठं म्हणजे? आत तिच्या नेहमीच्या जागी आहे. आणखी कुठं असणार?' त्याची तगमग तिला दिसत होती अन तरीही ती शांत. अरे, हा काय प्रकार आहे? म्हणाला, 'हे बघ, ती आत नाहीय. आरेन सुद्धा नाहीय.' ती म्हणाली, 'अरे! आत्ता काही वेळा आधीच तर आम्ही बोललो. आरेन ही इथंच होता. तू आत येण्याच्या अगदी थोडं आधी. बघ, बघ.

तुझी गंमत करण्यासाठी लपून बसली असेल कुठं. बाकी काहीच असणार नाही. ती कुठंच जात नाही, हे तुला माहीत आहे. अन गैर काहीही घडलेलं नाहीय, हे मला माहीत आहे. नक्कीच तुझी गंमत करण्यासाठी कुठतरी लपून बसली असेल. चल, आपण शोधू तिला.' असं म्हणून तिनं कुठल्याही प्रकारे गडबडून न जाता त्याला तिच्या पाठोपाठ यायला सांगितलं. आत तिनं अनेक जागी आरेनाला शोधलं. पलंगाखाली. गाद्यांच्या ढिगाआड. कपड्यांच्या गाठोड्यात. अंघोळीच्या अंधाऱ्या मोरीत. पैखान्यात. साहेबराव पाठोपाठ होता तिच्या. ताईऽऽ आरेनाऽऽ ते हाका देत होते. प्रतिसाद नव्हता. कुठेही नव्हती ती. गीता उभी राहिली. चकित झाली होती ती. आत्ता इथं होती अन अचानक कुठं गायब झाली? तिनं आपल्या डाव्या तळहाताखाली स्वतःचं स्वतःचे डोळे झाकून घेतले. साहेबराव पुढे झाला आणि त्यानं गीताचा खांदा हिसडला. 'कुठंय ती? कोण आलं होतं? तुला भुरळ पडली का?' तो तारस्वरात ओरडला. 'आन हे देवडीवर कोण हायेत? सिदनाक कालुमनाक? झोपा काढतात का काय भोसडीचे?' म्हणत जंबिया हातात घेऊन तो बाहेर धावला. त्याक्षणी मात्र अंगी असला नसला जोर एकवटून गीता त्याच्या पाठी धावली अन तिनं त्याला मागून कवळी घातली. म्हणाली, 'बाहेर नको जाऊ सायबूदादा. ताई आतच आहे. मी दाखवते तुला. चल, आत चल.' मोठ्या मुष्किलीने तो थांबला. आता गीता घाबरलेली होती. त्याचा हात धरून तिनं त्याला त्यांच्या शय्यागृहात नेलं. त्याच्या आणि आरेनाच्या शय्यागृहात. ती तिथलं जाजम गुंडाळू लागली. मग तो ही तिला मदत करू लागला. ते झाल्यावर म्हणाली, 'आता आपल्याला हा पलंग हलवायचाय.' तिनं एका बाजूनं पकडलं अन त्यानं दुसऱ्या. अन त्यांनी तो सहज उचलला. त्याच्या समजुतीप्रमाणे तो पलंगतर चांगलाच जड होता. अरे, हा इतका हलका कसा? जाजम गुंडाळलेलं. पलंग हलवलेला. त्याच्या मनातला प्रश्न ओळखून ती म्हणाली, 'हा नवीन आणलाय.' म्हणाली, 'इथं जमिनीत कुठं वेगळं काही दिसतं का तुला?' आता तो मनाने स्थिर झालेला होता. आरेना छपून बसलेली आहे. कुठं ते गीताला माहीत आहे. आता ती आपल्याला फक्त दाखवते आहे, हे त्याला कळलं. त्याचं मन शांत झालं आणि केवळ उत्सुकता उरली होती. त्या जमिनीचं बारकाईनं निरीक्षण केलं. सगळं सारखं होतं. शेणानं उत्तम सारवलेली जमीन. सपाट. मऊशार. म्हणाली, 'इथं बघ.' त्यानं पाहिलं. वेगळं काहीच नव्हतं. म्हणाली, 'जरा निरखून बघ.' बघितलं. वेगळं काही दिसेना. म्हणाली, 'हा चौकोन दिसतो?' तिनं सांगितल्यावर आणि दाखवल्यावर त्याला तो दिसला. ती एक तांब्याची पट्टी घेऊन आली. चौकोनात फिरवून तिनं ती जागा ढिली केली अन तीच पट्टी वापरून तिची अट लावून तो चौकोन उचलला. चौकोनाला कडी होता हे आता त्याच्या लक्षात आलं. म्हणाली, 'खाली शिडी आहे. उतर तिच्यात. तो उतरला आणि त्याच्या पाठोपाठ तीही. खाली आत सारवलेल्या जागेवर जाजम अंथरून आरेन आणि आरेना आरामात पहुडलेले होते. आरेन तर खरोखर झोपलेला होता. आरेना मात्र उठून उभी राहिली अन हसू लागली. तो आधी स्तब्ध तिच्याकडे नुसताच बघत होता. नंतर एकाएकी पुढे झाला आणि त्यानं तिला कवेत घेतलं. खूप जोरात आवळलं. 'स्सऽऽ इतकं जोरात, अरे मरून जाईन ना मीऽऽ,' ती किंचाळली.

'आन मी मरून चाल्लो व्हतो त्याचं काय? आशी कुढं गंमत करित्यात का?'

'बरं जाऊ दे. निदान गीता आहे शेजारी याचा खयाल तर कर.' 'काय बिघडत नायी. ती पन तुलाच सामील व्हती.'

'आरे, तिचंच डोकं सगळं. मी होकार दिला इतकंच. पण डोकं

सगळं तिचं,' आरेना हसत म्हणाली, 'बस, तुला सांगते सगळं.'

'तुम्ही दोघंही फार टणक डोक्याचे आहात. माझ्या शिकवणुकीचा काहीही परिणाम होत नाही तुमच्यावर. सायबूदादा, दीदी तुला अरे तुरे करते. तू तुझं गावठीपण सोडायला तयार नाहीस. अन दीदीचं बोलणं सुद्धा अजून चांगलं मराठी वळणाचं येत नाही. तुमच्यापेक्षा आरेन बरा. तो बोलायला शिकतोय चांगला अन लिहायला सुद्धा.'

'पण माझे भैनी तू सुद्दा आताच मला दीदी म्हणालीस!' आरेनानं तिला पकडलं.

'शिकू, शिकू आपन. ते व्हतय. पन आसं याच्या उप्पर करू नका.

जीव घाबरा व्हतोय.' साहेबराव म्हणाला.

'आरे एव्हढा जंगी वाघ माझा. तुपला जीव घाबरा कसा

व्हतोय?' आरेना हसत त्याच्या भाषेत म्हणाली.

'हां, त्याच्याकडूनच भाषा लवकर शिकशील तू.' गीता म्हणाली.

नंतर त्यांनी साहेबरावला सगळं सांगितलं. आधी त्या बदलीच्या बाया. नंतर गुरबतखानाचं खराडीला येऊन थेट साहेबरावला भेटणं. दोघीही खूप घाबरून गेल्या होत्या. एकमेकींना दाखवत नव्हत्या तसं ; इतकंच. पण मनावर सतत ते ओझं असे आणि अजूनही आहे. मग एक दिवस गीताला ही शक्कल सुचली. इथं खाली काय तरी असेल याचा अंदाज दोघींना ही होता. पण काय असेल हे माहीत नव्हतं. गीताने ते शोधलं. नंतर आत शिडी सोडून ती सरळ आरेनाला घेऊनच या बळदात उतरली. ते कायच उपयोगाचं नव्हतं. बांधणाऱ्यानं कशासाठी बांधलं असेल, माहीत नाही. कदाचित धान्य साठविण्यासाठी असेल किंवा आणीबाणीच्या प्रसंगी घरातल्या बायकांना लपण्यासाठी सुद्धा असेल. दुसरी शक्यता जास्त आहे. कारण आत हवा येण्यासाठी इथं इतका छान झरोका आहे, अन तो आतून किंवा बाहेरून अजिबात लक्षात येत नाही. वापरात नसल्यानं ही जागा अगदी गलिच्छ होती. धूळ, घाण, कोळिष्टकं अन असह्य कुबट वास. स्वच्छ करणं कठीण होतं. काम करणाऱ्या बायांना सांगणं शक्य नव्हतं. आरेना तर आजारीच पडली त्या हवेत जेवढा वेळ थांबली त्यामुळं. गीताने चिवटपणे सगळी सफाई केली. रंगरंगोटी केली. सारवून घेतलं. वरून खाली उतरताना आधी जे झाकण होतं, ते खूप जड आणि दगडी होतं. हे हलकं लाकडी झाकण सुद्धा तिनंच तयार केलं. आरेनाला पुन्हा खाली नेऊन सगळं दाखवलं. तिला ते आवडलं. म्हणाली, 'आता मी नेहमीसाठी सुद्धा इथं राहायला तयार आहे. वेळप्रसंगी लपून बसता येण्यासाठी ही छान जागा झालीय.' ती साहेबरावला दाखविण्यासाठी थोडा असा बनाव त्यांनी केला.

'अरे, किती घाबरले मी, तू जंबिया उपसून बाहेर निघालास तेव्हा

वाटलं, आपण करायला गेलो काय आणि होतंय काय?'

"पागल आहे वो. फिरेल डोक्याचा.' आरेना कौतुकानं हसली.

'अन सायबूदादा, तुमच्या पलंगाची जागा बदलल्याचं तुझ्या लक्षात

सुद्धा आलं नाही!'

'गीता, लय कामाची गोष्ट केली तू.' गीताच्या शेऱ्याकडं दुर्लक्ष करीत साहेबराव म्हणाला.

पाटीलबाबा त्याला सायबराऊ म्हणायचे. एकांतात आरेना सुद्धा रंगात येऊन 'माजा सायबराऊऽऽ' म्हणत त्याला मिठी मारायची. अशा वेळी त्याला हमखास आपल्या आईची आठवण येत असे. त्याला अगदी तोंड भरून सायबराऊ म्हणणारी या दुनियेत ती एकटीच तर होती. आता या दोघांच्यामुळं त्याला आई आणि तिचा स्वर आठवे. हे या दोघांनाही सांगणे त्याला शक्य नव्हते. इतक्या प्रेमाने हाक दिली की तो खूष होतो खरा पण त्याच्या दिलात काहीतरी डहुळतं, हे आरेनाला जाणवे. त्याला त्याच्या आईची आठवण होत असणार हे केवळ ती एक स्त्री आणि त्याची प्रेमिका असल्यानं तिला कळे. त्याची आई त्याला तशी हाक मारायची हे तिनं गीताकडून माहीत करून घेतलेलं होतं. तिच्या मनात कालवाकालव होई. पण ती तरी यात काय करू शकत होती? तुम्हाला जगावेगळं वागायचं तर काही चटके हे सोसावेच लागतात ना! आपल्याला या जन्मी आपली आई पुन्हा भेटण्याची शक्यता नाही, असं तो आपल्या मनाला बजावत असे. तर दिवस निघून जातील अन कदाचित त्याला त्याच्या आईवडिलांना निदान बघता-भेटता येईल सूद्धा. तसं आपल्याला काही करता येईल सुद्धा. असा विचार ती करत असे. तिला तिच्या माहेरचं, तिच्या जवळचं असं कोणीही उरलेलं नव्हतं. अफगाणिस्तानमधलं तिच्या पूर्वजांच गाव फक्त नावाने तिला माहीत होतं. तिथं तिच्या वडिलांचं राहातं घर आहे, तिथं दुनियेतले अव्वल दर्जाचे बदाम आणि अक्रोड पैदा होतात. तिथले लोक अफू तयार करून पैसा मिळवतात, असं तिनं ऐकलेलं होतं. बाकी एरवी ती तर सगळीकडून तुटलेली होती. त्याबद्दल तिची तक्रार सुद्धा नव्हती. जे नाहीच त्याबद्दल कसली तक्रार करणार? आता फक्त तोच आपला आहे, म्हणून त्याचं आहे ते सारं आपलं; अगदी त्याच्या आईवडिलांसकट, अशी तिची भावना होती.

पाटीलबाबांचं सायबराऊ म्हणून हाक मारणं वेगळं होतं. त्याला आईची आठवण तर होईच. पण कधी अशी हाक न मारलेले वडील सुद्धा तशी ती मारत आहेत असं त्याला वाटे. त्याच्या जन्मदात्या बापाशी त्याची खास जवळीक नव्हती. सहसा कोणाची ही नसते. बाप हा कायम एखाद्या भोकाडीसारखा असतो. आई सुद्धा त्याची तशीच प्रतिमा लेक वा लेकींसमोर उभी करत असते. कारण ते तिला सोयीचे असते. बापही सहज त्या भूमिकेत वावरत असतो. म्हणून त्याच्या अंतःकरणातला स्निग्ध ओलाव्याचा गर मुलांच्या अनुभवाला येत नसतो. साहेबरावलाही तो अनुभव नव्हता. आता पाटीलबाबा मात्र त्या ओलाव्याची मुक्त हस्ताने त्याच्यावर बरसात करीत होते. एकतर भोकाडीच्या भूमिकेची गरज भासण्यापल्याड तो गेलेला होता. आणि त्यांच्यासाठी स्वतःच्या आयुष्यात ती गरज संपलेली होती. तो त्यांना अगदी उशिरा झालेल्या मुलासारखा होता. शेंडेफळ, फार लाडकं असतं ते. लाडानं वाया जाण्याइतकं लाडकं. अन त्यांच्या नजरेत तर तो कर्तबगारीच्या शिखराकडे वाटचाल करत होता. त्यांना जे करायचं होतं, ते तो करत होता. ते सतत अथक त्याच्यासोबत होते. सतत त्याला आपल्या अनुभवाचे बोल ऐकवत होते. त्यांना त्याच्याकडून काहीही नको होतं. तो प्रश्नच नव्हता. असेच एकदा ते म्हणाले, 'सायबराऊ, महारमांग लोकांची बात त झाली आपली. बाकीचे अलुते-बलुते आपल्या मनानी घेता

येतीन. पन कुनबिकीला जिमीन देतानी इचार करावा लागतो. ही जिमीन त तुपल्या मालकीची-'

'आपल्या मालकीची.'

'हां, हां आपल्या मालकीची म्हन. ते समदे आपले कुळं. तेच्यात माळयाची जात बागाईत लय हारकून करिती, ह्ये कायम ध्यानात ठिवायचं. ते लोक वागण्या-बोलण्यात मऊ. कायेम हासूनखेळून राहनार. त्यानला पाण्याच्या सोयीचे बारकाले टुकडे द्यायचे. ते किफायती शेती पिकवनार. ते उग्राटपना करनारे नायीत. आपले महाटी लोक उग्राट. त्यांचं सेतीत ध्यान कमी रहातंय. त्यानला जिरायती मोठाल्या जिमिनी देयाच्या. आन धनगर त्यांच्या मेंढ्या घेऊन दरसाल येत राहातीन अशी शिस्त लावून देयाची. म्हंजी खताची फिकीर रहात नायी. तशे माळी, धनगर, म-हाटी; समदे येकच लोक. समदे कुनबीच. म-हाटी बी मेंढ्या वळितेत, बागायती बी करितेत. पन धंदा करता करता आलक जाती झाल्या आस्तीन. त्याच्यानी सभाव पन आलक व्हत गेला आसन. आन हीच बात बाकीच्या जातींची. आरं लढाईला जान्हारे फकस्ती म-हाटी थोडेच हायेत? पार समदे माळी, धनगरं, वारीकं, शिपी, कुंभारं, लव्हार; कोनचेय बी जातेत. हालीच्या जमान्यात ह्ये देसमुक लोकं झाले. ते तरी कुढं आलक हायेत? तेयबी महाटीच. स्वोताला उंच कुळीचे म्हन्त्यात. त्यांची कुळी उंच कोनी केली?

ह्ये मुसलमन राजांनी. बाकी फरोक काय नायी. त्यांच्यातयबी गंधर्व लागतो. आन गावाला जेवान धिलं का दोस खलास. आन नाय धिलं तर चार पिढ्यांनी आपाप खलास, आशी बात. आता तुलायबी देसमुकी मिळनारच समजा; मी सांगून ठिवितो तुला. पन म्हनून लगी तू उंच कुळीचा व्हनार का? आपलं जे हाये ते हाये. आपन समदे एकमेकीतले एक. महाटी....'

आणखी एकदा ते म्हणाले, 'सायबराऊ, गावकुसाच्या आतल्या अंगानी येशीपशी तालीम त खंदावा लागतीच. मारोतीच देऊळ बांधावा लागतंच. लाल माती अंगाला लागल्यासिवाय आपन कसे काय म-हाटी? आन बाकीचे ते तलवारबाजी, लेजीम, दांडपट्टा आशे ख्येळ हायेतच. तरन्या पोन्हांची रग जिरायची जागा आपुन करितोच. पन उशारा का व्हईना आपल्या गावात येक इठुबा-रखमाईचं देऊळ आपन बांधू. देव-धरम बरा रहातो. शांती रहाती. मी आता म्हतारा झालो. तुपल्याक आलो त त्याच देवळात मुक्कामाला राहात जाईन.'

पाटीलबाबा असं सतत सांगत असत. साहेबराव लगेच करायच्या

त्या गोष्टी लगेच करत असे. बाकीच्या ध्यानात ठेवत असे.

इतकं सगळं कळल्यावर आणि घडल्यावर साहेबराव गुरबतखानाच्या गरीबखान्यात पायाची धूळ झाडायला जाणारच नव्हता, हे सरळच. अखेर गुरबतच एके दिवशी आला. देवडीत शिदनाक होता. त्यानं नावगाव विचारलं अन म्हणाला, "सरकार हायेत का पघून येतो. तव्हर इथुशी बसा.' ही साहेबरावने घालून दिलेली शिस्त. आहेत हे माहीत असलं तरी, आहेत की नाहीत हे बघून येतो म्हणायचं. म्हणजे भेटायचं असल्यास आहेत, येताहेत; असं सांगता येतं आणि नसेल भेटायचं, तर नाहीत म्हणून सांगता येतं. वर्दी मिळाली तेव्हा साहेबराव आत आरेनासोबत बसलेला होता. ती लगबगीने उठली आणि बळदात

शिरण्याची तयारी करू लागली.

'आज्याबात नको जाऊ खाली. पुढं पडद्याआड बसून ऐक.' तो तिला म्हणाला.

'मला त्याचा थोबडा बगायचा नायी.' ती म्हणाली. 'आन तो मी रंगवणार आसन तर?' । 'नको, तसं नको करू. आपल्या घरी आलाय तो.'

'ठीक आहे. तू म्हणतेस म्हणून-' तो म्हणाला आणि बाहेर बैठकीत जाण्यासाठी निघाला.

खान बैठकीत बसलेला होता. याला पाहताच तो उठला. गळाभेट झाली. साहेबराव सावध होता. गळाभेट सुद्धा सावधानीने केली त्यानं.

'चला, सोचलं का पटेलसाहब आपल्याकडं येत नाहीत तर आपणच त्यांच्याकडं-'

'हां, हां.'

'आपन एक्या मुल्कचे लोग. या दुसऱ्या मुल्कमंदी पहचान कंधी

कामाला येयल ; सांगता येनार नायी.'

'खरं हाये.' 'आज मी तुमाला आवातनं देन्यासाटी आलो.' 'कशाचं?'

'आमच्याकडं कंदुरी ठिवलीय परसो. इथले चार-पांच बड़े लोग बोलावले हायेत. तेवढीच ओलक-पालक होऊन जाती. तुमाला ते चालत नसलं तर गोडाचे जेवन हाये. आपन ते पाटीलबाबांना घेऊन जरूर आना. जनाना लोगपन बोलावले हायेत. त्यांच्यासाटी बग्गी पाठवतो. त्यांचा समदा

आलग ठेप रहानार. वो सब मेरी बिबी-'

'आरे व्वा! हुशार हैस की!', साहेबराव खाटकन म्हणाला. स्वर,

मुद्रा सगळंच बदललं.

'काय हुवा? मी काय गुस्ताखी केली?' 'छे, छे! हुशार हायेस म्हनलं मी.' 'आपन काय तरी

'खानसाहेब आपन आमच्या कोठीवर आलेला आहात. आपला

अपमान करण्याची माझी इच्छा नाही.'

'क्या हुवा?' 'लगेच सांगतो. मी येनार नायी.' 'ऐसा क्यूं? ऐसा मत करना.'

'हे पक, ज्यो जिन्नस मिळवन्या खातीर तू इकडं आलेला हायेस, तो

इथं नाहीय. तू तुझा वखत बरबाद करतोहेस.'

खान चमकला. पण स्वतःला सावरत म्हणाला, 'मी कायच समजून

नायी व्हायलो.'

'तुपल्या ध्यानात आलंय. पुन्हा इथं येन्याची तसदी घेऊ नको. निघ

आता.' म्हणत साहेबराव उठून उभा राहिला.

इतकी बेअदबी! संतापाने गुरबतखानाच्या अंगाची लाही लाही झाली होती. म्यानातून समशेर उपसावी आणि या हलकट माणसाची खांडोळी करून टाकावी, असं त्याच्या मनात आलं. मुष्किलीने स्वतःवर काबू ठेवत तो उठला आणि म्हणाला, 'जैसी आपली मर्जी.'

'कशाला असं करायचं? सापाच्या शेपटावर तू निष्कारण पाय दिला

आहेस?' साहेबराव आत आल्यावर आरेना म्हणाली.

'निस्कारनी नाही हे तुला समजातं ना? आपल्याला समदं मायती

हाये, ही जानीव त्याला करून देयाची व्हती मला.'

'अरे पण, कशाला? नाहीतरी मी तिकडं गेले नसतेच आणि तुही मला जाऊ दिलं नसतंस. थोडं सबुरीनं आणि हुषारीनं वागलं तर अधिक चांगलं ना!'

'जो काय निकाल व्हायचाय त्यो फटक्याव झाला पायजे. मला घुळघुळ नकोय.', दोघांपुरता अंतिम निकाल देत तो म्हणाला.

गुरबत गप्प कसा बसणार? ती तिथं आहे, याची खात्री करून घ्यायची अन साहेबरावला बेसावध ठेवत तिला उचलायचं, असा त्याचा बेत होता. कंदुरीच्या निमित्तानं ती आली तर तिथंच उचलायची हा एक विचार होता. नाहीच जमलं तर आपल्या लोकांना घेऊन अचानक धडक हल्ला करून तिला उचलायचं, हे एक डोक्यात होतं. पण आता त्याच्या लक्षात आलं की शत्रू सावध झालेला आहे. त्याच्याकड सुद्धा जासूस आहेत. आणि तो तगडा आहे. एकास एक लढाईत तो आपल्याला ठेपणारा नव्हे. पण जमाव घेऊन गेल्यास जो हलकल्लोळ होईल, त्यात आपली संधी कायमची संपेल अशी शक्यता जास्त आहे. याच्यापेक्षा इम्रानकडं जाणं आणि रडणं कमी नामुष्कीचं. इम्रान अल्लाहच्या प्याऱ्या झालेल्या बडे भाईजान यांना ओळखतो. एकच धोका होता. समजा, इम्राननं तिला पाहिली तर त्याला तिच्या विषयी नक्कीच इश्क होणार आणि तो तिला स्वतःसाठी ठेऊन घेण्यासाठी मागणार. त्यात आपल्याला काहीही करता येणार नाही. ते तसं होईलच असं नाही. पण होऊ सुद्धा शकतं. तेवढी जोखीम घ्यावी लागेल. पण आता वेगळा रस्ता सुद्धा शिल्लकच नव्हता ना! गुरबत त्याच्याकडं गेला. स्वतःची ओळख करून दिली. येण्याचा मतलब साफ साफ शब्दात बेझिझक सांगितला. या काफीर इसमानं माझ्या एकट्याचंच नाहीतर आपल्या साऱ्या अफगाण बिरादरीचंच नाक कापलंय. बडे भाईजान आपले दिलोजान दोस्त होते. आपण तिला त्याच्या घरातून काढून मला द्या. एक पठाण आपल्या पठाणभाईच्या कामाला नाही येणार तर दुसरं कोण येणार? अन आपला तर इथं मोठा रौब आहे. आपल्या जागीरमध्ये तो राहतोय. आपल्यासाठी हा केवळ बाये हात का खेल. आणि माझ्यासाठी मात्र हा जगण्या-मरण्याचा झगडा आहे. इम्रानखान मनातल्या मनात हसला. एका लौंडीसाठी एखादा मनुष्य इतका पागल होतो, हे त्याला अतयं वाटलं. ती इतकी खुबसूरत असेल तर मीच तिला माझ्यासाठी ठेवायला मागू शकतो, हे याच्या ध्यानात कसं आलेलं नाहीय? अन ती तिथं आहे, हे केवळ हा म्हणतोय म्हणून. त्याला तसं कोणीतरी सांगितलंय म्हणून. असं नाही चालत. पण तरीही त्याला गुरबतची दया आली. म्हणाला, 'मी अगदी आत्ता त्याच्या मुसक्या आवळून त्याला आपल्यासमोर आणू शकतो. पण त्याच्याआधी ती त्याच्याकडं आहे, याची मला खात्री करून घ्यावी लागेल. केवळ तू म्हणतोस की, ती तिथं आहे, म्हणून ते खरं मानून मला चालणार नाही. त्या माणसाविषयी माझं मत अजिबातही वाईट नाही. मला तो सरळ माणूस वाटला. तो निजामशाहीतून आलाय अन एक बम्मनची छोकरी पळवून घेऊन आलाय, हे त्यानं मला खुद सांगितलंय. तो माझ्या जागीरमध्ये काम करतोय आणि चांगलं काम करतोय. उद्या मी त्याला अधिक मोठी जिम्मेदारीही देऊ शकतो. इतका कामाचा माणूस विनाकारण मी दवडणार नाही. पण तू म्हणतो ही बात खरी निघाली तर मी तिला त्याच्याकडून काढीन. जमाव करून त्याच्या कोठीवर जायचं अन गर्दी करून त्याची बेइज्जती करायची जरुरत नाही. तो माझा

किंवा आज तुझा सुद्धा दुश्मन नाहीय. ही लौंडी त्याच्याकडं सापडली तर तो खचितच आपला दुश्मन. म्हणून आपण त्याच्याकडं जाऊ. त्याला बेखबर ठेऊन जाऊ. तितकं मी नक्कीच करू शकतो. त्याचा मतलब त्याला कळेल. मी तुला घेऊन त्याच्या कोठीवर येतो, याचा मतलब तो समजून घेईल. तरीही त्याच्या जनानखान्यात आपण घुसणं, हे मात्र त्याची फारच बेइज्जती करणं होईल. ती तिथं नसेल तर आपण बेवजह तसं केलं असं होईल. अन माझा माणूस मला निष्कारण गमवावा लागेल. आपण असं करू. मी माझ्या सोबत विश्वासातल्या दोन बाया घेतो. एक अफगाण अन दुसरी म-हाटी. तुही तसंच कर. त्यांना आपण आत जायला सांगू. त्यांना चप्पाचप्पा हुडकायला सांगू. त्याची जी बाईल आहे, तिच्याशी बात करून कडक तपासणी करायला सांगू. अन ती बाई तू म्हणतोस तशी अफगाण आहे, असं या बाया म्हणाल्या तर तिला अन त्याला लगेच गिरफ्तार करू. पुढचा फैसला तू माझ्यावर सोड.

बेवजह जुल्म करणं मला परवडणारं नाहीय. विजापूरच्या दरबारात म-हाटा सरदारांची कमी नाहीय. अन ते लोग मातब्बर आहेत. त्या लोगांची बेमतलब बेअदबी मी कशी करू? मला ते परवडणारं नाहीय. तुला समजतेय ना बात?'

'सरकार, सरकार- इ्यागीरदार आलेत. म्या लांभून पाहयलं आन पळत आलो. तुमी आले त बरं न्हाईन.', देवडीहून धावत पळत आलेला लुमनाक घाबऱ्याघुबऱ्या स्वरात म्हणाला.

'आलोच मी', म्हणत साहेबरावनं आत शिरून आरेना आणि गीताला शांतपणे आवराआवर करायला सांगितलं. ही अपेक्षा होतीच. तयारीचे तपशील आखलेले होते. गुरबत इम्रानखान जहागिरदाराला भेटल्याची बातमी लागल्यापासूनच त्याला अंदाज आलेला होता. बळदात जय्यत तयारी आधीच केलेली होती. अन्न, पाणी, फळं, सुकामेवा असं सगळं ठेवलेलं होतं. आरेनसाठी अफू सुद्धा नेऊन ठेवलेली होती. उत्तम खाऊन अफूची गोळी चढवली की आरामशीर झोप. नीट निगुतीने करा. घाई करायची नायी. तो त्यांना संक्षिप्तपणे म्हणाला आणि लगबगीने पुढे गेला. दारासमोर इम्रानखान जहागीरदार घोड्यावरून उतरायच्या बेतातच होता. पाठीमागे गुरबत होता. अन त्यांच्या पाठी एक मेणा. म्हणजे बायका असणार. साहेबराव लगबगीने पुढे झाला. आदबीने कुर्निसात करून तो तिथेच उभा राहिला. पाठोपाठ गुरबत उतरला. मेण्यातील बायका उतरत होत्या. 'साहेबराय हे माझे अझीझ दोस्त गुरबतखान. सोबत त्यांचा जनाना आहे. चल, आपण अंदर जाऊन बाते करू.' इम्रानखान त्याला म्हणाला. आणि लगेच गुरबतकडं वळून म्हणाला, 'आप उन्हे साथ लेके आना.'

“हुजूर, आपण दस्तूर खुद आलात. केवढी मेहेरबानी! पैगाम मिळाला असता तर मी पेश झालो असतो.', बैठकीत बसल्यावर साहेबराव आदबीने म्हणाला.

'अरे नाही, साहबराय. कामच ऐसा होता का मला खुद येया पडलं. तू आंधी ऐसा कर. वो जनाना लोगांचा जवल कुठंतरी बसायचा इंतजाम कर. नंतर कामाची बात करू. त्यासाठी तुझी इजाजत लागेल.'

'काय बात करता हुजूर? तुम्हाला कशासाटी इजाजत?'

'सांगतो. सांगतो.' दरम्यान गुरबत आला. सोबतच्या बायांची शेजारी बसायची

व्यवस्था करण्यात आली. साहेबराव जागचा हलला सुद्धा नाही.

'गुरबतखान तुमच्या मुलुकमंदीच राहते होते. त्यांचे बडे भाई माजे दोस्त. यांचा एक नाजूक काम पडला. मनजे कुठूनतरी यांचे कानावरती आला की तुमचे कोठीत जनाना इंतजाम खूब बढिया आहे. ते मनाले मला तो बगता येऊ सकतो का? तर मी बोललो का, बाबा तुमी काय मी खुद सुद्दा नायी बगू सकत. हां, तुमचा जनाना ते बगू सकते. तेयबी सायबरायनी परवानकी दिली तर. मला आसं लागलं का समजा तू नाय परवानकी दिली तर हे काय करू सकते? पहचान नसेल तर ते बराबरच ना! आपले नजदिकी लोग हायेत. म्हनून मी खुद यांच्या संगती आलो.'

आशय स्पष्ट होता. गुरबतला आत शोध घ्यायचा होता. अन आता तो इम्रानला सुद्धा घ्यायचा होता. या बाया याच्या वा त्याच्या घरच्या जनान्यातल्या नव्हत्या. त्या कसून शोध घेणार. आरेना सापडली की ते तिला ताब्यात घेणार. आणि साहेबरावला हातकड्या घालणार.

'तर चालेल काय? इंतजाम होतो?' 'बिलकुल हुजूर. आपन खुद सांगता. काय सवालच नायी.'

'तेच मी गुरबतला सांगितला. चल, अंदर आता त्यांचं चालु द्या.

तोवर आपन गपसप करू.'

इम्रानखान बिलकूल आरामात बसलेला होता. असं किंवा तसं; काहीही झालं तरी काय करायचं, हे त्यानं आधीच ठरवलेलं होतं. इतक्या किरकोळ गोष्टीसाठी आपण इथं आलेलो नाहीय, हे साहेबरावच्या लक्षात आलंय. मनातून तो दुखावलेला आहे. ती लौंडी इथं सापडली तर काहीच सवाल नाही. मग साहेबरावला आपण दाबू. पण नाही सापडली तर आपल्याला त्याच्या मिनतवाऱ्या कराव्या लागतील. त्याची माफी मागावी लागेल. असं पुन्हा होणार नाही असा विश्वास त्याला द्यावा लागेल... इम्रानखान विचार करत होता. गुरबत अस्वस्थ होता. तो साहेबरावच्या नजरेला नजर देत नव्हता. इम्रानला आपण इथं घेऊन आलो, ही मोठीच चूक आपण केलीय, असं आता त्याला वाटत होतं. ती सापडली तर ती आता फक्त याच्या ताब्यातून त्याच्या ताब्यात जाणार. आपल्या हाती ती लागणार नाही, असं आता त्याला वाटत होतं. ती सापडू नये, असं सुद्धा मनाच्या एका कोपऱ्यात त्याला वाटत होतं. साहेबराव साहजिकच अस्वस्थ होता. त्याने कडेकोट तयारी केलेली होती. सगळ्या शक्यता लक्षात घेऊन ती केलेली होती. आरेना सापडली नाही की त्याचा पवित्रा तो बदलणार होता. म्हणजे अदबीनेच पण ठामपणे तो इम्रानला बजावणार होता की जे झालं ते ठीक नाही झालं. असं होणार असेल तर तुमच्या मुल्कमध्ये मी कशासाठी राहू? मी तर सगळं सत्य तेच आपल्याला सांगितलं होतं. पण आपण माझ्यावर भरोसा नाही ठेवला. ह्या माणसावर ठेवला. का तर तो अफगाण आणि मी काफर. आपण आदिलशाहीतले जागीरदार आहात.

पण इथली रयत तर म-हाटाच आहे ना! आपण माझं दिल दुखावलं आहे. मी कष्टी झालो आहे, असं पुष्कळ. हे असंच होईल याची त्याला खात्री होती. पण समजा, समजा असं झालं की आरेना ह्या बायांना सापडली- जी अत्यंत दूरची शक्यता होती, पण होतीच तर त्या वास्तवाला तोंड देण्याची तयारीही त्यानं केली होती. इम्रान आणि गुरबत असे

दोघेच आत आले असले तरी सोबत बाहेर आणखी माणसे असतीलच. पण ती जास्त असणार नाहीत असा त्याचा होरा होता. ती किती आहेत याचा अंदाज घ्यायला लुमनाकला त्यानं आधीच सांगितलेलं होतं. अन् एवढंच नव्हतं सांगितलं. हे येतील याचा अंदाज घेऊन आधीच सगळी योजना त्यानं केलेली होती. आता लुमनाकने सिदनाकला निरोप दिला असेल. वीस-पंचवीस तडफदार महार तरुण घोड्यांसकट हत्यारबंद जय्यत तयार असतील. त्यांना इशारा मिळाला की साताठ थेट आत घुसतील. गर्दी करून इम्रान आणि गुरबतला निःशस्त्र करतील. त्यांना मारणार नाहीत. त्यांना आणि बायांना हत्यारांच्या धाकात बसवतील. बांधून टाकतील. तोंडांना तोबरे लावतील. कोणताही आवाज होणार नाही याची दक्षता घेतील. गढीच्या मागच्या दरवाजाशी उरलेले तरुण असतील. तिथे घोड्यांवर बसून आरेना, आरेन, गीता आणि साहेबराव शांतपणे निघतील. आत गेलेले बाकी तरुण पुढचा दरवाजा ढकलून घेऊन बाहेर निघतील. इम्रानच्या माणसांना सांगतील की, हुजूरखाना घेऊनच निघणार आहेत. वेळ लागेल. नंतर तेही शहराबाहेर ठरलेल्या जागी बाकीच्यांना सामील होतील. त्यानंतर मात्र घोड्यांना टाच मारून भरधाव सोडले जाईल. कुठे जायचे हे साहेबराव तेव्हा सांगेल. आरेनाने सुरक्षित जागा निश्चित केलेली आहे. ती त्यालाही माहीत नाहीय. म्हणाली होती, 'माझ्यावर भरोसा ठेव. आणि मी समशेर चालवू शकते, हे ही ध्यानात घे.'

ताण असल्यानं सगळे गप्पगप्प होते .गुरबत शब्दानेही बोलत नव्हता. इम्रान आणि साहेबराव जेमतेम. इतक्या किरकोळ कारणासाठी आपण साहेबरावला दुखविण्याचा धोका पत्करला याचा आता इम्रानला पस्तावा होत होता. आपल्यासारख्या मुरब्बी माणसाने असा मूर्खपणा करावा याचं आता त्याला आश्चर्य वाटत होतं. गुरबतच्या रडक्या जुबानची आपल्याला भूल पडली. आपण खुद त्याला घेऊन इथं आलो. कोण आहे तो आपला? उलट हा माणूस आपला आहे. महाटा असला म्हणून काय झालं? तेच लोग आहेत हे सगळे. त्यांच्यातच राहायचंय आपल्याला. त्यांचा भरोसा घालवून कसे चालेल? ती लौंडी इथं सापडली काय अन न सापडली काय; आपल्याला काय फरक पडतो? आतून येणाऱ्या बाया काय बातमी आणतात याची आता त्याला अजिबातही उत्सुकता उरली नव्हती. आपलं नुकसान होऊ न देता या झमेल्यातून बाहेर कसं पडायचं याचाच तो विचार करत होता.

दरम्यान आत गेलेल्या बाया -इम्रान आणि गुरबतच्या सुद्धा व्यावसायिक होत्या. आपल्याला हे हे काम दिलेलं आहे आणि ते आपल्याला निष्ठुर कसोशीनं करायचं आहे, इतकंच त्यांना माहीत होतं. त्यांनी आत गेल्यावर गीताची तपासणी सुरू केली. बामण. ठीक आहे. सांग. कशी? अन तुझी भैन? नाही कशी? आम्हाला समजलंय. कुठं आहे ती? आम्ही शोधूच. पण तुही सांगू शकतेस. ते तुझ्या हिताचं राहील. तू बम्मन कशी? काय काय माहित आहे? वेद, उपनिषदं? ज्ञानेश्वर? पैलतो गे काऊ कोकताहेऽऽ? पसायदान? खळांची व्यंकटी सांडो? विठोबा? खंडोबा? अन तुझी अफगाण भैन? आम्ही शोधतो. चप्पाचप्पा छाननी करू. तू काय समजतेस? हे कपडे, गाद्या अन ही गुंडाळी कसली?... त्या तिची तपासणी करत होत्या अन शोधत होत्या. त्यांना ना कसली भीती होती ना कसला संकोच. त्यांनी सगळ्या गोष्टी उचकपाचक करून विस्कटून टाकल्या. त्यांना विधिनिषेध वर्य. फक्त

कामाशी मतलब. त्यांनी शय्यागृहातलं जाजम उचकलं तेव्हा गीता थोडी गांगरली. पण ते त्यांच्या लक्षात येणार नाही याची तिनं काळजी घेतली. तुझी भैन कुठंय? सांगितलं तर तुझ्या हिताचं होईल. माझी कोणीही बहीण नाही. मी शपथेवर सांगते. तुम्हीच मला बहिणींसारख्या आहात. मी घाबरून गेलेय. आम्ही निजामशाही मुलखातून आलो. इथं शांततेने जगता येईल असं वाटलं. पण ते शक्य नाही असं दिसतंय. आम्ही हा मुलुख सोडून जाऊ. असला जुलूम कोण सहन करणार? आमचा काहीही अपराध नसताना तुम्ही आमच्या घरात घुसला आहात.... गीता कसलाही विचार न करता सतत बोलत राहिली. सगळीकडं सगळ्या कसून तपासण्या झाल्या. बस. काहीच नाही. ही आहे. अन खात्रीने बामणीन आहे. चेहरा-मोहरा, अंगलट, वर्ण, भाषा; सगळ्या खुणा तेच सांगतात. आणि त्यात शंकेला जागा नाहीय. बाकी इथं काहीच नाहीय. कोणीही नाहीय.

आत फक्त एक बामणीन आहे. आणि ती बामणीनच आहे हे खात्रीलायक. नौकरानी आहेत. त्या त्याच आहेत. बाकी आणखी कोणीही नाहीय. अफगाण बाई इथं राहात असल्याच्या कोणत्याही खुणा नाहीत. आम्ही खात्री करून घेतलीय. बाहेर येऊन त्यांच्यातली एक म्हणाली. त्या चारीही एकत्र बाहेर आल्या होत्या. त्या अत्यंत थेट आणि बेधडक होत्या. इम्रानला फार शरम वाटली. त्या तपासणी करायला आलेल्या आहेत. आणि त्या गुरबतच्या जनान्यातल्या नाहीत, हे त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीतून प्रच्छन्नपणे स्पष्ट झालं. हे इतकं असं साहेबरावला कळावं, याचा त्याला फार खेद वाटला. म्हणजे ते तसं होतंच. पण ते असं थेट दिसावं हे फार गलिच्छ होतं. पण आता त्याला काहीही इलाज नव्हता. त्यानं गुरबतला विचारलं, तुला आणखी काही विचारायचंय? गुरबतला वाटलं, ती आत असो व नसो, ती सापडली नाही, हे बरंच झालं. तो काहीच बोलला नाही.

मुंडी नाही, नाही, करत हलवली फक्त.

'तुला खुद अंदर जाऊन बगायचंय?'

'नाही.' 'नाही?'

'ठीक. तू हो म्हणाला असतास तरी मी तुला मना केलं असतं.

तुज्यासाटी मी जे केलं त्याच्यामुळी मी आधीच खूब शरमिंदा झालोय या साहबरायसमोर. आता तू असं कर. तू तुजा हा जनाना घेऊन निघ. मी जरा वख्तचे बाद येतो.', इम्राननं हकूमच केला त्याला. आवाज करडा आणि कोरडा.

'साहबराय, मी फार मोठी गलती केली-' गुरबत बाहेर पडल्यासारशी

इम्रान म्हणाला.

"मला खूप धक्का बसला हुजूर. असं उद्या कोनीही काहीही बोललं तर आपन खुद येनार म्हनजे -आमच्यापेक्षा आपला भरोसा कोनाही ऐयगैऱ्यावर

बसतो- आम्ही काय करायचं?'

'कसी साल्याची भूल पडली मला. मी बोलतो ना- माजी खूब गलती

झाली. मी तुजी मुआफी चाहतो-'

'नको, नको. आसं बोलून मला लाजवू नका हुजूर. माझं दिल दुखलं

एवढीच माझी अर्जी हाये.'

“पुन्ना कधीच आसा होनार नायी. मी तुला जुबान देतो. तू मला सच तेच बोलला होता.

आता असी भूल कब्बीच होनार नायी.'

'हुजुरांचे पाय आमच्या कोठीला लागले ते ही अशा-' 'तो सवाल नाही. येतो मी आता.' 'आपन पाठीशी असला की हत्तीचं बळ येतं आंगात.' 'तेच्यात आता बदल होनार नाही.'

3

हतोत्साह होऊन गुरबतखान परतला त्याला दहा वर्षे लोटली आहेत. साहेबरावने त्याच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी माणसे नेमलेली आहेत. एवढ्या काळात त्याच्याकडून हालचाल नाहीय. आरेना आपल्या पूर्वाश्रमीच्या सवतीच्या खुशालीचा हालहवाल साहेबरावकडून जाणून घेत असते. तिला हव्या त्या गोष्टींची त्याच्याकरवी पूर्तता करत असते. तिची भेट या जन्मी शक्य नाही, हे तिनं स्वतःला पटवून घेतलेलं आहे. त्याचा तिला खास त्रास होत नाही. पण तिच्या साधेपणाच्या आणि भोळेपणाच्या आठवणींनी ती तिच्याशी कायमची बांधलेली आहे. या दहा वर्षांत पुष्कळ घडामोडी झाल्यात. साहेबराव त्याच्या कुटुंबासह खराडी इथल्या त्याच्या गढीत राहू लागलाय. आरेन आता पंधरा वर्षे वयाचा झाला आहे. रिवाजाचा विचार करता त्याचं लग्नाचं वय झालंय. पाटीलबाबा कधीकधी साहेबरावजवळ आरेनच्या लग्नाचा विषय काढतात. तो मातृमुखी आणि अत्यंत देखणा आहे. तो आंतरबाह्य म-हाटा दिसतो. लिहिणं-वाचणं आधी तो गीता मावशीकडून शिकला. नंतर एक पंतोजी घरी येऊन त्यास शिकवत असे. खेरीज म-हाटे लोकांना ज्या इतर विद्या अवगत कराव्या लागतात- त्या म्हणजे शस्त्रे चालविणे, घोडेस्वारी, शिकार करणे, लेजीम खेळणे, कुस्ती करणे अशा अनेक विद्यांमध्ये तो पारंगत आहे. ठासणीची बंदूक तो उत्तम चालवतो. तो अव्वल प्रतीचा नेमबाज आहे. त्याच्या आईवडिलांसकट सारे त्याला आरेनराव किंवा आरेनराय म्हणतात.

आरेना आणि साहेबराव यांना अपत्य झालेले नाहीय. पण म्हणून ते कष्टी नाहीत. साहेबराव आता तीस वर्षे वयाचा झाला आहे. तर आरेना समजा बत्तीस. पाटीलबाबा म्हणतात, 'सायबराऊ! पांडुरंगाची मर्जी आसंल त त्यो कोनच्याय बी वक्ताला फळ आपल्या वटीत टाखिन. आन नाय टाखलं त समजायचं का जे हाये ते त्याच्या मर्जिनी आपल्यासाटी बराबर हाये.' साहेबरावसाठी त्यांचा शब्द हा देवाचा शब्द. पाटीलबाबांचं वय आता सत्तरीच्या घरात गेलंय. तब्ब्येतीची तक्रार नाहीय, पण थकले आहेतच ते. ते जास्ती करून खराडीलाच राहतात. अधूनमधून भांबुर्डे येथे जाऊन त्यांच्या मुलाबाळामध्ये राहतात. पण ते तिथं आता जवळपास पाहण्यासारखे झाले आहेत. खराडी येथे त्यांना घरी असल्यासारखे वाटते. गढीच्या देवडीतून आत शिरलं की एक भलामोठा चौक लागतो. त्याच्या चारी बाजूंनी वर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. त्या संपतात तिथं बांधलेल्या खोल्या आहेत. अगदी समोर उजवीकडे भली मोठी मोकळी पडवी आहे. डाव्या अंगाला

अगदी कोपऱ्यात उंच कळस असलेले देऊळ आहे. ते विठोबा-रखुमाईचे देऊळ. पडवीतून डावीकडं दारातून आत शिरलं की एक मोठी दिवाणखाना म्हणता येईल अशी खोली आहे. तिथून समोर गर्भागारातले विठोबा-रखुमाई स्पष्ट दिसतात. सगळे बांधकाम दगडातले आहे. त्यामुळं तिथ उन्हाळ्यात गारवा असतो आणि हिवाळ्यात उबदार हवा असते. गभागारातल्या झरोक्यातून उजेड येतो आणि विटेवर उभ्या काळ्या विठू-रखुमाईला सतत झळकत ठेवतो. खेरीज तिथं पितळी समईत तेलाचा दिवा कायम तेवत असतो. बाहेरच्या दिवाणखान्यात मध्यभागी छतातून एक मोठी पितळी घंटा सोडलेली आहे. ती वाजवून देवाला आपल्या आगमनाची सूचना द्यायची. नंतर तिथूनच दर्शन घ्या अथवा आत गभोगारात जाऊन मोकळ्या मनाने पदस्पर्श करा. पाटीलबाबांचा मुक्काम तिथं असतो. विठोबा-रखुमाई आणि ते आता एकमेकांचे एक झाले आहेत. त्यांचे कपडे-चोपडे, त्यांचं सगळं सामान तिथंच असतं. अगदी त्यांची वीणा, टाळ, मृदुंग असं सगळं. ते सारं स्वच्छ आणि नेटकं राहील याची काळजी घेतली जाते. देव आणि पाटीलबाबा यांच्या सेवेसाठी एका माणसाची कायमसाठी तजवीज केलेली आहे. पडवीतलं हे देऊळ पूर्ण झाल्यावर साहेबराव पाटीलबाबांना पहिल्यांदा इथं घेऊन आला तेव्हा ते आत शिरले आणि समोर विठोबा-रखुमाईला पाहून मुग्ध, स्तब्ध झाले. त्यांच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा सुरू झाल्या. मग, पांडुरंग, पांडुरंग आणि जय जय विठोब्बा-रखुमाऽऽय म्हणत नाचू लागले. त्यांनी साहेबरावला गावात देऊळ बांध असं सुचवलं होतं. त्यानं ते थेट गढीत बांधलं. बाबांना कायम देवाच्या सहवासात राहता येईल अशी सोय करून टाकली. तेव्हापासून एक रिवाजच पडून गेला आहे.

गढीत कोणत्याही कामानिमित्त कोणीही आले की ते पहिल्यांदा डावीकडं वळून आत शिरून पांडुरंगाचं आणि पाटीलबाबांचं दर्शन घेतात आणि बाहेर येऊन साहेबरावच्या भेटीसाठी बसून राहतात. पाटीलबाबा म्हणाले होते ते खरं ठरलंय. खराडी गाव नांदतं झालं, चांगलं रेघेरूपाला लागलं अन चार वर्षांनी साहेबरावच्या देशमुखीची सनद आली. आता लोणीकंद, वाघोली, मुंढवा, लोहगाव, अगदी भीमा-कोरेगावपर्यंत दहा गावांची देशमुखी त्याला मिळालीय. त्यासाठी इम्रानखान त्याला विजापूरला आदिलशाही दरबारात घेऊन गेला होता. इम्रानखान आता या प्रांतीचा सुभेदार आहे. स्वतःची सुभेदारीची वस्त्रं घेतानाच त्यानं साहेबरावच्या देशमुखीचं राजकारण जमवलं. विजापूर दरबारी त्याचं वजन आता चांगलंच वाढलेलं आहे. साहेबराव त्याचा विश्वासू माणूस आहे. त्याच्या अखत्यारीतल्या गावांचा महसूल सुभेदाराकडं बिनचूक पोहोचतो. सुभेदाराची हाक आली की आपल्या वतनातली फौज घेऊन साहेबराव रणांगणावर हजर असतो. महाट लोकांना युद्धकलेचं शिक्षण गावोगावी मिळत असतं. हाक आली की आपापले घोडे घेऊन तरुण योद्धे हत्यारबंद हजर होतात. एरवी शांततेच्या काळातही गावोगावच्या लोकांना देशमुखाकडं काहीना काही काम पडतंच. ते गढीवर येतात. आत आले की आधी डावीकडं वळून देवाचं आणि पाटीलबाबाचं दर्शन घेतात. नंतर कामाच्या गोष्टी. साहेबराव विजापूर दरबारी एकदाच गेलाय. सुभेदारासोबत. त्यावेळी त्याला आधी सगळे रीतीरिवाज नीट शिकविण्यात आलेले होते. ते सगळं त्यानं व्यवस्थित पार पाडलं. पण दरबारी वातावरण त्याच्या मनाला फारसं रुचलेलं नाहीय. तिथं फारच हांजीहांजी प्रकार

असतो, आणि खूप कारस्थानं चालतात असं त्याचं खासगीतलं मत. आपल्या बारक्या इलाख्याचा मालक असणं आणि सुभेदाराशी निष्ठा ठेवणं त्याला रुचतं. त्यापेक्षा अधिक महत्त्वाकांक्षा त्याला नाहीत. त्याचं असं असणं सुभेदारालाही त्याच्यासाठी सोयीस्कर असल्यानं आवडतं. त्यानं अधिक महत्त्वाकांक्षी असणं आरेनाला कदाचित आवडलं असतं. पण तो तसा नाहीय म्हणून तिची तक्रार नाहीय. एक साधारण महाटा तरुण ते दहा गावांचा देशमुख असा त्याचा प्रवास तिच्या नजरेसमोर घडलाय. त्यात साहजिकच तिचा वाटा मोठा आहे. आधी पैसा तर तिनेच आणला होता ना! पण तो त्यानेही उत्तम वापरला. आणि आता त्यांच्याकडं त्याचीही बिलकूल कमी नाहीय. मुख्य म्हणजे तो आता सगळ्या अर्थांनी तिचा पुरुष झालेला आहे. ती कायावाचामने त्याची अस्तुरी झालीय. एक म-हाटण. मर्दिनी. गढीच्या बुलंद भिंतींच्या आत ती तिची स्वतंत्र आहे. भिंतीच्या बाहेरच्या कोणत्याही आकांक्षा ना तिला कधी होत्या ना आहेत. तिथं आत ती निर्धास्त आहे. तिला सारं माहीत असतं. एवढी वर्षे एकत्र घालवून सुद्धा त्याचं तिच्या विषयीचं आकर्षण उणावलेलं नाहीय. ते व्यक्त होण्याच्या रीतीत आता एक गंभीर समंजसता आलीय. तिच्याविषयी आदर तर त्याला आधीपासूनच होता. आता तो अधिक प्रौढ रीतीने व्यक्त होतो. तो युद्धावर गेला की आधी ती जरा फिकिरीत पडायची. त्याच्यासाठी आणि स्वतःसाठी सुद्धा. गुरबतच्या असण्याची, येण्याची धास्ती मनात असे. पण स्वारीवर गेला तरी तो गढीच्या रक्षणाचा चोख बंदोबस्त करून जातो, हे तिला अनुभवानं कळलंय. अन युद्धात कोणाचंही, कधीही, काहीही होऊ शकतं, हे एक क्षत्राणी म्हणून तिला माहीत आहे. त्यासाठी काळजी करून काय होणार, असं ती स्वतःला बजावत असते. तो युद्धावर गेला की ती तिचा अधिकांश वेळ पाटीलबाबांसमवेत देवळात घालवते. त्यांच्यासोबत भजनं म्हणते. पांडुरंगाचा जप करते. जय जय विठोब्बा रखुमाऽऽय, म्हणते. एरवीही ते ती करतेच. पण नवरा लढायला गेल्यावर जास्तीत जास्त. तेवढंच तिच्या हाती असतं म्हणून. पाटीलबाबांच्या समोर ती पडदा ठेवत नाही. त्यांच्यासाठी तिने तो अपवाद केला आहे. सोबत गीता असते. विठोबा-रखुमायच्या देवळात प्रवेश केल्यानंतर काही दिवसांनी पाटीलबाबांनी साहेबरावला

विचारलं, 'देवांच्यात जीव फुकला का नायी?'

त्याला काहीच कळेना. मग ते म्हणाले, 'त्या बामणाच्या पोरीला बोल्हव.'

तिला म्हणाले, 'देवळात देवांची मूर्ती बसवल्यावर काय तरी

करत्यात ना पोरी, ते जीव फुकित्यात ना?'

'त्याला मूर्तीत प्राणप्रतिष्ठापना करणं असं म्हणतात.', ती म्हणाली.

'हां, त ते क्यालं का नायी आसं इचारतो मी.', त्यांनी विचारलं. 'ते काहीही केलं गेलेलं नव्हतं.' 'ते करायला पायजे का नायी पोरी?'

'त्यात काय ; तुम्ही मूर्तीला स्पर्श केलात की झाली प्राणप्रतिष्ठा.',

गीता म्हणाली.

'नाय गं पोरी, ते देवाबामणाचं काम.'

'आमच्यासाठी तुम्हीच देवबामण आहात. माझ्यासाठी सायबूदादा

पण त्याच जागी आहे.'

'ते आसुंदे. पण एक मूर्त घातली का रिवाज आस्तोय. त्यो पाळाया
पायजे. मनाला चैन येती त्यानी.'
पाटीलबाबांच्या इच्छेला सगळयांनी मान दिला आणि कसब्यातून
व्युत्पन्न ब्राह्मण आणून त्याच्याकडून ते केलं गेलं.

देशमुखांच्या गढीच्या भोवती म-हाटा कुणबी, माळी लोकांची घरे आहेत. खेरीज गावठाणाबाहेर शेताच्या सोयीने त्यांच्या पडळया आहेत. गाई, बैल, म्हशी, शेळया, मेंढ्या यांच्या सोबतीने त्यांच्यातले काही मुक्कामाला सुद्धा तिकडे असतात. या जनावरांसाठी काटेरी कुंपणाचे वाडगे केलेले असतात. गावकुसाच्या आत बाकी सोनार, शिंपी, कासार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, साळी, कोष्टी, न्हावी, तेली असे सगळया जातीचे लोक राहतात. महार आणि मांग गावकुसाबाहेर राहतात. हे नव्याने वसलेले गाव जुनी राहारीत पाळूनच वसलेले आहे. सगळया जाती आपापली कामे करत असतात. पण त्यांच्यातल्या तरुण मुलांचा ओढा लढाईला जाऊन पैका कमावण्याकडे असतो. महार, मांग जातीतले तरुण याला अपवाद नाहीत. उलट अतिशय तिखट योद्धे म्हणून त्यांना अघोषित मान्यता असते. ज्याची तलवार खंबीर तो हंबीर, असा न्याय लढाईत असतोच.

देशमुख स्वारीवर गेले की कोणी त्यांना भेटायला येण्याचा प्रश्नच नसतो. संपूर्ण पडवीला पडदा लावलेला असतो. काही कामासाठी कोणी आल्यास ते आत येत नाहीत. पायऱ्यांच्या खाली चौकात उभे राहतात. देशमुखीणबाई पडद्यातून निवाडा करतात. हे स्त्रियांना सुद्धा लागू असतं. आरेनराव युद्धावर जाण्यासाठी उतावीळ असतो. सध्यापर्यंत तरी साहेबरावनं त्याला रोखलेलं आहे. पण असं फार काळ करता येणार नाही हे साऱ्यांना माहीत आहे.

गीता आनंदात आहे. आरेना आणि साहेबराव यांनी तिच्या लग्नासाठी -तिला राजी करण्यासाठी- खूप प्रयत्न केले. तिने त्यांना दाद दिलेली नाहीय. म्हणाली, मला नकोय. अगदी मनापासून नकोय. मला तुमच्यासोबत राहायला आवडेल. साहेबराव म्हणाला, 'तुला पसंत होईल असाच बामणाचा जोडीदार आणतो.' ती म्हणाली, 'मला नको. मला लग्नच नकोय.' तो म्हणाला, 'आयुष्य असं एकट्यानं कशासाठी घालवायचं? तुझा भाऊ आहेना मी?

तर माझी काही जबाबदारी आहे की नाही?' म्हणाली, 'माझं सरळ लग्न झालं असतं तर माझं फार बिघडलं असतं, असं आता माझ्या लक्षात येतंय. तिडकेंच्या पोरानी मला नकार देऊन माझ्यावर फार उपकार केलेत. ते झालं असतं तर मला आयुष्यभर पिचत जगावं लागलं असतं. अन त्याच्या आयुष्याचं सुद्धा नुकसानच झालं असतं. मला संसाराची इच्छाच नाहीय. हे मला आता कळतं. हजारात किंवा लाखात एखादी मी असेन ; पण आहे, मला पुरुषाच्या सहवासाची चाहच नाहीय. त्याच्याशिवाय मी फार सुखात आहे. अधिक फोडून तुला किती सांगू?' तरीही साहेबरावला ते कळेना. मग हेच तिनं आरेनालाही सांगितलं. बाई बाईला सांगू शकते तसं अधिक मोकळेपणी तिनं सांगितलं. आरेना साहेबरावला म्हणाली, 'गीताशी तिच्या लग्नाचा विषय याउप्पर काढायचा नाही. ती कायम आपल्यासोबत राहील. ती आपल्यासोबत आनंदात आहे.'

आरेनराव पाटीलबाबांचा लाडका आहे. आरेनलाही ते खूप आवडतात. पण ते सहजी

झालेलं नाहीय. आरेनमध्ये अगदी बालपणापासून दुनियेविषयी कायम सावध असण्याची एखाद्या वाघाच्या बछड्यासारखी वृत्ती आहे. त्याच्या नकळत किंवा जवळपास अजाणता म्हणता येईल अशा रीतीने तो समोरच्या मनुष्यास अनेक प्रकारे न्याहाळतो, पारखतो आणि कठोर चाचणीनंतरच त्याच्या संबंधाने निर्णय घेतो. दऱ्याखोऱ्यातील खडतर वास्तव्याच्या अनुभवांचे पिढ्यापिढ्यांमधून वाहत आलेले अफगाण संचित म्हणूनही ते तसे असेल, पण ते आहे. साहेबरावला सुद्धा त्याचे प्रेम सहजी मिळवता आलेले नाहीय. तीच गोष्ट पाटीलबाबांची. पण काहीएक खूणगाठ पटल्यावर आरेन त्यासाठी मोकळा होतो. आरेन आठ-नऊ वर्षेवयाचा होता, तेव्हा पाटीलबाबा नुकतेच या खराडीच्या गढीत राहायला आले होते. तेव्हा कधीतरी आरेनला देवी निघाल्या. त्यांची सांगून येण्याची प्रथा थोडीच असते? तर तेव्हा पाटीलबाबांनी त्याला देवळातल्या आपल्या मठीत मुक्कामाला घेतलं. ते ओढ्या काठीच्या बनातून निरगुडीचा ताजा पाला स्वतः आणत असत आणि त्याला त्या पाल्यात ठेवून त्याच्यावर लक्ष ठेवत. काही दिवसांनी देवी निवल्या. त्याच्या अंगावर कुठलीही निशाणी न ठेवता त्या आल्या तशा गेल्या. त्या काळात आरेनला ताप आणि अशक्तपणा फार असे. त्याच्या कपाळावर ते भुई मिठाची पट्टी ठेवत असत आणि ती सुकली की नवी लावत बसून असत. आरेन गुंगीत किंवा अर्धवट झोपेत पहुडलेला असे. एकदा अशीच त्याला जाग आली तर ते अत्यंत मायेने त्याच्या डोक्यावरून हात फिरवत होते. त्यांच्या त्या स्पर्शातून त्याला त्यांची ओळख कायमची पटली. स्नेहाच्या ओलीची खूणगाठ कायमची बांधली गेली. अगदी लहान वयापासून बव्हंशी सगळी युद्धकला तो साहेबरावकडून शिकला. युद्धात स्वतःला वाचवणं महत्त्वाचं. समोरच्याची कधीही गय करायची नाही. लढताना शत्रू हा फक्त शत्रूच असतो, हा मंत्र तो त्याच्याकडूनच शिकला. एकदा तलवारीचे हात करताना साहेबरावच्या शिकवणीनुसार तो त्वेषाने ती फिरवत असताना साहेबरावला स्वतःला त्याच्यापासून वाचवता आलं नाही अन त्याच्या खांद्याला आरेनची तलवार चाटून गेली. साहजिकच साहेबरावचा खांदा रक्तबंबाळ झाला. तेव्हा आरेन गोंधळून गेला. साहेबरावनं एकवार स्वतःच्या खांद्याकडं पाहिलं आणि आरेनला म्हणाला, 'तुला नाहीना लागलं कुठं?' आरेन नाही म्हणताच साहेबराव छान हसला. इतका वेळ स्तब्ध असलेला आरेन मग हळूच बापाच्या कुशीत शिरला. त्याच्यासाठी हृदयात नात्याची कायमची खूणगाठ बांधली गेल्याचाच तो क्षण होता.

4

एके दिवशी वांबोरीचे एडके-पाटील खराडीला हजर झाले. गावकुसातून आत शिरून थेट गढीच्या दाराला भिडले. अन म्हणाले, साहेबराव देशमुखांना भेटायचंय. त्यांना नेमका पत्ता कळविण्यात आलेला होता. बदललेल्या गोष्टींची जरूर ती माहिती

आधीच कळविण्यात आलेली होती. त्यामुळं पोहोचण्यात काहीच अडचण आली नाही. तरीही गढीच्या दरवाजाशी उभे असताना ते जरासे दबकले. ती गढी, तिचा कोट, बुरूज, बुलंद दरवाजा. दाराशी उभा रखवालदार. दहा-बारा वर्षांत पोरगा कुठल्या कुठं पोहोचलाय, याचा त्यांना आनंद वाटला. मुसलमानाच्या बाईसोबत पळून आलाय. येऊ दे. या सगळ्या वैभवाचे दरवाजे तिनंच त्याच्यासाठी उघडले आहेत. आपल्या लेकीला सख्ख्या बहिणीसारखी सांभाळतेय. कोणत्या जन्माच्या गाठी असतील कोण जाणे. ही मुसलमानीन खरीच मोठ्या काळजाची. तिनीच आपल्याला सांगावा दिला. लेकीला भेटायला या, असं सांगितलं. या जन्मात पुन्हा लेकीची भेट होणार नाही, असं आपण समजून चाललो होतो. पण आता ती होणार. आपल्या लेकीला आपण साक्षात पाहणार,या विचारानं त्यांच्या हृदयाची धडधड वाढली.

'कोन आलेत म्हनून सांगायचं?' देवडीवरल्या माणसानं आदबीनं

विचारलं.

'वांबोरीचे एडके-पाटील आलेत म्हणून सांगा.' 'कोन गावचे?' 'वांबोरी.' 'बरं, बरं. बसा पाटीलबुवा. मी वर्दी देऊनसनी येतो.'

पाटील बसले. प्रवासानं शिणलेले होते. वयानं ही थकलेले होते. मजल-दरमजल करीत आले होते. जवळजवळ चाळीस कोसांचं अंतर पायी पार करून आले होते. देवळं, धर्मशाळा असा जमेल तिथं मुक्काम. मिळेल तो कोरडा शिधा घ्यायचा अन स्वतःच शिजवायचा. पडशीत चणे-कुरमुरे असत. प्रसंगी त्याच्यावर वेळ मारून न्यायची. हातपायधड आहेत. चालण्याचा शीण होतो. पण विश्रांतीने तो हलकाही होतो. आठ दिवसां आधी निरोप मिळाला. ते इतकं अनपेक्षित होत की कळताच

मनाला धक्काच बसला होता. गीता आपल्या मुलाखातूनच निघून गेलीय असा त्यांचा समज झालेला होता. त्यांना माफक योग्य आणि खरी माहिती देण्यात आली आणि यायचं की नाही याचा निर्णय त्यांनीच करावा असं त्यांना सांगण्यात आलं होतं. त्यासाठी त्यांना फारसा विचार करावा लागला नाही. जे जसं असेल ते तसं असो, मला माझ्या लेकीला भेटायचंय. सायबूला भेटायचंय. मला दुनियेची पर्वा नाहीय. अन दुनियेचा विचार कशाला करा? ती तर गीताला विसरलीय आणि सायबूला सुद्धा. त्यांनी निर्णय घेतला होता आणि ते पोहोचले होते.

'चला बाबा. आत या. दारवठेकर म्हणाला.'

चौक पार करून झाल्यावर पायऱ्या लागल्या तेव्हा दारवठेकर म्हणाला, डाव्या अंगाला इठुबा-रखमिनीचं देऊळ हाये. तिथं देवांच्या पाया पडा. तसा रिवाज हाये.

पाटील आत गेले. घंटा वाजवून दर्शन घेतलं. तिथं त्यांना पाटीलबाबा दिसले. शिवरामबुवा बहिरट-पाटील. त्यांनी खाली वाकून त्यांनाही नमस्कार केला.

'बसा, बसा. कोन गावचे पाव्हने मनायचे? इथुल्ले त नायी दिसत.' "मी वांबोरीहून आलोय. गीताचा बाप.' 'म्हंजी बामण. आन मपल्या पाया पडले. आराराऽऽ रा, ही उलटी बात झाली. आवो आमी तुमच्या पाया पडायचं का तुमी आमच्या?'

'काही नाही तसं. तुम्ही वडीलधारे आहात. पांडुरंगाचे भक्त

आहात. देवाच्या दारी जातपात कशाला पाहिजे?'

'आसं नायी. वाडवडलांनी घालून धिल्याली रीत हाये ती. बाऽऽरं आसु द्या. ए पो हावोऽऽ आरं कोन हाये रे तिकडं? त्या पोरीला इथंच यायला सांगा. म्हनावा, तुपलं वडील आल्यात. लई चांगलं झालं, तुमी आले. सायबराऊनी मला समदं सांगातल्यालं हाये.'

गीता सर्वांगी उत्सुक दाराशीच उभी होती. ती धावतच देवळात आली. वडिलांना साक्षात पाहताना तिचं देहभान हरपणं स्वाभाविक होतं. अंतरीची उचंबळ आतल्या आत मुश्किलीने थोपवत ती त्यांच्यासमोर उभी राहिली. अन् सगळ्या प्रयत्नांना न जुमानता तिची उचंबळ तिच्या डोळ्यांमधून वाहू लागली. त्यामुळं एडके-पाटलांचेही डोळे भरून आले. तुझ्या वडिलांना कळविण्यात आलेलं आहे असं आरेनानं तिला सांगितलेलं होतं. पण ते असे लगेच येतील असं तिला वाटत नव्हतं. त्यांनी आपल्याला त्यांच्या मनातून पुसून टाकलेलं असेल असंच तिला वाटत होतं.

'बाबा, हे पाटीलबाबा. यांच्या मायेचं छत्र आमच्या सगळ्यांच्या

मस्तकावर आहे.', ती डोळे पुसत वडिलांना म्हणाली.

'म्हंजी नाग बसलाय का फना धरून तुमच्या डोक्यांवर?' पाटीलबाबा हसत हसत म्हणाले.

'तुम्ही तसं करायला या सगळ्यांना विष्णूचा अवतार घ्यावा लागेल. शेषशायी विष्णू', एडके-पाटील म्हणाले आणि हसले. तेवढ्यात साक्षात साहेबरावच तिथं आला.

'घ्याऽऽ सायबराऊ देसमुक खुद आले तुमाला घेयाला.', पाटीलबाबा म्हणाले.

'चला, काका आत चला.'

पाटलांना वाटलं, केवढा भारदस्त बाप्या झालाय सायबू. शोभतो

खरा देशमुख. त्याच्या नम्रतेतही एक दरारा आहे.

'चल, चल. पाटीलबाबा तुम्हीही चला.'

'नायबा. आमची जागा हीच. सायबराऊनी आमच्यासाटी खास करून बांधलीय. तुमी जावा. आमाला भेटाया पुन्ना येवा. इकत्या वरसांनी लेकीला भेटात्या. जावा, जावा.' लेकीच्या भेटीला आलेले पाटीलकाका चांगले दोन महिने खराडीला राहिले. तीर्थयात्रेला चाललोय असं घरी सांगितलेलं होतं. त्यामुळं ते घेतील तितका वेळ त्यांच्या हाताशी होता. आरेना पहिल्यांदा त्यांच्यासमोर आली तेव्हा ते स्वाभाविकपणे उठून उभे राहून हात जोडत झुकू लागले तेव्हा हात पुढे करत आरेनाने त्यांना अडवलं. म्हणाली, 'आता मी तुमची लेक आहे. मी थोरली आणि गीता धाकटी. लेकीला कोणी झुकून नमस्कार करतात का? तो तर मी तुम्हाला करायचा,' असं म्हणून ती त्यांच्यासमोर वाकली आणि त्यांच्या पायांना हात लावत तिने त्यांना दंडवत घातला. ती संपूर्ण महाटी वेषात होती. महाटमोळ्या पद्धतीने नेसलेलं नऊवारी लुगडं, चोळी, कपाळावर कुंकू, दोन्ही मनगटात बांगड्या, गळ्यात काळी पोत, नाकात नथ, कानात कुड्या. डोईवरून दिमाखदार पदर घेतलेला. अस्खलित मराठीत बोलत होती. कोण तिला अफगाण अन मुसलमान म्हणेल? आपल्या प्रिय पुरुषासाठी तिने स्वतःला अंतर्बाह्य बदलून टाकलेलं होतं. डोईवरून घेतलेल्या पदराखेरीज कोणताही पडदा नव्हता. पाटीलबाबांच्या नंतर या पाटीलकाकांसाठी तिने असा अपवाद केला होता. तिच्या असाधारण सौंदर्याची प्रभा चंद्राच्या कोमल प्रकाशाप्रमाणे तिच्या भोवताली सारखी उजळत दरवळत होती.

पाटीलकाकांना वाटलं, सायबू हिच्यासाठी वेडा झाला यात काहीच नवल नाही. ही देखणी तर आहेच. पण हे देखणेपण तिच्या केवळ बाह्यरूपात नाहीय. तिच्या मनाच्या गाभ्याशी जे श्रेष्ठ आणि सुंदर असं काही आहे, त्यामुळं तिचं बाह्यरूप अधिक शीतल, कोमल उजळलं आहे. त्यांना वाटलं, सायबू, आरेना आणि गीता यांनी हा जो जगावेगळा संसार, एक जगावेगळं कुटुंब उभारलंय, ते आता आपल्याला बिलकूलही तसं वाटत नाहीय. जगाच्या नजरेत ते तसं आहे आणि असणार हे आपल्यालाही कळतं. पण आपल्यापुरतं ते स्वाभाविक आणि सुंदर आहे. या दुनियेतून नाहीशी होण्याच्या कड्यावर असलेली आपली लेक इथं सुखात आहे. आपल्या दुनियेत तिला आता जागा नाहीय. अन आरेना सायबू यांनाही ती नाहीय. पण त्यांनी उभारलेल्या त्यांच्या दुनियेत ते आनंदात आहेत. गीता आणि आरेना यांनी कितीतरी गोष्टी त्यांना सांगितल्या. इकडं येणं, राहाणं- इथं आपली जागा तयार करणं, गीताचं लग्न करण्याचे प्रयत्न ;असं पुष्कळ. त्यांनी गुरबतच्या येण्याची गोष्टही सांगितली. पुण्याच्या वाड्यातलं तळघर प्रत्यक्ष दाखवलं. तो वाडा त्यांनी विकत घेऊन टाकलाय. साहेबराव एकदा म्हणाला, “एकच गोष्ट माझ्या मनाला डाचतेय. पाटीलबाबांना आरेना अफगाण आहे हे मी सांगू शकलेलो नाहीय. त्या देवमाणसाशी या बाबतीत मी खोटं बोललोय.' त्याची समजूत घालत पाटीलकाका म्हणाले, 'अरे बाबा अशा काही काही गोष्टी नाईलाज म्हणून कराव्याच लागतात. प्रश्न सत्य आणि असत्य यांच्यापेक्षा तुमच्या हेतूंचा असतो. तू कोणत्याही गैर हेतूने तसं केलेलं नाहीय.' साहेबराव म्हणाला, 'मी या प्रांतीच्या सुभेदाराला बामणाची मुलगी घेऊन पळून आलो असं सांगितलेलं आहे. ते गीताला माहीत नाही. गुरबत आला तेव्हा मी तिलाच माझी बायको म्हणून पुढे केलं. म्हणजे त्यांच्या समोर तिला जावं लागलं नाही. पण तसंच तिला वागावं लागलं. ती त्याच्याविषयी कधी काही बोलली नाही. पण तिला काय वाटलं असेल असं कधीकधी मनात येतं.' पाटीलकाका म्हणाले, 'पुन्हा तेच. तू कोणत्याही गैरहेतूने ते केलेलं नाहीय. गीता समजदार आहे. तुम्ही दोघांनी तिचा सांभाळ केलाय.' मग पाटीलकाकांनी त्याला वांबोरीत बराच काळ पिकलेल्या वदंतांच्या गोष्टी

सांगितल्या.

हे असं असतंच. उदाहरणार्थ, आरेन हा आरेना आणि साहेबराव यांचा मुलगा नाहीय. तो तिला तिच्या आधीच्या नव-यापासून झालेला आहे, ही गोष्ट आरेना आणि साहेबराव यांच्या खेरीज फक्त गीतालाच माहीत आहे. पण म्हणून ती तिने पाटीलकाकांना कुठं सांगितली? लपवाव्या लागतात कैक गोष्टी. अगदी आपल्या निकटच्या माणसांपासून सुद्धा.

महिना-दीडमहिना राहून समाधानी मनानं पाटीलकाका परतले. जाताना म्हणाले, 'सायबू, तुझ्या आईवडिलांनी तुझं हे वैभव एकदा पाहिलं पाहिजे रे. समाधानाने डोळे निवतील त्यांचे. मी त्यांना जेजुरीला घेऊन येतो अन तसंच इकडं आणतो. राहतील महिना-पंधरा दिवस. तुलाही चांगलं वाटेल. साहेबराव म्हणाला, मी विचार केलाय त्याच्यावर. ते जमण्यासारखं नाहीय. फार गुंते होतील. त्यापेक्षा मीच कधीतरी तिकडं येऊन तुमच्यासोबत त्यांना भेटेन. आमचं हे जगणं तुमच्यापल्याड कोणाला पचण्यासारखं नाहीय. तुम्ही आले, भेटले, त्यात सगळे भेटल्यासारखेच आहेत.' त्यावर आपल्याला संधी मिळाली हीच पांडुरंगाची कृपा, असं स्वतःला सांगत पाटीलकाका परतले. कधीना कधी

त्यांना परत जावं लागणारच होतं. एरवीही कोणी कोणाच्या आयुष्याला थोडंच पुरत असतं? वियोगाचं वाळवंट सोसावंच लागतं, सहवासाच्या आठवणींच्या मरुवनाच्या बळावर.

5

दहा-साडेदहा वर्षे लोटली गुरबतला नाचक्की होऊन परत आल्याची. आपल्या रंडक्या भाबीविषयीची त्याची हवस काळाच्या ओघात ओसरली. म्हणजे आधी सुद्धा त्याला ती जी काही होती तिच्यात हक्काचा भाग अधिक होता. उरलेला अर्थातच तिच्या सौंदर्याचा होता. आपल्या हक्काची स्त्री कोणी पळवून नेणं किंवा आपल्याला डावलून तिनं आणखी कोणासोबत पळून जाणं त्याला अपमानास्पद वाटलं होतं. पुण्याहून परतल्यावर त्या भानगडीतल्या अनेक गुंत्यांचा विचार करत हळूहळू त्याचं मन त्यातून मोकळं झालं. इतक्या किरकोळ गोष्टीसाठी आपण थेट तिकडं गेलो, हाच मुळी मूर्खपणा होता, असं त्याला वाटू लागलं. बाया तर कैक असतात. अन त्या इथूनतिथून सारख्याच असतात. अन त्यांच्यापेक्षा कोवळी पोरं सुखाच्या शय्येसाठी नेहमीच उत्तम; असा त्याचा अनुभव होता. त्यांची कमतरता कधीच नव्हती त्याला.

तिशी उलटलेल्या त्या रंडीत नाहीतरी आकर्षक असं आता काय उरलेलं असणार? ती बाई त्यानं आपल्या मनातून काढूनच टाकली कायमची. अन बाई हा विषयच मुळात त्याच्यासाठी आता संपला होता. अतोनात दारुबाजी आणि कोवळ्या पोरांशी केलेली शय्या यांच्यामुळं त्याला अनेक रोग जडले होते. काळजाची चाळण झालेली होती. त्वचा पिवळी आणि निस्तेज होत चालली होती. भूक कमी झाली होती. नाकाच्या एका बाजूला सतत पू वाहत असे. अनेक वैद्य आणि हकीम झाले. त्यांनी सांगितलेली पथ्ये हा पठ्ठ्या लहर लागली तितके दिवस पाळायचा अन मनास आलं की कोलायचा. परिणामी अधूनमधून त्याला विचित्र झटके येत असत. उन्मादी अवस्था होई. तो अनावर होत असे. एकदा त्या अवस्थेत त्यानं एकाच वेळी पन्नास कोंबड्या माना पिरगाळून मारून टाकल्या होत्या. एकदा एका नोकराला हंटरनं फोडून काढलं होतं. अखेर तोच दमला म्हणून नोकराचा मार थांबला. कधीकधी अचानक तो रडू लागे आणि सारखा रडतच बसे. त्याच्या एकूण जगण्याची पार रया गेली होती. अर्थात हे असे नेहमीच असे, असे मात्र नाही. भानावर असला की तो आपल्या आयुष्याचा पुष्कळ विचार करत असे. राजकारणाचा विचार करत असे. शय्येचा विचार करत असे. आपल्याजागी बळकट राहून टिकण्याची चलाखी त्याच्यापाशी निश्चितच होती. शय्येच्या गोष्टी प्रत्यक्षात आणणे मात्र दिवसेंदिवस मुश्कील होत चालले होते. हकीमांकडून दवा घेऊन कधीतरी कसेबसे ते जमे. त्याचा एक मुलगा आता बरोबरीला आलेला होता. त्याच्या मदतीने जागीरदारीचा

कारोबार तो जमवून घेई.

एके दिवशी तो असाच दौलतखानासोबत मद्य घेत बसला होता. तेव्हा दौलतखानाने त्याला जे सांगितलं, त्यातून त्याच्या लक्षात आलं की साहेबराव यानंच आपल्या बड्या भाईजानांना मारलंय. त्याच्याकडूनच ते मारले गेलेत. अन तोच साला त्यांची बिबी घेऊन आदिलशाहीत गेला होता. त्यांच्या बीबीला घेऊन त्याचं आदिलशाहीत जाणं दौलतखानाला माहीत नव्हतं. पण गुरबतला तर होतंच ना! तो प्रत्यक्ष बघून आलेला होता. म्हणजे तिला पाहिलं नसेल, पण ती तिथंच होती याची खात्री होती त्याला. त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. खानाशी त्याविषयी तो काहीही बोलला नाही. पण नंतर त्याला ते विसरता येईना. ठीक की बड्या भाईजानांशी त्याचे संबंध तितके चांगले नव्हते. त्यांचं त्याच्याविषयी चांगलं मत नव्हतं. पण त्यांचा खातमा करून त्यांची बिबी घेऊन हा एक काफीर अल्लाद निसटला होता. अन आपण त्यात काहीच करू शकलो नाही, हे त्याच्या मनात डाचत राहिलं. त्यानं अधिक माहिती घेतली. साहेबराव आता एक मोठा वतनदार झाला आहे आणि इम्रानखानाच्या खास विश्वासातला आता तो मानला जातो, अशी माहिती त्याला मिळाली. सरळच की आता तर तो त्याची खुदची फौज बाळगून असणार. त्याच्याशी लढण्याइतकी आता आपली औकात नाहीय. अंगी तितकं बळही उरलेलं नाहीय. त्यानं थंड मनानं विचार केला. आपण आता बदला घेऊ शकत नाही. त्या रंडीची आपल्याला अजिबातही चाहत उरलेली नाहीय. पण त्यानं आपला अपमान केला आहे. एक पठाण म्हणून आपण इम्रानखान याला सगळं यथोचित कळवणारा लखोटा पाठवला तर? एका पठाणाला मारून एक काफीर त्याची बिबी पळवतो अन पाकसुरत राहतो याची कळ इम्रानखानाच्या दिलाला लागेलच. बडे भाईजान त्याचे जिगरी दोस्त होते. त्याला ही बात जखम नक्कीच करेल. गुरबत जितका विचार करी तितकी त्याला हीच खेळी योग्य वाटू लागली. किंबहुना हेच करणं आपल्याला शक्य आहे, हेच आपल्या हाती आहे, असं त्याच्या लक्षात आलं. अगदी सुरुवातीपासून अखेरपर्यंत सगळी कहाणी हृदयद्रावक भाषेत मांडून एक पठाण दुसऱ्या पठाणासाठी हा बदला खासच घेईल, अन बडे भाईजान तर आपले जिगरी यार होते. यानं त्यांना मारून टाकलं अन हा काफीर त्यांची बिबी घेऊन पळालेला आहे. हा आपला सगळ्यांचाच अपमान आहे, हे लक्षात घ्या आणि योग्य ते करा, असं आवाहन त्यानं पत्रात केलं.

पत्र वाचून साहजिकच इम्रानखानाचं रक्त गरम झालं. त्याची कानशिलं तापली. एवढी वर्षे लोटली तरी गुरबत हे विसरलेला नाहीय. आपण त्याच्या घरी गेलो तेव्हा ती लौंडी तिथं सापडली नाही, तरीही ती त्याच्याकडंच आहे असं हा तळतळून सांगतोय. म्हणजे त्यात तथ्य नक्कीच असलं पाहिजे. साला साहबराय आपल्याशी झूट बोलला. बम्मनची लौंडी सामने केली अन ही लपवली. एका पठाणाला -त्यातही आपल्या दोस्ताला- मारून हा काफीर त्याची बिबी घेऊन पसार होतो अन पाकसुरत जिंदगी गुजारतो अन तीही आपल्या सुब्यात? आपल्या नाकावर टिच्चून? त्याने तातडीने साहेबरावला बोलावणं पाठवलं.

साहेबराव आल्यावर कसलीही प्रस्तावना न करता त्याने त्याला गुरबतचं पत्र मिळाल्याचं सांगितलं. मजकूर सांगितला. ते सांगताना खानाचा आवाज थरथरत होता.

तो अर्थातच संतापाने.

'आता मला सांग. याच्यात सच किती अन झूट किती?' खानाने तशाच स्वरात विचारल.

साहेबराव गप्प राहिला. 'मी सवाल केला आहे. चूप होऊन चालणार नाही.'

'त्याने लिहिलंय ते सारं सच आहे- फक्त एका गोष्टी खेरीज.' साहेबराव म्हणाला.

'कौनसी?' 'मी तिला पळवून आणलेलं नाहीय. तिनं मला पळवून आणलंय.' 'ऐसा कैसा होऊ शकतो? ती लौंडी तुला घेऊन आली? का?' 'तिला त्याच्याशी निकाह करायचा नव्हता.' 'का? कशावरून?' 'मी सांगतो सगळं.' साहेबरावने सांगितलं. शांतपणे. अथ पासून इतिपर्यंत. संपूर्ण सच.

'खानसाहेबांशी मी लढलो. त्यात ते किंवा मी असे एक जणच उरणार होतो. अन त्यात तेच जिंकण्याची शक्यता जास्त होती. मी थकलो होतो. पण तेवढ्यात माझे जोडीदार मदतीला आले. खानसाहेब खंदे लढवय्ये होते. नशीब त्यांच्या बाजूला नव्हतं. तोवर किंवा त्याच्या पुष्कळ नंतर मी त्यांच्या बीबीला पाहिलेलं देखील नव्हतं. नंतरचं मी हजुरांना सांगितलंच आहे. तिनं मला पळवून आणलेलं आहे. अर्थात मला तिच्याविषयी मोह वाटला, ही बात मी नाकारत नाही. मी माझ्या इच्छेनं तिच्यासोबत पळून आलो, ही बात मला नाकबूल नाही. आपण द्याल ती शिक्षा मला कबूल आहे.'

"मला आधी झूट का बोललास? बम्मनची छोकरी घेऊन पळून आलास असं का बोललास?'

'खरी बातमी कोणत्या तोंडानं बोलू शकत होतो? आपण मला समोर उभं तरी केलं असतं का?'

'अरे पन याच्यात मी आता काय करायचं? तू खुशाल कुबूल आहेस सगळ्याला.', इम्रानचा स्वर काहीसा हताश.

'ते हुजुरांनी ठरवावं. माझ्या शब्दांची खात्री करून घ्यावी. खुद येऊन तिच्याशी बोलावं. किंवा हुजूर खुद आपल्या बिबीजानसोबत माझ्या गरीबखान्यात चला आणि खात्री करून घ्या. माझ्या औरतशी बात करा. पाहिजे तर मी खुद इथं आपल्या नजरेसमोरून उठत नाही. आपल्यासोबत येतो. किंवा मला इथेच ठेऊन आपण माझ्या घरी जा. बोला. विचारा. खात्री करून घ्या अन फैसला करा. मी शब्दानेही खोटं बोललेलो नाहीय. माझी औरत आता पुरती म-हाटन झालेली आहे. ती खुदच्या मर्जीनं झालीय की सक्तीनं, याची खातरजमा करून घ्या.'

साहेबरावनं सगळी कबुली देऊन इम्रानखानाची पंचाईत करून टाकली होती. हे आता कसं हाताळायचं हे त्याला कळेना. ती लौंडी पठाण आहे. पण ती खुषीनं या काफरासोबत पळून आलेली आहे. किंवा हा म्हणतो तसा यालाच तिनं पळवून आणलेलं आहे. याच्यात आपण काय फैसला करायचा? अन हा साधा माणूस नाही. आपल्या कामाचा आहे. याला राखायचा आहे. तेव्हा हा आपल्याशी झूट बोलला हेही तो सांगतोय. आणि खरंच आहे की, एका पठाण औरतला घेऊन पळून आलोय असं तो म्हणाला असता, तर याचं काहीही न ऐकता आपण तेव्हा याच्या मुसक्याच आवळल्या असत्या. आता काय करायचं? हा म्हणतो तसं आपल्या बीबीला घेऊन याच्या घरी जायचं? पण मग ते बीबीला माहीत होणार.

तिच्यावर भरोसा कसा ठेवायचा? ती बोलू शकते ना कुठं ना कुठं. आपल्याला एकट्यालाच ही खातरजमा करून घेतली पाहिजे. म्हणजे ती पठाण आहे असं यानं कुबूल केलेलं आहेच. फक्त तिला गुरबत खरंच नको होता अन ती खुषीनं याच्यासोबत राहतेय याची खातरजमा करायची. हे आपल्यालाच करावं लागेल. अन ते करणं जरुरीचं मात्र आहेच. अन तसं असेल तर याला वाचवावं लागेल. हा कामाचा माणूस आहे.ते कसं करणार?

इम्रानच्या मनात हळूहळू राजकारण भावनेवर आरूढ होऊ लागलं होतं.

'साहबराय, आता तू तुझ्या घरी जा. मी कल येतो. मेहमाननवाजीचा

बंदोबस्त कर.'

'नाही. मी इथंच थांबतो. मी आधी गेलो तर मी तिला पढवून ठेवलंय

असं हुजुरांना वाटेल. मी आपल्यासोबत येतो.'

'अरे असं नाही. लोग अलग तरीक्याने बघतील. मी तुला बंदी करून ठेवलंय म्हणतील.'

'लोकांशी मला मतलब नाही. हुजुरांना काय वाटतं हे मला अधिक महत्त्वाचं.'

'असं म्हणतोस? ठीक. जशी तुझी मर्जी. आज मी तुझी मेहमाननवाजी करतो. उद्या तू माझी.'

दुसऱ्या दिवशी हुजूर दस्तुरखुद्द आले. देवळात जाऊन पाटीलबाबांना भेटले. मग आत जाऊन मेहमाननवाजी. चिकाच्या पडद्याआडून आरेना त्यांच्याशी बोलली. अस्खलित पुश्तू भाषेत बोलली. आरेन आसपास होता. आपली आई आपल्याला न कळणाऱ्या या वेगळ्याच भाषेत या माणसाशी बोलत असल्याचं त्याच्या लक्षात आलं. त्यानं गीताला विचारलं देखील. ती म्हणाली, "तुझ्या आईला अनेक भाषा बोलता येतात. त्यातली ही एक असेल. ते एकमेकांशी काय बोलताहेत, हे इतरांना कळू नये म्हणून कदाचित ते त्या भाषेत बोलत असतील. जाऊ दे. आपल्याला काय फरक पडतो?'

इम्रानखान नंतर साहेबरावला म्हणाला, "ही बात आपल्या दोघांमधीच राखायची. तुपली बिबी महाटाच आहे, ऐसाच आपण सांगणार. आता ही बात पुन्हा म्हणून निघणार नाही.' त्यानं गुरबतखानाला कळवलं: 'तुझ्या पत्रानुसार मी खुद जावून सगळी खातरजमा करून घेतली. कारण माझं डोकं सुद्धा खवळलं होतं. पण, त्याची बिबी म-हाटा कुळीचीच आहे. तुझे बडे भाईजान मरहूम बहरामखानसाहब यांची बिबी इथे नाही. ती आपल्या मुल्कला गेली असेल. तिकडे माहिती घेण्यासाठी काय व्यवस्था

करता येते का बघ.'

इम्रानखान याने हे असं लिहिलं, ते सत्यापासून फारसं दूर नव्हतं. कारण आणखी वर्षभराने समजा गुरबतने चौकशी केली असती तर त्याला आरेना अफगानिस्तानात त्यांच्या पूर्वजांच्या गावात राहतेय अशीच माहिती मिळाली असती. फक्त तिच्यासोबत तिचा शौहर आहे असं त्याला सांगण्यात

आलं असतं. तो शौहर साहेबराव आहे असं कोणीही म्हटलं नसतं. कारण त्याला तिकडं नेल्यावर ती त्याचा पेहराव बदलणार होती. त्याला पश्तून शिकवणार होती अन त्याचं नाव सुद्धा बदलणार होती. अन समजा आणखी काही वर्षांनी गुरबतनं चौकशी केली असती तर या जोडप्याला दोनतीन मुलं सुद्धा आहेत असं त्याला सांगण्यात आलं असतं. पण ह्या सगळ्या जर तरच्या आणि नंतरच्या गोष्टी.

इम्रानखान साहेबरावच्या गढीवर येऊन गेल्यानंतर काही दिवसांनी कुजबुजी सुरू झाल्या. देशमुखीणबाईला महाटीखेरीज दुसरी भाषा बोलता येते अशी सुरुवात झाली. आन काय बया नवालच झालं, कोनची म्हनायची वो भास. आवो मुसलमानीसुद्दा नायी म्हनं. ती जराशीका व्हईना समजती आपल्याला. ही आलकच भास हाये म्हनी. कुढं शिकली आसन म्हनावा? त्या पारुबाईनी खुद आईकली. ती तिथंच काम करती ना! आन त्यो हुजूरसायब पन त्याच भासमंदी बोलत व्हता म्हनी. आशी कशी बाई व्हनगाडी भास. मोलकरणींनी लांबून संभाषण ऐकलं असण्याची शक्यता होतीच. त्या कोणाशी बोलल्या असणं नक्कीच शक्य होतं. किंवा कदाचित आरेन सुद्धा सबागती कोणाला म्हणाला असेल. आपल्या आईच्या भाषेच्या ज्ञानाच्या कौतुकापोटी. पण लोकात वेगळी चर्चा सुरू झाली. अन तिला फाटे फुटू लागले. त्या मुसलमान राजाला समाजली म्हंजी मुसलमानीच आसन. जराशिक आलक आसन. पन मंग कोन्हालाच समजत नायी इक्ती आलक? आन देसमुकीन ती कुढं सिकली? लय फडफडा बोलत व्हती म्हनी. का खुद मुसलमानीनच हाये देसमुकीन? आपल्या देसची म-हाटी भास तिला येत आसन. ती समद्यांनाच येती.... असं होता होता देशमुखांनी मुळातच मुसलमानीन बायकू करून आनली, अशा निष्कर्षांपर्यंत काही लोक आले. आता, ह्या बड्या लोकांचं काय, ते काहीही करून कसंही जिरवू शकतात, असा निष्कर्ष दबत्या आवाजात निघू लागला. आणि तो इतर अनेक दिशांनी वाहू लागला. साहेबराव- आणि त्याच अर्थाने इम्रानखान, जे लपवू बघत होते ते वेगळ्याच रस्त्यानं लोकात वाहू लागलं. अशा गोष्टी होतातच. पण त्या मिटतात सुद्धा. किती दिवस लोकांना पुरणार ते? इतर अनेक नवनवीन लक्षवेधक बातम्या येतच असतात. हिलाच किती काळ धरून बसणार लोक? पण हे या ना त्या प्रकारे साहेबरावपर्यंत पोहोचायचंच होतं. अन ते कुठून तरी, कसंतरी त्याच्यापर्यंत पोहोचलं होतं. त्यात त्याला काहीच करता येत नव्हतं. तुम्ही किती लोकांची तोंडं धरणार आणि कशी?

यातच पाटीलबाबांनी आरेनच्या सोयरिकीचं जास्ती मनावर घेतलं होतं. त्यांच्या नातीचा प्रस्ताव त्यांनी त्याच्यासाठी पुढे केला होता. त्यांची नात म्हणजे पाषाणच्या रुस्तमराव शितोळे- देशमुख यांची मुलगी मर्दिनीबाई. म्हणाले, 'जोडा चांगला आहे. ते देशमुख लोकच आहेत. मुलगी आपण पाहिलेली आहे. ते लोक संपत्ती आणि सामर्थ्याने तुमच्या पासंगालाही पुरणारे नाहीत. फक्त कुळी जोडीला जोड आहे. तुमचा होकार असेल तर तुमच्यावतीने मी त्यांच्याशी विषय काढतो.' याच्यावर काय म्हणायचं ते साहेबरावला कळेना. नाही म्हणायचं काहीच कारण नव्हतं. पण लोकांमधली चर्चा त्यांच्यापर्यंत पोहोचली आणि त्यांनी आपल्याला विचारलं तर काय करायचं हा मोठाच प्रश्न त्याच्यासमोर होता. त्या देवमाणसाशी आजवर आपण खोटं बोललोय. अन आता लोकांकडून हे त्यांच्यापर्यंत गेलं तर, त्यांना काय वाटेल? माझ्या नातीशी सोयरीक करताना निदान तू स्वतः होऊन मला सांगायला पाहिजे होतं, असं उद्या ते म्हणाले तर? त्यांना जो धक्का बसेल त्याचं काय? आपल्याला सोडून निघून जातील ते. लग्न लावलेल्या नातीलाही घेऊन जातील. त्या पोरीची जिंदगी बर्बाद होईल. तिच्याशी कोण लग्न करेल? देशमुखात पोरीचं दुसरं लग्न लागत नाही. आपली फार नाचक्की होईल. तिलाही समजा तोंड देता येईल. पण ह्या माणसाच्या काळजाला दुःख पोहोचविण्याचं शल्य कायम डाचत

राहील. मुख्य म्हणजे ते आपल्या आयुष्यातून कायमचे निघून जातील.

अखेर एक दिवस मनाचा हिय्या करून तो देवळात शिरला. देवाला नमस्कार करून नंतर त्यांचेही पाय धरून तो त्यांच्या शेजारी बसला.

'काय सायबराऊ देसमुक, लय चिंतागती दिसता?' 'नाही, असं नाही काही.'

'आवो, तुमचा बाप नसलो तरी बापाच्या ठिकानी हायेच ना मी. ह्ये

पन मला वळखता येत नसन त काय राहिलं ; म्हनतो मी?'

'नाही, तुम्ही ते सोयरिकीचं म्हणत होते आरेनरावच्या.'

'हां, काढायचं ना बोलनं त्या लोकांकडं? तुमी जराशिक गुळणी धरून बसल्यावानी दिसता मला. त्याच्यानी मी त्यो इषय नायी घेतला. काय तुमच्या डोक्यात दुसरा कोनचा ठिकाना हाये का?'

'तसं काहीच नाही.' 'मंग?' साहेबराव गप्प बसला. 'बोला ना. मपल्यापसून लपवन्यासारकं हायेका कायी?'

'लोकांमध्ये चाललंय, ते माझ्या कानावर आलंय. तुमच्या नाही

आलं?'

'कशाचं म्हनता?' 'आलं आसंल तुमच्या कानावर.' 'चला, समजा आलं.'

'आलं? आलं आसन तर ती गोष्ट फार काय खोटी नाही. आपण ते कबूल करणार नसलो तरी. पण मी तुम्हाला ती सांगितलेली नाही, असं व्हायला नको. मी ते तुमच्यापासून लपवलं हे माझ्या मनाला फार ताप देतं. एकमेकांच्या इष्कात पडून आम्ही इकडं आलो. तिची जात सगळ्यांपासून लपवली. गुरबत तिचा दीर. तिला नेण्यासाठीच आला होता. त्याचा तिच्यावर डोळा होता. तिला तो नको होता आणि मी हवा होतो. आता सांगून टाकलं आणि मोकळ झालो मी. हलका झाला माझा भार. पण त्याच्यामुळंच अशात कशी काय सोयरिक होईल, असं म्हणतो मी?'

'आज्याबात बोलू नको सायबराऊ. लोकं आत्ता बोलातेत. मला ती पहिल्यापसून मायती ह्ये. मी पुन्यात पहिल्यांदा तुपल्या घरी आल्तो तव्हाच मला समाजलं व्हतं.', पाटीलबाबा हसले.

'अरे बापरे!' 'पक, झाली का नायी तुला बापाची आठवन!' 'आणि तरीही तुम्ही ह्या सोयरिकीचा विचार करता?'

'त्याच्यासाटीच करतो. आरे, तू एव्हढी दुन्या जितली. ती पोर लाखात एक देखनी हाये. तुपल्यासाटी समदी म-हाट झाली. देव मानसासाटी हाये का मानूस देवासाटी? देवच आस्तोयना आपल्यासाटी? बाकी शबुद सुदिक बोलू नको. तुलाही बात चालन का सांग. देवाच्या संबुर जात धरम कायच नसतोय. हे समदे मानसांचे खेळ आस्तेत. आपुन काय शिक्का घेऊन येतो का जात आन धरमाचा? पांडुरंगाची भक्ती करता करता जिंदगी आटपत आली मपल्यावाली. यावढं तरी कमसी कम सिकावलं आसन का नायी त्यानी? समद्या गोस्टी बोलल्या पायजेत आसं नसतंय. येव्हार त्याच्या त्याच्या ठिकानी आसतोच. पन तारतम धरावा लागतो. कायी झाकून ठुण्यात हित आसन, त ते करायचं. त्याच्यात काय पाप नायी. देवादिकांला सुद्दा ह्या गोष्टी चुकलेल्या नायीत. आपुन त मानसं हावोत. बाकी सोड. तुला चालतंय का ते सांग फकस्ती.'

'का नाही चालणार? तुमचा अपमान होऊ नये इतकंच वाटतं.' 'छ्याऽऽ छ्याऽऽ सोड बात तू.'

पाटीलबाबा म्हणाले, 'मी ही बाब कशी हाताळतो ते बघतच राहा तू. एकदा ही सोयरिक झाली की आपण सगळ्या दोषांमधून मोकळे होऊ. तुही मोकळा आणि मीही मोकळा. लोकांच्या जुबानी बंद होतील. माझ्या नातीला असा देवासारखा देखणा नवरा मिळून जाईल.'

पाटीलबाबा पाषाणला जावयाकडं गेले. प्रस्ताव मांडला. जावई फटक्यास म्हणाला, 'नको.' का तर म्हणे, 'तसं कायच नाही. पण ते फार मोठे लोक पडतात. पाटीलबाबा म्हणाले, साहेबराव मला माझ्या मुलासारखा आहे. मुलापेक्षा सुद्धा अधिक आहे. माझा शब्द तो डावलणार नाही. तो विषय सोडून बोला.' जावई हळूच म्हणाले, 'लोकांमध्ये वदंता आहे की साहेबराव देशमुखाची बायको मुसलमान आहे. ते लोक मोठे असले तरी असं असेल तर कसं चालेल?' पाटीलबाबा म्हणाले, 'मी पण ते ऐकलंय. लोक तोंडाला येईल ते बोलतात. ती बाई चांगल्या देशमुख घराण्यातली आहे. मी चौकशी करून आलोय. घराण्यात खोट असली तर माझी स्वतःची नात मी कशी देईन तिथं, याचा तरी विचार करा. हे सगळं सुरू जे झालं ते ती पोर म्हणजे साहेबरावची बाईल सुभेदाराशी पठाण लोकांच्या भाषेत बोलली तिथून. मला माहीत आहे. मी तिथंच तर असतो ना. मीही माहिती घेतलीय. मी थेट तिला विचारलं. त्याच्या उप्पर मी निजामशाहीत तेवढ्यासाठी जाऊन आलोय. ती मोठ्या घरची पोर आहे. शहाण्णव कुळी आहे. शेजारी एका पठाण सरदाराचा वाडा होता. तिथं मैत्रिणी होत्या, घरोबा-येणंजाणं होतं. त्याच्यात ती त्या लोकांची भाषा शिकली. पठाण आला म्हणून त्याच्याशी त्याच्या भाषेत बोलली. बाकी कायच नाहीय. लोकं आज बोलतील, उद्या गप्प होतील. अन खरी बातमी पण लोकांना सांगत आलोय ना. खोटं बोलायचं आपल्याला काय कारण? माझ्यावर भरोसा आहे लोकांचा. देवळात येतच असतात ते. इतका चांगला ठिकाणा आपल्याला शोधूनही मिळणार नाही. पोरगा बघा तुम्ही. कसला हिरदार आहे! माझ्या अंगाखांद्यावर वाढलेला आहे. कल्याण होऊन जाईल मर्दिनीचं. राजाची राणी होऊन राज्य करील ती. तिला नको असताना तिचं नखही कोणाला दिसणार नाही....' पाटीलबाबांनी जावयाला पुरतं कह्यात घेतलं आणि राजी केलं. सगळ्या शंका फिटल्यावर रुस्तमराव राजीखुशीनं तयार झाले. उलट त्या लोकांसमोर उभं राहाणं आपल्याला कसं जमेल याची काळजी व्यक्त करू लागले. पाटीलबाबा म्हणाले, 'मी आहे ना. मी दोन्हीकडचा कर्ता आहे. कसलीच काळजी करायची नाही.'

पुढच्या सगळ्या गोष्टी पाटीलबाबांनी ताब्यात घेतल्या. उत्साहाने रसरसलेल्या तरुणासारखे त्यांनी निर्णय घेतले. साहेबराव असो वा रुस्तमराव, कोण त्यांच्यापुढे जाणार? त्या दोघांनाही मुळात त्यांच्या शब्दांच्या आतच राहायचं होतं. लग्नाचं जंगी आयोजन करण्यात आलं. साहेबरावच्या आई आणि वडिलांना बोलावण्यात आलं. त्यांना कसं आणायचं याच्यापासून ते त्यांना काय, किती आणि कसं सांगायचं याची समज, जाणीव आणि जबाबदारी एडके-पाटील उर्फ पाटीलकाकांवर सोपविण्यात आली. ते तिघे कैकआधी बैलगाडीने जेजुरीला जायचे म्हणून निघाले आणि लग्नाच्या आधी काही दिवस

खराडीला पोहोचले. सायबूने एका देशमुखीणीशी लग्न केलेय. त्याला देशमुखी मिळालीय अन त्याच्या पोराच्या लग्नाला आपण जात आहोत असं एडके-पाटील यांनी त्यांना सांगितलं. प्रत्यक्षात ते गाव, साहेबरावची गढी आणि त्याचा सगळा थाट पाहून त्या दोघा मायबापांचे डोळे दिपून गेले. आपल्या लेकाने कमावलेले वैभव पाहून त्यांना परमसंतोष झाला. त्यासाठी तो असा गुपचूप पळून का गेला असेल या प्रकारचे प्रश्न त्या वैभवाच्या दर्शनात वितळून गेले. सायबूने एडके-पाटलाच्या पोरीला बहिणीसारखे सांभाळले आहे, हे प्रत्यक्ष पाहून त्याच्या आनंदाला पारावर उरला नाही. सायबूच्या लेकाला शितोळे-देशमुख यांच्यासारख्या थोर घराण्यातली मुलगी देण्यात आलीय हे पाहून त्यांचा उर अभिमानाने भरून आला. पाटीलबाबा उर्फ शिवरामबुवा बहिरट पाटील यांच्या पांडुरंगमय ओळखीने त्यांचे डोळे पाणावले. रुस्तमराव शितोळे यांचे उर अभिमानाने भरून आले. इतक्या चांगल्या जागी आपली पोर पडली हे केवळ पाटीलबाबांमुळे शक्य झाले आणि यात आपल्याला सांभाळून घेण्यात आलेय तेही त्यांच्याचमुळे ही गंभीर जाणीव त्यांना झाली. ही सोयरिक झाल्याने वेळीअवेळी साहेबरावच्या पत्नीच्या मुसलमान असण्याच्या वदंतांना आपोआप चपराक मिळाली. भल्या माणसांबद्दल लोक काहीच्या बाही बोलतात, पण मोठे ते खरोखर मोठेच असतात असे अनेक मुखांनी लोक बोलू लागले. लग्नानंतर जवळजवळ महिनाभर किंवा अधिक काळ साहेबरावचे आईवडील आणि एडके-पाटील खराडीला राहिले. आईवडील परत गेले तेव्हा त्यांच्या राहणीमानाच्या हिशेबाने त्यांना कैक पिढ्यांना पुरेल इतके द्रव्य देऊन साहेबरावने त्यांना अतोनात संतोष दिला. आपला मुलगा इतका मोठा माणूस झाला हे दिसल्याने ते आधीच दिपून गेलेले होते. त्यात या संतोषाने अर्थपूर्ण भर पडली. लग्नात आंदण म्हणा वा आहेर म्हणून म्हणा; सुबेदार इम्रानखान याने दोन गावांची देशमुखी आरेनराव याच्या नावे स्वतंत्रपणे करून दिली.

लग्नाचे सगळे विधी यथासांग पार पडल्यावर रिवाजानुसार ते जेजुरीला गेले. तिथं जागरण, गोंधळ असं करून आले. पाव्हणे-रावळे, सगेसोयरे, नातेवाईक जे ते आपापल्या गावी गेले आणि नव्या जोडप्याचा संसार सुरू झाला. अशातच एके दिवशी रुस्तमराव शितोळे-देशमुख खराडीला आले. आधी देवळात जाऊन देवाला अन नंतर पाटीलबाबांना नमस्कार करून

त्याच्या शेजारी बसले.

'काय जावई, लेकीला भेटायला आले का न्हेयाला?' पाटीलबाबांनी

विचारलं.

'नायी, नायी. काम दुसरंच व्हतं.' 'काय?'

'पुण्यात एक्या बामनाला आरेनराव आन मर्दिनीच्या पत्रिका दावल्या. तो म्हने पोरीच्या पत्रिकेत काय खोट नायी. पन आरेनरावांच्या पत्रिकेत कालसर्प दोस हाये. पत्रिकेतले समदे ग्रह राहू अनि केतूच्या मुखात हायेत

'बाऽऽरं. मंग?'

'शांती करावा लागती. त्र्यंबकेश्वरला जाऊन कालसर्प शांती, नारायण

नागबळी, त्रिपिढी श्राद्ध आसं करावा लागतंय.'

'कोन करतं?'

'त्यांच्या वळखीचे भटजी हायेत. यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे म्हणून तेथे
आहेत. ते करतील.'
'कोनी कोनी जावा लागातं?' 'जोडीनी जावा लागतंय.'

रुस्तमराव सगळी माहिती घेऊन आले होते. या विधींच्या जोडीने पुत्रकामेष्टी यज्ञ करून घ्यावा आणि नांदी श्राद्धही करून घ्यावे. हे सर्व विधी एकमेकांना पूरक असतात. नारायण नागबळी विधी तीन दिवसांचा असतो. बाकीचे एक किंवा जास्तीत जास्त दोन दिवसात होतात. एकूण पाच दिवस धरा. राहण्याची आणि इतर सर्व व्यवस्था कस्तुरे भटजी करतील. पाटीलबाबांना या गोष्टी माहीत होत्या. इथला ज्योतिषी अन तिथला भटजी यांची सांगड असते. सगळा भीती दाखवून लुबाडण्याचा उद्योग असतो. एक नुसतं पांडुरंगाचं नाव घ्या. या कशाचीच जरुरी नाही. फार वाटलं तर जोडीने पंढरपूरला जा. विठोबारखुमाईचं दर्शन घ्या. त्याच्याही पुढं गोरगरिबांना अन्नदान करा. संपली बात. पण पाटीलबाबा व्यवहारी होते. मनातलं हे ते काहीच बोलले नाहीत. साहेबरावसाठी ही किरकोळ गोष्ट होती. अन होऊन जावूद्या ना. यांच्या आणि त्यांच्या सुद्धा मनातलं किल्मिष निघून जाईल. तो फायदा मोठा.

'करून टाखा. बोला तुमच्या येही बुवांशी.' 'बोलतो. पन तुमी बोलले तर वजन-' 'बाऽऽरं. मी सांगतो. आणखी काय काय माहिती लागन?' 'देवक आणि कुळीचं नाव सांगावा लागातं.' 'बाऽऽरं. होऊन जाईल.'

आरेनराव आणि मर्दिनी यांच्या जोडीला गीता त्र्यंबकेश्वरला घेऊन गेली. त्यांची कस्तुरेशास्त्री यांनी उत्तम बडदास्त ठेवली. दक्षिणा आणि एकूण धनलाभ उत्तम असेल तर त्यात कमतरता कशासाठी ठेवायची? शास्त्रींनी आपल्या चोपडीत फा मोडीत नोंद करून ठेवली. तारीख अमुक अमुक. आरेनराव साहेबराव सातपाटील-देशमुख. पत्नी मर्दिनीबाई. गाव, खराडी. प्रांत, सुपे. कुळी, पठारे. देवक, सुरड.

सहा महिने लोटले. सगळे उत्तम सुरळीत चाललेले होते. नव्याने करावे असे आता काहीही उरलेले नव्हते. पाटीलबाबांचा पांडुरंगाच्या चरणी लळा लागलेला. आरेनराव आणि मर्दिनी यांचा नवा प्रपंच झोकात चाललेला. आईवडिलांच्या भेटीने सुखावलेला साहेबराव. तीच गत गीताची. एके दिवशी आरेना साहेबरावला म्हणाली, 'आपल्याला करायचं असं इथं आता काहीही राहिलेलं नाहीय. एकमेकांच्या प्रेमात पडून आपण आपली दुनिया उभारली. तिचा वेल आता आरेनराव गगनाला पोहोचविल. त्याला आणि मर्दिनीला पाटीलबाबा आणि गीताच्या छत्रछायेखाली सोडून आपण बाहेर पडायला काय हरकत आहे?'

'कुठं जायचं म्हणतेस?' 'जावू की माझ्या मुलखाला.'

'इतक्या लांब? किती काळासाठी?' 'कायमसाठी जाऊ.' 'कायमचं?'

'हां. इतका काळ मी तुझ्या मुलखात राहिले. तुझी होऊन राहिले. आता तू माझ्या मुलखात चल. माझा होऊन राहा. मी तुला माझा करून टाकीन.'

'तो तर मी आत्ताही आहे.'

'तसं नाही. मी तुझ्यासाठी महाटण झाले. आता तू माझ्यासाठी
अफगाण हो. मी तुला सगळं शिकवीन.'

'कशासाठी करायचं ते?'

'अरे नवी जागा, नवा मुलुख, नवी हवा. कदाचित आपल्याला मुलं
सुद्धा होतील. आरेन म-हाटा झाला. आपल्याला अफगाण मुलं होतील.'

'अन सगळ्यांना काय सांगायचं? पाटीलबाबा, गीता,
आरेनराव, मर्दिनी.'

'सांगायचं, आम्ही तीर्थयात्रेला चाललोय. परत येऊ किंवा नाही सुद्धा येणार. आवडलं तर कदाचित तिकडं हिमालयातच घर करून राहू. नाही तरी खैबरखिंडीतूनच पल्याड हिंदुकुश पर्वतरंगांच्या प्रदेशातच आहे आपला पठाणांचा मुलुख.'

'आपला?' 'मग? तू वेगळा समजतोयस स्वतःला? अजूनही?' 'जशी तुझी मर्जी.'

पाटीलबाबा आणि गीता काय समजायचं ते समजले. पाटीलबाबा म्हणाले, जशी पांडुरंगाची मर्जी. फक्त सोबत विठोबारखुमाईच्या मूर्ती घेऊन जा. दुनियेत कुठंही गेलास तरी आपले मराठ्यांचे देव सोबत पाहिजेत. त्यांनी खूप सुंदर पितळी मूर्तीची जोडी त्यांना दिली. गीता म्हणाली, मी इथंच आरेनराव आणि मर्दिनीच्या मुलांची आजी होऊन राहीन.

एकमेकांच्या प्रेमात पडलेले ते प्रौढ पक्षी स्थलांतराला गेले. त्यांची काहीही बातमी नंतर कोणालाही लागली नाही.

सातपाटलांचं घराणं सुरू होतं ते साहेबरावपासून नव्हे. ते सुरू होतं, आरेनराव साहेबराव सातपाटील यांच्यापासून. अफगाण स्त्रीला अफगाण पुरुषापासून झालेल्या अफगाण मुलापासून. त्याला म-हाटी टिळा लागला पठारे यांच्या कुळीचा. देवक सुरड. तसा काहीही संबंध नाही. पण आरेनरावची स्त्री मात्र मराठा. मर्दिनी. शितोळे-देशमुख. तेवढाच मराठा संबंध. तरीही ते मराठा म्हणून ओळखले जातात. म्हणजे ओळखले गेले. कुळी पठारे. देवक सुरड. असे अनेकांना अनेक टिळे लागतात. यांना हा लागला. पुढच्या काळात काय झाले ते पुढे येईलच. तोवर इत्यलम्.

◆ ◆ ◆

दसरत

काळ पेशवाईचा. त्यातही नेमका म्हणजे थोरल्या श्रेष्ठ बाजीरावाचा पुत्र नानासाहेब हा पेशवा असतानाचा. १७४० साली थोरला बाजीराव मरण पावला. त्यानंतर दोनेक महिन्यांनी नानासाहेबास पेशवाईची वस्त्रे मिळाली. तो १७६१ साली वारला. पानिपतचं युद्ध ही त्याच्या कार्यकाळात घडलेली महत्त्वाची घटना, जिचा महाराष्ट्रावर दूरगामी परिणाम झाला. पानिपतानंतर काही काळातच तो मरण पावला. पेशवे सतत कर्जबाजारी असत. १७०७ साली औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहू दक्षिणेत आला तेव्हा त्याच्यापाशी पैसा नसल्यात जमा होता. शिपायांपेक्षा सावकारांचेच पाठबळ त्याला अधिक होते असे म्हणता येईल. पेशव्यांकडे त्याची सतत पैशाची मागणी असे. पेशवे सैन्य उभारण्यासाठी कर्ज काढत आणि मोहिमा काढून पैसा मिळवत.तो बव्हंशी सावकारांची देणी फेडण्यासाठी उपयोगी पडे. मग पुन्हा कर्ज आणि ते फेडण्यासाठी मोहिमा असे चक्र सुरू असे. ब्रह्मद्रस्वामी, पाटणकर, हिंगणे, चासकर, भिडे, गद्रे, वानवले असे अनेक सावकार. तसेच हरिभक्ती, मोदी, गुळगुळे, रामनारायण, जगतशेठ असे बिगर मराठी सावकारही होते. नानासाहेबाने सरदारांकडून शपथा घेववून आपल्या कर्जाचे ओझे कागदावर सर्वांस विभागून दिले. हे वचन पुरे करण्यासाठी मनापासून झटले फक्त शिंदे. पण त्या साहसात ते जीवानिशी मुकले. जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी कामास आले.

नानासाहेबाच्या नंतरच्या काळात पेशव्याचे कारभारी दौलतीस कर्ज दाखवून स्वतःची खासगत पुंजी वाढवू लागले. गंगाधर यशवंत, चिंतो विठ्ठल, नाना फडणीस असे त्यातले काही होत. माधवराव पेशव्याने गंगाधर यशवंत यास छड्या मारून त्याची खासगत लुटली. हा प्रकार नंतर वाढतच गेला. कारभारी, शेठ-सावकार यांना लुटण्याचे प्रकार वाढले. अखेर सामान्य प्रजाजनांवरही जुलूम करून त्यांना लुटणे सुरू झाले. दुसऱ्या बाजीरावाचे काळात परिस्थिती इतकी अधोगतीला पोहोचली की इंग्रजांची परकीय सत्ता म्हणजे परमेश्वराची सोडवणूक असे लोकांस झाले. अर्थात हा सगळा प्रकार नंतरचा. नानासाहेबाच्या काळात असे नव्हते. त्याने उत्तरेतून आणि कर्नाटकातून पैसा आणला. व्यवस्था लावण्याचा प्रयत्न केला. पण पानपतास जे घडले त्यात सगळे बुडाले. त्याची हाय खावून नानासाहेबही बुडाला. याच्या पल्याड मोठी गोष्ट म्हणजे मराठे बुडाले नाहीत. त्यांनी लवकरच पुन्हा जम बसवला. अर्थात तो फार टिकाऊ ठरला नाही. राखेतून फिनिक्स पक्षी जन्म घेतो म्हणतात, तो तरी बिचारा किती वेळा पुन्हा पुन्हा जन्म घेणार? जन्म घेता घेता तो संपला एकदाचा. पण ही फार नंतरची गोष्ट. सध्या फक्त पानिपतचा काळ.

गाव खराडी. आता आदिलशाही नाही. जमाना पेशवाईचा आहे. दीडशे-पावणेदोनशे वर्षांआधी साहेबराव सातपाटील-देशमुख यांनी बांधलेली गढी आता त्याच्या वंशजांच्या ताब्यात नाही. आता सातपाटलांपैकी कोणीही तिथं राहात नाही. पेशवे सरकार यांनी एका देशस्थ ब्राह्मणास गावाची पाटीलकी दिलेली आहे. पाटीलकी आणि कुलकर्णीपण अशी दोन्ही कामे तो निभावतो. तो गढीच्या छोट्या जागेत राहतो. वसूल गोळा करण्यासाठी किंवा तत्सम निमित्ताने पेशवे यांच्याकडचा कोकणस्थ ब्राह्मण इसम आल्यास तोही तिथेच राहतो. त्याच्यासाठी जरा मोठी जागा राखलेली असते. कारण आता गढी पेशवे सरकार यांची खासगत झालेली आहे. इथल्या जमीन-जुमल्यासकट सगळे स्थावर-जंगम एके काळी गढीतल्या सातपाटलांच्या मालकीचे होते. ते सारे आता सरकार दरबारी जमा झाले आहे. जमीन सातपाटील कसतात पण मालकी आता पेशवे सरकारची आहे. जमिनीचा सारा त्यांच्या प्रतिनिधीकडे सालोसाल द्यावा लागतो. गढीची खास निगराणी नसल्याने तिची अवस्था फारशी शोभादायक राहिलेली नाही. सातपाटलांची भावकी मोठी आहे. गढी आपल्या पूर्वजाने बांधलेली आहे असे त्यांच्या ऐकिवात आहे. पण आता ती आपल्या मालकीची नाहीय हेही त्यांना माहीत आहे. गढीमध्ये एक विठ्ठलमंदीर आहे. देवदर्शनासाठी लोक तिथे जात असतात. बाकी विठोबाचे खास काही चालत नाही. गावोगावी विठोबाची देवळे असतात. तिथे जे चालते तितके इथेही चालते, इतकेच. त्या मंदिरासमोर शिवरामबाबांची समाधी आहे. ते एक मोठे सत्पुरुष होऊन गेलेले आहेत असे सगळ्यांच्या ऐकिवात आहे. माघ शुद्ध द्वितिया या दिवशी दर वर्षी नेमाने शिवरामबाबांच्या निर्वाणाचा दिवस यात्रा भरवून साजरा केला जातो. त्या दिवशी आद्यपूजेचा मान सातपाटलांचा असतो. एवढी मोठी भावकी असली तरी पूजेच्या मानावरून त्यांच्यात सहसा भांडणे झालेली नाहीत, होत नाहीत. या मानाला त्यांच्या नजरेत खास महत्त्वच नाही. तर कशासाठी भांडणार? ते सारे बव्हंशी इतर कुणब्यांसारखे कंगालच आहेत.

पुण्याच्या आसपासच्या खेड्यातील सामान्य कुणब्यांमध्ये त्यांचे सोयीरसंबंध झालेले आहेत. देशमुख किंवा स्वतःला उच्चकुलीन म्हणवणाऱ्या शितोळे, जेधे, बांदल, कोंडे, कोंढाळकर, खोपडे, पासलकर अशा मराठा लोकात त्यांच्या सोयरिका नाहीत. याचा अर्थ सातपाटील गरीब आणि शांत स्वभावी आहेत असे नव्हे. मारामारी, बांधांची रेटारेटी यात ते इतर कुणब्यांपेक्षा कुठेही कमी नाहीत. अभावाने ग्रस्त असल्याने ते सतत भुकेलेलेच दिसतात. मोठी गालफडे आणि सतत भूक व्यक्त करणारे डोळे ही काही फक्त त्यांची खासियत नव्हे. सगळ्या मराठी मुलखाचीच ती ओळख म्हणता येईल. पण त्यांच्यात ती अधिक ठळक दिसते. खराडी गावात आता जास्त करून सातपाटील आणि त्यांच्याशी सोयरिक करून टिकलेले इतर थोडे कुणबी लोक आहेत. बाकी अलुत्याबलुत्यांची एकेक-दोनदोन घरे आहेत. साक्षी मार्गापुरती. बागाईत करणारा एकही माळी आता या गावात नाही. सातपाटलांच्या लोकांनी काही पिढ्यांआधी त्यांना इथून हाकलले असे म्हणतात. माळी गेले, त्यांच्यासोबत बागाईतही गेले. जमिनींचे वाट्याला आलेले बारके बारके तुकडे आणि शेती पावसावर अवलंबून. त्यामुळे सगळे सातपाटील सहसा कावलेले दिसतात. अर्थात असे इतके सोपे स्पष्टीकरण त्यांच्या चिडखोरपणासाठी पुरेसे होईल असे नाही.

वरवर काहीही कारण दिसत नसताना अचानक क्रुद्ध होणे ही त्यांची खासियत म्हणता येईल. अन् कंगाल असल्याने त्याचा राग कोणावर त्यांना काढता येत नाही. त्यामुळे आविष्काराचा गुंता आणखी वाढतो. आपण जे जगत आहोत ते आपल्या लायकीचे नाही असे त्यांना वाटत असते. ते अर्थातच त्यांना नीट समजत किंवा दिसत नाही. अचानक राग उफाळून येतो. पण तो दाबावा लागतो.अगदी हक्काच्या बायकोवर सुद्धा तो काढता येत नाही, ही वस्तुस्थिती. राग काढताना बाईवर हात उचलला अन् चिडून समजा ती निघून गेली तर नवी बाईल आणायची कुठून हा मोठा कठीण आणि गहन प्रश्न असतो. एक तर बायको द्याज देऊन आणायला लागते. ती अशी निघून गेली तर नवी आणताना द्याजाचा पैसा आणायचा कुठून? अगदी पाट लावून एखादी लेकुरवाळी आणायची म्हटली तरी ती सुद्धा फुकट येत नाही. म्हणून बायकांना घाबरून राहण्याची रीत इथं कायम आहे. आणि स्वस्तात बायका आणायच्या तर त्या काळ्या मेंढ़्या, जशा असतील तशा स्वीकाराव्या लागतात. अर्थात या कुणबी लोकात रंग आणि रूप यांना तसं जेमतेमच महत्त्व असतं. शेजेला आणि शेतात राबायला बाई असली की पुरे इतकी माफक अपेक्षा असते. त्यात गोरेपणाची चैन कोणाला परवडणार? तरीही सातपाटलांच्या घरात गोऱ्या पोरी जन्माला येतातच आणि त्या त्यांच्या बापांना भरपूर द्याज मिळवून देतात, ही वस्तुस्थिती आहे. शिवाय काळ्याही जन्मत असतातच. त्यातही काळा रंग आणि हिरवे डोळे असे काहीही असू शकते. आणि काळा सातपाटील आणि त्याची काळी बाईल यांना अगदी गोरीगोमटी मुले झाल्यास इथे कोणालाही आश्चर्य वाटत नाही, किंवा त्या स्त्रीच्या चारित्र्याविषयी अजिबातही संशय घेतला जात नाही. आपला वंश हा एक चमत्कारिक वंश आहे, अशी काहीशी अनूभूत जाणीव ह्या लोकात असते.

आता समजा रानबा सातपाटील हा दणकट उंच बांध्याचा असला तरी तो ठार काळा आहे. त्याची अस्तुरी सुद्धा त्यास साजेशी करंद काळी आहे. त्याचा ठार काळा रंग, बेफाट अनुवांशिक उंची आणि असाधारण रांगडे रूप यांच्यामुळे त्याचे नाव रानबा असले तरी त्यास लोक रावणतात्या म्हणतात. रानबास हे माहीत आहे आणि त्याची त्याविषयी तक्रार नाहीय. या टोपण नावाचे कारण रावणाची आणि काळ्या रंगाची आपल्या मनात परंपरेने आलेली प्रतिमा. वस्तुतः रावण हा दशग्रंथी ब्राह्मण. ब्राह्मण हा सहसा गोरा असतो असं मानण्याचा प्रघात. तरीही उच तगडा काळा रानबा हा रावण का? तर तो राक्षस. काळा आणि तगडा. रानबा तसा आहे. रामायण खरे मानायचे तर राम हा मुंडा जातीचा राजा. पण आपल्या पारंपरिक मनात तो आर्य क्षत्रिय आणि गोरा. आपल्या मनातल्या प्रतिमा इतिहासापेक्षा परंपरेने अधिक तयार होतात. म्हणून उंच तगडा, काळा रानबा हा रावण. त्याची काळी अस्तुरी पार्वती उर्फ पारूबाई हीस कोणीही मंदोदरी म्हणत नाही. एक तर तिचे उदर बिलकूलही मंद नाहीय अन् रावणाची बायको मंदोदरी हिचे नाव कोणासही माहीत नाही. रानबा शरीराने तगडा असला तरी स्वभावाने अत्यंत शांत, सालस-सातपाटील यांचे नावास अगदी विरूप असा आहे. त्याला रावण म्हणून त्याला खलपुरुषाचा दर्जा देणे अगदी गैर आहे. अंगावरून गाडा गेला तरी हूं की चूं करणार नाही असा तो गडी. पण अशा काही काही गोष्टी असतातच. मुख्य म्हणजे रानबाचे दिल त्यास रावण म्हटल्यामुळे दुखत नाही हे महत्त्वाचे. रानबा आणि पारूबाई यांना पाच मुले आहेत.

थोरला दसरत आणि बाकीच्या सगळ्या एकापाठोपाठ झालेल्या लेकी. दसरत हा एखाद्या पठाणासारखा ताडमाड उंच आणि लालसर गोऱ्या रंगाचा आहे. पठाण ज्ञातीचे लोक पुण्यात जाऊन आलेल्या काही लोकांनी पाहिलेले आहेत.

आणि असे लोक सातपाटलांच्या घरात अधूनमधून जन्माला येत असतात, हे सगळयांना ज्ञात आहे. रानबाच्या बाकी पोरी काळ्या-ढवळ्या अशा आहेत. पण त्या रेखीवच म्हटल्या पाहिजेत. कारण त्या सगळ्यांची वय वर्षे दहाच्या आत लग्ने झालेली आहेत. आणि त्यांच्या लग्नातून रानबा यास उत्तम द्याज मिळालेले आहे. त्याचा एक सन्मार्गी आंशिक विनियोग म्हणजे त्यातून रानबाने दसरतच्या लग्नाचेही उरकून घेतले आहे. या सुनेच्या निमित्ताने पुन्हा एक करंद काळी कष्टाळू मुलगी त्यांच्या कुटुंबात आलेली आहे. तिचे सासूसासरे तिच्यावर खूष असतातच, खेरीज तिच्या नवऱ्याची म्हणजे दसरतची सुद्धा तिच्याविषयी काहीही तक्रार नाहीय. ती कामाला वाघीण आहे आणि शेजेला उत्तम बळकट. मग तक्रारीला कुठे जागा राहिली? रंगाची असमानता वगैरे चोचले खास नसणाऱ्या लोकात जे आहे ते छानच म्हणायचे. दसरत यास एक खणखणीत काळा निरोगी मुलगाही त्याच्या पत्नीने दिला आहे. प्रकृतीने तो आपल्या आज्याच्या वळणावर जाईल असं बायाबापड्या कौतुकाने म्हणत असतात. नाहीतरी आज्याचे गुण नातवात उतरतात अशी लोकधारणा आहेच. खराडी गावात औपचारिक शिक्षण वगैरे चोचले नाहीत. ते सगळे बामण लोकांचे उद्योग. ते त्यांनी करायचे ते करावेत. कुणब्याला त्यांचा काय उपयोग, अशी प्रांजळ गर्भित धारणा त्यापाठी असते. पाभर धरणे अन् पेरणी करणे याच्यासाठी लिहिणे वाचणे गरजेचे नसते. ते वडीलधारा कुणबी तरण्या पोराला शिकवत असतोच. त्यासाठी कोणी पंतोजी थोडाच लागतो? तसे पंतोजी लोक पुणे येथे भरपूर आहेत.

पुणे हे आता आदिलशाहीतले साधे जहागिरीचे गाव राहिलेले नाहीय. छत्रपती साताऱ्यास असतो आणि त्याचा पेशवा पुण्यात राहतो. छत्रपतीचा जेमतेम आब राखत राज्याची धुरा पेशवाच सांभाळत असतो. त्याने आपला प्रतिनिधी सातारा येथे ठेवला आहे. तो राजाशी संपर्कठेवण्यासाठी आहे, असे वरवर वाटते. पण त्याचे खरे काम राजाची खबर ठेवणे हेच आहे. दौलतीचा गाडा पेशवेच हाकतात. अजूनही छत्रपतीची मर्जी जेमेतेम सांभाळली जाते इतकेच. दिल्लीला मुघल बादशाही दुबळी झालेली आहे. सत्तावीस वर्षे औरंगजेबाशी लढून मराठ्यांनी ते साम्राज्य खिळखिळे केले आहे. नादीरशहाने दिल्ली लुटून कंगाल केलेली आहे. बादशहा आता मराठ्यांच्या आधाराने जगतो. उत्तरेत जवळपास सारीकडे मराठ्यांची चौथाई चालते. तशा सनदा बादशाहने दिलेल्या आहेत. नागपूरकर भोसल्यांची दहशत बंगालपर्यंत आहे. शिंदे आणि होळकरांनी राजपूतांना वठणीवर आणलेले आहे. नानासाहेब पेशवा जवळपास दहा वर्षे उत्तरेत होता.तो खासा लढवैय्या नव्हे. पण चतुर राजकारणी आहे.सबब पुणे आता या भरतखंडाच्या राजधानीच्या दर्जाचे, तशा महत्त्वाचे गाव झालेले आहे. देशोदेशीचे राजकारणी, व्यापारी, लढवैये तिथे असतात. अरबी, इराणी, तुरानी, अंग्रेज, फिरंग, वलंदेज, हबशी, मंगोल असे जगभरचे लोक तिथे आहेत. खेरीज हिंदुस्तान आणि दख्खन आहेच.

त्याचा उण्यापुऱ्या अठरा एकोणवीस वर्षांच्या जिनगानीत दसरत मोजून तीन वेळा या

ना त्या कारणाने पुणे येथे गेलेला आहे. अन् प्रत्येक वेळी घाईघाईने तिथून परतलेला आहे. ते गाव त्याला परदेश असल्यासारखे वाटते. नजीकच्या भविष्यात कदाचित त्याला अशी असंख्य गावे आणि शहरे, माणसे बघावी लागतील. अनेक अपरिचित भाषा ऐकाव्या लागतील. पण अजून तरी तो अगदी कोरा आणि स्वच्छ आहे. खराडी येथे चारचौघांसारखे जगण्यापल्याड कोणतेही स्वप्न त्याने पाहिलेले नाही. तशी कल्पनाच त्याने केलेली नाहीय. त्याचे एकूण बरे चाललेले आहे. स्वप्न न पाहण्याऱ्याच्या टणक टाळक्याच्या गरजा या दुनियेत तशा कमीच असतात. दसरत तसा टणक आणि सरळ माणूस आहे. पण म्हणून जगण्यातला ताप त्याला नाही असे नव्हे. एक गेनबा नामे त्याचा थोरला चुलता आहे. रानबाचा थोरला भाऊ. हा अंगकाठीने बुटका, रंगाने जेमतेम गव्हाळ आणि वैशिष्ट्यहीन असा माणूस आहे. पण त्याला एकूण पाच पोरे आणि एक पोरगी आहे. म्हणजे रानबाच्या जवळपास उलट. आणि सगळ्यात धाकटे एक वगळता त्याची ही पोरे फार वांड आणि रगदार आहेत. कोणत्याही क्षणी हमरीतुमरीवर येण्याची असाधारण क्षमता ते कायम राखून असतात. दसरत हा रानबाचा एकुलता एक मुलगा. गेनबाची पोरे पाच आणि वांड. दोन्ही भावांच्या वाट्याला भाऊहिश्याची सारखी जमीन आहे. म्हणजे उद्याच्या काळात दसरत हा त्याच्या चुलत भावांच्या पाचपटीने अधिक जमिनीचा मालक होणार आहे. आज रानबा आणि गेनबा यांच्या वाट्याला ज्या जमिनी आहेत, त्यांच्यात स्पष्ट विभागणी आहे. समोरासमोरच्या दोन क्षेत्रांना विभागणारी एक पाणंद आहे. पावसाळ्यात तिच्यातून पाणी वाहत असते. पाणंदीच्या दोन्ही बाजूंना आंब्याची प्रत्येकी जवळपास शंभर डेरेदार झाडे आहेत. उद्या त्यातली शंभर एकट्या दसरतची होणार आणि त्याच्या पाच चुलतभावांना मिळून तितकीच असणार हे साधे गुपित आहे. साहजिकच हे चुलतभाऊ त्याच्यावर कायम जळत असतात किंबहुना कायम त्याच्यावर खार खाऊन असतात. बांधांची रेटारेटी शक्य नाही म्हणून पाणंदीची त्यांच्याकडची बाजू ते कायम दसरतच्या वडिलांच्या बाजूला रेटत असतात. खेरीज त्यांची जनावरे कायम ह्या बाजूला वावरातल्या भर पिकात चरण्यासाठी सोडत असतात. अगदी पाहिले समजा दसरतने तरीही ते सावकाश येतात आणि सावकाश गुरांना त्यांच्या बाजूला हाकलून नेतात. अधिक काही बोलले तर उर्मटपणे म्हणतात, 'आम्ही काय जा म्हनतो का तिकडं त्यानला? मुकी जनावरं हायेत, त्यानला काय कळतं आपलं आन तुपलं? चार ताटं मोडली त्याह्यनी त काय लय एव्हढी जगबुडी व्हनार हाये?' दसरत गप्प बसतो. कारण त्याला त्याच्या बापाचा पाठिंबा नाहीय. अशा गोष्टी कानावर आल्या की रानबा काहीच बोलत नाही. गेनबाशी त्याने कधीही कलागत केलेली नाही. आपल्या थोरल्या भावाला तो कधीही उलटून बोललेला नाहीय. आपल्या बापाचे असे गुळणी धरणे दसरतला पटत नाही. अर्थात भांडायची वेळ आली तर दसरत त्या पाच चुलत भावांपुढे कसा टिकणार हाही प्रश्न असतोच. तो प्रामुख्याने दसरतच्या मनात असतो. कदाचित रानबाच्या मनात सुद्धा तो असेल. पण तो काहीच बोलत नसल्याने दसरतला त्यातले काहीच कळत नाही. गेनबा आणि त्याच्या मुलांचा विषय निघाला की रानबा अचानक गुळणी धरतो, याचे दसरतला गूढ वाटते. म्हणजे त्याने लगेच उठावे आणि आपल्या भावाला आणि पुतण्यांना अंगावर घ्यावे असे दसरतचे म्हणणे नाही. रानबामध्ये तेवढी ताकद निश्चितच आहे. शिवाय आपल्या

बापासोबत दसरत असणारच असतो ना! रानबाच्या अंगी असलेल्या अफाट ताकदीच्या अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्या दसरतने अर्थातच ऐकलेल्या आहेत. उभे झाड एकट्याने उपटून टाकणे, भुतांशी कुस्ती करणे, माजलेल्या वळूला एकहाती काबूत आणणे अशा कैक. पण त्याच्या भावाच्या मुलांचा विषय निघाला की रानबा ज्या गूढ प्रकारे गप्प होतो, काही एक भेदरलेपण त्याच्या चेहऱ्यावर दिसते, त्याची अगदी गोगलगायच होते; त्याचे दसरतला आश्चर्य वाटते. ह्या एवढ्या हत्तीसारखी ताकद असलेल्या माणसाचे असे का होते, हे त्याला काही केल्या कळत नाही. रानबा काहीही कृती करणार नाही याची खात्री गेनबाच्या मुलांना वारंवारच्या अनुभवांनी पटलेली आहे. पिकांची नासाडी करणे, उभ्या ज्वारीच्या ताटांची कणसे तोडून नेणे, रताळी खांदून नेणे, भुईमुग उपटून नेणे, आंब्याची झाडे उतरून नेणे असे त्यांचे सारखे काही ना काही चालू असते. रानबा शब्दानेही बोलत नाही. दसरतचा जळफळाट होतो. पण तो एकटा आहे. त्याला गप्प बसावे लागते. हे सगळे एवढ्यावर थांबत नाही, थांबलेले नाहीय. संधी मिळेल तिथे दसरतला हिणवणे, त्याला बोचकारे काढणे, त्याचा पाणउतारा करणे, असे त्यांचे चाललेले असते. अन् पुष्कळदा हे इतके सूक्ष्म असते की त्याच्याविषयी दसरतला काही बोलता सुद्धा येत नाही. विशेष करून त्याचा सगळ्यात धाकटा चुलतभाऊ जगन हा त्याला दिसला की सतत सतावत असतो. हे जगन्या एकदम पाप्याचं पितर आहे. वय वर्षे तेरा-चवदा. थोरल्या चार दांडग्या भावांच्या जीवावर अनेक गोष्टी करत असतो. दसरतला वाकुल्या दाखवणे, गलोरीने दगड मारून साळसूद चालणे, लागट बोलणे, त्याला डिवचणे, लेजीम खेळताना पाय मारणे, असे सारखे त्याचे चालू असते. एकदा रात्री लेजीम खेळताना तर सरळ टेंभ्याचा पलिताच घुसवला होता जगन्याने मागून दसरतच्या धोतरात. तर बाकी सारे गंमत म्हणून खुशाल हसले होते. तिथे हजर असलेल्या त्याच्या बाकी चुलतभावांसकट. आणखी एकदा असाच गुरं वळायला रानात गेलेला दसरत बाकी सवंगड्यांसोबत बसलेला असताना त्याच कारणाने तिथे असलेला जगन्या अचानक दसरतच्या समोर आला आणि आपलं ढुंगण त्याच्या तोंडासमोर धरत मोठ्याने पादला होता. अन् तिथेही बाकी सगळे हसले होते. एकदा असेच ते गुरे राखण्यासाठी रानात गेलेले असताना जगन्याने दसरतच्या एका गायीच्या कासेत सुई खुपसून दिली. ते मुकं जनावर. वेदना होत असल्यामुळे आपला पाय कासेजवळ नेऊन ती कमी करण्याचा प्रयत्न करी. तसतशी ती सुई आणखी आत घुसून तिला आणखी वेदना होत. नेमके झालेय काय हे बघायला दसरत तिच्या जवळ गेला तेव्हा त्याला ते दिसलं. त्याने मग हळुवारपणे ती सुई उपसून काढली. आणि तिथं कुडमुडीच्या पाल्याचा रस लावून गायीची कास चिरगुटाने बांधून दिली. तेव्हा मात्र न हसता बाकी सगळे जगन्यावर चिडले. म्हणाले, गायीला का? तिन्ही काय क्यालं? आरं ती समद्या पिर्थमीची आई आस्तीय. तिच्या पोटात तेहतीस कोटी देव हात्यात. हे चुकलं तुपल्यावालं हांऽऽ..' पण ते तितकंच. अधिक काही नाही. आणि यावर जगन्या हसतच होता. बाकीच्यांच्या दृष्टीने या किरकोळ गमतीजमतीच्या गोष्टी होत्या. पण यात खोडी काढणारा प्रत्येक वेळी जगन्या होता. दसरतने कधीही तसे केलेले नसे. हे इतरांच्या लक्षात येत नसे. हे असेच चालू राहणार. याच्या सकटच आपल्याला जगायला लागणार अशी दसरतची धारणा झालेली होती. नाहीतरी वेगळा असा काय

रस्ता होता त्याला? चीड येण्याची आणि ती दाबत राहण्याची सवयच त्याला झाली होती. लष्करात जावून तलवार गाजवून रग जिरवायची संधी सुद्धा त्याला नव्हती. तो एकुलता एक. बाप त्याला जाऊ देत नव्हता. गावातली बाकी तरणी पोरे जात असत. दसरतचे चार तगडे चुलत भाऊ जात असत. बहुतेक जण पेशव्यांच्या फौजेत जात. काही निजामाच्या फौजेत तर काही गुजरातेत दाभाडे यांच्या फौजेत सुद्धा जात असत. काही जण तर ग्वाल्हेर, इंदौर अशा ठिकाणी उत्तरेत शिंदे आणि होळकरांच्या फौजेत गेलेले होते. ते वर्ष वर्ष गावी येत नसत. काहींनी तिकडे दूर देशी आपली कुटुंबेच नेलेली होती.

पण हे असे व्हायचे नव्हते. सतत संथ वाहत्या काळात क्षणभरासाठी कालक्षणाचे एक अत्यल्पजीवी अणकुचीदार टोक तयार होणार होते. आणि त्या टोकावर दसरतचे आयुष्य बदलून टाकणारा अपघात होणार होता. अनावधानानेच ते होणार होते. पण त्याच्या परिणामी त्याच्यासाठी खराडी हे गाव कायमचे परके होऊन जाणार होते. त्याला त्याच्या आईवडिलांना पुन्हा कधीही भेटता येणार नव्हते. तो या गावातून कायमचा परागंदा होणार होता. आणि चुलतभाऊ जगन्या तर या दुनियेतूनच. जगन्याचे दुनियेतून नाहीसे होणे त्याला प्रत्यक्ष बघायला मिळणार होते. पण त्याचे आईवडील, त्याची बायको आणि मुलगा यांचे काय झाले हे किमान वर्षभर तरी त्याला समजणार नव्हते. त्या दुर्दैवी प्राणघातक रात्री क्षणभरात त्याचे जगणे बदलणार होते. त्याची संहिता त्याच्या बापाने दसरत चार वर्ष वयाचा असताना एका कुडमुड्या जोश्याकडून ऐकलेली होती. आणि त्या संहितेच्या दबावाखाली तो तेव्हापासूनचे आपले आयुष्य जगत होता. यातले दसरतला काहीही माहीत नव्हते अन् कधी होणारही नव्हते. तर झाले असे की: कृष्णपक्षातील एका गडद रात्री घरात सगळे गाढ झोपलेले असताना कोवळ्या पहाटेच्या आधीच्या प्रहरात अचानक सैपाकघरात मोठा आवाज झाला. तो उतरंड कोसळण्याचा आवाज होता. खरं तर सैपाकघर असं नव्हतंच काही. तिथं चूल होती. तिच्या मागच्या बाजूला भिंतीत एक देवळी होती. तिथं देव ठेवलेले होते. दरवर्षी घटस्थापना तिथेच होत असे. शेजारी मागच्या बाजूला उघडणारा दरवाजा होता. उजवीकडे भिंतीशी उभे रांजण आणि त्यावर गाडगी मडकी अशा उतरंडी होत्या. त्यांच्यात धान्ये, डाळी अशांपासून ते थोडे फार दागिने, पैसे, किडूकमिडूक असे होते. आवाज झाल्यासारशी दसरत उठला आणि वेगाने त्या जागी पोहोचला. उठतानाच हाताशी फरशी घेतलेली होती. दरवाज्यातून सटकून जाऊ पाहणारा माणूस अंधारात त्याला दिसताच त्याने फरशीचा घाव त्याच्यावर घातला. तो इतका जोरदार प्रहार होता की तत्क्षणी तो इसम जागीच कोसळला. आणि हात-पाय खोडू लागला. त्याच्या तोंडून आवाज सुद्धा निघाला नाही. तितका अवकाश त्याला मिळालाच नाही. दरम्यान रानबाही उठलेला होता. त्याने चिमणी पेटवली आणि तो तिथं पोहोचला. पडलेल्या माणसाच्या तोंडाजवळ चिमणी नेताच त्या दोघांनीही त्याला तत्क्षणी ओळखले. तो जगन्या होता. तो तिथं कशासाठी, काय चोरण्यासाठी कडमडला होता, हे कोण सांगणार? अन् आता त्याची काही सोयही उरलेली नव्हती. थोड्याच वेळात त्याची धडपड संपणार होती. रानबा मोठ्याने दसरतला म्हणाला, 'दसऱ्या पळ. लगीचच्या लगीच नाहीसा हो. सटीनी आपल्या कपाळावर कोरल्याली बात काय बी क्यालं तरी उलटवता येत नायी. इथं रायलास तर तू जिता न्हावू सकत नायी. पळ. जीव

खाऊन पळ. जा, बचव तुपला जीव.' दसरत पळाला. जीव खावून पळत अंधारात नाहीसा झाला. रात्रंदिवस पळत राहिला. दुसऱ्या दिवशी रानबाचे चार पुतणे आले. त्यांच्या हातात कु-हाडी होत्या. एखादं झाडं तोडावं तशा निर्दयतेने त्यांनी रानबाला खापलून काढलं. रानबाने त्यांचा प्रतिकार केला नाही. तसे करण्याइतकी ताकद त्याच्या अंगी खासच होती. निदान एकदोघांना तो स्वतःसोबत खासच घेऊन जाऊ शकत होता. पण इतकी वर्षे मनात घर करून राहिलेल्या सटीच्या अक्षरांनी त्याला पूर्ण हतबल करून टाकलेले होते. दसरत तीनचार वर्षे वयाचा असताना एक कुडमुडा जोशी रानबाला भेटला होता. 'तुला तुझ्या पुतण्यांच्या हातून मरण येणार आहे, तुझा वसबूड होणार आहे,' असे त्याने रानबास खात्रीने सांगितले होते. 'माहीत असले तरी अशा गोष्टी आम्ही कोणाला सांगत नाही. पण तुला मी सांगतो. की बाबा थोडे सुधारून राहिलास तर ही गोष्ट तुला निदान पुढे पुढे ढकलता येईल. तुझ्या पुतण्यांशी कलागत करायचे प्रसंग टाळत राहिलास तर जगशील. मरण तर कोणालाच चुकत नाही. पण ते टाळत जगणं हेच तर माणसाचं आयुष्य असतं ना! पण तरीय बी वसबूड व्हायचा हानार नायी म्हनता? रानबाने अधीरतेने विचारले तेव्हा जोशी म्हणाला, मी जी बात तुला सांगितली, ती कोनासंगती बोलला नाहीस तर कदाचित टिकेल सुद्धा तुझा वंश. पण टिकलेला वंश बघायला तू उरणार थोडाच आहेस? जे मला दिसलं ते मी तुला सांगितलं. की बाबा जे घडायचं ते घडणारच आहे. पण ते निदान जमेल तितकं पुढे ढकलायला काय हरकत आहे? आता, माझं काम मी क्यालं. त्याच्या उप्पर तुझं नशीब. तू चांगला माणूस आहेस म्हणून तुला सांगितलं. तसं माझ्या मनात आलं.' रानबाला त्याच्या पुतण्यांनी खापलल्यावर काही दिवसातच त्याची पत्नी पारूबाई हाय खाऊन मेली. सून, म्हणजे दसरतची बायको तिच्या बाळाला घेऊन तिच्या माहेरी पळून गेली. आणि दसरत तर आधीच परागंदा झालेला. कालक्षणाच्या एका अत्यल्पजीवी टोकावर रानबाच्या कुटुंबाचे सगळे होत्याचे नाहीसे झाले होते. त्याचा वंश निदान खराडीतून तरी पुसला गेला होता. तो सगळाच्या सगळा बुडणार की नाही हे काळाच्या प्रवासात स्पष्ट होणार होते. कारण त्याचा परागंदा झालेला मुलगा अजून जिवंत होता. अन् त्याचा नातू सुद्धा त्याच्या आजोळी जिवंत होता. त्याचा वंश अजून तरी बुडालेला नव्हता. सटवाईने लिहिल्याप्रमाणेच सगळे होणार होते. फक्त मर्त्य माणसांना त्याची माहिती नव्हती.

2

दसऱ्या पळ. लगीचच्या लगीच नाहीसा हो. सटीनी आपल्या कपाळावर कोरल्याली बात काय बी क्यालं तरी उलटवता येत नायी. इथं रायलास तर तू जिता हावू सकत नायी. पळ. जीव खाऊन पळ. जा, बचव तुपला जीव. असं रानबा म्हणाल्यासरशी

दसरतने झेप घेतली आणि तो धावत सुटला. त्या क्षणी त्याला तेच सुचलं. आणखी वेगळा कोणताही विचार त्याच्या मनात डोकावला नाही. तितका वेळच नव्हता. एक तर मारलेला माणूस जगन्या. आणि त्याच्या बापाच्या स्वरातला असाधारण तातडी. बचव तुपला जीव. ती एकच गोष्ट त्याला समजली. पळ, तुपला जीव बचव. तो पळत सुटला. सारखा धावत सुटला. त्याने कोणतीही दिशा ठरवली नव्हती. अंधारात फक्त पळणे. त्या गावापासून, त्याच्या चुलत भावांपासून दूर जाणे. सापडलो तर ते आपला खातमा करतील हे नक्की. ते सांगायला आणखी कोणाचीच गरज नव्हती. त्याच्या बापाचा स्वर पुरेसा होता. झाडझाडोरा, दगडधोंडे, काटेकुटे, वस्त्या, कुत्री-मांजरे, रान जनावरे, अशा साऱ्यातून उभ्या अंधारात तो धावत राहिला. अन्न आणि पाणी यांची तमा न बाळगता पळत राहिला. अंधारात पळणं आणि दिवसा जागसूद छपून राहाणं. वैरी कुठूनही, कधीही येऊ शकतो. सावध, सतत सावध राहाणं ही एकमेव गती.

नंतर मिळेल तिथं मिळेल ते खाल्लं. सापडतील ती फळं खाल्ली. ओढ्याकाठी झिरे करून त्यातलं पाणी प्याला. सापडली तेव्हा अगदी ओढ्यातली मासळी सुद्धा कच्ची खाली. तरीही पोट बव्हंशी रिकामंच असे. पोट भरण्याइतकं कुठंच काही मिळत नव्हतं. पण तो विचार करण्याइतकी सवड कुठं होती त्याला? दोन तीन दिवस उलटल्यावर त्याला जरा सुरक्षित वाटायला लागलं. मनात विचार यायला लागले. आपल्या बापाचं काय झालं असेल? त्याला आपल्या चुलत भावांनी मारून टाकलं असेल? आपली आई? आपली बायको आणि मुलगा? सटीनी आपल्या कपाळावर कोरल्याली बात काय बी क्यालं तरी उलटवता येत नायी. हे जे आपला बाप म्हणाला, ते काय होतं? सटवीने कोणती गोष्ट कोरलेली होती आणि ती आपल्या बापाला कशी माहीत होती? आपल्या हातून जगन्याचा खून होईल हे बापाला आधीच माहीत होतं? ते त्याला कोणी सांगितलेलं होतं? आणि आणखी काय काय त्याला माहीत होतं? ते आता आपल्याला कधीच कळणार नाही. बाकी सगळ्यांचं सटवीने काय करायचं ठरवलेलं असेल? आपल्याला कधीच कळणार नाही. ती माहिती घेण्यासाठी पुन्हा त्या गावाच्या आसपास सुद्धा आपण फिरकू शकणार नाही. आपण तिथून कायमचे तुटलो. ते गाव आता आपल्यासाठी नाही. हे सटवीने लिहिलेलं आहे हे आपल्या बापाला माहीत होतं? म्हणूनच का तो चुलत भावांविषयी आपल्या कोणत्याही तक्रारी ऐकून घेत नव्हता?

या सगळ्या गोष्टींचा विचार मनात येई. पण तोही फार टिकत नसे. जगण्याची, जिवंत राहण्याची तातडी होती. दूर जाण्याची तातडी होती. बाकी सगळ्या गोष्टी फिजूल होत्या. म्हणून रात्री पळणे आणि दिवसा सुरक्षित आडोसा पाहून जागसूद छपणे. तहान-भूकेची तमा न बाळगता धावणे आणि छपणे. त्याची अवस्था निशाचरासारखी, एखाद्या रानटी श्वापदासारखी झाली होती. किंबहुना ती त्यापेक्षाही बिकट होती. श्वापद रोज खात-पित नाही. पण गरज पडेल तेव्हा शिकार करण्याचा प्रयत्न करण्याची संधी त्याला असते. दसरत कसली शिकार करणार? ती विद्या त्याला अवगत नव्हती. आणि तितकी सवडही त्याच्याजवळ नव्हती. शरीर खंगत चाललेलं होतं. अंगातला तकवा हटत चालला होता. पण त्याचाही विचार करायला सवड नव्हती त्याला. एके सकाळी तो एका नदीच्या काठी झाडांचा आडोसा पाहून झोपला. झोपण्यासाठी खास प्रयत्न अर्थातच त्याला करावे लागत

नसत. क्लांत शरीर. आपोआप ग्लानी येई. मूर्च्छित झाल्यासारखा पड़े तो. पोटात अन्न नसताना झोप न लागणे ही त्याची आयुष्यभराची सवय. पण आता अन्न नसले तरी मूर्छा येई. अधूनमधून जाग येई तेव्हा सावधपणे आसपास बघणे, चाहूल घेणे.

त्या सकाळी तो असाच नदीचं पाणी ओंजळीत घेऊन प्याला, तेव्हा त्या पाण्याचा गारवा त्याच्या घशातून आतड्यांच्या रस्त्याने थेट पोटभर पसरला होता. अंगाची मुटकुळी करून झुडुपांच्या दाटीत तो एखाद्या जनावरासारखा झोपला होता. नंतर कधीतरी माणसांच्या गलक्याने त्याला जाग आली. तो जागेवर उठून बसला. त्याने सावध होऊन कान टवकारले. ते आपापसात बोलत होते. त्यांच्या बोलण्याला त्याच्या अस्तित्वाचा कोणताही संदर्भ नव्हता. ते खाद्यान्नाविषयी बोलत होते. येणारे कित्येक दिवस जी जंगी मेजवानी मिळणार आहे, त्याविषयी जिभल्या चाटीत बोलत होते. ते दसरतसारखेच गरीब लोक होते. त्यांच्या अंगावरची कळकट वस्त्रे, त्यांच्या गालफडांवरील रापलेली आणि ताणलेली त्वचा अशा गोष्टी ते सहज स्पष्ट करत होत्या. उत्तम अन्न भरपूर प्रमाणात आणि बरेच दिवस मिळणार म्हणून ते हरखून गेलेले होते. हळूहळू ते निघून गेले. दसरतच्या अस्तित्वाची दखल त्यांना नव्हती. तो त्यांना दिसला असता तरी कदाचित हा आपल्यासारखाच सतत अन्नक्षुधेच्या पूर्तीसाठी जगणारा इसम आहे असे त्यांना वाटले असते. हाही आपल्यासारखाच उत्तम अन्नाच्या अपेक्षेने आसपासच्या कोणत्यातरी गावाहून आलेला असेल असेच त्यांना वाटले असते. तसे असले तरी त्याची कोणतीही जोखीम पत्करण्याची तयारी नव्हती. ते गेले आणि तो पुन्हा आडवा झाला आणि ग्लानीत गेला. त्याला पुन्हा जाग आली तेव्हा पक्वान्नांचा संमिश्र दरवळ त्याच्या नाकपुड्यात शिरला. काही वेळाआधी ऐकलेल्या माणसांच्या गप्पा त्याला आठवल्या. अन्न शिजविण्याची जागा इथून निकट असावी असं त्याला वाटलं. पहिली भावना उठण्याची झाली. पण उठवेना. अंगात पुरेसा तकवा नव्हता. अन् गेले कैक दिवस माणसांच्या नजरांना नजर देऊन त्याने पाहिलेलेच नव्हते. तसा प्रसंग आल्यास स्वतःला लपवत ते करणे असा त्याचा क्रम होता. माणसे त्याने फक्त दुरून पाहिली होती. सर्प किंवा तत्सम प्राणी ज्याप्रकारे माणसाची चाहूल लागल्यास झटकन नाहीसे होतात तसे त्याचे झाले होते. पण अन्नाच्या मधुर वासाने हळूहळू त्याच्या त्या अल्पजीवी सवयीवर मात केली. तो उठला आणि सावधपणे आदमास घेत चालू लागला. अर्थात आपण कोणाच्याही नजरेत येऊ नये याची दक्षता तो घेत होताच. नदीकाठचा झाडझाडोरा संपतो तिथे पाचसहा पुरुष उंचीची खडकाची नैसर्गिक भिंत होती. ती मागेपुढे नजर जाईल तिथवर तशीच होती. याउलट नदीचा पल्याडला काठ जवळपास सपाट होता. आधीचे लोक कुठून आले होते? ते ही खडकांची भिंत उतरून नक्कीच आले नसतील. तसा रस्ताच इथं दिसत नाही; त्याच्या मनात आलं. तो आदमास घेत भिंतीच्या कडेकडेने चालत राहिला. माणसांची चाहूल नव्हती. बराच दूर गेल्यावर त्याला एक देऊळ दिसलं. तिथे सुद्धा कोणीही नव्हतं. त्यानं ते देऊळ नीट पाहिल्यावर त्याच्या लक्षात आलं की ते कोणत्याही देवाचं देऊळ नव्हतं. ती कोणातरी बड्या माणसाची छत्री होती. त्या माणसाचा अर्धपुतळा तिथे होता. डोईवर पगडी, ओठांवर भरघोस मिशा. अंगातल्या बंडीवर जाळीजाळीचे चिलखत आणि कमरेशी म्यानात तलवार होती. एकूण कोणातरी लढवैय्या माणसाची ती छत्री होती. तिथून वर

नजर गेली तेव्हा त्याला वर जाण्याचा रस्ता दिसला. व्यवस्थित पायऱ्या होत्या. म्हणजे, या पायऱ्या उतरून ते लोक आले होते तर ; त्याच्या मनात आलं. इथं आता कोणी दिसत नाही खरं, पण या पायऱ्या चढून आपण वर गेलो तर फटकन कोणाच्या नजरेस येऊ शकतो, त्याचं काय? पण मग अन्नाचा मधुर वास येतोय त्याचं काय? श्वापदासारखा दबकत, आदमास घेत तो पायऱ्या चढला. वर बऱ्याच अंतरावर एक वाडा होता. वाडा कसला; दगडी भिंतीची कूस असलेली ती एक मोठी गढी होती. त्या गढीची ती मागची बाजू होती. तिथे कोणीही नव्हतं. त्याला खराडीतली गढी आठवली. गढीच्या उजव्या अंगाला भली मोठी कनात लावलेली होती. तिथेच कदाचित एखादा जंगी भटारखाना असावा आणि तिथेच शिजणाऱ्या अन्नाचा वास आपल्याला आला असावा, असं त्याच्या मनात आलं. नदीच्या पात्रात ते लोक याच्याविषयीच बोलत असावेत. कोणातरी मोठ्या माणसाने काहीतरी उत्सव सुरू केला असेल, त्यानिमित्ताने अन्नदान होणार असेल. गर्दीत चेहरा लपवून आपल्याला ते मिळवणे आणि खाणे शक्य होईल सुद्धा; त्याच्या मनाला आशेची पालवी फुटली. तसाच दबकत पुढे जात असताना आपला अंदाज खरा असल्याची खात्री त्याला उत्तरोत्तर पटत गेली. शिजत असलेल्या अन्नाचा वास गडद होत होता आणि आत काम करणाऱ्या माणसांचे आवाज अधिकाधिक स्पष्ट होत होते. आवाजाला आधी तो बुजला पण अन्नाच्या वासाने त्यावर मात केली. तरीही एका क्षणी त्याला वाटलं, आपण आता पुढे जाणं ठीक होणार नाही. थोडा संयम पाळला आणि पुन्हा खाली जावून झाडांच्या आडोशाने पडून राहिलो तर रात्रीच्या अंधारात आपल्याला बिनधोक अन्न खाता येईल आणि तसेच पुढे चालायला लागता येईल. हे असं करणं अधिक शहाणपणाचं होईल, असं मनात येऊन तो मागे वळायच्या बेतात असताना थुलथुलीत अंगाचा एक जाडा माणूस कनातीबाहेर, तिच्या मागच्या बाजूला जवळपास पळतच आला आणि धोतर बाजूला करून उभ्या उभ्या मुतू लागला. त्याला दसरत अर्थातच दिसला. आता मागे वळणं शक्य नाही. पळालो तर चोर समजून आपला पाठलाग होईल अन् सडकून मार खावा लागेल. त्यापेक्षा चार दोन शब्द या माणसाशी बोलून कुठून तरी खडकाची भिंत पार करून खाली जावू असं त्याने मनाशी ठरवलं. दसरत हाकेच्या अंतरावर पोहोचला तेव्हा दुरूनच तो माणूस अधिकारवाणीने म्हणाला, 'आरे, चाल चाल जल्दी.

आत किती काम पल्डंय आन तू इकडं बोंबाट्या मारू व्हायला.'

हा आपल्याला इथं काहीतरी काम करणारा समजतोय. ते आपल्याला सोयीचंच आहे. तो सांगेल ते काम करू म्हणजे खायला हमखास मिळेल; त्याच्या मनात आलं अन् लगबगीने तो हसला. त्या कल्पनेने त्याच्या अंगात तकवा सुद्धा आला. आत भटारखाना. पिठांच्या, डाळींच्या, भाज्यांच्या राशी. दूध, तूप, गूळ असं आणखी पुष्कळ. अनेक स्त्री-पुरुष आपापल्या कामात गढलेले.

'हां, उचल ती कुन्हाड आन हो सुरू.' तो थुलथुलीत माणूस दसरतला म्हणाला. तिथं लाकडाच्या ओंडक्यांचा भला थोरला ढीग होता. तोडलेल्या धपल्यांचा ढीग सुद्धा होता. 'चुल्हांगणं पेटलीत आता.भसाभस धपल्या खात्यात ती. तू कर चालू. लाकडं आन्हाया गेलेत बाकीचे. ते येत्यानच. तव्हर चालु दे तुपला रट्टा. काल आला नव्हता का कामावर?'

दसरत गुळमुळीत हसला अन् त्याने कु-हाड उचलली. पहिला ठोका टाकला

ओंडक्यावर अन् खाच्चदिशी कु-हाड लाकडात घुसली. त्याला जगन्याच्या डोक्यात घातलेला टोलाच आठवला. एका ठोक्यात पालथा केला होता जगन्याला. जिनगानीतूनच हटवला त्याला. दम आणला होता साल्यानी. दसरतच्या मनात अपराधाची कोणतीही भावना नव्हती. तोही त्याच्या गावातून कायमचा उखडला गेला होता. त्याच्या चुलतभावांच्या हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करत देशोधडीला लागला होता. अन्नाच्या आशेने लाकडे फोडत होता. त्वेषाने दणके घालत होता. आसपासची माणसं, त्यांची बातचित, लगबग, शिजत असलेल्या अन्नाचा मधुर वास हे सारं इतकं निकट असूनही त्याच्यापासून कोसो दूर गेलं होतं. गाठीचा ओंडका फोडायला फार कठीण असतो. पण दसरतच्या घावांपुढे गाठी सुद्धा फटाफट फुटत होत्या. एक प्रकारचा अनुदभूत त्वेष, आवेश अन् त्याच्यातून प्रसवलेला जोश यांनी त्याला वेगळ्याच दुनियेत पोहोचवलं होतं.

शरीरातल्या आणि मनातल्या अनुदभूत उर्जेला सुद्धा काही एक मर्यादा असतेच. तशी एका क्षणी ती संपली. विसावा घेण्यासाठी तो बसला आणि बसल्या जागी लुंडकला. एका असाधारण थकावटीने त्याचं शरीर, मन आणि मेंदू यांचा पुरता कब्जा घेतला. आणि तो ग्लानीच्या दुनियेत शिरला. इतका की नंतर बाकी लोक आले. त्यांनी फोडलेल्या धपल्या त्याच्या अंगावर साचत गेल्या तरी ते त्याला जाणवलं नाही. त्यांच्यातला एकजण म्हणाला सुद्धा की, 'आरे! तिकडं ते फडकं पडल्यावानी काय दिसातं. का माणूस झोपलाय कोन?'

त्यावर दुसरा म्हणाला, 'च्यायसका तुपलं त काही पन बिट्या.

एवढ्या धपल्या घातल्या आपून. मानूस आस्ता त उठला नसता का?'

'हां, तेय बी खरं हाये म्हना', पहिला म्हणाला.

अशा प्रकारे ग्लानीत विसावलेला दसरत धपल्यांच्या ढिगाऱ्याखाली

गाडला गेला. ते फडकं दिसेनासंच झालं.

नंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी चुल्हांगणासाठी सरपण वाहणाऱ्या बायांपैकी एकीला तो तिथं दिसला. म्हणजे आधी तिलाही वाटलं, फडकंच आहे. घेऊन ठेवावं बाजूला. उपयोगाला येईल. म्हणून तिने ते ओढायचा प्रयत्न केला. तर कुठलं ओढलं जायला? म्हणून जरा आत हात घातला तर लक्षात आलं की माणूस आहे. तिने जोरात बोंब ठोकली. “ए बयाऽऽ इथं धपल्यांखाली मुडदा हाये पल्ड्यालाऽऽ'

साहजिकच तिकडं सगळेजण धावले. 'अराऽऽ राराऽऽ खरंच मुडदा हाये रे!' 'कव्हा गाडला गेला काय जनू.' । 'च्यायसका इथं काह्याला मरायला आला?' 'पार चिपाड झालंय गं बया बिचाऱ्याचं.'

'आरे त्याच्या आंगावरला धपल्यांचा ढिगोल उपसा आंधी. मानसं

हाये का कोन म्हनावा तुम्ही.'

भराभर लाकडाच्या धपल्या हटवण्यात आल्या. निपचित पडलेला माणूस. कोणाच्याही ओळखीचा नसलेला. कोणत्या गावाहून आलाय? इथला तर नक्कीच नाही. की कोणी मारून आणून टाकला?

'आरे ह्यो त इथंच लाकडं फोडायच्या कामाला व्हता ना?', तो थुलथुलीत जाडा माणूस- ज्याने दसरतला एक किंवा दोन दिवसांआधी तिथं लाकडं फोडायला सांगितलं होतं- तो

म्हणाला.

'छ्या छ्या! ह्यो आमच्या टोळीत कव्हाच नव्हता.', एकजण म्हणाला.

'आराराराऽऽ..' थुलथुलीत जाडा म्हणाला. त्यानं अधिक न बोलणंच पसंत केलं.

'तरीच मला वाटलं व्हतं-', एक लाकूडफोड्या म्हणाला. त्याने तो माणूस को फडक असा सवाल उपस्थित केला होता. तोही गप्प झाला.

'कोनी मारून आनून टाखला आसन बिट्या. सुकासुकी कोन झोपन धपल्यांच्या ढिगाखाली?'

'पन याचं आता करायचं काय?' 'उचलायचा आन माती देयाची. दुसरं काय करित्या ?'

'च्यायसका इथ दतबा पाटलाच लगीन- याला ह्योच वखोत सापडला का जीव देयाला?'

'मला त ह्यो जित्ता लागतो गं', म्हणत एक बाई पुढे झाली. तिने त्याच्या हाताला स्पर्श केला. तो उचलला अन् सोडला तर त्याच्यात काहीच जान नव्हती.

'छ्या छ्या ! त्याच्यात कायच जान हायलेली नायी. तुला उगंच तसं लागात तुळशी म्हतारेऽऽ., एकजण म्हणाला.

या तुळशी म्हातारीलाच तो पहिल्यांदा दिसला होता. पहिली बोंब तिनेच मारली होती. ती या गावातली पन्नाशीच्या घरातली एक विधवा म्हातारी होती. ही बुटकी काळी तुळशी म्हातारी गावात एकटी राहात असे. तिची एकुलती एक लेक लांबच्या गावात दिलेली होती. ती जराशी फटकळ होती. पण गावात तिला मान होता. तिचा दिवंगत नवरा पंचक्रोशीतला एक प्रख्यात गोंधळी होता. आणि ती स्वतः हरेक प्रकारे इतरांना मदत करत असे. ती अत्यंत उत्तम सुईण होती. अडल्या नडलेल्या बायांना तिचा फार आधार असे. दिवस-रात्रीच्या कोणत्याही प्रहरी हाक आली की ती धावून जात असे. अशा कामानंतर लोक तिला त्यांच्याजवळ असे ते आनंदाने देत असत. पण ती केवळ त्यावर अवलंबून नव्हती. वेळ आणि संधी असेल तेव्हा ती कोणाच्याही शेतात निंदणी-खुरपणीच्या कामावर आनंदाने जात असे. कामात कुचराई करण्याची तिची वृत्ती नव्हती. त्यामुळे कुणबी-शेतकरी तिच्यावर खूश असत. ती मुळात सुस्वभावी असल्याने तिचा फटकळपणा सहज स्वीकारला जात असे. दतबा पाटलाच्या लग्नासाठीच्या या भटारखान्यात गावातल्या इतर अनेक स्त्री-पुरुषांसारखी ती कामाला आलेली होती.

तुळशी म्हातारीने आधी दसरतच्या नाकाजवळ हात नेला. नंतर तिने थेट त्याच्या छातीला कान लावला. त्याच्या हृदयाचे ठोके तिने स्पष्ट ऐकले.

'आरे त्यो जित्ता हाये दोडांनोऽऽ' ती खात्री होऊन ओरडली, 'पकता काय गं बायांनू, जा पळा, पानी आना,' ती म्हणाली.

3

कोण गावचा कोण माणूस. तुळशी म्हातारीने त्याला शुद्धीवर आणला. पडला होता तिथून एका खोलीत हलवला. तिथं तो जागा होताच तिच्या शहाण्या नजरेत तिला समजलं की हा कैक दिवस जेवलेला नाहीय. तिने आधी त्याला नुसती पेज खाऊ घातली अन् झोपायला लावलं. उठल्यावर थोडा दहीभात. नंतर ती त्याला तिच्या घरी घेऊन गेली. मऊ अन्न देत हळूहळू त्याला ठीकठाक करत मार्गावर आणलं. एकली विधवा म्हातारी. परोपकारी स्वभावाची. लोकांना बरंच वाटलं. परदुःख शीतल. म्हणजे दुःख असतेच. पण त्याचे निवारण आणखी कोणी केल्यास उत्तम. लोकांना ते पटले. त्या परदेशी माणसाची सोय लागली. कोणालाही तोशीस न बसता. कशी का होईना, सोय लागली हे बरं झालं, असेच लोक उद्गारले. नंतर ते विसरले. दतबा पाटलाच्या लग्नासारख्या इतक्या मोठ्या प्रकरणात इतकी बारीक गोष्ट कोणाला महत्त्वाची वाटणार? मुख्य म्हणजे तो माणूस वाचला होता. तुळशी म्हातारीने त्याला आपल्या पंखाखाली घेतला होता. मिटला प्रश्न.

मे १७५८ मध्ये दत्ताजी शिंदे यांनी चांभार गोंदिया उर्फ श्रीगोंदे येथे

भागीरथीबाई हिच्याशी लग्न करून दक्षिणेतून उज्जनीस प्रयाण केले. बरोबर जनकोजीची बायको काशीबाई आणि नारोशंकर वगैरे होते. पुढे नोव्हेंबरात दत्ताजी आणि जनकोजी या चुलत्या-पुतण्यांच्या भेटी रेवाडी येथे झाल्या. डिसेंबरमध्ये ते दोघे दिल्ली ये थे यमुनातीरी मज्मूच्या टिळयाव र दाखल झाले. तेथे वाटाघाटी करून व्यवस्था लावण्यात त्यांचे तीन महिने गेले. १७५९ च्या मार्चात ते सरहिंद येथे व एप्रिलात लाहोरास जाऊन मे महिन्यात परत यमुनातीरावर आले.

'बाळा दसरता, तू आता काय करशीन?' तुळसाबाईने विचारलं.

संध्याकाळची वेळ होती. दसरत आता खडखडीत बरा झालेला होता. तुळसाबाई घरी जी मिष्टान्ने आणायची, त्यांच्यावर सडकून ताव मारण्याइतका चांगला बरा झाला होता. मुळात तो आजारी नव्हताच. त्याने उपास बराच काढला होता आणि ग्लानी येऊन तो लाकडांच्या धपल्यांखाली गाडला गेला होता, इतकंच. तुळसाबाईने त्याला प्रश्न विचारले होते. कोण, कुठला, कुठे निघाला होता असे जुजबी प्रश्न. त्याने त्यांची उत्तरे दिली होती. ती फार खरी होती असे नव्हे. आपल्या हातून आपल्या चुलत भावाचा खून झालेला आहे आणि आपण पळून इकडे आलेलो आहोत असं थोडंच सांगता आलं असतं त्याला? पण आपण अमुक अमुक गावचे आहोत. नाव दसरत. जात म-हाटा. नशीब काढण्यासाठी गाव सोडून आलो आहोत, असं तो म्हणाला होता. तुळसाबाईला अधिक माहिती नकोच होती. तिला पोरगा आवडला होता. विचारायची रीत असते म्हणून चार प्रश्न तिने विचारले होते इतकंच.

'काय करनार म्हंजी काय मावशी?' 'म्हंजी कोनच्या गावाला जान्हार नशीब काढन्यासाटी?' 'तसा कायच ठराव केल्याला नाय म्या.' 'मंग चलतो का मपल्यासंगती?' 'तुमी कोनच्या गावाला जान्हार?'

'आरे, दतबा पाटलाचं लगीन उराकलं आता. चार दिसांनी त्यांची

छावनी हलनार इथून. मी त्यांच्या लोकांसंगती जायाचं म्हनतेय.

'तू काय करनार- ते समदे फौजी लोकं. त्यांच्यात तुला कोन घेईन?'

'शिपाई गड्यांसंगती बुनगे मस लागात्या. बुनगे, बाया; मस समदे लागातेत त्यानला. बजार भरतो. त्यात भरेकरी लागात्यात. वनजारी लोक माल भरून आनायला लागात्यात. करमनुकीसाटी पवाडे म्हननारे शाईर, गोंधळी लागात्यात. मस आवा सुदिक लागत्या, तुला सांगते मी. हे भटारखान्यात मी काम करीतच व्हते ना इथं- तसंच करीन मी. इचारलंय म्या मालकाला. त्यो म्हनला, चल. तुपल्या मर्जिनी येनार आसशील तर चल. चांगली धावून काम करिती. तू पण कोनालाच नकोशी होनार नायीस. मी इथं ह्या गावात न्हावून तरी काय करू आता? मी रंडकी-बोडखी बाई. मला कोंचाच आगापिछा व्हायल्याला नाई. एक लेक हाये. ती तिच्या घरी नांदायची तशी नांदती. ह्या लोकांच्या संगती गेले तर फुकाटमंदी तीर्थं पघायला मिळतीन. काशी-वनारसी करीन. इथं न्हावून तरी काय उजेड पडनार? गाल्हेर, उज्जैन आशी लय लामलामच्या ठिकानी राज हाये पाटलाचं.'

'मला काय काम मिळन त्यांच्यात?'

'करनाऱ्याला कामाचा तुटवडा नसतोय कुढंच. मला म्हतारीला तेवढाच आधार व्हईन. आन कोन्ही सांगावा, तुपलं नशीब सुद्दा फळफळंल.'

दसरतला पटलं. नाहीतरी तो कुठं ना कुठं जाणारच होता ना! शिंद्यांच्या लष्करात उलट जास्त सुरक्षित. आधाराला तुळसाबाई. आणखी काय पाहिजे? गावात आणि लष्कर हलताना त्याला पुष्कळ नव्या गोष्टी माहीत झाल्या, होत गेल्या. ज्या गावात त्याला तुळसाबाई भेटली त्या गावाचे नाव चांभारगोंदे. दतबा पाटील यांचे खरे नाव दत्ताजी शिंदे. ते वर तिकडं हिंदुस्तानात ग्वाल्हेरचे राजे आहेत. पण चांभारगोंदियात सगळे त्यांना दतबा पाटील म्हणतात. यांचे वडील रानबा पाटील. राणोजी शिंदे. ते मोठे राजे होते. त्यांचा थोरला मुलगा जयाजी. त्यांना जयाप्पा म्हणत. ते मारवाडात राजपूत लोकांशी लढत असताना घात करून मारले गेले. ते अंघोळ करायला गेले अन् अंग पुसण्यासाठी अंगावर वस्त्र पडले असता मारवाडी लोकांनी घात करून त्यांना मारले. सगळ्या मारेकऱ्यांना लगेच ठार करण्यात आले. पण लाखांचा पोशिंदा गेला तो गेलाच. जयाप्पा आणि दतबा थोरले धाकले भाऊ. रानबा पाटलांचे मुलगे. जवान मर्द शिपाईगडी. शिंदे तिकडे ग्वाल्हेर उज्जैनचे राजे असले तरी लग्न करण्यासाठी चांभारगोंदे येथे येण्याचा त्यांचा रिवाज आहे. अन् महाट देशात त्यांच्या अनेक ठिकाणी पाटीलक्या आहेत. जयाप्पा यांचा एक मुलगा जनकोजी नामे आहे. त्यास जनकोजीबावा म्हणतात. तो बाप आणि चुलता यांच्यापेक्षा अधिक चलाख आहे. तरीही वडिलांची मर्यादा तो उत्तम पाळून असतो. त्याची बाईल काशीबाई नावाची ह्या लष्करात आहे. ह्या राजे लोकांना कितीही बायका करता येतात. त्यांच्यावर कोणतेच बंधन नसते. अन् बायांची सुद्धा जिंदगी बनते ना! फक्त

राजा मेला की त्यांना त्याच्या सरणात जित्यापणी जाळून घ्यावं लागतं. तसा कायदा असतोय. म्हणजे रिवाजच असतोय. पण कायदा असल्यासारखा. आता; राजाची राणी व्हयाचं म्हटल्यावर तेवढी जोखीम पत्करावीच लागते ना! ह्या लोकांला बायकांचा तोटा नसतोय. त्यांना कशाचीच तुटार भासत नाही. बायका तर असतातच अन् आणखी रखेल्या सुद्धा असतात. जयाप्पा यांचा घात झाल्यावर दतबा पाटील अन् जनकोजीबावा असे चुलतेपुतणे मारवाडात होते अन् त्या दोघांनी आख्खा मारवाड देश बेचिराख केला होता.

तुळसाबाईच्या ओळखीने दसरतला एका भटारखान्यात लाकडं फोडायचं काम मिळालं. त्याच्या लायकीचं तेच काम होतं. आणि त्याच्याबद्दल त्याची काहीही तक्रार नव्हती. ते तो सहज करू शकत होता. त्याला गाव, घर, आईवडील, बायको, मुलगा यांच्या आठवणी येत. लाकडे फोडताना त्या विशेष करून येत. प्रश्न पडत. तेच ते प्रश्न. आपल्यापाठी त्या सगळ्यांचं काय झालं असेल? आपला बाप आपल्याला पळून जायला सांगताना सटवीच्या नशीब कोरण्याच्या कसल्या गोष्टी बोलला? काळाच्या पटावरील एका क्षणाच्या फटकाऱ्यासरशी दसरतचे आयुष्य पुरते बदलून गेले होते. आठवणी होणारच. उलट आधी तरी तो एका बेभान अवस्थेत उपाशीपोटी धावत होता. त्याला बाकी विचार करायला सवडच नव्हती. आता मनाने तो अधिक स्थिर झालेला होता. त्याला गर्दीचे संरक्षण होते. विचार मनात येत. आणि ते मनातच ठेवावे लागत. बोलणार कोणाशी? त्याला कशाचीही उत्तरे मिळण्यासारखी नव्हती. तरीही कुढत बसणं त्याला परवडणारं नव्हतं. खेरीज आसपास रात्रंदिवस सतत हालचाल असे. एवढे मोठे लष्कर, बुणगे, बायका. भरेकरी, बाजारकरी. करमणूक करणारे शाहीर, गोंधळी, भराडी, नाचणाऱ्या बाया. गाड्या, बैल, हत्ती घोडे, लोहार, सुतार. एक भलंमोठं फिरस्तं गावच होतं ते. पाण्याची सोय बघून मुक्काम बसायचे. आसपासच्या गावांतून दाणागोटा, भाजीपाला, वैरण, घोड्यांसाठी चंदी, अशा गोष्टी आणाव्या लागत. रोज बाजार भरत असे. महाट मुलुख असेतोवर सगळे बैजवार असेच चालले होते. पण मुघलाई लागली अन् लुटी होऊ लागल्या. अशी मुघलाई कशी काय लागली ते आधी दसरतला कळेना. त्या गावांमधले लोक सुद्धा महाट देशचीच भाषा बोलणारे होते. मग मुलुख कसा बदलला, हे त्याला कळेना. मग कोणीतरी म्हणालं, की मुलुख म-हाटच पण ताबा मोगलांचा आहे. इतक्या सगळ्या प्रवासात अजूनही दसरतला दतबा पाटील दिसले नव्हते. पण ते तसं फार काळ राहायचं नव्हतं.

तर झालं असं की लष्कराचा मुक्काम जरा रानाच्या जागेत होता. मोठाल्या पठाराचा अन् दऱ्याखोऱ्यांचा देश होता. दाट झाडी होती. पण पाण्याची सोय चांगली होती. म्हणाले, मुलुख औरंगबाजच्या वरल्या अंगाचा फर्दापूर का काय अशा नावाच्या गावाच्या नजीकचा आहे. इथल्या मुलखात वाघ आणि सिंहांचा संचार असतोय. पण आपल्याला त्यांची कायच भीती नाही. इतक्या माणसांच्या वस्तीत ते फिरकणार नाहीत. शिवाय जाळ असतोच कायम. ते माणसांना आणि जाळाला घाबरतात. पण आपल्या सोबत बोकड, एडके आपल्या खाण्यासाठी असतात. बोल्हाईवाले बोकड खात नाहीत म्हणून त्यांच्यासाठी एडके. उपाशी जनावर भुकेपोटी दबा धरून त्यांच्यावर हल्ला करून त्यांना मारू शकतं. तेवढ्यासाठी सुधरून जागसूद राहिलं की झालं. म्हणजे तसं होत काहीच

नाही. पण सुधरून राहायचं फक्त. हे तुळसामावशीने दसरतला सांगितलेलं. पण सुधरून राहायचं म्हणजे काय करायचं? म्हणाली, आपला जीव बचावून राहायचं बाबा. दुसरं काय? एक वेळ एखादा बोकड नेला त्यानी मारून तर काय बिघडत नाही. पण आपल्या जीवाला ढका लागता कामा नाही. तितकं जपायचं. ज्याच्या भटारखान्यासाठी दसरत लाकडं फोडायचा त्याच्याकडच्या लाकडांच्या साठ्याजवळच तात्पुरती दावण करून बोकड बांधलेले होते. दसरत तिथेच झोपत असे. तुळसामावशी तिथंच आसपास पडायची. तीही त्याच भटारखान्यात काम करायची. ते मायलेक एकमेकांना धरून राहात आले होते.

रात्री उशिरा कधीतरी एका उग्र, घुरट वासाने दसरतला जाग आली. अचानक हा असा इतका घुरट वास कुठून आलाय? की भास होतोय आपल्याला? त्याने डोळे चोळत आसपास पाहिलं. अंधार होता. चुल्हांगणं विझलेली होती. उजेड नव्हताच. लांब कुठे कदाचित पेटलेले पलिते घेऊन काही शिपाई जागे असतीलही. पण दसरतच्या आसपास सारा अंधारच होता. काही वेळाने त्याचे डोळे अंधाराला सरावले. त्याची नजर बोकडांकडे गेली. ते सारे चमत्कारिक रित्या स्तब्ध उभे होते. ते पुतळ्यांसारखे स्तब्ध उभे होते. दसरतला ते विचित्र वाटलं. त्याने आसपास निरखून पाहिलं. घुरट वास पुन्हा जाणवला. आणि त्याला सगळ्याचंच कारण समजलं. अगदी दहा पावलांवर बिबट्या दबा धरून बसलेला होता. याच्यात आता आपण काय करायचं? बोंब मारायची? त्याला वाटलं, मारावी. पण त्याच्या तोंडातून शब्दही फुटेना. बिबट्याच्या असण्याच्या दहशतीने त्याचीही वाचा गेली होती. पण तरीही दसरत उठला. हातात चांगली मोठी धपली घेऊन उभा राहिला. बिबट्या सावधपणे त्याच्याकडं बघत होता. आपण असे उभे राहिलो तर तो निघून जाईल असं काहीसं त्याला वाटत होतं. अखेर जनावरसुद्धा माणसाला भितंच. माणसाच्या हातातलं हत्यार त्याच्याकडं कुठं असत? अर्थात इतका विचार दसरत थोडाच करत होता? ती त्याची त्या प्रसंगाची उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. बिबट्या आणि दसरत आपापल्या जागी होते. बिबट्या मेचत नव्हता. कदाचित जास्त भुकेलेला असेल. हातातोंडाशी आलेली शिकार अन् हे मधेच माणसाचं विघ्न उभं राहिलेलं. तो अंदाज घेत होता. आपण आपल्या हातातलं लाकूड हलवलं तर तो भिऊन निघून जाईल असं दसरतला त्याच्या अंतर्मनात वाटलं असेल किंवा भीतीपोटी त्याच्या हातातलं लाकूड थरथरलं असेल, पण त्याच क्षणी बिबट्याने दसरतच्या अंगावर झेप घेतली. त्या झेपेने गर्भगळीत होऊन किंवा अगदी योगायोगाने ते झाले असेल पण जेव्हा बिबट्याने दसरतच्या अंगावर झेप घेत जबडा वासला, तेव्हा दसरतच्या हातातली ती मोठी धपली बिबट्याच्या घशात घुसली. तिच्यासोबत त्याचं मनगटही त्याच्या जबड्यात गेलं. दसरत कोसळला पण पुन्हा उठून उभा राहिला. त्याचा हात अडकलेला होता हे असेलच. पण मुख्य म्हणजे बिबट्या अचानक स्थिर झाला होता आणि त्यामुळे दसरतला सवड सापडली होती. झालेल्या धडपडीच्या आवाजाने तुळसाबाई जागी झाली. डोळे उघडून ते चोळत तिने पाहिलं तेव्हा तिला ते दृष्य दिसलं. बिबट्याच्या तोंडात दसरतचा हात अन् बिबट्या जागच्या जागी उभा. तिने चमत्काराने आऽऽ वासला. पण अंगभूत हुषारीने तिने आवाज केला नाही. तिने आणखी लोकांना उठवलं. काय झालंय हे दरम्यान दसरतच्या लक्षात आलं. तो हळूच म्हणाला, 'मावशी घाबरू नको. जनावराच्या घशात लाकूड आडकलंय. ते कायच करणार

नाही. त्याला धरून ठेवण्यासाठी मी माझा हात आत ठेवलाय.' आणखी लोक उठले. त्यांनी टेंभे पेटवले. त्या सगळ्यांनी हा चमत्कार उघड्या डोळ्यांनी पाहिला. कोणाचीही त्यांच्या जवळ जाण्याची छाती होईना. 'घाबरू नका. ते कायच करू सकत नायी. रस्सी आना आन खुशाल बांधा त्याला, ' दसरत म्हणाला. कोणीही हिंमत करेना. अखेर तुळसाबाईनेच ती केली. नंतर धीर येऊन आणखी काही आले. त्यांनी त्याचे पाय बांधले. ढिलेच बांधले. तो पडू नये पण ताबा राहावा अन् दसरतचा हात नीट सुटावा यासाठी. बिबट्या एकदम सुतासारखा सरळ होता. त्याला काहीही करता येत नव्हतं. त्याचा घसा लाकडाच्या धपलीने पुरता गच्च झालेला होता आणि तो कासावीस झालेला होता. त्याला कोणत्याही परिस्थितीत ते लाकूड बाहेर काढून पाहिजे होतं. पण ते कोण काढणार? दसरतने त्याचा हात काढून घेतला तेव्हा लोकांनी बिबट्याचा जबडा सुद्धा दोरखंडाने बांधून टाकला. दसरतच मनगट रक्तबंबाळ झालेलं होतं. पहिल्या झटक्यात बिबट्याचे दात त्याच्या मनगटात घुसले होते. बाकी लोक पाहिलेल्या चमत्काराच्या कैफात एकमेकात बोलत असताना तुळसाबाईने तत्परतेने त्याच्या जखमा पुसून त्यांच्यावर मायेने तेलपाणी केलं.

सकाळपर्यंत छावणीभर बातमी झाली. सगळीकडे तीच चर्चा. वाघाच्या तोंडात हात घालून त्याला धरून आणला या माणसानी. काय हिंमत म्हणायची बाबा! अन् साधा शिपाईगडी सुद्धा नाही. लाकूडफोड्या आहे म्हणतात. कोणाच्या तरी भटारखान्यात लाकडं फोडतो. म्हणजे; आहे, तसा तगडा आहे. पण बुणगाच आहे. हिंमतीला तोड नाही त्याच्या. अंगावर आलेल्या वाघाच्या तोंडात हात घालायचा म्हणजे साधी गोष्ट नाही बाबा!.... साहजिकच बातमी दतबा पाटलांपर्यंत गेली. म्हणाले, असं करता असं झालं.

'घेऊन या त्याला. ' पाटलांचं फर्मान सुटलं.

दसरत भांबावून गेला होता. केवळ भीतीपोटी त्याने जे केलं, त्याची मोठ्या बहादुरीची गप तयार झाली होती. तशी झालीय हे त्याला दिसत होतं. सारखे प्रश्न. कसं केलं अन् कसं झालं. आणि नीट उत्तरं द्यायला सवड सुद्धा देत नसत लोक. उत्तरंही तेच देत बरीचशी. जणू त्यांनीच ते केलं होतं. त्याला नीट झोपून सुद्धा दिलं नव्हतं लोकांनी. अखेर तुळसाबाईच त्याची ढाल झाली. तीच लोकांना सांगू लागली, त्याला इचारीत बसून त्याला तकलीप नका देऊ. झोपुंद्या त्याला. मीच सांगते तुमाला. खुद मपल्या डोळ्यांनी पाहिल्यालं हाये म्या समद्यांच्या आंधी. आणि सकाळी ही राजाच्या फर्मानाची बातमी. तिच्या मनातल्या आनंदाला आभाळ ठेंगणं झालं.

'मी म्हनली व्हती ना तुला, का देवाच्या आसीरवादानी तुपलं नसीब फळफळन सुद्दा. आता खुद राजानी बलावलं तुला. आली का नायी तुला परिचिती! आरे, वाघाच्या तोंडात हात घालनारा मरद हाये मपला ल्योक. केवढी हिंमत!... ' तुळसाबाईने दसरतच्या डोक्यावर दोन्ही तळहात फिरवून आपली बोटे स्वतःच्या कानशिलांशी मोडली. आणि ती तिच्या परीने राजाच्या समोर कसं जायाचं, कसं उभं राहायचं, कसं वागायचं, नजर कशी ठेवायची याच्यासाठी मार्गदर्शन करू लागली. त्याची तितकी गरज उरली नाही. कारण राजाचे जे हुजरे त्याला बोलवायला आले, तेव्हा त्यांनी त्याच्याकडून सगळी तालीमच करून घेतली. चालत कसं जायचं, कसं उभं राहायचं, कुर्निसात कसा करायचा, राजा विचारील तितक्या प्रश्नांनाच फक्त उत्तरं कशी करायची असं कैक. राजाचं बोलणं संपलं की

पुन्हा कुर्निसात करायचा अन् परत निघताना त्याला पाठ दाखवायची नाही. खाली वाकून अशा अशा रीतीने डावा हात स्वतःच्या छातीवर आणि उजवा जोहाराच्या मुद्रेत हलवत मागे यायचं.

फारसा डामडौल नसलेल्या एका शामियान्यात राजा एका चौरंगावर ठेवलेल्या गादीवर अगदी साधेपणाने बसलेला होता. हुज़ऱ्यांनी शिकवलेले तंतोतंत पाळत राजाला कुर्निसात करून मान खाली करून दसरत उभा राहिला. राजाच्या नजरेला नजर द्यायची नाही, असं त्याला बजावून सांगण्यात आलेलं होतं.

'नाव काय?' 'दसरत.' 'गाव?' 'खराडी.' 'पुण्याजवळची?' 'जी हुजूर.' 'लष्करमधी कधीपासून आहेस?'

'बुनगा हाये. भटारखान्यात लाकडं फोडितो. चांभारगोंद्याला

मिळालो हुजूर.'

'समशेर चालवतो?' 'जी हुजूर.' 'घोडेसवारी?' 'करतो. पन दोन्हींची तितकी तयारी धरून नायी हुजूर.' 'का?'

दसरत गप्प झाला. काय उत्तर देणार? म-हाट देशात जन्मला होता तर या गोष्टी खेळ म्हणून तो शिकलेलाच होता. पण या दोन्ही गोष्टी बाळगायची

त्याची ऐपत नव्हती. त्याच्या बापाने त्याला कधीच लढाईवर जाऊ दिलेलं नव्हतं. तयारी धरून कसा राहणार तो? राजा विचारील त्या प्रश्नाला उत्तर हे दिलंच पाहिजे, असं त्याला सांगण्यात आलेलं होतं. काय उत्तर देणार? त्याला घाम फुटला.

'लढाईत कधी गेला होतास का नाही?' 'नायी हुजूर.'

'नाही? अरे, महाटा बच्चा आहेस. इतका तगडा आहेस. वाघाच्या

तोंडात हात घालण्याची हिंमत दाखवतोस. अन् झुंज खेळलेला नाहीस?'

दसरत पुन्हा गप्प. पण मग राजाने वेळ दवडला नाही. शेजारी उभ्या असलेल्या लोकांना म्हणाला, 'अरे, असं करा. याला उद्यापासून शिपायात घ्या. शिकवा. त्याच्या तयारीचा खुलासा मला देत चला. नीट तयार झाला तर खासगीत घ्या. वाघाशी जुझणारा माणूस साधा शिपाई सुद्धा नाही, हे आपल्याला शोभा देणारं नाहीय,' असं म्हणून त्याने स्वतःच्या उजव्या पंजाचं बोट किंचित वर उचललं. राजाच्या अशा संकेतानंतर काय करायचं हे दसरतला आधीच शिकविण्यात आलेलं होतं. ते त्यानं अगदी तंतोतंत पाळलं.

दुसऱ्या दिवसापासून दसरतची शिकवणी सुरू झाली. जानबा वाबळे नावाचा एक वृद्ध सरदार त्याचा शिक्षक झाला. जानबाच्या लक्षात आलं की पोरगा तगडा आहे, पण एकदम अडाणी आहे. त्याला जवळपास काहीच माहीत नाहीय. मग अगदी साध्या साध्या गोष्टींपासून शिकवणी सुरू झाली. समशेर कशी तयार करायची. ती करताना लोहाराशी आपलं नातं बनवायला आणि राखायला कसं शिकायचं, इथपासून ते तिला पाणी कसं पाजायचं आणि काय केलं असता कशी तलवार तयार होते इथपर्यंत. आणि लढताना ती कशी धरायची, कोणत्या परिस्थितीत कोणते पेच मारायचे असं कितीतरी. जानबाने आधी भीमथडी तट्टू त्याच्यासाठी वापरून पाहिलं. पण मग त्याच्या लक्षात आलं की दसरत एखाद्या पठाणासारखा उंचापुरा, मोठ्या अंगकाठीचा आहे. त्याच्यासाठी तट्टू उपयोगाचं नाहीय. त्याला मोठा अरबी घोडा पाहिजे. तो निवडल्यावर आधी त्याला ताब्यात कसा

आणायचा, आणल्यावर त्याच्याशी नातं कसं तयार करायचं, घोड्याची सेवा- त्याचा खरारा, खाणं-पिणं कसं करायचं अशा कैक गोष्टी. गडी होनहार आहे. पण तयार व्हायला जरा वेळ लागेल, असा एक अहवाल जानबाने दतबा पाटलांना देऊन टाकलेला होता. दसरत खूष होता. आपल्याकडे आपला स्वतःचा घोडा आहे. आपली स्वतःची ढाल आणि समशेर आहे. चिलखत अजून नाही. पण तात्पुरतं आणून ते कसं वापरायचं ते जानबाकाकांनी शिकवलंय. बुणग्यातून शिपायात येणं हीच मुळात त्याच्यासाठी मोठी गोष्ट होती. भेदरून बिबट्याच्या घशात लाकूड घातलं अन् आपण शूरवीर ठरलो, हे त्याचं त्यालाच माहीत होतं. जानबाकाका जुने, अनुभवी गडी. राणोजी पाटलांपासून शिंद्यांच्या लष्करात होते. कैक लढाया खेळलेले, अंगावर अनेक जखमांचे व्रण बाळगत असलेले. ठिकठिकाणी झालेल्या झुंजींच्या कितीतरी गोष्टी त्यांच्याकडे होत्या. फावल्या वेळात ते त्या दसरतला सांगत असत. मजल-दरमजल प्रवास चाललेला असताना दसरतची शिकवणी निर्वेध चालू होती.

त्याच्यानंतर असा मुलुख लागला की तिथं मुसलमान बोलतात त्याच्यासारखी भाषा बोलणारे लोक होते. तिथं म्हणाले, हा माळवा देश. आता आपली शिंदेशाही अन् होळकरशाही सुरू झाली. भाषा अलग पण हा म-हाट लोकांचा देश. आता लुटमार नाही करायची. त्याची गरजही पडत नसे हे अर्थातच. सगळ्या गोष्टी लोक खुषीने आणून देत असत. नजर जाईल तिथवर सगळा सपाट मुलुख. माती लोण्यासारखी मऊ. माणूस मवाळ आणि भेदरट. त्या मानाने महाट लोक जास्त रगील अन् तिखट. आपला मुलखच मुळात दगडधोड्याचा. जसा मुलूख तशी माणस. हे दसरतचं आकलन. ते त्याने स्वतःशी ठेवलं. उज्जैन नगरीत लष्कर पोहोचलं, तेव्हा लोक म्हणाले, आता चारदोन महिने तरी पाटलांचा मुक्काम इथं राहील. लग्न करून आलेत तर थोडा दम तर घेतील या त्यांच्या स्वतःच्या नगरीत. अर्थात तसं खात्रीने काहीच सांगता नाही येणार. पण अंदाज एक आपला.' खुद्द जानबाकाकांनी तो प्रकट केल्यावर दसरतची खात्री झाली. म्हणाले, "क्षिप्रा नदीच्या काठी छावणी आहे आपली. पण तू माझ्या घरी राहायला ये. माझ घर इथं या नगरातच आहे. राणोजीबाबांच्या सोबत आलो ते इकडंच रहिवसलो. माझ्यासारखे आणखी कैक महाटे आहेत. दतबा पाटलांचा मुक्काम इथं आहे, तोवर राहू घरी. बाकी हलती छावणी नेहमीसाठी आहेच.' दसरत म्हणाला, माझी तुळसामावशी आहे, तिला कुठं सोडू? तिला माझा आधार आहे. माझ्या सख्ख्या आईने मला एकदा जन्म दिला. तर हिने पुन्हा दुसरा दिलाय. तिने मला वाचवलं नसतं तर चांभारगोंद्याला लाकडाच्या ढिगाखाली कधीचाच मरून गेलो असतो मी.

'आरे मंग आन की तिलायबी. दोन मानसं सपादायला काय आडचन

नायी आपल्या घरात.' जानबाकाका म्हणाले.

उज्जैन हे देवळांचं गाव. महाकालेश्वर मंदीर, कालभैरव मंदीर, मंगलनाथ मंदीर, हरसिद्धीदेवी मंदीर, गढकालिका देवी मंदीर, नाथपंथी लोकांची राजा भर्तृहरी गुंफा, क्षिप्रा काठीचे घाट. असे आणखी कितीतरी दसरतने पाहिले. इतकी देवळं अन् इतके घाट अन् पूजा-अर्चा या भानगडी त्याने याच्या आधी कधीही अनुभवलेल्या नव्हत्या. अंगाला राख फासलेले, दाढ्या वाढविलेले आणि भगव्या कफन्या घातलेले असंख्य माजोरी

भिकारी त्याने या शहरात पाहिले. माजोरी अशासाठी की त्यांना पाहिलं की त्यांच्याविषयी दहशतच वाटे त्याला. अन् ते सगळे एकजात लठ्ठ, दुनियेला न जुमानणाऱ्या पुष्ट वळूसारखे होते. रेशमी कद नेसलेले आणि अंगात जानवे ल्यालेले उघड्या अंगाने रस्त्यातून चालणारे अनेक तुंदिलतनू ब्राह्मण त्याने पाहिले. ते त्याला त्यातल्या त्यात ओळखीचे वाटले. पण एकूणात हे सगळं काहीतरी विचित्र आहे. आपल्या दगडधोंड्याच्या मुलखापेक्षा वेगळं आहे. इथे बिनकामाचे ऐतखाऊ लोक पुष्कळच दिसतात, असं त्याचं मत झालं. ते अर्थातच त्याने स्वतःशी ठेवलं. आपल्याला काय वाटतं ते जरुरी नसताना आणखी कोणाला कशाला सांगा, असा अंगभूत गावठी शहाणपणाचा विचार त्याने केला.आपण मराठे, दगड-धोंड्यातले लोक. आपल्या लोकांना अशा ऐतखाऊ लोकांना पोसण्याची चैन परवडत नसेल. पण इथल्या लोकांना ती परवडतेय असे दिसते, असं त्याला वाटलं. मराठी मुलुखात, पेशव्यांच्या पुण्यात अशा प्रकारे मुलुखभरातल्या सगळ्या ब्राह्मण भटभिक्षुकांना असेच पोसले जात असल्याचे त्याला माहीत नव्हते. गावठी गडी असल्याने तो अशा ज्ञानाच्या संचयापासून मुक्त होता, इतकेच. अर्थात ब्राह्मण हे राजे लोकांच्या जवळचे असतात. ते उद्दामपणे वागतात. ते सारा वसूल करण्यासाठी येतात. तो नीट मिळाला नाही तर मारझोड करतात. कुणब्याला ते सारे निमुटपणे सहन करावे लागते, हे त्याला माहीत होते. याच्या अगदी उलट परिस्थिती आणि मनःस्थिती तुळसाबाईची होती. मंदिरे, घाट, ब्राह्मण, गोसावी यांच्या दर्शनाने ती अतोनात भारावून गेलेली होती. पाटलांच्या फौजेत आल्यानेच केवळ हे भाग्य आपल्या वाट्याला आलेले आहे अशी तिची ठाम भावना झाली होती. कष्ट करून मिळविलेला सगळा पैका ती रंडकी बाई त्या सगळ्या ठिकाणी अत्यंत श्रद्धेने उधळत होती. ती सगळीकडे दसरतला सोबत घेऊन जात होती. तिच्या श्रद्धेचा त्याच्या मनात पडणारा उजेड इतका तीव्र आणि कोमल होता की त्याला आपले मन तिच्याजवळ खुले करताच आले नाही. तिला वाटते ते आणि ती करतेय तेच कदाचित योग्य असेल असे त्याला वाटले. अन् पैका काय, आपल्याकडे आहे तो तिचाच आहे. त्यात तिला अडचण येणार नाही याची आपण काळजी फक्त घ्यायची, अशी खूणगाठ त्याने मनाशी बांधली.

नगरीत कोणत्या तरी निमित्ताने कोणता तरी उत्सव होता. त्यातल्या नृत्य-गायन, संगीत अशा अनेक पेशकशींसकट कुस्त्या, ढाल-तलवारीसह युद्धांची प्रात्यक्षिके, घोडेस्वारी असे मर्दानी खेळ सुद्धा होते. या मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिकांना जानबाकाका त्याला खास घेऊन जात होते. सगळ्या प्रात्यक्षिकात आणि शर्यतीत अनेकांनी भाग घेतला होता. काकांनी त्याला कुठेही भाग घ्यायला लावला नाही. पण घोडेस्वारी त्याने लक्ष्यपूर्वक बघावी असे त्यांनी सांगितले. ते त्याने अर्थातच केले. सगळ्यात शेवटी दतबा पाटील; राजे खुद्द एकटेच घोड्यावर स्वार होऊन त्याला दौडावत आले. राजा शर्यतीत थोडाच भाग घेणार? अन् त्याच्याशी कोण कशी शर्यत लावणार? तो सवालच नव्हता. पण पाटलांच्या घोडा पळविण्याच्या विधीने त्या कार्यक्रमाची सांगता झाली. आधी हलक्या चालीने निघालेला तो घोडा हळूहळू वेग घेत वावटळीसारखा सुसाट धावत होता. वळणांवर कुठे आणि कसा वेग कमी करायचा, तो नंतर कधी कुठवर आणि किती वाढवायचा हे त्याला आपसूक कळत असावे असे दिसत होते. पाटलांच्या हाती लगाम होता. पण त्या संपूर्ण

दौडीत त्यांनी तो कधीही खेचला नव्हता. त्यांच्या उजव्या हातात परजलेली तलवार होती. तिचा कोन अधूनमधून बदलत असावा असा दसरतला भास होत होता. कदाचित त्या बदलत्या कोनानुसार संकेत मिळून घोडा धावत होता. कारण वेग कमीजास्त करीत वळणे घेत तो धावत होता. त्यांची मांड खोगीरावर गच्च होती. पाय रिकिबीत गच्च होते. किंवा कुठेच काहीही गच्च नव्हते. सगळे एकजीवच होते. दसरतने त्यांना लांबून का होईना, पहिल्यांदाच नीट पाहिले. ते काळ्या वर्णाचे, ठेंगू आणि गच्च अंगाचे असावेत असे त्याचे मत झाले. एवढ्या भक्कम अंगयष्टीच्या राजाचे शरीर एखाद्या फुलपाखराला पाठीवर घ्यावे तसे घोड्याने पेलले आहे असे त्याला वाटले. किंवा घोडा आणि राजा यांच्यात वेगळेपण असे काहीच उरलेले नव्हते, असे त्याचे मत झाले. जानबाकाकांनी त्याला राजाच्या दौडीबद्दलच विचारले तेव्हा त्याने आपल्या मनात आले ते सांगितले. अखेर म्हणाला, 'लगाम न खेचता घोडा असा दौडवता येतो, ही अचंब्याची गोष्ट झाली.' जानबाकाका म्हणाले, 'तुला हे समजण्याचीच मी वाट बघत होतो. आता मी राजाला तुझ्याबद्दल काय सांगायचंय ते ठासून सांगू शकेन.'

असं एक असतं ना, की संगीत निर्माण करणारा वादक आणि त्याच्या हातातलं तंतुवाद्य यांच्या मेळातून ते निर्माण होत असतं.

कोणताही गुरू त्यासाठीचे नियम शिकवत असतोच. ते नीट आत्मसात केले की तुम्ही संगीत निर्माण करता. ते ठीकच असतं. पण संगीताच्या निर्मितीच्या ज्ञानाची ती फक्त सुरुवात असते. हे असे असते हे सगळी शिस्त पाळूनच कळत असते. एरवी प्रगल्भ वाटणाऱ्या या प्राथमिक पायरीवर शिष्याला समजा समजले की ही फक्त सुरुवात आहे. तंतुवाद्य आणि आपण यांच्यातील एकतानता निर्माण होण्याची ही पहिली पायरी आहे. याच्यानंतर वाद्य आणि आपण यांच्यात एक प्रकारचं जैविक नातं निर्माण करण्याची गरज त्याला भासली की तो योग्य दिशेने चालला आहे हे गुरूला समजतं. आणि याच्यापुढचा प्रवास शिष्याला गुरुविना करायचा असतो, हेही त्याला माहीत असतं. कारण शिष्य आणि त्याच्या हातातलं वाद्य यांच्यात जैविक नातं निर्माण करणं फक्त शिष्याच्याच हाती असतं. म्हणजे असं की शिष्याच्या हाताचा म्हणा व बोटांचा स्पर्श वाद्याला झाला की त्याच्या मेंदूतील संवेदना त्याच्या बोटातल्या धमन्यातून वाद्यातील स्फुरणशील सूक्ष्म कणांमध्ये प्रवाहित होतात. त्या तिथे त्याच्या मेंदूतील कंपने प्रवर्तित करतात. एका प्रकारे हा सजीव पेशींचा वाद्याच्या शरीरातला, तिथल्या कणांना सजीव आणि स्फुरणशील करणारा प्रवास असतो. वादकाचा मेंदू किंवा मन यांचे वाद्यातील कंपनांशी सेंद्रिय नाते तयार होते. त्या दोघात कोणतेही वेगळेपण उरत नाही. तेव्हाच श्रेष्ठ संगीत निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. ही अशीच गोष्ट योद्धा आणि त्याची हत्यारे यांच्यात निर्माण होण्याची शक्यता आणि आवश्यकता शिकणाऱ्याला जाणवली की तो योग्य त्या बिंदूवर आहे, हे गुरूला समजतं. योद्धा, त्याचा घोडा, त्याची तलवार यांच्यात अशी जैविक एकतानता साधण्याची गरज त्याला दिसली की श्रेष्ठ योद्धा निर्माण होण्याचे रस्ते खुले होतात. म्हणजे, श्रेष्ठ योद्धा त्यातून निर्माण होईलच अशी खात्री नाही देता येत. पण तसे होण्याच्या शक्यता खुल्या होतात. गुरू इतकेच करू शकतो. पुढचा प्रवास हा ज्याचा त्यालाच करायचा असतो.

जानबाकाका वाबळे यांनी दसरतला या गोष्टी शक्य होतील तितक्या फोडून सांगितल्या. म्हणाले, 'मला स्वतःला हे माझ्या आयुष्यात एक योद्धा म्हणून जमले आहे असा दावा मी करणार नाही. किंबहुना मला ते जमलेलेच नाहीय. पण मला इतके दिसलेले आहे, हे नक्की. ते मी तुला सांगितले आहे. पुढचा रस्ता तुझा तुलाच शोधायचा आहे. कारण तो ज्याचा त्यालाच शोधायचा असतो. तो तुला दिसेल वा न दिसेल. मी इथपर्यंत आणू शकलो याचा मला आनंद आहे. पण माझ्या शिकविण्याची ही मर्यादा आहे. बहुतेक कोणाही शिक्षकाची तीच असेल. तुला हे कितपत कळत असेल हे मला माहीत नाही. पण यापुढचा प्रवास तुला एकट्याने करायचा आहे. तोही अर्थात तुला करायचा असेल तर. तशी निकड तुला वाटत असेल तर. मनाचा कणखरपणा आणि स्वामीनिष्ठा जी तुझ्यात रुजली आहे, ती मी जोखली आहे. तीही उत्तम आहे. फौजेत काम करण्यासाठी इतके शिक्षण तुझ्यासाठी पुरेसे आहे.'

नंतर दसरतची नेमणूक दतबा पाटलांच्या खासगी सेवेत झाली. आपण त्याची परीक्षा करू शकता, अशी जानबाकाकांनी आदबीने पेशकश केली, तेव्हा दतबा पाटील म्हणाले, 'तुम्ही तीर्थरूपांपासून सेवेत. आम्हास त्यांचे ठिकाणीच आहात. परीक्षा करण्यासाठी आणि शिकविण्यासाठी आम्ही त्यास आपल्याकडे सोपविले आणि आपला अभिप्राय आला ते पुरेसे आहे.

वेगळी परीक्षा कशासाठी?'

दसरत दतबा पाटलांच्या खासगीत रुजू झाला. तेव्हा जानबाकाका म्हणाले, 'तू आता लष्करात राहायला जा. तुझ्या तुळसाबाईला सुद्धा घेऊन जा.' नंतर हळूहळू त्याच्या लक्षात येत गेले की जानबाकाका त्याच्यापासून अलिप्त झाले आहेत. त्यांच्या आपल्याशी वागण्यात एक प्रकारचा कोरडेपणा जाणवतो. आणखी नंतर हळूहळू त्याला समजत गेले की हाही त्याच्या शिक्षणाचाच एक भाग होता. कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या छत्रछायेशिवाय फौजेच्या गर्दीत त्याला आत्मविश्वासाने जगता यावे यासाठी त्यांनी तसे केले होते, किंवा असेल. किंवा आता आणखी कोणी नवीन शिष्याला दतबा पाटलांनी त्यांच्याकडे पाठविले असेल. हा त्यांच्या नित्याच्या कामाचा भाग असेल. अधिक विचार न करता दसरत राजाच्या खासगीत रुजू झाला. पुढे मग रेवाडी. तिथे दत्ताजी आणी जनकोजी या चुलत्या-पुतण्यांच्या भेटी झाल्या. मग दिल्ली येथील यमुनातीरीचा मज्मूचा टिळा. पुढे सरहिंद, लाहोर ते पुन्हा दिल्ली असा प्रवास. काय, कुठे, कशासाठी असे विचारण्याची सोय नव्हती. राजकारणे चालू होती. त्यात दसरतला फारसे गम्य नव्हते.

नजीबखान रोहिल्याचे पारिपत्य करावे. लाहोरचा बंदोबस्त करावा. तीर्थक्षेत्रे सोडवावी. आणि पटणे बंगालपर्यंत स्वारी करून क्रोड दोन क्रोड कर्ज वारण्यासाठी मिळवावा. हे मुख्य कार्यभाग नानासाहेब पेशव्याने दत्ताजीस सांगितले होते. नजीबखान अत्यंत धूर्त आणि चलाख होता. अब्दालीस पाचारण करणे, हिंदी मुसलमानांचे संगठन बनविणे, मराठ्यांच्या आक्रमणाला धार्मिक स्वरूप देणे आणि नाना प्रकारच्या भूलथापा देऊन मराठ्यांच्या पुढाऱ्यांना गाफील ठेवणे, या मुख्य गोष्टी नजीबाने केल्या. अब्दालीची रणनीती आणि नजीबाचा कावेबाज कारस्थानीपणा एकत्र येऊन ते मराठ्यांना भारी पडले. पण अब्दाली परत जाताच नजीब मराठ्यांपुढे निष्प्रभ ठरला.

नंतर एक वर्षभर दसरत दत्ताजी शिंदे यांच्या फौजेत रेवाडी, मारवाड, पंजाब, दिल्ली असा सारीकडे होता. लढाई झगडे असतच. मारवाड आणि पंजाब सरहिंद येथील राजपूत आणि जाट हे मराठ्यांइतकेच कडवे योद्धे. पण मराठ्यांचा दाब मोठा. त्यांनी यांना सुद्धा दहशत बसवली होती. त्यांचा सारीकडे दरारा होता. थोडे फार अपवाद वगळता देशभर सारीकडे चौथाई आणि सरदेशमुखी वसुलीचे अधिकार मराठ्यांना मिळालेले होते. दसरतला हे काय नीट समजत नव्हते. पण शिपाई झाल्यावर त्याला अनेक गोष्टी आणखी नीट दिसू लागल्या होत्या. सगळीकडे सगळ्या पातळ्यांवर आपमतलब फार होता. दतबा पाटलांचा दाब होता म्हणून वरवर सगळे ठीक वाटत होते. पण धनाच्या बळावर कोणीही कोणालाही सहज वश होऊ शकत असल्याचे त्याला दिसले. सरपण आणि धान्य, वैरण गोळा करणारे वणजारी, त्यासाठी दाब म्हणून जाणारे शिपाई, ते विकणारे व्यापारी, वेश्यात्मक व्यवहार करणाऱ्या स्त्रिया, गायक, वादक असे सगळे बुणगे यांच्यात लोभाचा अतोनात बुजबुजाट होता. प्रत्येक जण आपापल्या वकुबानुसार जमेल तितका जमेल तिथे हात मारत होता. नंतर अंतर्वेदी, शुक्रताल या भागात जे मुक्काम आणि लढायांचे प्रसंग आले तेव्हा नजीबखान रोहिल्याचे हेर अगदी किरकोळ मोबदला देऊन अनेक प्रकारची माहिती सहज काढून नेत असत. अशीच गोष्ट कदाचित नजीबाच्या गोटात सुद्धा असावी. असेच सारे आम लोकात सुद्धा होते. हात ओला करून कुठेही कसाही बचाव करता येतो असे मोठ्या मांडलिक राजांपासून शेठ सावकार ते अगदी भिकार माणसे यांना वाटत असे. सगळे हिंदुस्तान फंदफितुरीच्या रोगाने अतोनात ग्रासलेले होते. नजीकच्या भूतकाळात अतोनात लचके तोडले जाऊन दिल्लीच्या आसपासचा प्रदेश पुरता भोंगळा झालेला होता. इतरत्र सुद्धा सतत कोणी ना कोणी लचके तोडण्याला येतच असे. गांजणूक सार्वत्रिक होती. निष्ठा, सचोटी, प्रामाणिकता अशा बाबींना ओहोटी लागलेली होती. ओढणे, ओरपणे, ताव मारणे अशा गोष्टी बेदिक्कत सहज होत्या. म-हाट देशात ते त्याला तितके दिसलेले नव्हते. पण तिथल्या फौजेचे त्याला तरी कुठे नीट माहीत होते? त्याचा तसा कधी संबंधच आलेला नव्हता. एकदा त्याने आपले मन तुळसामावशीपुढे उघडे केले. ती म्हणाली, 'बाळा, याचा फार विचार करू नकोस. दुनिया देवाने जशी आपल्याला दिलेली आहे, ती तशी स्वीकारावी. मनाचा रस्ता धोपट असावा. जे आपल्या वाट्याला देवाने दिले आहे ते भजून खावे. कोणाला फसवू नये. आपल्या मालकाशी इमान राखावे. देवावर श्रद्धा ठेवावी. तो वरून सतत आपल्याकडे बघत असतो. आपण मेल्यावर आपल्या पापपुण्याचा निवाडा तोच करत असतो.' आणखी एका सहकाऱ्याला त्याने असे सांगितल्यावर तो म्हणाला,

'तुला जे दिसतं, ते दतबा पाटलाला दिसत नाही असं तुला वाटतय को काय? दुनियाभर कुठेही गेलास तरी माणसं ही अशीच असतात, हे तुझ्या लक्षात येईल. आपण मराठे लोक कधी काळी थोडे वेगळे असू. मी शिवाजीराजाच्या काळाची बात करतोय. माझा आजा मला सांगायचा. तो राजाच न्यारा होता. त्याचं अवसानच न्यारं होतं. तो रयतेला लेकराप्रमाणे सांभाळणारा होता. त्याच्या साध्या नुसत्या इषाऱ्यासरशी देशावरील मावळे आणि कोकणातील हेटकरी; जे त्याच्या फौजेत असत, ते काहीही करायला तयार असत. लुटालूट, खोटेपणा यांना जागाच नव्हती तेव्हा. म्हणजे शत्रूचा मुलुख त्यानेही लुटला. पण आपल्या रयतेवर त्याने प्रेम केले. आता आपले राजेच लुटारू झाले आहेत. ते स्वतःच्या रयतेला लुटतात. तेच भुकेले आहेत. ते आतून बाहेरून लुटारू झाले आहेत. जसा राजा तशी प्रजा. आता आपण आणि बाकी लोक यांच्यात जवळपास काहीच फरक उरलेला नाही. याच्यात तू आणि मी काहीही करू शकत नाही.'

अनेक कारस्थाने, कूटनीती, वकिलांचे इकडचे तिकडे जाणे आणि उलट; असे सारखे चालू होते. अंतर्वेदी, शुकरताल, बंगाल, पटना असे अनेक मुलुख आणि शब्द अनेक प्रकारे दसरतच्या कानावर येत असत. भल्या मोठाल्या नद्या, पाऊस, चिखल, राजाचे आणि बुणग्यांचे देवदेव, अशा गोष्टी सतत चालू होत्या. नजीबखान रोहिला, गाजीउद्दिन, शुजाउदौला, सुरजमल जाट, अब्दाली अशी नावे प्रत्यही कानावर पडत. पातशहा म्हणून दिल्लीला कोणीतरी मोठा राजा होता. पण त्याला काही किंमत उरलेली नव्हती, असे लोक सांगत. मुलुख तुडवले जात. चकमकी घडत. हे लष्कर लढण्यासाठी या सपाट आणि लोण्यासारख्या मातीच्या मुलखात आले आहे की देवदेव करण्यासाठी असा प्रश्न पडावा इतके सारे चालू होते. कशाचा कशाला मेळ लावावा अशी परिस्थिती नव्हती. तशात आवई आली की आफगानिस्तान नावाच्या कोणत्या तरी दूरच्या मुलखाचा राजा पंजाब नावाचा देश उतरून खाली आला आहे. आणि दिल्लीची पातशाही म्हणून जी काही आहे, ती त्याच्यापासून वाचविण्यासाठी दतबा पाटील त्याच्याशी लढायला निघाले आहेत. तिकडे सगळ्यांनी जायचे आहे.

सहा जानेवारी १७६० रोजी दत्ताजीने दिल्लीस जाऊन बायका, बुणगे, जड सामान रेवाडीस रवाना करून दिले. आणि आपण दिल्लीच्या उत्तरेस दहा मैलांवर बरारी घाट येथे अब्दालीच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी मुक्काम करून राहिला. मागे थोड्या अंतरावर त्याने जनकोजीस पाठपुराव्यासाठी ठेवले. दहा जानेवारीस सकाळी नजीबखान आपले पायदळ घेऊन नदीतून घाटावर साबाजी शिंदेवर चालून आला. रोहिल्यांच्या हातात लहान टप्प्याच्या बंदुका होत्या. मागाहून दुराणीचे लोक नजीबाच्या मदतीस आले. त्यांच्या हत्तींवर गोळीबार सोडण्याचे लहान जंबुरे होते. मराठ्यांजवळ बंदुका नसून फक्त भाले-तलवारी होत्या. घोड्यांच्या चपळ हालचालींना तेथे वावच नव्हता. तशाही स्थितीत मराठ्यांच्या अल्प संख्येने हजारो रोहिल्यांच्या झुंडीस थोपवून धरले. पण बंदुकांपुढे तलवारीचा निभाव लागेना. दत्ताजीस तळावर ही बातमी कळताच तो तसाच घोड्यावर बसून काही लोकांनिशी धावून आला. तोफा आणण्यास अवधी मिळाला नाही. दत्ताजीचा आवेश आणि नेट एवढा जबरदस्त होता की त्याने ताबडतोब रोहिल्यांस हटवून बेटापलीकडे घालवून दिले. त्या हातघाईत प्रेतांच्या राशी पडल्या. दत्ताजी आघाडीस

होता. यशवंतराव जगदाळे पडला तेव्हा त्याचे शव काढण्यासाठी दत्ताजी पुढे धाव घेत असताना एकाएकी उजव्या बरगडीत गोळी घुसून तो घोड्याखाली आला. त्याला उचलण्यासाठी जवळच्यांनी गर्दी केली. इतक्यात रोहिल्यांच्या ताज्या दमाच्या तुकड्या येऊन पोहोचल्या. त्यांनी मराठ्यांवर गोळीबाराचा सपाटा लावला. नजीबाने दत्ताजीस त्वरित ओळखले. त्याचा स्थूल ठेंगू बांधा व कृष्णवर्ण खानाच्या पूर्ण परिचयाचा होता. नजीबखान आणि कुतुबशहा धावून आले आणि दत्ताजीचे शीर कापून त्यांनी ते अब्दालीस नजर केले. बरारी घाटावरील या झोंबाझोंबीचे वृत्त जनकोजीस कळताच तो तसाच चुलत्याचे मदतीस धावून गेला. पण गोळयांच्या वर्षावापुढे भाले-तलवारींचा निभाव लागला नाही. जनकोजी जीवाची पर्वा न करता शत्रूवर तुटून पडला. त्या गर्दीत त्याच्याही दंडास गोळी लागून तो घायाळ होताच येसाजी भोईटे आणि जानराव वाबळे यांनी त्यास उचलून घोड्यावर घालून मागे आणले. सर्वत्र पळापळ झाली. ज्यास जिकडे वाट फुटली तिकडे ते निघून गेले.

उज्जैनमधून बाहेर पडून नंतर मारवाड, पंजाब, सरहिंद, शुक्रताल, अतवेदी, नजीबाबाद अशा अनेक ठिकाणी लढाईचे प्रसंग आले होते. पण किरकोळ चकमकींपेक्षा त्यांना फार मोठे म्हणता आले नसते. तरीही त्यांच्यामुळे लढाई काय असते याचा थोडाफार अनुभव दसरतला आलेला होता. तो थोडाफार अशासाठी की दबा धरून हल्ला करणे, घोडेस्वार होऊन शत्रूच्या तळात विजेच्या वेगात घुसणे आणि हलकल्लोळ मातवून पळून येणे किवा किल्ल्याला वेढा मारुन तळ देऊन राहात आतल्या लोकांची उपासमार होऊन त्यांनी शरण येण्याची वाट बघत राहणे, असे त्या लढायांचे स्वरूप होते. समोरासमोर आलेल्या दोन सैन्यांच्या लढाईचा अनुभव दसरतला नव्हता. आता तसे होईल असे सारे म्हणत होते. अशात एके दिवशी बातमी आली की नजीबखान रोहिल्याचे लोक यमुना पार करून घाटावर साबाजी शिंदे होता, त्याजवर घसरले आहेत. रोहिले आणि गिलचे संख्येने खूप अधिक आहेत. त्यांच्या बंदुकांपुढे मराठ्यांच्या भाले-तलवारींचा निभाव लागेनासा झाला आहे. तळावर दतबा पाटलांना खबर मिळताच ते सज्ज झाले. त्यांनी इतरांना तसे करण्याचा हुकूम सोडला. काही अनुभवी म्हातारे सरदार म्हणाले, सरकार आम्ही तयार होतच आहोत. पण गिलच्यांकडे बंदुका आहेत. आपल्याकडे भाले आणि तलवारी. ते अंतर ठेवून लढू शकतात. आपल्याला जवळ येऊ न देण्याची त्यांची कोशीश राहील. तो मारा सहन करीत आपल्याला त्यांच्या निकट जावे लागेल. कारण आपल्याला घुसून लढणे सोयीचे. त्याच्यात ते संख्येने खूप जास्त आहेत.

'आपली सलाह काय आहे?' 'थोडी सब्र करावी.'

'त्याने काय होणार आहे? साबाजीची तुकडी गिलच्यांनी गारद करत आणली आहे. इतका वेळ नेट धरून त्याने त्यांना थोपवले आहे. त्यांना तिथे गारद करून गिलचे थांबणार थोडेच आहेत? ते आणखी पुढे येतील. त्यात मार्ग म्हणजे आपण पळून जावे असे आपण सुचवाल. तसे केले तर ते आपला पाठलाग करतील. आणि पळणाऱ्या फौजेची लांडगेतोड किती सोपी असते हे तुम्ही जाणता. मागे जनकोजी आहे. त्याचीही फौज पळू लागेल. ती त्यालाही आवरता येणार नाही. न लढता असे भेकडासारखे पळून जात हरणे मराठ्यांच्या मर्दुमकीला शोभणारे आहे काय? त्यापेक्षा इथून त्यांच्यावर धावून जावू. त्यांच्यात घुसून

त्यांना नदीपार पिटाळून लावू. त्याच्यात पुरुषार्थ आहे.' दतबा पाटलांनी अंतिम निकाल दिला.

योद्धे घोडेस्वार झाले आणि निघाले. दतबांचा आवेश आणि जोम त्यांच्या घोड्यात संचारला. सोबत तो त्यांच्या सोबतीने दौडणाऱ्या योद्ध्यांमध्ये संचारला. दसरत त्यांच्या खासगीतला; अंतर राखून त्यांच्या सोबतीने दौडत होता. त्याचे बाहू स्फुरण पावू लागले. सगळ्या टोळीत विजेचा संचार व्हावा तसा जोम संचारला. फुरफुरत फेसाळते घोडे गिलच्यांच्या गर्दीत घुसले. समुद्रात महाप्रलयाची लाट उसळावी तसे ते सारे गिलच्यांवर कोसळले. बंदुकींच्या माऱ्याची पर्वा न करता घुसले. कैक कामी आले. तरीही न डरता घुसले. दुराणी, गिलचे अन् रोहिले भयचकित होऊन माघार घेऊ लागले. अंतर ठेवून बंदुकांच्या फैरी झाडू लागले. प्रेतांच्या राशी पडल्या. पण गिलचे बेटापल्याड हाकलले गेले. दतबा पाटील आघाडीस राहून लढत होते. तेवढ्यात समोर मराठ्यांचा कोणीतरी सरदार पडला म्हणून त्याचे शव काढण्यासाठी दतबा पाटील स्वतः धावले. तेव्हा त्यांच्या बरगडीत गोळी घुसून ते घोड्याखाली आले. त्यांना उचलण्यासाठी एकच गर्दी झाली. त्या गर्दीत दसरत होता. दरम्यान गिलच्यांची ताज्या दमाची नवी कुमक आली. ते गोळीबार करीत पुढे घुसले. तलवारी काढत आणि हातघाईची लढाई करीत त्यांनी पाटलांच्या भोवतीची गर्दी ढिली केली. त्या चकमकीत दसरतच्या दंडाला जखमा झाल्या. स्वतःला वाचविण्यासाठी तो पळाला. दरम्यान त्याला ते विलक्षण दृष्य दिसले. गिलच्यांनी दतबा पाटलांचे मस्तक त्यांच्या धडापासून वेगळे करून ते एका भाल्याच्या टोकावर ठेवले होते. आणि तो भाला उंच मिरवत ते निघाले होते. त्यांच्या मस्तकातून रक्त ओघळत होते. मराठ्यांची फौज विस्कटली होती. अगदी थोड्या वेळाआधी जीवावर उदार होऊन लढणारे वीर भयभीत होऊन पळ काढू लागले होते. दसरतने त्याचा घोडा वळवला आणि त्याला टाच दिली. पण घोडा ऐकेना. तो मैदान सोडायला तयार नव्हता. दसरतने खूप प्रयत्न करून पाहिला. पण जमेचना. घोडा ऐकेचना. गिलचे कधीही अंगावर येऊ शकत होते. दसरतने घोडा सोडला आणि तो पायी पळत निघाला. कोणी एक म्हातारा आपल्याकडे बघत तुच्छतेने हसतोय असा भास त्याला झाला. त्याचा विचार करायला त्याला सवड नव्हती.

दसरतच्या छोट्या आयुष्यातली पळण्याची ही दुसरी वेळ होती. आणि पहिलीपेक्षा ही दुसरी जरा निराळी होती. पहिल्या वेळी तो जास्त करून जीवाच्या भीतीने पळाला होता. रात्री पळणे आणि दिवसा छपून राहणे हा त्या पळातला त्याचा क्रम होता. आताही तो जीवाच्या भीतीनेच पळत होता. पण त्याहीपेक्षा त्याला दतबा पाटलांच्या भाल्याच्या टोकावर ठेवलेल्या मस्तकाने कदाचित अधिक भयभीत केलेले होते. कारण ते जिवंत असेतो तो जोषाने लढला होता. ते पडले तेव्हा त्यांच्या भोवतीच्या गर्दीत तो होता. गिलच्यांची वावटळ आली तेव्हा स्वतःला वाचविण्यासाठी तो दूर झाला. पण तोवर सुद्धा त्याला पळण्याची भावना झाली नव्हती. पण भाल्याच्या टोकावरचे दतबा पाटलांचे मस्तक पाहिले आणि तो पळाला. आता तो स्वतःचे मस्तक डोक्यावर ठेऊन पळत होता. मागे काही अंतरावर असलेली जनकोजीबावाची फौज ही बातमी लागताच नक्कीच दौडत येईल आणि पळणाऱ्यांना मागे लोटील हे त्याला माहीत होते. म्हणूनच त्याने वेगळा रस्ता

निवडला होता. येत असलेल्या फौजेचा रस्ता चुकवत तो नदीकाठाने पळत होता. तिथे उंचच उंच वाढलेली लव्हाळी होती आणि त्याच्या अल्याड मोठाली झाडे होती. त्यांच्या आसऱ्याने तो पळत होता. दतबा पाटलांचे भाल्यावर टोचलेले तोडलेले मस्तक आणि त्यातून ठिबकणारे रक्त त्याला सारखे दिसत होते. आपण पळपुटे आहोत, हिंदुस्तानी लोकांच्या भाषेत भगौडे आहोत, याची जाणीव त्याला अधूनमधून होत होती. पण ती त्याला तितकी त्रास देत नव्हती. एखाद्या लहान बाळाला जसे आपण पडलो याचे दुःख तितके नसते. पण तसे होताना इतरांनी

पाहिले तर ते अतोनात दुःखद असते, तसे काहीसे त्याच्या मनाचे झाले होते. पण मग मधेच तो तुच्छतेने हसणारा म्हातारा त्याला आठवत होता. पण तो तर केवळ भासच होता. विचार करावा किंवा फार लक्ष द्यावे असे त्यात काहीच नव्हते. आपण एकटे सगळयांना झुकांडी देत या नदीकाठाने पळत आहोत ही भावना त्याला सुखद वाटत होती. किंवा हेही तितके खरे नसेल. तो कदाचित कोणताही विचार त्या क्षणी करत नसेल. तो फक्त पळत होता. आणि आपण कशापासून पळत आहोत हे त्याला कळत नव्हते. आपण पुढे कुठे जाणार आहोत, काय करणार आहोत; या कशाचाही विचार तो करत नव्हता. तो एका अत्यंत भयप्रद दृष्यापासून पळत होता. तो जीवाच्या आकांताने पळत होता. गिलच्यांपैकी कोणाला आपण असे पळताना दिसलो तर ते आपल्यावर हल्ला करून आपला खातमा करतील याची भीती त्याच्या मनात होती. पण लगेचच तशी शक्यता नाही हेही त्याला माहीत होते. जनकोजीबावाची फौज जाईल आणि ती त्यांच्याशी लढेल. त्या लढाईचा फैसला जो होईल, त्याच्यावर ते अवलंबून असेल हे त्याला माहीत होते. तरीही तो काळजीपर्वक आणि नेटकी चाहूल घेत पळत होता. इथून पळत रेवाडीला जावे आणि तुळसामाईला भेटावे, असे काही काळ त्याच्या मनात येऊन गेले. पण ते त्याने बाजूला सारले. आपला जीव सलामत असेल तर बाकी सगळया गोष्टी. तो सलामत केल्यावर बाकी सारे. इथे तोच पणाला लागलेला आहे. त्याचा बचाव आधी. नंतर बाकीचे सगळे.

रात्रीच्या अंधारात एखाद्या निशाचराच्या चलाखीने रस्ता शोधत त्याने नदी पार केली. अंगावरचे आधीच लक्तरांसारखे झालेले त्याचे कपडे भिजले. अतोनात गारठ्याने त्याचे अंग काकडू लागले. पण त्याला त्याची तमा नव्हती. रणांगणापासून, दतबा पाटलांच्या भाल्याच्या टोकावर लाल ठिबकणाऱ्या मस्तकापासून दूर पळणे, आपला जीव वाचविणे; इतकेच त्याला कळत होते. अन्न, वस्त्र, निवारा यांच्यापैकी कशाचाही विचार त्याच्या मनात नव्हता. तो अंधारात अज्ञात भविष्याच्या दिशेने पळत होता. तो क्षणोक्षणी चाहूल घेत, श्वापदांना झुकांडी देत धावणाऱ्या एखाद्या गवतखाऊ प्राण्यासारखा पळत होता. तरीही तो माणूसच होता आणि तो माणसासारखाच थकला होता. आणि अनावर श्रमांनी भोवळ येऊन उत्तररात्री एका क्षणी तो नदीकाठच्या झुडपात लवंडला. त्या क्षणाच्या आधी, म्हणजे भोवळ येण्याच्या आधी त्याने आपली जागा सुरक्षित आहे याची खात्री करून घेतली होती. भोवळ आल्यानंतर मात्र तो साऱ्या चलाखीपल्याड जाऊन निपचित पडला. त्या रात्री त्याला स्वप्ने अर्थातच पडली. त्यातले मुख्य असे स्वप्न; जे अनेक वेगवेगळया प्रकारे त्याला पुढच्या अनेक रात्री आणि दिवसा देखील पडत राहणार होते, त्याची पहिली आवृत्ती त्या रात्री झाली: तो घोड्याला टाच मारत होता आणि घोडा ऐकत

नव्हता. इतके शिकवून, सांभाळून, प्रेमपूर्वक तयार केलेला तो उमदा प्राणी ऐन मोक्याच्या क्षणी बेईमान झाला होता. आपल्या धन्याच्या इषाऱ्याला प्रतिसाद देईनासा झाला होता. किंबहुना प्रतिसाद द्यायचा तो. टाच दिली की उलट वळून उभा राहायचा. अरे बाबा, तिकडच्या आगीतून निसटायचंय आपल्याला, चल, लवकर चल. तीनचार वेळा असं झाल्यावर दसरत उतरला. त्याचं क्षणी एका म्हाताऱ्याने त्याला पाहिले. गर्दी होती. इतरांकडे लक्ष द्यायला कोणालाही सवड नव्हती. पण म्हाताऱ्याचे लक्ष गेलेच. तो दसरतकडे बघत हसला. तुच्छतेने. घृणास्पद नजरेने. त्या मुक्या जनावरापासून तरी शिक काही, अशा अर्थाचे. ती नजर दसरतला डसली. ते जानबाकाका होते.

तो तडफडून जागा झाला. छे! छे! ते जानबाकाका कुठे होते? ती आपल्या मनाची धारणा. जीवाच्या भीतीने आपण आपल्या कर्तव्याशी प्रतारणा केली. म्हणून तो जो कोणी म्हातारा होता, त्यात आपल्या मनातला जानबाकाका आपण स्वप्नात पाहिला. खरे म्हणजे आपल्याला पळताना पाहणारा कोणी म्हातारा नव्हताच. आपले मन आपल्याला खाते म्हणून असे स्वप्न आपल्याला पडले. बाकी काही नाही; त्याने स्वतःची समजूत घातली. कीर्र अंधार होता. नदीच्या पाण्याचा, झाडांचा, गवताचा आणि चिखलाचा वास होता. अतोनात गारठा होता. अंग आखडले होते. शेकोटी पेटविता येण्याची शक्यता नव्हती. हाताशी काहीच साधन नव्हते. अंगातले कपडे भिजट, घाणेरडे आणि लक्तरांसारखे झालेले होते. चालणे हा अंगात ऊब आणण्यासाठी एकमेव इलाज होता. आणि फक्त चालणे नव्हे तर धावणे हा निदान सुरुवातीचा उपाय होता. त्याने आपले तळहात एकमेकांवर चोळले. नंतर ते चेहरा, कानांच्या पाळ्या, डोके असे सुरू करत सगळ्या अंगावर घासले. प्रसंग पडला की सगळ्या युक्त्या आपोआप सुचतात.

दिवसा आणि रात्री जमेल तितके चालणे. पळण्याची गरज आता उरली नव्हती. नदीकाठी झाडांना फळे असत. आणि ठिकठिकाणी देवळे होती. पूजा आणि अनुष्ठाने होत. प्रसाद असे. अगदी नियमित नसले तरी अन्न मिळत असे. सावध राहणे गरजेचे होते. पण अगदी चेहरा लपविण्याची वगैरे गरज उरली नव्हती. फक्त कपड्यांची लक्तरे झाली होती. त्याला काही मार्ग दिसत नव्हता. खांद्याला जखम झालेली होती. पण जनावरांच्या जखमा जशा आपोआप भरत जातात तशी ती आपोआप भरत चालली होती. आधी एकदा त्याने त्या जखमेत लव्हाळ्यातले पाणकणीस भरले होते. ते त्याला तितके आठवत नव्हते. झोपला की स्वप्ने पडत. तीच ती पळण्याची आणि कोणा म्हाताऱ्याने पाहण्याची. त्यांच्यातल्या तपशिलात प्रत्यही भर पडत असे. पुष्कळ बदलही होत असत. एकदा स्वप्नात तो म्हणाला, काका तुम्ही असे पाहू नका. मी पळून चाललेलो नाहीय. मी जखमी झालोय. उपचार घेणे गरजेचे आहे, म्हणून निघालोय. दुसऱ्यांदा तो म्हणाला, सरकार खूप जखमी झालेले आहेत. आपण लोक त्यांना बाजूला घेत आहातच. मी वैद्याला तातडीच्या उपचारासाठी घेऊन येतोय. पण त्याच वेळी त्याने भाल्याच्या टोकावर पाटलांचे रक्तबंबाळ मस्तक पाहिले आणि आपण खोटे बोलत आहोत याची स्वप्नातही त्याला जाणीव झाली. एकदा जानबाकाका त्याच्याकडे तुच्छतेने पाहून थांबले नाही. ते त्याच्या जवळ येऊन म्हणाले, तू माझा चेला आहेस, याची मला फार लाज वाटते. पण ते शब्द त्याच्या पाठीवर आदळले. आणि त्याचा पाठलाग करीत राहिले. गिलच्यांची खूप मोठी

झुंड आदळली आणि तो पळाला. तो पळत निघाला तेव्हा घोडा त्याचा पाठलाग करू लागला. त्याने आपला वेग वाढवला. पण घोडा त्याला कसा आटोपणार? त्याने सरळ नदीत उडी घेतली आणि पोहू लागला तेव्हा घोडा गोंधळून गेला. नंतर एकदा त्याने नदीत उडी घेतली तर घोड्यानेही त्याच्या पाठोपाठ नदीत झेप घेतली. तेव्हा त्याने फुफ्फुसात मोठा श्वास भरून पाण्याखालून पोहणे पसंत केले. पण वर तोंड काढले असताना घोडा त्याचा पाठलाग करत असल्याचे त्याला दिसले. एकदा तो निवांत झोपला असताना ते घोडेस्वार आले आणि म्हणाले, हाच तो गद्दार. सरकारांना सोडून पळाला हा भेकड. याला खापलून टाका. नंतर एकदा त्याने दतबा पाटलांचे रक्तबंबाळ मस्तक पाहिले. नजरानजर होताच ते भाल्याच्या टोकावरून म्हणाले, तुमच्यासारख्या नामर्द लोकांचा मी राजा. माझी ही अशी गत होणार नाही तर काय होणार?

झोपला की स्वप्ने आणि दिवसभर त्यांची उजळणी आणि तर्क. युद्धाच्या ऐन क्षणी त्याचा दम खचला आणि त्या क्षणाची अनेक रूपे त्याच्या मनात जन्म घेऊ लागली. अन् त्या प्रत्येकाला प्रतिकार करण्याची वृत्ती. त्यातून तो दिवसाही स्वतःशी बोलू लागला. अन् तेही प्रकट. मुळात जे काही घडले होते त्याच्या असंख्य वेगवेगळ्या आवृत्या त्याच्या मनात जन्मू लागल्या. आणि त्या त्या वेळी प्रत्येक नवी आवृत्ती त्याला खरी वाटू लागली. अन् त्याच वेळी तिच्या तशा असण्याबद्दल त्याला संभ्रम वाटू लागला. आणि त्या संभ्रमांच्या अनेक आवृत्या त्याच्यासमोर नाचू लागल्या. त्याच्या नजरेसमोर अनेक प्रसंग हिच्यातून तिच्यात अन् तिच्यातून हिच्यात घुसू लागले. त्यांच्यावर त्याचा कसलाही ताबा उरेनासा झाला. त्याच्या स्वप्नांमधले अनेक तुकडे वास्तव होऊन त्याच्यासमोर नाचू लागले. वास्तवाच्या अशा अनेक रूपांनी त्याचे मन घायाळ होऊ लागले. त्याचे भगोडेपण हा जो मुख्य भाग होता, तो सारीकडे कायम होता. त्याच्या त्याला दिसणाऱ्या अनेक कारणांचे आणि समर्थनांचे तुकडे दिवसाढवळ्या त्याच्या भोवती नाचू लागले. त्याचे स्वतःशी प्रकट बोलणे वाढीला लागले. आपल्याला वेड लागेल की काय असे त्याला वाटू लागले.

या नदीच्या आसपास राहिल्याने ही स्वप्ने आपली पाठ सोडत नाहीत अशी भावना होऊन त्याने मथुरेच्या आसपास यमुना ओलांडून आतल्या भागात जाण्याचा निर्णय घेतला. नदी ओलांडून पल्याड गेला तेव्हा त्याला तिथल्या झाडीत एक इसम झोपलेला आढळला. नदीकाठीच्या ओलसर बेटात उगवलेल्या दाट झाडोऱ्यातल्या एका झाडाखाली तो सुखाने पहुडलेला होता. अंगात सलवार खमीस, वरून चोग्यासारखा पायघोळ अंगरखा आणि डोईला निळे पागोटे होते. सरळच की तो दुर्रानी गिलचा होता. उडून टोला फार तर रोहिला. दसरतला कुतूहल वाटले. ह्या इतक्या ओलसर आणि दलदलीच्या जागी हा असा सुखाने कसा झोपू शकतोय? डोक्याला पागोटे घट्ट बांधलेले आहे. हा मेलेला आहे की काय? त्याच्या अंगावरले कपडे स्वच्छ होते. त्याने स्वतःकडे पाहिले. अव्वल भिकारीच असे कपडे वापरू शकतो. हा इसम मेलेला असेल तर त्याचे कपडे आपण घ्यायला काय हरकत आहे? युद्धात मारलेल्या शत्रूची मिळेल ती उपयुक्त वस्तू घेण्याचा शिरस्ता असतोच. त्यात कोणीही गैर मानत नाही. भावनांच्या अंगाने नजर मेलेली असते. याची हालचाल काहीच दिसत नाहीय. हा एकतर मेलेला आहे किंवा मेल्यासारखा झोपलेला आहे. कदाचित तो आपल्यासारखा भगौडा सुद्धा असेल. पण त्याच्या अंगावर किती चांगले

कपडे आहेत! दसरत योग्य अंतर ठेवून दबा धरून बसला. भक्षकाने आपल्या भक्ष्याला नजरेच्या टप्प्यात ठेवून बसावे तसा. चौदंडी सावध. त्याचे भक्ष्य तसे अगदी साधे होते. तो इसम मेलेला असेल तर त्याला त्याचे कपडे हवे होते. ती त्याची तातडीची गरज होती. अन् तो मेलेला असेल तरच त्याला ते मिळू शकत होते. बराच वेळ गेला. हालचाल नव्हती. काहीही हालचाल नव्हती. दसरतने चिखलाचा गोळा तयार करून फेकला. आसपास आवाज निर्माण करण्याइतका. हालचाल नव्हती. त्याने एक गोळा सरळ इसमाच्या अंगावर फेकला. हालचाल नव्हती. मग अधिक धाडस करीत सावध चालीने तो इसमाजवळ गेला. शेजारी म्यान केलेली समशेर होती. ती आतापर्यंत त्याला दिसली नव्हती. ती त्याने हलकेच उचलली आणि ताब्यात घेतली. ती हाताशी आल्याने त्याचा आत्मविश्वास वाढला. इसम एका अंगावर कलंडलेला होता. त्याच्या छातीवर तलवार रोखत दसरतने त्याला पायाने ढकलले. इसम उताणा झाला. तो ठार मेलेला होता. त्याच्या अंगावर जखमेची कसलीही खूण नव्हती. मात्र मेलेला होता खास. दसरतला वाटलं, काहीही असो. तातडीने त्याचे कपडे घ्यावेत. ते त्याने भराभर काढले. तर त्याच्या कमरेशी बांधलेला एक कापडी पट्टाही निघाला. तो चांगलाच वजनदार होता. बाहेरून हाताने शिवलेला होता. आत वजनदार काहीतरी होते. ते काय असावे याचे कुतूहल होतेच. पण ते आवरत त्याने भराभर आपल्या अंगावरची लक्तरे उतरून नवे कपडे चढवले. संपूर्ण नागडा झालेल्या त्या इसमाच्या अंगावर ती लक्तरे त्याने मोठ्या उदारपणे टाकून दिली. कापडी पट्टा स्वतःच्या कमरेशी बांधला. समशेर कमरेला लटकावली. आणि तिथून तातडीने बाहेर पडला.

तिथून सुमारे चार कोस जाईपर्यंत त्याने इकडे तिकडे पाहिले सुद्धा नाही. त्याला तिथून जमेल तितके दूर जायचे होते. त्या इसमाचे जे काही होते ते सारे संशयास्पद होते. अंगावर उत्तम नवे कपडे होते. कोणतीही जखम नव्हती. आणि तो नदीकाठी चिखलाच्या वासात झाडांच्या दाटीत मरून पडलेला होता. काहीही झालेले असू शकत होते. असतील-नसतील त्या शक्यतांपासून जमेल तितके दूर जाणे आवश्यक होते. त्याच्या मागावर कोणी असेल तर त्या धोक्यापासून पळणे अटळ होते. चार-सहा कोस दूर आल्यावर थोडे थांबणे पुरते सुरक्षित आहे, असे त्याला वाटले. मागे मैदान होते. आणि पुढल्या बाजूला टेकडी होती. कदाचित त्या टेकडीतूनच पुढचा खिंडीसारखा रस्ता होता. पायरस्ता सोडून तो एका बाजूला चालत गेला. तिथे एक खोंगळ होती. आत बसले तर बाहेर कोणाला दिसणार नाही अशी. तिथेही आसपास उभीआडवी चाहूल घेत त्याने कमरेशी असलेला कापडी पट्टा सोडला. जोरदार जड होता. त्याने त्याची शिवण ढिली केली. मोहरा होत्या. डोळे विस्फारून त्याने त्या पाहिल्या. पहिली भावना पट्टा बंद करण्याची झाली. पट्ट्याचे वजन सहज दोन शेर भरले असते. दोन शेर सोने! कुठून आणले होते गिलच्याने? या सोन्यापायीच मेला असेल तो. दसरतने आयुष्यात इतके सोने कधीही पाहिलेले नव्हते. हे इतके सोने जवळ असेल तर आयुष्यभर काहीही काम न करता कित्येक पिढ्या सुखाने जगणे शक्य आहे. हे सोने सांभाळता मात्र आले पाहिजे. अक्कलहुषारीने वागले तरच ते शक्य आहे. त्याने एक मोहोर बाहेर काढली. बाकी पट्ट्याला व्यवस्थित गाठ मारली. आणि पट्टा बंदोबस्ताने चोग्याच्या आत कमरेशी बांधून घेतला. एक मोहोर तेवढी बाहेर

खिशात टाकली. कमरेशी लटकलेल्या तलवारीला एकदा हात लावला आणि तो बंदोबस्ताने चालू लागला. ह्या अकल्पित लाभाने त्याला अधिक चलाख आणि जबाबदार केले होते. ही एक अवघड गोष्ट होती. सतत सावध असण्याची मागणी करणारी होती. पण ती सुखद सुद्धा होती. ती फारच सुखद होती. त्याच्या भोवतीचा उजेड सुखद सोनेरी झाला होता. तो त्याचा खासगी उजेड होता. तो तसा खासगी ठेवण्यावरच त्याचे भविष्यातले सुख अवलंबून होते. त्यासाठी तो सतत जागसूद राहणार होता. बाकी सगळ्या गोष्टी त्याच्यापुढे दुय्यम तिय्यम असणार होत्या. पण म्हणून भविष्य निश्चित होते असे नव्हे. ते तर नेहमी चपळ आणि कोणाचाही ज्याच्यावर ताबा नसतो असे असते.

दसरत समोरची खिंड ओलांडून एका गावात पोहोचला. ते चांगलेच सुपीक आणि भरभरून पिके देणाऱ्या जमीन आणि हवेचे गाव होते. मात्र तिथली घरे बारीक, बुटकी आणि कच्च्या विटांची होती. त्या घरांच्या समूहात एक भला मोठा वाडा चंद्राप्रमाणे झळकत होता. कसलाही गावकूस नसलेले ते पुरते उघडे गाव होते. मैदानातल्या त्या खुल्या उघड्या गावात कोणीही कुठूनही कसेही पोहोचू शकत होते. मध्यभागी असलेल्या त्या वाड्याभोवती मात्र भक्कम तटबंदी होती. त्या तटाच्या आत जाणे कदाचित अवघड असावे. तो इथल्या एखाद्या जमीनदाराचा वाडा असावा. त्या उघड्या गावात एका खानावळीपाशी पोहोचल्यावर त्याला आपल्या भुकेची जाणीव झाली. खिशात एका मोहरेची दणदणीत उब होती. बाकी पट्टा कमरेशी सुरक्षित होता. तो तिथल्या इसमाला आदबीने म्हणाला, 'खानेका कुच इंतेजाम हुवा तर बडी मेहेरबानी.' हिंदुस्तानी भाषा आता त्याला थोडीफार माहीत झाली होती. उत्तरेतल्या मुलखात ती जमेल तशी बोलली की काम होते हा त्याचा अनुभव होता. त्या इसमाने त्याला आपादमस्तक न्याहाळले. त्याच्या हातातली मोहोर पाहिली. विस्फारलेल्या डोळ्यांनी गदगद स्वरात तो म्हणाला, 'क्यूं इस गरीबका मजाक उडाते हो लालाजी! आप यहां कैसे खाना ले सकते है? आप जैसे लोग तो जमीदार भगतरामजीके मेहमाननवाजी के काबिल है. आपका पैसा अपनी जेब मे रखिये. उसकी यहां कोई जरुरत नही. आप बैठिये. मै उनके घर संदेश भेजनेकी व्यवस्था करता हूं'

इसम मोठाच गोडबोल्या होता. तो आपल्याला लालाजी का म्हणाला? आपल्याला तो गिलचा- अफगाण समजला को काय? आपल्या पोशाखामुळे? की पद्धत आहे इकडे अशी? अन् पैसे का नकोत? आपला पोषाख भारदस्त आहे. आपण एक मोहर समोर धरली. त्याचाच का हा प्रताप?

इसमाने त्याची जोरदार खातीरदारी चालवली होती. पाणी घ्या. शरबत घ्या. वर माहिती. 'जमीदार भगतराम फार मोठ्या दिलाचे आदमी आहेत. फार कनवाळू आहेत. मुलखात सारीकडे दंगे-फसाद आणि लुटालुटीचा माहौल आहे. पण इथे त्याचा सासूल सुद्धा नाही. बाहेरून आलेल्या बड्या लोकांची खातीरदारी खुद करतात. खूब बड़े मेहमाननवाज आहेत. आपल्या दिलाला चैन आलीय असे त्यांना वाटल्याखेरीज ते आपणास सोडणार नाहीत. इथे सगळे त्यांची रयत आहेत. रयतेशी सुद्धा ते फार ममतेने पेश येतात. खांसाहब रोहिले आहेत की दुर्रानी? रोहिलेच आहात ना? हिंदुस्तानी इतकी बोलता म्हणजे तेच. अर्थात त्याने मेहमाननवाजीत कायच फरक पडत नाही. आपल्या सारख्या लोकांचे पाय या गावाला लागले ही मोठीच मेहेरबानी.'

दसरत मनाशी विचार करत होता. त्याला एकूण सारे जरा विचित्र वाटत होते. हा इसम आपल्याला कोणीतरी बडा माणूस समजला आहे. रोहिला किंवा दुर्रानी समजला आहे. पोषाख हा नसतानाही आपण पठाणासारखे दिसतो असे आपण आधी ऐकलेले आहे. ते ठीक आहे. पण हा जमीनदार अशा लोकांची खातीरदारी का करतो? की आपल्या गावाला; मुख्य म्हणजे आपल्या मालमत्तेला इजा पोहोचू नये म्हणून? तीच शक्यता जास्त वाटते. दुसरे काय असणार? लुटले जाण्यापेक्षा खातीरदारी नक्कीच परवडत असेल. काय असेल ते असेल. जाऊ आपण. बघू. दरम्यान जमीनदाराचा माणूस आला आणि त्याने दसरतला झुकून कुर्निसात केला. म्हणाला, 'चलिये हुजूर.' दसरतने उजव्या हाताने कमरेशी लटकवलेली तलवार चाचपली. डावा हात कमरेशी असलेल्या कापडी कमरबंदाला चाचपडायला निघाला होता. तो त्याने आवरला. .

तटबंदीच्या आत मध्यभागी उंचावर अत्यंत सुंदर संगमरवरी महाल होता. पंचवीस तीस पायऱ्या चढून गेल्यावर समोर प्रशस्त मोकळी पडवीवजा जागा होती. तिथे मध्यभागी गादी घातलेली बैठक होती. तिथेच प्रशस्त अंतर राखून आत उघडणारे दोन बंद दरवाजे होते. डावीकडे राधाकृष्ण मंदिर. आतमध्ये चाळीस खोल्या आहेत. भटारखाना आहे. घुसल करण्याच्या जागा आहेत. सगळ्यात मागे पायखाने आहेत. ही सगळी माहिती तो हुजऱ्या आदबीने देत होता. महालाच्या दोन्ही बाजूंना जरा लहान्या पण देखण्या इमारती होत्या. त्या मेहमान लोकांना राहण्यासाठी. आता तिकडेच हुजूरांनी यायचे आहे. मालिक आता इथे नाहीत. ते उद्या आपणास भेटतील. पण ते नाहीत म्हणून आपल्या खातीरदारीत काहीही कमती होणार नाही. हुजऱ्याची आदबशीर टकळी चालू होती. दिंडी दरवाजातून आत येताना भिंतीला लागून दोन्ही बाजूना दरवाजे नसलेल्या खोल्या होत्या. त्या अगदी साध्या होत्या. एकूण माहौलशी विरूप दिसणार नाहीत इतपतच; अशा ठीक होत्या. त्या कशासाठी आहेत? दसरतने विचारले. तिथे लठैत लोग थांबतात. मालिक हुजूर इषारा करतात तेव्हा बाहेर येतात. आज ते सारे त्यांच्याच सोबत गेले आहेत. हा सारा परगणा मालिक हुजूर यांचाच आहे. सगळे त्यांचीच रयत आहेत. लठैत बाळगणारा हा जमीनदार बराच कनवाळू दिसतो; दसरतला खानावळीतल्या इसमाची आठवण झाली. त्याला वाटलं, जे काही असेल-नसेल ते असो. जेवणखाण करू. एखादा दिवस आराम करू आणि निघू. जमीनदाराची भेट झाली-नाही झाली; आपल्याला काय फरक पडतो? महाल स्तब्ध होता. आत कुठे तरी जमीनदाराचा राणीवसा असेलच. त्याच्या असण्याची कोणतीही चिन्हे नव्हती. बंद स्तब्ध संगमरवरी महालात चिटपाखरांच्या वावरण्याची सुद्धा हलचल नव्हती. मालिक बाहेर गेला होता आणि सगळी हलचल कोंबड्यांना डालावे तसा डालून गेला होता.

कितीतरी वर्षांनी संधी मिळावी तशी स्वच्छ अंघोळ मनसोक्त करीत तो उबदार आरामशीर पहुडला असताना हुजऱ्या मिठाईचे भले मोठे ताट घेऊन आला. हे हिंदुस्तानी लोक गोड फार खातात. आपण दगडधोंड्यातले महाटी लोक. आपल्याला ती आदत नाही. गोड घाश्या आन टिंगार वाश्या किंवा गोड घाश्या आन बायकू नाश्या, या महाटी म्हणी त्याला आठवल्या. बायको नासण्याचा किंवा टिंगार वासण्याचा सवालच नाही. कधी नव्हे ते आलेय समोर तर हाणा, असे मनाला सांगत त्याने मिठाईवर ताव मारला. त्याला

आणखी काहीही नको होते खरे तर. पण हुज़्या आला आणि म्हणाला, 'लालाजी तो गोश्तही खायेंगे ना!' दसरतला कळेना. म्हणाला, 'हां.' तर लगेच गोश्तचे ताट आले. अच्छा. गोश्त म्हणजे सागुती दिसते! पण माझ्या पोटात तर जागाच नाहीय्ये. हे इतके खायचे म्हणजे हत्तीसारखी भूक असली पाहिजे, असे दिसते. वाढलेले सगळे खायचेच असते असा काही दंडक नसतो, हे त्याला माहीत नव्हते. उत्तम अन्नाचे स्वाभाविक दुर्भिक्ष असलेल्या दगडधोंड्याच्या महाट देशातून तो आलेला होता. त्यामुळे पोटाला तडस लागेस्तोवर खाऊन तो आडवा झाला. हुजुरांना त्यांची समशेर कुठे सुरक्षित ठेवायची आहे काय, असे हुज़्याने विचारले. त्यावर तडक, अजिबात नाही. ती माझ्याच जवळ राहील असे तो म्हणाला. पण नंतर तो सताड झोपला. समशेर शेजारी होती. तिच्या असण्या-नसण्याचे किंवा एकूणातच सावध असण्याचे कसलेही भान त्याला उरले नाही.

गेल्या काही दिवसांमधले अन्नाचे दुर्भिक्ष, ते मिळण्यातला अनियमितपणा, चालण्याचे श्रम; अशा सगळ्या पाश्र्वभूमीवर इतके सगळे खाण्याने कोणालाही नक्कीच त्रास झाला असता. पण त्या पट्ट्याला तसे काहीही झाले नाही. संध्याकाळी जाग आल्यावर त्याचा हात समशेरीशी गेला. त्याला हुज़्याची विनंती आठवली. आपले निर्धास्त सताड झोपणे आठवले. तो खडबडून उठून बसला. कमरपट्टा जागेवर ठीकठाक होता. तरीही हे ठीक नाही. हा मूर्खपणा आपल्याला परवडणारा नाही. अंधार पडतोच आहे. इथून सटकणेच ठीक होईल.

तो असा विचार करत असताना एक स्त्री शामदान घेऊन आली. हातातल्या दिव्याच्या उजेडात तिची कांती गुलाबी चमकत होती. दसरत चमकला. आपण नकळत एखाद्या सापळ्यात तर अडकवलो जात नाहीय ना; त्याच्या मनात आलं.

'कौन?' 'मी कनीज तुमची. मला तुमच्या दिमतीला देण्यात आलंय.' 'मला नकोय.'

'का बरं? रिवाज आहे इथला. मी तुमची सगळी सेवा करीन. तुम्हाला शय्येतलं सुख सुद्धा देईन. किंवा त्यासाठीच मी आलेय. तुम्ही निश्चित राहा. मी घरातली स्त्री नाहीय. कनीज आहे.'

'मला नकोय. मी आता निघतोय.' 'का? इतकी का मी बदसूरत आहे? मी खूप सगळ्यांना सुख दिलंय.

आणि ते सगळे संतुष्ट झालेले आहेत. मी तुम्हाला निराश करणार नाही. हा माझ्या कामाचा भाग आहे. आणि तुम्ही मला आवडलेले आहात. तुम्हालाही खूप सुख मिळेल.'

'पण मला नकोय. मी निघतोय.' 'नका जाऊ.' "ठीक आहे. तू जा. माझं मी ठरवीन.'

'हे बघा. डोळे नीट उघडून माझ्याकडे बघा. मी खूप सुंदर आहे. तुम्हाला सुख देण्यासाठीची सगळी आयुधं माझ्यापाशी आहेत. एकदा माझ्याशी येऊन तर बघा. तुम्हाला सुख मिळालं नाही तर मालक माझ्यावर नाराज होतील. हा इथला रिवाज आहे.'

तिने अंगावरचे एकेक कपडे काढायला सुरुवात केली. 'अजिबात उघडू नकोस. मला नकोय.'

'तुम्हाला हे फार अंगावर आल्यासारखं वाटत असेल. तुम्ही ज्या मुलखातून आलात तिथे असे रिवाज नाहीत. इकडे हिंदुस्तानात ही आम रीत

आहे.'

'मी कोणत्या मुलखातून आलोय?' 'तुम्ही दुर्राणी नाही आहात.' 'मग?' 'महाटे आहात.' 'कशावरून?'

'दुपारी तुम्ही झोपलात तेव्हापासून मी इथे आहे. तुम्ही झोपेत बोलत
होतात. मी ते ऐकलं आहे.'

'तुला समजतं म-हाटी? कसं काय? तू तर हिंदुस्तानी बोलते आहेस.
मला मोठ्या मुश्कीलीने तुझ्याशी बोलावं लागतंय.'

'मी सांगते तुम्हाला. पण तुम्ही थांबा.' 'का?'

'तुम्ही आता इथून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणार असाल तर जमीनदाराचे लठैत दाराशी तुमचा समाचार घ्यायला तयार आहेत. तुम्ही योद्धे आहात. तुम्ही कदाचित त्यांना लोळवून पुढे जावू सुद्धा शकाल. पण बाहेर ठिकठिकाणी त्याचे लोक आहेतच. तुम्ही किती जणांना पुरे पडाल? आता
बाहेर पडलात तर तुमचा मृत्यू निश्चित आहे.'

'तसे असेल तर आत थांबून कोणती सुरक्षा मला मिळणार आहे ?'

'मी तसा प्रयत्न करीन.' 'का? तो तू का करावास?' 'मी सांगते.' 'हा जमीनदार माझ्या जीवावर का उठला आहे?' 'मी सांगते.' 'कधी?'

'लगेच सांगते. तुमच्यावर विषप्रयोग करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. तुम्ही शराब घेणार असाल तर तिच्यातून. आणि नंतर तुमच्या खान्यामधून तुम्हाला मी ते द्यावे असे मला सांगण्यात आलेले आहे. हे विष जालीम आहे. ते घेऊन मनुष्य मेला तरी शरीरावर कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. पण मनुष्य हमखास मरतो. ते इतके मोहक, मादक आणि चविष्ट
आहे की घेताना तुमच्या ते लक्षात सुद्धा येत नाही.'

'पण जमीनदाराने असे का करावे? मी असा कोणता अपराध केलेला
आहे? मी तर एक पांथस्थ.'

'कारण तुमच्याजवळ किमान दोन शेर सोने आहे असा त्याला संशय
आहे. आणि तो साधार आहे. त्याला ते सोने हवे आहे.'

'माझ्याजवळ तसे काहीच नाहीय.' 'नसेलही. किंवा असेल सुद्धा.' 'कसे काय?'

'ते कोणाला दिसलेले नाहीय. म्हणून नसेल. पण असण्याची शक्यता
जास्त म्हणून ते असेल.'

'अरे बापरे!'

'मी सांगते. तुम्ही आलात आणि खानावळीत जेवणासाठी एक मोहोर पेश केलीत. हेच त्याने केले होते. साध्या जेवणासाठी कोणी एक मोहोर पेश करत नाही. त्याने ती केली. तिथल्या माणसाने जमीनदाराला
निरोप केला.'

'कोण होता तो माणूस ? मोहोर पेश करणारा?' दसरत आतल्या आत गारठला.

'तेच सांगते. त्याने ती पेश केली. आणि निरोप आला. त्याला आदरपूर्वक इथे आणण्यात आलं. त्याची खूब खातीरदारी करण्यात आली. रात्रीच्या जेवणात मी त्याला एका हत्तीला मारेल इतकं विष दिलं. पण ते सुद्धा पचवून तो निघून गेला.'

'कधी?' 'आज पहाटे.' 'अरे बापरे!'

'तेच तर सांगते. तो गेला आणि तुम्ही आलात. तेच पुन्हा. मोहोर खानावळीत. पुन्हा निरोप. त्याचा पेहराव आणि तुमचा-अगदी एक. जणू तुम्ही त्याच्या अंगावरून तो काढला आणि घातलात. त्याच्याजवळ दोन शेर सोने होते. ते मी पाहिलेले आहे. कमरेभोवतीच्या एका कापडी पट्ट्यात ते बांधलेले होते. तुमच्याजवळ ते असण्याची चांगली शक्यता

आहे. जमीनदाराला ते हवे आहे.'

'आता?' दसरतच्या मनातला गारठा वाढत चालला होता.

'तेच सांगते. तुम्ही आता बाहेर पडू नका. मी शराब घेऊन येईन. अन्न, फळे घेऊन येईन. तुम्ही ते काहीही घेऊ नका. नाहीतरी तुम्हाला त्याची काहीही गरज नाहीय. बकासुरासारखे खाल्लेले आहात. किती वर्षांचे उपाशी

आहात?'

ती हसली. 'मी काय करावे असे म्हणतेस?' ।

'तुम्ही आराम करा. पहाटेच्या वेळी बाहेर पडा. त्या वेळी लठैत बेसावध असतात. ते जागे झाले तरी त्यांना अंदाज येईपर्यंत तुम्ही कैक दूर निघून गेलेले असाल. त्यातही धोका आहेच. पण तो पुष्कळ कमी आहे. जमीनदाराच्या अश्वशाळेत अल्लाची गाय वाटावा असा एक घोडा आहे. मी तुम्हाला त्याची पहचान सांगते. तो सोडा आणि त्याच्यावर सवार होऊन

निघून जा.'

'अश्वशाळेत पहारेकरी असतीलच ना!'

'त्यांना सुखाची झोप लागेल असा इंतजाम मी करते. माझ्यावर

आशिकच असतात सारे.'

'तू हे इतके माझ्यासाठी का करते आहेस? मी तुझ्यावर का भरवसा

ठेवावा?'

"सांगते. एक तर तुम्ही माझ्याशी शय्या करायला नकार दिलात. माझ्याविषयीच्या हवसमधून सहसा कोणी बाहेर पडू शकत नाही असा माझा अनुभव आहे. तुम्ही अधिक चालाक निघालात. कदाचित आपल्या कमरेशी बांधलेले कनकाचे गाठोडे तुम्हाला अधिक महत्त्वाचे वाटले असेल. आणि ते योग्यच आहे. पण याही पल्याड मी तुम्हाला इथून सुटण्यासाठी मदत करण्याचे आणखी कारण आहे.'

'कोणते?'

'आधी मी सांगितले ना! तुम्ही झोपेत महाटी जुबान बोलत होता.

तुम्ही महाटी आहात.'

'मग? त्याचे काय?'

'मीही एका प्रकारे महाटा आहे. किंवा मी महाटाच आहे. माझी आई एका म-हाटा सिपेह-सालारची कनीज होती. रोहिल्यांशी झालेल्या एका लढाईत तो मारला गेला. माझ्या आईने दुसरा रिश्ता केला नाही. ती तशीच झिजून झिजून मेली. मला महाटी जुबान समजते. मी कोणाशीच रिश्ता

केला नाही.'

'तू कोणत्या मुलखातून आलीयेस?' ।
'मला खरं तर मुलुकच नाही. पण बुंदेलखंडात माझा जन्म झाला.
पैदाईशी मी बुंदेलखंडी.'
'मी इथून सुरक्षित बाहेर पडलो तर जमीनदार तुझं काय करील?'
'तो माझा खातमा करण्याची कोशिश करील. पण मी सहजी मरणार
नाही. काही ना काही रास्ता शोधीन.'

त्याने तिला आपल्यासोबत बाहेर निघण्यासाठी पटवलं. म्हणाली, 'मी कशासाठी येऊ? मला का न्यायचं म्हणतोस? माझ्या जुबानवर भरोसा नाही म्हणून? चालाकीने मीच तुला सापळ्यात अडकवेन असं वाटतंय का?' तिच्या बोलण्यात खोटेपणा नाही जाणवला त्याला. पण तीही एक शक्यता होतीच. तो कोणतीही जोखीम पत्करायला तयार नव्हता. म्हणाला, 'तसं समज. नाहीतरी आत राहून तू मारली जाणारच आहेस म्हणतेस. त्यातून रस्ता शोधणार आहेस म्हणतेस. त्यापेक्षा माझ्यासोबत तो शोध. अन् मरायचं तर माझ्यासोबत मर. मी सहजी मरणारा नाहीय. चार जणांना आडवे केल्याखेरीज मला मरण नाही.' म्हणाली, 'निदान इथून बाहेर पडेपर्यंत तरी तुम्हाला त्याची गरज भासणार नाही. लठैत आणि पहरेदार चांगले पुष्ट आणि तालीमबाज आहेत. पण मी त्यांना रात्रीच्या जेवणात अफीम घालते. सारे ढेर होतील. आपण थोडे लवकर बाहेर पडू.'

उत्तररात्री कधीतरी ते बाहेर पडले. तिने योजिल्याप्रमाणे आणि सांगितल्याप्रमाणे सारे झाले. स्तब्धता होती. सारीकडे सारे ढेर झालेले होते. चिटपाखरे समजा गप्पच असतात रात्रीच्या प्रहरी. पण गावखाती कुत्री आणि मांजरे सुद्धा गप्पच होती. त्यांनाही तिने अफीम घातली होती की काय ; त्याच्या मनात आले आणि तो स्वतःशी हसला. अश्वशाळेत घोडा तिनेच निवडला. खोगीर आणि बाकी सरंजाम निवडला. तिला आपल्या पाठीशी बसवून तो निघाला. कमरबंद, समशेर; सगळे जागच्या जागी होते. ती म्हणाली होती तसा घोडा आदबशीर होता. अल्लाघरची गाय असावी असा. विशेष म्हणजे लगाम खेचून त्याला रस्ता दाखविण्याची गरज सहसा पडत नाही, योग्य तो रस्ता तो स्वतःच निवडतो हे दसरतच्या लक्षात आले आणि त्याला आश्चर्य वाटले. दहाबारा कोस जाईपर्यंत ते एकमेकांशी काहीही बोलले नव्हते. दोघांच्याही मनात आपापल्या परीने ताण होता. हळूहळू तो कमी होत गेला. बातचीत सुरू झाली. तिचं नाव महक. त्याचं नाव काय? म्हणाला, 'फिलहाल मला महाटाच म्हण.' सकाळ होण्याच्या सुमाराला घोडा थबकला. रस्ता निवडेनासा झाला. का बरं? म्हणाली, 'जमीदाराचा मुलुक आता संपला. इथवर त्याच्या माहितीचं होतं सगळं. यापुढे आपण त्याला सांगायचं. आपण आता कुठे जाणार आहोत? तू मला कुठे सोडणार आहेस?' म्हणाला, 'मी तुला तुझ्या मुलखात, बुंदेलखंड देशात सोडणार आहे. तिकडे पोहोचायला आपल्याला किती दिवस लागतील?' म्हणाली, 'नक्की सांगता येणार नाही. चारसहा दिवस लागतील बहुधा. पण तिथं जावून मी काय करू? तिथं माझं कोणीही नाही.' म्हणाला, 'ते मला सांगता येणार नाही. पण काहीतरी रस्ता शोध. तू दुनिया पाहिलेली आहेस. तुला आवडणारा आणि ज्याला तू आवडशील असा कोणी भेटेल सुद्धा. त्याच्याशी शादी कर. घर बसव. तितका पैका मी कदाचित तुला देईन सुद्धा. पण आता लगेच मला ते सांगता येणार नाही.' म्हणाली, “मला त्याची गरज नाही.

मी काही मोकळ्या हाताने तिथून बाहेर पडलेली नाही. तू म्हणतोस तसे माझ्या बारक्या आयुष्यात मी बरेच टक्केटोणपे खाल्लेले आहेत. कुठूनही कुठेही फेकली गेले तरी मांजरासारखी पायांवरच उभी राहीन मी.'

ठिकठिकाणी मिळेल त्या सरायांमध्ये मुक्काम करत ते तिच्या मुलखाला पोहोचले. त्यांनी सारीकडे एकाच खोलीत एकत्र मुक्काम केले. त्याने तिला कधीही स्पर्श केला नाही. तसे कोणत्याही संकेताने सूचित केले नाही. तो कमरबंदाला जपत स्वतः नेहमीच जागसूद राहिला. अधून मधून झापड येऊन थोडा फार जो काही झोपला असेल-नसेल इतकेच. कमरबंदातील ऐवजामुळे तो कधीही सुखाने झोपू शकला नाही. पहिल्या मुक्कामी झोपताना तिने आपल्या कमरेशी असलेला खंजीर काढून शेजारी ठेवला होता. सकाळी उठली तेव्हा तो गायब होता. ती तो शोधायचा प्रयत्न करू लागली तेव्हा तो म्हणाला, 'सध्या तो माझ्याकडेच असूदेत. तुझ्या मुलखात पोहोचलो की मी तो तुझ्याकडे देईन.' ती हसली. म्हणाली, 'तुला मी दगा देईन असं वाटतंय की काय? अरे ते तर मी आपण निघालो तेव्हा काल रात्रीच करू शकले असते. वेळप्रसंगी सोबत असावा म्हणून मी तो घेतला होता.' म्हणाला, 'ठीक आहे. पण मला कोणताही धोका पत्करायचा नाहीय.' तिच्या गावी ते पोहोचले तेव्हा आधी ती बावरल्यासारखी उभी राहिली. म्हणाली, 'इथं काहीच माझ्या ओळखीचं नाहीय. माझं गाव म्हणावं असं इथं काहीही नाही. इथं काय करायचं ते मला समजत नाहीय.' म्हणाला, 'असं काय करतेस? काही तरी करशीलच की. हा तुझा मुलुख आहे.' तो जरा भावुक झाला. या इतक्या तरुण आणि सुंदर मुलीला आपण इथं एकटं सोडणार, हे काही ठीक नाही असं त्याला अंतःकरणापासून वाटलं. अर्थात सगळं सुघटित झाल्यानंतरची ती त्याच्या अंतःकरणाची मोकळीक होती. म्हणाला, "मी तुझ्यासाठी इतकंच करू शकतो, याचं मला खरोखरीच वाईट वाटतं. पण अधिक मी काहीही करू शकत नाही.' त्याने तिचा खंजीर तिच्याकडे सोपवला. कमरबंदातून आधीच काळजीपर्वक काढलेल्या पाच मोहोरा त्याने तिच्या समोर धरल्या. म्हणाली, 'मला नकोत त्या. मी मोकळी आलेली नाहीय,हे मी तुला सांगितलंय. उगीचच भावूक होऊ नकोस. फारच वाटत असेल तर माझा नवरा होऊन इथेच राहा माझ्यासोबत.' ती क्षीण हसली. म्हणाली, 'इतके दिवस आपण सोबत होतो. एका खोलीत राहिलो. तू माझ्याशी येण्याची कोशिश सुद्धा केली नाहीस. हे काही मी तुझ्या मोठ्या मनाचं लक्षण मानत नाही. तुला तुझ्या कमरबंदाची अधिक काळजी होती. तो सोबत असताना तुला काहीही करता येणार नाही. आणि त्याची काळजीही घेता येणार नाही. तुला झापड यायची तेव्हा कधीही मी तो पळवू शकले असते. अन् तेवढ्या बारक्या वेळेतसुद्धा तू स्वतःशी बडबड करत होतास. आपण लढाईतून पळून आल्याचं शल्य तुझ्या मनात आहे. आता हे जे नवं ओझं तुझ्यासोबत आहे, तेही तुला असंच कधी झोपेत बोलायला लावील. आणि तू अडचणीत येशील. याचा बंदोबस्त लाव. तुझ्या विश्वासाचं, सगळ्यात जास्त विश्वासाचं कोणीतरी असेलच. तेही तुला फसवू शकतंच.

पण कुठं तरी, कोणावर तरी विश्वास हा ठेवावाच लागतो. तो ठेव. आणि लढाईला जा. त्याखेरीज तुला सुखाची झोप लागणार नाही. आपण काहीतरी अपराध, काहीतरी चूक केलेली आहे असं तुझ्या मनात आहे. ती भावना तुला सारखी छळत राहील. नेमकं काय

झालेलं आहे ते मला माहीत नाहीय. मी ते विचारणार सुद्धा नाहीय.' म्हणाला, 'मी विचार करतो तुझ्या म्हणण्याचा. पण या मोहरा ठेव तू. मला बरं वाटेल, तू त्या घेतल्यास तर.' म्हणाली, 'मी त्या घेणार नाही. उलट मीच तुला काही पैसे देते. या मोहरा बाहेर काढू नकोस. त्या तुझ्या जीवावर उठतील. माझी काळजी करू नकोस. मी माझं बस्तान बसविन. नीट बसविन. पुन्हा कधी इकडे आलास तर येऊन चौकशी कर. कदाचित मी सुखी संसारात नांदते आहे हे तुला दिसेल आणि तुला आनंद होईल.' म्हणाला, 'तू मला माझं नाव विचारलं होतंस. माझं नाव दसरत. जगलो-वाचलो तर नक्की भेटू. म्हणजे जिंदगी रही तो हरगिज मिलेंगे.'

माणसाचे जगणे म्हणजे हरघडी मरण्यापासून वाचणेच असते. कारण जिवंत असताना मृत्यू हरघडी समोर ठाकलेलाच असतो. त्याचे आपल्याला वेगळे भान नसते इतकेच. असे भान आले असताना जिवंत राहण्याची दसरतची ही तिसरी वेळ होती. पहिल्या वेळी बापाच्या स्वरातील आर्ततेने त्याला मरणाच्या निकटतेची जाणीव करून दिली होती. आणि तो मरणापासून पळाला होता. दुसऱ्या वेळी तुळसाबाईने त्याला मरणाच्या दाढेतूनच बाहेर काढले होते. अन् तिसऱ्या वेळी ही बुंदेलखंडी महक. घोडा दौडत होता आणि दसरत विचार करत होता. ती मुलगी नुसती सुंदर आणि सुजन नव्हती. लहानपणापासून दुनिया तिच्या भलेबुरेपणासकट भरपूर पाहिलेली असल्याने तिच्यात आत्मविश्वास, चलाखी आणि एकूण समज भरघोस होती. त्याला वाटलं, ती म्हणाली तसे आपण तिच्यासोबत तिथे राहिलो असतो तर? नाहीतरी माघारी जाऊन आता आपण कुठे जाणार आहोत? काय करणार आहोत? खराडीला आपण जावू शकत नाही. ते चुलतभाऊ आपला खातमा केल्याखेरीज राहणार नाहीत. आपले आईवडील, बायको, मुलगा यांच्यापैकी कोणी जिवंत आहे की नाही, ते आपल्याला माहीत नाही. कोणी असले तरी ती दुनिया आपल्यासाठी संपली. ही मुलगी आपल्याला नवी दुनिया उभी करण्यासाठी विचारत होती. ती ते मनापासून म्हणत होती की गमतीने? तिचा अनेक पुरुषांशी संबंध आलेला आहे. ते तिने लपवले नाही आपल्यापासून. हा इतका वेगळा मुलुख. कोण कशाची चौकशी करतो? इतक्या पुरुषांशी संबंध येऊनही ही मुलगी इतकी निर्मळ कशी राहिली असेल? तिच्याशी संसार करणं म्हणजे एखाद्या वेश्येशी लग्न करण्यासारखं आहे. आपण ते करणार नाही, हे तिला समजत असेल. म्हणूनच कदाचित ती अधिक मोकळेपणी बोलली असेल. अशा स्त्रीची आपण कल्पना सुद्धा करू शकलो नसतो. तिच्या गावात सुद्धा तिची माहिती नसेल कोणाला. आपण शेवटपर्यंत तिच्याशी सावधपणे वागलो. बाईशी संबंधाच्या सुखासाठी इतके ताटकळलेले, तुंबलेले असताना ती भावना थांबवली. शिंद्यांच्या लष्करात बुणगे बाया होत्या. बुणगे लोकात अनेक प्रकारचे बाजार करणारे, करमणूक करणारे लोक आणि धंदा करणाऱ्या आवा होत्या. आपल्या ते मनात येईल अशी अटकळ बांधूनच तुळसा मावशी म्हणाली होती, 'आवांच्यात जायाचं नाही माझ्या लेकरा. रोज इतक्या गड्यांना घेतात त्या. साफसूफ राहात नाहीत. त्यानला रोग व्हतो. आन त्यो आपल्याला जडतो. चांगली तरणी तरणी लोकं पग. कुठून ना कुठून पू वाहतच आसतो त्यांच्या अंगातून. त्या नादाला जायाचं नायी. इथून माघारी गेलो का मी तुपलं लगीन लावून देईन. तव्हर नाडबंद राहा.' तो राहिला होता. आपलं लग्न झालेलं आहे. आपल्याला

एक मुलगा आहे, हे काहीही त्याने तिला सांगितले नव्हते. महक सोबत असताना ती म्हणाली तसं कनक त्याला अधिक प्यार होतं. ते काही चुकीचं नव्हतं. इतकं सोनं त्याने बापजन्मी सुद्धा पाहिलेलं नाही. आणि त्याला ते हवं होतं. ते अर्थातच सुखाने जगण्यासाठी हवं होतं. पण ते सोबत ठेवून हिंडताना आपल्याला सुखाची झोप येणार नाही, याची त्याला खात्री पटली होती.

जिच्याजवळ मी ही मालमत्ता ठेवण्याचा विचार करू शकतो अशी माझ्या दुनियेत फक्त एकच व्यक्ती आहे. तुळसामावशी. महक म्हणाली तशी ती सुद्धा मला फसवू शकते. पण आता, कुठे तरी विश्वास हा ठेवावाच लागेल. आणि ती फार दूरची शक्यता आहे. ह्या इतक्या सोन्याचं ती तरी काय करणार. ती आपल्यासारखीच, जगण्याच्या गरजा किमान असलेली माणूस आहे. पण कोणी सांगावं. हा चमकदार पिवळा उजेड डोळ्यात शिरला की तिचं सुद्धा डोकं फिरू शकेल. किंवा समजा, हे घेऊन आपण तिच्यासोबत तिच्या गावाला तिच्या घरी राहू शकतो. तिला काहीही न सांगता. पण तेही आपल्याला जमणार नाही. आपण झोपेत बडबड करणार. हे सोन्याचं ओझं आपल्याला बाळगता येणार नाही. आपली ती पात्रताच नाही. भाल्याच्या टोकावरचे दतबा पाटलांचे रक्तबंबाळ मस्तक पाहिले आणि आपण रणांगणावरून पळालो. ते आपल्याला विसरता येत नाही. काहीही लपविण्याची, गैर वागून ते पोटात ठेवण्याची क्षमता आपल्या ठिकाणी नाहीय. त्याला वाटलं, वेळ येईल तसं करणं, त्या त्या वेळी निर्णय घेणं अधिक ठीक. बुणगे आणि बाया रेवाडीला होत्या. आता कुठे असतील; माहीत नाही. पण तुळसामावशीचा शोध तर घेऊ.

तो रेवाडीला गेला. तिथल्या व्यवस्थेची वाताहत झालेली होती. आणखी पुष्कळ बातम्या त्याला आधी येताना अन् रेवाडीला लागल्या. दतबा पाटील पडले तेव्हा जनकोजीबावा धावून गेले. जोषाने लढले. पण जखमी झाले. बंदुकींच्या पुढे त्यांचाही टिकाव लागला नाही. युद्धात अशा गोष्टी होतात. जनकोजीबावांना मारवाडात जयपूराजवळ कोटपुतळी म्हणून एक जागा आहे, तिकडे घेऊन गेलेत. बुणगे, बाया आणि जड सामान तिकडेच नेले आहे. आता कोटपुतळीला जाणे म्हणजे पुन्हा शिंद्यांच्या लष्करात जाणे. मोठी मुश्कील गोष्ट होती. पण जाणे आवश्यक होते. रात्रीची वेळ करून एखाद्या भामट्यासारखा तो शिंद्यांच्या लष्करात पोहोचला. त्याच्या आधी त्याने स्वतःचे कपडे बदलले होते. गिलच्यांच्या वेषात असताना सरळच की तिथे त्याचा मुडदा पडला असता. महकने दिलेले पैसे उपयोगी पडले होते. रात्री तळावर पोहोचून मोठ्या चतुराईने त्याने बुणग्यात तुळसामावशीची चौकशी केली. अन् फारसे सायास न पडता तो

तिच्यापर्यंत पोहोचला होता.

'आरे कुठं गायब झाला होता माह्या लेकरा! आरे मला लय बुळकांडी लागली व्हती. पार जगन का मरन आशी गत. आन त्याच्यात रोज पायी चालायचं. पार भात झाला रे मपल्यावाला. तुला पघायला न्हाईन का नायी, आशी गत झाली व्हती मपल्यावाली. आता तू आला. चल, मला चांभारगोंद्याला घेऊन चल. तुपल्या घोड्यावर तुपल्या माघं बसून येईन. मस समदे देव देव झाले. पुरी हौस झाली. मला आसं कुठंयबी मरायचं नायी. वाडवडलांची म्हन हाये का, मरावा त काशीत नायतर आपल्या गावच्या येशीत. मला आता काशी नको आन फाशी नको. मला चांभारगोंद्याला घेऊन चल.' त्याला पाहिल्यावर

ती हंबरडा फोडायचीच बाकी राहिली होती.

'त्याच्यासाटीच आलोय मी मावशी. उद्या सकाळी झुंजूरकाच निघू आपन. शिताळाईत घोडा चांगला चलतो. उन्हाच्या वक्ताला आराम करायचा आन सांजसकाळ दौड करायची. म्हंजी आपल्यालायबी बरं.'

'आरे आत्ता चल म्हनला तू, तरी लगीच निघन मी. आन हे पैशे घे तुपल्यापशी. त्योयबी एक जीवाला निस्कारनी घोर. बुळकांडी लागून मपला जीव चालल्याला. आन कोन्ही हे लुबाडीन का काय याचा घोर कायम मनात.'

'पैसे?' 'मंग? तुपले आन मपले- दोघांचे हायेत.' दसरत गप्प झाला.

'आरे लढाईला जातानी त्वा धिले व्हते ना मपल्यापशी. मस पैका
जमला आपल्यापशी. तुपलं ग्यान का कोकनाला ग्यालं का काय?'

'लय फापललो मावशी. डोसक्याचं पार भजं झालंय.' 'कुढं फापलला?'

'बुराडीच्या घाटावर गिलच्यांनी भाल्याच्या टोकावर ठुल्लयालं राजाचं
डोसकं पाहिलं आन फापललो.'

'आरे वाघासारका व्हता त्यो. वाघासारकाच मेला, तुळसामावशी
म्हणाली, 'पण आसुंदे. आता झोप तू. पहाटी उठून निघू आपन.'

तुळसाबाई भेटली तेव्हापासून दसरतचा जीव जरा थाऱ्यावर आला. प्रवासात अनेक मुक्काम झाले. स्वप्नात किंवा झोपेत तो काही बडबडला असेलच. पण त्याविषयी तिने चकार शब्दही काढला नव्हता. एक तर ती प्रत्येक मुक्कामी जमिनीला पाठ टेकली की गाढ झोपेच्या अधीन होई. दुखण्याने ती पुष्कळ हल्लक झाली होती. प्रवासात त्याने तिला एका वैद्याला दाखवलं. नाडी चिकित्सा करून वैद्यराज म्हणाले, 'म्हातारी अगदी ठणठणीत आहे. हगवणीमुळे अशक्तपणा आलेला आहे. तो काही दिवसात जाईल. पथ्यपाणी काहीच नाही. मात्र काही दिवस तूपभात खाऊ घाला. क्षुधाशमनासाठी जितका लागतो, त्यापेक्षा अंमळ कमी द्या. जेवणानंतर गुळाचा खडा अवश्य द्या. अंगात पुरेसा जोर आला की नेहमीचे अन्न द्या. पाणी भरपूर प्यायला सांगा. चारसहा दिवसात खडखडीत बरी होऊन जाईल ती.' आणि अगदी तसंच झालं. खडखडीत बरी होऊन ती टमाटमा बोलू लागली. आणि मुक्कामी मात्र जमिनीला पाठ टेकली की लगेच सुखाने घोरू लागली. दसरतचं तसं नव्हतं. कमरबंदात ऐवज होता. मनात भगौडेपणाची भावना होती. अधून मधून झापड आल्यासारख्या झोपेत म्हणा वा गुंगीत तो काही बोलला सुद्धा असेल. त्याच्याविषयी ती शब्दानेही बोलली नव्हती. त्यासाठी ती स्वतः कधीच जागी राहिली नसेल. चांभारगोंद्याला पोहोचल्यावर ती अगदी खूश होऊन गेली. दसरत सुद्धा खूषच झाला अर्थात. आता कमरबंद जपायचं तितकं कठीण राहिलं नव्हतं. कपड्यांच्या गाठोड्यात त्याने तो नीट ठेवून दिला होता. पण मग साफसफाई, भुईसारा, पोचारा असे घराला नांदते करण्यासाठीचे उपचार पूर्ण झाल्यावर कपड्यांच्या स्वच्छतेची पाळीही आलीच.

'आता, उंद्या कनी ; समदी कापडं घेते आन सरसोतीच्या निवळचंक पान्यात खसाखसा धुवून आन्हिते. म्हंजी पार समदं चकाचक होऊन जाईन.' एका रात्री भुईला पाठ टेकताना ती म्हणाली. सरसोती म्हणजे सरस्वती नदी. चांभारगोंद्यातली.

त्याला वाटलं, आपलं मन सुद्धा ही म्हणते तसं निवळचंक पाण्यात खसाखसा धुवून

काढलं पाहिजे. त्याच्यामुळं आपलं मन सुद्धा चकाचक

होऊन जाईल. ही बाई आपल्यासाठी ते निवळचंक पाणीच आहे. मनातलं सगळं खरं खरं बोलावं अशी या दुनियेत आपल्यासाठी फक्त हीच तर आहे.

'मावशी, लयच झोप आला का काय तुला?'

'नायी रे बाबा. कारे, काय झालं? तुला झोप येईना झाली का

काय?'

'तसं म्हन. मला बोलायचं व्हतं तुपल्यासंगती.' 'मंग बोल ना. तुपलं त्वांड बांधलंय का काय म्या?'

'काय नाय आपलं ते हेच- म्हंजी मी बुराडीच्या घाटावरून ऐन मोक्याला पळालो. ती बात मपल्या जीवाला लई लागली. आन आज सुदिक मला नीट समजत नायी, का बोवा, आपल्याला न्यामकं भ्याव काह्याचं वाटलं. आन कोन्हा संगती बोलायची सोय पन नव्हती...' हळूहळू त्याचा स्वर मोकळा होत गेला. मग तो घोड्याचा पळायला नकार, पायी धावणं, नदीकाठ, कपड्यांची लक्तरे. दिवसरात्री पडणारी स्वप्ने, त्यांच्या नवनव्या आवृत्या. मथुरेजवळ नदी ओलांडून पल्याड जाणं. तिथे झोपलेला पठाण. त्याच्याकडे मिळालेला ऐवज. महक नावाची मुलगी. तिच्यासोबतचा प्रवास. तिचं भलेपण. त्याची सावधगिरी; हे सगळं न थबकता तो बोलत राहिला. बोलून झाल्यावर हुश्श करून थांबला. त्याला मनावरून एक मोठं ओझं उतरल्यानं खूप मोकळं-बऱ्याच दिवसांनी दिलाला अगदी हल्लक- वाटलं.

'त्यो आयवज कुठं हाये?' 'घरातच हाये. मपल्या कापडांच्या गठुड्यात.' 'इकते दिवस लपून ठुल्ला. मपल्यापसून सुद्दा?' 'काय सुदरानी झालं व्हतं.'

'मंग आता कसं सुदारलं?' 'ते पन नायी सांगता येत.' 'मला दाखितो?' 'मंग? तुपल्यापशीच ठिवायचा ना त्यो.' 'आन तू कुढं निघाला?'

'लगीच नायी जात समजा. पण जाईन तव्हा तुपल्यापशीच ठिवावा लागन त्यो.'

'म्हंजी तुपल्या जीवाचा घोर मपल्यापशी.' 'तसंच म्हन.' 'आन मी नाई व्हवून पडले उंद्या तर?' म्हातारी बोळक्यातून हसली.

'तू काह्याला करशीन तसं? आन जे मुळापसून मपल्यावालं नायी, त्याचा घोर मी नायी धरनार.'

"आरेऽऽ माह्याऽऽ राजा माह्या दसरत्या! मी काह्याला करीन तसं? किती कुठून कुठून धरून आनली त्वा ही जोखीम. चल, आन. पधुंदे मला डोळे भरून.'

कमरबंद सैल करून त्याने दोन शेरांचा तो चमकदार पिवळा आडूळ ऐवज जमिनीवर सांडला. दोघांचेही डोळे विस्फारले. तो देखील पहिल्यांदाच ते असे बघत होता. त्या दोघांनीही इतकी संपत्ती त्यांच्या आयुष्यात याच्या आधी कधीही पाहिलेली नव्हती. त्यांच्या अंगाला कंप सुटला. काही बोलवेनाच. 'आरे, पांडुरंगा, परमेसराऽऽ' ती थरथरत्या स्वरात म्हणाली. तिने डोके वर करून ईश्वराला हात जोडले. तेही थरथरत होते.

साताठ महिने असेतसे गेले. त्यांनी ऐवज घरातच खोल खड्डा घेऊन त्यात पुरला होता. एका पितळी घागरीत नीट ठेवून तिच्यावर झाकण ठेवून खड्ड्यात बंदोबस्तात ठेऊन त्याच्यावर लाकडं, अन् त्याच्यावर मुरूम. थेट जमिनीला आल्यावर सगळं एकसारखं

करून सारवण. त्या जागेवर गोधडी अंथरून म्हातारी झोपायची. पहिले काही दिवस ऐवजाच्या असण्याचं सारखं मनात असायचं. हळूहळू त्यांना सवय झाली. आता रात्रीबेरात्री ती नेहमीसारखी कोणाच्याही मदतीला बिनधास्त जाऊ लागली. म्हणजे आधीही जातच होती. पण मनात धाकधूक असे. ती फिकी होत गेली. दसरत इथेतिथे कामाला जात असे. पण ते दिवसा. रात्रीचे त्याला कसले काम! झोपणे आणि राखण करणे. हळूहळू राखणाची भावनाही विरळ होत गेली. आहे ते घरात सुरक्षित आहे. आणि आपण दोघे सोडून ते कोणालाही माहीत नाही अशी खात्री झाली. ओझे हटले. त्या ऐवजाचे काय करायचे, त्याचा वापर कसा करायचा हे त्यांना कळत नव्हते. त्याच्या असण्याचा आणखी कोणाला अगदी बारकासा धागा लागला की आपले जगणे फार असुरक्षित होईल हे त्यांना समजत होते. त्याच्या असण्याने, असण्याच्या रहस्यमय ज्ञानाने ते दोन जीव एकमेकांशी अधिक घट्ट जोडले गेले होते. आपल्या खराडी येथील जगण्याच्या, त्या दिवसांच्या कितीतरी गोष्टी त्याने तिला सांगितल्या. अखेर काय झाले आणि आपण का पळालो हेही त्याने सांगितले. आपण तिथे परत का जावू शकत नाही हेही. आई, वडील, बायको, मुलगा यांचे काय झाले

हेही माहीत नाही. पळताना बाप जे रहस्यमय बोलला तेही.

'त्याच्यानी मावशी, आता तूच मपली आई आन बाप,' एकदा तो तिला म्हणाला.

'आन मला तरी तुपल्याबिगर कोण हाये माझ्या पुता! एक लेक हाये. ती तिच्या घरी सुकानी नांदती. लेकाची कमी व्हती.त्यो धर्मानी मला मिळाला.'

तिनेही तिच्या अनेक गोष्टी त्याला सांगितल्या. तिचा नवरा हत्तीसारखा दणकट गडी होता. गोंधळासाठी उभा राहिला की रात्र रात्र सगळ्यांना खिळवून ठेवायचा. निळावंतीची गोष्ट तर त्यानीच सांगावी. अशी बहार करायचा की सारे खिळून राहात. किती पात्रं माणसांपासून पशुपक्ष्यांपर्यंत; सगळं आवाजाची पट्टी बदलत, चेहऱ्यावरचे आविर्भाव बदलत, प्रत्येक जागी एकजीव होऊन करायचा. फार मशहूर होता. गमत्या होता. एके दिवशी तो तिला म्हणाला, 'आजची ही रात्र माझी शेवटची.' आणि हसला. आणि झोपला. तिला ते काहीच खरं वाटलं नाही. काहीच आजार नव्हता. स्वभाव थट्टेखोर. तिनं ते का मनावर घ्यावं? पण सकाळी उठून पाहते तर खरंच तो मेला होता. याला काय म्हणायचं?

ती एकटीने खराडीला गेली. तिथे हुषारीने सगळ्या बातम्या काढल्या. परत आल्यावर म्हणाली, 'तू म्हनलास तेच खरं हाये पुता. आता आपनच एकमेकांला. तुपल्या बापाला मारलं त्याहयनी. तुपली आई हाय खाऊन मेली. पन तुपली बायकू आन प्वार जीत्ते हायेत. तुपल्या सासरवाडीला. पन तू काय तिकडं जाऊ नको. जरासिक सासूल लागला तरी माग काढून खापलतील तुला. मरायचंच आसल तर लढाईला जावून मर. काय तरी कीर्त करून मर. ह्या पाप्यांच्या हातून नको मरू.'

दसरतच्या मनात तेच होतं. लढाईवर जाण्याची त्याची इच्छा होती.

मनाशी डाचत असलेलं भगौडेपणाचं शल्य त्याला पुसायचं होतं. अन् ते इतर कोणासाठी नव्हे तर फक्त स्वतःसाठी त्याला ते करायचं होतं. तशी संधी उभी राहिली. बातम्या होत्या की भाऊसाहेब पेशवा फार मोठी फौज घेऊन अबदालीचा बंदोबस्त

करण्यासाठी उत्तरेस निघाला आहे. बुणगे, बाजार मिळून लाखभर मनुष्ये आहेत. तुळसाबाईची परवानगी घेऊन आपल्या घोड्यावर बसून तो निघाला तेव्हा ती म्हणाली, 'इथुल्ली काळजी करू नको. तू परत येशीन तव्हर मी जित्तीच राहीन. आन नाय राहिले तर सर्पिण व्हऊन धनाचं राखन करीत राहीन. ते मानकाचा दिवा डोईवर असल्याले सर्प आस्तेत ना; तशी.'

5

दसरत भाऊसाहेब पेशव्याच्या फौजेसोबत उत्तरेत गेला आणि संधी मिळताच कुठेतरी वेढा घालून बसलेल्या शिंद्यांच्या शिबंदीत सामील झाला. एक तर ओळखीचे सारे लोक तिथे होते. आणि त्यांच्यातून तो पळाला होता तर त्यांच्यातच राहन लढण्याची उमेद त्याने ठेवली होती. आश्चर्य म्हणजे, इतके दिवस तो कुठे होता, काय करीत होता, हे कोणीही त्याला विचारले नाही. अपवाद एकच. जानबाकाका. ते तिथे असणार हे सरळच होते. त्यांच्याशी काय बोलायचे याची मनातल्या मनात त्याने पुष्कळदा तालीम केलेली होती. वेळ आली की सरळ खरे ते बोलून आपल्या मनातला सल कमी करायचा, असे त्याने ठरविले होते. प्रत्यक्षात ते समोर दिसले तेव्हा त्याचे अंग लटलट कापू लागले. रणांगणातून पळून जाताना त्यांनीच तर त्याला पाहिले होते. घोडा नकार देत होता आणि हा पळत होता. तेव्हा ते किती दाहक हसले होते. त्या हसण्याचा दंश अजूनही त्याच्या मनावर ताजा होता. रात्रंदिवस पडणाऱ्या अनेक स्वप्न आणि स्वप्नसदृश्य भ्रमांनी त्याच्या मनात साकार केलेल्या अंतिम चित्रात तेच दृष्य होते. त्याला पाहताच ते म्हणाले,

'आरे दसरत, कुठं गायब झाला होता इतके दिवस?' 'मी दख्खनला गेलो व्हतो' तो चाचरत म्हणाला. 'ते कशासाठी?'

'ती माझी माय व्हती ना ती तुळसामावशी- तिला लयच जुलाब सुरू झाले व्हते. पार जगन का मरन आशी परस्तीती व्हती. बातमी लागली त गेलो. तिला वैद्याकडं घेऊन गेलो. बरी झाली तर म्हने मला आता इथं राहायचं नायी. मला चांभारगोंद्याला न्हेऊन घाल. मी लयच गरबडून गेलो. न्हेऊन घातली.'

'बरं केलं ते. पण कमसीकम सांगून तर जायाचं.' 'त्या गरबडीत सुदारलं नायी.' 'बरं. आसुंदे. आलास हे माहात्म्य.'

संभाषणाच्या सुरुवातीचं त्याचं गांगरलेपण हळूहळू नाहीसं झालं. त्याच्या लक्षात आलं की, जानबाकाकांनी आपल्याला पळून जाताना पाहिलं, हा आपला भ्रम आहे. त्यांनी पाहिलेलं नाहीय. तो भ्रम आपल्या मनानं निर्माण केलाय. आपल्या मनातील अपराधाच्या भावनेतून तो उगवलाय. या भावनेनं तो खुलला. म्हणाला,

'आता मी कुढंच जानार नायी.'

'कसा जाशीन? आपले दतबा पाटील गेले. ह्या पिर्थमीवर कोनच अमरपट्टा घेऊन आल्याला नस्तोय. लढाईच्या मैदानावर कायमच मरान समोर आसतंय. लढतानी मरतो त्यो सर्गाचा मानकरी व्हतोय. पण ज्या रीतीनी गिलच्यांनी त्यांचं डोकं धडापासून तोडलं, त्याची लईच चंडाळी आलीय समद्यानला.'

दसरत अधिक बोलला नाही. शिंद्यांच्या तळावरील ही अस्वस्थता आणि खदखद यांचे अंशतः परिमार्जन होण्याची संधी कुंजपुरा येथील लढाईच्या निमित्ताने लवकरच चालून आली.

शिंदे-होळकर व विठ्ठल शिवदेव कुंजपुऱ्यावर पुढे चालून गेले; मध्ये भाऊसाहेब, त्याचे मागे तोफखाना व पिछाडीस दमाजी गायकवाड असे १६ ऑक्टोबर १७६० रोजी कुंजपुऱ्याजवळ पोहोचले. नजीबखानाचा भाऊ नजीबतखान किल्ल्यात संरक्षणार्थ असून सरहिंदचा कारभारी अब्दुस्समदखान व मिया कुतुबशहा त्याचे साहाय्यास धावून आले. ही बातमी लागताच अब्दालीने काही फौज यमुना पूर्वतीराने तिकडे रवाना केली. आणि अब्दुस्समदखानास कळविले. मदत येईपर्यंत कसाबसा टिकाव धरा, हे अब्दालीचे पत्र सहजगत्या मराठ्यांच्या हाती लागले. त्यांनी त्वरा करून कुंजपुऱ्याच्या किल्ल्यावर हल्ला चढविला. इब्राहीमखानाच्या तोफांनी जोराचा मार देवविला आणि तीन टोळयांनी तिहींकडून चढाई केली. त्या वेळी लढाई निकराची झाली. शिंदेमंडळीला दत्ताजीच्या मरणाचा सूड घेण्याचा आवेश चढला, त्यांनी शिकस्त केली. दमाजी गायकवाडाने हरहर महादेव घोष करून तोफांनी पडलेल्या भगदाडातून घोडे घातले, त्याबरोबर शहर व किल्ला हस्तगत झाला. अब्दुस्समदखान लढताना मारला गेला. जखमी नजाबतखान आणि कुतुबशहा जिवंत सापडले, त्यांस हत्तीवर घालून भाऊसाहेबाकडे आणिले. पाच-सहा हजार माणूस मारले. सहा-सात हजार जखमी झाले. वरकड दाती तृण धरून निघून गेले. कुंजपुऱ्यात लुट पुष्कळ पैदा झाली. वस्त्रहरण केले. तोफा, बंदुका, तीन हजार घोडे, दोन लाख मण गहू व इतर सामान दहा लाखांचे आणि साडेदहा लाख रोख अशी लुट सरकारात आली. याशिवाय शहरात प्रत्येकाचे हातास काय लागले असेल ते वेगळे. धान्य पुष्कळ जमले म्हणून लोकांस पगाराऐवजी दाणा देण्यात आला. नऊ महिन्यांपूर्वी बरारी घाटावर दत्ताजीचे शीर कापून ते अब्दालीस नजर करणारा कुतुबशहा जिवंत सापडला, त्याजवर भाऊसाहेब आणि शिंदे वगैरेंचा भारी राग झाला. पकडून आणल्यावर तो सर्वाना शिव्या देत सुटला. त्यावरून त्याला ठार मारले आणि शीर भाल्यावर अडकवून लष्करात फिरविले.....

कुजपुऱ्यात ज्याला जसा जमेल तसा त्याने भरपूर हात धुवून घेतला. बंकट भोसले म्हणून दसरतचा जोडीदार होता. तो एका दुकानदाराच्या घरातून खारीक, खोबरे आणि तूप घोड्यावर टाकून घेऊन आला होता. स्वतःसाठी भरपूर ठेऊन सुद्धा बरेच उरल्यावर त्याने ते मित्रांमध्ये वाटून टाकले होते. दसरतला अर्थातच त्याचा वाटा मिळाला होता. असे कैकांनी काय काय आणलेले आपापल्या मित्रांमध्ये वाटले होते. सगळीकडे सगळया गोष्टींची चंगळ होती. बुणग्यांमधल्या व्यावसायिक स्त्रियांची चलती सुद्धा चांगलीच वाढली होती. बंकट भोसले रात्रीचा अधूनमधून गायब व्हायचा. दसरतला शंका आली, तो

या धंदा करणाऱ्या बायांकडे जातोय की काय? पैसा आणला असेल. ऐश करायचा दुसरा कोणता मार्ग? त्याला तुळसामावशीचे शब्द आठवले. काहीही झालं तरी ते करायचं नाही. आवांकडे जायचं नाही. रोग लागतो. जिंदगी बरबाद होते. अन् आसपास बघतच होता ना दसरत. त्याने बंकटला स्पष्ट विचारलं. तो म्हणाला, 'मी आवांकडं कशाला जाऊ? मी जातो, पण ते चांगल्या बाईकडं जातो. कुंजपुऱ्यातलीच आहे ती.' मग भोसलेने सारीच कथा ऐकवली. म्हणाला, लढाईच्या काळात संधी मिळेल तसा सगळ्या गोष्टींवर हात टाकायचं कोणी सोडत नाही. म्हणजे बाकी माल-टाल तर मारतोच आपण. अन् तशाच बाया. तरणी-म्हातारी जी मिळेल ती. तुंबलेलेच असतो ना! किंवा जे काही असेल ते असेल. इथं जीवाची घडीभराची सुद्धा शाश्वती नसती, तिथं बऱ्यावाईटाच्या गोष्टी झूट. तर मी त्या घरात शिरलो-म्हणजे हे खारीक, खोबरं अन् तूप आणलं ना त्याच घरात. तर एक बाईच समोर आली. तुला तर माहितीच आहे. बायका कधीच समोर येत नाहीत. लपून बसतात. धुंडाळाव्या लागतात. ही थेट समोर आली. म्हणाली, तुला पाहिजे ते घे. फक्त माझ्या नवऱ्याला मारू नकोस. तुला नेण्यासाठी इथं खूप सगळं आहे. तू माझ्याशी येऊ शकतोस. अर्थात त्यासाठी तू माझी परवानगी कशाला मागशील? ती बाई अगदी भिजवलेल्या कणकेसारखी गोरी आणि जवानीने मुसमुसलेली होती. अन् परवानगी कशाला मागशील म्हणताना ती खुशाल हसली. ती बिलकुलही घाबरलेली नव्हती. मग काय रे, गेलो तिच्याशी. ते इतकं जबरं होतं की तसं कधी झालेलंच नव्हतं. म्हणजे तसा अनुभवच नव्हता. म्हणजे आपल्या बायका कशा रे नुसत्या काष्टा फेडून पासल्या पडतात त्या. काय झक मारायची ती मार. उरक. असा मामला. हे फारच वेगळं होतं. तीन घंट्यात चार वेळा गेलो मी. म्हटलं, लुटालूट गेली तेल लावीत. अशी बाई परत कशाला आपल्या जिंदगानीत येईल? अखेर तीच म्हणाली, इतक्या कमी वेळात इतक्या वेळा आलास. मरायचंय का तुला ? जा आता. परत ये, जमेल तेव्हा. अन् तिनंच हे खारीक अन् सगळं बांधून दिलं. तिच्याकडंच जात असतो मी. चटकच लागलीय म्हण मला. आता, याच्यावर समजा तू म्हणशील की मलाही घेऊन चल तिच्याकडं. ती काय तुझी बायको नाही. तर ते मी करणार नाही. अजिबात करणार नाही. म्हणजे काय को ती काय धुतल्या तांदळासारखी नाहीय. तिचा नवरा म्हातारा आहे. तिचे काही यार होते आधी. पण आता ते तिच्याकडे फिरकत नाहीत. माझ्याकडे एक म-हाटा फौजी येत असतो, असं तिने सांगितल्यावर ते सारे टरकले. मी म्हणालो, ह्या म्हाताऱ्या नवऱ्यासोबत का नांदतीस तू? म्हणाली, एक तर त्याची कमाई चांगली आहे. अन् तो वाईट नाहीय. हौस म्हणून त्याने मला करून आणलीय. तो माझ्या उद्योगांकडे दुर्लक्ष करतो. चार दिवसांची जवानी. नंतर तू कशाला असं करशील, असं तो म्हणतो. मी आल्यापासून त्याच्या धंद्यात बरकत आली असं तो म्हणतो. ते सरळच आहे ना! मला बघायला मिळावं म्हणून येतात लोक. अन् घेतात जिनसा. मी सतत त्याच्या भोवताली असावं, असं त्याला वाटत असतं. अन् आता तर ते माझे यार ; ते कोणीच येत नाहीत. अन् ही लढाई संपली की तुही जाशीलच निघून. म्हणजे सगळंच छान, असं त्याचं म्हणणं. तुझ्या हल्ल्यापासून मी सगळं वाचवलं, म्हणून खूष असतो हल्ली तो.'

तर अशी एकूण बंकट भोसले याची कहाणी. अशा कैकांच्या कैक गोष्टी असतीलच.

बहुतेक सगळ्या बळजोरीच्या. त्या कोण कशाला कोणाला सांगत बसतो? भोसलेची गोष्ट वेगळी होती. स्पष्टच होतं की त्या गोष्टीला पुढचा रस्ता नव्हता. तरीही आपल्या जागी ती सुंदर होती. बाकी अशा गोष्टी आणि घटनांना लष्करात जागाच उरलेली नव्हती. फौज पानिपत गावाबाहेर पाण्याच्या सोयीने तळ देऊन बसलेली होती. भोवताली खंदक होते. समोर गिलच्यांची फौज तळ देऊन बसलेली. कोस-दीड कोसाच्या अंतरावर. एकमेकांना एकमेक समोर दिसत असत. इकडचे तिकडे आणि उलट अशी येणीजाणी चालू होती. बातम्या काढण्यासाठी इकडचे तिकडे आणि उलट असे हेरगिरीचे चालू होते. शहाण्या लोकांच्या वाटाघाटी त्याच प्रकारे चालू होत्या. लढाई न करता एकमेकांना सोयीचे होईल असा रस्ता कसा शोधता येईल असे उद्योग चालू होते. ते सगळे मोठ्या लोकांचे मनसुबे आणि उद्योग. माहिती खाली पाझरत येई तेव्हा तिचे रूप बदलत असे. पण हळूहळू असे झाले की मराठ्यांची फौज चाही बाजूंनी आवळत गेली. खडी फौज, बुणगे, बाया असा लाखभराचा

किंवा अधिक मोठा जमाव होता. धान्यापासून सरपणापर्यंत सगळ्या गोष्टी मिळण्याचे रस्ते आटत चालले होते. उपासमार वाढत चालली होती. रोगराई वाढत चालली होती. तसा डावच अबदालीने टाकला होता. त्याने धीमेपणे सगळीकडून सगळे रस्ते आवळत आणले. आपल्या लोकांनी गिलच्यांवर पाठीमागून दाब टाकावा, त्यांनी रोहिल्यांचा मुलुख लुटून त्याना ढिले करावे, असे भाऊसाहेबाचे डावपेच होते. ते जुळले नाहीत. अबदाली प्रबळ झाला. मराठ्यांचे हाल सुरू झाले. घोडे अन् बाकी जनावरे मरू लागली. माणसांना फाके पडू लागले.

२२ नोव्हेंबर १७६० कार्तिक शुद्ध पौर्णिमा होती. चंद्रग्रहण होते. तत्संबंधी हिंदूंचे देवतार्चन चालू असताना दुराणी वजीर शहावलीखान काही लष्कर घेऊन पानिपतच्या नैऋत्य भागी एका विहिरीजवळ टेहळणीस आला असता सायंकाळचे समयी सिंद्यांच्या लोकांनी त्यास ओळखून एकदम गाठले. जनकोजी सिंद्याने त्याजवर निकराचा हल्ला करून त्याचे बहुतेक लोक कापून काढले आणि वजीरास त्याचे गोटापर्यंत पिटीत नेले. वजिराची कुमक करण्यास रोहिले आणि दुराणी चालून आले. उभय दळे एकमेकांवर आदळली. मराठ्यांनी ते दिवशी शर्थ केली. ते समयी बळवंतराव मेहेंदळे यांनी सिंद्यांची कुमक केली असती तर तेच दिवशी ताम्रांचा पराभव झाला असता. सिंदे केवळ इरेस पडले. गिलचा माघारा सारून गोटात घातला. त्यांच्या तोफा कित्येक ओढून आणिल्या. रोहिले दुराणी यांचे हजार मनुष्य ठार झाले. यांचे घोडे आणि माणसे मिळून पांचेकशें जाया झाले. झुंज मातबर झाले. संध्याकाळ जाला. नाही तर तेच दिवशी पारिपत्य उत्तम झाले असते. त्यांनी गोट सोडून पळ काढला होता....

त्या संध्याकाळी बंकट भोसले घोड्यावर स्वार होऊन आपल्या प्रियेला भेटण्यास निघाला होता. 'पौर्णिमेच्या त्या शुक्ल रात्री, तुला घराच्या माळवदावर चांदण्यातला उघडा भोग मिळेल,' असे आधीच तिने त्याला सांगितले होते. त्याच्या नुसत्या कल्पनेने त्याचे शरीर आणि मन अतोनात उल्हासित कंपनशील जोजावत होते. भोवताली अनेकांचे अनेक पूजापाठ चालू होते. काहींची अनुष्ठाने चालू होती. अनेक मांत्रिक आपले मंत्र उजळून घेत होते. बंकट स्वतःला उजळून घेण्यासाठी अतीव उत्साहाने निघाला होता. त्याला

त्याची प्रिया फक्त दिसत होती. त्याच्यासाठी दुनियेतल्या बाकी कोणत्याही गोष्टी अस्तित्वशून्य झालेल्या होत्या. पण तसे तरी कसे म्हणावे? एका विहिरीजवळ त्याला काही लोक दिसले. ते मराठी पोषाखात होते. म्हणून तो बिनधास्त त्यांच्यात गेला. त्यांनी त्याला काही तरी विचारले. ते त्याला समजले नाही. आणि त्याच्या लक्षात आले की हे मराठे नाहीत, गिलचे आहेत. त्याने वेळेचे अवधान राखून न बोलता संकेत केला की, मी तिकडे मराठ्यांत जातो आणि खबर आणतो. शिद्यांच्या गोटात येऊन थेट जनकोजीबावा यांनाच त्याने खबर दिली. त्यावेळी कानात भिकबाळी घातलेले कोणी एक प्रौढ ब्राह्मण सरदार त्यांच्या सोबत बसलेले होते. जनकोजीबावा त्यांना म्हणाले, 'काका, गिलचे टेहेळणीला आलेत. चला, त्यांचा मोड करू. अशी जरब बसवू की पुन्हा ते या फंदात पडणार नाहीत.' ते काका म्हणाले, 'वेडा आहेस की काय? असे दुःसाहस करू नकोस. आता ग्रहणकाळ सुरू झालेला आहे. मला काही तर्पण, जपजाप्य करायचे आहे. फार तर लक्ष ठेव त्यांच्यावर. चालून कशाला जातोस? अन् लक्षात घे, ओठ पिळले तर अजूनही दूध निघेल असे तुझे वय. कशाला अंगावर जातोयस गिलच्यांच्या? फार कडवी जात आहे ताम्रांची.' जनकोजीबावा ताडकन उठले. म्हणाले, 'नका येऊ काका. शिंदे काय आहेत हे सारे जाणतात. मी जयाजींचा पुत्र आणि दत्ताजींचा पुतण्या आहे. ते असणे काय असते हे मी आधी सगळयांना दाखविलेले आहे. आज पुन्हा आपणास दाखवून देईन.'

आधी अगदी छोटी टोळी विहिरीजवळ गेली. बंकट सगळ्यात पुढे होता. दसरत त्याच्या बाजूला होता. बंकटला पाहताच गिलच्यांना वाटले, हा काय सुराग घेऊन आलाय? जाऊन येतो म्हणाला होता अन् छोटी टोळी घेऊन आलाय. खबर असणारच. पण पुरेसे जवळ येताच त्यांनी समशेरी उपसल्या. गिलचे सावध होतेच. त्यांनीही तेच केले. पण मग त्याच वेळी झाडात छपून बसलेल्या जनकोजीबावाच्या झुंडीने वावटळ आल्यासारखी चाल केली. गिलच्यांच्या लक्षात आले, लढण्यात मतलब नाही. पळणे ठीक होईल. पाठलाग होईलच. काहीजण कापले जातील. तरीही आपल्या तळावर पोहोचले की झुंज देता येईल. हे काही फार लोक नाहीत. यांना हाकलता येईल. पण ते तसे नव्हते. शिंद्यांच्या मोठाल्या तुकड्या मागे होत्या. संदेश मिळताच त्या धावल्या. एकच गर्दी करीत त्यांनी पळत्या गिलच्यांची लांडगेतोड केली. उरले ते तळावर पोहोचले. शिंद्यांनी थेट तिथेही धडक मारली. रोहिले आणि दुराणी सावध होईपर्यंत शिंद्यांच्या लोकांनी हलकल्लोळ केला. ते सावध झाल्यावरही धडकेची धग कमी केली नाही. खवळलेल्या समुद्राच्या उसळत्या प्रलयंकारी लाटा किनाऱ्याशी अटीतटीने धडकाव्यात तसे मराठे पुन्हा पुन्हा गिलच्यांवर धडकत होते. पूर्वी सिंदखेडराजा येथे दत्ताजींनी डुक्कर खळीस यावा तशा निकराने निजामाशी युद्ध केले होते. तसेच इरेला पडून जनकोजीबावा लढले. त्यांनी गिलच्यांना सडकून मार दिला. हजारांवर गिलचे कापून काढले. उरलेले गोटात घातले. त्यांच्या कित्येक तोफा ओढून आणल्या. यांचेही घोडे, माणसे मिळून शे-पाचशे कामास आले. अंधार होऊ लागल्याने झुंज थांबवावे लागले. या लढाईत बंकट भोसले जबर जखमी झाला. जनकोजीबावांनी त्याचा गौरव करून एक मोत्यांचा कंठा त्याला बक्षीस दिला. त्याच्या उपचारांची उत्तम व्यवस्था केली. दसरत साहजिकच त्याच्या दिमतीला होता. चार दिवसांनी अंगात जरासा तवाका आल्यावर बंकट दसरतला म्हणाला, 'अरे त्या

पुनवेच्या दिवशी मी कुंजपुऱ्याला निघालो होतो. तिला भेटायला. चांदण्या रात्री भेटायचं आमचं आधीच ठरलेलं होतं. त्या विहिरीजवळ हे गिलच्यांचं प्रकरण मधेच उपटलं. पुढे जायचं तर राहिलंच. अन् त्यात पुन्हा मी असा जायबंदी झालो. मला तिला काहीच कळवता आलेलं नाहीय. तर माझ्यासाठी तू तिकडे जा. आणि तिला काय घडलं ते सांग. एरवी मी दुनियेपासून तिला लपवलेलं होतं. तुझ्यापासूनही. पण आता माझा नाईलाज आहे. मी बरा व्हायला वेळ लागेल. निरोपासाठी मी आणखी कोणावरही विश्वास ठेऊ शकणार नाही. तू माझं काम कर.' दसरत म्हणाला, 'मी जाईन. पण ते कोण, काय त्यांची नावे मला काहीच माहीत नाही.' बंकट म्हणाला, 'ते बारीकसं गाव. तिलाराम दर्जी गावभर प्रसिद्ध आहे. दर्जी म्हणजे शिंपी. पण त्याचं किराणा सामानाचं दुकान आहे. तो जातीने शिंपी असेल किंवा नसेल- ते मला माहीत नाही. त्याने आपलं काहीच बिघडत नाही. तू जा आणि माझा निरोप सांग.'

दसरत मोठ्या मुष्किलीने कुंजपुऱ्याला पोहोचला. गिलच्यांनी अनेक ठिकाणी चौक्या बसवून मार्ग बिकट केलेला होता. युद्धक्षेत्रावरील ताणाची ही झलक बाहेर पडल्यामुळेच दसरतला दिसली. मराठ्यांच्या तळावरील उपासमार, घोड्यांचे मृत्यू, सततचा गलिच्छ वास यांच्या मागची कारणे दिसली. म्हणजे, ऐकून होताच तो. ते प्रत्यक्ष दिसले. तो गावात पोहोचला तेव्हा बंकट म्हणाला होता तसा तिलाराम दर्जी याचा ठेपा सहज लागला. त्याचे घर बंद होते. दुकान बंद होते. गावच सारे ठप्प झाल्यासारखे बंद होते. त्यात जो दिसला त्याने माहिती दिली हे नशीब. तोही कुतूहलापोटी धाडसाने बाहेर आला असेल. फौजांच्या सततच्या धाडींमुळे ते तसे असणे स्वाभाविकच होते. फौज गिलच्यांची असो व मराठ्यांची; दाणागोटा, सरपण, वस्त्रे प्रावरणे अशा सगळ्यांसाठी धाडी पडत. मराठ्यांनी अगदी पानिपत गावात तरी कुठे काय शिल्लक ठेवले होते? गिलचेही तेच करत होते. दसरतने दाराची कडी वाजवली, तेव्हा बराच वेळ प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी, “मी बंकट मराठा याचा निरोप घेऊन आलोय' असे तो दाराच्या फळ्यांच्या जोडणीत तोंड धरून म्हणाला. त्यावेळी त्याचे तळहात दोन्ही बाजूंनी तोंडाजवळ धरलेले होते. आवाज जास्तीत जास्त आत जावा म्हणून. त्या युक्तीचा परिणाम झाला. आतली कडी उघडल्याचा आवाज झाला. एका म्हाताऱ्याने समोरचा इसम जेमतेम दिसेल इतपत तोंड बाहेर काढले. तो तिलाराम असावा. किंवा नक्कीच होता. वेळ न दवडता दसरत म्हणाला, “पुनवेच्या दिवशी बंकट येणार होता. पण अचानक गिलच्यांचं अन् आमचं झुंज लागलं. त्याच्यात तो जखमी झाला. म्हणजे बरा होईलच तो. काळजी करावं असं नाही काही. पण त्याच्यामुळं त्याला येता आलं नाही. मी त्याचा दोस्त. हा निरोप तुम्हाला सांगण्यासाठी त्याने मला पाठवलंय.' बाई आणि गडी यांच्या नात्याचं जे चित्र बंकटने रंगवलेलं होतं, त्यात अशा समयी बाई मागे उभी असेल असा दसरतचा होरा होता. तो अजिबातही चुकला नाही. लगेच मंजुळ स्वर प्रकटला, 'बरं झालं आपण आलात. आम्ही काळजी करत होतो. त्यांना सांगा, लवकर बरे व्हा. इकडे येण्याची घाई करू नका. आम्ही तुमचेच आहोत.' बापरे! ती स्त्री तिच्या नवऱ्यासमोर बोलत होती. ती हे बोलत असताना तिलाराम ओठ किंचित फाकवून बोळक्यातून हसत होता. त्यात लाचारीच्या छटा होत्या. आणि काही एक जिव्हाळा सुद्धा. दसरतला आश्चर्य वाटलं. 'आम्ही आपली खातीरदारी करू शकत नाही,

यासाठी माफ करा,' ती स्त्री म्हणाली. तिलारामने किंचित हात जोडले आणि दरवाजा बंद करून घेतला.

पौर्णिमेच्या दिवशी बंकटच्या खबरेच्या आधारावर शिंदे गिलच्यांवर चालून गेले त्या दिवशी जनकोजीबावा यांच्या सोबत जो ब्राह्मण सरदार बसलेला होता त्याचे नाव बळवंत गणपत. बळवंतराव मेहेंदळे. हा पुढच्या काळात प्रसिद्धीस आलेल्या नाना फडणवीस याचा मातुल. त्या दिवशी शिंदे यांनी पराक्रमाची शर्थ केली. मेहेंदळे सोबत असते तर त्याच दिवशी ताम्रांचा मोड झाला असता. ओठ पिळले असता अजूनही दूध बाहेर येईल. कशाला ताम्रांवर चालून जाण्याच्या बाता करतोस, असे ते उपहासाने म्हणाले. बावा चालून गेले आणि त्यांनी ताम्रांना सडकून मार दिला. त्यांची फार वाहवा झाली. याचा मेहेंदळे यास मनाचे अंतरी खूप खेद जाहला. की बुवा, आपण बोललो आणि त्या पोराने वाघासारखा पराक्रम गाजवला. तेणेकरून मेहेंदळे यांचे अंतरी वीरश्री बहुत. बामण खंग्री. इरीशिरीचे योद्धे होते. मीही दाखवून देतो, बामण कसा लढतो, असे मनात फार. दाखवून देण्याची खुमखुमी ते खूब बाळगून होते. त्यानंतर पंधरा दिवसातच त्यांना ती संधी मिळाली.

त्या दिवशी मराठे आपल्या तोफा छावणीच्या पुढे बाहेर आणून काही नवीन रचना करीत होते. ते पाहून नजीबखानास वाटले, ही संधी बरी आहे. त्याने चालून येऊन मराठ्यांना मागे रेटीत थेट खंदकापर्यंत आणिले. ते पाहून मराठे चहूकडून चवताळून उठले. इब्राहीमखान व बळवंतराव मेहेंदळे यांनी असा सडकून मार दिला की तीन हजारवर रोहिले मरून पडले. आणि उरलेसुरले जीव घेऊन आपल्या छावणीत परत गेले. या प्रसंगात भाऊसाहेबाचा मुख्य सेनानायक बळवंतराव मेहेंदळे निधड्या छातीने घोड्यावर बसून सर्वापुढे लोकांस उत्तेजन देत असता एकदम छातीत गोळी लागून ठार झाला, त्यामुळे या विजयाची किंमत बुडाली.

बामण काय अन् मराठा काय; दोन्हीही मराठेच. खंग्री. तू तसे केलेस. मग बघ आता मी असे करतो. अन् ते करता करता मेहेंदळे जीव गमावून बसला. पुढे कदाचित दोन शतके लोटल्यावर इरावती कर्वे नावाच्या एक विदुषी 'मराठ्यांचा मठ्ठपणा' नावाचा एक लेख लिहिणार होत्या. संदर्भ त्याकाळचे असले तरी आशय याच प्रकारचा असणार होता. हे पुढचे, दोनशे वर्षांनंतरचे समजा सोडा; पानपतावर छावणीत कोंडून घेतलेल्या मराठ्यांची स्थिती दिवसेंदिवस मोठीच कठीण होत चालली होती.

अब्दालीने त्यांना उत्तरोत्तर सर्व बाजूंनी घेरून त्यांचा बाह्य संचार अजिबात बंद केला. बाहेरची बातमी सुद्धा येईनाशी झाली, मग रसद किंवा खजिना कसा येणार! यमुना नदी तर गिलच्यांचा हमरस्ता बनली, पलीकडील अंतर्वेदीचा प्रदेश सारा मराठ्यांना प्रतिकूल. दक्षिणचा दिल्लीकडील व उत्तरचा कुंजपुऱ्याकडील मार्गही अब्दालीने रोकून धरला. एक पश्चिम मोकळी होती, पण तिकडचा काटेरी जंगलातून संचाराचा मार्ग किंवा पलीकडे धान्याचा मुलूखच नव्हता. तिकडे अरण्य व झाडी फार होती. गिलच्यांची हिंमत वाढत गेली तेव्हा त्यांनी हा रस्ताही बंद करून टाकला. मराठ्यांच्या सर्व बाजूस गिलच्यांच्या टोळ्या फिरू लागल्या आणि बाहेर पडेल त्यास बेलाशक तोडू लागल्या. पुढे पाराशर दादाजीचा खजिना अब्दालीचे हाती पडल्यावर भाउसाहेबाची आशा सर्व सुटून काहीच

इलाज राहिला नाही. तेव्हा काय होईल ते होवो, दुराणीवर एकदम घसारा करून मारीत मारीत निघून जाणे एवढाच उपाय राहिला. फौजेतले लोक सर्व नाउमेद होऊन भाऊसाहेबाकडे याचना करू लागले की आम्हास असे अन्नाविना न मारिता शत्रूवर घालून मारा. आता या यातना सहन होत नाहीत. उपासमारीने जनावरे पटापट मरू लागली, त्यांची दुर्गंधी छावणीत एवढी वाढू लागली की जिणे दुःसह झाले. माणसांनी माणसांस खाण्याची पाळी आली. डिसेंबरअखेर भाऊसाहेबाची कुचंबणा या प्रकारे कळसास पोहोचली.

पौष शु.,शके १६८२ रोजी पहाटेच शत्रूवर चाल करून निघून जाण्याचा बेत ठरविला. सर्व बाजूंनी मोठमोठे सरदार, तसेच समोर व बाजूंनी तोफखाना असा गोल बांधून, मध्ये कबिले घेऊन लढत लढत शत्रूची फळी फोडून निघून जावे असा सर्वानुमते निश्चय झाला. सकाळी सरासरी नऊ वाजता उभय सैन्यांची दृष्टादृष्ट झाली आणि लढाईस खरे तोंड दहाचे सुमारास लागले. तेव्हापासून तीन वाजेपावेतो तब्बल पाच तास युद्धाचा असा तीव्र झगडा बनला की जगाच्या इतिहासात पानिपताला महारणकुंडाची ख्याती प्राप्त झाली आहे. अब्दालीला प्रथम वाटले की पूर्वीच्या कित्येक हल्ल्यांप्रमाणे आजची ही एखाद्या सरदाराची वैयक्तिक चढाई असेल. पण ही त्याची संशयनिवृत्ती अल्पावकाशात होऊन सर्व मराठे एकदम चालून आलेले पाहून त्याने आपल्या लष्कराची पूर्वी मनात योजलेली रचना ताबडतोब अमलात आणली. स्वतः सर्वापुढे दौडून त्याने लोकांस ताकिदी दिल्या आणि लढाईस तोंड लागताच मागे दोन मैलांवर आपल्या तंबूत जावून तो पुढील व्यवस्थेत गर्क झाला. पहिल्या चार-दोन तासात त्याने मराठ्यांचा सारा दम पूर्णपणे ओसरू दिला आणि ते थकून जाताच पुन्हा ताज्या दमाने अब्दालीने त्यांजवर घसरून त्यांस गोत्यात आणिले. सहा हजार कझलबाज रिसाला म्हणून खास शरीररक्षकांचे एक संपूर्ण पथक त्याने शेवटच्या क्षणी उपयोगी पडण्यासाठी मुद्दाम राखून ठेविले होते. हे लोक अब्दालीने स्वतः चे गुलाम म्हणून वाढविलेले, उत्कृष्ट बंदुका व तलवारी असलेले, त्याने आपल्या फौजेच्या मागे जरुरीच्या उपयोगासाठी ठेऊन दिले. मराठे चार तास थकून मेटाकुटीस आल्यावर शेवटी हे पथक अब्दालीने पुढे आणिले. भाऊसाहेबाच्या खास हुजारतीचा शेवटचा संहार या गुलामांनी केला. तथापि त्या पहिल्या चार तासात अनेक वार अब्दालीच्या तोंडचे पाणी पळाले होते. आताईखान व त्याचे तीन हजार दुराणी पहिल्या तडाख्यात मरून पडले. अब्दालीचा वजीर गोत्यात आला. हा वजीर लष्कराच्या मध्यभागी लढत असता मराठ्यांकडून सडकून मार खाल्ल्यावर घोड्यावरून उतरून प्रेतांच्या ढिगाऱ्यात बसून तोंडात धूळ टाकीत आक्रोश करू लागला की, यार हो, पळून चाललात कोणीकडे? काबूल काय जवळ आहे समजता? अबदालीस हे समजताच त्याने पळून चाललेले तेरा हजार सैनिक वळवून पुन्हा संग्रामात ओढले. त्या वेळी दोन वाजण्याचा सुमार होता. भाऊसाहेब, विश्वासराव, समशेरबहादूर, इब्राहीमखान, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, जनकोजी शिंदे अशा वीरांनी अब्दालीच्या फौजेचा धुव्वा उडवून दिला. अशी हातघाई चालू असता विश्वासराव आपल्या दीलपाक घोड्यावरून लोकांस उत्तेजन देत पुढे पुढे घुसत असता, अब्दालीच्या सुदैवाने त्याच्या छातीत झांबरकाची गोळी अवचित शिरून तो तत्काळ गतप्राण झाला. त्याबरोबर भाऊसाहेबाचे देहभान सुटले. आवेशाच्या भरात

त्यांच्या हुजरातीची प्रचंड लाट अफगाणांवर कोसळली. त्याच सुमाराला जनकोजी शिंदे आणि मुकुंदजी शिंदे यांनी मोठी मर्दुमकी करून मारामारी करीत ते भाऊसाहेबापाशी आले. ते पाहताच आपल्या ताज्या दमाच्या सहा हजार गुलामांच्या मदतीला अब्दालीने आणखी पंधराशे झांबुरक रवाना केले. त्या योगाने शेवटच्या अर्ध्या तासात भाऊसाहेबाच्या भोवती भीषण कंदन चालू होऊन त्यातच तो गडप झाला. प्रेतांच्या राशी पडल्या. अशा स्थितीत आता निभाव नाहीसे पाहून मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड अशा कित्येक मातबरांनी रणातून पाय काढिला. त्याबरोबर लोकांचा धीर सुटून पळ सुरू झाला आणि एकदम अव्यवस्था माजली. ज्यास जिकडे वाट फुटली तिकडे तो पळत सुटला. त्याबरोबर गिलचे पाठलाग करीत धावले. शुद्ध अष्टमीच्या अंधुक प्रकाशात अफगाणांनी निरपराध्यांची साफ कत्तल उडविली.

विश्वासराव पडल्याचे वर्तमान ऐकताच जनकोजीबावा शिंदे यांनी मारामारी करत आपली फौज हुजुरातीचे जवळ म्हणजे भाऊसाहेबांचे फौजेत आणली. बावा वयाने लहान असले तरी अनुभव आणि योग्यता यांच्या अंगाने थोर होते. हा क्षण आणीबाणीचा आहे, हे त्यांनी जाणले. शिंदे पराक्रमी, थोर लढवय्ये. जगण्याच्या भीतीपायी पळ काढणे ही त्यांची वृत्ती नव्हे. जयाप्पा आणि दत्ताजी होते तसेच जनकोजी. थेट भाऊसाहेबांच्या शेजारी आले आणि जोशात हाणामारी करू लागले. भाऊसाहेब प्रक्षोभ होऊन आटोकाटीला पोहोचले तेव्हा त्यांना सबुरीचा, जीव बचावून जाण्याचा सल्ला देण्याचे क्षणभर त्यांच्या मनात आले. पण त्यांनी पाहिले की आटोकाटी टोकाला पोहोचलेली. गिलच्यांचा घसारा ताजा आणि कडक. मरणे किंवा मारणे इतकाच क्षात्रधर्म. आणि अंती मरणे इतकेच भविष्य. तेव्हा क्षत्रिय धर्माला अनुसरून जनकोजी शिंदे यांनी मरण्याचा पत्कर घेतला. गर्दीत घुसले आणि लढू लागले. वय लहान पण जयाजीबावा आणि दत्ताजीकाका यांचेसारखेच खळीस येऊन लढत राहिले. आणि जखमी होऊन शत्रूच्या हाती सापडले. नंतर मारले गेले. दसरत ह्यावेळी जनकोजीबावांसोबत होता. विश्वासराव पडल्याचे वर्तमान ऐकताच त्याची पहिली भावना पळून जाण्याची झाली. पण मग अंगी फुरफुरी अतोनात. आणि पळून पळून जाणार कुठे? अफगाण प्रलयंकारी वावटळीसारखे भोवताली. अन् जनकोजी राजा वीर. बाहुंमध्ये स्फुरण चढले. मरू आणि मारू असा कैफ मनात फुसांडलेला. त्या उधाणलेल्या क्षणी दसरत कैफात उमेठला आणि जगण्या-मरण्याचे भय विसरून वीरासारखा लढत राहिला. आपले मरण प्रत्यही समोर दिसत असताना त्याला त्या त्याच्या भावनिक उष्णतेत फार सुखाचे वाटत होते. भोवती गर्दीची दाटी होती. आरोळ्या, किंकाळ्या, चरफडणे, तडफडणे, धडपडणे, धावून जाणे, धुळीस मिळणे, लाल चिखलात लाल चिळकांड्या. मरण समोर दिसत असतानाही त्याला अतीव सुखाचे वाटत होते. किंबहुना त्याच्या सगळ्या आयुष्यात इतका सुखी तो कधीही नव्हता. थोडा हिशेब चुकला आणि समोरच्या गिलच्याच्या तलवारीचा एक घाव त्याच्या डोक्याच्या पुढच्या भागात बसला. तिथून ओघळणारे रक्त त्याला जाणवले नाही. युद्धाच्या त्या उष्ण हवेत त्याला आणखी उष्ण वाटले. त्याने त्वेषाने गिलच्यावर घाव टाकला. त्याच्या अंगातल्या चामड्याच्या अंगरख्याला किंवा अधिक नेमके म्हणजे त्याच्या मानेभोवती असलेल्या जाड कातड्याला भेदून दसरतचा घाव त्याच्या मानेत खोल रुतला. पण तशाही स्थितीत त्याने

दसरतच्या छातीच्या पिजऱ्यात जोरकस घाव टाकून तिथून रक्ताचे कारंजे काढले. ते दोघेही खाली पडत असताना दसरतला चमत्कारिकपणे वाटले की आपण आपल्यालाच मारून टाकलेले आहे. आपणच तो गिलचा आहोत. की आपण गिलचा आहोत आणि तो आपण आहे असेही त्याच्या मनात येऊन गे

ले. आपल्या अंगातून रक्त बाहेर पडत असल्याने येणाऱ्या ग्लानीत असे मूर्ख भास आपल्याला होत आहेत असेही त्याला वाटले. अन् नंतर त्याला ग्लानी इतकी जास्त आली की काही वाटण्या-समजण्याच्या पल्याड जाऊन तो समरांगणावरच्या

लाल चिखलाचा अभेद्य अचेतन भाग होऊन गेला.

6

कौरव पांडव संगरतांडव द्वापर काली होय अती तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपती युद्ध संपल्यावरही अतोनात कत्तली झाल्या. कापलेल्या मुंडक्यांचे जागजागी मोठमोठाले ढीग लागले. पळणारे सैन्य, बुणगे, निरपराध लोक यांची बेफाट कत्तल उडविण्यात आली. पानिपत, सोनीपत, दिल्ली असे सारीकडे ते झाले. दिल्लीत तर उंडग्या बायांनी सुद्धा पळणाऱ्या मराठी फौजांना लुटले. त्या नंग्या लोकांकडे कोणी लुटावे असे जवळपास काहीच उरलेले नव्हते. तरीही त्यांना अशा बायांनी बेशरम करून लुटले. बावीस हजारांच्या वर मराठे स्त्री-पुरुष कैद करण्यात आले. त्यापेक्षा अधिक कैद करून विकण्यात आले. अर्थात विकत घेणार कोण आणि किती? ते करण्यासाठी पैसाच कोणाकडेही फारसा उरला नव्हता. अफगाण विजयी झाले. पण त्यांना लूट फारशी मिळाली नाही. किंबहुना काहीच मिळाली नाही. मराठे, अफगाण दोघेही एकमेकांचा अंत पाहात कंगाल झालेले. दिल्ली आधीच कैक वेळा लुटून भोंगळी करण्यात आलेली. विजयी होऊनही अफगाण कफल्लकच होते. फौजेने आपला मुलुख सोडून दीड वर्षावरचा काळ लोटला होता. फौजेला अन्न जेमतेम मिळाले होते. पण पगार मिळाला नव्हता. त्यांच्यात असंतोष मातला होता. आता या उजाड मुलखात रोजचे अन्न मिळवणे सुद्धा मुष्कील झाले होते. तशात रोगराई पसरून फौजी हैराण झाले होते.

जानेवारीच्या संग्रामानंतर परिस्थितीचा अचूक अंदाज घेऊन अब्दालीने त्वरेने एकापाठोपाठ एक निर्णय घेतले. पानिपतवरील छावणी उठवून तो दिल्लीस गेला. तेथे शहराबाहेर तळ ठोकून स्वतः बादशहाच्या वाड्यात जाऊन राहिला. तेथे १३ मार्चपर्यंत निरनिराळ्या व्यवहारांची व्यवस्था लावून २० मार्च रोजी स्वदेशी प्रयाण केले. मार्च २७ ला अंबाला व पुढे यथाक्रम लाहोरवरून एप्रिलात तो काबुलास पोहोचला.

दसरत शुद्धीवर आला तेव्हा त्यास हे काहीही माहीत नव्हते. तो शुद्धीवर आला तेव्हा त्याला सगळेच वेगळे आणि गोंधळात टाकणारे असे वर्तमान होते. एक तर भोवताली

सगळे गिलचे. त्यांच्यात आपण आहोत आणि जिवंत आहोत, म्हणजे आपणास कैद करण्यात आले आहे अशी त्याची पहिली भावना झाली. त्याला अनेक गोष्टी आठवल्या. त्याची खराडीची काळीकरंद स्त्री त्याला आठवली. त्याच्या बाळाचा गोंडस चेहरा आठवला. त्याचे आईबाप आठवले. चांभारगोंदियाची तुळसामाई आठवली. तिथे ठेवलेले दोन शेर सोने आठवले. बुंदेलखंडातली महक आठवली. बंकट भोसले या त्याच्या मित्राची आठवण झाली. यातला एक बंकट सोडला तर बाकी सारे तो विसरूनच गेलेला होता. पण आता ते सगळे त्याला आठवले. आणि त्याच्या भोवती तर ते काहीही नव्हते. तो गिलच्यांच्या मेळाव्यात होता. अन् विशेष म्हणजे त्याचे नाव झोरावर झाले होते. तो शुद्धीवर आला तेव्हा कोणी तरी एक पठाण अत्यंत खूष झालेला त्याने पाहिला. तो त्याच्या भाषेत काही तरी बोलत होता. ते कळण्यास काहीही मार्ग नव्हता. पण त्याला झालेला आनंद त्याच्या चेहऱ्यावर नि:संदिग्ध झळकत असलेला त्याने पाहिला. तो त्याला पुन्हा पुन्हा झोरावर म्हणत होता. कोण हा झोरावर ; त्याला कळेना. त्याला हातघाईच्या युद्धात पाहिलेला माणूस आठवला. तो इतका त्याच्यासारखा होता की तो आपणच आहोत असे त्याला वाटलेले त्याला आठवले. मरताना आपण आपल्यालाच मारत आहोत अशी विचित्र उष्ण स्थितीची भावना आठवली. या गिलच्यांच्या मेळयात आपण आता दसरत म्हणून मेलो आहोत आणि झोरावर म्हणून जिवंत आहोत हे त्याला कळले. मराठ्यांचा पराभव झाला आहे आणि विजयी गिलचे स्वदेशी चालले आहेत, हे त्याच्या लक्षात आले. आपण कैदी नाही आहोत, आपण दसरतचे झोरावर झालो आहोत, हे त्याने जाणले. तो खूष झालेला पठाण झोरावरचा खास दोस्त असावा हे त्याच्या लक्षात आले. या सगळयात आपले झोरावर असणे आपला जीव बचावण्यासाठी उपकारक आहे, हे त्याने जाणले. पण झोरावरची भाषा तो कुठून बोलणार? मग मौनं सर्वार्थ साधनम. बचावण्यासाठी तोच एक उपाय आहे, हे त्याच्या लक्षात आले. जिवंत आहोत, बोलता येत नाही, असे सोंग उपयुक्त, हे त्याला जाणवले. तो पठाण कोणा तरी हकीमाला घेऊन आला. हकीमाचे आणि त्याचे बोलणे झाले. ते दसरतला काही कळले नाही. पण आदमासे असे की डोक्याच्या पुढच्या भागात घाव बसल्याने वाचा गेली आहे, भाषेची स्मृती गेली आहे, असे तो म्हणतोय, हे हावभावातून त्याने जाणले. काही काळाने ती येईल, किंवा येणारही नाही. पण जीव बचावला ही काही कमी मातबर गोष्ट नाही असे तो हकीम म्हणाला असावा असे दसरतला वाटले. अन् एरवीही मौन हे तिथे टिकण्यासाठी तात्पुरते का होईना सुयोग्य साधन होते, हे त्याने तैलबुद्धीने जाणले. हळूहळू त्या पठाणचे नाव सोहेल आहे, हे त्याला कळले. आपण झोरावर आहोत आणि सोहेल हा आपला दोस्त आहे, इतके त्याला समजले. बऱ्याच दिवसांनी आरश्यात स्वतःला पाहताना तो चकित झाला होता. आपण आपणच आहोत, पण आता आपण वेगळे झालो आहोत, हे त्याला पटले. वाढलेली दाढी, सैलसर पठाणी विजार आणि तसलाच अंगरखा, डोईवर निळी पठाणी पगडी असे त्याचे ध्यान पुरते झोरावर झाले होते. तोंडातून शब्द फुटू न देण्याचे भान राखले की तो सुरक्षित असणार होता. कोणत्या तरी मोठ्या शहराबाहेर गिलच्यांचा तळ पडलेला असून आपण तिथे आहोत, हे त्याने अंदाजाने जाणले. खेरीज चार दोन दिवसात फौजेला परतीच्या मार्गाला लागायचे आहे, हे त्याच्या लक्षात आले. तो आता हिंडू-फिरू शकत होता. पण घोडेस्वारी

त्याला कितपत झेपेल या आशंकेने सोहेल काळजीत पडलेला आहे हे त्याला जाणवले. त्याला कुठेही फिरण्याची मोकळीक होती. तो जेत्या फौजेचा भाग होता ना! पकडलेल्या मराठा कैद्यांचा तळ त्याने पाहिला. त्याला तिथे बघून भीतीने थरथरणारे ते लोक पाहताना त्याला भडभडून आले. आपण यांच्यातलेच एक असून केवळ एका अतयं अशा योगायोगाने जेत्यांच्या तळात आहोत अन् ते किती काळ राहणार आहोत याचेही नक्की काही आपण सांगू शकत नाही; त्याच्या मनात आले. तो तळ नसून बाजारच होता. फक्त लंगोटी ल्यालेले पुरुष आणि तशाच अर्ध अनावृत्त स्त्रिया. वक्षस्थळाभोवती जेमतेम बांधलेले फडके हा अधिकचा अलंकार. तोही सगळ्यांना उपलब्ध होता असे नव्हे. सगळीकडे अतोनात घाण वास मारत होता. गिलच्याच्या तळावर तो नव्हता असे नव्हे. पण इथे दुर्गंधी असाधारण होती. तो वीस-पंचवीस हजार स्त्री-पुरुषांचा नागडा समूह प्रचंड मोठया कोंडवाड्यात घातलेल्या जनावरांच्या समूहासारखा वाटत होता. ते सगळे मिळून अंगातून अव्याहत पू वाहणारे एक जखमी जनावरच भासत होते. बाकी मलमूत्र वगैरे होतेच. भोवताली अफगाण सुरक्षारक्षक अंतर ठेवून चौक्या लावून बसलेले होते. तिथल्या त्या मुक्कामात सोहेलने आणखी एक हकीम आणला. झोरावरला परतीचा प्रवास कितपत झेपेल, त्यासाठी काय काय करावे, जखमा भरून आल्या आहेत पण अशक्तपणा फार आहे. त्याच्या अंगात लवकर ताकद येण्यासाठी काय खायला द्यावे, अशा अनेक गोष्टी त्याने हकीमास विचारल्या. खेरीज त्याला बोलता येत नाही, हे समजा ठीक. पण आपण बोललेले कळत सुद्धा नाही, हे कसे काय असेही त्याने हकीमास विचारले. हकीमाने खाण्यापिण्याचे सांगितले. म्हणाला, याच्या जीवाला आता धोका नाहीय. पण माणसाच्या मेंदूची रचना फार गुंतागुंतीची असते. तिथे घाव खाल्ल्यावर कसे फेरबदल होतात याचे शास्त्रास सुद्धा पुरते ज्ञान नाही. अशा दुखण्यातून बरी झालेली माणसे नंतर दुसऱ्याच एखाद्या त्यांना आधी अजिबातही माहीत नसलेल्या भाषेत बोलू लागण्याचे चमत्कार सुद्धा घडलेले आहेत. अल्लाह परवरदिगारची दुवा मागण्याखेरीज आपल्या हाती काहीही नाही. आपल्या सैनिकांना झालेली परतायची घाई, त्यांना फारशी न मिळालेली लूट, न मिळालेला पगार यांच्यामुळे ते वैतागलेले आहेत, हे लक्षात घेऊन अब्दाली परतीच्या रस्त्याला लागला. अफगाण सारे घोड्यांवर आणि उंटांवर. दिल्लीच्या बादशाहतीतल्या काही बाया होत्या. त्याही घोड्यांवर. गुलाम पायी. सोहेल आपल्या दोस्ताच्या घोड्याला घोडा लावून चालत होता. कुंजपुऱ्यातून जाताना दसरत उर्फ झोरावरला बंकट भोसले आठवला. त्याचे, त्याच्या प्रेयसीचे काय झाले असेल या विचाराने तो विव्हल झाला. करता येण्याजोगे काहीही नव्हते. त्यामुळे अधिकच. जीवनात अशा गोष्टी असतातच. त्या आठवतात आणि त्यांचे आपल्याला काहीही करता येत नाही. काळजात त्यांना फक्त कुरुपासारखे ठेवता येते. त्या कुरूप नसतात तरीही त्यांना कुरुपात ठेवावे लागते. तसे झाले आणि अपरिहार्यपणे तो पुढे निघाला. सारीकडे मुक्कामाच्या जागी गुलामांचा बाजार भरे. त्यात काही स्त्रिया विकल्या जात. तारुण्य आणि सौंदर्य यांच्या हिशेबाने सौदे होत. पंजाबात पुढे पुढे थेट हल्ले करून बाया पळविल्या जाऊ लागल्या. त्यांच्याशी लढण्याइतका दम अफगाण सैन्यात उरला नव्हता. रोगराई आणि भुकेने व्याकुळ झालेले सैन्य काय लढणार? लूट करून अन्नधान्य मिळविण्याइतका जोर सैन्यात राहिला नव्हता.

सारे रोख विकत घेऊन आब राखून पुढे जावे लागत होते. वस्तूंचा साठा केला तर तोही पुढे रस्त्यात लुटला जाणार नाही याची खात्री नसे. किंबहुना लुटले जाण्याची खात्रीच असे. त्यामुळे साठा न करणे हे युक्त मानले जाऊ लागले. त्यात गुलामांचे फार हाल चाललेले होते. त्यांना जेमतेम का होईना अन्नपाणी मिळेल याची काळजी घेण्याची अब्दालीची कोशिश असे. पण स्वतःच्या फौजेत उद्भवलेल्या असंतोषाने, त्यातून उपस्थित होऊ शकणाऱ्या यादवीने त्याचे मन अधिक व्यापलेले असे. पंजाबात काही हजार स्त्रिया या प्रकारे लुटल्या आणि विकल्या गेल्या. असे दमले-भागलेले सैन्य बलुचिस्तानात पोहोचल्यावर आणखी वेगळीच समस्या उभी राहिली. बुगटी, मरी, मेंगल, मझारी, रायसानी, गुरचानी असे अनेक बलुची सरदार आपल्या टोळ्या घेऊन अब्दालीसोबत आलेले होते. ते द्रव्य मागू लागले. तो त्यांना काय देणार? आपल्याला देण्यासाठी अब्दालीजवळ काहीच नाही, हे त्यांनाही दिसत होते. लढून काही हिसकून घ्यावे असेही नव्हते. अखेर अब्दालीनेच तोड काढली. म्हणाला, बघा दोस्तांनो! मी आज लगेच तुम्हाला काही देऊ शकणार नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. अन् ते तुम्ही जाणता. पण उद्या मी काही देणारच नाही, असे नव्हे. सरहिंदपर्यंत मी असेनच. काबुलला जाऊन व्यवस्था लावून मी परत येणारच आहे. न येऊन मला चालणार नाही. हे इतके मोठे युद्ध आपण उगीच लढलेलो नाहीय. मी पुन्हा येईन तेव्हा तुम्हास योग्य ते द्रव्य अवश्य देईन. पण आता तुम्ही हे गुलाम घ्या. या स्त्रिया तुमच्या दासी होतील. पुरुष तुमचे गुलाम. या स्त्रिया सुंदर आहेत. त्या तुमच्या होतील आणि तुमची सारी कामे करतील. तुम्हाला सुख देतील. हे मराठे लोक फार काटक आणि कष्टाळू आहेत. ते

आमच्यासारखेच उत्तम शेती कसणारे आहेत. तुम्हाला शेती करणे फारसे माहीत नाही. ते शेती पिकवतील आणि तुमच्या देशाला समृद्ध करतील. ते चिवट आणि लढाऊ लोक आहेत. आपल्यापेक्षा किती तरी अधिक अंतर तोडून ते पानिपतावर आपल्याशी भिडले. आणि आपल्यासोबत इतकी पायपीट करूनही ते जिवंत आहेत. तुम्ही मी म्हणतो हे ऐका. तुम्ही यांना ठेऊन घ्या. तुम्हाला आज अन्न आणि पाण्याची कमी नाहीय. तुम्ही यांना पोसू शकता. पुढे यांच्या कष्टांवर तुम्ही सुखाने जगू शकाल. तुमची भरभराट होईल. बलुची सरदारांना ते पटले. पटवून घेण्याखेरीज दुसरा पर्यायही त्यांना नव्हता. त्यातून अब्दालीची सुखरूप सुटका झाली. बलुच्यांनी न स्वीकारलेल्या उरलेल्या दमगीर हजार-दोन हजार गुलाम स्त्री-पुरुषांसोबत तो काबुलला पोहोचला. रस्त्यात त्यातले काही मेले. वाचले ते ज्यांना हवे तसे वाटले गेले.. रस्त्यात अनेकदा पळून जाण्याची उर्मी दाबत, पुढे अफगाणांसोबत जाणे हेच सोयीचे आणि सुरक्षित असा विचार करून मौनी दसरत उर्फ झोरावर पुढे जात राहिला. पळून जाणे, निसटणे अशक्य आहे, सोहेलची नजर चुकविणे धोक्याचे आहे, हे त्याला वारंवार जाणवले. आपल्या सोबतच्या मराठा स्त्री-पुरुषांच्या अधम स्थितीतल्या जगण्याने तो आपोआप अधिक मौन होत गेला. जेते आणि पराभूत यांच्यातील क्षमतेचे अंतर इतके क्षीण असते, तरी पराभूतांना किती मानाहानीने जगावे लागते याच्या नागड्या दर्शनाने त्याच्या हृदयात दुःखाची एक कायमची गुठळी, एक कायमचे कुरूप, तयार झाले आणि ते तिथे कायमस्वरूपी गच्च झाले. कुठेही जाण्यापेक्षा येणाऱ्या अज्ञात भविष्याला सामोरे जाणे स्वतःसाठी अधिक सोयीचे असे त्याला वाटले.

आणि सोहेलसोबत तो अग्नेय अफगाणिस्तानातल्या कोणत्या तरी एका लहानश्या गावात एकमेव पर्याय म्हणून एखाद्या प्राचीन ज्ञानी बैलाप्रमाणे मूकपणे पोहोचला. तो तिथे पोहोचला, कारण सोहेल त्याला तिथे घेऊन गेला होता. डोंगररांगांनी वेढलेल्या मैदानी प्रदेशातील ते एक छोटे आणि सुंदर गाव होते. त्या घरात एक तरुण स्त्री राहात होती. तिच्या जोडीला फक्त एक वृद्ध स्त्री होती. ती तिची सासू किंवा आई अशी कोणीही असू शकत होती. त्या घराला भेंड्याच्या म्हणजे कच्च्या विटांच्या उंचच उंच भिंतीचा बंदिस्त कोट होता. असला कोट त्या गावातल्या आणि बाकी सारीकडच्या घरांसाठी सगळीकडे होता. ते तिथल्या घरांचे अविच्छिन्न वैशिष्ट्य होते, हे त्याच्या लवकरच लक्षात आले. आत आवारात पाळलेल्या काही बकऱ्या होत्या. त्याला तिथे सोडले तेव्हा सोहेल तिथल्या त्या स्त्रियांशी बोलला. त्यातली एक म्हातारी होती आणि एक तरणी. बोलणी काय झाली हे त्याला तितकेसे नीट कळले नाही. पण अंदाजाने लक्षात आले. खेरीज थोडीबहुत पश्तुन भाषा आता त्याला उमजू लागली होती. ती तरुण स्त्री झोरावरची पत्नी होती. आणि ती सोहेलची बहीण असावी असे त्याला वाटले. म्हणूनच ती अगदी मोकळेपणाने समोर आली होती. ती साहजिकच त्याची आतुरतेने वाट पाहत होती. झोरावरचे युद्धात काय झाले आहे, हे सोहेलने सांगितले असावे. तो युद्धभूमीवर कसा रक्ताच्या थारोळ्यात पहुडला होता, त्याला कशा जखमा झाल्या होत्या, त्याला किती रक्तस्त्राव झाला होता असे बरेच तो सांगत असावा. झोरावर हा त्याच्या बहिणीचा नवरा असल्यानेच तो इतक्या प्रेमपूर्वक आणि काळजीने जपत त्याला घेऊन आला होता. त्याला बोलता येत नाही, आपण बोललेले समजत नाही. पण तो जिवंत आहे, हा अल्लाह परवरदिगारचा प्रसाद आहे, असे सोहेल म्हणाला असेल. त्याच्या आशीर्वादाने तो इतक्या भयानक युद्धातून जिवंत परत आला ही अल्लाह परवरदिगारची मेहेरबानी, असेही तो म्हणाला असेल. किंवा त्याच्या वागण्यात आणि व्यवहारात विचित्र काही वाटले तर गडबडून जावू नका, असेही तो म्हणाला असेल. हकीमाने काय सांगितले, ते त्याने त्या दोन्ही बायांना सांगितले असेल. दसरत काही अंदाज करू शकत होता आणि काही काही त्याला समजत होते. पण जे आहे, त्याला सामोरे जाण्याखेरीज दुसरा रस्ता आपल्याला नाहीय हे त्याच्या लक्षात आले.

त्या म्हातारीचे नाव बाझिया होते आणि त्या तरुण स्त्रीचे नाव आफिया होते, हे काही काळात त्याला समजले. बाझिया ही झोरावरची आई आहे आणि आफिया ही त्याची पत्नी आहे हेही त्याच्या लक्षात आले. सोहेल बाहेर पडताच बाझिया त्याच्या निकट आली आणि अतितीव्र मायेने तिने दसरतला कवटाळले. तिने त्याच्या अंगाखांद्यावरून मायेने हात फिरवले. त्याच्या चेहऱ्यावरून हात फिरवले. आपले हात आपल्या कानशिलांशी घेऊन बोटे कडकडा मोडली. त्याच्या गालांचा हळुवार मुका घेतला. डोळ्यामधून झरणाऱ्या अश्रूंसोबत ती आनंदातिरेकाने हसली. आईची माया देश, धर्म, संस्कृती यांच्या पल्याड सारीकडे सारखी असते. ती भाषेचा परिचय नसलेल्या लहान बाळाच्या रडण्यासारखी दुनियाभर सारीकडे सारखी असते. ती आपल्याला जो समजते, तो आपण नाही आहोत. ती आपल्याला झोरावर समजत आहे, आणि त्याला तर आपल्या हातूनच मरण आले आहे, या जाणीवेने तो मनातल्या मनात कष्टी झाला. बाझिया आत गेली आणि आफिया येऊन त्याच्या शेजारी बसली. ती असाधारण सुंदर स्त्री होती. तिच्या देशात कदाचित ती तशी

सर्वसाधारण सुद्धा असेल. पण दसरतच्या नजरेत ती त्याला फार सुंदर वाटली. या प्रकारचा उजळ रंग, बदामी चेहरा, पाचूची झाक असलेली डोळयांची बुबुळे आणि सडपातळ तरीही दणकट अंगयष्टी असलेली स्त्री त्याने याच्या आधी कधीही पाहिलेली नव्हती. परक्या स्त्रीकडे थेट नजरेला नजर भिडवून जास्त वेळ कोणी बघत असते का? त्याने अगदी अल्पकाळ तिच्या नजरेला नजर दिली तेव्हा त्याला तिचे देखणेपण जाणवले.

त्याला पाहिल्यावर तिची पहिली प्रतिक्रिया अर्थातच आनंदाची होती. पण लगेचच तिच्या मनात आलं, हा आपला नवरा नाहीय. म्हणजे हा त्याच्यासारखा दिसतोय, पण हा तो नाहीय. आपण त्याची बायको आहोत, अगदी थोडा- लग्नानंतरचा चारसहा महिन्यांचा का होईना, काळ आपण त्याच्या सोबत घालवला आहे. पण स्त्री-पुरुषांना एकमेकांची ओळख होण्यासाठी तो पुरेसा आहे. त्याच्या असण्यादिसण्याची, एकूण त्याच्या असण्याचीच तिच्याइतकी ओळख आणखी कोणाला असणार? अगदी त्याच्या आईला सुद्धा ती तिच्याइतकी असणं शक्य नाही. निर्वस्त्र, निर्भर होऊन एकमेकांना मुक्त भिडत, एकमेकांत मुक्त शिरत, जिरत जी ओळख निर्माण होते ती फक्त एकमेकांचे जोडीदार असलेल्यांनाच शक्य असते. त्या उजेडात तिला वाटलं, हा तो नाहीय. अन् पुढच्याच क्षणी तिच्या मनात आलं, हा काय वेडेपणा करतोय आपण. आपल्या भावाने आपल्याला सगळे सांगितलेय. हा लढता लढता जखमी झाला. रक्त सांडत मरणाला शिवून परत आलाय. त्याला बोलता येत नाहीय. तो

आपल्यासकट कोणालाही ओळखत नाहीय. पण हा तोच आहे, आपला भाऊ त्याला घेऊन आलेला आहे. हा आज हाडामांसाचा गोळाच फक्त दिसतोय. तो माणसांच्या दुनियेच्या बाहेर गेलेला आहे. ओळख-अनोळख यांच्या पल्याड गेलेला आहे. पण तो जिवंत तर आहे ना! अन् येईल ना काही दिवसांनी आपल्या दुनियेत. होईल बरा. त्याची सेवा करणे, काळजी घेणे हे आपले त्याची बायको म्हणून कर्तव्यच आहे. अगदी नाहीच झाला बरा तरी त्याला टाकून थोडेच देता येईल?

दसरत तिथे राहात होता. त्याची देखभाल उत्तम राखली जात होती.

त्या लोकांच्या काही रीती हळूहळू त्याला अवगत झाल्या. सगळे एकत्र एका ताटात जेवतात. बाहेरचे लोक असतील तर पुरुष एकत्र. आणि स्त्रिया एकत्र. पण बाहेरचे नसतील तर बाई आणि पुरुष एकत्र. नवरा आणि बायको एकाच ताटात. ते आधी त्याला विचित्र आणि आश्चर्यकारक वाटले होते. रोज सकाळी न्याहारी. तिच्यात एक मोठी भाकरी, त्यावर सुका मेवा; म्हणजे बदाम, अक्रोड असे भरपूर टाकलेले. न्याहारीनंतर बकरीचे दूध. असे हे रोजच असे. वर्षाच्या काही काळात फक्त फळे खात जगणे. ते त्याच्यासाठी पुरेसे असे. पण हे फारच कमी आहे, असे ते बोलत. पण इतके जास्त खाणे त्याला नको असे. जे मिळे ते त्याला पुरेसे असे. किंवा ते त्याच्या गरजेपेक्षा नेहमीच जास्त असे. एकदा एक मोठा जल्लोष झाला. एक उंट कापला गेला. तो साफसूफ करून त्याच्या पोटात जागा मिळेल तसे बकऱ्या, कोंबड्या, भात, मसाले असे भरण्यात आले. आणि ते सगळे जमिनीत खोल खड्डा घेऊन पुरण्यात आले. त्यावर खूप मोठा जाळ लाकडे जाळून खूप वेळ करण्यात आला. ते थंड झाल्यावर उकरण्यात आले. खरपूस भाजलेला उंट आणि आतले सगळे शिजलेले खूप लोकांनी एकत्र खाल्ले. ते त्याला भयंकर वाटले. ते त्याला खाता आले नाही.

कोणीतरी निवडून त्याला उंटाचा अंड खाण्यासाठी वाढला. हाडे नसलेला उत्तम म्हणून. आणि वीर्यवर्धक म्हणून. त्याला ते खाण्याची वासना होईना. तो खुणेने नको म्हणाला. ते चकित झाले. पण गप्प बसले. सोहेल म्हणाला, त्याला दुखवू नका. त्याला वाटेल तसे, आवडेल तसे करूद्या. तिथे ते संपले. तरीही एकूण उत्तम खाणे-पिणे यांच्या परिणामी त्याची तब्ब्येत खूप सुधारली होती. त्याच्यावर कोणतीही बंधने नव्हती. तोंड बंद ठेवण्याचे भान राखणे इतकेच काय ते बंधन. त्याची आता त्याला सवय झाली होती. तो कुठेही कसाही भटकू शकत होता. असे भटकताना तो तिथून पळून जाण्याच्या योजनांवर विचार करत असे. ती अतोनात माया करणारी आई आणि ती बायको; दोघीही त्याच्या कोणीही नव्हत्या. झोरावरची हत्या करून त्याने त्यांचा अपराधच केलेला होता. अन् आता त्याच त्याची काळजी घेत होत्या. त्याला भयंकर अपराधी वाटत होते. मग हळूहळू दसरतच्या लक्षात आले की आपल्यावर लक्ष ठेवले जात आहे. तो कुठेही गेला तरी त्याच्या पाळतीवर एक इसम असतो. त्याचा बाकी त्रास नाही. पण तो असतो. सोहेलच्या नजरेत त्याची जी अवस्था होती, ती बघता त्यानेच ही व्यवस्था केली असेल. किंवा आफियाने सुद्धा. किंवा दोघांनी एकविचारे. अर्थातच काळजीपोटी. माणसाच्या आकारात मांसाचा गोळाच फक्त उरलेला झोरावर त्याच्या नादात गुम होऊ नये म्हणून. त्यातून झाले असे की दसरतला बाहेर पडता येत होते, पण पळून जाणे मुश्कील झाले होते. सोहेल त्याला घेऊन आला, त्या दिवशी त्याने बराच माल आफियाच्या स्वाधीन केला होता. त्याने झोरावरच्या वाट्याची लूट आपल्या बहिणीकडे सुपूर्त केली होती. कुठेच कशाचीही कमतरता नव्हती. दसरत मायेच्या, प्रेमाच्या जाळयात अडकला होता. ते जितके अधिक दिसे, अनुभवाला येई, तितका त्याला त्रास होत असे. सगळे मनातल्या मनात दाबत दडपत जगण्याखेरीज तो काहीही करू शकत नव्हता.

असे महिने उलटले. बायको म्हणून आफिया त्याच्या अंगचटीला आली नव्हती. त्याच्या मनात तसे काही उद्भवण्याचा प्रश्नच नव्हता. सुटकेचे खुंटलेले मार्ग, स्नेहभावाच्या ओलीचा दाब ; यात तो भोवंडत होता. तशा भेटीची साहजिकच ती कितीतरी वाट बघत होती. आधीही तिने ती पाहिलेली असेल. ती निरोगी, सशक्त अफगाण स्त्री होती. नवरा युद्धावरून आलेला आहे. धन घेऊन आलेला आहे. पण पुरुष म्हणून उपयोगाचा राहिलेला नाही. आसक्ती तर सोडा, साधी ओळखीची भावना सुद्धा त्याच्या नजरेत दिसत नाही. नुसताच हाडामांसाचा गोळा. तिलाही काही रस्ता दिसत नव्हता. ती त्याच्या शेजारी पहडत होती. तिला तो हवा होता. पण त्याला ते कळतच नव्हते तर त्यात ती काय करणार? अंगांगी जळणे हेच तिच्या प्रत्येक रात्रीचे जगणे झाले होते. मग एका रात्री तिने त्याला बोलताना ऐकले. ती रात्रीचा एकाकीपणाचा दाह सोसत जागी होती. ती तो दाह सुसह्य करत कसले तरी जाजम विणत बसली होती. त्यावेळी झोपेत त्याचे स्वतःशी बडबडणे तिने ऐकले. ती चकित झाली. अरे! हा तर बोलतोय. झोपेत का होईना स्वतः शी बोलतोय. ती लक्ष्यपर्वक ऐकू लागली. तिला ते काहीही समजले नाही. तो झोपेत बोलत होता. आणि ते अस्पष्ट होते. त्यातले शब्द तिला कळेना. शब्दही कळेना. ती भाषाच कदाचित वेगळी होती. पण तो बोलत होता हे खास. तो मुका नव्हता. नंतर रोजच जागी राहून ती लक्ष ठेऊ लागली. तो बडबडे. तळमळत कूस बदली. रडे. तिला काहीच कळत

नव्हते. तिने ते तिच्या सासूला ; बाझियाला सांगितले नाही. पण सोहेलला सांगितले. सोहेलला हकीम आठवला. मेंदूवरचे परिणाम. कधीही माहीत नसलेली भाषा इसम बोलू शकतो. त्याने बहिणीला विचारले. भाषा, शब्द, लहेजा; काहीतरी सांग म्हणाला. ती काय सांगणार? तिला ते काहीही कळत नव्हते. ती काय सांगणार? सोहेल आला आणि त्याच्याशी बोलू लागला. गेलेला काळ, एकत्र घालवलेले दिवस, हिंदुस्तानची मोहीम, जाट, मराठे, शीख. पण तो ढिम्म होता. त्याच्याकडून कसलाही प्रतिसाद नव्हता. त्याची नजर थंड होती. अखेर सोहेल थकला आणि आफियाला म्हणाला, तुला भास होत असतील. आणि ते स्वाभाविकच आहे. तू खूप विचार करतेस. ते करताना थकून गेलीस की भास होत असतील. फार विचार करू नकोस. अल्लाह मेहेरबान होईलच कधी ना कधी तुझ्यावर. रेगिस्तानात पाणी दिसण्याचे भास होतात, तसेच हे आहे. बाकी लालाची तबियत पुष्कळच सुधारली आहे. शरीर सुधारलं की त्याच्या आतलं मन धडपडत स्वतःला दुरुस्त करील. तू बघत राहा.

मग एका रात्री झोपेत बडबडताना अचानक त्याने स्वतःचे लिंग बाहेर काढले. ते उत्तेजित नव्हते. पण तो तिथे दाखवत होता. आणि रडत रडत काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होता. तो त्याची कूस बदलत हमसाहमशी रडत काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होता. त्याचे रडणे, लिंगाला हात लावून नाही नाही म्हणणे या सगळ्यात तिचे लक्ष पुन्हा त्याच्या लिंगाकडे गेले. तिने पाहिले आणि तिला पहिला धक्का बसला. खात्री करून घेण्यासाठी तिने पुन्हा पाहिले. ते बाहेर उघडे होते. तो ते पुन्हा पुन्हा दाखवत काही तरी बोलत होता. ते सुंता न झालेले होते. तिला धक्का बसला. प्रचंड धक्का बसला. हा तिचा पुरुष नव्हता, हे तिला कळले. आपले लिंग सुंता झालेले नाही, हे तो सांगत होता. आणि रडत होता. निदान तिला तसे वाटले. तिने त्याला हलवून हलवून उठवले आणि जोरकस स्वरात विचारले, 'तू कोण आहेस?' तो गोंधळलेला होता. त्याचे इंद्रिय त्याच्या कपड्यांच्या बाहेर निद्रिस्त सुंताविहीन होते. तिने त्याच्याकडे निर्देश करीत त्याला पुन्हा जोरात विचारले, “तू कोण आहेस?' त्याच्या लक्षात आले. त्याला स्वतःचे काही क्षणाआधीचे स्वप्नात असणे आठवले. काय झाले असेल याचा नेमका अंदाज आला. मोडक्या-तोडक्या पश्तुनमध्ये तो म्हणाला, “मी पठाण नाही. मी मराठा आहे. मी काफर आहे. मी झोरावर नाही. मी दसरत नावाचा मराठा माणूस आहे. तू आणि तुझी सासू ज्या मायेने आणि प्रेमाने माझ्याशी वागत आहात, त्याचा मला त्रास होतो. पानिपतच्या युद्धात झोरावर माझ्या हातून मारला गेला. तो आणि मी इतके एकसारखे दिसणारे होतो की त्याला पाहिल्यावर मीच मला मारतो आहे, असे मला वाटले होते. आम्हा दोघांपैकी कोणीही मरू शकत होता. त्याच्या दुर्दैवाने तो मेला. आणि मी वाचलो. मीही माझ्या दुर्दैवानेच वाचलो. या यातना सोसण्यासाठी वाचलो. त्याचे आणि माझे इतके एकमेकांसारखे असणे हा केवळ एक ईश्वरी चमत्कार होता. फार क्वचित असे असते. ते तसे होते, हे आमचे दुर्दैव. मी तो आहे असे समजत सोहेलने मला वाचवले. माझी शुश्रूषा केली. तुम्ही माझ्याशी फार चांगले वागत आहात. तुम्ही मला झोरावर समजत आहात. म्हणून तुम्ही तसे करत आहात. त्याचे मला फार ओझे झाले आहे. मी पळून जाण्याचा फार प्रयत्न केला. मला ती संधी मिळालेली नाहीय. मी आतल्या आत जळतोय. आता तुम्ही मला मारून टाका. म्हणजे मी या

यातनांमधून सुटेन. माझी वाचा गेलेली नाहीय. मला बोललेले समजते. पश्तुन भाषा थोडी फार समजू लागलेली आहे. मी मुकेपणाचे आणि काही न समजण्याचे सोंग घेतलेले आहे. मला रस्ता नाही. मला या यातनांमधून सोडवा. झोरावरला मारल्याच्या अपराधातून सोडवा. मी तुम्हा सगळ्यांचा फार अपराधी आहे.' तो म्हणाला आणि रडू लागला. कूस फिरवून तो पालथा झाला. तळहातांनी तोंड झाकत, स्फुदत तो हुंदके देऊ लागला.

ती इतकी चकित झाली की तिला बोलणे सुचेना. काहीच करता येईना. एकाच वेळी इतके सारे तिच्या मनावर आदळले होते. तो झोरावर नव्हता. तो काफर होता. तो गेले किमान साताठ महिने इथे राहिलेला होता. त्याला बोलता येत होते. त्याला सगळे कळत होते. ते तसे नसल्याचे सोंग त्याने घेतलेले होते. अचानक प्रचंड घाव तिच्या मनावर बसून तिच्या संवेदनाच काही काळासाठी गोठल्या. तिचे डोके सुन्न झाले होते. दोन्ही हातांनी चेहरा झाकत ती नुसतीच बसून राहिली. जरा वेळाने तिला वाटले, आता करायचे काय? हा झोरावर नाही, म्हणजे हा इथे राह शकत नाही. हा आपला नवरा नाहीय. याच्या हातून झोरावर मेलाय. हा सोंग घेऊन इथे राहिला. याच्या मरणाला पर्याय नाही. मृत्यूला शिक्षा मृत्यू, हा पठाणांचा न्याय असतो. अन् हा तर काफर. त्याला तर हालहाल करून मारतील. अन् आपले काय? हा इतके महिने इथे राहिला. आपल्या शेजारी झोपला. ठीक आहे, त्याने आपल्याशी एकशय्या केली नाही. पण त्यावर कोण विश्वास ठेवील? त्याला काहीच कळत नव्हते. त्याची वाचा बंद होती. त्याला माणसे ओळखू येत नव्हती. पण शरीर तर होतेच ना त्याला. शरीराला त्याचा त्याचा धर्म असतो. मन मेलेले असते तरी शरीर जागे राहते. तशाही स्थितीत एकशय्या होते, मुले होतात. अशा अनेकांच्या अनेक गोष्टी जगजाहीर. तेव्हा, त्याने ती आपल्याशी केलेली असणार असेच सारे म्हणणार. आपण कितीही, तसे झालेले नाहीय, म्हणालो तरी त्यावर विश्वास कोण ठेवणार? अन् का ठेवावा त्यांनी? अन नवरा नसलेल्या पुरुषाशी, त्यातूनही एका काफराशी आपण- अजाणतेपणे का होईना- शय्या केली म्हणून आपण शिक्षेच्या कचाट्यातून सुटू शकणार आहोत काय? काय करायचे काय?

तिला वाटले, आहे, रस्ता आहे. याला मारावे. आपणच मारावे. कोणालाही काहीही न सांगता मारावे. याने झोरावरला मारले. हा आपल्या नवऱ्याचा खुनी. याला शिक्षा आपणच दिली पाहिजे. त्याला मारून ते केले पाहिजे. हा भेकड त्याच्यासारखा दिसतो म्हणून इथवर आला. त्याने सोंग केले. स्वतःचा जीव वाचविण्यासाठी केले. त्याने आपल्या भावाला, आपणा सगळ्यांना फसवले. हा मेला तर काय होईल? झोरावरला भाऊ नाहीय. त्या प्रकारे कोणी आपल्याला हक्काने अंगाखाली घेण्याचा विचार करणार नाही. आपल्या भविष्याचा निर्णय आपण घेऊ शकू. आपल्याकडे पैसा आहे. कोणीही अफगाण पुरुष आनंदाने आपल्याला पत्करील. जोडणीसाठी एखादी चतुर म्हातारी शोधू. तिला उत्तम बिदागी देऊ. ती दिली की ती चांगले प्रस्ताव आणील. हा मेला पाहिजे. झोरावरच्या मरणाचा बदला आपण घेतला पाहिजे. याला आपण मारू शकतो. ते सोपे आहे आणि अगदी शक्य आहे. बाकी कोणाशीच काहीही बोलायचे नाही. अगदी सोहेलशी सुद्धा नाही. सूड म्हणून याला मारण्याचे सुख घ्यायचे आणि मोकळे राहायचे. नंतर तिला वाटले, हे त्याला मारणे आपल्याला वाटते तितके सोपे नाही. कसा मारायचा याला? विष घालून?

दुसरा कोणता रस्ता? याच्या डोक्यात दगड थोडाच घालता येईल? अगदी विष घालून मारायचं म्हटलं तरी कठीण आहे. बाझियाला संशय येणारच. झोरावरची आई आहे ती. ती आपल्याला सोडणार नाही. हा झोरावर नाही असं तिला कुठून सांगणार? सांगितलं तरी आपलीच अडचण. पाकसुरत तंतोतंत तो असताना नाही कशी म्हणतेस म्हणणार ती. आपण काय बोलणार? सुंता न केलेलं त्याचं इंद्रिय दाखवणार? मग म्हणेल, माझा मुलगा नसलेल्या या परक्या काफराशी एकशय्या कशी केलीस? काय उत्तर देणार?....ती उलटसुलट विचार करत राहिली. त्या रात्री आणि नंतरच्या अनेक रात्री आणि दिवसा.

हळूहळू तिला वाटू लागले की याला मारण्याचाच विचार का करतोय आपण? हा झोरावरशी लढला आणि वाचला याच्यात याचा काय दोष? हा झोरावरसारखा दिसतो ही त्याची चूक थोडीच आहे? हा जीवाच्या भीतीने आलाय. पण आपल्याशी चांगलंच वागलाय. सगळयांशी चांगलं वागलाय. त्याच्या मनाला यातना होताहेत, म्हणून तो झोपेत बडबड करत होता. आता तर तेही तो करत नाही. काळजीपूर्वक जागाच राहतो तो. झोपतो कधी; कळत नाही. दिवसा इकडे तिकडे जावून झोप घेत असेल. न बोलण्याचे चालू आहे तसेच. करायचं काय? एके रात्री तिने त्याला विचारले, 'तुला तुझ्या मुलखाला जायचं आहे?' तो चकित झाला. म्हणाला, 'जायचं तर आहेच. पण जायचं कसं हा प्रश्न आहे.' म्हणाली, 'मी व्यवस्था करीन.

पण एका अटीवर.'

'कोणत्या?' 'तुला मला सोबत घेऊन जावं लागेल.' 'छे, छे! असं कधी झालंय? तू कशाला येशील?'

तिने त्याला सगळे समजावून सांगितले. तिने खूप विचार केलेला होता. झोरावर मेलेला आहे, हे तर आता नक्की झाले होते. दुसऱ्या कोणाशी निकाह लावायचा तर हा कुठे वाईट होता. याच्याशी तर निकाह लावण्याची सुद्धा गरज नव्हती. याच्यासोबत इथे राहणे मात्र शक्य नव्हते. त्याने आणि तिने एकत्रित हा देश सोडून जाणे एवढाच एक उपाय त्याच्या आणि तिच्या भल्यासाठी उपलब्ध होता. नवरा बायको म्हणून सुद्धा इथे राहणे दोघांच्यासाठी धोक्याचे होते. त्याचे झोरावर नसणे उघड होण्याचा धोका टांगत्या तलवारीसारखा कायम उरणार होता. ते तिचीही मृत्युघंटा ठरणारे

होते.

7

त्याचा होकार मिळताच तिने भराभर साऱ्या गोष्टी केल्या. सगळयात पहिली गोष्ट म्हणजे तिने घरात एका देवळीत ठेवलेली स्त्री-पुरुषांच्या मूर्तीची जोडी त्याला दाखवली. पितळी मूर्ती होत्या. तिथे दिवा लावलेला होता. आणि ताजी फुले वाहिलेली समोर होती. तो चकित झाला. मुसलमानांच्या घरात मूर्ती आणि त्यांना वाहिलेली फुले! फारच आश्चर्य वाटावे असे ते होते. त्याही पेक्षा अधिक आश्चर्य म्हणजे ती चक्क विठोबारखुमाई अशा जोडींची मूर्ती होती. ज्याला ती ओळखता येणार नाही, तो महाट देशचा रहिवासी असूच शकत नाही. त्याने विचारलं, 'हे इथं कसं काय आलं? नक्की माहीत नाही,' ती म्हणाली, 'पण

असं सांगतात की फार पूर्वी आमचा पूर्वज हिंदुस्तानातून ती घेऊन आला. हे काफर लोकांचे देव आहेत म्हणतात. आमच्या धर्मात त्यांची पूजा चालत नाही. तरीही त्यांच्यासमोर दिवा लावायचा आणि फूल ठेवायचा रिवाज आहे. बाकी आम्ही काहीच करत नाही. जो हे घेऊन आला त्यानेच हे गाव वसवलेलं आहे. आम्ही सगळे त्याचेच वंशज आहोत, असं समज. थोरल्या घरातल्या थोरल्या मुलाकडे असा अनेक पिढ्या प्रवास करत हे आमच्याकडे आलेलं आहे. माझ्या सासऱ्याला झोरावर एकटाच. आता, हे कोणाकडे द्यायचं? म्हणजे तसं ते देता येईल सुद्धा. पण कारण काय सांगणार? म्हणून यांना आपण सोबत घेऊन जाणार आहोत. काफरांची वस्तू त्यांची त्यांना मिळेल. तुला आणि मला जी मुलं होतील ती आता काफरच असतील ना! त्यांना मोकळेपणाने यांची सेवा करता येईल.'

या आपल्या महाट देशात सगळ्यात थोर मानल्या जाणाऱ्या देव आणि देवीच्या या मूर्ती आहेत, हे सांगण्याचं त्याचा ओठांवर आलं. पण लगेच तसं करणं त्याने टाळलं. पुढच्या काही दिवसात तिने बाझिया आणि सोहेलला पटविण्यात घालवले. बाकी कोणाला काही सांगण्याची गरजच नव्हती. या दोघांना ती म्हणाली, झोरावर माझ्याशी बोलायला लागला आहे. म्हणजे बोलत नाहीच अजूनही. पण खाणाखुणांनी बोलतो. हिंदुस्तानात रोहिलखंड म्हणून कोणता देश आहे काय? सोहेल म्हणाला, 'आहे. ते रोहिले हे पठाणच आहेत. अन् ते तिथले सुलतान आहेत.' आफिया म्हणाली, 'त्या मुलखात कुठे तरी याने बरेच धन लपवून ठेवलेले आहे. ते आपण घेऊन येऊ असे तो म्हणतोय.'

'अगं मग मी जातो ना त्याच्यासोबत', सोहेल म्हणाला. 'हां, सोहेल म्हणतो ते मलाही पटतं', बाझिया म्हणाली.

'पण तो नाहीय ना तयार त्याला. मी काय ते त्याला सांगितलं नसेल असं वाटतं तुम्हाला? सोहेल, तू त्याच्यासोबत जाणं हेच सगळ्यात योग्य आणि सुरक्षित, असं मलाही वाटतं ना. पण तो ते ऐकायला तयार नाहीय. म्हणतो, आपण जाऊ आणि आणू. बाकी कशालाच तयार नाहीय तो. म्हटलं त्याला मी की बाबा, सोहेल माझा सख्खा भाऊ आहे. त्यानेच वाचवलंय आणि आणलंय इथं तुला. त्याच्यावर भरवसा नाही का तुझा? पण नाही ऐकत तो. त्याचा ठेका नाहीच बदलत. अन् ऐवज तर मोठा आहे असं म्हणतोय तो. आपल्या सात पिढ्यांना पुरून उरेल म्हणतोय. काय, करायचं काय? तुम्हीच सांगा. एखाद्या लहान बालकाने हट्ट धरावा तसा अडून बसलाय. दुखण्यातून बाहेर येताना तसाच झालाय तो. हां, तबियत तशी छानच झालीय त्याची. पण मन हट्टी आहे .ते सांभाळलं आपण तर तो

आणखी लवकर बरा होईल. तुम्ही सांगा.'

ते काय सांगणार? हिंदुस्तान ही ऐवजांची खाण. धन तर तिथेच असतं. इतक्या स्वाऱ्या झाल्या. इतकं लुटलं त्या लोकांना. तरी ऐवज उरतोच आहे. आपली धनाची हवस नाही संपत. जा बाबांनो. काळजीपूर्वक जा आणि सुखरूप या. तू हुषार आहेस आफिया. घेऊन या धन. आणि सुखरूप

जगुद्या पुढच्या सात पिढ्या. इथं कोणाला काय सांगायचं ते आम्ही बघतो...

आफियाने दोन दमदार घोडे पैदा केले. स्वतःसाठी पुरुषाचा पोषाख पैदा केला. आणि पठाणांच्या वेषात निघाले दोघेही. मजलदरमजल. सरायांमध्ये मुक्काम केले. देश बदलला

तसे वेष बदलले. भाषेचा वापर किमान. फसगत नको. हुषारीचा व्यवहार. पेशावरच्या पुढे पंजाबी दस्तूर. असे करत करत चलाखीने, हुषारीने कुरूक्षेत्रापासून निघाले ते अजात कुंजपुरा नामक गावात पोहोचले. एका धर्मशाळेत उतरले. आफियाला सांगून दसरत गावात फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडला. खानपानाची व्यवस्था पाहणे, घोड्यांसाठी चंदीचा बंदोबस्त करणे अशी कामे होती. खेरीज नुसते हिंडायचे देखील होते. आफियाला काही वेळासाठी एकटे सोडण्यात धोका व अडचण नाही, हे इतक्या प्रवासानंतर त्याला समजले होते. ती पुरुषी पोषाखात होती. आणि वेळी-अवेळी आलेल्या प्रश्नांना तिने व्यवस्थित तोंड दिले होते. त्याला बंकट आणि त्याच्या प्रेयसीची आठवण झाली. कुंजपुरा गावी येतानाच ते मनात आले होते. ती बाई, तिचा म्हातारा नवरा; यांचे काय झाले असेल, काय चालले असेल याचे कुतूहल मनात जागे झाले. पण आता गावातून फिरताना त्याला त्या घराची जागाही नीट आठवेना. इतक्या बारक्या गावात ते सापडू नये याचे त्याला आश्चर्य वाटले. युद्धानंतर सगळ्याच गोष्टी- अगदी जागा आणि घरे यांच्यासकट- विस्कटून गेलेल्या असतील, असे मनात येऊन तो उदास झाला. नदीकाठच्या आसपास रानातून चालला असताना त्याला एक माणूस पाठमोरा दिसला. त्याला बंकटची आठवण झाली. तीच चाल. अंग पुष्कळ हडकलेले अन् खांदे अधिक झुकलेले. दसरतने झपाझपा चालत त्याला गाठायचा प्रयत्न केला. त्या माणसाने वळून पाहिले आणि स्वतः चा वेग वाढवला. दसरतची खात्री पटली. हा बंकटच. दसरतने कच्चून हाक

दिली, 'आरेऽऽ ए बंकटऽऽ बंकट भोसल्याऽऽ'

बंकटने ती हाक ऐकली. तो चकित झाला. त्याची पहिली प्रतिक्रिया पळून जाण्याची झाली होती. हाक ऐकताच तो चकित झाला. 'आरे थांब, थांब बंकट. मी तुझा दोस्त दसरत. दसरत सातपाटील. म-हाटा.' इतकी महाटी हाक. म-हाटाच बिलकुल. काहीच फरक नाही. यमुनाकाठी महाटा थरारला. बंकट थांबला. ओळख पटताच अतोनात आनंदाने करवादला. 'तुपला पोशाक पघून आंधी भ्याव वाटलं रे!' तो म्हणाला.

ते आत थेट नदीकाठी घोर रानात पोहोचले. तिथे वस्ती होती. दोन तीन कोपीवजा घरे. ओबडधोबड. सगळा वावर चिडीचिप. लोक होते आणि कोणीच कुठेही नव्हते. बंकट म्हणाला, “इथे सगळे आपले लोक राहतात.

आपले रोड लोक.'

'रोड लोक?'

'हां, रोड. आता आम्ही म-हाटा लोक नाही आहोत. आम्ही रोड लोक. म-हाटा म्हणवून घेणं धोकादायक आहे आमच्यासाठी. काय झालं ते सांगतो तुला. तू कसा जगलास, जिवंत राहिलास ते सांगशीलच तू. पण मला आधी मी किंवा आम्ही कसे वाचलो हे तुला सांगायचं आहे. आपण पानिपतच्या युद्धात हरलो. त्याच्यानंतर अफगाण लोकांनी आपली लांडगेतोड केली. दिसतील तिथे दिसतील ते मराठे कापले. मुंडक्यांच्या राशी रचल्या. आपले नागवे झालेले लोक ठायी ठायी मारले त्यांनी. आम्ही त्यातून वाचण्यासाठी या यमुनेकाठीच्या रानात लपून राहिलो. ह्या दाट रानात छपून राहिलो. उपाशी-तापाशी जगलो, उरलो. वावटळ आली आणि गेली तरी लव्हाळ्यांसारखे उरलो. कुरुक्षेत्रापासून पानिपतपर्यंत नदीकाठीच्या रानात आम्ही छपून जगलेलो आहोत. नदीपल्याड बागपत

भागात काहीजण आहेत. बारक्या बारक्या टोळ्या आहेत. हळूहळू माहिती होतेय. गिलचे गेले तेव्हा आम्ही बाहेर पडलो. ते भागच होतं. काम केल्याखेरीज खाणार काय आणि जगणार कसं? आमच्यातला एकजण काम मागायला कोणा जाटाकडे गेला तर जाट म्हणाला, क्यूं बे इतने दुबले-पतले हो गये हो, तो क्या काम करोगे? तो संबंधित म्हणाला, दुबला जरूर हूं. बिलकूल रोड हो गया हूं. फीर भी काम करना चाहता हूं. काम करुंगा, खाउंगा तो फीर रोड नही रहूंगा.

त्या जाटाला त्याच्या रोड शब्दाची गंमत वाटली. काम मिळालं आणि रोड शब्दही चिकटला. इथं राहणाऱ्या आम्हा सर्वाना ते रोड लोक म्हणू लागलेत. आम्हालाही ते सोयीचं आहे. महाटा म्हणवून घेणं आजही धोक्याचंच आहे.'

'किती लोक आहेत?'

'तसं सांगता नाही येणार. ठिकठिकाणी आहेत. इथं या वस्तीत आम्ही दहाजण आहोत. नदीकाठच्या रानात अशा अनेक वस्त्या आहेत. आता इथली रानं तोडून शेत काढायचा आमचा विचार आहे.'

"म्हणजे इथंच राहणार? आपल्या मुलखात नाही जाणार?'

"तिथं जाऊन तरी काय? दगडधोंड्याशिवाय आहे काय आपल्या मुलखात? आणि रस्त्यात मारले जाण्याची भीती आहे ती वेगळीच. त्यापेक्षा इथं एकमेकांच्या आधाराने राहतोय हेच बरं. तू पण इथंच राहा. तू आलास कुठून? ते तर विचारायचंच राहिलं. कसा वाचलास? काय करतोस?'

'गिलच्यांनी कैद केलेल्या महाट लोकात मी होतो. जाताना एका शीख सरदारजीने मला त्यांच्याकडून विकत घेतलं. त्याचा घोड्यांचा व्यापार आहे. त्याच कामासाठी मी त्याच्यासोबत आलोय. इथं एका धर्मशाळेत

उतरलोय.'

दसरत अस्खलित खोटे बोलला. तसे त्याने इतक्या सहज केले की त्याचे त्याला सुद्धा आश्चर्य वाटले. आपल्या बाबत जे घडले ते इतके अद्‌भूत आहे की सांगणेही कठीण आहे असेही त्याला वाटले असेल. तरीही स्वतःच्या खोट्या बोलण्याने तो आतल्या आत शरमला.

'चांगलं आहे बाबा. त्यामुळेच तू ह्या पंजाबी पोषाखात आहेस. अन्

तुझी तब्ब्येत सुद्धा चांगली दिसतेय.' बंकट सरळपणे म्हणाला.

"अरे, तुझ्या त्या मैत्रिणीचं काय झालं? मी तर विसरलोच ते

विचारायचं.'

ते एका झाडाखाली बाहेरच बसले होते. दसरतच्या प्रश्नावर बंकटने एकवार आपल्या कोपीकडे पाहिले अन् म्हणाला, 'तू ये ना उद्या. आपण निवांत बोलू. की थांबतोस इथं?'

त्याच्या थांबतोस का म्हणण्यात फारसा जोर नव्हता. निदान दसरतला

तसं वाटलं. अर्थात तोही थांबणार थोडाच होता?

दसरतला धर्मशाळेत अर्थातच बराच उशीर झाला. काय झाले ते त्याने त्रोटकपणे आफियाला सांगितले. आपल्याला एकदोन दिवस इथे मुक्काम करायचा आहे हेही सांगितले. हाच तुझा देश आहे की काय, असे आफियाने विचारल्यावर तो म्हणाला, 'नाही. हा माझा

देश नाही. पण इथेच अफगाण आणि मराठ्यांची लढाई झाली. आपल्याजवळ ज्या मूर्ती आहेत ना, त्या आमच्या- म्हणजे आता आपल्या- देवांच्या मूर्ती आहेत. पुरुष आहे त्याचे नाव विठोबा आणि बाई आहे ती रखुमाई. त्यांचा देश हा आपला देश. तो इथून खूप दूर आहे. तिकडेच आपण जाणार आहोत. मी ज्या जोडीदाराची आत्ता तुझ्याशी बात केली, उद्या त्याला जरा निवांत भेटून येतो. नंतर आपण निघू.

युद्ध संपताना मराठ्यांच्या फौजेची वाताहत झाली. ज्याला जी दिशा सापडली तिकडे तो गेला. कैक कापले गेले. कैक गारठ्याने, उपासमारीने मेले. काहींच्या नशिबी जाटांचे औदार्य आले. त्यांना कसेबसे दक्षिणेत जाता येईल असे रस्ते मिळाले. काही गिलच्यांनी कैद करून सोबत नेले. अगदी थोडे जगले-वाचले ते ठिकठिकाणी लपून राहिले. त्यांच्यापैकीच बंकट एक. दोन तीन साथीदारांसह तो यमुनेकाठीच्या दाट रानात लपला. काही दिवसांनी आणखी चारसहाजण त्यांना सामील झाले. खाण्यापिण्याचे, राहण्याचे सगळेच वांधे. मुख्य म्हणजे जीव वाचवायचा होता. हवा आणि पाणी यांची ददात नव्हती. रानात अन्नाचा शोध घेतला जाई. अगदीच किरकोळ जे मिळे, त्यावर गुजारा चालला होता. नदीत मासे होते पण पकडायचे कधी आणि कसे? अन् भाजायचे कसे? हळूहळू रस्ते निघत चालले. गारठा मरणाचा होता. कोणीतरी कुठूनतरी विस्तव पैदा केला. मग धुनी सतत पेटलेली ठेवायची. जीव जगविण्यापुरते जे मिळे त्यात भागवले जात होते. हळूहळू भीड चेपली जावून अंधाराच्या आश्रयाने ते कधीमधी बाहेर पडू लागले. छोट्यामोठ्या चोऱ्या करू लागले. अशाच एका रात्री बंकट त्याच्या प्रेयसीच्या दाराशी धडकला. चोरी करण्यासाठी अर्थातच नव्हे. तिला भेटण्यासाठी. ठरवून हिंमत केली होती त्याने. तिला भेटून त्याला कैक महिने लोटले होते. युद्ध हरल्यावर मराठ्यांची पत मातीमोल झाली होती. त्यात इश्क आणि प्रेयसी अशा भानगडींना कुठली जागा? तो विचारच मनात नव्हता. जीव वाचविणे हे सगळ्यात निकडीचे. पण आता पुरेसा काळ लोटला होता. त्या रात्री हिंमत करून तो गेला होता. फार उशिराची वेळ नव्हती. कडी वाजवून बराच वेळ झाला तरी दार उघडले गेले नव्हते. ती पुन्हा पुन्हा वाजविणे योग्य नव्हते. मग दाराच्या फटीजवळ तोंड नेऊन हलकेच तो म्हणाला, 'मी आहे. मी बंकट मराठा.' आत हालचाल झाली असा भास त्याला झाला. दार उघडलं आणि त्याला आत घेऊन झटकन बंद करण्यात आलं. बारक्या दिव्याचा क्षीण उजेड होता. त्या उजेडात तिने त्याला पाहिलं. ती खिळल्यासारखी पुतळ्यासारखी उभी राहिली. आणि त्याच्यावर उडी घेत तिने त्याला कवटाळलं. ती स्फुदत हमसाहमशी रडू लागली. तो हडकलेला होता. तिच्या अंगाची रया गेलेली होती. ते दोघांनी एकमेकांना सांगितले. काहीही दुखणे नसताना तिलाराम दर्जी; तिचा म्हातारा नवरा अचानक वारला होता. तिचा मराठा पुरुष -म्हणजे तो; बंकट भोसला- हरलेल्या फौजेतला सैनिक. त्याचा धाक संपला होता. अन् त्याचा पत्ता बिलकूल नव्हता. तिचे ते आधीचे प्रियकर आता बेबंध, अनिबंध तिला कधीही भेटून तिच्याशी शय्या मागत, आपली हवस पुरी करत होते. तिला आता ते काहीही नको होते. पण आता ती लाचार होती. म्हातारा नवरा मेला होता आणि मराठा प्रियकर जिंदगीतून नाहीसा झाला होता. त्याच्यासोबत त्याचा धाक नाहीसा झाला होता. आणि हवेसे स्वप्न पडावे तसा तो त्या क्षणी तिच्यासमोर प्रकट झाला होता. तो अंग हटलेला, लाचार, अन्नान्नदशा झालेला होता. पण तिला तोच हवा होता. म्हणाली,

'मला घेऊन चल. मला तुझ्यासोबत ने.' म्हणाला, 'बाई मी तुला कुठे नेऊ? मी नदीकाठच्या रानात लपून छपून दिवस कंठतोय.' म्हणाली, 'मी कुठेही, कशीही राहीन. उपाशी तापाशी दिवस काढीन. पण तुझ्यासोबत राहीन.' म्हणाला, "तिथे बाया नाहीत. सगळे पुरुष. कोप्या करून जगतो आहोत आम्ही. त्यात राहशील?' म्हणाली, 'तू असशील तिथे आनंदाने राहीन. मला इथून घेऊन चल.'

त्या रात्री तो तिला घेऊन आला. तिथे बाकी सगळे पुरुष. आणि हा बाई घेऊन आलेला. बाई तर प्रत्येकालाच हवी ना! याला एकट्याला बाई अन् बाकीच्यांना नाही असे कसे चालणार? नदीकाठच्या त्या रानात बाकी काही वस्त्यात ठिकठिकाणी बाया आलेल्या, आणलेल्या होत्या. अनेक विधवा, नवऱ्यांनी टाकलेल्या, गरीब एकांड्या अशाच त्या बाया होत्या. जात, धर्म, वैवाहिक स्थिती अशा गोष्टी त्यांच्यासाठी फिजूल झालेल्या होत्या. त्यांच्याशी समजुतीने, समजदारीने एकापेक्षा अधिक पुरुष जात होते. त्या बाया समझदारीने आणखी बाया शोधून आणत होत्या. इथे बंकट एकटा बाईसोबत. आणि बाकी सगळे संडे. शरीराची भूक नजरेत अतोनात दिसे. पण इच्छेचे लादणे नव्हते. बाई आहे. आपली नाही तर नसूदेत. ती आहे म्हणून मार्दव आहे. ती मिळाली तर आनंद. नाही मिळाली तरी बळजोरी नको. ती गेली तर निदान दिसते समोर तर तेही संपेल, ही भावना. पण म्हणून नजरेतली भूक नाहीशी होते का? बाई हवी. संसार हवा. समजुतीने वाटणी करून घेऊन का होईना, तो हवा. यमुनेकाठीच्या सगळ्या रानात तीच रीत उभी होत होती. एका बाईशी अनेकांनी समजुतीने जाणे ही आम रीत झाली होती. एकूण रागरंग पाहून बंकटच्या बाईने बाया शोधून आणण्याची हिंमत केली. म्हणाली, 'मी फक्त बंकटची. त्याला माझा इलाज नाही. पण तुमची व्यथा मला समजते. मी बाया आणते, तशी कोशिश करते. तुम्ही त्यांना प्रेम द्या. त्यांच्या संमतीने त्यांना वाटून घ्या. आपले सगळ्यांचे संसार चालतील इतक्या बाया आणायची जबाबदारी माझी. मी हे इतके तुमच्यासाठी करीन. फक्त बंकटच माझा पुरुष असेल याची हमी मला द्या. मी हे जरा जास्तीचे मागते आहे. तरीही माझे ऐका. कारण तुम्ही हे मान्य केले नाही तर मीही जाईन. मग तुम्हाला बाया कोण आणून देईल?' तिने एक बाई शोधून आणली. त्या बाईने दुसरी आणली. त्या दोघींनी मिळून तिसरी आणली. समझदारीने संसार सुरू झाले. बाया आणखी येतील. संसार चालतील. रान तोडून शेते काढली जातील. पिके काढली जातील. संसार फुलतील, फळतील. मुलेबाळे वाढतील. रोड जात या नदीच्या काठच्या लोण्यासारख्या मातीत रुजेल.

'तर एकूण हे असं आहे,' बंकट म्हणाला, 'तू काल आलास. आज आलास. तुला कुठेही बाई दिसलेली नाहीय. कधीही आलास तरी दिसणार नाही. तेवढी काळजी आम्ही घेतो. बायाही घेतात. बाई आमच्यासाठी फार दुर्मिळ चीज. त्यांना जीवापाड जपणं भागच आहे रे. इथं सध्या चार बाया राहतात. पण तू आहेस तोवर त्यांचा सासूल कोणत्याच रीतीने लागणार नाही तुला. आता, तू तूच आहेस म्हणून मी तुला माझ्या बाईला भेटवू शकतो. तेही मला तिला आधी सांगायला लागेल. आणि ये ना इथं राहायला माझ्या दोस्ता. कोणाचा तरी गुलाम म्हणून जगण्यापेक्षा इथे आपल्या लोकात राहा. एकमेकांना धरून राहू आपण. माझी बाई सुद्धा तुझ्याशी येऊ शकेल. मी म्हणून बघतो तिला. इथं ही आम

रीत आहे. तिच्या कलाने घेतलं तर तेही जमेल.'

एकाएकी दसरतचे डोळे भरून आले. इथे इतक्या कठीण परिस्थितीत जगताना सुद्धा बंकट स्वतःचे मन इतके मोठे करू शकतो! आणि आपण? आपल्याला फारशा झळा सोसाव्या लागलेल्या नाहीत. भीतीच्या सावलीत आपणही जगलो. पण बंकट किंवा त्याच्यासारखे अनेकजण ज्या हालतीला सामोरे गेले, तसे आपल्याला काहीच करावे लागले नाही. या सगळ्यात याची माणुसकी उजळून निघालीय. आपल्यासाठी याचे मन किती उदार आहे. अन् आपण मात्र याच्याशी सहज किती खोटे बोललो. का बोललो?

'नको, नको, दसरत म्हणाला, मला तुझी बाई नाही बघायची. मी तुला माझी हकीगत नीट सांगितलेली नाहीय. ती सांगायचीय. ती सांगतो आणि निघतो मी. मला आणखी खूप प्रवास करायचा आहे. आपल्या

देशाला जायचं आहे. माझ्यासोबत माझी सुद्धा बाई आहे.'

'तुझी बाई? कुठे पैदा केलीस? अन् मुलखाला जायचं नक्की आहे तुझं?'

'सांगतो ते राजा. सगळं सांगतो. मी चांभारगोंदियाला तर नक्कीच जाणार. माझी तुळसामाय असेल तिथं. तिला भेटतो आणि बघतो काय करायचं ते. कायमच्या रहिवासासाठी कोणतं गाव निवडायचं ते पाहीन. ते अजून मी ठरवलेलं नाहीय.'

दसरतने त्याची कहाणी अगदी लहानपणापासून ते थेट युद्ध आणि नंतर अफगाणिस्तान ते परत अशी ठळक ठळक, मुद्द्याच्या कोणत्याही गोष्टी न लपवता बंकटला सांगितली.

'दसरत, तू आसं कर ना. तू माझ्या गावालाच राहायला जा.' 'कोणतं गाव तुझं?' 'करंजे नावाचं गाव आहे. साताऱ्याजवळ.' "तिथं कोण असतं?' 'सगळे आहेत. आईबाप. भावंडं. सगळं गणगोत.'

'अरे मग चल ना माझ्यासोबत. आम्ही दोघं आहोत. तू तिसरा.

किंवा काय ; तुझी बाई सुद्धा घे सोबत. दोन घोडे आहेत आमच्याजवळ.'

बंकट गप्प झाला. थोडा विचारात पडला. जरा वेळाने म्हणाला,

'नको आता. हाये हेच बरं हाये. मी आता रुजलो इथं.'

'भेटले तुझे आईवडील तर त्यांना काय सांगू?'

'काय नायी. जित्ता हाये म्हणावा. जिथं हाये तिथं सुखी हाये म्हणावा.

आन अडीनडीला बघत जा. माझा मैतर हायेस.'

'ती काय सांगायची बात झाली! मी करीनच ते. पण, खरं तर मलाच

आधार होईल त्यांचा.'

आफियाला घेऊन मजल-दर-मजल करीत दसरत चांभारगोंदियाला पोहोचला. जात वाकडी करून बुंदेलखंडातल्या महकच्या गावाला जायचं तो विसरला नाही. ती कोण, काय, तिने काय केलं ते त्याने आफियाला सांगितले. प्रवासात एकमेकांना अशा एकमेकांबद्दलच्या अनेक गोष्टी ते सांगत होते. त्यातलेच हे एक. चतुराईने साजेसा पुरुष निवडून महकने आपली दुनिया उभी केलेली होती. ते सारे त्याला फार सुखाचे वाटले. मनात काळजीचे, अपराधभावाचे काही काटे होते, त्यांचा निकाल लागला. आफियाजवळ त्याला सांगावे असे फार काही नव्हते. सारे त्याला माहीतच झालेले होते. पण त्याच्याजवळ तिला सांगावे, दाखवावे असे खूप होते. आणि तिला सगळ्याचे कुतूहल खूप. अप्रूप खूप. आता, एकत्रच जगायचे ठरले तर एकमेकांना सांगितलेच पाहिजे ना सगळे! आणि ठरवाव्या नाही लागत अशा गोष्टी. त्या आपोआप होत जातात. स्नेह रुजतो, वाढत जातो आणि अधिकाधिक स्नेहल होत जातो. तसे त्यांच्यात त्या सा-्या प्रवासात सुरू होते. आफियाला बघून महक म्हणाली, 'जन्नतची परीच घेऊन आला आहेस सोबत. तिला जप. सांभाळ नीट. तीही सांभाळीलच तुला. देखणी तगडी

अफगाणन आहे.'

चांभारगोंदियाला तुळसामावशीच्या दारात तो उभा राहिला तेव्हा त्याला पाहून क्षणभर तिचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. पानिपतात तर सगळेच मेले होते. जे काही आले ते आले, बाकी मेले असेच होते ना! इतके दिवस हा आला नव्हता म्हणून तो मेला असे समजून तिने पुष्कळ रडून घेतलेले होते. अन् तो खुशाल पाकसुरत दारात उभा.

'आरे दसरताऽऽ माह्या पुताऽऽ आलास रे मह्या राजा. ये, ये.' म्हणत म्हातारी धावली अन् त्याच्या गळ्यात पडून आनंदातिरेकाने रडू लागली. दंतहीन बोळक्याने त्याचे पटापट मुके घेऊ लागली. काही वेळाने तिचे त्याच्या पाठी उभ्या असलेल्या आफियाकडे लक्ष गेले.

'आन ह्यो कोन आला तुपल्या संगती? लयच चोपडा दिसतो.

आपल्या मुलुकचा लागतच नायी', ती म्हणाली.

'ह्यो त्यो नायी. ती हाये. मी घेऊन आलोय तिला. अफगन देस मधून. रस्त्याच्या हिसाबानी गड्याचा पोशाक केलाय तिनी. त्याची आता जरोर नायी उरनार. तुपली सून हाये मावशी ती.'

'ह्यो कोनचा अफगन देस? आन नाव काय तिचं?'

दरम्यान आफिया पुढे होऊन तुळसामावशीसमोर वाकली. तिच्या पायांना स्पर्श करीत तिने तिला दंडवत घातला. हे दसरतने आधीच तिला शिकवून ठेवलेले होते.

'बरं, बरं. नाव काय बाई तुपल्यावालं?' 'आफिया.', दसरत म्हणाला.

"आफुबाई? हाये मातर खरंच आफू. तुला चांगलीच चटक लागल्याली दिसतीय तिची. नाकीडोळी लयच सरस हाये. आशी बायच पाह्यल्याली नायी म्या. थमा इथंच जरासिक.' म्हणत तुळसामावशी आत जाऊन तांब्याभरून पाणी अन् सोबत भाकरीचा चतकोर तुकडा घेऊन आली आणि दोघांच्या भोवती दोन्ही गोष्टी फिरवत तिने ते पाणी समोर अंगणात ओतले आणि भाकरीचा तुकडा टाकून दिला.

'हां, चाला आता आतमंदी', ती हारकल्या मनाने म्हणाली.

पुढचे काही दिवस काय काय झालं. कुठे राहिला, कसे दिवस काढले अशा गोष्टी झाल्या.

म्हातारी म्हणाली, 'हिला- ह्या आफूबाईला तुझी बायको म्हणून कसं सांगायचं लोकांना? हिच्या कपाळावर गोंदण नाही. गालांवरही नाही. तिचं नाक टोचलेलं नाहीय. कानांना भोकं नाहीत. गळ्यात डोरलं नाही. तिला लुगडं नेसता येत नाही. कुंकू लावायची रीत माहीत नाही. हातात बांगड्या नाहीत. निस्ता देखणा दिवा आहे.'

'नाहीय ना ते सगळं. पण तू कशासाठी आहेस? शिकव सगळं. माझी आई आहेस तर आईसारखं कर सगळं. अन् आपण फार दिवस इथं राहणारच नाही आहोत. निघून जाऊ इथून. लांब तिकडं सातारा म्हणून गाव आहे, तिकडं जाऊ. आपल्यासाठी एवढं डबोलं गाडून राखून ठेवलयंस तू. त्याचा टुकीने आणि हुषारीने वापर करू. तुझी लेक आणि जावई यांना सुद्धा सोबत घेऊन जाऊ. त्यांचा तरी इकडं कुठं मोठा बारदाना वाया चाललाय? तुझी लेक माझी बहीणच आहे ना! त्यांचंही बस्तान बसवून देऊ नव्या गावात. आधी मी जावून पाहून येतो. माझ्या एका दोस्ताचं गाव आहे ते.'

नंतर त्याच्या पहिल्या बायकोचा विषय म्हातारीने काढला. म्हणाली, 'तिचं काय करायचं? की ती काळी आहे म्हणून तिला टाकून द्यायची? अन् पोरगा आहे तिला. त्याचं काय करायचं?' दसरत म्हणाला, 'मी हिला ते सांगितलेलं आहे. ती माझ्यासाठी थांबलेली असेल तर तिलाही नांदवीन मी. माझी आशा सोडून तिने कोणाशी पाट लावला असेल तर काही इलाज नाही. तू तिच्या माहेरी जा आणि तिला सांग. परिस्थितीचा अंदाज घेऊन योग्य ते कर. आपला कुनबा आता चांगलाच मोठा होईल. तो सगळाच घेऊन जाऊ. नव्या गावात सगळं नवं. तिथं कसं बस्तान बसवता येईल याचा आदमास घेतो मी.'

9

मुक्काम करंजे. दसरत दुनिया पाहिलेला गडी. नजर उघडी झालेली. चार दिवसात त्याला अंदाज आला. अंगावरून गाडा गेला तरी हूं की चूं करणार नाहीत असे सगळे भोसले लोक. भावकी तितकी मोठी नव्हती. पण गावात मान आणि दाब होता. चार दिवसांनी बंकटच्या वडिलांना बाजूला घेऊन दसरत म्हणाला, 'काका तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी बंकटने काही वस्तू दिलीय माझ्याजवळ.' म्हणाले, 'काय वस्तू?' म्हणाला, 'वस्तू मोठी आहे. फार उपयोगाची आहे. तुम्ही ती टुकीने वापरा.' असे म्हणत दहा मोहरा असलेला बटवा त्याने त्यांच्या पुढ्यात खोलला. ते साहजिकच स्तब्ध झाले. त्यांचे डोळे पाणावले. ही अशी एवढी मोठी वस्तू आपल्या लेकाने आपल्यासाठी पाठवली. आणि हा भला माणूस ती आपल्याला देण्यासाठी इथवर आला. त्याला ती सहज लाटता आली असती. कोणाला काय कळणार? हाक ना बोंब. त्याने तसं केलं नाही. तो हे घेऊन आला.

'तुम्हाला तर माहीतच आहे काका, लढाईत लागतात हाताला अशा गोष्टी, नशीब असलं तर. आम्हाला सापडलं. ते आम्ही दोघात वाटून घेतलं. त्याचा हिस्सा तुमच्या हाती द्या असं तो म्हणाला. सांभाळा आता तो.'

'लय भलं होईल पुता तुझं. असा दोस्ताना कोण निभावतो? माझा लेक आला असता तर या सोन्याहून पिवळं झालं असतं. पण तू म्हणतो तसा तो आहे तिथं सुखात आहे, तर राहो बिचारा.'

'माझं भलं करणं तुमच्या सुद्धा हातात आहे काका. माझ्या गावी माझी भावकी मला बरं पाहात नाही. माझे चार चुलतभाऊ मला मारायला टपलेले आहेत. मी तिकडं गेलो की तोडला गेलोच समजा. लांब तिकडं पुण्याच्या जवळ गाव आहे माझं. मी हे बंकटशी बोललो तेव्हा तो म्हणाला, तू माझ्या गावी जाऊन राहा. तिथं तुला अजिबात भीती नाही. तुम्हाला दिली तितकी माया माझ्याजवळ सुद्धा आहे. तुम्ही माझं बस्तान ह्या गावात बसवून द्या.'

'अरे वा! का नाही देणार? मला जसा बंकट तसाच तू माझ्या पुता. ये, तुला चांगली शे-पन्नास एकर जमीन घेऊन देतो. वाडा बांधायला जागा देतो. सगळे आपलेच लोक आहेत इथं. कायच काळजी नाही. ये तू, तुझा सगळा कबिला घेऊन ये.'

दसरत आला. कुटुंबकबिला घेऊन आला. आई, बहीण, मेव्हणा, दोन बायका, मुलगा. जमीन झाली. वाडा झाला. दूधदुभत्यासाठी गायी म्हशी आल्या. शेतीसाठी बैल. घोडे येतानाच आणलेले होते. वाढता वाढता बारदाना वाढत गेला. लेकरे-बाळे काळी-ढवळी उदंड झाली. आफुबाई अज्जात मराठा कुळीत मिसळून गेली. सोयीरसंबंध झाले. अफगाण-मराठा संतती मराठा झाली. भोसल्यांचे पाव्हणे म्हणजे कुळीचा अन् धाग्याचा सवालच नाही. गोंधळ्यांची तुळसामाई दसरतची आई होऊन मराठा झाली. तिची लेक दसरतची बहीण होउन मराठा झाली. भोसल्यांचे पाहुणे म्हणजे सवालच नाही. एका बंकटच्या दोस्तान्याने असे फेरफार दसरतच्या पुढच्या पिढ्यात घडून आले. शेतीच्या वहिवाटीत मुले घुसल्यावर दसरत तिच्यातून बाहेर पडला. गायी-म्हशी सांभाळणे इतकेच काम त्याने स्वतःला लावून घेतले.

: असे सांगतात की अगदी म्हातारपणी सुद्धा रोज सकाळी उठून अंघोळपांघोळ आवरून दसरत सातपाटील देवघरातल्या विठोबा रखुमाईचे दर्शन घेत असे आणि गोठ्यातल्या गाई-म्हशी सोडून नित्यनेमाने त्यांना भवानीआईच्या डोंगराच्या पोटाला माळावर चरण्यासाठी घेऊन जात असे. विठोबा-रखुमाईसाठी घरात छोटेसे देवघर केलेले होते. रोज घासूनपुसून धुऊनधावून त्या मूर्ती चकचकीत केलेल्या असत. लाल रंगाच्या स्वच्छ फडक्यावर त्या ठेवलेल्या असत. त्यांच्या पायाशी खालून अगदी बाळबोध लिपीत लिहिलेले होते: साहेबराव आणि आरेनाबाई यांना, शिवरामबावांकडून. आपल्या मुलखाची आठवण म्हणून. पण ते वाचतो कोण? त्यासाठी मुळात वाचता तर यायला हवे. आणि देवावरच्या श्रद्धेच्या पुढे अशा कुतूहलाची अन् लिखापढीची मातब्बरी ती काय?

◆ ◆ ◆

जानराव

१७ नोव्हेंबर १७१३ रोजी बाळाजी विश्वनाथ याला मिळालेली पेशवाई त्याचा पणतू दुसरा बाजीराव याने १२ जून १८१८ रोजी गमावली. म्हणजे पेशवाईला १०८ वर्षांची हयात लाभली. पेशवे अगदी आरंभापासून कर्जबाजारी. आरंभीचे कारण शाहू; जो मोगलांच्या कैदेतून सुटला तेव्हा तो कफल्लकच होता. त्यास खर्चासाठी पुरेसा पैसा नसे. हे त्याचे वर्म बाळाजी विश्वनाथाने बरोबर ओळखले. मग पैसा मिळविण्यासाठी मोहिमा. बाळाजी विश्वनाथाचा मुलगा थोरला बाजीराव हा फार पराक्रमी होता. तो त्याच्या हयातीत एकही युद्ध हरला नाही. पण त्याचे कर्जबाजारी असणे कायम राहिले. त्याने अनेक सावकारांना लिहिलेली अजीजीची पत्रे याची साक्ष आहेत त्याचा मुलगा नानासाहेब हा हिशेबात आणि एकूण व्यवहारात फार तरबेज होता. त्याने कर्जाची व्यवस्था लावायचा उत्तम प्रयत्न केला. त्याने जरा बरी घडी बसविली. ब्राह्मण सावकारांशी सोयरिका करून जवळीक निर्माण केली. पण त्याला पानिपतने मारले. जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी असे शिंदे घराण्यातील हिरदार पुरुष कामी आले. नंतरचा माधवराव पेशवा हुषार होता, पण तो अल्पायुषी निघाला. आणि राघोबादादाशी तंडण्यात त्याची फार ताकद खर्च झाली. त्याच्या कारकिर्दीत त्याच्या लक्षात आले की आपले कारभारी दौलतीला कर्ज दाखवतात आणि स्वतः उत्तम द्रव्य काखेला बांधतात. त्याने अशा लोकांना ठोकून त्यांच्याकडून पैसा वसूल केला. पण त्याच्यानंतरही कारभाऱ्यांनी स्वतःची भर करण्याचा क्रम चालू राहिला. नाना फडणवीस याने कारभार, हिशेब उत्तम करताना ही कला उच्च कोटीला नेऊन ठेवली. खेरीज त्याने छत्रपतींच्या सातारा आणि कोल्हापूर या गाद्यांचे महत्त्व कमी करत आणले. त्यांना पाठवायचा निधी कमी कमी करत आणला. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी तिथे आपले प्रतिनिधी नेमले. अगदी किरकोळ गोष्टींसाठी द्रव्य मागताना सुद्धा छत्रपतींच्या स्त्रियांना अशा प्रतिनिधींपाशी तोंड वेंगाडावे लागे. दोन्ही छत्रपतींच्या भोवती ब्राह्मण सरदारांच्या जहागिऱ्या निर्माण करून त्यांच्यावर वचक राहील अशी व्यवस्था नानाने उभी केली. त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबांचा होता होईल तितका उपमर्द करण्याचा

शिरस्ता त्याने कायम केला. पुढच्या काळात पेशवे यांचे सरदारांनी अनेकदा सातारा आणि कोल्हापूरच्या छत्रपतींवर स्वाऱ्या केल्या. हे वरवर हास्यास्पद आणि आश्चर्यकारक दिसत असले तरी अशा गोष्टींना इलाज नसतो. ज्याला ताकद मिळवायची आहे आणि ती स्थिर करायची आहे तो ब्राह्मण असो वा मराठा; तो त्यासाठी काहीही करण्यास मागेपुढे पाहात नाही. त्याने का पाहावे? मात्र दौलतीच्या कर्जाचा सिलसिला कायम राहिला.तो सतत वाढता राहिला. सावकार खंक झाले.कारभारी लुटून झाले. मग उरले सामान्य लोक. अखेरचा पर्याय म्हणून त्यांना वेठीस धरण्यात येऊ लागले. त्यांच्याकडून भरमसाट रकमा सक्तीने आणि जबर शिक्षा करत वसूल करण्यात येऊ लागल्या. बाकी युद्धामध्ये ते सतत होरपळत होते ते वेगळेच. अशात त्यांना राजवटीविषयी प्रेम ते काय राहणार? सगळे मराठा मंडळ फुटले आणि ते एकमेकांसकट जनतेलाही लुटू लागले. फक्त स्वतःची सुरक्षितता पाहणाऱ्या दुसऱ्या बाजीरावाच्या काळात हे सारे टोकाला पोहोचले. खेरीज ऐशोआराम, दिलफेक देणग्या, ब्राह्मण भोजने यांची भरमार झाली. एकाच काळात दुसरा बाजीराव, दौलतराव शिंदे, सर्जेराव घाटगे असे लोक निर्माण होणे, ही मराठ्यांच्या सत्तेची

इतिश्री करण्यास अत्यंत कारक गोष्ट ठरली. एक यशवंतराव होळकर वगळता कोणीही कर्तबगार पुरुष त्या काळात निपजला नाही. अन त्याची कोणीही साथ केली नाही. किंवा त्यालाही ते राजकारण जमले नाही; असे म्हणावे लागते. दुसऱ्या बाजीरावाच्या काळातील काही गोष्टी नमुन्यादाखल नोंदविण्याजोग्या आहेत.

पेशवाईत अधिकाऱ्याने मागितलेला वसूल शेतकऱ्याने दिला नाही तर त्याच्या मुलांच्या अंगावर उकळत्या कढईतील तेल ओतीत. तवे तापवून त्यावर शेतकऱ्यांना उभे करीत. त्यांना तक्त्यात पिळीत. कानात, बेंबीत बंदुकीची दारू घालून उडवीत. पाठीवर अमानुषपणे मोठाले दगड ठेवीत. ओणवे करून नाकाखाली मिरचीची धुरी देत. आता, दुसऱ्या बाजीरावाच्या रोजनिशीतील काही नोंदी: १२-१२-१८०८ दहा हजार रुपये विलास प्रकरणी खर्च जाहले. (असे पैसे ते कलावंतिणींना तर देतच, खेरीज कुलीन स्त्रियांनाही देत.) २५ ३-१८०९: रुपये १००० काशीबाई पेठी हीस बक्षीस दिले. ९-८-१८०८ : रुपये १००० सगुणाबाई दीक्षित मराठे यांस बक्षीस दिले. व्यंकट नरसी नाचणारणीला बसल्या बैठकीला २६००० रुपये दिल्याची नोंद १८०२ च्या रोजनिशीत आहे. १८११ मध्ये नारायणराव पेशवे यांचे भूत शनिवारवाड्यातील एका आचाऱ्याच्या अंगात आले. तो प्रकोप थांबावा म्हणून दुसऱ्या बाजीरावाने एक लक्ष ब्राह्मणास भोजन घालून प्रत्येकी अर्धा रुपया दक्षिणा दिली. तरीही शनवारवाड्यात राहण्याचे चित्तास गमेना म्हणून त्याने बुधवार, शुक्रवार व विश्राम हे वाडे बांधले. तसेच कोथरूड, फुलशहर, पाषाण वगैरे ठिकाणे विलासासाठी तयार केली. शिवाय गुहागर, नाशिक, वाई व माहुली येथेही वाडे बांधले. कोपरगाव येथे वाडे पूर्वीचेच होते. ठिकठिकाणच्या वाड्यात स्नान, भोजन व विलास यांचे समारंभ वारंवार होत. बहुतेक काळ बायकांचे घोळक्यात जाई. न्याय, नोकऱ्या वगैरेंचे वशिले बायकांचे मार्फत चालत. बाजीरावास कृष्णावतार समजून त्याची स्तुती करून बक्षिसे उपटण्याचा क्रम अनेकांनी चालविला होता. २६-१-१८०८ रोजी बाजीरावाने कर्णेल कलोष (कर्नल क्लोज) याला मेजवानी दिली. तिला २१२५ रुपये खर्च आला. बाजीरावाने एकंदर अकरा बायका लग्नाच्या केल्या. त्यापैकी सहा दक्षिणेत पेशवाईवर असताना आणि पाच राज्यच्युतीनंतर बिठूर (ब्रह्मावर्त) येथे केल्या. खेरीज बयाबाई दातार, सीताबाई शेंडे, सगुणाबाई दीक्षित-मराठे, सखुबाई ढमढेरे, गंगाबाई राजामाचीकर, उमा फडके, काशीबाई पेठे अशा कित्येक स्त्रिया बाजीरावाचे मर्जीत होत्या. ब्रह्मावर्त येथेही बाजीराव अत्यंत विलासी पद्धतीने दीर्घकाळ जगला. (मृत्यू: २८ जानेवारी १८५१) बाजीरावाच्या काळातील आणखी दोन वास्तवांची ऐतिहासिक नोंद अवश्य केली पाहिजे. एक: बाजीरावाचा पुणे येथील दानधर्म. श्रीमंतास देण्याचा सुमार नाही. १७९७ च्या श्रावण मासांत ब्राह्मण सालाबादपेक्षा जास्ती आले. प्रथम दिवशी तीस हजार आले. गुदस्तां वीस हजार होते. दुसरे दिवशी छत्तीस हजार शिधा पावले. शिवाय तीन हजार रिकामे आले. यंदा साठ हजारपर्यंत ब्राह्मण होतील अशी बोलवा आहे. गांवांतून रस्त्यांत ब्राह्मणच ब्राह्मण दिसतात. नवीन ब्राह्मणही लिहिले. त्यांस आंख उत्तम १५-४० पर्यंत घालून रुपये दिले. गेल्या वर्षी दीड लक्ष दक्षणा होती. ती यंदा दुप्पट झाली. श्रीमंतांनी आपल्या हातें दोनशे, चारशे, बाराशें, चवदाशें, दोन हजार पर्यंत दक्षिणा दिली. आजपर्यंत चार दरवाजे चालू होते, पांचवा दादासाहेबांचा चिणला

होता, तो यंदा चालू केला, त्याच दरवाजावर श्रीमंतांनी बसून मोहरा, होन, पुतळया, रुपये, मोती वगैरे मिळून खिचडी करून वांटली. ही पैशांची लूट व ब्राह्मणांची संभावना, आणि फौजेची उपासमार व रयतेची दैना एकसमयावच्छेदें मनात आणावी, म्हणजे राज्याचे संरक्षण फौजेच्या बळापेक्षा ब्राह्मणांच्या आशीर्वादाने होते ही बाजीरावाची भावना स्पष्ट दिसेल. मात्र खुद्द त्याच्या सरकारी राहत्या वाड्यात दिव्यास तेल, विड्यांस पानसुपारी वगैरे व बारीक तांदूळ सुद्धा मानसिक, अशी स्थिती होती. दुसरे: ब्रह्मावर्त येथील राजवाडा. बाजीरावांनी ब्रह्मावर्त येथे एक उत्तम राजवाडा बांधिला होता. तो फार भव्य व युरोपियन त-हेने भरपूर शृंगारलेला होता. दिवाणखाने मोठमोठ्या आरशांनी व झुंबरांनी गच्च भरून गेले होते. तसेंच भरगच्ची पडदे, रेशमी व जरीचे गालिचे आणि अनेक मौल्यवान चिजा यांचे योगाने पेशवाईचे वैभव तेथे मूर्तिमंत वास करीत आहे असें दिसत होते. चांदीसोन्याची भांडी, हत्तीघोड्यांचे सोन्यारुप्यांचे अलंकार, हौदे, अंबाऱ्या, मेणे, रथ, पालख्या, वगैरे पेशवाई दौलत तेथे यावत्शक्य अस्तित्वात होती. तसेच कुत्री, हरणे, काळवीट वगैरे नाना प्रकारची जनावरें हौसेने पाळली होती. त्या योगे ब्रह्मावर्त येथे एक नवीनच राजधानी निर्माण होऊन ती राजवैभवाने व जनसमुदायाने प्रफुल्लित दिसत होती. बाजीराव मोठे उदार व धर्मात्मे अशी सर्वत्र प्रसिद्धी असल्यामुळे तेथें दक्षिणेतून व काशी, प्रयाग, खाल्हेर, इंदूर वगैरे ठिकाणांहून ब्राह्मण लोकांचा समुदाय पुष्कळ जमला होता. त्यांस नित्यशः पंचपक्वान्नांचे सुग्रास भोजन व रौप्य दक्षिणा मिळत असे. ५ नोव्हेंबर १८१७ रोजी खडकी येथे बाजीरावाचा सेनापती बापू गोखले याने इंग्रजांशी लढाई सुरू केली. तिथून पुढे बाजीराव जवळजवळ सतत पळत होता. तो पळा अखेर शिवनी येथील लढाईत पराभूत पावून अशीरगड किल्ल्याजवळ धुळकोट मुक्कामी असताना इंग्रजांकडून घेरला गेला, तेव्हा ३ जून १८१८ रोजी त्यांना शरण जावून संपला. हे सात महिने विशेषतः त्यातले अखेरचे पाच महिने इंग्रजांना झुकांड्या देत तो सारखा पळत होता. या त्याच्या पळाची तुलना केवळ त्याचा आजा श्रेष्ठ थोरला बाजीराव याच्या चपळ लष्करी हालचालींशी करता येईल. यात फरक अर्थात मोठा आहे. थोरला बाजीराव युद्ध जिंकण्यासाठी विद्युतवेगाने हालचाली करत असे. हा शत्रूपासून पळण्यासाठी ते करत होता. पण त्याच्या अशा पळण्याने इंग्रजांना हतबुद्ध केले होते आणि दमवले होते हे बिलकूल खरे. त्या काळातील इंग्रज अधिकाऱ्यांच्या कागदपत्रात हे नोंदलेले आहे.

1

दुसऱ्या बाजीरावाच्या या अखेरच्या पळात ते पाच-सात महिने जानराव सातपाटील एक शिलेदार म्हणून त्याच्या सोबत होता.

जानराव हा करंजे नामक सातारा शहरानिकटच्या गावात रहिवसलेल्या दसरत

सातपाटलाचा नातू. त्याच्या मुलाचा मुलगा. दसरतला बायका दोन. एकीचे नाव आफुबाई आणि दुसरीचे काळीबाई. काळीबाईला तिचे काहीतरी नाव असेलच. पण तिला काळीबाई म्हणण्याचा प्रघात होता. आणि तिला त्याचे वैषम्य वाटत नसे. तिने ते आनंदाने स्वीकारलेले होते. ती डांबरासारखी काळी, बुटकी आणि दणकट आटूस अंगाची, नाकीडोळी धारदार ; काहीशी द्रविडी वळणाची बाई होती. जानराव याने तिला पाहिले तेव्हापासून ती तितकी आटूस उरली नव्हती. पण तिची रग त्याही वयात कायम होती. वावरात कामाला उतरली की तिची बरोबरी कोणीही करू शकत नसे. तिचा थोरला मुलगा जानराव याच्या बापापेक्षा चारेक वर्षांनी मोठाच होता. पण त्याला मुलेबाळे त्यामानाने जरा उशिरा झाली. याच्या उलट आफुबाई उंच, गोरी आणि एखाद्या पठाण बाईसारखी दणकट शेलाटी आणि रुबाबदार होती. त्या कुटुंबात तिचाच रौब सगळ्यात जास्त चालत असे. तिच्या उतरत्या वयात म्हणजे जानरावच्या लहानग्या वयात सुद्धा ती तशीच दिसत असे. तिला शेतात काम करणे जमत नसे. त्याची भर ती सैपाकाचा सगळा जिम्मा स्वतःवर घेऊन काढत असे. घरात दूधदुभते कायम भरपूर असे. खेरीज तिला स्वतःला सुकामेवा खासकरून आवडत असे. रोज सकाळी काळ्या-गोऱ्या; साऱ्या नातवंडांना तो वाटणे आणि ते तो नीट खातील याची खात्री करून घेणे हा तिचा एक कायमचा उद्योग असे. घरात सुना गर्भार राहिल्या की ती ती सून आणि तो तो मुलगा यांना खारीक-खोबऱ्याचा खुराक सुरू होई. तो त्यांना बाळे होऊन कैक महिने झाले तरी चालू राही. म्हणजे इतरांसाठी तो उपलब्ध नसे असे नव्हे, पण यांना तो सक्तीचा असे. घरात जसजशा सुना येत गेल्या तसतसा आफुआजीचा सैपाकाचा भार कमी होत गेला. बाकी सुका मेवा, खारीक खोबरे असे कायम राहिले. घरात ती अनभिषिक्त कारभारीण होती. ते तिचे पद अधिक घट्ट झाले. त्या दोघी सवतीत थोरली कोण अन धाकली कोण हे सांगता नसते आले. पण निदान लग्नाचा क्रम विचारात घेता काळीबाई ज्येष्ठ म्हणायला हवी. पण तसे झाले नाही. वागण्याचा डौल, आत्मविश्वास यात आफुबाई फारच श्रेष्ठ होती. आणि काळीबाईने ते विनातक्रार मान्य केले होते. तिच्या सगळ्या आयुष्यात ती आफुबाईला दबून राहिली. पण म्हणून आफुबाईने तिचा कधी पाणउतारा केला, असे घडले नाही. त्या दोघी सवती एकमेकींचा आदर ठेवत एकमेकींना पूरक होऊन सुखाने राहिल्या. दसरत सातपाटलाच्या नशिबी स्त्रीसुख मुबलक. साहजिकच त्याच्या या दोन्ही बायकांना भरपूर संतती झाली. ती मुले आपापल्या आयांच्या अंगकाठी आणि वर्ण यांनी रेखलेली स्पष्ट वेगळी दिसत. नातवंडे सुद्धा जवळपास तशीच. त्यांच्यात जानराव हा सगळ्यात थोरला. त्याची बाकी काळी, गोरी भावंडे, त्यांचे प्रत्येकाचे आईबाप, अनेक आत्या, त्यांची लेकरे असे ते भले मोठे कुटुंब होते. दिवाळीत भाऊबीजेला तो सगळा गोतावळा एकत्र येई तेव्हा ती नातवंडे काळ्या आणि ढवळ्या मेंढरांसारखी एकत्र हुंदडत असत. सगळ्यांसाठी आजा एक आणि आज्या दोन. त्यामुळे आजा हा फक्त आजा. पण आज्या दोन असल्याने एक आफू आजी अन् दुसरी काळीआजी. काळीआजी हसतमुख पण कमी बोलणारी. हसली की तिच्या नाकातली मोरणी चमके. ती खूप मृदू आणि मायाळू होती. याउलट आफुआजी जरा कडक स्वभावाची आणि सहसा न हसणारी होती. ती चिडली की कोणत्या तरी अगम्य भाषेत बोलत असे. ते नातवंडाना न कळून ते सारे गोंधळून जात. या दुसऱ्या भाषेतला

तिचा स्वर अधिक जाड, दणकट आणि पुरुषी वाटत असे. त्यामुळे ते घाबरूनही जात. राग कमी झाला की ती मराठीच्या अंगणात अलगद उतरत असे. तेव्हा नातवंडाना हायसे वाटत असे. अर्थात असे प्रसंग वारंवार येत नसत. अन् आले तरी आफुआजी त्वरित सावध होऊन मराठीच्या अंगणात येई, हे वाढत्या वयात जानरावाने पाहून ठेवलेले होते. तिच्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात तिचे एकूण बोलणेच कमी झाले तेव्हा या भाषेच्या भानगडी निरर्थक झाल्या. आपल्या पहिल्या नातवंडाचे जानराव हे नाव दसरत सातपाटलाने मोठ्या हौसेने ठेवलेले होते. जानबाकाका नावाचा त्याचा कोणीतरी गुरू होता, त्याच्या आठवणीखातर. जानराव पाचसहा वर्षांचा झाला त्या सुमाराला दसरत सातपाटील याने शेतीभाती आणि एकूण प्रपंच यातून अंग काढून स्वतः ला फक्त गायी-म्हशी सांभाळणे या कार्यास वाहून घेतलेले होते. सकाळी सगळे आवरून देवघरात विठोबा-रखुमाईला हात जोडले की तो जनावरे सोडायला मोकळा होई. त्यांना घेऊन तो भवानीआईच्या माळाकडे जाई. पहिलेच नातवंड असल्याने जानराव त्याचा लाडका होता. किवा त्याचा सर्वाधिक लाड जानरावच्या वाट्याला आला, असे म्हणू. तो पाचेक वर्षांचा झाल्यापासून दसरत या आपल्या नातवाला सोबत नेऊ लागला. विशेष म्हणजे ते जानरावलाही आवडत असे. दसरत आपल्या गायी आणि म्हशींशी इतका तादात्म्य पावलेला होता की तो त्यांच्याशी त्यांच्या भाषेत बोलू शकत असे. ती शब्दांच्या अतीत असलेली भाषा होती. ही भाषा अगदी लहान वयात जानरावला सुद्धा अवगत झाली. नंतर घोडेस्वारी शिकताना आणि बाजीरावाच्या फौजेत भरती होऊन सहा महिने घोडेस्वार होऊन पळताना त्याला याचा फार उपयोग झाला. किंवा एकूण आयुष्यभरच ही विद्या त्याच्या कामास आली, असे म्हणणे अधिक उचित होईल. याच्या खेरीज आणखी पुष्कळ विद्या त्याला आपल्या आज्याकडून थेट प्राप्त झाल्या. केवळ धोतराचा वापर करून ओढ्यात मासे पकडणे, ते तिथल्या तिथे बाभळीच्या काटेरी फांद्यांच्या सरपणावर भाजून थोडेफार मीठ चोळून गरमागरम खाणे, घोरपडी धरणे आणि त्यांचीही तीच गत करणे, चिंचा, बोरे, शिंदाडे, कांगुन्या, जांभळे असा रानमेवा खाणे. जनावरे खाऊनपिऊन तरारली की दसरतआजा त्यांना म्हणायचा, 'आता बास झालं पोन्हीहो, आता जराशिक निवांत पडा सावलीला.' पोन्ही सहसा आज्ञाधारक. मग हे आजा अन् नातू सुद्धा लवंडायचे इथं तिथं. संध्याकाळी घरी परतले, जनावरे दावणीला बांधली की दसरत मोकळा. शेणकुरापासून दोहनापर्यंत सारी कामे सुना करत. जानराव मोठा होऊ लागला तशी आज्याने त्याची मोकळी संध्याकाळ सुद्धा कारणी लावायला सुरुवात केली. तो जानरावला घेऊन मारुतीच्या देवळाशेजारच्या तालमीत जाऊ लागला. सोबतीला बारकी आणखी नातवंडे असतच. त्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत चालली होती. तालमीत जोरबैठका, मल्लखांब, कासरा चढणे, वजने उचलणे, मुद्गल फिरवणे, हौदा खोदणे, कुस्तीच्या लढती अशा चालतच. पण शेजारी मैदानावर तलवारबाजी, दांडपट्टा खेळणे, काठी फिरवणे अशा मर्दानी गोष्टी सतत चालत. यात मुलखावेगळे काहीच नव्हते. मराठी मुलखात ते तेव्हा सर्रास होते. आपल्या नातवंडांनी ते पाहावे आणि जमेल तसे ते शिकावे असे दसरत सातपाटलास वाटत असे. त्यासाठी वेगळे काहीही त्याला करावे लागले नाही. पाण्यात राहून पोहायला शिकावे तशी पोरे शिकू लागली.

हे सगळे असे उत्तम चाललेले असताना एक अशी घटना घडली की हे संध्याकाळचे सत्र कायमचे बंद होऊन गेले. त्यावेळी जानराव सुमारे दहा वर्षे वयाचा म्हणजे पुष्कळच मोठा होता. तर घटना अशी घडली की जानराव याची आत्या भीमबाई दसरत सातपाटील आणि त्याची पत्नी आफुबाई यांची सगळ्यात धाकटी लेक ; म्हणजे यांचे शेंडेफळ अचानक गायब झाली. सातारा येथे बाजाराला म्हणून तिच्या थोरल्या भावासोबत म्हणजे जानराव याच्या बापासोबत गेली अन् तिथून गायब झाली. ती तरणीताठी लग्नाला आलेली लेक; वय वर्षे अकरा-बारा, अशी अचानक गायब झाली हे समजताच हलकल्लोळ मातला. ती पितृमुखी होती आणि एखाद्या परीसारखी देखणी होती. सगळ्यांनी आधी जानराव याच्या बापाला जबाबदार धरले. त्याने लक्ष ठेवायला नको होते का? तो म्हणाला, 'अहो माझ्या सोबतच होती. अचानक नाहीशी झाली. मी खूप शोधलं. नाही सापडली. गुम झाली. ती माझी बहीण, मला फार प्यार, माझ्या लेकीसारखी होती.' तो खुडूक होऊन रडत बसला. त्याने काय होणार? सगळीकडे शोध सुरू झाला. पळून गेली की कोणी पळवून नेली? बामणांना विचारलं तर म्हणाले, उत्तरपंथे गमनमार्ग दिसतो. म्हणजे काय समजायचे? उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम; सगळीकडे कसून शोध घेतला गेला. भीमबाई सापडली नाही. त्या रात्री आणि नंतरच्या अनेक रात्री आणि दिवसा आफुआजीने आकांत मांडला. तो केवळ असाधारण असा होता. तो सगळ्यांना हलवून टाकणारा होता. ती सगळ्यांना अनाकलनीय अशा त्या कोणत्यातरी भाषेत बडबडत रडत स्वतः च्या झिंज्या उपटून घेत राहिली. कोणालाच काही कळेना. म्हणजे भाषा कळेना. पण दुःख तर कळतच होते. तिचे लेकरू गायब झाले होते. दुःखाच्या त्या आवेगात ती दीर्घकाळ त्या अनाकलनीय भाषेच्या अरण्यात रडत स्वतः शी तंडत राहिली. तिची ती भाषा दसरतआजा यास काहीशी गम्य असावी, असे त्याच्या तिच्याशी त्याच भाषेत बोलण्याच्या दुबळ्या प्रयत्नांमधून इतरांना जाणवले. निदान त्यांचा तसा समज झाला. पण ती त्याला अजिबातही जुमानत नव्हती. तिने त्याच्या प्रयत्नांना, त्याच्या शब्दांना अजिबातही दाद दिली नाही. खूप शोध घेऊन, खूप खूप प्रयत्न करूनही भीमबाईचा तलास लागला नाही. परिणामी दसरतआजा आणि आफुआजी यांनी एकमेकांशी बोलणे टाकले. त्या दोघांनीही खरे तर साऱ्या दुनियेशीच बोलणे जवळपास टाकून दिले होते. आफुबाईच्या मनाची काठी मुळातच कडक. ती आणखी कडक झाली. अगदीच गरज असल्याखेरीज ती कोणाशीही बोलेनाशी झाली. त्यातही शब्दांचा वापर किमान. अन् दसरत- तिचा नवरा; त्याच्याशी तर तेही नाही, असा प्रकार झाला. दसरत प्रपंचातून आधीच वनाला प्रस्थान करता झालेला. आता तो संन्यासाच्या मार्गाने जगू लागला. सकाळी उठला, आवरले की गायी-म्हशी सोडून रानात जाणे, इतकेच काम. त्यांच्याशी दिवसभर तो जे काही बोलत असे तितकेच सहसा त्याचे इतरांशी संभाषण. तेही किमान पातळीवर आले असावे. कारण आधी पुष्कळ दिवस त्या गायी-म्हशी भांबावलेल्या दिसत. पण हळूहळू त्या मुक्या जनावरांनीही त्याची सवय करून घेतली. ह्या सगळ्या काळात, म्हणजे भीमबाई गायब होऊन गेली ते दसरत आणि आफुबाई गप्प झाले त्या आकांताच्या काळात काळीबाई फार घाबरून गेलेली, आतबाहेर विस्कटून गेलेली सगळ्यांनी पाहिली. पण त्याच काळात पुढे होऊन तिने सगळ्यांचे सगळे केले. आफुबाई, दसरत यांच्यापासून ते सारी लेकरे, सुना, नातवंडे यांची काळजी तिने

शांतपणे वाहिली. ती मूक बैलासारखी काम करत राहिली. तिने सगळे साहिले आणि सावरले. सगळ्या काळ्या आणि ढवळ्या घराची सगळी जबाबदारी तिने एखाद्या बैलासारखी वाहिली. जनावरे जशी मूकपणे आलेल्या परिस्थितीला सामोरी जातात तसे ते सारे कुटुंब त्या घटनेला सामोरे गेले. सगळे शांत, स्थिर होऊन गेल्यावर सगळ्यांचे सगळे नियमित सुरू झाले- आफुबाई आणि दसरतच्या गप्प होण्यासकट- त्यात ती एखाद्या मूढ खांबासारखी स्थिर राहिली आणि तिने घर सावरले. त्या सगळ्यानंतरही तिने आपली दुय्यम असण्याची भूमिका सोडली नाही. आफुबाईचे अव्वल स्थान तिने कायम राखले. नंतर आफुबाईच्या किमान शब्दांतल्या आज्ञा उचलण्याची हिंमतही तिने दाखवली. आणि सगळे स्थिर झाल्यावर नामानिराळी होऊन दुय्यम स्थानी कायम झाली. इतको को चार वर्षांनी गावातली भोसले मंडळी जानरावासाठी लग्नाचा प्रस्ताव घेऊन आली तेव्हा ती त्यांना म्हणाली, 'मोठ्या बाईंना विचारते आणि काय ते सांगते.' त्या लोकांनी काळीबाईला विचारले, कारण आणखी कोणाला ते विचारणार? दसरत प्रपंचाच्या गोष्टींच्या बाहेर गायीम्हशीत शिरलेला. आफुबाई मुख्य पण तिच्यापर्यंत पोहोचणे अशक्य झालेले. उरली काळीबाई. तिनेच सारे केले. आफुबाईला सांगितले, विचारले. होकार मिळताच पुढच्या गोष्टी तिनेच केल्या. भोसले आधीचेच सोयरे. किमान तीन सुना त्यांच्यातून आलेल्या. अन् आता हा नातसुनेसाठीचा प्रस्ताव. आफुबाईची मंजुरी घेऊन तिने तो स्वीकारला.

जानराव अनेक विद्या अवगत केलेला असला तरी कुस्ती लढणे ही त्याची आवड कायम राहिली. लग्नानंतर सुद्धा ती कायम राहिली.

तो जत्रांच्या हंगामात अनेक ठिकाणी कुस्ती करण्यासाठी जात असे. आणि त्याचा त्या क्षेत्रात चांगलाच लौकिक झालेला होता. तो त्याच्या आज्यासारखा उंच, सडपातळ आणि चपळ देखणा होता. त्याची भोसले कुलोत्पन्न अस्तुरी तितकी गोरी आणि देखणी नव्हती. पण त्याविषयी त्याची काहीही तक्रार नव्हती. जोडीदाराच्या संबंधात रंग, उंची, देखणेपण अशा गोष्टी निवडण्याचे स्वातंत्र्य त्याकाळी नसे. आणि ते नव्हते म्हणून तक्रारही नसे. वाडवडिलांनी दिले ते मनोभावे स्वीकारावे असा क्रम होता. म्हणूनच कुस्तीची आवड जोपासतानाही त्याला रखमाजी नावाचा मुलगा आणि झमबाई नावाची मुलगी सहजक्रम म्हणून होऊन गेली होती. त्याच्या या दोन्ही अपत्यांची नावे आफुआजी हिने ठेवली होती, हे विशेष. रखमाजी या नावाचा रखुमाईशी काहीही संबंध नव्हता. रखमान नावाचा कोणीतरी संत म्हणा किंवा कवी आफुआजीच्या मुलखात होऊन गेलेला होता; त्याच्या आठवणीसाठी ते नाव. पण त्या नावासाठी कोणतेही स्पष्टीकरण तिने कोणालाही दिलेले नव्हते. तसेच आबे झमझम म्हणजे मक्केचे पवित्र पाणी. हिंदुस्तानी लोकांना जसे गंगाजल सगळ्यात पवित्र तसेच ते मक्केचे पवित्र पाणी. म्हणून ती झमबाई. आपल्या पणतवंडांना ही नावे प्रदान करताना तिने कोणतेही स्पष्टीकरण कोणालाही दिलेले नव्हते. त्याची गरजही तिला वाटली नव्हती. काळीआजीने तिला विचारले तेव्हा ही नावे त्यांना मिळाली इतकेच. झमबाईच्या जन्मानंतर वर्षभरात दसरतआजा खपला. ते इतके सहज मऊपणे झाले की घरातल्या गायीम्हशींखेरीज कोणाच्या आधी ते लक्षात सुद्धा आले नाही. एका संध्याकाळी तो त्यांना घेऊन आला. त्यांना त्याने दावणीला बांधले. एकेक करीत

प्रत्येकीच्या कपाळावर आणि पाठीवर त्याने हात फिरवला. त्याचा तो स्पर्श होताच त्या गहिवरल्या. त्या स्पर्शात काहीतरी वेगळे त्यांना जाणवले. त्यांच्यातल्या थोरल्या बायांनी हंबर केला. ते बाकी कोणाच्या कुठून लक्षात येणार? पण मग तिथे, त्या गोठ्यातच दसरत त्यांच्या शेजारी लवंडला तेव्हा बाकी सगळ्यांना ते जाणवले. अन् सगळ्या गायीम्हशी एकसाथ हंबरल्या. त्यांचा तो स्वर ऐकून कधी नव्हे ती आफुबाई गोठ्यात गेली तेव्हा तिथे मरून पडलेला -दसरत सातपाटील तिचा नवरा तिला दिसला. ती एकदाच हात उंचावून आकाशाकडे नेत त्या गायीम्हशींसारखी हंबरली आणि ते हात खाली आणत खाली बसून तिने त्याचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले. आधी गायीम्हशी अन् नंतर आफुबाई यांच्या हंबराने तिथे असलेली तिची सवत, मुले, सुना, नातवंडे घवाघवा जमा झाली.

जानराव एकदा असाच करंजे किंवा सातारा यांच्यापासून जवळ असलेल्या माहुली नामक गावी कुस्ती लढण्यासाठी गेला होता. तेव्हा त्याचे वय तिशीच्या आसपास होते. हे त्या काळात पुष्कळच जास्त वय होते, असे मानण्याचा प्रघात होता. पण जानराव याची लढण्याची हौस कायम होती. त्याचा लौकिक मोठा होता. तो आखाड्यात उभा राहिला आणि त्याच्यासाठी जोड पुकारली की त्याच्यावर चालून येण्यासाठी जोड स्वीकारणारे पैलवान सत्रांदा विचार करीत, इतका त्याचा रौब होता. माहुलीची जत्रा मोठी. तिथला आखाडा मोठा. इनाम मोठे. त्या वर्षी त्या फडात बापू गोखले म्हणून एक; जे पेशवे दुसरे बाजीराव यांचे सेनापती होते, ते जातीने हजर होते. म्हणजे बाजीराव पेशवे खुद्द त्या समयी माहुली मुक्कामी होते, पण ते फडात उपस्थित नव्हते. शेवटच्या काही मोठ्या इनामाच्या कुस्त्या झाल्या, त्यात जानरावाची कुस्ती झाली. कोल्या हा जानरावाचा हमखास डाव. तो सगळ्यांना माहीत होता. त्याच्या त्या डावापासून सावध राहण्याचा त्याच्याशी लढणाऱ्यांचा आटोकाट प्रयत्न असे. तसा तिथेही त्याच्याशी लढणाऱ्याने केला. आणि नेहमीसारखीच हूल देऊन, समोरच्याला बेसावध पकडून जानरावाने त्याला कोल्यातच ओवले आणि क्षणार्धात अस्मान दाखवले. टाळ्यांच्या कडकडाटात कुस्ती झाली. फेटे लहरले. पुकारलेले इनाम मिळाले आणि बाकी बक्षिसेही पुष्कळ दिली गेली. त्यानंतर जानराव त्याच्या कमरेशी हात घालून लंगोटावरील जाग्या उर्फकाच्या उतरत असताना कोणीतरी त्याच्या कानाशी बोलला, पेशवे सरकार यांचे सरदार बापू गोखले इथे आलेले आहेत. त्यांना आपल्याशी बोलायचे आहे. फड आटोपल्यावर ज्यांच्याशी सेनापती गोखले यांना बोलायचे होते, किंवा ज्यांना तसे सांगण्यात आले होते, त्या सगळ्यांना एकत्र करण्यात आले. गोखले म्हणाले, आपणा सगळ्यांचा खेळ मी पाहिलेला आहे. आपणापैकी सगळेच कुस्ती जिंकलेले आहात, असे नाही. पण आपल्यामधली ताकद आणि लढण्याची वृत्ती मी जोखलेली आहे. श्रीमंत बाजीराव पेशवे स्वतःच्या खासगतीसाठी फौज उभी करत आहेत. तशी त्यांची फौज आहेच. पण आपणासारखे होनहार लोक तिच्यात सामील झाल्यास ती अधिक दमदार होईल. आपणास निमंत्रण देण्याचे काम त्यांचा सेनापती म्हणून त्यांनी माझ्यावर सोपविलेले आहे. तयारीसाठी खर्चास एक कोट रुपये श्रीमंतांनी माझ्याकडे सुपूर्त केलेले आहेत. ज्यांना यात यायचे असेल त्यांनी आपापले घोडे आणि हत्यारे घेऊन दोनतीन दिवसात याच ठिकाणी येऊन हजेरी द्यायची आहे. ज्यांच्याकडे ती नसतील, त्यांना ती पुरविण्यात येतील. त्यासाठीचे दाम अर्थातच नंतर त्यांच्या पगारातून

कापून घेतले जाईल.

सेनापती गोखले यांच्या या निवेदनानंतर सगळे पांगले. पांगताना त्यांनी एकमेकांशी चर्चा केल्या. जानराव करंजे येथे पोहोचला तेव्हा त्याने ही बातमी त्याच्या बापास दिली. त्याने ती काळीआजीच्या कानावर घातली. काळीआजीने खुबीने ती आफुआजीपर्यंत पोहोचवली. आता, फौजेत जाणे ही कोणत्याही जातीच्या मराठ्यासाठी अगदी सहज गोष्ट होती. तो त्यांचा धंदाच होता. शस्त्र चालविण्याचे शिक्षण हा त्यांच्या मोठे होतानाच्या खेळाचा भागच असे. खुद्द बाजीराव पेशवे यांच्या खाजगतीचा भाग होणे हा मोठाच सन्मानाचा प्रस्ताव होता. खर्चासाठी आधीच तरतूद केलेली होती. सगळेच आकर्षक. पेशवे हे स्वामी. तसे राज्याचे तोंडदेखले स्वामी तर जवळच सातारा येथे छत्रपती होते. पण ते केवळ नाममात्र तसे उरलेले होते, हे सर्वांना माहीत होते. पेशव्यांचे प्रतिनिधी सातारा येथे असत. ते जरुरीपुरते शिधासामान छत्रपतींच्या कुटुंबास पुरवीत. पण जरुरीपुरतेच फक्त. बारक्या बारक्या गोष्टींसाठी राजाघराण्यातील स्त्रियांना पेशवे यांच्या माणसांपुढे तोंड वेंगाडावे लागे. तसे करूनही ते मिळेच अशी खात्री नसे. खेरीज जरुरी भासेल तेव्हा छत्रपती आणि त्यांच्या कुटुंबास वासोटा किंवा तशाच एखाद्या किल्ल्यावर आदरपूर्वक बंदोबस्ताने ठेवले जाई. त्यांच्या खासगतीची फौज होती. पण ती किती असावी, तिला पगार किती द्यावा, तो कितपत वेळेवर द्यावा, याचे सारे निर्णय पेशवे करीत. छत्रपती जवळपास पेशवे यांचे कैदी असल्यासारखेच होते. अशा गोष्टी लोकांपासून लपून थोड्याच राहतात? त्यामुळे अगदी निकट असूनही छत्रपतींच्या फौजेत जाण्याचा विचार सहसा कोणीही करत नसे. जानराव यानेही तो केलेला नव्हता. किंवा आफुबाईने तो केलेला नव्हता असे म्हणू. कारण तिच्या संमतीशिवाय त्यांच्या घरातले पानही हलत नव्हते. वस्तुतः छत्रपती यांची कुळी भोसले. जानराव याची सासरवाडी भोसले यांचीच. पण म्हणून हे आणि ते भोसले एकमेकांचे कोणी होते असे नव्हे. छत्रपती यांचे मूळ घराणे वेरूळ येथील. बाबाजी भोसले हा त्यांचा मूळ पुरुष. त्या गावाचा पाटील. पण महाराष्ट्रात भोसले कुळीची कैक घराणी कैक ठिकाणी होती. करंजे येथील भोसले आपले घराणे पुण्याजवळ यमाईचे कवठे येथील असल्याचे सांगत. मात्र छत्रपतींची कुलदैवते; जी तुळजापूर येथील भवानीआई आणि शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेव ही होती, तीच या करंजे येथील भोसले मंडळींची होती. त्यामुळे फक्त कुळी एक एवढाच धागा त्यांच्यात होता. छत्रपती बलाढ्य असते तर कदाचित हेही त्यांना खेटले असते. पण तशी परिस्थिती नसल्याने इतके निकट असूनही धागा थंड होता. जंग करण्याचा मोका साधून दौलत कमाविण्यासाठी त्यांचा उपयोग नव्हता. याउलट पेशवे हे स्वामी. त्यांचीही हालत तितकी बरी नाहीय अशा बातम्या होत्या. ज्यांना अंग्रेजबहादूर म्हणातात ते गोरे लोक त्यांच्या वरचढ आहेत अशी बोलवा होती. तरीही जंग झाली तर काय फैसले होतात हे आधीच कोणाला सांगता येत असते का? अन् काहीही फैसला झाला तरी काय फरक पडतो? जंग लढताना कशी ना कशी दौलत करता आली म्हणजे झाले. हे सगळे विचार जानरावाचे. पण स्वतःच्या बाबत फैसला त्याला कुठे करता येत होता? अंतिम निर्णयाचा अधिकार त्याचाकडे नव्हताच. तो त्या बड्या बाईने, आफ आजीने केला पाहिजे ना! भीमबाई गायब झाल्यापासून सारे घर तिच्या शब्दाबाहेर जाणे टाळत होते. किंवा तिचा फैसला हाच नेहमी कारीगर असतो,

अशी सगळयांची श्रद्धा आणि अनुभव होता. जानरावाला जंगचा थोडा अनुभव आधी होता. तो सोंडूरच्या घोरपडे यांच्या फौजेत दोन वर्षे होता. जंगचे काही प्रसंग आले. पण दोन वर्षे तिथे राहूनही त्याला खास काही कमाई करता आली नव्हती. म्हणून आफुबाईने त्याला तिथून काढून घेतले होते. त्यासाठी त्याला कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नव्हते. आफुआजीचा हुकुम. बस्स. फैसला खतम. त्याला तिथून काढून घेताना तिने काहीही कारण दिलेले नव्हते. पण त्याला अंदाज आला होता. आता ती काय फैसला करते, हे जाणून घेण्यासाठी तो उत्सुक होता. उत्सुकता अनावर होऊन त्याने काळीआजीला पुन्हा विचारले तेव्हा ती म्हणाली, 'मला तर तिने सांगितलेच आहे. पण तू स्वतः भेटून विचार. ते केव्हाही अधिक चांगले आणि अंतिम. भित भित तो तिच्यासमोर उभा राहिला तर म्हणाली, जा. काळजी घे. वख्त खराब आहे.' तिच्या त्या परवानगीमुळे आणि ती आपल्याशी तीन वाक्ये बोलली या वास्तवानेच तो खूष झाला.

2

जानराव पुण्याला गेला. तिथे सेनापती बापू गोखले यांनी माणसांची अधिक खोलवर परीक्षा करून त्यांना वेगवेगळया कामासाठी नेमले. त्यात बाजीरावसाहेब यांच्या खासगतीत जानराव याची नेमणूक झाली. त्यामुळे तो फार खूष झाला. राज्याच्या प्रमुखाच्या खासगतीत म्हणजे मोठीच गोष्ट ना! पण लवकरच त्याच्या लक्षात आले की ते काही खरे नव्हते. स्वतःच्या जीवापल्याड श्रीमंतास काहीही प्रिय नव्हते. कोणत्याही परिस्थितीत कितीही आणि कशाचेही मोल देऊन आपला जीव बचावणे हेच त्यांचे इप्सित असे. पुण्यात खडकी येथे इंग्रजांबरोबर लढाई चालू असताना बाजीरावसाहेब पर्वतीवर आपला कुटुंब-कबिला घेऊन बंदोबस्तात तेथील खिडकीतून लढाई पाहत बसले होते! नंतरच्या येरवड्याच्या लढाईचे वेळी त्यांनी पुण्यातून पळ काढला. नंतर चपळाईने पळ काढण्याचा सिलसिला सारखा सुरू राहिला. सोबतच्या फौजेचे काम एकच. पळणे. त्यांच्यासोबत पळणे आणि त्यांचे रक्षण करणे. अगदी तीन तीन चार चार इंग्रज अधिकारी आपल्या फौजा घेऊन मागावर होते तरी त्या सर्वांना झुकांड्या देण्यात बाजीराव यशस्वी होत होता. नुसते पळण्याचे तंत्र अक्कलहुषारीने वापरून त्याने इंग्रज फौजांचा दम काढला होता. या पळात जानरावही श्रीमंतांसोबत पळत होता. तो पळून पळून अगदी टेकीला आला होता. कुठे तरी शत्रूची गाठ व्हावी, लढाई व्हावी आणि जो काय लागायचा असेल तो निकाल लागावा, असे इतर अनेकांप्रमाणे त्यालाही वाटत होते. बाकी मोठाली राजकारणे, कोणाची ताकद किती आणि कोण कोण, कुठे कुठे, कसे आहेत याचा त्याला कसा पत्ता असणार?

अॅडम्सला असे कळले की पिंपळकोटच्या नैऋत्येस दहा मैलांवर शिवनी येथे

बाजीरावाचा मुक्काम आहे. लगेच त्याने घोडेस्वारांसहित धावत जाऊन बाजीरावास गाठले. ॲडम्स आल्याबरोबर बाजीराव परत वळून पांढरकवड्याकडे जात असतां डोव्हटनच्या अंगावर आला. पांढरकवडा शिवनीच्या उत्तरेस बारा मैल आहे. पण डोव्हटन अंगावर येतो असें कळल्याबरोबर बाजीराव पुनः परत शिवनीकडे निघाला. त्यास ओळखून ॲडम्सने एकदम त्याजवर झडप घातली. तेव्हा शिवनी येथे लढाई होऊन बाजीरावाची अत्यंत वाताहत झाली, आणि तो पश्चिम बाजूस पळून उमरखेड येथे व तेथून पश्चिमेस बोरी येथे दाखल झाला. या ठिकाणाहून बहुतेक लोक पळास कंटाळून त्यास सोडून गेले.

या सोडून जाणाऱ्यात जानरावही होता. सोडणार नाही तर काय? अरे! शत्रू अंगावर येतो तेव्हा तुमची पहिली प्रतिक्रिया काय, तर पळून जाण्याची! मग तुमचे बाकीचे लोक तुमच्या पाठी पळणार हे सरळच. अन् पळणाऱ्यांची लांडगेतोड होणार हेही ओघानेच आले. तुम्ही राजे आहात. तुम्ही स्वतः लढू नका. पण ठासून फौजेत तर बसा. तुमचे रक्षण ही आमची जबाबदारी आहेच ना! अगदी इलाजच खुंटला तर पळावेही लागते. नाही असे नाही. पण तेव्हाही तुम्हाला सुरक्षित ते करता यावे यासाठी आम्ही आहोत ना! गेले इतके दिवस तेच करून थकलो. पण शत्रू थेट अंगावर आल्यावर सुद्धा पहिली प्रतिक्रिया फक्त पळण्याचीच! इतक्या पळपुट्या माणसासोबत राहण्यात काय मतलब? जानराव आणि त्याचे काही दोस्त तिथून फौज सोडून निघाले तेव्हा त्यांना दिसले की आपल्यासारखे आणखी पुष्कळ आहेत. त्यामुळे होता होईल तितके आणि तिथवर एकमेकांच्या सोबतीने जावे असा विचार झाला. ज्याला जसे सोयीचे असेल तसा त्याने जथा सोडावा. उरलेल्यांनी आपापल्या घोड्यांवर स्वार होऊन गोळयामेळयाने चालावे असा क्रम ठरला. जानरावाचे दोन जानी दोस्त होते. एकाचे नाव अल्लाबक्ष. नावावरूनच तो मुसलमान होता हे सरळ. ते वेगळे सांगण्याची गरज नाही. दुसऱ्या दोस्ताचे नाव कचरदास. एवढ्या नावावरून त्याची जात कळत नाही. तो महार जातीचा होता. फौजेत जात उरत नाही. प्रत्यही मृत्युच्या छायेत वावरणारे ते सगळे क्षत्रिय या एकाच जातीचे असतात. हे दोघे बाजीरावाच्या खासगतीत कुठून आले, हे आधी साहजिकच जानरावाला माहीत नव्हते. दोस्ती झाल्यावर कळले. त्या गोष्टी अर्थातच बिनमहत्त्वाच्या होत्या. ठिकठिकाणी आपली माणसे पाठवून बाजीरावाने हे लोक गोळा केले होते. त्यानुसार जानराव हा जसा माहुलीस सापडला तसेच अल्लाबक्ष आणि कचरदास हे अनुक्रमे व-हाड आणि जुन्नर परगण्यात बाजीरावाच्या लोकांना सापडले होते. पळपुट्या बाजीरावाने आपल्यासोबत पळण्यासाठी (!) माणसे अशी पारखून निवडली होती. कदाचित आधी त्याची इंग्रजांशी लढण्याची जोरदार इच्छा असेल. पण युद्धाला तोंड फुटल्यावर त्याच्यापासून पळण्याची भावना त्याला दिसली असेल. ते जे असेल ते असो, त्याच्या अखेरच्या पळाच्या त्या पाच महिन्यात समानधर्म म्हणून हे तिघे दोस्त झाले होते. शिवनी येथून माघारी फिरताना ते सोबत होते. आपापल्या घोड्यांवर स्वार होऊन पुसद, वाशीम मार्गाने ते मेहकरला पोहोचले तेव्हा अल्लाबक्ष म्हणाला, 'आता मी थांबतो. माझं गाव इथून जवळच आहे. आपल्या भेटी पुन्हा होण्याच्या शक्यता जवळपास नाहीतच. पण दोस्तीचा आणि एकमेकांच्या जीवाला जीव दिल्याच्या या दिवसांना विसरू नका मित्रांनो.' ते खरेच होते.

एकमेकांच्या ताटातली भाकर त्यांनी वाटून खाल्ली होती. भाले जमिनीत टोचून त्यांना घोडे बांधून त्यांच्याजवळ उघड्या आभाळाखाली ते अनेकदा झोपले होते. दोघे गाढ झोपेत असताना तिसरा नेहमी जागा राहील याची खबरदारी त्यांनी घेतली होती. दिसेल त्या ओढ्यात त्यांनी अंघोळी केलेल्या होत्या. वाटेत अनेक अवघड प्रसंगी एकमेकांना हात दिलेला होता. पळाच्या त्या सा?्या काळात ते एकमेकांचे दिलोजान दोस्त होऊन गेले होते. अल्लाबक्ष थांबला तेव्हा हे दोघेच उरले. ते जालना, औरंगाबाद मार्गे अहमदनगर भागात शिरले तेव्हा कचरू म्हणाला, जानबा, ह्यो आमचा मुलुक. पण इथं आमचं कायच उरल्यालं नायी.'

'का बरं? आसं का?'

मुलुख सगळा उजाड वाटत होता. गावं होती. पण बहुतेक सगळी उजाड. घरे होती. पण बहुतेक सगळी मोकळी. टाकून दिलेली. सगळीकडे नुसता सन्नाटा. अंगाला दाभणासारखा टोचणारा गारठा.

'भिलाटी रे! तिकडं लांभून भिल्ल लोकं टोळयांनी येत्यात आन लुटालूट करित्यात. मारझोड करित्यात. त्याला कटाळून लोकं गाव सोडून दुसरीकडं राहायला गेले.'

"आरं पन हानायचे धरून भिल. चांगला चोप धिल्याव हिंमत मोडली आस्ती त्यांची.'

'एवढी हिंमत नस्ती ना सेतकरी लोकात. आन ते भिल लई यंग्राट जात.

'आपल्यासारक्यांना भारी पडतेन का काय ते?' 'मस कोचीस केलेली हाये पेशवा सरकारनी. ते लोकं कसं काय जनू; कितीबी हानले तरी परत येत्यातच. त्याच्यानी लोकांनी मुलुकच सोडला. कवचित जागजागी हायेत मानसं थोडी थोडी असा तसा जीव धरून.'

त्या प्रदेशातून आणखी चालताना त्यांच्या लक्षात आले की त्यांच्यासारखे बरेच फौजी आहेत, आणि ते अंदाज घेत या प्रदेशात घिरट्या घातल्यासारखे हिंडत शोध घेत आहेत. मोकळी गावे, उघडी घरे, उजाड जमिनी. पण ठिकठिकाणी विहिरी होत्या, शेतीचे सरंजाम होते. कुंभारांचे आवे होते. सुतारनेट होती. चांभारांच्या घरात सांदलेल्या वहाणा जशा होत्या तशाच बांधलेल्या मोटाही पडलेल्या होत्या. हे फौजी गटागटाने रहिवसण्याच्या विचाराने हिंडत होते.

काय, हरकत काय आहे? जानरावाच्या मनात आलं, गावी आपलं घर आहे, शेती आहे, ही गोष्ट खरीच. तिच्यातली आपली आपल्या वाट्याला काही येईल हेही खरे. पण इथे आपण अधिक मोठी शेती अधिक जोमाने करू शकतो. आपण आपली नवी दुनिया उभी करू शकतो. करंजे इथे आपले गणगोत आहे. ते कुठे पळून जाते थोडेच? ते असेलच तिथे. हे फौजी तर सगळे आपल्यासारखेच लोक. उघड्या दुनियेत वावरलेले. एकमेकांना धरून राहण्याची विद्या आत्मसात केलेले. कोण ; आले ते भिल्ल समजा, तरी त्यांना मारू की चांगले धरून. ही चांगली नशीब काढण्याजोगी जागा आहे. हिंमत करायला काय हरकत आहे? त्याच्या मनात आले, ते त्याने कचरुला सांगितले आणि म्हणाला, या भागात तुझं गाव आहे म्हणलास, ते कुठंय? कचरू म्हणाला, माझं असं कोणतंच गाव उरलेलं नाही खरं तर. मी हा आमचा मुलुख जे म्हणालो, ते अशासाठी की माझे वाडवडील या भागातल्या एका गावात राहात होते, असं मी ऐकलेलं आहे. बाकी माझा जन्म सुद्धा आणखी वेगळ्याच गावात झालेला आहे. बाकी सगळ्या लोकांसारखे माझे वाडवडील सुद्धा इथून

पळून गेलेले आहेत. पण इथं साल्पी नावाचं एक गाव आहे. ते माझ्या पूर्वजांचं गाव आहे, असं मी ऐकलेलं आहे. जानराव म्हणाला, आपण त्या गावात जाऊ.

शिरूर-घोडनदीच्या उत्तरेला दहा मैलावर ते साल्पी नावाचं गाव त्यांना सापडलं. या भागातल्या बाकी अनेक गावांसारखंच गाव. पण जरा वेगळं. गावाला तीन वेशी होत्या. भिंतींचे तीन कोट होते. बाहेरचा जरा पडझड झालेला का होईना; कोट म्हणा वा गावकूस ठीकठाक होता. सगळ्यात बाहेरच्या कोटात पेठ असावी. गावाच्या मध्यभागी एक मोठा वाडा होता. इथल्या पाटलाचा असणार. त्याच्या आसपासही आणखी बुलंद वाडे होते. गावात देवळांची भरमार होती. पश्चिमेला उत्तर- दक्षिण वाहणारा ओढा होता. पण सगळं गावठाण निर्जन सुनसान होतं. कुत्री, मांजरंच काय, पाखरं सुद्धा दिसत नव्हती. रानात ती असतीलच. पण इथं नव्हती. हे गाव या भागातल्या इतर गावांसारखंच नुकतीच युद्धाची आपत्ती येऊन गेल्यासारखं निर्मनुष्य होतं. गावकुसाबाहेरून महारवाड्याच्या बाजूने जाताना एके ठिकाणी माणसाच्या खोकण्याचा स्वर त्यांच्या कानी पडला. ते खूष झाले आणि आवाजाच्या अनुरोधाने तिकडे गेले. एका घराच्या ओट्याशी एक म्हातारा खुरमुंडी घालून बसलेला होता. रामराम-सामसाम झाल्यावर म्हणाला, 'कोन गावचे पाव्हने म्हनायचे?'

'इथुल्लेच हावोत.' कचरू म्हणाला.

'इथुल्ले? ह्या गावात तर दोनच मानसं हातेत. योक गावकुसाच्या भायेर, त्यो मी. आन आतमंदी हातो त्यो पाटील. दोन्ही म्हतारे!'

मग कचरूने आपण कोण, कोणाचे कोण, काय करत होतो, इकडे कुठून कसे आलो हे म्हाताऱ्याला सांगितलं. आपल्यासोबत असलेला आपला दोस्त जानराव सातपाटील हा महाटा आहे, असं सांगितलं. तसा म्हातारा बसल्याजागी जोहार करण्यासाठी वाकू लागला, तेव्हा जानरावाने त्याला अडवलं. कचरू म्हणाला, 'या गावात वसती करायचा आमचा विचार आहे. तर कोणाला विचारायचं?' म्हातारा म्हणाला, 'तू तर माझ्या वेटाळातलाच आहेस. तुझा हक्कच आहे इथं राहायचा. अन् या तुझ्या दोस्ताची पण सोय करून टाकू आपण. पाटील आपल्या शब्दाबाहेर नाही. मीही या गावात थांबलो नसतो. पण पाटलाच्या म्हाताऱ्यापुढ माझा इलाजच चालत नाही. तो काही इथून हलायला तयार नाही. मग त्याला सोडून कसं जाता येईल आपल्याला? सगळे गेले. पण मी राहिलो. पाटलाच्या घरात सगळया गोष्टी भरपूर आहेत.पण त्याच्या अंगाचा ढिगल झालाय ना! मीच जातो आन त्याला खाऊपिऊ घालितो. अशा वक्ताला जातपात, शिवाशिव; काहीही उरत नाही.'

म्हाताऱ्याचे नाव सटवाजी. सटवाजी वाघुले. कचरू त्याच्या वेटाळातला. म्हणजे भावकीतला. म्हातारा त्या दोघांना घेऊन पाटलाकडे गेला. पाटील म्हणाला, व्हावा की. हे सटव्या समदं दाखवून देतंय तुम्हाला. त्यो तुम्हाला घेऊन आला, याच्यातच समदं आलं. पाटील म्हणाला, तुमच्यासारखे हिंमतबाज लोक इथे आले, रहिवसले तर त्याच्यामुळे आणखी लोक येतील. गाव नांदतं होईल. गाव नांदलं पाहिजे. नंतर सटवा आज्याने त्यांना सारे गाव पुन्हा हिंडून दाखवले. पाटलाच्या वाड्याच्या डाव्या अंगाला जे वाडे होते, ते ब्राह्मण जमीनदारांचे होते. बाकी सोनार, सुतार, कुंभार, चांभार, माळी, कोळी, कोष्टी

अशा सगळ्या जातींची घरे. सध्या सगळी अर्थातच मोकळी. आणि मागच्या बाजूला कोटाला लागून एक मोकळा वाडा होता, तो जानरावला दाखवून तो म्हणाला, इथं व्हावा तुमी बिनधास. बायकू-पोन्हं घेऊन या खुशाल. ह्या वाड्याच्या मालकाचा वसबूड झाल्याला हाये. सुबेदार नाव व्हतं त्याह्याचं. आशेच इकडं तिकडं गेले आन मेले समदे. आन रानाचा पट्टा सुदिक दाखितो मी तुमाला. दणकून सेती हानायची. तुमी रहिवसले का आनखी लोक येत्यातच ; मी सांगतो तुमाला.'

'आनि कचरू?'

'त्याचं काय? त्यो मपल्या येटाळातला. मपल्या संगती व्हाईन. आन त्याला दाखितो ना घर त्याचं. बाकी हाडकी-हाडावळ्याचं वतन हायेच आमचं.'

हळूहळू लोक यायला लागले. काही फौजी, काही आधीचे रहिवासी. शेतीच्या चाहतीने येणारे कुणबी जास्त. आणि बाकी बलुतेदार आधीचे आणि बाकीचे. बलुतेदारात फौजी अजिबात नव्हते असे नव्हे. फौजीला जात नसते. पण गावगाड्यात आले की जात सांभाळावी लागते. एक बामण फौजी आला. केरोजी शौचे. तो अक्षरओळख असलेला होता. पाटील म्हणला, 'तू कुलकर्णी हो. ह्या गावाचा आधीचा कुलकर्णी खपलेला आहे. बाकी बामण इथे तिथे असतील. पण ते सगळे जमीनदार. तुला वतन पाहिजे?' केरोजी म्हणाला, 'मी तालुक्याला जातो आणि तिथे दस्तऐवज पाहतो.' केरोजी फौजी होताच, खेरीज उत्तम तैलबुद्धी असलेला होता. पारनेर या तालुक्याच्या गावी असलेल्या बामण नायब तहसीलदाराशी जातीचे गोड नाते प्रस्थापित करून त्याने सगळे समजावून घेतले. स्वतःचे कुलकर्णीपण कायदेशीरपणे मंजूर करून घेतले. कुलकर्णीपणाचे वतन कोणते आणि कुठे आहे याची माहिती सटवाजी याजकडून जाणून घेऊन खातरजमा करून घेतली. आधीचा कुलकर्णी खपलेला असल्याने आपल्याला फार अडचण येईल असे सहसा होणार नाही याचा होरा बांधला. बाकी गावात कोणत्या जमिनींचे मालक कोण आणि त्यातले कोण कुठे आहेत याची उत्तम माहिती घेतली. ती वतनदार महाराइतकी खात्रीची कोणासही नसते, हे केरोबा यांस अनुभवाने ज्ञात होते. शिवारातल्या जमिनी आणि त्यांच्या हद्दी यांच्याबाबत तंट्याचा प्रश्न आल्यास महाराची साक्ष अंतिम मानली जाते, हे पारंपरिक ज्ञान त्यांस उत्तम होते. नवे लोक येतील, त्या कोणाला कसे सामावून घ्यायचे, कोणाला नाकारायचे याचा हिशेब केरोजी याने मनाशी ठरवला. हे सगळे आपण ठरवू तसेच होईल असे नव्हे. पण गरज पडेल तशी आणि तेव्हा तैलबुद्धी वापरायची असा संकल्प त्याने केला. मग एके दिवशी अचानक फतवा आला की, त्या त्या गावातील कुलकर्णी आणि पाटील यांनी अमुकअमुक तारखेला अहमदनगर येथे कलेक्टर हुजूर पोर्तिंजरसाहेब बहादूर; यांचे चरणी रुजुवात करायची आहे.

अहमदनगर जिल्ह्याच्या गॅझेटियर मधील काही नोंदी: १८०२ मध्ये होळकरांच्या सैन्याने नगर जिल्हा बेचिराख करून टाकला होता. १८०३-०४ या वर्षांत भयंकर दुष्काळ पडला. लोक घरेदारे सोडून गेले. गावे ओस पडली. काही लोक मोठ्या गावांमधल्या किल्ल्यांमध्ये आश्रयाला जात. अहमदनगरच्या किल्ल्याभोवती खंदक खोदण्याच्या कामाला जनरल वेलस्ली याने यावेळी सुमारे ५००० पेक्षा जास्त मजूर लावलेले होते. भिल्ल व तत्सम रानटी लोक मैदानी भागात येऊन अतोनात लूट व क्रूर कृत्ये करीत.

पेंढाऱ्यांचे हल्लेही वाढले होते. भिल्लांच्या बंदोबस्तासाठी आधी दुसऱ्या बाजीरावाने खानदेशाचा सुभेदार बाळाजी लक्ष्मण याची योजना केली होती. मनोहरगीर गोसावी या आपल्या माणसामार्फत त्याने असंख्य भिल्लांना कोपरगाव येथे गोदावरीकाठी बोलावले व निघृणपणे त्यांची हत्या करून त्यांची प्रेते विहिरीमध्ये टाकली. त्यामुळे काही काळ बंदोबस्त झाला. पुन्हा १८०६ मध्ये तशीच बेशिस्त आणि गोंधळ चालू राहिला. त्रिंबकजी डेंगळे याने शेवगाव तालुक्यातील घेवडी चांदगाव येथे पुन्हा एकदा असाच भिल्लांच्या सामुदायिक हत्येचा कार्यक्रम घडवून आणला. त्यासाठी त्याने नारोबा पाटील नामक इसमाची योजना केली. पाच ते सहा हजार घोडी व बरेच मोठे पायदळ त्याच्या दिमतीला देण्यात आले होते. दिसतील ते भिल्ल आणि तत्सम यांची नारोबाने सर्रास कत्तल उडवली. पंधरा महिन्यात सुमारे पंधरा हजार माणसे कापली गेली, असे म्हणतात. अहमदनगरच्या दक्षिणेकडचा काही सुपीक पट्टा सोडता बाकी सारीकडे निर्जन गावे सुमारे १८१८ पर्यंत होती. १८१८ साली पेशव्याच्या फौजेचा सेवनी येथे पराभव झाला. तेव्हा पेशव्यांच्या फौजेतील अनेक पराभूत घोडेस्वार योद्धे अहमदनगर जिल्ह्यातल्या निर्जन मुलखात येऊन वसती करू लागले. ही गोष्ट त्यावेळचा अहमदनगर येथील कलेक्टर लेफ्टनंट हेनरी पॉटिंजर म्हणून जो होता, त्याने तेव्हाचा दख्खनचा कमिशनर एल्फिन्स्टन याला कळवली. आणि सूचना मागवल्या. त्यावर एल्फिन्स्टन याने त्यास कळवले की, पॉटिंजर याने अशा लोकांना उत्तेजन द्यावे व चांगली वागणूक द्यावी. त्याप्रमाणे पॉटिंजर याने व्यवस्था केली. पॉटिजर हा एल्फिन्स्टन याचा

मित्र आणि त्याच्या विश्वासातला होता. तो १८२५ पर्यंत कलेक्टर होता.

१९ ऑगस्ट १८२१ : अहमदनगरच्या जेलमधील कैद्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर हल्ला करून त्यांची हत्यारे हस्तगत केली. काही कैदी पळून गेले. बाकीच्यांनी किल्ला बंद करून फौज येईपर्यंत तो लढवला. फौजेने केलेल्या हल्ल्यात २९ कैदी मारले गेले. ६२ जखमी झाले. नंतर शांतता प्रस्थापित झाली.

१९ ऑगस्ट १८२२ : सांगलीचे संस्थानिक चिंतामणराव पटवर्धन यांचा सेवक नरसिंगराव याच्या जबानीवरून शिबंदी जमा करण्याचा एक कट उघडकीस आला. ही शिबंदी शिंदे यांची गावे - बेलापूर, सोनई, ब्राह्मणी, जामगाव आणि नंदुरबार (खानदेश) येथे जमविण्यात येणार होती. जी नंतर लासूर येथे एकत्र येणार होती. खेरीज हिंदुस्तानच्या अनेक भागात आणखी कुमक गोळा केली जाणार होती.ती घेऊन ब्रिटीश ठाण्यांवर हल्ले करण्याची त्यांची योजना होती.

अशाच आणखी पुष्कळ नोंदी रामजी भांगरे, गोविंदराव खाडी, राघोजी भांगरे, भागोजी नाईक या अकोले तालुक्यातील कोळी योद्ध्यांसंबंधी आहेत. १८७५ मध्ये पारनेर, कर्जत, श्रीगोंदे आणि नगर भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी झुंडीने सावकारांवर हल्ले केल्याच्या २२ घटना घडल्या. त्यावेळी त्या भागातील ब्राह्मण कुलकर्णी यांनी ब्रिटिशांना सल्ला दिला होता की या बंडखोर शेतकऱ्यांवर सैन्य पाठविण्यापेक्षा त्यांच्या मागण्यांकडे, त्यांच्या हालअपेष्टा संपविण्याकडे ब्रिटिशांनी लक्ष द्यावे.

केरोजी शौचे-कुलकर्णी यांनी फतव्याचे वर्तमान पाटलांचे कानावर घातले. पाटील

म्हणाले, 'मी पार डंगर झालोय. माझ्या अंगाचा ढिगोल झालाय. मला यायची गरज पडणार नाही अशी काय युगत नाही का करता येणार?' शौचे यांना वाटले, असे कसे चालेल? पाटील हे इथले घरंदाज वतनदार. त्यांनी न जाऊन कसे चालेल? पाटील निक्षून म्हणाले, 'तुला कुलकर्णी काय झ्याट मोजायला क्येला का काय म्या?' त्यावर नासिकेतील केस जळण्याची भावना होऊन केरोबा म्हणाले, 'मी तोड काढतो.' आणि नगास नग म्हणून ते जानराव सातपाटील यास सोबत घेऊन गेले. तीस बत्तीस वर्षे उमर असलेला एक मध्यमवयीन भारदस्त इसम आणि फौजी हा निवडीचा खासगी निकष त्यांनी त्यासाठी ठेवला होता. आणि अहमदनगर येथे केरोजी शौचे-कुलकर्णी यांस काहीही अडचण आली नाही. नगास नग कामी आला. पाटील हे अंगठेबहाद्दर असतात आणि त्यांना दस्तऐवज वगैरे गोष्टींचे ज्ञान फारसे नसते, किंवा अजिबातही नसते हे सारीकडे गृहीत होते. पण पाटलांना सांभाळून घ्यायचे असते. गावातील लोकांचा त्यांच्यावरच भरोसा असतो, हे अंग्रेजबहादूर यांना आणि कुलकर्णपण करणाऱ्या बामणांना चांगलेच माहीत होते. एक पाटील सांभाळला की सारे गाव सांभाळता येते आणि कोणाच्या डोळ्यावर न येता स्वतःचा उत्कर्ष साधता येतो हे पिढ्यापिढ्यांचे अनुभवसिद्ध सत्य केरोजी आणि बाकी कुलकर्णी अर्थातच

जाणून होते.

अहमदनगर येथे मेहेरबान अंग्रेज कलेक्टरसाहेब बहाद्दूर, पोतिंजरसाहेब हुजूर ; यांनी दस्तूरखुद्द सगळ्यांना हुकुम फर्मावला. ते अंग्रेजीत बोलत असताना त्याचा देशी तर्जुमा करण्यासाठी एक आंग्लविद्याकोविद ब्राह्मण यांशी नेमिले होते. ते तो उत्तमच करत असावेत. तरीही एकदोनदा त्यांचा तर्जुमा चुकला आहे, असे वाटून मेहेरबान पोतिंजरसाहेब बहादूर यांनी दुरुस्त देशी तर्जुमा खुद फर्मावला होता. ते ऐकताना साऱ्या कुलकणी लोकांची आश्चर्याने तोंडात बोटे गेली होती. आणखी काही तरुण आणि दुय्यम अंग्रेजबहाद्दूर तेथे उपस्थित होते. त्यांना चुकांचे बारकावे कदाचित नीट कळले नसतील सुद्धा. पण अंदाज येऊन त्यांच्यातही स्मित हास्यांच्या लकेरी उमटल्या होत्या. कलेक्टरसाहेब बहादूर यांनी फर्मावले की, 'हा आपला मुलुख आज अनेक घटनांमुळे उजाड झालेला आहे, हे आपण जाणता. इथे गेल्या काही दिवसांपासून अनेक फौजी लोक रहिवासासाठी येत असल्याचे वर्तमानही आपणांस विदित आहे. त्यांचे काय करायचे, यासंबंधी मी दख्खनचे कमिशनर मेहेरबान हुजूर अल्पिष्टणसाहेब बहादूर यांना अर्जी केली होती. त्यांचा हुकूम आला आहे की, आपण या लोकांना आपल्या या उजाड मुलखात सामावून घ्यायचे आहे. त्यांना योग्य त्या सोयी आणि सवलती द्यायच्या आहेत. गरज असेल तेथे शेतीचा सरंजाम सुद्धा द्यायचा आहे. त्यांनी उत्पन्न काढले की त्यातून आपली गुंतवणूक काढून घ्यायची आहे. पण हा फार पुढचा प्रश्न. मुख्य म्हणजे, ते लोक शेती पिकवतील आणि हा मुलुख पुन्हा नेटाने नांदू लागेल अशी आमची भूमिका आहे. हे मोठेच जिकिरीचे आणि अनेकदा बखेडे उपस्थित करणारे काम असेल, हे आपण ; पाटील आणि कुलकर्णी मंडळी जाणता. विशेष करून गावे नांदू लागली की आधीचे रहिवासी परत येऊन आपल्या वतनांवर हक्क सांगू लागतील. तेव्हा उपस्थित होणारे प्रश्न शक्यतो स्थानिक पातळीवर आपण मिटवायचे आहेत. जुने दस्त पाहून नव्या वसाहतीच्या उजेडात

समझोता करून देणे ही आपली जबाबदारी राहील. तशा आपल्या प्रयत्नांच्या पल्याड जावून जेव्हा काही लोक आमच्याकडे येतील तेव्हा आम्ही त्यांचा योग्य तो फैसला करूच. पण तशी पाळीच येऊ नये याची खबरदारी पाटील आणि कुलकर्णी यांनी घ्यायची आहे. गावचे मुख्य वतनदार दोन. पाटील आणि महार. समझोत्याचे काम पाटलांनी करावयाचे आहे. तंटे खास करून जमिनीच्या मालकीवरून उपस्थित होतील. अशा तंट्याबाबत महाराची साक्ष अंतिम मानण्याचा इथला रिवाज आहे. तो आपल्याला तसाच चालवायचा आहे. अशा नाजूक गोष्टी पाटील आणि महार यांच्या मदतीने हाताळण्याची जबाबदारी मुख्यतः कुलकर्णी लोकांची आहे. ते त्यांनी समझदारीने आणि पाटलांच्या सल्ल्याबरहुकूम करावयाचे आहे. पाटील अशिक्षित असला तरी तो गावाचा प्रमुख आहे आणि त्याचे म्हणणे गावकरी मानतात, याचे भान कुलकर्णी यांनी बाळगायचे आहे. ही कसरत चांगली जमण्यात आपले कुलकर्ण आहे, हे त्यांनी लक्षात घ्यावे.'

जे साल्पीमध्ये सुरू झाले, ते त्या प्रदेशातल्या इतर गावांसारखेच होते. लोक येऊ लागले आणि येत राहिले. काही फौजी, काही आधीचे रहिवासी. केरोजी शौचे-कुलकर्णी हे पाटील आणि सटवाजी वाघुले; यांचा सहारा घेऊन तैलबुद्धीने सगळे हाताळत होते. दरम्यान केरोजी यांनी आपले उपनाम शौचे हे टाकून दिले. त्या ऐवजी कुलकर्णी हेच फक्त ठेवले. कारण आपल्या या पारंपरिक आडनावाचा संबंध शौचाविधीशी म्हणजे हगण्याशी येतो, या जाणिवेने त्यांना कायम छळले होते. हे असे घाणेरडे आडनाव ब्राह्मण कुळीत जन्माला येऊनही आपल्या वाट्याला यावे, याचे फार वैष्यम्य त्यांना वाटत असे. खरे तर शुच पासून शौच. शुच म्हणजे पवित्र. शुच पासूनच ना शुचिता! म्हणजे पावित्र्य. शौचाविधी म्हणजे पवित्र होण्याचा विधी. अमंगळ गोष्टी बाहेर टाकण्याचा विधी. तरीही देशी भाषेत याचा अर्थ होतो, हगण्याचा विधी. हगरे असे आडनाव कोणाला आवडणार? शौचे आडनाव असणाऱ्या लोकांचा

स्वतःला कुलकर्णी करण्याचा हा सिलसिला विसाव्या शतकाच्या अंतापर्यंत आणि नंतरही चालू राहणार होता, तो याच भ्रष्ट समजामुळे. भले कुलकर्णपण असो वा नसो, शौचे पेक्षा कुलकर्णी उत्तम, अशा धारणा नेहमीच प्रबळ राहिल्या. त्या आजही आहेत. त्याची सुरुवात कदाचित केरोजी यांच्यापासून झाली असेल. त्या अर्थाने त्यांना एका नव्या परंपरेचे आद्यजनक सुद्धा म्हणता येईल. त्यांचे पहिले नाव सुद्धा केरोजी पासून केरबा, केरोभट अशी बारकी वळणे घेत केरोपंत या नावाशी अंततः स्थिर झाले. केरोपंत हे साल्पी नामक गावचे कुलकर्णी. केरोपंत कुलकर्णी.तरीही त्यांच्या पुढच्या पिढ्यांना शौचे या नावापासून फारकत घेता आली नाही हे विशेष. तो समजा पुढचा भाग. तैलबुद्धी असलेले होते म्हणून केरोपंत हे लबाड इसम होते असे नव्हे. जगण्यात स्वार्थ कोणाला चुकलाय? आपण सगळेच तसे असतो. त्यासाठी प्रसंगी लबाडीही आपण सारेच करतो. ती काहींची माफक असते तर काहींची आटोकाट. केरोपंत हे माफक लबाडी करून स्वार्थ साधत, भूमिका घ्यायची वेळ आली की विशाल होऊ शकत, हे आपणास नंतर लक्षात येईलच. याचे कारण त्यांची फौजी पार्श्वभूमी. जातीअंतासाठी आपल्या सगळ्या लोकांनी फौजेत गेले पाहिजे. पण ही सगळी आजची गोष्ट झाली. तूर्तास पुन्हा त्या अव्वल इंग्रजी आमदानीत. आणि गाव-खेड्यात.

फौजी येऊ लागले. कुणबी कुणब्यात, माळी माळयात, साळी साळयात, कोष्टी कोष्ट्यात असे लोहार, सुतार, कुंभार, चांभार, महार, मांग, सोनार, शिंपी, न्हावी, परीट अशा सगळ्या जातीत होऊ लागले. ते सारे फौजी आणि बिनफौजी लोक होते. गाव आहे तर जात आहे अन् तिला तिचा

तिचा वेटाळ आहे, अशी भावना सार्वत्रिक होती.

हळूहळू लोक आपापली कुटुंबे आणू लागले. पाटलांच्या घरातले लोक मुलाबाळांसकट हजर झाले. अनेक फौजींनी आपापली मुलेबाळे आणली. सटवाआज्याचे कुटुंब आले. कचरू आपली बायको मुले घेऊन आला. मुलाबाळांच्या वावरामुळे गावातली गजबज वाढली. गोठ्यात गायीम्हशी दिसू लागल्या. शेळयामेंढ्या, कोंबड्या, कुत्री; त्यांचे आवाज वेळीअवेळी होऊ लागले. त्यांचे हालहवाल पुसण्यासाठी पक्षीही येऊ लागले. त्या भागातील इतर अनेक गावांसारखे साल्पी या गावचे गावपण निनादू लागले. जानरावाने अजूनही कुटुंब आणलेले नव्हते. एकतर ते त्याच्या हातात नव्हते. आफुआजीची परवानगी त्यासाठी आवश्यक होती. मुळात साल्पीला स्थिर व्हायचा निर्णयही तिची परवानगी घेऊनच करावा लागणार होता. ते जरा मुश्कील काम होते. काळीआजीच्या मदतीने ते करता येईल अशी आशा मात्र होती. त्यामुळे मनाने जानराव अजूनही साल्पीत पुरता रुजलेला नव्हता. पाटलाचा मुलगा गणोजी नामे होता. तो जानरावाच्या शीणेचा होता. एखादे वर्ष इकडेतिकडे. त्यालाही दोन मुले होती. पाटलाचे आडनाव खोपडे. ते स्वतःला उंच कुळीचे मानत. पुण्याजवळ जेधे, बांदल, खोपडे, कोंडे, कोंढाळकर, पासलकर अशी जी देशमुख मंडळी होती, त्यांच्यातल्या खोपडे यांच्यापैकी आम्ही आहोत असे ते सांगत. एके काळी हे लोक छत्रपती शिवाजी राजाला सुद्धा जुमानत नव्हते असे ते म्हणत. हे सारे गणोजी खोपडे याच्याकडून जानराव यास ज्ञात झाले. म्हाताऱ्या पाटलात असली गुर्मी नव्हती. अर्थात गणोजी याच्या स्वभावात सुद्धा ती नसेलही कदाचित. आपले मोठेपण प्रस्थापित करण्यासाठी आणखी काही साधन नसते, तेव्हा माणसे हाताशी येईल ते वापरतात, अशातलाच तो प्रकार असेल. म्हाताऱ्या पाटलास तशी गरज भासली नसेल. गणोजी यास ती भासत असेल इतकेच. तालुक्यास आणि जिल्ह्यास जाण्याच्या गरजा कुलकर्णी यास भासत. प्रत्येक वेळी नसले तरी निदान काही वेळा तरी पाटलास तिकडे घेऊन जाणे आवश्यक होई. गणोजी आल्यानंतर तशी गरज भासली तेव्हा केरोपंत म्हाताऱ्या पाटलांच्या भेटीला गेले. दबकत म्हणाले, की असं असं.

'त्यो पोऱ्या नायी म्हनतो काय?' पाटलांनी विचारलं. 'नाही, तसं नाही. पण आता गणोजीराव आहेत तर-' 'म्या तुला काय इचारलं?' पाटलांचा स्वर करडा. 'ते येतील. पण पाटीलकी तुमची असताना-' केरोपंत टरकलेला. 'त्यालाच घेऊन जा. पाटीलकी काय पळून जाती व्हय?'

यातून केरोपंत यांस बोध झाला की पाटील यांचे आपल्या पोराविषयी तितकेसे बरे मत नाही. आणि जानराव याच्याविषयी पाटलांच्या मनात मऊ कोपरा तयार झालाय. त्यानंतर गरज पडेल तेव्हा त्याला घेऊन जाण्याचा शिरस्ता केरोपंत यांनी ठेवला.

एके दिवशी कचरू जानराव याजकडे आला. आताशा भेटी कमी झाल्या होत्या. कारण गावगाडा. त्यात जाती. आणि ज्याने त्याने आपली पायरी सांभाळून राहणे. त्याला इलाज

नव्हता. कचरू आला

आणि ओट्याच्या खाली पायऱ्यांच्या तळाशी उभा राहिला. त्यालाही इलाज नव्हता.

'मी काय म्हनतो, सातपाटीलभौ-'

हे त्यातल्या त्यात बरे संबोधन कचरूने पैदा केले होते. एके काळी; म्हणजे फार जुन्या काळी नव्हे ; हाच कचरू त्याला जानबा या नावाने पुकारत होता. आता गावकीत ते शक्य नव्हते. ते दोघांनाही कळत होते.

'काय म्हणतोस; बोल.' 'मी तुमच्याकडं घरमहार झालो तर काय हरकत हाये?' 'का?'

'आणखी कोनाला जोहार मायबाप करन्यापरीस तुम्हाला करीन.

समदी कामं करीन.'

जानरावच्या काळजात तुटलं. ते तुटलेपण दाखवण्यात अर्थ नव्हता.

अतराला इलाज नव्हता. ते उल्लंघता येणार नव्हतं.

'नको कचरू. तुला काय सांगायचंय ते पोहोचलं. आपण रस्ता काढू.

मी तो काढतो.'

जानराव म्हाताऱ्या पाटलांना भेटला. म्हणाला, "सटवाआजा आता म्हातारा झाला. त्याचा पोर आला आहे. तो तुमच्याकडे तुमच्या घरासाठी काम करीलच. पण त्याच्याजागी तुम्ही कचरुला घ्या. तो माझा फौजेतला जोडीदार. चांगला आहे. सगळे नीट करील. सटवाआज्याच्या पोराला माझ्याकडे असुद्या.' म्हातारे पाटील अनुभवी, समझदार होते. त्यांच्या सहज लक्षात आले. म्हणाले, "लय वानकी बात पोरा. करून टाखू. मी जित्ता हाये तव्हर कायच प्रस्न नायी. आन मोहं धर लागतीच आपाप.' अशी अदलाबदली होऊन कचरू पाटलांकडे आणि सटवाआज्याचा लेक जयरू जानरावकडे असा फैसला झाला.

केरोपंत यांनी सगळ्या पातळयांवर चांगलाच जम बसविला. म्हाताऱ्या पाटलांचे मन धरून गावात आणि बाकी तालुक्यात नायब तहसीलदार, तहसीलदार हे त्यांचे जातभाई; त्यांच्याशी उत्तम संधान बांधून त्यांच्यातही जमविले. वागणूक लवचिक आणि गरज असेल तिथे नम्र, आणि नसेल तिथे जरबदार. वरचे अधिकारी आणि पाटील यांच्याशी नम्र. कुणबी आणि बाकी सारे गावकरी यांच्याशी अधिकाराची जाणीव देत जरबदार. अशा गोष्टी कराव्याच लागतात. गावगाडा नीट चालायचा असेल तर ते पाहिजेच. जानराव सातपाटील यांच्याशी अधिक नम्रपणे वागले पाहिजे याची यशाला समज त्यांना एका वेगळ्याच घटनेने आली: झाले असे की, असेच कोणत्या तरी कामासाठी त्यांना जिल्ह्यास अहमदनगर येथे जावे लागले. पाटलांना घेऊन यायचे फर्मान होते म्हणून जानराव सातपाटील सोबत होते. तिथे कलेक्टरहुजूर साहेबबहाद्दूर पोर्तिंजरसाहेब ; यांनी जातीने हजर राहून सगळे अहवाल ऐकले. गरज असेल तिथे आवश्यक ते हुकूम जातीने दिले. त्यांची तामिली, अंमलबजावणी यांच्या मुदती सांगितल्या. त्या वेळी बाकी अंग्रेज अंमलदारही हजर होते. कामकाज संपताना एक पोलीस अधिकारी क्याप्टन इस्टूर लेसिंग साहेबबहादूर; हे केरोपंत कुलकर्णी यांजपाशी येऊन विचारते झाले, 'तुमचे पाटलाचा नाव काय?'

केरोपंत हे एरवी फाकडे. पण लेसिंगसाहेब बहाद्दूर यांना समोर पाहताना आणि त्यांच्या प्रश्नाचा रोख न उमजून त्यांची बोबडी वळली. आपण गावचा पाटील नसलेल्या

माणसाला पाटील म्हणून सोबत घेऊन आलो आहोत, हे साहेबबहादूर यांच्या लक्षात आलेय की काय या विचाराने ते हवालदिल झाले. ते कोणते नाव सांगायचे याचा मनाशी खल करू लागले. हाताशी वेळ कमी होता. तितक्यात साहेबबहादूर यांचा पुढचा अधिक नेमका आणि थेट सवाल पुढे ठाकला.

'यांचा नाव जॅनराव सॅटपॅटिल हाये काय?'

अरे बापरे! यांना तर नाव देखील माहीत आहे. खोटे बोलायला

जागाच नाहीय. ती जोखीम घेण्यात आता अर्थ उरलेला नाहीय.

'होय साहेबबहादूर', केरोपंत पटापट झुकून लटपटीत स्वरात म्हणाले. मनात विचार असा की प्राक्तनात असेल ते होईल. आता आपल्या हाती काहीच नाहीय.

'टेल हिम आय नीड टू टॉक टू हिम इन प्रायव्हसी. माजा त्याच्यासोबत काम हाय. कॅन ही स्पेअर सम टाईम? मला त्येला माज्या गरी नेयाचा हाये.

विल ही ॲंग्री? टेल हिम, आय रिक्वेस्ट फॉर अ बिट ऑफ हिज टाईम.'

आशय केरोपंतांच्या लक्षात आला. तो शेजारी असलेल्या जानराव याच्या सुद्धा लक्षात आला. साहेब थेट मराठीतच बोलत होता. पण साहेब घरी घेऊन जाण्याच्या गोष्टी कशासाठी करतोय? ओळख ना देख. विचार काय आहे त्याचा? आणि नकार देणे तर शक्यच नव्हते. त्यातल्या त्यात साहेबबहादूर यांचा स्वर फार नम्र, जवळपास अजिजीचा होता; ही आश्वासक गोष्ट होती.

'चालन ना. जाऊ ना', मान डोलावत जानराव म्हणाला. शब्द नीट

पोहोचतात की नाही म्हणून त्याने मान अधिक जोरात, जोरजोरात डोलावली.

केरोपंत यांची एका गोड स्मिताने बोळवण करीत त्यास तोषात भिजवून क्याप्टन इस्टूर लेसिंग साहेबबहादूर यांनी जानराव सातपाटील यास आदरपूर्वक सोबत स्वतःच्या घरी नेले. साहेबबहादूर आपल्याला स्वतःच्या घरी कशासाठी नेतोय याचे कुतूहल आणि त्यापेक्षा अधिक भीती जानरावच्या मनात होती. पण साहेबाची इच्छा हा त्याचा हुकूम ; जो बंधनकारक, अनिवार्य, अपरिहार्य आहे याची जाणीवही त्याच्या मनात होती, ती त्याच्या तिथे जाण्यास अधिक कारक ठरली होती. तो आत गेला आणि बसला तेव्हा, त्यानंतर थोड्याच वेळात तिथे अवतीर्ण झालेली स्त्री त्याने पाहिली, तेव्हा तो चकित होण्याच्या मर्यादांच्या घनघोर रानात पोहोचला. त्या रानातच त्याला ती स्त्री दिसली. ती वेगळ्याच वस्त्रप्रावरणात होती. ती अंग्रेज मडमेच्या पोषाखात होती. तिला ओळखायला त्याला तितकासा वेळ लागला नाही. आश्चर्य मात्र वाटले. धक्काच बसला. एका गोऱ्या अंमलदाराच्या घरात, त्याची स्त्री म्हणून आपण तिला बघत आहोत. म्हणजे याच माणसाबरोबर ती वीस वर्षांआधी पळून गेलेली होती! हे सारे अनपेक्षित होते. फार फार अनपेक्षित होते. ती त्याची आत्या भीमबाई होती. जवळजवळ वीस वर्षे लोटलेली. एवढ्या काळात कितीतरी बदल होतो माणसात. ती जरा अधिक गोरी आणि जाडी झाली होती. तिची त्वचा अधिक मऊसूत वाटत होती. तिच्या दिसण्यातील कोवळीकीचे रूपांतर आता स्थिर, शीतल, मोहकतेत झाले होते. त्याला पाहताच ती हसली आणि त्याला ओळख पटली. माणूस कितीही बदलला तरी त्याच्या वा तिच्या काही गोष्टी तशाच राहतात. तिचे हसणे तसे उरलेले होते.

आधी क्याप्टन स्टुअर्ट लेसिंग याने तिला सांगितले होते की एक माणूस एका गावाचा पाटील आहे आणि डीट्टो तुझ्यासारखा दिसतो. फक्त तो पुरुष आहे आणि तू बाई. तिने त्याकडे दुर्लक्ष केले. असे काही शक्य नाही. या अहमदनगरच्या मुलखात असा कोणी माणूस असणे शक्य नाही. माणसे माणसांसारखी दिसतात, ते भ्रम असतात. स्टुअर्टला तसा तो झाला असेल. पण तो ऐकेना. म्हणाला, 'मी तुला तो बघता येईल अशी व्यवस्था करतो.' त्याने ती केली. तिने पाहिले. तर तो जानराव. तिचा भाचा. तिच्यापेक्षा दोनतीन वर्षांनी लहान. म्हणजे तिच्याच शिणेचा. वयानुसार बदललेला. पण तोच. काहीच प्रश्न नव्हता. संपूर्ण खात्री. तिने त्याला सांगितले. म्हणाली, 'मला त्याला भेटायचे आहे. तो माझा भाचा आहे. त्याचे नाव जानराव सातपाटील आहे. चौकशी कर आणि ये घेऊन घरी त्याला.'

भीमबाईने तिच्या त्या अकरा बारा वर्षे वयाच्या उमरीत स्टुअर्टला पाहिले होते. आणि त्याने तिला. सातारा येथे छत्रपती रामराजा यास भेटण्यासाठी आलेल्या साहेबी मंडळाचा तो तिय्यम दर्जाचा तरुण सदस्य होता. ती त्या दिवशी कशासाठी तिथे होती हे तिला आता आठवत नाही. घरच्या कोणासोबत तरी ती काही निमित्ताने तिथे गेली असेल. कदाचित ती फक्त त्याला पाहण्यासाठी तिथे गेलेली असेल. निमित्त काहीही असेल. आणि तोही तिच्या नजरेला नजर भिडविण्यासाठी आलेला असेल. एरवी असे कसे होईल? भाषेच्या पल्याड जावून फक्त नजरेच्या खेळाने त्यांना कसे बांधले असेल? एक स्त्री आणि एक पुरुष; ज्यांचा कुठल्याही अर्थाने आधी कसलाही संबंध नव्हता, ते नजरेच्या एका कटाक्षाच्या देवघेवीत, त्या अत्यंत अल्पजीवी कालचिटोऱ्यात एकमेकांशी कसे जोडले गेले असतील? कसे बांधले गेले असतील? काळाच्या त्या एका चिंधीने त्यांना एकमेकांशी बांधून टाकले. प्रमत्त उष्ण सूर्य आकाशातून आपले प्रखर तेज घेऊन त्या चिंधीत उतरला आणि त्यांना एकमेकांशी बांधून पुन्हा जागच्या जागी होता तसा होण्यासाठी परत गेला. त्याचे तसे उतरणे त्या दोघांखेरीज आणखी कोणाच्याही लक्षात आले नाही. किंवा तो उतरला आणि त्याने ते केले हे त्यांना सुद्धा कळले नाही. त्यांना एक न कळणारे चेटूक झाले. आणि ते एकमेकांशी बांधले गेले. पुढचा सारा प्रवास जीवघेणा आणि प्रमाथी होता. एकमेकांची कसलीही, काहीही माहिती नसलेल्या त्या दोन स्त्रीपुरुषांच्या जगण्याचे सूत्र पुरते बिघडवून टाकणारा होता. ते एकमेकांना भेटले नसते तर त्यांचे आयुष्य अत्यंत अपुरे, एखाद्या चिरलेल्या वेळूसारखे एकाकी झाले असते, असे सांगणारा होता. ते एकत्र आले तरच तो वेळू संपूर्ण होणार होता. त्याच्या तसे होण्याला बाकी कोणताही मार्ग नव्हता. ते सारे शब्दाविण आणि शब्दातीत होते. ती हरेक प्रयत्न करून सातारा येथे जात होती. तो हरेक प्रयत्न करून सातारा येथे जात होता. एकमेकांना पुन्हा पाहण्याच्या वेडाने त्यांना दुनियेच्या साऱ्या सुख आणि दुःखांच्या पल्याड एका अशा दुनियेत नेले होते की तिथे ते दोघेच फक्त होते आणि एकमेकांना दिसत नव्हते म्हणून वेडे होऊन ते एकमेकांना शोधत होते. ते एकमेकांना पुन्हा दिसले आणि तिथेच त्यांचे भविष्य निश्चित झाले.

जानरावाला वाटले, एके काळी आपल्या सगळ्या घराचा तोल विस्कटून टाकणारी ही आपली आत्या, आपल्याच शिणेची; हिचे आता करायचे काय? हिच्या आईचे, बापाचे; त्यांच्या एकमेकांमधल्या संबंधांचे काय झाले हे हिला माहीत आहे काय? हिच्याशी आता वागायचे कसे? तिने मोठ्या असोशीने आपल्याला बोलावून घेतले आहे. ती अंग्रेज

बहादुराची बीबी म्हणून नांदते आहे. ती पुरती साहेबीण झाली आहे. उभ्या आयष्यात पुन्हा कधी ती भेटेल असे वाटलेले नसताना आज अचानक भेटली आहे तर आपल्याला काय वाटते आहे? ही आता आपली कोण उरली आहे? रक्ताचे नाते तुटत नाही म्हणतात. पण ते तोडूनच ती या अंग्रेज माणसासोबत पळून गेली होती. अघटित ते घडले होते. पण आज ती तिच्या दुनियेत सुखी आहे. फार फार सुखी आहे, हे दिसतेच आहे.

तिने केलेल्या चौकशांना त्याने तटस्थ स्वरात उत्तरे दिली. जेवढ्यास तेवढी. अलिप्त. आया, बाप, भावंडे, भाचरं. नंतर जन्मलेली मुलं. प्रश्नांपेक्षाही त्रोटक उत्तरं. चेहरा कोरा. भावनाविहीन. दिसत, जाणवत असूनही तिच्या मनात थबथबलेल्या असाधारण ओलीला, कल्लोळांना मख्ख प्रतिसाद. एकाएकी ती उठली आणि येऊन त्याच्या शेजारी, त्याला खेटून बसली. तिने त्याला मिठी मारली. गच्च मिठी मारून ती रडू लागली. हमसाहमशी रडू लागली. आधी त्याला वाटले, अरे, हे काय, अशी मिठी कधी मारायची असते काय? आपण काही लहान बाळे नाही आहोत आता. पण त्या स्पर्शातून आणि तिच्या हुंदक्यांतून अगदी मऊ असे मार्दवाचे काहीतरी त्याच्या मनाच्या गाभ्यापर्यंत पोहोचले. आपल्यालाही रडू फुटेल असे त्याला वाटले. 'बरं, बरं, चल बस आता नीट.' तो म्हणाला तेव्हा त्याचा स्वर तितका कोरडा उरलेला नव्हता. किंवा तो अजिबातही कोरडा उरलेला नव्हता. ती खुदकन हसली आणि बालपणी घालायची तसा त्याच्या पाठीत धपाटा घालून बाजूला झाली.

त्या दिवशी तो क्याप्टन लेसिंग यांचा पाहुणा म्हणून तिथे थांबला. त्याने क्याप्टन लेसिंग याच्याशी जमेल तितक्या गप्पा केल्या. अठरा वर्षे वय असलेला भीमबाईचा मुलगा तिथे नव्हता. तो इंग्लंडातल्या कोणत्यातरी शहरी शिकायला गेलेला होता. चौदा वर्षे वय असलेली तिची लेक तिथे होती. तीही नुकतीच सुट्टीसाठी इकडे आलेली होती, म्हणून तिथे होती. काही दिवसांनंतर तीही तिकडे इंग्लंडात जाणार होती. ती भुरक्या केसांची उंच तगडी मातृमुखी सुंदर गोरी मुलगी नात्याने आपली आतेबहीण आहे, हे समजावून घेणे त्याला कठीण गेले. ती मुलगी मोडक्यातोडक्या मराठीत फार आनंदाने त्याच्याशी बोलली. त्याला कळले ते इतकेच की भीमबाईची दुनिया बदललेली आहे. पण मनाच्या गाभ्याशी ती जशी होती तशीच आहे. त्या गाभ्यातूनच ती त्याच्याशी बोलली. क्याप्टन लेसिंग याला काय काय आणि किती किती करू असे झाले होते. भीमबाईला तिची दुनिया गवसली होती. आणि ती त्या दुनियेत फार आनंदात होती. जानरावाची भेट झाल्याने तिचा सारा भूतकाळ तिला भेटला होता. तिच्या जगण्याच्या वर्तमानाचे चौदंडी चांदणे त्याला दाखवताना ती एखाद्या लहान पोरीसारखी हरकून गेली होती.

जानरावचा घोडा आणायला गेलेल्या चपराशाने केरोपंत कुलकर्णी यांस निरोप दिला की, जानराव सातपाटील मेहेरबान क्याप्टन लेसिंगसाहेब बहादूर यांचे पाहुणे म्हणून त्यांच्या घरी थांबणार आहेत. तसा त्यांचा आपणास सांगावा आहे. ते ऐकून केरोपंत कुलकर्णी हर्षोल्हासित मनाने आपल्या घोड्यावर स्वार होऊन त्यांच्या साल्पी नामक ग्रामी प्रस्थान करते झाले.

अंग्रेजबहादूर क्याप्टन इस्टुर लेसिंग साहेबबहादूर यांचा पाहुणा म्हणून जानराव सातपाटील अहमदनगर येथे त्यांच्या घरी मुक्कामी राहिला, ही बातमी त्या साल्पी नामक ग्रामी सारीकडे होऊन जानराव याचा भाव खूपच वधारला. कसं काय बुवा? कशी काय

ओळख? आणि थेट घरी मुक्कामी! म्हणजे चांगलीच घसट दिसतेय. कशी काय? कावो? जानराव काय सांगणार? साहेब आपला सोयरा आहे म्हणून? म्हणाला, जुनी ओळख आहे. सातारच्या महाराजांच्या भेटीला बरेच अंग्रेजबहादूर आले होते. त्यांच्यात हे होते. त्यांचा तिथे महिन्याभरापेक्षा जास्त काळ मुक्काम होता. तेव्हा त्यांना लागणारे दूध आमच्याकडून जात होते. त्याच्यावर ते खूष असत. आपण लोक दुधाचे दही लावून, त्यातले लोणी काढून, ते कढवून तूप तयार करतो. हे त्यांना माहीत नव्हते. ते पाहण्यासाठी हे इस्टूरसाहेब एकदा आमच्या घरी आले होते. त्याच्यातून ओळख वाढली. भाऊपणा वाढला.

'नाही पण मग तुम्ही समोर दिसत असताना त्यांनी कसं काय विचारलं की, यांचं नाव हे हे आहे काय?' ही केरोपंत यांची पृच्छा.

'अहो, वर्स लोटल्याली. मानूस काय तसाच हातो काय? आन वाटलं आसन त्याला का बोवा, ह्यो सातारचा मानूस इकडं कसा काय? त्याच्यानी अंदेशा आसन. त्यांनी वळख ठुली ह्यो त्याच्या दिलाचा मोठेपना. मला त त्यो वळखायला सुद्दा आला नायी.'

'हां, तेही खरंच आहे म्हणा.'

केरोपंतांनी संतोषाने मान डोलावली.

3

आता आपणही आपले कुटुंब साल्पीला आणायला हरकत नाही, असा विचार करून आपल्या घोड्यावर स्वार होऊन जानराव मजल-दरमजल करीत करंजे मुक्कामी पोहोचला. एकाच वेळी चार पिढ्या एकत्र नांदत असलेल्या त्या भल्या मोठ्या गोकुळात शिरताना त्याला आनंद अर्थातच झाला. दोन अडीच वर्षे लोटल्यावर तो घरी आलेला होता. फार विशेष काही बदलले नव्हते. काळ संथ गतीने वाहणाऱ्या त्या जमान्यात इतक्या कमी काळात बदल तो काय होणार? काही लग्ने झाली होती. काही पोरे जन्माला आली होती. गोकुळ त्याच्या त्याच्या पद्धतीने नांदत होते. दोन्ही आज्या

म्हाताऱ्या झाल्या होत्या. त्याही अडीच वर्षांत कितीक अधिक म्हाताऱ्या होणार? जानरावाने आधी आपल्या बापाजवळ आपला इरादा प्रकट केला. बाप म्हणाला, 'इथं तुला काय कमी पडातंय? कस्ट करून घासातला घास समद्यांना मिळतोय. तुपले समदे भाऊ, भैनी; समदं गणगोत सोडून काह्याला परक्या मुलखाला जातोस? ह्या दोन म्हाताऱ्या खपल्या का समद्यांच्या वाटन्या व्हतीन. आपल्या वाट्याला पोटापुरती जिमीन येईन. आन काय सांगावा; आपन खपल्यावर बखेडे नकोत म्हनून आफुआई खुद जित्ती आसतानीच समदं बैजवार करून टाखीन.'

आफुआजीने त्याला पाहिले तेव्हा क्षणभर ती सूक्ष्म हसली आणि लगेचच तिच्या नेहमीच्या दगडी मुद्रेत घुसली. म्हणजे असे की आपला गोतावळा तुझ्याखेरीज अपुरा होता. आता तू आलायस तर तो पूर्ण झालाय. आनंद आहे. सगळे विनाशब्द. याच्या उलट काळीआजी. 'आरे माह्या पुताऽऽ' म्हणत तिने त्याचे मुके घेतले होते. आता सांजसकाळ ज्याचा मुलगा लग्नाला येईल अशा त्या आपल्या थोरल्या नातवाचे मुके घेताना ती फार खूश झाली होती. तिने त्याची सगळी चौकशी केली होती. माहिती घेतली होती. त्याने आपला इरादा तिला सांगितला. तिची पहिली प्रतिक्रिया त्याच्या बापासाराखीच होती. तो म्हणाला, 'माझा निश्चय झालेला आहे. ते गाव चांगले आहे. माझ्या वाट्याला चांगली मोठी आणि भरपूर जमीन आलेली आहे. मला इथले आपले काहीही नको. मी माझी मुलेबाळे घेऊन तिकडे जातो. तिकडे आपला वेल विस्तार वाढण्यात वाईट ते काय? तू तेवढी आफुआजीची परवानगी काढ. तिला पटव.' नंतर आसपास ऐकणारे कोणी नाहीय, याची खातरजमा करून घेत त्याने तिला भीमबाईच्या भेटीची हकीगत सांगितली. अगदी साद्यंत. तिने मोठ्या उत्सुकतेने ते ऐकून घेतले. भीमबाई आनंदात आहे, तिचा संसार फुलला फळला आहे, हे ऐकताना तिचे डोळे भरून आले. ते पुसत तिने आकाशाकडे तोंड करत ईश्वराला हात जोडले. म्हणाली, 'देवा, पागा सुकात ठिव रेऽऽ माज्या लेकरालाऽऽ' मग म्हणाली, ती त्याच्यासोबत गेली, हे मला माहीत होतं. पण ते सगळं इतकं सुखाचं होईल, तिचा इतका सुखाचा प्रपंच होईल याची खात्री नव्हती. ती तशी कोणत्याही प्रपंचाची नसते. पण त्यातही हा परका अनोळखी गोरा माणूस. पांडुरंगाच्या आशीर्वादाने सगळं चांगलंच झालं.

'अरे बापरे! तुला माहीत होतं? अन तरी तू तिला अडवलं नाहीस?

नंतर जे सगळं रामायण आपल्या घरात घडलं-'

"अरे, ती इतकी लहानी पोर. ती बोलणार कोणाशी? त्या पठाणीनीला सांगायला गेली असती तर तिने तिला उभी चिरून टाकली असती. मलाच सांगितलं तिनी. खूप समजूत काढली मी तिची. पण पागल झाली होती ती. इथं राहिली असती तर वेड लागूनच मेली असती. मग त्याच्यापेक्षा गेली निघून तर काय वाईट? दृष्टीआड सृष्टी. तिचं नशीब तिच्यासंगती. आणि आता तू सांगितलंस, तर चांगलंच झालं ना तिचं. अशीच सुखात म्हातारी होवो बिचारी. तुला माहीत आहे ; ती पळून गेल्यावर तुझ्या आज्याला आफू काय म्हणत होती? म्हणत होती, जा तिला शोध आणि तिला खापलून टाक. तिला तोडूनच मला तोंड दाखवायला ये. लय निकरट अवलाद. माझा सगळा जन्म तिला टरकून राहण्यात गेला. म्हणजे तशी वाईट नाहीय ती. आपला चार पिढ्यांचा सगळा विस्तार तिनीच तोलून

धरलाय. पण पोटच्या लेकीसाठी माणूस इतकं निकरट होतं; त्याचं काय करायचं? माहीत होतं मला. वीस वर्षे मी दाभाड गच्च ठेवून राहिलेय. अन् आताही ते उचकटणार नाहीय. तुही बोलू नकोस कोणाशी.'

आफुआजी खरंच पठाणीन आहे? ती किती वेगळी भाषा बोलायची ना चिडल्यावर?'

'आसंल नायतं नसंल. त्यांनी काय फरक पडतो आता? तुपला आजा तिच्याशी लगन करून चांभारगोंद्याहून तिला घेऊन आला होता, इतकं मला माहीत आहे. आणखी कैक मला माहीत आहे. त्यात खराब काहीच नाही. मग त्याच्या बाता कशाला? हे इतकं आपल्याला पुरेसं आहे.'

'माझं काय करायचं ठरवलंस?'

'जायचंच म्हणतोस तर करते. माझं ऐकेल ती. दम काढ. वेळ वखत बघून गोष्ट काढते तिच्याजवळ.'

काळीआजीने तिचे काम मोठ्या हुषारीने अगदी चोख बजावले असावे. जानरावला ती म्हणाली, 'पटलंय बहुतेक तिला. जरा आणखी दम काढ. तुला बोलावून घेईल ती.'

आणखी चार दिवसांनी काळीआजीच त्याला सांगायला आली,

'बोलावलंय.' तो गेला आणि शिरस्त्यानुसार त्याने आफुआजीच्या पायांशी डोके टेकवले.

'जायचंच आहे?' 'तू परवानगी दिलीस तर.' 'इथून काय घेऊन जातोस? जमीन तर उचलून नेता येत नाही.' 'नको मला.' 'काहीच नको?'

'देणार असशील तर विठोबा-रखुमाईची मूर्ती दे. माझ्या पिढीत मी थोरला आहे. नित्यनेमाने पूजा करीन.'

"दिली. आणखी?' 'आणखी काहीच नको. तुझे आशीर्वाद असूदेत.'

तिने कनवटीला हात घातला. काळजीपूर्वक बटवा उघडला. त्यातून

सोन्याच्या मोहरा काढल्या. मोजल्या. दहा होत्या.

'ह्या तुला घे.' 'मला नको.

'घे. तुझ्या आज्याने काळीआजी आणि माझ्यासाठी या ठेवलेल्या होत्या. आम्ही आता यांचं काय करणार? आम्ही भरून पावलो आहोत. मी काळीला विचारलं आहे. तिला विचारूनच तुला देते आहे. जाशील तिथं कुळीचं नाव काढशील. आमचे आशीर्वाद आहेत तुला.'

आफुआजी आपल्याशी इतकं बोलली यानेच तो मुळात सद्गदित झाला. उठून त्या आनंदात तो तिच्यासमोर पुन्हा वाकला. त्याने तिचे पाय धरले. तो उभा राहात असताना तिने त्याला जवळ ओढले आणि त्याचा मुका घेतला. त्याच्या डोक्यावरून आपले हात फिरवले आणि ते आपल्या दोन्ही कानाशिलांशी नेत तिथे तिने आपली बोटे कडकडा मोडली. तिचे डोळे भरून आले. मोहरा नाकारणे अशक्य होऊन गेले. नाही म्हणण्याची ताकदच संपली. त्या भावनाविवश अवस्थेत तुझी लेक भेटली होती, ती तिच्या घरी अगदी सुखात आहे, असे तिला सांगण्याचे त्याच्या मनात आले. पण त्वरित स्वतःच्या मनावर काबू करीत तो मोह त्याने आवरला. एके काळी आपल्या आज्याला सांगितलेली कामगिरी आज पुन्हा तिने आपल्याला सांगितली तर काय घ्या, असे त्याच्या मनात आले.

'आपली सातपाटलांची कुळी ही पसरणारी कुळी आहे, हे नेहमी लक्षात ठेव. पसरण्यासाठी तिला कोणत्याच मर्यादा नाहीत,' तो तिच्यासमोरून निघताना आफुआजी म्हणाली. त्याला ते उमजले नाही. ते त्याला फार गूढ असे वाटले.

नंतर काळीआजीला त्याने हे सांगितले तेव्हा ती म्हणाली, 'आरं ती काय बोलती, ते समदं मला तरी कुढं उमगातंय? तिचं तिलाच ठावं आसन. नायतं नसन सुद्दा. बोलत नायी जास. आन बोलली त ह्ये आसं गौडीबंगाळ.'

4

बंदोबस्तातल्या दहा मोहरा, विठोबा-रखुमाईची मूर्ती, बायको सरूबाई, वय वर्षे एकोणतीस, मुलगा रखमाजी, वय वर्षे तेरा, लेक झमबाई, वय वर्षे आठ आणि तो स्वतः वय वर्षे चौतीस असे ते करंजे येथून निघाले. बायको-मुलांसाठी बैलगाडी केलेली होती. जानराव घोड्यावर बसून सोबतीने चालला होता. निघताना स्वाभाविकच बायकांची रडारडी झाली. डोळे पुसणे, मिठ्या मारणे असे प्रकार झाले. चार दोन कोसांची चाल झाल्यावर सगळे आनंदात आहेत असे झाले. आपली बायको सरूबाई ही सुद्धा फार आनंदात आहे, हे जानराव यास जाणवले. स्वतंत्रपणे संसार करण्याची चाहत बायकांमध्ये नेहमीच असते; तशी संधी मिळाली की त्या खूष होतात, असा एक खासगी शोध त्याला लागला. साल्पी येथील त्यांच्या जुनाट छोटेखानी वाड्यात पोहोचल्यावर तिने जो मोकळा श्वास घेतला अन् तिच्या डोळ्यात जी चमक प्रकट झाली त्यातून त्याच्या त्या समजास पुष्टीच मिळाली. त्याला त्याची काहीही हरकत नव्हती. त्यांच्या प्रपंचाचे यापुढचे सगळे निर्णय तेच घेणार होते.

गाव, घर, शिवार; सगळेच नवे. पण तिथे रुजायला आणि रुळायला जानरावाच्या कुटुंबाला फार वेळ लागला नाही. मोकळा श्वास घ्यायला मिळाल्याने सरूबाई खूष झाली होती आणि नव्या रुपाने वावरू लागली होती. जे आहे ते आता फक्त आपले, आपल्या नवऱ्याचे आहे. फक्त आपणच इथले मालक आहोत, यात आणखी कोणीही भागीदार नाही, याचे तिला खूप अप्रूप वाटत असे. त्यांची मुले रखमाजी आणि झमबाई ही खूप वेगवेगळ्या स्वभावाची होती. थोरला रखमाजी हा फार कमी बोलणारा, सहसा मळ्यात जाऊन काम करण्याच्या वृत्तीचा होता. तो साधा, सरळ आणि आतल्या गाठीचा वाटावा इतका अबोल होता. त्याचे कोणाला काहीच कळत नसे. तो काळा, दुहेरी हाडाचा आणि आपल्या आईवर गेलेला आहे असा वाटावा असा होता. पण त्याची आई सरूबाई कधी कधी चांदण्यासारखे हसू शकत असे. तसे हसताना त्याला कधी कोणी पाहिलेले नव्हते. हसणे, बोलणे, किंवा कोणत्याही प्रकारे भावना व्यक्त करणे, हे त्याच्यासाठी कष्टदायक वाटावे इतके अल्प असे. इतक्या लहान वयात सुद्धा तो शेतात अबोलपणे आणि एखाद्या बैलासारखा मूकपणे राबत

असे. ते त्याला आवडत असे. या गोष्टीचे कधी कधी जानराव यास आश्चर्य वाटत असे. इतके सहज राबणे हा सातपाटलांचा स्वभाव नव्हे, असे त्याच्या मनात येई. लढणे, घोड्यावर स्वार होऊन मुलुखगिरीला बाहेर पडणे ही सातपाटील लोकांची मूळ वृत्ती आहे, असे त्याला वाटत असे. किंवा तशी त्याची स्वतःची वृत्ती होती. आपल्या कुळीसाठी शेतात राबणे हा अखेरचा आणि नाईलाजाचा मार्ग आहे, असा त्याचा समज होता. हा आपला मुलगा वेगळा आहे, असे वाटून त्याच्या मनात कधी कधी काळजी उत्पन्न होई. पण मग काळजी करावी असे काहीही नाही, एका छापात असे काहीही होत नसते, एकाच कुळीत वेगवेगळ्या स्वभावाची माणसे जन्मू शकतात, हे त्याला पटत असे. किंवा तशा प्रकारे तो स्वतःची समजूत घालत असे. धाकटी झमबाई याच्या उलट म्हणावी अशी होती. एक तर ती सडपातळ, गोरीपान आणि अत्यंत देखणी होती. गोरी होती म्हणून देखणी होती असे नव्हे. तिच्या चेहऱ्यात अगदी अपवादात्मक अशी माधुरी होती. ती सतत हसतमुख असे. तिच्या भोवती सतत चांदणे झमझमत आहे असे वाटत असे. ती आबे झमझम म्हणजे मक्केच्या पवित्र पाण्यासारखी सुंदर होती. आफुबाईला हे तिच्या जन्माच्या वेळीच कदाचित दिसले असावे. म्हणूनच तिने या पोरीचे नाव झमबाई ठेवले असावे. तिचा सहज वावर सुद्धा एखाद्या राजकन्येसारखा होता. तिच्या आईने तिला त्याच प्रकारे वाढविले होते. ती राजाची राणी होण्यासाठीच जन्माला आलेली आहे, याविषयी सरूबाईच्या मनात यत्किंचितही शंका नव्हती. दूरवरच्या कोणत्या तरी देशाचा राजकुमार घोड्यावर बसून आपल्या दारी येईल आणि आपल्या या लेकीला मागणी घालील, असे स्वप्न तिने वारंवार पाहिले होते. पोरीबाळींच्या कोणत्याही समूहात ती एखाद्या परीसारखी उठून दिसत असे. बाकी पोरी सुद्धा चकित नजरेने तिच्याकडे पाहात असत. त्या साऱ्या तिच्याभोवती वावरणाऱ्या दासींसारख्या दिसत असत.

एके दिवशी जयरू म्हणाला, 'कचरूकाकाचा सांगावा हाय.' 'काय?' 'थोरले पाटील म्हनले, सवड आसन तवा येऊन जायाचं.'

जानरावनेच कचरूला सांगून ठेवलं होतं, 'तू पाटलाचा निरोप घेऊन माझ्या घराच्या ओट्याशी यायचं नाही. मला जोहार करायचा नाही. रीत असली तरी मला त्याचा त्रास होतो.' असं काय काय थांबवणार होता जानराव? रीतभात बदलता येत नाही. पण होता होईल तितकं करायचं इतकंच. आणि सवय होतेच माणसाला. ती कचरूला होत होती आणि जानरावालाही. शिकस्त करत होते दोघेही. काय करणार? फौज संपली, गावकी सुरू झाली, की आतडं तुटण्याच्या गोष्टी दूर दूर जातात.

जानराव थोरल्या पाटलांच्या भेटीला गेला. मग चौकशी. 'विंग्रेज अंमलदारांनी तुला पाव्हना म्हनून घरला ठिवून घ्यातलं म्हने. आयकली ती बात खरी हाय?'

'हां, खरी हाय.' 'कसं काय?'

जानरावाने सांगितलं. इतरांना सांगितलं तेच पाटलांना. वेगळं काय सांगणार?

'वानकी बात. पण काय रे पोरा, हा विंग्रेज सरकार तरी सुकाचे दिवस आनीन का नाय?'

'त्याचं काय सांगता येतंय?' 'पार ज्यार ज्यार झाली रे लॉकं. जिनगी हराम केली ह्या लोकांनी. कोन्हीबी या आन धाड घाला. पेसवा आसुंदे नाय त शिंद्या व्होळकर. फरोक

कायच नायी. बायाबापड्यांची आबरू खलास केली त्यायनी. कैक मेल्या, कैक बेपत्ता झाल्या. ज्याची फौज येती ती लुटिती.

आखरी लुटायला काय हातोय घंट्या? लॉकच सोडून गेले गावं. म्हने, भिलाटी येती. येती ना! पण त्यांछा हिसाब लावायचा कोन्ही? तुमी राजे हायेत त तुमचं काम हाये ना ते. आरे, तुमी खुद येत्या आन सेतकऱ्याच्या बोच्यात लाकडं ठोकित्या. त्यांच्या पोरायला तापल्या तव्यावं उभं करित्या. का त सारा का धिला नायी? पिकच नायी त कुढून सारा देतीन सेतकरी? त्यांच्या बोच्यातून ? तुमी येयाच्या आंधीच दुसरे कोनी तरी त्याला नंगे करून जात्या. तव्हा तुमी काय करीत आसत्या? त्याला संबाळायचं काम नायी का तुमचं? तिथं त गांड ढिली पडती तुमच्यावाली. तुमी काह्याचे राजे? सारकी सारकी टोळधाड येवा तशी तुमच्या फौजा येत्या. आन धिंगाणा घालित्या. नांदती गावं खलास केली तुमी. गावंच उरली नायी त कोंचा सारा घेता घंट्या ?'

'आता निदानशिक गावं नांदाया लागली.'

'तव्हाच म्हनतो मी का ह्यो सरकार पहिल्यापरीस बरा हाये का काय?'

'हे गोरे लोकं. सात समुंद्र वलांडून आल्याले हैत म्हंत्यात.'।

'मी काय म्हंतो; काळे, गोरे, कोनचे का आसानी; लोकांला आबादानी द्या. पाऊसपानी समदं व्हयाचं तसं व्हईन. पिक पिकलं त घ्या ना! राजाचा वाटा देयाला खुसी हाये आमी. पघा आन माघा. आसं मला लागातं. पन आसुंदे, च्यायला ; जसं व्हयाचं तसं व्हईन. पण तुपल्यावाली वळक हाये त सांग त्या लोकांला. आता ही पेंढारी लोकांची लई आवई हाये म्हंत्यात. त्यांछं काय करित्या कोनाला ठावकी? तुमी निदानशिक फौजी लॉकं. सुदरून व्हा. गाव जितून व्हा.'

पाटील आणखी बरेच बोलत राहिले. आपण आपले गाव नांदते राखू शकलो नाही, म्हणून आपल्याला गावचा पाटील म्हणवून घ्यायचा अधिकार सुद्धा उरलेला नाहीय. आता तुम्ही लोक आला आहात तर ते नांदते झाले आहे. आपल्या म्हातारपणात तरी आपल्याला सुखाचा श्वास घेता येईल, असे वाटू लागले आहे. आपले आता फार दिवस राहिलेले नाहीत. सुखी नांदते गाव पाहून मला आनंदात मरायचे आहे. सगळे एकजुटीने राहा. अस्मानी-सुलतानीचा एकजुटीने सामना करा. फौजी आहात. पळून जावू नका. असे पुष्कळ.

जानराव उठून त्यांचा निरोप घेत निघाला तेव्हा पाटील हळूच म्हणाले, 'जानबा, तू शाहनासुरता मानूस. दुन्या पाह्यल्याला. आमचं गनबा पाटील यावढं चलाक नायी. ते पाटीलकी आन देसमुकी आशा बाता करीतं. म्हंजी कुळीचं माहात्म्य आसतंच. पण त्या का बोलायच्या गोस्टी आसत्यात का? आरे! येवढुसंक गाव संबाळता आलं नायी तुमाला. तव्हा पळून गेले तुमी. ते एक सटव्या महार आन मी- आमी दोघंच व्हायलो इथं. समदे पळाले. कोंचे पाटील आन देसमुक? ह्यो काह्याला ह्या फोकल बाता करितो? तू संबाळून घे त्याला. घेशीन ना पोरा?'

'तसं कायच मनात आनू नका पाटील. आपन समदे येकातले येक.' जानराव म्हणाला.

या पाटलाविषयी त्याच्या मनात आधीपासूनच आदर होता. तो या भेटीने आणखी वाढला.

गावचा पाटील म्हणून जानरावाचं सोबत येणं, त्याचं एकूण व्यक्तिमत्व आणि वागणं, इंग्रज अधिकाऱ्याशी असलेली त्याची जानपहचान यांच्यामुळे केरोपंत यांच्या मनात एक कल्पना उगवलेली होती. अधिकृतपणे त्यालाच पाटीलकी मंजूर करून आणण्याची. नाहीतरी जवळपास सगळं गावच मुळात नव्याने वसलेलं होतं. अधिकांश सारे फौजी लोक. तर फौजी गावाला नवा फौजी पाटील असायला हरकत काय? शिवाय हे म्हातारे खोपडे -पाटील फारच रांगडे आहेत, असे त्यांचे त्यांच्या मनाशी राखलेले मत होते. त्या म्हाताऱ्यापुढे बोलतीच बंद होते अगदी. अन् तो त्याचा मुलगा गणोजी तर बिलकुल माठ्या आहे. त्याच्यासोबत काम करणं तर आणखीच कठीण.

एके दिवशी केरोपंतांनी जानरावासमोर हलकेच प्रस्ताव मांडला. म्हणाले, "तालुक्यावरून हे मंजूर करून आणता येईल. ते मी करतो. तुमची संमती फक्त हवी. पाटील म्हतारे झालेले आहेत. गाव नव्याने वसलेले आहे. फौजी गावात फौजी पाटील. तुम्ही त्या जागी शोभता. तुमच्या वरच्या पातळीवर ओळखी आहेत. गावाला फायदा होईल.'

जानराव क्षणभर गप्प बसला. त्याचा कदाचित चुकीचा अर्थ लावून केरोपंत आणखी म्हणाले, 'थोरल्या पाटलांविषयी आपणास आदर आहे, याची मला कल्पना आहे. मलाही तो आहे. हवे तर आपण हे मंजूर फक्त करून आणू. आणि ते आहेत तोवर हे गुलदस्त्यात ठेवू. नंतर उघड करू.'

'तुमची अडचण नेमकी आहे काय?' 'नाही, तशी अडचण काहीच नाही. पण-'

'मग त्या भल्या माणसाचा असा विश्वासघात आपण का करायचा? त्याने तुम्हाला घरदार दिलं, कुलकर्णी केलं. मलाही सगळं दिलंय. आपण फौजी लोक. आपल्या लोकांना त्यांनी सामावून घेतलं. असा कोणाला धोका आपण नाही द्यायचा. मला असल्या गोष्टींची काहीही मातब्बरी नाहीय. देवासारखी माणसं आहेत ही. थोरले पाटील काय किंवा तो सटवाआजा काय; अहो सगळे लोक गाव सोडून गेले तरी ते दोन हिमतबाज म्हातारे इथेच ठाण मांडून राहिले. आपण आलो तर म्हणाले, राहा. गाव नांदतं झालं पाहिजे.'

'नाही, नाही. माफ करा मला. मी चुकलो. तो प्रश्नच नाही. मनात

आलं, ते आपणाशी बोललो इतकंच. हा विषय आता संपला.'

आपल्या गालांवर थपडा मारत केरोपंतांनी आपल्या कानांच्या पाळ्या बोटांनी पकडल्या.

'तसं काहीच नाही. तुमची माझ्याविषयीची भावना चांगलीच आहे.

त्यापोटीच तुम्ही हे म्हणालात.'

'अगदी बरोबर.' 'पण नाही करायचं आपण.' 'नाही करायचं. माफ करा.'

केरोपंत हे काही खलप्रवृत्तीचे इसम नव्हते. ठीकठाक जगण्यासाठी जितका काही स्वार्थभाव माणसाच्या ठायी असावा लागतो, तितकाच तो त्यांच्या ठायी होता. त्यापल्याड ते भलेच माणूस होते. आपल्या भोवतीची व्यवस्था आपल्याला जास्तीत जास्त सोयीची करणे; तसा प्रयत्न करत राहणे हा मनुष्यस्वभाव आहे. माणसे आणि इतर सजीव यांच्यातला तो स्वाभाविक फरक आहे. प्राणी आहे तो भोवताल स्वीकारून त्यात जगतात. माणसे त्याला स्वतःला जास्तीत जास्त अनुकूल करून जगण्याचा प्रयत्न करतात. केवळ

त्याच भावनेने केरोपंतांनी जानरावाला पाटीलकीचा प्रस्ताव दिला होता. थोरल्या पाटलांच्या थोरवीची त्याने जी जाणीव करून दिली, त्यामुळे ते मनातल्या मनात खजील झाले. सज्जन माणसेच खजील होतात. निब्बर माणसांना त्याची गरज नसते. ती त्याच्या पल्याड पोहोचलेली असतात. केरोपंत अल्याड होते. एके दिवशी जानरावास ते म्हणाले, "एक गोष्ट आपणास सुचवायची आहे. आपल्या गावाच्या खालून ओढा वाहतो. तो निदान सहा महिने तरी वाहता असतो. आपण त्याला योग्य ठिकाणी बांध घातला आणि पुढे पाट काढला तर त्याखाली गावाचे निम्मे शिवार बागाईत होईल. विहिरींना पाणी वाढेल.' जानराव म्हणाला, "फार चांगली बात. पाटलांना सांगू आणि सगळे एकत्र येऊन काम करू.' पाटील म्हणाले, 'करा रे पोरांनो. चांगली बात आहे. आनंद आहे. त्याच्यात परवानगी कसली मागता?' केरोपंतांनी गावकऱ्यांना बांधाची जागा दाखवली. पाट कुठून कसा काढायचा हे दाखवले. फौजीच ते. त्यांना पटले. ते एकत्र आले. त्यांनी शिस्तीत बैलांसारखे काम केले. त्यातून गावाच्या वरच्या अंगाला ओढा अडविण्यात आला. पाट खोदला गेला. पाट बागाईत तर झालेच. पण विहिरी भरल्यामुळे खूप मोठा भाग बारमाही बागाईत झाला. गाव आणखी जोमाने नांदू लागले.

गावाच्या अशा आबादानीचा परिमळ सर्वदूर पसरत असतो. तो भल्याबुऱ्या सगळ्या प्रवृत्तींना आकृष्ट करतो. पाटातून वाहतं पाणी, डोलणारी पिके, सुखाने चरणाऱ्या गायी-म्हशी; साल्पी गाव सगळीकडे दुमदुमत होतं.

अशात एके दिवशी पेंढारी लोकांची एक टोळी गावावर धडकली. ऐन दुपारची वेळ त्यांनी निवडली होती. ती साहजिकच अगदी ठरवून. दुपारच्या वेळी बरीचशी पुरुषमाणसे रानात, शेतात असतात. बायाही. त्यामुळे गावात सहसा म्हातारी माणसे असतात. अगदी लहान मुलेमुली सुद्धा रानात जातात. तिथे खेळतात. जरा मोठी असलेली मोठ्यांना मदत करतात. म्हाताऱ्यांना घाबरवणे, लुटणे सुलभ असते. जरब आणि चपळाई महत्त्वाची. जरब बसण्यापुरती मारहाण करायची. जास्त निब्बर लागलं कोणी तर खलास करायचा. त्याला इलाज नसतो. आणि चपळाईने माल गोळा करायचा. तो ठेवायच्या जागा सहसा ठरलेल्या असतात. रांजणांवर गाडगी मडकी ठेवलेल्या उतरंडी साऱ्या घरात असतात. फार मौल्यवान असं सहसा नाहीच सापडत. पण कधीतरी, कुठेतरी लग्गा लागून जातो. आणि भुकेलेले असतात पेंढारी. मिळेल ते चालवून घेतात. रोजचा धंदा असतो. कमी जास्त हे चालतच असतं. धाड घालायची, माल उचलायचा आणि चालतं पडायचं. ते घोड्यांवर स्वार होऊन आले आणि त्यांनी वेशीवर बंदुकधारी पहारे ठोकले. आतले बाहेर नाही आणि बाहेरचे आत. पंचवीस-तीस जण होते. बाकी आधी गावाची पाहणी करूनच ठेवलेली असणार त्यांनी. वेशीवर ठाकलेले वगळता बाकी चपळाईने आत घुसले. त्यांनी बंदुकांचे बार काढले. एकजणाने गर्जना केली. 'जिंदा रहना है तो बाहर निकलो. घरमे जो दिखेगा वो मारा जायेगा!' तो घोडा दौडवत गावभर तीच गर्जना करत होता. गर्जना आणि घोड्यांच्या टापा यांनी हवेत भीतीचा थरार निर्माण केला. असतील नसतील ते जीव मुठीत धरून घरांच्या, वाड्यांच्या बाहेर आले. सरूबाई आणि तिची लेक झमबाई घरात होत्या. जानराव आणि रखमाजी रानात गेलेले होते. वेळ-प्रसंग पाहून सरूबाईने वाड्याच्या पुढच्या दाराला आतून कडी घातली आणि तिने लेकीसह बळदात जाण्याचा

निर्णय घेतला. करंजे इथून आणलेल्या मोहरांची पुरचुंडी सोबत घ्यायला ती विसरली नाही. बळद मजबूत आणि सुरक्षित होते. वरून सहजी लक्षात न येणारे होते. वाड्याच्या बाहेर येऊन उभं राहाणं धोक्याचं आहे, आपल्या लेकीसाठी ते फार तसं आहे, हे तिच्या अंतर्मनाने जाणले. कडी तर खोलणारच होते ते. घरातल्या सामानाची उचकापाचक होणारच होती. लेकीसह आपण सुरक्षित राहिलो म्हणजे जिंकली, अशी तिची भावना होती.

पेंढाऱ्यांनी भराभर घरे खाली केली. घरोघरी फोडलेल्या गाडग्या-मडक्यांचा आणि लवंडून दिलेल्या रांजणांचा खच पडला. धान्यांच्या कणग्या, गोधड्या, लुगडी-धोतरे, सगळ्या प्रकारची धडुती आणि चिरगुटे; सगळे अस्ताव्यस्त होऊन गेले होते. त्यांना कुठेही काहीही प्रतिकार झाला नाही. कोण प्रतिकार करणार? ज्याला त्याला ज्याचा त्याचा जीव प्यारा. त्याच्यासाठी गप बसून राहायचं. घोडे उधळत होते. पेंढारी आतबाहेर करीत होते. दिवसाढवळ्या फौजी लोकांचे गाव लुटले जात होते. कोणीही काहीही करू शकत नव्हते. सरूबाई तिच्या लेकीला पोटाशी घेऊन जमिनीखाली बळदात बसून राहिली होती. तिचे घर विस्कटले जातानाचे आवाज तिला ऐकू येत होते. भांड्यांचे गाडग्या-मडक्यांचे आवाज, दणादण टाकल्या जाणाऱ्या पावलांचे आवाज, हे सगळे ऐकताना ती जीव मुठीत धरून बसली होती. मनातल्या मनात पांडुरंगाचा धावा करीत होती. अनेक प्रकारचे नवस बोलत होती. तिने तिचा एक तळहात आपल्या लेकीच्या तोंडावर दाबलेला होता. तिने शब्दोच्चार करू नये म्हणून. पण परिस्थितीचे गांभीर्य त्या पोरीलाही कळले होते. ती गपगुमान बसून होती. वर हळूहळू सगळे शांत होत जाताना सरूबाईचा जीवही तिच्या मुठीतून हळूहळू तिच्या छातीत शिरू लागला होता. तरीही ती तिथेच बसून राहिली होती. आणखी बराच वेळ ती तिथून हलणार नव्हती. त्या दिवशी, त्या वेळी कचरदास वाघुले उर्फ कचरू महार पाटलांच्या वाड्यात लाकडे फोडीत होता. एकटे म्हातारे थोरले पाटील घरात होते. लहान मोठ्यांसकट घरातली बाकी सगळी माणसे मळ्यात गेलेली होती. बाहेरचा गलबला ऐकल्यावर कचरू वाड्याबाहेर आला. तत्क्षणी त्याच्या सारे लक्षात आले. तो धावत आत आला आणि पाटलांना म्हणला, पेंढारी आलेत.

'पेंढारी? आवई व्हतीच तिच्यामायला सका त्यांछे!' 'भायेर येऊन हुबे राहा म्हंतेत.' । 'हावू ना. मपली बंधूक काहाड. होऊन जावूदे एकदाची.'

'छ्या,छ्या पाटील! आवो, लय गाताडी आन निकरट जात ती.

त्यांच्या कुढं नादी लागात्या?'

'मपली बंधूक काहाड सांगातलं ना तुलाऽऽ-' पाटील मोठ्यांदा ओरडले.

आता, कैक वर्षांत न वापरली गेलेली, साफसफाई, तेलपाणी न केलेली बंदूक काढून काय करणार तिचं पाटील? करायचं काय? म्हातारं अजिबात ऐकणार नाही. ती चांगली असती तर त्यांच्यासाठी त्याने स्वतःच ती वापरली असती. आता बाकी काहीही करणं शक्य नव्हतं. वाड्याच्या बाहेर जावून उभं राहाणं आणि स्वतःचा जीव वाचवणं अधिक शहाणपणाचं होतं. पण ते सांगायचं कोणी आणि कसं?

बंदुक होती. धुळीने लदबदलेली. गंजलेली सुद्धा असेल आतून. ते बोलायची सुद्धा सोय उरली नव्हती. त्याने आणलेली बंदूक खेचून स्वतः कडे घेत म्हातारे पाटील त्वेषाने

वाड्याच्या दाराकडे निघाले तेव्हा आणखी काहीच न कळून तोही त्यांच्या पाठी निघाला. चपळाई करत त्यांच्या पुढे झाला. घोडे दौडवत पेंढारी आले होते. पाटील दारात उभे राहिले आणि चापावर बोट ठेऊन त्यांनी बंदूक त्यांच्यावर रोखली.

'एक पाउल सुद्दा टाखलं मोहं तर बार काढीन, ह्ये समजून राहा.' पाटील गरजले.

हे दृष्य पाहून पेंढारी चकित झाले. थबकले. हे असे त्यांनी कधीच अनुभवले नव्हते. पेंढारी लोकांचा सरदार घोड्यावरून उतरला. उतरणारच होता तो. पण उतरला आणि विस्मयाने थबकला. त्याने स्वतःची बंदूक सरसावली नाही. इतरांनाही तसे न करण्यासाठी इषारा केला. एक म्हातारा पाटील आणि हे अवसान! पाटलाचे पाय सुद्धा डुगडुगत होते. तरीही ही हिंमत!

'क्यों पटेल? जिंदगीसे बिलकुलही प्यार बचा नही है क्या?,' तो हसला.

'आरे, श्याटमारी, मी मरन सुद्दा. पन कमसी कम चार लोकांना
सोबत घेऊन जाईन. जातीचा महाटा हाये मी,' पाटील गरजले.

पेंढारी सरदाराने आपल्या तोंडावरचा फेट्याचा पदर बोलण्यासाठी क्षणकाल उघडलेला पुन्हा जागेवर नेला. त्या क्षणात कचरुला त्याचा चेहरा दिसला आणि आठवला. डोळ्याचे पाते लवायच्या आत तो पाटलांच्या पुढे होऊन छातीखोरपणे म्हणाला,

'आल्लाबकस! आल्लाबकसच हाये ना तू?' सरदार चमकला.

'आरेऽऽ मी कचरू. कचरू वाघिले- महार. तुपला दोस्त. आपल्या
दोस्ताचीच गांड माराया आला का काय तू हरामखोराऽऽ'

त्या क्षणी अघटित ते घडले. पेंढारी लोकांचा सरदार कचरू महाराला शरण आला. शस्त्र त्याने हाती घेतलेले नव्हतेच. पण तो उभ्या जागी वाकला. त्याने पाटलाला कुर्निसात केला. म्हणाला, 'या दोस्तासाठी जान कुर्बान आहे पाटील. आणि बोल दोस्ता, तुला पण कुर्निसात करतो मी.'

पाटलाला कळेना. कोणालाही कळत नव्हते. कचरू खाली उतरला. त्या दोघांनी एकमेकांना मिठ्या मारल्या. सरदार त्याच्या लोकांना म्हणाला, 'आपण मिळवलेले सगळे इथे पाटलाच्या वाड्यासमोर ठेवा. ज्यांचे जे आहे ते त्यांना घेऊन जाउद्या. आपल्याला इथून काहीही घेऊन जायचे नाहीय. टाकलेल्या सामानाची व्यवस्था पाटील करतील. आपण सगळे बाहेर पडा. मी नंतर येतोय. हा माझा हकूम आहे.' झाले. गोळा केलेला सगळा ऐवज पाटलाच्या वाड्या समोर सांडण्यात आला. पेंढारी निघून गेले. अल्लाबक्ष; त्यांचा मुख्य सरदार, तेवढा राहिला. त्याचे आणि कचरू महाराचे काय गुट्टू' झाले हे कोणालाही कळले नाही. सगळे टरकलेले लोक. ऐकण्यात रस कोणाला असणार? नंतर रानातून आलेला जानराव त्यांना सामील झाला. ते तिघेही पाटलांच्या वाड्यात गेले. काही दिवस उलटल्यावर तो अल्लाबक्ष पेंढारी त्याच्या कुटुंबकबिल्यासह गावाच्या वेशीवर आला तेव्हा वाजंत्री लावून त्याला मिरवणुकीने गावात आणण्यात आले. थोरले पाटील म्हणाले, नाहीतरी गावात मुसलमान नव्हताच. मुसलमानाखेरीज गाव अपुरेच. आता हा आला आणि गाव पुरे झाले.

अर्थात, हे सगळे इतक्या सरळ मऊपणे पुढे गेले नाही. साल्पी गावातील पेंढारी लोकांचे येणे आणि लूट न घेताच निघून जाणे याची कथा दुमदुमली. तालुक्याहून लोक आले.

माहिती घेऊन गेले. नंतर जिल्ह्याहून लोक आले. दस्तूरखुद्द लेसिंग साहेब बहादूर आले. ते आधी थेट जानराव सातपाटील याच्या वाड्यावर धडकले. नतर जानराव आणि कचरू वाघुले; महार हे त्यांना घेऊन थोरल्या पाटलांना भेटण्यासाठी त्यांच्या वाड्यावर गेले. तिथे पाटील म्हणाले, अल्लाबक्ष यांस आम्ही आमच्यात घेतले आहे. तर लेसिंग साहेब बहादूर म्हणाले, 'चौकशी करून निवाडा करावा लागेल. आपण निर्णय घेतला आणि विषय संपला असे होणार नाही.' तेव्हा केरोपंत कुलकर्णी पाटलांना म्हणाले, 'मी सारे आपणास हवे तसे करतो. मी अल्लाबक्ष यांस घेऊन जिल्ह्यास जाईन. आणि आपणास हवा तसा निवाडा करून आणीन.' पाटलांची तशी मान्यता मिळताच ते लेसिंग साहेब बहादूर यांना नम्रपणाने म्हणाले, 'आपली आज्ञा शिरसावंद्य. अल्लाबक्ष आणि मी आपण सांगाल तेव्हा जिल्ह्यास येतो.' तसे ते गेले. आणि केरोपंत यांनी आपले सारे कौशल्य पणाला लावून सगळा मजकूर पोर्तिंजर साहेब कलेक्टर बहादूर यांस विदित केला. अल्लाबक्ष यांस माफी देणे, इतकेच नाही तर त्यांस काही इनाम देणे हे पेंढारी यांचा बंदोबस्त करताना एक उदाहरण म्हणून कसे योग्य होईल, हे त्यांनी साहेब मजकूर यांस पटवून दिले. आणि गायरानातील दहा एकरांचा तुकडा अल्लाबक्ष यांस इनाम मिळवून दिला. सबब अल्लाबक्ष पेंढारी हे अल्लाबक्ष इनामदार झाले. आणि लोक त्यांना त्या प्रकारे पुकारू लागले. या सगळ्या प्रकरणात केरोपंत कुलकर्णी हे थोरले पाटील आणि जानराव सातपाटील यांना अधिक प्रिय झाले आणि उत्तरोत्तर अधिक तसे होत गेले, हे ओघानेच होय. तेणेकरून केरोपंत यांचे अंतःकरणास विशेष संतोष आणि स्थैर्य मिळाले, हा एक उत्तम अनुषंग म्हटला पाहिजे.

5

ह्या सगळ्यात जानराव सातपाटील याचे कौटुंबिक आयुष्य पुढे जात होते ; ज्याला आपण पुन्हा आपल्या कुतूहलाच्या केंद्राशी घेणे आवश्यक आहे. कारण आपल्या कथेचे खरेखुरे केंद्र तेच आहे. आणि कितीही इकडे तिकडे आपण गेलो तरी मूळ गाभ्याशी येणे ही आपण आपली गरज मानली पाहिजे. जानरावाने लेसिंग साहेबाशी अधिक घसट वाढवली नाही. साहेब आणि दूधवाला या स्वतःच्या निवेदनावर इतरांसाठी तो कायम राहिला. तो पुढच्या सा-या आयुष्यात कधीही भीमबाईला भेटला नाही. नंतर लेसिंग साहेब यांची आणखी कुठे तरी बदली झाली. त्यामुळे तो प्रश्न आणखी नीट मार्गी लागला. जानराव याच्या आयुष्यात बाकी काही घडामोडी घडल्या, ज्या खास किंवा विशेष म्हणाव्या अशा नव्हत्या. पण आयुष्यात अनेकदा अशा साध्या, नेहमीच्या किंवा नित्यक्रमाच्या घडामोडी कधी कधी जगणेच बदलून टाकण्याइतक्या प्रमाथी होऊन जातात. त्यांचे कोणत्याही टप्प्यावर काहीही लक्षात आले, तरी आपण त्यांच्यासंबंधी काहीही करू शकत नाही, असे त्याचे काहीसे झाले.

तर झाले असे की रखमाजी पंधरा वर्षे वयाचा झाला. आणि झमबाई दहा वर्षे वयाची झाली. तेव्हा साहजिकच दोघांसाठी सोयरिका पाहणे हे जानराव याच्यासाठी एक महत्त्वाचे काम होऊन बसले. पैकी रखमाजीसाठी गावातीलच एक रावजी तोडमल म्हणून होते; त्यांची मुलगी सून म्हणून जानराव याने पसंत केली. ते तसे जानराव आणि सरूबाई

यांनी केले असे म्हणूया. कारण तिनेही ती मुलगी पाहून होकार दिला तेव्हाच ती बाब पुढे नेण्याचे जानराव याने मनावर घेतले. रखमाजी यास मुलगी दाखविण्याचा प्रश्नच नव्हता. तशी रीत नव्हती. आणि गावातली असूनही रखमाजी याने ती पाहिलेली असण्याची शक्यता क्षीण होती. याचे कारण त्याला फक्त रानात, शेतात असलेला रस एखाद्या घाण्याला जोडलेल्या बैलाइतका झापडबंद आणि संपूर्ण होता. ही मुलगी रीतभात समजणारी गोरीपान आणि मर्यादशील होती, असे सरूबाईचे मत झाले. बाकी नातेसंबंध वगैरे गोष्टी तशा क्षीण होत्या. तोडमल हे मुळात चाळीसगाव भागातले. तिकडे आधी कसला सोयीरसंबंध? पण त्याने काहीही बिघडत नाही. नव्या देशात नवी नाती जोडताना इतका विचार नसतो करायचा. तोडमल यांनी तरी तो कुठे केला होता? जानराव सातपाटील यांनी आपल्या लेकीला मागणी घातली, या घटनेवरच ते खूष होते. म्हणाले, 'द्याज काहीच देऊ नका. पोरगी उचलून घेऊन जा. आरे महाट्याला महाटा मिळाला अन् मनगटाला मनगट मिळालं की झाली बात. बाकी काय पाहिजे?'

ह्याच सुमाराला जानराव यास एक गोड बातमी समजली, ती अशी की त्याची स्त्री; सरुबाई ही गर्भिणी आहे. ती त्या जोडप्याच्या दृष्टीने एक असाधारण घटना होती. खरे तर ती कोणाच्याही नजरेत तशी म्हणावी अशीच घटना होती. झमबाईच्या जन्मानंतर दहा वर्षांनी; इतक्या उशिरा सरूबाई पोटुशी राहिली होती. ज्यांना कळले त्या बाया, 'काय बया, इकती वरीसं कायच नायी. आन आत्ता हे काय ह्या वयात? आझुनयबी संसार करित्या का काय?' असे म्हणून सरूबाई हीस हसू लागल्या. देशी भाषेत संसार याचा अर्थ संभोग. आता, जानराव किंवा सरूबाई यांचे फार काही वय झालेले नव्हते. अगदी चाळीशीत सुद्धा बायांना मुले होत असत. त्यात हे जगावेगळे अजिबातही नव्हते. पण इतक्या वर्षांचा खाडा पडून सरूबाई पोटुशी राहिली याचे अप्रूप बायांना होते. आणि त्या कौतुकाने बोलत होत्या. एरवी पाळी जाईपर्यंत सतत मुले होत राहणे ही साधारणतः सगळ्या बायांसाठी आम रोत होती. अगदी खंडीवर पेंढी झाल्याची म्हणजे एकविसावे अपत्य झाल्याची घटना सुद्धा घडत असे. आणि, बाकी संसार तर काय; जोडप्यांना जितका टिकवता येतो तितका टिकतो, चालू राहतो. त्याच्या गोष्टी कोणी जाहीर थोड्याच बोलत असतात? तरीही सरूबाई मनातल्या मनात लजित होत असे, की बाबा आपल्या लेकाच्या लग्नाच्या गोष्टी चालल्या आहेत. अन् आपण इकडे पोटुशी आहोत! पण त्याच वेळी ती फार आनंदात सुद्धा दिसत होती. हृदयात आनंद म्हणून पोटात आनंद, ओठात आनंद, असे सगळे चालू होते. त्यातच एके दिवशी म्हातारे थोरले पाटील जानरावाच्या घरी आले. हा म्हातारा पाटील आपला स्वतःचा वाडा सोडून गावात अगदी क्वचितच कोणाच्या घरी गेला असेल. किंवा जवळपास नसेलच. तर ते आले आणि जानराव यांस अत्यंत नम्रतापूर्वक म्हणाले, 'जानबा तुपली लेक मपल्या नाताला देतोस का? म्हंजी म्या माघीतलं तिला मपल्या नातासाठी; त तू ते ऐकनार हायेस का?'

जानराव याच्या मनात थोरले पाटील यांच्या येण्याचे गुरुत्व आणि गांभीर्य आधीच पोहोचले होते. त्यांचा प्रस्ताव ऐकून त्याने सहज मान होकारार्थी हलवली.

'म्हंजी आमचं गनबा पाटील तुपल्यावानी चलाक आन गुलाम नायी. पन नातू तसा आरभाट निघन आसा आदमास हाये मपल्यावाला. आज्याचे गुन नातवात उतरतेत आसे

म्हंत्यात लोकं. मलाबी तसं थोडसंक दिसातं. म्हनून मी आलो. तुपली लेक लय आदिक हाये म्हंत्यात.'

आपली लेक फार आदिक म्हणजे अत्यंत वेगळी आणि असाधारण सुंदर असे इतके जानराव याला त्याच्या आधी कधी वाटले नव्हते. ते लोकांना तसे वाटते आणि कोणीतरी पाटलांना तसे सांगितले आहे, हे त्याच्या लक्षात आले. तो म्हणाला, 'तुम्ही मला लाजवू नका. पोर तुमची

झाली असे समजा.'

हा मजकूर जेव्हा जानराव याने आपली पत्नी सरुबाई हीस सांगितला तेव्हा ती तितकी खूष झाली असे त्याला वाटले नाही. कारण तिने ते ऐकले आणि ती त्यावर काहीच बोलली नाही. पाटील हे खोपडे; त्यांचा घराणा देशमुखांचा; याच्याशी तिला काहीही घेणेदेणे नव्हते. तिच्या नजरेत तिची लेक तर फक्त राजाची राणी होण्यासाठी जन्माला आलेली होती. आणि पाटील हे काही राजे वगैरे नव्हते. कोणता तरी राजकुमार घोड्यावर बसून आपल्या लेकीला मागणी घालायला येणार आहे, असे मनात घोकून घोकून ती त्या वास्तवाचा इतका अविच्छिन्न भाग झालेली होती की वेगळ्या कोणत्याही वास्तवास तिच्या लेखी काहीही किंमत उरलेली नव्हती. आपल्या लेकीला हे तिने सांगितलेले होते. आणि तिची लेक तर आपले सगळे आयुष्य हे एक गोड स्वप्न आहे, अशाच प्रकारे जगत होती. ती एखाद्या सुकुमार परीसारखी होती. कोणत्याही दुःखाचा कोणताही स्पर्श तिला कधीही झालेला नव्हता. तसा तो होणार नाही याची सरूबाई हिने कायमच काळजी घेतलेली होती. पण हे कधीही तिने जानराव यास सांगितलेले नव्हते. त्याची गरज तिला वाटलेली नव्हती. किंबहुना, झमबाई हिच्या आयुष्यात जे घडणार आहे ते घडणारच आहे, त्यासाठी कोणाशी ; अगदी आपला नवरा जानराव याच्याशी सुद्धा काही बोलावे असे सरूबाईस वाटले नव्हते. जे घडणार आहे, ते आपल्याला माहीत आहे, तर त्याची चर्चा कशाला; असा विचार कदाचित तिने केला असेल. किंवा आपल्या लेकीसाठीचे स्वप्न पाहताना हळूहळू तीही स्वप्नात जगायला लागली असेल, किंवा तिच्यापुरते जगणे हेच अविच्छिन्न सुंदर स्वप्न तिच्यासाठी झाले असेल. किंवा आणखी टोकाचे म्हणजे, कदाचित आपले प्रत्यक्षात न आलेले स्वप्न तिने आपल्या लेकीत संक्रमित केलेले असेल. म्हणूनच थोरल्या पाटलांनी आपल्या नातवासाठी आपली लेक झमबाई हीस मागणी घातली ही गोष्ट तिला तिच्या स्वप्नवत जगण्यात केवळ अडथळाच वाटली असेल. खेरीज काहीतरी होईल आणि हा अडथळा पार केला जाईल असा दृढ विश्वास तिला वाटला असेल.

हे एकाच वेळी इतके सुख देणारे वर्तमान; मुलाची सोयरीक जमणे, लेकीसाठी थेट थोरले पाटील यांनी मागणी घालणे आणि सरूबाई पोटुशी राहणे यांजमुळे जानराव याचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. सरूबाई हीस सुद्धा वेगळे काही वाटत नव्हते. थोरल्या पाटलांचा नातू हा आपल्या लेकीसाठी स्वप्नातला राजकुमारच नाहीय; पण काही तरी नक्कीच घडेल आणि तो घोड्यावर स्वार झालेला राजकुमार येईल याची तिला खात्री पटलेली होती. तेवढे एकच तिच्यासाठी घडलेले नव्हते. पण ते घडणार याची तिला खात्री होती. झमबाई ही परीकथेतील राजकुमारी होती. आणि तिच्यासाठी परीकथेतील राजकुमार घोड्यावर स्वार होऊन येणार, याबाबत ती तिच्या स्वप्नांच्या दुनियेत निश्चित

होती. जानराव यास या मायलेकींची दुनिया जवळपास माहीतच नव्हती. थोरल्या पाटलांना आपण हो म्हणून बसलो आहोत आणि आपल्या पत्नीला ते तितके पसंत नसावे, असा समज करून घेत त्या संबंधाने त्याच्या हालचाली मंदावल्या होत्या. खेरीज जमलेले रखमाजीचे लग्न पार पाडायचे होतेच ना. दरम्यान आपल्या पत्नीसही पाटलांशी होणारी सोयरीक मान्य होईल, किंवा तिच्या मनात काही किंतु असल्यास तो काढण्यासाठी तिच्याशी बोलता येईल असे त्याने ठरवले होते. पाटलांना दिलेला शब्द मोडणे त्याला शक्य नव्हते. तसे काहीही कारण त्याला दिसत नव्हते.

दरम्यान रखमाजीच्या लग्नाच्या निमित्ताने करंजे येथून सातपाटील मंडळींच्या तीन बैलगाड्या भरून आल्या. पुरुष, बाया, लहान-मोठी लेकरे यांनी जानराव याचे साल्पी येथील घर गजबजून गेले. आफुबाई अन् काळीबाई अर्थातच नव्हत्या. त्यांची वये आणि आपले घर सोडण्याची अनिच्छा, यामुळे ते स्वाभाविक होते. बाकी आलेली मंडळी जानराव याचा वाडा, शेती, गावातील स्थान यांजमुळे प्रभावित होऊन गेली. सरूबाईच्या सगळ्या धाकट्या सख्ख्या आणि चुलत जावांनी तिच्या पोटुशी असण्याच्या निमित्ताने हास्यविनोद भरपूर केला. ते सगळे प्रेमाचे होते. ते नाकातल्या नथीवर मूठ ठेवून खुसूखुसू हसण्याची झालर पांघरलेल्या मित शब्दांनी प्रकट होणारे असे होते. सरूबाईही अशा वेळी आपल्या नथीवर मूठ पालथी घालून खुसूखुसू करत असे. लग्नाच्या आधी आणि नंतर मिळून जवळपास महिनाभर ते सारे साल्पीत राहिले. आपल्या कुळीची एक शाखा इकडे, इतक्या लांब चांगली रुजली आहे, याची त्यातल्या शहाण्या भावांना खात्री पटली. इतक्या लांब वारंवार येणेजाणे मुश्कील असते. त्यामुळे काही पिढ्या गेल्या की कुळी तुटक होऊन जातात. आणखी काही पिढ्यांनंतर तर काहीच संबंध उरत नाही. या अशा गोष्टी त्यांच्यापैकी अनेकांच्या मनात येत राहिल्या.

करंजे येथील मंडळी परत गेली. त्यांच्यासोबत घरातली गजबजही गेली. आता नेहमीची मोजकी माणसे आणि त्यांची दुनिया. एक तोडमलांची मुलगी सून होऊन आलेली तेवढी वाढली. त्या मुलीचे नाव समिंदरा. माहेरी तीस समाबाई म्हणत. तेच नाव सासरी राहिले. पुढे काही एक दुःखद प्रसंग घडून गेल्यानंतर अचानक सरूबाईने तिला समिंदरा अशी हाक मारायला सुरुवात केली. पण तसे ती एकटीच पुकारत असे. बाकी सगळ्यांसाठी ती समाबाईच राहिली. समाबाई गोरीगोमटी होती. लग्न ठरल्यावर आपोआपच खेड्यातील मुली सर्वांगी उमलून येत फुलानी डवरलेल्या झाडांसारख्या उत्सुक होतात, तशी ती अमाप झालेली होती. शेजेचे सुख अजून तिच्यापासून कदाचित दूर होते. पण त्याच्यासाठी ती तिच्या नकळत मोहोरून आलेली होती. सतत रानात राबणारा रखमाजी आता घरात अडमडू लागला होता. ते त्याला नीट जमत नसे. एखाद्या गोंधळलेल्या बैलासारखा तो घरात इथे तिथे जाई. पण इथे कुठेच आपले काहीही काम नाहीय अशी जाणीव होऊन रानाच्या रस्त्याला लागे. हे लक्षात येऊन समाबाई हिचे मन आणि शरीर आणखी मोहरून येत असे. आणि ती मनातल्या मनात स्वतःशी हसत असे.

रखमाजीचे लग्न उरकले आणि सरूबाई आपल्या लेकीसह तिच्या स्वप्नांच्या दुनियेत अलगद शिरली. आपल्या जन्मापासून झमबाई आणि तिच्या जन्मापासून सरूबाई या मायलेकी कायमच त्या दुनियेत होत्या. ती त्या दोघींची खासगी दुनिया होती. ती

उत्तरोत्तर अधिक भक्कम होत गेली होती. इतरांच्या असण्यामुळे त्यात विक्षेप येत नसे. तसेच इतरांनाही त्यांची इतकी वेगळी काही दुनिया आहे असे लक्षात येत नसे. त्या दोन्ही विश्वात कसलाही टकराव नव्हता. आपल्या खासगी दुनियेच्या बाहेर आम दुनियेकडून अपेक्षित असलेल्या सगळ्या गोष्टी त्या दोघीही नेटकेपणाने करत. मग कोणाला तक्रारीला जागा कुठून राहील?

रखमाजीच्या लग्नाला दोनेक महिने उलटल्यावर संधी पाहून जानरावाने सरूबाईला विचारलं,

'थोरल्या पाटलांना काय सांगायचं?' 'काह्याचं?"

'हेच आपलं ते- नायका, ते आपल्या घरी आले होते. त्यांच्या

नातासाटी आपली पोर माघत होते.'

'नाय नाय. तिला न्हेयाला दूरदेसचा राजकुमार येनार हाये.' 'आसं कधी झालंय? छ्या,छ्या.' 'ते ठरल्यालं हाये.'

'कोनी ठरावलं?' 'ते आंधीपसूनच ठरल्यालं हाये.'

सरूबाई इतक्या सहज आणि शांत ठामपणे ते सांगत होती की जानरावच गोंधळून गेला. आपल्या बायकोच्या डोक्यात हे कसलं खूळ घुसलंय, ते त्याला समजेना. हा कोण दूर देशीचा राजकुमार आणि हे सगळं आहे काय? आणि इतक्या ठामपणे आपली बायको असं म्हणतेय याचा अर्थ काय? तिचं डोकं फिरलंय की काय? पण ती तर सगळी कामे अगदी नीटनेटकी करतेय. बायको, आई, सासू म्हणून कोणत्याच जबाबदारीत ती कमी पडत नाही, पडलेली नाही. आता, इतक्या वर्षांनी गरोदर राहिलीय. लग्नात, पाव्हण्या-रावळ्यात; सारीकडे ती किती छान वावरली. आणि हे काय? त्याला वाटलं, आपण पुन्हा कधी तरी तिला समजावून सांगू, की बाई, हे असं काही नसतं. जुन्या काळी कदाचित झाल्या असतील अशा गोष्टी. त्याही अगदी क्वचित. पण कायम त्या तशा थोड्याच होतात? आणि आता तसे राजेही राहिलेले नाहीत. खळ्याच्या दिवसात किंवा इतर राखणीच्या निमित्ताने रानात शेकोटीभोवती बसल्यावर अनेक म्हातारे भुताखेतांच्या गोष्टी सांगून सगळ्यांना जागे ठेवतात. म्हाताऱ्या बायका लहान्या पोरापोरींना झोपी लावण्यासाठी चिमणीकावळ्यांपासून हरत-हेच्या गोष्टी सांगतात. त्यांच्यातल्या काहीत असतात असले राजकुमार. जानरावानेही ऐकलेल्या होत्या दोन्ही प्रकारच्या गोष्टी. पण म्हणून त्या खऱ्याच असतात असं थोडंच? गोष्टी गोष्टींच्या जागी, जगणं जगण्याच्या जागी असतं. हे आपल्या इतक्या समझदार बायकोला तिच्या या वयात कळत नसेल हे कसं शक्य आहे?

काही दिवस जाऊन देऊन त्याने पुन्हा तो विषय तिच्याशी छेडला. उत्तर तेच. आणि ठाम. ते बोलताना तिच्या चेहऱ्यावरच्या रेषाही ठाम आणि संपूर्ण. जानरावाच्या लक्षात आले, आपली ही बायको नेहमीचीच आहे. पण हा विषय निघाला की ती वेगळी होते. तिथे ती ठाम आहे. तिथे तडजोड नाही. झमबाईचा विषय हा तिचा खासगी विषय आहे. तो निघाला की ती वेगळी होते. ती एका वेगळ्याच भावनिक तंद्रेत जाते. त्याला भयंकर धक्का बसला. एवढे सगळे आयुष्य एकत्र जगून हे आपल्याला कसे लक्षात आले नाही, याचे त्याचे त्यालाच आश्चर्य वाटले. हे एकाएकी झालेले नाहीय. हे खूप आधीपासून, कदाचित झमबाई हिच्या जन्मापासूनच सुरू झालेले आहे, आणि ते आपल्याला कळलेले नाही, या ज्ञानाने तो

गोंधळून गेला, चकित झाला. त्याने झमबाईशी; आपल्या लेकीशी संवाद करण्याचा प्रयत्न केला. संवादात ती ठीकठाकच होती. पण ती जगण्यातल्या सगळ्या गोष्टीपासून, कुटुंबापासून, नात्यापासून पूर्णतः सुटी झालेली होती, हे त्याच्या लक्षात आले. ती एखाद्या फुलपाखरासारखी तिच्या एका वेगळ्याच दुनियेत जगत होती. हे आपल्याला कधीच कळले नाही, आपल्याला त्याची गरजच कधी भासली नाही, आणि आता तर तिचे हे सगळे विश्व आपल्या सगळ्यांपासून पूर्णतः सुटे होऊन एका वेगळ्याच मूर्ख स्वप्नांच्या दुनियेत स्थिरावलेले आहे, याच्या दर्शनाने तो विद्ध झाला. तिचा संवाद तिच्या आईशी कदाचित असेल. किंवा तो नक्कीच असेल. तिची आई तिच्यासाठी नेहमीच सहजपणे त्या दुनियेत शिरत असेल. ती फक्त त्या दोघींची दुनिया होती. आणि ती दुनिया आपल्या डोळ्यांसमोर घडत असताना ते आपल्या लक्षातच आले नाही, या जाणिवेने तो आणखीनच व्याकूळ झाला. त्याच्यासाठी हे भयंकर होते. असे काही प्रश्न असू शकतात, याची कल्पनाही त्याने याच्या आधी केलेली नव्हती.

जगताना पेच असतातच. पण मग त्यांच्यातून सुटण्याचे मार्गही असतातच. पण या अशा प्रकारचा चमत्कारिक पेच जानरावाला आधी कधीही पडलेला नव्हता. अशा प्रसंगात देवलशी उर्फ देवऋषीकडे म्हणजेच भगताकडे जाण्याची प्रथा होती. आपण आपला प्रश्न सांगायचा. भगताच्या अंगात वारे येणार आणि तो सांगणार, झाडांना अमक्या अमक्यांनी झपाटलेले आहे. त्यांना बाहेर काढावे लागेल. त्यासाठी अमुक अमुक करावे लागेल. ज्यांनी झपाटले असते, त्यांना बाहेर काढण्यासाठीच्या प्रथा फार क्रूर होत्या. भगत झाडाला म्हणजे व्यक्तीला निघृणपणे चाबकाने फोडून काढत असत. ज्याने झपाटलेले आहे त्याला, म्हणजे कोणत्यातरी भुताला वा आत्म्याला शिवीगाळ देत बाहेर काढण्यासाठी अशा यातना असत. पण त्या प्रत्यक्षात झाडांना म्हणजे उदाहरणार्थ, सरूबाई आणि झमबाई यांना त्या सोसाव्या लागल्या असत्या. आपली गरोदर बायको आणि आपली कोमल सुंदर लेक यांना त्या सोसाव्या लागण्याची कल्पनाही तो करू शकत नव्हता. मुख्य म्हणजे त्या दोघीही एरवी अगदी नेहमीसारख्या व्यवस्थित वागणाऱ्या होत्या. त्यांना कशानेही झपाटलेले नव्हते, हे जानराव याला दिसत होते. मग भगताकडे जायचे कशासाठी आणि त्याला सांगायचे काय, हा त्याचा स्वतःलाच पडलेला प्रश्न होता. एका विशिष्ट बाबतीत त्या दोघींनी एक घट्ट काल्पनिक दुनिया तयार केलेली होती. त्या एकाच बाबतीत त्यांना त्या दुनियेतून बाहेर कसे काढायचे हा त्याचा प्रश्न होता. त्याबाबत घरात आणि बाहेर कोणाशीही बोलणे शक्य नाहीय, हे त्याला कळत होते. घरात रखमाजीस ते माहीत नव्हते. सुनेला माहीत असण्याची शक्यताच नव्हती. मुळात जानराव यास अगदी अपघातानेच ते कळले होते. तेही इतक्या उशिरा.

त्याला वाटले, देवांच्या पायाशी डोके ठेवू. दुसरे करण्यासारखे काहीही नाहीय. घरात देवांचे टाक आहेत. रंगनाथ उर्फ लंगडा बाळकृष्ण आहे. पूर्वजांकडून आलेली आणि आपण हौसेने आणलेली विठोबा-रखुमाई यांची मूर्ती आहे. आपण नित्यनेमाने रोज त्यांची पूजा करत असतो. पण आता हे घरात करण्यापेक्षा त्या त्या ठिकाणी सारे कुटुंब घेऊन जाऊ आणि करू. नाहीतरी घरात लग्न झाले की खंडोबाला भेटण्यासाठी जेजुरीला जावेच लागते. जागरण- गोंधळ करावाच लागतो. आपण सरळ बैलगाडी काढू. पंढरपूर,

तुळजापूर, गाणगापूर, जेजुरी; सगळे यथासांग करून परत येऊ. देवांसमोर माथा टेकून करुणा भाकल्याने काही होईल सुद्धा. त्याने अशी कल्पना मांडल्यावर सरूबाई खूष झाली. तिनेच लेकीला आणि लेका सुनेला ते उत्साहाने सांगितले. तो मोठा दौरा होता. पण तो करायचाच असे जानरावाच्या मनाने घेतले. पंढरपूर येथे विठोबाचे देऊळ वेगळे आणि रखुमाईचे वेगळे हे पाहून सरूबाईच्या डोळ्यात प्रकटलेली नाराजी जानरावाच्या नजरेतून सुटली नाही. पण जेजुरी येथे ती फार खूश झाली. जागरण-गोंधळात खंडोबाच्या दोन्ही लग्नाच्या गोष्टी ऐकत असताना तिचे डोळे विशेष तेजाने लकाकले होते, हेही त्याच्या नजरेतून सुटले नाही. झमबाई सारीकडे नेहमीची, मासूम परीसारखी नाचत आणि हसत होती. तिच्या स्वप्नाच्या दुनियेत ती मश्गुल होती. आणि तेच तिचे वास्तव होते. तिच्यासाठी वेगळे कोणतेही वास्तव शिल्लकच नव्हते. रखमाजी आणि समाबाई खूषच होते. पण ते सरळ साधे लोक कोणत्याही प्रश्नांच्या परिघात नव्हते. जानरावाने सगळे मनोभावे केले. या अनाकलनीय आणि दुर्लंघ्य संकटातून देवांनी आपल्याला सोडवावे, अशी त्याने करुणा भाकली. पण परतल्यावर त्याच्या लक्षात आले की सगळे आपल्यापल्या ठिकाणी आहे तसेच आहे. त्यात काडीचाही बदल झालेला नाही. पण काहीतरी होईल. आपण कधीही कोणाचेही वाईट केलेले नाहीय, तसे मनात चिंतलेले सुद्धा नाहीय. तर ईश्वर दयाळू होऊन आपल्यासाठी काही तरी मार्ग काढीलच अशा श्रद्धेने तो वावरत राहिला. त्याच्या अंतर्यामीचा धसका अर्थातच संपलेला नव्हता. एक प्रकारची हताशा होतीच. पण या पल्याड आपण काहीही करू शकत नाही, हे त्याला कळले होते.

दरम्यान सरुबाईचे दिवस भरत आले. तोडमलीणबाई; समाबाईची आई, थेट सातपाटलांच्या वाड्यावरच मुक्कामी आली. ती भरपूर लेकरेबाळे झालेली अनुभवी स्त्री होती. खूप वर्षांच्या अंतराने आलेले सरूबाईचे बाळंतपण. साहजिकच सगळे काळजीत आणि जय्यत तयारीत होते. कचरू महाराची बायको सुंद्राबाई ही गावातील सर्वांत कुशल सुईण. आणि हे तर तिच्या दृष्टीने तिच्या घरचेच बाळंतपण. कचरू आणि जानराव यांच्या मैत्रीच्या कैक कथा तिने आपल्या नवऱ्याकडून ऐकलेल्या. गावातली जातीपातीची व्यवस्था कोणाला मोडता येतीय? पण अंतरीचा जिव्हाळा त्या दोघात अन् अल्लाबक्ष इनामदार यांच्यात कायम होता, हे तिलाही माहीत होते. ती रोज यायची अन् बारीक सारीक सूचना करत राहायची. अखेर ती 'काळजी करू नको सरूबाई. तुपलं बाळ फुलासारकं भायेर कहाडीन मी.' असं सांगायची. आणि एके दिवशी संध्याकाळी सरूबाई सुखरूप बाळंत झाली.

सुंद्राबाई म्हणाली होती तसं तिने ते बाळ फुलासारखं बाहेर काढलं. ती खास विशेष अशी गोष्ट होती. कारण बाळ फारच गोंडस होतं. तिच्या इतक्या वर्षांच्या अनुभवात सुंद्राबाईने जन्मतःच इतकं बाळसं असलेलं बाळ पाहिलेलं नव्हतं. नंतर साफसूफ करून त्याला त्याच्या आईच्या शेजारी ठेवलं, तर त्याने नेमक्या आणि मोजक्या हालचाली करत आपल्या आईचा स्तन बिनचूक शोधून काढला आणि ते तिथं लुचायला लागलं. बाळाला बघायला आलेल्या जानरावाला, तिच्या नवऱ्याला, सरूबाई म्हणाली, 'मी अल्लाबक्ष इनामदार याच्या घराजवळच्या पीराला नवस बोलले होते. तुम्ही त्याच्या पाया पडून या. नवस आपण नंतर फेडू.' बाळाला बघून खूष झालेला जानराव अर्थातच तिकडे गेला.

पुत्रजन्माचा आनंद म्हणून गावभर, वाड्यावस्त्यांवर शेरणी वाटण्यात आली. पहिला मान अर्थातच पाटलांचा. जानराव थोरल्या पाटलांना म्हणाला, 'ह्यो योक खटका मिटला आता. पोराचं लगीन झालं. आता ह्ये पन चांगलं झालं, ल्योक जल्माला आला तुमच्या आसीवादानी. उरला लेकीसाटीचा तुमचा सब्द झेलायचा. त्या कामासाटी मोकळा झालो आता मी.'

"ते काय इषय नायी. बरं हाये. चांगलं हाये.' पाटील आनंदून म्हणाले.

पाटलांनी घरी येऊन झमबाईसाठी शब्द टाकल्याला बरेच महिने होऊन गेले होते. मधल्या काळात त्या मानी म्हाताऱ्याने पुन्हा शब्दानेही विचारलेले नव्हते. जानरावही काही बोलला नव्हता. त्याची कारणे वेगळी होती. पण ते तो त्यांना कसे सांगणार? आणि दिलेला शब्द मोडणे ही मन्हाट्यांची रीत नव्हती. हे बाळ जन्माला आल्यावर कदाचित संपेल हेका आपल्या बायकोचा; असे त्याला वाटत होते.

जानरावला जे वाटत होते, ते फार अनाठायी नव्हते. कारण सरूबाई या नव्या बाळाच्या जन्माने मोहोरून गेलेली होती, हे त्याला दिसत होते. कदाचित त्याच्यामध्ये ती तिच्या स्वप्नातला राजपुत्र बघू लागली असेल. तिचे तसे करणे त्याला तितके धोकादायक वाटत नव्हते. तो खूप नंतरचा प्रश्न होता. आणि भविष्यात हाताशी असलेल्या दीर्घ काळात त्यावर काही ना काही मात्रा शोधणे आपल्याला शक्य होईल, असे त्याला वाटत होते. बाळाच्या जन्माने मोहोरलेल्या आपल्या आईला बघताना झमबाई आधी काहीशी बावरलेली होती. नंतर ती आपली भावजय समाबाई हिच्यासोबत अधिक राहू लागली होती. घरातल्या आणि बाहेरच्या सगळ्यांशी अधिक संवाद करू लागली होती. मुख्य म्हणजे ती आपल्या आईपासून सुटी होऊ लागली होती. या एका पुत्राच्या जन्माने आपली पत्नी आणि आपली स्वप्नात जगणाऱ्या परीसारखी लेक यांच्यातले ते वेडपट आणि चमत्कारिक ठाम रहस्य विरळ होऊन जाताना बघताना, तसे जाणवताना, जानरावाच्या मनात सगळे ठीकठाक होण्याच्या आशेला कोवळ्या पालव्या फुटू लागल्या होत्या.पीराला नवस करून झालेला म्हणून बाळाचे नाव पिराजी ठेवण्यात आले होते. पिराजीच्या जन्माचा उत्सव साजरा करण्यासाठी करंजे येथून जानराव याचे आईवडील येऊन गेले. ते चांगले महिनाभर राहून परत गेले. बाकी कोणीही आले नव्हते. जानरावला वाटले, रहिवास बदलला की कुळी तुटक होते, हेच खरे. पुढे आणखी काही भले-बुरे झाले तर कदाचित कोणीही येणार नाही. तो जगण्याचा कायदा आहे. आणि आपल्याला तरी कुठे करंजे येथील आपल्या गोतावळ्याच्या तितक्या आठवणी येतात? कुळी दुरुस्त पण अंतर हे अधिक सत्य. त्याचे दु:ख बाळगायचे कारण नाही. आपल्या सुखदु:खाला आपण बांधील, त्यात फार लोक सामील नाहीत, हे काही फार वाईट नाही, असे त्याला वाटले. मुख्य म्हणजे, तो त्याच्या स्वत:च्या प्रश्नात गुरफटलेला होता. आणि ते त्याला एकट्याने सोडवायचे होते. सरूबाईचे असणे पिराजीने पुरते व्यापून टाकले होते. तिच्या तशा गुंतण्याला झमबाई सरावली होती. घरात नाचत राहण्यापेक्षा आता ती बाहेर अधिक राहू लागली होती. मळ्यातील शेती, नदीकाठची मंदिरे, समाबाईचे माहेर; अशा काही जागात तिने आपल्या मनाचा आसरा शोधला होता. आपल्या लेकीचे बावरेपण संपत आहे आणि ती तिच्या आईपासून अधिक सुटी होऊन दुनियेत स्वतंत्रपणे वावरत आहे, या जाणिवेने

जानराव पुष्कळच सुखावला होता. आपल्या लेकीला तिच्या मूर्ख स्वप्नातून बाहेर काढणे फारसे अवघड नाही. तिच्या आईला तिथून बाहेर काढणे मुश्कील आहे, अशी जानराव याची धारणा होती. आपला लेक पिराजी याच्यात प्रगाढ गुंतून आपली बायको स्वतः होऊन मोकळ्या वास्तवात आलेली आहे, या जाणिवेने त्याला खुला रस्ता दिसू लागला होता.

त्या एका दुपारी रखमाजी नेहमीप्रमाणे रानात, समाबाई त्याच्यासोबत रानात किंवा माहेरी आणि झमबाई तिच्यासोबत, ती असेल तिथे बाहेर. सरूबाई एकटी तिच्या बाळासोबत घरी. पिराजी आता साताठ महिन्यांचा झाला होता. अधिक बाळसेदार. त्याची भूक थोरली. त्याच्या आईचे स्तन्य त्याला अपुरे पडू लागले होते. सरूबाई आणि पिराजी यांना एक गोडसर दुधट डिकामली वास सतत वेढून असे. इतके दिवस होऊनही तो होता. जानराव बाहेरून आला. बायको घरात एकटी. लेकराशी खेळणारी, प्रसन्न. जानराव तिच्या शेजारी बसला. मनातला विषय बोलण्यासाठी ती वेळ आणि परिस्थिती त्याला सगळ्या अंगांनी योग्य वाटली.

'मी काय म्हणत व्हतो?' | 'काय?' 'आपन आता झमबाईच्या सोयरिकीचा इचार कराया पायजे.' 'त्याची काय जरूर नायी.' 'आसं कधी व्हतंय का? मी सब्द धिल्याला हाये थोरल्या पाटलाला.' 'मी तुला आंधीच सांगितल्यालं हाये जानराव.'

तिचा आवाज अचानक बदलला. तो जाड, भरड, अधिकारवाणीचा आणि अत्यंत तुटक स्वतंत्र झाला. ती त्याला थेट जानराव म्हणाली. तशी पद्धत नव्हती. लग्न झाल्यावर आहाणे घेऊन लाजत मुरके घेत मुश्किलीने करण्याची ती अत्यंत कोमल बाब होती. नंतरही फार क्वचित बायका एकत्र आल्या आणि तसा विषय निघाला तर करण्याची ती सुंदर गोष्ट होती. एरवी नवऱ्याचे नाव घेण्याची रीत अजिबातही नव्हती. अगदी एकांतात सुद्धा. अन् थेट अरे-तुरे! 'मी तुला आंधीच सांगितल्यालं हाये जानराव!' त्याला प्रचंड धक्का बसला. त्याची बोलतीच बंद झाली.

'मपल्यासंगती लगीन करून त्वा मपलं वाटुळं क्यालं, ते कैक झालं.'

बाप रे! मी ह्या बाईचं काय वाटोळं केलंय? पण मग हे तिने कधीच आपल्याला सांगितलेलं नाहीय. संसारात कधीही कसलीही अनिच्छा दाखवलेली नाहीय तिने. सगळ्या गोष्टी समरसून बैजवार केल्यात तिने. निदान तसं आजवर आपण समजत आलो. हे भयंकर आहे. फार फार भयंकर आहे.

'म्या काय वाटुळं क्यालं?' त्याने विचारलं. भितभितच विचारलं खरं तर. तिचा स्वर आणि अवतार यांनी तो मुळापासून हादरला होता.

'मला राजाची राणी व्हयाचं व्हतं.' ती म्हणाली.

त्याला भयंकर चंडाळी आली. तो उठला आणि त्याने फाडकन

तिच्या मुस्काडात ठेऊन दिली.

"तुला काय बळंच उचलून आणली का काय म्या? आऽऽ बळजोरी केली तुपल्याव? आन ह्ये सांगायला तीन पोहं व्हयाची वाट पाहिली काय त्वा?' तो म्हणाला.

त्यांच्या आजवरच्या सहजीवनात त्याने कधीही तिच्यावर हात उगारलेला नव्हता. तशी वेळ कधीच आलेली नव्हती. त्याची जरुरी कधीच भासलेली नव्हती. अगदी आता;

तिला मारल्या क्षणीच, त्याला आपलं वागणं फार मूर्खपणाचं वाटलं.

तिला रडू फुटलं नाही. ती एखाद्या दगडासारखी स्तब्ध होती. पण मुस्काडात थप्पड खाणाऱ्या आपल्या आईकडे बघताना, अचानक काहीतरी चुकीचं घडलंय अशा जाणिवेने, तिच्या मांडीवरील पिराजीने जोरदार बोंब ठोकली. जानराव हतबल होऊन ते पाहात असताना समोरून झमबाईला येताना त्या दोघांनीही पाहिली. ती नेहमीची नव्हती. ती अजिबातही नेहमीची नव्हती.

6

तिचे केस विस्कटलेले होते. तिच्या कपाळावरील कुंकवाचा गोल चेंगरून विस्फारलेल्या डोळ्यासारखा प्रश्नांकित फराटे मारल्यासारखा झालेला होता. तिचे डोळे विझलेले मलूल होते. तिच्या लुगड्याचा बोंगा तिच्या अंगावर कसाबसा गुंडाळलेला होता. तिच्या गालांवर अश्रू आणि धूळ एकत्र झाल्याच्या वाळलेल्या भीषण खुणा होत्या. चेहऱ्यावर ओरखड्यांचे लालसर डाग होते. तिचे हात, पाय, चेहरा; सगळीकडे भीषण उद्ध्वस्ततेच्या खुणा होत्या. ती जेमतेम उभी राहिली आणि उभ्या जागी कोसळली. ती एका अंगावर कलली. तिचा उजवा हात करुणा भाकत असल्यासारखा आधी पुढे आला. नंतर तिने आपली मूठ दुर्बल, असहाय्य असल्यासारखी विझवून पालथी घातली. जानराव बसल्या जागी थिजला. सरुबाईने केकाटणाऱ्या पिराजीला आपल्या मांडीवरून बाजूला फेकले आणि ती जखमी वाघिणीसारखी तिच्याकडे धावली. असहाय्य, विद्ध पक्षिणीसारख्या आपल्या लेकीला मांडीवर घेत तिने विचारले, 'काय झालं माह्या बाळा?'

काय झालेय, हे इतके स्वयंस्पष्ट होते की तो प्रश्नच निरर्थक झालेला होता. रडणाऱ्या पिराजीला उचलून छातीशी घेत उभ्या जानरावाच्या काळजाची क्षणार्धात लक्षावधी शकले उडाली होती. काय झालं माझ्या बाळा?, हा स्वर सरूबाईचा होता. धावून जात लेकीला मांडीवर घेण्याची कृती तिची होती. पण काळजातल्या शकलांमधून जानरावाचाही तोच उद्गार होता. आणि काय झालंय, हे ऐकताना, जे झालंय ते स्पष्ट दिसत असल्याने तो प्रश्न निरर्थक होता, हे त्याला जाणवले होते. काळाच्या एका बारक्या बिंदूवर त्याची सारी दुनिया बदलून गेली होती. स्वतःला प्रतिष्ठित केलेला, गावभर आणि आसपास दरारा असलेला तो पुरुष क्षणार्धात हतबल, हतवीर्य, गलितगात्र झाला होता.

सरूबाईने आपल्या लेकीला उचलले आणि ती तिला आतल्या घरात घेऊन गेली. झमबाईला अंथरुणावर झोपवून तिने तिचे लुगडे बाजूला करून पाहिले. रक्ताळलेले होते. सरळच होते. पोरीवर बळजोरी झालेली होती. कोणी केली, काय झाले या नंतरच्या गोष्टी होत्या. ती तरातरा बाहेर आली

आणि नवऱ्याला म्हणाली, 'सुंद्री महारनीला मोहं घालून घेवून या.'

तिने त्याच्या कडेवरील बाळाला आपल्याकडे घेतले. काय झाले, हे त्याला आधीच कळले होते. आता खात्री झाली. त्याच्या अंगातले बळच गेले. पण ते जावू देऊन करतो काय आणि सांगतो कोणाला? अवचित बसलेला धक्का, दुःख, संताप; सगळे आत ठेवत तो बाहेर पडून महारवाड्याच्या दिशेने निघाला. मनात सारा तोच कल्लोळ. त्या क्षणभरात जगणेच बदलले. इतका मातब्बर माणूस. त्याच्या लेकीवर बळजोरी करायची हिंमत कोणी करू शकतोच कसा? लेकीला तिच्या त्या अवस्थेत

पाहताच जानराव एक दुर्बल माणूस झाला. आपली मुलगी असाधारण सुंदर आहे, हे त्याला त्या क्षणी जाणवले. तिचा तो मासूम फाटलेला चेहरा, निस्तेज डोळे, कोवळे हात. आपण किती दुबळे आहोत याची त्याला जाणीव झाली.

"इकडं कुढं निघाले पाटील? निरोप देयाचा. मी आलो नसतो का?' जयरू वाघुले. त्याच्या घरातून त्याला जानराव दिसला. समोर येऊन जोहार करीत त्याने विचारलं.

'अरे काय नायी. आपली ती सुंद्रा- म्हनजे कचरू; त्याच्याकं चाललो व्हतो.

'मला निरोप देयाचा-' 'नायी काय नायी. सह्यज-' 'मी येऊ का तुमच्या संगती?"

'नको, नको. काय कामच नायी. तुला मायती हाये; आमी फौजेतले जोडीदार.

'हां, ते बी खरं.'

सुदैवाने सुंद्राबाई घरी होती. म्हणाला, 'मानसांनी घरी यायला सांगातलं.' जानराव स्वतः हे सांगायला आलाय, याचा अर्थ काही नाजूक अन् तातडीचे काम आहे, हे त्या माउलीने तात्काळ जाणले. अधिक प्रश्न न करता ती तडक निघाली.

असा काही प्रश्न आपल्यासमोर उभा ठाकेल याची जानरावाने कल्पनाच केलेली नव्हती. घराच्या अब्रूचा सवाल होता. कसे सांगणार कोणाला की असे असे झालेय. झमबाईलाच विचारायचे. सरूबाई तसे प्रयत्न करत होती. झालेल्या घटनेला चारसहा दिवस झाले तरी झमबाईने अन्नाचा कणही घेतलेला नव्हता. बळेच खाऊपिऊ घातले तर वांती होऊन ते त्वरित बाहेर पडायचे. ती शब्दानेही बोलत नव्हती. ती सरुबाईच्या कोणत्याही प्रश्नाला प्रतिक्रियाच देत नव्हती. पोरीला धक्का बसलाय, त्यामुळे ती बोलत नाहीय असे तिला वाटत होते. पण उलटणाऱ्या दिवसांगणिक ती अधिकाधिक धास्तावत चालली होती. पोर बोलत नव्हती, खातपीत नव्हती, अंघोळ सुद्धा करायला नकार दिला तिने. सुंद्रा महारीण यायची

आणि गरम पाण्यात फडके बुडवून तिचे अंग पुसून काढायची.

'खाया-प्यायाचं कायच आइकत नायी ग सुंद्रे. बळंच घातलं त वकून टाखिती. मरून जायाची पोर आशानी.' सरूबाई.

"आसं वाईट वक्टं बोलू नका. पन काय करावा वन्सं, मलाबी

समजानी झालंय,' सुंद्राबाई म्हणाली.

शरीराच्या जखमांवर तिने उपचार केले होते, करतही होती. त्या जखमा काबूत आणता येतील याची तिला खात्री होती. मनाच्या जखमांचे ती तरी काय सांगणार?

'बोलतच नायी. कोन्ही क्यालं, कसं समजायचं आपल्याला?' 'बरी झाली, खाया-पेया लागली का आपाप व्हईन ते.'

बळजोरी कोणी केली हे समजणे, न समजणे यापेक्षाही झमबाईचे बरे होणे अधिक

निकडीचे होते. ते त्या दोघींनाही कळत होते. जानराव रोज सुंद्राबाईकडून माहिती घेत होता. सरूबाईशी बोलण्याची हिंमत त्याच्यात उरली नव्हती. झालेली घटना घराबाहेरच्या फक्त सुंद्राबाईलाच तर माहीत होती. ती कोणाशी बोलणार नाही याची जानरावला खात्री होती. रखमाजी आणि समाबाई यांना काही अंदाज आले असतील. त्या दोघांनी काहीच विचारले नाही. पण सरूबाईनेच त्यांना सांगितले की झमबाईला लागीर झालंय. तिला भुताने झपाटलंय. ते काढण्यासाठी सुंद्राबाई येत असते. रखमाजी दिवसातून किमान एकदा त्या खोलीत यायचा आणि बहिणीकडे शून्यमनस्क नजरेने बघत राहायचा. समाबाई तर तेही करत नव्हती. ती खूप घाबरून गेलेली होती. तिच्या वयाचा विचार करता ते साहजिकच होते. त्या दिवशी आधी झमबाई समाबाईसोबतच तोडमल यांच्याकडे गेली होती. त्यामुळे अगदी सहज वाटणाऱ्या स्वरात जानराव याने आपल्या सुनेला विचारले की, 'त्या दिवशी जाताना तुम्ही सोबतीने गेलात आणि नंतर ती एकटी कशी आली परत?' हा प्रश्न आपल्याला विचारला जाईल, याची खात्रीच होती तिला. म्हणाली, 'आम्ही कैक वेळा जातो. त्या दिवशी आई आणि वडील घरी होते. माझे दोन्ही भाऊ, भावजय मळ्यात, शेतात होते. वन्सबाईंना शेवया आवडतात, म्हणून आईने शेवया शिजवल्या. भरपूर तूप-साखर घालून आम्ही दोघी नणंदभावजयांनी त्या आनंदाने खाल्ल्या. अन् अशाच इथे तिथे करत असताना अचानक लक्षात आलं की वन्सं नाहीयेत. मी आईला विचारलं. वडिलांना विचारलं. त्यांनाही काही सांगता येईना. वन्सं अचानक गायब झाल्या. मी घाबरून गेले. मी त्यांना शोधायला बाहेर पडले. खूप सगळीकडे शोधलं. मळ्यातही गेले.

देवळांमध्ये गेले. कुठेच नाही सापडल्या त्या. मी खूप घाबरून गेले. एकटीने घरी येण्याची मला हिंमत होईना. शेवटी अंधार होताना आले परत तर घरात वन्सं आणि आत्तीबाईं दिसल्या. माझा जीव भांड्यात पडला. पण काही बोलायची हिंमत झाली नाही. तेव्हापासून त्या आजारलेल्या आहेत. आत्तीबाई म्हणाल्या की त्यांना लागीर लागलंय. मला त्यांना बघायची फार भीती वाटते.'

हे ठीकच होते. तिला भीती वाटणे स्वाभाविकच होते. लहानीच होती ती. झमबाईच्याच वयाची. कदाचित वर्ष-सहा महिन्यांनी मोठी. सारक्या-वारक्याच होत्या त्या. घडलेली घटना जानराव, सरूबाई, सुंद्राबाई यांनाच माहीत होती. आणि अर्थातच झमबाईला. तिच्याशी कोणी अतिप्रसंग केला हे फक्त तिलाच माहीत होते. अन् ती त्याविषयी काहीच बोलत नव्हती. कोणाला विचारणार? कुठे चौकशी करणार? बाईमाणसाची अब्रू म्हणजे काचेचे भांडे. ते तर फुटलेच होते. त्याचा गवगवा कसा करणार? दुसरीकडे ही इतकी नाजूक मनाची पोर. ती या धक्क्यातून कशी सावरणार? जानराव सगळीकडून कोंडला गेला होता. तोही रखमाजीसारखाच झमबाईच्या खोलीत जाई आणि असहाय्य विमनस्कपणे तिच्याकडे बघत राही. बोलणार काय आणि विचारणार काय? ते सरूबाईचे काम. तिलाच ते शक्य होते. पण तिलाही ती दाद देत नव्हती. या दुनियेला नाकारत असल्यासारखी ती गप्प झाली होती. ती या दुनियेपासून खूप दूरच्या प्रवासाला निघाल्यासारखी मौनात गेली होती. तिच्या मौनातून तिला बाहेर काढणे दिवसेंदिवस अवघड होत चालले होते. जानरावाची एकाकी तगमग आणि तडफड

वाढत चालली होती. तो अशा एका चक्रव्यूहात सापडला होता की त्याला तिथून बाहेरचा रस्ताच दिसत नव्हता.

हळूहळू गावात बातमी झाली. जानराव सातपाटलाच्या सुंदर लेकीला कोणत्या तरी भुताने झपाटलंय. ते भूत फार जहाल आहे. सुंद्री महारीन त्याला बाहेर काढायची कोशिश करीत आहे. पण ते तिलाही दाद देत नाहीय. पोर पिवळी पडत चाललीय. लोकांना दुःख झाले. इतकी सुंदर मुलगी. राजाची राणी होण्याच्या लायकीची. बरोबर तिलाच झपाटलं भुतानी. भुतांना सुंदर पोरी प्यार. त्यांनाच झपाटतात ती. बरं आहे बाबा, आपल्या लेकी तितक्या सुंदर नाहीत. मग कोणीतरी म्हणालं की, त्याने तिला भुताटकीच्या आमराईत एकटीने हिंडताना पाहिलं. आणखी कोणी तिला खोल्या महादेवाच्या देवळासमोर स्मशानात पाहिलं. तिथे भुतात्मे असतातच. कशाला जायचं अशा पोरीने

तिथं? आईबापांनी लक्ष नको ठेवायला? चालली ना पोर हातची. बोलतच नाही काही म्हणतात. कशी बोलणार? ते भूत तिला बोलून देईल तर ना! लोक बघायला, भेटायला येऊ लागले. कुतूहल, दुःख अशा समिश्र भावना. रावजी तोडमल आणि त्याची अस्तुरी हे तर नात्यातले. ते आले आणि त्या खोलीत काही काळ थांबले. पण त्यांना अधिक दम धरवेना. त्याच्या पोरांनी तर तीही हिंमत केली नाही. ते बिचारे कुठून करणार हिंमत? बाई असून समाबाईला; त्यांच्या बहिणीला धाडस होईना. ते तर पुरुष. बाईमाणसाच्या दुखण्यात ते किती जवळ जाणार? पण बाकी सगळे ; विशेषतः बाया फार येऊ लागल्या. त्या तपशिलात माहिती घ्यायचा दुःखवेल्हाळ प्रयत्न करू लागल्या. एके दिवशी सरूबाईने त्या खोलीत मेणबत्ती लावली आणि उदाचा धूर केला. त्यानंतर तिने सगळयांना आत येण्यास मजाव केला. कोणीही आत यायचे नाही. अगदी घरातल्या लोकांनीही यायचे नाही. एकट्या सुंद्राबाईला आत प्रवेश होता. जानराव याने कोशिश केली. त्याला सरूबाई म्हणाली, 'लोक येतात तेव्हा त्यांच्या सोबत त-हेत-हेच्या पाकोळया येतात. पोर गुदमरून जाईल ना! पाकोळया नकोत.' सगळयांना आत प्रवेश बंद झाला. कोणीही दिसले की सरूबाई आतूनच ओरडायची, 'तुम्हाला दिसत नाहीत काय, किती पाकोळया हिंडतायेत तुमच्या भवती? माझ्या लेकीला मारायला येत आहात काय?' सरुबाईने स्वतःच्या लेकाला; खुद्द पिराजीला सुद्धा आत प्रवेश नाकारला. रखमाजी त्याला घेऊन आला होता. त्याच्या बायकोच्या सांगण्यावरून. बाळ पिराजी रडत होता. त्याची सुद्धा तिला दया आली नाही. म्हणाली, 'कोणीही आत यायचं नाही. पाकोळया नकोत. फार फडफड करतात, चौकशा करतात. रात्रंदिवस सतत तेवती मेणबत्ती आणि उदाचा धूर हे त्या खोलीतले सत्य उरले. एके दिवशी जोर करून जानराव त्या खोलीत घुसला तेव्हा सरूबाईने इतका आकांत मांडला की त्याला भिऊन तोही फार काळ तिथे थांबू शकला नाही. आपली पोर तर गेल्यात जमा आहे आणि आपली बायकोही त्या दुःखाने वेडी होऊन त्याच रस्त्याने निघाली आहे, या जाणिवेने तो सैरभैर झाला. लोक म्हणू लागले, त्या साऱ्या घराला आता भुताटकीने झपाटले आहे. त्या पोरीनंतर आता तिची आई सुद्धा त्या भुताच्या कह्यात गेली आहे. ती आत उद जाळते आणि कोणालाही जवळ येऊ देत नाही. हळूहळू ते सारे घर त्या भुताच्या ताब्यात जाणार आहे. जानराव सातपाटील, त्याचा मुलगा आणि सून यांनाही ते सोडणार नाही. इतका कर्तबगार माणूस, इतका रेघेरूपाला

आलेला संसार, सारा एका भुताने खलास केला आहे. जानरावाने त्या वाड्यात मुळात राहायलाच नको होते. तो वाडाच भुताटकीचा आहे. आधी जे सुभेदार नावाचे लोक त्या वाड्यात राहात होते, त्यांचे असेच झाले आहे. त्यांचा वसबूड झालेला आहे. त्यांचा वंश संपलेला आहे. जानरावाच्या हे लक्षात यायला पाहिजे होते. त्याच्या त्या सुंदर पोरीला बाहेर कुठेही, कोणत्याही भुताने झपाटलेले नाहीय. ते घरातच आहे. इतके दिवस ते झोपलेले होते. आता ते जागे झालेले आहे आणि त्याने त्याची करामत दाखवायला सुरुवात केली आहे. तिथे कोणीही साधे जाणे सुद्धा चुकीचे आहे. जा आणि भुताने झपाटून घ्या. कशाला बाबा? त्याने केली ती चूक. आपण कशाला करा? त्या बाईला आपल्याभोवती पाकोळ्या दिसतात. त्या मुळात तिच्या भोवती आहेत. आपण तिथे आत जाऊन आपल्याला त्यांनी घेरू नये म्हणून ती बाई कोशिश करते. ती चांगली आहे. चांगल्या चालीची आहे. पण ती तिच्या लेकीच्या पाठोपाठ त्या पाकोळ्यांनी वेढली गेलीय. आपल्याला त्यांनी वेढू नये म्हणून ती बिचारी कोशिश करते आहे. म्हणूनच ती आता तिच्या घरातल्या लोकांना सुद्धा आता त्या खोलीत येऊ देत नाहीय. पण तिचे हे प्रयत्न फार काळ टिकाव धरणार नाहीत. ते सारे घर त्या भुताटकीच्या पाकोळ्यांनी भरून जाणार आहे. त्या पाकोळ्या त्यांना पिवळ्या पिवळ्या करत खाऊन टाकणार आहेत. त्यांचा वसबूड अटळ आहे. ही भूमका सबागती सटवाजी वाघुले म्हाताऱ्याच्या कानावर गेली. त्याच्या लेकाने जयरूनेच बोलता बोलता उल्लेख केला. सुभेदाराचा वाडा तर म्हाताऱ्यानेच सुचवला होता. त्यामळे मनात असूनही तो जानरावाच्या भेटीला गेला नाही.

कचरू महार आणि अल्लाबक्ष इनामदार हे तर मित्र. तेही पुन्हा पुन्हा येत होते. पण आत प्रवेश त्यांनाही मिळाला नाही. केरोपंत कुलकर्णी ज्ञानी. त्यांना कुठेही सहज प्रवेश. पण त्यांनाही आत प्रवेश मिळाला नाही. उदाच्या घोर वासाने त्यांच्यासारख्या ज्ञानी माणसाच्या नजरेसमोर सुद्धा चमत्कारिक पाकोळ्या फडफडल्या. थोरले पाटील आले. त्यांना प्रवेश नाकारणे सरूबाईस कसे कोण जाणे; कठीण गेले किंवा जमले नाही. ते आत गेले. मेणबत्तीच्या क्षीण उजेडात त्यांनी त्या पोरीला पाहिले. इतका जबर म्हातारा. पंचवीस पेंढारी लुटारुंसमोर एकटा बंदूक घेऊन उभा राहिलेला. पण त्याला तिथे रडू फुटले. तो ढसाढसा रडला आणि नाक पुसत बाहेर आला. तिथे आणखी कोणाशीही न बोलता तो निघून गेला. आणि दोनच दिवसांनी कसलाही आजार नसताना झोपेतल्या झोपेत तो देवाघरी गेला. लोक म्हणाले, बघा. पाटलाच्या लक्षात नाहीच ना आलं! कशाला जायचं आत? त्या पाकोळ्यांनी पाटलाला घेरलं. त्या त्याच्या सोबत त्याच्या घरी गेल्या. आणि तो मेला. म्हणजे वय झालंच होतं त्याचं. पण म्हणून असं जीव द्यायला जायचं काय? अर्थात, सटीने म्हणजे सटवाईने समजा त्याचं मरण तिथेच लिहिलं असेल तर त्याला तो तरी काय करणार होता? आपण निदान त्या घरी मरणाच्या दारात स्वतः होऊन का जायचं? लोक चौकशी करायला यायचे बंद झाले. हळूहळू या गोष्टी रखमाजी आणि समाबाई यांच्यापर्यंत पोहोचल्या. पण ते बिचारे त्यात काय करणार? त्यांना कोणतेही निर्णय घेण्याचा अधिकारच नव्हता. एरवी आपण सगळ्यांनी रानात, शेतात झोपडी-पडळी ; जी काही आहे, तिच्यात राहायला जाऊ, असे आपल्या बापाला सुचवायचे

रखमाजीच्या मनात आले होते. पण सांगण्याची हिंमत त्याला झाली नव्हती. जखमी झालेल्या वाघाने करवंदीच्या जाळीत आश्रयाला जावे तसा जानराव सातपाटील त्या खोलीच्या बाहेर बसलेला असे.

अखेर अपरिहार्य ते झाले. एका संध्याकाळी पेटती मेणबत्ती तिचा तळ गाठून विझली, हे तसे होईस्तोवर सरूबाईच्या लक्षातच आले नाही. पण ती विझल्यासरशी ती उठली आणि तरातरा चालत येऊन खोलीच्या बाहेर बसलेल्या जानरावास म्हणाली, 'सातपाटला उठ. अग्नी आण. दिव्याला दिवा लाव झटपट. नाहीतर या पाकोळ्या तुला खाऊन टाकतील.' सैपाकाच्या खोलीत समाबाई भाकरी थापत होती. जानरावाने आगीची जळती धपली उचलली आणि ती तशीच घेऊन तो लगबगीने खोलीच्या दारात आला. सरूबाईच्या हातात मेणबत्ती होती आणि जानरावाच्या हातात पेटती धपली. पण सगळे प्रयत्न करूनही मेणबत्तीच्या वातीने पेट घेतला नाही. सरूबाई म्हणाली, 'हलकट आहेस तू. प्रयत्न केलास खरा, पण साधी मेणबत्ती तुझ्याच्याने पेटवत नाही. ही ताकद तुझ्यात कधीच नव्हती. आता पाकोळ्या पेटतील आणि हे सगळे घर, सगळा आसमंत उजळून टाकतील.' जानराव यास वाटले, लेकीच्या दुखण्याने आपली बायको ठार वेडी झालीय. कसल्या पाकोळ्या अन् कसला उजेड. पण ठार काळोखाच्या त्या दुःसह क्षणी त्यानेही झळाळणाऱ्या पाकोळ्यांचा अद्‌भूत उजेड पाहिला. त्या चमकत्या पाकोळ्यांचा अनिर्बंध उजेड पाहताना त्याची खात्री पटली, की आपली लेक देवाघरी निघाली आहे. आपण ज्याला वेडेपण समजत होतो, त्यात वेडेपण काहीही नाही आहे. आपल्या सगळ्यांच्या पाकोळ्या होऊन चमकत फडफडत निघून जाण्याचा रस्ता आपल्या पोरीने खुला केलेला आहे. त्या क्षणापासून जानराव सातपाटील; शहाणा सवरता इसम खुशाल पाकोळ्यांच्या दुनियेत शिरला. आणि तो मरेपर्यंत काही इथे, काही पाकोळ्यात असा जगत राहिला. त्याचे पाकोळ्यातले असणे हे त्याच्या खासगी दुनियेपुरते उरले. पाकोळ्यांबाहेर तो जितका होता तोही इतरांना अनाकलनीय झाला. काळाच्या झपताल चिंधीत तो काहींना समजल्यासारखा वाटावा इतका सुबोध होता. इतरांना सुबोध वाटाव्या अशा गोष्टी त्याच्या हातून घडल्या. तोही त्यांच्यात अर्धवटपणे होता. पण मुळात तो झमबाईच्या जाण्याच्या झगमगत्या पाकोळ्यातच जितका जगला, तितका जगला. जगणे आणि मरणे यांच्या सीमारेषेवर इतके दीर्घकाळ जगणे सहसा कोणाच्याही वाट्याला येत नाही. ते त्याच्या वाट्याला आले.

7

झमबाईच्या मृत्युनंतर रखमाजीने ठाम आणि सौम्य स्वरात सगळ्यांना सांगून टाकले. आपण आता मळ्यात राहायला जाणार आहोत. सगळे कोण ; तर त्याचे

आईबाप आणि पत्नी आणि अर्थातच त्याचा छोटा भाऊ पिराजी. त्याचा स्वर निर्णायक होता. ती विनंती नव्हती. इतका ठाम निर्णय घेण्याच्या वयात तो आला होता असे नव्हे. त्याच्या प्रभावशाली बापापुढे दबून राहण्याचीच त्याची सवय होती. जानरावही तितका वयस्क झालेला नव्हता. पण परिस्थितीच्या दडपणाने सारी समीकरणे बदलली होती. आपल्या आईच्या काही एक चमत्कारिकपणाचा अनुभव त्यास बालपणापासूनच होता. पण आपल्या बहिणीच्या आजारात ती मनाने अधिकच दुबळी होऊन गेलेली आहे हे त्यास जाणवले. आपला बाप ; एवढा खंबीर पुरुष ; पण तोही लेकीच्या अचानक मरणाने अन् कदाचित आणखी कशाने तरी हादरून गेलेला आहे, हे त्या नेमस्त, मितभाषी पोराच्या लक्षात आले. दुःख तर त्यालाही झालेलेच होते. इतक्या सुकुमार कोवळ्या, देखण्या बहिणीचे अचानक अकाली जाणे त्यालाही हलवून गेले होते. पण त्याही उप्पर जगणे असतेच ना. शहाण्या माणसाने सगळे पोटात घेऊन पुढे जायचे असते. पेरणीचा हंगाम असतो तेव्हा, घरात समजा मयत झाली तरी, शेतकरी प्रेत झाकून ठेऊन, पेरणी आधी उरकून घेतो आणि नंतर दुःख करायला मोकळा होतो. त्याला इलाज नसतो. या ना त्या प्रकारे कमीअधिक दुबळ्या झालेल्या आईबापाला बघताना रखमाजी यास प्रौढपण प्रकट करावे लागले. विशेष म्हणजे त्याच्या आईबापांनी त्याला कोणतीही खळखळ न करता संमती दिली. जिथून त्यांची लाडकी लेक देवाघरी गेली, त्या घरात राहणे त्यांनाही अवघड झाले होते. हळूहळू त्या दोघांचेही आपल्या आपल्या खासगी दुनियेत या ना त्या प्रकारे प्रकट होणे सुरू झाले. त्याच्या अशा प्रकटण्यास काळ, काम, वेग अशा मर्यादा अनेकदा उरत नसत. सामान्य अर्थबोधन त्यांच्या उक्ती आणि कृती यांचा अर्थ लावण्यास अपूरे होई. हे सरूबाईचे अधिक झाले होते. पण जानराव याचेही काही अंशी झाले तसेच होते. ते सतत त्या दुनियेत असत असे नव्हे. पण ते तिथे कधी जातील आणि किती वेळ थांबतील याचा कसलाही नियम नसे..

रानाच्या मोकळ्या हवेत सरूबाई अधिक मोकळी झाली. गायी, बैल, शेळ्या-मेंढ्या, कुत्री-मांजरे; शेतकऱ्याचा संसार छोटा का असतो? सगळ्यांशी तिचे आंतरिक संभाषण चालत असे. शेतातल्या चिमण्यांना सुद्धा पुकारून ती बोलावत असे. त्यांना दाणे घालत असे. बाळ पिराजी आता सहसा समाबाईजवळ राही. ती स्वतःच तशी पोरसवदा. पण परिस्थितीने तीही प्रौढ झाली होती. दिराला आपल्या स्वतःच्या लेकासारखी सांभाळत होती. जे काही घडले होते, त्याने ती मुलगी भांबावून गेली होती. ती काहीशी कुचंबल्यासारखी दबून वागत होती. घराबाहेरच्या कोणी किंवा घरातल्या कोणीही तिला झमबाईच्या संबंधाने काहीही दोष दिलेला नव्हता. जे झाले ते तिच्या नशिबात होते, त्यात कोणाला दोष देऊन काय उपयोग? आई सटवाईने त्या पोरीची रेघ तिथवरच रेखलेली होती, त्याला कोणाचा काय इलाज, असेच सगळे लोक म्हणत. तरीही काही एक अपराधभाव तिच्या वागण्यात दिसे. एरवीही ती कमी बोलणारीच होती. पण आता ती जवळपास मौनातच गेली होती. आपला सासरा जानराव याच्याविषयी एक अनाकलनीय भीती तिच्या मनात वसतीला आली असावी असे वाटे. एरवीही सासऱ्यांच्या समोर सुनेने न जाण्याचीच पद्धत होती. तो एक आधार तिला होता. पण अगदी तशी वेळ आली तरी ती ते टाळत असे. हे सहसा कोणाच्या लक्षात येत नसे, हे एक बरे होते. बायाबापड्या

भेटीला येत. सुख वाटल्याने वाढते आणि दुःख वाटल्याने कमी होते अशा धारणा. पण ते किती दिवस? अखेर ज्याचे त्याचे जगणे असतेच ना! नंतर अल्लाबक्ष इनामदार, कचरू वाघिले, त्या दोघांच्या बायका अधून मधून येत असत.

कचरू वाघिले याची बाईल सुंद्राबाई ही घरातली. जानरावाच्या दोस्ताची अस्तुरी. महारीण असल्याने गावात घरी येताना नाही म्हटले तरी अवघडलेपण असे. ते रानात संपले. वाडा नाही, गावकूस नाही. खुला आसमंत. मोकळेपण अमाप. एकदा ती आली तेव्हा सरूबाई चिमण्यांना गोळा करून, त्यांना दाणे घालत, त्यांच्याशी बोलत होती.

'पक सुंद्रे, झमबाईच्या मैतरणी कशा घवाघवा गोळा झाल्या. रोज व्हत्यात. चिमणी झाली आसन का वं माय ती पुढल्या जल्मात? मपलं लेकरू देवाघरी गेलंऽऽ वं सुंद्रेऽऽ' तिला बघताच सरूबाई म्हणाली आणि तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले.

सुंद्राबाईने स्वतःच्या डोळ्यांमधले अश्रू आवरले.

'आवो आसं काय करित्या वन्सं. आपुन पाह्यलं व्हतं ना पाटीखाली पिठात. पुन्ना मानसाच्या जलमाला येती आपली लेक. आता यईनच पघा, समाबाईच्याच पोटाला यईन. तुमची नात व्हऊन येती ती. जाती कुढं आपल्याला सोडून?'

'आन मंग ह्या चिमन्या?'

'देव आस्तोच ना समद्या जीवामंदी. त्यो नाचतो चिमन्या व्हऊन. म्हनतो का दुक नको करू बहिनाबाई, पक मी कसा नाचतो तुपल्या भवती चिमनी व्हऊन.'

'झमबाई मपली नात व्हऊन येती?'

'यईन ना. देवाच्या दरबारातला ख्योळ आस्तोय वन्सं. त्यो कोन्हाला

चुकतो का?'

"खरं हाये तुपल्यावालं. आगंऽऽ ए समेऽऽ समिंदराऽऽ ऽऽ' सरूबाईने हाक मारली. समिंदरा समोर वावरात कांद्याच्या पिकाला पाणी देत होती. रखमाजी विहिरीवर मोटा हाकत होता. ती पाणी भरत होती. सासूची हाक ऐकताच ती धावत आली.

'आगंऽऽ समिंदरे, ही सुंद्रामामी काय म्हनती पक, आपली झमबाई

तुपल्या पोटाला यईन म्हनती ती.'

'यईनच. मी काय चुकीचं नायी बोल्ले.' सुंद्राबाई.

'काय पांडुरंगाची भावना आसन तसं,' समाबाई मर्यादेने म्हणाली.

'आगं, तिला दे ना कायतरी. यावढा चांगला आसिर्वाद धिला तिनी.'

'देती ना. आनती ना.'

'काय नको बाई. जा, तुपलं तुपलं काम कर. मस समदं देत्या मला. जा, तिकडं मपला भासा गागन तुला, का काम सोडून काय टाहिल्या करून व्हायली म्हनून. आमचं चाललंय ननंद-भावजयीचं.'

सुंद्राबाईला खरोखरीच काहीही नको होते. एरवी घरात काही नसले की यावेच लागते कुणब्याकडे. रागरंग पाहून देतातच ते काही ना काही. खूप गरज असली अन् नाही दिले काही तर मागावे सुद्धा लागते अनेकदा. पण ती या घरातून मोकळ्या हाताने कधीही परतलेली नव्हती. आणि आज तिला खरोखरच काहीही नको होते. केवळ सरूबाईला भेटण्यासाठीच ती आलेली होती.

सुंद्राबाई निघाली तेव्हा जानराव तिथे आला आणि म्हणाला, 'चल सुंद्रा, मी सोडून येतो तुला इथवर.'

'चला ना भावोजी. तेवढीच मला सोबत.', ती म्हणाली.

त्याला आपल्याशी काहीतरी बोलायचे आहे, हे तिच्या लक्षात आले. म्हणून स्वतः होऊन आणखी काही ती बोलली नाही. थोडे अंतर गेल्यावर तो म्हणाला, 'आता या सगळ्याचा खास काही उपयोग नाहीच आहे. पण मनात गुथ्थी कायमच राहील, की बाबा हे केलं कोणी. माझ्या लेकीवर बळजोरी केली कोणी? पण त्याचा तलास लावायचा कसा? गेलेली पोर काय परत येत नाही. ती शब्दानेही बोलली नाही. तू, मी अन् तिची आई सोडून हे कोणालाही माहीत नाही. कचरूला कदाचित माहीत असेल. तू बोलली असशील.'

"कशी बोलन दादा. तुमची आबरू ती मपली आबरू, आपली आबरू. मी त्यांच्यासंगती पन नायी बोलल्याली.'

'आसं का, बरं बरं. पण तलास लाव ना तू. मी कोनाला इचारनार, कोनासंगती बोलनार?'

"तुमी सांगायच्या आधीच मी कोशिश करू राहायले. पन मनात एक आसं का, समाजलं आपल्याला, तरी काय उपेग? तुमी त्याच्याव दात धरनार. दिलाची ठ्या ठ्या करूनसनी घेनार. धराधरी, मारामारी करनार. आन कायपन झालं तरी आपली लेक काय परत येत नायी-'

'बराबर. पन मंग आसाच आंधारात मरून जावू मी?'

सुंद्राबाई बराच वेळ गप्प राहिली. ती मनाशी उलटसुलट विचार करत

राहिली.

'ह्यानला सांगातलं त चालन?,' तिने विचारले. 'का?'

'का, का कायी कायी जागा आशा आस्त्यात, का तिथं बाईमानसाला नाया जाता येत.

तिचं बरोबर होतं. न्हावी, शिंपी, सोनार, चांभार, कुंभार, सुतार अशा कोणत्याही अलुतेदार- बलुतेदाराकडे ठेपा लागू शकत होता. थोडसंक सूत लागल तरी तो धागा पकडून मुळाकडे जाण शक्य होत. अशा सगळ्या जागी जाण्यास बाईमाणसाला मर्यादा होत्या. अगदी पुरुषांच्या हागणदारीत सुद्धा ठेपा लागू शकत होता. बाई तिथं कशी जाणार?

'सांग त्याला,' तो म्हणाला.

गावाच्या सगळ्या कामातून, व्यवहारातून जानराव बाजूला झाला होता, तुटला होता. त्याला तिथून कोणीही दूर केलेलं नव्हतं. तो स्वतःच तिथून दूर झाला होता. त्याचा त्यातला रसच आटला होता. ज्याच्या स्वतःच्या जगण्यातच इतकी मोठी जखम झाली होती, तो तिच्या बाहेर येऊन गावासाठी काय करणार? तो गावात, रानात; सगळीकडे एकाकी होता. आधी त्यालाही पुष्कळ लोक भेटायला येत, पण ते हळूहळू थांबले. कारण तेच. ज्याचे त्याचे जगणे. ते कोणालाही चुकत नाही. केरोपंत कुलकर्णी; ज्यास त्याच्याविषयी इतका आदर, त्यांनीही नव्या वर्तमानाशी जुळवून घेतले. गणोजी खोपडे-पाटील यांना घेऊन ते सारे व्यवहार करत होते. जानरावास अल्लाबक्ष इनामदार आणि

कचरदास वाघुले हे दोस्त होते. सगळ्या व्यवहारांपल्याडचे. ते मळ्यात येत. ते आले तरी हा बोलत नसे. हाही त्यांच्याकडे जाई. बोलत नसे. नुसता बसून राही. तरीही ते याच्यासाठी आणि त्यांच्यासाठी पुरेसे असे. अल्लाबक्ष समजा नदीपल्याड त्याच्या घरी असे. तिथे कोण चौकशीला येतो? पण महारवाड्यात हा कचरुच्या घरासमोर ओट्यावर बसला की लोक हळहळत. कचरूही हळहळे.की बाबा, पाटील महारवाड्यात येतो आणि महाराच्या घराच्या ओट्यावर बसतो. हळूहळू कचरूला सवय झाली. इतरांनाही. की बाबा, हा दुःखी आहे. दुःख जातीपातीपल्याड असतं. मैत्र सगळ्यापार असतं. जानराव सातपाटलाचं डोकं ठिकाण्यावर राहिलेलं नाहीय. त्याच्या देखण्या मुलीच्या मरणात तो मेलाय. जिवंत आहे, तरीही मेलाय. वाईट वाटतं. पण त्यात कोण काय करणार? तो त्याच्या दोस्ताला भेटायला येतो. ठीक. त्यांचं त्यांचं ते पाहतील. आयुष्यात सुख आणि दुःख असतंच. त्याला कसं सामोरं जायचं हा ज्याचा त्याचा प्रश्न. जानरावाचं फार काही वाईट झालेलं नाही. त्याची लेक अचानक गेली. अनेकांच्या जातात. पण रखमाजीसारखा मुलगा आहे त्याला. तो सगळी शेती ठोकून हाकतोय.

आईबापांना सांभाळतोय. आणखी काय पाहिजे माणसाला? लोकांना जसं दिसतं, तसा ते त्याचा अर्थ लावतात.

एके दिवशी अल्लाबक्ष मळ्यात आला आणि जानरावाला म्हणाला, 'माझ्याकडे एक अवलिया आलेले आहेत, हाजीसाहेब म्हणून. चार दिवस मुक्कामाला आहेत. तू भाबीला घेऊन त्यांना भेटायला येतोस माझ्याकडे? त्यांना काहीही सांगण्याची गरज नसते. त्यांना सगळे आपोआप कळते. त्यांच्या पायाशी बसलात तर ते काही सांगतील सुद्धा.' जानराव गेला. मुख्य म्हणजे कसलीही खळखळ न करता सरूबाई त्याच्या सोबत गेली. ते दोघे त्यांच्या समोर बसल्यावर हाजीसाहेबांनी बराच वेळ त्यांच्याकडे अत्यंत स्नेहल नजरेने पाहिले. ती नजर तीक्ष्ण सुद्धा असेल. पण त्यांना ती तशी बोचली नाही. सुखकारक वाटली. मग ते सरूबाईला म्हणाले, 'बेटी जरा आगे आ.' ती थोडी पुढे, त्यांच्या निकट गेल्यावर त्यांनी तिच्या डोक्यावर हात ठेवला. स्वतःचे डोळे मिटले. तो स्पर्श तिच्यासाठी फार सुखद होता. तिला वाटले, आपल्या डोक्यातील सगळे विखुरलेले दुःखांचे तुकडे एकत्र होताहेत आणि ते तिथून बाहेर पडायच्या रस्त्याला लागले आहेत. निचराच होतोय सगळा. पण ते तितकेच फक्त. निचरा झाला नाही. ते तुकडे बाहेर पडले नाहीत. त्यांनी त्यांना मिळालेल्या कोमल आज्ञा ऐकल्या नाहीत. ते पुन्हा एकत्र आले. समुच्चयाचा कल्लोळ झाला. आणि कोसळून ते पुन्हा विखुरले. ते पुन्हा आपापल्या जागी जाऊन नाचू लागले. एकमेकांच्या जागा बदलत, एकमेकांतून वेगवेगळे विभ्रम प्रकट करत, पुन्हा पुन्हा एकमेकात मिसळत, सतत नवे होत, दुःखांचे दिवे होत नाचू लागले.

हाजीसाहेब म्हणाले, “ठीक है बेटी. अब तुम जावो.' हे म्हणताना त्यांचा चेहरा घामाने डबडबलेला होता. सरूबाई शांतपणे उठली आणि आत जाऊन अल्लाबक्षच्या बिबीजवळ बसली.

'पटेलसाब आपकी बिबी अंदरही अंदर बिलकुल टूट चुकी है. बिलकुल बिखर चुकी है. इसमे कोई कुछ भी नही कर सकता. उपरवाले के सामने हमारी कोई औकात नही होती. फीर भी, इन्सान होनेकी हैसियत से हम कोशिश जरूर करते है. इनके लिये कुछ करना

बिलकूल नामुमकीन है. बस, कोशिश करो, जिंदगी है तबतक उन्हे सुकून मिले, यही आपकी कोशिश होनी चाहिये.'

जानराव यास सगळे कळले नाही. पण आशय लक्षात आला. त्याला दखनी भाषा ओळखीची होती. हाजीसाहब जरा वेगळी भाषा बोलत होते. हे तिचं जसं खरं आहे, तसंच जवळपास माझं झालेलं आहे, असं सांगायचं त्याच्या मनात आलं. ते त्याने टाळलं. खूप थकला होता जानराव. त्याने पुढे झुकून त्यांचे पाय धरले. 'अरे नही, नही. इसकी कोई जरुरत नही,' म्हणत त्यांनी स्वतःचे पाय ओढून आपल्या हातांच्या मिठीत घेतले. 'खुदका भी खयाल रखना. अल्ला रहम करे.' म्हणत हात उंचावून त्यांनी त्याला आशीर्वाद दिला.

परतताना रस्त्यात सरुबाई म्हणाली, 'मी तुला सांगत होते ना जानराव- कशाचाच काही उपेग नायी.'

तिचं त्याला जानराव म्हणून थेट एकेरी हाक मारणं आता त्याच्या सवयीचं झालेलं होतं. पण कशाचाच काही उपयोग नाही, हे तिला कुठून कळलं? हाजीसाहब जे बोलले ते तिने कसं ऐकलं?

'कशावरून तुला आसं लागातं?'

'आरे त्यांनी मपल्या डोक्यावर हात ठुल्ला ना, तव्हाच त्यानला काय

वाटलं ते मला समाजलं.'

'आसं कुढं आसतंय का?' 'तुला ही गप लागती?' 'नायी, तसं नायी-'

'जानराव, मपल्या काळजाचे टुकडे टुकडे झालेत रेऽऽ आन सांदत नायीत ते कशानीय पन. कोनी केलं आसन आपल्या लेकीसंगती आसं वंगाळ काम?'

तिचे डोळे भरून आले. त्याला वाटलं, बाईमाणसाला किती पटकन रडता येतं! तिला ती देणगीच देऊन ठेवलीय पांडुरंगानी. अणूंच्या टपटपण्यात दुःखाचा सडा घालून मोकळं होता येतं तिला. तेही तात्पुरतं असेल, कदाचित. पण ते असतं. पुरुषाला ती संधी सहजी उपलब्ध नसते. त्याला ते सतत आत जिरवतच जगावं लागतं. पुरुष म्हणजे, जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण. म्हणजे पुरुष मोठा नसेलही कदाचित. पण सहजी न रडता येण्याचा शाप त्याला असतोच असतो. कदाचित दुःखाचे वाढते कुरूप सहन करत ते सांभाळण्याची, सहन करण्याची अधिक क्षमता पांडुरंगाने त्याला दिलेली

असेल.

'इतका सदमा बसला तिला. का, बोललीच नायी रे. मुकीच झाली

रे आपली लेक. मुकी होऊन देवाघरी गेली.'

जानरावाचे डोळे आतल्या आत भरून आले.

'पन आसुंदे. आता समाजलं तरी काय उपेग? आपली पोर तर गेली. ती कशानीही परत यायची नाही,' ती तिचे नाक पुसत समझदारपणे म्हणाली.

8

कसलीही निरोप-बातमी नसताना अचानक एके दिवशी आफुआजी अन् काळीआजी साल्पीला जानरावाच्या मळयातल्या वस्तीवर येऊन धडकल्या. कोणी काहीही सांगितले नसताना त्यांना सगळे कसे कळले याचे आश्चर्य जानरावाने मनात जिरवून टाकले. झमबाई देवाघरी गेलीय हे त्यांना माहीत होते. कुठून माहीत झाले? कोणालाही कळले नाही. झमबाई हे त्यांच्या लेखी त्यांचे पणतवंड. इतका चार पिढ्यांचा कण्हता धागा कोण मनात टिकवतो? असे असे कळल्यामुळे आम्ही आलो, असे त्या काहीही बोलल्या नाही. सहज मनात आले म्हणून आल्या म्हणावे तर त्यांना ती पोर गेल्याचे आधीच कसे कळले? जानरावाने कळवले नव्हते. आणखी कोण सांगणार? पण त्या आल्या आणि त्यांना आधीच माहीत होते. आफुआजी आता वाकली होती. काळीआजी घेरदार म्हातारी झाली होती. दोघीही ऐंशीच्या पुढे सरकलेल्या होत्या. रांगड्या आक्रमक आर्य संस्कृतीची वारसदार आफुआजी अन् पराभूत सुसंस्कृत सिंधूसंस्कृतीची वारसदार काळीआजी. पराभव पचवून आक्रमकाला आपल्या करुणेच्या विशाल पोटात घेतल्यासारखी काळीआजी ठाम घेरेदार बुटकी कणखर होती. वाकलेली आफुआजी आता परावलंबी होऊन तिच्या कह्यात आली होती. पण म्हणून काळीआजी हिच्या वागण्यात विजयोत्सव नव्हता. सवतीची काळजी घेणे कायम होते. पण आता आफुआजीला काही विचारले तर ती लगेच काळीला विचार असे म्हणू लागली होती. आपला निसर्गदत्त वाटावा असा अधिकार आफुआजीने काळीआजीला बहाल करून टाकला होता. ती आता अधिक बोलकी आणि काहीशी नम्र झाली होती.

'तुला झगमगत्या पाकोळ्या दिसतात?' 'दिसतात. मी त्यांच्याविषयी कोणाशीही बोलत नाही.'

'मला आणि काळीला त्या दिसल्या होत्या. आम्ही दोघीही गुदमरून गेलो होतो. आम्हाला कळलं होतं. त्याच दिवशी आम्ही ठरवलं की इकडं तुझ्याकडं यायचं. पण घाईत येऊन तरी काय करणार? पाकोळ्या आपण थांबवू शकत नाही.'

'कशा काय असतात त्या, कुठून येतात?' 'चारसहा पिढ्यातून येतात.' 'का?'

'तेव्हाच पाकोळीसारखं कोणीतरी जन्माला येतं ना! करुणेच्या श्वासात झगमगत त्याला किंवा तिला अकाली त्यांच्या सोबत जावं लागतं. त्यांच्या येण्याचा भार बाकीच्यांना सोसावा लागतो. तुम्हाला तो सोसावा लागेल.'

'म्हणजे काय होईल?' 'ते माहीत नाही. सगळं समजण्याइतकं आयुष्य सुबोध नाही.'

'पण तू तर म्हणाली होतीस की सातपाटलांचा वंश पसरणारा, विस्तारणारा आहे.'

'मी माझ्या त्या म्हणण्यावर अजूनही ठाम आहे.' 'मी खूप घाबरून गेलोय.'

'नकोस. विधिलिखित कशानेही बदलत नाही. पण म्हणून डरपोक

व्हायचं, असायचं आपल्याला शोभत नाही.'

'काय करू?' 'विठोबा- रखुमाईची पूजा करतोस?' 'करत होतो. गेल्या काही दिवसात नाही.' "सुरू कर.' 'का?'

'ते आपले कुलदैवत आहे. मी त्यांना माझ्या देशातून सोबत घेऊन आले आहे.'

'तुझा कोणता देश?' 'अफगानिस्तान.' 'हा कोणता देश? कुठे असतो?' 'खूप दूर आहे. तुझा आजा मला तिथून घेऊन आला.'

'तू महाटा नाहीस?' 'आहे. मी महाटाच आहे.'

आफुआजीशी हे संभाषण कधी आणि कसे झाले, हे जानराव यास सांगता येईना. आणि सांगणार कोणाला? ते इतके चमत्कारिक होते की ते फक्त स्वप्नातच घडू शकत होते.

जानरावाने विठोबा-रखुमाईच्या मूर्ती काढल्या. रिठ्या लावून घासून-पुसून त्या लखलखीत केल्या. सहज पाहताना त्याला मूर्तीच्या तळाशी काही कोरलेले दिसले. तळात हे काय कोरलेले? ओरखडे आहेत. ते नुसते उमटलेले नाहीत. त्यांना काहीतरी अर्थ असेल. काहीतरी असेल. कोण सांगणार? त्याने केरोपंत यांना पाचारण केले. ते आनंदाने आले आणि त्यांनी वाचन केले. साहेबराव आणि आरेनाबाई यांना, शिवरामबावांकडून. आपल्या मुलखाची आठवण म्हणून. वाचले ते त्यांनी सांगितले. आणखी ते बिचारे काय करणार? कोण हा साहेबराव? आरेनाबाई कोण? आणि शिवरामबावा? काहीच पत्ता नव्हता. केरोपंत परत निघाले तेव्हा काळीआजी त्यांच्या पाया पडली. तिने त्यांच्या हातावर घसघशीत रक्कम ठेवली. ती ते नाकारू लागले तेव्हा ती नम्रपणे म्हणाली, 'देवा घ्या. आसिरवाद आसुंद्या.' ते गेल्यावर ती म्हणाली, 'बामण आपल्यासाठी देवाच्या ठिकाणी असतोय. बामणाचं अगदी लहान पोर आसलं तरी त्याच्या पाया पडण्यात पुण्य आहे. हे नेहमी लक्षात ठेव.' आफुआजी केरोपंतांच्या पाया पडली नाही. त्या पुण्याची माहिती तिला नसेल कदाचित. बामणाने जे वाचले ते जानरावाने त्या दोघी आज्यांना सांगितले.

'बघ, मी तुला सांगितलं होतं ना, मी मराठणच आहे.' 'त्याचा काय संबंध?'

'अरे मी ज्या गावातून आले, ते गाव या साहिबखान आणि आरियाना यांनीच वसवलेलं होतं. तिथूनच घेऊन आला ना तुझा दसरत आजा मला. म्हणजे मी आले त्याच्या मागोमाग म्हण.'

'याचा संबंध काय?'

'अरे हा जो कोणी साहेबराव म-हाटा होता, तो त्याची बिबी आरेना हिला घेऊन तिकडे आला. आणि त्यांनी ते गाव वसवलं. ही विठोबा रखुमाई तेच घेऊन आले असतील ना सोबत. ती आता तुझ्यापर्यंत आलीय.'

'उगीच घोडीला घोडा नको लावू. आणि हा शिवरामबावा कोण,

तुला माहीत आहे?'

'नाही. मला माहीत नाही.'

'आफुला नसेल माहीत. पण मला आहे ना. मी खराडीत नांदलेय

काही वर्षे तुझ्या आज्याची बाईल म्हणून, काळीआजी म्हणाली.

'खराडी?'

'आपल्या पूर्वजांचं मूळ गाव. तुझा आजा दसरत सातपाटील याचं गाव. तिथं दरवर्षी माघ शुद्ध बीजेला मोठी यात्रा भरते. शिवरामबावांच्या नावाने. मोठे सत्पुरुष होते ते. बाकी माहिती नाही. त्यांच्या पूजेचा मान सातपाटलांचाच असतो. खूप जुन्या काळी तिथं सातपाटलांची गढी होती म्हणतात. मी ती पाहिलेली आहे. पण तिची मालकी तेव्हा पेशवे सरकारांची होती. मात्र गाव सगळं सातपाटलाचंच होतं.'

'दसरतआजा अफगाण मुलखात कसा काय गेला?' 'लढायला गेला होता. तिथून आफुला घेऊन आला.' 'अन् तू?'

'मी होते इथंच, आपल्या मुलखात. आल्यावर त्यांनी मला घेतलं. आफुसंगती लगीन केलं चांभारगोंदियाला. आम्ही करंजे गावाला आलो. तिथं संसार झाला.'

या आजेसासवा आल्यापासून सरूबाई बरीच शांत गप्प झाली. पण ती काहीतरी आतल्यात दाबून गप्प असल्यासारखी होती. त्यांच्या येण्याने तिच्या असण्यावर गच्च झाकण बसले होते. ती जानरावाला त्याच्या नावाने बेदिक्कत पुकारत नव्हती. ती इतरांना विचित्र वाटेल असे बोलत नव्हती. रखमाजी आणि समिंदरा यांच्यासाठी या दोन्ही म्हाताऱ्या खूप दूरच्या होत्या. त्या दोघांचीही त्यांच्यात गुंतवणूक नव्हती. जरुरीपुरता आदर व्यक्त केला की त्यांचे भागे. खेरीज त्यांना काम पुष्कळ असे. पिराजी तर कायमच समिंदरा हिच्या सोबत असे. त्याने सरूबाईचा नाद पुरता सोडला होता. तो सतत समिंदरेच्या पाठी पाठी असे. काळीआजीने सरूबाईला चारदोन वेळा शिकेकाई लावून, घासून पुसून अंघोळ घातली. आधी त्याचे हसूच आले सरूबाईला. पण आफुआजीच्या नजरेच्या इशाऱ्याने ती नरमली, की बाबा काळीआजीचे ऐकायचे आहे, त्यात बदल नाही. त्या अंघोळींनी तिला तेव्हा खूप हलके, मुक्त मुक्त वाटले होते. पण तेही गच्च झाकणाच्या आतले मुक्तपण होते. काळीआजीला तिला त्यातून बाहेर काढायचे होते. पण तिची त्यास तयारी नव्हती. या सगळ्या निःशब्द, स्नेहल आणि दुर्लघ्य घडामोडी

होत्या. या दोघी आज्या आल्यापासून, त्यांच्यामुळे आणि त्यांच्यासाठी केरोपंत कुलकर्णी यांनी जानरावाच्या या रानातल्या वस्तीवर अधूनमधून यायचा शिरस्ता ठेवला होता. त्यातच एके दिवशी त्याने काळीआजी हिला सुचवले की जानराव आणि सरूबाई यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर यात्रा करून यावी. महादेवाचे दर्शन करावे. कालसर्पपूजन करावे. नारायण नागबळीचा विधी करावा. अनेक कौटुंबिक संकटांच्या विमोचनासाठी ते कर्तव्य आहे. आपण दोघी वृद्ध आहात. रखमाजी-समिंदरा लहान आहेत. तुम्ही कोणीही जाण्याची गरज नाही. जानराव आणि सरूबाई कर्ते आहेत. त्यांनी विधी केला तर तो सर्वांसाठी युक्त होईल. तिने ते आफुआजीला सांगितले. ती जानरावास म्हणाली, 'काळी म्हणते ती पूजा करून ये. काळीचा शब्द खाली पडून द्यायचा नाही.'

जानराव सरूबाई हीस घेऊन त्या तीर्थक्षेत्री गेला. आधी आपल्या पत्नीस स्वतःच्या सोबत घोड्यावर घेऊन जाण्याचे त्याच्या मनात आले होते. पण सरूबाई हिच्या मानसिक स्थितीस घाबरून त्याने ते टाळले. ते दोघे बैलगाडी जोडून त्या तीर्थांच्या क्षेत्रांच्या देशात गेले. आणि सगळीकडे सगळे त्यांनी त्यांनी यथासांग केले. त्र्यंबकेश्वर क्षेत्री पुजारी मराठा

ज्ञातीचे; उधोजीराव तुंगार नामे होते. त्यास भोसले कुलोत्पन्न शहाजीराजे यांचे थोरले चिरंजीव संभाजीराजे- जे शिवाजीराजे यांचे थोरले बंधू होत, शिवाजीराजे यांचे प्रसिद्ध पुत्र संभाजी हे नंतरचे- यांनी पुजारीपण हक्क दिलेले होते, ते म्हणाले की पूजा यथासांग होईल. मी बामण पुजारी यास सगळ्या सूचना देतो. तेव्हा ते बामण पुजारी यांनी पूजा; सुंदर अर्थातच केली. आणि दक्षिणा उत्तम वाजवून घेतली. त्यास जानराव सातपाटील; सश्रद्ध, यांनी आक्षेप घेण्याचा प्रश्नच उपस्थित झाला नाही. उत्तम दक्षिणेच्या झळाळत्या उजेडात बामण पुजारी यांनी एक भली मोठी चोपडी काळजीपूर्वक बाहेर काढली. ती बरीच जुनी असावी. म्हणाले, काही नोंदी करायच्या आहेत. आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी त्या उपयुक्त होतील. पुढच्या काळात आपल्यापैकी कोणी आल्यास त्यांना माहिती मिळेल.

'नाव?' 'जानराव खंडोजी सातपाटील.' 'गाव?' 'साल्पी.' 'प्रांत?'

'ते काय आसतंय?' 'प्रदेश. आपण सांगता त्यावरून अहमदनगर असावा.' 'तोच आहे.' 'कुळी?' 'माहीत नाही. सातपाटील हीच कुळी.'

'नाही. ते पडनाव आहे. तुम्हा मराठे लोकात शहाण्णव कुळी

असतात. त्यात आपली कोणती?'

'माहीत नाही.' 'देवक?' 'माहीत आहे. सुरड. एक प्रकारचे गवत असते. कोकणात मिळते.'

बामण पुजारी यांनी या माहितीच्या उजेडात आपल्या चोपडीतल्या

नोंदी तपासल्या. बरीच शोधाशोध केली. म्हणाले, आहे. एक नोंद आहे.

'कसली?'

'आपल्या आधी आदिलशाही काळात एक सातपाटील इथे पूजा करण्यासाठी येऊन गेले आहेत.'

'कोण?'

'आरेनराव साहेबराव सातपाटील-देशमुख. पत्नी मर्दिनीबाई. गाव,

खराडी. प्रांत, सुपे, कुळी, पठारे. देवक, सुरड. आपले देवक सुरड, म्हणजे आपण त्यांच्यापैकीच आहात. हे मी खात्रीने सांगतो. आमच्याकडे नोंद आहे.'

'चांगलं आहे. माझे आजोबा दसरत सातपाटील त्या गावात जन्मले होते.

अर्थात आपण पाटील असा वा देशमुख ; वर्ण शुद्रच होय.' 'ते काय आसतंय?' 'वर्णव्यवस्थेतील तुम्हा लोकांची जागा.' 'चांगलं आहे. कुठं तरी जागा आहे.' 'समझदार आहात.' 'चुकलं-माकलं पोटात घ्या.'

'पोटाची ती विशालता आम्हापाशी जन्मजन्मांतरीची आहे. देवतांची अर्चना मनःपूर्वक करणारे आपणासारखे शूद्र आहेत, हे आम्हासाठी भाग्य आहे.'

'शूद्र असणे म्हणजे काय? चांगले की वाईट?'

'ते चांगले. तळाशी असणे, बळी असणे आणि पृथ्वी उचलणे.' 'मग तक्रार कसली? बामण देवतांचे उपकारच आहेत.'

'नोंद बघाः जानराव खंडोजी सातपाटील. पत्नी, सरूबाई. गाव,

साल्पी. प्रांत, अहमदनगर. कुळी, पठारे. देवक, सुरड.'

'बघायचंय काय त्यात? तुम्ही सांगितलं आहे ते ठीक. आम्हाला

वाचता कुठं येतंय?'

'ठीक आहे. या शाईत भिजवून आपला अंगठा डकवा इथं.

आफुआजी आणि काळीआजी आल्याने रावजी तोडमल आणि त्याची पत्नी भेटायला येऊन गेले. त्यांची सून -त्यांच्या लग्न झालेल्या थोरल्या लेकाची बायको- माहेरी गेली होती आणि ती काही केल्या परत येत नव्हती. त्यात खूप प्रयत्न करूनही त्यांना रस्ता दिसत नव्हता. ते बिचारे कोणाला काय बोलणार? आपली गणगण आपल्याशी ठेवण्याच्या समंजस वृत्तीचे होते ते. तरीही ते जानराव यास समजले होते. आणि आपण कधी तरी जाऊन त्या पोरीची समजूत घालून तिला परत आणू असे तो त्यांना म्हणाला होता. आफुआजी आणि काळीआजी यांचे करंजे येथे जायचे ठरले त्याच्या आधी आफुआजीने घरातल्या प्रत्येकाला बोलावून त्याच्या डोक्यावर हात ठेवला आणि प्रत्येकाचे हृद्गत जाणून घेतले. त्यासाठी तिला त्या कोणाशीही बोलण्याची गरज भासली नाही. डोक्यावर हात ठेवून त्या त्या प्रत्येकाच्या मेंदूतले सारे वाचण्याची काही एक विद्या तिच्यापाशी होती. ती कदाचित अगदी पूर्णत्वाला गेलेली होती, असे नव्हे. किंवा तशी ती गेलेली असूनही ती आपले सारे आकलन प्रकट करत होती असेही नसेल. पण प्रत्येकाविषयी तिने जानराव यास सांगितले. 'सरूबाईच्या असण्याचे तुकडे तुकडे झालेले आहेत. तिला देता येईल तितका आनंद आणि सुख देणे इतकेच तुझ्या हाती आहे,' असे ती म्हणाली. ते जानराव यास आधीच हाजीभाई यांनी सांगितलेले होते. आणि त्याला एरवीही त्याची जाणीव होती. समिंदरा ही अतोनात धास्तावलेली आहे आणि तिच्या आईबापाची स्थिती त्यापेक्षा वेगळी नाही, असे तिने सांगितले. याची कारणे त्याने तिला विचारली असता ती म्हणाली, 'मला इतकेच दिसते. याच्या पल्याडचे माझ्या दृष्टीच्या टप्प्यात नाही. त्यास माझा इलाज नाही. पिराजी हा पोर दुर्लघ्य, शक्तिमान; माझ्याच जातीचा असेल. त्याचा वंश सातासमुद्रापार जाईल,' असे ती म्हणाली. 'रखमाजी हा काळीसारखा आहे. जैविक अंगाने काळीचा संबंध कसा असेल असे तुला वाटत असेल, पण तो आहे आणि हा मुलगा तुझा वंश भरपूर फळवून पुढे वाहत आणि विस्तारत नेईल,' असे ती म्हणाली. तिने जानराव याच्या डोक्यावर हात ठेवला तेव्हा आपल्या हजारो पिढ्यांची परंपरा तिने आपल्या मेंदूत सोडून दिलीय, असे त्याला वाटून गेले. जानराव म्हणाला, 'माझ्या डोक्यावर तू हात ठेवलेला आहेस. तुला माझ्याविषयी काहीच का बोलायचे नाहीय?' ती म्हणाली, 'तुला त्यातून जितके समजले असेल तितके पुरेसे आहे. त्या पल्याड मी काहीही बोलणार नाही. कारण मलाही तितकेच माहीत आहे. आपण जन्माला येतो तेव्हाच आपली या पृथ्वीवरील जगण्याची भूमिका निश्चित झालेली असते, तशी तुझी काहीतरी असेल. ती सगळी मला दिसत नाही. पण तू भलाच माणूस आहेस. एरवी, मी आणि काळी तुझ्या भेटीला कशासाठी आलो असतो?'

या सगळ्या काही कळणाऱ्या, काही न कळणाऱ्या गोष्टी जानराव याच्या मनात पेरून दोन्ही आज्या परत निघाल्या तेव्हा कधी नव्हे ते आफुआजीने त्याला आपल्या छातीशी घेतले तेव्हा तिच्या डोळ्यातून टपकणाऱ्या अणूंनी तो चकित झाला होता. तसे त्याआधी कधीही घडल्याचे त्याच्या स्मरणात नव्हते. या उलट काळीआजी हिने त्याला आपल्या कुशीत घेतले, ते त्याला अगदी स्वाभाविक पृथू असे म्हणजे मातीने आपल्याला आलिंगन

द्यावे असे वाटले होते. तिच्या डोळ्यात झळकलेले अश्रू स्नेहल, मृदू; मातीचे असेच उत्कट होते. सगळे ठीक होईल, देव आहे, त्याच्या मायेची पाखर आपल्यावर कायम असते, असे ती म्हणाली होती.

या दोन्ही आजेसासवा आल्यापासून सरूबाई आपल्या आतले सगळे प्रवाह सांभाळत खूप संयमाने वागली होती. त्यांचे- विशेषतः आफुआजीचे न बोललेले बोल आत्मसात करण्याचा प्रयत्न करून तिने आपल्या मनातल्या पाकोळया दाबून पाहिल्या होत्या. आणि त्या, त्या दोघी होत्या तोवर कशा का होईना, आत कोंडून राहिल्या होत्या. पण त्या सासवा गेल्या आणि सरूबाई मोकळी झाली. तिच्या भोवतालच्या पाकोळया मुक्त झाल्या. तिच्या आत दबलेले दुःख मुक्त होऊन तिच्या भोवती पाकोळया होऊन फडफडू

लागले. तिच्यासाठी ते दुःख नव्हतेच मुळी. तो मुक्तीचा स्वर होता. ती अशा जगात आधीच पोहोचली होती की तिथे सुख आणि दुःख यांचे अर्थ बदललेले होते. या बायांच्या येण्याने तिला जे दाबावे लागले होते, ते पुन्हा मुक्त झाले. पक्ष्यांचा स्वर, चिमण्यांचे चिवचिवणे आणि पाकोळयांची तगमग हा तिच्या जगण्याचा नाद होता. ती दुःखाच्या अशा प्रदेशात पोहोचली होती

की जिथून परतीचा रस्ताच नव्हता. आणि तिलाही मुळात कुठेही परतायचे नव्हते. जगणे आणि मरणे यांच्या सीमेवरच्या एका अनुदभूत अरण्यात ती पोहोचली होती. त्या विशाल अरण्यात जगण्याचे सगळे अर्थ बदललेले होते. ती सुखदुःखांच्या पल्याडच्या प्रदेशात पोहोचलेली होती. त्या ध्रुव स्थानापासून तिला आता कोणीही हलवू शकत नव्हते. फडफडत्या पाकोळयांचे कलहस्वर हे तिच्या जगण्याचे स्वर झाले होते. आणि तरीही जगण्या-मरण्याचे वेगळे सुबोध अर्थ मानणाऱ्या दुनियेत ती जगत होती. त्या दुनियेत ती अधूनमधून वास देखील करत होती. आपल्या लहरीत कधी कधी ती धाकट्या पिराजीला जवळ घ्यायचा प्रयत्न करी तेव्हा ते बाळ घाबरून तिच्यापासून दूर पळत असे

आणि शोधून समिंदरेच्या कुशीत लपत असे.

हळूहळू असे झाले की बाहेरचे कोणी तर सोडाच, पण घरातला तिचा थोरला मुलगा रखमाजी आणि सून समिंदराही तिच्या वाऱ्याला फिरकेनाशी झाली. नंतर नंतर शेळ्या, मेंढ्या, गायी, म्हशी, बैल असे घरातले प्राणीही तिच्यापासून अंतर राखून राहू लागले. हे सारेजण तिचा राग राग करत होते म्हणून तसे झाले, असे नव्हते. त्यांच्या नकळत त्या साऱ्यांना तिच्या निकट जाण्याची भीती वाटू लागली होती. हे काहीही तिच्या लक्षात येत नव्हते, हे एक बरे होते. जानराव मात्र तिच्यावर लक्ष ठेवी. पण त्याचे तरी काय? त्याचेही जगणे मुळापासून बिनसलेले होते.

एके दिवशी सरूबाईच्या भोवताली झगमगत्या सोनेरी पाकोळयांचा थवा इतका गच्च झाला की तिला जागेवर थांबताच येईना. थवा सारखा दाटत होता. अगदी श्वास घुसमटावा इतका दाटत होता. पण तिला गुदमरल्यासारखे अजिबातही वाटत नव्हते. तिला अगदी सुखदायक उष्ण वाटत होते. फक्त एके ठिकाणी बसून राहणे तिला असह्य झाले होते. ती उठली आणि तरातरा चालत विहिरीजवळ गेली. तिच्या हातात वस्त्रांचे मोठे गाठोडे होते. तिने विहिरीतून बादलीने खसाखसा पाणी शेंदून तिथे असलेली दगडी डोणी भरून टाकली. गाठोडे उघडले. त्याच वेळी तिच्या ओटीपोटात असह्य कळ उमटली.

इतकी की ती मारण्यासाठी तिने तातडीने एक अणकुचीदार दगडी कपची शोधली आणि दुखऱ्या ओटीपोटावर खच्चून ओढली. त्यासरशी रक्ताची लाल धार सुरू झाली. ती बघताना तिला हसू फुटले. 'बघ, आली ना भायेर माझे माई, किती दिवस लपून राहायचं 5 आँऽऽ'

काहीतरी विचित्र घडत असल्याच्या संशयाने जानराव धावत विहिरीजवळ आला. त्यावेळी सरूबाईने एक वस्त्र आपल्या ओटीपोटावर बांधले होते आणि ते लाल ओले ठिबकत होते. शेजारी लाल दगडी कपची पडलेली होती.

'काय केलंस हे तू?'

'दिसत नायी का तुला? पाणमोटली फुटलीय माझी. आपली लेक

पुन्हा जल्माला येतीय.'

जानराव पुढे झाला. त्याने ते वस्त्र दूर करून पाहिले. रक्ताचा लोट वाहात आला. करण्यासारखे काहीच उरले नव्हते.

9

सरूबाईच्या मरणानंतर जानराव हल्लक झाला. जीव वाऱ्यानेही उडावा असा झाला. झाडाचे पिकले पान सहज झुळकेने गळून पडण्याजोगे व्हावे इतका हल्लक झाला. त्याचा जगण्यातला, जगण्याच्या संबंधातला रस आटला. पण म्हणून त्याने तो संपवला असे नव्हे. त्याही काळात आपल्या जवळच्या आणि संबंधातल्या माणसांची दुःखे कमी करण्याचा त्याचा सिलसिला संपलेला नव्हता. उदाहरणार्थ रावजी तोडमल ; त्याचा व्याही, यास त्याने सांगितले होते की तुझी सून जी माहेरी निघून गेली आहे, आणि जी परत सासरी येत नाहीय, तिला आणण्याच्या प्रयत्न आपण करूया. त्या शब्दाला तो जागला. त्याने रावजी यास विचारले. रावजी म्हणाला, 'मला जायचे नाही आणि तुम्हीही जाऊ नका. मी करायचे तितके प्रयत्न केलेले आहेत. तो विषय आता आपल्यासाठी संपला आहे. तुमचा शब्द खाली पाडला जाऊन जो अपमान होईल, तो मला नको आहे.' याच्या उप्परही जानराव त्या पोरीच्या माहेरी गेला. एकटाच गेला. अशा बाबतीत मान-अपमान यांचा विचार करू नये, अशा भावनेने गेला. तिथे पोरीच्या माहेरचे लोक सत्प्रवृत्त. आपल्या लेकीचे असे येणे आणि हट्टीपणाने माहेरी राहणे त्यांना रुचत नव्हते. लेक तिच्या सासरी नांदावी, त्यातच तिच्या जगण्याचा आणि असण्याचा उत्सव असतो, अशी धारणा असलेले ते सरळ, सीधे लोक होते. म्हणाले, 'तुझे सासरे रावजी तोडमल आधी कैक वेळा येऊन गेले आहेत. आता हे सातपाटील आले आहेत. स्वतःच्या दुःखावर पांघरून टाकून आले आहेत. तू सासरी जायला तयार नाहीस. तू त्यासाठी काहीही कारण देत नाहीयेस. ते आम्हाला पटत नाही. हे जानराव सातपाटील भले माणूस आहेत. त्यांच्या शब्दाला तरी तू

मान दिला पाहिजेस.' ती पोर म्हणाली, 'मला तोडमल यांच्या घरी जायचे नाहीय. तुम्हाला मी जड झाले असेन तर मी माझा काही तरी रस्ता शोधीनच. याचा अर्थ मी जीव पणाला लावीन असे नाही. माझे जगण्यावर प्रेम आहे. तुम्हाला ओझे नको म्हणून मी कुठेही निघून जाईन. तुमचा ताप हलका करीन. पण जीव देणार नाही. तितकी हिंमत माझ्यात नाही. पण म्हणून माझ्यात काहीच हिंमत नाही असे नाही. तुमच्या वळचणीला जागा नसेल तर मी माझ्यासाठी इतरत्र जागा निर्माण करीन. पण मी त्या घरी जाणार नाही.' काहीच कळेनासे होऊन ते लोक बिचारे कावून गेले. जानराव म्हणाला, 'पोरी, बोलले, सांगितले पाहिजे. बोलल्याने दुःख; जे काही असेल ते हलके होते. काहीच बोलले नाही तर त्याचे कुरूप होते आणि ते आपल्या काळजात रुतून राहते.' म्हणाली, 'मला काहीच बोलायचे नाही. तुमची लेक; झमबाई, तिच्या दुःखाला सोबत घेऊन मेली. तिने कशाचाही उच्चार केला नाही. माझे दुःख तिच्या पासंगालाही पुरणारे नाही. ती देवाघरची पोर होती. मी नाहीय. पण समजा, ती बोलली नाही, तशी मीही बोलणार नाही. मी तोडमल यांच्या घरी नांदायला जाणार नाही, ही काळ्या दगडावरची रेघ समजा.'

इतके बोलून त्या पोरीने जानराव याच्या पायांवर डोके टेकवले आणि तिच्या अणूंनी तिने त्याचे तळपाय ओले केले. हे इतर कोणास तितके दिसले नाही, पण जानराव यास; त्याच्या हृदयास ती ओल भिडली आणि तो निः शब्द झाला. परतीच्या प्रवासात त्याच्या मनात अनेक प्रश्न होते. पोर का येत नाही? ती सुरूप, सुस्वभावी, चांगली वाटते. आपल्या पायांवर डोके टेकवून रडली. येण्याचे ठाम नाकारले. कारण सांगण्याचे नाकारले. काय असेल? रावजी तोडमल आपणाला जाऊ नको म्हणत होता. का? की त्यानेच त्या पोरीचा हात धरला असेल? त्याचा उच्चार तिला करायचा नसेल? शक्य आहे. अशी उदाहरणे असतात. तोंड दाबून बुक्क्यांचा मार अनेक ठिकाणी अनेक सुनांना खावा लागतो. या पोरीने ते नाकारले असेल. झमबाई कशामुळे मेली हे या पोरीला माहीत असेल? कसे असेल? ते तर फक्त आपली बायको आणि सुंद्राबाई यांनाच माहीत होते. आणि सुंद्राने कचरूला; तिच्या नवऱ्याला सांगितले असेल, म्हणून त्याला. सरूबाई तर देवाघरी गेली. यांच्यापैकी कोणीही कुठेही त्याचा उच्चार करणारे नाही आणि नव्हते. सगळयांच्या नजरेत झमबाईला लागीर झाले होते. मग ही पोर असे कसे बोलत होती? तिला माहीत होते? ती कशामुळे मेली हे की अधिक? कोणी तिच्यावर बळजोरी केली ते सुद्धा? काही तरी आहे खास. त्याने कचरू आणि सुंद्रा यांना एकदोनदा विचारले होते. त्यांचा ठेका एकच. खूप तलास केला. काहीच धागा लागत नाही.

तो साल्पीला परतला आणि थेट महारवाड्यात जाऊन कचरूच्या घरच्या ओटीवर बसला. दाद्या-बायको ; दोघेही घरातच होते. त्याने थेट विचारले. त्यांनीही थेटच सांगितले. सरूबाईच्या मरणाच्या आधीच त्यांना तलास लागला होता. एकमेकात विचार करूनच त्यांनी ते सांगायचे टाळले होते. पण आता त्यांना ते सांगायचे होते. परिणामाची पर्वा न करता सांगायचे होते.

: त्या दिवशी समिंदरा आणि झमबाई मळयात गेल्या होत्या. तोडमलांच्या मळयात. तिथे समिंदरा हिचे दोन्ही भाऊ आणि थोरली भावजय असे होते. धाकटा मोटा हाकत होता आणि थोरला वावरात उभ्या केळींना पाणी भरत होता. शेजारच्या वावरात भेंडी,

गवार, मेथी, लसूण, मिरची यांचे वाफे होते. तिथे भावजय काहीबाही करत होती. या दोघी गेल्यावर तिने तिचे काम थांबवले. ते तितके तातडीचे नव्हते सुद्धा. मग अशाच इकडच्या तिकडच्या गप्पा. माहेरच्या रानात समिंदरा आनंदात होती. झमबाई एखाद्या परीसारखी इथे तिथे बागडत होती. दुपारचे जेवण त्या सगळ्यांनी एकत्रच केले. मोटेच्या बैलांच्या धावेला लागून आंब्याचे एक गर्द सावलीचे झाड होते. तिथे जेवून तिथेच काही वेळ लोळून घोळून गप्पा करत त्यांनी पुन्हा आपली कामे सुरु केली. समिंदरा आपल्या भावजयीसोबत मिरच्या तोडत होती. झमबाई सुद्धा तसा प्रयत्न करू लागली. पण तिला ते नीट जमेना. 'तुमी राहुंद्या झमबाई. आमी तोडितो.' त्या दोघी नणंद भावजया तिला म्हणाल्या. झमबाई नुसतीच बसून राहिली. मग कंटाळून उठली. आणि इथे तिथे हिंडू लागली. अनेक वाफ्यांतून फिरत शेजारी केळीच्या वावराच्या भोवती शेवरीचे कुंपण होते; तिकडे गेली. केळींना कमळे लागली होती. वर उमललेले काही आणि अखेर सुखद जांभळ्या रंगांची कमळे. काम करताना एकमेकींशी बोलताना त्या दोघी नणंद भावजया तिच्यावर लक्ष ठेऊन होत्या. तशी खास गरज नव्हती म्हणा. पण पोर अल्लड आणि अचपळ म्हणून. असे सगळे चालले असताना अचानक त्यांना जाणवले की ती दिसत नाहीय. आधी त्यांना वाटले, गेली असेल कुठे; लघवीला बसली असेल समजा. पण मग बराच वेळ झाला तरी दिसेना. समिंदरा ताटकन उठली. 'आवो झमबाई ऽऽ झमबाई ऽऽ' अशा हाका देत केळीच्या बागेकडे धावली. भावजय तिच्या पाठोपाठ. त्यांनी आत पाणी भरणाऱ्या समिंदरेच्या थोरल्या भावाला हाका दिल्या. झमबाई दिसली का असे मोठ्याने विचारले. काहीच प्रतिसाद न मिळाल्याने त्या बागेत सैरावैरा धावत हाका घालू लागल्या. एके ठिकाणी लांबून पळत आलेला आणि त्यांना पाहून दिशा बदलत पळून गेलेला थोरला दिसला. तो ज्या दिशेने आला होता त्याच दिशेने त्या गेल्या. तिथे केस विस्कटलेली, अंगावर ओरखडे उमटलेली, पाकळ्या पाकळ्या तोडून टाकल्या गेलेल्या सुकुमार फुलासारखी झमबाई मोठ्या मुश्किलीने उठून उभी राहण्याचे प्रयत्न करताना दिसली.

'आरे पांडुरंगाऽऽ देवा, देवा! काय करून बसला वं ह्यो राकीऽऽस!' 'आता कशे नांदावत्यान ते लोकं मलाऽऽ' 'तुमच्या नांदन्याचं जाऊंद्या. या पोरीचं काय झालंय पघा.'

त्यांनी झमबाईला उठून बसण्यासाठी हात देण्याचा प्रयत्न केला. तिने ते नाकारले. ती प्रयत्नपूर्वक उठली आणि चालू लागली. तिने त्यांच्याकडे पाहणे देखील नाकारले.

'आता काय करायचं वं माय. त्यांच्यासंगती कोनच्या तोंडानी जाऊ मी? मपल्या भावानी आसं आसं क्यालं, आसं कंच्या तोंडानी सांगू?' समिंदरेला रडू फुटलं. भावजय तिला काय सांगणार? संतापाने तिच्या अंगाची लाही लाही झाली होती.

कचरू आणि सुंद्रा यांचं सांगून झाल्यावर जानराव स्तब्ध झाला. जरा वेळाने म्हणाला,

'तुम्ही जे सांगताय त्याची खात्री आहे तुम्हाला?' 'आहे. सोयीरपणात बाधा नको म्हणून आम्ही टाळत होतो.' 'इतकं बारीक सारीक कसं सांगता?'

'तोडमलांच्या सुनेच्या तोंडून ऐकलं खुद. आधी कायच धागा कुठे लागेना. पण मग ध्यानात आलं की ज्या दिवशी झमबाई घरी आली, त्याच्या दुसऱ्या दिवशी तोडमलांची सून माहेरी गेली होती. ती सासरी येत नाही असा ठेपा लागला. तर बोवा का येत नाही? म्हणून सुंद्रा तिला भेटायला गेली. तिला अंदाज आला की धागा लागू शकतो. मग पुन्हा

पुन्हा जाऊन महारणीचं सगळं कसब पणाला लावून तिने खुलासा काढून घेतला. नंतर आम्हाला दिसलं की तोडमलांचं सगळं कुटुंब धास्तावलेलं आहे. तुमची सून सतत भीतीच्या सावलीत आहे. झमबाई वारल्यावर ती सावली तितकी राहिली नाही. पण संपलीही नाही. आम्ही हे सांगत नव्हतो. पण आता वाटतं, किती दिवस हे ओझं मनात घेऊन जगायचं आणि कसं? झाल्या गोष्टी घडून गेल्या.

आपली गेलेली माणसं काही केल्या परत येत नाहीत.'

'माझी पोर गेली, बायको गेली. मी माणसांतून उठलो रे कचरू.'

'वन्सं कळवळून विचारायच्या, माझ्या लेकीसंगती कोणी आसं वंगाळ काम केल आसन वं माय. त्यांचं दुख थेट काळजात उतरायचं. लय भाजायचं वं भावजी.'

'काय होऊन गेलं रे बाबांनो!'

'झाल्यालं कायच परत येत नायी. तुमाला काय सांगावा ते समजत नायी. तुमी शहाणे आबदार. लेकराबाळांकडे बघा. तोडमलांचा पोर तितका वाईट नायी. त्या घडीला त्याच्यात कळी संचारला आसन. आपलं नशीब वंगाळ. आणखी काय सांगू? जानबा, तुमी मैतर हावोत मपल्यावाले. लय कठीण बात. आमाला कायच सांगता येत नायी. तुमचं दुख देखवत नायी.'

10

सगळ्या क्लेशकारक माहितीचा डोंगर मनात बाळगून स्वतःशी तंडत जानराव त्याच्या मळ्यात एकाकी बसलेला असे. बैलाइतक्या मूढपणे शेती हाकणारा थोरला रखमाजी आणि सगळीकडे सळासळा वावरणारा मुग्ध पिराजी. तेवढीच जानरावाची दौलत उरली होती. नव्या ज्ञानाच्या उजेडात समिंदरा त्याला दिसत होती आणि तिच्याविषयी त्याला काहीही वाटेनासे झाले होते. तिचे ठोकून काम करणे, पिराजीला लेकासारखे सांभाळणे त्याला दिसत होते. तरीही तिच्याबाबत त्याच्या मनाचा पुरता दगड झालेला होता. त्याला वाटे, हे सगळे आपल्या नशिबी का यावे? हे कोणत्या जन्मीचे पाप? तोडमलाच्या पोराच्या एका कृतीने आपले सगळे आयुष्य बेचिराख झाले. की मुळात आधीच ते तसे झाले होते? राजाची राणी होण्यासाठी जन्माला आल्याची समजूत घेऊन, तो स्वप्नभंग सतत सोबत घेउन, आपली बायको आयुष्यभर विनातक्रार आपल्याशी संसार करत राहिली. यात तोडमलाचा पोरगा कुठे होता? आपल्या लेकीला राजाची राणी करण्याचे स्वप्न मनाशी बाळगत, तिला तसे सांगत आपली बायको जगत होती, त्यातही तो नव्हताच. आणि देवाघरच्या परीसारखी सुंदर आपली लेक निष्कलंक शुभ्र जगली, तेव्हा तोडमलाच्या पोराने त्यात कुठे अडथळा आणला होता? त्याच्याकडून जे झाले, तो त्याचा अपराध खासच होता. पण तो निमित्तच फक्त. त्याच्या जागी आणखी

कोणाकडूनही ते घडणारच होते. त्या मायलेकी मूळात अशक्य, अतक्ये असे स्वप्न घेऊन जन्माला आलेल्या होत्या. आणि ते कधी तरी विस्कटायचेच होते. कोणी तरी ते विस्कटणारच होते. जे आपल्या नशिबी होते, ते चुकणारच नव्हते.

पण इतकी समझदारी फार काळ त्याच्या मनात टिकत नसे. आपले सगळे जगणेच बर्बाद करणाऱ्या तोडमलाच्या पोराचा जीव घ्यावा, असे त्याचे मनात सारखे येई. त्याचे परिणाम काय होतील, याचेही विचार मनात उमटत. आणि बऱ्यावाईटच्या बेरजेचे शून्य त्याच्या मनास व्यापून त्यास बधीर करून टाकत राही. कधी कधी त्याला वाटे, सगळे आयुष्य रगदार शुभ्रतेने घालवून अखेरच्या टप्प्यात असे दीनवाणे जगणे हे आपल्या नशिबातच होते. त्यासाठी कोणाला दोष देऊन काय उपयोग? दिवसा तो असा स्वतःशी तंडत बसे आणि रात्री अंथरुणाला अंग टेकले तरी त्याला झोप येत नसे. जाग आणि स्वप्ने यांच्या जन्ममरणाच्या फेऱ्यात तो भरकटत राही. त्या अदलाबदलीत त्याचा जीव घुसमटत राही. मग हे सारे दिवसाही सुरू झाले. स्वप्न आणि सत्य हे सगळे मुळात आभास. जगणे हाच आभास. इतरांना समजणाऱ्या वास्तवाच्या खूप पल्याड एका तीव्र घुसमटीत तो रात्रंदिन जगू लागला. हे कोणालाही दिसणे, कळणे केवळ अशक्यच होते. त्याच्या मनातील व्यापाराच्या तितके निकट येणे कोणाहीसाठी केवळ अशक्यच झाले होते. तितकी त्याची निकड कोणालाही उरली नव्हती. कचरू आणि अल्लाबक्ष हे त्याचे दोस्त कधी कधी त्याला भेटण्यासाठी मळयात येत. तो त्यांना मौनात गेलेला, दुनियेतील जगण्याच्या पार गेलेला दिसे. त्यांना प्रत्येकी माहिती असलेल्या उजेडात ते त्याचा अर्थ लावत आणि हळहळत. बाकी दुनियेला त्याच्यात रस उरलेला नव्हता.

एके दिवशी रावजी तोडमल मळयात आले आणि त्यांनी सांगितले की उद्या त्यांच्या थोरल्या पोराच्या दुसऱ्या लग्नासाठी सुपारी फोडायचा कार्यक्रम आहे. ते सोयरे माणूस. व्याह्याला निमंत्रण न देऊन कसे चालेल? बाकी लेक आणि जावई तर आहेतच. ते येतीलच. पण व्याह्याला न सांगून कसे चालेल? त्यांनी सांगितले. जानरावाने शांतपणे मान डोलावली. तोडमल यांना अंतरी संतोष. ते गेले तेव्हा जानराव यास वाटले, जावे की न जावे? आपला लेक कर्ता आहे. तो जाईल. तो सुज्ञ बैलबुद्धीने जाईल. सुनेच्या भावाचे कार्य आहे. ती जाईल. ती तिच्या माहितीच्या उजेडातही जाईल. आपण वृद्ध. गेले, नाही गेले, काय फरक? आपल्या माहितीच्या उजेडाचे काय करायचे? त्याला वाटले, हा उजेड आपण गाडून टाकावा, हे उत्तम. आपण रानवासी झालो आहोत, हे सगळयांना माहीत आहे. आपल्या विरक्तीचा उजेड सगळयांच्या ओळखीचा आहे. तिच्या काही तीव्रकोमल छटा सगळयांना भले माहीत नसतील. म्हणजे नाहीतच आहेत. आपली लेक गेली, बायको गेली. आपले जगणे विस्कटून गेलेय हे सारे जाणतात. तोडमलाच्या थोरल्या पोराची करणी आपल्याखेरीज आज जिवंत असलेल्या कचरू, सुंद्रा, आपली सून आणि तिच्या माहेरी असलेली तोडमलाची सून इतक्याच लोकांना माहीत आहे. कदाचित तोडमल, त्याची बायको, त्याचा धाकटा मुलगा; हेही जाणत असतील. हा माहितीचा अष्ट दिशांच्या आठ मितींचा उजेड झाकून राहिला तर सारे सुरळीत होईल. यात आपण ठळक स्थानी आहोत. आपली लेक आणि बायको गेली आहे. आपण उजाड झालो आहोत. पण घडून गेलेल्या घटनांची दिशा उलटी फिरवणे या सगळयांसकट आपल्याही हाती नाहीय. तर मग सरळ

ओघात अडथळा आपण कशाला आणा? ज्याने काहीही बदलत नाही त्या कृतीच्या आसपास मनाने फिरकण्याच्या शक्यतेच्या निकट आपण का जावे? आपण एक समझदार, जबाबदार इसम आहोत. न जाणे युक्त.

तरीही दुसऱ्या दिवशी जानराव ठरलेल्या वेळी, ठरलेल्या जागी, म्हणजे तोडमल यांच्या वाड्यात पोहोचला. त्याला वाटले, आपला मुलगा आणि सून जाईलच. पण अशा महत्त्वाच्या वेळी आपले न जाणे यातून चुकीचा संदेश लोकात जातो. वयस्क शहाण्या सोयऱ्या माणसाचे अशा ठिकाणी असणे महत्त्वाचे असते. आपण शांत समझदारीने वागू आणि वेळ सांभाळून नेऊ. आपण सगळया रागलोभाच्या पलीकडे पोहोचलेलो आहोत. झाले ते झाले. चाक उलटे फिरत नसते. गेलेले काहीही परत येत नाही. कचरू म्हणाला ते रास्त. त्या घडीला त्या पोरात कळी संचारला. तो तितका वाईट नसेल. आपलं नशीब वंगाळ, हेच खरे.

तिथे सारे सोयरे-धायरे; आधीचे, होणारे आणि गावातील प्रमुख लोक, गणोजी खोपडे-पाटील, केरोपंत कुलकर्णी आणि बाकीचे ठळक; असे जमलेले होते. भटजी होता. चौरंगावर स्वस्तिक गव्हाच्या दाण्यातून रेखलेले होते. बाया शिरस्त्यानुसार आत, चिकाच्या पडद्याआडून होत्या. हवेत उत्सव होता. फेटे, शेमले झळकत होते. रावजी तोडमल खुषीत जबाबदार झळकत होता. जानराव जबाबदारीने येऊन आबदार बसल्याचे पाहून खूष होता. जानरावास वाटले, रखमाजी कुठेतरी असेलच. तो जबाबदार मूढ बैलासारखा बसलेला असेल. आपली सून चिकाच्या पडद्याच्या आड असेल. बाकी अल्लाबक्ष इनामदार असेल. कचरू वाघुले कुठेतरी अंतर राखून बसलेला असेल. सारे रीतीनुसार चालू होते. भटजी काय काय बोलत होता. जरुरीचे सामान आणले, ठेवले जात होते. आंब्याची पाने लावलेल्या जलयुक्त कलशाची पुटपुट पूजा चालू होती. जानराव तिथे बसलेला होता. जानरावाला वाटत होते, जग हे असेच चालते. पवित्र जलाच्या सिंचनाने सगळी पापे धुवून निघतात. पाप आणि पुण्य असे काही नसतेच. उरते ते सारे पुण्यच असते. जगण्याला लायक असणाऱ्याला पांडुरंग जगण्याची संधी देतो. जे तसे लायक नसतात, ते परमेशाच्या नजरेत अधिक लायक असतात. म्हणून पांडुरंग त्यांना लवकर घेऊन जातो. त्यासाठी निमित्त होतात गोष्टी. आपण त्यांच्या पल्याड बघावे. दुःखाच्या गर्तेत रुतणे ठीक नाही. त्यावर स्वार होता आले पाहिजे.

खूप सारे लोक होते. त्या कोणाकडेही जानरावाचे लक्ष नव्हते. तो आपल्या माहितीच्या उजेडाच्या आणि व्यक्तिगत दुःखाच्या पार, स्वतःच्या नकळत प्रत्यंचा ओढलेल्या धनुष्यासारखा, स्वतःला खेचून त्या क्षमाशील दुनियेत राखत होता. त्याला ते जमत होते, याचा त्याला आतल्या आत आनंद होत होता. त्याला वाटले, हा तोडमलाचा थोरला पोर; याच्या हातून पाप अर्थातच घडले आहे. याच्यामुळे आपली पोर मेली, बायको मेली. तरीही हा जिवंत आहे. म्हणजे याचे या दुनियेतले आणखी काही काम शिल्लक उरले आहे. तरीही याने जे केले ते त्याला बाधक कसे ठरले नाही? असे कोणत्या जन्मीचे पुण्य त्याच्या असण्याचे सार्थक करत आहे? असे कोणते पाप आपल्या लेकीने आणि बायकोने त्यांच्या पूर्वजन्मात केले असेल? ज्या क्षणी आपल्या लेकीवर याने बळजोरी केली असेल तेव्हा तिला कोणत्या यातनांमधून जावे लागले असेल? ती त्या क्षणी कशी तडफडली असेल?

तिच्या शरीराचे आणि मनाचे काय झाले असेल? या हैवानाला ते आता कितपत आठवत असेल? आपल्या लेकीच्या मनाच्या आणि शरीराच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविणाऱ्या त्या बलात्कारी क्षणांचे याला कितपत आठवत असेल? याने आपल्या लेकीच्या जगण्याचा चक्काचूर केला. त्याचा धसका घेऊन आपली बायको मेली. आणि हा

पाकसुरत नव्या बायकोच्या प्रतीक्षेत जोजावतो आहे!

"आवो सातपाटील ऽऽ जानराव सातपाटील ऽऽ, सुपारी फोडा. चला, घ्या दगड आणि हाना टोला.'

'चला, बाकी समदी पटापटी झाली आहे.'

'काय मंडळी, बराबर हाये ना!'

'बराबर, बराबर.' 'चला, उचला दगड आन फोडा सुपारी. त्यो मान तुमचा सातपाटील.'

जानराव उठला. कुंकवाची बोटे लावलेल्या चिकण्या सुपाऱ्या हारोहार मांडलेल्या होत्या. बस्स, दगड उचला आन टोला हाणा. काम तमाम. जानरावाने दगड उचलला. टोला सुपाऱ्यांवर टाकताना तो अनपेक्षित वेगाने वळला आणि त्याने तो टोला नवऱ्या मुलाच्या; रावजी तोडमलाच्या थोरल्या लेकाच्या डोक्यात जबर ताकदीने घातला. त्या अनपेक्षित टोल्यासरशी तो पोरगा बसल्याजागी उताणा झाला. पण म्हणून जानराव थांबला नाही. त्या उताण्या पोराच्या डोक्यात तो त्वेषाने एका पाठोपाठ अनेक टोले हाणत राहिला. त्याच्या डोक्याचा शेंदाडा झाला, चेंदामेंदा झाला. तरीही जानराव हाणतच राहिला. हे सारे इतके अचानक अनपेक्षित झाले की सारे लोक स्तंभित होऊन गेले.

अरे बापरे! प्रकट- अप्रकट उद्गार.

भानावर येऊन काहीजणांनी धाव घेत जानराव यास कवळी घातली. पण तोवर उशीर झालेला होता. काही लोक; बहुधा मुलीकडचे लोक त्याला मारहाण करू लागले. रावजी तोडमल त्वरित धावला आणि त्याने जानरावास कवळी घातली.

'यानला मारायचं काम नायी. यांच्या अंगावर हात टाखायचा नायी.' रावजी ओरडला.

'अरे! इथं या माणसाने खुद्द तुझ्या लेकाच्या डोक्यात अशा शुभ प्रसंगी दगड घातलाय. त्याने तुझ्या मुलाला जाहीरपणे ठार केलेय. अन् तू हे काय बोलतोहेस? केवळ तुझी लेक त्याच्या घरात नांदतेय म्हणून ? ठार वेडा झालेल्या अशा माणसाला तुम्ही इथे कसे बोलावले? केवळ तो तुमचा व्याही आहे म्हणून? तो वेडा आहे ना! त्याने तुझ्या मुलाला ठार केलेय. तो रक्ताच्या थारोळयात पडलाय. अन् तू काय म्हणतो आहेस?'

'रावजीबाबा, भानावर या. सातपाटलांनी तुमच्या लेकाच्या डोक्यात दगड घातलाय. वेडाच्या भरात त्यांनी त्याला ठार केलंय. हे भयंकर आहे."

'मी भानात आहे. माझी तक्रार नाहीय.'।

'पण मी या गावाचा पाटील आहे. मी खुद्द माझ्या डोळयांनी घटना पाहिलेली आहे. तालुक्याच्या अंमलदाराला ते कळवणे ही माझी जबाबदारी आहे.'

'पण माझी कायच तक्रार नाहीय ना!' 'अशी कशी तक्रार नाही? सगळया लोकांनी पाहिले आहे.'

'मी सगळ्यांना हात जोडतो. जे झाले ते झाले. माझी तक्रार नाही.
गणोजी पाटील, तुम्हाला हात जोडतो. तक्रार नाही.'

: असे सांगतात की त्या प्रसंगानंतर जानराव यास त्याचा पुत्र रखमाजी खबरदारीने त्यांच्या मळ्यातील वस्तीवर घेऊन गेला. आणि त्याने जानरावाची; आपल्या बापाची राहण्याची व्यवस्था जनावरांच्या गोठ्यात केली.जानरावाने त्यास कसल्याही प्रकारे आक्षेप घेतला नाही. उलट आनंद आणि समाधानच निःशब्द प्रकट केले. असे सांगतात की त्यानंतर त्याने आपली सून समिंदरा हिने शिजवलेले अन्न खाण्यास नकार दिला. त्याचा दोस्त कचरू वाघुले याची पत्नी सुंद्राबाई ही त्यास रोजचे अन्न स्वहस्ते शिजवून आणत असे, आणि तेच तो खाई. त्याने ते खावे यासाठी ती स्त्री आग्रही ठाण देऊन बसत असे. त्यामुळे अन्नग्रहण त्यास टाळता येत नसे. तो ठार वेडा झालेला आहे, याविषयी कोणाच्याही मनात यत्किंचितही शंका उरलेली नव्हती. त्यामुळे त्याच्या भेटीला कोणीही येत नसे. अपवाद अर्थातच सुंद्राबाईचा.आणि अधूनमधून येणाऱ्या कचरू आणि अल्लाबक्ष इनामदार यांचा. पण त्यांच्याशीही तो खास असे बोलत नसे. मुळात तो महाट भाषेतूनच बाहेर सटकला होता. तो ज्या भाषेत बोलत होता, ती कोणालाही कळत नव्हती. ही भाषा मुसलमानी असावी असे कचरू यास वाटत असे. पण अल्लाबक्ष म्हणाला, ही मुसलमानी भाषा नाहीय. आपल्या महाट देशमधील मुसलमान जी भाषा बोलतो, तीच भाषा तमिळ, तेलंग, मल्ल्याळ आणि कन्नड देशातील मुसलमान बोलतात. हे सगळे दखनी लोक. वर हिंदुस्तानात मुसलमान वेगळी भाषा बोलतात, हे मला आणि तुलाही माहीत आहे. पण ही भाषा ती सुद्धा नाहीय. ही पूजाअर्चा करताना बामण लोक बोलतात त्या भाषेची आठवण करून देणारी आहे. पण ही नेमकी तीच आहे, असेही मला वाटत नाही.

याच्यापल्याड आणखी दुनियेला जानराव याच्या बडबडण्यात कोणताही रस नव्हता. खुद्द त्याचा पोर रखमाजी आणि त्याची सून समिंदरा यांनाही त्यात रस नव्हता. तो त्या अतळ भाषेत सारखा बडबडत राही. दुनियेशी संवाद करण्याची त्याची इच्छाच संपून गेलेली होती. तो स्वतः च्या आत आत कदाचित अनेक पिढ्या मागे जाऊन, कदाचित अनेक काल्पनिक व्यक्तींशी संवाद करत असे. हेलमंड, अघुदाब, खाश रुद, फरह रुद, मुर्घाब, कुंडुझ, लोगार, पंजशीर, कुनार, काबुल असे अनेक अनाकलनीय शब्द त्याच्या बोलण्यात येत. तसेच दुर्राणी, खिलजी, मोहंमद, शिन्वारा, हजारा, किरगीझ, फोंडुकिस्तान, बामियान असेही अनेक. ते कोणाला कळणार? खुद्द जानराव काही कळण्या न कळण्याच्या पल्याड गेलेला. त्याच्या बडबडीत रस कोणाला असणार? कचरू आणि अल्लाबक्ष तो घेत. पण त्यांच्या आकलनाच्या पल्ल्यापासून फार दूर अशा वेगळ्याच भाषेच्या अरण्यात तो पोहोचला होता. त्याला तिथून काढून पुन्हा म-हाट देशच्या भाषेच्या अंगणात आणणे कोणालाही शक्य उरलेले नव्हते. तशी निकड जाणवणे सगळ्यांसाठी संपावे इतका दूर तो पोहोचलेला होता. त्याचा धाकटा पोर; पिराजी कधी कधी त्या गोठ्यात येऊन त्याच्या शेजारी बसे. तो काय बोलतोय, हे लक्षपूर्वक ऐकत असे. त्यावर हसणे, अनुमोदन देणे, आक्षेप घेणे, अशा प्रतिक्रिया सुद्धा तो देत असे. ते त्याच्यापर्यंत कितपत पोहोचत असे हे कोणालाही सांगता आले नसते. भाषेतून भाषेत आणि त्यापल्याड कदाचित शब्दातीत मौनात तो कधी गेला आणि त्याचे पुढे काय झाले याचा नेमका उलगडा कोणालाही करता

आला नाही. त्याची गरजच कोणाला भासली नाही. इतके संपूर्ण एकाकी होत कधीतरी त्याच्या प्राणांचे पाखरू नगण्य होऊन उडाले आणि आसमंतातील हवेच्या झुळूकेचा भाग होऊन सगळ्या असण्या-नसण्याच्या पार निघून गेले की त्याच्या तेव्हाच्या आयुष्यातील अखंड साक्षी, साथीदार असलेल्या बैल,

गायी, म्हशी यांच्याही ते लक्षात आले नाही.

◆ ◆ ◆

रखमाजी आणि पिराजी

आता काळ १८५८ च्या आसपासचा. ईस्ट इंडिया कंपनीची राजवट संपली. व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा आला. त्याच्या आधी शिपायांचे बंड होऊन गेले. हे अर्थात इंग्रज लोकांच्या भाषेत. ते त्याला *'Soldier's Mutiny* किंवा *'Sepoy's Mutiny* असे म्हणत म्हणून. कित्येक देशी इतिहासकार त्यास १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध किंवा स्वातंत्र्यसमर म्हणतात. तो ज्याचा त्याचा प्रश्न. ते जे काही झाले, त्याच्यानंतर कंपनी सरकारची राजवट संपली आणि व्हिक्टोरिया राणीची म्हणजे ब्रिटीश सरकारची राजवट सुरू झाली, असे आपण म्हणायचे. या काळाच्या आसपास थोडे मागे पुढे धरून फार कर्तबगार माणसे महाराष्ट्रात होऊन गेली. यात आपल्या लोकांची सत्ता

गेली म्हणून विलाप करणारे लोक जसे होते, तसेच ब्रिटिशांच्या सत्तेचा फायदा घेऊन जनसामान्यांचे उत्थान करावे अशा भावनेने काम करणारे लोकही होते. साधारण चित्र उभे राहावे म्हणून काही नावे बघा. जोतीराव गोविंदराव फुले *(१८२७-१८९०)*, सयाजीराव गायकवाड *(१८६३-१९३९)*, पंडिता रमाबाई *(१८५८-१९२२)*, ताराबाई शिंदे *(१८५०-१९१०)*, नारायण मेघाजी लोखंडे *(१८४८-१८९७)*, कृष्णाजी पांडुरंग भालेकर *(१८५० १९१०)*, गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजिक काका *(१८२९-१८८०)*, वासुदेव बळवंत फडके *(१८४५-१८८३)*, राजर्षी शाहू छत्रपती *(१८७४ १९२२)*, गोपाळ गणेश आगरकर *(१८५६-१८९५)*, गोपाळ कृष्ण गोखले *(१८६६-१९१५)*, बाळ गंगाधर टिळक *(१८५६-१९२०)*, महादेव गोविंद रानडे *(१८४२-१९०१)*, धोंडो केशव कर्वे *(१८५८-१९६२)*, विष्णुशास्त्री

चिपळूणकर *(१८५०-१८८२)*.

प्रामुख्याने मुंबई आणि पुणे यांना केंद्राशी धरून पुष्कळ राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक घडामोडी या काळात महाराष्ट्रात घडत होत्या. यात कोल्हापूर आणि बडोदे यांचा अंतर्भाव नक्कीच करावा लागेल. विशेषतः विसाव्या शतकाच्या सुरुवातीला औपचारिक शिक्षणापासून पिढ्यान्पिढ्या वंचित राहिलेल्या बहुजनांमध्ये शिक्षणाच्या आस्थेचा जो लोट उसळला, त्यांची केंद्रे या दोन मराठा संस्थानात होती, हे आपण जाणतो.

तरीही राजकीय आणि सामाजिक बाबी, स्वातंत्र्याची चळवळ अशा गोष्टी प्रामुख्याने पारंपरिक शहरी पांढरपेशा लोकांच्या विश्वापुरत्याच मर्यादित होत्या. आणि आपली खेडी; जी जवळपास आर्षकालापासून जशी स्वायत्त होती, ती बव्हंशी तशीच राहिलेली होती. नगरजनातील श्रेष्ठींना धनधान्य, भाजीपाला यांच्या सोबतीने सैनिक, हरकामे, दासी, बटकी यांचा पुरवठा करणारी केंद्रे यांजपल्याड त्यांना महत्त्व नव्हते. त्यांचा उपरोल्लोखीत कोणत्याही भानगडींशी काहीही संबंध नव्हता, असेच म्हटले पाहिजे. फार तर इंग्रजी राजवट येण्याच्या आधी पेशव्यांपासून शिंदे-होळकर यांच्यापर्यंत लष्करे किंवा पेंढारी ज्या लुटालुटी आणि अत्याचार करत, शेतजमिनीचा वसूल दिला नाही म्हणून पेशवे सरकार यांचे लोक ज्या प्रकारे शेतकऱ्यांचा छळ करीत असत; ते प्रकार थांबले किंवा किमान पातळीवर आलेले होते, असे म्हणता येईल. या खेड्यापाड्यातल्या लोकांना राजकीय लढ्याच्या मध्याशी आणून उभे केले ते १९२० साली निधन पावलेल्या बाळ गंगाधर टिळक यांच्यानंतर नेतृत्वाच्या स्थानी आलेल्या मोहनदास करमचंद गांधी यांनी. पण या फार नंतरच्या गोष्टी. तूर्तास काळ १८५८ च्या आसपासचा.

1

८५८ मध्ये साल्पी गावात शाळा सुरू झाली. ती बिगारीपासून पहिली ते थेट व्हर्नाक्युलर

१ फायनल, म्हणजे सातव्या इयत्तेपर्यंत सलग गेली आणि स्थिर राहिली. आपल्या देशी भाषांना उद्देशून ब्रिटीश लोक व्हर्नाक्युलर या शब्दाची तुच्छतेने योजना करीत. तो आजतागायतही पुष्कळ ज्ञानी लोक योजतात. अर्थात अशा आणखी पुष्कळ गोष्टी आहेत. उदाहरणार्थ गंगा या आपल्या भारतीय लोकांना पवित्र वाटणाऱ्या प्राचीन नदीस ते लोक अडाणीपणे ग्यांजीस म्हणत, तो उच्च्चार देशी आंग्लविद्या कोविदांनी कायम राखला आहे. असो. आपल्या इतक्या सुंदर आणि आपल्याला पवित्र वाटणाऱ्या गंगामाईस जवळपास गंजाडी म्हणणाऱ्या अडाणी ब्रिटिशांचे एक वेळ सोडा, पण तेच मूढपणे तसेच पुढे चालविणाऱ्या देशी आंग्लविद्या कोविदांविषयी काय बोलावे? अशा बाबींची अधिक चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. पण त्या लक्षात घेतल्या पाहिजेत, हेही तितकेच खरे आहे.

तर साल्पी येथे ही शाळा सुरू झाल्यानंतर दोन वर्षांनी रखमाजी सातपाटील याचे सहावे अपत्य, शंभुराव याचा जन्म झाला. रखमाजी यास साधारणतः दोन दोन वर्षांच्या अंतराने ओळीने सहा अपत्ये झाली. त्यात पहिल्या दोन मुलांनंतर एक मुलगी झाली. तिचे नाव झमबाई. आपल्या मेलेल्या देखण्या बहिणीचे नाव रखमाजीने आपल्या पोरीसाठी मुक्रर केले तेव्हा त्याची पत्नी समिंदरा हिने त्यास आनंदाने संमती दिली. झमबाईच्या जन्मानंतर आणखी तीन अपत्ये म्हणून रखमाजी आणि समिंदरा यांना लागोपाठ तीन मुलगे झाले. त्यातला अखेरचा मुलगा शंभुराव नामे होय.त्याचे जन्माचे समयी पिराजी; हा त्याचा चुलता आणि रखमाजी याचा धाकटा भाऊ, वय वर्षे सोळाचा होता. म्हणजे त्या काळाच्या हिशेबाने त्याचे लग्नाचे वय उलटलेले होते, असेच म्हटले पाहिजे. आपल्या पुढच्या कथानकात पिराजी यास जसे महत्त्व आहे तसेच आणि तितकेच शंभुराव यास थोड्या नंतरच्या काळी आहे. पण म्हणून रखमाजी याची बाकी मुले नगण्य होती असे नव्हे. सबब, त्यांच्या नावांचा निर्देश तरी किमान केला पाहिजे. खेरीज एका जोडप्याने खंडीवर पेंढी जन्मास घालण्याच्या त्या काळात रखमाजी आणि समिंदरा यांच्या अपत्यांची संख्या सहावरच मर्यादित झाली, हे विशेष म्हटले पाहिजे. फक्त त्याकाळी असणाऱ्या प्रथेनुसार अशा मोठ्या संख्येने जन्मणाऱ्या अपत्यांच्या पैकी काही कोणत्या ना कोणत्या रोगाच्या साथीस बळी पडत, तसे यांच्या अपत्यांचे झाले नाही, हे एक वेगळेपण नमूद केले पाहिजे. तर त्यांच्या अपत्यांची नावे अशी : जयाजी, जनकोजी, झमबाई, शेखोजी, बापूराव आणि शंभुराव.

शंभुराव हा साधारणतः दोनेक वर्षे वयाचा असताना झमबाई हिचे तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी लग्न झाले. हे जानराव सातपाटील याच्या मृत्युनंतरचे त्या घरातील पहिले कार्य होय. त्या काळी जनमानसात जानराव सातपाटील याचा निर्देश, 'याडा जानबा' असा होत असे. आणि त्याची मुले आणि नातवंडे यांचा उल्लेख ; याड्या जानबाचा खानोटा म्हणून होत असे. साल्पी येथील त्या काळाच्या लोकधारणेच्या हिशेबाने ते युक्तच म्हटले पाहिजे. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या कालखंडात जानराव वेडा झालेला होता, हे माहीत असलेले निदानपक्षी बरेच लोक तेव्हा जिवंत होते. त्याने ज्या प्रकारे रावजी तोडमल याच्या थोरल्या मुलास, त्याच्या दुसऱ्या लग्नाआधीच्या सुपारी फोडण्याच्या कार्यक्रमात डोक्यात दगड घालून ठार केले होते, त्याच्या काहींना रोमहर्षक आणि काहींना अत्यंत भीतीदायक वाटणाऱ्या आठवणी अजूनही हवेत जिवंत होत्या. अशी गोष्ट एखादा

माणूस फक्त वेडाच्या भरातच करू शकतो ना! आणि अशा त्या बिकट प्रसंगी, केवळ आपली मुलगी सातपाटील यांच्या घरात नांदतेय, असा प्रौढ विचार करून रावजी तोडमल याने त्या याड्या जानबा विरुद्ध तक्रार करायचे नाकारले ; हे रावजी याचे समंजसपण अजूनही लोकधारेत होते. नंतरच्या काळात याड्या जानबा याने आपल्या सुनेच्या, म्हणजे रावजी तोडमल याच्या लेकीच्या हातचे अन्न खाण्यास नकार दिला, हेही जनमानसात एक वास्तव म्हणून उरलेले होते. पुढे जितका काळ म्हणून तो जिवंत होता तोवर, तो फक्त सुंद्राबाई महारीण हिच्या हातची भाजीभाकरी खात असे, हे लोकांना माहीत आहे. महाराचा बाट जो मानत नव्हता, त्यास वेडा म्हणू नये तर काय म्हणावे लोकांनी? म्हणून त्याचा खानोटा हा, याड्या जानबाचा खानोटा. पैकी थोरला रखमाजी याच्याविषयी लोकात काहीशी आदराचीच भावना होती, असे म्हटले पाहिजे. कारण त्याच्यामध्ये वृषण ठेचून खच्ची केलेल्या भक्कम बैलाइतकी बधीर शेतीनिष्ठा होती. आईवडिलांकडून वारशाने प्राप्त झालेल्या मोहरांचा, इतरांच्या डोळ्यावर येणार नाही अशा हुषारीने आणि टुकीने वापर करीत, त्याने आपल्या शेतजमिनीचा विस्तार करत नेला. तशा बैलासारखाच तो त्या शेतीत नित्यनेमाने राबत असे. गावकीच्या बाकी गोष्टीत त्याला काडीचाही रस नव्हता. इतका थंड आणि सरळ असा माणूस कोणाला अप्रिय होईल? त्याच्याविषयी, त्याच्या आपले आपल्याशी असण्याच्या वृत्तीविषयी लोकांच्या मनात म्हणूनच आदर होता. त्याचे वृषण ठेचलेले नव्हते, हे सरळच होय. ही इतकी मुले त्यास नित्यक्रमे उगीच का झाली? वृत्तीने तो अगदीच शांत आणि अनाक्रमक होता, इतकाच त्याचा ध्वन्यार्थ. त्याची पत्नी समिंदरा हिच्याविषयी सुद्धा लोकांचे वेगळे मत नव्हते. त्यांच्या मते ती सुज्ञ, समंजस, पतिपरायण, प्रापंचिक अशी श्रेष्ठ स्त्री होती. आपल्या सासऱ्याने आपल्या भावास भर कार्यक्रमात डोक्यात दगड घालून मारण्याची कृती तिने याच भावनेने गिळलेली होती, अशी धारणा प्रतिष्ठित होती. अशा स्त्रीविषयी कोणास आदर वाटणार नाही?

पण ज्या तिच्या दिरास; पिराजी यास, तिने आपल्या स्वतःच्या लेकासारखे वाढविले; त्याच्याविषयी लोकधारणा फार वेगळ्या होत्या. रखमाजी उंचीने बुटका, रंगाने काळा आणि अंगाने आडवा घसघशीत होता. उलट पिराजी गोरागोमटा, साडेसहा फूट उंच, एखाद्या पठाणासारखा तगडा होता. तो पहिल्यापासून वृत्तीने स्वतंत्र आणि कोणालाही न जुमानणारा होता. स्वतःच्या शेतीत बैलासारखे राबणाऱ्या रखमाजी यास आपल्या या धाकट्या भावाकडे तितके लक्ष देण्याचे कदाचित जमले नसावे. आणि आपला हा भाऊ आपल्याला किंवा आणखी कोणाला ; कशालाही जुमानत नाही, हे लक्षात आल्यावर त्याने कदाचित त्याचा नाद सोडून दिला असेल. ते काहीच सांगता येत नाही. पण तो थोडेफार समिंदरा हिचे ऐकत असे, अशी बोलवा होती. कदाचित तिने त्याला आपल्याला न झालेल्या आपल्या लेकासारखे वाढवले होते, हे त्याच्या मनात कुठे तरी असेल. पण ती बिचारी तरी त्याच्यावर किती लक्ष ठेवणार? तिला तिचा तिचा प्रपंच होता, मुलेबाळे नित्यनेमाने होत होती. तो लहान असताना त्याला सांभाळण्याची गरज निर्माण झाली, तेव्हा त्या माउलीने, स्वतः अगदी पोरसवदा असताना, त्याला सांभाळले होते. तिने आणखी काय करावे? पिराजी अनेकदा महारवाड्यात सुंद्राबाई हिला भेटण्यासाठी जात

असे. तो तिला हवे नको ते सगळे बघत असे. तो अनेकदा तिथे तिच्या हातचे जेवत सुद्धा असे. आपल्या जन्माच्या वेळी ती सुईण होती, हे त्याला माहीत होते. त्याची स्वतःची आई त्याला तितकी आठवत नव्हती.

समिंदरा हीच त्याच्यासाठी आईच्या जागी होती. पण तितकीच आणि तशीच जागा त्याच्या मनात सुंद्राबाई हिला होती. मळयातल्या वस्तीवर येऊन रोज आपल्या बापाला भाजीभाकरी खाऊ घालताना त्याने तिला पाहिलेले होते. त्याच्या अंगी असलेल्या आडमाप ताकदीमुळे लोक त्यास वचकून असत. तो समोर दिसला की त्यास पिरादादा म्हणून लवून पुकारण्याचा प्रघात पडू लागला होता. त्याच्या पाठी लोक अर्थातच त्याच्याविषयी चांगले बोलत नसत. तो अत्यंत आडबंग असून कोणत्या क्षणी आणि कशावरून त्याचे मस्तक फिरेल याचा काहीही नेम नाही, असे लोकांचे निरीक्षण असे. त्याचा बाप; याडा जानबा, हा त्याच्या आयुष्याच्या उत्तरकाळात कोणत्यातरी अनाकलनीय भाषेत अखंड बडबडत असे. ते कोणालाही कळत नसे. अगदी अल्लाबक्ष मुसलमान; यालाही ती भाषा उलगडता आलेली नव्हती. पण ती भाषा पिराजी यास अवगत असून तो तेव्हा इतका लहान असूनही आपल्या बापाशी, त्या भाषेत बोलत असे, असे अनेक जाणते लोक शपथेवर सांगत. तो शेतातले कोणतेही काम करत नसे. पण स्वतःच्या खर्चासाठी तो स्वावलंबी होता. लहान वयात त्याचा वेगळा असा कोणताही खर्च नसे. गरजेचे ते सारे घरातून मिळे. जाणता झाल्यावर कशाहीसाठी भावापुढे हात पसरण्याचे त्याने नाकारले. गावात त्याचा खास असा कोणीही दोस्त नव्हता. पण आसपासच्या गावात त्याचे रामोशी, बेरड, भिल्ल अशा जातीतले बरेच मित्र होते आणि ते सारे मिळून कुठे कुठे दरोडे घालत अशी बोलवा होती. लोक दबक्या आवाजात चर्चा करीत, इतकेच. तशा घटना कुठेही ऐकिवात नव्हत्या. किंवा तशा कोणत्याही कारणाने तो कधीही पकडला गेलेला नव्हता. पण अमक्या अमक्या गावात या या गरीब घरातल्या पोरीचे लग्न अडले तेव्हा त्याने ते मार्गी लावले किंवा अमुक एका मुलीला सासरचे लोक छळू लागले तेव्हा याने तिथे जाऊन त्या लोकांना पैसे दिले आणि हग्या दम सुद्धा दिला, की पुन्हा हे कानावर येता चालणार नाही. आले तर तुमची खैर नाही. अशा पुष्कळ गोष्टी प्रचलित होत्या. अशा कृत्यासाठीचे धन त्याच्याकडे येणार कुठून? सरळच होते. कायद्यात न बसणाऱ्या काही ना काही गोष्टी तो करत होता. त्या काळाचा विचार करता त्याचे लग्नाचे वय उलटून गेलेले होते. त्याचा त्याच्या बापाच्या ठिकाणी असलेला थोरला भाऊ रखमाजी त्या संबंधाने प्रयत्न करीत नाही, असे काहींचे म्हणणे होते. काही असे म्हणत की रखमाजी कोशिश करतो, पण हा ऐकत नाहीय. त्याच्या मनात काय आहे, हे कळत नाही. काहींना वाटे, रखमाजीने कोशिश केली असेलच. पण अशा याड्या खानोट्यात पोरगी द्यायला कोण तयार होणार? हा इतका आडबंग माणूस ; त्याला आपली लेक देऊन कोणता शहाणा माणूस

आयते दुःख विकत घेणार?

या सगळयात पिराजीची पुतणी, रखमाजी याची लेक; झमबाई हिचे, तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी लग्न झाले. विशेष म्हणजे गावातील अत्यंत प्रतिष्ठित गणोजी पाटील-खोपडे यांच्या नातवाशी तिचे लग्न झाले. त्यावेळी पिराजी हा अठरा वर्षे वयाचा घोडा होता.

अर्थात त्यास तसे कोण म्हणणार? याडा जानबा याच्या नातीचे लग्न प्रतिष्ठित गणोजी पाटील-खोपडे यांच्या नातवाशी व्हावे, ही वरवर फार आश्चर्यकारक घटना साल्पी ग्रामातील लोकांसाठी होती. पण तीस गणोजी याचा नातू सर्वात अधिक कारक होता, असेच म्हटले पाहिजे. झमबाई ही सुंदर होती. मुळात रखमाजी सातपाटील याची सारीच मुले अंगलटीने उंच, सडपातळ, गोरी आणि त्यामुळे हिंदुस्तान देशातल्या रीतीप्रमाणे सर्वकाळी देखणी मानली जातील अशी होती. गोऱ्या रंगाविषयीची आत्यंतिक चाहत हे आपले सार्वजनिक लक्षण द्रौपदी सारखी अत्यंत देखणी श्यामा इथल्या महाकाव्यात होऊन गेल्यावरही कायम उरलेले आहे. रखमाजी याची ही मुले, स्वभावाने नसली तरी, अंगलक्षण हिशेबाने त्यांचा धाकटा चुलता पिराजी याच्यासारखी होती. त्यात झमबाई ही एकमेव कन्या. ती गोरी तर होतीच. खेरीज अप्रतिम सुंदर होती. पण तिच्याशी नामसादृश्य असलेल्या तिच्या मृत आत्यासारखी ती कोणत्याही वेड्या स्वप्नात वावरणारी नव्हती. याचे कारण तिची आई समिंदरा. तिने आपल्या लेकीचे पाय कायमच जमिनीवर राहतील याची कसोशीने काळजी घेतली होती. तिचे देखणेपण कोणालाही वेडे करण्याइतके प्रमाथी होते. तसे त्याने गणोजी पाटील याचे नातवास केले. तो हट्टाला पेटला. तर साल्पी ग्रामातील इतर साऱ्या शहाण्या लोकांप्रमाणेच गणोजी पाटील यास या याड्या जानबाच्या वंशाशी सोयीरसंबंध नको होता. जानबा याच्या निघृण, क्रूर कृत्यास स्वतः गणोजी पाटील साक्षी होते. जानबा याचे वेडेपण पुढे कोणत्याही पिढीत कधीही, कसेही उतरू शकत होते, हा त्यातला साधा सुसंगत विचार होता. पण गणोजी यांचा नातू या सगळ्या समजूतदारीच्या पल्याड ठार बधीर, त्या पोरीच्या देखणेपणाने हट्टी आणि आंधळा झालेला होता. त्यामुळे आब राखून आपल्या नातवाचे कोड पुरविणे गणोजी पाटील यास भाग पडले. ते दाती तृण धरून, स्वतः होऊन रखमाजी सातपाटील याच्या घरी गेले.

म्हणाले, 'आपली बहीण झमबाई याच नावाची; अगदी परीसारखी सुंदर होती, तिचे लग्न माझ्या मुलाशी व्हावे अशी थोरल्या पाटलांची इच्छा होती. तो योग काही दुःखद घटनेमुळे आला नाही हे आपण जाणता. तरी या पुढच्या पिढीत का होईना, तसा योग आपल्या या लेकीचा संबंध माझ्या या नातवाशी होऊन प्रत्यक्षात यावा असे आम्हाला वाटते. आमची तशी मागणी आहे.' यावर रखमाजी काय बोलणार? त्याने आनंदाने तो प्रस्ताव स्वीकारला. त्यामुळे ते प्रेमलग्न म्हणता येईल असे नव्हे, पण ते गणोजी पाटील यांच्या नातवाच्या रखमाजी याची लेक झमबाई हिच्याविषयीच्या आत्यंतिक चाहतीतून झाले, असे म्हणावे लागेल. या लग्नाच्या प्रसंगी अगदी बारीकसारीक कामांसाठी पिराजी सतत हजर होता. त्याच्यावर कोणतीही जबाबदारी कोणीही टाकलेली नसताना प्रत्येक ठिकाणी पुढाकार घेण्यात तो तत्पर होता. या गोष्टीचे अनेकांस आश्चर्यच वाटले होते. हा इतका आडबंग माणूस इतका नम्र, तत्परतेने वागतो आहे हे पाहून, आपण त्याच्याविषयी जे ऐकतो ते चुकीचेच असले पाहिजे असे अनेकांस अंतःकरणापासून वाटले.

या लग्नानंतर पिराजी नाहीसा झाला. म्हणजे कुठे तरी निघून गेला. आधी कोणाला त्याचे खास काही वाटले नाही. अगदी घरातल्या लोकांनाही ते खास वेगळे वाटले नाही. कोणालाही काहीही न सांगता निघून जाणे आणि त्याला वाटेल तेव्हा परत येणे ही त्याची

रीतच होती. त्यामुळे सगळयांनाच असे वाटले की, गेला आहे. येईल. पण महिना झाला, दोन महिने झाले, तरी तो परतला नाही. त्याची कसलीही बातमी लागली नाही, तेव्हा मात्र लोकात कुजबुज सुरू झाली. लोक रखमाजी यास विचारू लागले. तो बिचारा काय सांगणार? एकदा समिंदरा हिने सुद्धा भितभित त्यास विचारले, तेव्हा संक्षिप्तपणे तो म्हणाला, "मला इचारून कव्हा जातोय का कुढं त्यो?' त्यावेळी त्याच्या मनातील अस्वस्थताही तिने वाचली होती आणि ती गप्प झाली होती. त्याला जे जे काही ठेपे माहीत असतील, तिथे त्याने तलास केला असेल आणि तिथे काहीच माहिती मिळत नाही म्हणून तोही अस्वस्थ असेल, हे तिने जाणले. पिराजी अधूनमधून काही धन आणून आपल्या थोरल्या भावाजवळ ठेवत असे आणि तो काहीही न विचारता ते ठेवून घेत असे, हे त्या माऊलीस माहीत होते. ती गोष्ट तिला रुचत नव्हती. पण ती तक्रार कशी करणार? शिवाय कदाचित असे सुद्धा झाले असेल की, आधी आधी रखमाजी याने आपले धाकटे भावास तशी विचारणा सुद्धा केलीच असेल आणि रागे भरण्याचा प्रयत्न सुद्धा केला असेल. पण त्याचा परिणाम काहीही होत नाही, असे अनुभवाला आल्यावर, तो सुज्ञपणे ते धन ठेऊन घेत असेल, असेही तिला वाटत होते. शेवटी, धनाचा लोभ कोणाला सुटला आहे का? आपल्या भावाची वृत्ती बदलण्याचा प्रयत्न त्याने केला असेलच. पण ते शक्य नाही, हे लक्षात आल्यावर त्याने हा मार्ग स्वीकारला असेल, अशी तिची पतिपरायण धारणा होती.

आणखी काही महिने गेले तरीही पिराजी परत आला नाही. तेव्हा लोक समजले की हा आता कायमचा परागंदा झालेला दिसतो. अशा गोष्टी होत असत. अनेक घरातली अनेक मुले अशा प्रकारे निघून जात आणि पुन्हा परतत नसत. काही काळ गेला की ती लोकांच्या त्यासंबंधीच्या कुतूहलाच्या टप्प्याच्या बाहेर निघून जात. पिराजीच्या बाबत मात्र सहजी तसे झाले नाही. त्याच्याविषयी अनेक भूमका उठत, ओसरत राहिल्या. कुठे तरी काही तरी दरोडा घालण्यासारखा उद्योग करताना तो मारला गेला असेल, ही त्यांच्यात अग्रस्थानी होती. आपले लग्न होत नाही, म्हणून तो एखाद्या बाईला उचलून कुठेतरी घेऊन गेला असेल, अशीही एक गप होती. अंग्रेज सरकारबहादूर याने त्यास पकडून तुरुंगात ठेवले आहे, असे काहींचे म्हणणे होते. अशा अनेक पद्धतीच्या गप्पा चालत असत. अर्थात हेही सगळे आणखी काही काळ गेल्यावर पुसट होऊन गेले. म्हणजे असे की ज्याचे त्याचे काय काय व्हायचे ते होतच असते. आपले आपल्याला उदयोग काय कमी आहेत? खेरीज नव्या नव्या पुष्कळ गोष्टीही घडतच असतात ना! लोकगप्पांसाठी खाद्याची कमतरता कधी पडते का? लोक समंजस असतात आणि मिळेल त्या कडब्यावर आपले चर्वण करत राहतात, हे त्यांचे समंजस चांगुलपणच म्हटले पाहिजे.

साल्पी येथील लोकांच्या नजरेत पिराजी याची स्मृती पुसट होण्याच्या काळात किंवा ती नाहीशी होण्याच्या काळात आणखी एक सगळयांना वेधक वाटावी अशी घटना घडून आली. आणि तीही याडा जानबा याच्या कुटुंबाच्या संदर्भातच होती. ती अशी की, रखमाजी याचा थोरला मुलगा जयाजी याची सोयरीक वडगाव दर्या येथील गाढवे-देशमुख यांच्या मुलीशी निश्चित झाली. गाढवे हे कुळीने उच्च मानले जाणारे, त्यांच्या गावच्या पंचक्रोशीबाहेर दूरवर प्रसिद्ध होते. हे लोक महादजी शिंदे यांचे सरदार फकीरजी गाढवे यांचे वंशज होते. त्यांची वडगावदर्या येथे गढी होती. विशेष म्हणजे मुलीच्या वडिलांचे

नावही फकीरजी असेच होते. अशा उंच कुळीच्या लोकांनी ह्या वेड्या जानबाच्या खानोट्यात आपली मुलगी द्यावी याचे कैकांना आश्चर्य वाटत होते. पण मग काही लोकांनी स्वतः होऊन स्पष्टीकरण दिले की रखमाजी याची लेक खोपडे-पाटील यांच्या घरात दिलेली आहे, ही वस्तुस्थिती इथे कारक ठरलेली दिसते. खोपडे यांच्याशी संबंध म्हणजे कुळीविषयी अधिक चौकशा करण्याची गरजच नाही असेच गाढवे यांना वाटले असेल. पण मग तरीही अशा वेडपट घराण्यात मुलगी देताना गाढवे यांनी काही नीट विचार केलेला दिसत नाही, असाच साधारण अभिप्राय पडला. नंतर अंतिम साधारण अभिप्राय असा की, आपल्याला त्याचे काय करायचेय, तो त्यांचा आणि यांचा प्रश्न. कोणाचे चांगले होत असेल तर, त्यात आपण आपणाला क्लेश का करून घ्यावेत? आणि काहीही झाले तरी रखमाजी हा बरा माणूस आहे.

त्याची स्त्री पतिपरायण आहे. जानबा वेडा होता आणि पिराजी अफाट. त्या दोन्ही सावल्या आता दूर गेलेल्या आहेत. तर भल्या माणसांचे भले होणे, हे काही वाईट म्हणता यायचे नाही.

अशा रीतीने वडगाव दर्याच्या फकीरजी गाढवे यांची लेक दीपाबाई, जयाजी याची पत्नी होऊन या याड्या जानबाच्या खानोट्यात नांदायला आली. काही काळाने कोणीतरी माहिती पुरवली की जानबा सातपाटील यास वेड लागण्याच्या आधी तो गावातला मातब्बर माणूस होता. आणि नुसते गावातच नव्हे तर जिल्ह्याच्या ठिकाणी सुद्धा त्यास मान होता. जिल्ह्याचा एक गोरा अंग्रेज अंमलदार याने त्यास आपला पाहुणा म्हणून स्वतःच्या घरी मुक्कामी नेले होते. ही पुष्कळच जुनी गोष्ट गाढवे मंडळीस विदित होती. अशा गोष्टी या देशमुख वगैरे लोकांस महत्त्वाच्या वाटतात. त्यातून हे झाले. खेरीज खोपडे-पाटील यांचेशी नातेसंबंध होणे हेही महत्त्वाचेच होते. तेव्हा, एकूण झाले ते झाले; त्याचे आपणास काय, अशा शांत, संयत प्रतिक्रिया झाल्या आणि चर्चात्मक आस्थांसाठी लोक नव्या वेगळ्या विषयांच्या शोधास लागले.

दीपाबाई स्वतःच्या सोबत एक आठ-नऊ वर्षे वयाचा मुलगा घेऊन आली होती. म्हणजे या देशमुख वगैरे लोकात मुलींना सासरी येताना सोबत स्वतःची दासी किंवा दास घेऊन यायची जुन्या काळी प्रथा होती, त्या प्रकारे हे झाले नव्हते. म्हणजे तसा तिने स्वतःच्या सेवेसाठी हा दास म्हणून आणलेला नव्हता. किंवा लग्नप्रसंगी तो तिच्यासोबतही आलेला नव्हता. रीतीप्रमाणे लग्नानंतर चार दिवस सासरी राहून ती माहेरी परतली होती. आणि परत येताना तो तिच्यासोबत आला होता. तो तिच्या नात्यातला कोणी असण्याची सुतरामही शक्यता नव्हती. तो एक अत्यंत गरीब, लुकडा आणि काळा मुलगा होता. शिवाय तो मुका आणि बहिरा होता. सतत हसतमुख असणे हे त्याचे वैशिष्ट्य होते. त्याला पाहून तिची सासू समिंदरा ही आधी गोंधळून गेली. पण विचारणार कशी? या मोठ्या घरच्या पोरीसमोर ती जराशी दबलेलीच होती. घरातल्या बाकी कोणीही त्यासंबंधी विचारले नाही. मग दीपाबाईनेच आपल्या सासूला सांगितले की, 'बैलगाडीने सासरी येताना रस्त्यात एके ठिकाणी हा मुलगा तिला एका झाडाखाली झोपलेला दिसला. अन तिला पाहिल्यावर तो इतका गोड हसला की, त्याला तिथे सोडून यावे असे तिला वाटले नाही. त्याला बोलता येत नाही आणि ऐकायलाही येत नाही, हे लक्षात आल्यावर तर

तिचा निश्चय अधिकच ठाम झाला. हा इथे आपल्यासोबत राहिला तर चालेल का, असे तिने आपल्या सासूस विचारले. हे म्हणजे रस्त्यात एखादे दीनवाणे एकाकी कुत्र्याचे पिल्लू दिसावे आणि एखाद्या लहान मुलाने भावकंपित होऊन त्याला घरी घेऊन यावे असे होते. समिंदरा हीस हसू फुटले, पण तिने ते दाबले. ती म्हणाली, 'चालेल की. भरल्या घरात एखादे गरीब लेकरू आपल्याला काहीच जड नाही.' दीपाबाई म्हणाली, 'मी याचे नाव विठोबा ठेवले आहे. आपण सगळ्यांनी त्याला त्या नावाने हाक मारायची.'

'अगं पण तो तर मुका आणि बहिरा आहे ना!' 'असू देत. तरीही आपण त्याला विठोबाच म्हणायचं.'

हेही पुन्हा कुत्र्याचं पिल्लू आणून त्याचं नामकरण करणंच झालं; समिंदरा हिच्या मनात आलं. पण ती हसून म्हणाली, "ठीक आहे, ठीक आहे.' अन् मनात म्हणाली, अशी आणखी पोरं गोळा करून नाही आणलीस म्हणजे पुष्कळ झालं.

हा विठोबा कोण कुठला, कोणत्या जातीचा, याचा काहीच पत्ता नव्हता. पण तो त्या घरात रुळला. आणि घरात म्हणण्यापेक्षा रानात रुळला. घर, रान, शेत अशा सगळ्या जागी हिंडून त्याने स्वतः होऊन त्या लोकांमधली आपली जागा हळूहळू नक्की करत नेली. जानरावाच्या मृत्युनंतर रखमाजीने गावात मोठा वाडा बांधलेला होता. शेतात वस्ती होतीच. गाया, बैल, म्हशी यांच्यासाठी वाडगी होती. संपूर्ण वस्तीभोवती बाभळी आणि बोराटीच्या वाळक्या काटेरी फांद्यांचे भक्कम संरक्षक कुंपण होते. तिथे सालगडी मुक्कामी असत. त्यांच्यात त्याने स्वतःची जागा करून घेतली. सालगड्यांसाठी घरून सकाळ संध्याकाळ विपुल अन्न येई. त्याच्यात तो हलकेच भागीदार झाला. आपले हसणे आणि आपला कामाचा उरक यामुळे तो गड्यांना प्रिय झाला.शेतातली बाकी कामे करताना त्यांना गायी- म्हशी यांचा शेणकूर करणे, अधूनमधून त्यांना धुणे, त्यांना चरायला पठारावर किंवा पायथ्याच्या माळ, माचाड अशा ठिकाणी नेणे ही कामे करावी लागत. त्याबाबत स्वतःची उपयुक्तता त्याने सिद्ध केली आणि अनुषंग म्हणून त्यांच्या आरामाचा काळ वाढेल असे केले, म्हणून त्यांनाही तो प्रिय झाला. गोठ्यात तो गायीम्हशींच्या सोबतीत आनंदाने झोपे. वाट्यास येईल तितक्या अन्नात तो स्वतःची भूक भागवत असे. वस्त्र म्हणून एक लंगोटी आणि कोणाचाही वापरून निरुपयोगी झालेला सदरा त्यास पुरेसा होई. ते सदरे इतके मोठे असत की त्यास अनेकदा लंगोटी नसली तरी चालत असे किंवा तो ते चालवून घेत असे. कशाहीबद्दल काहीही तक्रार न करणे हा त्याच्या सदैव सुस्मित स्वभावाचा प्रमुख अलंकार होता. कुठेही कोणासही न दुखविता त्याच्या वा त्यांच्या पोटात शिरून नगण्य असत जगण्याची विद्या अंगभूतपणे त्याच्या ठायी एकवटलेली होती. त्याच्याजवळ शब्द नव्हते आणि कोणी काहीही बोलले तर ते ऐकता येत नसल्याने त्यास त्याच्या कोणत्याही प्रतिक्रिया नसत. अशा सद्गुणांच्या बळावर कोणत्याही पाण्यात विरून जाणाऱ्या पदार्थासारखा तो त्याला उपलब्ध झालेल्या दुनियेत कोणालाही न खुपणाऱ्या वस्तूसारखा एकरूप झाला होता. या इथल्या दुनियेत दीपाबाई ही आपली ईश्वरसदृश्य माय आहे आणि तिची पाखर आपल्यावर कायम आहे, याचे भान त्याला होते. आपल्या वागण्याने भक्त जसा ईश्वराला कोणतीही तोशीश न देता केवळ भक्ती करून त्याला प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करतो, तसे वागणे त्याने कायम केले होते. इतक्या लहान

वयात अशी समझदारी असलेला तो कोवळा पोर कोणास ओझे होणार? साहजिकच दीपाबाई, घरातले इतर लोक आणि गडीमाणसे यांच्यात तो सहज एकरूप होऊन गेला होता. काहीही बोलता न येता, ऐकता न येता. पंचेन्द्रियातील इतर तीन इंद्रियांची ताकद त्यांच्या सीमेपल्याड वाढविलेले ज्ञानेंद्रियांचे खासगी विकसन त्याच्यापाशी होते, हे त्याच्याखेरीज कोणाला कळणार? त्याचे हसणे हे एका ज्ञानी माणसाचे हसणे होते, हे कोणाला कळणार? ते कोणालाही कळत नसण्याचे आणि त्याला तर ते सारे कळत असण्याचे, एक खासगी ज्ञान त्याच्यापाशी होते, हे कोणालाही, कधीही उमगले नाही. पुढच्या काळात तर गायीम्हशी आणि तो; यांच्यात एक शब्दांपल्याडची खासगी भाषा सुद्धा विकसित झाली होती. आणि त्यांच्यात त्या भाषेत उत्तम संवाद होत असे, हे फक्त त्या गायीम्हशी आणि तो यांनाच माहीत असलेले एक सुंदर गुपित होते. नेहमीच्या दुनियेत वावरताना त्याने हे साध्य केले होते आणि त्याच्या मुक्याबहि-या दुनियेतले ते एक श्रेष्ठ गुपित होते. गायीम्हशी यांच्याशी उत्तम संवाद करू शकणारा तो एक पूर्ण गोपाळ झाला होता आणि ते दुनियेच्या गावीही नव्हते.

2

अशातच कधीतरी एके दिवशी, आपल्या गमनास वर्ष किंवा अधिक बेहिशेबी काळ प्रदान करून, श्रेष्ठ असा पिराजी सातपाटील साल्पी मुक्कामी हजर झाला.

तो गावात गेला नाही. किंवा मळयातल्या सातपाटलांच्या वस्तीवरही गेला नाही. गावाच्या पश्चिमेला ओढ्याच्या पार खालच्या अंगाला सपाटीवर रखमाजी सातपाटील याची सलग मोठी जमीन होती. या जमिनीतच त्याची रानातली वस्ती होती. ही सपाटीची जमीन संपली की चढ सुरू होत तो पुढे पठाराला मिळत असे. या पठारावरही रखमाजीची मोठी जमीन होती. या जमिनीला सातपाटील घरचा पठार म्हणत असत. या त्यांच्या घरच्या पठाराला लागूनच शेजारी पल्याडच्या माजमपूर गावच्या पाटलाच्या मालकीचे पन्नास एक एकरांचे मोठे पठाराचे रान होते. रखमाजी आपल्या पठारावर जिराईत ज्वारी, करडई अशी पिके घेत असे. जी जमीन रखमाजीची होती किंवा जी त्याची म्हणून ओळखली जात असे, ती वस्तुतः रखमाजी आणि पिराजी या दोघांचीही होती. ते दोघेही जानराव याचे औरस पुत्रच होते. पण पिराजी कधीही त्या जमिनीच्या वाट्याला गेला नाही किंवा कधीही तिच्यात राबला नाही म्हणून ती त्याची म्हणून ओळखली जात नसे. आणि त्याबद्दल त्याचे काही म्हणणे आहे, असे कधीही कोणालाही दिसले किंवा वाटले नाही. शेजारचे माजमपूरच्या पाटलाचे मोठे रान वहिवाटीला न आणलेले असे कुंवार होते. त्यापल्याड उतरण होती. उतरणीखालच्या खबदाडीत वीसपंचवीस घरांचे छोटेसे माजमपूर गाव होते. पुढे काही सपाट प्रदेश आणि

पुन्हा चढ उतार असे रान होते. त्या परिसरात रानडुकरे आणि हरणे सापडत असत. हे रांगडे पठार माणसांच्या वस्तीसाठी सर्वथा अयोग्य होते. त्या ठिकाणी पिराजीने आधी एक साधी कोपी बांधली. आणि तिच्यात राहून काही दिवसातच, एक पक्की झोपडी उभारून, तिच्या भोवती बोरी-बाभळींच्या वाळक्या काटेरी फांद्यांचे एक भक्कम कुंपणही त्याने उभे केले. त्यासाठी गावातल्या कोणत्याही कारागिराची सेवा त्याने घेतली नाही. त्याचे जे कोणी रामोशी, बेरड, भिल्ल साथीदार होते; त्यांनीच ते काम पुरे केले. आता, हे असे का, या कुतूहलाच्या पूर्तीसाठी लोक जेव्हा दुरून का होईना अधिक चौकसपणे पाहू लागले, तेव्हा त्यांना समजले की पिराजी ह्या वेळी आपल्या सोबत एक बाई घेऊन आलेला आहे. म्हणजे एक कोणीतरी बाई लांब अंतरावरून तिथे कोणाला तरी दिसली होती; इतकेच. ही बाई कोण, ती पिराजीची कोण, ती इथे कशी आली, याचे कुतूहल साल्पीतील आम जनतेस अतोनात होते. पण विचारणार कसे आणि कोणाला? पिराजी गावात येत नव्हता. आणि आला असता तरी त्याला थेट विचारायची हिंमत कोणीही केली नसती, हे उघडच होय. आणि तो गावात येत नाही म्हणून थेट तिथे जावून चौकशी करण्याचे धाडस कोणातही नव्हते. कळून सवरून वाघाच्या गुहेत कोण प्रवेश करणार? ज्याला त्याला आपला आपला जीव प्यारा. त्या मैदानी पठारावर पिराजी एखाद्या रानटी वाघासारखा अत्यंत विक्राळ आत्मसुखकारी आनंदे राहात होता. त्याच्या परिसराच्या आसपास फिरकण्याची हिंमत सुद्धा कोणी करत नव्हते. बाकीच्यांचे समजा सोडा; पण त्याचा सख्खा थोरला भाऊ रखमाजी किंवा त्याला प्रिय असलेली त्याची भावजय समिंदरा, हेही तिकडे गेल्याचे ऐकिवात नव्हते. कदाचित तो आला आहे आणि तो जिवंत आहे, हेच त्यांच्या सुखासाठी पुरेसे होते.

थोड्याच दिवसांनी काही वेधक तपशील लोकांच्या कानांपर्यंत पोहोचला आणि त्यांची ताणलेली उत्सुकता निदान काही अंशी तरी शमली. बाकी कल्पनेचे इमले रचण्यास वाव अर्थातच होता. पण ते तर काय ; रस असला की सतत चालणारे काम असते! तर झाले असे की एके दिवशी एक इसम गावात आला आणि पाटलाला भेटण्यासाठी विचारपूस करू लागला. त्याचे नाव आबराम कोल्हाटी असे होते. तो जामखेड गावचा रहिवासी होता. त्याची तक्रार अशी होती की त्याची लेक उल्फी हीस पिराजी सातपाटील याने उचलून आणले होते. बार्शी भागात माणकेश्वर हे कोल्हाटी लोकांचे मूळ स्थान आहे. तिथे जत्रेला हा आबराम आपल्या लेकीसह गेलेला असताना, तिथून पिराजी याने त्याची पोर उचलली आणि तो तिला बळजोरीने घेऊन आलेला आहे, असा त्याचा दावा होता.

त्याचे म्हणणे असे की, त्याला बायको नाही आणि आणखी मूलबाळही नाही. या पोरीला ती अगदी छोटी असल्यापासून त्याने तळहातावरील फोडासारखे जपत वाढविले आहे. आता ती तिच्या वयाच्या भरात आलेली आहे आणि ती चांगली कमाई करू लागलेली आहे. तिच्या जीवावर सुखाने जगण्यास नुकतीच कुठे सुरुवात झाली होती. तिच्या लहानपणापासून ते आजवर तिच्यावर ; तिच्या नाचगाण्याच्या शिक्षणावर त्याने खूप खर्च, मोठ्या मुश्कीलीने केलेला आहे. अन् आता पिराजी याने त्याच्या लेकीला ऐन मोक्यावर असे काढून आणून त्याच्या तोंडचा घासच काढून घेतलेला आहे. तर याचा न्याय पाटलांनी करून द्यावा आणि एका गरीब कोल्हाट्याची जिन्नस त्याची त्याला परत

मिळवून द्यावी, अशी फिर्याद करण्यासाठी तो पाटलाला भेटणार आहे.

कोल्हाटी ही जात महाराष्ट्र, कर्नाटक, कानडा, व-हाड या भागात आहे. यांच्या जातीत बायकांची संख्या जास्त आहे. ही भ्रमणवृत्ती जात आहे. बार्शी तालुक्यातील माणकेश्वर हे यांचे मूळ वसतीस्थान होय. दोरावरून चालणे, नाचणे, कोलांट्या उड्या मारणे वगैरे कसरतीचे खेळ करून, भिक्षा मागून या जातीचे स्त्री-पुरुष उदरनिर्वाह करतात. शिंगांच्या फण्या, चाके, फडक्याच्या बाहुल्या करणे हे धंदेही हे लोक करतात. परंतु पुष्कळ कोल्हाटी स्त्रियांचा पूर्वापार धंदा गाणे, नाचणे व वेश्यावृत्ती हा असून जातपंचायतीच्या संमतीने तरुण मुली ह्या धंद्यात शिरतात. यांच्यात मुलीचे लग्न केलेच पाहिजे असा दंडक नाही. मुलगी वयात आल्यावर तिला विचारतात, लग्न करणार की कसबीण होणार? कसबीण होणार, असे उत्तर तिने दिल्यास जातपंचायतीच्या संमतीने आणि जातीस भोजन घालून तिची वेश्यावृत्ती जाहीर करतात. कोल्हाटणीने एकदा वेश्यावृत्ती पत्करली की मग जातीतले लोक तिच्याशी अन्नोदक व्यवहार तोडून टाकतात. यांच्यापैकी गोपाळगणी या पोटजातीतील स्त्रिया पुरुषांना फार नादी लावतात, अशी त्यांची ख्याती आहे. त्यांच्यातल्या निवडक व उत्तम कसबीणींना सोनचेडी असे म्हणतात. नृत्यगायन, वाद्यवादन याची साथ या स्त्रियांचे नातलग पुरुष करतात. उच्च जातीतील मुली चोरून, पळवून हे लोक त्यांना वेश्या बनवितात. महादेव व मारुती तसेच खंडोबा, बहिरोबा, मरीआई, जानाई, जोखाई, म्हसोबा वगैरे या जातींची दैवते आहेत. यांच्यातले काही मुसलमान झालेले आहेत. व-हाडात कोल्हाट्यांचे डुक्कर कोल्हाटी आणि खाम कोल्हाटी असे दोन पोटभेद आहेत. डुक्कर कोल्हाटी हे रानडुकरांना मारण्यात पटाईत असतात. हे लोक दरोडे घालतात. पण गुरे मात्र चोरीत नाहीत. खाम कोल्हाटी हे सहसा बायकांच्या वेश्यावृत्तीवर आपला निर्वाह चालवितात. खानदेशात उघड्या मांडीचे कसब अर्थात राजरोस वेश्यावृत्ती आचरणारी हरदास नावाची एक कोल्हाटी पोटजात आहे. गरती स्त्रियांनी व्यभिचार केल्याची शंका आल्यास हे लोक त्यांना काही दिव्ये करायला लावतात. ते अविवाहित स्त्रियांच्या मुलांना जातीबाह्य समजतात. यांच्यात विधवा विवाह रूढ आहे, पण सोडचिठ्ठी देण्याची पद्धत मात्र नाही.

आबराम हा जातीचा कोल्हाटी ; साहजिकच त्याच्याजवळ अभिनयाचे नैपुण्य पुरेपूर होते आणि तेणेकरून त्याने ऐकणाऱ्यांच्या काळजास अगदी हलवून टाकले. त्यामुळे त्यातले काही स्वतः होऊन त्यास तुळाजी पाटील खोपडे; जे वृद्ध गणोजी पाटील यांचे पुत्र ; जे सध्याचे पाटील होते, त्यांजकडे घेऊन गेले. यांचाच पुत्र जयसिंग यास झमबाई; पिराजी सातपाटील याची पुतणी, दिलेली होती. तुळाजी हे शांत, दमदार स्वभावाचे म्हणून सर्वास ज्ञात होते. त्याविषयी लोकांचे काहीही म्हणणे नव्हते. पण आबराम कोल्हाटी याच्या प्रश्नांविषयी त्यांना कुतूहलजनक आस्था होती. त्यांच्या मनात शक्यतेच्या टप्प्यात आलेल्या, अगदी नजीकच्या भविष्यातील नाट्याला साक्षी होण्याची चाहत होती. तुळाजी पाटील यांनी आबराम कोल्हाटी यांचे म्हणणे अगदी शांतपणे ऐकून घेतले. मग म्हणाले, 'तुला काय पाहिजे?' 'मला न्याय पाहिजे. मला माझी मुलगी परत पाहिजे.' 'ती तिच्या मर्जीने आली असेल तर?' 'नाही. त्याने ती बळजोरीने काढून आणलेली आहे.' 'कशावरून?' 'तशी माझी अर्जी आहे.'

'ती अर्जी माझ्याकडे करून उपयोग नाही. तू तालुक्याला जा. मामलेदारसाहेब यांच्याकडे अर्जी दे. ते फैसला देतील. त्या संबंधाने मला विचारणा झाल्यास मी मला दिसणारे सगळे सत्य सांगेन.'

अशा पुळचट प्रकारे आबराम याच्या प्रश्नांची समाप्ती झाल्याने त्याच्या सोबत गेलेले साल्पी येथील जबाबदार नागरिक खटू झाले, की बुवा, पाटलांसोबत रखमाजीचे पठारावर जावून चौकशीचे नाट्य

पाहण्याची आणि त्यापेक्षाही पिराजीने काढून आणलेली ती स्त्री पाहण्याची सुरक्षित संधी हुकली. एरवी स्वतः होऊन तिकडे जाण्याची हिंमत कोण कशाला आबराम कोल्हाटी मोठाच चलाख माणूस होता. तो ज्या परिस्थितीत जगत होता, त्या जगण्यानेच त्याला तसे केले असेल. त्याने सांगितलेले सगळे तपशील बव्हंशी खरेच होते. पिराजीने त्याची पोरगी बळजोरीने उचलून आणली, हे मात्र खरे नव्हते. उचलून आणली, पण ती बळजोरीने नव्हे. खेरीज तो तालुक्याला जाऊन आलेला होता, तिथे त्याला कोणीही कुठेही उभे केलेले नव्हते, हे त्याने सांगितले नव्हते. तो रखमाजीच्या पठारावर जाऊन आपल्या लेकीला भेटला होता आणि तिथे त्याने तिला ओढून बाहेर काढण्याचा प्रयत्न केलेला होता, हेही त्याने सांगितलेले नव्हते. त्याला त्याच्या लेकीला भेटण्याची उदारपणे परवानगी देणाऱ्या पिराजीने त्याची ही कृती लक्षात आल्यावर त्यास बेदम पिदाडले होते, याविषयीही तो बोलला नव्हता. एकट्याने तिकडे जाण्याची त्याच्यात हिंमत उरली नव्हती, याविषयीही तो बोलला नव्हता.

जामखेड येथे नागपंचमीच्या दिवशी इतरत्र असते तशी नागेश्वर मंदिरात नागोबाची पूजा होते. दुसरा दिवस षष्टीचा. तिला शिराळषष्टी म्हणतात. त्या दिवशी संध्याकाळी गावच्या पाटलाच्या घरी शिराळशेट्टी उर्फ सकरुबाची पूजा होते. या षष्टीच्या रात्री रात्रभर गावातल्या रस्त्याने नाचगाणे चालते. यात नाचणाऱ्या तरुण, देखण्या कोल्हाटणी असतात. त्यांच्या भोवती वाद्यवादन करणारे काही त्यांचे नातेवाईक आणि बाकीचेही असतात. टिपऱ्यांचा, लेजिमांचा खेळ चालतो. शौकिनांसाठी ती एक पर्वणी असते.

त्या नागपंचमीला पिराजी जामखेड गावी धडकला यात किरकोळ योगायोगाखेरीज काहीही नव्हते. तो आणि त्याचे दोस्त त्या भागात होते आणि तिथे षष्टीच्या रात्रीचा कोल्हाटणींचा नाच मोठा दिलखेचक असतो, असे त्यांच्यापैकी एकाने ऐकलेले होते. दोस्तांच्या नादाने पिराजी तिथे गेला. आणि रात्री कधी तरी त्याने तिथल्या रस्त्यात नाचणाऱ्या उल्फीला पाहिले. तिला पाहताक्षणीच तो घायाळ झाला. अन् नुसते त्याने तिला पाहिले असे नव्हे. तिनेही त्याला पाहिले होते. त्याच्याशी नजरानजर होताच तिच्या नृत्याचे न्यास बदलले होते. ती दिलखेचक अदाकारा तर होतीच.

पण पिराजीशी नजरानजर होण्याच्या आधी ती काहीशी कंटाळलेली आणि यांत्रिक पद्धतीने नाचत होती. त्याच्याशी नजरानजर होताच तिच्या नृत्यात नवी जान आली. त्याची नजर तिच्यावरून हटेनाशी झाली. अन् तीही फक्त त्याच्यासाठीच नाचू लागली. तिचा बाप आबराम त्यावेळी तिथे होता. हे त्याच्या लक्षात यायला फारसा वेळ लागला नाही. या गोष्टीला त्याची अजिबातही हरकत नव्हती. गडी मोठाच तगडा दिसत होता. मालदार असावा हे सहज दिसण्यासारखे होते. असा तेजदार मासा गळाला लागावा, ही

मोठीच खुशीची गोष्ट होती. त्याची नजर खेचता खेचता उल्फी जरा जास्तीच उत्साहाने नाचत आहे, हे त्याला जरा विक्षेपकरी वाटले. पण ते त्याला फार बोचले नाही. घायाळ करा आणि खेचा. खेळच असतो तो. धंद्याचा भाग. आबराम हलकेच पिराजीच्या निकट गेला आणि त्याने त्याला रामराम घातला. त्याच्या कानाशी लागून म्हणाला, "जिन्नस आवडला असेल तर गरीबाच्या घरी पायधूळ झाडा. माझे नाव आबराम.'

इतके बोलून आबराम सटकला. कारण तितकेच त्याचे काम होते. पेटलेल्या पलित्याला योग्य ती दिशा देण्याचे काम. बाकी गोष्टी आपोआप होतात, असा त्याचा अनुभव होता. पिराजीच्या दोस्तांचीही त्याच्यावर नजर होतीच. आपला हा दोस्त या पोरीसाठी पुरता पागल झाला आहे, हे त्यांना दिसत होते. ती पोरगीही त्याला चेतवत खेचत आहे, हेही त्यांच्या लक्षात आले होते. पण सकाळ होता होता खेळ संपला तरी पिराजीने कोणतेही पाऊल उचललेले नव्हते, काहीही संकेत दिला नव्हता. त्यामुळे ते गोंधळून गेले होते. तरीही एकाने धीर करून त्याला विचारले, 'जायाचं का?' 'कुढं?' 'त्येच्या घरी.' 'काह्याला?' 'काय नायी. सह्यज आपलं ओळकपाळक', विचारणारा गांगरला. 'नायी.' पिराजी ठामपणे म्हणाला.

त्या भागात डोंगरगणमधल्या डोंगरातल्या गुहा त्यांच्यासाठी सगळ्यात सुरक्षित होत्या. तिथे बसल्या बसल्या घाटरस्त्यात घाला घालता येत असे. घाटात, रस्त्यात काय करायचे ते करून लपण्यासाठी तितकी आदर्श जागा दुसरी नव्हती. त्या रानात वाघ- सिंह असे प्राणी वसतीला असण्याच्या भूमका असत. अशा ठिकाणी कोण कशाला फिरकतो? हे तिथे सुरक्षित होते. पण त्यांचा मुखिया आता भानावर उरलेला नव्हता. त्याच्यासाठी ते अस्वस्थ होते. पण पिरादादाशी कोण बोलणार आणि कसे? अरे! तुला ती पोर आवडली ना? आम्ही तिला उचलून आणतो ना! तुला तिच्या घरी नाही जायचे? ठीक आहे. आम्ही तजवीज करतो. यःकश्चित कोल्हाट्याची पोर ती काय; तिच्यासाठी असे झुरणीला कशासाठी लागायचे? तिच्याशी लग्न थोडेच करायचे असते? वापरली, सोडून दिली; संपला व्यवहार. मनाने गुंतण्यासारखे, झुरणीला लागण्यासारखे या लोकात काय असते? कसबिणीच असतात त्या. तिचे ते विजेसारखे नाचणे, तिचे मादक हावभाव; नाटक असते रे सारे! धंदा असतो त्यांचा. तेच शिकलेल्या असतात त्या. असेल ती पोर पारंगत तिच्या कौशल्यात. पण डोके ठिकाण्यावर असले की कळतेच ना रे सारे! कमाल आहे; तुझ्यासारखा इतका हुशार माणूस अशा चलाख कटाक्षांनी घायाळ कसा होऊ शकतो? पिराजी काहीही बोलत नव्हता. आणि त्याला कशातही रस उरलेला नव्हता. मग करायचे काय? एकाने युगत काढली. म्हणाला, 'माणकेश्वरला जत्रा आहे. ते कोल्हाट्यांचे मूळ ठिकाण. निदान तसे ते सांगत असतात. या जत्रेला तमाम कोल्हाटी जमा होतात. तिथे ती पोर अन् तिचा बाप हमखास येईल. तिकडे जाऊया. दादाला काहीच सांगायला नको. जत्रेला जायचे आहे, इतकेच सांगूया. तिथल्या देवाचे सत्त्व मोठे आहे. आपल्या मनातले ओळखून तो आपल्याला रस्ता सांगतो, असे अनेक लोक सांगतात. आपण तिथे जाऊ आणि माथा टेकवू.

पिरादादाला जरूर तितकेच सांगायचे. बाकी आपले आपल्यात.' असे करून जत्रेला गेले. तर तिथे थेट भेटच झाली. दृष्टादृष्ट झाली आणि ती पोर पळत येऊन त्याच्यासमोर

उभी राहिली. तिच्यापाठी तिचा बाप ; जो तिच्यावर डोळ्यात कायमच तेल घालून लक्ष ठेऊन होता, तो येऊन उभा राहिला. म्हणाला, 'बघा, बघा. माझी लेक तुमच्यासाठी किती पागल झालेली आहे. ती आसुसलेली आहे. अन् ती अगदी झुरणीला लागलेली आहे. तिच्या अशा स्थितीला फक्त आणि फक्त तुम्हीच जबाबदार आहात. तुम्हाला तिला असे दुःखी करण्याचा काय अधिकार आहे? ती सारखी तुमची वाट बघत आहे. तुम्ही तिला भेटायला का नाही आलात?'

पिराजीच्या साथीदारांमधला एकजण म्हणाला, 'अगदी बरोबर आहे काका. आमच्या दोस्ताची अवस्था काही वेगळी नाही. पण या आषुकमाषुक व्यवहारात तो जरा अडाणीच आहे. तो दिसतो एखाद्या राजपुत्रासारखा. पण तसे त्याला कधीच वागता आलेले नाहीय. किंवा त्याला इतके घायाळ झालेले आम्ही याच्या आधी कधीही पाहिलेले नाहीय. आपण त्या दोघांना एकमेकांशी एकांतात बोलण्याची संधी देऊ. म्हणजे; आपण थोडे पलीकडे जाऊन त्यांच्यावर लक्ष ठेऊनच राहू. त्याबद्दल काळजी करू नका. यांचे जमले तर तुम्हाला फार मोठ्या लाभाची संधी आहे, हे आम्ही सांगण्याची गरज सुद्धा नाहीय. तुम्ही अनुभवी आहात.'

'अरे! चला ना मुलांनो! मी तुमच्या शब्दाबाहेर का आहे?' 'चला, चला काका.'

ते एकमेकांच्या समोर उभे राहिले. त्यांनी एकमेकांच्या डोळ्यात पाहिले. त्यांनी एकमेकांच्या फुलत्या नाकपुड्या पाहिल्या. त्यांनी एकमेकांच्या ओठांची थरथर पाहिली. त्यांचे कान बधीर झाले. जत्रेतले सगळे आवाज थांबले. कोलाहल ठप्प झाला. सगळे अंतराळ एकवटून त्यांच्यात उतरले. त्यांच्यासाठी सारे विश्व त्यांच्या अस्तित्वाच्या आडोशाला गेले होते.

'तू मला इथून उचल. तू मला पळवून ने. माझा बाप भामटा आहे.

मला तुझ्यासोबत राहायचे आहे. नेतोस मला?'

'नेतो. पण मी कोण, काय करतो, हे काहीच विचारणार नाहीस?' 'नाही. त्याची मला गरज नाही.' 'ठीक.'

त्याने दोस्तांना संकेत केला. ते आले. त्यांच्यात हर्षोल्हासित चेहऱ्याने तिचा बाप जवळपास धावतच अग्रभागी होता. तो आला आणि त्याने एखाद्या प्रफुल्लीत प्रौढ बाईसारखे आपले हात आपल्या लेकीचा चेहरा, कानशिले; यांजवर फिरवून स्वतःच्या कानशिलांशी बोटे मोडत कृतज्ञ आनंद व्यक्त केला. कोल्हाटणीच्या कसबात आपली लेक किती पारंगत आहे, हे त्याला आधीही कळलेले होते. त्या शिक्षणाचा अंतिम टप्पा तिने कधीच पार केलेला होता. आता, इथे इतक्या बड्या धेंडाला इतक्या कमी वेळात गळाला लावून तिने आपल्या विद्येतला कळसच गाठला होता. मिळू घातलेल्या बिदागीचा उजेड त्याच्या चेहऱ्यावर उत्फुल्ल फाकला होता. दोस्त जवळ येताच पिराजी एकाच्या कानी लागला, 'पोरगी उचलायची आहे. थेट साल्पीला घेऊन जायची आहे.'

'ठीक आहे.' दोस्ताचा शब्दांचा मितव्यय.

'काका, तुम्ही देवदर्शन वगैरे निवांत उरका. नंतर आपल्याला निघायचे आहे.'

'कुठे?' 'कुठे म्हणजे? तुमच्या घरी. जामखेडला. आणखी कुठे?' 'चालेल, चालेल. बडी मेहेरबानी आपली.'

'मेहेरबानी तुमची आहे काका. आमच्या दोस्ताचं झुरणं निकालात काढलंत.'
'सेवा करणं हा आमचा धंदाच आहे ना! तुमच्या दोस्ताची मुळीच
निराशा नाही होणार.'
'निराशेचा प्रश्नच नाहीय काका. या, या देवदर्शन करून या; निवांत. ते झाले की निघू.'
'काय बेटी, चालेल ना?' कोल्हाट्याने आपल्या लेकीस प्रेमळपणे विचारले.
तिनेही प्रेमळ होकार दिला.

त्या संध्याकाळी, माणकेश्वर स्थानी, आबराम कोल्हाटी याच्या मते, एका गाफील क्षणी, देवदर्शनाच्या गर्दीत, कोणीतरी त्याच्या लेकीला अजात उचलले. आणि पळवून की हो नेले! आत्ता होती अन् आता नाही, असा चमत्कार जाहला. लक्षात येताच भानावर येऊन तो सैरावैरा तिथल्या गर्दीत छातीवर दोन्ही हात झोडत आकांत करीत धावू लागला, तेव्हा लोकांना कळेचना की झालेय काय, कारण को दुःखाच्या त्या टणत्कार क्षणी; आवेग, संवेग, प्रवेग यांनी युक्त अशी भावनांची इतकी दाटी त्याच्या हृदयात झाली होती की, त्याला बोलताच येईना. शब्दच स्तंभित झाले.कोणत्या तरी दिशेने भरधाव धावणारे चारसहा घोडे त्याने पाहिले आणि तिकडे हात करीत, 'तेच ते, तेच ते, त्यांना अडवा, त्यांना पकडा.' असे तो म्हणू लागला. पण त्याच्या मनातील ते शब्द खुद्द त्याच्या कानांपर्यंत पोहोचू शकत नव्हते, ते इतरांपर्यंत कुठून आणि कसे पोहोचणार? दरम्यान, घोड्यांनी उठविलेली धूळ तेवढी उरली आणि ती हळूहळू जमिनीवर बसत, सगळे पोटात घेतल्यासारखे, त्या दिशेचे क्षितिज, आधी होते तसे, कोरे होऊन गेले. तो खूप उन्हाळे-पावसाळे पाहिलेला माणूस होता. त्याच्या लक्षात आले की, हे तिच्या इच्छेखेरीज होऊच शकले नसते. त्याला मोठाच धक्का बसला.

3

आबराम हा मोठाच चतुर, सतत सावध असलेला मनुष्य होता. जन्माने कोल्हाटी असल्याने त्याला तसे व्हावे लागले होते. जगताना प्रत्येक क्षणी सावध राहणे, हे त्याला कायमच भाग पडले होते. वंचिताला वेगळा रस्ता नसतो. ती त्याच्या जगण्याची पूर्वअटच असते. आबराम हे त्याचे नाव बहुधा त्याच्या इब्राहीम या नावाचे अपभ्रंश रूप होते. ते नाव त्याला त्याच्या आईने किंवा बापाने ; सहसा आईनेच दिलेले असेल. कोल्हाट्याला बाप नसतो. आई असते. कोल्हाट्याला धर्म नसतो. जो मिळेल तो आपला मानून जगणे त्याला क्रमप्राप्त असते. नाहीतरी आकाशातल्या भगवंत किंवा अल्लाह यांच्या नजरेत हिंदू अन् मुसलमान असा फरक कुठे असतो? कोल्हाटणीला निदान कसबीण होऊन पैसा कमवायची संधी तरी असते. पुरुषाला तीही नसते. त्यामुळे जगण्यासाठी हिंमत आणि अनेक हिकमती करून कुठून तरी एखादी बाई पकडून किंवा

तात्पुरती लुभावून आणावी लागते. तिला चतुराईने धंद्याला लावून चरितार्थ चालवावा लागतो. नच जमले तर चोऱ्यामाऱ्या करा अन् तेही नीट जमले नाही तर लाचार होऊन एखाद्या कोल्हाटी कसबिणीला वाद्यासाठी साथ करा, तिला गि-हाईक मिळवून देण्यासाठी साह्य करा. भडवेगिरी या ना त्या प्रकारे करणे हेच त्याच्या जगण्याचे भागधेय असते. कारण जगणे तर असतेच ना!

असे अनेक सगळे उद्योग करत असताना आबराम याने एक बाई हेरली आणि आपले सगळे कौशल्य वापरून पटवली सुद्धा. बाई विधवा होती. तरुण, सुंदर होती आणि मराठा जातीची होती. प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागली. पण यश मिळाले. ती तिच्या माहेरी तिच्या भाऊ आणि भावजयांसोबत फेकून दिलेल्या फाटक्या चिरगुटासारखी राहात होती. पुन्हा लग्न होण्याची शक्यता अजिबातही नव्हती. ते समजा नाही झाले तरी चालले असते तिला ; ते ती समजू शकत होती. कुळीच्या मराठ्यात बाईचा पुनर्विवाह होत नसतो. पण ज्या प्रकारे तिचे भाऊ तिला एक लोढणे समजून वागवत होते आणि तिच्या भावजया सतत तिला हिडीसफिडीस करीत होत्या, त्यामुळे ती कावून गेलेली होती. आबरामने तिचे हे वर्म नेमके हेरून आपली चाल चालवली. कोल्हाट्याचे बुलंद आकर्षक रूप त्याच्यापाशी होतेच होते. त्याची वाणी मिठास होती. सगळे हेरून त्याने जाळे टाकले आणि तिला पळवून घेऊन तो आला. तिच्यापाठी तिला शोधायला कोणीही आले नाही. बरे झाले, पीडा गेली हीच भावना ; दुसरे काय? तिची समजूत पटविण्यासाठी त्याने तिला रानातल्या एका देवळात नेऊन तिच्याशी पाट लावला. जातीला जेवण दिले. ती खूश झाली. त्याच्याशी नांदू लागली. ती बाई इतकी चांगली आणि मनाने सुकुमार होती की इतका चलाख कोल्हाटी असूनही त्याचे मन द्रवले. त्याने चोऱ्यामाऱ्या सोडल्या. कोणत्याही प्रकारे भीक मागणे सोडले. तो धंदेवाईक कोल्हाटणींना वाद्यवादनाची साथ करत असे. पण ते काही रोज मिळणारे काम नव्हते. मग आणखी एक जोडीदार घेऊन तो लाकडे कापण्याचे काम करू लागला. तसेच आंबे उतरणे, केळी खांदणे, पिकांची राखण करणे, उतरणीवरच्या जमिनीला दगडी बांध घालून शेत काढून देणे, अशी असंख्य प्रकारची कामे तो करू लागला. लवकरच त्याला त्या बाईपासून एक मुलगी सुद्धा झाली. ही मुलगी झाल्यापासून त्याच्या विचार करण्याच्या पद्धतीत बदल होऊ लागला. तो इतक्या सूक्ष्मपणे होत गेला की, त्याचे त्याला सुद्धा ते लक्षात आले नाही. मुलगा होणे हे ओझे आणि मुलगी होणे हे उत्साहवर्धक, असा समज त्याच्या जातीत होता. आणि का असू नये? लेकीला नीट वाढवून, शिकवून धंद्याला लावून चरितार्थ उत्तम करणे ही आम रीत होती. वाढत्या, खेळत्या लेकीकडे बघताना त्याच्या हे मनात येत असे. खेरीज त्याला आणखी वाटू लागले की, ही जी सगळी मजुरीची कामे एखाद्या कुणबटाच्या निष्ठेने आपण करत आहोत, तो काही आपला धंदा नाहीय. ही बाई भेटली, चांगली वाटली; ठीक आहे. पण म्हणून आपण आयुष्यभर हेच करीत राहायचे, हे काही ठीक नाही. अरे! आपल्याजवळ बाई आहे. पोरगी मोठी होईल तेव्हा होईल. बाई म्हणजे अखेर असतं काय? चमडंच ना! त्याचीच चाहत असते ना मूर्ख पुरुषांना. तर वापरा ना ते. त्याने बाई बाटते थोडीच? पोरगी मोठी होईस्तोवर जमेल तितकी या बाईला हुशारीने वापरली तर आरामात बसून खाऊ, जगू शकतो आपण. मग त्याला वाटू लागलं की, मुळात हा हेतू मनाशी ठेवूनच

आपण ही बाई पटवली होती. पण मधल्या काळात आपण भरकटलो. तिच्या नादाने कुणबट मजुऱ्या करण्यापर्यंत आपली मजल गेली. आपलं डोकं काय कोकणाला गेलं होतं की काय? आपल्याला पाहिजे त्या दिशेकडे बाईला नेण्याच्या ऐवजी आपणच तिच्या आहारी गेलो! आता तिला कामाला लावली पाहिजे.

परिस्थिती त्याला अनुकूल होती. तिच्यासारख्या अनेक बाया वस्तीत होत्या. कोल्हाटी पुरुष आपल्या जातीत लग्न करत नाहीत. ते दुसऱ्या जातीतल्या बाया पळवून आणतात. तशाच सगळ्या बाया भोवताली होत्या. त्या अनेक जातींच्या होत्या. त्या कोल्हाटणी होऊन आपल्या मांडीचे कसब वापरत होत्या. तिने ते का वापरू नये? आधी त्याने काम करणे बंद केले. चलन येणे बंद. फाके पडू लागले. मार्ग? म्हणाला, 'तुला दिसतेय ना? आसपास पाहते आहेस ना? आता तू मराठण नाहीस. कोल्हाटीण आहेस. मांडीचे कसब, हा आपला धंदा आहे. त्यात गैर काहीच नाहीय. सगळे तेच करतात.' ती म्हणाली, 'मला ते नको आहे. एखाद्या फुलाभोवती भुंगा जसा घिरट्या घालत गुणगुणतो, गुंजारव करतो; तसे प्रेमाचे सुख तू मला दिले आहेस. मला तितके पुरेसे आहे. आणि मला तेच हवे आहे. प्रसंगी उपाशी राहून सुद्धा मला तेच हवे आहे.' म्हणाला, 'मूर्खासारखी बोलू नकोस. कोल्हाटीण झाली आहेस तर तिच्यासारखी वाग. तो आपला धर्म आहे. तो आपल्या सुखाचा धर्म आहे. तुझा मुख्य पुरुष म्हणून मी हे तुला सांगतो आहे. बाकी पुरुष येतील आणि जातील. मी कायम आहे.' ती म्हणाली, 'मला चालणार नाही.' म्हणाला, 'तुला चालवून घ्यावे लागेल. मी पुरुष आणतो. तू त्याच्याशी जा.' ती ऐकत नाही, हे लक्षात आल्यावर त्याने बळजोरी करण्याचे ठरवले. तो एकाला घेऊन आला. म्हणाला, 'हा आला आहे. याला खूश कर. मांडीच्या कसबात भावना आणून गुंता करू नकोस. उरेल ते सगळे सुख आपलेच आहे.' ती ऐकेना. त्याने तिच्या थोबाडीत सणसणीत फटका दिला. तिला त्याच्याशी जायला लावले. कल्पना अशी होती की, सवय होईल तिला. होतेच. सगळे सुरळीत होते नंतर. मन मरून जाते माणसाचे. पण तिचे तसे झाले नाही. ती त्या परक्या माणसाशी गेली. तो पुष्कळ दिवसांच्या खंडानंतर त्या रात्री दारू पिऊन घरी आला. मनात असे की बुवा, झाले. आता मैदान आपल्यासाठी मोकळे आहे. आज नसेल तर उद्या असेल. उद्या नसेल तर परवा होईल. परवा नाही तर नंतर कधी. रडेल, गागेल; पण निर्दावेलच कधीतरी. तसे झाले नाही. ती त्या रात्री निघून गेली. दारू पिऊन आलेला असल्याने त्याला ते तितके त्या रात्री जाचले नाही. पण दुसऱ्या दिवशी ती नव्हती. नंतर तिसऱ्या, चौथ्या किंवा येणाऱ्या कोणत्याही दिवशी ती नव्हतीच. ती कुठे गेली, तिचे काय झाले, याचा त्याला कधीही पत्ता लागला नाही. आधी वाटले, येईल. पण नाही आली. त्याने त्याची सवय करून घेतली. मुख्य म्हणजे ती एक रत्न ठेऊन गेली होती. त्यांची पोर. तिचे नाव उल्फी. त्या पोरीच्या बळावर आपले भविष्य बांधण्याचा त्याने निर्धार केला. शेजेला नियमित बाई कोणाला नको असते? ती होती. पण आता ती नाही. बिघडत नाही. आधी पोट नियमित चालण्याची व्यवस्था हवी. ते चालले की बाकी बाई वगैरे गोष्टी. त्या नियमित नसल्या तरी जगणे शक्य असते. पोट नियमित चालले पाहिजे. त्याच्याखेरीज कसे जगणार? पोरगी पाचसहा वर्षे वयाची आहे. तिला बघून तिला वाढविणारा मिळाला तर पुढचा काळ कठीण नाही. त्याने पोरगी दुनियेत उभी केली. अशी अशी आहे. बघा. नंतर ती तुमची होऊ शकते. पण तिला

वाढवा. तिला सगळ्या हुनर शिकण्याची संधी द्या. ती तुमची असेल. ती तुम्हाला सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून सुद्धा उपयोगी होऊ शकते. तुम्ही तिला वापरा. आणि इतरांना वापरण्याची संधी देऊन कमाई करा. ते नको असेल आणि ती फक्त तुम्हाला तुमचीच म्हणून हवी असेल तरी चालेल. पण तिला वाढवली तर पाहिजे ना! काय करायचे ते ठरवा. जिन्नस असा असा आहे. बघा. अशात एक पारखी मिळाला. पाटोदा परगण्यातलाच होता. नामे सुकलाल. मारवाडी होता. म्हणाला, मी पत्कर घेतो. ती वयात येईपर्यंत सगळा जिम्मा माझा. तुम्हाला काहीच कमी पडणार नाही.

सुकलाल त्याच्या शब्दाला जागला. त्याने अनाठायी पैसा दिला नाही. दिला तो व्यवस्थित हिशेब करत मारवाड्याच्या दक्षतेनेच दिला. त्यात थोडी काटकसर करून आबराम आपल्या विडीकाडीचा बंदोबस्त करू शकत असे. त्याने लेकीचे खाणेपिणे, तिचे तव्हेत-हेचे शिक्षण नीट होईल याची दक्षता कायम घेतली. ती शहाणी झाल्यावर, म्हणजे पहिल्यांदा ती रज:स्वला झाली तेव्हा, ती बातमी त्याने मोठ्या आनंदाने सुकलाल याचे कानी घातली. तिचा चिरा उतरविण्यासाठी तो मोठी रक्कम मोजणार होता. तो मोठाच आनंद आबरामसाठी होता. उल्फी हीस असे होणार आहे, याची कल्पना होती. ती आम रीत असते, हे तिला माहीत होते. त्याविषयी तिची काहीही तक्रार नव्हती. आपल्यासाठी मारवाड्याने पैसे मोजलेले आहेत, तेव्हा त्याचा आपल्यावर हक्क आहे, हे तिला मान्यच होते. एका रात्री तो आला आणि तिच्या शय्येत गेला. तेव्हा ती सरळपणे त्या प्रसंगास सामोरी गेली. आणि नंतरही त्याला हवे तेव्हा जात राहिली. असे करणे हा आपल्या जगण्याच्या धर्माचा भाग आहे, अशी तिची श्रद्धा होती. तिला तो संबंध खास प्रिय आणि सुखकारक वाटत नसे. सुकलाल वयस्क होता. त्याचे सामान एखाद्या कोळंबीसारखे होते. तव्यावर तेलात ती भाजताना जशी फुगते तसे ते रतीकाळी काहीसे फुगे. आणि तेही फार काळ टिकत नसे. त्याबद्दल सुद्धा उल्फीची तक्रार नव्हती. सरळच की, शरीराच्या सुखाची तिला खास माहिती नव्हती. ते पुरुषांना हवे असते म्हणून ते तसे करतात आणि आपण त्यांना हवे तसे वागले पाहिजे, इतकेच तिला कळत होते. जसा असेल तसा सुकलाल तिचा पुरुष होता. तिने ते मनाने स्वीकारले होते. इकडे ती तिच्या नृत्य आणि गायनाच्या कौशल्याने रसिकांना घायाळ करू लागली होती. अनेक लोक तिच्यासाठी पागल झाले होते; प्रत्यही होत होते. त्यातल्या अनेकांना तिच्या शय्येत जाण्याची कांक्षा होती. त्यासाठी ते कितीही दाम मोजायला एका पायावर तयार होते. ते साहजिकच होते. कोल्हाटीण तर त्यासाठीच असते ना! रगेल आणि रंगेल पुरुषांची कमतरता कधीच नसते लोकात. आवडणाऱ्या नाची बाईसाठी कितीही पैसा उधळायला ते तयार असतात. आणि कोल्हाटणींचे तर काय! तरुण वयात जितका खेचता येईल तितका पैसा खेचायचा आणि वय झाल्यावर एखाद्या शेठ- सावकाराशी निष्ठेने राहायचे असा रिवाजच असतो त्यांचा. आबराम खोऱ्याने पैसा ओढत होता. तो सुकलाल यास त्याचा हप्ताही देत होता. सगळा आनंदी आनंद होता. धुंगरांच्या तालावर उल्फी थिरकत होती. तिच्याभोवती पैशांचा पाऊस पडत होता.

एकेदिवशी आबराम उल्फीला म्हणाला, 'असा असा, अमुक अमुक पाटील तुला फार चाहतो आहे. त्याला तुझ्याशी येण्याची इच्छा आहे.' ती म्हणाली, 'हे नाही चालणार. मी

सुकलाल यांच्याशी बांधलेली आहे. मी इतर कोणाशी जाणार नाही.' आबराम म्हणाला, "सुकलाल शेठची परवानगी आहे त्याला. त्याचं काहीही म्हणणं नाहीय.' ती म्हणाली, 'मी शेठशी बोलते.' ती बोलली. म्हणाली, 'असं असं.' तो म्हणाला, 'माझी हरकत नाही. तू माझी आहेसच. पण तुला अधिक पैसे मिळत असतील तर मी त्याच्या आड येणार नाही.' ती म्हणाली, 'मला नाचगाण्यातून खूप पैसे मिळतात. मला त्यापेक्षा अधिक नकोत.'

'तुला किती मिळतात?'

"ते मला माहीत नाही. ते माझ्या बापाला माहीत असेल. तो ते गोळा करतो. पण ते भरपूर असावेत. लोक सारखे ते उधळत असतात. दौलतजादा करत असतात.'

'तू सगळ्या प्रकारे जास्तीत जास्त पैसा मिळवावा अशी तुझ्या बापासारखीच माझीही इच्छा आहे.'

'पण मी तर तुम्हाला बांधलेली आहे ना!' 'ठीक आहे. चांगलं आहे. तरीही मीच तुला मोकळीक देतोय ना!'

सुकलाल याला त्या हिशेबात फायदाच होता. त्यातून त्याचा हिस्सा त्याला बिनबोभाट मिळत होता. हिशेब साधा होता. गुंतवणूक तर उत्तम परतावा अन् अधिकाधिक नफा मिळवण्यासाठीच असते ना! ते चांगले होत होते. त्यात आबराम त्याची थोडी फार फसवणूक करतही असेल. तरीही एकूण मामला फायद्याचाच होता. निर्लिप्त मनाने व्यवहार हीच सुकलालच्या जगण्याची रीत होती. तो काही उल्फीच्या प्रेमात थोडाच पडलेला होता? अशा अनेक उल्फी त्याने पाहिलेल्या, घडविलेल्या होत्या. तो आपल्या गुंतवणुकीवर खूश होता. आबराम जितका स्वतःच्या जगण्यावर खूश होता, तितकाच सुकलालही केलेल्या सौद्यावर खूश होता. त्याने भांडवल ओतले होते. आणि त्याला त्याचा परतावा उत्तम मिळत होता. मग तक्रारीला जागा कुठे होती?

उल्फीने सुकलालने देऊ केलेली संधी घेतली. ती अनेक आषकांसोबत जाऊ लागली. त्यामुळे तिला शरीराच्या सुखाच्या अनेक ढंगांची ओळख होऊ लागली. रांगडे, धसमुसळे पुरुष. रसिकतेने तिला स्पर्श करून द्रवित करणारे पुरुष. या दोहोंच्या मधल्या प्रदेशात वावरणाऱ्या पुरुषांच्या अनेक तऱ्हा तिने अनुभवल्या. तिच्याशी प्रत्यक्ष संबंध न करू शकणारे आणि तरीही तिच्या नग्न देहाच्या दर्शनाचे नेत्रसुख अनुभवणारे म्हातारे पुरुष तिने पाहिले. अनेक ओंगळ प्रकारे संबंध चाहणारे पुरुषही तिने पाहिले, अनुभवले. या सगळ्या दर्शनात आणि अनुभवात तिने सुकलाल याच्या कोळंबी अनुभवाची जागा सुद्धा रेखांकित केली. ज्ञानाच्या उन्नत अवस्थेतच हे शक्य असते. त्याच्या योगे, अगदी लहान वयात दुनियेचे आकलन करणारा एक दार्शनिक सहजपणे तिच्या मनात तयार झाला. त्याची व्यक्त होण्याची रीत आणि भाषा भले दार्शनिकाची नसेल, पण आशय त्याच प्रकारचा होता. तिच्या दुनियेत स्त्रिया नव्हत्या. होते फक्त पुरुष. तिला वापरणारे आणि भोगणारे पुरुष. तिचा बाप आबराम, सुकलाल मारवाडी आणि तिच्या शय्येत येत असलेले पुरुष. हीच तिची दुनिया होती. तिच्या लक्षात आले की या दुनियेत आपण फक्त एक यंत्र आहोत. आपला बाप आणि सुकलाल मारवाडी यांना पैसा मिळवून देणारे यंत्र. अनेक वेगवेगळ्या पुरुषांच्या हवसची चाहत पुरी करणारे यंत्र. या दुनियेत आपले म्हणून असे कोणीही नाहीय. बाप नाही, सुकलाल नाही आणि अगदी रंगून जाऊन आपल्याशी शय्या

करणारा कोणताही पुरुष सुद्धा नाही. या प्रत्येकाच्या नजरेत आपण फक्त यंत्र आहोत. त्या त्या नजरेत ते ते यंत्र. ज्याच्या खांद्यावर मान टाकून रडावे असा बाप नाही. जिच्या मायेची विव्हल ओल आपले हृदय भिजवून टाकेल अशी आई नाही. सुखदुःखाचे बोलावे अशी मैत्रीण नाही, आणि मित्रही नाही. आपण फार एकटे आहोत. आपण एक एकटे यंत्र आहोत, भोगयंत्र आहोत. कोणीही आपल्यावर प्रेम करत नाही. आपल्यालाही कोणाविषयी प्रेम वाटत नाही. आपल्या या यंत्रात्मक अस्तित्वाचे काय करायचे हे आपल्यालाही कळत नाही. ती अशा अवस्थेत अडकलेली होती आणि तिला त्यातून सुटायचे होते.

ती अशा मनःस्थितीत असताना जामखेडला त्या रात्री तिची पिराजीशी नजरानजर झाली. नेत्रांमधून इकडून तिकडे आणि तिकडून इकडे बाण सुटले आणि लक्ष्यांचा अचूक वेध घेत त्यांनी त्या दोघांनाही घायाळ केले. अचूक खुणा पटल्या. त्या शब्दांच्या अतीत होत्या. त्या, त्या दोघांनाही विव्हल करणाऱ्या होत्या. ती त्याला माणकेश्वर येथे भेटली तेव्हा काहीही वेळ न दवडता म्हणाली, 'तू मला इथून उचल. माझा बाप भामटा आहे. मला तुझ्यासोबत राहायचे आहे. नेतोस मला?' या सगळ्याची पार्श्वभूमी एकूण अशी होती.

4

आबराम काही गप्प बसणारा माणूस नव्हता. आणि कसे गप्प बसावे त्याने? त्याची सोन्याची अंडी देणारी कोंबडी पळवली गेली होती. ती कोंबडी त्याने निगुतीने वाढविली होती. त्यासाठी मदतका यजमानाला; सुकलाल याला, तो मोबदल्याचा बऱ्यापैकी रास्त पुरवठा करत होता. सगळे उत्तम आणि सुखकारक चालले होते. आणि मधेच ही अशी त्याची कोंबडी पळवून नेण्यात आली होती. ती तिच्या मनाने पळून गेली होती. हे समजा खरेच - पण हे असे होणे त्याला परवडणारे नव्हते. ते त्याच्या भवितव्याचा चोळामोळा करणारे होते. त्याचा चुराडा करणारे होते. या पिराजीने समजा, तो आणि सुकलाल यांच्यात या कोंबडीची अंडी खाण्यात भागीदारी मागितली असती, तरी त्याने त्यावर विचार केला असता.

की बाबा, कोंबडीचीच इच्छा आहे की, काही अंडी या इसमास मिळावी. तर चालले असते ना! पण त्याने थेट कोंबडीच उचलून नेली. अन् ती कोंबडीही खुशाल गेली. आबराम याच्या दुःखास पारावार उरला नाही. त्या दुःखाचे निराकरण करण्यासाठी तो अहोरात्र झगडत राहिला. तो सरकार दरबारी गेला. तो उल्फीला भेटला. तिथे त्याने पिराजीचा मार खाल्ला. त्याचा हग्या दम स्वतःच्या आत जिरवत, पुन्हा तिथे जाण्याची हिंमत तो हरवून बसला. तो साल्पीच्या पाटलाला भेटला. तो सुकलाल मारवाडी याला भेटला. तो हरप्रकारे कोशिश करत राहिला. तेच त्याच्या हाती होते. दीर्घकाळ त्याची कोशिश नाकाम

होत राहिली. पण म्हणून तो त्याच्या या कार्यात कधीही ढिला पडला नाही. त्याच्या या अपरिहार्य जिद्दीची जी काही प्रकट-अप्रकट निष्पत्ती झाली, ती कथानकाच्या ओघात येईलच. पण जितक्या म्हणून पडझडी तो करू शकला, त्या सगळ्यानंतरही त्याची लेक त्याला परत मिळाली नाही; इतके तूर्तास नक्की सांगता येईल.

इकडे उल्फीला पृथ्वीवरच तिच्या जगण्यातला स्वर्ग सापडला होता. तिला तिच्या आयुष्यातले पहिले निष्कलंक, निरभ्र, रानवट प्रेम सापडले होते. ती वयाने पिराजीपेक्षा थोडीशीच लहान- कदाचित त्याच्या वयाच्या बरोबरीचीच होती. स्त्रीपुरुष संबंधांच्या हिशेबाने ती ज्ञातास्वाद होती तर तो अगदी कोरा आणि रांगडा. तिने हलके हलके त्याला ताब्यात घेत, आपण त्याला शिकवत आहोत अशी यत्किंचितही जाणीव त्याला न देता निःशब्दपणे, तिला त्याच्याकडून जे हवे, ते देण्यासाठी पारंगत करत नेले. तिने त्याला स्वतःत पुरते गुरफटवत त्याच्या मनाला द्रवरूप स्थितीला नेले. त्याच्या मनाच्या गाभ्यात दबून, दडून बसलेल्या कोमलतेला पृष्ठस्तरावर आणले. एकमेकांवर प्रेम असेल तर शरीरसंबंध किती असाधारण सुखाचा होऊ शकतो आणि प्रत्येक वेळी तो कसा नवा असू शकतो, हे तिलाही अनुभवाला आले. प्रेमसंबंधात सगळे हिशेबच बदलून जातात. तुम्ही जितके द्याल त्यापेक्षा खूपच जास्त तुम्हाला मिळत असते. अन् तसे दोघांनाही होत होते. साधारण गणिताचे सारे नियम तोडणारे हे जास्तीचे कुठून येते हे खरोखरीच न कळणारे असते. असीम आनंदाची कोमल किरमिजी आभा तिच्या शरीराभोवती सतत झळकू लागली. ती फक्त त्यालाच दिसत असे. ती त्याच्यासाठीच प्रकटत असे. त्या मोहक तेजाचे त्याला वेडच लागले. तिला दिवस गेल्याचे समजल्यावर तर तिला कुठे ठेऊ आणि कुठे नको असे त्याला झाले. ती तिच्या गर्भारपणाच्या आठव्या महिन्यात असतानाच त्याने आपला एक रामोशी दोस्ताला - त्याची बायको, त्यांच्या लेकरांसकट - वस्तीवर आणून ठेवले. तिची देखभाल करण्यासाठी आणि काळजी घेण्यासाठी. ही रामोशीण बाई उत्तम सुईण म्हणून मशहूर होती. इतकी की तिच्या तिसऱ्या बाळाचे बाळंतपण तिचे तिनेच केले होते. म्हणजे असे की ती त्या तिसऱ्या बाळाच्या वेळी गर्भार होती. आणि दिवस भरले तरी निर्धास्त होती. तिचा नवरा निर्धास्त होता. कारण सुईण तिची आईच होती. आणि ही स्वतः ही आईचे काम लहानपणापासून बघत असल्याने चांगली जाणकार होती. तिला दोन बाळे झालेली होती. तर एके दिवशी सकाळी हा गडी पाहतोय तर बायको बाजल्यावर झोपलेली आणि तिच्या पोटाशी एक गाठोडे. त्याला वाटले, गर्भार आहे. तर पोट आले असेल पुढे. पण त्याला बघताच ती उठून बसली, तेव्हा गाठोडे तिथे तसेच. तो म्हणला, 'हे काय आहे?' म्हणाली, 'आपलं बाळ आहे.' त्याने पांघरूण दूर करून पाहिले तर खरेच. बाळच होते. म्हणाली, 'रात्री जलमला. म्याच सगळं केलं.' त्याला आनंद झाला आणि आश्चर्यसुद्धा वाटलं, की काय बाई आहे, हूं नाही की चूं नाही. खुशाल शांतपणे स्वतःच स्वतःचं सगळं केलंय. ही कथा त्या सगळ्या दोस्तांमध्ये प्रसिद्ध होती. म्हणूनच उल्फी गर्भार आहे हे कळताच पिराजीने हा निर्णय घेऊन टाकला होता. त्याचा हा मित्र आनंदाने सहकुटुंब त्याच्याकडे राहायला आला होता.

मुलगा जन्माला आला. नाव ठेवलं, जालिंदर. हाक मारण्यासाठी जालन. हळूहळू जालन हेच स्थिर झालं. दोघांचे तिघे झाले आणि त्या पठारावरचा कोमल रानटी उल्हास

आणखीनच घमघमू लागला. हे असे चालू झाले की जणू दुनियेच्या अंतापर्यंत त्यात काहीही बदल होणार नव्हता. पण तसे तर नसतेच ना! दुनियेला अंत असतो. मानवी प्रजातीला अंत असतो. माणसाच्या जगण्याला शेवट असतो. आणि जगताना यातले काहीही सहसा आपल्या लक्षात येत नाही. आपण आहोत म्हणजे कायमचे आहोतच असेच आपल्याला वाटत असते. तारुण्याच्या उन्नत आणि प्रमाथी काळात हे असेच असते. योगायोगाने अपरान्ह काळापर्यंत आपण जगलो तर मनात मरणाचे विचार सुरू होतात. आपल्या एकाकीपणाची जाणीव होते. शरीराचा एकेक अवयव निकामी होत जाताना अनेक प्रकारच्या वेदना सोसाव्या लागतात. कधीकधी माणूस म्हणून आपल्या असण्याचा अर्थ काय, आपण कशासाठी जन्माला आलो, असे भयंकर प्रश्न मनात उमटू लागतात. तरीही सहसा आपण या सगळ्याचा विचार करत नसतो. माणूस म्हणून आपल्या अग्रक्रमात अशा गोष्टी नसतात. विशेषतः सुखात असले तर अजिबातही नसतात. तरुण असताना अजिबातही नसतात. तरीही काळ वाहात असतो. स्थलकालाच्या चतुर्मित अवकाशात अनेक घटना घडत असतात. त्यांचा आपल्याशी थेट संबंध असतो असे आपल्याला वाटत नाही. घटनांची वीण कुठून कुठे कशी बसत असते, हे पुरते आपल्यालाही कळत नाही.

त्या दांडग्या पठारावर पिराजी त्याच्या बायको-मुलासह सुखाने एखाद्या वाघासारखा जगत होता. वाघ, वाघीण आणि त्यांचा बछडा. बस्स. आणखी कोणीही नाही. पण ते तसेही नव्हते. लोकांना कुतूहल होते, तरीही कोणी तिकडे फिरकत नव्हते, हे खरेच. तरीही अगदी सूक्ष्मपणे क्वांटम टनेलिंग होते तसे ती भिंत भेदणारे काही होतेच. उदाहरणार्थ रखमाजी सातपाटील; जो पिराजीचा सख्खा थोरला भाऊ होता, तोही तिकडे फिरकत नव्हता. त्याने आपली पत्नी समिंदरा हीस निक्षून तसे सांगितले होते. ती बिचारी पतिपरायण. तिने ते तंतोतंत पाळले. आपल्या लेकासारखा पिराजी; त्याने बाई आणलेली आहे आणि त्याचे चांगले चालले आहे, एवढ्या नुसत्या दुरूनच्या दिसण्याने ती आपल्या मनाचे समाधान करून घेत असे. आपले आईवडील जे करतात, जसे दुनियेशी संबंध ठेवतात, ते आदर्श मानून त्याप्रमाणे जगण्याची त्यांच्या मुलाबाळांची रीत असते. त्यानुसार रखमाजी याची मुले सुद्धा तिकडे फिरकत नव्हती. घरच्या पठारावर ज्वारी अन् करडईची पेरणी करताना किंवा नंतर ती ज्वारी आणि करडई काढताना त्यांना दुरून ते काट्याकुट्यांच्या उंच भिंतींनी वेढलेले घर दिसे. क्वचित कधी ते बाळ आणि त्याची आई दिसे. अगदी क्वचित घोडेस्वार होऊन आलेला किंवा गेलेला पिराजी सुद्धा दिसे. पण ते तेवढेच आणि तितकेच. त्यापल्याड नजर न लावण्याची शिस्त त्यांच्यात होती.

पण विठोबा तर तिथे आपली जनावरे घेऊन रोजच जात होता ना! त्याला रोज काही ना काही दिसे. त्या घराकडे जायचे नाही ; नसते, हे कोणीही न सांगता त्याला कळलेले होते. किंवा इतरांनी सांगितले सुद्धा असेल, पण ते न ऐकू येता त्याला समजले असेल. किंवा त्याच्याशी भाषेपल्याड संवाद करू शकणाऱ्या दीपाबाईने त्याला तसे सांगितले असेल. जे काही असेल ते असो; पण तोही हा नियम तंतोतंत पाळत होता. त्याच्या गायी-म्हशींना सुद्धा त्याने ते त्यांना कळेल अशा भाषेत सांगितलेले असेल. पण अखेर जनावरेच ती. सांगितलेले सगळे कायम ऐकण्याचे त्यांना कुठून जमणार?

ती जात कधी कधी तिकडे. त्यांनाही कुतूहल असेलच ना, की बुवा आहे काय, कोण राहते इथे? अन् ती तिकडे अशी गेलेली असताना कधीकधी त्या वस्तीतले बाळ पळत पळत बाहेर येई. अशावेळी विठोबाची घाबरगुंडी वळे. कारण त्याने पिराजीला घोड्यावर बसून जाताना आणि येताना आणि त्या घराजवळ उतरताना पाहिलेले होते. अशा विक्राळ देहयष्टीच्या माणसाला पाहून दुरून जी भावना कोणाच्याही मनात उतरेल तशी ती त्याच्याही मनात उतरलेली होती. त्याला पिराजीची फार भीती वाटत असे. म्हणून भीतीने पोटात गोळा येऊन तो तातडीने धावत तिकडे जाई आणि जनावरांना तिथून हाकली. त्यांना निःशब्द शिव्या देई. आणि ती सगळी बिचारी खजील होऊन परत फिरत असत.

अशातच एके दिवशी तो जनावरांना हाकलायला तिथे गेला असताना त्याच्या इषाऱ्यासरशी जनावरे परत फिरली, पण बाहेर आलेले बाळ त्याच्याकडे बघून हसत त्याच्या दिशेने झेपावले. ते त्याच्याकडे बघून इतके गोड हसत होते की त्याला कवेत घेण्याखेरीज वेगळे काहीही त्याला करता आले नाही. बाळाला उचलून छातीशी घेतानाच तो भानावर आला.त्याला डाव्या हाताने धरत उजव्या थरथरत्या हाताने त्याने उंच काटेरी कुंपणाचा दरवाजा खोलला तर समोर ती. त्याची आई. त्याने अनेकदा दुरून पाहिलेली. तो स्वभावानुसार हसला. तर ती स्त्री सुद्धा त्याच्या हसण्याच्या प्रेमात पडली. लेकराला आपल्याकडे घेत म्हणाली, 'हा माझा वाघाचा बछडा तुझ्याकडे कसा आला? फार चलाख आहे तो. कोणाच्या वाऱ्याला सुद्धा थांबत नाही. तो तुझ्या कडेवर कसा आला?'

त्याला ऐकायला येत नव्हते आणि बोलताही येत नव्हते. तो फक्त सुकोमल हसला.

'तुझं हसणं किती निराळं आहे! मी रोज बघते तुला.'

आपले हात कान आणि तोंडाशी नेत 'नाही नाही' करत त्याने आपली स्थिती जाहीर केली.

ती बांगड्यांच्या किणकिणण्याच्या आवाजात हसली. हा इतका गोड मुलगा मुका आणि बहिरा आहे, हे लक्षात आल्याने ती दुःखी सुद्धा झाली. त्याचे कपडे, त्याचा अवतार; तो कोण आहे हे जाहीर करणारा होता. तो खुणांमधून म्हणाला, 'मी गुरे सांभाळतो. मी रोज तुम्हाला पाहतो. पण तुमच्याकडे यायचे नाही, संवाद करायचा नाही, अशी समज मला देण्यात आलेली आहे. मला तुमची फार भीती वाटते. ती म्हणाली, 'कोणाची? माझी?'

तो म्हणाला, 'तुमची नाही. पण तुमच्या पुरुषाची. त्याची सगळ्यांना भीती वाटते. तो केवढा मोठ्ठा आणि तगडा आहे! म्हणून कोणीही तुमच्याकडे येण्याचे धाडस करीत नाही. या बाळाला तुमच्याकडे देण्यासाठी मी आलो. मला माफ करा.

ती म्हणाली, 'तू रोज येत जा. भीती बाळगावी असे आमच्यात काहीही नाहीय.'

त्यानंतर आधी दबकत, अधूनमधून आणि हळूहळू सरावत, तो नियमित त्या घरी जाऊ लागला. त्या बाळाला त्याचा लळा तर लागलाच, पण घरमालकीण सुद्धा हसून त्याचे स्वागत करू लागली. तिचा बाकी दुनियेशी संपर्क नव्हता. त्याची तिला गरजही नव्हती. पण विठोबामुळे तो सुरू झाला. त्याला कसला संपर्क म्हणायचे? जो स्वतःच मुका आणि बहिरा आहे, तो कसा संपर्काचे साधन होऊ शकत होता? पण तिच्यासाठी तो झाला. त्याने रखमाजी सातपाटलाचे घर, त्यातील एकूणएक माणसे, गाव; गावातील माणसे, असे

सगळे वर्तमान तिच्यापर्यंत पोहोचवले. आणि तिच्यासाठी तो ते सारे सतत अद्ययावत करत राहिला. अगदी दीपाबाई हिने कसे आपल्याला इथे आणले आहे, हे सुद्धा त्याने तिच्यापर्यंत पोहोचवले. तिला त्याचा लळा लागला होता. त्याचे ते कोमल हसणे, त्याचा मासूम दैवी चेहरा आणि त्याचे अकृत्रिम स्नेहल वागणे तिला फार सुंदर वाटले. आणि त्याला तर दीपाबाई नंतर तीच अशी कोमल प्रेमळ स्त्री दिसली की जी फक्त स्नेहल होती. हळूहळू त्याच्या नजरेत ती आणि दीपाबाई यांच्यातले अंतर मिटत चालले होते. आणि दीपाबाईपेक्षा तिच्याशीच त्याचा रोजचा अधिक संपर्क होत होता. नंतर एकदा तो त्या घरात असताना पिराजी आत आला. त्याला बघून याची बोबडी वळली. तो घाबरून उठण्याचा प्रयत्न करू लागला, तर त्याला उठता सुद्धा येईना. पिराजीने नुसते त्याच्याकडे पाहिले तर तो अगदी गलितगात्र झाला. त्याची ती अवस्था पाहून पिराजी ढगांच्या गडगडासारखा विकट हसला. पिराजीला उल्फीने त्याच्याविषयी सांगितलेले होते. पण विठोबाला ते कसे माहीत असणार? पिराजी म्हणाला, 'उल्फीला तू आवडतोस म्हणजे तू माझ्या घरातला माणूस आहेस. घाबरू नकोस. तुला वाटते तितका वाईट माणूस मी नाहीय.'

विठोबाला अर्थातच काहीही ऐकू गेले नाही, तरी त्याला ते कळले. आणि खूप थांबून तो निर्मळ कोमल हसला. त्यानंतर हळूहळू पिराजीची भीती वाटणे त्याच्या मनातून हद्दपार झाले.

विठोबाचे त्या घरी जाणे कोणापासूनही लपून राहिले नव्हते.

रखमाजीच्या घरातील माणसे, शेतातले सालगडी; असे साऱ्यांना ते माहीत झाले होते. त्यामुळे सगळे त्याच्याकडे चौकशा करीत, विचारीत. तो काय बोलणार? तो तर मुका आणि बहिरा. त्याला सांगता येईल तितके तो सांगे. त्याची ती भाषा कळणाराला जितकी कळे तितके त्याला किंवा तिला जे कळायचे ते कळे. हे असे दीपाबाईला सगळ्यात जास्त कळे. कारण त्याची भाषा, तिला त्याच्याविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्याच्या रस्त्याने, तिच्यापर्यंत सगळ्यात जास्त पोहोचलेली होती.

एके दिवशी विठोबाने जयाजी ह्यास पठारावरच्या त्या वस्तीच्या आसपास चोरटेपणे घुटमळताना पाहिले. ते चोरटेपण त्याच्या अनाघ्रात स्वच्छ मनात सहज घुसले. त्याला वाटले, हे चुकीचे आहे. असा चोरटेपणा दीपाबाईच्या नवऱ्याने करणे हा तिचा अपमान आहे. आता, हे त्याला वाटले, तेव्हा त्याला काय आणि किती माहीत होते? जयाजीला तो कितपत ओळखत होता? त्याला काय कळत होते? सगळ्याच प्रश्नांना थेट सोपी उत्तरे नसतात. विठोबाच्या अतींद्रिय जाणिवांना आपल्या ऐंद्रिय कक्षेत कसे आणावे? त्याला वाटले हे कळणे, हे आपल्या कक्षेत आहे, तेवढे पुरे करून घ्यावे. विठोबाला तो चोरटेपणा विशेष तापदायक वाटला. त्याच्या मनातला ताप तो कोणाला सांगणार? फार तर त्याच्या गायीम्हशी; त्यांना सांगणार. त्यांना बिचाऱ्यांना त्याचे काय होय? बाकी अगदी दीपाबाईला सुद्धा तो थोडेच सांगणार? जयाजी चोरासारखा घुटमळला आणि भेदरटपणे निघून गेला. तो तसा निघून गेला तेव्हा विठोबाला सुटल्यासारखे वाटले.

पण ते तिथेच थांबायचे नव्हते. जयाजी पुन्हा पुन्हा चोरट्यासारखा येत राहिला. त्या प्रत्येक वेळी विठोबा साक्षी होता. प्रत्येक वेळी त्यास यातना होत. जयाजीचे तिथे जाणे

चुकीचे आहे असे त्यास वाटे. त्याचा हेतू खराब आहे असे त्यास वाटे. त्याला काहीच माहीत नव्हते, काहीच कळत नव्हते. तरीही त्याला जे वाटत होते, ते वाटत होते. नंतर कधीतरी त्याला दिसले, की जयाजीने आत प्रवेश केला आहे. त्याला दिसले, की पिराजीची स्त्री जयाजीला निरोप देण्यासाठी बाहेर आलेली आहे. त्याला पुन्हा पुन्हा जयाजीचे येणे दिसले. त्याला पुन्हा पुन्हा निरोपाचे दृष्य दिसले. आणि एके दिवशी त्याला दिसले, की पिराजीने ठोकून, बडवून फेकलेला जयाजी पटकुरासारखा बाहेर पडलेला आहे. विठोबा हिंमत करून

तिथवर गेला आणि त्याने जयाजीला उचलत रडतखडत रखडत रखमाजी सातपाटलाच्या सपाटीच्या रानातील वस्तीपर्यंत नेले. त्याच्या मूकबधीर भाषेत त्याने तिथल्या कामकरी गड्यांना सांगितले की, 'सातपाटलांना फार मार पडलेला आहे. मारणारे लोक पळून गेलेले आहेत.' नंतर तिथून तो स्वतः पळत गावात गेला आणि दीपाबाईला थेट तिथे घेऊन आला. ती तिथे आल्यावर आपली जबाबदारी संपल्यासारखा तो स्वस्थ झाला.

5

पिराजी सातपाटील, त्याला जसे जगायचे तसे, त्याच्या स्वतःच्या अटींवर जगत होता. त्याची दुनियेविषयी काहीही तक्रार नव्हती. त्याला कोणाहीकडून काहीही नको होते. तो, त्याची स्त्री आणि त्याचे बाळ ; हे त्याचे आयुष्य होते. बाकी जो मोजका मित्रपरिवार होता, तो होताच. तरीही तुम्ही या दुनियेत जगता तर ती- तुमची इच्छा असो व नसो- तुमचे असणे सिद्ध करण्यासाठी काही मागत असतेच असते. म्हणजे असे की तुमची कैक इच्छा असो व नसो; अशा अनेक गोष्टी असतात की ज्यांच्यात घुसण्याची तुम्हाला इच्छा नसते, तरीही त्या तुम्हाला टाळता येत नाहीत. कानांवर येणाऱ्या गोष्टी पिराजी कशा टाळणार? त्याला समजले की त्याची अत्यंत देखणी पुतणी; झमबाई हीस तिच्या सासरचे लोक; खोपडे-पाटील, यांच्या घरातल्या स्त्रिया, याड्या जानबाची नात म्हणून हिणवतात. ते तिला आडबंग पिराजीची पुतणी म्हणून हिणवतात. ते हलकट लोक त्या सुंदर पोरीला सतत घालून पाडून बोलतात. तिच्या प्रेमात पडून तिच्याशी लग्न केलेला खोपडे मुलगा-गणोजी खोपडे यांचा नातू ; जयसिंग सुद्धा यात काहीही करत नाही आहे. रखमाजी सातपाटील; त्याचा थोरला भाऊ, याला त्याची माहिती देण्यात आलेली आहे आणि तो याकडे दुर्लक्ष करतोय. लेक आपल्या सासरी गेली की तिने तिचे जे असेल ते निभवावे, त्यात आम्ही काहीही करणार नाही, असा एकूण त्याचा व्यवहार आहे. पिराजी यास ते पटले नाही. तो सरळ थेट त्या लोकांच्या घरी गेला. म्हणाला, “तुमच्या बापजन्मी इतकी सुंदर मुलगी तुमच्यात आली नसती. आम्ही ती तुमच्या घरात घातलेली नाहीय. तुम्हाला ती हवी होती म्हणून तुम्ही ती तुमच्यात घेतलेली आहे. तुम्ही जितके उंच कुळीचे

आहात तितकेच आम्हीही आहोत. तिला ताप होणे, मी सहन करणार नाही.

तुम्हाला काय पाहिजे आहे?'

त्याच्या तिथे येण्याने ते सारे लोक हबकून गेले होते. ते त्यांना अनपेक्षित होते. असे काही होईल याची त्यांनी कल्पनाच केलेली नव्हती. प्रत्यक्ष झमबाई सुद्धा चकित झालेली होती. तुम्हाला काय पाहिजे आहे, या पिराजीच्या प्रश्नावर कोण काय बोलणार? ते टरकलेले होते.

'तात्या, असं कायच नाहीरे. तुला उगीच तसं वाटतं.' झमबाईने

बोलण्याची हिंमत केली.

'थोडसंक झालं होतं. पण मी बोललो ना सगळयांना. तरी पण चूकच झाली आमची,', झमबाईचा नवरा म्हणाला.

'पुन्हा असं काही तुमच्या कानावर येणार नाही,' आणखी कोणी तरी म्हणालं.

'ते येऊ नये. ती माझी पुतणी आहे आणि माझी बहीण सुद्धा आहे.' 'चूक झाली आमची.' 'पुन्हा करू नका,' पिराजी म्हणाला.

त्याने खिश्यातून एक सळई काढली आणि तिला भराभर वळवून ती त्यांच्यासमोर टाकली. शुद्ध सोन्याची ती सळई गुळासारखी वळली. ती पाहताना सगळयांचे डोळे फाटले.

'राहुंद्या हे. माझ्या झमबाईसारखं शुद्ध आहे हे. पुन्हा काही ऐकायला येणार नाही असे वागा. तुम्ही सोयरे लोक. मी चांगल्यांशी चांगला आहे आणि मुळात आडबंग सुद्धा आहेच', पिराजी उठताना म्हणाला.

सडकून मार खाल्लेला जयाजी अंथरूण धरून होता. कोणाला काय सांगणार तो? पठारावरच्या त्या उंच काटेरी कुंपणाच्या घराकडे पुन्हा कधीही बघायचे नाही, हे त्याने मनाशी ठरवले होते. तो दुसरे काय ठरवणार? त्याचा सगळा अंदाजच चुकला होता. तो उल्फीला फक्त कोल्हाटीण समजला होता. त्याच्या लोभीपणाने त्याच्या समझदारीवर मात केलेली होती. त्याने मूर्ख हिंमतीने वाघाच्या गुहेत प्रवेश केला होता. वाघाने त्याला ठार केले नाही, हे त्याचे नशीब. कारण तो वाघ त्याच वेळी माणूसही होता. त्याच्या त्या माणूस असण्यामुळे जयाजी सडकून मार खाऊनही जीवानिशी सुटला होता. जयाजीचे समजा सोडा; विठोबाही त्या प्रसंगानंतर तिकडे फिरकला नव्हता.

उल्फीखेरीज तो एकटाच असा होता की, ज्याला जयाजीची ही हालत कोणी केली हे माहीत होते. पण मग एके दिवशी विठोबाला जवळपास बघून उल्फी स्वतः बाहेर आली आणि त्याला आत घेऊन गेली. म्हणाली, 'मी काहीही तक्रार केली नव्हती. जयाजी मला, काकी, काकी म्हणत होता. पण त्याच्या नजरेत मी फक्त एक कोल्हाटीण होते. त्याची नजर चांगली नव्हती. तरीही मी त्याची काहीही तक्रार पिराजीकडे केली नव्हती. माझी काळजी घेण्यास मी समर्थ होते. पण एके दिवशी त्याने माझा हात धरला आणि मी तो झटकला. त्या सुमाराला पिराजी घोड्यावरून उतरून आत येत होता. जे त्याने पाहिले, त्यातून सारे त्याच्या लक्षात आले. मला शब्दानेही काहीही न विचारता त्याने जयाजीला बुकलून काढले. पुन्हा इकडे फिरकलास तर खुळपा करून सोडीन, असे सांगितले. तो मार पाहून मलाही भीती वाटली होती. तो त्याला मारून टाकतोय की काय या भीतीने मी

घाबरून गेले होते. पिराजी रागावला की कोणाचाही नसतो. तो माझ्या आत आणि माझ्या आसपास असला की मृदू होतो. पण तो सतत तसा राहील याची मला खात्री नसते. मलाही कधीकधी त्याची भीती वाटते. पण ती सारी इतरांच्या बाबतीत आणि त्यांच्या संबंधात. माझ्यासाठी तर तो नेहमीच तोंडात विरघळणाऱ्या खडीसाखरेसारखा असतो. त्याच्या इतरांशी वागण्याची रीत पाहताना मला भीती वाटते.'

'मला तर फारच भीती वाटते', विठोबा म्हणाला.

'भिऊ नकोस. येत जा. पिराजीला तू आवडतोस. आवडणाऱ्या माणसाला तो राक्षसासारखा जपतो. पिराजी खूप कोमल आहे. माझ्या जालनला तुझी खूप आठवण येते. जालऽऽन, अरे बघ, कोण आलंय तुला भेटायला.'

जालन दुडूदुडू धावत आला आणि विठोबाच्या अंगावर कोसळला.

'पिराजी दुनियेत सारीकडे जातो. मी कुठे जाणार? मला त्याची गरज सुद्धा नाही. माझ्या गेलेल्या सगळ्या आयुष्यात इतकी आनंदी मी कधीही नव्हते. या दांडग्या प्रेमळ माणसाने माझ्या जगण्यात अतोनात आनंद पेरलाय. तू येत जा. मला तू आवडतोस. तू आला नाहीस तर पिराजी तुला पकडून आणून इथे कोंडून ठेवील. ते चालेल का तुला? परवाच तो म्हणाला, विठोबा का येत नाही? म्हणाले, येतो की नाही, हे तुला काय माहीत? म्हणाला, मला सारं तुझ्या चेहऱ्यात बघता येतं. काय आहे विठोबा; आपला पिराजी आभाळासारखा आहे. आणि मी जमिनीसारखी. जमिनीला का कधी आभाळ ताब्यात घेता येतं? तो कायम माझ्यावर पांघरूण धरतो. त्या पांघरुणात गुरफटून राहाणं मला आवडतं. पण म्हणून त्याच्यावर ताबा मला कसा ठेवता येईल? मी प्रयत्न करते. मी ते पांघरूण इकडे तिकडे सरकवते. पण ते तितकंच ना! ते असतं तर कायम. तो माझ्याभोवती असतो आणि माझ्यापल्याड सुद्धा असतो.'

ती जे बोलली ते शब्दातीत होते आणि त्याने जे ऐकले तेही तसेच. त्या संभाषणात शब्द नव्हतेच. त्यांच्या पल्याडचा अतींद्रिय सेतू त्यांनी आपल्या आदानप्रदानासाठी स्नेहल भावनांच्या धाग्यांनी बांधलेला होता. म्हणूनच संभाषण सुलभ झाले होते.

पिराजीला अनेक उद्योग आणि अनेक उचापतीचा सामना करायचा असतो. ते सारेच तो उल्फीला सांगतो असे नव्हे. तिचा बाप आबराम हा किती उद्योगी आणि उचापतखोर इसम आहे, हे तिला माहीत आहे. पण त्याच्या सध्याच्या उचापती तिच्यापर्यंत पोहोचलेल्या नाहीत. आबराम याच्यात पिराजीशी थेट सामना करण्याची हिंमत नव्हती. पण मग त्याने सुकलाल मारवाडी याला पेटवले. की बाबा, तू इतका पैका घातलास अन् सारा घास या हैवानाने गिळलाय. याचे तू काही करणार आहेस की नाही? सुकलाल हिशेबी माणूस. प्रत्येक गुंतवणुकीवर अपेक्षित परतावा मिळतोच असे नाही, हा त्याचा अनुभव होता. त्याच्या गुंतवणुकी अनेक ठिकाणी होत्या. काही नफा, काही नुकसान असे ठिकठिकाणी मिळून एकुणात धंदा बरकतीचा असला पाहिजे हे त्याला कळत होते. उल्फीच्या ह्या गुंतवणुकीतही त्याला फार खोट आलेली नव्हती. तरीही उत्पादनाचे तयार साधन गायब करण्यात आलेले होते, हे त्यालाही मान्य होते. तो आबराम याचे ऐकून घेत होता, त्याच्या दुःखाचा हिशेब करत होता. त्याला सहानुभूतीही दाखवत होता. पण तो स्वतंत्रपणेही विचार करत होता. कोणत्या कृतीत किती जोखीम आहे, याचा आपल्या

परीने आदमास घेत होता. आपल्याला सुरक्षित नामानिराळे राहून काय करता येईल याचा विचार करत होता. मूर्ख बेहिशेबी धाडस त्याला त्याज्य. काही थोड्या गुंतवणुकीच्या सहाय्याने, नामानिराळे राहून, पिराजी याचा खातमा करणे शक्य आहे, असा प्रस्ताव आबराम याने एकदा दिला, तेव्हा त्याने तो तोलून मापून पाहिला. यात तोशीश फार नाही आणि गुंतवणूक किरकोळ आहे, हे लक्षात घेऊन त्याने त्यास मान्यता दिली. पण झाले असे की पिराजी त्यातून सहीसलामत सुटला आणि शोध घेत थेट मूळ स्रोताशी पोहोचला. ह्या उद्योगाच्या मुळाशी सुकलाल आहे, हे त्याच्या लक्षात आले. ते कळल्यावर सुकलाल याच्या मनात धोक्याची घंटा वाजली. आणि हे तिथे थांबले नाही. पिराजी थेट स्त्रोताला भिडला. त्याने थेट सुकलाल यालाच सडकून नरम केले. आणि बदल्यात असाधारण बिदागी हासील केली. सुकलाल कायमसाठी नरम झाला. आता सुकलाल आबराम याचे ऐकण्याच्या मनःस्थितीत अजिबातही उरला नाही. पण म्हणून आबराम थांबेल किंवा सुकलाल काहीही करणार नाही, याची खात्री पिराजी स्वतःला देऊ शकत नव्हता. तो सतत सावध होता. तुम्हाला तुमची वाघीण फार प्रिय आहे, आणि ती तुम्हाला कायम तुमची ठेवायची असेल तर इतके करणे आवश्यकच आहे. पिराजीला हे फार मुश्कील वाटत नव्हते. ते त्याला आपल्या नेहमीच्या जगण्याचा भाग वाटत असे. कायम सावध असणे हे वाघाच्या अंगवळणी पडलेलेच असते ना! पिराजी तसा होता. हे काहीही उल्फीला माहीत नव्हते.

एके दिवशी शेजारच्या माजमपूर येथील कोकाटे-पाटील यांचा एक तरणा पोरगा पिराजीच्या वस्तीवर आला आणि म्हणाला, “तुमची वस्ती आमच्या शिवारात आहे. हे अतिक्रमण आहे.'

'तुमचे येथे किती शिवार आहे?' पिराजीने विचारले. 'आमची ही एकूण पन्नास एकर जमीन आहे.'

'ठीक आहे. हे सारे वहिवाटीला न आणलेले रान आहे. त्यात मी राहतो. मी या जागेचा मालक आहे, असे कुठे म्हणतोय?'

'तरीही तुम्ही तुमची वस्ती हलवा. नाहीतर मला वेगळा विचार करावा लागेल.'

'कर, कर. अवश्य कर.', पिराजी शांतपणे म्हणाला.

काही दिवसानंतर एका सकाळी पिराजी बघतो तर त्याच्या घराचे उंच काटेरी कुंपण विस्कटून टाकलेले. हे कोणाचे काम आहे, हे तत्क्षणी त्याच्या लक्षात आले. पाटलाच्या पोराने केलेल्या हिमतीचे त्याला आश्चर्य वाटले. त्याने त्याच्या दोस्तांना निरोप धाडले. ते सारे त्यांच्या त्यांच्या घोड्यांवर बसून दौडत आले. ते येताना काही कारागिरांना घेऊन आले. कुंपण पुन्हा नीट आणि भक्कम करण्यासाठी. कारागीर कामाला लागलेले असतानाच पिराजी घोडेस्वार होऊन त्याच्या दोस्तांसोबत माजमपूर गावी गेला. ते एखाद्या बारक्या वाडीसारखे लहानसे गाव होते. सगळी मिळून पंचवीस-तीस घरे. कधीकाळी कदाचित ते आकाराने मोठे गाव असेल. काही कारणाने लोक ते सोडून गेले असतील. किंवा ओसाड पडलेल्या साल्पीत जसे बाहेरून फौजी वस्तीला आले, तसे तिथे आले नसतील. असतील तो सारा एकाच कुटुंबाचा विस्तार असेल. इतक्या लहान गावचे शिवार मात्र फारच मोठे होते. पिराजीला त्या इतिहासात रस नव्हता. गावाभोवती घोडे उडवत त्या सगळयांनी एक दहशती फेरी घातली. पिराजी पाटलाच्या घरासमोर घोड्यावरून खाली उतरला.

त्याने दमदार आवाजात पुकारा केला, 'पाटीऽऽल! तुझ्या पोराला भायेर पाठव. त्याला लय चरबी चढलीय. मी त्याला नरम करायला आलोय.'

आधीच घोड्यांच्या टापांनी पाटलासकट सारे गाव भेदरून गेलेले. त्यात हा पिराजीचा दणकट पुकारा. पाटील हात जोडत बाहेर आला.

'पोऱ्या कुठंय तुझा?' 'चूक झाली दादा त्याच्याकडून.' 'त्याचा निवाडा करावा लागतोय.' 'माफी करा. पुन्हा असं होणार नाही.' 'पाटील, ही सगळी तुझीच भावकी आहे?' 'समदे एकातले एक.'

'जिमीन जास्ती दिसते तुम्हा लोकांना. पठार वहितीला आणलेलं नाहीस?'

'काय कमी नाही देवाच्या आसीर्वादानी.'

'आता त्या पठारावर कोणी पाऊल टाकायचं नाही. ती समदी जिमीन ह्या पट्ट्याची.' आपल्या मांडीवरचे धोतर बाजूला करून तिथे हाताने शड्डु ठोकत पिराजी म्हणाला, 'जो कोणी येईल त्याचं तंगडं मोडून मी त्याच्या हातात देईन. काय समजलास?'

पाटलाने हात पुन्हा पुन्हा जोडले. 'तुझ्या पोराला सांग.' पाटलाने पुन्हा हात जोडले.

अधिक कोणताही अतिप्रसंग न करता पिराजी आणि त्याचे साथीदार त्यांच्या त्यांच्या घोड्यांवर स्वार झाले आणि परत निघाले. चारच दिवसांनी पाटील पठारावर येऊन पिराजीला भेटला. जमीन तुझ्या नावावर करून देतो म्हणाला. पिराजी म्हणाला, 'माझ्या नावावर करून मी तिचं काय करू? माझा थोरला भाऊ रखमाजी याला भेट. ती त्याच्या नावावर कर. तू सरळ आला आहेस म्हणून मी तुला तिचा काही पैका देतो. तो किती द्यायचा ते मी ठरवीन. माझ्या भावाला सांग, पैका मिळालेला आहे.' अशा प्रकारे काही दिवसातच ते सारे पठाराचे रान रखमाजी सातपाटील याच्या नावावर झाले. पुढे कैक वर्षांनी रखमाजी सातपाटलांच्या मुलांच्या काळात ते वहिवाटीला आणले गेले. रखमाजीचा आधीचा पठार होताच. त्याला पुढे ते घरचा पठार म्हणू लागले. आणि वहिवाटीला आणलेल्या या नव्या पठाराला खरेदीचा पठार म्हणू लागले. पण त्या साऱ्या बऱ्याच नंतरच्या गोष्टी.

6

त्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे विठोबा आपली जनावरे घेऊन पठारावरच्या रानात गेला. पाऊसकाळ नुकताच संपल्याने सारे रान हिरवेगार होते. सूर्य उगवून कासराभर वर आलेला होता. तिथून खालचे माळ आणि त्यापल्याडची रखमाजीची पडळी स्पष्ट दिसत होती. हवा स्वच्छ होती. भरपूर हिरवा चारा सगळीकडे असल्याने गायी-म्हशी निवांतपणे चरत होत्या. बारकी वासरे-पारडे अधूनमधून शेपट्या उंच करून हुंदडत आपला आनंद व्यक्त करीत होती. रखमाजीच्या पठारावर ज्वारीची बुटकी ताटे, करडईची झुडपे स्तब्ध चमकत होती. समोरची पिराजीची वस्ती गवताच्या हिरव्या कोवळ्या उत्सवात करडी, खैरीबांडी उठून दिसत होती. त्यापल्याडच्या वहिवाटीत नसलेल्या पठारावर अनेक बुटकी झाडे ; केकताड, साबरकांडे, बोरी, अशी ठिकठिकाणी दाटलेली होती. विठोबा हातातल्या काठीला दोन्ही हातांनी धरून, तिला तिरकी करून, तिच्यावर आपली हनुवटी टेकून मजेने सारीकडे बघत होता. तेवढ्यात त्याला पिराजीच्या वस्तीच्या कुंपणाचा झाप उघडून

त्यातून बाहेर पडलेला पिराजीच दिसला. तो बाहेर येऊन उभा राहिला. आणि पाऊल टाकताना कोसळला. ते पाहून त्याला धक्काच बसला. इतका उंच, तगडा ताकदवान माणूस असा अचानक कसा कोसळला? त्याने एकवार सारीकडे पाहिले. आसपास कोणीही नव्हते. तो तसाच पुढे धावला. जवळ जाऊन पाहिले तर पिराजीच्या तोंडातून फेस येत होता. त्याची शुद्ध हरपली होती. त्याने डोळे उघडून विठोबाकडे पाहिले, पण त्याच्या नजरेत ओळखीच्या कोणत्याही खुणा नव्हत्या. विठोबा तसाच आत धावला. उल्फीला बोलावण्यासाठी. तर ती कुठेच त्याला सापडेना. दिसेच ना! जालनही नव्हता. पिराजीचा घोडाही नव्हता. दोन्ही बाबींचा एकत्र मूकबधीर अर्थ लावताना जाणवलेल्या अशुभ संकेताने तो हादरला. तो तिथून सुसाट धावत निघाला आणि आणि बाणासारखा रखमाजीच्या पडळीवर पोहोचला. तिथे शेतात कामे करणाऱ्या सालगड्यांना खाणाखुणा करत त्याने सांगितले. त्याने पठाराच्या दिशेने संकेत केला. हातवारे केले. 'आयेऽऽ ओय्येऽऽ ताडमाड उंच तगडा. पिराजी सातपाटील. कोसळलाय' म्हणाला. 'पाणी घेऊन जा,' म्हणाला. अन् तिथून पुन्हा सुसाट निघाला. गावातल्या रखमाजी सातपाटलाच्या वाड्याकडे. तिथे पुन्हा तेच.

आयेऽऽ ओय्येऽऽ पठाराची दिशा. ताडमाड, उंच तगडा. कोसळलाय. रखमाजीला कळेना. विठोबा त्याचा हात धरून ओढत होता. मळ्याच्या दिशेने. रखमाजीने आपला थोरला लेक जयाजी याला हाक मारली. म्हणाला, 'आरे पक ह्ये मुकं काय म्हनतंय ते?' जयाजीच्या पाठोपाठ दीपाबाई आली. त्याने तिच्याकडे मोहरा वळवला. त्याने तिला सांगितले. तिला लगेच कळले. तिने इतरांना सांगितले.

तासाभरात गावभर बातमी झाली. निम्मा गाव पठारावर उलटला. अघटित ते घडले होते. ज्याच्या आडमाप ताकदीमुळे सारी पंचक्रोशी ज्याला भरभरा भित होती, तो पिराजी सातपाटील त्याच्या मालकीच्या पठारावर कोसळला होता. मेला होता! तोंडाला फेस येऊन मेला होता. काय झाले होते? कोणी भानामती केली? की खाण्यातून काही दिले? त्याची अस्तुरी म्हणा वा त्याची कोल्हाटीण रखेल गायब होती. तिने केले? तीच शक्यता जास्त. कोल्हाटीण. भामटी जात. पैक्यासाठी काहीही करील. त्यांचा धंदाच असतो तो. अन् पैका तर होताच पिराजीजवळ. विष घालून मारला त्याला आणि माल घेऊन गायब झाली. आधी कळले तेव्हाच रखमाजी जागेवरून हलला नव्हता. तेव्हाच त्याच्या पायातले बळ गेले होते. कधी ना कधी असे काहीतरी आपल्या अफाट धाकट्या भावाबाबत होणार, हे आधीच त्याला जाणवले होते? पिराजीचे प्रेत वाड्यात आणण्यात आले, तेव्हाही त्याला जागचे उठवेना. वाडाभर माणसांची दाटी. घरची अन् दारचीही. तुळाजी खोपडे-पाटील आले. त्यांनी एकवार प्रेताकडे पाहिले अन् रखमाजीला म्हणाले, 'आत चलता का जराशिक?'

जयाजी याने ढिगल झालेल्या आपल्या बापाला उठवले.

'काय, तुमचा काय आंदास? कोनावर सौंशय?', पाटलांनी विचारले.

रखमाजी स्तब्ध. 'कोल्हाटीण गायब,' जयाजी मध्येच म्हणाला.

'रखमाजी, तुम्हाला कोनाचा सौंशय?' पाटलाने जयाजीकडे दुर्लक्ष करीत विचारले.

'काय कळानी झालंय.' रखमाजी मोठ्या मुश्कीलीने म्हणाला. 'तालुक्याला रिपोट

करायचा तर वहीम सांगावा लागन.' 'करायचा नायी.' 'आपन करीतच नायी. तुम्हाला तर ठावं हाये. तिथं सतरा झंजटी.' 'नायी. ते नको. गेल्याला मानूस कशानीच परत येत नायी.' 'जे आसन ते आमचं आम्हीच पघून घेऊ.' जयाजी म्हणाला.

'तू गप बस. भायेर जा,' रखमाजीने जयाजीसाठी निकडीचा स्वर लावला.

त्यामुळे जयाजीला बाहेर जावेच लागले. तिथे रखमाजी याची एकमेव लेक आणि गणोजी खोपडे-पाटील याची नातसून ; झमबाई आलेली होती. आणि जमलेल्या गर्दीत तिने हंबरडा फोडून चढा स्वर लावलेला होता. 'आरंऽऽ मपल्या तात्याऽऽ आसा कसा गेला तूऽऽ आता कोन माह्याकड ययीन. कोन माझी चवकशी करीन. आगं बयाबाई गंऽऽ आरेऽऽ कोन्या दुस्मानानी करनी केलीऽऽ त्या कोल्हाटनीनी काय क्यालंऽऽ आरेऽऽ तात्या, मपल्या तात्याऽऽ आरे देवाऽऽ आसा कसा निकरट तूऽऽ आरे पांडुरंगाऽऽ तुला लोतपडी झालीऽऽ तुह्या, कसा घेऊन गेला माह्या तात्यालाऽऽ...' झमबाई येण्याच्या आधी बाया दुःखाचा स्वर शोधण्यासाठी धडपडत होत्या. तिच्या येण्याने आणि गाण्याने त्यांना सुद्धा अचूक आपला स्वर सापडला होता. आणि सामूहिक आर्त रुदनस्वराच्या कल्लोळाला दिशा मिळाली होती. म्हाताऱ्या समिदराचे समजा सोडा- तिने पिराजीला लेकासारखे वाढवले होते- पण दीपाबाई आणि तिच्या धाकट्या जावा ; ज्यांचा पिराजीशी कधीही थेट संपर्क आलेला नव्हता, त्यांच्या रुदनालाही स्वर सापडला होता. आणि सगळे मिळून एकच आर्त कल्लोळ मातलेला होता.

'काय करायचं?' तुळाजी पाटलांनी आत रखमाजीला विचारलं.

'उरकून घेऊ मयत. कोन्हाला बोलवायचा, सांगावा धाडायचा सवालच नायी.

'ते बरं राहीन,' पाटील म्हणाले.

पिराजीच्या मरणाचे दुःख एक भाऊ म्हणून रखमाजीला होतेच होते. पण ते जरा गुंताड्याचे आणि अत्यंत खासगी होते. या धाकट्या भावाला मनातून तोही कायम भीतच आलेला होता. पण तो असा मेल्यावर त्याला वाटले, पिराजी स्वतःसाठी जगलाच नाही. त्याने अनेक तोहमती अंगावर घेतल्या. तो क्रोधी, दरोडेखोर ; जे काही होता ते होताच. पण त्याने जे काही मिळवले ते सगळे आपल्यालाच दिले. दोष स्वतःवर घेतला आणि आपले कल्याण केले. का केले? आपण हुषार, लोकांच्या नजरेत साव; पण आपणच खरे चोर होतो आणि आहोत. शेतकऱ्याची वृत्ती पसरण्याची असते. आपण पसरलो. पण ते त्याच्या जीवावर पसरलो. आपण हुषार कुणबी निपजलो. तो मुलूखगिरी करणाऱ्या आपल्या लढाऊ पूर्वजांसारखा सतत मिळवत गेला आणि आपल्यापायी ठेवत गेला. आपण त्याच्या साठी काहीही केले नाही. त्याने मिळवले ते कायमच आपल्याला दिले. सगळी संपत्ती आपल्याला दिली. आपण ती टुकीने वापरत स्वतःचा उत्तम भरणा केला. लोकांच्या डोळ्यांवर येणार नाही अशा हुषारीने सतत शेतीची जोड केली. आज आपल्याकडे खोपडे-पाटलापेक्षा कितीतरी जास्त जमीन आहे. ती नेकळी आहे. भरपूर पाणी असलेल्या विहीर-बागाईताची आहे. तो आपल्याला लेकासारखा होता. आपण त्याच्याकडे लेक म्हणून कधीही पाहिले नाही. आपण साधे त्याचे लग्न सुद्धा करून दिले नाही. त्याने कोल्हाटीण आणली आणि तो तिच्याशी राहिला. आपण कधीही त्याची वास्तपुस्त केली नाही. त्याला मारून ती पळून गेली तेव्हा अधिक चौकशी आपण टाळली. का टाळली? कोल्हाटीण

आल्यानंतर सुद्धा त्याने पठारावरची माजमपूरच्या पाटलाची जमीन घेतली आणि ती आपल्या नावावर केली. का केली? आपल्याला कधीही ते प्रश्न पडले नाहीत. आपण शातपणे आणि हुषारीने स्वतःचा भरणा करत राहिलो. उद्या आपला वंश वाढेल. किंवा वाढलाच आहे तो. पिराजीचे काहीच उरले नाही. मिळवले ते सारे आपल्याला देऊन तो या दुनियेतून नाहीसा झाला. आपल्या वंशजांना प्रश्न विचारण्यासाठी स्वतःचा वंश सुद्धा त्याने इथे ठेवला नाही. किंवा तो राहिला नाही. कोल्हाटणीने त्याला मारले आणि ती माल घेऊन पसार झाली. सगळे स्पष्ट दिसत असतानाही आपण सगळे दाबून भक्ष्य गिळलेल्या सापासारखे सुस्त राहिलो आहोत. हे इतके आपमतलबी असणे आपल्यात कुठून आले? हे सगळे आहे काय?

रखमाजी मतलबी होता. त्याचा मतलब उत्तम साधला गेला होता. त्याबाबत त्याची भूक मिटली जावी इतका तो संतुष्ट होता. पण त्याच्या मतलबी असण्याचे कुरूप मात्र त्याला उरलेले आयुष्य त्याच्या आतल्या आत सतत छळत राहणार होते.

या जाणिवेचे कुरूप यापुढे रखमाजीच्या मनात वाढत जाणार होते. तो नेहमीच अबोल होता. तो आता आधी अधिक अबोल होणार होता. स्वतःच्या मनातील कुरुपाशी बोलणे इतकेच त्याच्या हाती उरणार होते. ते बोलणे, अगदी स्वतःशी बोलणे सुद्धा इतके मतलबी असणार होते की त्यात कुठेही पिराजीविषयीच्या त्याच्या भावना व्यक्त होणार नव्हत्या.आणि आतले कुरूप मात्र वाढत जाणार होते. आणि ते त्याला क्षणोक्षणी खिन्न करत, मारत, बद्दड करत राहणार होते. पिराजी मेला तेव्हा रखमाजी पन्नाशीकडे झुकला होता. म्हणजे त्या काळाच्या हिशेबाने म्हाताराच झालेला होता. पिराजी त्याच्या तिशीत वारला. तेव्हा रखमाजीचा थोरला लेक जयाजी पंचवीस वर्षे वयाचा होता. आणि दोन दोन वर्षांनी त्याला झालेली मुले असा हिशेब धरताना सगळ्यात धाकटा शंभुराव पंधरा वर्षे वयाचा होता. म्हणजे तो तेव्हा लग्नाला आलेला होता. बाकी मधल्या सगळ्या पोरांची लग्ने झालेली होती. जयाजीची सोयरीक गाढवे-देशमुख यांच्याशी झाली, म्हणून पुढे बाकीच्या मुलांना तालेवार घरातल्या मुली मिळाल्या असे नव्हे. त्या सगळ्या साधारण कुणबी घरातल्या होत्या. आणि त्यात वैषम्य वाटण्याजोगे काहीही नव्हते. शेतकऱ्याला शेतकरीच मिळणार. आणखी कोण कशाला पाहिजे? देशमुखाला काय चाटायचंय? अर्थात ही रखमाजीची भावना. बैलासारखे राबत आपला विस्तार शांतपणे कोणाच्याही डोळ्यावर येऊ न देता पसरण्याची भावना. सातपाटील यांच्या एकूण स्वभावाशी हे विसंगतच म्हटले पाहिजे. पण अशा गोष्टी असतातच. फार तर आपला जेनेटिक इतिहास जे टिळे लावत असतो, त्याच्या पल्याड आपले एकमेकात मिसळणे असते, असा होरा बांधायचा. ती आपल्या आकलनाची मर्यादा असते. किंवा जगणे आपल्या समजावून घेण्याच्या पल्याड बरेच लांबरुंद असते असे म्हणायचे.

रखमाजीचा थोरला लेक जयाजी आपल्या बापाइतकाच; किंबहुना अधिक मतलबी होता. त्याचे मतलबी असणे अधिक प्रच्छन्न होते. आणि आपला मतलब साधण्याचे समाधान त्याला त्याच्या आयुष्यात कधीही मिळाले नाही. त्यामुळे तो कायमच भुकेलेला राहिला. आणि त्याची ही भूक त्याचे शरीर भरून त्याच्या चेहऱ्यावर कायमच विलसत राहिली. भुकेच्या या विलासाने त्याला नेहमीच खप्पड चेहरा प्रदान केला. त्याच्या भुकेचा

थोडाफार उपशम त्याच्या मुलांनी पुढे एका मोठ्या जमीन खरेदीत त्याचा सगळ्यात धाकटा आणि कर्तबगार भाऊ शंभुराव याला हल देत मामला हस्तगत करून केला. पण ते पाहण्यासाठी जयाजी जिवंत नव्हता, हेही त्याचे दुर्देव म्हटले पाहिजे. कारण तेवढेही सुख त्याच्या वाट्याला आले नाही. अर्थात ही सगळी बऱ्याच नंतरची गोष्ट. पण दीपाबाईसारखी घरंदाज आणि सुस्वभावी स्त्री आयुष्यात येऊनही त्याचा जयाजीच्या मूळ स्वभावावर काहीही प्रभाव पडला नाही, हेच खरे. मतलबी असणे आणि तो न साधण्याचे दुःख कायम बाळगत राहणे, हेच त्याचे जगणे राहिले, असे म्हटले पाहिजे.

पिराजी मेला, तेव्हा जयाजीने दोन गोष्टी केल्या. पहिले म्हणजे त्याने उल्फी कुठे गेली असेल, याचा आदमास घेत केलेले तिचा माग काढण्याचे प्रयत्न. आणि दुसरे, पिराजीचे घर; जे पठारावर होते, ते खणणे. त्यातली पहिली गोष्ट त्याने गुप्तपणे केली. आणि दुसरी उघड. या दुसऱ्या गोष्टीचे या ना त्या प्रकारे स्पष्टीकरण देणे त्याला आवश्यक होते. तो म्हणाला, 'माझा प्रिय चुलता गेला. तो मारला गेला आहे. कोल्हाटीण त्याला मारून पळून गेली आहे. त्याची आठवण देणारे त्याचे वाडगे आता नको. ते बघताना मला त्रास होतो. तिथे आपण शेत काढू. ती जमीन वहिवाटीला आणू.' मुख्य अघोषित हेतू अर्थातच तिथे खणती लावून पुरलेले काही सापडते का, याचा शोध घेणे, असा होता. तो त्याने माणसे कामाला लावून, डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवत घेतला. पण त्याला तिथे काहीही सापडले नाही. त्याला वाटले, कोल्हाटीण हुषार जात. सगळे घेऊन पळाली. हलकट होती. आपण एक गरती बाई आहोत असे तिने आपल्या चुलत्याला दाखवले. आणि म्हणून त्याने आपल्याला बदडले. तिच्यामुळे आपल्याला मार पडला. पण अखेर आपली जात तिने दाखवलीच. आपल्याला बधली तर नाहीच आणि सगळे घेऊन, आपल्या चुलत्याला मारून अज्ञात पळाली साली. जयाजीला माहीत होते की चुलत्याने आपल्या बापाजवळ खूप माल आणून दिलेला होता. पण म्हणून त्याच्याकडे तो त्यापेक्षा अधिक नव्हता असे कसे म्हणता येईल? तो असणार हे सरळच. तो या हरामी कोल्हाटणीने अजात पळवला. चुलता

मेल्याचे काहीही दुःख त्याला नव्हते. माल गेल्याचे होते. खूप खूप होते. त्याने गुप्तपणे तिचा माग काढण्याचा शर्थीने प्रयत्न केला. ती नगरकडे गेली याचा सासूल त्याला लागला. पण नगरच्या सीना नदीच्या पल्याड त्याला रस्ता दिसेनासा झाला. अन् काही दिवसांनी तर पिराजीचा घोडा चालत त्या पठारावर आला. त्यानंतर काही दिवसांनी त्याच्या पाठी एक माणूस आपला घोडा इकडे आला असे सांगत आला. तेव्हा हा आमचा घोडा आहे हे जरबेने सांगणे जयाजी यास भाग पडले. तेव्हा तो माणूस कबूल झाला की त्याला हा घोडा सीना नदीच्या एका काठाला एका झाडाला बांधलेला आढळला. आणि त्याने तो त्याच्या घरी नेला होता. पण तो साला इकडे पळून आला. कोल्हाटीण त्या घोड्यावर बसून गेली, हे त्यातून स्पष्ट झाले. तिने सीना नदीच्या आसपास कुठे तरी तो घोडा सोडला, हेही त्याला कळले. पण त्याच्या पल्याड त्याचे प्रयत्न जाऊ शकले नाहीत. कोल्हाटीण आपल्याला भारी पडली, याची स्वतःला कबुली देत मूग गिळणे त्याला भाग पडले.

पिराजी ज्या सकाळी त्याच्या वस्तीसमोर मरून पडला, त्याच्या आधीच्या रात्री, म्हणजे समजा, त्या दिवशीच्या पहाटे घोड्यावर बसून त्याच्या वस्तीवर पोहोचलेला होता. मोठ्या मुश्कीलीने तो घोड्यावरून उतरला आणि झुकांड्या खात आत आला. त्याच्या अंगातून घामाच्या धारा वाहात होत्या. त्याला बसताही येईना आणि पडल्या जागी स्थिर राहताही येईना. उल्फीला आधी वाटले, हा दारू पिऊन आलाय. पण त्याच्या अंगाला वेगळाच कोणतातरी विषाक्त वास येत होता. सगळ्या अंगाची आग आग होत असल्यासारखा तो गडबडा लोळत होता. त्याची ती अवस्था पाहून तिच्या मनाने ठाव सोडला.

'आरेऽऽ देवा याला काय झालंय?'

तिला कळेचना. हे काय भिनलेलं आहे याच्या अंगात? कोणी काही घातलंय? इतका दैत्यासारखा ताकदवान पुरुष. हे असं झालंय काय? तिने हंड्यातून तांब्याभर पाणी घेतलं अन् त्याच्या तोंडाला लावलं. तर त्याला ते गिळताच येईना. ते बाहेर सांडत राहिलं.

'काय झालंय? असं काय झालं?' ती विचारत राहिली.

त्याला बोलता येत नव्हतं. तो प्रयत्न करीत होता. पण शब्द बाहेर येत नव्हते. आटोकाट प्राणांतिक प्रयत्न करूनही शब्द निर्माणच होत नव्हते. शब्दांच्या खेरीज किंवा त्यांच्या आधी नुसता स्वर किंवा आवाज असतो, तोही फुटत नव्हता.

'आरे बाबा, काय झालंय? कोन्ही क्यालं? कोन्ही काय खाऊ घातलं तुला?'

उत्तर नाही. नुसतेच हातवारे. अन् हातवारे कसले? तर जा, जा. ताबडतोब निघ.

'मी का जाऊ? कुठं जाऊ? एवढ्या रात्री कुठं जाऊ?' 'जा. जाच. लगेच निघ.' 'अरे पण का? तुझं हे काय झालंय?'

या सगळ्या गडबडीत तिचा मुलगा - तिचा आणि पिराजीचा मुलगा जालन - झोपेतून जागा झाला. आधी डोळे चोळत आणि बापाची अवस्था पाहून डोळे गाळत ते पोर शेजारी उभं राहिलं होतं.

'तुला कोणी काही खाऊ घातलं का? कोण तो वैरी? मला सांग तरी. मी आता काय करू?'

तिला माहीत असलेला उपाय तर तिने कधीच अंमलात आणलेला होता. तिने घरात होते- नव्हते ते सारे भोकपडे पैसे गोळा करून ते चुलीवर तवलीत पाण्यात उकळू घातले होते. पिराजीला कोणीतरी जालीम विष घातलंय. इतकं जालीम की त्याची वाचा गेलीय. अन् त्याच्या अंगाची आग आग होतेय. अन् माठ पाझरावा तसा घाम फुटलाय त्याला, हे तिला दिसत होतं.

ती कोल्हाट्याची अवलाद होती. मोठ्या धीराची बाई होती. तरीही तिचं मन थाऱ्यावर उरलेलं नव्हतं. गेली दहा-बारा वर्षे तिने पिराजीसोबत घालवली होती. या वादळी तुफानाला तिने अत्यंत प्रेमाने आपल्यात सामावून घेतलेलं होतं. तिच्यात रुजलेला त्याचा अंकुर आता साताठ वर्षांचा झालेला होता. त्याच्याखेरीज तिचा दुनियेशी काहीही संबंध उरलेला नव्हता. त्याच्या पल्याड तिला दुनियाच नव्हती. अन् आता हे काय झालं होतं? कोणाला बोलवायचं? काय करायचं? झाडपाल्याचं काही औषध असतंय काय? याला काहीच बोलता येत नाहीय. हा नुसता खुणांनी म्हणतोय, जा, जा. लगेच निघ. कुठं

जाऊ? काय करू? अरे बाबा, तुला सोडून कशी जाऊ? का जाऊ? कुठं जाऊ?

तिने तवलीतलं पाणी मोठ्या परातीत काढलं. लवकर निवण्यासाठी. ते भरवण्यासाठी शिंपला शोधून काढला.

नको, नको. काही उपयोग नाही त्याचा. गळ्याच्या खाली काहीच उतरत नाही. पिराजी हातवारे करीत सांगत होता.

तिने प्रयत्न केला. खरंच त्याच्या गळ्याच्या खाली काहीच उतरत नव्हतं. त्याचा गळाच बंद झाला होता. तोंडात घातलेलं पाणी ओठांच्या कडेनं बाहेर गळत होतं. थेंबही आत उतरत नव्हता.

पिराजी प्रयत्नपूर्वक उठला आणि तिला लेकरासोबत त्वरेने निघून जाण्यासाठी हातवारे करू लागला. तो जोरजोराने सांगत होता. अखेर खवळून त्याने हाताशी आलं ते टिकुरं उचललं आणि ते घेऊन तो तिच्यावर धावला. ती जागीच स्तब्ध उभी राहिली. हतबल होऊन त्यानं टिकुरं खाली टाकलं. त्याच्या डोळ्यांशी आसवं जमा झाली. त्याने तिला हात जोडले. मी याच्यातून वाचत नाही, म्हणून तू जा. तुला इथं माझ्यापाठी निभायचं नाही. तुला फाडून खातील सगळे. तूच मला मारलंस म्हणतील. तो हातवारे करत सांगत राहिला. मागच्या बाजूला केकताडाच्या बेटात सोनेनाणे, पैसे पुरलेले आहेत, ते घेऊन जा. पळ. लगेच पळ. तो पुन्हा पुन्हा सांगत राहिला.

एका क्षणी तिला ते पटले. निदान त्याच्या मरण्याच्या क्षणी तरी त्याला आपण सुरक्षित पळतो आहोत, याचे समाधान देणे, हे आपले कर्तव्य आहे, असे तिला वाटले. तिने पोराला घेतले आणि ती निघाली. पिराजी आता वाचत नाहीय्ये. आपण वाचले पाहिजे. जगले पाहिजे. आपले पोर जगले पाहिजे, असे तिला तीव्रतेने वाटले. पोराला घेऊन ती घोड्यावर स्वार झाली. ती याआधी एकटी घोड्यावर कधीही बसली नव्हती. आता पोराला घेऊन बसली होती. कुठे जायचं, काय करायचं, हे काहीही त्या क्षणी तिला माहीत नव्हतं. तिथून पळणं, घोडा जाईल तसं दूर जाणं, एवढंच ती करू शकत होती. अन् करणार होती.

एका क्षणात तिच्या आयुष्याने पलटी खाल्ली होती. एका सरळसोट आयुष्याने अनपेक्षित वळण घेतले होते. पुढचे काहीही तिला माहीत नव्हते. साराच अंधार होता. अन् अंधारात घोडा नेईल तशी ती चालली होती. पोराला पोटाशी घट्ट कवटाळून अंधार चिरत ती चालली होती. चिरलेला अंधार पुन्हा एकत्र मिळून तिच्या दृष्टीला अन् मनाला व्यापून होता. एका अनिश्चित भवितव्याच्या अंधाराकडे तिचा वारू दौडत होता. हे असे पहिल्यांदाच झाले होते; असे नाही. माणकेश्वरला पिराजीने तिला उचलले तेव्हाही तिच्या मनासमोर भविष्याचा अंधारच होता. त्याआधी तिचे निश्चित झालेले भवितव्य तिला माहीत होते. तिच्यासारख्या कोल्हाट्याच्या अनेक पोरी करतात, तेच ती करणार होती. नाच, गाणी, शय्या अशा अनेक अदांनी अन् अंदाजांनी पुरुषांना घायाळ करत दौलत गोळा करायची अन् अखेर एखादा शेठ गाठून त्याच्याशी राहायचं, असा एकूण हिशेब होता. तिचा शेठ निश्चित होता. तिने धाडस केले. तिने पिराजीला पुकारले. त्याने तिला उचलले. तो तिला त्याच्या रानात घेऊन आला. तिचे काहीही बिघडले नाही. सगळे सुखाचेच झाले. त्याने अतोनात प्रेम केले तिच्यावर. त्या वादळी पुरुषाची स्वामिनी होऊन ती आनंदात राहात होती. ती त्याची रखेल नव्हती आणि पत्नीही नव्हती.ती त्याची जोडीदार, त्याची

स्वामिनी होती. ती त्याची एकमेव स्त्री होती. अन् तो तिचा एकमेव पुरुष होता. लग्न झालेल्या गरती स्त्रीच्या वाट्यालाही सहसा येत नसेल असे प्रेम आणि निष्ठा तिच्या वाट्याला आलेली होती. त्या वादळी सहवासाचे, प्रेमाचे फळही ईश्वराने तिला जालनच्या रूपाने दिलेले होते. माणसाला आयुष्यात आणखी काय पाहिजे असते? इतक्या सुखाच्या आयुष्याची तर तिने कल्पनाही केलेली नव्हती. आणि आता एका क्षणात सारे होत्याचे नव्हते झाले होते. आठदहा वर्षे मांडलेला सुस्थिर डाव मोडला होता. तिच्या आधाराचा खांब, तिच्या जगण्याचा आसच मोडून पडला होता. वारमोड झाली होती. सोसाट्याचा वारा आला आणि क्षणार्धात सारे भुईसपाट झाले होते. ती अंधारात धावत होती.

एके ठिकाणी घोड्याने एक नदी पार केली. पाणी उथळच होते. तिने घोडा थांबवला. उतरली. नदीच्या पाण्यात हातपाय स्वच्छ धुतले. पुष्कळ अंतर पार करून आली होती ती. अजूनही अंधारच होता. पण कच्ची पहाट जाणवू लागली होती. दिवस उजाडण्याआधी कुठेतरी लपायला जागा मिळणे आवश्यक होते. अज्ञाताचा कोणता तरी दरवाजा ठोठावून त्यात लपायला मिळणे गरजेचे होते. नामशेष होणे गरजेचे होते. घोड्याला कुठे घेऊन जायचे? घोडा तिच्या दुनियेच्या ओळखीचा होता.त्याने तिला इथवर आणले होते. यापुढे त्याचा त्याग करणे आवश्यक होते. उजाडायच्या आत कुठेतरी गडप होणे आवश्यक होते. ओळखीच्या सगळ्या खुणा पुसणे, त्यांचा त्याग करणे आवश्यक होते. तिने तिचा प्रिय पुरुष, तिच्या जगण्याचा स्वामी; त्याला मरणाच्या दारी एकाकी सोडून, त्याचा त्याग केला होता. आता हा आणखी एक त्याग. त्याच्याच सेवकाचा. तिने त्याला तिथेच एका झाडाशी बांधले. कुणीतरी येईल आणि तुला सोडील. एखादा वाटसरू, एखादा शेतकरी; कुणाला तरी कळेलच की तू एकटा आहेस. तो तुला सोडील आणि घेऊन जाईल.

तिने त्याला अंधारातच हात जोडले आणि पोराचे मुटकुळे खांद्यावर घेऊन ती निघाली. आता पुष्कळच चांगला आणि अंधारातही दिसण्याजोगा रस्ता होता. अंधारातही दिसणारा आणि अजिबातही खाचखळगे नसलेला. सारीकडे स्तब्धता होती. क्वचित कुठे एखादी वस्ती आहेशी वाटे आणि प्रत्यक्षात ती नसे. रस्ता चांगला असल्याने तो भराभर उरकत मात्र होता. खांद्यावर झोपलेले लेकरू होते. त्याचा भार जाणवत होता आणि नव्हताही. त्याच्यासकट ती दुनियेचे अस्तित्व चाचपत होती. आपल्याला मायेने कवेत घेऊ शकणाऱ्या जागेला शोधत होती. ते मुश्कीलच होते मुळात. पण समजा एखादा दिवस कुठे तरी लपता येईल. अंधार झाला तर आणखी कुठे जाता येईल. अंधारात अंधाराच्या पल्याड सुरक्षित ओळख बुजवणारा कोपरा सापडेपर्यंत चालायचं. वेगळा रस्ताच नव्हता तिला.

एके ठिकाणी डाव्या हाताला एक भलीमोठी भिंत असल्याचा भास तिला झाला. हा आधीच्या भासांसारखाच असेल, असे तिला वाटत होते. ती अर्थात चालतच होती. भिंत असली काय अन् नसली काय; काय फरक पडतो? हा एखादा कैदखाना सुद्धा असेल मोठ्या गावातला. किंवा एखाद्या मातब्बराच्या गढीचा कोटही असेल. गढ्या तिने लहानपणी, निदान बाहेरून का असेना; पाहिलेल्या होत्या. कैदखाना तिला माहीत नव्हता. एकदाची ती भिंत संपली अन् मग खूप मोठाली आवारे असलेली घरे सुरू झाली. एके ठिकाणी घराच्या आवाराच्या तोंडाशी एक माणूस बसल्याजागी झोपलेला तिला दिसला. तिथले फाटक उघडेच होते. तिने क्षणभर विचार केला. नीट निरखून पाहिले. ती हलकेच आत

शिरली. जरासाही आवाज होणार नाही याची काळजी घेत. आत काही ठिकाणी उंच खांबांवर काचेच्या खोक्यात जळणारे दिवे होते. उजेड होता. समोर एक भले मोठे घर होते. डाव्या अंगाला काही अंतरावर बारकी बारकी घरे होती. उजेडाकडे पाहात अन् स्वतःला काळजीपूर्वक अंधारात ठेवत ती चालत होती. आवारात अनेक मोठाली झाडे होती. त्यांच्या खोडांशी गोलसर पार बांधलेले होते. त्यातल्या एखाद्या पारावर टेकावे, असे तिच्या मनात आले. पण ते तिच्या उपयोगाचे नव्हते. सकाळ होताच पार उजेडात आला असता. आणि हे कोणाचे घर, कोण माणसे इथे राहतात, हे काहीही न कळता तिला कोण, कुठली, आत कशी आली ; असल्या प्रश्नांच्या वेढ्यात अडकावे लागले असते.

मोठ्या घरापासून दूर असलेल्या बारक्या घरांच्या समूहाकडे तिने मोर्चा वळवला. तिथे राहणारे लोक आपल्याशी जरा अधिक माणुसकीने बोलतील, या अंदाजाने, किंवा तशा अध्याहृत समजुतीने तिने तसे केले. पण मग इतके मोठे आवार, एवढी मोठी जागा; इथे कोणालाही न कळता कुठेतरी लपण्यासाठी सुरक्षित कोपरा शोधणे आणि तिथे लपून घराची एकूण दुनिया न्याहाळणे जास्त योग्य, असा विचार तिने केला. पाठीशी भलीथोरली भिंत होती. एक झाड होते. त्याच्या पायथ्याशी चौथरा होता. चौथऱ्यावर झाडाच्या खोडाला लागून काही तरी होते. हा चौथरा उंच होता. चौथरा आणि मागची उंच भिंत यांच्या मध्ये जेमतेम दीडहात रुंदीची जागा होती. आसऱ्यासाठी तिने ती पसंत केली. जालनला तिथे उखाडी टाकून, त्याला कवटाळून त्याच्या शेजारी आडवी झाली, तेव्हा अगदी स्पष्टपणे तिच्या मनात आले, पिराजीचे काय झाले असेल? लोकांना कधी कळेल? काय होईल? असे प्रश्न आधीही तिच्या मनात उमटतच होते. पण आता त्यांना पुरेसा अवसर मिळाला होता. शरीराने ती थकून गेली होती. एका रात्रीत ती कुठून कुठे आली होती! जाग, थकवा, झोप यांच्यातल्या सीमारेषांमध्ये एकदा तिला वाटले सुद्धा की, हे सगळे स्वप्नच आहे. अन् सकाळ होताच सारे नीटनेटके होऊन जाणार आहे. साल्पी गावाच्या त्या पठारावर राहताना पुष्कळदा पुष्कळ दुःस्वप्ने तिने पाहिलेली होती.आणि नंतरच्या प्रत्येक सकाळी सगळे नीटनेटके असल्याचे प्रमाण तिला मिळालेले होते. अनुभवांचा दीर्घ उजेड तिच्या पाठीशी होता. त्यामुळेच कदाचित नंतर ती ठार दगडासारखी झोपी गेली होती.

सकाळी तिला जाग आली तेव्हा दिवस कासराभर वर आलेला होता. टळटळीत उजेड होता. क्षणभर तिला वाटले, हे असे कुठे, कसे, कोणत्या अनोळखी ठिकाणी आपण आलो आहोत? मग तिला जाणवले की हे नेहमीसारखे स्वप्न नाहीय. आपण दूरवरचा पल्ला मारून, या अनोळखी गावातल्या अनोळखी घराच्या आवारात, या चौथऱ्यापाठी लपलो आहोत. आसपास सारीकडे शांतता असली तरी माणसांच्या हालचाली आहेत. हे फार मोठे घर आहे. फार मोठे आवार आहे. हे घर कोणा तरी मोठ्या अंमलदार माणसाचे असले पाहिजे. आणि ती उजवीकडची लहानी घरे कामकरी माणसांची असतील. तिथेच आणखी पल्याड तबेलावजा जागा होती. अन् तिथले घोडेही तिला दिसत होते. झाडे तर होतीच आणि चारी बाजूंनी भिंत होती. अजूनही तो उंच चौथरा आणि तिथून दीड हात अंतरावरची भिंत यांच्या मधल्या जागेत सावली होती. तिथेच ती मायलेकरे होती. सूर्य अगदी डोक्यावर आलेला असतानाही इथे सावली असेल. कारण चौथऱ्यावरचे झाड, असे

तिच्या मनात आले.

जालनला जाग आली. डोळे चोळत त्याने आसपास पाहिले. अंथरूण नाही. पांघरूण नाही. अन् ही अशी जागा तर आपल्या घरात कुठेच नाही. अन् हे असे उखाडी आपण. अन् आपली आई सुद्धा. कुठे आलोय आपण? अन् आपला बाप कुठंय?

"मपला दादा कुढं गेला?' त्याने उल्फीला विचारले.

'गप. मोठ्यानी बोलू नको.' ती त्याच्या तोंडावर हात ठेवत म्हणाली,

'आपुन दुसऱ्या गावाला आलो. तुपला दादा घरलाच हाये.'

'मंग चल ना, आपन आपल्या घरला-'

'गपचित बस. मोठ्यानी बोलू नको सांगातलं ना-,' तिने पुन्हा त्याचे तोंड दाबले.

त्याने एकवार तिच्याकडे पाहिले. मागची भिंत, पुढची चौथऱ्याची भिंत. गपचिप बसायचं. त्याला अचानक रडू फुटले. प्रकट. तिने त्याला जवळ ओढले. त्याचा आवाज बंद करीत त्याला छातीशी कवटाळले. 'आपन दुसऱ्या ठिकान्याव आलोय. आपून कोन्हाला दिसलो तर ते लोकं आपल्याला मारतीन. गप राहा.' ती हलकेच म्हणाली. हे सगळे असे का, हे त्याला कळेना. पण समझदारपणे तो गप्प बसला. काहीतरी विचित्र घडून गेलेय. आपली आई अडचणीत आहे, हे त्याला कळले. खेरीज काल रात्री आपला बाप आजारी झालेला पाहिल्याचे त्याला आठवले. जन्मल्यापासून त्याच्या आईबापाखेरीज फारशी माणसे त्याने पाहिलेली नव्हती. जवळून तर नव्हतीच नव्हती. एक विठोबा तेवढा पाहिला होता. पण तोही मुका आणि बहिरा. साल्पीतल्या त्या माळावर जालन एखाद्या रानटी रोपट्याइतका नैसर्गिक वाढलेला होता. रोपट्याला जमिनीची उब आणि ओल, तशी त्याला त्याच्या आईची होती. अन् सूर्यासारखा दूरस्थ अन्नदाता बाप होता. एखाद्या झाडाने किंवा रानातल्या एखाद्या प्राण्याने ज्या समझदारीने आयुष्य स्वीकारावे तसे त्याने केले होते. त्याचे ते सगळे जग आनंदाचे होते. आतासुद्धा तो घाबरलेला नव्हता. आई सोबत होती. ती सांगेल तसे वागले की झाले. काय करायचे ते ती बघेल. गुंते निर्माण करणारे कुतूहल त्याच्याठायी नव्हते. तरीही काही ना काही कुतूहल हे असतेच.

'मपला दादा म्याला?' त्याने तिच्या कानात विचारले.

त्याने आदल्या रात्री आपल्या बापाला हातपाय खोडताना, गडबडा लोळताना पाहिले होते. त्याच्या पुष्कळ आधी त्याने एका घोड्याचा मृत्यू पाहिला होता. मरताना तो घोडा तडफड करत लोळत होता, हे त्याला आठवत होते. नंतर पिराजीने खड्डा खणून घोड्याला तिथे मिठात पुरल्याचे त्याला आठवत होते.

त्याच्या प्रश्नावर उल्फीने डोळे रोखून त्याच्याकडे पाहिले. निर्मळ कुतूहल, स्वीकार; यांच्या पल्याड काहीही नव्हते त्याच्या डोळ्यात.

'हां.' ती म्हणाली. 'मंग त्याला कुढं पुरला? तिथंच?' 'हां.'

आणखी जरा वेळ गप्प बसून तो तिच्या कानात म्हणाला, “आये! मला लई हागाया लागली.'

'बस तिथं.' ती शेजारी संकेत करत म्हणाली..

तो निर्मळ मनाने बसला आणि त्याच मनाने त्याने आपला विधी पुरा केला.

'दगोड कुढंय?' त्याने बसल्या जागी विचारले. 'गाडा गाडा कर.' ती म्हणाली.

गवत होते. त्याने आपला पार्श्वभाग गवतावर घासत गाडा गाडा उरकला आणि आपली लंगोटी शिस्तशीर ओढून पुन्हा करदोऱ्यात अडकवली. ती उठली. तिने खसाखसा हाताने माती खणली आणि त्याच्या विष्ठेवर टाकली. वास नको. मुख्य म्हणजे माशांची भणभण नको.

आणखी जरा वेळाने तिने दोन माणसे तबेल्याकडे जाताना पाहिली. त्यांच्या अंगावरची कापडे फारच चमकदार आणि आटुसबाज होती. लाल लाल रंगांची खमिसे. छातीवरून आणि कमरेभोवती घट्ट बांधलेले सोनेरी झिलमिलीचे पट्टे. डोईवर तसेच ऐटबाज फेटे. अन् त्यांच्यावर तुरेबाज झिलमिल. अंगात खाली लांड्या चड्या. पायात गुडघ्यापर्यंत पोहोचलेली कातडी पायताणे. असली पायताणे तिने आधी कधीही पाहिलेली नव्हती. असे पोषाखच नव्हते पाहिलेले. स्वतःला सुरक्षित लपवत ती थोडी

आणखी पुढे जाऊन बघू लागली.

त्यांनी चार घोडे बाहेर काढले. त्यांच्या अंगांवर झुली टाकल्या. त्यांच्या मोरख्या तपासल्या. अन् त्यांना घेऊन ते पुढे गेले. कुठे ते उल्फीला दिसले नाही, कारण ते मोठ्या घराच्या समोरच्या बाजूकडे गेले. आणखी जरा वेळाने कोणीतरी काहीतरी पुकारले. नंतर एकदम खडाऽऽ खाऽऽ असा आवाज अन् बऱ्याच जणांची एकसाथ आरोळी. पुढच्या क्षणी एक घोडागाडी गेटातून बाहेर जाताना उल्फीला दिसली. चार घोडे जोडलेली गाडी होती. गाडीच्या पुढच्या भागात तिने आधी पाहिलेली ऐटबाज माणसे असावीत. ते गाडीहाक्ये फक्त. अन् तो या मोठ्या घराचा मालक मागे बसलेला असेल. त्याची पाठ ओझरती दिसली तिला. पोषाखातला पाठीचा अन् डोक्याचा भाग.

ती गाडी गेली आणि कुंपणाच्या आतले वातावरण मोकळे झाले. माणसे मोकळेपणाने येताना, जाताना दिसायला लागली. कोणीतरी फारच बड़ा अंमलदार असला पाहिजे या जागेचा मालक ; जे उल्फीला आधीच वाटले होते, त्याची तिला खात्री पटली. माणसांची चहलपहल वाढल्यासरशी तिने स्वतःचे कुतूहल आवरून स्वतःला चौथरा आणि मागची भिंत यांच्या बेचक्यात पुन्हा बंद करून घेतले. कोणी पाहिले तर काय? खेरीज ती विचारही करत होती. आता करायचे काय? अगदी तातडीचे प्रश्न सुद्धा होतेच तिचे. एव्हाना जालनची न्याहारी होऊन जाते रोज. आता तो शहाण्या माणसासारखा गुपचूप बसलेला होता. तरीही ते बारके पोर ; भूक किती वेळ मारू शकणार? अन् प्यायला पाणी? ते कुठून आणायचे? निदान लेकारापुरते तरी. अंधाराच्या आसऱ्याखेरीज कुठेही हिंडणे धोक्याचे होते. पण त्याआधी कुठे कुठे काय आहे, हे पाहता आले तर! काय, समजा, चोरीमारी करता येईल गरजेपुरती. त्यासाठी सुद्धा सगळे नीट माहिती पाहिजे.

एक चांगलीच ढबुली वयस्क बाई धुतलेल्या धुण्याच्या पिळयाचे भले मोठे भांडे डोक्यावर घेऊन आली अन् एकेक कपडा उचलून झटकून दोरीवर वाळत घालू लागली. सगळी पांढरीफेक कापडं. लहानी मोठी फडकी. मालकाचीच आस्तीन. इकत्या समद्या फडक्यांचं काय करीत आसन त्यो? बाई मानसाची कापडं; लुगडंचोळी आसं कायच दिसत नायी, उल्फी विचार करत होती. आणखी एक लुकडासा माणूस आणखी एक धुण्याचे भांडे घेऊन आला. शेजारच्या आणखी एका दोरीवर तोही धुणे झटकून टाकू लागला.

'राहुंदे रानुबाय. मी टाखितो तुपलंय पन,' तो त्या बाईला म्हणाला.

'आसुंदे. झालंच माजं-'

'किती काम पडातं तुला रानुबाय. धुणीभांडी, झाडलोट. पुन्हा त्या

डंगऱ्या रह्यमानचाचाच्या हाताखाली सैपाकघरात-'

'पडूंदे. तुला काय-'

'मला बी राबून घ्येतो लई. माळी म्हणून घ्यातलं मला. त, ह्यो काय बी काम सांगतो. ते आयकाया लागातं. सयपाकाला मातर हात लावू देत नायी. त्यापरीस तू किती चांगली-' असे म्हणत कळत नकळत तो तिच्या निकट जाऊ लागला.

'लांब राहा भाड्या. मपला उपास ह्ये आज. शिवू नको मला.' 'तू पन काय लागून गेली; धोबनच हयेस ना!' 'पन भंगी नायी.' 'उपास करिती म्हनी. मटानबिटान समदं चापून हानिती-'

'एऽऽ मेहतरकी औलादऽऽ' लांबून कुठून तरी हाक आली, जरा जल्दी कर. हौर भौत काम पड़ा है. चल जल्दी जल्दी.'

'पक, तुला म्हंतो का कायी? आन मी दोन सबद बोललो तुपल्यासंगती, त लागलंच पॉट दुखाया त्याचं,' तो त्या बाईला म्हणाला आणि भराभर सगळे आवरत पळाला.

'का रे, आता का?' ती रानुबाई हसली.

'सायबाच्या चाबकाखाली चामडी सोलून नायी घेयाची मला.' तो पळता पळता म्हणाला. काही वेळाने राणुबाईही सावकाश डुलत डुलत निघून गेली. राणुबाई, अन् तो आधीचा भंगी, अन तो न दिसलेला रहमान चाचा. शिवाय घोड्यांची गाडी हाकणारे. आणखीही पुष्कळ असतील कामकरी. या मोठ्या घराच्या मागच्या बाजूला बाकीचे पटकन दिसणार नाहीत. पण असतील हे नक्की. हा मालक कोण असावा? त्याचा धंदा काय असावा? घोडागाडीत बसून मोठ्या रुबाबात गेला. काय काम करीत आसंल तो? लयच मोठा कायतरी आसन तो.

आणखी घंटाभराने राणुबाई डुलत डुलत चौथऱ्याकडे येताना उल्फीला दिसली, तेव्हा धास्तीने तिची गाळण उडाली. पाहिलंय की काय? पाहिलं, विचारलं तिनं तर बोलायचं काय? अन सगळेच गोळा झाले अन हाकललं तर? सावलीतल्या बेचक्यात जालनला पोटाशी घेऊन ती बसलेली होती. त्याच्या कानाशी म्हणाली, 'आवाज करू नको. ती बाई येतीय.' पोराच्या पोटात भुकेनं काहूर मातलं असेल. पण हूं की चूं न करता बसलाय; तिच्या मनात आलं. चौथऱ्याच्या पायऱ्या चढताना राणुबाईच्या श्वासोच्छवासाचा आवाज स्पष्ट येत होता. जाडी बाई. दम लागत असेल. काम कसं करीत असेल मग?

राणूबाईने वाजवलेल्या घंटीचा आवाज आला. मग चौथऱ्यावरल्या झाडाभोवती प्रदक्षिणा. उल्फीने अंगाचा आणखी संकोच केला. चौथऱ्यावर झाडाखाली देवाचं ठाणं दिसतंय. उपास हाये म्हणजे काही निवदबोणा केलाय की काय? बरं होईल. माझ्या लेकराला तेवढं तरी खायला मिळेल.

राणुबाईला परतताना उल्फीने पाहिले. ती दिसेनाशी झाल्यावर तिने आसपासचा सासूल घेतला. अन चपळाईने वर गेली. निवद ठेवलेला होता. एक चपाती. त्याच्यावर वरणभात. भजी. कुरडई. कोणता देव? कोणता का असेना ; आपल्या लेकराला पावलाय बिचारा. तिने पटकन सगळे उचलले आणि बेचक्यात परतली. तिने जालनसमोर ते मांडले,

तेव्हा ते लेकरू मटामटा खाऊ लागले. यावढंच? त्याने डोळयांनीच विचारले आणि लगेच डोळे आत घालत तो डोळयांनीच गप्प झाला. 'ह्ये पक, आसा भितीच्या कडाकडानी रांगत रांगत जा. त्या तिथं दगडाची डोनी हाये. तिच्यात पानी हाये. ते पेयाचं आन तसंच परत येयाचं. कोणाला दिसू नको.' ती त्याच्या कानात म्हणाली. पाण्याची ती डोणी तिने पाहून ठेवलेली होती. घोड्यांना पाणी पाजण्यासाठी असेल. काय फरक पडतो? रात्र झाल्यावर स्वतःही तिथे जाऊन पोटभर पाणी प्यायचं तिने ठरवलेलं होतं. पण लहान पोर तेवढा दम कुठून काढणार? आणि सोप्पंच होतं ते तसं. झाडो़ऱ्याचा आसरा करून जायचं, अन पाणी पिऊन यायचं परत. गेलं तसंच.

परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन जालन अगदी हुषारीने तिथवर जाऊन, पाणी पिऊन, सुखरूप बेचक्यात परतला. उल्फीचा घोर निदान काही वेळापुरता तरी मिटला होता. लेकराच्या पोटाला आधार गवसला होता. मोठ्या माणसाला दम धरता येतो. मोठ्या माणसाची आताडी निझूर झाल्याली हात्यात. लहान लेकराचं तसं नायी. पोटाला आधार मिळाल्यावर ते खुशी होऊन बेचक्यात येऊन मातीत लुंडकलं. उल्फी बसून होती. सावचित. सावध चित्ताने. पुष्कळ गोष्टी तिच्या मनात उमटत होत्या. तितकी सवड आत्ताशी तिला मिळाली होती. पिराजी मेला. आपण तिथं थांबलो असतो तर, आपणच त्याला विष घालून मारलंय, म्हणून सगळयांनी आपल्या चिंध्या चिंध्या केल्या असत्या.

अजूनही त्यांचा तोच समज असेल आणि राहील. ते कशानेही बदलणार नाही. पण पिराजीला विष घातलं कोणी? आपला बाप? पिराजीचे जोडीदार? मारवाडी? कदाचित सगळयांनी संगनमतानी. अन् इतकं होऊनही तो वस्तीवर आला. आपल्याला वाचवण्यासाठी. आपल्याला अन् आपल्या बाळाला. पैसे, दागिने घेऊन जा; म्हणत होता. नाही आणले आपण. तेवढ्यासाठी कोणी आपल्याला मारलं तर काय, असं मनात आलं आपल्या. पण थोडे तरी आणायचे होते. वेळाकाळाला बरे असतात. आता, याच्या नंतर काय करायचं आपण? रात्र पडल्यावर बाहेर पडायचं? अन् जायाचं कुठं? की इथंच त्या राणुबाईकडं जाऊन तिचा आसरा मागायचा? एकटीच दिसतीय. देवाधर्माची आदी दिसतीय. कुणी सांगावं, पाकळंल सुद्धा तिचं मन. म्हणायचं, काहीही काम सांग. करीन. भायेर माह्या जीवाची खैर नाही. आता तूच माझी आई. आई, भैन ; समदी तूच. समदं तुपल्या स्वाधीन. नायतं कोन त्यो रह्यमान चिच्या, त्याच्या पायावर लोटांगण घालू. त्याचा लय दाब दिसतोय इथं. पन त्याला त आझुन पाह्यल्यालं पन नायी आपून.

संध्याकाळी जरा अंधार व्हायला लागला असताना हवेत वास दरवळू लागले. शिजत असलेल्या मटणाचा, मसाल्याचा अन् भाताचा वास. मटणाचा वास अगदी पटकन ओळखला उल्फीने. तसं तर कोणीही सहज ओळखू शकतं ते. तरीही तो गंध अत्यंत अनोखा होता. अन् त्यापेक्षाही भाताचा वास. साळीच्या शेताजवळून जाताना येतो तो. तसाच होता तो. पण असाधारण मोहक. भुकेची तीव्र जाणीव झाली तिला. हळूच डोकावून पाहिलं तिनं. कोणीही नव्हतं बाहेर. असतीलच सगळे. आवाज होते. जे ते आपापल्या कामात.

उजव्या बाजूने एक माणूस साखळीला बांधलेल्या एका कुत्र्याला घेऊन आला. कुत्र्याच्या गळयाला पट्टा होता अन् त्याची साखळी त्या माणसाच्या हातात. व्हांवऽऽ,

व्हांऽऽ व, ते कुत्रं मोठ्यांदा भुंकलं. भलं दांडगं कुत्रं होतं. उल्फीच्या काळजात बसल्याजागी धडकी भरली.

"रयमान चाचा, वोऽऽ रयमान चाचाऽऽ सुटीला घेऊन आलो मी.' घराच्या मागे येऊन तो माणूस मोठ्यांदा म्हणाला. स्वीटी नामक त्या कुत्रीने आपले आगमन आधीच जाहीर केलेले असल्याने रहमान चाचा बाहेर आलाच होता.

'ठीक है ना अब? दो दिनतक रखा डागदरबाबूने.'

'हां, बिलकुल ठीक हाये आता. शिकपना बिलकुल नायी हाये म्हनला.'

'ठीक है. रख उसे अंदर. और खाना ले जा उसको.' रहमानचाचा म्हणाला. त्याने प्रेमाने त्या जंगी कुत्रीला- स्वीटीला जवळ घेऊन थोपटलं.

पण स्वीटी आत जायला तयार नव्हती. ती मागच्या बाजूकडे वळून भुंकत होती. साखळीला ताण देऊन मागच्या बाजूकडे; चौथऱ्याकडे ओढ घेत होती.

'चल, चल, उधर क्या रखा है तेरा? चल. जाव अंदर. ये रानुबाईने कुच रखा होगा उधर. पिछली बार खाया तो तबियत बिगड गयी थी तेरी.' रहमानचाचा म्हणाला.

"ए चाचा, भगवान के सामनेका परसाद खाया तो क्या बिघडता उसका? तब्येत कैसा बिघडता? आदमी जो खाता उससे कुत्रीका तब्येत बिघडता क्या? मेरे उप्पर तोहमत मत ले. मै बोल देती हूं-' आतून बाहेर

येत, तणतणत, आवाज चढवत राणुबाई म्हणाली.

'अच्छा, अच्छा. तुम्हारा भगवान कुच नाही बिगाडता. चल बे, ले उसको अंदर. जा बेटी, अंदर जा. मै अभी तेरेको तेरा गोश्त भेजता, चल जा,' रहमान चाचा आधी राणुबाईला, नंतर त्या माणसाला आणि अखेर त्या स्वीटी नामक कुत्रीला म्हणाला. पण स्वीटी कोणाचेही न ऐकता भुंकत, साखळीला ओढ देत चौथऱ्याकडे ताणत राहिली. तिला साखळीने धरणाऱ्या त्या माणसाने मोठ्या मुश्कीलीने ओढत तिला तिच्या पिंजरेवजा खोलीकडे नेत तिथला दरवाजा उघडला. तर त्याच दरम्यान संधी साधत साखळीसकट ती त्या माणसाच्या हातातून निसटली आणि थेट चौथऱ्यामागे बेचक्यात शिरली. ती तिथे जोरजोराने भुंकू लागली. तेव्हा घाबरून आणि वेगळे काहीही न सुचून उल्फी आपल्या पोरासकट तिथे उभी राहिली.

'एऽऽ कौन है बे? तरी मी म्हनत होतो-' 'कोण बाई ह्ये आचानिक?' 'इधर आ, इधर आ-' रहमान चाचा उल्फीला म्हणाला.

'जा, स्वीटीको लाव इधर. वो औरत डर गयी है.', त्याने कुत्रीला घेऊन येणाऱ्याला हुकूम सोडला. उल्फी थरथरत त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली. हात जोडत. जालन तिला लगटून उभा होता.

'आचानिक कुठून आली बाय तू?' राणुबाई.

'यहां क्या कर रही है? कब आई है?' 'गरीब औरत. आसरेकू आयी,' उल्फी थरथरत हात जोडत म्हणाली.

'कब आयी तू? अंदर कैसे आयी? अरे, जा जरा वाचमनको बुलाव.' रहमानचाचाला एकाच वेळी अनेकांशी बोलण्याची नेहमीची सवय असावी.

'कब आयी तू?' 'अब्बीच. आत्ताच आयी.' 'क्या करनेको आयी?' 'आसरा मांगनेको आयी.'

'कायका आसरा? अंदर कहांसे घूस गयी?'

'अरे चाचा जरा उसकू बोलणेकु देव. कौन हय, कहांसे आयी, क्यूं आयी? बहुत डरी हुयी लगतीय बिचारी,' राणुबाई.

'ठीक है. तू पूछ. पूछ ले,' रहमानचाचा म्हणाला.

'बाई कोण गावची तू? इथं कशापाई आली? आतमंदी कशी काय आली? हे इंग्रेज सायबाचं घर हाये. आतमंदी येन्याची परवानकी नस्तीय.'

'लय लांबच्या गावाची हाय मी. मपल्या नवऱ्याला मारलं त्या लोकांनी. आमच्या जीवाला लय खतरा हाये. जीव घेऊन पळाली आन आली. मला ठिवून घ्या. मी तुम्ही सांगशान ते काम करीन. मी भायेर गेले तर मपल्या जीवाला खतरा. ह्या मपल्या लेकराच्या जीवाला पन-' उल्फी हे बोलत असताना वाचमन धावत आला.

'क्यूं बे, सोता है क्या गेटपर? ये औरत अंदर कैसे आयी? अब साहब छोडेगा क्या तेरेको? ऐसेही कोई बंदूक लेके आया होता तो-'।

'ये बाई! पयली भायेर चल. निघ लगीच. सायब यायचा टायम झाला. चल-', म्हणत वाचमनने उल्फीचं बकोट धरलं आणि तो तिला ओढत निघाला. त्यांच्या पाठोपाठ बाकीचे. दहा पंधरा पावले अशीतशी ती वरात चालली असताना बाहेर गेटाशी साहेबाची गाडी आल्याचे वॉचमनने पाहिले अन् उल्फीला सोडून तो गेटाकडे धावला. जेमतेम वेळ साधत त्याने गेट उघडले आणि साहेबाला कडक सॅल्यूट ठोकला. घोडागाडी आत येऊन थांबली. कोचवानाने दरवाजा उघडला. साहेब खाली उतरून उभा राहिला तेव्हा डाव्या बाजूला उभ्या असलेल्या बंदूकधारी शिपायांनी कडक सलामी दिली. उजवीकडे नोकरांचा घोळका पांगण्याच्या बेतात होता. फक्त या आगंतुक बाईचे आणि तिच्या पोराचे काय करायचे याविषयी थोडा दुविधेत होता. त्यासकटही घोळका पांगला आणि सगळे उजवीकडच्या सर्व्हंट्स क्वार्टर्सकडे निघाले. उल्फीही भेदरत त्यांच्यात चालत होती. साहेबाची नजर तीक्ष्ण. ससाण्याचीच.

'रह्यमान, क्या है? वॉट्स द मॅटर?'

'ए वूमन सर. वूमन केम अंदर. नो टेक पर्मिशन,' रहमान पुढे येत कुर्निसात करत म्हणाला.

'व्हाट वूमन? कौन है?' "धिस सर- तो घोळक्याकडे निर्देश करीत म्हणाला, एऽऽ बाई, इधर

आ.'

उल्फी पोरासकट आली. त्याच्या सकट साहेबासमोर बसकणच मारली तिने. मान खाली आणि हात जोडलेले. साहेबाने पाहिले. विटकी वस्त्रे. सुकलेला चेहरा. तरुण, लाल अंगकांतीची अन् रसरशीत शरीराची अत्यंत देखणी स्त्री.

'व्हेअर डिड शी कम फ्रॉम? व्हाट डझ शी वाँट? क्या मंगटा है?"

'अब्बीच देखा साब. जस्ट नाऊ कम. पूछताछ कर रहा था मै. शी कम और यू कम सर.'

'क्या मंगटा? व्हाट डझ शी वाँट?'

'आसरा चाहिये मंगता,' उल्फीने धीर करून स्वतःच सांगितले. तेवढ्यापुरते तिने क्षणभर डोळे वर करून पाहिले अन् पुन्हा मान झुकवली. त्या नजरानजरीने साहेब मुग्ध

आणि स्तब्ध झाला. ते त्याने कोणालाही दिसू दिले नाही. स्वतःला दिसले तेही त्याने दूर फेकले. पण ते असे फेकले जाते थोडेच?

'आशरा? व्हाट्स टॅट? रह्यमान- व्हाट्स आशरा?'

त्यातल्या त्यात जुजबी इंग्रजी येणारा रहमान एकटाच होता. यस आणि नो पल्याड काही इंग्रजी शब्द, त्यांच्या अर्थासकट त्याला माहीत झालेले होते. आसरा मागते म्हणजे काय मागते? काय सांगायचे? बोलले तर पाहिजेच.

'आसरा सर. वर्क मांगता सर.'

'आच्छा. ब्रिग हर टू सी मी टुमारो मॉर्निंग. अँड कीप हर विथ द लॉड्रेस- रानोबाय-डू यू अंडरस्टॅड?

'यस सर. अंडरस्टॅड. समझ गया.' 'रानुबायके साथ. वुईथ रानुबाय.' 'जी सर.'

'और कल सुबहको आना. विथ हर.' 'हां साब.'

त्या रात्री उल्फीला तिच्या लेकरासकट राणुबायच्या घरात आसरा मिळाला. ज्या अन्नाचा घमघमाट तिने संध्याकाळी अनुभवला होता, ते अन्नही तिला खायला मिळाले. माहितीही पुष्कळ मिळाली. अंदाज आल्यावर आणि विश्वास पटल्यावर तिनेही आपली खरीखुरी कहाणी राणुबाईला सांगितली. तुझं नशिबच तुला इतक्या चांगल्या ठिकाणी घेऊन आलंय. तुला इथं काही ना काही काम मिळावं, यासाठी मी प्रयत्न करीन. सकाळी साह्यबाला भेटशील तेव्हा मला सांगितलंस, तेच त्याला सांग. इथं तुला कशाचीही भीती नाही; असं पुष्कळ राणुबाईने मायेने तिला सांगितलं. तिला समजलं की हा गोरा साहेब मोठा अंमलदार आहे. सगळे गोरे लोक अंमलदारच असतात. हा बंगला कंपनी सरकारच्या काळापासून गोऱ्या लोकांच्या मालकीचा आहे. आता कंपनी सरकार नाही. गोऱ्या लोकांची तिकडं त्यांच्या देशात एक राणी आहे. तिचंच आपल्याकडे राज्य आहे. हा साहेब नव्यानंच आलेला आहे. तो इथं येऊन फक्त सहा महिने झालेले आहेत. इथं नोकर-चाकर भरपूर आहेत. रहमान चाचा इथं सगळ्यात जुना. कैक साहेब लोक पाहिलेत त्याने. त्याला साहेबाची भाषा समजते. त्याचाच सगळ्या नोकरांवर दाब चालतो. तसा तो भोळ्या मनाचा आहे. पण बेशिस्त खपत नाही त्याला. लांडीलबाडी चालत नाही. साहेबापुढे त्याचाच शब्द चालतो. वर्षानुवर्षे तसंच चालू आहे. जाणारा साहेब येणाऱ्या साहेबाला सांगतो. तो खानसामा आहे. म्हणजे सैपाक करणारा. गोऱ्या लोकांना जसा सैपाक लागतो, तसा तो अगदी चवदार बनवून देतो. अन् आपल्या मोगल लोकांच्या खाण्याच्या चिजा सुद्धा हलकेच पेश करतो. ते लोक खूष असतात त्याच्यावर. अन् ह्या आताच्या साहेबाला अजून मेमसाहेब सुद्धा नाहीय. मेमसाहेब म्हणजे गोऱ्या लोकांची बायको. हा एकदम तरुण आहे ना! म्हणून त्याला अजून बायको नाहीय. या लोकांच्या मेमसाहिबा इकडे येऊन राहायला तितक्या खूष नसतात. तिकडं त्यांच्या मुलखात हवा थंड असते. आपला मुलुख गरम. गर्मी त्यांना सोसत नाही. अन् मच्छरसुद्धा फार असतात इथं. म्हणून हे साहेब लोक पुष्कळदा आपल्याकडच्या बायकांशीच घरोबा करतात. म्हणजे ते लग्न नाही करीत. त्यांना तशाच ठेवतात. आता, हे इतके भारी गोरे लोक ; त्यांनी इषारा करायचा अवकाश, की आपल्या बाया एका पायावर त्यांच्याशी राहायला तयार होतात. आणि का नाही होऊ त्यांनी? राजाच्या राणीसारखं जगायला कोणाला आवडत नाही? अन् उगी कोणालाही

नाही म्हणत ते. त्या लोकांना सुद्धा बाई पटायला पाहिजे ना! तुझ्यासारख्या रूपवान बाईसाठी कोण पागल होणार नाही? म्हणूनच म्हणते, तुझ्या नशिबानीच आणलंय इथं तुला.....

त्या रात्री उल्फीला खूप उशिरा झोपायला मिळालं. त्याविषयी तक्रार नव्हती तिची. एक तर चोवीस तासात ती कुठून कुठे आली होती अन् इथवर आल्यावर हे जे काही आहे ते जास्तीत जास्त माहीत करून घ्यायचं अन् एवढा मोठा माणूस आहे तर इथं आपल जमूनच जाईल. अन् इतके सगळे लोक जगताहेत त्याच्या आश्रयाने तर आपल्यासारखी एखादी बाई त्याला कशाने जड होईल? अन् आपण मिळेल ते काम आनंदाने करू, त्यात कुचराई नाही करणार, अशा कैक गोष्टी मनात. बाकी आपले रूपवान असणे अन् साहेबाने आपल्याला ठेऊन घेणे हे तिला अशक्य वाटले. ती प्रौढ आणि पाय जमिनीवर असलेली कोल्हाटीण होती. भलतीसलती स्वप्ने पाहण्याचा भोळसटपणा तिच्या ठायी नव्हता.

सकाळी अगदी लवकर रहमानचाचा आला. शेजारीच राहात होता. राणुबाईला आवाज दिला अन् आला. राणुबाईनेच जास्त करून त्याला उल्फीची कहाणी सांगितली. या पोरीला काही ना काही काम मिळवून देऊन ठेवून घेच, असा तिने आग्रह केला. त्याला शांतपणे हो हो करत त्याने उल्फीला साह्यबाच्या समोर कसं उभं राहायचं, आधी कुर्निसात कसा करायचा, जे सांगायचं ते थोडक्यात नेमकं कसं सांगायचं हे समजावून दिलं. तालीमच घेतली तिची. स्वच्छ अंघोळ करून नीटनेटकं तयार राहायला सांगितलं. तो बाहेर निघाला तेव्हा राणुबाईने तेच टुमणं लावलं, तेव्हा एका वाक्यात चाचा म्हणाला, 'साहबने पहलेही खुदका मन बना लिया है. तू फिकर मत कर.'

रहमानचाचा अनुभवी माणूस होता. आयुष्यातले इतके उन्हाळे-पावसाळे काही आंधळेपणाने नव्हते पाहिलेले त्याने. त्याची उमर साठीला झुकली होती. आसरा चाहिये मंगता. असे काल संध्याकाळी डोळे वर करून उल्फी म्हणाली तेव्हा साहेब क्षणभर स्तब्ध झाल्याचे रहमानचाचाच्या अनुभवी नजरेने अचूक टिपले होते. हे सगळे कुठे जाऊ शकते याचा अचूक अंदाज त्याला तेव्हाच आलेला होता. आणखी पुष्कळ गोरे साहेब त्याने पाहिलेले होते. त्यात हा तर अगदी तरणाबांड; बच्चाच होता. वीस बावीसच्या पुढे त्याची उमर नसेल. ही इतकी अप्रतिम देखणी बाई पाहिल्यावर साहेबाचं मन पाकळलंय, हे त्याने ओळखलं. मुळात रहमान स्वतःच तिला पहिल्यांदा पाहिल्यावर चकित झाला होता. तिची दीनवाणी अवस्था, तिची विटकी वस्त्रे या सगळ्यांसकट तिचं देखणेपण लपण्याजोगं नव्हतं. खास हिंदुस्तानी गोरा वर्ण- तेच खरं निष्कलंक गोरेपण. अंग्रेज बाया गोऱ्या असतात.जास्त गोऱ्या असतात. पण त्यांचं गोरेपण उकडलेल्या बटाट्यासारखं. त्यात हे निखळ नितळपण नसतं, असं चाचाचं खासगी मत. शिवाय तिची सुदृढ घडीव चिरेबंद अंगकाठी, हालचालींमधला नैसर्गिक डौल; हे सगळं अद्भूतच होतं. आज सकाळी राणुबाईकडून तिची कहाणी ऐकताना त्याला आणखी काही रहस्ये उलगडली. उदाहरणार्थ, ती कोल्हाटीण आहे, म्हणजे सुडौल, सुंदर असणारच. कसरत करणे हा या लोकांचा धंदाच असतो. मोठमोठे शेठ, नबाब, जागीरदार अशा बायांना ठेऊन घेतात. अन् ही कोल्हाटीण आहे म्हणजे साहेबाची रखेल व्हायला तिच्या मनाची काही अडचणही नाही येणार. बाकी तिची सुरक्षा वगैरे; त्यात काहीही अडचण नव्हती. अंग्रेज साहेबाच्या

किल्ल्यात सारेच सुरक्षित. या बाईचे नशीब फळफळणार.

सकाळी साडेआठ वाजता सुस्नात, चापून चोपून लुगडे नेसलेल्या उल्फीला रहमानचाचाने पाहिले, तेव्हा त्याला खात्रीच झाली की आपल्याला वाटते तसेच होणार. त्यात काहीही बदल होऊ शकत नाही.

'बच्चेको यही रहने दो, राणुबायके पास. तू अकेली चल,' तो निघताना तिला म्हणाला.

रहमानचाचा याचा अंदाज तंतोतंत खरा ठरला. पुढचे खरे तर त्या अंदाजापल्याड गेले. साहेबाने माहिती घेतली. साल्पी गावात रॉबिनहूडच्या प्रकारचा एक माणूस मेला होता. त्याची कुठलीही तक्रार सरकार दरबारी आलेली नव्हती. बाई त्याला आवडत गेली. ती त्याच्यापेक्षा चारसहा वर्षांनी मोठीच होती. समझदार होती. रखेल म्हणून उत्तम होती. हळूहळू तो तिच्या प्रेमात पडत गेला. काही वर्षांनी त्याने ठरवून तिच्याशी लग्न केले. पुढे त्याने इंग्लंडात जालनच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली. निवृत्त झाल्यावर तो उल्फीला सोबत इंग्लंडास घेऊन गेला. त्याच्यापासून तिला मूलबाळ झाले नाही. त्याने जालन यासच आपला पुत्र मानले. उल्फी ही केवळ साल्पी गावातूनच नाही तर हिंदुस्तान देशातूनच गायब झाली. तिचा ओळखीच्या अशा- तिला तिच्या पूर्वेतिहासाचे भान देणाऱ्या- कोणाशीही पुढे कधीही संबंध आला नाही. नाही म्हणायला, ती मुंबईत आलेली असताना तिची एकदा शंभुराव याचेशी भेट झाली होती. त्यावेळी तिने त्याच्यासोबत एक फोटोही काढून घेतला होता. पण शंभुराव सुद्धा तिच्या पूर्वेतिहासाचा भाग थोडाच होता? म्हणायचे तर तो तिच्या नात्यातला होता आणि नव्हताही. अपवाद म्हणून, ही एक घटना सोडता, ती तिच्या पूर्वायुष्यातून कायमची सुटी झाली होती, असेच म्हटले पाहिजे. साहेबाचे नाव अँथनी ब्लॅकस्मिथ. उल्फी या नावाचा अर्थ- म्हणजे लांडगी नव्हे. उल्फत हा उर्दू शब्द आहे. उल्फत म्हणजे स्नेह. उल्फी म्हणजे स्नेहल. स्नेहा. अशी, इतकी माहितीही त्याने मिळवली होती. तिच्या नावाच्या वाच्यार्थाने कदाचित ती प्रेमिका नसेल सुद्धा, पण त्याच्यासाठी, गॉडेस ऑफ लव्ह. उरलेले आयुष्यभर तो तिच्या स्नेहल ओलीच्या पाशातच राहिला.

8

पिराजीचा घोडा परत आला खरा; पण आल्यावर तो बावचळल्यासारखा पठारावर जाऊन उभा राहिला. खाणे नाही, पिणे नाही. एखाद्या ध्यानस्थ ऋषीसारखा किंवा एखाद्या हटयोगी जोग्यासारखा फक्त उभा. त्याचा मालक नव्हता. त्याची वस्ती नव्हती. फक्त काही एक ओळखीचा वास. जयाजीसकट आणि सातपाटलांच्या घरातील पोरासोरांसकट, सर्वांनी त्याला खाऊपिऊ घालायचा प्रयत्न केला. त्याने कोणालाही दाद दिली नाही. घोडा अबलख होता. पिराजीचा घोडा म्हणजे वेगळे सांगायला नको. गेल्या

काही दिवसांच्या उपासाने तो हडकलेला होता. पण जनावर जातवान होते, यात शंकाच नव्हती. असे इतके जातवान जनावर डोळ्यांसमोर असे हटवादीपणे मरून जाणे कोणालाही देखवण्यासारखे नव्हते. प्रत्येकाचे मनातले हेतू फार तर वेगवेगळे असतील, पण तो घोडा जगावा असेच त्यांना वाटत होते. अशातच एकदा ज्वारीची काढणी चालली असताना सालगडी विठोबाला म्हणाले, 'एऽऽ मुक्याऽऽ पक तरी. तुपलं आयकन ते घोडमं एखांद्या टायमाला. नायीतरी तुपला लय भावपना व्हता त्या लोकासंगती.'

विठोबा त्याच्याजवळ गेला अन् नुसताच उभा राहिला. मग हलकेच त्याने त्याच्या आयाळीवर थोपटले. तिथून त्याचा हात घोड्याच्या पाठीला चोळत, थोपटत तो त्याच्या चेहऱ्याकडे आला. तो त्याचा चेहरा आपल्या हाताच्या तळव्याने कुरवाळू लागला. यातच एका क्षणी घोड्याचे डोळे भरून आले. ते वाहू लागले. विठोबा आणखी पुढे सरकला आणि त्याच्या गळ्यात गळा घालून रडू लागला. ते असाधारण दृष्य पाहून पाथीवरचे सालगडी सुद्धा रडू लागले. विठोबाच्या थोपटण्याने घोड्याचे दुःख मोकळे होऊन त्याच्या डोळ्यांमधल्या अणूंमधून वाहू लागल्याचे त्यांनी याची देही याची डोळा पाहिले होते. चक्षुर्वैसत्यम्.

घोडा खाऊपिऊ लागला. दुःख गिळून अधिक प्रगल्भ झाला. तेव्हा प्रश्न आला की आता तो कोणाच्या मालकीचा? म्हणजे विठोबा किंवा बाकी सालगडी त्याचे मालक होऊ शकत नव्हते. तो तर सातपाटलांच्याच मालकीचा होता ना! प्रश्न हा होता की तो आता कोणाचा होणार? कोणाला हवा आहे? त्याच्यावर पहिला अधिकार साहजिकच जयाजीचा होता. सगळ्यात थोरला सातपाटील. पण तो म्हणाला, "मला तो नको.' त्याला तो नको होता, कारण तो त्याला अतोनात बुकलून काढलेल्या पिराजीचा होता. तो त्याला नको होता, कारण त्याला विठोबाने माणसात आणले होते. विठोबा हा असा एकच माणूस होता की ज्याने जयाजीला पिराजीचा मार खाऊन लोळागोळा झालेले पाहिलेले होते. तो त्याला पठारावरून खाली मैदानातल्या सातपाटलांच्या वस्तीत घेऊन आलेला होता. आपले न्यून आणि आपले दैन्य ज्याने पाहिलेले आहे असा तो माणूस ; त्याचे काहीही त्याला नको होते. तो घोडा नको आणि तो विठोबाही नको, अशी त्याची भावना होती. बाकी भावंडांना सुद्धा तो घोडा तितका नको होता. रखमाजी काय हवे आणि नको, याच्या खूप पल्याड गेलेला होता. म्हणून पिराजीचा घोडा फक्त विठोबाच्या सोबतीने राहात होता. अशातच एके दिवशी समुंदरा वारली. तिचे वय झाले होते. ती वारली. झाडाचे पिकलेले पान गळून पडावे, तशी ती देवाघरी गेली. त्याने कोणाचेही काहीही बिघडले नाही. अनेक दुःखे आणि गुपिते स्वतःच्या आत कुरुपासारखी ठेऊन जगत ती मेली. आपल्या सासऱ्याने आपल्या भावाला का मारले, हे तिला माहीत होते. त्या घटनेनंतर ती कधीही माहेरी गेली नाही. तिने त्या लोकांशी संपर्कच ठेवला नाही. तिच्या मयतीला तिचा भाऊ आला होता, असे काही लोक म्हणाले. पण ते बघायला ती जिवंत नव्हती. ती मेली आणि पिराजीच्या मरणाने आधीच एकाकी झालेला रखमाजी अधिक एकाकी झाला. त्याचा शेतीभातीतला रस सुद्धा आटला.

परिणामी आपल्या बापाने सगळ्या मालमत्तेची वाटणी करून द्यावी, असा ठेका जयाजीने लावला. बाकी धाकट्या भावांनाही तेच हवे होते. ही जनरीत आहे, वेळीच ते

केलेले चांगले. त्याने भावाभावातले संबंध ठीक राहतात; असे सगळयांचे मत होते.

शंभुराव तेव्हा सतरा वर्षे वयाचा होता. म्हणजे त्या काळाच्या हिशेबाने लग्नाचे वय उलटून गेलेलाच होता. जयाजीने दुबळया झालेल्या रखमाजीसमोर वाटणीचा प्रस्ताव मांडला, तेव्हा त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. पण पुन्हा पुन्हा तो येत राहिल्यावर तो जयाजीस म्हणाला, "भडिच्याहो, वाटून मागताना जरा तरी लाज बाळगा. आपला सगळयात धाकटा भाऊ अजून बिनलग्नाचा आहे, हे तरी लक्षात घ्या.'

शंभुराव हा सातपाटलांमधला औपचारिक शिक्षण घेतलेला पहिला पुरुष. अर्थात असेही नव्हते. जयाजी वगळता बाकी धाकटे भाऊ असेच पहिली दुसरीपर्यंत शाळेत गेलेले होते. त्यापुढे त्यांची मजल गेलेली नव्हती. पण शंभुराव हा व्हर्नाक्युलर फायनल पर्यंत पोहोचलेला त्या कुळीतला पहिला पुरुष. सरळच की बाकी भावांशी तुलना करता तो फारच उच्च शिक्षित होता. त्याचे लग्न लांबण्याचे तेही एक कारण होते. काळ साधारणतः १८८० चा. थोडा नेट लावून पुन्हा परीक्षेस बसून तो ती पास करता तर शंभुराव त्या भांडवलावर शाळामास्तर सहज होऊ शकला असता. कारण त्यानंतर अगदी ऐंशी वर्षानंतर १९६० साली त्याचा नातू देवनाथ वय वर्षे दहाचा असताना सुद्धा तसा रिवाज चालू होता. पण शंभुरावला ना त्याची गरज होती ना इच्छा. त्याचे शिक्षण तिथेच थांबले. सातवी नापास. एके दिवशी दीपाबाई त्याला म्हणाली, 'शंभुराया, माझ्या चुलत भावाची लेक लग्नाची आहे. नाव तेजबाई. तुम्हाला साजेशी आहे. माझ्या माहेरीचे नाक असल्यासारखी सुंदर आहे.' शंभूराव म्हणाला, 'मी त्यात काय सांगणार? तू जयाजीदादाशी बोल. ते बाबाला सांगतील. तुम्हा सगळयांच्या शब्दाबाहेर मी थोडाच आहे?'

ती म्हणाली, 'वाटण्या तुमच्या लग्नासाठी थांबलेल्या आहेत. नंतर लगेच त्या होतील. तेव्हा तुम्ही विठोबाला तुमच्यात घ्या.' म्हणाला, 'मी तुझ्या शब्दाबाहेर नाही.'

दीपाबाई फार समझदार स्त्री होती. आपल्या नवऱ्याला विठोबा नको आहे, हे तिने ताडले होते. अन् तिला तर त्याची व्यवस्था लावायची होती. वाटण्या झाल्यावर शंभुराव त्याला सांभाळू शकेल याची तिला खात्री वाटत होती. तिला जे करायचे होते ते तिने हलकेच, हळुवारपणे, कुठेही समोर न येता केले. तेजबाई गाढवे-देशमुख ही तिची भाची लग्न होऊन सातपाटलांच्या घरात आली. विठोबा अलगद शंभुराव याच्या वाटणीला गेला. विठोबाला ते कोणीही न सांगता कळले. त्याने पिराजीच्या घोड्याला सांगितले, आता हा शंभुराव आपला मालक. आपण यापुढे त्याच्या सेवेत आहोत. माझ्यासारखेच आता तूही त्याच्या आज्ञेत राहायचे आहे. तुझी सारी काळजी मीच घेणार आहे. पण आता हा आपला मालक असणार आहे. त्यानंतर घोडा शंभूराव याच्यापुढे नम्र झाला. जयाजीने पाच वाटण्या केल्या. त्या उचलण्यावरून बाको भावात बरीच तणातणी झाली. कोणी आधी उचलायची याची रीत ठरेना. शंभुराव म्हणाला, 'ते तुमचे तुम्ही ठरवा. तुम्हाला लेकरे-बाळे आहेत. माझे सगळे नव्याने सुरू व्हायचे आहे. तुमच्या वाटण्या उचलून झाल्या की शेवटी उरलेली माझी. फक्त रखमाजीबाबा माझ्याकडे राहील. विठोबा मला हवा आहे. आणि आपल्या घरातली विठोबा-रखुमाईची पितळी मूर्ती मला पाहिजे.' त्याच्या या तीनही अटी सगळयांसाठी इतक्या मूर्ख, सामान्य आणि सोयीच्या होत्या की सगळयांनी आनंदाने त्यास संमती दिली. शिकला तितका हुकला, अशी म्हण शेतकरी लोकांमध्ये

नुकतीच प्रचलित होऊ लागली होती. त्याचे प्रत्यंतर बाकी भावांना आले, असे म्हणायचे; बाकी काय?

तेजबाई ही फार सुकोमल आणि निरागस मुलगी होती. ती एखाद्या परीसारखी नाजूक होती. लग्नात शेलकाट पांघरून ती जेव्हा शंभुराव याच्या पाठी त्याच्या उपरण्याला बांधलेल्या गाठीत मर्यादेने चालत होती, तेव्हाच ती एखाद्या सुकोमल बाहुलीसारखी दिसत होती. तिला बघून, ही इतकी नाजूक पोर शेतातल्या कामाचा रगाडा कशी सहन करणार, असा प्रश्न अनेकांच्या मनात उभा राहिला होता. खेरीज सातपाटील हे रांगडे लोक. त्यांच्यात नांदणे ही अशी नाजूक बाहुली कशी निभावणार, असेही त्यांना वाटत होते. तेजबाई लग्न होऊन साल्पीत सातपाटलांच्या घरात आली आणि तिला आपला नवरा, सासरा यांना घेऊन स्वतंत्र संसार मांडावा लागला होता. एकत्र कुटुंबात ज्या अनेक गोष्टी सहज शिकायला मिळतात, त्यांना ती मुकली होती. सगळ्या मराठा कुटुंबात रीतीरिवाज स्थूलमानाने सारखे असले तरी कुटुंबागणिक अतिविशिष्ट गोष्टी असतातच. त्या नीट समजल्या की जगणे, वागणे सोपे होते. अर्थात दीपाबाई ही तिची आत्या; तिच्यावर घारीसारखी नजर ठेऊन होती, त्यामुळे पुष्कळच बरे झाले. शंभुराव याने पठाराच्या खाली माचाडावर आपल्यासाठी नवी वस्ती उभी केली. बाकी भावंडांनी रखमाजी याची आधी वस्ती होती; तिथेच आपापल्या वस्त्या उभारल्या. त्या तात्पुरत्याच होत्या. आणि नंतर जो तो आपल्या आपल्या सोयीने नव्या वस्त्या उभारणारच होता. गावठाणातला रखमाजीचा वाडा ओस पडला होता. बरेच नंतर शंभुराव सातपाटील तेजबाई हीस घेऊन तिथे राहायला जाणार होता. ती पुष्कळ नंतरची गोष्ट. पण शंभुराव याने लगेचच नवी, वेगळी, आपल्या भावांपासून दूर वस्ती उभारली, या वास्तवामुळे रखमाजी फारच खूष झाला. म्हणजे तसे तो बोलला काहीच नाही. पण त्याची खुषी शंभुरावापासून लपून राहिली नाही. तिचे कारण त्याला कळले नाही. आणि त्याची त्याला गरजही वाटली नाही. आधी पिराजी मेला आणि नंतर समिंदरा. त्यामुळे रखमाजी प्रपंचातून मुक्त झाला होता. त्याचे असे मुक्त होणे वेगळे होते. त्याने आधी शंभुराव याच्या नव्या वस्तीतून बाहेर पडणे थांबवले. त्याचे बोलणे हळूहळू कमी होऊ लागले. शंभुराव यास त्याचे खास काही वाटत नव्हते. वय झाले की हळूहळू आपल्याला कोणी विचारत नाही, या भावनेने माणसांच्या ज्या अनेक प्रतिक्रिया असतात, त्यातली सातपाटील लोकांची वृत्ती गप्प होण्याची असते, हे त्याला अंगभूतपणे समजलेले होते. तसा तो बापाला काही ना काही हरहमेश विचारतच असे. पण बापाला त्याची खास गरज वाटत नाही हे लक्षात आल्यावर हळूहळू त्यानेही ते थांबवले. मुख्य म्हणजे, रखमाजी आपल्या आपल्या नादात खूष आहे, हे त्याला दिसत होते. मग म्हातारपणी त्याला आणखी ताप द्या कशाला, असा त्याचा विचार. त्याने तीनचार नव्या म्हशी घेतल्या. विठोबासाठी. खेरीज घोड्याची निगा तो राखत होताच. त्याला शेतात काम करणे तितके रुचत नाही, हे लक्षात आल्याने त्याने तसे केले. शेतात काम करण्यासाठी सालगडी ठेवला. त्याचे नाव गोपाळा. गोपाळआबा पाटील. तो खोपडे-पाटलांच्या भावकीतला होता. गरीब, सज्जन आणि सालस. शंभुराव तेजबाईला म्हणाला, 'तू फक्त सैपाक करायचा आणि बाबाला सांभाळायचं.' ती म्हणाली, 'मला त्यांची भीती वाटतेय. ते काही बोलतच नाहीत.'

म्हणाला, 'त्याची काळजी नको करू. तो त्याच्या नादात खूष आहे आणि तो तसाच राहील, इतकं फक्त बघायचं.' रखमाजी उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळा अशा सगळ्या मोसमी काळात, कमरेला धोतर गुंडाळून उघडाबंब, जनावरांच्या गोठ्याच्या आश्रयाने बसलेला असे. त्याचे तसे बसणे आणि तिथे बसणे तेजबाई हीस तितके रुचत नव्हते. पण तिच्या नवऱ्याने तिला सांगितले होते ना, की बाबाला जिथे आणि जसे राहायचे, जगायचे असेल तसे असू द्यायचे. तिने आधी त्याला तलम कोपरी शिवून सादर करण्याचा प्रयत्न केला. गोठ्यात बसण्यासाठी अनेक गोधड्यांची गादी देण्याची कोशिश केली. त्याने त्या कशालाही जुमानले नाही. पण त्या पोरीच्या नाजूक आणि कोमल भावनांचे संक्रमण त्याच्यापर्यंत पोहोचले आणि कधी तरी तो गोड हसला. त्यानंतर तिला आपल्या नवऱ्याचे बोलणे आठवले आणि ती निर्धास्त झाली. म्हणूनच रखमाजी सुखाने आपल्या एकांतात तिथे जगू लागला. आणि विशेष म्हणजे एके दिवशी तो उठला आणि खांद्यावर कु-हाड टाकून बाहेर पडला. त्याला कोण काय बोलणार? तो त्याच्या मनाचा स्वामी. बाहेर उन्ह तळपत होते. तो भर उन्हात बाहेर पडला आणि पठारावर जाऊन त्याने केकताड म्हणा वा घायपात तोडण्यास सुरुवात केली. खरेदीच्या पठारावर ते मुबलक होते. तिथे त्याने तोडलेल्या घायपाताचा भला मोठा गंज घातला. दुसऱ्या दिवशी त्याने तिथून घायपात उचलत पठाराच्या उतरणीवरील एका पाण्याच्या उथळ डबक्यात ते आणून टाकणे सुरू केले. ते त्याच्या वयाचा विचार करता, त्याच्यासाठी अत्यंत कष्टाचे काम होते. मग काहीही न बोलता विठोबाने ते घायपात वाहण्याचे काम अंगावर घेतले. त्याला रखमाजीने आक्षेप घेतला नाही. त्यानंतर रोज घायपात तुटू लागले आणि वेगवेगळी डबकी शोधत विठोबा ते त्यात टाकू लागला. नंतर ते सगळे इतके झाले की सारे माचाड सडणाऱ्या घायापाताच्या वासाने वेढले गेले. हे सगळे चालू असताना जेव्हा सडणाऱ्या घायपाताचा वास रात्रीच्या गोड समयी पहिल्यांदा एकदा शंभुराव यास जाणवला, तेव्हा त्याने आपल्या पत्नीस विचारले की, 'हे काय आहे,' तेव्हा तिने सांगितले. त्यानंतर त्याने तिला काहीही विचारले नाही. रखमाजीचे ते सारे चालू असतानाचा वास त्यांच्या सवयीचा झाला. पुढे ते सडलेले घायपात बाहेर काढून वाळवणे, झोडपणे, तयार वाखाच्या गंड्या बांधून त्या वस्तीवर आणणे यात विठोबा सतत रखमाजी सोबत होता. रखमाजीला किमान श्रम व्हावेत यासाठी तो कायमच तत्पर होता. त्या शुभ्र वाखाच्या गंड्यांचा भला मोठा गंज वस्तीवर लागला. त्या नंतर त्या वाखाच्या दोऱ्या वळण्याचा सिलसिला रखमाजीने सुरू केला. तो त्याचा एकट्याचा उद्योग होता. कोणी कधीही पाहिले तरी त्यास गोठ्यात दोर वळणारा रखमाजी हरहमेश दिसत असे. नाडा, सौंदर असो वा आणखी अनेक प्रकारचे दोर असोत; शेतकऱ्याला ते हरहमेश लागतातच. आणि घरात ते पुरेसे होते. तरीही रखमाजी ते वळत होता. ते कशासाठी, कोणासाठी वळत होता, हे त्याला कोणीही विचारत नव्हते.

त्याला त्याचा बाप, भाऊ, त्याची आई, मेलेली बहीण; या सगळयांच्या आठवणी येत. किंबहुना आयुष्याच्या या टप्प्यावर तो मनाच्या अंतर्मनात आपल्या भूतकाळात वावरू लागला होता. आपण जे हुषारीने जगलो, नेमस्तपणे शेतीचा विस्तार केला, तो कशासाठी आणि कोणासाठी अन् आपण जे जगलो ते कोणासाठी आणि कशासाठी, असे आधी कधीही न पडलेले प्रश्न त्याला आता पडू लागले होते. त्याला आता कोणाही विषयी काहीही ममत्व

उरले नव्हते. अगदी त्याच्या मुलांपासूनही तो मनाने तुटला होता. तो मौनात गेला होता. शंभुराव केवळ सगळ्यात लहान ; त्याचा प्रपंच नुकताच सुरू झालेला, म्हणून त्याच्याविषयी त्यास थोडे ममत्व वाटत होते. पण तेही त्याला आपल्या मूर्ख स्वार्थभावाचे एक कोवळे रूपच फक्त वाटत होते. त्याच्या वर्तमानात त्याचा भूतकाळ नांदत होता. आणि तिथले त्याचे जगणे आता त्याला निरर्थक वाटू लागले होते. त्याला आपल्या स्वार्थी जगण्याची लाज वाटू लागली होती. आपण ज्या कोणासाठी हे सारे केले, ती आपली मुलेबाळे ; ते आपले कोण लागतात, असे चमत्कारिक प्रश्न त्याला पडू लागले होते. मुख्य म्हणजे त्याचा भाऊ; पिराजी, हा ज्या निःस्वार्थ उमदेपणाने वागला आणि जगला, त्याचे त्याला काहीही कळेनासे झाले होते. पिराजीने जे काही मिळवले ते त्याने सारे आपल्या जवळ आणून दिले. त्याने स्वतःसाठी असे काहीच केले नाही. असे कसे काय असू शकते, हे त्याला कळेनासे झाले होते. त्याच्या वर्तमानात त्याचा भूतकाळ होता आणि तो सारा विस्कटलेला होता. घायपात सडवून, झोडून, त्याचे वाख पिंजून त्याने तो सारा भूतकाळ शुभ्र करायचा आणि बघायचा कदाचित प्रयत्न केला होता. आणि दोर वळताना कदाचित तो ते सारे एका आळयात बांधायचा प्रयत्न करत होता. आपण जे काही करत आहोत, ते का करत आहोत, ते अर्थातच त्याला कळेनासे झाले होते. उघड्या मांडीवर आणि पोटरीवर दोर वळून वळून त्या साऱ्या ठिकाणी त्याला काळे घट्टे पडले होते. आणि त्याचा हा उद्योग अव्याहतपणे सुरू होता. गुरांच्या वाडग्यातील त्याच्या झोपायच्या जागी दोराचा डोंगर वाढत चालला होता.

१८९० साली जोतीराव फुले यांचे निधन झाले. त्यांनी केलेले शूद्रातिशुद्रांसाठीचे काम सर्वश्रुत आहे. महार-मांगांच्या मुलींसाठी पुण्यातील सदाशिवपेठेत भिडेवाडा येथे त्यांनी शाळा सुरू केली. तिथे शिकविण्यासाठी योग्य व्हावी म्हणून आपली पत्नी सावित्रीबाई हीस शिकविले. ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्याचा असूड, तृतीयरत्न असे मौलिक लेखन केले. त्यांच्या हयातीत पुण्यातील अभिजन वर्गाने त्यास महत्त्व दिले नाही. आणि त्यांचे विचार खेड्यातील जनसामान्यांपर्यंत नुसते पोहोचण्यासाठी सुद्धा नंतर बराच काळ जावा लागला. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतून पुढे आलेल्या ताराबाई शिंदे या मराठा स्त्रीने १८८२ साली स्त्रीपुरुष तुलना हा कसदार ग्रंथ लिहिला. साल्पी सारख्या महाराष्ट्रातल्या असंख्य गावात या कशाचाही सासूल सुद्धा नव्हता. एवढेच नाही तर साल्पी ज्या अहमदनगर जिल्ह्यात आहे, तेथील अनेक तालुक्यात मामलेदार म्हणून काम केलेल्या त्रिंबक नारायण आत्रे यांनी तिथे आलेले अनुभव आणि पाहिलेली स्थिती यांच्या आधारे लिहिलेला गावगाडा नामक मौलिक ग्रंथ पुढे १९१५ साली प्रसिद्ध केला. त्या काळात खेड्यातील कुणबी शेतकरी सगळ्या पातळयांवर ब्राह्मण भट, अलुतेदार-बलुतेदार यांच्यासकट भटके फिरस्ते यांच्याकडून ज्या प्रकारे नागविला जात होता, त्याचे अत्यंत भेदक आणि मनाला विव्हल करणारे चित्रण आहे. पाटील, कुलकर्णी, देशपांडे, देशमुख आणि काही मातब्बर कुणबी वगळता बाकी सगळयांस हे लोक बेसुमार चावे घेऊन घायाळ करीत असत. त्याच्या अनेक हकिगती आत्रे यांनी त्यांच्या ग्रंथात नमूद केलेल्या आहेत. कुणब्यांखेरीज या बाकी सगळयांना कदाचित वेगळा रस्ता कदाचित दिसत सुद्धा नसेल. वरवर कुणब्यांना बळीराजा म्हणत, आणि मनातून त्यांना फक्त भक्ष्य मानत बाकी

सगळे जगत होते. रानात शिकारी प्राणी जगण्यासाठी शिकार करताना गवतखाऊ प्राण्यांमधील दुबळ्या जीवांवर हल्ला करतात. कारण हल्ला करून मारण्यास तेच सुलभ असतात. तसेच हे काहीसे होते. अशा प्रकारच्या परिस्थितीची तार्किक अखेर असे हल्ले सहन करण्याची गवतखाऊंची क्षमता नाहीशी होऊन त्यांचा अस्त होण्यात होते. किंवा हल्लेखोरांची हल्ले करण्याची क्षमता दुबळी होऊन त्याची परिणती त्यांच्या विकल होण्यात होते. आपल्या नजीकच्या भूतकाळात दुसरी शक्यता प्रत्यक्षात येऊन कुणबी टिकला आणि बाकी कारू-नारू, भटके दुबळे होत गेले किंवा कुणबिकीच्या वहिवाटीचा भाग झाले. खेड्यातील सगळ्या स्तरांवरील आणि जातीधर्माच्या लोकांच्या दृष्टीने हा सगळा संक्रमणाचा काळ होता. होती त्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी त्रिंबक नारायण आत्रे यांनी काही मार्ग सुचविले होते. फिरस्त्यांना बंदी घालणे, अतिथी, पाखरे, जनावरे यांच्या संबंधाने कुणब्याच्या मनात जो अपायकारक भोळेपणा असतो, तो नाहीसा करणे, चाकरी तशी भाकरी असा हिशेब कारू-नारू यांच्यासाठी लावणे, कुणब्यांनी त्यांचा व्यवहार रोकडीचा आणि रोखीचा करणे, त्यांच्यात आणि खेड्यातील समस्त लोकात शिक्षणाचा प्रसार करणे, मुरलेल्या आणि नवशिक्या गुन्हेगार लोकांमध्ये शिक्षण रुजविणे, प्रसंगी त्यांना शिक्षा करणे, मुक्त गुन्हेगार जातींना योग्य मार्गांना लावणे, त्यांना त्यासाठी मदत करणे; असे काही उपाय आत्रे यांनी सुचविले होते. स्थळ काळ आणि स्थिती यांच्या दबावाखाली बरेच सारे याच दिशेने गेले. काही प्रयत्नपूर्वक आपल्या लोकांना करावे लागले, ज्यातले बरेच अजूनही चालू आहे. प्रश्न संपलेले नाहीयेत. याच काळात महाराष्ट्रात- विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात काही ठळक घटना घडल्या. मुंबई येथे दिनशॉ माणेकजी पेटीट या पारशी गृहस्थांनी १८५५ साली पहिली सूतगिरणी सुरू केली. त्यांनी १८७५ मध्ये बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशनची स्थापना केली. ते १८७९ ते १८९४ या काळात तिचे चेअरमन होते. त्यांनी मुंबई येथे पारशी पंचायतीची स्थापना केली. तिचे ते ४१ वर्षे ट्रस्टी होते. १८८४ ते १८९४ या काळात मुंबईतील सूतगिरण्यांची संख्या ४३ वरून ८२ वर गेली होती. महाराष्ट्राच्या देश आणि कोकण भागातील खेड्यांमधल्या सगळ्या जातीधर्माच्या लोकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी त्यातून निर्माण झाल्या. यातील कुणबी शेतकरी जातीतील लोकांनी गिरण्यात मजुरी करून कमावलेला पैसा शेतीत गुंतवून ती सुधारत नेली. नंतर शाहूमहाराजांच्या प्रेरणेतून बहुजनांमध्ये शिक्षण पेरले गेले. स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळ सुरू झाली आणि फोफावली. त्यामुळे खेड्यातील बऱ्याच लोकांचे जीवन झपाट्याने बदलत गेले. आणि एक अनुषंग म्हणून पारंपारिक शेतकरी जातीतून त्यांचे शोषण करणारे नवे शोषकही निर्माण झाले. अर्थात या सगळ्या बऱ्याच नंतरच्या गोष्टी.

एके संध्याकाळी रात्र गडद झाली असताना शंभुराव वस्तीवर आला असताना त्याला तिथे काहीशी चमत्कारिक शांतता जाणवली. रखमाजी त्याच्या जागेत बसलेला होता. पण तो नुसताच बसून होता. दोर वळत नव्हता. अन् घरात त्याची अस्तुरी तेजबाई घायाळ पाखरासारखी फडफडत होती. काय झालं, असं विचारता मोठ्या मुश्कीलीने थरथरत म्हणाली, 'आपली गाय न्हेली त्याहयनी.' 'त्याहयनी कोनी?'

तिला सांगता येईना. तिने पटकन तोंडावर पदर घेतला अन् आत मनात, शरीरात ती

स्फूंदू लागली.

शंभुराव बाहेर आला. वाडग्यात गुरांच्या शेजारला रखमाजी होता. बाहेर अंधारात खडकावर विठोबा आणि नवा सालगडी गोपाळा बसलेले त्याला दिसले. काय झालंय काय, असे शंभुराव याने दरडावून विचारता ते रडायला लागले.

'काय झालंय ते आधी सांगा. नंतर रडा.', शंभुराव जरबेने म्हणाला.

'कुंभारखांदीच्या वावरात टोळी आली आन जवारीचं उभं पिक खुडून घेऊन गेली.', गोपाळा म्हणाला.

'कंधी?' 'आत्ता. गडाद पडता.'

"आरे व्वा! टोळी आली आन पिक खुडून घेऊन गेली! आन तू काय

करीत होता? आजुबाजूला कोणीच नव्हतं काय?'

'आशा वख्ताला कोण रहातंय? मीय पण निघालोच व्हतो. त्याच्यात

आदिशा आला, म्हनून फिरलो माघं.' 'मंग?'

'गेलो पळत त ते कनसं खुडीत व्हते खपाखपा. म्हनलं, ये खरमाळ्याहो, ह्ये काय लावलंय? त म्हनले, कुढं काय? काळी माघाया आल्तो त इढं कोनीच नाय. त न्हेतो जरासिक पोटाला. तू बळीराजा. तुला बरकतच व्हईन. म्हनलं, चोरी करित्या आन बरकतीची बात करित्या भडिच्याहो-' "किती मान्सं व्हते?'

"पिकामंदी अंधारात काय समजातंय? आपुन इकडं हाकलावा त्यानला त ते तिकडं पळायचे आन माघले इकडं येऊन खुडायचे. मंग बोंब ठोकली म्या मोठ्यांनी का; याऽऽ रेऽऽ हे भामटे मपलं पिक खुडून राह्यले रेऽऽ त पळाले मंग.'

'कुढं?'

'ह्या आपल्या वस्तीच्या आंगानीच निघाले. ते मोहं आन मी माघं. पंधरा इस गडी साज आसन. त ते मलायबी हिंमत व्हईना का आसले

टकुरबंद गडी. फिरस्ती जात. हत्यारबंद आस्तीय. त्याच्यानी मीय पन जीवाला जपून 'बाऽऽ रं.' 'त ते पळत आले वाडग्याकं आन येकानी एक वासरूच उच्याल्लं कवळी घालून.'

'वासरू उच्याल्लं? आन बाबा नव्हता का तिथं?'

'बाबा कुढं गेलता काय जनू. इठुबा तिथंच व्हता. त्यायनी पाह्यल्या व त्यो पळाला त्यांच्या माघं.'

विठोबा एऽऽ ओयऽऽ करत रडत सांगू लागला. ते वासरू घेऊन पळाले. आन ती गाय पन गेली दावं तोडून त्यांच्या माघं.

'गाय?' 'तिचं लेकरू न्ह्यालं त्यांनी धरून. त्याच्यानी तीयबी-'

विठोबा मोठमोठ्याने रडत हातवारे करत एऽऽ य ओऽऽ य करू लागला.

'एऽऽ गप. थमान. गप तूऽऽ' शंभुराव ओरडला.

'इठुबा लागला त्यांच्या माघ पळायला. म्याच त्याला धरलं. म्हनलं, कारभारी येउंदे. ही आपल्या आटुक्यातली गोष्ट नायी.'

मोठाच तातडीचा प्रसंग उपस्थित झाला होता. कोणते तरी फिरस्ते लोक असतील. पण त्यांना सुद्धा कुठे असे उद्योग करायचे याची अटकळ असते. हे नेहमीचे नसतील. उपलाणी असतील.

"ह्ये पक गोपाळा- तू आसाच जा आन राधु महाराला घेऊन ये. मायती हाये ना त्याचं घर? मपलं नाव सांग आन तसाच पाठीशी घालून घेऊन ये.'

'त्यो आला का तसंच आपल्या थोरल्यांच्या तिथं जायाचं. तिथं राजाबा आन महादबा- मपले पुतने; त्यानला घेऊन यायचं. थोरल्याला सांगायचं नायी. सूक्षम बोल्हावलं यानला, म्हनून सांगायचं. जा, आंधी राधुला घेऊन ये.'

गोपाळा गेला. विठोबा रडे दाबत कण्हत बसून होता. प्रश्न कणसे खुडण्याचा किंवा गायीला गमावण्याचा तितका नव्हता. तो इभ्रतीचा अधिक होता. किंबहुना तो फक्त इभ्रतीचाच प्रश्न होता. अशा चोऱ्यामाऱ्या भिकार-पेंढारांकडून कायमच होता असतात. कारू-नारू सुद्धा काय काय सतत करत असतात. कुणब्याला वदळ बसवणारे सारेच. खेरीज भुरट्यांचा उपद्रव नाही असं नसतंच. गरीब कुणबी अशा वेळी कपाळाला हात लावून नशिबाला बोल लावत बसतात. पण आता ही डोळ्यांदेखत चोरी झाली होती अन् तीही सातपाटलांच्या शिवारात. पिराजी सातपाटील जिवंत असताना अशी हिंमत करण्याचं कोणी मनात सुद्धा आणत नसे. कधीही झालं नव्हतं तसं. दुसऱ्याच काहीतरी कारणासाठी पिराजीने बल्लूची एक टोळी अशी झोडपून काढली होती, अन् त्याची दहशत सगळ्या फिरस्त्यात इतकी पांगत गेली होती की, सातपाटलांना फिरस्त्यांचा उपद्रव अजिबातही नव्हता. कारू-नारू त्यांना मिळेल तितक्यात खूष असत. अर्थात रखमाजी सुद्धा कोणाला नाराज ठेवतच नसे मुळात. तरीही या घराची खोड काढायची नाही, असा रिवाज पडून गेलेला होता. आणि तो सर्वदूर होता.

अन् आता हे असं झालं होतं. पिराजी मरून दोनेक वर्षे लोटायच्या आत फिरस्त्यांनी इतकी हिंमत बांधली होती? की अडाणीपणे आले होते? भुरटे, उपलाणीच असतील. जाता जाता मारू डल्ला म्हणून दिसेल त्या शेतात घुसले आणि दिसलं तिथलं वासरू उचललं. अरे, बाबांनो, उचललं ते कोणाचं? सातपाटलाचं? या शंभुरावाचं? पिराजीच्या पुतण्याचं? काही माहितीच घेतली नाहीत? कुठं उतरलेले आहेत हे लोक? कोण आहेत?

'मांगगारोड्यांची टोळी हाये. शेजारच्या पिप्री गावात उतारल्याले हायेत. कालच्यालाच मी गेलो व्हतो तिकडं. आन गोपाळभाऊंनी सांगातलं का तिकडंच पळाले त ते त्यांचेच लोक आस्तेन.' राधु महाराने आल्यासरशी आपला होरा स्पष्ट शब्दात मांडला.

पिंप्री गाव साल्पीपासून तीन कोसांच्या अंतरावर. मध्ये भवानीआईचा पहाड फक्त. तिथं रस्ता जरा बिकट. पण अंतर फार नाही. इतक्या जवळच्या शिवारात राहून फिरस्त्यांनी हिंमत केली? इतक्या जवळ?

“लय हालकट जात. निकरट. जाऊन आपन धरले तरी म्हंतीन, चार कनसं खुडले निस्ते पोटासाटी त काय झालं यावढं? तुला काय कमी पडातं? तू बळीराजा-'

'आरे पन वासरू न्ह्यालं, गाय न्हेली-' गोपाळा म्हणाला.

'वासरू लगीच घसरून टाखतीन आन गायीची आशी दशा करतीन का वळखायलाबी यायची नायी.'

'गोपाळा, तू लगीच मपल्या पुतन्यांना घेऊन ये. आन त्यानला सांग, पाचपंचीस नवाट गडी संगती घेऊन या. आपुन लगीच जानार हाये तिकडं. आन समदे ते लाठ्याकाठ्या, तलवारी; आस्तीन ती हत्यारं घेऊन या म्हनावा,' शंभुरावाने हुकूम सोडला.

'शंभुकारभारी मी पन जाऊ का त्याच्या संगती?' राधुने विचारलं.

'नको. तू बस,' शंभुराव म्हणाला.

राधु शंभुरावापेक्षा वयाने आणि अनुभवानेही मोठा होता. हा साल्पी गावातला आणि पंचक्रोशीतला एकमेव महार जो सातवीची परीक्षा पास झालेला होता. त्या वर्षी तो एकटाच ती परीक्षा पास झाला होता. वगोच्या बाहेर दूर बसून त्याने आतल्या सगळयांना मागे टाकले होते. नंतर त्याला मास्तरकीची नोकरी सुद्धा लागली होती. पण महाराला कुठेही गावात राहू कोण देतो? त्यालाही त्याची तयारी होती. तो महारवाड्यात राहू लागला. पण महार मास्तर कडून शिकायचे कसे? त्याला शाळेत घ्यायचे कसे? कुठेच गावकरी तयार होईनात. अखेर मास्तरकी सोडून तो पुन्हा गावात आला आणि महारकी करू लागला होता. आरे बाबा आखीर महार ते महारच -हानार, असं लोक म्हणायचे, तरी मनातून त्यांना त्याच्याविषयी दबका असे.

राधु म्हणाला, "घाई करण्यात अर्थ नाही. कितीही घाई केली तरी वासरू आता वाचणार नाही. गायीला लगेच मारणार नाहीत, पण तिची शिंगं तासतील, शेपटी कापतील, तिचं रूप पालटतील. किंवा त्यांच्यातला एखादा तिला लांबच्या बाजारलाही घेऊन जाईल. चोरलेल्या वस्तूची ताबडतोबीने निर्गत लावण्यात फार माहीर असतात फिरस्ते. उरलेले दारू ढोसतील यथेच्छ आणि ताव मारतील वासराच्या सागुतीवर. आपण जरा उशीर करून गेलो अन् दारूच्या नशेत धुंद असताना किंवा निस्सूर झोपलेले असताना त्यांना धरणं अधिक सोयीचं. अचानक झडप घालावी लागेल. त्याच्या आधी किती माणसं तळावर आहेत, याचा अंदाज घ्यावा लागेल. या लोकांच्या बायका सुद्धा महाहलकट असतात.'

'पन सापडतीन ना?' 'सापडतीन.' 'मांगगारुडीच आस्तीन?'

'कोनी का असाना. फिरस्ती जात. त्यांनी आपल्याला ढका

लावण्याची हिंमत केली-'

"तेच तं!' बाकी गडी जमा होईस्तोवर राधुने शंभुरावाला हल्ल्याची सारी

योजनाच समजावून दिली. त्याच्या मते लाठ्या, काठ्या अन् तलवारींची तितकी गरज नव्हती. पण असुदेत हत्यारं. वेळकाळ सांगून येत नाही. आपल्याला जास्ती जरुरी आहे ती दोरखंडांची. कमसीकम पाचसात वार लांबीची वाखाची दणकट दोरखंडं लागतील. ती पण शेपन्नास. राधु स्वतः ती मांगवाड्यात जाऊन घेऊन येईल. मांगांची काही नवाट तगडी पोन्हं संगती घेऊन येईल. आवाज न करता निगुतीनं तळाजवळ जायचं. संधीची वाट बघत बसून राहायचं. जय्यत तय्यार. हत्यारं, वाखाचे दोर सगळे जिथल्या तिथे वाटून. तोवर राधु स्वतः तळाजवळ जाऊन, प्रसंगी अगदी निकट जाऊन, माणसांच्या संख्येचा अंदाज घेईल. त्यांच्या गप्पांमधून किंवा त्यांच्या नशेतल्या बरळण्यातून, त्यांनीच हे केलंय अथवा नाही, याची तो खात्री करून घेईल. हल्ला कधी करायचा याचा अंदाजही सांगेल. सगळं योजनेप्रमाणे झालं तर फारशी गडबड न होता, सगळे गडी अन् बाया; त्यांची जागीच गठडी वळता येईल.

तपशिलातला एक बारका बदल वगळता सगळे योजल्याप्रमाणे पार पडले. दोर मांगावाड्यात जाऊन आणावे लागले नाही. शंभुराव आणि राधु यांच्यातली चर्चा चालू

असताना ती ऐकण्याच्या टप्प्यात नसलेल्या रखमाजीने त्याला हाक मारली. तो तिथे येताच तो म्हणाला, “ये पोरा, ह्ये पक.' त्याने स्वतः वळलेल्या दोरांच्या ढिगाकडे संकेत केला. ते दोर उत्तम आणि भक्कम होते. राधुने दोर मांगवाड्यातून आणले नाही. पण तिथल्या काही नवाट पोरांना मात्र तो घेऊन आला. फिरस्त्यांच्या तळावर बाकी ठरल्याप्रमाणे सारी योजना पार पडली. वीसेक पुरुष, पंधरासोळा बाया अन् पोरंटोरं; अशा सगळ्यांची जागच्या जागी गठडी वळण्यात आली. अतोनात दारू पिऊन, भरपेट जेवून झोपलेले ते सगळे फिरस्ते पडल्या ठिकाणी अज्जात सापडले. कोन ह्ये, काय ह्ये, काय करित्या; अशा स्फुट अस्फुट प्रश्नांपल्याड व एखाददुसऱ्या ठिकाणी किरकोळ हातपाय झाडण्यापल्याड प्रतिकार झाला नाही. पण ते सगळे जागे झाले अन् हलकल्लोळ उडाला. त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी गलका सुरू केला. बायांनी फारच आततायी स्वर लावला, तेव्हा त्यांना काठ्यांनी ठोकून मऊ करण्यात आलं. गलका इतका जबर होता की आख्खं पिंप्री गाव जागं झालं. तरीही तिथे कोणी फिरकलं नव्हतं. एरवीही भटक्यांच्या पालांवर उत्तररात्रीपर्यंत गलका असतोच. अन् गावकऱ्यांच्या नजरेत ते हरामी जात. त्यामुळे त्यांच्याकडे फिरकायला गावकरी धजत नाहीत. पण हा गलका फार जोरकस होता. सारखा वाजत होता. त्यात

बायकांच्या विव्हळण्याचे जोरकस स्वर होते. त्यामुळे निव्वळ कुतूहल म्हणून आधी गावाचा जागल्या आला. कुतूहलाने बघायला. तोही अंतर ठेऊन उभा होता. राधु महाराने त्याच्याकडे जाऊन त्याला खबर दिली. गावच्या पाटलाला बोलावून आणायला सांगितलं. तोवर विठोबाने त्याची गाय शोधून काढली. त्याने त्याच्या पद्धतीने पुकारताच अंधारात हंबरत ती त्याच्याकडे आली..

'वासरू कुढंय?' शंभुरावाने टोळीच्या नायकाला विचारलं. 'वासरू? कोंचं वासरू पाटील? वासरू नायी.'

'नायी? शंभुरावाने नायकाच्या बरगडीवर काठीचा रट्टा दिला. त्यामुळे तो कळवळून विव्हळला. आणि त्याच्या शेजारी असलेल्या मैनेने बेंबीच्या देठापासून टाहो फोडला.

'चूऽऽ पऽऽ' म्हणत शंभुरावाने तिच्या थोबाडावर फटका दिला.

'भडिच्याहो, मपला गडी वावरात आस्तानी तुम्ही मपलं वावार खुडलं. तुम्ही मपल्या दावनीचं वासरू उच्याल्लं. ते मारून कापून खाल्लं. इथं तीन कोसांवर आणून कापलं, खालं- ही हिंमत तुमची? सोडीत नायी आता मी तुम्हाला. चला रे; सडकवा, पार पांगळे करून टाखा समद्यानला. जावूद्या खुरडत खुरडत. आन मेले तरी पर्वा नका करू. हाणा, सडकून काढा, कोणालाच सोडू नका.' पुन्हा हल्ला सुरू झाला. पुन्हा हलकल्लोळ माजला.

'चुकी झाली. लय चुकी झाली पटेल. जीव नका घेऊ बळीराजा.

लेकरांच्या चुका पदरात घ्या.' नाईक कळवळत बोंबलू लागला.

'मपल्या डोळ्यादेखता मपलं वासरू उचलून आनितो आन कापून खातो. वर चुक्या पदरात घ्या म्हनतो, भडिच्याऽऽ', शंभुरावाने पुन्हा फटका लगावला.

दरम्यान पिंप्री गावचा पाटील आला. सोबत दोन तीन टेंभेकरी, काही जागले, काही शहाणे-सवरते लोकं ; असे होते. काय झालं ते पाटलाने समजावून घेतलं. चौकशा केल्या. टोळीचा नाईक कबूल झाला. चुकी झाली, माफ करा म्हणत गयावया करू लागला.

तुमच्या आसऱ्याने राहिलोय, यांच्या पासून वाचवा, म्हणू लागला.

'आरे म्या आसरा धिला हीच मपली चुकी झाली. आता कोंच्या तोंडानी त्यानला काय म्हनू? तुमच्या बराबर आम्हाला बी ते ठोकीत नायीत हे आमचं नसीब.'

'लय चुकी झाली शंभु कारभारी. ही फिरस्ती जात. म्हनले, हातो चार रोज तुमच्या आसऱ्यानी. तव्हा म्हनलं, राहा. पण ते आशे करतीन-'

पाटील हात जोडून बोलत असताना राधुने त्याचं बोलणं तोडलं.

'आवो फिरस्ते आसानात का, पण तुमी पाटील- तुमी वळखाया पायजे ना; का काय माल-टाल आनून देत व्हते तुमाला? म्हनून धिला आसरा?' राधु आक्रमक झाला.

"हे पक राधु, आपली शिवंला शिव. तुला पन मायती हाये, त्यो आपला धंदा नायी. ही बारक्या गावाची चिमुटभर पाटीलकी; वाडवडलांकडून आली तशी तिची निभवनूक करितोय. आरे बाबा, पिराजी सातपाटलाच्या घरातल्या काडीला सुदिक हात लावला तर काय गत होईल याची मायती नायी का मला? ह्ये अडानचोट लोकं. मपली लय चुकी झाली.'

'पन आमची व्हयाची ती नुस्कानी झालीच ना!' राधु.

'तुमी काय म्हनशान ते आयकतो. तुमीच न्याव करा.' पाटील अजीजीने म्हणाला, 'तुम्ही सब्द टाखा शंभु कारभारी. आम्ही त्यो झेलला म्हनून समजा.'

काय शब्द टाकणार शंभुराव? फिरस्त्यांनी शेत खुडलं. वासरू कापून खाल्लं. पण हाणलंय आता त्यांना. जागच्या जागी जखडून पार हागस्तोवर हाणलंय. त्यांच्याकडून काय भरपाई घेणार? आगापिछा नसलेली भामटी फिरस्ती जात. ते काय देणार? अगदी समजा पैसेही दिले त्यांनी, तरी जीव घेतलेल्या वासराची भरपाई कुठून होणार?

'ते काय सब्द टाखित्या पाटील! म्हंतेन, साले हराम जात. यांच्याकं काय भरपाई माघात्या? हानलेत पुष्कळ ; आता द्या सोडून बात.' राधु म्हणाला.

"तू सांग राधु, तुपलं आयकू सातपाटलांना चलत आसन तं -

"आवो, वासरू मारून खालं त्यांनी. कुनब्याच्या जातीला मानसाचा जीव आन जित्राबाचा जीव; कायच फरोक नायी. पण म्हनून यांचा पन जीव घ्यावा, आसं पन मी मांघत नायी.'

'जे काय म्हनशीन ते. "हे पघा, ह्यो नाईक ; याच्या हाताखाली समदे. यान्हीच क्यालं ना त मी याला एक तडाखा देतो. याच्या गुडघ्याव काठीचा फटका देतो. एकच तडाखा. तुम्ही याचे दोर सोडा. मोकळा करा त्याला. त्यो उभा राहिला, का, मी तडाखा हाननार. त्याला त्यो हुकवायची सवलत हाये. हुकला त त्याचं नसीब.'

शंभुरावला वाटलं, यात काय खास? आधीच पुष्कळ तडाखे खाल्लेत नाईकाने. बांधलेला असताना पुष्कळ मार खाल्लाय त्याने. आता मोकळा झाल्यावर अन् पळण्याची संधी असताना काय खास होणार? मग त्याला वाटलं, असुदेत. नाहीतरी काय फरक पडतो? आपण अधिक काय भरपाई मागणार? प्रश्न इभ्रतीचा होता. तो सुटलाय. फिरस्त्यांना अद्दल घडलीय. ही बातमी फिरस्त्यांच्या कैक टोळयात फिरेल, पसरेल. खेरीज गावात अन् पंचक्रोशीतही बातमी जाईल. पुरेसं आहे.

'सातपाटलांना चलत आसन तं-' पाटलाने वाक्य अर्धवट सोडले. 'राधु म्हंतो तसं.'

शंभुराव संक्षिप्तपणे म्हणाला.

नाईकाला मोकळे करण्यात आले. इतका सडकून मार खाल्लेला अन् त्याच्या आधी दारूने लास झालेला नाईक हुषारीने उभा राहिला. राधुने काठी हातात घेतली अन् तो ती गरगर फिरवू लागला. कोणत्याही क्षणी फटका बसणार म्हणून नाईक सावध होता. त्याचे डोळे राधुच्या हातावर रोखलेले. बाकी जमाव स्तब्ध. पेटलेल्या पलित्यांचा उजेड. निमिषात एका निर्णायक घातक विद्युत क्षणी राधुचा हात खाली आला. नाईकाने चपळतेने उडी मारली. अगदी निसटता फटका त्याच्या गुडघ्याच्या जोडावर बसला. एक साधा फट् असा आवाज! राधुने काठी खाली टाकली. नाईक उभाच होता. मग त्याने पाऊल उचलले. अन् तो जागीच बसला. त्याचा गुडघा निखळला होता. पायातून निघालाच होता तो. जोडच तुटला होता. असे असते ना, की जमिनीत समजा सुरुंग ठासला व्यवस्थित, अन् बत्ती पेटवून बार उडाला तर, समजा भला मोठा आवाज झाला तर कामकरी म्हणतात, अऱ्याऽऽ या दट्ट्याच गेला रे! म्हणजे स्फोट तर झाला पण खडक जवळपास जसाच्या तसाच. याउलट समजा तिथे बद्द! असा आवाज झाला की कामकरी खूष. कारण त्यावेळी कैक रान, कैक खडक जमिनीत मोकळा झालेला असतो. राधुने वर्मी फटका दिला अन् साधा फट् असा आवाज झाला. गुडघा पायातून निखळला.

'जा, तुह्याय्ये तुह्ये! जिनगानीभर सातपाटलांची याद सोडत नायी तुला!' राधु म्हणाला.

दुसऱ्या दिवशी साहजिकच सगळीकडे बातमी झाली. शंभुराव सातपाटलाची करामत. त्याचा पराक्रम. खरे तर राधु महाराच्या अक्कल हुषारीने सारा डाव जमला होता. पण त्याला कोण श्रेय देणार? त्याने जे काही केले ते त्याचे काम. पण डोके तर शंभू कारभारी यांचेच ना! ते तसे नव्हते हे शंभुराव यास ठाऊक अन् राधुलाही. शंभुरावाने तसा उच्चार कधी केला नाही. राधुलाही तशी अपेक्षा नव्हती. सोबत असलेल्या लोकांनी पाहिले, ते तसे इतरांना सांगितले. श्रेय साहजिकच शंभुराव याचे. कैकांना पिराजीच्या आठवणी आल्या. विठोबा ती शिंगे तासलेली भुंडी गाय घेऊन मळयात गेला. ती भंडी गाय मरेपर्यंत शंभराव याच्या मळयात अन् विठोबाच्या मायेत जगणार होती. ती नंतर दोन अस्सल गो-हे जनणार होती. अन् त्यांना नाझर आणि गुजर अशी नावे मिळणार होती. अन् हे दोन्ही गो-हे म्हातारे होईस्तोवर शंभुरावाचे प्यारे होऊन जगणार होते. पण ते सारे पुष्कळ नंतर. शंभुराव कारभारी यांचा दबदबा सारीकडे बसण्याची ही ठळक सुरुवात.

9

दिवस जात राहिले. ते जात असतातच. त्यांच्यावर कोणाचा ताबा असतो? घडणारे सगळे त्यांच्या कह्यात राहून घडत असते. शंभुराव कारभारी गावातला सगळयात

महत्त्वाचा माणूस म्हणून नावाजत राहिला. गावात इतका शिकला-सवरलेला माणूस कुणबी शेतकरी लोकात दुसरा नव्हता. राधुजी वाघुले ; महार हा त्याच्यापेक्षा अधिक शिकलेला. पण त्याला गावकीत तितका मान कुठून मिळणार? गावकीच्या कामात शंभुराव कारभारी याची साथ देणे इतकेच त्याचे काम. तालुक्याची साहेब मंडळी गावात आली की आधी शंभुराव याच्या वाड्यावर जात आणि माहिती घेत. पाटीलकी खोपडे यांच्याच घराण्यात होती. पण तेच शंभुराव कारभारी यांचे अधीन तर बाकी काय गोष्टी? रामचंद्र पाटील-खोपडे हे पोलीस पाटील. ते कायदे-कानून यासाठी शंभुराव याजवर अवलंबून, त्याच्याशी दोस्ती ठेवून जगणारे. तेव्हा बाकी यंत्रणा तेच करणार. गावाचा सगळा कारभार; अलिखितपणे गावाची पाटीलकीच शंभुराव याचेकडे एकवटली होती. पण म्हणून ती कायद्यानेच बळकावून घ्यावी असे शंभुराव यास कधीही वाटले नाही. याचे कारण तो आणि रामचंद्र पाटील-खोपडे यांच्यातील निर्विष दोस्ती. ती का आणि कशी होत गेली हे त्या दोघांसही नीट कळले नाही, तेव्हा बाकीच्यांचा काय प्रश्न?

शंभुराव याचे प्रापंचिक जीवन उत्तम चालले होते. पण तेजबाई हीस होणारी मुले जगत नव्हती. ती जन्मतः मृत असत किंवा जन्मून मरत किंवा काही दिवस जगून मरत. त्यांना चारपाच बाळे झाली अन् ती या ना त्या प्रकारे तशीच देवाघरी गेली. आधीच नाजूक असलेली तेजबाई या प्रकाराने कापरासारखी होऊन गेलेली होती. गावातील बामण शौचे-कुलकर्णी म्हणून एकजण होते. ते एके दिवशी आले आणि त्यांनी त्या दोघांच्या पत्रिका पाहून त्यांचा घनघोर अभ्यास केला. सुदैवाने दोघांचीही जन्मवेळ, जन्मस्थळ आणि जन्मतारीख उपलब्ध होती. अभ्यासांती ते म्हणाले, 'शंभुराव; आपण महिष योनी आहात. आणि आपल्या पत्नी व्याघ्र योनी आहेत. प्राण्यांमध्ये महिषापासून वाघीणीस कधी गर्भ राहात असतो का? आपल्या पत्नीस गर्भधारणा होते, हेच मुळात आश्चर्य. किंबहुना आपले स्वभाव जुळणे हेही आश्चर्य. तरीही ते होते ही शास्त्राची मर्यादा होय. स्पष्ट बोललो यासाठी क्षमा असावी. बाकी सारे ईश्वराच्या अधीन होय.' आता, यात कोण काय करणार? पत्रिका पाहून लग्ने जुळवणे हा प्रकार मराठा जातीत नव्हता. किंवा कदाचित ब्राह्मण जात वगळता अन्य कोणातही नव्हता. अशा भानगडींचा कोण विचार करतो? कुळीला कुळी आणि मनगटाला मनगट जुळले की झाले काम! शंभुरावची पोरे जगत नव्हती आणि त्याची अस्तुरी दिवसेंदिवस सुकत चालली होती, इतकेच वास्तव होते. बाकी अंगारे-धुपारे, देव-देवस्की अशा गोष्टी वारेमाप चालू होत्या. दीपाबाई ही आधी तेजबाई हिची आत्या आणि आता थोरली जाऊ. ती पुष्कळ गोष्टी करत होती. कशाचाच काहीही उपयोग होत नव्हता. 'कारभारी, आपली मुलं जगत नाहीत. तुम्ही आता दुसरं लगीन करा,' असे तेजबाई अधूनमधून म्हणे. त्याकडे शंभुराव दुर्लक्ष करत असे. बायकोविषयी त्याची काहीच तक्रार नव्हती. बाकी, पांडुरंगाची मर्जी असेल तर होईल आणि जगेल संतती. अन् ती होत नव्हती असेही नव्हते. ती जगत नव्हती, इतकाच मुद्दा होता. देवघरात देवांचे पुष्कळ टाक होते. वाडवडलांकडून मिळालेली विठोबा-रखुमाईची मूर्ती होती. तेजबाई नित्यनेमाने मनोभावे त्यांची पूजाअर्चा करत होती. शंभुरावही करत असे. आणखी काय करायचे? आपल्या हातात काय असते? अशी प्रांजळ धारणा.

या साऱ्यात रखमाजी सातपाटील त्याने स्वतःला गाडून घेतलेल्या जनावरांच्या

गोठ्यात एके दिवशी एकदाचा मरून गेला. एकदाचा अशासाठी की पिराजीच्या मरणानंतर तो क्षणोक्षणी मरतच होता. स्वतःसाठी काहीच न गोळा केलेल्या त्याच्या धाकट्या अफाट भावाचे जगणे त्याला स्वतःच्या स्वार्थी जगण्याच्या पार्श्वभूमीवर कायमच त्याच्या हृदयाच्या आत गुंतवत राहिले. त्या गुंत्यातून त्याला कधीही सुटता आले नाही. किंबहुना त्यात अधिकाधिक गुंततच तो मरत राहिला. आपण जे गोळा केले ते कोणासाठी आणि कशासाठी या प्रश्नांची तड त्याला कधीच लागली नाही. त्याच्या धाकट्या भावाच्या जगण्याचा झळाळ त्याला उत्तरोत्तर अधिकाधिक दिपवत राहिला. या गत्यातून सुटण्याच्या प्रयत्नात त्याने केकताडाच्या वाखाच्या दोरांचे डोंगर वळले. तेही फळास नाही आले. शंभुराव याच्या शेतावर फिरस्त्यांनी हल्ला केल्यावर तो त्याच्या संन्यस्त जिण्यातून तात्पुरता का होईना बाहेर आला. त्याने हुषारीने आपले दोर फिरस्त्यांना जखडण्यासाठी अचूक बहाल केले. जगण्याच्या गुंत्याचा अर्थ लावण्याचा त्याचा खासगी प्रयत्न तिथे विफल झाला. मुळात तो संन्यासात गेलाच नव्हता. आपण तसे गेलो आहोत असे त्याला वाटत होते. पैसा मिळवणे, जमीन व्यापणे ह्या कुणबिकीच्या गोष्टी त्याने असाधारण बैलपणे केलेल्या होत्या. पण त्या ज्यांच्यासाठी त्याने केल्या असे त्याला वाटत होते, त्या त्याच्या मुलांच्या मनात तो म्हातारा झाला तेव्हा निरुपयोगी अडगळ झाला असल्याचे त्याने अनुभवले होते. तो जितका म्हातारा होत गेला, तितका कडवट होत गेला. त्याचे तसे होणे, तो स्वतःच्या आत गिळत राहिला. त्या कडवटपणाला बांधण्यासाठी त्याने दोरांचे डोंगर वळले. त्यातला फोलपणा जाणवल्यावर तो थांबला. पण आतल्या आत तो धुमसत होता. या धुमसण्याची परिणती अखेर त्याच्या स्वतःशी बडबडण्यात झाली. आधी तो शंभुराव यास बोलावून त्याच्याशी बोलू लागला. त्याला काही सांगू लागला. पण तो जे बोलत होता, त्यातले काहीही शंभुराव याजपर्यंत पोहोचत नव्हते. आणि त्यात शंभुराव यास रस आहे, असेही दिसत नव्हते. मग त्याने तोही नाद सोडला. तो फक्त स्वतःशी बोलत राहिला. त्याचे ते बोलणे कोणासही समजत नव्हते. कोणालाही त्यात रस नव्हता. तो एका वेगळ्याच भाषेत बोलत होता. ती त्याच्याकडे कुठून आली, हे त्याच्यासकट कोणालाही, कधीही कळले नाही. झह पुश्तून यम्. नुम् मी रखमान् दएय. स्ता नुम् चह् दएय्? स्ता नुम् यार रखमान दएय्. त पुश्तून् येय. पह कोर् क्शेय् चोक श्तह् ? पह् दय् बाब क्शेय् स्तासूही घरझ नश्तह्. लल. राजम्. हे आणि असे त्याचे बोलणे. त्याचा कोणाला अर्थ लागणार? त्यासाठी कोण डोकेफोड करून घेणार? पण समजा तो म्हणत

होता की, मी पठाण आहे. माझे नाव रखमान आहे. तुझे नाव काय आहे? तुझे नाव यार रखमान आहे. तू पठाण आहेस. घरात कोणी आहे का? या बाबतीत तुझा काहीही संबंध नाहीय. जा. मी येतो. तर साऱ्यांनी त्याला वेड्यातच काढले असते. सगळाच मूर्खपणा. बुद्धी नाठी होणे. दुसरे काय? त्याचा घराशी आणि दुनियेशी संपर्क कधीचाच संपून गेलेला होता. त्याचे बडबडणेही हळूहळू त्याच्या मनाच्या आत आत घुसत गेले. शब्द संपून फक्त स्वर. नंतर तेही मंद झाले. एके दिवशी त्याच्यातील आंतरिक उर्जेचा पूर्ण लोप होऊन त्याने राजम् म्हणत प्राण सोडला तेव्हा ते ऐकायला त्याच्याजवळ कोणीही नव्हते.

रखमाजीच्या मयतीला त्याची सारी मुले, नातवंडे, गावातले आणि पंचक्रोशीतले इतर लोक ; असे खूप जमले होते. त्यातल्या कित्येकांनी खरे तर बहुतेकांनी- त्याला गेल्या कैक

वर्षात पाहिलेले देखील नव्हते. ते तसेच असते. जनरीत आहे, त्यात कोण काय करणार? सुतकाच्या त्या दिवसात त्याची मुले सुद्धा बऱ्याच दिवसांनी इतकी वारंवार एकमेकांना भेटली, इतका वेळ एकमेकांसोबत राहिली. जी गोष्ट पुरुषांची तीच बायकांचीही. त्या सगळ्या जावा, त्यांची मुले असा सातपाटलांचा सगळा जथा शंभुराव याचे वस्तीवर त्या दिवसात वारंवार एकत्र येत राहिला. मग दहाव्या आणि तेराव्या दिवसाच्या जेवणावळीचा खर्च कसा वाटून घ्यायचा अशी चर्चा निघाली. आधी अर्थातच, आपण सगळी त्याची मुले. आपण तो वाटून घेऊ, असा सूर होता. किती किती पैसे काढायचे आणि ते कोणाकडे द्यायचे असा विषय निघाला तेव्हा साहजिकच ते थोरल्याकडे द्यावेत असा प्रस्ताव आला. मग एक जण म्हणाला, शंभू सगळ्यात धाकटा असला तरी गावाचा कारभारी आहे. त्याच्याकडे द्या. आणखी एकजण म्हणाला, आधी काढायचेच कशाला पैसे? थोरल्याने खर्च करावा आणि किती झाला ते सांगावे आणि बाकीच्यांनी हिशेबाने ते त्याला द्यावेत. थोरल्याने हात झटकले. त्याला हा असा लांडा कारभार नको होता. तो म्हणाला, आपल्याच्यानी नाय निभायचं ते. पैसे आधी खर्च करायचे अन् नंतर ते मागायचे, त्यात कोणी नाही होऊन पडला तर आपण काय करणार? किवा तसा कारभार कोणालाच नको होता. मग म्हणाले, शभुरावाने खचे करावा. सगळ्यानी त्याला नतर द्यावेत. मग कोणीतरी म्हणाला, की आपण त्याला नंतर तरी का द्यावेत? शंभू बापाचा पुष्कळ पैसा आधीच दाबून बसलेला आहे. तो आपल्या सगळ्यात हुषार निघाला. ते आपल्या ध्यानात आलं नाही. तो बापालाच दाबून बसला. आता आपली काय तक्रार नाही. पण खर्च त्यानेच करावा. इथवर शंभुराव काहीही बोलला नव्हता. म्हणाला, मी सारे करतो. तुम्ही काहीही देऊ नका. त्यावर काही वेळ सारे गप्प झाले. तिथून निघताना ते एकमेकांशी कुजबुजत होते.

'आरे लगीच तय्यार झाला!' 'वाटलंच मला.' 'मी म्हणत होतो ना, का हा माल दाबून बसल्याला हाये.' "च्यायसका त्वा बरी तोड काहाडली!' "लय चत्रा हाये त्यो.' 'पण आपून कुढं कमी हाये?' 'लय कारभार करितो गावाचा, तेह्याय्ये तिह्ये!.....'

एकाच आईच्या पोटी जन्मलेले सगळे ; तरी मोठे झाले की ज्याचा त्याचा प्रपंच सुरू होतो. अंतर वाढत जाते. भाऊ भाऊ असले तरी, प्रसंगी एकमेकांच्या जीवावर उठायला देखील ते कमी करत नाहीत. ही जनरीतच आहे. खेरीज एकमेकांना धरून राहून कळप करण्याची वृत्ती सातपाटील मंडळीत जरा कमीच म्हणायची. त्यामानाने शंभुराव त्यातल्या त्यात अधिक उमदा म्हटला पाहिजे. वाटण्या होतानाच त्याने आपला म्हातारा बाप आपल्या सोबत राहील असे सांगितले होते. दहाव्याच्या जेवणासाठी खरेदी करायची म्हणून तो बैलगाडी घेऊन घोडनदी येथे गेला. सोबतीला गोपाळा होता. घोडनदी ही मोठी बाजारपेठ. साल्पीहून सहा कोसांच्या अंतरावर. तिथे योगायोगाने शंभुराव याची व्यंकूशेठ कालेवार आणि राजूशेठ वंजारी या दोघांशी एकत्र भेट झाली, ओळख झाली. हे दोघे एकमेकांचे मावसभाऊ मूळचे घोडनदी येथील असून मुंबई येथे इमारतींच्या बांधकामांचे मोठे कंत्राटदार म्हणून नावाजलेले होते.

व्यंकू बाळोजी कालेवार (१८२०-१८९८) यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील घोडनदी येथे झाला. वडील बाळोजी इस्ट इंडिया कंपनीच्या लष्करातील

सेवानिवृत्त शिपाई होते. वडील वारल्यावर लहान वयातच ते मुंबईस गेले. तिथे बिगारी, गवंडी, मेस्त्री अशी कामे क्रमाने करीत ते इमारतींच्या बांधकामांची कंत्राटे घेऊ लागले. बोरीबंदर स्थानकासमोरची मुंबई महापालिकेची इमारत त्यांनीच बांधली. मुंबई, पुणे, बडोदे येथे अनेक टोलेजंग इमारती बांधल्या. त्यांनी तेलगु भाषिकांसाठी

शाळा आणि वाचनालये सुरू केली. राजू बाबाजी वंजारी हे व्यंकू बाळोजी कालेवारांचे मावसभाऊ. जन्म घोडनदी येथेच. घरच्या गरिबीमुळे लहान वयात मुंबईस गेले. तिथे काही काळ छापखान्यात काम केले. नंतर बिगारी, गवंडी, मेस्त्री या क्रमाने कंत्राटदार बनले. त्यांनी मुंबई येथे अनेक कापडगिरण्या बांधल्या. 'टाईम्स ऑफ इंडियां ची इमारत त्यांनीच बांधली. ते लोकोपयोगी कामांना सढळ हस्ते मदत करीत असत. ते जवळजवळ शंभर वर्षे जगले.

त्या दोघांच्या तोंडून शंभुराव यास पुणे येथील जोतीराव फुले नामक माळी जातीतील माणसाविषयी बरीच माहिती मिळाली. सदर फुले हे चारपाच वर्षांआधी वारले. पण कुणबी जातींसाठी आणि महार-मांग जातीच्या लोकांसाठी त्यांनी खूप काम केले आहे, असे ते म्हणत होते. हा फुले नामक इसम इंग्रेजी विद्या जाणत होता. त्याने अनेक पुस्तके देखील लिहिली होती. सरकार दरबारी त्यास मान होता. पण ब्राह्मण लोक त्याचा द्वेष करीत असत. फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे हे दोघे भाऊ सदस्य होते. ओतूर येथील डुमरे-पाटील नावाच्या काही मराठे लोकांनी जोतीराव फुले यांनी सांगितलेल्या सत्यधर्मास अनुसरून ब्राह्मण न आणता लग्ने लावली. त्याच्या केसेस कोर्टात चालू आहेत. डुमरे पाटील हे जोतीराव याचे अनुयायी आहेत. चांगले लोक आहेत. तुमचे सोयरे सुद्धा असतील, अशा अनेक गोष्टी त्यांनी सांगितल्या. डुमरे-पाटील लोक गाढवे-देशमुख यांच्याकडून आपले सोयरे आहेत, हे शंभुराव यास माहीत होते. पण शंभुराव शिकलेला असला तरी असल्या गोष्टी त्याच्या आस्थेच्या आवाक्यात याच्या आधी आलेल्याच नव्हत्या. आणि यानंतर येतील असे त्यास सांगता आले नसते. शंभुराव याने मुंबईस यावे आणि एक खूपच वेगळी दुनिया बघावी, असे त्या दोघांनी आवर्जून सुचवले. मोठमोठाले पक्के रस्ते, भव्य इमारती, बागा, कापडगिरण्या, ट्रामगाड्या, हर त-हेच्या भाषा बोलणारी माणसे; असे ते खूप वेगळे जग आहे. आपला पाहुणा म्हणून त्याने यावे, आपल्याकडे राहावे असा त्यांनी आग्रह केला. हे इतके नावाजलेले लोक, जातीने कोमटी; फार साधे, जमिनीवर पाय घट्ट असलेले होते. शंभुराव यास त्या अपरिचित नवलाईच्या दुनियेविषयी कुतूहल जरूर वाटले. पण जोतीराव फुले नामक इसम याने जे काही केले, असे जे त्या दोघांनी सांगितले, ते त्याला विशेष काही वाटले नाही. त्याची जरुरी त्याच्या मनात ठसली नाही. वाडवडिलांचा रिवाज सोडून डुमरे-पाटील यांनी बामणाशिवाय लग्ने लावण्याचा लांडा कारभार का करावा, हे त्यास कळले नाही. जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी काही अंग्रेज लोक असत, ते त्याने पाहिलेले होते. ते राजे लोक आहेत, ही गोष्ट त्याने मनाने स्वीकारलेली होती. ज्याच्याजवळ बळ आणि विद्या आहे, तो राज्य करणार असे सरळ साधे आकलन त्याच्या मनात होते. पूर्वी मराठे लोक राजे होते, हे त्यास माहीत होते. नंतर बामणांचा काळ येऊन गेला. आता अंग्रेज. ज्याच्यात धमक आहे तो राज्य करतो. त्याच्याशी खेड्यातील आम लोकांचा किरकोळ संबंध येतो. तेवढा सांभाळला की बाकी

फरक नाही. अंग्रेज लोकांचे राज्य आल्याने ठग, पेंढारी अशा अनेक प्रकारच्या लुटारू लोकांचा खेड्यांना जो उपद्रव होत असे, तो थांबला, अशी त्याची माहिती होती. बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको. संसारामधी ऐस आपुला, उगाच भटकत फिरू नको, हा अनंत फंदी याचा फटका त्याने शाळेच्या पुस्तकात वाचलेला होता आणि त्यास तो योग्य वाटत होता. बामण लोक चलाख असतात हे त्यास पटले. पण तो त्यांचा जगण्याचा धंदा आहे, असे त्याचे मत होते. त्या त्या जाती आपल्या आपल्या जगण्याचा धंदा करतात, त्यात गैर ते काय असे त्याचे मत होते. तिथी, वार, नक्षत्र सांगणारा बामण गुरू घरी येतो, तेव्हा त्यास दक्षिणा म्हणून कोरडा शिधा द्यावा आणि त्यास ब्राह्मणदेवता म्हणून दंडवत घालावा, हे त्याला रीतीला धरून वाटत होते. महार, मांग, चांभार, भंगी असल्या जाती त्यांना रुढीने नेमून दिलेली कामे करतात, यात त्याला काहीही गैर वाटत नव्हते. त्याला किंवा त्याच्या आसपासच्या लोकांना असल्या कोणत्याही गोष्टीचा कधीही ताप झालेला नव्हता. फिरस्त्या लोकांना चोपताना राधु महार त्याच्या सोबत होता, किंबहुना त्यानेच ते सारे केले होते आणि त्याचे श्रेय सुद्धा त्याने मागितले नव्हते. शौचे-कुलकर्णी यांनी अगदी

कसून त्याची आणि त्याच्या पत्नीची पत्रिका पाहून त्यांची संतती का जगत नाही, याचे आकलन मांडले होते. त्यावर त्याने त्यांस जी बिदागी दिली, ती त्यांनी आनंदाने स्वीकारली होती. मग तक्रारीला जागा कोठे राहिली? खेड्यात जत्रांच्या निमित्ताने कुस्त्यांचे हगामे होत. त्यात सगळ्या जाती धर्माची पोरे खेळत असत. अंगाला अंग भिडवताना जातीचा विचार कोणीही करत नव्हते. त्याची माहिती घेण्याची गरज कोणालाही कधीही वाटत नव्हती. साल्पी येथील सगळ्यात मोठा पैलवान चांभार जातीचा होता. कैक मुसलमान तरुण पैलवानीत माहीर होते. पण त्यांचा धर्म त्यांच्या श्रेष्ठ असण्याच्या आड येत नसे. ज्याचे मनगट खंबीर तो हंबीर, असा रिवाज सार्वत्रिक होता. म्हणजे जाती-पाती होत्याच. एकमेकांना नाडणे होते. बामणांपासून ते सगळे कारू-नारू गरीब कुणब्यांना नाडत असत. पण त्याचा अनुभव शंभुराव यास नव्हता. त्याला त्याची झळ कधी पोहोचलेलीच नव्हती. रानाच्या दुनियेत शिकार करताना शिकारी जसे दुबळे भक्ष्य निवडून त्याचा पाठलाग करून त्याचा बळी घेतात, तसेच गावच्या व्यवहारात होते. शंभुराव ताकदवान होता. जो ताकदवान आहे त्यास वचकून राहण्याची रीत होती. म्हणूनच शंभुराव यास कोमटी बंधूंनी जे जोतीराव फुले यांच्याविषयी सांगितले, त्याचे मर्म त्यास तितके कळले नाही. त्याला मुंबई नामक शहराविषयी कुतूहल मात्र वाटले. कधी तरी ते पाहावे असेही त्याच्या मनात आले. पण ते तेवढेच आणि तितकेच.

आणखी एक गोष्ट त्याचे बाबत त्या घोडनदी येथे जाण्याच्या निमित्ताने त्याच्या मनाच्या कोषात घुसली, तिचे गांभीर्य त्याला तेव्हा तितके जाणवले नाही. पण ती घटना पुढे त्याच्या जगण्याचा प्रवाह प्रभावित करणार होती. किंबहुना त्याच्या जगण्याला ती अतोनात भारित करणार होती. ती म्हणजे देऊबाई नामक खानावळ चालविणाऱ्या स्त्रीची भेट. तो घोडनदीला गेला तेव्हा सोबत तो तेजबाईने दिलेले चटणी-भाकरीचे पेंडके घेऊन गेला होता. खरेदी, भेटीगाठी उरकल्यावर नदीकाठी गाडी सोडून भाकरी खाणे हे ठरलेले होते. पण त्याच्या दैवाचा वारा आला म्हणा, किंवा तसेच काही; तो एका खानावळीत

घुसला. घोडनदीसारख्या बाजाराच्या गावात खानावळी असतात, हे त्यास माहीत होते. पण तशा ठिकाणी खाण्याचा योग त्याला कधीही आलेला नव्हता. तसे त्याचे आयुष्य प्रभावित करणाऱ्या त्या दिवशी त्याच्या मनात का आले, हे एका असल्या नसल्या ईश्वराखेरीज कोणालाही सांगता आले नसते. तो त्या खानावळीत शिरला तेव्हा खूप उशीर झालेला होता. दुपार उत्तम कलली होती. इतकेच नाही तर, आता कोणीही येणार नाही अशा अनुभव आणि अपेक्षेने, आतली साफसफाई इत्यादी सारे उरकलेले होते. अशात श्रीमान शंभुराव सातपाटील यांनी तिथे प्रवेश केला आणि कुठेही कोणीच न दिसल्याने ते गोंधळून उभे राहिले. एकूण माहौल पाहून तिथून पाय काढता घेण्याच्या विचारात असताना आणि त्या भावनेला अनुसरून ते परत निघाले असताना, एक मंजुळ ध्वनी हलकेच त्यांच्या कानी विसावला, 'जेवायचंय?' दबकत म्हणाले, 'त्यासाठीच आलो होतो. पण आवराआवर झालेली दिसतेय. मला उशीर झालाय, असं दिसतंय.'

आतून एक बाई आली. कोपऱ्यातल्या मोरीकडे संकेत करीत म्हणाली, 'हातपाय धुवा आणि बसा.' हातात आणलेला पाट मांडून ती लगबगीने आत गेली. शंभुराव एकटाच होता. अशा अडनिड्या वेळेला कोण कशाला येणार? चूकच झाली होती. पण आता ती निभावून नेण्याला पर्याय नव्हता. शिवाय मालकीण किंवा जी कोणी बाई होती, तिनेच तर थांबवून घेतले होते. शांतता होती. आतल्या लसणाच्या फोडणीचा वास, भाजत्या भाकरीचा खरपूस वास असे आले आणि पाठोपाठ जेवणाचे ताट आले. गरमागरम भाकरी, पिठलं, कांदा-लिंबू, चटणी, लोणचं, पापड असं त्यात होतं. ताट आणि पाण्याचा तांब्या मांडून बाई पुन्हा आत गेली. जरा वेळाने एका ताटात भाकरी पिठलं घेऊन आली आणि अंतर ठेवून बसली.

'कोणत्या गावचे?' 'साल्पी.' 'रोज असेच उशिरा जेवता?'

'नाही. बाजार करायला आलो होतो. तिथं नंतर व्यंकूशेठ अन्

राजूशेठ भेटले. त्यामुळं उशीर होत गेला.'

'आईकलंय मी. नात्यातल्या कोणाच्या तरी लग्नासाठी आले होते

म्हणे. तुमची बैलगाडी आहे?'

"हां. तिकडं बाजारतळावर झाडाखाली सोडलीय. गडी आहे सोबत.' 'त्याच्या जेवणाचं? बांधून देऊ?' 'नको. तो जेवला आसन. घरून भाकरी बांधून आणली होती.'

तृप्त होऊन निघताना तो पैसे देऊ लागला तर म्हणाली, 'नको. मोहल्ल्या वक्ताला आले का द्या.' तो म्हणाला, 'आसं नायी चालनार. पैसे घ्यावा लागतेत.' म्हणाली, "पुन्हा या. आशेच उशोर करून या.'

"काय?' तो चमकला.

ती हसली. म्हणाली, 'आशे आले का बोलता येतं. नेहमीचा रगडा नसतोय.'

तो तिथून परतला पण ती बाई त्याच्या मनात रुतून राहिली. अगदी ठसठशीत बांधेसूद बाई होती. अत्यंत आकर्षक, मनात ठसून राहावी अशीच होती. पण मग, असे कैक लोक रोज तिथे जेवायला येत असतील अन् त्या प्रत्येकाच्या मनात ती अशीच ठसून उरत असेल. प्रत्येकाशी ती अशीच गोड बोलत असेल. तिचा धंदाच आहे तो. आपल्या मनात ती रुतली, हा आपला दुबळेपणा. त्या त्या वेळी वाटलं ; संपलं. त्याचा अधिक विचार करायचा नाही,

तो स्वतःला सांगत होता. पण बाई मनात ठसलेलीच राहिली. म्हणाली, 'उशीर करून या. का?' हसून म्हणाली, 'आशे आले का बोलता येतं.' काय त्याचा अर्थ? आपणही बाईच्या मनात ठसलोय की काय? तो हे विचार मनातून हाकलायचा प्रयत्न करी. पण ते उसळी घेऊन मनात उतरत आणि नाचत राहात.

अखेर एके दिवशी तो घोड्यावर स्वार झाला आणि तिच्याकडे गेला. उशीर करूनच गेला. तेच निवांतपण. तसंच स्वागत. होरा खरा ठरल्याचा अनुच्चारित उल्हास. मार्दव आणि अकृत्रिम आपुलकी. स्त्री-पुरुषांमध्ये कोणतेही औपचारिक नाते नसताना एखादी स्त्री इतक्या मोकळेपणाने वागू शकते याचा असा अनुभव त्याला नव्हता. पुरुषांना नादी लावून, भुलवून लुटणाऱ्या कोल्हाटणींविषयी त्याने ऐकलेले होते. त्याचा चुलता पिराजी सातपाटील अशीच कोल्हाटीण घेऊन आला होता, हे त्याला

माहीत होते. ही बाई तशी नव्हती. आकर्षणाच्या कैफात आपल्याला ती तशी नाही असे वाटते आहे, असे त्याच्या मनात येई. कैफ तर होताच. म्हणून तो पुन्हा पुन्हा जात राहिला. पण तो सावध होता. ती उत्तम चवदार अन्न देत होती. ताट साग्रसंगीत असे. पण ते तसे तर घरी तेजबाई सुद्धा सुरुवातीला करीत असे. नव्याने लग्न होऊन आल्यावर ती अशीच कांदा लिंबू, चटणी, कोशिंबीर, लोणचे, पापड असे सारे मांडून ताट पेश करत असे. कदाचित ती देशमुखांच्या घरातून आलेली असल्याने तसे असेल. पण शंभुराव तर रांगडा कुणबी गडी. पितळीत बरबाट ओतायचं अन् त्यात भाकरी मुरगाळून तो चिखल ओरपायचा; अशा पद्धतीने दणकून अन्नग्रहण करीत तो वाढलेला होता. त्याची ती सवय समजून घेत तेजबाईने स्वतःस बदलत नेले होते. त्याला जे जसे आवडते ते तसे देत तिने तिच्या सवयी तिच्यापुरत्या मर्यादित केल्या होत्या. तरीही देऊबाईचा सैपाक, तिचे तो वाढणे त्याला आकर्षक वाटत होते. आकर्षण मुळात त्या साऱ्यापल्याड होते, हे त्या कैफात असल्याने, त्याला कळत नव्हते.

एके दिवशी तिने सागुती बनवली. स्वादिष्ट भरघोस ताट. घमघमाट होता. तांब्याशेजारी एक फुलपात्र मांडलेले होते. त्यात पिवळसर द्रव होता.

'काय?' त्याने प्रश्नार्थक तिच्याकडे पाहिले. 'घेत असता ना? सागुती खायची तर आधी पोटात जाळ झाला पायजे ना!' ती हसली.

कधीतरी -आणि सागुती केली तर आधी हमखास- थोडी दारू घेणे त्याच्या सवयीचे होते. घरात सागुती शिजली की साऱ्या पोराबाळांना ओळीत बसवून वाटीत प्रत्येकी थोडी दारू देण्याचा रिवाज सातपाटील यांचे घरात पूर्वापार होता. मद्य त्यांना वर्ण्य नव्हते. त्या दिवशी पोटात उत्कृष्ट जाळ पाडून घेत त्याने सागुतीवर सणसणीत आडवा हात मारला. त्या दिवशी तो थोडा अधिक वेळ तिथे थांबला.

ती हलकेच म्हणाली, 'तुम्ही मला आवडता. तुम्ही मला ठेवा.'

आवडण्याची बाब तर न बोलताही त्यांना स्पष्ट झालेली होती. पण तिने ती थेट मांडली. अन् सरळ म्हणाली, मला ठेवा. थेट, स्पष्ट बोलणं ही तिची खासियतच होती. त्यांच्यात कोणत्याही प्रकारची शारिरीक जवळीक अद्याप झालेली नव्हती. बाई ठेवणं ही त्याच्या जगण्याशी विपरीत अशी गोष्ट नव्हती. मालदार कुणबी अशी अंगवस्त्रे बाळगत असत. ज्याच्यात हिंमत आणि ऐपत आहे, त्याने ते करावे असा समज सार्वत्रिक होता.

'गप्प का झाले? मी तुमच्यावर ओझं नाही व्हायची.' 'तसं नाही.' 'मग काय?'

अनेक गोष्टी असतात. ठेवायची तर कुठं आणि कशी ठेवायची? बायकोला काय वाटेल? भावकी काय म्हणेल? ही स्त्री आधी कोणाची कोण? तिच्या पूर्वायुष्याचे काय काय तिच्या सोबत येईल? असं पुष्कळ काय काय त्याच्या मनात चाललेलं होतं.

'लांब तिकडं मिरज-सांगलीकडं गाव आहे आमचं. माझं लगीन झाल्याल होत. नवरा पाग्या होता. मी पयल्यापसून आशी धटमुट बाई. किती दिवस दम काढणार? आले पळून एका संगती इकडं. तर वरसाआधी तोही अचानक खपला. लोकांची नजर आस्तीयच. त्यांची काय चूक? पण मी माझी मला खबरदार आहे. तुम्हाला पाहिल्यावर मन पाकळलं.'

तेच पुन्हा. कसलीही लपवाछपवी नाही.सारं थेट आणि स्पष्ट.

'तुला ठेवायची ऐपत माझ्यात नसली तर? माझ्याविषयी तुला काय आणि किती माहिती आहे?'

'मला काहीच माहिती नकोय. तुम्ही माझ्यासारखेच रगदार आहात. घोड्यावर बसून येता. ऐपतीशिवाय जमतं का ते? घरदार, नवरा सोडून स्वतः च्या हिंमतीवर जगणारी बाई मी. इतकी भोळपट तर नक्कीच नाही.' ती हसली.

परत निघताना तो सवयीने येतो म्हणाला तेव्हा ती हसून म्हणाली, 'नक्की या. मला न्यायलाच या.'

नंतरचे काही दिवस तो विचार करत होता. तिला ठेवायची तर कशी ठेवायची? घरदार सांभाळून इतरत्र खुषीचे संबंध असलेले लोक होते. त्याच्या अनेक तन्हा असत. अनेक विधवा शरीराची गरज म्हणून आणि संबंधित पुरुष एक रुचीपालट म्हणून संबंध ठेवत. या सगळ्यात चुकून समजा गर्भ राहिला तर तो पाडताना सुद्धा अनेक बाया मरत. त्याची कुठे गणना? हाक ना बोंब. गडी मोकळा. त्याला काय, ही नाही तर ती. त्यात त्याची तरी काय चूक? त्याला संधी आहे तर तो ती साधणार. बाईला नसते, याला तो काय करणार? मृत्यू हीच तिची गती. किंवा इतका विचार कोण कशासाठी करतो? अनेक गरती बाया पहिल्या बाळंतपणातच काही ना काही कारणाने मरतात. त्याचे कोण काय करणार? गडी दुसरी बाईल करायला मोकळा. त्याच्या बायकोची धाकटी बहीण तोवर लग्नाला आलेली असेल तर सासराच म्हणतो, ती गेली तर ही कर. सोयीरसंबंध राहिला पाहिजे. वाट बुजता कामा नये. हे सारे मातब्बर लोकांचे. गरीबांना द्याज देऊन बायका आणाव्या लागतात. त्यांना ही चैन नाही. अशा कैक तव्हा. हा विषय मनात घोळवत असताना शंभुरावाची नेहमीची कामे चालूच होती.तेजबाईला काय वाटेल? आपल्याला आईच्या जागी असलेल्या थोरल्या भावजयीला-दीपाबाईला काय वाटेल? दुसरी बाईल आणा असे तेजबाई कैक वेळा म्हणते. अन् प्रत्यक्षात तशी वेळ आली तर? अन् हिच्याशी तर लग्न नाही करता येणार आपल्याला. ठेवलेली बाई तिला चालेल? असं कधी असतं का? चालत कोणालाच नसेल. मन मारून चालवून घेतात बाया. तेजबाईची मुलं जगत नाहीत. ती मुळातच नाजूक. इतक्या बाळंतपणांनी तिच्या अंगाचा कापूर होऊन गेलाय. एकत्र येण्यात तिला सुख होत नाही. ती नकार देत नाही. पण काही करतही नाही. पण म्हणून ती अशी दुसरी बाई चालवून घेईल? संबंधात त्याचा विरस होतो. पण तो खपवून घेतो. या देऊबाईची ओळख झाल्यापासून असे विरस होणे त्याला अधिक जाणवू लागले. अन् आता तर ती थेट

म्हणालीय, मला ठेवा. एका रात्री एकशय्या झाल्यावर काहीशा खेळकर स्वरात तो तेजबाईला म्हणाला, 'आता खरंच दुसरी बाईल आणावा लागती.' त्याच्या स्वरातला खेळकरपणा कृतक आहे, हे त्याचे त्यालाच पटले. 'आना की. मी कवा नको म्हनले? आना. माझी तकलीप तरी कमी होईल.' ती हसत म्हणाली. तिचे हसणे सुद्धा कृतक होते, हे तिच्या दमलेल्या स्वरात त्याला जाणवले. आपल्याला निदान या सक्तीच्या सहवासातून सुटका तरी मिळेल, अशी काही एक भावना त्यात होती. ती दुःखद आणि सच्ची होती. सत्य हे नेहमीच तापदायक असते आणि ते सहसा रहाटीला धरून नसते. वेदनेचा उच्चार हिमनगासारखा असतो. त्यापल्याड फक्त अधार. सगळे पोटात घेऊन गडीगुप्प आणि चिडीचुप्प. म्हणूनच नंतर सारे एका कळाहीन आणि कर्तव्यदक्ष अंधाराचा भाग होऊन गेले.

मनातल्या अनेक विचारांशी सामना करताना रोज संध्याकाळी परिमित मद्यसेवन करण्याचा परिपाठ शंभुराव याने हल्ली सुरू केलेला होता. तेजबाई हिच्यासाठी ते तितके आक्षेपार्ह नव्हते. ते तिने तिच्या माहेरी पाहिलेले होते. अनेकदा अत्तराचे दिवे पेटवून आणि वाजंत्री लावून तिचे वडील आणि चुलते मद्यसेवन करीत असत. वाजंत्री अशासाठी की देशमुख दारू पित आहेत. आणि तो एक उत्सव आहे. शंभुराव ते तितके करत नव्हता. एकटाच बसे. नंतर जेवून त्या गुंगीत झोपी जाई. तिला सहसा हात लावत नसे. ते तिला बरेच वाटत असे. ती त्याला त्यातल्या त्यात सुख मिळावे म्हणून तिला माहीत असलेले पूरक खाद्यप्रकार अगदी मनापासून करत असे. मद्याच्या संगतीत अनेक प्रकारचे विचार आणि कल्पना यांच्या सुखदायक ढगांच्या हवेत शंभुराव याचा काळ व्यतीत होत असे. अशा पुष्कळ गोष्टी ; ज्या एरवीच्या सजग वेळी अशक्य वाटतात, त्या अशा धुक्याच्या मनःस्थितीत सहज शक्य वाटत असत. असाच विचार करत एका संध्याकाळी मद्यसेवन करीत तो बसलेला असताना वाडग्यातून कदाचित लघवी करण्यासाठी बाहेर आलेला विठोबा त्याला दिसला. रखमाजीच्या मरणानंतर जनावरांसोबतची त्याची जागा विठोबाने घेतली होती. शंभुरावाच्या मनात आले, देऊबाईचे लग्न समजा विठोबाशी लावले तर? काय हरकत आहे? विठोबा हा शंभुरावापेक्षा वयाने मोठा. त्याच्या लग्नाचा विचार कोणाच्याही मनाला शिवलेला नव्हता. कसा शिवणार? तो मुळात माणसात नव्हताच. मानवी भावभावना त्याच्या ठायी उत्तम होत्या. पण पुरुषी वासना, पुरुषाला स्त्रीची वाटणारी चाह, ओढ त्याच्या ठायी नव्हती. कुत्र्यांचे लौंगट पाहताना किंवा गाय, घोडी, म्हैस यांना लावायचा प्रसंग येत असे तेव्हा, ते पाहतानाची त्याची नजर शांत, थंड असे. सगळ्यांचीच ती तशी असते. पण काही एका वासनेचे कढ स्वतःस त्या ठिकाणी मानून पुरुषांच्या चेहऱ्यांवर दृगोचर होत असतात. तसे काहीही त्याच्या चेहऱ्यावर उगवत नव्हते. पण तो पांग्या, हांडगा किवा मेंगा नव्हता. ह्या तिन्ही अवस्थांना आपापले अर्थ असतात. त्यांची त्यांची मर्मस्थाने असतात. पण विठोबा त्या सगळ्यांच्या पल्याड होता. दोनच टोके शक्य होती. एक तर त्याच्यात काहीच नव्हते किंवा दुसरे टोक म्हणजे तो पूर्ण होता. पूर्ण असणे हे तर देवत्वाचे लक्षण. त्या मुक्या-बहिऱ्याला ते कसे द्यायचे, म्हणून तो काहीही नसलेला निष्कलंक होता, असे समजायचे. किंवा हे सगळे एक अर्थच्छल म्हणूनही सोडता येईल. कारण इतके खोलात जाऊन त्याचा विचार कोण कशासाठी

करतो? विठोबाला स्त्रीत रस नाही हे कैक आधीपासून शंभुराव यास स्पष्ट झालेले होते.

शंभुराव यास वाटले, असे असले तरी चारचौघांसारखे त्याचे लग्न व्हायला काय हरकत आहे? आपण त्याला विचारू. त्याला सांगू. आपण त्याला फसवणार नाही आहोत. त्याला रस नाही, पण आपल्याला आहे ना. त्याला त्याच्या नावाने कुंकू लावणारी बायको मिळेल. लोकांना त्याचे वर्म माहीत नाही, नसेल. त्या गरीबात मुळात रसच नाही कोणाला. दीपाबाईला असेल, पण ती तिच्या नवऱ्याला बांधलेली. त्याच्या लग्नाचा विचार कोण कशाला करतो? अशी कैक गरीब माणसे असतात, की ज्यांची लग्नेच होत नाहीत. तसाच हा. आपण त्याचे लग्न लावून देऊ. त्याला बायको मिळेल. अन् आपल्याला सोयीस्कर आपली स्त्री. सगळ्यांना सोयीस्कर. नुकसान कोणाचेही नाही. विठोबाला पटवावे लागेल. देऊबाईला पटवावे लागेल. राहिल्या तेजबाई आणि दीपाबाई. त्या काय बोलणार? त्यांना किंवा बाकी इतरांना फार तर वाटेल की विठोबासाठी इतकी सुंदर बाई शंभुरावाने कुठून पैदा केली? तर त्यात काय; असतात अशा बाया. गरीब, सुंदर, नडलेल्या. आणि अशा सगळ्या प्रश्नांची उत्तरे द्यायला आपण बांधलेले थोडेच आहोत? ज्याला जे समजायचे, त्याने ते समजावे. नाही तरी हळूहळू सगळ्या दुनियेला सत्य समजून चुकणारच आहे. देऊबाईला आणून वेगळी ठेवण्यापेक्षा हे केव्हाही चांगले.

10

मद्याच्या कैफात सगळ्या गोष्टी सुलभ वाटतात. तेव्हा कोणत्याही प्रश्नांना सुलभ उत्तरे असतात. कारण तेव्हा आपण एका वेगळ्या वास्तवात वावरत असतो. तिथे कल्पनेचा वारू अश्वमेधाच्या घोड्यासारखा वावरत असतो. कोणताही प्रश्न उपस्थित होऊ दे, त्याचा खातमा अवश्य करता येतो. आणि विजयी ध्वज मिरवत घोडा पुढे चाल करत असतो. पण कैफानंतरच्या वास्तवात प्रश्न टणक होतात. तसे शंभुराव याचे प्रश्न टणक झाले. पण देऊबाई हीस ठेवण्याची चाहत इतकी टणक होती की तिने सगळ्या प्रश्नांवर मात केली. तो आधी विठोबाशी बोलला. विठोबाच्या भाषेचे पुष्कळ आंतरिकीकरण त्याने केलेले होते. त्यातून त्याने त्याला सगळे सांगितले. विठोबा म्हणाला, 'बाई घेऊन मी काय करू?' शंभुराव म्हणाला, 'मला ती हवी आहे आणि त्यासाठी हाच रस्ता आहे. मी तिला सांभाळीन. कदाचित ती तुलाही सांभाळीन.' विठोबा म्हणाला, 'जशी तुमची मर्जी.' मग देऊबाई हीस सांगितले. म्हणाली, 'असे कसे?' म्हणाला, "विठोबा असा असा. शरीराची आस नाही. भला आहे. माझ्यावर भरवसा ठेव. हाच रस्ता आहे.' म्हणाली, 'जशी तुमची मर्जी. कसेही करा आणि मला ठेवा.' मग एके दिवशी रानात विठोबा आणि देऊबाई यांनी एकमेकांस माळा घातल्या. माचाडावरच्या एका नूतन शिल्पित खोपटात त्यांचा संसार सुरू जाहाला. खल्क खुदाचा, मुल्क पातशहा शंभुराव

याचा. असा क्षेम सुरू जाहला. कोण काय बोलणार? सगळे सुक्षेम. तेजबाईच्या थेट समोर नको म्हणून शंभुराव याने गावठाणातल्या रखमाजीच्या जुन्या वाड्यात डागडुजी करून घेऊन तिकडे मुक्काम हलवला. तो वाडा रखमाजीसोबत भावांनी आनंदाने त्याच्या वाट्यास दिलेला होता. पत्नीस वाड्यात मुक्कामी ठेवून शंभुरावाने रान स्वतः साठी अधिक मोकळे करून घेतले.

तरीही, अशा गोष्टी लपून का राहतात? दुरून का होईना, लोकांना अंदाज येतोच. थोड्या चर्चा होतात. नंतर थांबतात. ज्याची त्याची मर्जी असते. शंभू कारभारी यांच्यासारखा बडा माणूस काहीही करू शकतो. अन् शोभतं सुद्धा ते अशा लोकांना. तेजबाईला सुगावा लागला होता. पण बोलणार काय? तिच्या नवऱ्याने तिला टाकली थोडीच होती? अंगवस्त्र आलं. ठीक आहे. त्याची मर्जी. असतात मोठ्या लोकांना. तिला वाटलं, बरंच झालं. आता शय्येची कटकट नाही. तिकडं जातो. त्याला सुख मिळतं. मिळूदेत. तिला एकशय्या नकोशी झाली होती, तिला ती झेपेनाशी झाली होती. नाही कसं म्हणायचं म्हणून जुलमाचा रामराम. आणि झालं बाळ पुन्हा अन् जगलं तर बरंच ; अशी क्षीण आशा. पण ती स्वतःच आता प्रकृतीने क्षीण झाली होती. कधी कधी तिला वाटे, या रखेलीला बाळं झाली अन् जगली तर? तीच पुढचा वंश चालवणार? कडूचा वंश? त्या बाईच्या जातीचा, गोताचा कसलाच पत्ता नाही. ती दुसऱ्याच्या नावानं कुंकू लावतीय. ती मुलं विठोबाचंच नाव लावतील. तिला वाटे, या सगळ्यात विठोबाच्या मनाची स्थिती कशी असेल? त्याच्या गरीबाच्या मनाचा विचार कोण कशाला करतो? मुकं झवलं, हाक ना बोंब.

शंभुराव याच्या ठायी सुरुवातीस थोडा अपराधभाव अवश्य होता. पण असाधारण, अननुभूत, अपरिमित सुखाच्या मोहक कैफात तो कापरासारखा उडून गेला. मनगटाला मनगट जुळणं जे म्हणतात त्याची प्रतिती शय्येत येऊ लागली. आपल्या ठायी आवेग फार आणि पत्नी नाजूक; तिचे ठायी तो फारच कमी, म्हणून तो संयम बाळगत असे. त्याचा त्याला त्रास होई, तरी तो ते करत असे. अशा गोष्टी कोण कोणाशी बोलतो? पण आता तो प्रश्न निकाली निघाला होता. आवेगाशी आवेग आणि आवेशाशी आवेश. सगळे तोडीस तोड. देण्याची असाधारण असोशी. स्तंभन करा आणि खेळत राहा. अंगभर जल्लोषाच्या अपरिमित लाटा. उसळतात, आदळतात, विरतात; पुन्हा उसळी घेण्यासाठी. सारे अर्थातच दोन्ही बाजूंनी चाललेले होते. शंभुराव यास कधीकधी शौचे-कुलकर्णी यांचा अभिप्राय आठवे. पत्नी व्याघ्र योनी अन् आपण महिष ; संसार होतो हेच मुळात आश्चर्य. मुले होतात हेच आश्चर्य. महिषापासून व्याघ्रीला कधी बाळे होतात काय? त्याला वाटे, आपण महिष अन् आपल्याला आता सापडलेली ही देऊबाई सुद्धा नक्कीच महिष. म्हणूनच सारे इतके सुखकारक होते.

देऊबाई आता दोन पुरुषांची स्त्री. कुंकवासाठी विठोबा. शय्येत शंभुराव. विठोबाशी वागताना, त्याच्या सोबत वावरताना सुरुवातीस ती थोडी बिचकली होती. असा कसा हा माणूस? एका बाईशी लग्न करतो अन् राजरोस ती दुसऱ्याला वापरू देतो? तो गरीब आहे म्हणून काय झालं? असं कोणी करतं का? काहीच का आक्षेप नसेल त्याचा?

निदान मनातल्या मनात? त्याला कधीच का चाह वाटत नसेल? दिसतो तर निरोगी. मनात येत नसेल? आधी आधी आपल्याकडं साधं बघायला सुद्धा बिचकायचा. आपल्याला माळ घातल्यामुळे त्याच्यासाठी जणू काहीच बदललेलं नव्हतं. दिवसभर गायी-म्हशींची निगराणी. रात्री गोठ्यात मुक्काम. गायी आणि म्हशीत. पण आपण शिजवलेले अन्न तर तो खातो. त्याविषयी तो काहीच बोलत नाही. कसा बोलणार? तो मुका बहिरा. तो तिच्याशी काय बोलणार? अन् ती बोलल्याचे त्याच्यापर्यंत कसे पोहोचणार? पण हळूहळू तिच्या लक्षात येऊ लागले. तो माणसात नव्हता. पण तो माणसांच्या पल्याडचा होता. त्याला ऐकता-बोलता येत नसले तरी त्याची व्यक्त होण्याची त्याची स्वतःची अशी भाषा होती. त्याचा चेहरा, त्याची देहबोली सारे व्यक्त करत असे. त्याचे ते व्यक्त होणे गायी-म्हशींना उत्तम समजत असे. ते देऊबाई हीस दिसत असे. तिला वाटे आपण तर माणूस; आपल्याला ते का न कळावे? त्या प्रयत्नांतून ती हळूहळू शिकत गेली. तो तिचे ऐकू लागला. तिने त्याचे लंगोटी वापरणे बंद करून टाकले. धोतर, सदरा आणि पटका असा नेटका पोशाख तो करू लागला. अन् तिच्या धाकापोटी तो नेटकेपणे वापरू लागला. उत्तम आणि रुचकर अन्न खाऊ लागल्याने त्याच्या तब्ब्येतीत बदल दिसू लागला. सालगडी गोपाळा अन् रोजाने वावरात काम करायला येणारे स्त्रीपुरुष येता-जाता त्याची थट्टा करीत. पण ती निर्विष असे. त्याला उशिरा का होईना इतकी सुंदर बाईल मिळाली, अन् त्याचे चांगले चालले आहे, हे त्याच्याकडे पाहून कळते सुद्धा, असा भाव त्यात असे. त्याच्या स्वीस शंभुराव कारभारी समजा वापरत असेल तरी, त्यात नवल ते काय? गरीबाच्या रूपवान स्त्रीला अशा गोष्टींशी जुळवून घ्यावेच लागते. अशा गोष्टी उघड बोलायच्या नसतात. अन् ते असे किती काळ टिकणार असते? चार दिवसांची जवानी. ती हटली की संपलं. या मोठ्या लोकांचा रस हटतो. स्वतः ची हवस पुरविण्यासाठी त्यांना पुरी दुनिया कायम खुलीच असते. पण शंभुराव कारभाऱ्याच्या आधाराने विठोबाचा संसार फुलेल, फळेल हे काही कमी आहे काय? एरवी त्याला कुठून बाईल मिळाली असती? त्याच्यासारख्या गरीब, कसलाही आगापिछा नसलेल्या माणसाला फार चांगली बाईल मिळाली हे उत्तम. बाई रूपाची आहे. गरीब बाईच्या अशा रूपाला भक्कम आधाराशिवाय सुखाने जगताच येत नाही. कोणी तिला तसे जगूच देत नाही. तिला विठोबा सारखा देवगुणी नवरा मिळाला अन् शंभू कारभाऱ्यासारखा भक्कम आधार.

गरीबाच्या जातीला सुखाने जगण्यासाठी आणखी काय पाहिजे?

तेजबाईने रानात जाणे सोडून दिले होते. एरवीही तिच्या तोपर्यंतच्या आयुष्यात तिने वावरात कधीही कोणतेही काम केलेले नव्हते. तिने ते करावे अशी अपेक्षा शंभुरावाने कधीही केलेली नव्हती. गावातल्या वाड्यात ती राजाच्या राणीसारखी राहात होती. तिचा राजा, तिचा पुरुष आणखी एका बाईकडे जात होता. पण राजाला तर अनेक राण्या असतात. दासी-बटकी, कचुकी, नाटकशाळा असतात. याची तर आणखी एकच फक्त आहे. त्याला त्यात सुख वाटतेय तर ठीक आहे. जुलमाच्या एकशय्येतून आपली सुटकाच झाली आहे. आपल्या पतीची आद्य आणि एकमेव स्त्री म्हणून आपले स्थान कायम आहे.

आणि एके दिवशी तिला समजले की विठोबाच्या स्त्रीस बाळ झाले असून ते चांगलेच गोरेगोमटे आणि गुटगुटीत आहे. तातडीने हालचाली करीत महिन्याभरात तिने एक मुलगी

शोधली, पारखली. शंभू कारभारी यास ती म्हणाली, आपली मुले जगत नाहीत. आता मला ती होण्याची शक्यता उरलेली नाही. तितकी माझी तब्ब्येतच उरलेली नाही. आपल्या वंशाला दिवा तर पाहिजेच. मी माझ्यासाठी सवत शोधली आहे. या मुलीचे नाव तुळसाबाई. ती शेजारच्या राळेगणसिद्धी या गावातील होती. गरीब घरातली होती. अकरा-बारा वर्षे वयाची होती. वयाने लहान असली तरी उफाड्याच्या अंगकाठीची होती. तिच्या बापास तेजबाई हिने उत्तम द्याज दिले होते. आपल्या प्रथम पत्नीच्या प्रस्तावास शंभुराव याने निमुटपणे संमती दिली आणि त्याचे दुसरे लग्न लागले.

◆ ◆ ◆

शंभुराव

आता काळ पहिल्या जागतिक महायुद्धाच्या आसपासचा. हे युद्ध १९१४ च्या सुमाराला सुरू झाले आणि १९१८ च्या अंती संपले. १७६० ते १८५० ते हा ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीचा काळ मानला जातो. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला जगातील एक चतर्थांश भागावर ब्रिटनची सत्ता होती. ब्रिटनइतक्या नसल्या तरी फ्रेंचांच्या वसाहतीसुद्धा जगभर होत्या. ब्रिटन नंतर फ्रान्स आणि जर्मनीत औद्योगिक क्रांती झाली. जर्मनीत ती फार झपाट्याने झाली. आपली औद्योगिक उत्पादने विकण्यासाठी ब्रिटन आणि काही प्रमाणात फ्रान्स यांच्याकडे त्यांच्या जगभरातल्या वसाहतींच्या रूपाने हुकमी बाजारपेठा होत्या. वसाहतीतील उद्योग मोडीत काढून तशा बाजारपेठा त्यांनी तयार केल्या होत्या. भारतासारख्या समृद्ध देशातून ब्रिटनमध्ये संपत्तीचा ओघ १७६० च्या सुमारालाच सुरू झाला. कारण १७५७ मध्ये बंगाल काबीज करून त्यांनी त्याची जोरदार सुरुवात केली होती. बंगाल सारखा समृद्ध प्रदेश हाती येणे आणि ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांती सुरू होणे, ह्या समकालीन घटना असणे, हे नाते आपण लक्षात घेतले पाहिजे. पण त्यांच्यानंतर त्यांच्यापेक्षा फारच मोठी औद्योगिक व्यवस्था झपाट्याने उभ्या करत असलेल्या आणि शेतीची फारच अधिक समृद्धी असलेल्या जर्मनीकडे अशा गोष्टींची, म्हणजे हुकमी बाजारपेठेची वानवा होती. जर्मनांनी बर्लिन ते बगदाद अशी रेल्वे लाईन टाकली. त्यांचे नाविक तळ जगभर निर्माण झाले. ही सगळी ताकद सरळच बाजाराची नवी क्षेत्रे निर्माण करणारी होती. ते दिसत असताना ब्रिटन आणि फ्रान्स अस्वस्थ होते. अशा प्रकारे जुन्या आणि नव्या वसाहतवादी सत्तांमध्ये संशय आणि अविश्वास यांचे वातावरण वाढीला लागून युद्धाची ठिणगी पडली. बाकी युरोपातल्या इतर देशातील स्थानिक वाद, वांशिक वाद अशा गोष्टी होत्याच. या युद्धात, भारत ही ब्रिटनची वसाहत असल्याने, पंधरा लाखांपेक्षा अधिक भारतीय, सैनिक आणि असैनिक सहभागी झाले होते. ते आजच्या भारत, पाकिस्तान आणि बांगला देशातील होते. यात प्रामुख्याने पंजाब आणि उत्तर प्रदेश व थोड्या प्रमाणात बंगाल आणि मद्रास भागातील लोक होते. मराठी फौज त्या मानाने कमी होती. याचे कारण भारत जिंकताना ब्रिटिशांचे अखेरचे कडवे शत्रू मराठेच होते. म्हणूनच मराठ्यांविषयी एक प्रकारचा अविश्वास ब्रिटिशांच्या ठायी होता. तरीही मराठे त्यात अगदीच नव्हते असे नव्हे. पॅलेस्टाईन, इराण, इराक, तुर्कस्तान या भागात मराठा पलटणींनी मोठी कामगिरी बजावल्याचे इतिहासात नमूद आहे. पण या युद्धाचा महाराष्ट्रावर खास परिणाम झाल्याचे दिसत नाही. उलट खूप मोठ्या फौजेला कपडे पुरविण्याच्या गरजा निर्माण होऊन मुंबईतील कापड गिरण्यांमधील उत्पादनाची मागणी वाढली आणि अडचणीत सापडलेला तो उद्योग तिथे ऊर्जितावस्थेत आला, असे काही लोकांचे निरीक्षण आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून युरोपात विज्ञानाच्या क्षेत्रात क्रांतिकारी गोष्टी घडल्या.

एकोणिसाव्या शतकाच्या अंतापर्यंत तिकडे अशी धारणा दृढ झाली होती की विज्ञानात जे शोधायचे ते सारे शोधून झाले आहे. शोधावे असे नवे काहीही उरलेले नाहीय. पण नुसता फिजिक्सचा विचार केला तरी, तेव्हापासून अगदी आजपर्यंत आपले जगणे सर्वस्वी बदलून टाकणाऱ्या ज्ञानाचा पाया, विसाव्या शतकाच्या आरंभी घातला गेला असे लक्षात येते. नुसत्या पहिल्या महायुद्धापर्यंतचा विचार करायचा तरी बघाः १९०० मध्ये मॅक्स प्लँक या तेव्हाच्या अगदी तरुण शास्त्रज्ञाने मांडणी केली की प्रकाशाचे उत्सर्जन हे सतत होत नसून ते प्रकाशकणांच्या सुट्या सुट्या पुंजांच्या रूपात होत असते. अशा पुंजासाठी त्याने क्वांटम अशा शब्दाची योजना केली होती. हा एका प्रकारे आधुनिक पुंजविज्ञान किंवा क्वांटम फिजिक्सचा पायाच होय. १९०५ मध्ये जर्मन शास्त्रज्ञ आल्बर्ट आईनस्टाईन याने फोटोइलेक्ट्रिक इफ 'क्टचा शोध लावला. त्यातून वस्तुजाताच्या सूक्ष्मतर अवस्थेतील कण आणि लहर अशा द्वंदात्मक अस्तित्वाची जाणीव ज्ञानी लोकांना झाली. याच वर्षी त्याने त्याचा सुप्रसिद्ध सापेक्षतावादाचा सिद्धान्त मांडला. आणखी एका पेपरात त्याने वस्तुमान आणि ऊर्जा यांच्यातील नात्याची मांडणी केली. ते सुप्रसिद्ध $E = mc'$ या सूत्रात अस्तित्वात आले. १९०७ मध्ये जर्मन गणिती हरमन मिंकोवस्की याने मांडणी केली की आईनस्टाईन याचा सापेक्षतावाद उत्तम प्रकारे स्वीकारायचा असेल तर स्थळ आणि काळ हे एकमेकांपासून सुटे नाहीत, असे मान्य करावे लागते. ही दोन्ही मिळून जो एक चतुर्मित अवकाश तयार होतो, त्यातच घटनांचा विचार करावा लागतो. १९११ मध्ये अर्नेस्ट रुदरफोर्ड याने अणूमधील बव्हंश भाग हा पोकळ असून त्याच्या गाभ्याशी धन प्रभार असलेला वजनदार भाग असतो आणि त्याच्या भोवती ऋण प्रभार असलेले हलक्या वस्तुमानाचे इलेक्ट्रॉन नामक कण वेगाने फिरत असतात असे सिद्ध करून मांडले. १९१६ मध्ये आईनस्टाईन याने त्याचा सर्वसाधारण सापेक्षतावादाचा सिद्धान्त मांडला.

त्या काळात झालेले ज्ञानात्मक काम हे पायाभूत स्वरूपाचे आणि अत्यंत महत्त्वाचे होते. विश्व आणि अणूचे अतिसूक्ष्म अंतरंग यांच्याविषयीच्या ज्ञानाचा आणि आकलनाचा पाया तेव्हा घातला गेला. विसाव्या शतकाच्या सगळ्या ज्ञान चर्चेत जर्मन शास्त्रज्ञ आईनस्टाईन याचे किती महत्त्व होते याचा अंदाज यातून येतो. आणि ते त्याच्या मृत्युनंतर, अगदी आजपर्यंत सुद्धा कायम राहिलेले आहे. पुढच्या काळात आपले एक भारतीय शास्त्रज्ञ सत्येन बोस यांनीही या क्षेत्रात काम केले. मूलकणांसाठी बोस-आईनस्टाईन स्टॅटिस्टिक्स ही एक ज्ञानशाखा त्यातून विकसित झाली. त्याच्या आधी अणूचे विखंडन शक्य असते, असा महत्त्वाचा शोध लागला. त्याचा उपयोग करून दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने १९४५ साली जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अणुबाँब टाकून मोठाच विध्वंस केला. लक्षावधी लोक प्राणांना मुकले. वित्तहानी अमाप झाली. इतक्या भयंकर प्रमाणात मनुष्यहानी, वित्तहानी झाल्याने धसका खाऊन जपानने शरणागती पत्करली. तरीही, त्याच्या पुष्कळ नंतर, पन्नाशीच्या दशकात पुणे येथील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात केमिस्ट्री शिकवणारे, संगमनेर येथील हिंमतलाल मगनलाल शाह यांचे जावई, प्रोफेसर पारेख सत्तरीच्या दशकात अल्पकाळच्या भेटीसाठी आपल्या श्वशुरगृही आले असताना म्हणाले की, तेव्हा अणू हा वस्तुजाताचा अतिसूक्ष्म भाग असून त्याचे विखंडन अथवा विभाजन होत नाही असेच आम्हाला शिकवावे लागत होते. ते होते, असे

जाहीर ढळढळीत माहीत असूनही, तसे विद्यार्थ्याने परीक्षेच्या पेपरात लिहिल्यास, ते चूक दिले जात असे. या आणि अशा अनेक स्युडो-वास्तवांना वैतागून प्रोफेसर पारेख सर परशुरामभाऊ महाविद्यालयातील नोकरी सोडून कॅनडा या देशात निघून गेले व तिकडेच आपला योगक्षेम चालवित राहिले. असो. या अशा पुष्कळ नंतरच्या गोष्टी. तूर्त काळ विसाव्या शतकाच्या पहिल्या / दुसऱ्या दशकाचा. जगात किंवा अगदी आपल्या देशात सुद्धा काय चालले आहे याच्याविषयी ठार अनभिज्ञ असलेल्या खेड्यातील दुनियेसोबतचा. साल्पी हे असे प्रातिनिधिक खेडे होय.

1

शंभुराव आता त्याच्या वयाच्या अगदी आरंभीच्या पन्नाशीत. तरीही त्या काळाच्या हिशेबाने वृद्ध. वयोवृद्ध. आपले वय झाले आहे, आपला भूलोकीचा कार्यकाळ आता संपला असे त्या काळातील अशा वयातील लोक म्हणत असत. हल्ली तसे कोणी म्हणत नाही. कारण हल्ली मनुष्ये फार जगतात. आणि पुष्कळ साठी-सत्तरीत सुद्धा कायावाचामने उत्तम कार्यरत असतात. फार कशाला; मोरारजी देसाई भारताचे पंतप्रधान झाले तेव्हा त्यांचे वय एक्क्यांशी वर्षे होते. आज मलेशिया या देशाचे पंतप्रधान असलेल्या महाथीर मोहंमद यांचे वय त्र्याण्णव वर्षे आहे. हे असे आपले आजचे वर्तमान आहे. पण समजा, देहू येथे त्यांच्या वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी इ.स. १६५० साली तुकोबाराय आंबिले-मोरे वैकुंठवासी झाले किंवा पुष्कळांच्या मते मारले गेले; त्यांचा खून झाला, असे अनेक जाणते लोक सांगतात. वैकुंठीहून विमान आले अन् थेट भगवंतच त्यांना नेण्यासाठी सामोरा आला, किंवा सप्तलोक ओलांडून जाताना त्यांची पत्रे आली. सब झूट. जे काही असेल ते असो; ते काही आपण आता बदलू शकत नाही. पण मरण्याच्या आधी कधी तरी लिहिलेल्या एका अभंगात जरा कर्णमुळे सांगो आली असे त्यांनी म्हटले आहे. किंवा शंभुराव याचे समकालीन म्हणता येईल असे, गोपाळ गणेश आगरकर (१८५६ ते १८९५) यांनी त्यांच्या वयाच्या छत्तीसाव्या वर्षी, आपण आता म्हातारे झालो, असे उद्गार काढल्याचे कुठे तरी नमूद आहे. त्यामुळे पहिल्या महायुद्धाच्या जरा आधीच्या त्या काळात पन्नाशीतला भारतीय शंभुराव वयोवृद्ध होता असेच म्हणावे लागते. आणि आयुष्याच्या या टप्प्यावर त्याला मिळायचे ते सारे उत्तम मिळालेले होते. त्याची स्त्री तेजबाई हिने त्याचे लग्न ज्या तुळसाबाई या राळेगण-सिद्धी येथील उगले नामक कुटुंबातील मुलीशी लावून दिले; तिला त्याच्यापासून चिखलाचे गोळे निर्माण व्हावेत अशा पद्धतीने नियमित पाच मुले आणि दोन मुली अशी त्या क्रमाने अपत्ये झाली होती. या चिखलाच्या गोळ्यांची नावे तितकी महत्त्वाची नसली तरी पुढच्या पिढ्यांना ती माहीत असणे महत्त्वाचे आहे. ती अनुक्रमे अशी: धैर्यराव, सूर्यराव, तिमाजी, तुळाजी, माणकोजी, रेऊबाई आणि सरूबाई

अशी होत. यापैकी धैर्यराव आणि सूर्यराव ही नावे त्या मुलांना तेजबाई हिने प्रदान केलेली होती. नंतरच्या मुलामुलींची नावे तिला प्रदान करता आली नाहीत, कारण त्याच्या आधीच तिचे निधन झाले होते. म्हणून नंतरच्या अपत्यांचे नामकरण तुळसाबाई हीस तिच्या मगदुराप्रमाणे करावे लागले होते. म्हणूनच नामकरणाचे देशमुखी वळण आणि कुणबी वळण यांच्यातील भेद इथे कोणासही स्पष्ट दृगोचर होईल असा आहे. या पहिल्या दोन अपत्यांना तेजबाई हिने आपल्या अंगाखांद्यांवर मुबलक खेळविले होते. किंबहुना ती आपलीच अपत्ये आहेत अशी तिची धारणा होती. आपली मृत झालेली अपत्ये पुन्हा तुळसाबाई हिच्या पोटी जन्म घेत आहेत, अशी तिची दृढ धारणा होती. त्यांच्या जन्माचे आणि जगण्याचे हारिक तिच्या ठायी इतके होते की, त्यानंतर तिने शंभुराव यास त्याच्या नावाने पुकारण्यास सुरुवात केली. झाले असे की सूर्यराव याच्या जन्मानंतर ती आनंदित होऊन आपल्या पतीस थेट म्हणाली, शंभुराव, देशमुखीण तेजबाई तुला लाधली नाही. पण ही कुणबिण तुळशी मात्र लाधली, असं तुला वाटत असेल. पण ही माझीच लेकरे तुळशीच्या पोटी पुन्हा जन्माला येत आहेत, हे तुला माहीत नाही. माझी सात बाळे देवाघरी गेली. त्यातली ही दोन आलीत. उरलेली सारी पुन्हा जन्म घेण्यासाठी देवाच्या दारी उभी आहेत, हे कधीही विसरू नकोस. ही माझी बाळे परत आली, म्हणून आता तुही माझा मुलगा झाला आहेस, हे तुला कळत नसले तरी मला कळते. अष्टपुत्रा सौभाग्यवती भव असा बामण जेव्हा एखाद्या बाईला आशीर्वाद देतो तेव्हा त्याला, तू तुझ्या नवऱ्याची आई हो, असेच म्हणायचे असते. मी आता तशी झालेली आहे. या तिच्या निवेदनाने तो तितका चक्कर झाला नाही. पण तिने त्यास थेट त्याच्या नावाने पुकारले, हे त्यास विस्मयकारी होते. आणि तिने ते नंतर ती जगली तोवर कायम ठेवले. तिने किमान इतरांसमोर आपणास या प्रकारे पुकारू नये आणि तसे केल्यास आपण काहीही करू शकणार नाही, याची धास्ती त्यास कायम असे. पण त्या माउलीने तसे कधीही केले नाही. तुळशीस झालेली लेकरे ही आपलीच आहेत, ही तिची धारणा ठाम होती. पण हे कसलीही कर्तबगारी अंगी नसलेले चिखलाचे गोळे निघणार आहेत, ही तिची भावना तिने शंभुराव याजपासून कधीही लपवून ठेवली नाही. ते शंभुराव यास त्याच्या आयुष्याच्या उत्तरकाळात अधिकाधिक स्पष्ट होत गेले. ते स्पष्ट होण्यासाठीचे प्रदीर्घ आयुष्यही त्याच्या वाट्याला आले, हे वास्तव होय. प्लेग नामक त्या काळी वारंवार प्रकटणाऱ्या एका महामारीत तेजबाई देवाघरी गेली. गावठाणात उंदीर नित्य असत. ते मरून पडलेले रस्त्यात दिसू लागले की गावातील घर, वाडा, वस्ती; जे काही असेल ते सोडून रानात राहायला जाण्याचे ज्ञान त्या काळच्या खेड्यातील लोकात प्रस्थापित होते. अशा प्रकारे एकदा महामारी आल्याचे दिसताच शंभुराव याचे सारे कुटुंब त्याच्या कुंभारखांदी नामक शेतात वसतीला गेले होते. त्याची अघोषित स्त्री देऊबाई तिच्या विठोबा नामक घोषित पतीसह आधीच माचाडाच्या रानात वसतीला होती. त्यामुळे ती, विठोबा आणि त्यांची बाळे आधीच सुरक्षित होती. पण धोका लक्षात आल्यावर तेजबाई हिने तुळशीसह आपली लेकरे आणि थोर शंभुराव यांना कुंभारखांदी येथील वावरात थाटलेल्या तात्पुरत्या वस्तीत रवाना केले. ती स्वतःही गेली. पण तिथे गेल्यावर तिच्या लक्षात आले की घरातील पवित्र अशी विठोबा-रखुमाईची मूर्ती; जी शंभुराव याने वाटणीत स्वतःकडे खास घेतलेली होती

आणि तिची पूजाअर्चा आणि निगा यांचा जिम्मा तिने स्वतः होऊन स्वतःकडे घेतलेला होता; ती मागे गावातल्या वाड्यातच राहिली होती. तेव्हा सगळ्यांची व्यवस्था लावून ती पुन्हा मूर्ती आणण्यासाठी गावात वाड्याकडे निघाली असताना शंभुराव तीस म्हणाला सुद्धा की, 'देव तिथे राहिले ते चांगलेच आहे. ते आपल्या वाड्याचे राखण करतील.' तेव्हा ती हसून म्हणाली की, 'वाड्याचे जे व्हायचे असेल ते होईल; माझ्यासाठी माझ्या कच्च्याबच्च्यांचे राखण अधिक महत्त्वाचे आहे. म्हणून विठोबा-रखुमाई; जी आपली पूर्वापार आहे, ती सोबत असणे गरजेचे आहे.' या प्रकारे निवेदन करून ती माउली पुन्हा गावात, गावठाणात एकटीच गेली असता तिथे तीस महामारीची बाधा झाली आणि ढाळ-वांत्या यांचा प्रकोप सुरू झाला. त्याचे वर्तमान तिचा पुरुष शंभुराव यास समजले तेव्हा त्याने स्वतःसकट काही धाडशी मित्रांच्या सोबतीने धोतराची झोळी करून तीस कुंभारखांदी येथील तात्पुरत्या वसतीकडे आणण्याचा क्रम चालविला असताना रस्त्यातच तिचे निधन झाले. तत्पूर्वी आपला मृत्यू समोर दिसत असताना ती शंभुराव यास म्हणाली, 'मी जरा लवकर देवाघरी निघाले, याचे मला दुःख होतेय. मला माझ्या आणखी पाच बाळांना माझ्या अंगाखांद्यावर खेळवायचे होते. मी जगले असते तर या चिखलाच्या गोळयाना काही आकार देण्याचा मला प्रयत्न करता आला असता. पण पांडुरंगाची तशी इच्छा दिसत नाही. आणि येणाऱ्या तुझ्या वृद्धापकाळात तुला ते शक्य होणार नाही. म्हणून उत्तरोत्तर तुला अधिक दुःखाचा सामना करावा लागेल. पण शंभूराया, त्यासाठी तू दुःखी होऊ नकोस. माणूस म्हणून आपले आयुष्य हे असेच असते. एकाच आयुष्यात बरे-वाईट सगळे बघावे आणि भोगावे लागते. दुःखांच्या त्या एकाकी क्षणी माझी आठवण कर आणि स्वतःला बळ देण्याचा प्रयत्न कर. आपल्या हाती तितकेच असते, याचे भान ठेव.' आपल्या आयुष्याच्या अंताच्या झोळीत पहुडलेली असतानाचे तेजबाई हिचे ते प्रॉफेटिक उद्गार तेव्हा त्यास तितके समजले नाही. पण त्याच्या प्रदीर्घ आयुष्याच्या काही अंतिम दिवसात त्याला ते आठवणार होते. ती त्याला शंभुराया म्हणाली तेव्हा त्यास पुष्कळच आधी खपलेली तिची आत्या आणि त्याची सगळयात थोरली भावजय दीपाबाई हिची आठवण झाली. त्याला या प्रकारे संबोधणारी ती एकमेव स्त्री होती. तेजबाई गेली आणि आपल्या आयुष्यातले शुभ्र ते सारे मावळले, आपल्या आतला आपल्यावरील धाक नाहीसा झाला, हे त्यास समजले नाही. ते त्याला त्याच्या उरलेल्या आयुष्यात लक्षातच आले नाही.

तेजबाई म्हणाली त्यानुसार तुळसाबाई हीस नंतर क्रमाने आणखी तीन मुले आणि अखेरीस दोन मुली झाल्या. त्यानंतर तिचा पाळणा थांबला. थोरला धैर्यराव आणि सगळयात धाकटी सरूबाई यांच्या वयात जेमतेम पंधरा-सोळा वर्षांचे अंतर होते. त्यातून तुळसाबाई हीस झालेल्या अपत्यांची क्रमवार नैमिकता सहज दृगोचर होते. तुळसाबाई ही आयुष्यभर शंभुराव याचे समोर दबूनच राहिली-वागली. असे असले तरी तो जिवंत असे पावेतोचे तिचे आयुष्य सुखातच गेले असे म्हटले पाहिजे. मुलांना जन्म घालण्यापेक्षा अधिक कोणतीही विशेष गंभीर जबाबदारी तिला कधी पेलावी लागली नाही. मुले लहान असेतो त्यांचा प्रतिपाळ तिने ठीकठाक केला. घरात सुबत्ता. सगळे महामूर. ती आणि तिची मुले यांना कशाचीही ददात कधीही भासली नाही. शंभु कारभारी याचा गावातला रौब वाढता होता. इतका की त्याचे त्याच्या थोरल्या भावांना मनातून वैषम्य वाटे. पण ते

सांगणार कोणाला? गावातल्या सगळ्या उद्योगात केवळ सातपाटील असल्याने त्यांचे सगळे सुलभ झालेले असे. संबंधातली अशी चीर इतरांना दाखवली तर आपलेच नुकसान याची त्या भावांना जाणीव होती. साधी रानातून शेतमाल, भाजीपाला गावात वाहून आणायची गोष्ट. ते सगळे पाट्यांमध्ये घालून डोक्यावर वाहून आणण्याची आम रीत होती. साल्पीत शंभुराव त्यासाठी पहिल्यांदा गाडा घेऊन आला. ही एक बुटकी गाडीच होती. पण त्याची चाके भरीव लाकडी होती. तिला बैलगाडीच्या चाकासारख्याच लोखंडी धावा होत्या. ती गाळात रुतली तरी बैलांच्या ओढीच्या ताकदीवर सहज निघून येत असे. तसे त्याच स्थितीत अडकलेल्या बैलगाडीच्या चाकांना कठीण असे. हे इतके नवीन होते की त्याची साऱ्या गावाने वाहव्वा केली. या वाहव्वाचा दाह शंभुराव याच्या भावंडांनी आणि त्याच्या पुतण्यांनी मनात रुतवून त्याचे कुरूप करून घेतलेले होते. पुढे कैक वर्षांनी शंभुराव मेला तेव्हा त्याचे सगळे थोरले भाऊ आधीच मेलेले असताना सुद्धा त्याच्या तेव्हा वयाने बऱ्याच ज्येष्ठ असलेल्या पुतण्यांनी त्वरेने तो गाडा बलपूर्वक कु-हाडीने तोडला होता. लोक साहजिकच असे का, असे का, म्हणाले तेव्हा ते म्हणाले, 'तो आमच्या चुलत्याने आणलेला होता. तो आता त्याच्या सरणात त्याच्या सोबत जळूदेत.' मृताची प्रिय वस्तू त्याच्यासोबत सरणात जावी अशी आपली रुढी आहे. हे दुनियेस पटावे असेच प्रेमवेष्टित कर्म होते. पण त्याच्यापाठी त्यांच्या मनात दीर्घकाळ साचलेला द्वेष फक्त होता. चिखलाच्या गोळ्यांप्रमाणे किंवा उकिरड्यातील खतामधल्या उन्ह्यांप्रमाणे सुरक्षित वाढलेल्या शंभुराव याच्या मुलांना त्यातले इंगित जाणवले असताना सुद्धा त्याविषयी काहीही करता आले नाही. कारण इतक्या थोर स्पष्टीकरणाच्या उजेडात त्यांची दातखीळ गच्च होऊन गेलेली होती. पण समजा, त्याच्या पुष्कळ आधी शंभुराव याची मुले लहान असताना आणि ती जयाजी आणि जनकोजी यांच्या नातवंडांच्या जवळपास समवयस्क असताना आणि मधल्या आणखी भावांच्या मुलांच्या वा नातवंडांच्या जोडीची असताना एके दिवशी सातपाटलांच्या अशा एकूण पोरांचा बराच मोठा घोळका संतापत, रडत, गागत शंभुराव याच्याकडे पोहोचला आणि त्यांनी तक्रार अशी केली की 'ते सारे गावातील एकमेव न्हावी बाबू याजकडे डोकी करण्यासाठी गेले असताना ते उत्तम चालू होते, पण तेवढ्यात खोपडे-पाटील यांच्या भावकीतील काही पोरे आली आणि म्हणाली, आधी आमची डोकी कर. तेव्हा त्यांच्या सोबत पाटील यांचे भावकीतील अमुकअमुक हे वयस्क शहाणे सोबत होते; त्यांनीही तोच आग्रह धरला तर ते बाबू न्हावी यांनी आमची डोकी करण्याचे सोडून पाटील यांचे घरातील मुलांची डोकी करण्यास आरंभ केला, हे आम्हास फार वेदनादायी आणि अपमानास्पद असे वाटले आहे.' ते समयी अधिक काही विचार न करता शंभुराव हे घोडेस्वार झाले आणि त्यांनी शेजारच्या कोणत्या तरी गावातील न्हावी, बाळू म्हणून होता; त्यास घोड्यावर सोबत घालून आणले आणि त्यास सांगितले की माझ्या मालकीचा हा हा वाडा आता आपले मालकीचा होय. आपणास वर्षभर लागणारे अन्नधान्य हे हे इतके लगेच घेणे. उप्पर भाजीपाला माझे शेतातून लागेल तसा घेणे. आपल्या घोड्यास

लागणारी चंदी आणि घास माझे शेतातून मिळेल. अट फक्त एकच. आपण फक्त सातपाटील यांच्या भावकीची डोकी करायची. आणखी कोणाचीही नाही. तेव्हा ते

वर्तमान शंभुराव याचे भावांना विदित झाले, तसेच ते सर्व गावासही समजले. त्या समयी ते सारे थोरले भाऊ आणि त्यांची पोरे, नातवंडे यास इतका थोर संतोष झाला की त्या सगळ्या भावांनी अतीव आनंदाने बाळू न्हावी यास आपल्या शेतात भाजीपाला आणि चंदी घेण्यास तितकीच मोकळीक दिली. तेव्हा साहजिकच बाळू न्हावी यास अस्मान ठेंगणे होऊन त्याने फक्त सातपाटील यांच्या भावकीतील लोकांची डोकी करण्याचा क्रम चालविला. आणि हे सारे असामी आणि बलुतेदार असे नाते टिकले तोवर अव्याहत चालू राहिले. ते शंभुराव याचा नातू; माणकोजी सातपाटील याचा मुलगा; त्याच्या मृत्युनंतर दोन वर्षांनी जन्मलेला देवराव नामे होता; जो पुढे स्वतःस देवनाथ म्हणवत असे; त्यानेही स्वतःच्या बालपणी अनुभवले. ही घटना घडली तेव्हा साल्पी नामक त्या ग्रामी वर्तमान असे की हे सातपाटील यंग्राट. यांचे नादास न लागणे उत्तम; हा जो रिवाज आहे, त्याची स्मृती बाकी सर्वांनी ठेवणे अगत्याचे आहे. न ठेवल्यास बाबू न्हाव्याचे जे होते ते कोणाचेही होते. आता हा बाळू न्हावी आलाय. तो बाबू न्हावी याचे नाक तर कापीलच आणि आता खोपडे-पाटील यांच्यासकट सगळ्या गावाच्या नाकावर टिच्चून रुबाबात जगणार यात नवल ते काय? घडली ती घटना अगदी क्षुल्लक. पण तिची परिणती अशी जबरदस्त. सबब अगदी क्षुल्लक बाबीत सुद्धा सातपाटील यांचे नादास लागणे टाळणे हे उत्तम, हा धडा; जो सर्व ग्रामास परिचित, तो पुन्हा जागविला पाहिजे, हे खरे.शंभुराव सातपाटील याने बाळू न्हावी यास प्रदान केलेला हा वाडा त्याच्या मालकीच्या किमान पाचसहा वाड्यापैकी एक होता. हे वाडे बव्हंशी गहाणुकीच्या व्यवहारातून त्याच्या मालकीचे झालेले होते. सावकारी हा त्याचा एक व्यवसाय होता. त्याकाळी सोनार आणि तेली ज्ञातीतील लोक हा व्यवसाय करत असत. ते सारे चोपडीकुशल. उचल घेण्याच्या वेढ्यात कुणबी एकदा अडकले की त्याची बेडी बनविण्यात महाकुशल. घरातील मालटालासकट दावणीची जनावरे देखील निर्दयतेने सोडून आणत. त्यापेक्षा शंभू कारभारी हा आपला. गोताचा नसेल तरी किमान जातीचा. विनंती-आर्जवे केली की ऐकतो. पुढचा वादा मागितला तर सवलत देतो. असा समज होऊन शंभू कारभारी याची सावकारी सुदृढ झाली. कारभारी तेली आणि सोनार यांच्यापेक्षा वेगळा नव्हता. त्यास निर्दयतेची गरज नव्हती, कारण त्याचा रौब तितका होता. आणि चोपडीतील हिशेब तो नीट सांगे.

त्यात प्रेमळपणा असे. गांजलेल्या कुणब्यांना ते थोर वाटे. हिशेब वरलोट झाला की ते खुशीने आपली मत्ता देत. त्यातून जे अनेक लाभ शंभू कारभारी यास होत, त्यातील हे वाडे होते. त्यातील एक बाळू न्हावी यास मिळाला आणि तो खुशी झाला. पण या प्रकारे खुशी होणारा तो एकटाच नव्हता. आणि शंभू कारभारी प्रत्यही हिशेब पाहत, असेही नव्हते. हिशेबी आणि बेहिशेबी बाबी एकमेकींना बळ देतात आणि त्यातून होणारा फायदा पत, बळ, विश्वास यांना मुबलक करत अंती चोपडीसाठी हितकारीच होतो असा

त्याचा अनुभव होता.

जरा जुनी गोष्ट. तेजबाईने शंभुरावाचे दुसरे लग्न लावून दिले तेव्हाचा काळ. एके दिवशी बातमी फुटली की, रामचंद्र पाटील-खोपडे यांची एकुलती एक मुलगी वय वर्षे चौदाची ; बाबुशा इनामदार याचा मुलगा लियाकत याचा हात धरून निघून गेलीय. स्वाभाविकच सनसनाटी बातमी होती. सगळीकडे खळबळ आणि चर्चा. शंभू कारभारी

यांनी नीट माहिती घेतली. लोक म्हणाले, 'पाटलाला अक्कल नको? पोर न्हाती-धुती व्हायच्या आत उजवून टाखायची; ते धिलं सोडून. लियाकत गोरापान, तरणाबांड, टकुरबंद. घरासमोर उघडा होऊन लाकडं फोडायचा तर त्याचं अंग घामानी भिजून जायचं. उन्हात त्याचं सारं शरीर चमचम करायचं. ते त्याच्या छातीचं तकट, दंडाच्या बेडक्या. कोणचीही पोर पागल होईल आसं. पाटलाचा आन मुसुलमानाचा तर लय भावपना. ते तिथंयबी लाकडं फोडायला जात व्हतं. त्या पोरीला पडली भुरळ आन ती गेली त्याचा हात धरून.' शंभू कारभारी बाबुशाला घेऊन पाटलाकडे गेले. तो मेचत होता, काचकूच करत होता. 'पटेलका नाक काटा. पुरे गावका नाक काटा उस हरामीने. मैं कैसे ये थोबडा लेकर उनके सामने आऊ,' म्हणत होता. शंभू कारभारी म्हणाले, 'हेच सांगतो मी पाटलाला. चल.' ते गेले तर तिथं पाटलाची बरीच भावकी जमलेली. सुतकी वातावरण. कैकांच्या मनात की बरी जिरली साल्याची. पण बाबुशाला पाहताच त्यातले काही उठले आणि त्याच्या अंगावर एऽऽ लांड्याऽऽ अशी गर्जना करत धावून आले. शंभू कारभारी यांनी त्यांना अडवलं. 'तुम्हाला जितकं दुक हाये तितकंच त्याला हाये,' ते म्हणाले. त्यांनी पाटलाला बाजूला घेत त्यांच्या समोर बाबुशाला विचारलं, 'कुढं गेले आस्तीन? तुपला काय आंदास?'

'एक दोन ठेपे हैत. तिथं नस्तीन तरी ते हायेत कुढं याचा ठेपा कुढं तरी लागन. अगर आप साथ है तो'

"मी येतो ना!'

“धुंडून काढू. पटेलची लडकी तुमची आन मपली पन कोनीतरी हायेच ना. ये लियाकतच्या दिलमंदी पता नही कोनसा कली घूस गया. दिसला का कु-हाडीनी खापलतो साल्याला.' बाबुशाने पाटलांसमोर सपशेल लोटांगण घातलं.

चार दिवसांच्या आत त्यांनी पोरीचा तलास लावला. हे दोघे तिथे पोहोचल्याची बातमी लागताच लियाकतने तिथून पोबारा केला. कारभारी म्हणाले, 'लियाकतचं नंतर बघू. मुख्य वस्तू हाती लागली, हे आपलं नशीब.' नंतर दोन दिवसांनी रामचंद्र पाटील आणि शंभू कारभारी सावलीसाठी तट्टा केलेल्या बैलगाडीत पोरीला टाकून मजल-दरमजल करीत इंदौरला गेले. तिथे महिना पंधरा दिवस तळ ठोकून, चांगले ठिकाण शोधून पोरीला उजवली. त्या लोकांना महाराष्ट्रातून पोरी हव्याच असत. पाटलांचे नातेसंबंध निघाले. सगळे ठोकून-ठाकून झाले. हे परत निघाले तेव्हा ती पोर साहजिकच रडू लागली. पाटलाने हुंदका गिळला. शंभू कारभारी म्हणाले, 'चांगली राहा. घराण्याचं नाव काढ. चुका होतातच माणसाच्या हातानी. त्या धरून बसायच्या नाहीत.' पाटलांनी लेकीला जवळ घेतले. त्यांच्या डोळ्यांमधून ओघळणारे अश्रू पुसण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत. लेकीची आणि आपली कदाचित ही आयुष्यातील अखेरची भेट; असे मनात आल्याने त्यांचे हृदय भरून आले. ते ओळखून शंभू कारभारी म्हणाले, 'तुला आता साल्पीला येणे कदाचित नाही जमणार. पण पाटील भेटतीलच ना तुला इकडं येऊन. बापाचं काळीज आहे. त्याला राहावत आसतं का?'

हे असे एवढ्यावर थांबले नाही. पाटलाचे नशीब एकूण खडतरच. घटना घडली तेव्हापासून पाटलीणबाई घराच्या बाहेर पडली नाही. पाटलाने पुष्कळ सगळे सांगितले

असेल. ते आणखी कोणाला कसे कळावे? पण महिन्याभराने पाटलीण बाहेर आली ती तिरडीवर विराजमान होऊनच. ती अभिमानी खानदानी मराठा स्त्री. आतल्या आत सगळे साहत थेट तिरडीवर बाहेर पडली. आणि सरणावर जळून स्मृतिशेष झाली. पाटील उघडा एकटा झाला. एकाकी झाला. लेक दूरदेशी, बायको देवाघरी. चार दिवस लोक हळहळले. पुढे ज्याचे त्याचे जगणे. पाटील आतल्या आत वेडापिसा. त्याचे कोणाला काय दिसणार? एके दिवशी तेजबाई शंभुराव यास म्हणाली, 'स्वतः ला त्याचा मैतर म्हणवतोस. त्याच्यासाठी काय करतोस तू? पाटलाची बाईल अस्सील म-हाटा कुळीची. स्वोत्ताला आतल्या आत चावत देवाघरी गेली.

त्याच्यात आता काय बदल करता येत नायी. पण तू आसं बघ, गडी मेला तर एकलाच मरतो. त्याच्या पाठी बाई कशीयपण रांडारोटा करीत दिवस काढिती. पण बाई मेली की सगळं घेऊन मरती. गड्याला सुदिक घेऊन मरती. त्याला जिता आसून दिवस कठता येत नाहीत. हे तुला समजत नाही. पुरुषाला आनभाव नसतो. बाई ते ग्यान घेऊनच जल्माला येती.'

'काय करायचं?' 'लगीन लावायचं त्याचं आन काय करायचं दुसरं?'

शंभुरावाचे उत्तम चाललेले होते. तेजबाई, देऊबाई अन् तुळसाबाई.

तुळशीचे पोट पुढे आलेले होते म्हणून तेजबाई खूश होती. 'स्वोत्ता लोळतो सुकाच्या राशीत.'

तेजबाईच्या या तेज विधानावर शंभुराव एकदम चपापला आणि गप्प झाला. ती हसली. म्हणाली, 'बघ. कसा डोळे मिटून दूध पिणाऱ्या बोक्यासारखा गप्प झालास. पण आसं बघ, माझी कायच तक्रार नाही. मी भरून पावलेय. पुन्हा जल्म घेण्यासाठी माझी लेकरं आभाळात रांग लावून उभी हायेत. ती माझ्या अंगाखांद्यावर खेळतील.'

'मी काय करू?' शंभुराव दबकत्या स्वरात म्हणाला.

'तू कशाला काय करतो? मीच करते समदं. तू फक्त त्याला सांगायचं.

का बाबा आसं करतानी आसं,' तेजबाई कोणाचं ऐकणारी नायी..

शंभुराव याने ते केले. रामचंद्र पाटील तेव्हा सैरभैर एकाकी इसम. त्याला एकटेपण पेलणे शक्य उरलेले नव्हते. कावळा बसणे हे फांदी मोडण्यासाठीचे निमित्तच फक्त. फांदी मुळातच निमित्ताला टेकलेली असते. ती निमित्त मागत असते. आपण ते मागत आहोत हे तिला समजत नसते. तेजबाई सारख्या समझदार बाईला ते समजले. तिने तिच्या नात्यातील एक पोर त्याच्यासाठी शोधली. पाटलाचे त्यांनी दुसरे लगीन लावून दिले. तरीही पाटलाचे नशीब खडतरच. ही नवी बाईल तरणी. तुळशीच्याच वयाची. ती आठ चार दिवस राहायची अन् पुन्हा माहेरी पळून जायची. पाटील आणायला गेला की परत यायची. का जायची? का परत यायची? ती धड ना माहेरी सांगायची ना सासरी. सासरी म्हणजे नवऱ्याला. हे इतक्या वेळा झालं की पाटील वैतागला. एके दिवशी शंभू कारभारी यांना म्हणाला, आसं करतानी आसं. त्याने ते तेजबाईला सांगितलं. ती जरा विचार करून म्हणाली, 'उदईक गाडी जोडून आपण पोरीला आणायला जाऊ. तिला रगडून घेऊन यायची. ते कसं ते तू बघ.' ते गेले. कारभारी अन् सोबत खुद्द तेजबाई. कारभारी म्हणाले, “आम्ही आमची वस्तू घेऊन जायला आलोत. ती पुन्हा पुन्हा का तुमच्याकडं येती?' तिचे

वडील म्हणाले, 'वस्तू तुमची. तुम्ही ती तुम्हाला न्यायची तशी अन् न्यायची तेव्हा घेऊन जा. ती वारंवार इकडं येती याच्यात आमचा कायच दोस नायी. ती कायच बोलत नायी. तुमची तुम्हाला ती नांदवता येत नसल तर त्यात आमचा काय दोस? काय तरी दुक आसनच ना. आम्हाला ती सांगत नायी. म्हणून ते नायी आसं कसं म्हणावा? विहीर बारव जवळ करण्यापरीस ती आमच्याकडं येती, तर आम्ही काय करायचं? तिचं सुक-दुक जे काय आसन त्याची तड लावा. तो जिम्मा आमचा नायी. आम्ही खानदानी लोकं. ज्यानी त्यानी आपापल्या ठिकाणी नेट धरून जगावं आन कुळीचं नाव काढावं हीच आमची शिकवण. पण पोर आमच्याकडं येती तर आम्ही तिला ढकलून देणार नाही.'

तेजबाईने शंभुरावाला बाजूला घेतले अन् म्हणाली, 'शंभुराया, पोरीला रगडून न्यायचीय. तिला परत इकडं यायची वासना नायी झाली पायजे. तिकडं गेल्यावर मी तिच्या मनाची पारख करीन आन तुला सांगीन.' परतीसाठी शंभुराव याने बैलगाडी जोडली. तेजबाई बसली. आणि माहेरच्या सगळ्यांचा निरोप घेत रडवेली ती पोर गाडीत बसण्यासाठी मागच्या घोडक्याला धरून वर चढू लागली तेव्हा शंभुराव कडाडला, 'पोरी, गाडीच्या साटीत तुझ्यासाठी जागा नाहीय.' पोर गोंधळली. तिच्या माहेरचे गोंधळले. शंभुराव उतरला. त्याने पोरीचे दोन्ही हात दोरखंडाने करकचून बांधले आणि तो दोर गाडीच्या घोडक्याला बांधून टाकला. काय चालले आहे, हे लक्षात येताच पोरीचे तरणे भाऊ पुढे धावले. तेजबाई कडाडली, "वस्तू आमची. आम्हाला न्यायची तशी आम्ही नेणार. तुम्हाला ती तुमची म्हणून ठेवायची असेल तर आम्ही तिला लगेच मोकळी करतो.' पोरीच्या वडिलांनी हात आडवा धरला. भाऊ जागीच थांबले. शंभुरावाने हातातला चाबूक हवेत फडकवला. गाडी निघाली. घोडक्याला बांधलेली पोर पळू लागली. सगळे स्तब्ध कठोरपणे जागच्या जागी उभे राहिले.

साल्पीत पोरीला स्वतःच्या वाड्यात आणल्यावर शंभुराव दाबात म्हणाला, 'पोरी आज मी तुला फक्त घोडक्यांना बांधून पळवत आणलीय. पुन्हा माहेरी गेलीस तर भोंगळी करून अशीच बांधून पळवत आणीन. अन् आणल्यावर तुझं तंगडं उखळात कांडून तुला जल्माची लंगडी करून टाकीन.'

तेजबाई म्हणाली, 'बास आता शंभुराव. तुझं काम तू केलंस. आता मी बघते पुढचं.'

पोर तेजबाईच्या नात्यातली. तिने तिला मायेने चार दिवस स्वतः कडे ठेऊन घेतली. रामचंद्र पाटील येऊन गेले. तेजबाई म्हणाली, 'मी तिला माझ्या घरी घेऊन आलेय. हेही तिचे एक माहेरच आहे ना! मला वाटेल तेव्हा मी तिला तुमच्याकडे आणून घालीन.' तिने पोरीला आंजारत गोंजारत तिच्या काळजाच्या रस्त्याने तिच्या मनाच्या गाभ्यात प्रवेश मिळवला. तिथे जे प्रकट झाले ते ऐकले. म्हणाली, 'काळजी करू नकोस. सारे ठीक होईल. आणि आयुष्यभरासाठी कायम लक्षात ठेव. पुरुषाला आपण भितो असं दाखवायचं पण भ्यायचं कधीच नाही. आपल्या निकट येताना तो स्वतःच मुळात घाबरलेला असतो. जी दडपशाही आणि हल्ला तो करतो, तो ते स्वतःच्या भीतीतून बाहेर पडण्यासाठी. आपण त्याला विश्वास द्यायचा की बाबा, घाबरण्यासारखं या वितळत्या अंतरात काहीही नाही. जे आहे ते सारे सुंदर आहे. मला त्यातून खूप आनंद मिळतोय. मला अधिक काहीही नकोय. मग तो नम्र होतो आणि आपल्याला जाणून घेतो. तो मुळात आपला सेवकच असतो. आपण

ते ध्यानात घ्यायचं. पण तो सेवक असल्याचं त्याला कधीही जाणवू द्यायचं नाही. हे तुला हळूहळू आणि अनुभवाने कळेल. पुरुषाला घाबरावं आणि त्याच्यापासून पळून जावं असं त्याच्या ठायी मुळात काहीही नसतं. त्याच्या असण्याचा अहम् आपल्याला कुरवाळता आला की तो आपल्या ताब्यात येतो. तो तसा इतका ताब्यात येतो की आपण तसे झालो आहोत हेही त्याच्या लक्षात येत नाही. हे सगळे तुला लगेच सारे कळेल असे नाही. पण अनुभवाने शिकशील. घाबरू नकोस. पळून जावू नकोस.'

पोरीच्या अंतरीचे गुज जाणल्यावर तेजबाई शंभुराव यास म्हणाली, 'आरे तुझा दोस्त याडमाटच दिसतो मला.'

"का? का? काय झालं?' 'तो सारखा संसार करायला मागतो.'

तेजबाई हसली. शंभुराव गोंधळला. ही अशी इतकी नाजूक ;

ज्याची त्याची गोष्ट. रामचंद्र पाटलाला त्याच्या बायकोच्या मृत्युच्या दुःखातून बाहेर काढण्यासाठी तेजबाईनेच हे सारे केले आहे. तुंबलेला असेल तर करत असेल. अन् ही तर तरणी पोर. तिला त्यात काय अडचण? तिला ते हवे अन् याला ते करता येत नाही, अशी अडचण असू शकते. पण हे उलटे काय आहे? की या पोरीला हा आपला वयस्क नवरा मुळातूनच आवडत नाही की काय?

'तरणी पोर आहे. तिच्या कलाने घ्यायचे सोडून तो चळ भरल्यासारखा कशाला वागतो?'

'मला काहीच समजत नाही.'

'सगळं समजतं तुला. अन् ते माझ्याइतकं कोणाला माहीत तरी आहे का? तुला आवेग जास्त. मला तो तितका नव्हता. ते उमजून तू कायम किती संयमाने वागला आहेस! तुला होणाऱ्या त्रासातून रस्ता कसा शोधावा हे मला कळायचं नाही. अखेर तुझा तू तो शोधलास.'

शंभुराव गप्प झाला. स्पष्ट संकेत देऊबाई हिच्याकडे होता. तो काय बोलणार?

'हे बघ, माझी तक्रार नाही शंभुराव. माझी सुटकाच केलीस तू. मी तुला दोष दिला नाही. पण वंशाला दिवे तेवते असावेत म्हणून मी माझ्यासाठी सवत आणली. कसलीही खळखळ न करता तू मी म्हणाले ते मान्य केलंस. आपण एकमेकांशी हे कधी बोललो नाही. न बोलता आपल्याला ते कळत

गेलं. तुला ते कळलं. तू समझदार आहेस असं मी म्हणतेय.'

'मी काय करू?'

'ते मलाही नीट सांगता यायचं नाही. या पोरीचं अन् तिच्या पुरुषाचं त्या दोघांचही रसायन मला माहीत नाही. अशा गोष्टी कोणी कधी बोलतं का? आज आपण दोघे जिथे, जसे आहोत, तिथून मी तुझ्याशी काही काही बोलू शकते. पण बाई आणि पुरुष ; जसे असतील तसे त्यांनी एकमेकांना पारखायला नको का? त्याला अनुसरून एकमेकांशी जुळवून घ्यायला नको का? तू ते केलेलं आहेस. तुला ते सांगण्याचा अधिकार आहे.'

"मी काय करू?'

'संसार दोघांचा असतो. दोघांच्या देण्याघेण्यातून तो फुलतो. तू बघ. बोल. मला तुझा दोस्त घाबरलेला जास्त दिसतो. घाबरून तो धसमुसळेपणाने अधिक मागत असेल. त्याला

सांग, घाबरू नकोस. नम्र हो. सारं त्याच्या पाठी आपोआप येत असतं. अधिक फोडून काय सांगू?'

शंभुराव याने ते रामचंद्र पाटलाला सांगितलं. त्याला जमलं तसं त्याने केलं. खरं म्हणजे त्याला खूप अधिक माहिती होतं. देऊबाईने ते त्याच्या जगण्यात आणलं होतं. पण हे सारं तेजबाईला कुठून कळलं? असे प्रश्न त्याला त्या काळात तितके धारदार दिसले नाही. पण त्याच्या आयुष्याच्या अपरान्ह काळी, किंवा त्यापेक्षाही अधिक उत्तरकाळी ही कैक आधी मेलेली तेजबाई त्याच्या मनाच्या गाभ्याशी कायम उरली होती. किंबहुना त्याच्या आयुष्यातील ती एकच अशी स्त्री होती, किंवा अधिक नीट सांगायचं तर, ती अशी एकच माणूस होती, की जिचा धाक त्याला कायम वाटत राहिला. ती मेली आणि त्याच्या जगण्याचा आस ढिला झाला. आपण एका अनाकलनीय धाकातून मोकळे झालो असे तेव्हा त्याला वाटले. किंवा तिच्या मरणानंतर त्याच्या जगण्याचा वारू सुसाट धावत राहिला. पण त्याच्या प्रदीर्घ आयुष्याच्या अखेरच्या दिवसातल्या पराभूत एकाकीपणात तिच्या असण्याचे पांघरूण निघून गेल्याचे वास्तव त्याला अतोनात जाणवत राहिले. पण हे सारे खेड्यातील बायका एकमेकींशी सुखदुःखाच्या गोष्टी करताना म्हणतात तसे, सांगू नायी पन सांगायची वग येती. अशा पद्धतीचे होय. इथे वग म्हणजे ओघ. म्हणजे हे मला आत्ता सांगायचे नाहीय पण ओघाने आले म्हणून सांगावे लागतेय, असा त्या बायांचा पवित्रा असतो. तसाच हा समजायचा. बाकी, त्यानंतर रामचंद्र पाटलाची बाईल पुन्हा म्हणून कधीही माहेरी गेली नाही. तिला ओळीने एकाचढ एक अशी तगडी आठ मुले झाली. ही त्याची बाईल शंभू कारभारी आणि रामचंद्र पाटील यांच्या जगण्याला पुरून उरून पुढे कैक जगली. इतकी की पुढे शंभू कारभारी यांचा नातू ; माणकोजी सातपाटील याचा पुत्र देवनाथ हा कळत्या वयाचा बालक असताना, तिने एकदा तो रस्त्यात दिसला तेव्हा, त्याला खास बोलावून तिची कायमचे नांदायला येण्याची गोष्ट हौसेने सांगितली होती. आणि, तुझा आजा असा असा होता, असे सांगताना ती तिच्या दंतविहीन बोळक्यातून छान हसली होती. अर्थात हेही पुन्हा, सांगायचं नायी पन सांगायची वग येती अशाच पद्धतीचं झालं.

रामचंद्र पाटलाच्या पोरीचं इंदौरला लग्न लावून दिल्यानंतर सुमारे दीडेक वर्षाने एके दिवशी सकाळी बाबुशा इनामदार शंभू कारभारी यांच्या वाड्यावर हजर झाला. तिथे लोकांची नेहमीची वर्दळ होती. बाळू न्हावी धोकटी घेऊन आला आणि कारभारी यांची दाढी करून गेला. ते सुरू असतानाही कारभारी यांचा जनसंपर्क चालूच होता. आपले आपले काम उरकले की कोण कशाला थांबतो अधिक? तरीही कारभारी अगदी एकटे असे सापडेनात म्हणून बाबुशा बसून होता.

अखेर कारभारी यांनीच त्याला विचारलं, 'काय बाबुशा बरा हैस ना?'

'बराच आहे कारभारी. आपकी दुवा.' 'काय घेऊन आलास?' 'बात करायची होती.'

'कर ना.' 'अकेलेसे.' 'आरे एकलाच हाये ना आता मी. कोण हाये आणखी?'

घरात काम करणारा चौगुल्याचा एक हरकाम्या पोरगा त्याच्या कर्तव्याचा भाग म्हणून हाकेच्या टप्प्यात उभा होता. कारभारी यांनी संकेत करताच तो तिथून नाहीसा झाला.

'बोल आता.' 'कालच्या राती लियाकत आला.' 'कोण लियाकत?' 'मेरा बेटा. पटेलची

लडकी घेऊन पलून गेला होता.' 'आरे हां. आला का तो?'

'त्याचं काय करायचा ते समजून नायी व्हायला. एक बार लगता, जैसा भी हो; बेटा है अपना. दिलका टुकड़ा है. फीर लगता उसने ऐसा ऐसा किया; इसको कैसा रखेंगे यहां.'

'आलं, लक्षात आलं.'

शंभू कारभारी यांनी काही वेळ डोळे मिटून स्वतःशी विचार केला. म्हणाले, 'आसं कर. संध्याकाळी गडद पडल्यावर तू तुझ्या पोराला घेऊन ये. कायतरी तोडगा काढू. म्हणजे काढावाच लागतोय. पाटलाची पोर जशी आपली होती, तसा तुझा पोरगाही आपलाच आहे. अन् असं कर. येताना राधु महाराला सोबत घेऊन ये.' कारभारी थांबले. बाबुशा खूश झाला. त्याला खूप खूप बरं वाटलं. कारभारी मनाशी अधिक विचार करून म्हणाले, "किंवा आपण असं करू. तू राधुला तुझ्या घरी बोलावून घे. मीच तिकडं येतो. ते जास्त सोयीचं राहिल.'

'आप येनार?'

'मंग? मला काय बाट लागतो का काय मुसलमानाचा? मुसलमान आसुंदे नायतं महार. आपुन समंदे एकातले एक. देव, धरम, राहारीत तिच्या तिच्या जागी आस्तीय. त्याच्यात आपुन काय नायी करू सकत. का, का बाबा ती आपल्या बापाजाद्यांची रूढ. पन तुला मायती हाये का, तुपला, मपला आन राधु महाराचा आजा एकाच पलटणीत होते? हे दोघं आधी साल्पीला आले. तुपला आजा पेंढारी लोकांचा सरदार होऊन नंतर आला इथं लुटालूट करायला तर त्याला राधुच्या आज्यानी वळाखला.'

"खूब आईकला हाये. पण आता जमाना अलग झाला ना.'

'कसा व्हईन? आपन ध्यान धरलं तर काय नाय आलग व्हत. बरं ते जाऊंदे. सांच्याला मी येतो. ये आता तू.'

शंभू कारभारी दिवसभर विचार करत राहिला. त्याला बाबुशा इनामदारचा पोर आठवला. तो तरणाबांड खोंडासारखा पोर. देखणा आणि ताकदवान. कोणतीही पोरगी त्याच्यावर लटू होणार नाही तर काय करील? पण बाबा, हा रीतीचा कायदा आहे ना! मुसलमान अन् महाटा यांची सोयरीक कशी होणार? तशी रीत नाही. ती आपण कशी मोडणार? नायतर पाटलाची पोर आणि बाबुशाचा पोरगा एकदम मनगटाला मनगट जुळणारेच होते. आपण पाटलाच्या लेकीला आणून तिला इंदौरला नेऊन तिच्या जगण्याची धर लावून दिली. ह्या पोराची का नाही? अन् बाबुशा तेव्हा त्याच्या पोराला खापलायला निघाला होता. का, की त्याने गावाचं नाक कापलं. त्यात तो कुठं खोटा होता? आज तो त्याच्या लेकासाठी भेटायला आला. काय चूक? बापय तो. बाबुशा बोलला तेव्हाच शंभुरावाच्या लक्षात आलं की त्याच्या पोराला इथं नाही जगता येणार. पण कुठे तरी त्याला जगता आलं पाहिजे. आपल्याला त्याला रस्ता दाखवता आला पाहिजे. तो विचार करताना त्याला व्यंकूशेठ आणि राजूशेठ यांची आठवण झाली. व्यंकूशेठ तर आता खपला होता. पण राजूशेठ तर जिंदाच होता ना. राजूशेठसाठी चिठ्ठी देऊन या पोराला आपण मुंबईला पाठवू शकतो. महिना-पंधरा दिवस टिकाव धरता येईल इतके पैसे आपण त्याला देऊ शकतो. फार काय पैसे लागणार नाहीत. तिथे तो त्याची जिंदगी शोधील. राजूशेठ त्याला नक्कीच रस्ता दाखवील. बाबूशाच्या पोराविषयी असा विचार मनात आला तेव्हा;

त्याच क्षणी त्याला राधु महाराची आठवण झाली. या महाराने आपली अब्रू वाचवली. आपला दरारा निर्माण केला. त्याच्या मोबदल्यात त्याने आपल्याकडे काहीही मागितलं नाही. किंवा आपण अमुक केलं अन् तमुक केलं असंही तो म्हणाला नाही. झालं त्यातलं इंगित फक्त त्याला आणि आपल्याला माहीत. श्रेय आपल्याला मिळालं. त्याला काय मिळालं? तो या गावातला सगळ्या जास्त शिकलेला माणूस. केवळ महार असल्यानं त्याला त्याचा काहीही उपयोग करता आला नाही. गावकीची कामे करत कुजणं त्याच्या नशिबी आलं. आपण त्याच्यासाठी काहीही केलं नाही. अंगी इतकी कुवत असूनही गावकीत सडणं त्याच्या नशिबी आलं. तो आपल्यापेक्षा वयाने मोठा. पण समजा, त्याचा एखादा पोर या बाबुशाच्या पोरासोबत आपली चिठ्ठी घेऊन मुंबईला जाऊ शकतो. त्या मोठ्या शहरात जातपात तितकी उरत नाही, असं ते दोन्ही कोमटी शेठ सांगत होते. तिथे बांधकामाची कामे आहेत. कापडगिरणीतली कामे आहेत. मच्छिमार बोटीवरची कामे आहेत. कष्ट करण्याची तयारी असेल तर तिकडे कोणालाही काहीही कमी पडत नाही असं ते लोक सांगत होते. जाऊदेत. उघड्या दुनियेत उभे राहूदेत. रस्ता दिसेलही त्यांना. राधुचा एक मुलगा गेला अन् त्याचं बस्तान बसलं तर तो त्याच्या आणखी एखाद्या भावाला घेऊन जाईल. नंतर आणखी एखाद्याला. पाठोपाठ कदाचित राधुही या चिखलातून बाहेर पडेल. आयुष्याच्या अखेरच्या दिवसात लेकराबाळात त्या शहरात सुखाचे दिवस मोजील. आपल्याला दुवा देत राहील. आपण त्याचे देणे लागतो. त्याने कधीही काहीही मागितलेले नाही. फार काही मोठा खर्च येणार नाही. आपण विचार केला पाहिजे.

2

आंग्लभाषेत म्हणतात तसे आता, बॅक टू स्क्वेअर वन; काळाची वाहती गुठळी गुंडाळून पुन्हा विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या सुरुवातीस. शंभुराव त्याच्या वयाच्या पन्नाशीत. तेजबाई प्लेगाच्या एका साथीत देवाघरी गेलेली. शंभुराव यास तुळशीपासून तीन अपत्ये झालेली आहेत. तिकडे देऊबाई हीस अपत्ये होण्याचे थांबले आहे. तीही शंभुराव याच्यासारखी तिच्या पन्नाशीत. त्या वयात बाईचा ऋतू सहसा संपतो. किमान त्या रस्त्याला तर नक्कीच लागलेला असतो. देऊबाई तृप्त आहे. तिच्या स्त्री असण्याचे सार्थक झाले आहे. अतीव प्रेमसुखातून जन्मलेली तिची बाळे तिच्या निरोगी स्तनांना लुचली आणि विठोबाच्या मायाळू अंगाखांद्यावर खेळत सौंदर्याची लेणी होऊन वाढत राहिली. प्रेमसंबंधातून झालेल्या जन्माची आभा त्यांच्या असण्याभोवती सतत झळकत असते. अवैध संबंधातून झालेल्या जन्माचे सावट अजून त्यांच्या मनावर नाही. त्यांना त्याची जाणीव होईल तेव्हा ते सावट त्यांच्या अस्तित्वाला कोमेजून टाकत कदाचित त्यांना आयुष्यभरासाठी दीनवाणे करून टाकील. पण हे सारे अजून दूर आहे. माचाडावरच्या त्या

झोपडीत ती बाळे आनंदाने जगत आहेत. देऊबाईच्या स्तनांमधले दूध आणि विठोबाचा स्नेहल स्पर्श हे त्यांच्या जगण्याचे बाळबळ आहे. गाईच्या वासरांना किंवा म्हशींच्या पारड्यांना तो जितक्या प्रेमाने कुरवाळत असतो, तितक्याच स्नेहल ओलीने तो त्यांना कुरवाळतो. गायीम्हशींच्या बाळांशी जी भाषा संप्रेषणासाठी त्याने वापरली आहे त्याच भाषेत तो त्या बाळांशी संवाद करतो. ती भाषा त्यांना आपलीशी करावीशी वाटली तर त्यांनी ती करावी. त्यांनी ती न केल्यास त्याची तक्रार नसते. तुळशीची मुले समजा तिथे गेली तरी विठोबा त्यांना तितक्याच प्रेमाने जवळ घेतो.त्याच्या ठायी आपपरभाव नाही. शंभराव याच्या ठायीचा रतीसंबंधाचा आवेग आता ओसरलेला आहे. पण तो थांबलेला नाही. तुळशीचे ठायीचा संसार त्याच्याकडून सुरू आहे. तुळशी हिची त्यासंबंधी तक्रार नाही. विनातक्रार आणि बिनबोभाट शय्येत साहचर्य ही तिची आधीपासूनची जी खासियत आहे, ती नित्यनूतन आहे.

शंभुराव याचा सरंजाम आणि पसारा वाढलेला आहे. जुना सालकरी गोपाळ आबा पाटील आता म्हातारा झालेला आहे. त्याच्यावर आता फक्त देखरेखीचे काम सोपविण्यात आलेले आहे. रोजाने कामाला आणायची माणसे तो आणतो, अटकलीने कामे करून घेतो, त्यांचे हिशेब तो नीट सांगतो. बाकी नवीन दोन सालगडी आहेत. विठोबाची स्वतंत्र दुनिया आहे. त्याच्या गायी-म्हशी, त्याची पोरेबाळे प्रामुख्याने तिच्यात असतात. फिरस्त्यांकडून सोडवून आणलेली भुंडी गाय त्याची खास लाडकी होती. सुखाने नांदून वर्षभराआधी ती मेली. तेव्हापासून आहारात दूध वापरणे त्याने सोडून दिलेले आहे. आपल्या प्रेमाचे काही देवाघरी गेले की त्याच्या आठवणीसाठी काही ना काही सोडावे असा संकेत कुणबी लोकात असतो. भुंडीसाठी त्याने दूध कायमचे सोडले आहे. भुंडीला झालेले दोन गो-हे; नाझर आणि गुजर आता साह्यादाती होऊन शेतकामात असतात. येता-जाता ते दिसले की विठोबा त्यांना जवळ घेऊन त्यांची मान कुरवाळतो आणि त्यांच्या पाठीवर थाप मारतो. त्या दोघांनाही विठोबाचा तो स्पर्श आणि त्याची भाषा समजते, ही आता कोणाच्याहीसाठी नवलाची गोष्ट उरलेली नाही. बाकी देऊबाई, शंभुराव, गोपाळा हे असतातच. विठोबाही आता म्हातारा झालेला आहे. पण तो दणकट आहे. दुभत्या गायी-म्हशी रोज तो स्वतःच पिळतो. सगळयांना पोटभर मिळूनही भरपूर दूध उरते. देऊबाईने त्यातून मार्ग काढला आहे. दही लावणे, लोणी काढणे, तूप तयार करणे यात तिचा हातखंडा आहे. रांजणात दही घुसळून लोणी काढले की उरणारे ताक नेण्यासाठी मोठाली भांडी घेऊन गोरगरीब बाया येतात. ते इतके चवदार असते की, ताकात ताक देऊबाईचं. बाकीचं समदं फुळळक वानाचं. अशी म्हणच साल्पीत पडलीय. लेकराबाळांनी पुरेपूर खाऊनही भरपूर तूप उरते. मग ते घेऊन विठोबा घोडनदीला जातो. तिथे देऊबाईचे खास ठेपे आहेत. ते सगळे मारवाडी जैन लोक आहेत. त्यांना देऊबाईच्या तुपाची गुणवत्ता माहीत आहे. ते लोक योग्य दाम देऊन आनंदाने ते घेतात. ते तूप ते सारे घरात वापरण्यासाठी घेतात. आलेले पैसे शंभुराव घेत नाही. देऊबाईच्या सांगण्यावरून विठोबाने तसे प्रयत्न केलेले आहेत. त्यास शंभुराव नम्र नकार देतो. विठोबा तो नकार समजावून घेतो आणि नम्र सौम्य हसतो. शंभुराव देऊबाईस म्हणतो, विठोबा गायी-म्हशींना सांभाळतो. तू बाकी सगळं करतेस. घरात दूधदुभतं मुबलक आहे. ते पुरेसं आहे.

मी पैसे घेण्याचा काय संबंध? देऊबाई पैसे गाठीला बांधते आणि मऊ सायीसारखी हसते. तिला, ताकात ताक देऊबाईचं, बाकीचं समदं फुळळक वानाचं. आठवतं.

काही वर्षांआधी शंभुराव याने बाबुशा इनामदार याचा पोरगा लियाकत आणि राधु वाघुले, महार ; याचा थोरला मुलगा, त्याचे जे काही त्याचे नाव असेल तो; यांना राजूशेठ वंजारी यांच्यासाठी खास चिठ्ठी सोबत देऊन मुंबईस पाठविले होते. ते दोघे त्या नवलनगरीत गेले. त्यांचा मगदूर पाहून राजूशेठ यांनी लियाकत यास दिनशॉ माणेकजी पेटीट यांच्या एका सूतगिरणीत कामाला लावले. राधुचा मुलगा सुद्धा त्या कामास लायक होता. पण गिरणीत काम करताना अस्पृश्य लोकांशी भेदभाव होतो, हा अनुभव असल्याने त्यांनी त्यास स्वतः च्या कामात घेतले. ही दोन्ही पोरे देशावरून गेलेली. मुंबई नगरीतला गजबजाट पचवून अनेक शक्यता धुंडाळत त्यांनी त्या नगरीच्या कोलाहलात स्वतःचे पाय रोवले. पैकी लियाकत गिरणीत रुळला. तिथल्या कामात त्याची विश्वासार्हता इतकी वाढली की नवीन भरती करताना त्याने कामगार आणावेत आणि व्यवस्थापनाने ते घ्यावेत असे होऊ लागले. अशा लोकांना देशी भाषेत जाबर म्हटले जाते. तसा तो जॉबर झाला. साहजिकच साल्पी येथील शिंपी, कुंभार, सुतार, कोष्टी अशा आणि यासादृष्य जातीतील तरुणांना गिरणीत काम मिळू लागले. हळूहळू कुणबी, माळी अशा शेतकरी जातीतील तरुण सुद्धा गिरणीत काम मिळवू लागले. लियाकत याची साल्पी येथील पत वाढू लागली. जातीतली पोर पाहून त्याचा बाप बाबुशा याने मुंबईतच त्याची शादी ठोकून दिली. तो वर्षाकाठी चार दिवस का होईना; उघड माथ्याने साल्पीत वावरू लागला. पाटलाच्या पोरीला घेऊन पळून जाण्याची त्याची कहाणी मागे पडू लागली. या सा़ऱ्याचा बाबुशा इनामदार यास विशेष संतोष असे. त्या

बाबतीतली आपली कृतज्ञता शंभुराव याजकडे येऊन तो प्रकट करीत असे. राधु महाराच्या मुलाने काही दिवस राजूशेठ यांच्या बांधकाम व्यवसायात काम केले. गवंड्यांच्या हाताखाली काम करत असताना तो सजग चौकसपणे अनेक व्यवहार न्याहाळत होता. महाराची जात जात्याच जास्त चौकस. प्रतिकूल परिस्थितीत टिकण्याची वेळ ज्या समूहावर येते त्यास तसे असावे लागत असेलच ना! तशा परिस्थितीचा अनुभव महार या जातीस अधिकोत्तम. तेव्हा राधुच्या मुलाच्या लक्षात आले की खाटिकखान्यात, दुधापासून खवा तयार करण्याच्या मोठाल्या भट्ट्यात, माझगाव डॉकयार्ड मध्ये ओझी उचलण्यात रोजगार खूप अधिक आहे. ती कामे अधिक कष्टाची आहेत. पण पैसाही अधिक आहे. आणि ही कामे अस्पृश्यांसाठी खुली आहेत. खाटिकखान्यात बैलांची किंवा टोणग्यांची कत्तल करण्याचे काम अधिक कौशल्याची मागणी करणारे असते. मृत जनावराला फाडण्याचा अनुभव तिथे तितका उपयोगी नसतो. पण समजा जे मांस तयार होते त्यास ठोकून मऊ करण्याच्या कष्टप्रद कामासाठी लोक सहजी मिळत नाहीत. तसेच दुधापासून खवा तयार करताना जाळ घालणे किंवा कोणत्याही भट्टीस जाळ घालणे हे काम फार कठीण असते आणि तिथे रोजगार अधिक असतो. माझगाव डॉकयार्ड किंवा आणखी कुठेही ओझी उचलणे हेही असेच कष्टप्रद असते आणि त्यात पैसा अधिक असतो. राधुच्या मुलाने बांद्रा येथील एका कत्तलखान्यात काम मिळविले. तिथे प्रामुख्याने टोणगे कापले जात असत. तिथे काम करत असताना त्याने हळूहळू टोणग्यांना मारण्याच्या कलेत पारंगतता

प्राप्त करून घेतली. मुंबईत स्वतः रुजल्यावर त्याने एकेक करीत आपल्या भावांना तिथे आणून एकेका कामात रुजवले. अखेर तो त्याच्या आईवडिलांना मुंबईस घेऊन गेला. त्याच्या नादाने अनेक महार आणि मांग तरुण मुंबईस जाऊ लागले. त्यांच्या लक्षात आले की त्या महानगरात जाती जात नाहीत पण त्या तितक्या बोचत सुद्धा नाहीत. वस्त्या जातवारच होतात. पण तुम्ही तिथे अधिक मोकळा श्वास घेत जगू शकता.

राधुचा मुलगा काय किंवा बाबुशाचा मुलगा काय; त्यांना मुंबईचा रस्ता दाखविण्यास शंभुराव हा निमित्तमात्र होता. पुढे त्यांनी त्यांच्या हिमतीवर स्वतःचे बस्तान बसविलेले होते. आणि हळूहळू आपल्या सोबत अनेकांना त्यांनी तो रस्ता खुला केलेला होता. तरीही त्यांच्या नजरेत शंभुराव याची जागा मुहूर्तमेढीची होती. विशेषतः राधु; ज्याला त्याच्या मुलांनी अत्यंत प्रेमाने मुंबईस नेले होते आणि ज्यास आता स्वतःच्या जगण्यासाठी काहीही काम करावे लागत नव्हते; तो त्याला वाटेल तेव्हा पाहिजे तितकी मोकळी सुट्टी घेऊन साल्पी येथे येत असे. खेरीज लियाकत हा गावी आला की शंभुराव यास भेटत असे. आणि बाबुशाही आपल्या लेकाचे सुखाचे जगणे पाहण्यासाठी मुंबईस जाऊन राहात असे. राधु आणि बाबुशा यांची तिथे राजूशेठ वंजारी यांची भेट होत असे. बोलणी होत. त्यात या दोघांच्या बाजूने शंभुराव असेच. म्हणून राजूशेठ त्यांना प्रत्येक वेळी शंभुराव यांनी मुंबई येथे यावे अशी भावना अंतःकरणापासून प्रकट करत असे. परिणामी राधु आणि बाबुशा यांचा शंभुराव यास मुंबईस जाण्याचा आग्रह कायम असे. अशात एकदा राधु वाघुले याने राजूशेठ वंजारी यांचा निर्वाणीचा खलिता शंभुराव यास कायावाचामने कथन केला: की बाबा, 'आपल्या शब्दासाठी आम्ही जे काही केले ते केले. ते काही विशेष थोर आहे असे आम्ही म्हणत नाही. पण हे लोक भेटतात आणि आपली आठवण काढतात. ते फार आदरपूर्वक ते करतात. आम्हीही आपला आदर करतो. पण आम्ही इथे केलेले काम आपण पाहिलेले नाही याचा आम्हास खेद फार. आमचा भाऊ व्यंकूशेठ कालेवार तर आता देवाघरी गेलेला आहे. उद्या मीही पटकन इथून उलथलो तर आपल्या मनास यातना होतील, की बाबा यांनी इतके बोलावले आणि आपण गेलो नाही. सबब वेळ न दवडता येणे आपणासाठी हितकर. त्यासंबंधी विचार स्वार्थमूलक विशेष करावा.' तेव्हा आत्मियतेच्या खोल ओलीसकट त्या शब्दातील गरम झळा आणि त्यांच्यातली धग शंभुराव यास विशेष जाणवली. आणि त्याने राधु याचे सोबत मुंबईस प्रस्थान केले.

राधु याचे सोबत मुंबईस जाताना जातपात, शिवाशिव सोबत होतीच. म्हणून तिथे गेल्यावर राधु याने शंभुराव याची एका कुणबी कुटुंबात राहण्याची व्यवस्था केली. तेव्हा शंभुराव राधुस म्हणाला, 'जातपात, शिवाशिव या गोष्टी आहेतच. पण त्या आपल्या गावच्या रहाटीत. इथे या शहरात त्या कशाला? मी किंवा तू गावी भेटलो की आपल्याला त्या पाळाव्या लागतील, हे खरेच आहे. पण इथे ते कशाला? माझा आजा आणि चुलता तुमच्या घरचे अन्न गावी सुद्धा बेदिक्कत खात होते. ते हिंमतबाज लोक होते. मी ते केलेले नाही. तितकी हिंमत माझ्यात नाही. पण थोडीफार तर आहेच. मी इथे तुझ्या घरात राहीन. लियाकतच्या घरी राहीन. मला त्यात दिक्कत नाही. गावी गेलो की जातपात आहे. तिथे ती मी ओलांडणार नाही. पण इथे ती मी पाळणार नाही.'

सबब शंभुराव राधु आणि लियाकत यांच्याकडे राहिला. त्याने राधुसोबत राणीचा

बाग, ट्रामगाड्या, माहीमचा किल्ला, घारापुरीची लेणी, व्हिक्टोरिया टर्मिनस, महापालिकेची इमारत अशा अनेक गोष्टी पाहिल्या. फोर्ट भागातील गोऱ्या लोकांची किल्लेवजा घरे पाहिली. न कळणाऱ्या अनेक भाषा ऐकल्या. अनेक वेगळे लोक, वेगळे पेहराव, रीतीभाती यांच्या कल्लोळात तो वावरला. ते सगळे झाल्यावर राधु त्यास राजूशेठ यांच्याकडे घेऊन गेला. तोपर्यंत व्हिक्टोरिया टर्मिनस, महापालिकेची इमारत, टाईम्स ऑफ इंडियाची इमारत या सगळ्या इमारती या कोमटी लोकांनी बांधलेल्या आहेत हे त्यास कळले होते आणि त्याचे त्यास नवल वाटले होते. कितीतरी भव्य कापडगिरण्या सुद्धा या कोमटी लोकांनी बांधलेल्या होत्या. त्याने पाहिलेल्या इंदौर आणि महेश्वरपेक्षा ही दुनिया फारच वेगळी होती. अखेर राजूशेठ यांची भेट झाल्यावर ते राधु यास म्हणाले, 'आजवर शंभुराव हे आपले पाहुणे होते. यानंतर ते माझे पाहुणे असतील. माझ्याकडे राहतील.' त्यास राधु याने आनंदाने संमती दिली. राजूशेठ यांचे घर मोठे होते. सगळ्या समृद्धीचा वावर तिथे होता. पण एकूण वागणूक अगदी साधेपणाची होती. शौचविधीची घरातच सोय असणे हा प्रकार तिथे शंभुराव याने पहिल्यांदा पाहिला. त्यास त्या गोष्टीशी जुळवून घेणे कठीण गेले. शौचविधीसाठी पाण्याचा वापर करणे एकवेळ ठीक, पण घरातच हगणे हे त्याला अतयं वाटले. पण ते करणे भाग तर होतेच. बाकी राजू कोमटी यांच्या वागण्यातील साधेपणाने तो भारावून गेला. त्यांच्याकडूनच पूर्वी एकदा ऐकलेल्या जोतीराव फुले नामक इसमाचा विषय पुन्हा निघाला. हे फुले माणूस काही वर्षांआधी वारलेले होते. ते राजूशेठ यांच्या मनात कायम वसतीला होते. ब्राह्मण हे इराण नामक देशातून आलेले आर्य लोक आहेत. त्यांनी जातींची व्यवस्था निर्माण करून बाकी सगळ्या जातींना हजारो वर्षे गुलाम करून ठेवले आहे. सध्या जी गोऱ्या लोकांची राजवट आपल्या इथे आहे, तिच्या उदार दृष्टिकोणाचा फायदा घेऊन बाकी जातींनी जागे होऊन शिकले आणि शहाणे झाले पाहिजे, असे फुले यांचे म्हणणे होते. कोल्हापूर येथे शाहू छत्रपती नामक एक राजे आहेत. ते फुले यांना गुरू मानतात. तसेच बडोदा येथे सयाजीराव गायकवाड नावाचे तसेच राजे आहेत. त्यांनीही लोक जागे व्हावेत म्हणून काम चालविले आहे. बाकी इंदौर, ग्वाल्हेर, धार, देवास अशा कैक ठिकाणी मराठे राजे आहेत. त्यांची मदत घेऊन सगळ्या लोकात शिक्षण पेरले पाहिजे, अशा कितीतरी गोष्टी राजूशेठ बोलत होते.

राजूशेठ यांच्या बोलण्यातील उत्कटता शंभुराव याचे पर्यंत अवश्य पोहोचत होती. पण त्यांचे प्रतिपादन त्याला तितके समजत नव्हते. गावाच्या ज्या व्यवस्थेत तो वाढला होता, तिथे बामण इतरांना गुलाम म्हणून वागवतात, असे त्याच्या अनुभवाला आलेले नव्हते. ते वरिष्ठ जातीचे लोक असतात. ते शिवताशिवत पाळतात. ते शिकले-सवरलेले असतात. त्यांच्या त्यांच्या जागी ते जे काही असतात ते असतात. गरीब बामण तर तिथीवार नक्षत्र सांगून मिळणाऱ्या कोरड्या शिध्यावर गुजराण करतात. जमीनजुमला असलेले मालदार बामण सुद्धा असतात. पण ते बाकी मालदार कुणब्यांसारखेच इतरांना अनेक कामांसाठी वापरतात. त्यात फरक काय असतो? अन् जाती बामणांनी कशा निर्माण केल्या असतील? त्या तर देवानेच निर्माण केलेल्या. ज्याने त्याने आपल्याला जन्मानुसार दिलेले काम नीट करावे यात गैर ते काय? जन्म कोणाच्या हाती असतो? माणसाच्या शरीरात मेंदू असतो,

हृदय असते आणि आतडीकातडी असतात. गुदाशय आणि गुदद्वार असते. प्रत्येक अवयवाला आपले आपले काम करावे लागते. तेव्हाच तर शरीर नीट चालते. शरीरातच सगळ्या जाती असतात. त्या कशा नाकारता येतील? मेंदूने गुदद्वाराला स्पर्श करावा अशी इच्छा कशी चालेल? लिहिणे वाचणे हा बामणांचा धंदा आहे. त्यांनी तो करावा. त्याचा कुणब्यास काय उपयोग? पाभर धरणे, पेरणी करणे किंवा मोटा हाकणे या गोष्टींचा लिहिण्या वाचण्याशी काय संबंध? कुंभार, चांभार, सुतार, सोनार यांच्या कामात त्याला काय जागा? किंवा पूर्वी आपले लोक घोड्यावर स्वार होऊन तलवारबाजी, भालाफेक करत लढाया करत तेव्हा त्यासाठी लिहिणे-वाचणे कुठे आवश्यक होते? आता ते दिवस समजा गेले. आज ज्याने त्याने आपले आपले काम नीट केले की गावाचा गाडा चालतो. आपण शिकलो. त्याचा आपल्याला काय फायदा झाला? राधु महार शिकला. त्याला काय मिळाले? त्याची मुले इथे आली, रहिवसली; म्हणून आता म्हातारपणी तो सुखाचे चार घास खातोय. शंभुराव यास वाटले, दुनिया बदलत आहे. शहरात लोक अनेक वेगवेगळी कामे करतात. अनेक सगळ्या जातीचे लोक एकाच प्रकारची कामे करतात. तेव्हा इथल्या दुनियेत राजूशेठ म्हणतात त्याला जागा कदाचित असेलच. पण गावाच्या रहाटीत त्याचा काय उपयोग? अर्थात आपल्या मनात आले ते त्याने स्वतःशीच ठेवले.

एके दिवशी राजूशेठ म्हणाले की, त्यांचा एक जुना गोरा दोस्त अंतोनी बलाकसिमित म्हणून आहे. तो आता निवृत्त झालेला आहे आणि

विलायतेत राहतो. पण तो आता काही दिवसांसाठी इकडे आलेला आहे. विलायत आणि तिकडच्या आणखी देशात लढाई लागण्याची शक्यता उभी राहिली आहे. तेव्हा तिथल्या सोजिरांची आणि बाकी लोकांची सुद्धा कापडाची गरज वाढलेली आहे. ते कापड मुंबईतील गिरण्यांनी पुरवावे याबाबत बोलणी करण्यासाठी तो आलेला आहे. बलाकसिमित यास मी दोस्त म्हणतो खरा. पण तो एक फार मोठा गोरा अधिकारी होता. त्याला फुले यांच्या कामाविषयी फार आदर होता. त्यामुळेच माझी त्याच्याशी ओळख झाली. माझ्या बांधकाम कंत्राटांच्या अनेक गोष्टीत त्याची मला फार मदत झालेली आहे. तो आपल्या लोकात कायम मिळून-मिसळून वागलेला आहे. त्याची बायको सुद्धा इथलीच आहे. ते दोघेही इथे आलेले असून फोर्ट भागात एके ठिकाणी उतरलेले आहेत. मी त्यांच्या भेटीला जाणार आहे. तेव्हा तू माझ्यासोबत येऊ शकतोस.

'मी कशाला?'

'प्रत्येक गोष्टीसाठी कारण कशाला पाहिजे? तुला एक चांगला गोरा माणूस बघायला मिळेल.'

'मला चालेल. पण तुमची कामाची बोलणी होणार असतील तर त्यात माझे असणे कदाचित अडचणीचे होईल.'

'तो माझा प्रश्न असू शकतो. तसे असते तर मी तुला माझ्यासोबत चल असे म्हणालोच नसतो. आता माझे त्याच्याकडे काहीही काम नाही. तरीही मला त्याला भेटायचे आहे. तो हिंदी लोकांविषयी आस्था असलेला गोरा इसम आहे.'

'तुम्ही म्हणता तर ठीक आहे. आपण अवश्य जाऊ."

फोर्टातल्या एका अत्यंत भव्य दगडी इमारतीत ते दोघे गेले.

मुंबईतल्या वैभवाचे आश्चर्य वाटण्यापल्याड आता त्याचे डोळे सरावले होते. तरीही ते घर आतून पाहताना शंभुराव दिपून गेला. बाहेरचा दरवाजा उघडण्यासाठी आधी जो दरवानवजा इसम आला, त्यालाच तो बिलिकसिमित समजला. कारण तोही गोरा आणि उत्तम पोषाख केलेला होता. पण अतिशय उंच छताच्या एका खूप मोठ्या जागेत बसण्यासाठी त्यांना आदबीने संकेत करीत. तो तिथल्या एका दारातून आत निघाला तेव्हा राजूशेठ म्हणाले, 'आता हा नोकर आत जाऊन आपण आल्याची वर्दी देईल. हे गोरे लोक वेळ पाळण्यात फार काटेकोर असतात. दिलेल्या वेळी आपण पोहोचलो नाही समजा; तर ते भेटीला नकारही देऊ शकतात.' तेव्हा शंभुराव यास समजले की आपल्याला आत घेऊन आला तो नोकर. आत येण्यासाठीचा दरवाजा दोन पुरुष उंचीचा होता. बैठकीच्या जागेत वर छताला हंड्या आणि झुंबरे होती. पुरुषभर उंचीचे आरसे होते आणि तितक्याच उंचीच्या खिडक्या होत्या. पायाखाली असलेल्या जाजमात वहाणा गायब झाल्यात जमा होत्या. 'या लोकांच्या घरात वहाणा घालूनच जायचे असते. वहाणा काढून गेल्यास त्यांना तो अपमान वाटतो,' असे राजूशेठ यांनी आधीच सांगून ठेवलेले होते. तरीही इतक्या महागड्या मऊ जाजमावरून चालताना वहाणा काढून ठेवण्यासाठी जागा चाचपडायला त्याचे मन चुकले नाही.

आणखी जरा वेळाने तो नोकर ज्या दारातून आत गेला होता तिथून बाहेर आला आणि तिथेच दाराशी जरा अलीकडे घडी घातलेल्या लाकडासारखा अत्यंत निर्विकार उभा राहिला, तेव्हा पुढे घडणारे माहीत असल्यासारखे राजूशेठ वंजारी बसल्या जागी उठून उभे राहून दगडासारखे स्तब्ध झाले, तेव्हा काहीही न कळून शंभुरावही तसाच उभा राहिला, त्याक्षणी त्या दारातून एक भव्य अंगयष्टी असलेला गोरा इसम बाहेर आला आणि सहज चालत राजूशेठ यांच्यासमोर येऊन त्याने आपला बोटे जुळविलेला तळहात उभा त्यांच्या समोर धरला तेव्हा शिस्तीने आपला तळहात त्यास जोडत वाकून आपले कपाळ त्या जोडावर टेकवत राजूशेठ यांनी हलकेच त्या जोडाचा मुका घेत असल्यासारखे केले. त्यावेळी राजूशेठ यांनी आधीच त्यास या प्रकारे वागायची तालीम दिली होती, ती विसरून शंभुराव याने आपला डावा हात आपल्या छातीस लावून वाकून उजव्या हाताने ते गोरे इसम -जे बलाकसिमित साहेबबहादूर; आहेत याची शंभुराव यास खात्री पटली होती- त्यांना मुजरा केला. त्यावर त्या इसमाने स्मित करीत राजूशेठ यांना विचारले, 'हे कोण?'

'मित्र आहेत. मी मुद्दाम त्यांना घेऊन आलो.'

'इज ही फ्रॉम कोल्हापूर?, तिकडे महाटे लोक अशा रीतीने अभिवादन करतात.'

'नाही. ते माझ्या गावाशेजारचे आहेत. घोडनदी जवळ साल्पी नावाचे गाव आहे. हे तिथले शेतकरी आहेत. मातब्बर आहेत. साल्पी गाव अहमदनगर जिल्ह्यात पडते तसे. पण घोडनदीला जवळ.'

'अहमदनगर? मी काही वर्षे तिकडे होतो, हे तुला माहीत आहे काय?"

'नाही. आपण तर मुंबईतच भेटलो.' 'ठीक, ठीक. बसा, बसा.'

तिथे बसणे शंभुराव याच्यासाठी तितके आरामशीर नव्हते. सगळीकडून भरघोस कुशन असलेली ती एक भली मोठी खुर्ची होती. आणि बसल्या जागी माणूस तिच्यात बुडत होता. तरीही त्या दोघांच्या बसण्याचे निरीक्षण आणि अनुकरण करीत शंभुराव बसून राहिला.

साहेब वयस्कर होता. सत्तरीच्या घरात असावा. तो म-हाटी भाषा उत्तम प्रकारे बोलत होता. ती काहीशी गावठी वळणाची आणि शंभुराव यास जवळची वाटणारी होती. अनेक नव्या-जुन्या गोष्टी त्याच्या संभाषणात येत होत्या. राजूशेठ यांनी केलेली अनेक कामे, भारत देशातील गरीब लोकात वसत असलेले अज्ञान आणि अंधश्रद्धा, बारके बारके स्वार्थभाव, फसवणुकीची वृत्ती, म-हाटे लोकांची युद्धखोर वृत्ती, त्यांच्यातली दिलेरी, कोणत्या तरी जर्मनी नावाच्या देशाचे वाढलेले बळ, पंजाब, बंगाल आणि गुरखे नावाचे योद्धे, असे अनेक विषय. खेरीज तो जोतीराव फुले नामक इसम होताच. खेरीज शाहू छत्रपती नावाचा कोल्हापूर येथील कोणीतरी राजा; त्याचा उल्लेख आला. काँग्रेस नावाचे काहीतरी. फिरोजशाह मेथा, दादाभाई नवरोजी, बाळ गंगाधर टिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय अशी कितीतरी अनोळखी नावे. अंग्रेज लोक ज्ञानी आहेत आणि म्हणून त्यांचे राज्य आहे, हे शंभुराव यास माहीत होते. पण अल्पशिक्षित राजूशेठ यांनाही दुनियेची चांगलीच माहिती होती याचे त्याला आश्चर्य वाटले. मुंबईत राहिल्याने आणि अनेक वेगवेगळ्या लोकांच्या सहवासात आल्याने असे ज्ञान होत असेल असा होरा त्याने बांधला. साल्पी येथे जगताना अशा माहितीची काहीही जरुरी पडत नाही. तिच्यावाचून कोणाचेही काहीही अडत नाही, असे त्याचे मत झाले. पण आपल्या भोवती आपाल्याला रुची नसलेली बरीच मोठी दुनिया आहे याचे भान त्याला आले. अंग्रेज हे परके लोक आहेत आणि राज्य करण्यासाठी सात समुद्र ओलांडून ते आलेले आहेत, हे त्याला माहीत होते. पण हल्ली त्या लोकांच्या विरोधात इथले अनेक लोक बरेच उद्योग करीत आहेत, याचा प्रत्यय या निमित्ताने त्याला आला. त्यांचे बोलणे ऐकत असताना त्याला ते वेधक वाटत होते. पण राजूशेठ यांनी आपल्याला नेमके कशासाठी इथे सोबत आणले आहे, याचे त्याला काही कळेनासे झाले. राजूशेठ यांची पोहोच कुठवर आहे, हे आपल्याला दाखवण्यासाठी? की गोरे लोक जवळून दाखवण्यासाठी? की तो वारलेला फुले इसम किंवा कोण तो शाहू राजा याची माहिती आपल्याला कळावी म्हणून? शंभुराव यास काहीही निश्चित करता येईना. तरीही जे दिसते आहे, ते एक वेगळी दुनिया दाखवणारे आहे. आणि कदाचित तेच आपल्याला बघायला मिळावे असे त्यांना वाटले असावे असा त्याचा ग्रह झाला.

बोलणे संपण्याच्या बेतात असताना एक सौजन्य म्हणून किंवा सभ्यतेने वागण्याचा एक भाग म्हणून कदाचित; ते बलाकसिमित साहेब बहादूर यांनी शंभुराव यास त्याचे नाव काय असे विचारले. तेव्हा जवळपास एकाच वेळी, शंभुराव आणि राजूशेठ म्हणाले, 'सातपाटील.'

'सातपाटील?'

बलाकसिमित यांनी स्वतःशीच उद्गारवाचक असा प्रश्न केला. त्या नावामुळे त्यांना क्षीणपणे काहीतरी आठवले असावे, असे दिसले.

'मी आधी सांगितले ना साहेब, हे शंभुराव सातपाटील. शंभुराव रखमाजी सातपाटील. साल्पी नावाच्या गावात राहणारे आहेत. तुम्ही ज्या अहमदनगर जिल्ह्यात काम केलेत, त्याच भागातले आहेत हे. तुम्ही तिकडे होतात तेव्हा हे चार-दोन वर्षे वयाचे असतील. आणि जाणते असते तरी साहेब लोकांची माहिती घेण्याची गरज बारक्या गावातल्या लोकांना कुठे पडते? किंवा तिथपर्यंत यांना कुठून पोहोचता येणार? अर्थात मलाही आपण

तिकडे होता हे कुठे माहीत होते? जोतीराव यांच्यामुळे आपली ओळख झाली.

'फार मोठा माणूस होता जोतीराव. अनेकांना ते नाही कळले. पण पुढच्या पिढ्यांना ते नक्कीच कळेल. अर्थात तुम्हाला त्यांचा सहवास अधिक लाभला. तुम्हास ते नक्कीच जाणवले असेल. गरीब आणि दुबळ्या लोकांविषयी इतकी कणव असलेले असे लोक अवतरतात आणि ते पुढच्या अनेक पिढ्यांसाठी स्वत्वाच्या जाणिवेचे कुंभ ठेऊन जातात. ब्रिटनमधल्या स्कॉटलंड नावाच्या देशात मी जन्मलो, वाढलो. मी स्कॉट आहे. फुले यांचे आयुष्य आमच्यासाठी प्रेरणा देणारे आहे. त्यांच्याविषयी पुस्तक लिहायचे

माझ्या मनात आहे. बघूया. पण, आता आपण बसा. मी जरा आत जाऊन येतो.'

ही जरा वेगळी सूचना होती. बैठक संपली हे सरळच होते. ते सूचन झाले की उठायचे आणि सौजन्यपूर्वक निघायचे, हा शिरस्ता होता.

तो शंभुराव यास तितका माहीत नसला किंवा समजत नसला तरी राजूशेठ यांच्या तो परिचयाचा होता. त्यात साहेबबहादूर यांचे हे आत जाऊन येण्याचे प्रकरण कसे उपस्थित झाले, असा सौम्य प्रश्न राजूशेठ यांच्या मनात उपस्थित झाला. पण म्हणून त्यासंबंधी साहेब बहादूर यास विचारणे, खुलासा मागणे हे शक्यच नव्हते. ते पुन्हा आतून बाहेर आले आणि म्हणाले, 'उद्या संध्याकाळी याच वेळी आपणास इथे येणे शक्य आहे काय?'

'का शक्य नाही? साहेबमजकूर तसे म्हणतात हे त्यांचे सौजन्य. ते बोलावतात हा त्यांचा मोठेपणा.'

'अर्थात. नक्कीच.' 'तुम्ही दोघेही या. जेवणासाठी या.'

अरे बापरे! जेवण! अंतोनी बलाकसिमित यांचे निमंत्रण? इतक्या जवळिकीचा अनुभव; ते कितीही मैत्र वगैरे म्हणत असले तरी राजूशेठ यांना तो नव्हता. हे असे कसे काय झाले? साहेब आत जाऊन बाहेर आले, याच्या दरम्यान काही झाले काय?

'माझी बायको महाटी आहे हे आपणास माहीतच आहे. तिची इच्छा आहे. आणि अर्थात माझीही.'

अंतोनी बलाकसिमित साहेब बहादूर हसत हसत म्हणाले.

दुसरे दिवशी जाण्याआधी राजूशेठ यांनी अंग्रेज लोक यांचे भोजनप्रसंगीचे रीतीरिवाज, पोशाख, काटे आणि चमचे यांचा वापर, खुचीत बसून टेबलावर मांडलेल्या ताटात खाणे इत्यादी अनेक बाबींची माहिती ठिकठिकाणी मिळवली आणि ती शंभुराव यास काटेकोरपणे सांगितली तेव्हा, भीक नको पण कुत्रं आवर अशी त्याच्या मनाची अवस्था झाली. पण साहेबाचे निमंत्रण ; ते टाळणेही शक्यच नव्हते. म्हणून राजूशेठ यांच्या सोबत सगळे तपशील आठवत शंभुराव तिथे गेला. पण प्रत्यक्ष जेवताना साहेब स्वतःच काटे-चमचे न वापरता आरामात जेवत असल्याचे त्यांना दिसले. तेव्हा शंभुराव यास विशेष संतोष झाला. साहेब म्हणाला सुद्धा की, 'तुम्हा हिंदुस्तानी लोकांची कसलेही अवडंबर न माजवता थेट हातातोंडाची गाठ घालण्याची पद्धत मला आवडते. त्यात एक प्राणिज सहजता आहे. आणि माझ्या म-हाटी बायकोमुळे अनेक बाबतीत मी पुरता हिंदुस्तानी झालेलो आहे. त्यातली जेवण ही एक आहे. अंग्रेज लोकांसोबत जेवताना नाईलाज होऊन मी त्यांचे रीतीरिवाज पाळतो. पण माझ्या घरात हिंदुस्तानी वळण मुख्य असते. आणि ते मला आवडते."

असे ते एकूण सगळे चविष्ट, मुबलक आणि सुखकारक झाल्याने या दोघास विशेष संतोष झाला. अखेरीस मुखशुद्धीसाठी बडीशेप-सुपारी यांचे चूर्ण सुद्धा देण्यात आले. ते राजूशेठ यांच्या परिचयाचे असले तरी शंभुराव यास नवीन होते. तरीही त्यासंबंधात अंगभूत हुशारीने त्याने वेळ यथायोग्य साजरी केली. एकूण माहौल बाहेर पडण्याचा आणि श्रीमान अंतोनी बलाकसिमित साहेबबहादूर यांनी; आपल्याला स्वतःच्या पंक्तीला समजा नसेल तरी, एका टेबलावर समोरासमोर बसून जेवण्यासाठी, स्वतःच्या किंवा ते जिथे उतरले आहेत अशा ; घरी बोलावले, हा अभूतपूर्व आणि सहसा अलभ्य असा योग आहे, याची मनात प्रचिती घेऊन श्रीमान राजूशेठ वंजारी; कोमटी हे उठण्याच्या बेतात होते आणि श्रीमान शंभुराव सातपाटील हे त्यांच्या अनुकरणास सिद्ध होते ; त्या एका स्नेहल वेळी अत्यंत खेळीमेळीत बलाकसिमित साहेबबहादूर नम्रतापूर्वक राजूशेठ यास म्हणाले, 'सातपाटील यांना मी जरा आत घेऊन जाऊ इच्छितो.'

हे अनपेक्षित होते. आत कशाला? आणि एकटे सातपाटील यांनाच का?

'माझ्यासोबत माझी बायको आहे, हे मी तुम्हाला सांगितलेले आहे. तिची त्यांना भेटण्याची इच्छा आहे.'

हे दोघेही स्तब्ध.

'मी तिला म्हणालो सुद्धा की तू बाहेर इथे हॉलमध्ये येऊ शकतेस. श्रीयुत वणजारी हे एक सभ्य गृहस्थ आहेत, माझे मित्र आहेत. तुझा त्यांच्याशी सुद्धा परिचय होईल. पण ती म्हणाली, मला सातपाटील यांना एकट्याला भेटायचे आहे.'

का, असे कसे विचारायचे? 'ते बहुधा तिच्या ओळखीचे असतील. किंवा आहेत असे तिला वाटते.'

'अवश्य. त्यात हरकत घ्यायचे काय कारण? जा शंभुराव,' राजूशेठ म्हणाले.

ठाणबंद कपड्यातील त्या नोकरवजा इसमापाठोपाठ शंभुराव आत गेले तेव्हा बाहेर बलाकसिमित साहेब बहादूर राजू वंजारी यास सांगू लागले, त्याचे झाले काय की काल आपण भेटलो....

आत तशीच मोठी जागा होती. तितकेच उंच छत होते. अशा छताखाली बसले की, आपण आहोत त्यापेक्षा बुटके आहोत, अशी जाणीव होते, असे शंभुराव याचे कालपासूनचे खासगी निरीक्षण होते. त्याचा उच्चार त्याने केला नव्हता; इतकेच. पण तिथे एकट्याने बसताना ती भावना त्याच्या मनात उगवली. मध्यभागी बैठक व्यवस्था होती. साहेब बहादूर याची स्त्री आपल्या ओळखीची असू शकते, किंवा ती आपल्याला ओळखत आहे, ही गोष्ट त्याच्यासाठी आश्चर्याच्या पल्याडची होती. ती महाटी आहे, हे समजा ठीक. पण आपल्या माहितीची? पाहण्यातली? गो-या साहेबासोबत निघून गेलेली अशी कोणतीही स्त्री त्याला माहीत नव्हती. अगदी साल्पीच्या पंचक्रोशीत कुठेही अशी घटना कधी घडल्याचे त्याने ऐकलेले नव्हते. असुदेत, भेटणारच आहे आता ती. अधिक विचार करून काय उपयोग, असे तो स्वतः ला सांगत होता. तरीही त्याच्या मनात उत्सुकतेची सळसळ होती आणि ती त्याला स्वस्थ बसू देत नव्हती.

अशात आतून एक उंच, पुष्ट, गोरी, प्रमाणबद्ध गरगरीत स्त्री चालत आली तेव्हा स्वतःच्या नकळत तो जागीच उभा राहिला. तिने किरमिजी रंगाचा झगा परिधान केलेला

होता. तिच्या डोईचे अर्धवट पण प्रमाणबद्ध कापलेले केस करडे झालेले होते. तिची कांती मऊ आणि गुलाबसर होती. क्षणभर त्याने तिच्याकडे पाहिले तेव्हा ओळखीचे काहीही त्याच्या मनात शिरले नाही. तिच्या झग्यातून तिची काहीशी ओघळलेली पृथुल स्तने त्याला जाणवली आणि तात्काळ त्याने आपली नजर झुकवली. त्याच्या समोरच्या खुर्चीत बसताना ती म्हणली, "बस. बस.'

तो बसला. त्याची नजर झुकलेलीच राहिली. स्वतःची नजर झुकलेली ठेवण्याची गरज तिला नव्हती.

'मला वळाखलं त्वा?'

भाषेचा हा लहेजा तिच्या असण्या आणि दिसण्याशी संपूर्ण विपरित होता. ती झग्यातली मड्डम होती. ती मुळात महाटी होती, हे त्याला माहीत असले तरी ती बोलली ती भाषा, थेट देशी गावठी होती; ते त्याला विपरीत वाटले. अंग्रेजी पोशाखातली इतकी पुष्ट आणि गोरी बाई महाटी असली तरी, थेट आपल्या बोलीत बोलते? कोण ही?

क्षणभरासाठी नजर उचलून तो म्हणाला, 'नाही. लक्षात येत नाही.' 'रखमा सातपाटलाचा ल्योक ना तू? समद्यात धाकला?'

'हां.'

'आरं, मी उल्फीऽऽ उल्फी! पिराजी सातपाटलाची कोल्हाटीण.' त्याला मारून अज्ञात बेपत्ता झालेली. त्याला लुटून मारून फरार झालेली. हीच बाई या अंग्रेज बहादूर याची बायको? हे कसे असू शकते? जिचा तपासच लागला नाही, ती उल्फी? इतकी ढोली, गोलमटौल? जगण्यातल्या सुखाच्या चरबीचे किती थर तिच्या अंगप्रत्यंगावर दिसताहेत. उंदरांना गिळून पुष्ट होणाऱ्या सर्पिणीसारखी ही बाई. आयुष्यभरात किती पुरुषांना उंदीर करून तू गिळले आहेस! तो धंदाच असतो या बायांचा. प्रत्येक ठिकाणी लुटणे आणि गिळणे. माझ्या बहादूर चुलत्याला मारून, गिळून, आणखी किती जणांचे जगणे गिळून, तू या अंग्रेज बहादूर साहेबाकडे पोहोचलीस? अन् आता या झग्यात आणि तोकड्या केसात म्हातारी होऊन तू किती आत्मविश्वासाने एक कुर्रेबाज साहेबीण म्हणून मला नम्र करू पाहतेस? माझ्या दैत्यासारखी ताकद असलेल्या चुलत्याचा खून केलेला आहेस तू. हलकट कोल्हाटीण.

'सायबांनी मला सांगातलं का असा असा सातपाटील. म्हनलं, नाव सांग नीट. सांगातलं त्यानी. तव्हा मी त्याला सांगातलं का आसं करतानी आसं. मला त्याला भेटायचंय. पिराजी मेला तव्हा लय लहाना व्हतास तू. मपल्या जालनच्या शिणेचा.'

शंभुराव स्तब्ध होता. आतल्या आत उकळत होता. त्याच्या मनात उकळून होणाऱ्या भावनांच्या वाफेला या अंग्रेज बहादूर साहेबाच्या किल्ल्यात बाहेर पडायला जागाच नाहीय, या जाणीवेने तो क्षुब्ध होता.

'तुला वाटत आसन का म्याच तुपल्या चुलत्याला मारलं.' 'त्यात चुकीचं काय?'

'बराबर ह्ये ना! मी कुढं म्हनते तसं. तुम्हाला तसंच वाटन म्हणूनच तव्हा पिराजी म्हनला का लगीच बस घोड्यावर आन निघ....'

तिने तिची कहाणी सुरू केली. पिराजीचे येणे. विषबाधा. तिला निघायला सांगणे. त्यासाठी निकराला येणे. पुढचा तिचा प्रवास. अँथनी ब्लॅकस्मिथ याची भेट. तिची कहाणी

ऐकत असताना हळूहळू त्याला जाणवत गेले की ही बाई जे सांगते आहे, त्यात कसलीही खोट नाही. ते ती तिच्या बेंबीच्या देठापासून सांगत आहे. हे सगळे कोल्हाटणीचे कौशल्य आहे असे त्याने मनात आणून पाहिले. पण ते टिकाव धरू शकले नाही. तिच्या स्वरातील प्रामाणिकतेने सगळ्या गोष्टींवर मात केली. तिचे कोल्हाट्याची पोर असणे, तिचा बाप, मारवाडी, तिचे एकाकीपण आणि त्यात पिराजीची भेट; अशा केक गोष्टी. आभाळातून पाणी पडते आणि खाचखळग्यातून असंख्य धारांमधून वाहात एकत्र होऊन एखाद्या बेलाग कड्याशी जमा होऊन तिथे प्रचंड प्रपातासारखे कोसळू लागते, तसा तिच्या सांगण्याचा प्रवाह अखेरच्या टप्प्यात कोसळत राहिला. आणि तिच्या हृदयातील आर्त कोमल भावनांच्या ओलीत भिजून परोपरी शुद्ध होत गेला. किंवा तो आधीपासूनच तसा होता आणि त्याचे तसे असणे शंभुराव यास उत्तरोत्तर दृगोचर होत गेले.

गेली चाळीसबेचाळीस वर्षे जे तिच्या मनात साचलेले होते, ते आता मोकळे झाले होते. तशी तिच्या पूर्वायुष्याबद्दल ती तिचा नवरा अँथनी ब्लॅकस्मिथ -देशी भाषेत अंतोनी बलाकसिमित- याच्याशी कैक बोलली होती. पण आपण पिराजी यास मारले नाही. त्याला लुटले नाही. त्यानेच मरताना आपल्याला आणि आमच्या मुलाला घोड्यावर बसून दिशा सापडेल तिकडे तातडीने जायला सांगितले. त्यात ह्या माणसाची भेट झाली आणि आयुष्य रेघेला लागले. ते पुरते बदलले. पिराजीने जे जगणे तिला दिले होते त्याच्याविषयीची कृतज्ञता तिच्या मनात कायम आहे. या आणि अशा गोष्टी एका अतळ योगायोगाने भेटलेल्या पिराजीच्या पुतण्यास तिला सांगता आल्या, याची तिला विशेष खुशी होती. त्याला ते खरे वाटो वा न वाटो; त्याने तिच्या भौतिक जगण्यात कोणताही बदल होणार नव्हता. पण या मनात साचलेल्या कुरुपाचा अनपेक्षित निचरा होताना तिला फार सुख वाटत होते. ते तिच्या चर्येवर स्पष्ट दिसत होते. बाकी, ती तिच्या सातासमुद्रापलीकडच्या जगण्यात अगदी खूश होती. तिला कशाचीही ददात नव्हती.

'जालन काय करितो?'

'आरं त्यो तुपल्याच शिनेचा ना! एखाद्या दोन वर्त्यांनी लहान आसन. चांगलं चाललंय त्याचं. लेकरं झाले. संसार झाला. त्याची बायकू तिकडचीच. गोऱ्या लोकातली.'

'सायबापसून तुला काय लेकरं नाय झाले?'

'नायी झाले. सायब लय मोठ्या दिलाचा मानूस. त्यानी जालनलाच आपला ल्योक मानला. तिकडंच त्याचं शिक्शान झालं.'

'काय का आसानी; चांगलं झालं तुपल्यावालं.'

तिला अचानक आठवलं: चाळीस-बेचाळीस वर्षांआधी त्या रात्री घोड्यावर बसून ती साल्पीच्या पठारावरून निघाली असताना पिराजी तिला सोबत धन घेऊन जा असे सांगत होता. ते तिने नेले नव्हते. ते कुठे होते, ते तिला माहीत होते. आता एवढ्या वर्षानंतर ते तिथे राहिलेले असेल किंवा कदाचित नसेलही. पण असेल समजा; तर त्याने जमिनीत पुरून राहण्यापेक्षा या त्याच्या पुतण्याच्या हाती लागावे. तिने ती जागा; तिची खूण त्याला सांगितली. म्हणाली, असेल तुझ्या नशिबात तर मिळेल तुला ते.

त्याला वाटले, ही स्त्री इतक्या मोकळेपणी आपल्याशी बोलतेय, पुरलेल्या धनाचे सांगतेय, कारण ती आता त्या कशातही गुंतलेली नाहीय. तर मग आपणही तिला अधिक

का न सांगावे? तो म्हणाला, 'तू सोडलेला घोडा आणखी कोणीतरी नेला होता. पण तिथून सुटून तो पुन्हा पठारावर येऊन उभा राहिला होता. तो काहीही न खाता पिता फक्त उभा राहिला होता. तो पिराजीचा घोडा होता आणि तो त्याची वाट बघत उभा राहिला होता. पिराजी मेला म्हणून हा सुद्धा जीव द्यायला निघाला होता. कोणीही काहीही दिले तरी खात नव्हता अन् पित नव्हता. अखेर विठोबा त्याच्याजवळ गेला आणि त्याने त्याच्याशी त्याच्या भाषेत बोलून, त्याला थोपटून, गोंजारून त्याचे मन वळवले. तो खाऊ पिऊ लागला. पण त्याला ठेवायचा कोणी? जयाजीदादा त्याला ठेवायला तयार नव्हता. मी तो माझ्याकडे घेतला. आमच्या वाटण्या झाल्या तेव्हा तो आणि विठोबा माझ्याकडे आले. ते खूप उमदे जनावर होते. वीसेक वर्षांआधी तो म्हातारा होऊन वारला. पिरातात्या वारला अन् तू गेलीस, त्यानंतर जयाजीने तुमच्या वस्तीला खणती लावली होती. ती अर्थातच धन शोधण्यासाठी. तिथे त्याला काहीही सापडले नसावे. मी तेव्हा कर्ता नव्हतो. पण मला ते आवडले नव्हते.'

तिला अनेक गोष्टी आठवल्या. जयाजीचे मूर्ख लघळपण, ते दिसल्यावर पिराजीचे त्याला बेदम ठोकणे, मुक्या-बहि-या विठोबातली जगावेगळी मानुषता आणि कोमलपण. जालनला लागलेला त्याचा लळा. जयाजीविषयी काही विचारावे असे तिला वाटले नाही. रखमाजीच्या मुलांपैकी फक्त त्याच्याशीच तिचा संपर्क आलेला होता. पण त्याच्याविषयी तिला कुतूहल उरलेले नव्हते. तिच्या भूतकाळातील असंख्य कटू आठवणींपैकी तो एक क्षुद्र ठिपका मात्र होता. पण विठोबाची मूकबधीर माधुरी तिला आठवली. तिने त्याच्याबद्दल विचारले. 'तो आहे? कसा आहे?' शंभुराव म्हणाला, 'तो आहे. तो माझ्यासोबत असतो. मी त्याला गडी म्हणून मानत नाही. त्याचे गायीम्हशींचे खिल्लार आणि तो; हेच त्याचे जगणे आहे.' हे सांगताना शंभुराव याच्या मनात कळ उठली. आपण त्या भल्या माणसाचा स्वतःसाठी उपयोग केला. आपल्याला प्रिय असलेल्या स्त्रीशी केवळ एक सोय म्हणून आपण त्याचे तिच्याशी लग्न लावून दिले.

'त्याचं लगीन झालं?' तिने विचारलं.

'झालं. त्याचा त्याचा संसार आहे. तो सुखाचा आहे', म्हणताना त्याच्या मनात आणखी एक कळ उमटली.

'तुझी माझी भेट झाली ही केवळ देवाची कृपा', ती म्हणाली.

तिने नोकरवजा इसम ; स्ट्युवर्ट यास संकेत केला. म्हणाली, 'Ask Tony to come in.'

टोनी उर्फ अँथनी तातडीने आत आला. ती म्हणाली. 'You have arranged photographer, I pressume.' 'Off course I did.'

'Ask him to get in. Shambhurao is indeed Jaalan's cousin. I want to be photographed with him. I shall have that as a souvenir.'

'May I find a place in there?' टोनी गोड हसला.

'Of course you will. In the first, only he and me together. You can join us in the next.'

'O.K. O.K. No problem.'

टोनी आणि उल्फी यांच्यातील हे आंग्लभाषेतील संभाषण शंभुराव यास कळण्याचा

जराही संभव नव्हता. तरीही तिचे अधिकारवाणीने बोलणे, त्याचे तिच्यासमोर नम्र ; खेळकर असणे, हे त्याला नवे आणि सुंदर वाटले. स्वतःच्या जगण्यात देऊबाई आणि तो ; यांच्या नात्यात पुरुष म्हणून स्त्रीसमोर नम्र होणे त्याने अनुभवले होते. पण ते सारे अस्फुट आणि म्हणूनच गम्य नव्हते. शब्दांचा आकार धारण न केलेला भावनांचा तो उत्सव त्याला माहीत होता. पण शब्द आणि कृती यांच्या अंगाने व्यक्त होताना त्यामागील मेळाच्या दीर्घसुंदर जलाचे भान त्याला या दोघांच्या संभाषणातून आले. ते येताना शब्द अनावश्यक झाले. शब्द आणि भाषा यांच्या अतीत अधिक उच्च भाषा असते, हे त्याला विठोबाशी संवाद साधताना नेणिवेत कुठे तरी कळले होते. आता त्याला त्याचा प्रत्यय आला होता. तो त्याला तितका कळला होता असे नव्हे. पण काहीतरी असे झाले की त्यामुळे त्याचे हृदय ओले झाले होते.

फोटोग्राफर आला. फोटो काढणे या प्रकरणाविषयी त्याने ऐकलेले होते. माणूस जसा आहे तसे; अगदी तसेच, पाकसुरत चित्र त्यात काढले जाते, हे त्याला ऐकून माहीत होते. पण अनुभव काडीचाही नव्हता. तो फोटोग्राफर, त्याचा तो भला मोठा स्टँड, काळ्या कपड्यात झाकलेल्या खोक्यातील जादुई काळेपण, यांनी तो गोंधळला. त्या सगळ्याला बुजला. त्यात पुन्हा सूचना. असे उभे राहा. असे असे बघा. नाही, नाही. चेहरा हसरा पाहिजे. तुम्ही जरा नीट शेजारी उभे राहा. ते त्याला जमेना. उल्फी म्हणाली, 'आरे आसा काय धरून आनल्यावानी हबा हातोस? राहा, मला चिकटून हुबा व्हा. मी काय तुला खाऊन टाखीत नायी.' ती हसली आणि तिने त्याच्या कमरेत हात घालून त्याला जवळ ओढले. तो लाजला. त्याच क्षणी फोटोग्राफरने कॅमेरा क्लिक केला आणि म्हणाला, 'ओके.' नंतर ती म्हणाली, 'Tony, now you can join us' तेव्हा तिघांचा फोटो निघाला. त्यात तिने मध्याशी उभी राहून एकीकडे शंभुराव आणि दुसरीकडे टोनी असा दोघांच्याही कमरेत हात घातला होता.

तिथून बाहेर पडल्यावर शंभुराव राजूशेठ यांना म्हणाला, आपणास माझ्यामुळे निष्कारण अडकून थांबावे लागले यासाठी माफी मागतो. तेव्हा राजूशेठ म्हणाले, 'माफीचा प्रश्नच उद्भवत नाही. तुम्ही आत असताना त्यांच्या पत्नीविषयी त्यांनी मला जे सांगितले त्याने मी भारावून गेलो आहे. कोल्हाटी जातीत जन्मलेल्या त्या स्त्रीचा जगण्याचा प्रवास केवळ असाधारण असाच आहे.'

शंभुराव साल्पी येथे पोहोचल्यावर काही दिवसांनी पोस्टाने फोटो आला. एकच फोटो होता. शंभुराव आणि उल्फी. तिने त्याच्या कमरेत घातलेला हात. उंच तगडा रापलेला शंभुराव सातपाटील. अन् त्याच्या कमरेत हात घालून त्याच्या निकट उभी हसरी दांडगे उत्फुल्ल गरगरीत शरीर असलेली देखणी स्त्री. फोटोत ती कुठेही वयस्क वाटत नव्हती. आखूड केस असलेल्या आणि झगा परिधान केलेल्या एका निरोगी स्त्रीने शंभुराव यास कमरेशी धरून चित्रात उभारलेले एक शिल्प. ते पाहताना शंभुराव संकोचला. त्याला वाटले, या फोटोचे करायचे काय? ते समजा कोणी पाहिले- आणि या कोणीत देऊबाई, तुळशी आणि त्याची पोरे, अशी सगळीच त्याच्या मनात होती. तर- त्यांना आपण काय स्पष्टीकरण देणार? त्याने थोडा विचार केला आणि तो फोटो त्याने एका फडताळात ठेऊन दिला. तो खराब होऊ नये म्हणून कदाचित त्याने तो पालथा ठेवला होता. ते त्याच्या

दारूच्या बाटल्या ठेवण्यासाठीचे अत्यंत खासगी फडताळ होते. तो फोटो त्या फडताळात सुमारे तीस वर्षे; म्हणजे १९४८ साली शंभुराव त्याच्या वयाच्या ऐंशीत मेला, तोवर तिथे पालथा पडून दारूच्या बाटल्यांच्या ओझ्याखाली दबत, धुलीकण आणि सूक्ष्म किडे, यांच्या खाद्यवृत्तीला तोंड देत राहिलेला होता. शंभुराव याच्या उत्तरायुष्यातील एकाकीपणात तो त्याच्या मनातून हद्दपार झाला होता. तो सूक्ष्म दुनियेतील कण आणि किडे यांचे भक्ष्य होण्यासाठी खुला राहिलेला होता. शंभुराव जिवंत असेस्तोवर त्या फडताळाला हात लावण्याची हिंमत कोणीही केली नव्हती. त्याच्या मृत्युनंतर मात्र मोठ्या आशेने त्याचा त्यातल्या त्यात चलाख, लोभी आणि हुशार असा त्याचा द्वितीय क्रमांकाचा मुलगा सूर्यराव याने अतीव हावरेपणाने ते फडताळ उघडले, तेव्हा त्यास तिथे बँडी, व्हिस्की अशा विदेशी मद्यांचा भला मोठा साठा आढळून आला. ते त्यास माहितीचे आणि अपेक्षित असल्याने त्याचा त्याला धक्का बसला नाही. पण त्या बाटल्या बाहेर काढून ठेवताना एके ठिकाणी तळाशी त्याला हा फोटो सापडला. तो तेव्हा झिजलेला, धूळ आणि सूक्ष्म किडे यांनी खाऊन अस्पष्ट झालेला होता. तरीही त्यात आपला बाप आणि एक भव्य अंगाची झगा घातलेली आखूड केसांची गरगरीत स्त्री त्याला दिसली. त्या बाईने त्याच्या कमरेत हात घातलेला त्याने पाहिला. त्या स्त्रीचे हसणे पाहिले. त्याला वाटले, बाया उपभोगणे हेच आपल्या बापाचे आयुष्य होते. आपल्याला माहीत नसलेल्या अशा आणखी किती तरी बाया त्याने उपभोगल्या असतील. आणि असा विचार मनात येऊन त्याने तो फोटो फाडून त्याच्या चिंध्या चिंध्या करून टाकल्या. तरीही त्यानंतर सुमारे बेचाळीस वर्षांनी शंभुराव याचा एक नातू; देवनाथ सातपाटील, जो पुढे लेखक झाला आणि लेखकांच्या एका शिष्टमंडळातील एक सदस्य म्हणून ब्रिटन देशी गेला असताना त्यास ह्या फोटोची प्रत पहावयास मिळाली. अर्थात हे सारे बरेच पुढचे होय.

3

पहिले आणि दुसरे महायुद्ध यांच्या दरम्यान वीस-एकवीस वर्षांचा काळ गेला. पहिल्या महायुद्धाच्या अंती जर्मनीवर फार अपमानास्पद अटी लादल्या गेलेल्या होत्या. ज्याची शेती प्रबळ होती आणि जिथे औद्योगिक क्रांती उत्तम झालेली होती, अशा जर्मन देशातील जनता त्या अपमानात होरपळत होती. त्या होरपळीचा एक शस्त्र म्हणून उपयोग करीत लोकांच्या भावनांना; त्यांच्या काळजांना हात घालण्याइतके अमोघ वक्तृत्व अंगी असलेला हिटलर नामक इसम तिथे सत्तेवर आला. पुन्हा एकदा जग

जिंकण्याचा आणि जगाची बाजारपेठ काबीज करण्याचा आवेश जर्मन देशाने प्रकट केला. तेव्हा ब्रिटन आणि फ्रांस यांनी त्याचा प्रतिकार केला. किंवा त्यांना तो करणे जरुरीचे झाले. त्यावेळी आपापल्या हितसंबंधांचा विचार करत रशिया आणि अमेरिका हे अधिक मोठे देश त्यांच्या बाजूने उभे राहिले. तेव्हा भारत ही ब्रिटिशांची वसाहत. प्रचंड मोठी आर्थिक आणि मानवी शक्ती असलेली वसाहत. सर अकीनलेक नावाच्या ब्रिटीश सैन्याधिकाऱ्याने नोंदून ठेवलेले आहे की, या दोन्ही महायुद्धात भारत आमच्या सोबत नसता -आमची वसाहत नसता तर ही युद्धे जिंकणे आम्हाला शक्य झाले नसते. दुसऱ्या महायुद्धात २५ लाख भारतीय सैनिक ब्रिटिशांच्या बाजूने लढले. त्यांच्या बाजूने लढलेल्या कोणत्याही एका देशाचे ते सगळ्यात मोठे सैन्यदल होते. १९३९ मध्ये ब्रिटीश भारतातील खडे सैन्य २०५००० होते. आणि युद्धासाठीच्या रंगरुट भरतीच्या परिणामी ते १९४५ साली २५ लाख झाले होते. त्यातील एक लाखाच्या आसपास त्या युद्धात कामी आले. त्या काळात अन्नधान्य, कपडे आणि पैसा यासाठी सुद्धा भारताचा अतोनात वापर ब्रिटिशांनी केला. इतका की त्यामुळे बंगालसारख्या शेतीच्या दृष्टीने या देशातील सगळ्यात समृद्ध अशा प्रदेशात १९४३ साली फार मोठा कृत्रिम दुष्काळ पडला. अन्नधान्याचे उत्पादन नेहमीसारखे असताना देखील त्या काळात तिथल्या एकूण सहा कोटी लोकसंख्येपैकी किमान तीस लाख माणसे मृत्युमुखी पडली. त्याचे पुरावे उपलब्ध आहेत. त्या काळातील मरणासन्न मुले, माणसे आणि स्त्रिया यांचे फोटो पाहताना किंवा जिवंतपणीच कोल्ह्या-कुत्र्यांकडून त्यांच्या शरीराचे लचके तोडले जात असण्याची दृश्ये पाहताना मनास फार क्षोभ होतो. त्याकडे चर्चिल यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या ब्रिटीश सरकारने निघृणपणे दुर्लक्ष केले, असे लक्षात येऊन अगदी एक मनुष्य म्हणून सुद्धा मनास फार यातना होतात. पहिल्या महायुद्धाच्या तुलनेत या युद्धात मराठा लोकांचा ब्रिटिशांनी भरपूर वापर करून घेतला. आणि तेही अत्यंत वीरश्रीने लढले. एकूण सोळा किंवा अठरा सर्वोच्च सैनिकी सन्मान मिळविणाऱ्या राणीच्या प्रजाजनांमध्ये, म्हणजे व्हिक्टोरिया क्रॉस मिळविणाऱ्यांमध्ये, यशवंत घाटगे आणि नामदेव जाधव असे दोन मराठा सैनिक होते. विशेष म्हणजे, या महायुद्धाच्या अखेरीस भारत ही जगातली चौथ्या क्रमांकाची आर्थिक सत्ता म्हणून उरलेली होती. अर्थात तरीही ती तेव्हा ब्रिटिशांची वसाहतच होती. या दोन महायुद्धांच्या दरम्यानच मोहनदास करमचंद गांधी नामक महापुरुषाचा उदय जगाच्या पटलावर झालेला होता. त्याचे अहिंसेचे तत्त्वज्ञान आणि सत्याग्रहाचे शस्त्र यांच्या वापराने ब्रिटिशांना आणि एकूण दुनियेला थक्क करून टाकले होते. त्याचा प्रतिकार कसा करावा, हे त्यांना समजेनासे झाले होते. भारतातल्या सामान्य माणसांच्या दृष्टीने याहीपेक्षा मोठी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्यांना या माणसाने देशातील सामाजिक आणि राजकीय घडामोडींच्या केंद्रस्थानी आणून उभे केले होते. आणि त्यांना तो सांगत होता की, बघा, आहे हे असे आहे. यात तुम्हाला जे म्हणायचे ते म्हणा. जे करायचे ते करा. ते करताना कशाचीही आणि कोणाचीही भीती बाळगू नका. आपल्या आत आपण स्वतंत्र असतो. ते बाहेर आणा आणि निर्भयतेने जगा. गांधीजींनी जे केले होते, ते त्यांच्या आधी कोणीही केलेले नव्हते. त्यांचे गुरू गोपाळ कृष्ण गोखले यांनी देशभर फिरून तो पाहण्याचा जो सल्ला त्यांना दिला होता, तो त्यांनी तंतोतंत अंमलात आणून लोकांचे प्रश्न जाणून घेऊन,

त्यांना आपल्या सोबत घेतले होते. हे असे त्यांच्या आधी कोणत्याही नेत्याने केलेले नव्हते. अहिंसा पाळून सत्याग्रह करणारा इतका मोठा सामान्य माणसांचा समूह जगाच्या इतिहासात कधीही कुठेही प्रकट झालेला नव्हता..

जग दुसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे असताना साल्पीमध्ये शंभुराव जिवंत होता. आपल्या वयाच्या सत्तरीच्या घरात तो पोहोचलेला होता. सरळच होते की एक माणूस म्हणून जी काही मुद्रा त्याला त्याच्या दुनियेत उमटवायची होती, ती त्याने उमटविली होती. पण आता या वयात त्याला किंवा त्याच्या जगण्याला गावाच्या एकूण व्यवहारात फार महत्त्व उरलेले नव्हते. ते साहजिकच आणि योग्य असे होते, याविषयी शंभुराव याच्या मनात कोणताही किंतू नव्हता. गावातल्या व्यवहारात आता त्याची जागा, त्याचा थोरला भाऊ जयाजी याच्या नातवांनी घेतली होती. ते शंभुराव याची मुले ; धैर्यराव आणि सूर्यराव यांच्याच शिणेचे होते. म्हणजे, त्यांच्या त्यांच्या वयाच्या तिशीत होते. आयुष्याच्या या टप्प्यावर शंभुराव साहजिकच थकलेला होता आणि त्याची ही उशिरा झालेली मुले केवळ खतपुराड म्हणण्याच्या लायकीची होती. किंबहुना त्याच टोपण नावाने शंभुराव याच्या घराचा निर्देश त्याच्या बाकी थोरल्या भावांच्या वंशजांकडून तेव्हा होत असे. यात शंभुराव याचे तेज आणि त्याची कर्तबगारी यांच्याखाली दीर्घकाळ दबून जगण्याचा राग असेलच. तो होताच. पण ते शंभुराव याच्या घराचे अगदी यथार्थ निर्देशन होते,यात शंका नाही. शंभुराव याची ही मुले कोणतीही जबाबदारी न झेलावी लागता, कोणतेही झटे न बसता, चिखलाचे गोळे वाढावेत तशा निरागसतेने वाढलेली होती. जगण्यासाठी आणि दुनियेत उभे राहण्यासाठी काही एक झगडा; जो प्रत्येक प्राणिमात्राला करावा लागतो आणि त्यातून त्याला त्याची जागा या दुनियेत निश्चित करता येते, करावी लागते; तसे या चिखलाच्या गोळयांबाबत काहीही घडलेले नव्हते. त्यांना ती तशी जागा आयती मिळालेली होती. जगण्यात हे असे सारे आयतेच मिळत असते अशी त्यांची धारणा झालेली होती. त्यात त्यांची बिच्याऱ्यांची काय चूक? आपल्या कर्तबगारीच्या दाट सावलीमुळे आपल्या मुलांचे हे असे झाले आहे, याची जाणीव शंभुराव यास झाली, तेव्हा फार उशीर झालेला होता. वाढत्या वयामुळे जी एक साहजिक विकलता मनुष्याच्या ठायी येते, ती शंभुराव याचे ठायी आलेली होती. अर्थात तो हार मानणारा नव्हता. पण सारे त्याच्या हातातून सुटत चालले होते आणि तो त्याला धरून, ओढून निस्तरण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या आयुष्याच्या या उत्तरकाळात ते त्याच्यासाठी फार कठीण होते. पण त्याच्यापासून त्याला पळूनही जाता येत नव्हते. त्याच्या नशिबी आलेल्या या खतपुराडात या ना त्या प्रकारे प्राण फुकण्याचा तो यथाशक्ती प्रयत्न करत होता. त्याच्या एका आयुष्यात त्याने मान-मरातब, पैसा, प्रतिष्ठा असे सारे कमावले होते. त्याच्या ठायी स्त्रीसुखाची चाह अंगभूत फार होती. तेही त्याला देऊबाईच्या सहवासात चिंब भिजून जावे इतके मिळाले होते. उल्फीने दाखवून दिलेल्या जागेत, कोणाच्याही नजरेत न येता, हुशारीने खणती लावून ते धन; त्याने सर्पाने आपले भक्ष्य बिनबोभाट गिळावे, तसे अजात दाबले होते. ते वापरून त्याने हळूहळू आपल्या मालकीच्या क्षेत्राचा विस्तार केला होता. तुळसाबाईपासून झालेली त्याची सारी मुले जगली होती, वाढली होती. ती निरोगी होती आणि अंगाने थोराड होती. पण हे सारे त्याच्या या मुलांच्या कर्तबगार नसल्याच्या जाणिवेने

त्याच्यासाठी केवळ शून्यवत झाले होते. माणसाला त्याच्या एकाच आयुष्यात सुख आणि दुःख असे सारे भोगूनच प्राण सोडण्याची संधी असते, असे त्याने ऐकलेले होते. आयुष्याची लांबी जी काही असेल ती असो; सुख आणि दुःख यांच्या भोगाचा पुरता अनुभव घेतल्याखेरीज ती तुटत नाही असे त्याला कोणीतरी कधीतरी सांगितलेले होते. आयुष्याच्या मध्यापर्यंत आपली सगळी सुखे भोगून झाली. त्यात आपल्याला काहीही कमी पडले नाही. आणि नंतर आपली ही मुले आपल्या सावलीत लेंदुळयासारखी वाढत आहेत हे आपण ध्यानातच घेतले नाही. अन् आज ती जशी आहेत तशी ती आपल्याला नांदवावी लागत आहेत. प्रत्येकाविषयी काही ना काही असमाधान घेऊन, ते मनात बाळगून मारून-मुटकून आपल्याला जगावे लागत आहे, असे त्याला सतत आणि फार वाटत असे. आणि ते सारे त्याला सतत आपल्या मनात वाढत्या कुरुपासारखे बाळगावे लागत होते. भरात असताना आणि तो ओसरल्यावर सुद्धा आपण त्यांना मूर्खासारखी सावली देत राहिलो. किंवा ते आपल्या सावलीत जगत पंगू होत आहेत, हे आपल्या लक्षातच आले नाही. किंवा कदाचित मुळातच त्यांच्या ठायी काही नसेल, तर त्यात आपण काय करणार होतो, असेही कधीकधी त्याच्या मनात येई. स्वतः शंभुराव शिक्षणात सातव्या इयत्तेपर्यंत पोहोचलेला होता. पण धैर्यराव, सूर्यराव आणि तिमाजी ही त्याची पहिली तिन्ही मुले अक्षरशत्रू होती. चौथा तुळाजी याने तिसऱ्या इयत्तेत शाळा सोडली. पाचवा माणकोजी पाचव्या इयत्तेत शाळेबाहेर पडला होता. रेऊबाई आणि सरुबाई या धाकट्या लेकी अक्षरशत्रू होत्या. हाक मारण्यासाठी सोयीचे

म्हणून कदाचित ; थोरल्या तिघांना अनुक्रमे धुरुभाऊ, सुरुभाऊ आणि तिमाप्पा म्हणत असत. तर तुळाजी यास तुळबा आणि माणकोजी यास माणकू म्हणत असत. हा प्रघात बहुधा तुळसाबाई हिने स्वतःला त्यांना हाक मारण्यासाठी सुलभ म्हणून पाडला असावा. थोरले तीन लेक आणि धाकट्या दोन्ही लेकींची लग्ने झालेली होती. तुळाजी आणि माणकोजी लग्नाचे होते. दोघेही विशीच्या घरात, म्हणजे त्या काळाच्या रीतीच्या हिशेबाने लग्नाचे वय उलटून गेलेले होते. साधारणतः भावांमध्ये जो भ्रातृभाव असतो, एकमेकांविषयी जिव्हाळा असतो, त्यांचे एकमेकांस धरून राहणे वागणे असते; त्याचा अभाव म्हणता येईल इतका दुरावा या भावांमध्ये होता. त्याला दुरावा, आळस, एकटेपण, भावनाहीनता असे काहीही कदाचित म्हणता आले असते. पण ते एकएकटे त्यांच्या नात्यांचे नेमके वर्णन करण्यासाठी पुरेसे झाले नसते. ते समजा एकूण सातपाटील लोकांच्या वृत्तीला धरूनच होते. पण स्वतंत्रपणे उभे राहून जगण्याची कुवतही पुरेशी त्यांच्यात नव्हती. शंभुराव याच्या मृत्युनंतर ते प्रच्छन्नपणे स्पष्ट झाले. कारण तोवर एकमेकांना धरून राहून काही करण्याची गरजच त्यांना भासली नव्हती.

धुरुभाऊ आता त्याच्या वयाच्या तिशीत होता. तो गावात, शेतात काहाहा काम करत नव्हता. सकाळी उत्तम न्याहारी झाली की मळयात जाणे आणि तिथे इकडे तिकडे निर्हेतुक चक्कर टाकून सहसा आंब्याच्या झाडाच्या गर्द सावलीत झोप मारणे, दुपारी पुन्हा उत्तम खाणे आणि इकडे तिकडे करून झोपणे ते संध्याकाळी गावात घरी येऊन अन्न हादडणे आणि झोपणे हे त्याचे आयुष्य होते. त्याच्या जगण्यातील या पद्धतीच्या अग्रक्रमांना कंटाळून कदाचित त्याची स्त्री दोनेक वर्षांआधी पळून गेलेली होती. पण त्याचे काहीही

शल्य मनी नसल्यासारखा त्याचा दिनक्रम यत्किंचितही बदललेला नव्हता. शंभुरावाने त्याला सगळ्या प्रकारे सांगूनही त्याच्यात काहीही बदल होत नव्हता. त्याच्यासाठी आणखी एखादी पोर; त्याची बायको म्हणून आणावी तर, त्या पोरीचे आयुष्य बर्बादच होणार, तेव्हा यातून रस्ता कसा शोधावा, हे शंभुराव यास कळत नव्हते. त्याच्या वयाच्या तिशीत शंभुराव स्वतःची तिशी बघत होता. पण जगण्यातील निकड, तपशील आणि स्वभाव यांच्यात कुठेही काहीही जुळत नव्हते. धुरुभाऊ याच्या जगण्याचे काय करावे याचे उत्तर त्याला मिळत नव्हते. धाकटा सुरुभाऊ हा काहीसा शंभुराव याचा बाप रखमाजी याच्यासारखा होता. रोज न्याहारीनंतर रानात जाणे आणि राबणे हे त्याचे आयुष्य होते. त्यास दोन मुले होती आणि एखाद्या शांतपणे राबणाऱ्या बैलासारखे त्याचे जगणे होते. तो मितभाषी होता. त्याचे मनात काय चालले आहे, हे कोणासही कळत नसे. पण त्याच्या ठायी आपला बाप रखमाजी याच्यासारखा शांत, मजबूत आणि थंड स्वार्थभाव आहे, हे शंभुराव यास दिसत होते. यात गैर ते काय, असा प्रश्न स्वतःस करून शंभुराव विचार करत असे. पण काहीतरी असे आहे की जे ठीक नाही, असे त्यास वाटत राही. रखमाजी याच्याप्रमाणेच सुरुभाऊ यास ग्रामव्यवहारात काडीचाही रस नव्हता. त्यामुळे गावातील आणि भावकीतील लोकांचे त्याच्याविषयी चांगलेच मत होते. पण आपली मौन राबणूक चालविणाऱ्या रखमाजीस त्याच्या पायाशी बिनबोभाट संपत्ती आणून टाकणारा पिराजीसारखा अफाट धाकटा भाऊ होता, तसे सुरुभाऊ याचे नव्हते. अशा परिस्थितीत हा मुलगा बैलाच्या शांत प्रज्ञेने आपल्या भावांसच लुबाडील अशी शंभुराव याची धारणा होती. तिसरा तिमाप्पा हा आणखीनच वेगळा होता. अगदी लहानपणापासून त्याला गायीम्हशींचा; विशेषतः म्हशींचा लळा होता. शेतीच्या बाकी कामात त्याला रस नव्हता. हे काहीसे विठोबा याच्यासारखे होते. आणि त्याचे विठोबाशी उत्तम जमत असे, हीही एक ठळक गोष्ट होती. यात शंभुराव यास आक्षेपार्ह असे काहीही वाटलेले नव्हते. शंभुराव याच्या नजरेत विठोबा हा भलाच माणूस होता. आपल्या मुलांनी विठोबाच्या घरी जावे, त्याच्या मुलांशी खेळावे असेच त्याला वाटत असे. लहान वयात ती मुले तिकडे जात असत. पण कळत्या वयात आपला बाप आणि देऊबाई यांच्यातल्या संबंधाचे इंगित ध्यानी आल्यापासून ती तिकडे फिरकेनाशी झाली होती. एक तिमाप्पा तेवढा विठोबाच्या सहवासात आपखुशीने राहून म्हशींशी संवाद साधण्याची विद्या शिकलेला होता. त्यांच्या सहवासातच त्याचे मन रमे. सकाळी उठल्यापासून रात्री शेजेला टेकेपर्यंत त्याच्या ध्यानीमनी त्याच्या म्हशी असत. त्यांचे सारे तो अत्यंत मनोभावे करीत असे. इतके की त्याच्या लग्नाच्या स्त्रीकडे त्याचे पुरेसे लक्ष नसावे, असे कधी कधी शंभुराव याचे मनात येई. वाड्यात लग्ने झालेल्या तिन्ही मुलांसाठी स्वतंत्र खोल्या करून दिलेल्या होत्या. पैकी धुरुभाऊ स्वतः च्या खोलीत एकटाच झोपत असे. सुरुभाऊ त्याच्या स्त्री आणि मुलांसोबत आणि तिमाप्पा त्याच्या स्त्रीसोबत; असे मुक्कामी असत. सुरुभाऊ आणि तिमाप्पा यांच्या बायका दिवसाही निमित्तानिमित्ताने आपापल्या खोल्यात अधूनमधून जात असत. तुळाजी आणि माणकोजी यांना स्वतंत्र खोल्या देण्याची गरज अजून भासलेली नव्हती. अर्थात त्याही लवकरच तयार कराव्या लागणार होत्या. आणि त्यात काहीही अडचण नव्हती.

एके दिवशी दुपारी शंभुराव याने माणकोजी यास तिमाप्पाच्या खोलीतून बाहेर

पडताना पाहिले. बापाशी नजरानजर झाली तेव्हा आपली नजर तातडीने हटवून तो तिथून निघून गेला. त्याच्या चालण्यात काही एक चोरटेपण आहे असा भास शंभुराव यास झाला. त्याच्या मनात कळ उठली. कलती दुपार होती. घरात सारीकडे एक सुस्त; काहीशी आळसटलेली शांतता होती. तिमाप्पा त्याच्या म्हशींसोबत रानात. धुरुभाऊ मळ्यात कुठेतरी आंब्याच्या झाडाखाली. सुरुभाऊ शेतात. दुपारच्या या अशा वेळी माणकोजी तिमाप्पाच्या खोलीत कशासाठी गेला होता? शंभुराव उठला आणि आवाज होईल म्हणून काठी आधाराला न घेता हळूहळू तिमाप्पाच्या खोलीच्या दारापर्यंत गेला. त्याने हलकेच आत डोकावले तेव्हा तिमाप्पाची स्त्री तिथे अंगाचे मुटकुळे करून झोपलेली त्याला दिसली. पण बायकांचे झोपणे किती सावध! त्याच्या तिथे उभे राहण्याने त्या खोलीतल्या उजेडात जो किरकोळ फेरफार झाला असेल; त्याची चाहूल लागताच ती उठली. साक्षात आपला सासरा दाराशी उभा आहे, हे लक्षात येताच तिने झटकन आपला पदर डोईवरून ओढून घेत स्वतःचे तोंड झाकले आणि पाठ करून बसती झाली. 'काय नाय, काय नाय. झोप, झोप.' शंभुराव तोंडातल्या तोंडात पुटपुटला आणि पुढे सरकला.

माणकोजी वाड्यात कुठेही नव्हता. बाहेर कुठे गेला असेल. का गेला? इतक्या तातडीने का गेला? शंभुराव बैठकीतल्या त्याच्या नेहमीच्या जागी येऊन बसला. काही क्षणांआधी हे घडून गेले आणि शंभुरावाच्या मनात वादळ सुरू झाले. माणकोजी त्या खोलीतून बाहेर पडला आणि आपण दिसताच चोरासारखा निघून गेला. का? तिमाजीची स्त्री आत झोपलेली होती. की जागीच होती? काहीच चाहूल लागणार नाही अशा मांजराच्या पावलांनी आपण तिथे गेलो. तर ती लगेच कशी जागी झाली? ती झोपलेली नव्हतीच. आणि माणकोजी परत आलाय असे तिला वाटले होते का? आपल्याला बघून ती दचकली. सावरून बसली. ते ठीक. तो सुनेने सासऱ्याशी वागण्याच्या रीतीचा भाग. तिचा चेहरा आपल्याला दिसला नाही. ठीक. पण काय झालेय? तिमाप्पाचा जीव सारा त्याच्या म्हशींमध्ये. बायकोकडे त्याचे लक्ष नाहीय. अन् हा तरणा धाकटा बिनलग्नाचा दीर. जमवले तिने. अन् त्याला ते नको का असेल? मग शंभुरावला वाटले, आपल्याला पाप दिसते याचे कारण आपल्या मनात ते आहे. अरे! त्याच्यासाठी ती त्याची थोरली भावजय. नात्याने मोठ्या बहिणीसारखी. तो तिच्या खोलीत गेला म्हणून कुठे बिघडले? एकाच घरात राहतात सारे तर एकमेकांना भेटणार, बोलणारच ते. त्यात गैर ते काय? पण मग तो चोरासारखा निघून का गेला?

शंभुराव यास वाटले, काही तरी बिघडलेय खास. आपल्या डोळ्यासमोर असे घडत असेल तर ते कसे चालेल? अन् नसेल तर? खात्री कशी करून घ्यायची? माणकूला विचारायचे? की लक्ष ठेवून त्यांना पकडायचे? समजा पकडले. पुढे काय? घरभर कदाचित घरच्या बाहेरही चर्चा, तमाशा. काय करावे? सुनेशी बोलावे? कसे बोलणार? केवळ संशयावरून कसे करता येईल तसे? तिमाजीशी बोलावे? बायकोकडे लक्ष दे; म्हणून सांगावे? तो हो, म्हणेल. आपण का आणि कशामुळे म्हणत आहोत, हे त्याला कळणार नाही. माणकूला विचारावे? काय विचारणार? मग त्याला वाटले, काहीही विचारायचे नाही. बोलायचे नाही. सांगायचे नाही. जे करायचे ते करायचे. नजरानजर माणकूशी झालेली आहे. बाकी कोणालाही काहीही माहीत नाहीय. शंभुराव याने निर्णय घेऊन

टाकला.

संध्याकाळी शंभुराव याने तुळसाबाईद्वारा माणकोजी यास आपल्या खोलीत बोलावून घेतले. आल्यावर त्याला दाराची आतली कडी लावून घेण्यास सांगितले. तो उभा असताना शंभुराव याने तिथे आधीच आणून ठेवलेला चाबूक हातात घेतला आणि काहीही न बोलता माणकोजीच्या अंगावर कोरडे ओढण्यास सुरुवात केली. तो हूं की चूं न करता ते झेलू लागला. पण चाबकाच्या फटक्यांचे आवाज बाहेर जात होतेच. शंभुराव याचे काहीतरी बिघडले आहे, हे तुळसाबाईच्या आधीच लक्षात आले होते. त्याला चाबूक आत नेताना तिने पाहिले होते. तिनेच माणकोजीला आत पाठविले होते. त्या खोलीचे दार कधीही लावले जात नव्हते, तशी गरजच पडत नव्हती. ते लावले गेलेले होते. चाबकाच्या फटक्याचे आवाज येत होते. अर्थ स्पष्ट होता. माणकोजी याचे काहीतरी चुकले होते.

पण काय ते विचारणे किंवा त्या खोलीच्या दाराशी जाऊन, तुम्ही हे काय करता, का करता, असे प्रश्न करणे तिला शक्य नव्हते. तितकी हिंमत तिने तिच्या आजवरच्या आयुष्यात कधीही केलेली नव्हती. पुढे कधी ती करू शकेल अशी शक्यताही नव्हती. पोराला बसत असलेल्या फटक्यांनी विव्हल होत जागच्या जागी मनात रडणे, इतकेच ती करू शकत होती. माणकोजी या आपल्या विशी-बाविशीत असलेल्या सगळ्यात धाकट्या पुत्रास चाबकाने फोडताना सत्तरीच्या घरातला शंभुराव अखेर थकला आणि चाबूक फेकून देत तो आपल्या पुत्रास म्हणाला, 'जा.' त्यानंतर कोणीही कोणाशीही काहीही बोलले नाही. कोणीही कोणालाही काहीही विचारले नाही. जे घडले ते काहीही घडले नाही, असेच ते सारे झाले. पाठीची लालकाळी गोधडी झालेल्या आपल्या लेकास त-हेत-हेचे लेप लावून ती बरी होत राहील, असे

तुळसाबाई हिने पाहिले; इतकेच.

या घटनेनंतर शंभुराव याने आपल्या तुळाजी आणि माणकोजी या मुलांसाठी स्थळे शोधण्याचा क्रम अधिक तीव्र केला. पैकी तुळाजी याच्यासाठी त्याने तुळसाबाई हिची भाची राळेगणसिद्धी येथील उगले यांची लेक निश्चित करून टाकली होती. ते दोन्हीकडून सोयीचे आणि सहज झाले होते. कारण भाची म्हणून ही मुलगी- तिचे नाव आंजाबाई; तिला सगळे आंजी म्हणत असत, ती तिच्या लहानपणापासून शंभुराव याच्या घरात वावरलेली होती. काळसर निळया वर्णाची ही मुलगी अत्यंत देखणी होती. पांडवप्रतापाच्या पोथीत द्रौपदीच्या दिसण्याचे, तिच्या अतिसुंदर श्यामा असण्याचे जे वर्णन असे; त्याची आठवण व्हावी, अशी ती होती. ती शंभुराव याची अत्यंत लाडकी होती. ती त्याला मामाऽऽ अशी लाडिक स्वरात जेव्हा पुकारत असे, तेव्हा त्याचे मन स्निग्ध मधाळ होऊन जात असे. तुळाजी ताडमाड साडेसहा फूट उंच होता. वर्णाने ठार काळा होता. पण तगडा आणि देखणा होता. शांत, चलाख आणि मृदू होता. उगले मंडळींनी हा प्रस्ताव आनंदाने मान्य केलेला होता. जोडा सुंदर होता, मनगटाला मनगट जुळत होते आणि नात्याची चाल चालती राहून धागा पुढे बळकट राहणार होता. त्यात आता काहीही अडचण उरलेली नव्हती. माणकोजी याचे कुठे जुळले की एकाच मांडवात दोन्ही लग्ने ठोकून द्यायची असे शंभुराव याने ठरविलेले होते. माणकोजी तुळाजीच्या मानाने जरा बुटका आणि तगडा होता. शंभुराव याची तिमाजी सोडता सारी मुले दणकट अंगयष्टीचीच

होती. तिमाजी थोडा बारकट आणि काहीसा मेंगळट वाटावा असा होता. बाकी सगळे मोठ्या अंगयष्टीचे होते. ही मुले अंगयष्टीने तगडी असली तरी सुखोप्यात वाढल्याने काहीशी फुसकी होती. पण म्हणून त्यांच्या ठायी बळ नव्हते असे नव्हे. पण शंभुराव याच्या दमदार वृद्ध सावलीत सुखाने जगताना त्यांच्यातील पारंपरिक जेनेटिक स्नायुबल निद्रिस्त राहिलेले होते. त्याला जागे होण्याच्या संधीच मिळालेल्या नव्हत्या. त्यांच्या आयुष्यात ते जागे होण्याची निकड बरीच उशिरा ; शंभुराव याच्या मृत्युनंतर जेव्हा पडली, तेव्हा आपल्यातील बळाचा त्यांना त्याचा विसर पडलेला होता. ते समजा पुढचे होय. पण वर्तमानाच्या बिंदूंच्या या जुडग्यांवर शंभुराव माणकोजी याचेसाठी स्थळ शोधत बाप म्हणून आपल्या कर्तव्याची सांगता करण्याच्या तयारीत होता. चाबूकफोडीच्या प्रसंगानंतर त्याच्या मनातली यासाठीची निकड अधिक तीव्र झाली होती. तो गेले सुमारे सहा महिने साल्पीतील सबाजी तोरणे नामक इसमाच्या घरी पुन्हा पुन्हा जाऊन माणकोजीसाठी त्याच्या पोरीला मागणी घालत होता. तोरणे हा इसम कुठेही शंभुराव याच्या तोडीचा नव्हता. जमीनजुमला, मालमत्ता यांच्या हिशेबाने तो फार सामान्य होता. जरीचा व्यापार करून तो आपला चरितार्थ कसाबसा चालवत होता. म्हातारा झाला असला तरी शंभुराव याची सामाजिक प्रतिष्ठा कुठेही कमी झालेली नव्हती. गावाच्या व्यवहारातून तो बाजूला पडलेला असला तरी त्याचे नाव मोठेच होते. त्याची आर्थिक ताकद कुठेही कमी नव्हती. पण त्याची पोरे खतपुराड लायकीची आहेत, असे सारीकडे बोलले जात होते. ते लक्षात घेऊनही जबाजी तोरणे हा इसम एक व्याही म्हणून कुठेही त्याच्यासमोर बसण्याजोगा नव्हता. तरीही शंभुराव याचा आग्रह कायम होता. तोरणे याचे म्हणणे असे की, 'माझी पोर फार लहान;

वय वर्षे नऊ इतकी आहे. आपला मुलगा त्याच्या वयाच्या बाविशीत आहे. जोडा तितकासा ठीक होत नाही. खेरीज आपण फार मोठे मालदार नामांकित आहात.' पण बोलण्याच्या आतले बोलणे म्हणजे, आपल्या खतपुराड कुटुंबात मला माझी मुलगी द्यायची नाहीय. तोरणे हा परिस्थितीने गरीब असला तरी पिंपळगाव नामक गावातील आबदार पाटील घराण्यातील होता. चरितार्थासाठी त्याचे वडील साल्पीत आलेले होते. तो घरंदाज कुळातील असल्याने त्याच्या दोन थोरल्या मुली खोपडे-पाटील यांच्या भावकीत त्या लोकांनी आनंदाने करून घेतलेल्या होत्या. ही त्याची तिसरी मुलगी लहान; एखाद्या बळकट मेंढीसारखी आटूस होती. अंगलक्षण गुणांनी युक्त होती. तोरणे याच्यासाठी शंभुराव याच्या मुलाचे हे स्थळ वरवर फारच उत्तम असले तरी तो तसा विचार करताना घाबरत होता. बोलले, न बोललेले सगळे अपमान झेलत शंभुराव या मुलीसाठी जोर लावून होता. त्यात कसलीही कसर न सोडता त्याचे प्रयत्न चालू होते. हे सगळे असे असताना एके दिवशी शंभुराव यास समजले की आपली स्त्री; आपल्या प्रेमाची स्त्री देऊबाई, जी आपली समवयस्क, कदाचित थोडी लहान मोठी इकडे तिकडे अशी ; तिजवर आपला मुलगा सूर्यराव उर्फ सुरुभाऊ; स्वतः दोन मुलांचा बाप, वयाने तिशीला टेकलेला; याने हात उचलला. त्याने तिला मारले.

एका दुपारी किंवा खरे तर एका संध्याकाळी कधीतरी ती घटना घडली. वृत्तांत दुसऱ्या दिवशी सकाळी शंभुराव याचेपर्यंत पोहोचला. फार किरकोळ कारणावरून ते झाले.

अर्थात तिच्यापाठी राग, लोभ, द्वेष आणि त्यांच्या सबोध आणि अबोध असण्यापोटी; कदाचित निरागस किंवा आधी निरागस आणि आतून नकळत रागस अशा अनेक गोष्टी होत्या. मुले खेळतात. एकत्र आली की ती काही ना काही प्रकारे खेळतात. सहसा ते साधे निर्हेतुक असते. पण घटना घडत असताना मुलांना माहीत असलेल्या, त्यांच्या पालकांकडून त्यांनी ग्रहण केलेल्या अनेक गोष्टी त्या खेळात उतरतात. मुले वाटतात तितकी निरागस सुद्धा नसतात. खेळणे हे जगणे समजावून घेणे असते. ते जगण्याची उजळणी करणे सुद्धा असते. किंवा हे सगळे इतके झुडुपाभोवती झोडपणे तरी कशाला; झाले काय ते थेट असे की, त्या दिवशीच्या कलत्या दुपारी सातपाटलांच्या शिवारात मुले खेळत होती. सगळी सातपाटलांच्या पाच घरातली नातवंडे अन् जास्तीकरून पणतवंडे, काही पाव्हणे-रावळयांची पोरे. त्यात देऊबाईची नातवंडेही होती. तीही सातपाटलांच्या शिवारातलीच ना! आपाधापी, आबाधाबी किंवा आपारपी यापैकी कोणत्याही नावाने ठिकठिकाणी ओळखल्या जाणाऱ्या त्या खेळात एक चिंध्यांचा चेंडू पुरेसा असतो. किमान दोन खेळाडू हवेत. एकूण सहभागास कमाल मर्यादा नाही. खेळाडू जितके जास्त तितकी खेळाची मजा अधिक. ज्याच्या हाती चेंडू असेल तो त्याने त्याच्या भोवतालच्या हलत्या समूहात सोयीचे वाटेल त्याच्यावर नेम धरून मारावा. ज्याच्या अंगावर येईल त्याने तो चुकवावा किंवा पकडावा. शक्यतो पकडावाच. कारण त्यामुळे त्याला आणखी कोणाला मारण्याची संधी प्राप्त होते. नेम चुकवता नाही आल्यास रट्टा खावा लागतो अन् तो हसून जिरवावा लागतो. अर्थात, चिंध्यांच्या चेंडूचा मार तो कितीसा? पण सारे हसतात तेव्हा खजील न होता हसून जिरवावे लागते. पुन्हा कधी चेंडू हाती आल्यास ज्याने आपल्याला ठोकले त्यास मारण्याचा प्रयत्न होतो. समूह सतत हलता, पळता असतो. आरडओरड, हास्यविनोद, कुचाळक्या अशा कितीतरी गोष्टी एकाच वेळी चालू असतात. एकमेकांवर धडकणे, आपटणे अशा गोष्टी सर्रास घडत असतात. सारे मैदान चैतन्याने रसरसलेले असते. त्यात असाच पळत असताना सुरुभाऊचा मुलगा कोणाला तरी अडखळून पडला. पडताना त्याच्या पाठीत चेंडूचा रट्टा बसला होता. साहजिकच सगळे हसले आणि उठताना तोही खजील होऊन हसला. चेंडू त्याच्या पाठीला रट्टा देऊन आणखी कोणाच्या तरी ताब्यात गेला. तो ज्याच्या ताब्यात गेला, त्यालाच अडखळून हा पडला होता आणि तो देऊबाईचा नातू होता. त्याने हसतच, हा त्याच्या निकट होता म्हणून, चेंडू याच्याकडे भिरकावला आणि तो पुन्हा याच्या छाताडावर बसला. पुन्हा हशा आणि वेग. पुन्हा चेंडू याच्या पकडीतून सुटलेला. चिडून हा सरळ त्या पोराच्या अंगावर धावला आणि धडक देऊन याने त्याला खाली पाडले. नुसते पाडले नाही तर हा त्याला दाबून धरून घोळसू लागला. याच्या अनपेक्षित हल्ल्याने तो जरा गडबडला आणि याच्या पकडीतून सुटण्याचा प्रयत्न करू लागला. या अचानक उपस्थित झालेल्या प्रसंगामुळे खेळ थांबून सारे या कुदाकुदीकडे बघू लागले. कारण ते नाट्यमय होते. अचानक शंभुराव याचा अस्सल नातू आणि त्यांना त्यांच्या वडीलधाऱ्यांकडून या ना त्या प्रकारे कानी आलेल्या शंभुराव याच्या रखेलीचा नातू यांच्यात ते सुरू झाले होते. आणि सगळया पोरांसाठी ते नाट्यमय होते. लहान मुले निरागस असतात. त्यांची निरागसता खतम करणे हा प्रौढ माणसांचा कळत नकळत उद्योग असतो. आणि हे सारे पूर्वापार आहे. बघणाऱ्या त्या मुलांमधली रागसता जागी

झाली आणि ती सारी हा खेळ सबोध सजगतेने अनुभवू लागली. त्यांच्या नजरेत ती कुदाकुदी, धराधरी, गुद्दागुद्दी; सारेच एका वेगळ्याच प्रतलावर गेले. मार खाणारा खाली होता, तो जीव खाऊन उठला आणि याच्या वर येऊन त्याने याला खाली घेऊन घोळसायला सुरुवात केली. तो याला आपटू-धोपटू लागला. पुन्हा याने जोर केला आणि त्याला खाली घेतले. पुन्हा त्याने याला. असे होता होता दोघांच्याही हातापायांची ढोपरे फुटली. रक्त, माती, शिव्यांची बरसात. वाहव्वा जी व्वा!

खेळ तिथेच संपला आणि सुरुभाऊचा मुलगा त्याच्या घरी गेला. त्याची ती फुटलेली ढोपरे, मातीने माखलेले हातपाय पाहून त्याची आई; सुरुभाऊची स्त्री, हिने त्याला विचारले की काय झाले? तेव्हा त्याने सांगितले की, असे करता असे. तेव्हा ती माउली चिडून म्हणाली, 'या रखेलीच्या गोताची ही हिंमत. त्याने माझ्या लेकराची ढोपरे फोडली. काय पण जमाना आलाय!' ते ऐकण्यासाठी सुरुभाऊ तिथे हजर होता. तो त्याच्या रिवाजानुसार दिवसभर शेतात बैलकाम करून येऊन थकून-भागून बसलेला होता.दिवसभराच्या श्रमाने कैक घाम त्याच्या त्वचेवर पुन्हा पुन्हा जिरून त्याचा शाडवट थर त्याच्या अंगावर साचलेला होता. तोंड हातपाय धुवून थोडे नेटके व्हावे आणि स्वस्थ बसून संध्याकाळच्या जेवणाची मूढ उत्कंठतेने वाट बघावी अशा बैल मनःस्थितीत तो होता. त्यात हे सारे सामोरे आले. तो सावकाश उठला आणि हाती येईल ते दांडके घेऊन तो बाहेर निघाला. तेव्हा ती माउली; त्याची स्त्री, जी त्यास उत्तम जाणत होती, तिने त्यास थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यास तो कसला जुमानणार? बैलास एकदा दंश झाला म्हणजे झाला.

तो थेट मळ्यात देऊबाईच्या वस्तीवर पोहोचला. गरजला, 'रांडिच्याहो कंच्या पोरानी मपल्या पोराची ढोपरं फोडली? चाल, या, सामनी या.'

कोण सामनी येणार? पण कोणाला तरी समोर येणे भाग होते. त्या मुलाचा बाप हात जोडत अजीजीने समोर येत म्हणाला, 'सुरुभाऊ, पोरांच्यात खेळतानी झालं ते. याची पन ढोपरं फुटलीत.'

त्याच्या त्या अजीजीला, हात जोडण्याला प्रत्युत्तर म्हणून सुरुभाऊने हातातल्या दांडक्याने त्याच्या बरगडीवर जोराचा टोला दिला. म्हणाला, 'माझ्या बापानी झवून काढलं तुला. आन तुझ्या पोराची ही हिमत! आरे, आमच्या जीवावर जगता आन आमच्यावर चढता काय?'

सुरुभाऊने दांडक्याचा हल्ला जोरकस केला तरी देऊबाईच्या त्या मुलाचे हात जोडलेलेच होते. शिव्यांची लाखोली वाहात सुरुभाऊ दणके घालतच होता. तेव्हा म्हातारी देऊबाई धावत आली आणि मध्ये पडून

म्हणाली, 'चूक झाली बाबा. पण त्या पोराच्या चुकीपायी तू याला जित्ता मारून टाखितो का काय?' ती मध्ये आली तसा तिलाही याने दणका घातला. ती म्हातारी तात्काळ खाली पडली तेव्हा हा भानावर आला. तो वरमला आणि तिथून निघाला. तरीही निघताना म्हणाला, 'आमच्या पोरांच्या नखालाही हात लावलात तर तुमची खैर नाही. पायरी राखून जगता येत आसल तर जगा. माझ्या बापानी तुमची जिदगी केली, हे ध्यानात घेऊन राहा. नाय तर तुम्हाला समद्यांना मी खांदून टाखीन, हे ध्यानात ठिवा.'

दुसऱ्या दिवशी शंभुराव यास बातमी लागली. "का मारलं?" 'पोन्हापोहांची कळवंड झाली.' 'झाली आसन ना! व्हतंच ते. चालायचंच.' 'हा उजगरायला गेला.' 'दांडकं घेऊन? देऊबाईला का मारलं?'

'सबागती लागलं. ह्यो तिच्या लेकाला मारीत व्हता. ती मंधी आली. तिला टोला बसला आन ती पडली.'

'हा काय बोलला?' 'लय घाण घाण बोलला,' 'काय पण?' 'मपल्या बापानी तुमाला झवून काहाडलं. पायरी संबाळून वागा."

शंभुरावाच्या हृदयात कळ दाटून आली. हातपाय गळल्यासारखे झाले. त्याच्याच पोराने जाहीरपणे त्याच्या जगण्याची लक्तरे काढली होती. त्याहीपेक्षा देऊबाईला त्या क्षणी किती हतबल वाटले असेल याच्या कल्पनेने त्याचे म्हातारे हृदय कळवळले. त्याला वाटले, माणकू स्वतःच्या थोरल्या भावजयीच्या खोलीतून साधा बाहेर पडताना आपल्याला दिसला तर संशयावरून आपण त्याला फोडून काढला. आता याचं काय करायचं? त्या बाईची लेकरं, नातवंडं; त्या सगळ्यांसमोर तिच्या या वयात याने तिची लाज काढली. याचं काय करायचं? याला आपण फोडून काढू शकत नाही. याचा थोरला पोरगा कळत्या वयाचा आहे. प्रपंच याचाच त्यातल्या त्यात ठीक चालू आहे. हा कामधंदा नीट करतो. दिवसभर शेतात राबतो.

शंभुरावाने सुरुभाऊस बोलावून घेतले. कसलीही प्रस्तावना न करता, काहीही न विचारता म्हणाला, "तुमचा बाडबिस्तारा उचला आन मळ्यातल्या वस्तीवर राहायला जा.' सुरुभाऊ काहीही बोलला नाही. कार्यकारणभाव त्याला समजला. कितीही करुणा भाकली तरी यात बदल होणार नाही, हे त्याला अनुभवाने माहीत होते. ज्या धीमेपणे चालत तो आला होता तसाच चालत तो निघून गेला. नंतर शंभुरावाने तिमाजीस बोलावून घेतले. तो आला आणि एखाद्या अश्राप जित्राबाच्या दीन नजरेने बापाकडे बघत उभा राहिला. हात् तिच्यायला! यावढा चांगला गड्यासारका गडी. काय पघतोय,

काय उभा राहतोय!

'तुमचा काय इचार? का उच्यालता बि-हाड तुमीयबी?' 'म्या कायच केल्यानं नायी.'

बराच वेळ जाऊन देऊन तिमाजी बोलला तेव्हा त्याच्यापाठी त्याची स्त्री शंभुराव यास ओझरती दिसली. डोईवर पदर पांघरून, चेहरा झाकून..

'आमाला नका हाकलून देऊ. आमी तुमच्या संगती राहणार,' ती मर्यादापूर्वक बोलली.

तिने धाडसच केले होते. न बोलविता आली होती. न विचारता बोलली होती. पण हे सारे तिने तिच्या नवऱ्यासाठी केले होते. एक पत्नी म्हणून त्याच्या मर्यादा तिला ठाऊक झालेल्या होत्या. या पोरीमुळेच याचा संसार कडेला लागण्याची आशा करायची; शंभुरावच्या मनात आले.

'ठीक आहे. बरं. चला आता.'

हे एवढे झाले म्हणजे झाले; असे कसे होणार? शंभुराव उठला आणि बाहेर पडला. तुळसाबाई न्याहारीचे ताट घेऊन आली होती. तिला खुणेनेच तो नको म्हणाला. अजूनही त्याच्या घरात त्याचा शब्द अंतिम होता आणि त्याच्या मरणापर्यंत तो तसाच राहणार होता. अर्थात त्याच्या तारुण्यात आणि प्रौढ वयात त्याच्या शब्दाच्या वजनाचा विस्तार

उभ्या पंचक्रोशीत होता. त्याचा हळूहळू संकोच होत ती क्षेत्रमर्यादा त्याच्या घराच्या भिंतीच्या आत पोहोचली होती. त्याबद्दल त्याची तक्रार नव्हती. आपला आपला जमाना असतो. ते आयुष्यभर नसते. पण त्या नजीकच्या इतिहासाचा रौब इतरांच्या मनात असतो, हेही मनाला उभारी देण्यासाठी पुरेसे असते. रस्त्याने चालताना हे काहीही त्याच्या मनात नव्हते. तो देऊबाईच्या वस्तीकडे निघाला होता. गेली काही वर्षे तो वर्ष-सहा महिन्यांनी कधी तरी तिकडे जात असे. देऊबाईचे घर तिची लेकरे, नातवंडे यांनी गजबजून गेलेले होते. ती आता कोणत्याही प्रकारे शंभुराव याच्यावर अवलंबून नव्हती. तिने स्वतःच्या लेकरांच्या सोयरिका जमतील तशा जमविल्या होत्या. ती प्रेमसंबंधातून जन्मलेली मुले आणि मुली अत्यंत देखणी होती आणि सुस्वभावी होती. शंभुराव हा आपला जन्मदाता बाप आहे, पण आपला त्याच्यावर काहीही अधिकार नाही, हे त्यांनी स्वीकारलेले होते. प्रत्यक्ष शब्दांनी काहीही न सांगता देऊबाईने तो संस्कार त्यांच्यावर घडविलेला होता. आधी विठोबाच्या साथीने आणि मुले मोठी होताना त्यांना शहाणे करीत, तिने स्वतःचा बारदाना वाढविला होता. गायी-म्हशींचे खिल्लार तर होतेच. घोडनदी येथील अनेक मारवाडी वर्षानुवर्षे देऊबाईच्या घरचेच तूप खात असत. खेरीज आंबे उतरणे, चिंचा झोडणे, लाकडे कापणे, अशा कामांनी सुरुवात करत तिच्या मुलांनी आंबे, चिंचा, कांदे, केळी अशा मालाच्या व्यापारात प्रवेश केला होता. राजमुंद्री आणि दावणगिरीपर्यंत त्यांची पोहोच होती. शंभुराव याने त्या त्या वेळी देऊ केलेल्या गोष्टी देऊबाईने कणखर विनयाने नाकारलेल्या होत्या. तू मला आणलंस, पण ते मी म्हणाले म्हणून. म्हणजे माझ्यासोबत असणं तुलाही आवडलं, हे मी जाणते. पण आता ही बाळे माझी आहेत आणि त्यांना मी जबाबदार आहे. आणि फक्त मीच जबाबदार असेन. मी त्यांना त्यांच्या आयुष्यात उभे करीन. अगदीच गरज पडली तर तुझी मदत सुद्धा मागेन. तशी वेळ माझ्यावर येऊ नये, यासाठी फार तर प्रार्थना कर. हे सारे या शब्दात ती कधीही बोलली नाही. पण हे तिचे म्हणणे, तिचा स्वाभिमान ; हे सारे त्याच्यापर्यंत कायम पोहोचत आलेले होते. म्हणूनच सुरुभाऊ याने जे काही केले त्यामुळे तो आतल्याआत घायाळ होऊन अगदी विकल झालेला होता.

शंभुराव देऊबाईच्या वस्तीवर पोहोचला आणि नेहमीसारखा वस्तीसमोरच्या आंब्याच्या झाडाखाली मांडलेल्या एका बाजेवर जाऊन बसला. ती बाज तिथे कायमची होती. त्या बाजेवर एरवी तिथे कोण बसत असे हे शंभुराव यास माहीत असण्याचे वा करून घेण्याचे काहीही कारण उरलेले नव्हते. तो येई तेव्हा तेव्हा ती बाज मोकळी असे. ती आपली वाट पाहात रिकामी आहे, ही जाणीव त्याच्यासाठी सुखदायक असे. एखाददुसऱ्या वेळी त्याने विठोबाला तिथे बसलेले पाहिलेले होते. ते त्याला कोणत्याही प्रकारे विक्षेपकारी वाटलेले नव्हते. आपण विठोबाचे अपराधी आहोत, ही भावना त्याच्या मनाच्या अंतर्मनात नेहमी असे. विठोबाचे निःशब्द नम्र वागणे त्याच्या मनाला डहुळत असे. तो इथे वर्ष-सहा महिन्यातून कधीतरी येत असे आणि बसत असे. तिथे तसे बसणे त्याला नेहमी सुखाचे वाटत असे. ते गायी-म्हशींचे खिल्लार, तो त्या मुलांचा आणि नातवंडांचा नम्र मोकळा वावर, ती सुखद स्पष्ट निरोगी हवा, वाऱ्याच्या प्रेमळ हलत्या झुळुका; ते सारे फार सुंदर आणि मनाला निवविणारे असे. ही सगळी आपण निर्माण

केलेली -किमान आपण निमित्त होऊन निर्माण झालेली- दुनिया आहे, या भावनेचा फवारा त्यास सुखदायी वाटत असे. आपण इथे निमितमात्र आहोत आणि हे सारे देऊबाईचे आहे, हे त्यास कळत असे. तरीही ते त्याच्यासाठी सुखदायक असे. ही अशा प्रकारची स्त्री आपल्या आयुष्यात आली यासाठी त्याला फार नम्र वाटे. या सगळ्या भावनांचा चोळामेळा आपल्या मुलाने केला, आपल्या अत्यंत आदराच्या स्थानी असलेल्या स्त्रीचा ; देऊबाईचा मनोभंग, उरोभंग त्याने केला. तुळसाबाईला झालेली मुले आपली, कारण दुनियेच्या न्यायात त्यांना आपली मानणे हा प्रघात आहे आणि आपणही मनाने तेच करत आलो. त्यांनी आपल्याला कोणतेही सुख दिलेले नाहीय. आजवर दिले ते फक्त दुःख आणि भावनिक यातना. आणि ही मुले सारी आपली, ही स्त्री आपली ; तिला आपण आपल्या आयुष्यातली तिची जागा उघड कधीही दिली नाही. ढाण्या वाघासारखे दुनियेला वाटणारे आपण मुळात फार भेकडासारखे जगलो आणि वागलो. ती मुले जितकी आपली तितकीच ही. पण ते आपण आपल्याशी साधे मनाने सुद्धा मानले नाही. मनातल्या मनात आपणही त्यांना आपल्या अनैतिक जगण्याची अपत्ये मानले. देऊबाईशी आपल्या असलेल्या संबंधाला आपण आपल्या मनात भेकडपणे अनैतिक मानले. ती समज मनाशी घेऊन आपला तो तथाकथित अधिकृत मुलगा या आपल्या प्रिय स्त्रीशी जसा वागला, त्यात त्याच्या चुकीपेक्षा आपली चूक अधिक आहे. आपले जगणे आपल्याला पेलता आले नाही.

एखाद्या मूर्ख विव्हल डंगर बैलासारखा तो तिथे बसलेला होता. तो अत्यंत एकटा होता, अत्यंत विकल होता. अलीकडच्या काळात तो येत असे तेव्हा सुद्धा ती तातडीने त्याला भेटण्यास येत असे; असे नव्हे. ती गरजच नसण्याइतके सुंदर नाते त्यांच्यात तयार झालेले होते. ती असण्याच्या हवेच्या टप्प्यात आपण आहोत हे त्याच्या साठी सुखदायक असे. आणि तो आल्याचे कळून निःशब्द मोहरून जाऊन सावकाशीने थोडा वेळ कधी तरी ती तिथे येऊन बसत असे. तिचे तिथे वावरणारे सुंदर गोकुळ त्याच्या आनंदासाठी पुरेसे असे. त्या सगळ्यावर उमटलेल्या निघृण ओरखड्याच्या खिन्न उजेडात तो आता तिथे आलेला होता. गोकुळ स्तब्ध होते. कदाचित त्यांची त्यांची कामे चालू असतीलही. पण काहीतरी असे होते की जे स्तब्ध आणि खूप दुखलेले होते. नीरवता होती. पण पाणंदीतून वाहणाऱ्या पाण्याच्या स्नेहल सुखद नादाची नीरवता त्या हवेत नव्हती. ती मुले त्याच्याकडे आली. त्यांनी त्याची विचारपूस केली. ते त्याच्याशी बोलले. त्यात तो कुठेही नव्हता. देऊबाई आपल्याला भेटावी असे इतक्या तीव्रतेने गेल्या कैक वर्षात त्याला वाटलेले नव्हते. ती भेटली तर तिला सामोरे कसे जायचे हेही त्याला कळत नव्हते. तरीही एकीकडे ती दिसावी असे त्याला तीव्रतेने वाटत होते. आणि दुसरीकडे तिच्या अपमानित दीन अवस्थेत ती आपल्याला दिसू नये असेही त्याला वाटत होते. आपण इथे कशासाठी आलो आहोत हेच आता त्याला कळेनासे झाले होते.

तो खूप वेळ ; कदाचित कल्पांतापर्यंत त्या तिथल्या बाजेवर मूढ एकाकी पराभूत डोंगरासारखा बसून राहिला. आणि हा डोंगर पोकळ भुसभुशीत आहे, या अन्दभूत आंतरिक जाणिवेने आतील एकमेकांशी न जोडल्या गेलेल्या गुळगुळीत दगडांच्या कोसळणीत, कधी तरी आडवा झाला. त्यातून त्याला उठविताना ती म्हणाली, 'उठा. घरी जा. वाईट वाटून घेऊ नका.'

: त्यानंतर आठ दिवसांनी देऊबाई; ती मानी स्त्री, थेट देवाघरी गेली.

4

देऊबाईच्या मरणानंतर शंभुराव मनाने जगण्यातून उठला. तो मनाने संन्यस्तच झाला. तसे होण्याचे त्याचे वयही झालेले होते. तरीही प्रत्यक्षात त्यातून पुरता संन्यास घेणे त्याला जमले नाही. खरे तर त्याच्या आयुष्याच्या अंतापर्यंत कधीही त्याला ते जमले नाही. त्याच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत कधीही त्याला ती संधी मिळाली नाही. मनाने निवृत्त आणि गरज म्हणून प्रवृत्त असा त्याच्या जगण्याचा अवमेळ त्याच्या वयाच्या या उत्तरकाळात उपस्थित झाला आणि उत्तरोत्तर तो वाढत गेला. त्यातूनच उत्तरोत्तर त्याचे जगणे दु:सह होत गेले.

रात्री स्वत:च्या खोलीत एकट्याने मद्यसेवनाचा क्रम आधीच चालू होता. ते केले की काही ना काही वशाट म्हणजे सुके सामिष पदार्थ जेवणात असत. सुकट, बोंबील, सोडे असे काही ना काही. त्याच्या पिण्याचा क्रम आता अधिक नियमित झाला. 'तुळशेऽऽ बोंबलाची उखर टाखिती का उलशी,' असे म्हणण्याची त्याला आता गरज पडेनाशी झाली. रात्रीसाठी ती नित्य असू लागली. बोंबलाची उखर, सुकटीची चटणी किंवा सोड्याची आमटी असे काही ना काही असेच. मद्यसेवन करताना तो अखंड स्वत: शी विचार करत असे आणि त्यात अनेक घटना, प्रसंग, विचार अनिर्बंधपणे त्याच्या मनाच्या प्रतलावर प्रकटत असत. तशा वेळी सारे काही ठीक आहे किंवा तसे होण्यासाठी रस्ते आहेत असे त्याला वाटत असे. सकाळ झाली की अनेक समस्यांनी वेढलेले वर्तमान समोर येई. तशी ददात कसलीही नव्हती.

पण काहीच नीट नव्हते. त्याच्या या वयात त्याच्या घराचे गजबजते नांदते गोकुळ व्हायला हवे होते, ही काही फार मोठी अपेक्षा नव्हती. साऱ्यांचेच तसे होते; होत असते. त्याच्या आणि देऊबाईच्या एकत्र येण्यातून तिच्या घराचे केवढे थोरले गोकुळ झाले होते! पण त्या घराला त्याचा टिळा नव्हता, असणार नव्हता. अन त्याचा टिळा असलेल्या त्याच्या घरात ते अवतरले नव्हते. धुरुभाऊची बायको पळून गेलेली होती. स्वत:ची लेक त्याला बायको म्हणून द्यायला निकटच्या नात्यात कोणीही तयार नव्हते. कारण ते सारे त्याला ओळखत होते. इतक्या निष्क्रिय पोळासारखे जगणाऱ्या पुरुषास कोण शहाणा सुरता माणूस आपली पोर देणार? धुरुभाऊच्या त्या स्वभावात बदल होण्याची कोणतीही लक्षणे दिसत नव्हती किंवा तसे करण्याचा कोणताही रस्ता शंभुरावास दिसत नव्हता. आणि अगदी भरपूर द्याज देऊन समजा एखाद्या गरीबाची मुलगी करून आणली तरी वेगळे होणार काय आणि त्या गरीब पोरीचे आयुष्य आपण का बर्बाद करावे, असे त्याच्या मनात येई. सुरुभाऊला दोन मुले होती. पण बापाच्या आज्ञेनुसार तो रानात वेगळा राहात

होता. तिमाजी यास एक मुलगी होती. ती आठेक वर्षांची होऊन गेली होती तरी त्यास पुन्हा अपत्य नव्हते. ते होईल अशी कसलीही चिन्हे दिसत नव्हती. पुरुषाच्या ठिकाणी आपल्या स्त्रीसाठी जी चाह असावी लागते ती त्याच्या ठायी अजिबातही दिसत नव्हती. ती मुलगी त्याला झाली हा एक अपघात असावा, असे शंभुराव यास वाटे. तिमाजी याची स्त्री आदबशीर होती. पण आपल्या पुरुषापासून पुरेसे सुख न मिळणाऱ्या त्या स्त्रीचे पाउल कधीही वाकडे पडू शकते, असे त्याच्या मनात येई. गेल्या एवढ्या आयुष्यात अशा किती तरी गोष्टी त्याने पाहिलेल्या होत्या. कोणताही बोभाटा न होईल अशी दक्षता घेत असे अनेक स्त्री-पुरुष आपले आपले रस्ते शोधतात. आणि बोभाटा होत नाही तोवर शहाणी माणसे सुद्धा शक्यतो त्याकडे दुर्लक्ष करतात, हे त्याने पाहिलेले होते. त्याची गावात दिलेली आणि शेजारच्या गावात दिलेली; अशा दोन्ही लेकी आपापल्या घरी नेटक्या नांदत होत्या, हे त्यातल्या त्यात समाधानाचे होते. पण लेकी या परक्यांचे धन. त्या आपला वंश थोडाच पुढे चालवणार आहेत? देऊबाईचे गोकुळही आपले नाव लावणार नाही. आणि आपल्या घरात ते अवतरायचे नावही घेत नाहीय. हे असे का व्हावे असे प्रश्न त्याच्या मनात मद्यसेवनाच्या प्रसंगी हमखास उतरत. त्यांची उत्तरे शोधताना आपण देऊबाईशी संबंध केला हे त्याच्या मनात येई. पण त्यात तर कोणतीही बळजोरी नव्हती. तिच्या इच्छेने त्याने तिला आणले होते. मग त्याला वाटे, आपण विठोबाचे अपराधी आहोत. आपण देऊबाईच्या ठिकाणी जो वंश उत्पन्न केला त्याला विठोबाचे नाव मिळाले. त्याला ते मिळावे अशी व्यवस्था आपण केली. तो मुकाबहिरा देवासारखा माणूस. त्याचे आपण अपराधी आहोत. आपण उल्फी आणि पिराजी यांचे धन हडप केले. उल्फीच्या इच्छेने ते केले. पण ते दरोड्याचे, पापाचे धन. त्याचा शाप आपल्याला लागला असेल. तो आपल्याला या जन्मी पुरता भोगावा लागेल. सुटका कशातूनही नसते. काहीही फुकाफुकी गिळता येत नाही. गिळण्याच्या यातना आपल्याला सोसाव्याच लागतील. अजगर जेव्हा एखाद्या मोठ्या भक्ष्याला गिळते, तेव्हा ते तृप्त असते आणि तेव्हाच ते कोणत्याही हल्ल्यासमोर हतबल असते. कारण गिळलेल्या भक्ष्याच्या पोटात असण्याने त्याच्या हालचालीवर मर्यादा आलेल्या असतात. आपण अशा अजगरासारखे आहोत. पण अजगर तर स्वतःच्या जगण्यासाठी आपले भक्ष्य गिळत असते. आपण त्याच्या पल्याड जाऊन अनेक पापे केली आणि अशा पापांची सावली या आपल्या मुलांवर पडलेली आहे. त्यांची यातून सुटका नाहीय. आपल्या मुलांना आपण ही गिळण्याची, सगळ्यांपासून सगळे घेऊन कोणालाही काहीही न देण्याची सावली दिलीय. जगणे हे असेच असते, असा त्यांचा समज झाला असेल, तर त्यांचेही आपण अपराधी आहोत. मनाच्या प्रतलावर उपस्थित होणाऱ्या या अशा भावनिक घडामोडींचे पडसाद शंभुरावाच्या झोपेत आणि अर्धग्लानीत पडणाऱ्या स्वप्नात उमटत. त्या स्वप्नात तिमाजीची स्त्री अनेक ठिकाणी उपस्थित होत असे. ती तिथे त्याचे पुतणे महादबा आणि राजाबा यांच्या मुलांशी एकशय्या करताना दिसत असे. मला अशा पुरुष नसणाऱ्या माणसाशी बांधलेले आहे, तरीही मी कुळी टिकवून आहे, कारण मी तुमच्याशी येतेय, बाहेर कुणाशी जात नाहीय. तुम्ही माझ्याशी या, असे ती म्हणत असे. कधी त्या पुरुषांच्या जागी अचानक उपस्थित होऊन माणकोजी येत असे. तर कधी कधी रानात आंब्याच्या झाडाखाली लोळत पडलेला धुरुभाऊ तत्परतेने उठून रानात आलेल्या

तिच्याशी एकत्र होत असे. या स्वप्नात अनेकदा तिमाजी याची स्त्री, आपली लेक ही आपल्याला कशी धुरुभाऊ किंवा माणकोजी यांजपासून झालेली आहे असे ज्याला त्याला सांगताना दिसे. आणि दिवसा तर ही तिमाजीची अस्तुरी अत्यंत आदबीने वागताना दिसे. अनेकदा या स्वप्नात तेजबाईही अवतरत असे आणि तुला काही दिसत कसे नाही म्हणून त्याला खडसावत असे. हे सारे, मनी वसे ते स्वप्नी दिसे, या प्रकारचे आहे, असे त्यास दिवसा विचार करताना जाणवत असे. आणि तो त्याच्या मनास मोठा दिलासा असे.

हे असे सारे मनात, स्वप्नात आणि सत्यात उतरत असताना आपला प्रपंच सावरण्याचे त्याचे प्रयत्न सतत चालू असत. त्याचा एक भाग म्हणून त्याने तुळाजी आणि आंजी यांचे लग्न ठोकून दिले. त्यात अडचण नव्हती. जोडा उत्तम होता. उगले मंडळी खूष झाली होती. घरात गोकुळ नांदण्याचा एक नवा रस्ता खुला झाला होता. आंजीच्या येण्याने घरात एक नवे चैतन्य उतरले होते. तिच्या मोकळ्या वावराने तुळसाबाई आणि काही अंशी तिमाजीची स्त्री यांना मोकळा श्वास घेता येत होता. शंभुरावाची सगळी कामे ती बिनबोभाट तर करत असेच. आणि तिच्या त्या घरातील खळखळत्या वावराने शंभुराव याच्या विषयीच्या धाकाने तयार झालेली जळमटे फोलकटांसारखी उडून गेली होती. ती आली आणि तिने शंभुराव यास पुरते ताब्यात घेतले. त्याच्या दाबातून कोंडलेली त्या घरातील हवा तिने मोकळी केली. तिचे देखणेपण, तिचा आत्मविश्वास, तिची निरागस सहजता यातून घरात आरोग्यकारी हवा खेळू लागली. ती इतकी की खुद्द शंभुराव यास खरोखरीच वाटू लागले की, या आपल्या खतपुराड कुटुंबाचे भविष्य आता बदलाच्या एका चांगल्या दिशेच्या उंबरठ्यावर उभे आहे. त्या भावनेतून त्या पोरीविषयी त्याच्या मनात आधीपासून जी ममता होती, ती निर्भर स्नेहलतेने वाढीला लागली होती. तुळाजी तर चेटूक झाल्यासारखा सतत तिच्या पाठी असे. 'जव्हा पघावा तव्हा बायकुचं ढुंग धरून' असे त्याच्या असण्याचे वर्णन घरात आणि बाहेर केले जाई, ते कानावर येई तेव्हा तो हसून वेळ मारून नेत असे. कारण त्या निरीक्षणाचा प्रतिवाद करण्यासाठी त्याला मुद्दे सापडत नसत; इतके ते त्याला सुद्धा पटत असे. आता एक माणकोजी तेवढा उरला होता. पण जबाजी तोरणे अजूनही टणक होता. अशात एके दिवशी रंगरुट भरतीसाठीचे अंग्रेज अधिकारी साल्पीत आले. गावात त्यांची बैठक लागली. युरोपात इंग्रजांचे जर्मनीशी युद्ध सुरू झाले होते. त्यांना तातडीने सैन्य भरती करायची होती. त्यासाठी कोण कोण लायक तरुण घरोघरी आहेत याची यादी सुरू झाली. राजाबा आणि महादबा हे शंभुराव याचे पुतणे त्याच्यापेक्षा थोडे लहान असलेले; आता गावकीच्या व्यवहारात म्हातारे ठरलेले असले तरी, त्यांची मुले गावात मानाच्या स्थानी होती. खोपडे-पाटील यांच्या वंशातील कारभारी लोकांच्या जोडीचे स्थान त्यांना मिळालेले होते. तिथे शंभुराव याच्या लेकांना कुठेही जागा नव्हती. गावातील इतर अनेक घरातील तरुणांच्या सोबतीने या नव्या रंगरूट भरतीत तुळाजी आणि माणकोजी या शंभुराव याच्या मुलांचा समावेश करण्यात आला. तेव्हा त्यास शंभुराव याने आक्षेप घेतला नाही. एकतर मुलुखगिरी ही आपली पूर्वापार रीत आहे,याची स्मृती त्याच्या मनात असेल किंवा युद्धात उतरून दुनिया पाहताना आपली निदान ही दोन पोरे तरी जरा अधिक शहाणी होऊन परततील असे त्यास वाटले असेल. किंवा आता खात्रीने दूरदेशी असणार असलेला माणकोजी आपल्या स्वप्नात तिमाजीच्या

स्त्रीशी जाताना दिसणार नाही, असेही त्याला वाटले असेल. यात तुळाजीचे दूर जाणे त्यास तितके रुचले नसेल, पण त्याची अस्तुरी आंजी लहान आहे, ती आपली भाची, आपल्या घरात वाढलेली अशी आपलीच आहे. युद्धावर दूर देशी गेलेल्या नवऱ्याची वाट बघत ती अधिक शहाणी होईल, आणि युद्धावरून परतलेला तुळाजी सुद्धा अधिक शहाणा होऊन येईल, असे त्याला वाटले असेल. जे काही असेल ते असो; शंभुराव याने रंगरुट भरतीत त्यांच्या झालेल्या निवडीस आक्षेप घेतला नाही. त्याच्या या दोन्ही मुलांनी सुद्धा ते मनाने तात्काळ स्वीकारले हेही त्यास आवडले. त्या वेळी गावातील काही बामण, शिंपी, सोनार, कासार अशा जातीतील तरुण मुले शंभुराव याच्या वाड्यात येऊन त्यास विनंती करत म्हणाली की त्याने आपल्या मुलांना रंगरुट भरतीत पाठवू नये. कारण महात्माजींना हे मान्य नाहीय. कोणी तरी गांधीबाबा म्हणून एक इसम होता, ज्याचा हल्ली जिकडे तिकडे बोलबाला होता. त्याला ती पोरे महात्माजी म्हणत होती. शंभुराव याने आधी पुण्यातील बाळ गंगाधर टिळक नावाच्या माणसाविषयी ऐकलेले होते. खेरीज कोल्हापूरचा राजा शाहू छत्रपती म्हणून एक होता; त्याच्याविषयी ऐकलेले होते. त्या दोघांनाही देवाज्ञा होऊन वीस बावीस वर्षे लोटलेली होती. हा गांधीबाबा नवीनच होता आणि तो थेट गावागावापर्यंत पोहोचला होता. आणखी एक भीमराव आंबेडकर म्हणून एक महारांचा पुढारी नावाजलेला होता. तेही शंभुराव याच्या कानी पोहोचलेले होते. तरीही अंग्रेज बहादूर हा आपला राजा आहे आणि तो संकटात आहे तर त्याच्या हाकेला आपण प्रतिसाद दिला पाहिजे, असेच त्याला वाटत होते. तो त्या मुलांना म्हणाला, तुम्ही हे माझ्या पोरांना सांगा. त्यांना पटत नसले तर ते नाही जाणार लढाईवर. पण राजाच्या हाकेला ओ देणे हा आपला जुना महाट धर्म आहे. तो त्यांनी पाळावा असे मला वाटते. त्यांना तो पाळायचा नसेल तर ती त्यांची मर्जी. तुळाजी आणि माणकोजी यांनी माघार घेणे साफ नाकारले. ते त्यांनी त्या पोरांना फार आर्ष शब्दात सांगितले. त्याचा उच्चार समजा नको; कारण ती सारी जातवार धारदार विशेषणे होती आणि ती त्यांनी मुक्तपणे वापरली. अर्थात त्याच्यापाठी ते शंभुराव याचे पुत्र असण्याचे बळ होते आणि ती विविध जातीतील मुले मऊ आणि सजन होती. त्यांच्या विनंतीला असा रांगडा प्रतिसाद मिळताच त्यांनी आपले म्हणणे आटोपते घेतले.आणि शंभुराव याची दोन्ही मुले लढण्यासाठी पलटणला गेली, तेव्हा शंभुराव यास आपल्या मुलांविषयी अभिमानच वाटला होता.

आपली मुले युद्धावर गेली म्हणून आरंभी शंभुराव यास जो हर्ष झाला होता, त्याला हळूहळू ग्रहण लागू लागले. एकतर नेहमी हिरव्या गवतावरून सरसरत जाणाऱ्या नागिणीसारखा घरभर जिचा वावर असे, जिच्या हसण्याचा खळखळ नाद सतत चैतन्याच्या लाटा उठवत असे, तो वावर आणि तो नाद हळूहळू मलूल होत गेला. घरात बाया तीन आणि पुरुषही तीन. पण आता त्या कोणाचाही कोणाशीही संबंध उरलेला नव्हता. पुरुष शंभुराव, धुरुभाऊ, तिमाजी आणि स्त्रिया तुळसाबाई, तिमाजीची स्त्री आणि आंजी. त्या सगळ्यांना एकमेकांशी जोडून ठेवण्याची क्षमता फक्त आंजीत होती. आणि तीच आता चिडचिड करू लागली होती. शय्येसाठी नवरा सोबत नाही म्हणून तिची चिडचिड होत असेल हे खरे. पण तो येणारच आहे ना. त्याची वाट बघत धारदार जगणे तिला शक्य होते. ती म-हाटा बाईल होती. युद्धावर गेलेल्या नवऱ्याची वाट पाहत संयमाने

जगण्याची शिकवण तिच्यात कशी उतरलेली नव्हती? तिचे तिच्या माहेरी जाण्याचे टुमणे प्रत्यही वाढू लागले होते. त्यात तिला कोण अडवणार? प्रत्यक्ष शंभुराव तिच्या पाठीशी असताना बाकी प्रश्न काय होते? त्याचा तिच्या मागणीस कधीही नकार नसे. तरीही तिला माहेरी फार काळ राहता येत नसे, असे काहीतरी होते. कारण अगदी थोडे दिवस ती तिकडे राहिली की तिचे वडील किंवा भाऊ तिला बिनचूक इकडे आणून घालत असत. तिमाजी याची स्त्री घट्ट मर्यादेने सारे करीत असली तरी तिचे काहीतरी बिनसले असावे असे तिचे वागणे असे. भांड्यांच्या आदळआपटीत सूक्ष्म, तरीही जाणवेल इतकी वाढ झाली

होती. त्याचा संबंध माणकोजी याच्या लढाईवर जाण्याशी आहे, या कल्पनेने शंभुराव याचे मन विकल होत असे. तिमाजी याने आपल्या पत्नीशी अधिक स्नेहलतेने वागावे असे त्यास वाटत असे. शंभुराव यात काय करणार? कधीतरी त्याला बोलावून घेऊन, तू तुझ्या बायकोकडे जरा लक्ष देत जा. नुसत्या म्हशी सांभाळून काय उपयोग, असे तो म्हणत असे. पण त्यातले इंगित ध्यानी न घेता तो फक्त मुंडी हलवत असे. आणि शंभुराव यास हतबुद्ध करत असे.

तुळाजी आणि माणकोजी यांची पत्रे येत. ती तुरळक आणि त्रोटक असत. तुळाजी उत्तर आफ्रिकेच्या वाळवंटात कुठेतरी होता. तर माणकोजी तिथला समुद्र ओलांडून वरच्या अंगाला युरोपातील इटली नामक देशात लढत होता. हे सगळे इतके दूरचे देश होते की त्यांच्या नावातून त्यांच्याविषयी काहीही बोध होत नव्हता. पाचवी नापास ही माणकोजीची शैक्षणिक अर्हता तुलनेने उच्च मानली जावून त्यास ट्रक्स, जीपगाड्या यांच्याविषयी जुजबी तांत्रिक ज्ञान देऊन त्या चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. बंदूक चालविण्याचे शिक्षणही अर्थातच त्याला दिले गेले होते. तो आपले काम उत्तम बजावत होता, असे निदान त्याचे तरी म्हणणे होते. खेरीज कोतूळ येथील जयवंतराव देशमुख नावाचा इसम ; त्याचा वरिष्ठ जो होता; त्यानेही एका पत्रात शंभुराव यास काळजी न करण्याविषयी आणि माणकोजीच्या प्रगतीविषयी स्वदस्तूर लिहिले होते. माणकोजी पत्र मोडी लिपीत लिहीत असे आणि शेवटी सही मात्र M. S. Saatpatil अशी झोकात करत असे. इंग्रजीचे जुजबी शिक्षण त्याला देण्यात आलेले होते. याच्या उलट तिसरी नापास तुळाजीची स्थिती होती. तो इन्फंट्री बटालियनमध्ये होता आणि वाळवंटातील कधीही न अनुभवलेल्या दुःसह पर्यावरणात लढत होता. दिवसा पराकोटीची उष्णता आणि रात्री हाडे फोडणारी थंडी; अशा हवेत त्याला जगावे लागत होते. सुरुवातीच्या काही पत्रात त्याने तिथली हवा, कच्चे मांस खाणारी माणसे, त्यांचे उंटांच्या मान आणि खांदे यांच्या मधल्या जागेत बारकेसे छिद्र पाडून रक्त पिणे, अशा पुष्कळ रंजक गोष्टी मोठ्या उत्साहाने कळविल्या होत्या. ते बहुधा तो ज्याच्याकडून पत्र लिहून घेत असेल; तो इसम कळवित असेल. तुळाजी स्वतः लिहीत नसे आणि अखेरी सही देखील करत नसे. पुढे पुढे जशी माणकोजीची पत्रे तुरळक होऊ लागली तशीच तुळाजीचीही. दोघांच्याही पत्रात साधारणतः सगळे ठीक आहे. मी सुखरूप आहे. काळजी नसावी, असा जुजबी मजकूर असे. तो शंभुराव याच्यासाठी पुरेसा असे. पण ऐन युद्धात ही मुले ज्या प्रकारे जगत होती, त्याचे खरे वर्तमान त्या पत्रांमध्ये नसे. समजा की, तुळाजी उत्तर आफ्रिकेतल्या त्या रणक्षेत्रात सतत मरणाच्या सावटाखाली जगत होता. तिथल्या रात्रीच्या

हाडे फोडणाऱ्या थंडीत मोठ्या मुश्कीलीने दिवस कंठीत होता. कधी कधी चार चार दिवस अन्नपुरवठा होत नसे. अशावेळी आतड्यांचे कुरतडणे; त्याचे बापाला काय कळविणार? अनेक सैनिकांनी तिथल्या पर्यावरणाशी जुळवून घेत उंटाचे रक्त पिणे किंवा मिळेल त्या प्राण्याला भाजून खाणे जगण्यासाठी पत्करले होते. ते तुळाजी यास जमत नव्हते. मरणाच्या टोकावर जगणाऱ्या त्या सैनिकांच्या सगळ्या क्षुधा टोकदार झालेल्या होत्या. संधी मिळताच स्त्रिया, मुले यांच्यावर कोणतेही, कसेही अत्याचार करताना त्यांना काहीही दिक्कत वाटत नसे. त्याच्याशीही त्याला जुळवून घेता येत नव्हते. असे टोकावर जगताना सगळ्या प्रकारच्या क्षुधांच्या संदर्भात माणसात जी वखवख निर्माण होते, ती त्याला भयकारी वाटत होती. अन्नक्षुधेचे दमन करणे त्याला भाग असे. कारण कच्चे मांस खाणे किंवा प्राण्याचे रक्त पिणे हे त्याच्या आवाक्याबाहेरचे होते. तुंबलेल्या वासनांचे तांडव अगदी उपाशी असताना सुद्धा इतरांसारखे त्याच्याही मनात उतरे. पण तेव्हा त्यास आंजीची आठवण होई. तिच्याशी कोणी असे वागण्याची कल्पनाही तो करू शकत नसे. रक्त जाळणारे उन्ह आणि हाडे फोडणारी थंडी यात अनेक प्रकारची उपासमारी सोसताना त्याच्या मनातील अडाणी गावठी सद्विचार त्याला बळ देत. पण याचे दीर्घकालीन परिणाम त्याच्या पुढच्या आयुष्यात त्याच्या शरीरावर होणार होते आणि अखेर राजयक्ष्मा सारखा दुर्लघ्य आजार होऊन त्यातच त्याची इतिश्री त्याच्या वयाच्या साठीच्या आतच होणार होती. पण त्याच्या आधी त्याच्या आयुष्यात आणखी पुष्कळ दाहक घटना घडणार होत्या. हा सगळा समजा जरा पुढचा कथाभाग. पण उत्तर आफ्रिकेतील त्या रणभूमीत दिवस कंठताना त्याचे भान आणि त्याच्या दुनियेशी असलेल्या संबंधांचे भान उत्तरोत्तर क्षीण होत चालले होते. पत्र लिहून वडिलांना तो काय कळविणार होता? म्हणूनच, बरे आहे, ठीक आहे, इतका जुजबी मजकूर; तोही काळाच्या अंतरात स्वतःला दुमतत तो कळवत होता; इतकेच.

याच्याउलट माणकोजी याची स्थिती होती. आघाडीवरच्या सैनिकांना शस्त्रे, अन्न, कपडे अशी रसद पुरविणे त्याच्या कामाचा भाग होते. त्यामुळे त्यास त्या कशाचीही कमतरता कधीही भासली नव्हती. इटलीमधली ती युद्धभूमी डोंगराळ होती. पण तिथली हवा तितकीशी तापदायक नव्हती. किंबहुना ती सुखदायकच होती. खेरीज तिथे मेंढपाळ लोकांचा भरणा अधिक होता. आणि तिथले पुरुष युद्धासाठी बाहेर पडल्याने तिथल्या घरात वृद्ध पुरुष, लहान मुले आणि तरुण स्त्रिया यांचा भरणा अधिक होता. त्या स्त्रिया सहसा कामाग्नीत जळणाऱ्या आणि म्हणूनच अपराधाची कोणतीही तमा न बाळगता सहवासास राजी होणाऱ्या होत्या. सहवासाचे मोकळेपण त्या हवेत होते आणि ते माणकोजी यास अचंबित करणारे होते. अर्थात म्हणून तिथे आक्रमकांचा द्वेष करणाऱ्या स्त्रिया नव्हत्या, असे नव्हे. पण एकूण माहोल स्वागतशील होता. मरणाच्या सावटाखाली वावरताना माणकोजी याच्यासाठी तो सुखदायक होता. अन्न आणि वस्त्रे पुरविण्याची गाडी त्याच्या ताब्यात होती. तिचे आनुषंगिक फायदे यास होत. ते तो कसलीही दिक्कद न बाळगता भोगत होता. तो कुठेही गुंतलेला नव्हता आणि सतत मरणाच्या छायेत वावरतानाचे सारे भोग तो एखाद्या आंडील बैलाच्या मूढतेने सुखाने भोगत होता. पण हे सारे तो त्याच्या बापाला पत्र लिहून थोडाच कळवू शकत होता? परिणामी त्याची पत्रेही

तुरळक आणि त्रोटक होत गेली.

इकडे साल्पीत माणकोजी याची पत्रे कोणास दाखविण्याची शंभुराव यास गरज पडत नव्हती. तो ठीक आहे, जिवंत आहे असे तुळसाबाई हीस सांगितले की पुरेसे असे. कदाचित ते तिथून तिमाजी याच्या स्त्रीस कळत असेल, असे शंभुराव याचे मनात येई. तेवढी एक गोष्ट वगळता माणकोजीचे त्याच्या मनात काहीही नसे. पण आंजी हीस तुळाजी कुठे आहे आणि त्याचे कसे चालले आहे याचे काहीच कुतूहल नाही, असे मनात येऊन तो कष्टी होत असे. आधी आधी आंजी काहीही न विचारता निदान कुतूहल तरी दाखवत असे. तिच्याविषयी पत्रात काहीही नसे. तरीही ते आहे असे शंभुराव वाचून दाखवताना सांगत असे. आता, हे सरळच की बापाला पत्र लिहिताना तुळाजी आपल्या बायकोची विचारपूस कशी करणार? पण तो ती करतोय असे दाखवून शंभुराव तिला खूष करत असे. किंवा आपण तिला खूष करतोय असे त्याला वाटत असे. पण हळूहळू त्याच्या लक्षात आले की तिला आपल्या नवऱ्याकडून येणाऱ्या पत्रांविषयी काहीही कुतूहल नाहीय. तेव्हा शंभुराव घाबराघुबरा झाला. ती त्याची आवडती भाची, तुळाजी या त्याच्या मुलाची पत्नी; तिला नवऱ्याचे काय आणि कसे चालले आहे, हे जाणून घेण्याचे कुठलेच कुतूहल नाहीय, हे त्याला भयंकर अनर्थकारी वाटू लागले होते. आपण कसलीही मागणी करत

नसताना तिच्या माहेरचे लोक तिला तातडीने इकडे आणून का घालतात अन् त्याचा अर्थ तिचे माहेरी आणखी कोणाशी सूत जुळलेले आहे की काय अशा आशंकेने त्याचे मन छिन्नविछिन्न होत असे. ज्याची पत्नी पळून गेली आहे असा थोरला धुरुभाऊ अजगरासारखा सुस्त जगत होता. सुरुभाऊच्या कुणबाऊ जगण्यात काहीही पुरुषार्थ दिसत नव्हता. तिमाजीला त्याची पत्नी राखता येतेय असे म्हणता येत नव्हते. तुळाजीच्या पत्नीला त्याच्यात रस उरलेला नाहीय असे वाटत होते. माणकोजी कारा होता. पण म्हणून त्याच्यात समझदारी होती, असे नक्की सांगता येत नव्हते. आपापल्या बायका नीट नांदवता न येणारी मुलेच आपण पैदा केली की काय, असे वाटून शंभुराव मनातल्या मनात फार कष्टी होत असे. पण, हे सारे आपल्या मनाचे खेळ आहेत. आपण उगीचच जास्ती विचार करतो, असे तो त्याच्या मनास पटविण्याचा प्रयत्न करत असे. त्याचे असे सारे प्रयत्न विफल होत आणि यातनांच्या दाहक गर्भात वावरणे त्यास भाग पडे.

नंतर हळूहळू सरुबाईचे घरी येणे वाढू लागले. ती शंभुरावची सगळयात धाकटी लेक. गावातच दिलेली. एका मुलाची आई. तिचा मुलगा चारेक वर्षे वयाचा होता. तो छान मातृमुखी होता. तिच्यासोबत ते पोर येई तेव्हा ते शंभुराव याच्या आसपास खेळत राही. ते त्यास फार सुखाचे वाटत असे. ती कधीही येऊ जाऊ शकत होती. तो काहीच प्रश्न नव्हता. पण तिच्या येण्याची वारंवारिता वाढली होती, हे खरे. आणि त्यात गैर काही होते असेही नव्हे. तिचे आणि आंजीचे आधीपासूनच मेतकूट होते. नवरा सोबत नसताना

आंजीला जो एकटेपणा वाटे, त्यातून तिच्या मनाला काही एक निवारा मिळावा म्हणूनच सरुबाई येत असेल; आणखी काय? पण त्यांचे एकमेकीत खुसूखुसू हसणे, कानगोष्टी करणे, आणखी कोणाचे आपल्याकडे लक्ष आहे अशी जाणीव होताच गप्प होणे, शंभुराव यास गोंधळात टाकत असे. पण असा गोंधळ तो प्रयत्नपूर्वक झटकून टाकत असे. तिच्या नवऱ्याच्या घरी सुखाने नांदणारी आपली लेक तिच्या लहान मामेबहिणीला -आणि

आता भावजय झालेल्या आंजीला- भेटायला येऊन तिच्या मनाला रिझवत असेल तर ते चांगलेच आहे. आपण म्हातारे झालो आहोत, आपल्या मुलांच्या जगण्यातील त-हेत-हेच्या प्रश्नांनी करवादून गेलो आहोत. आपण त्यात प्रत्यक्ष काहीही करू शकत नाही, या जाणिवेने हतबल आहोत. म्हणून आपले कान, नाक, डोळे- आपली पंचेंद्रियेच हळवी आणि शंकेखोर झालेली आहेत. आणि आपल्याला सगळीकडे सारे काळेबेरेच दिसते, असे तो स्वतःस सांगत असे.

शंभुराव सहसा वाड्याच्या बाहेर पडत नसे. तशी गरजही उरलेली नव्हती. दुनियेच्या व्यवहारातून तो मुक्त झाला होता. त्याच्या शिणेचे बव्हंशी सारे लोक देवाघरी गेलेले होते. रामचंद्र पाटील, राधु महार, बाबुशा इनामदार असे सारे खपले होते. बाहेर पडून तो कोणाला भेटणार होता? त्याचा जमाना कधीच संपलेला होता आणि तो मात्र जिवंत होता. त्याच्या दुनियेचा आणि त्याच्या मनाचा संकोच झालेला होता. त्याच्या मनाच्या प्रतलावर आता फक्त त्याची मुले होती. त्यांची आयुष्ये डगमगती होती. त्यांना स्थैर्य मिळावे, असे त्याला वाटत होते. लढाईवर गेलेली आपली मुले आता परत यावीत असे त्याला प्रकर्षाने वाटत होते. तेही आता त्याच्या हाती उरले नव्हते. सोजिरांना एरवी सुट्ट्या मिळतात, त्याही या युद्धाच्या काळात त्यांना मिळत नव्हत्या. ते खूप लांब दूरदेशी होते. त्यांच्या त्रोटक पत्रांनी त्याच्या मनाचे अस्वस्थ अवकाश डहुळत होते. हे सारे कोणाशी बोलण्याची सोय नव्हती. ज्यांच्यापुढे तो आपले मन मोकळे करू शकत होता त्या त्याच्या दोन स्त्रिया; तेजबाई आणि देऊबाई देवाघरी गेलेल्या होत्या. तुळसाबाईशी तो काय बोलणार होता? ती फारच गरीब आणि सरळ स्त्री होती. ती त्याची जोडीदार कधीही होऊ शकली नव्हती. भीती आणि संशय यांचे दमनकारी राक्षस त्याच्या मनाच्या अवकाशात मोकाट धुडगूस घालत होते. युद्धाच्या बातम्या येत. त्या इथे यांनी त्यांच्यावर विजय मिळवला आणि त्यांनी यांच्यावर अशा असत. युद्धाचा अंत कुठेही नजरेत येत नव्हता. मुलांच्या पत्रांमधून तशी कसलीही चिन्हे त्याच्याकडे पोहोचत नव्हती. ते साधे सोजीर ; त्यांना कोण असे सांगणार? आपली मुले युद्धावरून परत येण्याच्या आधी आपण खपू नये असे त्याला प्रकर्षाने वाटत होते.

5

बातमी आली की अमेरिका नामक देशाने जपान नामक देशातील नागासाकी आणि हिरोशिमा या शहरांवर बॉम्बगोळे टाकले. ते इतके शक्तिशाली होते की, त्यात लाखो माणसे एकाच वेळी मेली आणि ती शहरे उजाड झाली. प्रचंड हाहाःकार मातला. तिथेच युद्ध संपले. परिणामी तुळाजी आणि माणकोजी ही शंभुराव सातपाटील याची मुले गावी घरी परतली. ते रंगरुट होते आणि त्यांना फौजेतून निवृत्त करण्यात आले होते. ती शंभुराव

याचेसाठी फार आनंदाची गोष्ट होती. त्याच्या आयुष्याच्या उत्तरकाळात तो इतका आनंदी क्वचितच आणखी कशाने झाला असेल. ती मुले परतल्यावर त्याला भेटायला त्याच्या खोलीत आली तेव्हा उठून त्यांना उराशी घ्यावे आणि त्यांना कडकडून भेटत त्यांच्या पाठी थोपटाव्यात असे त्याला प्रकर्षाने वाटले. प्रत्यक्षात तो फक्त कोमल हसला. पण तेही त्या पोरांपर्यंत पोहोचले. तुळाजी अधिक हडकला आहे आणि माणकोजी अधिक गरगरीत झाला आहे असे त्याचे मत झाले. तुळाजी त्याच्या बायकोपासून जवळजवळ तीन वर्ष दूर होता. त्याचे हडकणे स्वाभाविक आहे. आता बायकोचा सहवास आणि घरचे अन्न यांच्या द्वारा तो काही दिवसातच पहिल्यासारखा होऊन जाईल. कसलाही आगापिछा नसलेला माणकोजी गरगरीत झालाय. त्याचे आता तातडीने लग्न लावून दिले की झाले, असे शंभुराव याच्या मनात आले.

मुलांच्या येण्याने शंभुराव याचा उत्साह इतका वाढला की गेल्या तीन-चार वर्षात; विशेषतः देऊबाईच्या जाण्यानंतर त्याने घराबाहेर पडणे जवळपास जे थांबविले होते, त्या मरगळीस झुगारून तो पुन्हा बाहेर पडला आणि जबाजी तोरणे याच्या घरी जावून बसला. आणि निकराचे बोलणे लावत म्हणाला, तू तुझी मुलगी मला माझ्या मुलासाठी देत का नाहीस? आमच्यात तुला कोणता कमीपणा दिसतो? तुझी लेक माझ्या मुलासाठी मला आवडली म्हणून मी इतकी वर्षे थांबलो आहे. तुझी अडचण काय आहे? तुला किती द्याज पाहिजे आहे? मी ते पाहिजे तितके द्यायला तयार आहे. माझा मुलगा लढाईहून परतला आहे. तो दणकट तगडा आहे. येता जाता तू त्याला अनेकदा पाहिलेले आहेस. मुलगा आणि मुलगी यांच्या वयात जरा अधिक अंतर आहे, हे तुझे म्हणणे मला मान्य आहे. पण जोडीचे आयुष्य जसजसे पुढे जाते तसतसे हे अंतर मिटत जाते, हे मी तुला सांगायला नको. मुलीपेक्षा मुलगा किमान दहा वर्षांनी मोठा असावा असे आपले शास्त्र सांगते. या दोघांमधले वयाचे अंतर त्यापेक्षाही अधिक आहे हे मलाही मान्य आहे. माझी मुले माझ्यासारखीच अंगकाठीने थोराड आहेत. म्हणून ती त्यांच्या वयापेक्षा अधिक मोठी दिसतात, हे मीही जाणतो. बाकी कुळीच्या अंगाने आमच्यात काहीही कमीपण नाही, हे तुही जाणतोस. तू ही तुझी लेक मला माझ्या लेकासाठी द्यावीस असे मला वाटते. एरवी तुलाही जावई मिळेल, मलाही सून मिळेलच. योग असतो तसे घडते. ते आपल्या हाती नाही. पण मी आज तुला अखेरचे विचारायला आलेलो आहे.

विचार कर आणि सांग. पुन्हा मी तुला विचारायला येणार नाही. जबाजी जरीचा व्यापार करणारा माणूस. अर्थात त्याला व्यापार म्हणणे सुद्धा मुश्कील होते. गावोगावी जाऊन जुनी लुगडी, फेटे, उपरणी गोळा करायची आणि त्यातील जर काढून ती सोनारांना द्यायची. सोनार त्याचे जे दाम देईल ते आपले. विक्री वजा खरेदी बरोबर नफा नव्हे ; मेहनताना. हा असा उद्योग करणारे गावात आणखी काही लोक होते. सगळेच जबाजी याच्यासारखे गरीब होते. या उद्योगात साल्पीतील सोनार सुधारले. त्यांनी मोठमोठ्या सावकारी पेढ्या उभारल्या आणि त्या निष्ठुरपणे राबवल्या. गावोगावी कैक जमिनी गहाणवटीने त्यांच्याकडे आल्या आणि नंतर त्या त्यांच्या मालकीच्या झाल्या. वसुलीसाठी शेतकऱ्यांची दावणीची गुरे सुद्धा सोडून आणण्यात त्यांना दिक्कत वाटत नसे. ते सोनार सकाळी स्नान करून उघड्या अंगाने छातीवरील जानवे आणि कपाळ, छाती, दंड

यांजवरील पांढरे भस्माचे पट्टे मिरवत हाती तांब्याचा चकचकीत कमंडलू घेऊन पूजाअर्चना करण्यासाठी देवळात जात असत. शेतात न राबणाऱ्या सगळयाच अडाणी जाती तुलनेने अधिक सुखात जगत होत्या. त्यांच्या बायकांना मातीत राबावे लागत नव्हते. स्वतःची फारशी शेतजमीन नसणाऱ्या कुणब्यांचे जगणे जिकीरीचे होते. जगण्यासाठी परक्या गावातून येऊन साल्पीत वसलेला जबाजी तोरणे याला अपवाद थोडाच होता? त्याच्या दोन थोरल्या लेकी भीमाबाई आणि ठमाबाई या खोपडे-पाटील यांच्यात दिलेल्या होत्या. पैकी भीमाबाई हिचे ठीक चालले होते. पण ठमाबाई हिला अनेकदा लेकराबाळांसकट माहेरी राहावे लागे. तिचे तितके ठीक चालले आहे असे म्हणता आले नसते. त्याखाली त्यास एक पुत्र होता. तो गावातील एका माळयाच्या घरी सालगडी म्हणून राबत होता. त्यास आणखी एक कन्या आणि पुत्र होता. पैकी या राहिलेल्या कन्येवर शंभुराव याचा डोळा होता. तिचे नाव चिमाबाई. जबाजी याने शंभुराव याच्या निकराच्या प्रस्तावावर विचार केला. शंभुराव मोठा कर्तबगार होता हे सरळच, पण त्याची मुले खतपुराड होती. तरीही समजा; त्याने कमावलेले खाऊन ती निदान पिढीभर तर नक्कीच सुखाने जगू शकत होती. पुढे ज्याचे त्याचे नशीब. त्याला नकार देणारे आपण कोण लॉर्ड फॉकलंड लागून गेलो, असे त्याच्या मनात आले. त्याने शंभुराव याच्या प्रस्तावास होकार भरला.

माणकोजी आणि चिमाबाई यांचे लग्न शंभुराव याने धडाक्यात लावून दिले. त्यात सहभागी होताना कित्येकांस सातपाटलांच्या जुन्या वैभवाच्या आठवणी आल्या. चिमाबाई खरोखरीच लहान होती. तिला अजून नहाण सुद्धा आलेले नव्हते. ती अंगकाठीने टणक आणि काटक होती. या घरात मिळणाऱ्या नियमित उत्तम अन्नाच्या प्रभावातून हळूहळू उत्तम आरोग्याची आभा तिच्या शरीरावर झळकू लागली. तिची रात्र तिच्या सासूशेजारी सुखाने झोपण्यात जात असे आणि दिवसभर ती आंजीच्या देखरेखीखाली असे. अगदी तिला अंघोळ घालण्यापासून ते तिची वेणीफणी सुद्धा तीच करत असे. तुळाजी युद्धावरून परतला तेव्हापासून आंजीच्या हसण्यातील खळखळ आणि वावरण्यातील नागीण पुन्हा प्रकट झाली. त्यामुळे शंभुराव फार खूष झाला. पण त्यामुळे आंजीचे घडोघडी माहेरी जाणे काही थांबले नाही. तिला वाटेल तेव्हा ती जात असे. अर्थात शंभुराव यास विचारूनच. अन् तिला काही नाकारण्याची त्याला सवयच नव्हती. त्याला वाटे, आंजी तशी लहानच आहे. आपली लाडकी आहे. तिचे माहेर जवळच तर आहे. अन् उगले मंडळी तिला त्वरेने परत आणून घालतात. कधी कधी तुळाजी तिच्यापाठी जातो आणि दोन दिवस सासरी गोडधोड खाऊन तिला घेऊन येतो. आपल्याला विचारूनच तोही जातो. त्याच्या तशा बायकोच्या मागे मागे असण्याचे आपल्याला हसू येते. आपण ते त्याला दिसू देत नाही. मुळात तो बोलतोही कमी.

'जाऊन येतो.' 'कुठं?' 'आंजीला घेऊन येतो.'

शंभुराव थोडा वेळ गप्प बसतो. आतल्या आत हसतो आणि म्हणतो, 'ठीक.' हा इतकाच संवाद.

एके दिवशी तुळाजी शंभुरावाच्या खोलीत आला आणि नेहमीसारखा उभा राहिला. शंभुरावाने त्याच्याकडे प्रश्नार्थक पाहिले.

'पोलिसात भरती होऊन आलो.'

'आऽऽ' शंभुराव यास आश्चर्य वाटले. आपल्याला कसलाही पत्ता न लागू देता? काहीही न सांगता- सवरता? म्हणजे; त्याने केली ती गोष्ट चांगलीच केली. काही ना काही उद्योगाला लागणे हे छानच! सगळ्यांनी शेतात राबलेच पाहिजे असे नाही. कुणबिक ही आपल्यासाठी नाईलाज म्हणून करण्याची गोष्ट, हे कुठून कसे आलेले शंभुरावाच्या मनात ठाम. मुख्य म्हणजे हे तुळाजीच्या डोक्यात आले आणि त्याने ते केले. स्वतंत्रपणे विचार केला. शंभुराव यास खूप आनंद वाटला.

'चालन ना?' 'हां. का नायी? चांगलं ह्ये. तुपल्या डोक्यात कसं आलं?' 'आंजी म्हणली.' 'ठीक.'

शंभुरावाला वाटले, ही पोर आंजी; लबाड आहे खरी चंट. अन् याने बायकोचे ऐकले यात काहीच गैर नाही. एकमेकांच्या विचारानेच प्रपंच करायचा असतो. त्यासाठी नवरा बायकोचा एकमेकात विचार हा पाहिजेच. आपल्याला तो अनुभव तितका नाही. तेजबाई सांगायची कधी काही. पण ते खास तितके नसे. आपल्याला तशी गरजच पडली नाही. तो रिवाजही नव्हता. ही नवी पिढी आहे. थोडा फरक असणारच. आहे ते चांगले आहे.

प्रशिक्षणाचा काळ संपवून तुळाजी शिरूर-घोडनदी येथील पोलीस ठाण्यात रुजू झाला. तेही पुन्हा सोयीचे. अगदी जवळचे ठाणे. घरी कधीही यायचे तर सोयीचे आणि नजिकचे. तेही आंजीनेच त्याला निवडायला सांगितले, असे शंभुराव यास समजले. साहजिकच तिची रवानगी घोडनदीस झाली आणि ती तिथे तिच्या नव़्यासोबत पोलिसांच्या क्वार्टर्समध्ये राहू लागली.

नंतर एके दिवशी माणकोजी आला आणि म्हणाला, 'मुंबईला जातो.' 'मुंबईला जाऊन काय करतोस?'

"मिलट्रीत डायवरकी शिकलो. इथं त्याचा काही उपयोग नाही. तिथं होईल.'

माणकोजीची बायको अजून लहान होती. संसार करायच्या दृष्टीनेही लहान होती. शंभुराव यास वाटले, हा मुंबईस जाऊन आपले नशीब आजमावयाचे म्हणतो, हे काही वाईट नाही. हा जाईल. कोणाच्या तरी गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करील. त्याला ते नीट जमले तर उद्या समजा आपण एखादी ट्रक त्याला घेऊन देऊ. तो एकीच्या दोन करील. वाढेल आणि वाढवेल. त्याचे नशीब उजळेल. बाप म्हणून आपल्याला या वयात आणखी काय पाहिजे? पैसा ही आपल्यासाठी तितकी मोठी अडचण नाहीय. मुंबई आता आपल्याला परकी राहिलेली नाहीय. गावातली अनेक पोरे तिथे आहेत. मुख्य म्हणजे राधु आणि बाबुशा यांची मुले तिथे स्थिरावलेली आहेत. माणकोजी याचा हा विचार चांगलाच आहे.

"जा. नीट राहा. नीट काम कर,' शंभुराव म्हणला.

माणकोजी गेला तेव्हा घरात पुन्हा पुरुष तीन आणि स्त्रिया तीन. शंभुराव, धुरुभाऊ आणि तिमाजी. तुळसाबाई, तिमाजीची स्त्री आणि माणकोजीची स्त्री. पण आता चित्र अधिक आशादायक होते. आपल्या धाकट्या दोन पोरांनी स्वतःच्या बुद्धीने आपले काम शोधले, ही शंभुराव याच्यासाठी संतोषकारी गोष्ट होती. हा खानवटा खतपुराड नाहीय. स्वतःच्या बुद्धीने निर्णय घेण्याची ताकद निदान या दोन पोरांनी दाखवलीय. ही मुले

लढाईवर गेली. दुनिया बघून आली. शहाणी झाली. त्यांनी त्यांचे रस्ते शोधले, हे शंभुराव याच्यासाठी परम संतोषकारी होते. त्यामुळे त्याच्या म्हातारपणी त्याच्या मनाने उभारी धरली. तो वाड्यातून बाहेर पडू लागला. हातात त्याचा आवडता सोटा घेऊन हळूहळू चालत जाऊन गावाच्या वेशीजवळच्या मारुतीच्या देवळाच्या पायरीवर बसू लागला. हाती काठी येण्याचे त्याचे वय कधीचेच होऊन गेले होते. पण आधाराला काठी घेऊन तो अजूनही चालत नव्हता. तो जाड काठीवजा सोटा त्याच्या हाती फार शोभे. तो त्याच्या भव्य व्यक्तिमत्त्वाचा भाग होता. दोन धाकटी पोरे वेगळया रस्त्याने गेल्यामुळे त्याच्या मनाने उभारी धरली होती. तो मारुतीच्या देवळाच्या पायरीवर बसे तेव्हा येणारे जाणारे लोक त्याला आदराने रामराम घालत. काही आदबीने येऊन त्याच्या शेजारी अंतर ठेऊन बसत. जुजबी बोलणेही होई. तुळाजी आणि माणकोजी यांच्या गोष्टी निघाल्या की त्यास फार संतोष होई. पण म्हणून तो त्यांच्याविषयी फार बोले असे नव्हे. पण संतोष असे आणि दिसे.

तुळाजी अगदी जवळ घोडनदीला होता. तो आणि आंजी महिन्या-पंधरा दिवसांनी, त्यांच्या सवडीने कधीही दिवस-दोन दिवसांसाठी राहायला घरी येत असत. ते घरी असल्यासारखेच होते. पोलीस म्हणजे काही मोठा असामी नव्हे. पण साल्पीत लोकांना ते महत्त्वाचे वाटे. तुळाजी पोलीस असल्याने लोक त्यास महत्त्व देत आणि वचकून असत; मान देत असत. आंजी आली की घरात चैतन्य येई. एरवी माणकोजीची चिमुरडी स्त्री चिमाबाई ही शंभुराव याचे सारे बघत असे. अंगात घातलेले लुगडे नीट सांभाळता न येणाऱ्या वयाची ती होती. ती सासूच्या सूचनांनुसार सारे नीट करत असे. शंभुरावाचे रात्रीचे जेवणाचे ताट तीच त्याच्या खोलीत घेऊन येत असे. तिची कोवळीक, तिची सुंदर लगबग, हे सारे त्यास फार गोड वाटत असे. गावात माहेर असूनही ती कधीही तिकडे जात नसे. त्याची मानसिक, भावनिक गरज तिला भासत नसे. म्हणजे, नसेल ; नसावी. तिने तशी मागणी कधीही केली नव्हती. तिला बरे वाटावे म्हणून शंभुराव अधूनमधून तिचा बाप जबाजी तोरणे यास बोलावून त्याच्याशी चार गप्पा करत असे. शंभुराव याच्या मते ती फार गोड ; चिमणीसारखी छान मुलगी होती. अर्थात, आंजी आली की ती ताबा घेई. चिमाबाईचा त्यास आक्षेप कसा असणार? ती आंजीची लाडकी लाडुली. आंजीचे ते ताबा घेणे शंभुराव यास आवडे. तिकडे मुंबईत माणकोजीचा जम बसत चालला होता. त्याला एका पारशी शेठकडे नोकरी लागली होती आणि तो शेठ त्याच्या कामावर खूष होता. हे त्याच्या पत्रांमधून कळे. आणि येणाऱ्या जाणाऱ्या बाबुशा, राधु यांच्या मुलांकडूनही कळे. खेरीज खुद्द माणकोजीही अधून मधून येत असे.

शंभुराव यास वाटे, सगळयांचे सगळे आता निदान बरे म्हणावे, असे चालले आहे. एकटा धैर्यराव उर्फ धुरुभाऊ सगळयात थोरला असूनही एकटा आहे. त्याचे काही कळत नाही. त्याचे काय करावे? त्याला स्त्रीत रसच नाही की काय? पण तो दिसतो तर चांगला रेड्यासारखा. त्याच्यात रेड्याची ताकद असेल असे आपल्याला वाटत नाही. कदाचित असेल सुद्धा. आपण त्याच्याकडे तितके लक्ष दिले नाही. का दिले नाही? स्वतःची बाईल ज्याला सांभाळता आली नाही, त्याला आपण काय सांगणार? ती पोर परतली नाही. तिच्या माहेरचे लोक आले नाहीत. काय झाले असेल? सांजसकाळ हा चाळीशीला

पोहोचेल. एका वेळेला कोरड्यासात दोन दोन भाकरी मुरगाळून हादडतो आणि कुठेतरी जाऊन झोपतो. हे कसले जिणे? काय असेल? का असेल? एकदोनदा विचारले त्याला तर तो गप्प. शुंभ. कशातही काहीही रस नसलेला. तुला नवी बाईल करायचीय काय, असे विचारल्यावरही गप्प. याला आयुष्यात काय पाहिजे आहे? पुढे जाऊन हा काय करणार आहे ? बाईखेरीज पुरुषाचे आयुष्य अपुरे असते, हे याला कळत नाही काय? याला बाईची चाहच नाही काय? की मुळातून हांडगा आहे हा? की विठोबाची सावली पडलीय याच्यावर? सगळे असून कशातही रस नसलेला आहे हा? पण विठोबाने आयुष्यभर सतत काम केलेय. तो कधीही मोकळा बसला नाही. हा काहीच कसे करत नाही? आपल्या मरणानंतर याचे कसे होणार? ही मुले वेगळी होतील. ज्याचे त्याचे आयुष्य त्या त्या पद्धतीने चालेल. हा काय करील?

शंभुरावाने त्याला बोलावून घेतले. तो आला आणि शुंभासारखा उभा राहिला.

'काय करतोस?'

धुरुभाऊ शुंभ. भला मोठा आकार. त्वचेखाली पाणथळ जागी मातावी तशी चरबीची दलदल. तो संथ उभा आहे आणि त्याच्या श्वासोच्छवासाचा आवाज स्पष्ट येतोय. नुसता उभा आहे तरी याला श्वास घ्यायचा इतका शीण येतोय. हा काय करणार?

'काही तरी कर.' 'हां.' हे श्वासोच्छवासातून मुश्कीलीने. 'केळी खांद. रताळी खांद. पठारावर जाऊन दगडांच्या ताली बांध.' 'हां.' पुन्हा संथ श्वासोच्छवासातून. 'ठीक आहे. जा आता.'

शंभुराव यास पटते. हा काहीही करणार नाही. जाईल आणि झोपेल. आपण यात काहीही करू शकत नाही. चाळीशीच्या घरात शिरलेल्या पोराला म्हातारपणी आता कसे वळण लावणार? जेव्हा ते लावायचे तेव्हा आपल्या ते लक्षात आले नाही. आता कशाचाही उपयोग नाहीय. याचा सगळयात जास्ती लाड झाला. पहिला पोरगा म्हणून तेजबाईने याचे फार लाड केले. हा लडदू झाला. आपल्याला वाटले, मोठा झाला की शिकेल. सगळेच शिकतात. काही ना काही करतात. याच्या लहानपणीच तेजबाई गेली. हा खाऊन खेळत वाढला. अन् तसाच वाढत राहिला. माणसाचे असे कसे होते? त्याची पहिली बायको पळून गेली त्यानंतर काही दिवसांनंतरची गोष्ट. कधी नव्हे ती तुळसाबाई आली आणि भितभित म्हणाली, “धुरुभाऊचं काय करायचं?'

'त्याचं काय करायचं?' 'त्याची बाईल पळून गेली.' "हां.'

'दुसरी करून आणायची? माझ्या माहेरच्या भावकीत आहे एक.

चांगली आहे. नवऱ्याने टाकलेली आहे.'

ते शक्य नव्हते. कुळीला बट्टा कसा लावून घेणार? सातपाटलात पाट लागत नाही. बाईल लग्न लावूनच आणावी लागेल. तेही समजा सोडा. अगदी लावायचाच ठरला पाट तर देशमुखात सुद्धा लागतो. सजा म्हणून भावकीला किंवा गावाला जेवण दिले की दोष मिटतो. अन् नाही दिले तरी तीन पिढ्यांनी तो तसाही आपोआप मिटतो. साधी गोष्ट आहे, जो गावजेवण घालू शकतो तो पाट कशाला लावील? कैक तरण्या पोरींचे बाप हसत हसत तिथे सोयरीक करायला तयार होतील. मुळात प्रश्न असा हे की, याची पहिली बाईल का पळून गेली?

'पहिली का गेली?' 'हा तिला परसत नव्हता.' 'का?' 'हा तिला मारत होता.' 'का?' 'ती संसार करायला मागायची. हा तिला मारायचा."

'त्यात तिची काय चूक? नवी आणली तरी हा तिच्याशी संसार

करणार आहे का? हा का संसार करत नाही?'

'माहीत नाही. वाटलं, नवी आणली तर करील तिच्याशी कदाचित.' 'विचार त्याला. आणि सांग.'

विचारले तिने. म्हणाला, 'मला बाईल नको. मी आहे असा ठीक आहे.' संपला विषय.

असायचं असं. आठ-दहा मुले झाली तर त्यात एखादा हांडगा निपजायचा. एखादा मनाने वाढायचाच नाही. एखादा निरोगी असून संसाराच्या दृष्टीने निरिच्छ निघायचा. एखादा अचानक कुठेतरी निघून जायचा तो परतायचाच नाही. ज्याला संसारच करायचा नाही, त्याला आपण तरी का त्यात घुसवावे? शंभुराव याने तेव्हाच हा विषय त्याच्यापुरता संपवला होता.

: आयुष्य सगळे सुफळ संपूर्ण नाही करता येत. आहे ते तसे गोड मानून जगण्यात समाधान मानावे. हे शंभुराव याचे संध्याकाळी दारू पित असतानाचे विचार.

6

एके दिवशी शेजारच्या गावचा कटके म्हातारा शंभुरावास भेटण्यास आला. हा कटके म्हातारा वयाने शंभुराव याच्याच शिणेचा. फार मोठा जमीनदार. असे सांगतात की राणोजी कटके म्हणून याचा कोणीतरी पूर्वज पेशवाईच्या काळात होता. पानिपतात मराठे हरले तेव्हा जो पळ झाला, त्यात याने पेशवे यांच्या घरातली कोणीतरी बाई सुरक्षित आणून पुणे येथे पोहोचवली. तेव्हा तिने या राणोजीस फार नावाजिले. म्हणून पेशवे यांनी फार मोठे रान त्यास बक्षीस म्हणून दिले होते. शंभुराव आणि हा कटके अर्थातच कैक वर्षांपासून एकमेकांस ओळखत होते. अलीकडच्या काही वर्षात भेटी तितक्या होत नव्हत्या. कारणे संपतात. शरीरे थकतात. सारे व्यवहार पुढच्या पिढीच्या ताब्यात गेलेले असतात. बसल्या जागी हरी हरी करायचे. पोरांनी किंमत नाही ठेवली तर प्रसंगी जनावरांच्या गोठ्यात त्यांच्या सोबतीने लाफटपणे पटकुरासारखे जगत राहायचे, असे अनेकांच्या नशिबी येते. असे काहीही शंभुराव याच्या वाट्यास आलेले नव्हते. पण कटके सांगत होता त्याच्यावरून त्याच्या नशिबी ते आले होते. त्याच्या शरीराची रया गेली होती. दात पडले होते. गालफडे आत घुसली होती. अंगभर सुरकुत्यांचे जाळे. बोलताना त्याची जीभ सारखी बाहेर येऊ बघे आणि ओठ चाटून तो ती आत घेई.

'शंभुराव ; मी जिमीन काढायची म्हणतो. तू घेतो का?' 'कशाला काढितो?'

'जाउंदे, त्याच्यायसका, पैश्यांचं गठुळं जवळ आसल्यावर तरी परसतील मला. समदे

मजाहाजा करित्यात. आन मी मातर गोठ्यात.'

'ह्यो काय उपाय नाही कटकेभाऊ. गठुळं कधी ना कधी खाली व्हतं. जमीन कायम जाग्याव राहती. उद्या समजा तुझं गठुळं कोणी हिसकावलं, त तू काय करशीन? तू सांगतो, त्याच्यावरून ते करायला तुझी पोरं नायी कमी करायची.'

'हाये बराबर, तू म्हनतो ते. पन ते हाये तव्हर त नीट वागतीन. मपले राहिले किती दिस आता? चार दिस सुकानी तरी जगन मी. आन जिमीन इकली त जराशिक जाग्याव तरी येतीन भडीचे. धाक लागन का म्हतारं पार नागवं करूनसनी टाखीन आपल्याला. तुला त मायती ह्ये. आपल्याला जिमीन महामूर. योक तुकडा गेल्यानी कायच फरोक नायी व्हत. तुला घ्यायची का बोल. नायतं सोड बात.'

'मला काय ; मी घेईनच. सांग कोनती जिमीन-' कटकेने सांगितली. जमीन साल्पीच्या शिवारातच होती. पश्चिम दिशेला. पन्नास एकरांचा एकच सर्व्हे नंबर होता. कटके आधी सूर्यराव उर्फ सुरुभाऊ यास भेटला होता. त्याचा होरा असा की आता शंभुराव आपल्यासारखाच. म्हातारा. त्याची मुलेच आता कर्ती असतील. धुरुभाऊ त्यास माहीतच नव्हता. रानात सुरुभाऊ भेटला तेव्हा तो त्याच्याशी बोलला होता. सुरुभाऊ म्हणाला, 'माझ्या म्हाताऱ्याशी बोला. त्याच्याच हातात सारे आहे.' म्हणून कटके घरी वाड्यावर आलेला होता. त्याची अट एकच होती. रक्कम जी ठरेल ती एकाच वेळी एकरकमी मिळावी. शब्द झाला की व्यवहारात खोट नाही.

'करू आपन. चार दिसांनी ये तू,' शंभुराव म्हणाला.

कटके चार दिवसांनी आला. तो जमीन विकण्यासाठी पेटलेला होता. त्याला त्यासाठी ती क्षमता असलेला आणि शब्द पाळू शकणारा माणूस हवा होता. त्याच्या नजरेत शंभुराव तसा होता. बोलाचाली झाली. व्यवहार ठरला. एक रकमी एक हजार रुपये शंभुराव याने द्यावे. त्या शब्दावर व्यवहार ठरला. रक्कम मोठी होती. शंभुराव झाला तरी, त्याच्यासाठीही ती फार थोरली रक्कम होती. पण तो म्हणाला, तीन महिन्याच्या आत व्यवहार करू. इसार म्हणून हे पंचवीस रुपये घे. मी ते तुला देतोय, यासाठी साक्षीदार असण्याची गरज मला वाटत नाही. उद्या तू नाही होऊन पडला तरी ही माझ्यासाठी मोठी रक्कम आहे. एकमेकांवर भरवसा नसेल तर व्यवहार करण्यास काय अर्थ आहे? कटके म्हणाला, 'मला पाच रुपये पुरेसे आहेत. पंचवीस नको. मीही शब्दाला जगणारा माणूस आहे. पण तीन महिन्याच्या आत व्यवहार व्हावा, इतके मात्र मीही म्हणेन. नाही झाला तर हे तुझे इसाराचे पैसे बुडाले समज.' शंभुराव याने ते मान्य केले. जमीन उत्तम होती. जमिनीतून ओढा वाहात होता. घडीव दगडांनी बांधलेली भक्कम विहीर तिथे होती. तिला बक्कळ पाणी. थोरले बागाईत होते. शंभुराव यास आधी सारे माहीत होते. तरीही सूर्यराव याच्या मुलास तिकडे पाठवून शंभुराव याने खात्री करून घेतलेली होती. आपण मेल्यावर आपल्या मुलांना या पृथ्वीवर उभे राहण्यासाठी अधिकाधिक जागा असावी असा पसरण्याचा स्वाभाविक शेतकरी विचार त्यापाठी होता. आपल्या पोरांनी उद्या समजा सगळयांनी शेती केली नाही, म्हणजे ते शेतात राबले नाही, तरी शेती नुसत्या अर्धलीने देऊन सुद्धा त्यांना बऱ्यापैकी जगता येईल असा सुखद विचार त्याच्या मनाशी होता. अर्थात इतकी मोठी रक्कम तीन महिन्यात उभी करणे हेही काही सोपे नव्हते. पण वेळ

हाताशी होता. काही ना काही तरकीब निघेल, याचा त्यास भरवसा होता. त्याला वाटले, आपण या ना त्या प्रकारे तीनेकशे रुपये उभे करू शकू. एक मुलगा पोलिसात आहे, दुसरा मुंबईत डायवरकी करतो. तिमाजीच्या काही म्हशी विकू. व्यवहाराचे सूर्यराव याला माहीत आहे. तो काही करील. अखेर त्यांच्यासाठीच तर हे सारे चालू आहे. आणि अगदीच काही शेपटासारखे उरले तर आपण आपले पुतणे -थोरल्या जयाप्पाची मुले- राजाबा आणि महादबा यांना सांगू. ते आपल्या धाकट्या भावांसारखे आहेत. अशा वेळी ते आपल्याला नक्कीच हात देतील. बाकी सोयरे लोकात काही मागायचे नाही. ते मागावे अशी स्थिती नाही. पण एवढ्यात निभाव होईल ; अशा प्रकारे शंभुराव विचार करत होता.

हा व्यवहार ठरल्यानंतर साधारणतः महिन्याभराने माणकोजी मुंबईहून घरी आला. ते अगदी सहज होते. त्याची स्त्री आता नहाती झालेली होती. तिची चाह त्याला वाटणे स्वाभाविक होते. म्हणूनच तो येऊन जवळपास महिना लोटला होता तरी शंभुराव याने त्यास मुंबईस कधी जाणार असे विचारले नाही. पण मग एके दिवशी एक इसम आला. त्याने खुद्द शंभुराव यास भेटून एक पुडके दिले. त्यातील ऐवज मोजून तशी पोचपावती त्याने मागितली. तो इसम मुंबई येथून आलेला होता. माणकोजी ज्या बोमनजी नामक पारशी शेठकडे काम करत होता, त्याचा तो माणूस होता. पुडक्यात एकूण रुपये सहाशेएकतीस आणि काही पैसे होते. सगळा हिशेब बैजवार लिहिलेला कागद होता. सोबत पत्र होते. झाले ते असे होते :

तीन सालांआधी माणकोजी मुंबईस गेला. तो बाबुशा इनामदार याच्या मुलाच्या ओळखीने या बोमनजीशेठ पारशी याच्या ट्रान्स्पोर्ट कंपनीत ड्रायव्हर म्हणून कामास लागला होता. माणकोजी कामास चोख. ट्रक उत्तम चालवी. माल पोहोचविणे, रक्कम घेणे आणि शेठच्या मुनिमाकडे बिनचूक जमा करणे यात कुठेही खोट नव्हती. वागणे, बोलणे नम्र. या पारशी लोकांस प्रामाणिक नेटके काम करणाऱ्यांविषयी लोभ विशेष. त्याने माणकोजी याची अधिक माहिती घेतली. हा देशावरील एका मोठ्या मालदार बापाचा मुलगा आहे, असे त्यास समजले. त्याने माणकोजीच्या हस्ते शंभुराव यास चिठ्ठी दिली. आपला मुलगा होनहार आहे. कामात हषार आहे आणि व्यवहारास चोख. आपल्यासारखे पैश्यांची थोडी गुंतवणूक करण्याची ताकद असणारे वडील असताना त्याने केवळ ड्रायव्हर म्हणून आयुष्य का घालवावे? तुम्ही इतके इतके पैसे गुंतविण्यास तयार असाल तर एक ट्रक त्याच्या -माझ्या किंवा तुमच्या- माझ्या प्रत्येकी अर्धा हिस्सा मालकीची करू. पुढच्या काळात हा धंदा त्याने नीट केला तर सगळी ट्रक मी त्याच्या मालकीची करून देईन. त्याला स्वतंत्रपणे धंदा मिळेल यासाठी मदत सुद्धा करीन. त्याचे नशीब उजाडेल. यात माझे काहीही नुकसान नाही. धंद्यासाठी संधी आणि जागा यांची बिलकुलही कमतरता नाही. मी काही जणांसाठी असे केलेले आहे. मला कोणाकडूनही स्पर्धेची भीती नाहीय. होनहार लोकांचे भले व्हावे अशी चाह असते. आमचे पूर्वज इराणमधून हिंदुस्तान देशी आले तेव्हा त्यांनी कैक वर्षे गुजरातमध्ये शेती केलेली आहे. मी स्वतःला शेतकरी लोकांचाच वंशज मानतो. तुमची तयारी असेल तर सगळे कायदेशीर करता येईल. मी इथे मुंबईत तुमच्या मुलासाठी तुमच्या जागी आहे, असे समजा. शंभुराव याने माणकोजी यास काही जुजबी प्रश्न विचारले. निर्णय घेऊन रक्कम त्याच्या हाती सोपवली. म्हणाला, शेठ असे

असे म्हणतोय आणि त्यास मी मान्यता दिली आहे. जबाबदारीने वाग. अत्यंत आनंदी आणि उत्साही होऊन माणकोजी मुंबईस गेला.

माणकोजी फार खूष होता. आता तो नुसता ड्रायव्हर नव्हता, तर स्वतः मालक सुद्धा होता. शेठ बोमनजी यांना त्याच्याविषयी वाटणाऱ्या प्रेमामुळे आणि त्यांनी केलेल्या शिफारशीमुळे आपण एका ट्रकचे अर्धे मालक झालो आहोत, ही भावना त्याच्यासाठी फार सुखद होती. तो जोराने काम करू लागला. कितीही ट्रिपा मिळोत, कोणत्याही वेळी मिळोत, त्या करायच्या, त्या अधिकाधिक मागायच्या, असा सपाटा त्याने लावला. शेठने त्याच्या मुनीमजीला सांगून ठेवले होते, याला जास्तीत जास्त काम दे. मुनीमजी जाणता; ताकावरून ताकभात ओळखणारा. माणकोजी यास भरपूर काम मिळू लागले. तो ते सारे चोख बजावू लागला. गाडी चेंडूसारखी उडविताना हा माणकोजी याचा मेव्हणा; चिमाबाई हिचा भाऊ; याचा शब्दप्रयोग स्वतःचा जम बसल्यावर त्याला त्याने आपल्यासोबत मुंबईस नेले होते. सालगड्याचे जिणे सोडून तो आता माणकोजीच्या गाडीवर हमाल म्हणून काम करत होता. तो माणकोजीच्या गाडी चालविण्यावर बेफाम खूश होता. त्याला आश्चर्य वाटे की गाडी चालविताना माणकोजी यत्किंचितही थकलेला नसे. एखादे खेळणे लीलया हाताळावे तशी तो त्याची गाडी हाताळत असे. माणकोजी आता आपण आपल्या कोवळ्या आटूस बायकोला मुंबईस घेऊन येऊ, खोली घेऊन तिच्यासोबत इथे राहू, अशी स्वप्ने बघू लागला होता. त्या कैफात तो बैलासारखा काम करत असे. शेठ बोमनजी त्याच्यावर अगदी खूष होता. माणकोजीची ट्रक सुसाट धावत होती. साहजिकच माणकोजी त्याच्या सवंगडी ड्रायव्हर दोस्तात अधिक प्रतिष्ठित इसम झाला. आता तो त्यांच्यासारखाच ड्रायव्हर होता आणि मालकही होता. ते त्याची इज्जत करू लागले. हळूहळू ट्रकात भरण्यासाठी माल देणारे आणि तो घेणारे लोकही त्याच्याशी अधिक आदबीने वागू लागले. त्या पल्याडही ओळखीचे लोक असतात आणि होत राहतात. तेही माणकोजी याच्याशी आदब राखून वागू लागले. त्याच्यासाठी हा नवा अनुभव होता आणि त्यास तो नम्रतेनेच सामोरा गेला. तरीही लोक आता त्यास माणिकराव म्हणू लागले. त्याचे मन राखणे आणि त्याची स्तुती करणे, असे त्याचे काही दोस्त उत्स्फूर्तपणे करीत. पुढे पुढे ते करण्यातले फायदे त्यांच्या लक्षात येऊ लागले. पैसे टाकण्याची वेळ आली की माणिकराव कधीही माघार घेत नसे. तो दोस्त होता आणि मोठा माणूस होता. त्याचे चांगुलपण असे की इतका मोठा होऊनही त्याने आपल्या दोस्तांना तोडले नव्हते. एकत्र असताना आपल्या गरीब दोस्तांना कसलीही तोशिश बसू नये याची तो काळजी घेई.

त्यासाठी ते त्याचे गुणगान करीत. माणिकराव याचे दिल अशा अभिप्रायांमुळे आणखी विशाल होई. तो सतत आपल्या मोठेपणाचा मान राखण्यासाठी खिसा ढिला सोडत असे. हळूहळू असे झाले की तरुण वय; माणसाला थोडे फार षौक असायला काय हरकत आहे? हेच तर वय असते ना! आणि आहारी नाही जायचे कशाच्या. पण आनंद घेणे का सोडायचे? करून बघायचे. सट्टा खेळा. जुगार खेळा. दारू प्या. वेश्यांची माडी चढा. तशा त्या काही चांगल्या गोष्टी नव्हेतच. पण वाईट आहेत हे अनुभवून उमजून तर घ्या. जितका आनंद आहे तितका घ्या. जे वाईट आहे ते टाळा. अनुभवाने ते जमते. हे सगळयांना शक्य नसते. गरिबाने अशा भानगडीत पडूही नये. नेमके गरीबच अशा उद्योगात पडतात आणि

बरबाद होतात. पण माणिकराव पाटील यांची गोष्ट वेगळी आहे. त्यांच्यात हिंमत आहे. अन् या गोष्टी त्यांच्यासाठी किरकोळ आहेत.

हे असे साधा षौक म्हणून सुरू झाले. कधी कुठे पैसे मिळाले की आनंद करण्यासाठी पार्टी. पिलाहाउसची वारी. पैसे गेले तर दुःख विसरण्यासाठी पार्टी. सट्टा, स्त्री, दारू. पैसा माणिकराव पाटील यांचा. तो एकटाच होता ना, पैसेवाला आणि दिलवाला माणूस. साहजिकच माणकोजी याच्या कमाईचा हिशेब बिघडू लागला. येणारे पैसे आणि मुनीमजीकडे जमा होणारे पैसे यांच्यात अवमेळ होऊ लागला. त्यासाठी खोटे बोलणे आले. हरवले, विसरले, खर्च झाले असे अनेक पर्याय झाले. मग गावी घरी पाठवले असा एक झाला. माझ्या वाट्याला येतील त्यातले कापून घ्या, असा सल्ला देणे झाले. हे असे वारंवार घडू लागले. रोज नसला तरी बोमनजी अधूनमधून स्वतः बारकाईने हिशेब तपासत असे. या अनियमितता लक्षात आल्यावर त्याने मुनिमास विचारले. तेव्हा मुनीमजी याने घडाघडा सारे सांगितले. बोमनजी याने माणकोजी यास बोलावून कडक समज दिली. त्यामुळे काही दिवस बरे चालले. पण अखेर ज्या रस्त्यावर तो रुळला होता, त्याने त्याला स्वतः कडे खेचून घेतलेच घेतले. मग हिशेबातील फेरफाराच्या गोष्टी डोईजड होऊन हद्दीपल्याड गेल्या. तो कामावर जाईनासा झाला. तो खंक झाल्याचे लक्षात येताच त्याचे ते दोस्तही त्याला विचारीनासे झाले. अखेर शेठकडून भेटीसाठी बोलावणे आले. पण हा जाणार कोणत्या तोंडाने? सांगणार काय? त्याने अधिक विचार केला. त्याला वाटले, आपण शेठला थेट सांगावे की बाबा, माझ्याकडून घोळ झाला आहे आणि मला तो निस्तरता येणे शक्य नाहीय. तेव्हा जे काही पैसे माझ्यावर निघत असतील ते कापून घेऊन ट्रकमधील उरलेले माझ्या वाट्याचे मला द्या.

माणकोजी गेला. शेठच्या घरी जावून त्याला भेट, असे त्याला सांगण्यात आले. सकाळची वेळ होती. तो त्याच्या आधी कधीही बोमनजी याच्या घरी गेलेला नव्हता. ते मोठे, दुमजली, दगडी बांधणीचे घर होते. बंगलाच होता. भोवताली मोकळे आवार, त्यात नारळी-पोफळीची झाडे, काही फुलझाडे, वेली, कुंड्या असे होते. आणि घराला चारी बाजूंनी दगडी कुंपण होते. त्या परिसरात सारी घरे बव्हंशी तशीच होती. कुंपणाचा दरवाजा उघडून तो पुन्हा लावून घेत माणकोजी आत शिरत असतानाच तिथे खिडकीच्या आतून एकाने त्याला पाहिले. तो दाराशी उभा असताना ते उघडण्याऐवजी त्याने त्या खिडकीतूनच याचे नाव विचारले आणि त्याला तिथेच थांबायला सांगितले. आणखी जरा वेळाने दार उघडत तो म्हणाला, आत मोठा उंच छत असलेला हॉल; काही खुा, एक टेबल वगळता बव्हंशी मोकळा असलेला होता. सारे खूप जुनाट आणि वर्षानुवर्षे न वापरलेले असावे तसे जागच्या जागी स्तब्ध होते. माणसांच्या वावराच्या कसल्याही खुणा तिथे नव्हत्या. बोमनजी कदाचित एकटाच तिथे राहात असावा. हा एक नोकर वगळता इथे कोणी ही येत नसावे. बोमनबावा वर आहे. तू त्या दादराने वर जा, तो नोकर म्हणला.

माणकोजी अडला-अडथळला. दादर म्हणजे काय ते त्याला कळेना. तो नोकर अतोनात म्हातारा होता. तो नोकर नसेल सुद्धा. नातेवाईकच असेल बोमनजीचा. तो जिकडे हात करत होता तिथे भिंतीला लागून एक बंद दरवाजा होता. माणकोजी दबकत त्या दरवाज्याशी गेला. तो उघडताना बिजागांचा कर कर्रऽऽ आवाज झाला. आत अंधार होता.

इतक्या सकाळी देखील अंधार. डोळे थोडे सरावल्यावर त्याला तिथल्या जिन्याच्या पायऱ्या अंधुक दिसल्या. सावकाशीने पावले टाकत वर जाताना उगीचच त्याच्या हृदयाची धडधड वाढली. शेठशी काय आणि कसे बोलायचे, हे तर होतेच आणि तो अंधार, जिन्यातली ती कुबट कोंडलेली हवा यांचाही परिणाम असेल. तो वर पोहोचला तर तिथे आणखी एक दरवाजा होता. तो उघडताना पुन्हा तो बिजागऱ्यांचा आवाज झाला. पण पुढे उजेड होता. आणि बोमनजी होता. तीही मोठी खोली होती. उजेडासाठी तिथे पुरुषभर उंचीच्या खिडक्या होत्या. बोमनजी एका टेबलाशी बसून हातातल्या सुरीने मांसाचे तुकडे कापत होता. एखाद्या मऊ फळात शिरून तिच्या फोडी कराव्यात तसे ते चाललेले होते. ती सुरी धारदार असेल किंवा ते मांस मऊ असेल किंवा दोन्हीही. पारशी लोक डुकराचे मांस खातात हे त्याने ऐकलेले होते. शेजारी ब्रेडच्या कापलेल्या स्लाईसेसची चळत होती. खेरीज बहुधा लोण्याने भरलेली बरणी देखील होती. तिच्या झाकणावर आणखी एक बारका चाकू होता. बोमनजी अगदी तल्लीन होऊन त्याचे काम करत होता. बिजागऱ्यांच्या आवाजाने त्यात विक्षेप आला आणि त्याने मान वर करून पाहिले तेव्हा त्याला माणकोजी दिसला. तो खुणेनेच ये ये म्हणाला. त्याला त्याने खुर्चीत बसायचा संकेत केला आणि त्याने आपले काम चालू ठेवले. जरा वेळाने तो सावकाश उठला. हातात ती मोठी सुरी तशीच होती. तिच्यासकट तो जिन्याच्या दाराकडे गेला आणि त्याने ते दार सावकाश बंद करून घेतले. तेव्हाची त्याची पाठ आणि कडी घालतानाची हातातली सुरी पाहून माणकोजी चमकला. दगडी शांतता होती. सालं या शेठनी ठरवलंय काय? इथं आणखी कोणीही नाही. हा जिन्याचं दार कशासाठी लावून घेतोय? याचा विचार काय आहे? आपल्यावर तो सुरा चालवायचा त्याचा विचार आहे की काय? आपली चूक झालीय. शेठचे पैसे बुडालेत. पण म्हणून थेट हे? च्यायला यानी इथं आपल्याला भोकसलं तर कोणाला काय कळणार? हाक ना बोंब. याची लक्षणं ठीक दिसत नाहीत. माणकोजी असा विचार करत असताना बोमनजी हातातल्या सुरीसकट वळला आणि सावकाश चालीने माणकोजीकडे निघाला. त्याची नजर स्थिर होती आणि त्याच्या हातातली सुरी चमकत होती. एका क्षणी माणकोजी तडक उठला आणि दिसेल त्या जवळच्या खिडकीतून त्याने सरळ खाली उडी घेतली. 'अरे माणकू, अरे डिकराऽऽ' पडताना बोमनजीचे शब्द त्याच्या पाठीवर आदळले. त्याच्या सुदैवाने तो खाली ओलसर मऊ गवतात पडला होता. उठताना त्याने वर खिडकीकडे पाहिले तर बोमनजी हातात सुरी धरलेली असताना पुन्हा तेच, 'अरे माणकू, अरे डिकराऽऽ' म्हणत होता आणि त्याचे डोळे विस्फारलेले होते. ती सुरी आणि ते डोळे पाहून माणकोजी आणखी घाबरला. त्याला वाटले, हा धावत खाली येईल आणि या कंपाउंडाच्या आत आपला खातमा करील. तो धडपडून उठला आणि त्याने कंपाउंडाच्या भिंतीवर झेप घेऊन सपाट्यात उडी घेतली ती थेट बाहेर अन् तिथून तो तकाट धावत सुटला....

माणकोजी असा पळून गेल्यावर थोड्याच वेळात झालेला घोटाळा बोमनजीच्या लक्षात आला. त्या भेटीच्या साऱ्या प्रसंगात आपल्या हाती सुरा होता. त्याला भिऊन माणकोजी पळाला. तो स्वतःशी हसला आणि लगेच गंभीर झाला. साला, आपण सुरी घेऊन हिंडत होतो, तो घाबरला यात त्याची काय चूक? पण पोऱ्याने थेट उडीच घेतली

खाली! हात पाय मोडले, काय झाले; काय कळायला मार्ग नाही. त्याने चौकशीसाठी माणसे पाठवली. माणकोजी नव्हता. कुठेही नव्हता. कुठे गेला असेल? अर्थातच त्याच्या गावी. आता करायचे काय? चार-सहा दिवस गेले. मनातून माणकोजी हटेना. त्याने बाबुशा इनामदाराच्या पोराला बोलावले. म्हणाला, 'आठ दिवस झाले. माणकोजी गावी जातो असे सांगून गेलाय. त्याचा निरोप, पत्ता काहीच नाही. असे कधी झालेले नाही. तू जरा गावी जाऊन त्याची खबर घेऊन येतोस?' तो म्हणाला, 'अवश्य.' बोमनजी त्याला प्रवासासाठी पैसे देऊ लागला. ते त्याने नाकारले. म्हणाला, 'ते माझ्या घरातले आहेत. ते रुसून गेले असतील तर मी त्यांना घेऊन येईन.' तो साल्पी येथे येऊन माणकोजी यास भेटला. म्हणाला, "तुम्ही न सांगता आलात. शेठ आठवण करत आहेत. कधी येणार मुंबईला?' माणकोजी म्हणाला, 'लय हरामी अवलाद आहे ती. माझ्या जीवावर उठला होता तो. मी नाही येणार मुंबईला. पण त्याला सांग, तू आलास इकडं तर मी तुझ्या तंगड्या साळून टाकीन.' बाबुशाच्या मुलाच्या लक्षात आले की, गंभीर काहीतरी घडलेले आहे. तो परतला आणि त्याने माणकोजीचा निरोप सौम्य करून बोमनजीला सांगितला. बोमनजी याच्यासाठी ते पुरेसे होते. माणकोजी हातापायांनिशी ठीक आहे, हे त्याला दिलासा देणारे होते. थोडा अधिक वेळ घेऊन हिशेब ठीकठाक करत त्याने आपल्या मुनिमास थेट साल्पीला पाठवले. पत्र आणि पैसे सोबत देऊन पाठवले. त्याला साल्पीत आपल्या घरी माणकोजीने पाहिले आणि पहिली प्रतिक्रिया म्हणून त्याने लगेच तिथून पोबारा केला.

रात्री खूप उशिरा तो घरी परतला तेव्हा कोणत्याही क्षणी आपला बाप आपल्याला बोलावेल अशी धास्ती त्याच्या मनात होती. पण तसे काहीही घडले नाही. दोन दिवसांनी शंभुरावाने माणकोजीला बोलावले. म्हणाला, 'तुझ्या शेठचा माणूस येऊन गेला. पत्रात त्याने सारी हकीगत सांगितली आहे. ती त्याला जशी जाणवली तशी त्याने लिहिली असेल. तुझ्याकडून चुका झाल्याच असतील. आता त्याचे खरेखोटे करण्यात मतलब नाही. गोष्ट एकदा चिघळली की सगळा चिकदाळा. तो चिवडण्यात मतलब नाही. आता तू इथेच राहा. शेठ हा नक्कीच चांगला माणूस. त्याचा तुझ्यावर हल्ला करण्याचा इरादा नव्हता. पण तुला तसे वाटले, तू आलास. ठीक आहे. त्याने हिशेबासकट सगळे पैसे पाठवले आहेत. या जमान्यात कोण असे करतो? पण तू याच्यातून धडा घे. तरुण वयात चुका होतात माणसाकडून. त्यातून आपण शिकले पाहिजे. इथेही करण्यासारखे खूप आहे. जमिनीचा एक मोठा व्यवहार चालू आहे. त्यात या पैशांची मदतच होईल. खूप मदत होईल. तुम्हाला सुखाने जगता यावे याचा बंदोबस्त मी नक्कीच करून जाईन. पुढे तुमचे तुमचे नशीब.'

हे असे सारे इतके बिनबोभाट झाल्याने माणकोजी खूष होऊन गेला. शंभुराव तडक पुढच्या कामाला लागला. त्याने कटके म्हाताऱ्याला निरोप पाठवला, सुदैवाने मुदतीच्या खूप आधीच मी पैशांची जुळणी करू शकलोय. कागद करायला कधी जायचेय? हा निरोप घेऊन सुरुभाऊ याचा मुलगा गेला होता. त्याला त्याच्या बापाकडून या व्यवहाराची माहिती मिळालेली होती. असे व्यवहार गुपित राखून तातडीने उरकायचे असतात. कारण, माहिती मिळाली की आणखी कोणी त्यात फांदा मारण्याची नेहमीच शक्यता असते, याची त्या तरुण पोरास उत्तम जाण होती. तो तरुण होता आणि त्याच्या बापासारखाच सतत

पसरण्याची जाण असलेल्या शेतकरी बुद्धीचा होता, हे शंभुराव याने जाणले होते. म्हणून त्याच्या हाती निरोप. पण त्या पोराला तिथे कटके म्हाताऱ्याचा ठिकाणा लागला नाही. त्याचा एक मुलगा म्हणाला, 'कुठं गायप झालं डंगरं; कायच पत्त्या नायी. पन तुमचं त्याच्यापं काय काम व्हतं म्हनायचं?' हा म्हणाला, 'आमचा आजा शंभुराव सातपाटील यानी आठवन काढली व्हती त्याची. येईन तव्हा लगीच यायला सांगा.'

'आवो का नायी सांगनार? येवढा मोठा आगाजल्याला मानूस

आठवन करितो- ह्यो आला का मीच दांडारून घेऊन येतो त्याला."

कटके म्हातारा आला नाही. फिरकलाच नाही. तो खरोखरीच गायब

झाला होता. काही दिवसांनी सुरुभाऊचा मुलगा आला आणि म्हणाला, 'त्या वावरात नांगर घातला त्यांनी.'

'कोणत्या वावरात कोनी?'

'आपुन खरिदी करनार व्हतो ते कटके म्हताऱ्याचं रान, तिथं आपल्या थोरल्या घरच्या लोकांनी घातला नांगर."

शंभुरावच्या लक्षात आले. कटके म्हातारा ; जो जमीन खरेदी द्यायला इतका पेटला होता, तो सापडला नाही, तेव्हाच त्याच्या लक्षात आले होते; बात फसली. व्यवहार मोडला. पण तो आपल्या घरच्या लोकांनीच मोडला, हे कळल्याने त्याच्या हृदयात कळ उमटली. थोरल्या जयाप्पाची नातवंडे कर्ती आणि हुशार होती. पण त्यांचे कर्तेपण असे थेट आपल्याच अंगावर आदळेल याची कल्पना त्याने केलेली नव्हती. कुठून तरी त्यांना सुराग लागला आणि त्यांनी चढाची बोली लावून आपला व्यवहार मोडला. आपलेच दात आणि आपलेच ओठ. मूग गिळणे आणि गप्प बसणे भाग होते. आणखी कोणामुळे अशी नामुश्की ओढवली असती तर त्याचा समाचार घ्यायला आपण जयाप्पाच्या या नातवंडांनाच सांगितले असते. पण आता, त्यांनीच ते केलेय तर कोणाला सांगणार? आणि मुळात कटके हाच आपल्या शब्दाचे वजन ; त्याची बूज नाही राखू शकला, याचा अर्थ आपल्या शब्दालाच मुळात वजन उरलेले नाही, तो हल्लक झालाय, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. यात आणखी कोणाशी काहीही बोलणे शक्य नव्हते. शंभुराव आधीच वृद्ध; या मोडीने मनातून खचला. पण तो ते त्याच्या मनातल्या आतल्या आत. इतर कोणाला ते कसे कळणार? रोज सकाळी ज्या खुषीने चालत जाऊन तो मारुतीच्या देवळाच्या पायऱ्यांवर बसत असे, ते आता थांबले. अन् ते थांबले, हे कोणाच्याही लक्षात आले नाही.

माणकोजीचे मुंबईहून घरी येणे, खरेदीचा व्यवहार मोडणे, या गोष्टी आपल्या जगण्याच्या अंतिम प्रवासाची सुरुवात करणाऱ्या आहेत, हे शंभुराव याच्या लक्षात आले नाही. तसे ते कोणाच्याही लक्षात येत नसते. जन्माला आल्यापासूनच्या पुढच्या सगळ्या आयुष्यात मृत्यू प्रत्यही आपल्याला इतक्या हुलकावण्या देत असतो की, आपल्या जगण्याच्या प्रत्येक क्षणावर तो यमदूत होऊन खडा असतो, याची आपल्याला जाणीवच होत नाही. किंबहुना, आपले सारे जगणे हा भ्रम असतो आणि मृत्यू हा शाश्वत असतो, या सत्याकडे अनावधानाने दुर्लक्ष करत राहणे हेच जीवन असते, हे आपल्या लक्षातच येत नाही. म्हणूनच, शंभुराव यास त्याच्या अंतिम यात्रेचा सुगावा कसा लागणार ? मरणाचे सारे आपल्या जगण्यासोबत नांदत असते आणि आपल्याला ते दिसत नाही, यातून

कोणाचीही सुटका नसते. आणि हे असे गणित खरे तर कोणाच्याही बाबतीत मांडता येत नाही, हे मृत्यूच्या आपल्यावरील स्वामित्वाचे हकमती गारुड असते. पण शंभुराव याच्या अंतिम प्रवासाची सुरुवात त्याला भावनिक आणि मानसिकदृष्ट्या प्रत्यही एखाद्या हत्तीला पकडण्यासाठी खड्ड्यात घालण्याचा खोडा करावा, तशी होती. तो समजा एका खड्ड्यात अडकला तर त्यातून त्याची सुटका नव्हती. म्हणजे बाहेर येऊन मोकळा श्वास घेणे त्याच्या नशिबी नव्हते. एकातून दुसऱ्या खड्ड्यात जाणे आणि तिथून तिसऱ्या ; असेच ते सारे क्रमाक्रमाने झाले. मेल्यावर माणसाचे काय होते, हे कोणाला कळते? स्वर्ग आणि नरक या आपल्या कल्पना. पण जगतानाच प्रत्यही दुःखाच्या अधिकाधिक खोल खाईत खचत जाणे, हे जगणे रसातळाला जाणे, जात राहणे; असे आपण म्हणू शकतो. तळ, तळातळ, रसातळ अशी क्रमवारी आपण कल्पिलेली असते. जगण्यातील जखमांनी विद्ध होत ते जिवंत असेतो अनुभवणे शंभुराव यास भाग पडले.ते त्याच्यापुरते होते. असा क्रम प्रत्येकासाठी वेगळा असतो. त्याचे गणित नसते. असे हे आणखी कोणाला कळण्याचा संभव नसतो. जगण्याचा भ्रम कायम आपल्याला एका कैफात ठेवतो. कोणतेही रस्ते आपल्याला कळत नाहीत. आणि मृत्यू समोर उभा ठाकला की आपल्याला वाटते, अरे! हे असे कसे झाले? मला तर आणखी जगायचे आहे. अन् हे काय? प्रवास कळत नाही, ही आपली मर्यादा. फक्त शंभुराव याचे बाबतीत बोलायचे तर तो त्याच्यासाठी तयार केलेल्या खोड्यात जाऊन बसला. तो खोडा त्याचा होता. आणखी कोणी तो तयार केला असेल तर ते निमित्त मात्र होते. परिणाम म्हणून शंभुराव त्याच्या वाड्यातील त्याच्या खोलीत बंदिस्त झाला. त्याच्या दुनियेचा संकोच झाला. तो कधीचाच झालेला होता. पण तो त्या संकोचातून पुन्हा पुन्हा बाहेर पडू पाहात होता, हे त्याच्या आधीच्या आयुष्याचे वर्तमान होते. आता त्याच्या संधींचा सुद्धा संकोच होत जाणार होता.

7

'एके दिवशी तुळाजी आला आणि म्हणाला, 'आंजी कुठेय?'

'म्हणजे काय? आंजी तर तुझ्याच सोबत असते मर्दा. तुझी बायको आहे ती. आणि गेलीच असेल कुठे, तर ती तुलाच विचारून म्हण की सांगून गेली असेल ना! जाऊन जाऊन जाणार कुठे? इथे साल्पीत नाही तर राळेगणला- तिच्या माहेरी. तू इथे नसताना साल्पीत तिचे काय काम? ती राळेगणमध्ये असेल.'

'नाही, नाही. ती राळेगणमध्ये नाहीय. मी जाऊन आलो तिकडे.'

'ती इथेही आलेली नाहीय. पण तू इतका कावराबावरा का झाला आहेस? अरे, तू पुरुषासारखा पुरुष. पोलीस आहेस. तू शोधू शकतोस.' आंजी गायब झाली होती. तुळाजी राळेगणला जाऊन आला होता. तिथे तिच्या माहेरी त्या लोकांनी आश्चर्य व्यक्त केले.

म्हणाले, 'ती इकडे आलेली नाही. ती जेव्हा जेव्हा आली, ते ती तिचे सासरे आणि तुमचे वडील शंभुराव सातपाटील यांना विचारूनच आलेली होती. आता ती इथे नाही यात आम्ही काय करू शकतो? तुमची बायको कुठे गेली याचा शोध तुमचा तुम्ही घ्या.' हे असे कोरडे आणि कसलाही संबंध नसल्यासारखे त्या लोकांचे उत्तर ऐकून तुळाजी हबकला. साल्पीला आला तर तिथेही ती नव्हती. तुळाजीने पोलिसात तक्रार दिली. स्वतः पोलीस असूनही त्याला ती द्यावी लागली. साहजिकच ती यंत्रणा कामास लागली. अगदी जोमाने कामास लागली.

: आंजी कुठे असेल याचा अंदाज तुळाजीला नव्हता. पण ती कोणाच्या सोबत असेल याचा होता. तो तिच्या माहेरच्या लोकांना सुद्धा होता. आधी इतके सगळे माहीत असून सुद्धा त्या कोणालाही काहीही करता आले नव्हते. याचे कारण खुद्द आंजी. तिचा स्वभाव. ती रानात उगवणाऱ्या दुर्मिळ फुलझाडासारखी कोमल आणि स्वतंत्र होती. तिच्या माहेरी हे सगळयांना माहीत होते आणि ते त्यांना कळत नव्हते. किंवा ते त्यांना दिसत होते, पण त्याचे काय करायचे हे त्यांना कळत नव्हते. मुलगी किंवा स्त्री म्हणून वावरण्याचे कोणतेही दबाव तिच्यावर जन्मत:च नव्हते. आणि जगताना आलेले अनुभव तिच्यासाठी अशा दबावांची जडता वाढवू शकलेले नव्हते. ती अत्यंत स्वतंत्र अशी माणूस होती. सगळया प्रकारचे दबाव झुगारण्याचे अनद्भूत स्वातंत्र्य तिच्या ठायी प्राकृतिक देणगी म्हणून अंगभूत होते. हे ना तिला नीट कळत होते ना तिच्या भोवतालाला. शंभुराव यास ती आवडत होती याचे कारण सुद्धा कदाचित हेच असेल. तिचे अनद्भूत स्वातंत्र्य. आपल्याला तिच्याविषयी वाटणाऱ्या भावनेचे नाणे तयार करणे कोणालाही जमले नव्हते. कदाचित ते तिलाही कळले वा जमले नसेल. इतकी आतून स्वतंत्र माणसे फार क्वचित असतात. सहसा नसतातच. पण म्हणून जगावेगळे लोकोत्तर काही करण्याची संधी अशा सगळयांनाच मिळते, असेही नाही. किंवा ते जे काही जगतात, तेही लोकोत्तर मानले जात नाही. कारण कदाचित, ते कोणाला दिसतच नाही. म्हणूनच लोकोत्तर असे काहीही नसते. माणसे जगतात. इतरांना दिसते त्याच्या कहाण्या त्या इतरांना गरज असेल तर तयार होतात. बाकी सगळे अलक्षित आणि अगेय. गाभाच दिसला नाही तर गाणार काय? खूप वेगळी असलेल्या आंजी नावाच्या स्त्रीचे सारे जगणे असेच अलक्षित आणि अगेय झाले असेल. कोणी लक्ष द्यायचे आणि कोणी तिची गाणी म्हणायची? आणि का म्हणायची? जगण्याच्या, संस्कृतीच्या, परंपरांच्या अनेक दबावात आपण सारे वाढतो. ती त्यात वाढूनही वेगळी राहिली आणि जगली, असे म्हणायचे.

शंभुराव याने तुळाजीसाठी तिला मागणी घातली तेव्हा तिचे आईवडील, थोरले आणि धाकटे भाऊ, असे सारेच खूष झाले; ते अशासाठी की निदान या सातपाटलांच्या मातब्बर घरात तरी तिच्यावर अंकुश बसेल आणि ती जगण्यातल्या अनेक वेसणींना जुमानेल. तिने तिचे लग्न सगळे आनंदाने स्वीकारले. कारण तुळाजी तिच्या आत्याचा मुलगा- अगदी लहान असल्यापासून तिला तो माहीत होता. तो उंच काळा आणि मृदू स्वभावाचा होता. आणि तिलाही तो आवडत होता. खेरीज शंभुराव याची तर ती लाडकीच होती. ती सून होऊन सातपाटलांच्या घरी आली तेव्हा तिचे त्या घरातील वागणे, वावरणे शंभुराव यास घरातील राहरीतीचे एखाद्या धनाच्या साठ्याचे राखण करणाऱ्या सर्पिणीसारखे वाटले

होते. तुळाजी तर तिच्यासाठी कायम वेडाच होऊन गेलेला होता. ती निर्लेप आणि मुक्त होती. अगदी संभोगताना सुद्धा ती आपले सित्कार आणि चित्कार मुक्तपणे व्यक्त करत असे. खेरीज संभोगताना एरवी विक्षेपकरी वाटावे अशा स्वरात म्हणा वा खळखळत्या नादात ती हसत असे. ते सित्कार आणि चित्कार आणि त्याहीपेक्षा ते अद्‌भूत हसणे यांच्यातून तुळाजीच्या मेंदूत स्वप्नमय लाटांच्या अजब कानठळ्या बसत. हसण्याच्या त्या साऱ्या लयी तिच्या योनीच्या आतील विविध मृदू जागांच्या आणि पडद्यांच्या हालचालीत आपसूक प्रतिबिंबित होत. अपरंपार सुखांच्या त्या कानठळ्यात तो तिचा गुलाम होऊन जाई. आणि हे असे त्या क्षणांपुरते न उरता ते त्याच्या जगण्याच्या वर्तमानावर सतत स्वार होऊन राही. आपल्या जगण्याच्या भोवतालावर आपली सत्ता प्रस्थापित करण्याची विलक्षण अंगभूत क्षमता तिच्या ठायी होती. त्यातून तिचे भोवताल हे तिचे सेवक होत असे. शारीरिक निकटतेमुळे, त्या संधीमुळे; तिची सर्वश्रेष्ठ सत्ता तुळाजी याच्यावर प्रस्थापित झाली, यात नवल काहीही नाही. पण अशी सगळी सत्ता प्रस्थापित करूनही ती त्याच्यात गुंतलेली नव्हती. किंबहुना, कुठेही न गुंतणे हा तिचा स्वभाव होता. जगण्यातली सगळी सुखे तिच्यासाठी होती. पण सुखांच्या लाटांमध्ये ती कुठेही नव्हती. माणसाचे हे असे इतके मुक्त आणि निर्लिप्त असणे त्याच्या जगण्यासाठी एकीकडे सतत सुंदर आव्हान असते आणि त्याच वेळी ते धोकादायक सुद्धा असते. कारण जगण्याच्या प्रत्येक क्षणी तुम्ही धोका पत्करायला, एक प्रकारच्या अनोळखी अंधारात उडी घ्यायला सतत सज्ज असता. हे असे ठरवून काही कोणाच्या वाट्याला येत नाही. ते तिच्या वाट्याला आले म्हणायचे. पण म्हणून ती सतत अशा उड्या शोधत होती असेही नव्हे. दडपण तिच्यावरही होते. तिला तिच्या नवऱ्यासोबत सुखाने नांदायचे होते. ती तसा प्रयत्न करत होती. पण तिच्या जगण्याचा स्वाभाविक नाद तिच्या या इच्छेशी संघर्ष करत होता. तिने त्यातून रस्ते शोधायचे प्रयत्न केले ; नाही असे नाही. अखेर तिच्या प्राकृतिक भावनांनी सगळ्यांवर मात केली.

आंजीच्या लग्नाच्या साधारणतः वर्षभर आधी राळेगण येथे एका देवळाचे बांधकाम सुरू झाले. म्हणजे लगेच बांधकाम सुरू झाले असे नव्हे. मोठाले घडीव दगड तिथे येऊन पडले. काही दगडी शिल्पे आली. ते दगड आणि ती शिल्पे यांना छिन्नी आणि हातोडे यांच्या सहाय्याने अंतिम आकार देणारे कुशल कारागीर आले. ते, त्यांच्या हाताखाली काम करणारी पोरे, आणखी काही हरकामे, त्या सगळ्यांना सैपाक करून खाऊ घालणाऱ्या बाया; असा मोठा समूह तिथेच उघड्यावर तंबू टाकून राहू लागला. चुना मळण्यासाठी भक्कम दगडी घाणी बांधण्यात आली. त्या वर्तुळाकार घाणीचा मध्यबिंदू ते घाणीची चकार आणि तिच्यातील भव्य दगडी चाक यांना जोडणारा लाकडी आस; असे आले. गावातल्या आबालवृद्धांसाठी हे सारे कुतूहलजनक ; त्यांनी कधीही न पाहिलेले असे होते. त्यामुळे सांजसकाळ तिथे ते जमत आणि सारे बघत स्वतःची करमणूक करून घेत. पुण्यात राहणारा कोणी तरी पैशेवाला बामण; जो मुळातला इथला वतनदार होता, त्याला इथे देऊळ बांधण्याचा दृष्टांत झाला होता. त्याच्यासाठी हे सारे लोक काम करत होते. गावात बामणाचा पडझड झालेला एक जुना वाडा होता. तिथले घडीव दगड गोळा करून इथे आणले जात होते. देऊळ बांधून पूर्ण झाले की त्याच्या भोवती त्या दगडांचे भक्कम कुंपण

घालण्यात येणार आहे, असे बोलले जात होते. त्या कामावर देखरेख करणारा उस्मानअली म्हणून एक सुपरवायझर होता. तोही त्याच्या पत्नीसह तिथेच एका तंबूत राहात होता. हा मोठाच मिठ्ठास आणि हसतमुख असा इसम होता. तो गोरा, ताडमाड उंच; अगदी एखाद्या पठाणासारखा होता. अधूनमधून तो त्या लोकांसारखी गोंडेदार टोपी सुद्धा घालत असे. अमिना नावाची त्याची स्त्री सुद्धा त्याला साजेशी अशीच देखणी होती. त्यांना अजून काहीही मूलबाळ झालेले नव्हते. दोघेही खरे तर पुरेशी प्रौढ होती. पण झालेच नसेल बाळ तर त्याला ते काय करणार? देवाच्या मनात येते तेव्हाच अशा गोष्टी होतात. काहीही असो, उस्मान अली आंजीला आवडला. ते अर्थात तिने कोणालाही सांगितले नाही. पण इतर लोकांसारखे देवळाचे काम बघायला जाण्याऐवजी ती त्याला पाहण्यासाठीच तिथे जाऊ लागली. हे आधी कोणालाही- खुद्द उस्मानअली यालाही समजले नाही. अमिनाला ते जाणवले. ती त्याची बायको होती. तिलाच ते आधी जाणवणार, यात नवल ते काय? ती एकदोनदा उस्मानअली यास तसे म्हणाली सुद्धा. ते त्याने थट्टेवारी नेले. म्हणाला, 'बच्ची है वो. उसको क्या समजता?' पण नंतर तोही त्या नजरेने बघू लागला, तेव्हा त्यालाही ते जाणवले. हे धोकादायक आहे आणि हे या गावठी लोकांच्या लक्षात आले तर आपला काहीही अपराध नसताना आपल्याला इथून गाशा गुंडाळावा लागेल, कदाचित खूप मारही खावा लागेल, याची त्याला जाणीव झाली. ते काम टिकणे हे त्याच्यासाठी गरजेचे होते. त्याला आंजीत रसही नव्हता. तो त्याचा स्वभाव नव्हता. अन् ही पोरगी किती छोटी मासूम होती! तिला काय सांगणार? इकडे येऊ नको म्हणून ? कसे सांगणार? वरवर काहीच दिसत नसताना?

उस्मानअली याची या पेचातून अनपेक्षितपणे सुटका झाली. आंजीचे लग्नच झाले. तिच्या सासरचे लोक मातब्बर आहेत आणि त्यांचा सारीकडे दरारा आहे असे त्याने ऐकले. तो अधिक सावध झाला. इकडे आंजी तुळाजीशी सुखाने नांदत होती. कारण हे लग्न होणार हे कैक आधीपासून तिला माहीत होते. त्याला तिची ना नव्हती. अर्थात तिच्या होकार वा नकाराला विचारतो कोण? पण ती आनंदाने सासरी आली आणि नांदू लागली. सासरचे घर सारे आधीच तिच्या ओळखीचे होते. ते तिच्या आत्याचे तर होते. ती उस्मानअलीच्या प्रेमात थोडीच पडलेली होती? तिला तो आवडत होता; इतकेच. अन् ते तिने कोणालाही सांगितलेले नव्हते. पण मग ती सासरी आली तरी तिला वाटेल तेव्हा ती माहेरी येऊ लागली. देवळाचे काम बघायला जाऊ लागली. तिचा बाप आणि भाऊ यांना संशय आला. म्हणाली, 'मी देवळाकडे जाते. तिथले काम बघते. माझे काहीही लफडे नाहीय. तुम्ही माझ्यासोबत या आणि बघा.' आक्षेप घ्यावा असे ती काहीही करत नव्हती. ती जाई, बसे आणि परत येई. माहेरचे लोक तिला एकदोन दिवस ठेवून सासरी आणून घालत होते. ती ते नाकारत नव्हती. पण काही दिवसांनी पुन्हा येत होती. उस्मानअली आता सावध झाला होता. त्याला सारे दिसत होते.त्याला या झमेल्यात अडकायचे नव्हते. त्याने स्वतः चे बि-हाड घोडनदीला हलवले. तो तिथून येऊन-जाऊन करू लागला. उगले मंडळींच्या ध्यानात आले. मुसलमान चांगला आहे. आपलाच दाम खोटा आहे. पण त्यास खोटा म्हणावे तर तसे गैर ती काहीही वागत नाही. त्यांना तोड सापडेना. त्यात नंतर तुळाजी युद्धावर गेला. आंजी येत राहिली. त्याला बघे आणि परत जाई. ते सारे इतके सहज आणि सुक्षेम असे होते

की बाकी कोणाच्या ते लक्षातही येत नव्हते. आता उस्मानअली याच्यावर लक्ष ठेवायला अमिना नव्हती. अधूनमधून तोही तिच्याकडे बघे. माणूसच होता तो. त्याची काय चूक? पण मग उगले मंडळींनी त्यास दम दिला. म्हणाले, 'काम सोड. नाहीतर परिणाम वाईट होईल.' तो म्हणाला, 'तुमचे म्हणणे मला कळते. मी मार्ग काढतो. पण आज मला कामाची गरज आहे. माझ्यावर उपकार करा. मी वेगळ्या कामाच्या शोधात आहे. ते मिळाले की मी जाईन. तुमच्या कुळीला डाग लागेल असे मी काहीही करणार नाही.' असे आणि तसे होता करता तुळाजी युद्धावरून परत आला. तरीही आंजीचा क्रम बदलेना. उगले मंडळींनी तुळाजी यास कल्पना दिली. म्हणाले, बाकी काही नाही. पण ती असे असे करते. तुम्ही मार्ग काढा आणि आम्हाला वाचवा. तुळाजी आंजीच्या प्रेमात आंधळा झालेला. तो काय मार्ग काढणार? तो सासरी जाई आणि तिला घेऊन येई. अन् तीही लगेच परत त्याच्यासोबत येई. त्याच्याशी प्रेमाने वागे. शय्येत खेळ करी. तक्रार करावी असे काहीच नव्हते. इकडे उस्मानअली यास घोडनदी येथे दुसरे काम मिळाले. तो गेला. उगले मंडळीस वाटले, आता आपण सुटलो. पुढचे सातपाटील लोकांनी बघावे. पण ते आंजीने पाहिले. तिने तुळाजीस पोलिसात भरती होण्यास सुचवले. त्यास घोडनदी निवडण्यास सांगितले. ते जमले. तिथे पुन्हा तिचा खेळ सुरू झाला. नेत्रपल्लवीच फक्त. तिथे त्यामुळे उस्मानअली याचे मनास पाझर फुटला. तोही तिच्या नजरेस नजर देऊ लागला. इतक्या आटोकाट रीतीने एखादी सुंदर स्त्री आपल्या पाठी येत असेल तर ते कोणत्या पुरुषास सुखाचे वाटणार नाही? अगदी तो विवाहित असला तरी. तो पाघळला. ती म्हणाली, 'मी तुझ्याबरोबर यायला एका पायावर तयार आहे. अमिनाला तुझ्यापासून बाळ झाले नाही. माझ्यापासून होईल. आपण सुखाने एकत्र राहू.' उस्मानअली याच्या समोर प्रश्नांचे डोंगर. कुठे न्यायचे? कसे न्यायचे? अमिनाला काय सांगायचे? सातपाटील महा यंग्राट. ते काय करतील? तिचा नवरा पोलिसात आहे. कुठेही गेलो तरी तपास लावतीलच. काय करायचे आणि कसे करायचे? पुष्कळ दिवस अनेक प्रश्नांचे किडे त्याचे डोके पोखरत राहिले. पण तिच्या चाहतीने सगळ्यांवर मात केली आणि एक दिवस तो, ती आणि अमिना असे गायब झाले.

: अखेर पोलिसांनी तलास लावला. म्हणाले, 'मुंबईत भेंडीबाजार येथे आहेत. त्यांना धरू शकतो. पण केस कोर्टात न्यावी लागेल. त्याने तिला फूस लावून पळवून नेली, असा दावा करावा लागेल. पण समजा तिथे तो म्हणाला, की मी तिला आणलेली नाही. ती माझ्यापाठी आलेली आहे. अन् ती म्हणाली, की मी माझ्या खुषीने आलेली आहे. तर काय करायचे याचा विचार करा. किंवा कोर्टाने अगदी तिला सोडली तरी, एका मुसलमानाचा हात धरून गेलेली बाई तुम्ही पुन्हा घरात घेणार आहात काय? किंवा, तिच्या माहेरचे लोक तिला स्वीकारणार आहेत काय? मुसलमानाकडे जाणे हाच रस्ता तिच्यासाठी खुला असेल. अन् तो तर तिला कधीही स्वीकारील. या सगळ्यात तुमच्या तालेवार कुटुंबाची जी ठ्या ठ्या होणार आहे, ती तुम्हाला चालणार आहे काय? आम्ही काय; आम्ही तिला पकडू. आमचा हा धंदा आहे. आम्हाला दोन्हीकडून पैसे मिळतील. पण तुमच्या अब्रूचा खेळ होईल. तुळाजी हा आमचा माणूस. म्हणून इतके सांगितले. तुम्ही तुमचा फैसला करा.'

शंभुराव याने फैसला केला. आंजी गरती असूनही दुसऱ्याचे घर निघाली. मुसलमानाचा

हात धरून गेली. तिला आता या घरात जागा नाही.

आता ती आपल्याला मेली आणि आपण तिला. पोलिसातली आपली तक्रार आपण मागे घेत आहोत. आपण कसलीही तक्रार करायची नाही.

8

शंभुराव याच्या खतपुराड खानवट्याचे जहाज आता चिखलात रुतू लागले होते. तो त्या जहाजाचा कप्तान होता. तो आता म्हातारा झाला होता. तो अतोनात थकला होता. त्याच्या कप्तानपदाची जागा आता आणखी कोणी घेणे गरजेचे होते. पण सुकाणू ज्याच्या हाती द्यावे असा कोणीही त्याला त्या खतपुराडात दिसत नव्हता. हा आपला वंश खतपुराड आहे असे आपले भाईबंद जे म्हणतात, ते खोटे नाही, असे त्याचे त्यालाच वाटू लागले होते. कुठेच काहीही, कोणताही आशेचा किरण दिसत नव्हता. धैर्यराव, सूर्यराव, तिमाजी यांचे जे चाललेले होते, त्यात त्याच्या मनाला दिलासा देणारे काहीही नव्हते. तुळाजी आणि माणकोजी यांच्यामुळे त्याच्या ज्या आशा पल्लवित झालेल्या होत्या, त्या आता सपशेल उधडल्या गेल्या होत्या. माणकोजी पराभूत होऊन परत आलेला होता. आणि तुळाजी उद्ध्वस्त झालेला होता. शंभुरावाच्या वृद्ध छत्रछायेखाली अंगिकारलेल्या उद्योगातून पळून आलेला माणकोजी निदान आपल्या पत्नीशी नांदत तरी होता. पण तुळाजी याची मनःस्थिती फार भीषण होती. तो जवळपास वेडाच झालेला होता. जखमी जनावरासारखा इकडून तिकडे फिरे आणि जप सारखा, आंजी, आंजी. त्याला दुसरे काही दिसत नव्हते, सुधरत नव्हते. त्याने तिच्यावर फार प्रेम केले होते. तिने त्याला शरीराचे आणि मनाचे सारे सुख अतोनात दिले होते. त्याला ते आठवे आणि वाटे, ते सारे खोटे का होते? त्या खळखळ सुखाच्या साऱ्या लाटा खोट्या होत्या? ती आपल्याला सोडून आणखी कोणाचा हात धरून कशी जाऊ शकते? तिला हवे ते सारे आपण केले. तिच्याभोवती नाचनाच नाचलो. त्याला काहीच का मोल नव्हते? तो पुन्हा ड्युटीवर गेला नाही. ते लोक आले आणि म्हणाले, 'असे करू नको. पोलिसाची नोकरी सहजी मिळणारी नाही. बायको गेली तर गेली. बायका छपन्न मिळतील. कामावर हजर हो. मधल्या गैरहजेरीची व्यवस्था लावता येईल, असा ठाणेदार यांचा निरोप आहे. तू चल.' तुळाजीला ते जमले नाही. समजलेच नाही. आंजीचे नसणे हळूहळू त्याच्या मनाच्या प्रतलावर तिच्या भ्रामक असण्यात परावर्तित झाले. ती आहेच असे समजून तो वागू लागला. तिला हाका मारू लागला. तिच्याशी बोलू लागला. घरातल्या बाकीच्यांच्या नजरेत तो ठार वेडा झाला. तो

अचानक हसे आणि गप्प होई. मग अचानक लहान मुलासारखा रडू लागे. स्फुदून स्फुदून रडे. ते कोणाच्याही हृदयाला द्रवित करणारे होते.

शंभुराव हे सारे बघत होता. ताडमाड उंच, कोमल काळा असा हा आपला पुत्र झुंजीत हरलेल्या बैलासारखा शोक करत मरून जाईल, अशा विचाराने त्याचे हृदय सतत विद्ध होत होते. विचार करून त्याने गावातील हरिपंत शौचे-कुलकर्णी यांना निरोप दिला. मी आपल्या भेटीस येऊ इच्छितो. काम हे, हे आणि असे, असे आहे. साल्पीच्या पंचक्रोशीत हरिपंत यांचा रुग्णोपचार संबंधे मोठा लौकिक होता. ते जडीबुटीचे उपचार करत. रुग्णाची नाडीपरीक्षा करून ते रोगाचे निदान करत असत. निदानात दुविधा किंवा प्रश्न उपस्थित झाल्यास त्यांच्याकडे एक हस्तलिखित चोपडी होती; तिचा आधार घेत. ज्या गुरुंकडून त्यांनी ही विद्या घेतली होती, त्यांनीच त्यांना ही वही दिलेली होती, अशी बोलवा होती. रुग्णपरीक्षेसाठी ते बाहेर जात नसत. करत असलेल्या उपचारांसाठी ते काहीही मोबदला घेत नसत. रुग्णांनी स्वतः किंवा त्यांचा नातेवाईकांसोबत आपल्याकडे यावे, एवढीच त्यांची अपेक्षा असे.

शंभुरावाचा निरोप आल्यावर आपला नेहमीचा शिरस्ता मोडून ते चोपडीसह दस्तुरखुद्द त्याच्या वाड्यावर हजर झाले. अत्यंत कडक सोवळे पाळणारा तो कर्मठ बामण सातपाटलांनी आदराने अंथरलेल्या जाजमावर ऐसपैस बसला. नाडीपरीक्षा केली. नेत्रपरीक्षा केली. भुवया आणि पापण्या यांच्या हालचालींचे कठोर निरीक्षण केले. अखेरी मस्तकी हात ठेवला आणि बुबुळांच्या हालचाली पाहिल्या. म्हणाले, 'लक्षणे समजली. त्यांच्या मुळांशी काय आहे, हे आपण मला आधी मोकळेपणाने सांगितले, हे माझ्या निदानासाठी उत्तम झाले. काय असते ; आपल्या मेंदूमध्ये वास्तवाचे आकलन करणारी मंडले असतात. माणसाच्या मेंदूवर आघात होतो, तेव्हा ही मंडलेही ते धक्के खातात. आघाताची व्याप्ती अधिक असेल तर ही मंडले भ्रष्ट आणि भ्रमित होतात. त्यांचे परस्पर संबंध बदलतात. मेंदूचे आकलन बदलते.'

'मग काय करता?'

हरिपंत जे सांगत होते, ते शंभुराव यास अर्थातच नीट कळले नाही. त्याला ते काय उपाय करतात, यात रस.

'मीही या प्रकारच्या दुखण्यावर उपाय केलेले नाहीत. पण उपाय

आहेत. त्यासाठी थोडा धोका पत्करावा लागेल.'

'धोका कसला?' 'आहे ती परिस्थिती आणखी बिघडण्याचा.'

शंभुराव यास वाटले, बिघडायचे ते सगळे बिघडून झाले आहे. आणखी काय बिघडणार? होऊन होऊन काय होणार? तुळाजी आणखी वेडा होईल. कधीही बरा न होण्याइतका वेडा होईल. पण बरा होईल हीही शक्यता आहेच. काहीही उपाय न करण्यापेक्षा काहीतरी उपाय करणे केव्हाही चांगले. हरिपंत त्यांच्या हाताशी असलेल्या चोपडीत काही तरी वाचत होते, शोधत होते. अखेर एके ठिकाणी त्यांना ठोस काहीतरी सापडले असावे. त्यांनी नजर वर केली आणि म्हणाले, 'काय करुया?'

'काय व्हायचं ते होऊंद्या. औषध करा.' 'अधिक विचार करतो. औषधाची मात्र ठरवतो. आणि पाठवतो.' 'लई उपकार झाले देवा.'

'उपकाराची भाषा नको. पेशवाईचा अस्त होताना या गावाची जी नवी वसाहत झाली तेव्हा, तुमच्या आणि माझ्या पूर्वजांनी ते एकमेकांवर पुष्कळ करून ठेवलेले आहेत.'

असे नेमस्त नेटके, वरवर भावरहित वाटणारे आणि गाभ्याशी सारे व्यक्त करणारे बोलून हरिपंत तिथून ताठ चालीने बाहेर पडले. दुसऱ्या दिवशी त्यांनी औषध पाठविले. पुड्या बांधलेल्या होत्या. त्यामुळे मात्रा किती असावी हे सांगण्याचा प्रश्न नव्हता. काहीही पथ्य सांगितले नव्हते. दररोज सकाळी आनूसपोटी एक पुडी असे तीन दिवस ते घ्यायचे होते. दीर्घ निद्रा येईल. अन्नक्षुधेचे भान असणार नाही. त्याची गरजही नाही. जलाची मागणी केल्यास ते अवश्य द्यावे. गाढ निद्रेत असताना रुग्ण मधूनच दचकून उठेल. पुन्हा निद्रेत जाईल. त्याने गडबडून जायचे नाही. तो औषधाचा सुयोग्य परिणाम समजावा. पण फार जास्ती दचकला, कळवळला तर मात्र लगेच निरोप द्या. त्या स्थितीत औषध बदलावे लागेल. एरवी, हे औषध नेटके लागू पडल्यास चौथ्या दिवशी सकाळी तो स्वतः होऊन अन्न मागेल. तेव्हा त्यास अगदी थोडासा भात साजूक तूप घालून द्यावा. अधिक अन्न देऊ नये. हळूहळू त्यात वाढ करावी. ते हलके आणि सहज पचणारे हवे. सामिष अन्न देऊ नये. रुग्ण काही दिवस अबोल आणि शांत असेल. त्याच्याशी कशाहीबद्दल काहीही बोलू नये. तो स्वतः होऊन बोलू लागल्यास त्यास जेमतेम उत्तरे द्यावीत. ही उपाय योजना लागू पडेल, असा मला विश्वास वाटतो. तरीही सारे ईश्वराच्या अधीन समजावे. त्याची प्रार्थना करावी. प्राक्तनी असेल ते होईल.

: इतक्या सगळ्या सूचना मिळाल्यामुळे शंभुराव याने आपल्या या पुत्रास स्वतःच्या खोलीत ठेऊन घेतले.

तुळाजीच्या मस्तकातील नव्याने तयार होऊ पाहणारी आणि तयार झालेली विद्युत मंडले हरिपंतांच्या औषधांनी तुटली. संभ्रमाची मंडले तुटली आणि जुन्या मंडलांच्या रस्त्यांना जाईपर्यंत तुळाजी अबोल स्तब्ध, मुग्ध झाला. त्याच्या मनास एक शून्यबधीर स्थिती प्राप्त झाली. सारे पुसले गेले. कोरी पाटी आणि कोरा तुळाजी. पण मग आता तो दीन झाला. फटके खाल्लेल्या समंजस बैलाने आपसूक दावणीशी जाऊन उभे राहावे तसे त्याचे झाले. मूक होऊन तो सरळसोट त्याच्या जगण्याला सामोरा झाला. दाती तृण धरून तो जगण्याला शरण गेला. हे सारे जे त्याच्या मनाच्या गाभ्यात घडले, ते त्याने पाहिले, आणि फक्त त्यानेच; जे आणखी कोणालाही दिसले नाही.

काही महिन्यांनी तुळाजी याचा दुसरा विवाह झाला. शिरूर येथील खेसे नामक गृहस्थाची धोंडाबाई नामक मुलगी त्याची पत्नी होऊन सातपाटील यांच्या घरात आली. हे शिरूर पूर्वी तालुक्याचे गाव होते. घोडनदी या व्यापारी गावाशेजारी असलेले. पुढे घोडनदीचाच इतका विस्तार झाला की लोक घोडनदीलाच शिरूर म्हणू लागले. आणि हे आधीचे शिरूर घोडनदीत विलीन झाले. असो. धोंडाबाई ही प्रौढ, दुहेरी हाडाची आणि अत्यंत दणकट स्त्री होती. ती चांगलीच गोरीगोमटी होती. फक्त तिच्या एका डोळ्यात टिक पडलेली होती. म्हणूनच तिचे लग्न लांबले होते. खेसे हे सातपाटील यांचे जुने सोयरे. संधी दिसताच त्यांनी ती साधली. सातपाटील यांना तरी या दुसोट्याच्या वरासाठी आणखी कुठे मुलगी मिळणार होती? एकूण झाले ते दोन्ही घराण्यांसाठी जितले-जितले असे झाले. या साऱ्यात तुळाजी अगदी शांत होता. दावणीला बांधलेला बैल जसा शिस्तीने मालकाचे सारे

ऐकतो, तसे त्याचे वर्तन होते. नंतरच्या आयुष्यात तुळाजी याने आंजीच्या नावाचा कधीही उच्चार केला नाही. त्यास धोंडाबाई हिजपासून चार अपत्ये झाली. पण म्हणून त्यास आंजी हिची आठवण येत नसे असे नव्हे. त्यास ती येई. ज्या मुसलमानाचे घर ती निघाली, तिथे ती कितपत सुखी असेल याविषयी त्यास प्रश्न असत. ती तिथे दुःखी असल्यास त्या मुसलमानाला सोडून ती परत आपल्याकडे येईल, अशी कल्पना तो करत असे. कोणत्याही क्षणी ती येऊ शकते, असे त्यास वाटत असे. धोंडाबाईशी संसार करतानाच्या त्याच्या साऱ्या आयुष्यात तो नेहमीच आंजीची वाट बघत राहिला. ती आली नाही म्हणून त्याचे सारे आंतरिक आयुष्य कायम ताणलेल्या प्रत्यंचेसारखे राहिले. त्याच्या वयाच्या पंचावन्न ते साठीच्या दरम्यान कधीतरी तो राजयक्ष्मा नामक व्याधीने वारला. रुग्णशय्येवर असताना देखील त्यास आंजीच्या आठवणींमधून मुक्त होता आले नाही. आपण आजारी आहोत, हे तिला कुठून तरी कळेल आणि ती आपली भेट घेण्यासाठी येईल, या आशेची धुगधुगी त्याच्या प्राणोत्क्रमणापर्यंत त्याच्या अंतःकरणात कायम राहिली. हे सगळे त्याचे आंतरिक आणि खासगी असे वास्तव होते. ते त्याच्या काळजाला झालेले कुरूप होते. पण ते त्याला कुरूप न वाटता सतत सुरूप वाटत राहिले. दुसऱ्या महायुद्धात लढताना त्याला जे उपास काढावे लागले आणि ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या, त्यांच्यातून त्याच्या शरीरावर झालेल्या परिणामांतून तो कधीही मुक्त होऊ शकला नाही.

आंजी त्याच्या आयुष्यात राहिली असती तर कदाचित तो त्यांच्यातून मुक्त होऊन पुन्हा धडधाकट झाला असता. ती संधी त्याला मिळाली नाही. उरलेल्या आयुष्यात तो काळा, उंच शेकाट्यासारखाच राहिला. काही मजबूत गावठी शहाणपण असलेल्या ज्ञानी लोकांच्या मते धोंडाबाई हिच्या संसार करण्याच्या मागण्या पुरवता पुरवता त्यास राजयक्ष्मा या व्याधीच्या अधीन व्हावे लागले. संसार हा शब्द देशी व्यवहारात एकशय्येसाठी वापरला जातो. ज्ञानी लोकांची अशी धारणा होणे, काही अंशी युक्तच म्हणावे लागेल. कारण धोंडाबाई कायमच दणकट निरोगी होती. बाई दांडार असेल अन् पुरुष कुतंगळा तर संसार करण्याच्या गरजा पुऱ्या करताना त्याच्यावर अशी आपत्ती ओढवू शकते, अशी धारणा प्रस्थापित होती. अंदाज या स्वरूपात ती फार गैर म्हणता यायची नाही. धोंडाबाई ही आडदांड आणि कोणत्याही संभाषणात शब्दांचा वापर करताना कोणाचाही मुलाहिजा न बाळगणारी होती. याचे अनुभव तिने तिच्या संपर्कात आलेल्या अनेकांना मुक्तपणे दिले असतीलच. उदाहरणार्थ, देवनाथ सातपाटील, जो शंभुराव याचा नातू आणि माणकोजी याचा मुलगा होता आणि म्हणूनच धोंडाबाई हिचा पुतण्या होता, त्याने त्याच्या तरुण वयात कागदोपत्री एकत्र असलेल्या जमिनीच्या रीतसर वाटण्या करण्यासंबंधी काही एक प्रस्ताव तिच्यासमोर मांडला असताना झालेल्या बोलाचालीत एका तीव्रोत्कट क्षणी ती त्याला म्हणाली, तू माझे शस्पही वक्र करू शकत नाहीस. आता, शस्प म्हणजे काय हे ज्ञानी जाणतात आणि वक्र म्हणजे वाकडे. आणि असे बोलताना तिने आपल्या उजव्या हाताचा अंगठा आणि त्याच्या नजीकचे बोट यांची काल्पनिक कात्री तिच्या शस्पस्थानी नेऊन झटक्याने बाहेर काढून दाखवली होती. आपल्या पुत्राच्या स्थानी असलेल्या पुतण्याशी जी इतके स्वच्छ मोकळे बोलू शकते ती दुनियेशी त्यापेक्षा कितीतरी अधिक मुक्तपणे जिंदगीभर बोलली असेल यात प्रत्यवाय असण्याचे कारण नाही.

: असे हे सारे ओघाने आलेल बरेच पुढचे होय. तुळाजी याचे लग्न लावून दिल्यावर शंभुराव यास वाटले, चला. आता संपले एकदाचे. ज्याची त्याची जमेल तितकी तशी तशी व्यवस्था लागलीय. ज्याचे काहीच होऊ शकत नाही- उदाहरणार्थ धैर्यराव याचे त्याचे कोण काय करणार?- त्याचे नशीब त्याच्या सोबत. बाकी इतरांचेही फार ठीक चाललेले होते असे नव्हे. जन्मतानाच प्रत्येकजण आपल्या आपल्या आयुष्याची रेघ घेऊन येतो. तिच्यात आणखी कोणाला फार काही हस्तक्षेप करता येत नाही. तरीही बाप म्हणून प्रयत्न केल्याखेरीज राहवत नाही, म्हातारपण आले, शरीराचा ढिगल झाला; तरीही नाही. खरेदी मोडणे, माणकोजीचे परतणे, आंजीचे दुसऱ्याचा हात धरून पळून जाणे, तुळाजीचे नोकरी सोडणे आणि वेडा होणे; सगळयांमधून त्याने काहीना काही मार्ग काढला होता. पण त्या प्रत्येक वेळी त्याच्या मनाला न भरून येणाऱ्या जखमा झाल्या होत्या. गावात आणि विशेषतः त्याच्या भावकीत त्याच्या घराविषयी टवाळीच्या स्वरूपात काय काय बोलले जात असेल याच्या कल्पनांनी त्याचे काळीज भाजून निघत होते. आतल्या आत तो खचत चालला होता. त्याच्या मनाचे खतपुराड होत चालले होते. अशातच एके दिवशी बातमी आली की सरुबाई; गावातच दिलेली त्याची धाकटी लेक, तिच्या नवऱ्याचे घर सोडून निघून गेली!

ती का गेली, कशी गेली, कुठे गेली या सगळयांची कारणे आणि अंदाज काहीही उपयोगाचे नव्हते. ती तिच्या नांदत्या घरातून निघून गेली होती. ती तिच्या सासरच्या लोकांचे नाक कापून गेली होतीच, पण त्यापेक्षाही ती तिच्या बापाचे नाक कापून गेली होती. एका संध्याकाळी ती बातमी कानी आली तेव्हा तो तुळसाबाईशी बोलत होता. वाड्यातल्या चौकात उभा राहून तो तिला सांगत होता, की मी आता माझ्या खोलीत निघालोय. अर्थ असा की तू दिवसभर भिजवून ठेवलेले बोंबील किंवा सोडे; जे काही असतील ते, नेहमी करतेस तसे शिजवून, बनवून थोड्या वेळाने तिथे आणून दे. शंभुराव सातपाटील यांच्या मद्यसेवनास आरंभ होत आहे. तर तुळसाबाई भितभित म्हणाली, 'सरी गेली.'

'सरी गेली? कुठे गेली?' 'पळून गेली. तिच्या पोराला घेऊन नवऱ्याचे घर सोडून निघून गेली.'

अरे! हे अचानक असे काय झाले? शंभुराव याच्या पायातले बळच गेले. तो उभ्या जागी तिथेच बसला. हातात सोटा होता. हल्ली तो तो आधारासाठी वापरत असे. तो हातातून निसटला आणि पडून दंडगोल घरंगळला. जगण्यातील आघात मूकपणे साहत असलेली आणि अकाली थकून गेलेली ती त्याची स्त्री; तुळसाबाई पुढे सरसावली. पण हे इतके मोठे धूड तिने कसे उचलावे? तिमाजी आणि माणकोजी यांच्या बायका घरात होत्या. त्या धावून आल्या. पण त्या तरी आपल्या सासऱ्यास कशा उचलणार? तेवढ्यात माणकोजी आला आणि त्याने आपल्या वडिलांना उचलून उभे केले. सगळयांना आधीच सगळे कळलेले होते. तुळसाबाईने ते शंभुराव यास सांगितले; इतकेच. शंभुराव यास उठवून त्याचा हात आपल्या खांद्यावर घेऊन, स्वतःचा हात त्याच्या कमरेत घालून माणकोजी हळूहळू त्यास चालवत नेत त्याच्या खोलीत घेऊन गेला.

तारा ऊर्जा निर्माण करायचे थांबवतो, किंवा खरे तर त्याची ऊर्जा निर्माण करायची

क्षमताच संपायला येते, तेव्हा तो स्वतःच्याच गुरुत्वाकर्षणाखाली खचायला लागतो, तसे काही तरी शंभुराव याचे झाले होते. तारा या प्रकारे खचायला लागला की त्याच्या भोवताली सुरक्षित कक्षेत फिरणारे ग्रह आणि उपग्रह गोंधळून जातात आणि त्यांच्या कक्षा भरकटू लागतात. कारण गुरुत्वाकर्षणाचे सगळे प्रस्थापित नातेच अशावेळी संकटात येते. आणि सगळीच गोंधळाची स्थिती निर्माण होते. अथांग विश्वात कोण कुठे जाईल आणि कुठे कशाशी, कोणाशी टकरावेल, किंवा त्यांचे काय होईल याचे काहीही सांगता येत नाही. ताऱ्याच्या इंधन संपण्याच्या काळात अशी दुर्धर परिस्थिती निर्माण होते. शंभुराव याच्या पायातील बळ जाण्याने काहीसे असे घडले, पण त्याच्या भोवती फिरणाऱ्या त्याच्या कुटुंबाला ते तितके जाणवले नाही, याचे कारण स्वतः शंभुराव. तो खचला, त्याचे बळ गेले. पण त्याने ते कोणाला जाणवू दिले नाही. किंवा कोणाला ते जाणवले नाही. मनाला धक्का बसला की असे होते. पण शंभुराव भक्कम आहे. तो तो

सहन करील असेच सगळ्यांना वाटत होते. आणि तसा त्याने केला. निदान सगळ्यांना तसे दिसले. तो त्याच्या खोलीत जाऊन स्थिरस्थावर झाला तेव्हा त्याने हाक दिली, तुळसेऽऽ ती तिथेच मागे होती. त्याने कपाटाची किल्ली तिच्या हाती दिली. अर्थ स्पष्ट होता. बाटली काढ. पेला काढ. पाणी घेऊन ये. खाण्याचे मी आधी सांगितले ते काहीतरी कर. काहीही झालेले नाही. अशा गोष्टी होतात. आयुष्य हे असेच असते. मला धक्का बसलेला आहे. पण तो मी सहन करू शकतो. तुम्हीही तो करा. मी तो सहन करतो, म्हणजे तुम्हाला ते अवघड जाऊ नये. दारू असतेच. ती मला आवश्यक आहे. मी शांतपणे बसतो. कोणीही मला भेटायचे नाही. मी कोणालाही भेटणार नाही. तुम्ही ते जाणता. जे घडले ते घडले. या गोष्टी आपल्या हातात नसतात. जे जसे आहे ते तसे स्वीकारा आणि जगा. नसेल जगता येत तर मरा. पण तुम्ही कोणीही मरायचे नाही. मीही मरत नाही तर तुम्ही का आणि कसे मरणार? मी आहे. घाबरू नका. पळून जायचे नाही.

हा सारा बनाव म्हणा वा देखावा; शंभुराव याने केला तरी त्याचे मन त्याच्या जगण्यातील लागोपाठ बसलेल्या धक्क्यांनी विव्हल झाले होते. दारू पिताना एरवी अनेक रस्ते दिसतात, काही ना काही करून किंवा होऊन सगळे ठीक होईल असे वाटते, तेही त्यास वाटेना. मनातून तो इतका खचला की दारू पिणे सुद्धा त्याला मूर्ख वाटले. अव्यवस्था निर्माण करणाऱ्या लाटा सारख्या येत राहिल्या होत्या. त्यांची काही ना काही व्यवस्था लावण्याचा त्याने सतत प्रयत्न केला. पण आता तो हताश झाला होता. त्याच्या जगण्यातील गुरत्वाच्या असह्य दाबांखाली तो चिणला गेला होता. आपण लावलेल्या व्यवस्था ह्या मुळात व्यवस्था नाहीतच. ते सारे डागडुजीचे काम होते. सारे मुळातूनच बिघडलेले आहे. आपण त्यात काहीही करू शकत नाही, अशी त्याची धारणा झाली होती. दारूच्या कैफात सुद्धा त्याला ती बुडवता आली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो उठला आणि हातातला सोटा काठी सारखा टेकवत बाहेर पडला. तो का बाहेर पडला, तो कुठे जाणार, त्याची तबियत ठीक नाही तर त्याने बाहेर पडू नये, असे प्रश्न केवळ तुळसाबाई हीस पडले. पण ती बिचारी आयुष्यभर त्यास भिऊन जगली, वागलेली; ती त्यास कुठून विचारणार आणि सांगणार, की बाबा तू कुठे चाललास? तू बाहेर पडू नकोस. तुझ्या मनाची आणि शरीराची स्थिती ठीक नाही. तेजबाई किंवा

देऊबाई यांच्यासारखे या ना त्या पद्धतीने त्याची स्वामिनी होणे तिला कधीच जमले नाही. तो मागेल ते आणि तसे त्यास देणे इतकेच तिचे जगणे होते. त्याने न मागितलेल्या, न विचारलेल्या गोष्टी तिला जेव्हा त्याला सांगाव्या लागल्या, त्या प्रत्येक प्रसंगी ती अतोनात घाबरलेली असे. तो काय आणि का करतो आहे, हे तोंड वर करून विचारणे, तिच्या आवाक्याबाहेरचे होते.

शंभुराव बाहेर पडला आणि चालत निघाला. त्याला कैकांनी पाहिले असेल. गावात दिलेली त्याची मुलगी तिच्या नवऱ्याचे घर सोडून निघून गेल्याची सनसनाटी बातमी त्यांना लागलेली असेल. पण त्याला विचारणार कोण? एखाद्या वृद्ध आणि जगण्यासाठी जागा न उरलेल्या वाघासारखा तो रस्त्याने चालत गेला. वृद्ध तर तो होताच. पण आता त्याला जगण्यासाठी जागाच उरलेली नाही, हे कोणाला कसे समजणार आणि जाणवणार? तो म्हातारा असला तरी तो एक वाघ आहे, एवढेच त्यांना दिसले असणार. लागोपाठ आलेल्या नामुश्कीच्या लाटा त्याने झेलल्या, त्या झेलताना मनाने आतल्या आत तो त्याच्या जगण्याच्या रसातळाला पोहोचत होता; पोहोचला होता, हे त्याला स्वतःला तरी कुठे जाणवले होते? आपण निर्माण केलेले आपले भोवताल आपल्याला जपता आले नाही, त्याचा शीण पेलताना आपण थकलो, हे त्याच्या लक्षात आले नाही, ते इतरांच्या कुठून येणार? गेले कैक दिवस शंभुराव सातपाटील घराबाहेर पडला नाही अन् आज पडलाय याचा अर्थ काय, असे प्रश्न कोणाला पडण्याचा काहीही संभव नव्हता. मनाच्या पातळीवर जगण्यातील प्रश्नांनी चिणले जाताना एक प्रतिकार म्हणून तो बाहेर पडला होता अशी संगती कोण कशी लावणार? कोणाला ते कळणार? त्याला स्वतःलाच ते कळत नव्हते, ते इतरांना कसे कळणार?

तो मळयात गेला. मळयातल्या त्याच्या वस्तीवर. सूर्यराव आणि त्याच्या बायकोमुलांनी त्याला पाहिले. त्यांना आश्चर्य वाटले. ते सजग झाले. पण त्याच्या स्वागताला पुढे येण्याची हिंमत त्या कोणालाही झाली नाही. सूर्यराव याने देऊबाईवर हात उचलला तेव्हापासून तो त्याच्या मनातून उतरलेला होता, हे सूर्यराव आणि त्याचे कुटुंब यांना माहीत होते. ते पुढे येण्याची हिंमत कसे करणार? ते दुरून फक्त लक्ष ठेऊ शकत होते. तेच त्यांनी केले. शंभुराव थेट गोठ्यात गेला. तिथे भुंडीची मुले ; नाझर किंवा गुजर यांच्या वंशातला कोणतातरी एक बैल होता. त्याने त्यास ओळखले. बैलानेही शंभुराव यास ओळखले. शंभुराव याने त्या बैलाच्या वशिंडावरून हात फिरवला. हात तसाच मागे नेत तो त्याने त्याच्या पाठीवरून फिरवला.ओळख देणारी त्याच्या पाठीच्या त्वचेची थरथर त्याने पाहिली. त्याने त्याच्या गळयाखालील पोळावरून हात फिरवत स्नेहाच्या ओलीचे श्रेष्ठ सुख अनुभवले. त्याने त्याच्या मस्तकाला स्पर्श केला. शिंग, डोळे, चेहरा, नाकपुड्या; सारीकडे संवाद. अखेरी कानांशी स्पर्श करताना उत्कट होऊन त्याने आपले तोंड तिथे नेले. त्याच्या कानात तो पुटपुटला. तेव्हा त्या बैलाने तितक्याच उत्कटतेने प्रतिसाद द्यायचा म्हणून आपले तोंड हलवले. ते शंभुराव याच्या फासळीस लागले. तेव्हाच्या त्या इतक्या प्रेमळ आणि कोमल धक्क्याने शंभुराव कोसळला. सोटा हातात होता. तो त्या गाफील क्षणी आधारास आला नाही. आधार म्हणून तो तेव्हा नव्हताच. शंभुराव कोसळला तेव्हा तो सोटाही निसटला अन् घरंगळला. त्याचे ते थकलेले वृद्ध अवजड शरीर कोसळले तेव्हा

साहजिकच आवाज झाला. इकडे कान लावून असलेल्या सूर्यराव आणि त्याच्या लेकाने तो तत्क्षणी ऐकला आणि ते धावले. शंभुराव उताणा पडला होता. डोईची पगडी निसटून पडलेली. शेजारी घरंगळलेला सोटा. समोर आश्चर्यचकित झालेला स्तब्ध बैल. त्यांनी शंभुराव यास बसते केले. उठून उभे करण्याचा प्रयत्न केला. ते शक्य होईना. शंभुराव कळवळला. म्हणाला, 'नको, नको. मी इथून हलणार नाही.' त्याच्या लक्षात आले. आपल्याला आता उठता येणार नाही. आपल्या एका किंवा कदाचित दोन्ही पायांचा भुगा झाला आहे.

त्या पितापुत्रांनी भराभर हालचाली केल्या. गोठ्यातली जनावरे बाहेर काढून झाडांखाली सावलीला बांधली. बायकांना गोठा स्वच्छ करून घेण्यास सांगितले. एकजण गावातल्या वाड्यावर गेला आणि शंभुराव याच्या खोलीतून त्याची गादी, लोड, तक्के, उशा असे सारे घेऊन आला. कारण रानात ते काहीच नव्हते. किंबहुना शंभुराव याच्याखेरीज ते कोणाच्याही वापरात नव्हते. त्या गादीवर शंभुराव याची स्थापना करणे हा त्यांच्यासाठी आणि अर्थातच खुद्द शंभुराव याच्यासाठी फारच क्लेशकारक अनुभव होता. वाड्यात तुळसाबाईला बातमी लागताच ती लगबगीने आली. पाठोपाठ तिची सारी मुले एकेक करत जमा झाली. शंभुराव सातपाटील याचा सारा वाडाच रानात आला. सगळे गांगरून आणि गोंधळून गेले होते. त्यांचा आधारवड अनपेक्षितपणे कोसळला होता. एक सूर्यराव तेवढा हालचाली करत होता. त्याने बैलगडी जुंपली. गाडीला तट्ट्या लावला. शक्य ते उत्तम अंथरूण गाडीत घातले आणि तो हरिपंत शौचे-कुलकर्णी; बामण याच्या दारी गेला. म्हणाला, असे करता असे झाले. शंभुराव सातपाटील धराशयी झाले. हरिपंत सत्वर गाडीत बसले. आले, पाहिले, परीक्षा केली. त्यांनी इतर सगळ्यांना बाहेर पिटाळले. म्हणाले, 'शंभुराव अंतकाळ नजिक आला. तुझ्या हाडांचा चुराडा झाला आहे. आणि तो कमरेपासून घोट्यापर्यंत आहे. वाढत्या वयात हाडामधले सत्व कमी होत जाते. त्याला काहीही इलाज नसतो. शल्यकर्माचा मजला अनुभव नाही. पण ते केले तरी उपाय नाही. हाडे सांधण्यासारखी स्थिती नाहीय. ईश्वराचे चितन करत राहा. वेदना किमान होतील असे चूर्ण देतो. बाकी करण्याजोगे काहीही नाही. हे मला इतरांसमोर तुला सांगायचे नव्हते. म्हणून त्यांना बाहेर पिटाळले.' शंभुराव याने त्यास हात जोडले.

गोठ्यात धराशयी झालेला शंभुराव. भोवताली त्याचा गोतावळा. बाहेर कोणीतरी; बहुधा सूर्यराव याचा पुत्र झाडाखाली बांधलेल्या त्या बैलास मारत असावा. तो जीव खाऊन चाबकाचे फटके लगावत होता. झाडाच्या बुंध्याला बांधलेले ते मुके जनावर वेदनांनी फुसफुसत हालचाली करत होते. शंभुराव यास त्याचा सासूल लागला. म्हणाला, 'बैलाला मारू नका. त्याची काहीही चूक नाही. ते आसूड मला बसताहेत.' पटकन कुणीतरी धावले. बैलाचा मार थांबला. तुळसाबाई शेजारी बसलेली होती. ती रडत होती. शंभुराव म्हणाला, 'तुळसेऽऽ रडू नको.' त्याने मोठ्या मुश्कीलीने खिशातून किल्ली काढली आणि तिच्या हाती सोपवली. म्हणाला, जा. किल्ली तिच्या परिचयाची होती. ती त्याच्या कपाटाची किल्ली होती. तिथे दारूच्या बाटल्या होत्या. आज्ञा सरळच की, जा आणि बाटल्या घेऊन ये. मला इथे शांतपणे बसायचे आहे.

चार दोन दिवसात सारीकडे बातमी झाली. हळहळ आणि दुःखाच्या प्रतिक्रिया

अर्थातच झाल्या. माणूस वयस्क आहे म्हणून काय झाले, कोणाचेही असे होणे आनंददायक थोडेच असते? तरीही शंभुराव त्याच्या काळाच्या पल्याड जगलेला माणूस. दुनियेच्या वर्तमानात तो पुसला गेलेला होता. कोणाला काय वाटणार? त्याच्या भावकीतले लोक म्हणाले, 'हे सारे असेच असते. तुमचा जमाना होता, तेव्हा तुम्ही खूप उतमात केला. सावकारी केली. लोकांच्या मुंड्या मुरगाळल्या. बेमुर्वतखोरीने स्वतः चे घर भरले. दोन दोन बायका केल्या अन् तिसरी बाईही ठेवली. हे सगळे पाहणारा देव आहे, याचे भान तुम्हाला उरले नाही. पण तो असतो. या जन्मी केलेल्या पापांची परतफेड याच जन्मी करावी लागते. तशी याला ती करावी लागलीय. बाकी काहीही नाही. अखेर याच्या हाती काय उरले? खतपुराड संतती. दुसऱ्याचे घर निघणाऱ्या पोरी. घरच्या बैलाकडून लोळवले जाणे हेच त्याच्या नशिबात होते, याला कोण काय करणार?' पुष्कळांना हे रुचले नाही. त्यांच्या नजरेत तो जिवंत असलेला गुजरलेल्या जमान्यातला माणूस होता. त्यांच्या जगण्याशी त्याचा काहीही संबंध नव्हता. तरीही, मरणाच्या दारी असलेल्या माणसाविषयी असे बोलणे ठीक नाही असेच त्या लोकांना वाटले. भावकीचे तसे नव्हते. त्याच्या मोठेपणाचा आणि रुबाबाचा जाच त्यांनी मन मारून पुष्कळ काळ सहन केलेला होता.

त्यांच्या मनातल्या जखमा त्यांनी दीर्घ काळ सोसल्या होत्या. एके दिवशी तुळसाबाई त्याच्या कानात म्हणाली, 'सरी पघायला यायचं म्हनती.' शंभुराव स्तब्ध राहिला. बघायला तर खूप सारे येत होते. ते सगळेच दुःखी होते असे नव्हे. ज्याला वाटेल तो येत होता आणि थोडा थांबून जात होता. शंभुराव कुठे कोणाला अडवत होता? त्याचे पाय हत्तीच्या पायांसारखे सुजले होते. आणि ती सूज आता त्याच्या सगळ्या शरीरावर पसरत चालली होती. बोलणे किंवा कोणतीही प्रतिक्रिया देणे कष्टाचे होत चालले होते. माणसांची ओळख धरणे मुश्कील होत चालले होते. त्याच्या मनातल्या काळाची मोडतोड होत चालली होती. त्याची स्त्री; तुळसाबाई आणि त्याच्या दोन्ही लेकी; रेऊबाई आणि सरुबाई, त्याच्या आसपास बसल्या आणि रडल्या. तो त्यांच्यात कुठेही नव्हता. अचानक त्याला तेजबाईची आठवण येऊ लागली, तेव्हा तो अगदी चकित झाला. एवढी वर्षे गेली अन् आता या आपल्या अखेरच्या प्रवासात तेजबाई का आठवतेय, हे त्याला कळेना. पण नंतर तीही त्याच्या आठवणींमधून पुसट होत गेली. त्याला देऊबाईचे स्निग्ध स्नेहल असणे आठवू लागले आणि त्याला खूप सुख वाटले. पण अंतरीच्या कोलाहलात त्याच्या मनातल्या दुनियेने त्याचे स्वतःविषयीचे सारे अधिकारच हडप केले. आतल्या आत त्याची एक वेगळीच दुनिया तयार झाली होती आणि ती प्रत्यही बदलत होती, जिच्यावर त्याचा काहीही अधिकार उरला नव्हता. मनाच्या पटलावर कधीही काहीही प्रकट होई. आणि धुरकट होत पुसून जाई. त्याच्यावर त्याचा ताबा उरला नव्हता. त्याच्या शरीरात सर्वत्र पसरलेला पू आता त्याच्या मेंदूतही घुसला होता. त्याला प्रतिकार करताना अखेर त्याच्या मनात एक वेगळीच भाषा प्रकट झाली. तो त्या भाषेत

मोठमोठ्याने बोलू लागला. मग त्याच्या लक्षात आले की आपण बोलतोय, पण ते कोणालाही ऐकायला येत नाही. अगदी आपल्यालाही ऐकायला येत नाही. आपण मुळात काही बोलतच नाही आहोत. कोणत्या तरी चमत्कारिक शब्दांचे आणि प्रतिमांचे अगम्य

दुर्लघ्य काहीतरी आपल्या मनाभोवती घोटाळू पाहतेय. भोवताली ही इतकी माणसे का आहेत? ती कोण आहेत? हा कोणता गलबला आहे? त्या गलबल्यातच कधीतरी त्याने त्याचा अखेरचा श्वास घेतला. कुठेतरी, कोणाला तरी हात जोडावेत असे त्याला वाटले. पण हात उचललेच गेले नाहीत.

◆ ◆ ◆

देवनाथ

आता कथानकाचा काळ १९५० पासून सुरू होतो. तो १९५० पासूनच का? तर त्या वर्षी देवराव माणकोजी सातपाटील याचा जन्म झाला. त्याने नंतर देवराव हे आपले पाळण्यातील नाव बदलून देवनाथ असे का केले, याचे वृत्त पुढे कधीतरी येईलच. त्याचे आजोबा शंभुराव सातपाटील त्याच्या जन्माच्या दोन वर्षे आधी म्हणजे १९४८ साली वारलेले होते. त्याच वर्षी मोहनदास करमचंद गांधी यांचा नथुराम गोडसे नामक महाराष्ट्री ब्राह्मण ज्ञातीतील इसमाने गोळया घालून खून केला. गोडसे यांना चाहणारे लोक या घटनेस गांधीहत्या म्हणत नाहीत. ते त्यास गांधीवध म्हणतात. ते अर्थातच अत्यंत घृणास्पद आहे. असो. तर त्या समयी त्या संधीचा उपयोग करीत सातारा वगैरे भागातील शेतकरी जातीच्या लोकांनी जमीनदार ब्राह्मण वर्गास दहशत घालून त्यांना त्यांचे वाडे, जमिनी यांच्यातून हद्दपार केले. हे नाही तर आणखी कसले तरी निमित्त त्यांना मिळालेच असते. शेतकरी वर्गात तो असंतोष कायम खदखदत होता. हे किंवा असे साल्पी ग्रामी किंवा नगर जिल्ह्यात बव्हंशी झाले नाही. साल्पीतील ब्राह्मण जमीनदार त्यांचे वाडे आणि जमिनी यांच्यासकट सुरक्षित राहिले. कारण कदाचित या भागात ब्राह्मण जमीनदार वर्गाचे इतर शेतकरी जातींशी वागणे प्रायः समझदारीचे राहिले. त्यांनी फारसा जुलूम आणि उतमात कदाचित केला नसेल. तरीही भोवताली घडणाऱ्या घटनांचा धसका घेऊन इथल्याही ब्राह्मणांनी हळूहळू पुण्या मुंबईसारख्या शहरी स्थलांतर करणे पसंत केले. पुढे कुळकायदा आल्यावर ते सारे अधिक वेगवान आणि सहसा एकमेकांना न दुखाविणारे असे झाले. नंतर शेतांना बामणमळा, कुरनिकीचा मळा म्हणजे कुलकर्णी यांचा किंवा पुराणिकाचा मळा अशी नावे मात्र उरली. या सगळयासकट साल्पी येथे दणकून शेती करणारे दत्तोपंत हे हरिपंत शौचे-कुलकर्णी यांचे वारस उरलेच उरले. ते उत्तम शेती करीत आणि इतरांना मार्गदर्शन सुद्धा मनापासून करीत. पण त्यांच्या नकळत त्यांच्या ठायी असलेले त्यांच्या वरिष्ठ ज्ञातीतील असण्याचे अध्याहृत भान त्यांना टाकता आले नाही. तरीही त्या काळातील समजुती आणि धारणा यांच्या हिशेबाने ते प्रागतिकच म्हणावे असे होते. दत्तोपंत यांचे धाकटे बंधू सोन्याबापू शौचे हे देवनाथ याचे शिक्षक. हे त्यांच्या स्थळ आणि काळाच्या हिशेबाने फार पुढचे म्हणावेत असे होते. देवनाथ याच्या प्राथमिक शिक्षणाच्या सात इयत्तांपैकी तीन इयत्तांच्या वेळी ते त्याचे शिक्षक होते. ते महार, मांग अशा जातींसकट सगळया जातीच्या त्यांच्या विद्यार्थ्यांस आपल्या वाड्यात अभ्यासासाठी मुक्कामी ठेवून घेत असत. त्यासाठी अधिकचे शुल्क घेण्याचा विचार मनी येण्याचा तो काळ नव्हता. या सगळया अशा त्या काळाच्या आणि नंतरच्या गोष्टी. त्यामुळे पुन्हा शंभुराव याच्या उत्तरायणानंतरच्या गोष्टी.

शंभुराव याची सारी मुले तातडीने वेगळी झालेली होती. शंभुरावाच्या मृत्यूने त्यांना बांधणारे सूत्र तुटले आणि ते एकमेकांपासून वेगळे झाले, हे सरळच होते. त्या सगळयात

शंभुरावाची स्त्री; त्या मुलांची आई तुळसाबाई, ही कोणाकडे राहील, असा प्रश्न सुद्धा उपस्थित झाला नाही. त्या माउलीचे असणे त्या पुत्रांसाठी इतके नगण्य होते, की ज्याचे त्याचे, त्याने त्याने बघावे, तसेच तिनेही तिच्या उतारवयात आपले आपले बघावे, असे तिच्या त्या सा-या मुलांनी गृहीत धरले होते. शंभुराव असेस्तोवर ती कायमच त्याच्या नम्र दासीसारखी जगली. तिने त्याला हवी होती तितकी पोरे दिली. तिने त्याची नम्रपणे सेवा केली. त्या सगळयात त्याच्या असण्याचे छत्र तिच्यावर कायम होते. जगण्यासाठी वेगळे काही करण्याची गरज; किंवा तसा विचार तिच्या मनात कधीही उमटला नसेल. पण तो गेला आणि ती उघडी झाली. कितीही कसेही असले तरी जीवात जीव असेतो जगणे हे असतेच. ती तिचा उरलेला काळ अशीच रखडत रखडत बव्हंशी आपली लेक रेऊबाई हिच्याकडे राहिली. पाच पाच लेक जिवंत असताना त्या माउलीला जावयाच्या दारात जगताना यातना झाल्याच असतील. पण तिच्या जगण्यातील वैभवाच्या काळात, म्हणजे शंभुराव असेस्तोवरच्या काळात सुद्धा तिच्या इच्छा, भावना, आकांक्षा कायमच अस्फुट राहिल्या, तशाच किंवा त्यापेक्षाही अधिक त्या, तिच्या त्या नंतरच्या दीनवाण्या जगण्यात राहिल्या. माणूस म्हणून जगताना इतके निःशब्द एकाकीपण क्वचितच कोणाच्या वाट्याला येते. ते तिच्या वाट्याला आले. तिचे असणे तिच्या कोणत्याही मुलाच्या खिजगणतीत उरले नाही. तिच्या मृत्युनंतर तिच्या दशक्रिया विधीचे वेळी जेवणाचा खर्च कोणी किती आणि कसा उचलायचा, यावरून तिच्या पुत्रांमध्ये मारामारीची वेळ आली होती.

देवनाथ सातपाटील यास इतके महत्त्व का? आणि १९५० हे वर्षे कथानकात महत्त्वाचे का? १६५० साली थोर तुकोबाराय यांचा खून झाला. १८५० साली विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म झाला. किंवा १९५० साली देवनाथ सातपाटील यांचा जन्म झाला. यात १७५० साली असेच काही महत्त्वाचे घडले असल्याचे अर्थातच शोधता येईल. म्हणजे सतराव्या शतकाच्या मध्यापासून ते विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत एक संगती लावता येईल सुद्धा. पण ते इथे अभिप्रेत नाही. कथानक सुरू होते ते १२९० च्या सुमाराला. अल्लाउद्दीन खिलजी याच्या रामदेवराव यादव याच्यावरील स्वारीपासून. त्यामुळे कथानकात कोणत्याही शतकाच्या मध्याला तसा अर्थ नाहीय. १९५० साली देवनाथ याचा जन्म होणे यास कथानकात महत्त्व आहे, याचे केवळ कारण तो या कुलवृत्तांताचा कथक आहे. अर्थात एक योगायोग म्हणून म्हणा किंवा आणखी काहीही; १९५० साल हे आणखी बऱ्याच गोष्टींचे निदर्शक आहे. १२९० पासून सुरू होणारा कथानकाचा काळ घेतला तरी ते कोणाच्याही लक्षात येईल. खिलजी, विजयनगर, बहामनी, निजामशाही, आदिलशाही सकट पाच शाह्या, छत्रपती शिवाजी यांचा अद्भूत उदय, औरंगजेब, पेशवाई, अंग्रेजी राजवट अशा सगळयातून जाताना महाराष्ट्रातील खेडी बव्हंशी अचल होती. सैन्ये आणि लुटारू, भटके आणि पेंढारी यांची वदळ वगळता समाजजीवन फार संथ होते आणि संथ गतीने बदलत होते. बदलत्या सत्ताधारी वर्गाच्या कल्याणकारी आणि सहसा अकल्याणकारी सुख आणि त्रास यांना तोंड देताना खेड्यांनी आपले स्वायत्तपण कायम राखले होते. मोहनदास करमचंद गांधी नामक इसमाने खेड्यातील लोकांना जागे केले. त्याने त्यांना राजकीय चळवळीच्या केंद्राशी आणून उभे केले. तरीही खेड्यातील लोकांचे जगणे तातडीने बदलले नाही. जीवनपद्धती बव्हंशी स्थिर

राहिली. म्हणूनच १९५० साली जन्मलेल्या देवनाथ याच्यासाठी भूतकाळाची बव्हंशी स्थिर सावली कायम होती. तो आज २०१९ या साली त्याच्या वयाच्या सत्तरीच्या उंबरठ्यावर उभा आहे. त्याच्या भूतकाळाचे बव्हंशी स्थिर संचित आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झालेला वेगवान बदल त्याने अनुभवलेला आहे. आणि आज तर काळ क्वांटम लीप्स घेत एक्स्पोनेन्शिअल प्रकारे बदलत आहे. कालच्या गोष्टी आज जुन्या होत आहेत. आपल्या आजच्या गरगरत्या वर्तमानात स्थिर असे काहीही उरलेले नाहीय. म्हणूनच देवनाथ हा किमान तेराव्या शतकापासून ते आजपर्यंतच्या जगण्याचा साक्षीदार म्हटला पाहिजे. ही अशी संधी त्याच्या नंतर जन्माला आलेल्या पिढीला किंवा पिढ्यांना नाही.

१९५० साली देवनाथचा जन्म होणे याचे या कथानकातील महत्त्व त्यासाठी आहे.

1

मी साल्पी येथेच जन्माला आलो. पण त्याआधी मी माझ्या आईच्या पोटात असताना ती पुण्याजवळ कोथरूड येथे राहात होती, असे मला सांगण्यात आलेले आहे. मला एक थोरला भाऊ होता. तो सातव्या इयत्तेत असताना विषमज्वराचे निमित्त होऊन वारला. तेव्हा मी चौथ्या इयत्तेत होतो. दुसऱ्या महायुद्धात भाग घेऊन परतलेले माझे वडील त्या युद्धाच्या काळात जड वाहने चालविण्याची विद्या शिकलेले होते. त्याचा वापर स्वतःच्या चरितार्थासाठी ते करत असावेत, किंवा होते असे म्हणू. त्या काळातील त्यांच्या मिळकतीच्या हिशेबाने त्यांनी आपला डेरा कोथरूड या त्यावेळी पुण्याजवळचे राहण्यासाठीचे स्वस्तातले खेडे म्हणून तिथे टाकला असेल. तर व्हायचे असे की, माझे वडील माणकोजी हे ट्रक घेऊन मोहिमेवर जात तेव्हा घरात खाण्यापिण्याचा काही बंदोबस्त आहे वा नाही याचे तितकेसे भान त्यांना नसे. त्यावेळी अगदी तरुण असलेली वय वर्षे अठराची माझी आई; चिमाबाई ही वेळप्रसंगी कांदा मीठ आणि भाकरी असे अन्नसेवन करत आपल्या क्षुधेचे शमन करत असे. अनेकदा तेही संपून जाई. ती तरुण आणि प्रकृतीने निर्दोष निरोगी अशी होती. तशात मी तिच्या गर्भपिशवीत. आणि तेव्हा जिवंत असलेला माझा मोठा भाऊ चारेक वर्षे वयाचा तिथेच असेल. तो तिला तिच्या वयाच्या चौदाव्या वर्षी झालेला असेल, म्हणजे बघा! पुढे खूप वर्षांनी ती म्हातारी झालेली असताना एकदा आई मला म्हणाली, 'मी शहाणी कधी झाले, हे मला समजलेच नाही.' म्हणजे, इतके आधी संबंधाचे सगळे सुरू झाले होते. शहाणी होणे म्हणजे ऋतुप्राप्ती होणे होय. यातील सूक्ष्म गोष्टी स्पष्टच आहेत. असोत. आपल्याला म्हणायचे ते नेमके व्यक्त करण्यासाठी गावठी बाया जी भाषा वापरतात ती केवळ अद्‌भूतच होय. माझ्या आईकडे साहजिकच ती होती. तर कोथरूड येथे राहात असताना अन्नादिकांची वानवा असताना तिने ते मिळविण्याचे

अन्य मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला असेल, हे सरळच होय. त्या काळी कोथरूड येथे पेरुच्या उत्तम बागा विपुल होत्या. तेथे जावून ती चोरून पेरू खात असे. अशा फलाहारावर तिने कैक दिवस काढले असतील. त्यात एकदा एका बागेच्या मालकाने तिला पेरू खाताना पाहिले. तेव्हा त्यास दिसले की, तरुण स्त्री आहे, गर्भवती आहे. तो म्हणाला, 'बाई, अशी चोरट्याने कशासाठी खातेस? तू कधीही येऊन तुला पाहिजे तितके पेरू उघडपणे खात जा. तुला कोणीही हटकणार नाही. तुझ्यामुळे माझ्या बागेला बरकत येईल.' त्यापुढे माझी आई ते राजरोस आनंदाने भरघोस खात असे. परिणामी मी जन्मत:च अगदी गुटगुटीत निपजलो. आणि माझ्या त्वचेची रंध्रे अधिक मोठी झाली. म्हणून मला अगदी सहज घाम येतो. पुढे मोठा झाल्यावर स्त्रीशी रत होताना माझे सारे शरीर घामाने डबडबून जाई. त्याचे स्पष्टीकरण सुद्धा मी आईच्या त्या पेरू खाण्याशी जोडत असे. आता सत्तरीच्या उंबरठ्यावर उभा असताना रतीच्या संधी तितक्या उरलेल्या नाहीत. पण निमित्ते-कारणे सहज घाम येणे थांबलेले नाहीय.

एकत्र कुटुंब ; चुलते, चुलत्या, चुलत भावंडे, गायी, म्हशी, बैल, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या, कुत्री असा कुणब्याचा कबिला मी कधीही अनुभवलेला नाहीय. म्हणजे ते तसे इतरांचे मी पाहिलेले पुष्कळ आहे. आमचेही एके काळी तसे होते म्हणतात. पण मी स्वतः तशा कुटुंबात वाढलेलो नाहीय. कारण माझ्या जन्माआधीच सारे चुलते वेगळे निघालेले होते. आम्ही एका वाड्यात शेजारी शेजारी सुद्धा राहात नव्हतो. माझे सगळ्यात थोरले चुलते धैर्यराव उर्फ धुरुभाऊ हे आमच्या भावकीतल्या थोरल्या घरी सालगडी म्हणून काम करत होते. धुरुभाऊ यांचा आहार जबरदस्त होता. अन्न कोणतेही असो; त्यामुळे त्यांना काहीही फरक पडत नसे. अशी असाधारण आहार असलेली माणसे त्या काळी खेड्यात असत.धुरुभाऊ यांच्या अन्नक्षुधेविषयीची सर्वंकष माहिती असतानाही आमच्या थोरल्या आजोबांच्या घराने त्यांना आपल्याकडे गडी म्हणून ठेवलेले होते. खेरीज ते त्यांच्याशी आपलेपणानेही वागत असत. त्यापाठी आपल्या भावकीतील इसमास त्याच्या कठीण काळात आधार देणे किंवा संधी देणे इतकीच पवित्र स्नेहल भावना नव्हती. तर एके काळी खूप आगाजलेला माझा आजा शंभुराव याचे पुत्रास आम्ही गडी म्हणून ठेवले आहे, अशी नाचक्की करणारी भावना अधिक प्रबळ असेल, किंवा नक्कीच होती. त्या प्रकारचा सुप्त द्वेषभाव त्या लोकांच्या ठायी नक्कीच होता. पुढे काही वर्षांनी धैर्यराव उर्फ धुरुभाऊ याने एका नवऱ्याने टाकलेल्या सवत्स स्त्रीशी गंधर्व लावण्याचा म्हणजे तिच्याशी पाट लावण्याचा किंवा म्होतूर लावण्याचा आपला मनोदय जाहीर केला. तेव्हा भावकीतले लोक म्हणाले, 'तू आमची कुळी बुडवायला निघाला आहेस.' त्यावेळी धुरुभाऊ गंभीरपणे म्हणाला की, 'तसे तितके तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही माझे लग्न एखाद्या कुमारीशी अवश्य लावून द्या. मी त्यासाठी तयार आहे. तेव्हा त्या भानगडीत कोणीही पडले नाही, की बाबा तो खर्च करायचा कोणी? म्हणून विधीपूर्वक गंधर्व लावून त्याने त्या ठरलेल्या स्त्रीशी घरोबा केला. आणि पुढे त्यास त्या स्त्रीपासून मुलेबाळे उत्तम झाली. धुरुभाऊ यांचेशी माझा संपर्क काही मोजक्याच वेळी आला. पैकी एकदा ते म्हणाले, "तू शिकतो आहेस, आनंद आहे. शिक.' आणखी एकदा पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील कर्ड, बाभळसर, गोलेगाव किवा आंबळे अशा कोणत्या तरी गावात; जिथे माझी एखादी चुलत बहीण

दिलेली असेल; त्या गावी आम्ही पाहुणे म्हणून गेलेलो असताना सकाळी चहा पितळीत दिला होता. तेव्हा धुरुभाऊ तो डोळे बंद करून मिटक्या मारत मचक् मचक् करत पित असताना त्याचे डोळे त्याने मिटून घेतलेले होते आणि त्या अतिगोड कषाय पेयपानात तो मग्न होता, तेव्हा आम्ही सगळे ; बहुधा त्याचे उपस्थित पुतणे, हसत होतो, तेव्हा त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करत त्याने स्वतःच्या पेयपानात विघ्न निर्माण होऊ दिले नाही. आणि ते पूर्ण झाल्यावरच आम्हास त्याने विचारले की, 'पोन्हावो, तुम्ही मला हसत होता काय?' तेव्हा आम्ही साहजिकच, 'छे! छे! असे काहीही नाही,' असे म्हणालो होतो. पुढे नंतर बऱ्याच वर्षांनी घडलेला पुणे येथील एक प्रसंग मला आठवतो. ही आठवण चमत्कारिक आणि धूसर आहे. सरुबाई नावाची माझी एक आत्या होती. ती तिच्या उत्तरकाळी साल्पी येथेच राहात होती. तेव्हा तिच्याकडे जायचे नाही, तिच्याशी बोलायचे नाही, असे घरातून मला बजावलेले असे. तिला आत्या म्हणून मी कधीही पुकारलेले नाही आणि नव्हते. ती तिला आवडणाऱ्या कोणत्यातरी माणसासाठी गावातच असलेल्या तिच्या नवऱ्याचे घर सोडून बाहेर पडलेली होती. त्यामुळे आमच्या घराची फारच नाचक्की झालेली होती. माझा आजा शंभुराव सातपाटील याच्या मृत्युस ज्या अनेक गोष्टी कारक झाल्या, त्यात हीही एक होती. सबब आम्ही तिच्याशी संपर्क तोडलेला होता. मला आठवतो तो पुणे येथील प्रसंग; तिथे मी कसा काय हजर होतो, याचे कितीही विचार केला तरी काहीही स्पष्टीकरण मला देता येत नाही. त्या वेळी पुणे येथे राहत असलेल्या सरुबाई हिच्या घरी माझे वडील आणि सारे चुलते जमलेले होते. ते सारे मुक्कामीच तिथे होते. सरूबाई हिचा मुलगा तेव्हा पुणे येथे कुठेतरी कामास जात असावा. त्या काळी -आणि कदाचित अजूनही- कनिष्ठ मध्यमवर्गात सकाळी चहा घेताना सोबत ताजी गरम पोळी खाण्याची प्रथा असे. सरुबाई हिने सकाळी तिच्या मुलाच्या डब्यासाठी पोळ्या केलेल्या असाव्यात. तर आपल्या भावांनाही तिने त्या चहासोबत खाण्यासाठी दिल्या. त्या काळी चहा कपबशीऐवजी पितळीत देण्याची प्रथा असे. साहजिकच तो विपुल असे. साखरेऐवजी गूळ त्यासाठी वापरण्याचा प्रघात होता. सरुबाई हिने आपल्या भावांना तसा चहा दिला. वातावरण फारच खेळीमेळीचे होते. तिच्याशी आपला संबंध काहीही नाही असे सांगणारे हेच का आपले वडील आणि चुलते, असे माझ्या मनात आले. कदाचित इस्टेटीच्या संबंधात त्यांना तिचा अंगठा घ्यायचा असेल. तर तेव्हा धुरुभाऊ यांना चहाची पितळी दिली गेली तेव्हा रागरंग पाहून त्यांनी सरळ ती गव्हाची गरमागरम पोळी त्या गरम चहात चुरली आणि अत्यंत लालस प्रज्ञेने त्यांनी ती भिजलेली पोळी म्हणा किंवा चपातीचे गोड गोळे अत्यानंदाने आपल्या तोंडात टाकल्याचे मला स्पष्ट आठवते. आणि विशेष म्हणजे ते कोणालाही आक्षेपार्ह वाटले नव्हते. किंवा कोणीही त्यास काही दृश्य प्रतिक्रिया दिल्याचे मला आठवत नाही.

ही आठवण चमत्कारिक आणि धूसर अशासाठी आहे की, मी पुण्यात पहिल्यांदा कधी गेलो हे माझ्या आठवणीत स्पष्ट आहे. त्या वेळी मी साधारणतः पंधरा वर्षे वयाचा होतो. काहीही काम न करता घरी बसलेले असणाऱ्या माझ्या वडिलांनी, माझ्या आईच्या सततच्या टोचणीला वैतागून कदाचित; तेव्हा पुणे येथे नोकरी मिळवण्यासाठी जाण्याचा क्रम केलेला होता. तेव्हा ते कोणत्या तरी कंपनीत, आपल्या पूर्वाश्रमीच्या मिलिटरी पार्श्वभूमीचा उपयोग करीत रखवालदार म्हणून कामास लागलेले होते. त्यावेळी ते तिथे

रामवाडी, जकातनाका या ठिकाणी राहात होते. तिथे निगडे नावाच्या एका इसमाची पिठाची गिरणी होती. त्या गिरणीत आमच्या गावचा वाघुले आडनाव असलेला एक महार काम करत असे. वडील गेले तेव्हा त्यांना या महार इसमाने आश्रय दिला होता. तो माझ्या वडिलांना स्वतः सैपाक करून खाऊ घालत असे. गिरणीत दळणाला आलेल्या धान्यातून पीठ सूक्ष्मपणे चोरत ते होत असे. बाकी भाजी आणि ज्वलन यासाठी जे काही खर्च करावे लागे,ते तो करत असे. अर्थात इकडे गावी आला की मात्र तो आमच्या घराच्या ओट्याची पायरी न चढता अंगणात उभा राहात असे. हे सगळे आधी आणि नंतर मिळून मला माहीत झालेले वास्तव आहे. तर त्याकाळी कधीतरी वडिलांचे पत्र आले नाही किंवा काही खबरबात कळली नाही, म्हणून कदाचित; माझ्या आईने मला वाटखर्चीचे पैसे देऊन पुण्यास पाठविण्याचा निर्णय घेतला असेल. माझी अक्कलहुषारी किंवा शहाणपण यावर आईचा फार भरवसा होता. किंवा तो तसा टाकणे तिला अपरिहार्यही झाले असेल. पण तेव्हा मी आयुष्यात पहिल्यांदा पुणे येथे गेलो होतो, असे मला आठवते. कदाचित तेव्हाच मी वडिलांसोबत सरुबाई हिच्या घरी पुण्यातील सोमवार पेठेत गेलो असेन. आणि तेव्हाच ते चुलते सगळे तिथे जमलेले असतील. असो. धुरुभाऊ यांचेशी त्यांच्या उर्वरित आयुष्यात माझा कधीही संबंध आला नाही. पण माझ्या विवाहप्रसंगी त्यांना येण्यास मज्जाव करावा, कारण माझ्या श्वशुरगृहीचे लोक उच्चकुलीन, शहाण्णव कुळी मराठे वगैरे होते आणि त्यांना माझे चुलते यांचा गांधर्वविवाह नातेसंबंध रुचणार नाही, असा माझ्या मावसभावांचा अभिप्राय होता. म्हणून त्यांना त्या प्रसंगी बोलावण्यात आले नव्हते, असे मला आठवते. हे सगळे आज मला कितीही मूर्ख वाटत असले तरी तेव्हा ते तसे झाले होते, हे नमूद केले पाहिजे.

माझे त्या नंतरचे दुसरे चुलते सूर्यराव उर्फ सुरुभाऊ हे होत. यांच्याशी माझा जवळजवळ काहीही संपर्क कधीही आला नाही. त्यांची अंगयष्टी माझ्या वडिलांसारखीच भक्कम बैलासारखी होती. त्यांच्या चेहरेपट्टीत उत्तम साम्य होते. पण त्यांना स्वतःची पत्नी आणि मुले आणि स्वतःची शेती यापल्याड कशातही रस नव्हता. त्यांची मुलेही त्यांच्याप्रमाणेच सगळयांशी उत्तम अंतर राखून स्वतःपुरते जगणारी होती आणि आहेत. त्यांची स्त्री, म्हणजे माझी ती चुलती, अडखळत बोलणारी होती. पण तिचे हसणे मला निर्मळ वाटत असे. या स्त्रीस युटेरल प्रोलॅप्स म्हणजे स्वतःची गर्भपिशवी बाहेर पडण्याची व्याधी झालेली होती आणि त्याविषयी कोणाशीही काहीही न बोलता तिने तिचे आयुष्य व्यतीत केले होते, हे माझ्या आईने तिच्या म्हातारपणी मला सांगितले होते. आयुष्यातील अशा अंधाऱ्या दुःखासकट तिला तिच्या पुरुषाशी जाताना, जगताना, काय काय सहन करावे लागले असेल, याच्या कल्पनांनी मी निःशब्द होतो. सूर्यराव याची एक मुलगी; जी माझी चुलत बहीण होती, ती पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील गोलेगाव या घरटी किमान एक तरी माणूस सैन्यात असलेल्या गावात दिलेली होती. ती खूप गोड हसणारी आणि निर्मळ सुंदर होती. चुलत्यांशी किमान संबंध ही आमच्या जगण्याची रीत कायम असल्यामुळे या बहिणीशी माझा तितका संबंध आला नाही. म्हणूनच पुढे माझे वडील माणकोजी सातपाटील यांच्या मृत्युनंतर जेव्हा ती आमच्या भेटीस आली आणि माझ्या गळयात गळा घालून रडली तेव्हा मला त्याचे घोर आश्चर्य वाटले होते. त्यानंतरच्या

आयुष्यात या बहिणीची आणि माझी भेट झालेली
नाही.

माझे तिसरे चुलते तिमाजी उर्फ तिमाप्पा यांच्या पौरुषाविषयी पुष्कळ वदंता असत. ते पुरेसे पुरुष नाहीत किंवा ते हांडगे आहेत असे बोलले जात असे. हे फार सज्जन गृहस्थ होते. म्हशी पाळणे हा त्यांचा व्यवसाय होता. तो त्यांनी अत्यंत नेकीने आयुष्यभर केला. त्यांच्या जगण्याला त्यापल्याड कोणतीही दृश्य परिमाणे नव्हती. विठोबा नावाचे आमच्या एकत्रित कुटुंबाचे आमच्याशी रक्तसंबंध नसलेले एक सदस्य होते; ज्यांना मी माझ्या लहानपणी पाहिल्याचे आठवते. ते तेव्हा फारच वृद्ध अवस्थेत होते. माझ्या सगळ्यात थोरल्या आज्याची पत्नी दीपाबाई ही त्यांस कुठून तरी घेऊन आलेली होती. विठोबा हा मुकाबहिरा असून प्राण्यांशी संवादाची विद्या आश्चर्यकारक प्रकारे आत्मसात केलेला होता. त्याच्या सहवासात राहून तिमाजी यानेही ती विद्या म्हशींपुरती आत्मसात केलेली होती असे लोक म्हणत. मी माझ्या जन्मापासून ते माझ्या वयाच्या पंचविशीपर्यंत दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ क्वचितच खाल्लेले असतील. ते जे काही खाल्ले असतील, ते जास्ती करून तिमाजी यांच्या घरी खाल्ले. त्यांच्या घरी मी गेलो की हमखास त्यांची स्त्री म्हणजे माझी ती चुलती दूध, दही, तूप असे पदार्थ भाकरीसोबत खाण्यास देत असे. ते उत्तम असत. भावकीमध्ये कोणाच्याही घरी जेवायचा प्रसंग पडल्यास आपण स्वतंत्र ताटात जेवायचे नाही, अशी रीत आम्हास घालून देण्यात आलेली होती. भावकीतले कोण कधी काय खाऊ घालील याचा भरवसा काय घ्यावा? म्हणून ही खबरदारी. आम्ही सारी चुलतभावंडे हा नियम कसोशीने पाळत असू. अन् ते दिसेही साजरे की, बघा, ही भावंडे आहेत आणि किती आनंदाने एका ताटात जेवत आहेत. अर्थात असे प्रसंग फार कमी येत असत. पण येत तेव्हा अशा नियमांचे पालन हा आमच्या जगण्याचा धर्म असे. माझ्या वाढत्या वयात बाकी सगळ्या चुलत्यांच्या घरांप्रमाणे तिमाजी यांच्या घराशी माझा संबंध कमी कमी होत जावून शून्यवत् झाला. माझ्या वयाच्या सोळाव्या वर्षी मी अधिक शिक्षणासाठी साल्पीतून बाहेर पडलो तो उत्तरोत्तर तिथल्या दुव्यांपासून दूर होत गेलो. त्याचे मला काडीचेही दुःख नाही. माझ्या मनाच्या अंतर्मनातून मला तिथून कायमचे बाहेर पडायचे होते. तरीही माझ्या आयुष्यातले साल्पी मला येनकेन प्रकारे कायमच चिकटत राहिले आणि त्याने मला स्वतःपासून कधीही विलग किंवा स्वतंत्र होऊ दिले नाही. अधून मधून मी तिथे कायम जात राहिलो. असाच एकदा गेलो असताना माझी चुलती; तिमाजी याची स्त्री, माझ्या भेटीस आली. तेव्हा ती फारच वृद्ध झालेली होती. आणि तिच्या डोळ्यांची बुबुळे खेळण्यातील काचेच्या गोट्यांसारखी झालेली होती. ती तिच्या नाकातील गोलसर नथ सांभाळून माझ्याशी बोलत असताना तिच्या डोळ्यांच्या खोबणीतील ती बुबुळे कधीही तिथून निखळून पडत जमिनीवर वाटोळी फिरत राहतील या कल्पनेने मी फार अस्वस्थ होतो. त्याच्या भरात माझे तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष होत होते. पण एका क्षणी ती म्हणाली की, "तुझा बाप माझ्या लेकाला म्हणाला की, मी तुला झवून काढले आहे. तेव्हा मी चमकलो. आणि ती काय म्हणते आहे ते समजावून घेतले. झाले असे होते की, शेतातील बांधावरून तिचा मुलगा आणि माझे वडील यांच्यात काहीतरी वाद झडला. बांधाची अशी रेटारेटी असतेच. तिथे शब्दावरून शब्द वाढत गेला आणि त्यात माझे वडील तसे बोलले.

तेव्हा तिच्या एकुलत्या एक मुलाने माझ्या वडिलांवर हात उचलला. परिणामी सूड म्हणून मी त्यास इजा करू नये अशा प्रांजळ भावनेने ती मला काही सांगण्यासाठी आलेली होती. तेव्हा तिचे म्हणणे मला तातडीने पटले किंवा मी ते पटवून घेतले. कारण ती कदाचित अधिक वेळ बसली तर तिची बुबुळे जमिनीवर घरंगळतील अशा भीतीने मी अस्वस्थ झालेलो होतो. नंतर अधिक विचार केल्यावर सुद्धा तिचे म्हणणे मला पटले. माझे वडील माणकोजी सातपाटील यांचा त्यांच्या लग्नाआधी आणि कदाचित नंतर सुद्धा या त्यांच्या थोरल्या भावजयीशी शारीर संबंध होता, हे माझ्या ऐकण्यात आलेले होते. तसा तो असेल वा नसेल, पण ते त्यांनी इतक्या ग्राम्य पातळीवर जावून व्यक्त करावे, हे मला प्रशस्त वाटले नाही. आणि वडीलधाऱ्यांशी कसे वागावे अशी समज देण्यासाठी चुलतभावास ठोकावे, असेही माझ्या मनात आले नाही. ते करण्याइतकी उत्तम शारीर क्षमता माझ्या ठायी होती. पण, तेव्हा माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान असलेला माझा धाकटा भाऊ; जो तेव्हा अत्यंत तरुण आणि रगाट होता, त्यास अडवणे आणि थांबवणे मला फार मुश्किल गेले होते.

माझे चौथे चुलते तुळाजी हे माझ्या वडिलांसारखेच दुसऱ्या महायुद्धात लढलेले होते. त्यांची पहिली पत्नी आंजी नावाची होती, जी माझी आजी तुळसाबाई हिच्या भावाची मुलगी; राळेगणसिद्धी येथील होती. ती तिच्या मुसलमान यारासोबत पळून गेलेली होती. ती त्यांची अत्यंत आवडती स्त्री असावी, असा माझा तर्क आहे. आंजी हिच्याविषयी मी माझ्या आईकडून ऐकलेले आहे. ती फारच देखणी होती. ती माझे आजोबा शंभुराव सातपाटील यांची फार लाडकी होती. माझ्या आईच्या वाट्याला तिचा खूप स्नेह आलेला होता. ती गेली तेव्हा माझा हा चुलता; तुळाजी जवळपास वेडाच झाला होता. नंतर तो गावातील हरिपंत शौचे- कुलकर्णी यांच्या औषधाने बरा झाला. आणि त्याचे दुसरे लग्न माझ्या आजोबांनी शिरूर येथील आमच्या नात्यातील एका स्त्रीशी लावून दिलेले होते. तुळाजी यांची ही स्त्री, म्हणजे माझी ती चुलती एक डोळा गेलेली अत्यंत दणकट अशी स्त्री होती. तुळाजी यांना तिच्यापासून चार मुले झाली. त्यांची थोरली मुलगी वयाने माझ्यापेक्षा मोठी होती. तिला गावातच खोपडे-पाटील यांच्यात दिलेले होते. पण तिथे तिला खूप छळाला सामोरे जावे लागले. आम्ही गावातीलच आमचे मामा तोरणे यांच्या घरात राहात असताना ती अनेकदा मागच्या दाराने तिथे येई. तेव्हा ती चार चार दिवसांची उपाशी असे. तेव्हा माझी आई तिला गुपचूप खाणेपिणे देत तिचे सांत्वन करत असे. पण ते किंवा तसे सारे तिला पुरेसे झाले नाही आणि तिने एके दिवशी विहिरीत उडी घेऊन प्राणोत्क्रमण करणे पसंत केले. तुळाजी; हे माझे चुलते मनाने फार मृदू असावेत, असा माझा कयास आहे. पुढे त्यांना राजयक्ष्मा नामक आजाराने घेरले. त्या सुमाराला मी त्यांना भेटलो होतो. ते सहा फुटांपेक्षा अधिक उंच आणि रंगाने ठार काळे होते. आपले दुःख आपल्या आत लपविण्यासाठी त्वचेचा काळा रंग फार उपयुक्त असतो, असे त्यांच्या आजारपणात त्यांना भेटल्यावर माझे मत झाले. एखाद्या फळाचे पक्व झाल्यानंतरही जे काहीही इलाज न उरून सुरकुतणे असते, तसे त्यांच्या देहाचे झाले होते. कदाचित ते आणखी वेगळे होते. फळाचे पक्व न होता जे इजाळणे असते, तसे त्यांच्या देहाचे झाले होते. त्यांच्या त्वचेचे सुरकुतणे तिच्या काळ्या अंधारात इतरांसाठी दृष्यदुर्लभ झालेले होते. पण

त्या अंधाराच्या आत त्यांचे मन आणि शरीर फार एकाकीपणे सडत गेले होते. ते इतर कोणासाठीही किंवा कोणाचेही उरलेले नव्हते. पण त्या ठार अंधारात गाभ्याशी एक आटोकाट ज्योत पेटती ठेवत ते कोणाची तरी वाट बघत होते. कदाचित ते आंजीची वाट बघत असतील. ते तसे असेल अथवा नसेल सुद्धा ; त्यांच्याविषयी मी जे ऐकलेले होते त्याच्यातून माझा तसा समज झाला असेल. पण त्यांच्या मरणाच्या दारी ते फार एकाकी होते असे माझे मत झालेले होते. तुळाजी यांची एक आठवण माझ्या मनाशी कायम आहे. ते त्या दिवशी एकटे होते. मी फार लहान होतो. आमच्या वाड्यातील आमची खोली ढासळलेली असल्याने तेव्हा आम्ही आमचे मामा तोरणे यांच्या घरात राहात होतो. तरीही माझे आमच्या त्या जुन्या वाड्यात जाणे असे. ती एका दुपारची आठवण आहे. ओटा ओलांडून आत गेले की पहिली खोली तुळाजी यांची होती. मध्ये तिमाजी यांची. आणि त्यापल्याड आमची पडलेली खोली होती. मी तिथे त्या दुपारी कशासाठी गेलो होतो, हे मला आठवत नाही. पण मी तिथे गेलो तेव्हा हे माझे चुलते तुळाजी भाकरी थापत होते. चूल पेटलेली होती. पुरुषाने भाकरी थापणे मला कदाचित वेगळे आणि कुतूहलजनक वाटले असेल किंवा काहीतरी; मी त्यांना भाकरी थापताना पाहून तिथे थबकलो. त्यांनी स्वतःच्या ओठांवर बोट ठेऊन मला गप्प राहण्याचा संकेत केला आणि जवळ बोलावले. तिथे उत्तम दूध एका पातेल्यात तापत ठेवलेले होते. त्यांनी दोन भाक़ऱ्या भाजल्या. त्या उत्तम शुभ्र पांढऱ्या आणि कडक जाड पापुद्रा आलेल्या होत्या. त्या झाल्यावर त्यांनी त्या एका मोठ्या पितळीत चुरल्या. त्यांच्यावर गरम दूध ओतले. आणि ते रसायन खाण्यालायक पुरेसे थंड झाल्यावर मला ते म्हणाले, 'चाल, धुर.' तेव्हा ते माझे चुलते; तुळाजी आणि मी यांनी एका ताटात ती दुधभाकरी खाल्ली. ते जेवण अत्यंत रुचकर होते. एका ताटात खाण्याचा कोणताही नियम तिथे नव्हता. तशी भाकरी मी आणखी कोणत्याही चुलत्यासोबत खाल्ली नाही. अगदी माझ्या वडिलांसोबत सुद्धा. मी असे एका ताटात इतक्या स्नेहल ओलीने कोणाही सोबत जेवल्याचे मला आठवत नाही.

राहता राहिले माझे वडील. त्यांच्याविषयी निमित्तेकारणाने पुढे येईलच. पण माझ्या दोन आत्या ; त्यांच्यातील सरुबाई हीस आम्ही आत्या म्हणतच नव्हतो आणि दुसरी रेऊबाई ही शेजारच्या गावी दिलेली होती. माझी आजी तुळसाबाई सहसा तिच्याकडे तिथे असे. रेऊबाई ही दुसोट्यावर दिलेली होती. ती तिच्या लेकराबाळात आनंदाने जगत होती. शंभुराव सातपाटील याच्या पुढच्या पिढ्यातील, म्हणजे त्याच्या लेकी आणि नाती यांच्यासंबंधी एक मी पाहिलेय. त्या जिथे जिथे दुसोट्यावर दिलेल्या होत्या, म्हणजे त्यांच्या त्यांच्या पुरुषांच्या त्या दुसऱ्या पत्नी होत्या, तिथे तिथे त्यांचे चांगले झाले. ज्या ज्या प्रथमवरास दिल्या, तिथे त्यांचे प्रपंच नीट उभे राहिले नाहीत. हे असे का व्हावे याचे काहीही स्पष्टीकरण मला देता येत नाही. पण तशी संगती मात्र स्पष्ट दिसते. जिला आम्ही आमची आत्या म्हणण्यास नकार दिला ती सरुबाई, प्रथमवरांना दिलेल्या माझ्या दोन बहिणी, एक चुलतबहीण आणि दुसोट्यावर दिलेल्या माझ्या किमान तीन चुलतबहिणी यांचे आयुष्य पाहताना मी या निर्णयास आलेलो आहे. तर ही माझी दुसोट्यावर दिलेली आत्या, रेऊबाई ही तिच्या प्रपंचाची निर्विवाद स्वामिनी होती, असे आज मला दिसते. तिच्या घरात तिचाच शब्द चाले. आमच्याकडे आत्यास मावळण या आणखी एका

शब्दाची योजना असे. आणि मावळणीचा नवरा तो मावळा. हा आमचा मावळा शांत, सोशिक आणि शब्दांचा अतिव्यय टाळणारा होता. आत्याची आम्ही सगळी भाचरे, त्या त्या वेळी जितकी तिच्याकडे जात असू, तेव्हा ती मोठ्या आवाजात तिच्या लेकी-सुनांना जाहीर करत असे की, 'ये पोन्हीहो, चला, चला, मपले भासे आलेत. गरम भाकरी टाखा. आंडी तळा.' तव्यावर तळलेल्या अंड्यास आम्ही ऑमलेट म्हणत नसू. तो शब्दच आम्हाला माहीत नव्हता. तीस अंड्याची पोळी म्हणत असत. अंड्याची पोळी संपू नये म्हणून तिला भाकरी फक्त टोचायची आणि त्या स्वादाने युक्त भाकरी खात राहायची असा आमचा क्रम असे. आत्याची शेती, गुरेढोरे असा मोठा बारदाना होता. तिथे आम्ही कधीही गेलो आणि कितीही दिवस राहिलो तरी त्यास कोणीही आक्षेप घेत नसे. आम्ही आत्याची लाडकी भाचरे होतो आणि ती तिच्या घराची स्वामिनी होती. माझ्या वडिलांकडच्या नात्यातील इतके स्वागतशील घर दुसरे मला आठवत नाही. नंतर मी पुण्यात दोनशे तेरा नारायण पेठ, पारखे वाडा, लिमये मांडववाले यांच्या समोर, अशा पत्त्यावर पोटभाडेकरू म्हणून खोलीभाडे रुपये पंधरा आणि स्वहस्ते केलेल्या सैपाकाचा खर्च रुपये पस्तीस या प्रकारे अत्यंत सक्तीच्या टुकीने राहून पुणे विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत असताना एकदा लकडी उर्फ संभाजी पुलाच्या फुटपाथवरून डेक्कन जिमखान्याच्या दिशेने चाललो होतो. तर विरुद्ध बाजूच्या फुटपाथवरून माझी रेऊआत्या तिच्या त्याकाळी लोकांच्या घरांच्या भिंतींना रंग देण्याचे काम करणाऱ्या मुलांसोबत चाललेली मी पाहिली. तेव्हा अतीव आनंदाने मी तिला खणखणीत आवाजात हाक मारल्याचे आणि तीही चकित झाल्याचे आठवते.

बाकी आमची भावकी होतीच. ती फार मोठी होती. एकूण पाच आज्यांचा विस्तार. आमचे शंभुराव सातपाटील यांचे घर सगळ्यात धाकटे. मी त्याच्या सगळ्यात धाकट्या पुत्राचा मुलगा. साहजिकच मला कळायला लागले तोवर आमची एकूण भावकी फार मोठी झालेली होती. नात्याने माझ्या वहिनी असलेल्या अनेक स्त्रिया माझ्या आईपेक्षा वयाने मोठ्या होत्या. साहजिकच त्या मला अहो-जाहो करीत. आणि ते मला गमतीचे आणि आश्चर्यजनक वाटत असे. पण एकूण सगळ्या भावकीच्या नजरेत आम्ही खतपुराड खानदानाचे लोक होतो. आमच्यातून कसलेही कर्तृत्व उगवणार नाही अशी सगळ्यांची खात्री झालेली होती. शंभुरावाच्या सावलीत वाढलेली त्याची फुसकी पाच पोरे आणि त्यांचा विस्तार. खतपुराडच होते सगळे. त्या घराला तसे म्हणताना त्यांच्या ज्या काही भावना असतील त्या असोत, पण ते वास्तवाचे दर्शकच होते असे मी म्हणेन. आम्हाला त्यांच्याच काय; गावातील कोणाच्याही नजरेत काहीही किंमत उरलेली नव्हती. लहानपणी एकदा मी माझ्या आईसोबत चाललो होतो. तिच्या डोक्यावर विहिरीतून शेंदलेल्या पाण्याच्या हंड्यांचे ओझे होते. मी शेपटासारखा तिच्या पाठी चाललो होतो. तर समोरून खोपडे-पाटील यांच्या घराण्यातील एक प्रौढ गृहस्थ येत होते. ते लगेच बाजूला झाले. म्हणाले, 'अरे बाबा, मोठ्या घरची सून चालली आहे. तिच्यासाठी रस्ता मोकळा हवा.' मी आईस विचारले, 'ते माणूस असे का म्हणाले? आपण तर किती गरीब आहोत!' ती म्हणाली, 'ते आपल्याला हसण्यासाठीच तसे बोलले. तुझ्या आज्याच्या काळात आपले घर या गावातले खरोखरीच मोठे घर होते. आता ते तसे उरलेले नाहीय. म्हणून लोक हसतात.

आपले भाऊबंद सुद्धा हसतात. अशा गोष्टींकडे लक्ष द्यायचे नसते. तू खूप मोठा होऊन या सगळ्याला उत्तर दे.' मोठा होऊन मी याला कसे उत्तर देणार हे माझ्या लक्षात आले नाही. पण मी माझ्या आईला अधिक न छेडता गप्प झालो होतो.

आईचे माहेर गावातच असल्याने तिच्या बाजूचा फार मोठा गोतावळा गावात होता. तिच्या दोन मोठ्या बहिणी भीमाबाई आणि ठमाबाई गावातच खोपडे-पाटील यांच्या घराण्यात दिलेल्या होत्या. हे खोपडे लोक स्वतःला देशमुख किंवा शहाण्णव कुळी म्हणजे उच्च कुलीन समजत असत, हे माझ्या जरा उशिरा लक्षात आले. कारण, लहान वयात अशा गोष्टी मनात नसतात आणि त्यांचे असणे अजिबातही जाणवत नाही. खोपडे हे स्वतःला जे काही समजत होते, तेच किंवा तसेच त्यांचे नातेवाईक सुद्धा समजत होते, हेही माझ्या उशिरा लक्षात आले. एरवी ते लोक अगदी साधे माझे मावसभाऊ आहेत, असे मी समजत होतो. आणि त्यांचे खूप प्रेम माझ्या वाट्याला आले होते. खेरीज आईच्या कैक चुलतबहिणी, आत्या, आतेबहिणी गावात होत्या. आईच्या माहेरचे आडनाव तोरणे. दुसरे एक पेरणे म्हणून त्यांचे नातेवाईक होते. एकमेकात त्यांचे खूप सोयीरसंबंध होते. ते सगळे खूप मायाळू असे लोक होते. ते सगळे गरीबच लोक होते. पण आम्ही जरा अधिक गरीब होतो. पूर्वी खेड्यात सगळे लोक सहसा गरीबच असत. खाऊन-पिऊन सुखी असणारास श्रीमंत समजण्याचा प्रघात होता. तसे लोक कमी असत. आम्ही गरीब गटातल्या तळाच्या आसपास होतो. तशाही स्थितीत माझे प्रकृतीने गुटगुटीत असणे आईच्या या नातेवाईकांना आश्चर्यकारक आणि सुखदायी वाटे. तशात माझा मोठा भाऊ अकाली त्याच्या वयाच्या तेराव्या वर्षी वारल्याने ती जखम त्यांचा मनात कायम असे. ते सगळे लोक माझ्याशी अत्यत प्रेमाने वागत असत. खाऊ-पिऊ घालणे हा प्रेम व्यक्त करण्याचा एक धोपट मार्ग त्यांना माहीत होता. मी जिथे जाई तिथे हे प्रेम माझ्या वाट्यास अतोनात येई. त्यास उत्तम प्रतिसाद देण्याइतकी प्रमाथी भूक माझ्या ठायी सतत असे. तिथे कुठेही जेवताना आणखी कोणाला आपल्या ताटात घेण्याचे बंधन नसे. कारण भाऊबंदांकडून असलेला धोका मला या लोकांकडून अजिबातही नव्हता अशी जाणीव मला देण्यात आलेली होती. आईची एक आत्या पेरणे यांच्या घरात दिलेली होती. माझ्या लहानपणी ती विधवा, वृद्ध, काळी आणि डोळ्यात टिक पडलेली अशी होती. मी तिच्याकडे गेलो की तिला फार आनंद होत असे. ती मला जवळ घेऊन माझे मुके घेत असे. तिच्या दंतहीन ओठांचा प्रेमळ स्पर्श मी माझ्या मनाच्या कुपीत कायम सुरक्षित ठेवलेला आहे. एखादा राजपुत्र आपल्याकडे यावा अशा प्रेमाने ती माझे अगत्य करत असे. जेवण तर हमखास असेच. खेरीज ताटाला वटकावणे म्हणून ती त्याखाली कधी दोन पैसे, कधी एक आणा ठेवत असे. 'तुपलं लय चांगलं व्हईन. चांगला म्हतारा व्हशीन आन तुला मपल्याएवढी चांगली बायकू मिळन,' असे म्हणून ती खूप गोड हसत असे. या आपल्या आज्या, मावश्या असा कसा आशीर्वाद देतात आणि अशा गोड का हसतात याचे कोडे त्या लहान वयात मला उलगडत नसे. आजही ते उलगडतेय याची मला खात्री नाहीय. पण एक अर्थ असा दिसतो की, बाळा, आज मी माझ्या ज्या वयात आहे आणि जी दुनिया मला दिसलीय, ती तिच्या अगदी तरुण वयात कळणारी बायको तुला मिळो, असा त्या आशीर्वादाचा अर्थ असेल. ही माझ्या आईची आत्या, म्हणजे माझी आजीच; जिने अत्यंत प्रेमपूर्वक मला हा आशीर्वाद पुन्हा पुन्हा दिला, तो बव्हंशी

फलद्रूप झाला, असे मला वाटते. मी आज माझ्या वयाच्या सत्तरीत आहे. माझे सारे चांगले झालेले आहे. ज्या अनेक प्रकारच्या अभावात मी जन्मलो, ते काहीही आता नाहीत. खेड्यातल्या त्या प्रकारच्या जगण्यातल्या प्राथमिक संघर्षातून मी बाहेर पडलो. मला जे आवडते ते मला जरा उशिरा, तरीही, योग्य वेळीच समजले आणि ते करण्यातला पुन्हा पुन्हा मरून जिवंत होण्याचा, म्हणजे स्वच्या अंताचे सुख पुन्हा पुन्हा अनुभवण्याचा तापदायक आनंद निदान काही वेळा तरी माझ्या वाट्याला आला. आपल्याला काय हवे हे वेळीच कळणे आणि ते करायला मिळणे यात जगण्याचे सर्वश्रेष्ठ सुख असते. ते मला दिसले, असे वाटते. मी उत्तम सुखाने म्हातारा झालो आहे. स्त्रीसौख्य मला मिळाले. ते अतोनात मिळाले. स्त्रीसौख्य आणि पुरुषसौख्य यांच्यात मी फरक करत नाही. त्यात एकाखेरीज दुसरे नसते अशी माझी धारणा आहे. मिळाले नाही असे काहीही नाही. इतके सुखाचे आयुष्य क्वचितच कोणाच्या वाट्याला येते. त्यापल्याड उरते त्यात माझे, माझ्यातले काही न्यून असेल, असे मला वाटते. लिहिणारे लोक जन्मतःच जे चमत्कारिक गारुड घेऊन आलेले असतात, त्यात ह्या न कळण्याच्या गोष्टी असतात; कदाचित असतील, असे मला वाटते.पण त्यासंबंधी काहीही दुःख माझ्या मनात उरलेले नाहीय. नसो.

खरे म्हणजे आम्ही तितके गरीब सुद्धा नव्हतो. आमच्या वाट्याला आलेली जमीन आमचा चरितार्थ चालविण्यास पुरेशी होती. कारण त्यातली बरीच उत्तम विहीर-बागाईताची होती. शेतीचा पुष्कळ सरंजामही आमच्या वाट्याला आलेला होता. पण शेतात राबायचे कोणी? वडिलांना त्यात रुची नव्हती. त्यांच्या लहानपणापासून त्यांनी ते कधी केलेले नव्हते. शंभुराव सातपाटील जिवंत असेतोवर वडिलांना आणि त्यांच्या भावांना असले काम करावेच लागलेले नव्हते. एक सुरुभाऊ नामक माझे चुलते वगळता शेतात राबणे कोणालाही माहीत नव्हते. खोपडे यांच्या घराण्यातील गोपाळ आबा पाटील यांचे आयुष्य आमच्या घरी सालगडी म्हणून काम करण्यात व्यतीत झाले होते. वडील दुसऱ्या महायुद्धात लढून आले म्हणून त्यांना शेतीची आवड नव्हती, हे अर्धसत्य होय. त्यांना मुळातच ती नव्हती. दसऱ्याला शिलंगणाचे सोने लुटण्याचा विधी हल्ली प्रतिकात्मक झालेला आहे. पण पूर्वी आपले अठरा पगड जातींचे पूर्वज त्या मुहूर्तावर घोड्यावर बसून सीमोल्लंघन करीत. म्हणजे ते मुलुखगिरीला निघत. ते म्हणजे महाराष्ट्राच्या बाहेर जाणे आणि लुटालूट करून शक्यतो वर्षभराची बेगमी करणे, असा आपल्या लोकांचा रिवाज होता. एरवी या आपल्या दगडधोंड्याच्या मुलखात आपला टिकाव कसा लागावा? पण अंग्रेज लोक आले आणि आपला तो शिरस्ता बंद झाला. त्यामुळे शेतात राबणे एवढा एकच रस्ता उरला. तो अनेकांना जाचक वाटत असे. हे सारे थेट माहीत नसले तरी, किंवा त्याची थेट स्मृती नसली तरी, अशा लोकात तो जाच एक प्रकारच्या अनाकलनीय चिडीच्या रूपात व्यक्त होई. म्हणजे ते लोक काहीही दृश्य कारण नसताना पिसाळल्यासारखे होत. इच्छेविरुद्ध पिंजऱ्यात कोंडलेल्या श्वापदांसारखे त्यांचे होई. हे मी माझ्या वडिलांच्या वागण्यात पाहिलेले आहे. ते शरीराने अत्यंत भक्कम होते. त्यांच्या अंगी हत्तीसारखी ताकद होती. आमचा वाडा माझ्या जन्माच्या आधीच कोसळलेला होता. त्या पडक्या वाड्यात माझे दोन चुलते कसेबसे राहात होते. पण आम्ही इथेतिथे काही काळ राहात अखेर आमचे मामा तोरणे यांच्या गावठाणातील घरी स्थिर

झालो होतो. कारण मामांचे घर गावात असले तरी ते रानात पडळी बांधून राहात होते. त्या रिकाम्या घरात आम्हाला राहण्याची संधी मिळाली. ती इतका काळ की लोकांना ते आमचेच घर आहे असे वाटू लागले होते. त्या घराला शिंपी, सोनार, कासार, मुसलमान, मन्यार, तांबोळी अशा लोकांचा शेजार होता. एकदा असेच काहीतरी कारणावरून दोन सोनारांचे भांडण सुरू झाले. ते हमरीतुमरीच्या पुढे जावून एकमेकांच्या शरीरांवर हल्ले करण्याच्या बेताला पोहोचले. तेव्हा बायाबापड्या, आमच्यासारखी लहान मुले ; असे आम्ही सारे ते तन्मयतेने बघत होतो. कोणीही त्यात हस्तक्षेप करत नव्हते. तेवढ्यात कुठून तरी माझे वडील आले. ते थेट त्यांच्यात घुसून मध्ये उभे राहिले आणि त्यांच्या भांडणास मज्जाव करू लागले. अशा प्रसंगी लढणाऱ्या दोन्ही पक्षांना एक अनामिक प्रेक्षणीय बळ मिळून ते एकमेकांवर अधिक त्वेषाने हल्ले करू लागतात हा प्रेक्षक म्हणून आपला अनुभव असतो. तसे ते झाले आणि त्या गडबडीत कोणत्या तरी एका सोनाराचा त्याच्या शत्रूला लक्ष्य करून दिलेला फटका माझ्या वडिलांना बसला. पुढच्या क्षणी अघटित ते घडले. वडिलांनी दोन्ही सोनारांना एकत्र कवळी घालून वर उचलले आणि थेट मोकळे सोडले. ते दोन्ही लढवय्ये सोनार एकाच वेळी भूमीवर कोसळून पडले. त्या दोघांनी एकाच वेळी माझे वडील माणकोजी सातपाटील यांच्याकडे भयभित मुद्रेने पाहिले. काय झालेय आणि काय होऊ शकते याचा त्वरित अंदाज घेत ते दोघे उठले आणि एकमेकांच्या विरुद्ध दिशांना पळते झाले. तेव्हा प्रेक्षकांमध्ये हास्याच्या लकेरी उठल्या. एक शिंप्याची बाई म्हणाली, 'माणकूदादा, भांडण सोडवायचा हा तरीका आपल्याला पटला, हां!' तेव्हा उपस्थित प्रेक्षकांच्या हास्यकल्लोळात माणकोजीही सत्वर सामील झाले. आपल्या अंगी असलेल्या अशा आडमाप ताकदीचे कुणबिकीच्या वहिवाटीत रूपांतर करणे वडिलांना कधीच जमले नाही. कुणब्याचे जगणे हे तो ज्याला गुलाम म्हणून वापरतो, त्या ढोरासारखे असते. अंगी ताकद अमाप, पण ती टुकीने वापरणे ही त्या जगण्याची रीत असते. झोक्यात काम करायचे असते. ते वडिलांना कधीच जमले नाही आणि समजले सुद्धा नाही. ती वृत्तीच त्यांच्या ठायी नव्हती. माझी आई गरीब घरातून आलेली असल्याने तिच्या ठायी ही झोक्यात काम करण्याची विद्या अंगभूतपणेच होती. तिची निश्चयी वृत्ती आणि कणखरपण यांच्या बळावर आमचा निभाव लागला.

बाकी एकूण सातपाटलांविषयी सांगायचे तर, ते सहसा कळपाने राहणारे लोक नाहीत आणि नसत. ते सहसा आडदांड आणि आडबंग. अंगयष्टी भरघोस. साल्पी येथील इतर लोकात ते वेगळे उठून दिसत. माझ्या आज्यांच्या एका घराला नंग असे टोपणनाव प्राप्त झाले होते, ते अशा नंगट वृत्तीमुळेच. खरे तर सर्व सातपाटलांसाठीच ते योग्य होते. वाघिणीची नर पिल्ले शिकार करण्याच्या वयाची झाली की कळपातून बाहेर पडतात. तसेच या लोकांचे. भाऊ भाऊ म्हणून सुद्धा एकमेकांना फार धरून राहण्याची वृत्ती नाही. ज्याचा तो सुटा. ज्याने त्याने आपला आपला वासोटा आणि कासोटा जिंकावा. त्यांना सामिष भोजनाची चाह फार. शिकार करताना श्वापदे जशी एकत्र येतात आणि केलेल्या शिकारीवर ताव मारतात, तसे त्यांचे होते. असे सांगतात की माझे पूर्वज; अगदी माझ्या पाच आज्यांपर्यंत सुद्धा मांस खाण्याची इच्छा झाली की, शिकारीची आयुधे घेऊन आमच्या साल्पी गावाच्या पूर्वेला आमच्या मालकीची जी पठाराची जमीन होती, तिथे जात. या

पठाराच्या आसपास अनेक लहानमोठ्या दऱ्या होत्या आणि राने होती. तिथे हरणे असत. त्यांची शिकार करून हे सारे सातपाटील तिकडेच त्याचा फन्ना उडवत. खाली पुन्हा गावात आले की ज्याचा तो नामानिराळा. भांडणे, अडवणूक, मारामाऱ्या यात कसलीही कमतरता नसे. काया आणि वाचा या अंगांनी साहजिकच मी त्यांच्यातला दिसतो. कारण मी त्यांच्यातलाच तर आहे! पण मनाने मी कदाचित थोडा वेगळा असेन. कदाचित हा शब्दप्रयोग अशासाठी की मी स्वतःला तसा मानतो. मी स्वतःला कोमल वृत्तीचा वगैरे मानतो. इतरांना ते तसे वाटत नसेल सुद्धा. त्यासाठी मी त्यांना दोष देणार नाही. कारण मी तसा दिसत नाही. या आडबंग लोकांच्या खानदानात जन्माला येऊन, आयुष्यभर यांच्यात वावरणे आपल्याला शक्य नाही, याची माझ्या नकळत हृदयाच्या आंतर्हृदयात कुठे तरी जाणीव होऊन, संधी मिळताच मी त्यांच्यातून पळालो, आणि जगण्याची उस्तरवार करता करता लेखनाच्या दुनियेत शिरलो.

2

देवनाथ हे माझे पाळण्यातले नाव नव्हे. ते देवराव. माझे पूर्वज स्वतःला जे काही आणि जसे काही समजत; त्याच्याशी सुसंगत असेच ते नाव होते. आमच्या स्वतःच्या नजरेत आम्ही कुठले ना कुठले रावच होतो ना! पण देवराव असे माझे नाव ठेवले तेव्हा कुजकेपणाने लोक म्हणाले, 'देवराव? म्हणजे, देऊबाई पोटाला आली की काय?' देऊबाई ही माझा आजा शंभुराव याची स्त्री. ती त्याची वैध पत्नी नव्हे. ती त्याच्या प्रेमाची स्त्री. तेजबाई आणि तुळसाबाई या माझ्या वैध आज्यांच्या मध्ये असलेली माझी आणखी एक आजी. तिला वैध मानले जात नसे किंवा नाहीही. ही देऊबाई आधीच वारलेली होती. शंभुरावही वारलेला होता. तरीही त्यांच्या, लोकनजरेतून अवैध असलेल्या नात्याचे भूत, माझ्या नावापाठी आले. वस्तुतः माझे ते तसे नाव ठेवताना घोडनदी-शिरूर येथील कोणातरी बामणाचे योगदान त्यात अधिक होते. त्याच्या हिशेबातून माझी जी नावरास निघाली, त्यातून त्याने हे सुचवले. आणि सगळ्यांना ते ठीक वाटले, म्हणून तसे ते ठेवले गेले. तरीही त्यात देऊबाई पोटाला आलीच. कारण ती शंभुराव सातपाटील या माझ्या आज्याची स्त्री होती. लहानपणी मला ते तितके नीट समजत नसे. आता समजते. देऊबाईच्या वंशजांचा वाडा थेट आमच्या समोरच होता. तो शंभुराव यानेच त्यांना दिलेला होता. असे सांगतात की माझा चुलता सूर्यराव उर्फ सुरुभाऊ याने कोणत्या तरी कारणाने देऊबाई हिच्यावर हात उचलला, तेव्हा माझा आजा; जो की तेव्हा म्हातारा झालेला होता, त्याने तो वाडा देऊबाई हीस दिलेला होता. ती वेगळी राहावी आणि तरीही स्वतःच्या नजरेसमोर असावी, अशी त्याची भावना असेल. त्यांचे आडनाव वेगळे होते. देऊबाई हिची मुले, नातवंडे तिथे राहात होती. ते सगळे अत्यंत देखणे लोक होते. प्रेमातून

निपजलेली संतती आपोआप देखणी होते. मी जेव्हा जेव्हा तिथे जाई, तेव्हा त्या घरातील स्त्रिया आणि तरुण मुले-मुली माझ्याशी अत्यंत प्रेमाने वागत. त्या अनेक मोठ्या बहिणी माझा मुका घेत आणि मला अतीव प्रेमाने खाऊ-पिऊ घालत. त्यांच्यात पुढे फार चांगले शरीर, बुद्धी आणि मन यांनी युक्त असे लोक निर्माण झाले. त्यांच्यातला एक तर इतका गोरा, उंच, सडपातळ आणि तगडा होता की तो ब्लॅक कॅट कमांडो झाला आणि देशाचे राष्ट्रपती यांचे जे सुरक्षापथक असते, त्याचा सदस्य झाला. त्या घरातील बहिणभावांचे प्रेम लहानपणी मला तितके कळले नाही. त्यांना कडूचे समजत असत. म्हणजे खालच्या दर्जाचे मराठे मानत असत. त्यांच्या सोयरिकाही तशाच लोकांशी होत असत. हे मला लहान वयात समजत नसे. आणि नंतर मी त्या सगळ्यापासून इतका दूर गेलो की ते सारे केवळ एखाद्या स्वप्नासारखे माझ्या मनात उरले आहे. मी स्वतःला प्रागतिक विचारांचा समजतो आणि या नात्यापासून दूर गेलेलोही आहे, या वास्तवाचा मला फार ताप होतो. माझे नाव देवराव ठेवलेले असले तरी खेड्यातील त्या काळी असलेल्या प्रथेप्रमाणे मला देव~या याच नावाने पुकारले जात असे. एक माझी आई, चिमाबाई, तेवढी मला देवराव असे तोंड भरून पुकारत असे. मी लिहायला लागलो तेव्हा माझ्या सुरुवातीच्या काही कथा देवराव सातपाटील अशा नावेच प्रसिद्ध झालेल्या आहेत. इतके भारदस्त नाव असलेला इसम असूनही मी प्रत्यक्षात फार संकोची होतो. आणि आतल्या आत अजूनही आहे. लोकांना ते तसे वाटत नाही. कारण मी संकोची न दिसता लोकांच्या अंगावर येणारा तगडा इसम, असा कायमच दिसत आलेलो आहे. लोकांना मी त्यासाठी का दोष देऊ? उलट माझ्या अशा तगड्या दिसण्याने जगताना माझे अनेक प्रश्न कायमच सुटलेले आहेत. मी दिसतो असा की, याच्या नादास लागू नये, असे कोणाच्याही मनात येते. प्रत्यक्षात कोणी तसे लागले असते तर त्याला किंवा त्यांना लगेच कळले असते की अरे! याच्यात काहीच दम नाहीय. हा फुसका आहे. तसे सहसा झाले नाही, हे माझे नशीब. एकूणात माझ्या दिसण्याच्या कवचाने मला फार सुरक्षित ठेवले आहे असा याचा अर्थ. तर पुण्यातील एका मासिकाचे संपादक यांनी माझ्या ब~याच कथा त्यांच्या नियतकालिकात उत्तम कथाचित्रे देऊन पहिल्या पानावर छापल्यानंतर ब~याच काळाने भितभितच मी त्यांना भेटायला गेलो असताना ते म्हणाले, 'तुमचे हे नाव एक लेखक म्हणून आजच्या काळात जरा विचित्र वाटते. हा लेखनाच्या प्रांतात सुद्धा बदलाचा काळ आहे. मराठेच काय; पण अठरा पगड जातींमधून आलेले लेखक लिहू लागले आहेत. ते छान आहे. तरीही तुमचे हे नाव आज एखाद्या लेखकाचे नाव वाटण्याऐवजी एखादा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष किंवा साखर कारखान्याचा अध्यक्ष याचे वाटते; जे तुम्ही नाही आहात. आणि लिहिणारे असल्याने ते होण्याची शक्यताही मला दिसत नाही. मी तुम्हाला वेगळे नाव सुचवतो. ते पटल्यास बघा. देवराव ऐवजी देवनाथ करा'. तो सत्तरीच्या दशकाचा काळ होता. मला त्यांचे म्हणणे पटले. आणि मी देवनाथ झालो. पुढे त्या नावाने मी बरेच लिहिले. काही लोकांना ते महत्त्वाचे वाटले. आज, देवनाथ सातपाटील हे नाव माहीत नसल्यास मी स्वतःला मराठी म्हणवून घेण्याचा हक्कदार नाही, असेही काही म्हणतात. पण काही माझा निदान मला वाटते तसा - अकारण द्वेष सुद्धा करतात. ते सारे कोणत्याही क्षेत्रात असते, तसे असावे असे मी मानतो. खेरीज ते आपल्या लोकांच्या जातीय डायनॅमिक्सचा भाग सुद्धा आहे, असे मी

मानतो. आणि सगळयाच लोकांनी आपल्याला नावाजावे अशी अपेक्षा सुद्धा मूर्ख आहे, असे मला वाटते. लेखक म्हणून प्रस्थापित धारणांचा प्रतिकार करणे, ही तुमची गरज होत असेल, अन् तरीही सगळयांनी आपल्याला नावाजावे असे तुम्हाला वाटत असेल तर तुमच्यातच काही खोट आहे, असे तुम्ही बेलाशक समजा. बाकी; लेखकांना त्या त्या काळात उचलणे, गटबाजी करणे अशा गोष्टी असतातच. त्या तात्पुरत्या आणि निरर्थक असतात. त्यांचा विचार आपण कशासाठी करायचा? मी तो करत नाही. आयुष्याच्या या टप्प्यावर काही मिळवणे, घडवून आणणे या गोष्टी मला मूर्ख वाटतात. विश्व फार मोठे आहे. त्या पसाऱ्यात आपण नगण्य. अगदी बिंदू इतकीही आपली व्याप्ती नाही. तर अशा या दुनियेत आपण मिळवले काय आणि गमावले काय ; कशानेच काहीही फरक पडत नाही.

सन्माननीय संपादकांनी माझ्या नावात बदल सुचविला आणि तो मी स्वीकारला, तरीही माझ्या आडनावाचे भूत उरलेच. म्हणजे भूत असे ते काहीही नाहीय. पण ते चमत्कारिक आणि वेगळे आहे. म्हणजे असे की सातपाटील हे चमत्कारिक आडनाव आहे. पाटील आपण समजू शकतो. ते तसे खानदेश या प्रदेशापासून सांगली, सातारा, कोल्हापूर, असे सारीकडे आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकण; असे सारीकडे कैक जातींचे पाटील आहेत. माहिती घेतली तर असे दिसते की या प्रत्येकाची काही एक कुळी आहे. त्यांची त्यांची आडनावे आहेत. पण ते फक्त पाटील आडनाव लावतात. सातारा जिल्ह्याच्या पाटण तालुक्यातील दिवशी या गावचे शंकर बाबूराव पाटील हे माझे आवडते शिक्षक होते. त्यांना मी विचारले तर ते म्हणाले, 'आमचे कुळीचे नाव सूर्यवंशी.' म्हणालो, 'मग ते का लावत नाही?' म्हणाले, 'पाटील आहोत, म्हणून पाटील लावतो.' एक उदाहरण म्हणून हे सांगितले. पण ते सार्वत्रिक आहे. आमच्या नगर जिल्ह्याच्या उत्तर भागात आडनावापुढे पाटील लावण्याची प्रथा आहे. जसे विखे-पाटील, थोरात पाटील, निबे-पाटील इत्यादी. आणि ते फक्त तथाकथित मराठा जातीपुरते मर्यादित आहे, असे नाहीय. माळी, धनगर, वंजारी या मराठ्यांशी समकक्ष जाती ; त्यांच्यातही ही प्रथा आहे. जसे की खेमनर-पाटील, होडगर-पाटील, जहाड-पाटील हे धनगर. तसेच सांगळे, केकाण, नागरे अशा आडनावांचे वंजारी त्यांच्या आडनावापुढे पाटील असे लावतात. आणि बोरावके, गिरमे, पुंड, ताजणे अशा आडनावांचे माळीही पाटील लावणारे आहेत. हल्ली इकडे साऱ्या जातीतले लोक लग्नांची निमंत्रणे देणाऱ्या पत्रिकेत स्वतःच्या आडनावांपुढे पा. असे जोडतात. मी एकदा खानदेशातील एरंडोल येथे काही कामानिमित्त गेलो होतो. तिथले एक शिंपी जातीतले गृहस्थ म्हणाले, 'आम्ही तुमच्या जिल्ह्यात कोपरगाव येथे एक कापडाचे दुकान काढले. प्रोप्रायटर म्हणून आमच्या आडनावापुढे पाटील जोडले. दुकान उत्तम चालते.' आणखी एक वरिष्ठ महाविद्यालयात काम करणारे गृहस्थ; आडनाव खरात, जे ज्ञातीने मांग किंवा हल्ली आपण ॲट्रोसिटी कायद्यास भित असतो म्हणून त्यांना मातंग म्हणावे, असे होते. ते म्हणाले, 'कोणी आपल्याला खरात-पाटील म्हटले की किती आनंद होतो, याची तुम्ही कल्पनाही करू शकत नाही.' तर एकूण पाटील या उपनामाचा आडनावाच्या स्थानी जाण्याचा महिमा या महाराष्ट्र देशात केवळ अगाधच आहे, असे म्हणायचे. अर्थात, हे सारे मी स्वागतार्हच मानतो. इतक्या बारक्या आणि निरुपद्रवी गोष्टीने कोणाच्या जगण्यात आनंद निर्माण होत असेल तर ती छानच आहे ना!

हे असे सारे असले तरी त्यामुळे सातपाटील या माझ्या चमत्कारिक आडनावाविषयीचे कुतूहल यातून शमले नाही. पाटील समजा ठीक. पण सातपाटील हा काय प्रकार? एक पाटील, दोन पाटील असे करता करता सातपाटील? ते का? कशासाठी?आता, सातपाटील कशासाठी, हे समजा ठीक. पण तो नंतरचा प्रश्न. ते का आहे आणि कुठून आले, हा प्रश्न माझ्या मनात अगदी लहानपणीपासून होता. त्याला काहीही उत्तर मिळत नव्हते. गावातले लोक सुद्धा म्हणत की हे सातपाटील म्हणजे लय आडबंग जात. एक पाटलाचा खानोटा आहे. त्यात हे सातपाटील कुठून आले? तो अर्थात माझ्या फार जिव्हाळ्याचा प्रश्न कधीही नव्हता. पण इतके चमत्कारिक आणि भारदस्त आडनाव आपल्या कुळीला कुठून आणि कसे मिळाले याचे कुतूहल मात्र होते. याविषयी माहितीचा अगदी प्रारंभिक सोर्स म्हणजे, माझे वडील माणकोजी सातपाटील. त्यांचे आणि माझे तितके कधीही जमले नाही. वडील घरी बसून असतात आणि आई लोकांच्या शेतात कामास जाते, असे विपरीत चित्र मी माझ्या घरात अगदी लहान असल्यापासून बघत आलो. बाकी कोणत्याही घरात असे नव्हते. वडील कमावून आणतात आणि आई घरकाम करते, क्वचित तीही आणखी खुरपणी-टुरपणी सारखी किरकोळ कामे करत वडिलांच्या मिळकतीला हातभार लावते, असे मी आसपास कष्टकरी वर्गात बघत होतो. हे उलटे चित्र मला मनातल्या मनात वडिलांचा राग आणणारे असे. तरीही आपल्या पूर्वजांविषयी माहिती घेण्यास ते अधिक लायक इसम आहेत, असे माझ्या ध्यानात आले. ते ती माहिती फार रंगतदारपणे देत. आपण उंच कुळीचे लोक आहोत, असे ते सांगत. त्यांची थोरली आई देशमुख घराण्यातली होती असे ते सांगत. मी म्हणायचो, 'मग आपण या गावचे पाटील का नाही?' ते म्हणत, 'कुळीच्या मराठ्याची कोणत्या ना कोणत्या गावी पाटीलकी असतेच.' मी म्हणे, 'आपली कोणत्या गावी आहे?' ते त्यांना सांगता येत नसे. कारण ते त्यांना माहीतच नव्हते. पण कुळीच्या बाबतीत ते हार मानणारे नव्हते. त्यांच्याजवळ उत्तर असे. सांगत, 'हे साल्पी गाव फौजी लोकांनी वसवलेले आहे. इथे लोकच उरलेले नव्हते. एक म्हातारा पाटील होता आणि तितकाच म्हातारा एक महार होता. खोपडे आणि वाघुले. बाकी सगळे पळून गेलेले होते. का? तर भिल्लांचा उपद्रव फार होता. तशात कोण राहणार? मग हे फौजी लोक आले. पाटलाला म्हणाले, आम्ही राहतो. आम्ही या गावाचे संरक्षण करतो. पाटील म्हणाला, या, राहा. त्यात आपला पूर्वज आला. तो माझा पणजा. तो मुळात कुठून आला, हे मला माहीत नाही. पण तो जिथून आला, तो तिथल्या पाटलाच्या घराण्यातलाच असला पाहिजे, यात वाद नाही. कारण आपले नातेसंबंध. माझा पणजा डोक्याने जरा सर्किट होता. त्याच्याविषयी कोणी फार सांगत नाही. पण त्याच्या हातून एक खून झाला होता, अशी बोलवा आहे. हे शेवटचे ते जरा बारीक आवाजात, नाईलाज झाल्यासारखे सांगत. त्याचे नाव जानराव होते, हेही सांगत. ही आणि अशी माहिती देताना वडील फार खूष असत. आयुष्यात कर्तबगारीचे काही जमत नसले तर अशी पूर्वजांची महती माणसाच्या जगण्याला भावनिक बळ पुरवत असते, हे माझे जरा प्रौढ झाल्यानंतरचे निरीक्षण. डिलांसाठी ते तसे असेल. आमचे असे संभाषण

चालू असताना दिवसभर कष्ट करून दमून भागून आलेली माझी आई कावून गेलेल्या स्वरात माझ्या वडिलांना म्हणे, 'बापजाद्यांच्या मोठेपणाच्या गोष्टी करितो, पण तू स्वोत्ता

काय करितो?' आईच्या अशा अभिप्रायानंतर वडील हिरमुसले होउन गप्प होत.

आमच्या देवघरात एरवी साऱ्या घरी असतात तसे बरेच टाक होते. मिशाळ पुरुष आणि नथ घातलेल्या स्त्रिया. हे असे टाक वडिलांनंतर त्यांच्या थोरल्या मुलाकडे येतात. वडील थोरले नव्हते. आई म्हणाली, 'ते आपण घडवून घेतलेले आहेत. ते घरात असावे लागतात. खंडोबा, बाणाई, म्हाळसाई आणि बाकी आपले पूर्वज. तो आपला मराठधर्म असतो.' एका देवळीवजा जागेत अधून मधून स्वच्छ धुतल्या जाणाऱ्या लाल कापडावर हे पूर्वज सतत विराजमान असत. त्यांना धुणे, स्वच्छ करणे, त्यांच्या समोर अगरबत्ती लावणे, अशी कामे वडील मनापासून करत असत. मीही अधूनमधून हौसेने ते करत असे. या देवांखेरीज एक लंगडा बाळकृष्ण होता. त्यास रंगनाथ म्हणत. आणखी एक विठोबा-रखुमाई यांची पितळी मूर्ती होती. ती फार सुंदर आणि वजनदार होती. या सगळयांना धुवून स्वच्छ करताना कुतूहल म्हणून मी ती जोडमूर्ती खालीवर करून पाहिली. तिच्या तळाशी बाळबोध लिपीत काहीतरी लिहिलेले आहे, हे माझ्या लक्षात आले. तळ आणखी स्वच्छ करून मी ते वाचले. साहेबराव आणि आरेनाबाई यांना, शिवरामबावांकडून. आपल्या मुलखाची आठवण म्हणून.

आई लोकांच्या शेतात कामाला गेलेली आहे, त्यामुळे रसविघ्न निर्माण होण्याचा प्रश्न नाही, अशी अटकळ बांधत एका दुपारी मी वडिलांना विचारले, 'साहेबराव आणि आरेनाबाई यांच्याविषयी तुम्हाला काय माहीत आहे? आणि हे शिवरामबावा कोण?'

माझ्या या अचानक प्रश्नाने वडील गोंधळले.

'आपल्या देवघरातली विठोबा- रखुमाईची मूर्ती तुम्ही नीट पाहिली आहे काय?'

'अरेवा! वाटणीच्या वेळेला मी ती मागून घेतलीय. बाकी भाऊ हंडे, तपेले मागत होते, तेव्हा मी ही मूर्ती मागितली. सगळे मनातल्या मनात हसले असतील. पण मला ती आवडली होती, म्हणून मी ती मागून घेतली होती.'

'पण तुम्ही ती नीट पाहिलेली नाही.' 'का? कशी काय?'

मी उठलो. ती मूर्ती आणून तिच्या तळाशी असलेला मजकूर वडिलांना वाचायला सांगितला.

तो वाचणे त्यांना अवघड जाण्याचे कारण नव्हते. पाचवी नापास आणि मोडी लिपी जाणणारे असे ते होते. अन् हे तर बाळबोध लिपीत होते.

'हे कोण लोक आहेत?' 'काय समजत नाही. कोणी तरी असतील. आपले पूर्वज असतील.'

'ही मूर्ती किती पिढ्यांपासून आपल्या घराण्यातल्या देवघरात आहे?'

'ते मला सांगता येत नाही. असेल, खूप जुन्या काळापासून असेल.'

त्यांना वाटले ते त्यांनी सांगितले. तितके तर अंदाजाने मलाही कळत होते. ते बोलत होते, त्याची त्यांना खात्री नव्हती. तशीच ती मलाही नव्हती. वाटले, हे याआधी कोणीच कसे वाचले नाही? माझा आजा शंभुराव हा सातवी नापास होता. त्यानेही नाही वाचले? त्यालाही नाही कुतूहल वाटले? नसेलच वाचले. त्याच्या आकलनाचे पुढे काहीच आले नाही, म्हणजे अगदी माझ्यापर्यंत हे साहेबराव, आरेनाबाई आणि शिवरामबावा; हे सगळेच काहीही न बोलता तळाशी उरलेले आहेत. हे कधीपासून आहे? साहेबराव आणि आरेनाबाई आपला मुलुख सोडून कुठे गेले होते? शिवरामबावा यांनी त्यांना मुलखाची

आठवण म्हणून भेट दिलेली ही जोड-मूर्ती आमच्या घरात कधी आणि कशी आली होती? या सगळ्याचा सातपाटलांशी काही संबंध होता का? की शंभुराव याचा सावकारीचा धंदा होता म्हणतात. त्यात वसुली करताना त्याने ती कोणाच्या तरी देवघरातून उचलली? तेही काही अशक्य कोटीतले नव्हते.

या सगळ्याचा शोध घ्यावा इतके असे काही त्यावेळी वाटले नाही. असतीलच ना, कोणीतरी असतीलच ते. होऊनच गेले असतील ते. कोणाचे तरी कोणीतरी असतीलच ते. त्यांच्या होऊन गेल्याने आपल्याला काय फरक पडतो? किंवा, इतका सुसंबद्ध विचार करावा असे तितके ते मनात घुसून राहिले नाही. अशा किती तरी गोष्टी असतात, ज्या दिसतात आणि त्यांचे आपल्याला काही कळत नाही. त्या असतात इतकेच दिसते. ते न कळल्याने आपले काहीही बिघडत नाही; असे ते होते. मी ते सारे विसरून गेलो. म्हणजे ते माझ्या मनाच्या तळाशी उरले नाही, असे नव्हे.

ते असेलच. किंवा होतेच. कारण पुढे काही एक संधी मिळताच ते झपकन वर आले. अर्थात ही बरीच पुढची गोष्ट. म्हणजे मी लेखक म्हणून प्रतिष्ठित झालो आणि लेखकांच्या एका शिष्टमंडळाचा सदस्य म्हणून आंग्लदेशी गेलो, त्या नंतरची गोष्ट.

3

मी लिहिण्याच्या नादात कधी आणि कसा पडलो? त्याचे खरे म्हणजे काहीही माझ्या डोक्यात कधीही नव्हते. मी वाचणारा होतो आणि वाचण्यात खूष होतो. तो नाद मला अगदी लहानपणापासून अतोनात होता. गावात विजेचे दिवे नव्हते. रॉकेल जाळून पेटत राहणाऱ्या चिमण्या असत. रात्री त्या क्षीण उजेडातच चिमणीच्या जास्तीत जास्त निकट राहून तिच्यातला धूर नाकात घेत वाचावे लागत असे. जास्त रॉकेल खाणारा कंदील परवडत नसे. चिमणी अधिक काळ चालू ठेवण्यावरही दबाव असे. कारण जळत्या रॉकेलचा खर्च. म्हणूनच दिवसाचा जास्तीत जास्त आणि रात्रीचा शक्य होईल तितका वेळ मी माझ्या या वाचनाच्या नादात घालवत असे. परिणामी, मी अगदी लहान वयातच एका आंतरिक स्वप्निल दुनियेत जगू लागलो होतो. माझे बाहेरचे आयुष्य वेगळे आणि आतले वेगळे. असे अनेकांचे असेल. पण मला माझे खात्रीने माहीत आहे म्हणून मी तसे म्हणतोय. वाचत असलेल्या गोष्टींची एक वेगळीच दुनिया माझ्या मनात आकार घेत वाढत चालली होती, असे मागे वळून पाहताना मला दिसते. मी ज्या दुनियेत जगत होतो ती आणि माझ्या आतली ही वाढत चाललेली दुनिया यांच्यातले अंतर सतत वाढत राहिले होते. त्यामुळे असे हळूहळू होत गेले की बाह्य दुनियेविषयी माझ्या ज्या प्रतिक्रिया असत, त्या माझ्या

आंतरिक दुनियेच्या मुशीत भिजून तयार झालेल्या असत. हळूहळू त्या प्रकट करणे मला

कठीण होत चालले होते. अशा गोष्टी एरवी लक्षात येत नाहीत. तसे प्रसंग सहसा येत नाहीत. तुम्ही तुमच्याशी असण्याने बाहेरच्या दुनियेचे काहीच बिघडत नाही. तुम्ही बाहेरच्यात शिरत नाही तोवर काहीही अडचण नसते. स्वतःच्या नकळत अपघाताने मी एकदा तसा शिरलो, तेव्हा मला ते दिसले. वाढत्या वयात मी कविता लिहू लागलो होतो. त्या वयात सगळेच कविता लिहितात, असा माझा समज आहे. त्या सुमार असतील समजा; तरीही त्या आपल्या भावना आपल्याशी प्रकट करणाऱ्या असतात. मी लिहीत असे आणि कोणालाही दाखवत नसे. एकदोनदा तसे केले तेव्हा मी त्या वेळच्या मित्रांच्या टवाळीचा विषय झालो. म्हणून मी त्याचा धसका घेतला होता. तरीही लिहिणे आपले आपल्याशी होते म्हणून त्यात काही विक्षेप येण्याचा सवाल नव्हता. कॉलेजात शिकत असताना या प्रकारच्या अनुभवांचे तात्पुरते विस्मरण होऊन मी तिथल्या एका कवी संमेलनात माझी एक कविता वाचली तेव्हा मला पुनःप्रत्ययाचा दारुण अनुभव आला. मी मोठ्या आत्मविश्वासाने व्यासपीठावर गेलो. कविता वाचायला सुरुवात केली आणि माझा आवाज फाटला. त्या फाटत्या आवाजाने मी आणखीनच घाबरून गेलो. त्यामुळे माझी दारुणावस्था आणखीनच भीषण झाली. साहजिकच उपस्थितांनी माझी हुर्यो उडवून मला पुरते नामोहरम केले. त्यानंतर पुढची अनेक वर्षे अगदी मी चांगलीच प्रतिष्ठा असलेला लेखक झाल्यावर सुद्धा मी तसाच मुखदुर्बळ राहिलो. मी बऱ्यापैकी प्रतिष्ठित झालेलो असताना पुढे एकदा असेच पुणे येथे एका पारितोषिक वितरण समारंभात अनपेक्षितपणे ते वितरण करण्याचे काम माझ्या अंगावर आले. कारण कार्यक्रमातील मुख्य लोक मुंबई येथून यायला निघाले असताना तिथे बॉम्बस्फोट झाले आणि धोकादायक परिस्थिती निर्माण झाली, म्हणून ते येऊ शकत नव्हते. त्यांनी निरोप पाठविला की ते वितरण देवनाथ सातपाटील म्हणजे मी ; यांच्या हस्ते करावे. त्याला नकार देणे मला शक्य नव्हते किंवा मला ते जमले नाही. तो कार्यक्रम पुण्यातील टिळक स्मारक मंदिर या नाट्यगृहात होता. आणि विख्यात काकासाहेब उर्फ न.वि. गाडगीळ यांचे चिरंजीव बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. ते इंग्लंडात शिकलेले विख्यात बॅरिस्टर आणि फर्ड वक्ते. स्टेजवर आम्ही दोघेच होतो. तिथे एका कवीला पारितोषिक द्यायचे होते. ते मी उत्तम हसून-सवरून दिले. नंतर भाषणाची वेळ आली. मला खरे तर खूप बोलायचे होते. माझ्या मनात खूप होते. पण बोलायला तोंड उघडले आणि शब्दाशब्दांना फाडून त्यांच्यात घुसणारी, त्यांना लपेटणारी दारुण थरथर माझ्या स्वरात प्रकट झाली. माझा स्वर थरथरत होता आणि माझे हातपाय किंवा एकूण सारे अंग सुद्धा थरथरत होते. व्यासपीठावर वक्त्यांच्या समोर एक डेस्क असते. त्यासमोर माईक. त्या डेस्कला दोन्ही हातांनी पकडून करुण किनऱ्या विव्हल आवाजात मी काहीतरी बोललो. श्रोते माझ्या आवाजातली थरथर ऐकत होते. विठ्ठलराव गाडगीळ त्यासकट माझ्या पायांची थरथर बघत होते. एकदा मी त्यांच्याकडे पाहिले तेव्हा ते सूक्ष्म स्मित करताना मला दिसले. त्यामुळे मी आणखीनच हादरून गेलो. तो सगळा अनुभव माझ्यासाठी फार भीषण होता. पुणे हे आता तितके अर्क लोकांचे शहर राहिलेले नाही. पण तेव्हा ते तसे होते. तरीही आश्चर्य म्हणजे तेव्हा माझी कोणीही टवाळी केली नाही. मनात हसले असतीलच. पण त्यांनी तसे कृतीने दाखवले नाही. किंवा मला कोणी तसे बोलून दाखवले नाही. एक

जवळचा मित्र तिथे हजर होता. तो मात्र म्हणाला, 'च्यायला! तू इतका महत्त्वाचा लेखक. आणि चार वाक्ये सुद्धा तुला आत्मविश्वासाने बोलता येत नाहीत. कमाल आहे!' त्याच्या त्या बोलण्यात आश्चर्य आणि जिव्हाळा होता. ही माझी मुखदुर्बलता पुढे बराच काळ- म्हणजे माझ्या प्रौढ वयात आणि अगदी माझ्या वयाच्या पन्नाशीपर्यंत कायम राहिली. ती होती तोवर मी जोमाने लिहीत राहिलो. पण हळूहळू मला या दुर्बलतेवर मात करणे भाग पडले. कारण लोक मला सतत इथे-तिथे बोलावू लागले. आणि सारखे दुर्बल कसे राहणार? खेरीज मिळणारी प्रतिष्ठा माझा आत्मविश्वास वाढवत राहिली. म्हणून मी माझी आतली थरथर माझ्यापुरती खासगी ठेवण्यात हळूहळू यशस्वी होऊ लागलो. नंतर नंतर मी इतका निर्वावलो की ही थरथर सुद्धा निघून गेली आणि मी फोलकटासारखे शब्द फेकण्यात माहीर झालो. तसे होताना माझ्या लेखणीची धार साहजिकच नरम होत फुळकट होत गेली, हे इतरांना कदाचित जाणवले नसेल. पण मला ते जाणवत गेले. हे असे असतेच. तुमची एकाकी रानटी थरथर थांबवून दुनिया तुम्हाला फुळकट करण्यासाठी टपलेलीच असते. आणि तिला शरण जावून दावणीशी निमूट उभ्या राहणाऱ्या बैलासारखे तुम्ही मठ्ठ होता, तेव्हा दुनियेचे प्रश्न संपतात. मी उत्तरोत्तर असाच बैल होत गेलो. शहाणा होत गेलो. आणि आतल्या आत ती थरथर जागविण्याचा प्रयत्न करत लिहीत राहिलो, असे मला वाटते. आज विचार करताना वाटते की ती माझी थरथर ही माझी सगळ्यात मोठी संपत्ती होती. माझ्या आतली दुनिया आणि बाहेरची दुनिया यांच्यातील संघर्षाचे प्रश्न उभे राहिले की प्रतिकाराचे ते माझे सगळ्यात मोठे बलस्थान होते. आजही मी ते पुरते गमावले आहे असे मला वाटत नाहीय. किंवा ते गमावलेले नाहीय असे स्वतः ला बजावण्यासाठी मी लिहीत राहिलो असेन. पण एक निश्चित परिणाम म्हणून मी आतल्या आत ठप्प होत गेलोय आणि बाहेरच्या दुनियेविषयी माझी आस्था क्षीण होत चाललीय असे मला दिसतेय. हा कदाचित वयाचा परिणाम सुद्धा असेल. असो.

तरीही मी या लिहिण्या-बिहिण्याच्या भानगडीत का आणि कसा पडलो, हे उरतेच. लिहिण्याचे वेगळे असे इंद्रिय माझ्यात काहीतरी असेलच. ते सहसा सगळ्यांच्या ठायी असते असे मी मानतो. पण ते सुप्त इंद्रिय जागे होण्यासाठीचा फलयुक्त अपघात प्रत्येकाच्या आयुष्यात होतोच असे नव्हे. मी लिहीत असलेल्या कवितांच्या सादरीकरणाच्या भीषण अनुभवांनी नामोहरम न होता मी त्या लिहीत राहिलो. कारण ती माझी आंतरिक गरज असेल असे मला वाटते. कुठेच संवाद नाही असे माणसाचे नसते. कुठेही तो करता येणे मला शक्य नव्हते. कारण त्यासंबंधीचे दारुण अनुभव. पण मी तो स्वतःशी तर नक्कीच करू शकत होतो. म्हणूनच कविता लिहिणे हा माझ्या आंतरिक जगण्याचा भाग झालेला होता. त्या कोणालाही दाखवायच्या नाहीत हे मी माझ्यापुरते ठरवून घेतल्याने कोणत्याही नामुष्कीचा कोणताही सवाल नव्हता. नंतर मी कथा लिहायला लागलो. ते कदाचित मी जे वाचत होतो, त्या लेखनात अनुभवाला येणारे वास्तव, मला दिसणाऱ्या वास्तवापेक्षा वेगळे होते म्हणून. मी बघत असलेली दुनिया, मी जे वाचत होतो; त्यात मला दिसत नव्हती. लिहीत असलेल्या कविता आणि कथा मी हळूहळू निरनिराळ्या प्रतिष्ठित नियतकालिकांना पाठवू लागलो. पाठवण्यात अडचण नव्हती. कोणाच्या समोर जाऊन बोलणे एवढीच माझी अडचण होती. माझ्या सगळ्या कथा आणि कविता बिनचूक परत

येत. मला माझे लेखन प्रतिष्ठित ठिकाणी छापले जावे असे वाटत असे. कारण तेव्हा प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या त्या जागा होत्या. पण तसे होत नव्हते. लिहिलेले असे परत आले की माझे हृदय तळमळे. पण ते सारे खासगी असल्याने मी ते सहन करू शकत होतो. माझ्या मित्रांमध्ये बुद्धिमान आणि असाधारण वाचणारा म्हणून मला मान्यता होती. मी लिहितो, हे त्यांना माहीत नव्हते. मी लिहावे असे ते म्हणत. अशात देशात आतापर्यंत पहिलीच आणि एकमेव आणीबाणी घोषित झाली. तिच्याशी माझा काहीही संबंध नव्हता. तिचा प्रतिकार करणारा मी नव्हतो. मी एक नगण्य माणूस होतो. आणि मला कसल्याही भावनिक झळा बसत नव्हत्या, बसल्या नव्हत्या. पण तरीही तिच्याविषयी माझी काही मते होतीच. राजकीय स्वातंत्र्याचा संकोच झाल्याचे मला कळत नव्हते. पोलिसांचे अधिकार असाधारण वाढले आहेत, असे मला दिसत नव्हते. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य संकोच पावले आहे, हे मला कळत नव्हते. कारण तशा स्वातंत्र्याचा माझ्यापुरता संकोच मी आधीच केलेला होता. माझे अगदी जवळचे काही मित्र त्या घटनेने व्यथित होते. ते त्यांच्या परीने काय काय करत होते. मी तसे काही करत होतो असे मला म्हणता येणार नाही.

अशात एके दिवशी मला फोन आला. त्या काळी फोन सगळीकडे उपलब्ध नव्हते. मान्यवर संस्था आणि प्रतिष्ठित लोक यांच्याकडे तो असे. मी ज्या संस्थेत काम करत होतो, तिच्याच परिसरात राहात होतो. एकदा रात्री नऊ वाजता आमच्या संस्थेच्या कार्यालयातील गुरखा माझ्याकडे आला आणि म्हणाला, 'आपका पोन आया है.' मी अर्थातच चकित झालो. मला कोण फोन करणार? तितका महत्त्वाचा मी कधीही नव्हतो. गुरख्याला मी म्हणालो, 'कोणाला फोन आलाय? तुला माझे नाव माहित आहे काय?' तो निर्विकारपणे म्हणाला, 'ऐसा क्या बोलते शातपाटील शाब? आपको ही पोन आया है.' त्याकाळी माझा एक आवडता मावस भाऊ उमाजी खोपडे-पाटील फौजेत होता. माझे वडील माणकोजी सातपाटील तब्येतीने थकलेले होते. वाटले, या दोघांपैकी कोणी खपले की काय? म्हणून मी तातडीने संस्थेच्या कार्यालयात गेलो आणि फोन घेतला. मी हॅलो केले तर पलीकडून फक्त हमिंग साऊंड होता. मी हॅलो, हॅलो करत राहिलो. एका क्षणी पलीकडून कोणी तरी म्हणाले, 'तुमच्यावर लक्ष आहे.' आणि पुन्हा आधीचा हमिंग साऊंड. मला फोन वापरता येत नव्हता. त्याचे काहीही मला नीट कळत नव्हते. कोण बोलले, का बोलले; काहीच कळेना. आपण कोण बोलता, काय आहे? असे मी तोंडातल्या तोंडात बोललो. पण त्यात जीव नव्हता. आणि त्याला प्रतिसादही मिळाला नव्हता. हे तितक्यावर थांबले नाही. आणखी दोन दिवसांनी असाच रात्री नऊच्या सुमाराला गुरखा आला आणि म्हणाला, 'पोन आया. बुलाता है.' गेलो. तेच सारे तसेच पुन्हा. आणि हे असे पुन्हा पुन्हा घडत राहिले. कपाळात पुन्हा पुन्हा ठोकल्या जात असलेल्या खिळ्याप्रमाणे तेच ते प्रत्येक वेळी. मी त्या खिळ्याने प्रत्येक वेळी नव्याने जखमी होत होतो. कोण फोन करतोय, का करतोय; कळेना. संस्थेतली माझी कामे मी करत होतो आणि माझा बाकी कशाशीही संबंध नव्हता. कोण माझ्यावर लक्ष ठेवत होता आणि का? आणि तो मला पुन्हा पुन्हा का सांगत होता? मला समोर न दिसणारा असा तो कोण होता? मी गोंधळून जात होतो आणि आतल्या आत भ्यायला लागलो होतो. मित्र काही होते. पण त्यांना हे काय सांगणार? माझे खासगी कोणाला काही सांगण्याइतके तसे जवळचे कोणीही नव्हते. गुरखा यायचा आणि

सांगायचा, पोन आया है. गेलो की तेच सारे तसेच. कधी कधी वाटे, कोणीतरी आपली थट्टा करतोय. पण इतकी जीवघेणी गंभीर थट्टा कोण कशासाठी करेल? तितका माझा कोणाशीही संबंध नव्हता. मी तर पुरता फक्त माझ्या आत असलेला माणूस. मग मी जवळच्या सगळ्यांना हळूहळू त्या उजेडात बघायला लागलो. कुठेच काही दिसेना. माझ्या संस्थेचे प्रमुख, बाकी मला मित्र वाटणारे लोक. त्यांच्या नजरात मी फोन करणारा शोधू लागलो. संशयाच्या जंजाळात अडकून स्वतःला जाळत राहिलो. वाटे, फोन करणाऱ्याला आणखी कोणाला हे सांगायचे आहे आणि चुकून तो मलाच ते सांगतो आहे. पण फोन तर मलाच येत होता. त्याचे मी कोणाशीही बोलू शकत नव्हतो. गुरखाही हळूहळू वेगळ्याच प्रकारे माझ्याकडे बघू लागला आहे, असे मला वाटू लागले. एकदा म्हणाला, 'कौन पोन करता है? रातको ही बोलता है. अच्चा नयी शाब. अपनी बिबी-बच्चे ही सिर्फ अपने. किसी औरकी चक्करमे मत आना.' त्याला, असे काहीही नाहीय, हेही मला सांगता येईना. फोनवर जो एकतर्फी संदेश येतो; तोही मला त्याला सांगता येईना. या फोनची फ्रिक्वेन्सी नियमित नव्हती. वेळाही हळूहळू बदलत गेल्या. म्हणजे रात्री अकरा बारा वाजता सुद्धा गुरखा येऊ लागला. डोक्यात खिळा ठोकण्यासाठी तो कायम असे. त्याची बिच्याऱ्याची त्यात काय चूक ? फोन येई म्हणून तो येई. काही तरी चुकीचे होत होते आणि प्रत्येक वेळी नवा खिळा माझ्या डोक्यात ठोकला जात होता. ते कोण ठोकत होते ते मला दिसत नव्हते. माझ्यासारख्या नगण्य माणसाला हा कोण कशासाठी सांगत होता की, तुमच्यावर लक्ष आहे. आणीबाणी होती. पण तिच्याशी माझा संबंध काहीही नव्हता. मी अनेक प्रकारे ओळखीच्या लोकांशी बोलणे तिथवर आणून चाचपणी घेत असे. असे की बुवा, माझा एक मित्र आहे अन् त्याला असा असा फोन येतो, तर त्याचा अर्थ काय समजायचा? हे सगळ्यात शेवटचे. त्यावर, काळ बेकार आहे. पोलीस कधीही कोणालाही उचलू शकतात; याच्यापासून, ते तुझ्या अमुकतमुक मित्राने काहीतरी उद्योग केलेला असणार. तो तुला माहीत नसेल. किंवा आपण आपले काम करत राहावे, आपण या व्यवस्थेत नगण्य. आपण असल्या गोष्टींचा का विचार करावा; अशा प्रतिक्रिया होत. अखेर झाले असे की, मी मला काय वाटते ते माझ्यासाठी लिहीत राहिलो. तेवढी एकच गोष्ट माझ्या हाती होती, जी मी मुक्त निर्विघ्नपणे करू शकत होतो. मी ती करत राहिलो. त्यात मला कोण कशासाठी अडविणार? प्रत्येक वेळी तुमच्यावर लक्ष आहे, हे ऐकून माझे जे होई त्यातून उद्भवणाऱ्या माझ्या मनाच्या स्पंदनांचे सारे त्या लेखनात असे. आणीबाणी उठेस्तोवर असे माझे बरेच लेखन झाले. गुरख्याचे माझ्यावर तसे उपकारच झाले. मुख्य म्हणजे त्याने आमच्या संस्थाप्रमुखांना वा इतराना मला असे रात्री-अपरात्री फोन येतात, असे सांगितले नाही. खेरीज माझी काहीही कोणाही स्त्रीशी लफडी नसावीत, पण मी कोणी तरी गुप्तकार्य करणाऱ्या कोणत्या तरी संघटनेशी संबंधित आहे, असा त्याचा समज झाला. अशा कामात आपण सहकार्य केलेच पाहिजे असे त्याला स्वयंप्रज्ञेने वाटू लागले. एकदा तो म्हणाला, 'हमे मालूम है. आप मरहट्टा. आप छेत्री. हम गोरखा. छेत्री. कुकरी अगर बाहर निकाला तो दुश्मन का खून पिये बिना वो म्यान नही होती. वैसाच आप मरहट्टा. हम समजता. लडाकू जात. छेत्री. हम आपका साथ है. आप हम एकही जात.' मी आणीबाणीच्या प्रतिकाराच्या कोणत्या तरी संघटनेशी संबंधित आहे, असे त्याने स्वयंप्रज्ञेने ठरवले होते. त्यासंबंधी गुप्तता

पाळली पाहिजे, हेही त्याने त्याच भावनेने निश्चित केले होते. ते तसे नाहीय, हे त्याला सांगण्याच्या भानगडीत मी पडलो नाही. लिहीत मात्र राहिलो. माझ्या लिहिण्याचा देशातल्या आणीबाणीशी कितपत संबंध होता? माझ्यापुरते खरे सांगायचे तर अजिबातही नव्हता. मी त्या, तुमच्यावर लक्ष आहे, अशा भयानक संदेशांनी व्याकुळ होत आतल्या आत चिणत जात होतो आणि त्यासंबंधी व त्या अनुषंगाने लिहीत होतो.

आणीबाणी उठल्यावर काही काळाने मी ते लेखन पुण्यातल्या एका प्रतिष्ठित नियतकालिकाकडे पाठविले, हा केवळ योगायोग होता. अर्थात त्याच सुमाराला ते फोन येणे थांबले, हाही एक अतळ योगायोग होता. त्याचे मला कधीही काहीही कळले नाही. जे थांबले ते संपले. पण माझे लिहिलेले उरले होते. ते मी त्या नियतकालिकाकडे पाठविले. ते परत येईल याची मला खात्री होती. कारण पूर्वानुभव. प्रकाश मिळण्यासाठी दिलेले परत येणे आणि त्याच्या वेदनेत आतल्या आत तडफडणे ही माझी गती कायम होती. तरीही ती नामुष्की जिरवत लिहिलेले इथे तिथे पाठविण्याचा खासगी रिवाज मी कायम ठेवलेला होता. मी लिहिण्याचे कोणाशीही बोलत नव्हतो. छापले न जाण्याच्या नामुष्कीच्या थपडा खात जगत होतो. पण यावेळी अतयं ते घडले. ज्या नियतकालिकाला मी ते लेखन पाठवले त्याच्या संपादकाचे पत्र आले.

"आपले लेखन अव्वल प्रतीचे आहे. आणीबाणीच्या काळात संवेदनाक्षम मनांची जी असाधारण कोंडी झाली होती, तिचे प्रातिभ दर्शन यात आहे. पुण्याकडे फेरी झाल्यास आमच्या कार्यालयास अवश्य भेट द्यावी. म्हणजे तपशिलाने बोलता येईल.आपणाशी प्रत्यक्ष परिचयाची संधीही

मिळेल."

त्या दिवशी मी जितका खूष झालो तितका पुढच्या आयुष्यात कधीही झाल्याचे मला आठवत नाही. पुढे लेखकांना मिळायला हवेत असे वाटणारे बहुतेक सारे सन्मान माझ्या वाट्याला आले. थोडा फार आनंद त्या प्रत्येक वेळी झालाच असेल. मुळात असा आनंद आपला आपल्याशी ठेवणे ही माझी रीत. या सर्वोच्च आनंदाच्या क्षणी सुद्धा मी तेच केले. पण आतल्या आत उसळणारे तसे जल्लोष मी पुन्हा अनुभवलेले नाहीत. मी पुन्हा पुन्हा ते पत्र वाचत राहिलो. आपले लेखन इतक्या प्रतिष्ठित ठिकाणी छापले जाणार याची हवा मनभर मनःपूत होती. पण ती मी माझ्याशी ठेवली. कोणाशीही त्याबद्दल बोललो नाही. मनात उसळणाऱ्या लाटांचे हळूहळू पठार झाल्यावर मी ते पत्र अधिक स्वस्थ होऊन वाचू लागलो. पुण्याकडे फेरी झाल्यास आमच्या कार्यालयास अवश्य भेट द्यावी. म्हणजे तपशिलाने बोलता येईल. आपणाशी प्रत्यक्ष परिचयाची संधीही मिळेल. हा जो मजकूर त्या पत्रात होता, त्यातील अपेक्षा मला अस्वस्थ करू लागली. इतक्या प्रतिष्ठित नियतकालिकाच्या संपादकाने भेटीस पाचारण करणे कोणालाही आनंदाच्या डोहात तरंगायला लावेल असे होते. पण मी स्वतःला चांगलाच ओळखत होतो. भेटीस जाणे आणि तिथे माझे ततपप करणे, यातून माझ्याविषयी संपादक मजकुरांचा भ्रमनिरास होईल. छापायला स्वीकारलेले माझे लेखन ते कदाचित नाकारतील सुद्धा. दोन वाक्ये ज्याला धड बोलता येत नाहीत, तो कसला लेखक? हे आणखी कोणाचे तरी मी माझ्या नावावर खपवतो आहे, असा संशय सुद्धा येईल त्यांना. ही परिचयाची संधी आपल्याला नको. मी

त्यांना लिहिले.

आपणास माझे लेखन छापण्यायोग्य वाटले, ही माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. मी सध्या जिथे जे काम करतो, त्याचे स्वरूप पाहता नजिकच्या काळात मला पुण्याला येता येईल असे वाटत नाही. तशी संधी मिळताच आपणास कळवून मी अवश्य येईन..

या लेखनाचे पुस्तक त्या मंडळींनी छापले. जाणकारांनी त्याची दखल उत्तम घेतली. माझे आधी साभार परत आलेले सारे लेखन इथे तिथे छापून आले, येत राहिले. मी नव्या जोमाने लिहायला लागलो. देशातली आणीबाणी उठली असली तरी माझ्या मनात माझी आणीबाणी कायमच होती. तीच माझे भांडवल. आत आणि बाहेरच्या ताणातून प्रकट होणारे मी लिहीत राहिलो. ते छापले जाऊ लागले आणि वाचलेही जाऊ लागले. तरीही नंतर सुमारे दहा वर्षे मी साहित्याच्या दुनियेतल्या लोकांना भेटायचे टाळत राहिलो. कारण माझी मुखदुर्बळता संपलेली नव्हती आणि संपत नव्हती. लोक याचा वेगळा अर्थ काढू लागले. फारच वेगळा लेखक आहे. कुठेही जात नाही. कोणाला भेटत नाही इत्यादी. किंवा, ते सतत त्यांच्या तंद्रीत असतात. ते कोणाशीही बोलत नाहीत, फार उद्दाम आहेत, कोणाला नमस्कार सुद्धा करत नाहीत. या लोकांचे असे असतेच.

अशा सगळ्या भुमका मला केंद्राशी घेऊन तयार होत असताना मी माझ्या मुखदुर्बळतेच्या अस्वस्थ कोषात होतो, हे कसे सांगणार कोणाला? कदाचित काही गूढ गारुड घेऊन मी जन्माला आलेलो असेन. मी नशीब मानत नाही. पण मी लिहायला लागलो तेव्हा मला आवडणारे माझ्या काळातले कित्येक चांगले लिहिणारे कायमचे अस्तंगत झाले. काही नगण्य लिहीत राहिले. काही कोणासाठी तरी घोस्ट रायटर झाले. हे असे होतच असते. आपल्या काळाचा स्वर सांगणे ही आपली जबाबदारी आहे असे आपल्याला कधी कळेल याचे गणित नाही. मला ते थोडे कळले असे मला वाटते. किंवा माझ्या काळाने माझी निवड केली असेही. कारण ; असे बघा, काही गोष्टी अगदी तोपल्याडच्या असतात. अत्यंत धकाधकीचा प्रवास करत, कोमल मोहक योनीसलीलाच्या कराल दाढेतून वाचत कैक शुक्राणू स्त्रीबीजाच्या भिंतीशी धडकतात, तेव्हा त्यांच्यातल्या कोणातरी एकालाच स्त्रीबीज आत घेते आणि दरवाजा बंद करून घेते. पण म्हणून तो शुक्राणू सर्वात शक्तिशाली असतोच असे नव्हे. अंतिम निवड हा एका अतयं योगायोगाचा भाग असतो. हे असे सारीकडेच असते. आपल्या काळाचा स्वर सांगण्यासाठी भाषिक समाज लेखकाला निवडतो. म्हणून तो सगळ्यात श्रेष्ठ असतो, असे नव्हे. आणि ती त्याची नियती असते किंवा ते त्याचे नशीब असते असेही नव्हे. ती एका अतयं हलत्या संख्याशास्त्रीय डायनॅमिक्सची निष्पत्ती असते, फार तर. साभार परतीचा अनुभव आपल्याला नाही, असे अनेक प्रसिद्ध लोक सांगतात. ते सहसा खोटे बोलतात, असे मी म्हणेन. हे म्हणजे, आमच्या घरातील वातावरण इतके शुद्ध आणि चांगले होते की जातीपातीचे आम्हाला फार उशिरा लक्षात आले, असे म्हणण्यासारखे आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत या हिंदवी समाजात जात आपल्याला सोडत नाही. आपण सोडण्याचा प्रयत्न केला तरी लोक आपल्याला ती सोडू देत नाहीत. ती जाणीव ते आपल्याला मस्तकात खिळा ठोकल्यासारखी प्रत्यही करून देतात. ही दावण तुमची आहे, तिथे तुम्ही उभे राहा, असे ते आपल्याला सांगतात. आपणही थकून जाऊन त्या दावणीला उभे राहतो. हे आपल्या

लोकांसाठी उभारलेले असाधारण विणकाम आहे. या विणकामाला तोडण्याचे प्रयत्न कायम झालेले आहेत, हा आपल्यासाठी फार आधाराचा मुद्दा आहे. जातीचे आणि भाषेचे सुद्धा इतके सगळे वेगळे आहे की आपण त्या गोंधळात कायम एका मूर्ख ओझ्याखाली असतो. ते आता तितके उरलेले नाही असे मी मानतो. तरी ते अजूनही आहे, असे मला दिसते आणि त्याचा मला ताप होतो. एकदा अशाच एका परिसंवादात माझ्यासोबत माझ्या आधीच्या पिढीतले ज्येष्ठ मानले गेलेले एक लेखक होते. ते सामान्य जातीत जन्माला आलेले होते, हा काही त्यांचा दोष नव्हता. पण, भाषिक आणि सांस्कृतिक शुचितेचे सारे लगाम आपल्या हाती आहेत असे कळत-नकळत वाटणाऱ्या काळात त्यांनी अनेक तडजोडी करून साहित्याच्या दुनियेत अत्यंत नम्रपणे स्वतःची जागा करवून घेतलेली होती. प्रकाशक महाशयांना सोयीचे वाटावे यासाठी त्यांनी आपले लेखन पाच-पाच, सहा-सहा वेळा पुन्हा-पुन्हा लिहिले होते. त्याबाबत मी त्यांना दोष देणार नाही. त्या काळात परिस्थितीच अशी होती की त्याखेरीज त्यांचे लेखन प्रसिद्ध होऊच शकले नसते. पण मग हळूहळू नकळत त्या धारणांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला असेल. तर बोलताना ते म्हणाले, 'आपण लेखक होणार हे मला माझ्या शाळेच्या आठव्या इयत्तेत लक्षात आले होते. म्हणूनच मी तेव्हा संस्कृत हा विषय माझ्यासाठी निवडला होता. कारण त्या भाषेत सुंदर सुंदर शब्द असतात.' हे त्यांचे म्हणणे मूर्ख होते. तरीही त्यांना अडविणे मी टाळले. म्हणालो, इतक्या लहान वयात यांना हे कळले हे मला आश्चर्यकारक वाटते. तसे सहसा कळत नाही, असे मी मानतो. लेखणीची गूढ विद्या आपल्यापाशी आहे, हे केवळ अपघातानेच आपल्याला कळते, असे मला दिसते. निदान माझे तरी तसे झालेले आहे. मी फिजिक्स, गणित आणि संख्याशास्त्र यांचा औपचारिक अभ्यास केला. तरीही लिहिणे हा माझ्या जगण्याचा एकमेव सर्वोत्तम आविष्कार उरला असे मला दिसते. आणि संस्कृत भाषेत सुंदर शब्द असतात तर ते मराठीत नसतात काय? माझा म-हाटीचा बोलू कवतिके, अमृताशी पैजा जिंके असे सांगणारा ज्ञानेश्वर नावाचा कवी मराठीत होऊन गेलेला आहे, हे यांना माहित नाही काय? आपली भाषा ही रोकठोक, थेट जगणाऱ्या लोकांची भाषा आहे, याचा मला फार अभिमान वाटतो. या भाषेत खोटी नम्रता नाही, हे फार श्रेष्ठ आणि सुंदर आहे, ते आपल्या मराठीपणाचे द्योतक आहे, इत्यादी.

यापेक्षा अधिक काही सांगणे ही आत्मस्तुती होईल. तिची गरजही नाहीय. मी या भाषेतला एक महत्त्वाचा लेखक आहे, असे मी नक्की म्हणेन. माझ्या काळाचा स्वर व्यक्त करण्यासाठी ज्या काहीना या भाषेने, ती बोलणाऱ्या लोकांनी निवडले, त्यांच्यातील मी एक आहे. अग्रभागीचा सुद्धा आहे. माझ्या लेखणीवर प्रेम करणारे जसे खूप आहेत तसेच एक व्यक्ती म्हणून द्वेष करणारे सुद्धा आहेतच. ते असतेच. ते कोणालाही टाळता येत नाही.

4

भारतीय लेखकांच्या एका शिष्टमंडळाचा सदस्य म्हणून मी दहा वर्षांच्या आधी ब्रिटन देशी गेलो होतो. ब्रिटन हे इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स, उत्तर आयर्लंड अशा देशांचे युनायटेड किंग्डम आहे. आपण त्या साऱ्याला मिळून पुष्कळ वेळा केवळ इंग्लंड असेच म्हणतो. ते एकीकडे इंग्रज लोकांच्या तेथील -आणि एके काळच्या एकूण जगातील- प्रभुत्वाचे दर्शक आहे. पण स्कॉट, वेल्श आणि आयरिश या लोकांच्या स्वतःच्या वेगवेगळ्या भाषा आहेत, त्यांची त्यांची वेगळी पृथक् संस्कृती आहे, हे आपल्याला सहसा माहीत नसते. तिथे इंग्रजांनी सगळ्यांना दाबले आहे. आणि अमेरिकेतही इंग्रजी भाषीक लोकांनी इतरांना दाबून इंग्रजीस केंद्रस्थानी आणलेले आहे. अर्थात आता हे अमेरिकन इंग्रजी इंग्रजांच्या इंग्रजीला दाबून टाकण्याइतके प्रमाथी झाले आहे, हा भाग वेगळा. तर तिथे इंग्लंडात ऑक्सफोर्ड या ठिकाणच्या प्रसिद्ध विद्यापीठात आम्हा भारतीय लेखकांचा तेथील निवडक काही लोकांशी संवादाचा कार्यक्रम होता. आपण भारतीय लोक एके काळी त्यांची वसाहत होतो, हे वास्तव अध्याहृतपणे त्या लोकांच्या मनात असते. ते सुसंस्कृत, सर्व मानवी प्रजाती इथून-तिथून एक, असा देखावा कितीही उत्तम करीत असले तरी, त्यांच्या मनाच्या गाभ्याशी हे सत्य कायम असते. त्याला त्यांचा आणि आपलाही इलाज नसतो. म्हणून आपण जास्तीत जास्त उत्तम इंग्रजी बोलण्याचा प्रयत्न त्यांच्या समोर करत असतो आणि ते, आपल्याला जे समजायचे ते समजत असतातच. हे सगळे शब्दात व्यक्त होत नाही.ते तसे असते खास. तर तिथला एकूण कार्यक्रम या प्रकारे सुसंस्कृत असाच झाला. तो संपताना म्हणा किंवा संपल्यावर तिथला रिचर्ड लेसिंग नावाचा एक इसम माझ्याजवळ आला. म्हणाला,

“I am extremely impressed by the views you expressed about literature, culture and ethnicity. But, there is something more on a personal level and specific about you, that has almost compelled me to speak with you.'

'What is that? I don't understand.' 'It's your surname, Saatpatil.' "What about it?'

Well, it has been mentioned by somebody in my lineage.

‘Excuse me? What are you saying? Are you joking or what? It is almost next to impossible. As I can gather, I haven't found my surname beyond my native place in my own country. I have come from Maharashtra state in India. Saatpatils absolutely have no place in any literature, even in my own language, Marathi. I am, probably the first Saatpatil, who is connected to words; written words, I mean.

'I am connected to that name, I must say.'

"Well, I am really stunned here; as you can see. I mean – who are you? What do you do?

*I am British, obviously, an anthropologist by training and practice. My name is Richard Lessing.'

'How are you connected to Saatpatils; if I may ask?'

'I can give you the detailed explanation on one condition.'

*And what is it?' “You'll have to visit my place a kind of invitation, you may say.'

'I will be grateful. I'm very anxiously and eagerly looking forward to have it happen.'

'Well, my place is not far from here. I stay at Headington. It is a suburb of Oxford. It is at the top of Headington Hill overlooking the city in the Thames Valley below.'

मिळालेली पहिली संधी घेऊन मी रिचर्ड लेसिंग याच्या हेडिंग्टन येथील घरी गेलो. त्याच्या आधी त्याच्याविषयी माहिती घेतली. गुगलचे सर्च इंजिन त्यासाठी उपयुक्त असतेच. खेरीज आणखी काही लोकांशी बोललो. रिचर्ड हा आजच्या काळातला महत्त्वाचा ब्रिटीश मानववंशशास्त्रज्ञ होता. तो ऑक्सफर्ड विद्यापिठाच्या त्याच विषयाच्या विभागात प्रोफेसर म्हणून काम करत होता. माझ्यापेक्षा वयाने जरा मोठा असावा. त्याचे घर फार भव्य वगैरे नव्हते. आपल्याकडे हल्ली कॉलेजातील प्राध्यापकांना त्यांच्यातील अधिकांश जणांची बौद्धिक क्षमता आणि काम यांच्या हिशेबाने फारच जास्त पगार मिळतो. त्यांची घरे सर्व सोयींनी युक्त आणि भव्य असतात. पुस्तके वगैरे रद्दी गोष्टींना त्यांच्या घरात सहसा जागा नसते. रिचर्ड याच्या घरात त्याने जमविलेल्या पुस्तकांना सगळ्यात जास्त जागा होती. मी तिथे गेल्यावर त्याने त्याची पत्नी आणि मुलगी यांचेशी माझी ओळख करून दिली. ते फक्त एक सुसंस्कृत सोपस्काराचा भाग म्हणून. कारण नंतर त्या दोघी पुन्हा मला जेवणाच्या टेबलाशी सुद्धा दिसल्या नाहीत. त्या आणखी कुठे तरी गेल्या असाव्यात. त्यांची त्यांची त्या दिवसाची कामे आणि उपक्रम असतील. हे युरोपी लोक दुनियेपासून आणि एकमेकांपासून सुद्धा ; फार तुटलेले आहेत, असे माझे खासगी मत आहे. आपण भारतीय लोक ; आपल्याला दुनियेविषयी कुतूहल फार. ती आपली जुनी खोड आहे. अगदी आपला छत्रपती शिवाजी राजा दिल्ली किंवा आग्रा येथे औरंगजेब याच्या कैदेत असताना त्याची निकोलाय मनुची नामक इटालियन गृहस्थाशी भेट झाली होती, तेव्हा त्याने युरोपातील राजे, त्यांचे व्यवहार, राज्यपद्धती यांचेविषयी माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता, असे मनुची याने त्याच्या 'असे होते मोगल' नामक ग्रंथात नमूद करून ठेवले आहे. किंवा आजही आपण अगदी एखाद्या बसमध्ये शेजारी बसलेल्या अनोळखी माणसास कोण, कुठले, काय असे सांगत विचारत आपले गाव, धंदा, जात यांची माहिती देत-घेत निर्मळ, निर्हेतुक संभाषण सुरू करतो. हे युरोपी- विशेषतः ब्रिटीश लोक या बाबत आपल्या अगदी विरोधी टोकावर आहेत. स्वतःचे खासगीपण जपण्यावर त्यांचा ठाम कटाक्ष असतो. असो.

त्या दिवशी रिचर्ड याच्याशी त्याच्या घरी माझ्या त्याच्याशी ज्या काही गप्पा झाल्या, त्या मात्र बहारदार आणि कधीही न विसरता येण्याजोग्या होत्या. त्याच्या सातपाटील कनेक्शन संबंधी अर्थातच मला कुतूहल होते, फार फार कुतूहल होते. इकडे इतक्या लांब, सातासमुद्रापल्याड हे असे काही सापडावे किंवा दिसावे, हे विलक्षण होते. तो म्हणाला, “एक भीमबाई म्हणून त्याची एक खापर-खापर पणजी होती. ती भारतीय अन् महाटाच होती. ती सातारा शहराजवळच्या करंजे गावची होती. रिचर्ड याचा खापर-खापर पणजा स्टुअर्ट लेसिंग म्हणून होता. ती दोघे एकमेकांच्या प्रेमात पडली आणि ही भीमबाई त्याच्यासोबत पळून आली. पुढे अहमदनगर येथे पॉटिंजर नामे कलेक्टर असताना हा लेसिंग तिथे पोलीस अधिकारी होता. तिथे ते राहात असताना अगदी अनपेक्षितपणे तिची भेट तिच्या जानराव नामक एका भाच्याशी झाली होती.'

'भाच्याचे नाव काय म्हणालास?' 'जानराव. तिच्या आत्मवृत्तात ते लिहिलेले आहे.' 'आत्मवृत्त?'

'होय. तिने ते लिहिलेले आहे. ते अगदी छोटेखानी आहे. खासगी वितरणासाठी आम्ही ते छापून सुद्धा घेतलेले आहे. त्याची प्रत मी तुला देतो.'

"फारच विलक्षण. हा जानराव कोणत्या गावाचा होता? काही उल्लेख?'

'असेल. म्हणजे आहेच. पण ते माझ्या ध्यानात नाहीय.'

'ठीक, ठीक. पण जानराव हे माझ्या खापरपणज्याचे नाव आहे, हे मी तुला सांगून ठेवतो.'

'काय सांगतोस काय! तसे असेल तर आपण एकमेकांचे कझिन्स झालो.'

"अरे, मुळात आमच्या सातपाटील लोकांचा माझ्या गावाखेरीज माझ्या देशातच मला कुठेही ठाव लागलेला नाहीय. आणि हे इथे असे काही सापडावे, हे मला फार चकित करणारे आहे.'

“भीमबाई हिचे आत्मवृत्त वाचले तर तुला अधिक काही कळेल.'

'मला फार उत्सुकता आहे." सरळच की, मला ती असाधारण होती.

दरम्यान आम्ही बाकी पुष्कळ गोष्टी बोललो. रिचर्ड हा समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ असल्याने त्याने जगातल्या मानवी वंशांचा खोलवर अभ्यास केलेला होता. मानवी वंश, माणसांची सामूहिक स्थलांतरे, त्यांचे एकमेकात मिसळणे, भाषा, लिपी, चित्रशैली, संगीत, संकेतव्यवस्था, विज्ञाने, शेतीच्या पद्धती; अशा असंख्य बाबीत त्याला रस, गती आणि रुची होती. तो म्हणाला, महाटे लोक मुळात महारठ्ठ लोक होत. त्या लोकांची मूळ भाषा महारठ्ठी होय. तिला महाराष्ट्री म्हणतात, याचे कारण तिचा तसा उच्चार संस्कृत साहित्यात आलेला आहे. संस्कृत ही कोणत्याही प्रदेशाची भाषा नव्हे. भारतवर्षातील अतिप्राचीन प्राकृत भाषांमधील शब्दांवर संस्कार करून ती कृत्रिमरित्या तयार करण्यात आलेली आहे. तेथील ब्राह्मणांनी बाकी प्राकृत भाषांमधील सर्वप्रकारचे ज्ञान तिच्यात साठवून ठेवून भारतातल्या आणि जगातल्या अभ्यासकांची मोठीच सोय करून ठेवलेली आहे. त्यापाठी ब्राह्मण वर्णीय लोकांचे तात्कालीन स्वार्थ असतीलच ; म्हणजे होतेच. त्यांना संस्कृतच्या माध्यमातून आणि त्या भाषेवरील त्यांच्या हुकमतीतून तिथल्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक दुनियेत आपला वरचष्मा कायम ठेवायचा

होता आणि आहे. तिच्या द्वारे त्यांनी ते साधले आहे. नव्या जमान्यात ते टिकणे कठीण आहे. पण त्यांनी साठवून ठेवलेले बरेवाईट ज्ञान हा मोठाच खजिना ज्ञानी लोकांसाठी उपलब्ध आहे. इतके प्राचीन ज्ञान साठविलेली आजच्या जगात आणखी कोणतीही भाषा नाहीय. ज्ञात जगाचा प्राचीन इतिहास समजण्यासाठी ती सगळ्यात उपयुक्त आहे. हे आजच्या काळात जर्मन लोकांनी सगळ्यात जास्त जाणले आहे. जर्मन हे प्राचीन वैदिक साहित्यातील दस्यू लोक होत. ते त्यांच्या देशाला आजही डॉइश्चेव्हिले म्हणतात. डॉईश्च म्हणजे दस्यू. व्हिले म्हणजे निवासाची जागा. 'डॉईश्चेव्हिले' म्हणजे जिथे दस्यू लोक राहतात तो प्रदेश. तसे डेन्मार्क हा प्राचीन दानव लोकांचा देश आहे. तिथे राहणारे लोक दनू म्हणजे दानव होत. अगदी स्कँडेनाव्हिया हा प्राचीन स्कंद लोकांचा प्रदेश होय. त्यात नॉर्वे, स्वीडन आणि डेन्मार्क येतात. हे समजा सोड. पण महाराष्ट्री ही वेदपूर्व अशी अत्यंत प्राचीन प्राकृत भाषा आहे. आधुनिक महाटी भाषा तिच्यातूनच निपजलेली आहे. एकूण किमान सत्तावीस भाषा या महाराष्ट्री भाषेतून निपजल्या आहेत. अगदी श्रीलंका या देशात बोलली जाणारी सिंहल भाषा सुद्धा या महाराष्ट्री भाषेतून उद्भवलेली आहे.

या आणि अशा कितीतरी गोष्टी माझ्यासाठी अगदी नव्या होत्या. आपल्या नजरेत आपला आणि श्रीलंका या देशाचा संबंध फार तर रम्य ही स्वर्गाहुनी लंका या नाट्यगीतापुरता.

रिचर्ड म्हणाला, 'प्राचीन सिंधू संस्कृतीच्या लिपीचा अद्याप उलगडा झालेला नाहीय. अनेकांनी अनेक प्रकारे प्रयत्न केलेले आहेत. पण प्राचीन महाराष्ट्री भाषेचा अभ्यास; तिची ध्वनीव्यवस्था, रसव्यवस्था, लयव्यवस्था यांच्या उजेडात अधिक खोलवर केला गेल्यास एखादा रस्ता दिसू शकतो, असे मला वाटते. प्राचीन सिंधू संस्कृती आणि महारठ्ठ लोक यांच्यात निश्चित काहीतरी नाते असावे असा माझा कयास आहे.'

'आमचे महारठ्ठ लोक, आमची भाषा यांच्याविषयी तुला फारच
आस्था दिसतेय.'

'आहेच. अरे माझ्यातही महारठ्ठी अंश आहेच ना! हे मला आधीच
माहीत होते. पण थेट एखाद्या सातपाटलाशीच माझी भेट होईल, अशी मी कल्पनाही केलेली नव्हती. ती आज झाली. मी फार खूष आहे. आपण संपर्कात राहूया. आणि कझिन्स आहोत आपण. हे तू विसरू नकोस,' रिचर्ड फिकट हसत अगदी गंभीर स्वरात म्हणाला.'

या भेटीने मला काय मिळाले? आश्चर्यकारक रीतीने मला माझा एक दूरचा इंग्रज चुलतभाऊ भेटला. अन् फार काही दूरचा नव्हताच तो. त्याची खापर-खापर पणजी माझ्या खापर पणज्याची आत्या होती. भीमबाई सातपाटलीण. आंग्ल-महाटा संपर्क तिने थेट माझ्या कुळीत आणला होता. ते सारे फार वेधक आणि आश्चर्यकारक होते. पण त्यापेक्षाही रिचर्ड याने माझी भाषा आणि माझा देश यांच्या विषयीच्या माझ्या अज्ञानास गदागदा हलवले; हे मी अवश्य म्हणेन.तिथून पुढे रिचर्ड आणि माझ्यात कायम संपर्क राहिला. तो थेट त्याच्या मृत्युपर्यंत. ते सारे पुढे येईल आणि येत राहील. रिचर्ड याचेशी जडलेले मैत्र हा माझ्या आयुष्यातला एक अनमोल ठेवा आहे, इतकेच तूर्तास सांगतो.

संधी मिळताच मी अगदी हावरेपणाने भीमबाई हिचे आत्मवृत्त वाचले. ते मी पुन्हा पुन्हा वाचले. अगदीच छोटे चोपडे होते ते.

वाङ्मयीन दृष्ट्या त्याचे खास महत्त्व मानावे, असे ते कदाचित नसेलही. पण सांस्कृतिक दृष्ट्या आणि एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून ते खासच महत्त्वाचे होते. आणि देवनाथ सातपाटील म्हणून माझ्यासाठी ते केवळ अनन्यसाधारण होते. खूप साधेपणाने भीमबाई हिने ते लिहिले होते. ते तिने फक्त स्वतः साठी लिहिले होते. ते छापले जाईल, लोक वाचतील, आपली वाहव्वा होईल, अशा कोणत्याही गोष्टी तिच्या डोक्यात नसतील, हे ते वाचताना मला जाणवले. मी अशा बाबीला एक लेखक म्हणून त्या कृतीचे सगळ्यात मोठे मूल्य मानतो. कुठूनही काहीही न मागणारी, आपल्या हृदयाचा अंतःस्तर निखळपणे प्रकट करणारी अशी निहेतुक धवल; फक्त स्वतःसाठी असलेली कृती, ही श्रेष्ठ होण्यासाठी सगळ्यात जास्त लायक असते, हे सरळच होय. तिच्या या इतक्या बारक्या लेखनाला तितके महत्त्व कोणी दिलेही नसेल. पण ते कधीतरी कोणीतरी देईल सुद्धा ; असे माझ्या मनात आले. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या लेखनाला तरी त्यांच्या काळात कोणी महत्त्व दिले होते? पण काळाच्या सोबत वाहत, आपले असणे टिकवत, ते उरलेच. हे मनात यावे असे भीमबाई हिचे ते लेखन होते. ते कदाचित माझे आणि भीमबाई हिचे नाते मला दिसल्याने माझ्या मनात उतरले असेल. ते जे काही असेल ते असो वा नसो. पण त्यातील अनेक तपशील माझ्यासाठी फार वेधक आणि माझ्या सातपाटील असण्यास विस्तारून माझ्या मुळांचा अधिक शोध घेण्यास उद्युक्त करणारे होते. ते मला साल्पी या माझ्या जन्मगावापासून अधिकृतपणे बरेच मागे नेणारे होते, बरेच सांगणारे होते.

भीमबाई हिचे जन्मगाव करंजे. ते सातारा या शहराजवळ आहे. हल्ली हे करंजे गाव सातारा शहराचा भाग झालेले आहे. आपली सगळी मोठी गावे म्हणा वा शहरे; आसपासच्या गावांना सारखी गिळत आपला भाग करत असतात, हे आपण बघत असतो. तसेच ते आहे. तर करंजे इथे स्थायिक झालेला दसरत सातपाटील म्हणून एकजण होता. तो भीमबाई हिचा बाप. तो पानिपत येथील मराठे आणि अब्दाली यांच्या युद्धातून वाचून परत आलेला एक इसम होता. तो काही तरी निमित्ताने, त्या युद्धानंतर अफगाणिस्तान नामक देशी गेलेला होता. कदाचित तो युद्धकैदी म्हणून गेलेला असेल किंवा चोरून, लपून गेलेला असेल ; पण तो गेलेला होता खास. कारण तो परत आला तेव्हा एका अफगाण स्त्रीला सोबत घेऊन आला. त्या स्त्रीचे नाव आफिया किंवा आफुबाई. विशेष म्हणजे येताना ती अफगाण स्त्री आणि दसरत त्यांच्यासोबत विठोबा-रखुमाईची एक पितळी मूर्ती घेऊन आलेले होते. ती त्यांच्या देवघरात कायम असे. तसा उल्लेख भीमबाई हिच्या आत्मवृत्तात आहे. आफुबाई ही भीमबाई हिची सख्खी आई. ती सख्खी अशासाठी की भीमबाई हीस आणखी एक आई होती. तिचे नाव काळीआई. आफुबाई ही उंच, गोरी आणि धारदार करारी नाक असलेली होती. तिला सगळे वचकून असत. भीमबाई ही तिची सख्खी लेक असूनही तिला तिची भीती वाटत असे. याउलट काळी आई ही फार मायाळू होती. तिने भीमबाई हीस जुन्या कैक गोष्टी सांगितलेल्या होत्या. उदाहणादाखल दसरत हा मुळचा पुण्याजवळ खराडी नामक गावाचा रहिवासी होता. तिथे त्याचे कोणीतरी भाईबंद त्याच्या जीवावर उठलेले होते, म्हणून त्याने पानिपतहून परतल्यावर त्या गावी जाणे टाळले होते. पण युद्धावर जाण्याआधीच्या आपल्या बायकोला, म्हणजे काळीआई हिला नंतर तो करंजे इथे घेऊन आला होता. त्याची एक धर्माची आई होती. ती चांभारगोंदे उर्फ

श्रीगोंदे नावाच्या गावातली भराडी किंवा गोंधळी अशा कोणत्या तरी जातीची वयस्क विधवा होती. तिच्यावर त्याची फार श्रद्धा होती. तीच काळीबाई हिला घेऊन आलेली होती. या धर्माच्या आईला दसरत आपल्या सोबत करंजे इथे घेऊन आलेला होता. या आणि अशा अनेक गोष्टी भीमबाई हीस काळीआई हिच्याकडून कळलेल्या होत्या. भीमबाई जेव्हा स्ट्युअर्ट लेसिंग याच्या सोबत पळून गेली तेव्हा तिने आपला इरादा फक्त काळीआई हीस माहीत करून दिलेला होता. पुढे अनेक वर्षांनी भीमबाई हिची भेट तिचा भाचा जानराव याचेशी अहमदनगर येथे झाली होती. ती पळून गेल्यानंतर तिच्या माहेराशी झालेला तिचा तो एकमेव आणि अखेरचा संपर्क.करंजे सोडून जानराव त्या वेगळ्या मुलखात का आणि कसा आला, हे भीमबाई हीस कळले नाही. ते विचारण्याइतकी सवड तिला त्या भेटीत मिळाली नाही. कारण माहेरच्या त्या अनपेक्षित आणि आश्चर्यकरक स्पर्शात ती वाहून गेलेली होती. तिच्यापेक्षा थोडाच लहान असलेल्या त्या भाच्याला तिने जवळ घेतले, तो स्पर्श तिला कायम आठवत असे. त्याची आणि तिची ती एकमेव भेट. बाकी लेसिंग याच्यासोबतचे आयुष्य ; सहजीवन, यांच्याविषयी तिने अत्यंत संयमाने लिहिले होते. पण तिचे त्याच्या सोबतचे या सातासमुद्रापलीकडील मुलखातले आयुष्य समाधानात व्यतीत झाले, असे म्हणण्याजोगे मार्दव त्या लेखनात होते.माझ्यासाठी कितीतरी गोष्टींची झाकणे ते एक चोपडे वाचून उघडली. एक; सातपाटील लोक साताऱ्याजवळ करंजे या गावी तसेच पुण्याजवळ खराडी येथे राहात होते. दोन ; दसरत सातपाटील याची एक बायको अफगाण होती. ते अफगाणिस्तान येथून येताना विठोबा-रखुमाईची पितळी मूर्ती सोबत घेऊन आले होते. तीन; माझा खापरपणजा जानराव हा या दसरत सातपाटलाचा नातू. तो तिथून साल्पी येथे येऊन रहिवसला होता. तोच ही मूर्ती सोबत घेऊन आला असेल. ती आता माझ्याकडे आहे.

हे सगळे माझ्यासाठी इतके थरारक होते, की ते लगेच कोणाशी तरी शेअर करावे असे माझ्या मनात आले. कोणाशी तर अर्थातच रिचर्डशी. त्यानेच तर हे दार माझ्यासाठी खुले केले होते. तरीही मी संयम पाळला. खेरीज मला तितकी सवड तेव्हा नव्हती. आमचा दौरा सुरूच होता. तो संपवून स्वदेशी परत आल्यावर मी सारे त्याला सविस्तर कळविले. सातपाटलांचे हे अफगाण कनेक्शन तुझ्याकडून कसे काय निसटले, अशी मी पृच्छा केली तेव्हा त्याने सांगितले की, 'मी भारताच्या प्राचीन काळात मनाने वावरत असतो- आणि सहसा अधिक त्याच काळात असतो- तेव्हा मला दिसणारे बृहद् भारतवर्ष हल्लीच्या अफगाणिस्तानपासून सुरू होते. इसवी सनाच्या आधी सुमारे चारशे वर्षे आणि त्याच्या नंतर आणखी चारशे वर्षे असा कमीजास्त काळ धरून सुमारे एक हजार वर्षे साऱ्या भारतवर्षात बौद्ध आणि फक्त बौद्ध धर्म नांदत होता. तो अफगाणिस्तानातही होता. तिकडे मुसलमान आले आणि पुष्कळ वेगाने तिथे तो धर्म पसरला. चंगीझखानाने जेव्हा काबुलवर हल्ला केला तेव्हा त्याला एके ठिकाणी बरेच मुसलमान नमाज पढताना दिसले. चंगीझखान हा मुसलमान नव्हता. त्याने कोणाला तरी विचारले, हे इतके लोक जमिनीवर डोके टेकवून आणि ढुंगणे वर करून काय करत आहेत? तेव्हा त्यास सांगण्यात आले की ते अल्लाहची प्रार्थना करीत आहेत.' तो म्हणाला, "हे लोक मूर्ख आहेत. कापून काढा साल्यांना. साहजिकच तिथे मोठीच कत्तल उडाली होती.' मी विचारले काय अन् रिचर्डने

सांगितले काय! मी म्हणालो, 'दसरत आणि आफिया यांनी अफगाणिस्तानातून जी विठोबा-रखुमाईची मूर्ती आणली, ती आमच्या घरात आहे. म्हणजे ती तीच असावी, असे वाटते.' तो म्हणाला, 'दसरत ज्या बाईला तिकडून घेऊन आला, ती हिंदू असेल. आज तिकडे हिंदू नाहीत असे समजू नकोस. ते आहेत. मायनॉरिटीत असतील; पण ते आहेत. हिंदू, शीख, बौद्ध, ख्रिस्ती असे सगळे आहेत. अगदी महाराष्ट्रातून गेलेल्या चक्रधर स्वामींचे शिष्य असलेल्या महानुभाव पंथाचे मठ सुद्धा तिकडे आहेत. त्यांची कृष्णमंदिरे सुद्धा आहेत. आणि समजा; आफिया मुसलमान असेल तरी काय फरक पडतो? की तुला पडतो? तुम्ही, काय ते, शहाण्णव कुळी मराठे लोक- हेही मला माहीत आहे बरे का- तुम्हाला हे लपवून ठेवावे वाटत असेल. तुला वाटते? सगळे शोध घे. पण स्वतःपासून काहीही लपवू नकोस. आपण सारे एकाच मानवी प्रजातीचे सभासद आहोत, हे कायम मनाशी बाळग. पूर्वी आपले पूर्वज समूहाने स्थलांतरे करत. हल्ली अशा एकट्या-दुकट्या घटना घडतात. हे सारे असेच असते. आणि ते सुंदर आहे.' मी म्हणालो, 'त्या मूर्तीच्या तळाशी साहेबराव आणि आरेनाबाई यांना, शिवरामबावांकडून. आपल्या मुलखाची आठवण म्हणून. असे लिहिलेले आहे. हा साहेबराव आणि आरेनाबाई कोण हे मला समजत नाही. त्यांना ही मूर्ती कोणा शिवरामबावाने भेट दिली. आपल्या मुलखाची आठवण म्हणून. म्हणजे साहेबराव आणि आरेनाबाई मुलूख सोडून कुठे बाहेर गेले होते की काय, आणि तो मुलूख अफगाणिस्तान असावा की काय? तो म्हणाला, 'हे वेधक आहे. शोध घे. आपल्या आजच्या जगण्याशी अर्थाअर्थी संबंध नसलेल्या गोष्टी सुद्धा अनेकदा खूप अर्थपूर्ण असतात. कुतूहल असणे आणि त्याची पूर्ती करण्यासाठी धडपडणे यात आपल्या मानवीपणाचे सार दडलेले आहे.' अशी अब्सर्ड प्रश्नोत्तरे आमच्यात झडण्याची ती केवळ सुरुवात होती. म्हणजे प्रश्न माझे आणि उत्तरे त्याची, असे ते असे.हल्ली ई-मेल असतो. एका क्लिकमध्ये चारदोन सेकंदात जगात कुठूनही कुठेही कितीही मजकूर पाठविता येतो. त्याचा आम्ही मुक्त वापर केला.

दरम्यान मला आणखी एक धक्का देत माझा आणखी एक ब्रिटीश नातेवाईक भेटला. हा तर अधिक सख्खा होता. त्याचे नाव अँथनी ब्लॅकस्मिथ. हा खूपच वेगळा होता आणि वेगळ्याच रीतीने भेटला. केम्ब्रिज विद्यापीठात आम्ही भारतीय लेखक आणि काही निवडक इंग्रज लेखक यांच्या जाहीर संवादाचा तो कार्यक्रम होता. तो बहुधा सर्वांसाठी खुला होता. तरीही मोजकेच लोक ; साहित्य आणि पौर्वात्यविद्या या विषयांचे अभ्यासक, स्कॉलर्स असे लोक उपस्थित असावेत. 'Current Themes in Literatures' असे त्या चर्चेचे मध्यवर्ती सूत्र होते. तिथे बोलाविलेले इंग्रज लेखक हे उच्चभ्रू वर्तुळात मान्यता आणि चर्चा असलेले आणि वाचकांचे कमी पाठबळ असलेले असावेत. आम्हीही त्याच प्रकारचे आपापल्या भाषांमधील लेखक होतो. तरीही वाचकांच्या संख्येच्या दृष्टीने आमच्यात खूपच फरक होता. आम्ही फारच तुटपुंज्या संख्येच्या वाचकांचे

लेखक होतो. अन् आम्ही भारतीय लेखक सारे प्रत्येकी वेगवेगळ्या भाषांमध्ये लिहिणारे होतो. अर्थात, आमच्या भाषा लहान नव्हत्या. आमचा इतिहास, भूगोल आणि परंपरा यांच्यात आम्हाला जोडणारे सूत्र अवश्य होते. तरीही स्थानिक परिस्थितीनुसार आमच्यात थिम्स म्हणजे लेखनाच्या विषयांच्या अंगाने फारच जास्ती विविधता होती. ती तितकी इंग्रज लेखकांच्यात नव्हती. त्यात पुन्हा सारी चर्चा आंग्लभाषेत. वसाहतवादी इंग्रजांनी

आपल्याला दिलेली ती एक देणगी आहे. आजही आपल्या आंतरभाषिक संवादासाठी आपल्याला एक पर्याय म्हणून ती उपलब्ध आणि उपयुक्त आहे. जगातही अमेरिकेमुळे त्या भाषेला सर्वात श्रीमंत भाषेची प्रतिष्ठा आहे. आपल्याकडे हिंदी ही आपल्यातली एक चांगला दुवा ठरू शकणारी भाषा होऊ शकते. पण तिला दक्षिणी लोकांचा विरोध. ते म्हणतात, इंग्रजी एकवेळ चालेल. पण हिंदी नको. तिचे सांस्कृतिक वर्चस्व नको. त्याबाबत ते अगदी घट्ट असतात. अन् हिंदीभाषी स्वतःची भाषा सोडायला बिलकूलही तयार नसतात. आपण महाराष्ट्री लोक या दोन आग्रहांच्या मध्ये आहोत. सगळा भारत जोडलेला राहावा, ही आपली अनुभूत मागणी आणि इच्छा असते. त्यासाठी आपण आपली भाषा सहज टाकतो. दक्षिणेशी इंग्रजीत आणि उत्तरेशी हिंदीत संवाद साधत स्वतःची भाषा सोडण्याचा आपला सिलसिला कायम असतो. अगदी उत्तरपूर्वेत; जिथे इंग्रजी अथवा हिंदी असे दोन्हीही पर्याय असतात, तिथे त्या त्या लोकांना जो सोयीचा असेल, तो आपण स्वीकारतो आणि वापरतो. खेरीज काहीच जमले नाही तर गप्प बसणे, हे असतेच. देश जोडलेला राखण्यासाठी इतका त्याग करणारे आपल्यासारखे लोक या भरतखंडात दुसरे नाहीत. परिणामी विदेशी गेल्यावर आपले दक्षिणी भाषांतील लोक त्यांच्या देशी भाषांच्या लय आणि परंपरा यांच्या ताजव्यात इंग्रजीचा उपयोग दणकून करतात. मातृभाषा न सोडणारे हिंदीभाषी लोक सहसा गप्प राहतात. आपण महाराष्ट्री लोक त्या दोहोंच्या मध्ये रेंगाळत असतो. असे साधारण सरासरी चित्र आपण आपल्या देशाबाहेर गेलो की सहज जाणवते. या सगळ्यासकट संवाद छान झाला. एकूण मजा आला.

संवादानंतर आम्ही इथेतिथे रेंगाळत असताना समोर श्रोत्यात मला एका अत्यंत देखण्या पुरुषाभोवती बरीच गर्दी जमलेली दिसली. तो इसम आमच्याशी चर्चेत सहभाग घेणारा सेलेब्रिटी लेखक नव्हता. साहजिकच तो इथल्या रंगभूमी अथवा सिनेमाध्यमातील कोणी तरी लोकप्रिय इसम

असावा, असे मला वाटले. त्या क्षेत्रात असे लोक असतात. त्यांना गंभीर साहित्यात रस असतो. आणि आपल्या सेलेब्रिटी असण्याचे कवच बाजूला ठेऊन ते अशा प्रसंगी आवर्जून हजेरी लावतात, किंवा अशी हजेरी लावून आपल्याभोवतीचे वलय अधिक गडद झळाळते करतात, असा माझा अनुभव होता. जे काही असेल ते असो; आपल्याला याच्याशी काय करायचेय असा विचार करत मी पुढे निघालो असताना तिथल्या स्त्री-पुरुषांच्या गराड्यातील तो देखणा इसम पुढे येऊन थेट मला उद्देशून म्हणाला,

'Mister Saatpatil, I would like to have a word with you.

तेव्हा साहजिकच मी चकित झालो. म्हणालो,

“You seem to be too heavily engaged. I don't see that as a possibility.'

'Oh! I can handle it. It is not unusual for me. Frankly speaking, if this does not happen, I get a bit confused.'

'Go ahead, then.'

'No, no it is not possible here. Let us go out, Get in my car and go to some quiet place nearby - let's say- some cafe and speak over a cup of coffee.

"Well, despite the fact that, we don't know each other,

I can't find any excuse to deny your invitation.'

'Thanks. I won't take much of your time.'

आम्ही जवळच्याच एका कॉफीहाउसमध्ये जाऊन बसलो. ते बरेच महागडे असावे. किंवा कदाचित नसेलही. पण निवांत बसावे, अशी ती जागा होती. तिथेही सगळे लोक त्याला ओळखत होते, असे दिसले. त्याने स्वतःची ओळख करून दिली. म्हणाला, माझे नाव अँथनी ब्लॅकस्मिथ. तू मला टोनी म्हणू शकतोस. इकडे येणाऱ्या तुम्हा लेखकांच्या शिष्टमंडळात तुझे नाव दिसले. ते माझ्यासाठी फार वेधक होते. कारण मीही तसा सातपाटीलच आहे.

'काय सांगतोयस काय?'

मी खरोखरीच चकित झालो. सातपाटलांशी संबंधित असलेला एक विद्वान आधीच मला भेटलेला होता. अन् आता हा तर थेट मी सातपाटीलच आहे असे सांगत होता. नाव अँथनी ब्लॅकस्मिथ. अन् म्हणतोय, मीही तसा सातपाटीलच आहे! तसा म्हणजे कसा? हे आहे काय?

'तेच तर सांगतो. इकडे येणाऱ्या लेखकात मी तुझं नाव वाचलं आणि माझी उत्सुकता जागी झाली. मी थोडा रिसर्च केला. गुगलवर सर्च देऊन माहिती मिळाली. तुझ्या भाषेतला तू एक महत्त्वाचा लेखक आहेस, हे समजलं. तुझ्या वडिलांचं नाव माणकोजी, हेही समजलं. त्याच्या आणखी मागे मी गेलो.'

'कसा?

'तुमच्या जनगणनेच्या रेकॉर्डात. कुतूहल असलं की गोष्टी उपलब्ध होतात. तिथे माझ्या लक्षात आलं की तुझा पणजा रखमाजी आणि माझा खापरपणजा पिराजी हे सख्खे भाऊ. रखमाजी थोरला आणि पिराजी धाकटा.'

'पण तू तर ब्रिटीश. ब्लॅकस्मिथ. पिराजीशी तुझा संबंध कसा?'

'सांगतो ना. तेच तर सांगतोय. पिराजी मारला गेला, त्याचा विष घालून काटा काढण्यात आला तेव्हा त्याची स्त्री उल्फी नावाची होती, ती पळून गेली.'

'ती त्याची ठेवलेली बाई; कोल्हाटी नावाच्या जातीची होती. तिनेच त्याचा काटा काढला आणि त्याची संपत्ती घेऊन ती पळून गेली होती.'

'नाही. तसे झालेले नाहीय. ते आणखी कोणीतरी केले. पिराजीला कोणी मारले हे स्पष्ट झाले नाही. पण तिने त्याला मारले नाही. आणि ती त्याच्या सांगण्यावरून पळून गेली. तिचे तिथे थांबणे तिच्यासाठी आणि तिच्या मुलासाठी धोकादायक आहे, असे त्याने तिला परोपरीने सांगितले आणि ते तिला पटले, म्हणून ती घोड्यावर बसून स्वतःच्या लहान पोरासह पळून गेली. तिच्या मुलाचेचे नाव, जालन.'

'हे कशावरून म्हणतोस तू? आमच्या घराण्यात चालत आलेल्या कथेनुसार ती त्याला मारून पळून गेली होती. अन् पुढे तिचा काहीही पत्ता लागला नाही, असं म्हणतात.'

'माझ्याजवळ तिचं आत्मवृत्त आहे. ते तिने इकडे इंग्लंडात आल्यावर आपल्या उत्तरकाळात लिहिलेलं आहे. पुस्तकाचं नाव, “Memoirs of Woolfie' तुला भेट देण्यासाठी एक प्रत मी सोबत आणलेली आहे. वुल्फीने सांगितलेय ते सत्य मानायचे की नाही, हा तुझा प्रश्न. निखळ एक वाचक म्हणून काय ते तुला जाणवेलच.'

'अरे बाबा, उल्फी मुळात इकडे आलीच कशी आणि का?'

'सांगतो ना. तिचं आत्मवृत्त वाचून तुला ते कळेलच. पण थोडक्यात सांगायचं तर ती तुझ्या गावातल्या त्या पठारावरून पळाली ती थेट अहमदनगरला तिथल्या त्यावेळच्या इंग्रज कलेक्टरच्या बंगल्यावर पोहोचली. हा कलेक्टर तरुण होता. वुल्फीपेक्षा कदाचित थोडा लहान. त्याला ती आवडली. तो तिच्या प्रेमात पडला आणि त्याने तिच्याशी लग्न केलं. या कलेक्टरचं नाव अँथनी ब्लॅकस्मिथ. त्याच्यापासून तिला मुलबाळ झालं नाही. तिचा आधीचा मुलगा जालन ह्यासच त्याने आपला मुलगा मानला. निवृत्त झाल्यावर अँथनी आपल्या बायकोमुलासह इकडे आला आणि सुखाने जगला. पुढे जालनचा वंश इथे वाढला. एका महाटा स्त्रीला महाटा पुरुषापासून झालेला जालन हा आमचा आद्यपुरुष. वंशपुरुष. मूळ जालन हा माझा पणजा. कारण आमच्याकडे जालनचा थोरला मुलगा अँथनी आणि त्याचा थोरला मुलगा जालन अशी नावे ठेवण्याची प्रथा आहे. आडनाव ब्लॅकस्मिथ. तर आता सांग, आहे की नाही मीही सातपाटील? अर्थात असं सांगून मला काही तुझ्या इस्टेटीत वाटा मागायचा नाहीय, ते सारं माझ्याकडे मुबलक आहे', तो हसत हसत म्हणाला.

अँथनी याने जे काही सांगितले, त्यामुळे मी थक्क होण्याच्या पलीकडे पोहोचलो. तो एक अत्यंत देखणा माणूस होता. वयाने चाळीशीच्या आसपास. धारदार नाक, सणसणीत उंची, भक्कम; तरीही अंगावर न येणारी देहयष्टी. त्याच्या स्वरात मार्दव होते. त्याने सांगितल्यामुळे त्याच्या त्वचेचे पौर्वात्य वळण सुद्धा मला जाणवले. ती काहीशी इटालियन किंवा स्पॅनिश माणसासारखी होती. ती उत्तर युरोपी लोकांप्रमाणे उकडलेल्या बटाट्यासारखी नव्हती. तो सिनेनट किंवा तत्सम नव्हता. तो तिथला आजच्या पिढीतला अत्यंत लोकप्रिय लेखक होता. रॉबर्ट लुडलुम किंवा सिडने शेल्डन यांच्या नंतरच्या पिढीतला. अगदी आजचा. त्याच्या मिळकतीचे आकडे आपल्या कल्पनेच्या फार फार पलीकडचे होते. त्या तुलनेत इंग्रजीत लिहिणारा आपल्याकडचा चेतन भगत अगदी किरकोळ ठरला असता. अगदी लोकप्रिय लेखनाचा विचार करायचा तरी हा त्या त्या देशातल्या वाङ्मयीन संस्कृतीच्या दर्जाचा फरक असतो. अर्थात इंग्लंडात आज जागतिक दर्जाचे लेखक फारसे नाहीत, हेही तितकेच खरे. आणि त्यांना ते कळतही असेल. कारण ते हुषार लोक आहेत. ते कोणत्याही परिस्थितीत स्वतःला अद्ययावत ठेवायचा प्रयत्न करत असतात. ज्यांना दुनियेचा ताबा कोणत्याही परिस्थितीत स्वतःकडे ठेवायचा असतो, त्यांना हे शहाणपण प्रकट करावेच लागते. तसा प्रयत्न ते करतात आणि दुनियेतले सारे चांगले साहित्य आपल्या भाषेत तत्परतेने आणण्याची खबरदारी घेत असतात. आणि हे नुसत्या साहित्याचे नाही. दुनियेतले साऱ्या प्रकारचे ज्ञान आपल्या भाषेत असावे याची तातडी त्यांना कायम असते. ती असेल तोवर त्यांची हुकमत कायम राहील. ती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असेल, पण ती असेल. ती जोवर असायची तोवर असो. कारण कोणत्याही संस्कृतीची अशी हुकमत अनंत काळ टिकत नाही, हे दुनियेचे वास्तव आहे. हल्लीचे श्रेष्ठ दर्जाचे लेखक सहसा तिसऱ्या दुनियेत राहतात. त्यातले काही त्यांच्या द्वारे तिथून पहिल्या दुनियेत पोहोचतात आणि वाचक म्हणून आपल्यापर्यंत त्यांच्या आंग्लभाषेद्वारा येतात, असे माझे निरीक्षण आहे. ते असो. अँथनी केवळ माझी भेट घेण्यासाठीच विद्यापिठात

आला होता. एरवी तो तिकडे फिरकत नाही. तो म्हणाला, माझ्यासारखे लेखक या उच्चभ्रू लोकांच्या आस्थेचे विषय कसे होणार? फार तर सोशिओ-लिंग्विस्टिक स्टडी करायचा म्हणून काही लोक फील्ड सर्व्ह करून, अभ्यास करून माझ्या लोकप्रियतेचे रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न करतील, काही निष्कर्ष काढतील. हे सांगतानाची त्याच्या मनातील खिन्नता लपून राहिली नाही. पण ते बोलणे संपले आणि ती खिन्नताही नाहीशी झाली.

त्याला उल्फीला केंद्रस्थानी ठेऊन कादंबरी लिहायची होती. तो म्हणाला, त्यासाठी त्याला भारतात- विशेषतः महाराष्ट्रात- यायचे आहे. म्हणालो, 'अगदी बरोबर. ती कशी जगली असेल, हे प्रत्यक्ष अनुभवून तुला तिला स्वतःत घ्यावे लागेल. लिहिणे हे ऐकीव गोष्टींवरून रचणे नसते. ते त्या गोष्टींना आपल्या आत घेऊन आपल्या असण्याचा भाग बनवून, आपले करून, रचणे असते, हे मी तुला सांगण्याची गरज नाहीय.' तो म्हणाला की, 'त्याने उल्फीच्या या आत्मवृत्ताची पारायणे केलेली आहेत. पण लिहायचा कितीही प्रयत्न केला तरी त्याला तिच्या जगण्याची कादंबरी लिहिणे जमलेले नाहीय.' तो म्हणाला, 'तो ज्या प्रकारचे लिहितो; त्याने त्याला दुनियेकडे बघायचा एक रस्ता दिलेला आहे. त्यात वावरणे त्याला सोयीचे आणि सहज असते. पण त्यामुळे कोणत्याही गोष्टीकडे तो त्याच रस्त्याने पाहतो. पण तसा रस्ता त्याला या लेखनासाठी बिनकामी वाटतो.' मी म्हणालो, 'तुला जोवर असे वाटते, तोवरच अशी कादंबरी तुझ्याकडून लिहिली जाण्याची शक्यता आहे. अर्थात तुला ते फार मुष्कील आहे, हे मी नक्की सांगतो. तुझे काहीही वाचलेले नसतानाही सांगतो. कारण लिहिण्यासाठी एक नजर आपण मिळवली की कालांतराने ती आपली सवय बनते आणि ती आपल्यावर स्वार होते. या पकडीतून बाहेर पडणे फार कठीण असते, हे मला थोडे फार माहीत आहे.' नंतर त्याने वुल्फी या नावाचे इंग्रजी स्पेलिंग Woolfie लिहिण्याच्या पाठीमागचा किस्सा सांगितला. तो त्याचा पूर्वज अँथनी याच्या काळातला होता. तो तिच्या उल्फी या नावाशी संबंधित होता. इग्रजीत Wolf म्हणजे लांडगा. त्यामुळे वुल्फी याचा अर्थ she-Wolf लांडगी; असे त्या पहिल्या अँथनीस वाटले होते. त्याने माहिती घेतली तेव्हा उल्फत हा उर्दू शब्द आहे आणि त्याचा अर्थ स्नेह असा आहे, असे त्याला समजले. त्यामुळे वुल्फी म्हणजे स्नेहल असे त्याला सांगण्यात आले. उल्फी हिच्या नावाचे इंग्रजी स्पेलिंग Woolfie करताना त्याने मूळ अर्थ बराचसा कायम राहील याची काळजी घेतली. म्हणजे असे की वुल म्हणजे लोकर. ती उबेसाठी असते. उब देणारी म्हणजे इंग्लंड सारख्या थंड देशासाठी स्नेहलच होय. म्हणून उल्फी म्हणजे स्नेहल, स्नेहा; असा अर्थ कायम राहिला. अर्थात, आपल्या नावांसारखा इंग्रज लोकांच्या प्रत्येक नावाला अर्थ असतोच; असे नव्हे. त्यांची नावे सहसा अर्थातीत असतात किंवा खरे तर अर्थहीनच असतात. तरीही ही काळजी घेण्यात आली. आमची ती भेट संपताना अँथनी याने उल्फीचे आत्मवृत्त मला भेट दिले आणि सोबत आणखी एक माझ्यासाठी अनमोल अशी गोष्ट त्याने दिली. ती म्हणजे उल्फी आणि शंभुराव सातपाटील यांचा एकत्र फोटो. म्हणाला, 'हा फोटो पुस्तकात नाहीय. इकडच्या वाचकांना त्यातून काहीच मिळणार नाही, म्हणून आम्ही तो टाकलेला नाहीय. पण तुला तो वेधक वाटेल असे वाटते, म्हणून माझ्या वतीने ही भेट.' ती माझ्यासाठी खरोखरीच अनमोल होती. कारण माझ्या आयुष्यात पहिल्यांदा मी माझ्या जन्माच्या दोन वर्षे आधी मेलेल्या माझ्या आज्याची प्रतिमा त्यामुळे पाहू शकलो आणि

शकतो. आज माझ्याकडे माझे वडील माणकोजी यांचा फोटो नाहीय. पण शंभुराव या माझ्या आज्याचा आहे, तो केवळ अँथनी याच्यामुळेच. मी त्याला भारतात येण्याचे निमंत्रण दिले. उल्फी ज्या कोल्हाटी जातीत जन्मलेली होती, त्या जातीच्या लोकांचे जगणे प्रत्यक्षात त्याला पाहायला मिळावे, त्यांच्या सोबत राहायला मिळावे, म्हणून तुला मी अवश्य मदत करीन, असे म्हणालो.

आंग्लदेशीच्या त्या भेटीचे बाकी फलित म्हणजे ; आजच्या हिशेबाने प्रगत मानली जाणारी एक मानवी संस्कृती, त्या लोकांचे जीवनमान, राहण्याची रीत, त्यांच्या आस्थेचे विषय, त्यांची दुनिया पाहण्याची पद्धती अशा पुष्कळ गोष्टींचा परिचय झाला. बाकी प्रेक्षणीय स्थळे वगैरे होतीच. त्यांच्यात मला तितका रस नव्हता आणि नाही. ती असतातच. पण या सगळ्यापेक्षा अगदी अनपेक्षितपणे मला माझे दोन नातेवाईक भेटले. एक माझ्यापेक्षा सुमारे दहा वर्षांनी मोठा होता अन् दुसरा सुमारे वीस वर्षांनी लहान. दोघेही ब्रिटीश. खेरीज अफगाणिस्तान नामक देशाशी सुद्धा आपल्या कुळीचे कनेक्शन आहे, हे मला तिथेच समजले.

5

परत आल्यावर भीमबाई आणि उल्फी यांची आत्मवृत्ते मी पुन्हा पुन्हा वाचली. लेखन म्हणून उल्फीचे आत्मवृत्त अधिक सरस होते. तिने तिचे कोल्हाटी जातीत जन्मणे, तिचे लहानपण, शिक्षण, वाढत्या वयातील तिचे पुरुषस्पर्धांचे अनुभव यांच्याविषयी फार स्पष्ट संयमाने लिहिले होते. पिराजीची भेट, त्याच्या सोबतचे जीवन, हेही खूप असोशीने सांगितले होते. तिच्या आणि शंभुरावाच्या मुंबई येथील भेटीचा प्रसंग तिने मोठ्या जिव्हाळ्याने रेखाटला होता. आणि अर्थातच अँथनी ब्लॅकस्मिथ, त्याच्या-तिच्या प्रेमाची, सहजीवनाची स्नेहल आभा तिच्या लेखनात सर्वत्र वेल्हाळ होती. ते सारे लेखन एखाद्या भारतीय परीकथेसारखे होते. आपण राजकन्या आहोत, हे माहीत नसलेली एखादी मुलगी जशी अनेक प्रकारच्या अभावात वाढते, अनेक संकटांचा सामना करत राहते, जगण्यातील सुखदुःखांचा पराकोटीचा अनुभव घेते, आणि तिला अखेर तिचा राजकुमार भेटतो, तिची कहाणी सुफळ संपूर्ण होते; असे ते लेखन होते. त्यात एक पिराजी आणि त्या एका भेटीपुरता शंभुराव वगळता सातपाटील मंडळींचा काहीही संदर्भ नव्हता. ते स्वाभाविक होते. तिचा त्या लोकांशी संबंधच आलेला नव्हता, तर ती त्यांच्याविषयी लिहिणार काय? अँथनी याने भेट दिलेला उल्फी आणि शंभुराव यांचा फोटो माझ्यासाठी केवळ अनमोल होता. तो मी माझ्याकडे जपून ठेवलेला आहे. आठवण आली की अधून मधून अगदी जपून ठेवलेला एखादा दागिना आपल्या खजिन्यातून काढावा तसा मी तो काढतो आणि मोठ्या स्नेहल नजरेने त्याच्याकडे पाहतो. फोटो श्यामधवल आहे. एक गोरी,

पृथुल अंगाची, फिकट रंगाच्या

फुलाफुलांचा झगा परिधान केलेली हसरी स्त्री आहे. तिच्या शेजारी, तिच्या कवेतच जवळपास; एक त्याच्या वयाच्या चाळीशीतला उंच, तगडा प्रौढ इसम उभा आहे. तो मात्र संकोचून उभा आहे. एखाद्या स्त्रीच्या इतके निकट उभे राहण्याचा अनुभव त्याला अजिबातही नसेल. ती त्याची पत्नी नाहीय, त्याची प्रेयसी नाहीय. अन् समोर फोटो काढणारा उभा आहे याचे भान त्याला आहे. त्या स्त्रीचा चेहरा आणि तिचे सर्वांग एखाद्या विस्तीर्ण तळयात पूर्ण उमललेल्या शुभ्र कमळासारखे आहे. त्याच्या चेहरा आणि सर्वांग यावर विराजमान असलेल्या संकोचाने त्या स्त्रीचे शुभ्र हसणे तोलून धरलेले आहे. काळाच्या सूक्ष्म चिंधीत अनाहूतपणे एखादी अद्‌भूत कलाकृती घडून यावी असे ते प्रतिमाचित्र आहे.

भीमबाई हिची चोपडी माझ्या पूर्वजांविषयीच्या माहितीची अनेक दारे किलकिली करणारी होती. सातपाटील साल्पीतले. पण त्याच्या आधी करंजे. त्याच्याही आधी खराडी. आणि आफुबाई हिचे अफगाणिस्तान कनेक्शन. विठोबा-रखुमाईचे तिथून इकडे येणे. ती विठोबा-रखुमाई माझ्या घरातच होती. ती तीच असण्याची शक्यता होती. तिच्या द्वारा मी थेट दसरत आणि आफुबाई यांच्याशी जोडला जाऊ शकत होतो. भन्नाटच होते ते सारे.

मी साल्पी, करंजे आणि खराडी येथे जाण्याचे ठरवले. पैकी आधी साल्पी येथे गेलो. ते माझे जन्मगाव. पण तिथे माझा फारसा संबंध उरलेला नव्हता. मी माझ्या वयाच्या साठीला टेकलेलो होतो. वडील परलोकी जावून पंचवीस वर्षे उलटलेली होती. आई तेव्हा होती. पण ती वृद्ध आणि थकलेली होती आणि तिने साल्पीपासून शंभर किलोमीटर अंतरावरील ज्या संगमनेर नामक गावी स्थिर होण्याचा निर्णय मी घेतलेला होता, तिकडे; माझ्या घरी राहायला आलेली होती. ती जोवर साल्पी येथे राहात होती, तोवर तिला भेटण्यासाठी चार-सहा महिन्यांनी मी तिकडे जात होतो. ती आल्यावर तो प्रश्नही मिटलेला होता. गेल्या कैक वर्षात मी साल्पीला गेलेलोच नव्हतो. एक बिलाल इनामदार नावाचा बालमित्र होता. तो जिव्हाळ्याचा होता. पण आता त्याच्या आणि माझ्या जगण्यात फार अंतर पडलेले होते. तो बालपणीच्या मैत्रीच्या गोष्टीत अडकून पडलेला होता. खेरीज सततच्या मद्यसेवनाने त्याला कायमचे हळवे करून टाकलेले होते. मद्यसेवन मला वर्ण्य नव्हते. पण मी तोवर हळवा झालेलो नव्हतो आणि

त्याच्या दर्जाची सतत स्वप्नात वावरण्याची क्षमता माझ्या ठायी उपजलेली नव्हती, जी अजूनही नाहीय असे मला वाटते. अर्थात ती माझ्यात कधीही उपजेल अशा कड्यावर मी उभा आहे हे मला कळते. पण आपले जगणे ही इतकी अद्‌भूत गोष्ट आहे की आपल्या आकलनाचे बुरुज तिथे कायम चकवा देणारे ठरतात असे माझे निरीक्षण आहे. सबब ते असो. तर, आमच्या सातपाटलांच्या भावकीतल्या एकाला फोन करून मी तिकडे गेलो होतो. तो म्हणाला की आपल्यातले ते अमुकअमुक जे आहेत; त्यांच्याकडे आपल्या वंशाचे झाड आहे. ते तुला कदाचित उपयोगी होईल. तोवर एक लेखक म्हणून मी प्रसिद्ध झालेलो होतो आणि सातपाटील यांच्याविषयी मी काहीतरी लिहीत आहे याची कुणकुण आमच्या भावकीतल्या त्या इसमास लागलेली होती. किंवा खरे तर मीच त्याला म्हणालो असेन की, मी असे असे लिहितोय आणि मला हे हे हवे आहे. तो म्हणाला, 'आपल्या वंशाचे झाड

एकाकडे आहे, ते मी तुला देतो.' आपला थेट वंशवृक्षच जर मिळणार असेल तर ते उत्तमच ; असा मी विचार केला आणि गेलो.

मी बसस्टँडवर उतरलो तिथूनच मला ते गाव अनोळखी वाटायची सुरुवात झाली. गावाचे पडझड झालेले तीन कोट, वेशी, त्यांच्याबाहेरचे महारवाडे आणि मांगवाडे; सारेच बदलले होते. मुसलमान इनामदारांच्या इनामी जमिनीत खूप घरे झाली होती. ती अर्थातच बलपूर्वक झालेली असणार. सगळे त्याच्या त्याच्या पद्धतीने बदललेले होते. गाव प्रचंड वाढले होते. वेशी होत्या. त्या पडझड दीनवाण्या होत्या. त्यांचा भोवताली अनेक टपरीवजा दुकाने उभी राहिली होती. आत अनेक दुमजली इमारती उभ्या राहिल्या होत्या. बहुतेक माणसे अनोळखी होती. माझ्या लक्षात आले की, मी फार काही दिवसांनी इथे आलो नव्हतो. पण याआधी आईला भेटायला येताना मी स्टँडवर उतरून झापड लावलेल्या बैलासारखा इकडे तिकडे न पाहता थेट घरी जात असे आणि या बदलांकडे माझे लक्षच नसे. आता आई तिथे नव्हती आणि माझी नजर मोकळी होती, म्हणून कदाचित मला सारे दिसले, जाणवले. एरवीही या माझ्या जन्मगावाविषयी एक परकेपणा माझ्यात उपजलेला होता. किंवा तो आधीपासूनच होता. कदाचित मी माझ्या गावातील लोकांच्या, माझ्या भावकीतील लोकांच्या नजरांमधल्या, वागण्यांमधल्या सगळ्या प्रकारच्या भुकांच्या दर्शनाने भिऊन गेलेलो असेन. कदाचित अगदी लहानपणापासून मी त्यांच्यापासून तुटलेलो असेन. पण मला तिथून बाहेर पडून दुसरीकडे कुठे तरी जाण्याची घाई झालेली होती. आणि संधी मिळताच मी तिथून बाहेर पडलो. काही तरी असे होते की जे मला तिथे गुदमरून टाकणारे होते. आपले जन्मगाव, आपली जन्मभूमी; तिचे प्रेम, असे माझ्यात मुळातूनच नव्हते, याचे मला नेहमीच आश्चर्य वाटते. वस्तुतः या गावाने मला खूप दिलेले होते. पण एखाद्या बांडगुळासारखा त्या गावाचा जीवनरस शोषून मी इथून कृतघ्नपणे बाहेर पडलो होतो.

माझ्या लहानपणी साल्पी येथे आम्ही अत्यंत निकृष्ट दर्जाचे जिणे जगत होतो. म्हणजे फक्त आम्हीच ते तसे जगत होतो असे नव्हे. त्या काळी खेड्यातील सारे लोक तसेच जगत होते. त्यात गरीब-श्रीमंत असा भेद फारसा नव्हता. आणि सगळ्याच गोष्टी तेव्हा निकृष्ट होत्या असेही नव्हे. किंवा ते जगणेच निकृष्ट होते, असेही नव्हे. उदाहरणार्थ, कोणत्याही ओढ्याच्या काठी हाताने झिरा खोदला आणि अगदी थोडा वेळ पाणी निवळण्याची वाट पाहिली की निस्संदिग्ध निवळचंक शुद्ध पाणी मिळत असे. पाणी हा कोणत्याही प्रकारे विकाऊ पदार्थ नव्हता. हवा प्रदूषणरहित स्वच्छ होती. अगदी भिकाऱ्यासही सहजी खाण्यायोग्य अन्न मिळत असे. जेवताना घरांची दारे कायम उघडी असत. त्यावेळी कितीही गावखाती कुत्री दारात आली तरी, त्या सगळ्यांना अगदी गरिबातील गरीब घरातून सुद्धा, कोरभर तुकडा का होईना मिळत असे. भाज्या किंवा ताक विकण्याची पद्धत नव्हती. वावरात खुरपणी करताना गवत काढून बाया लुगड्याच्या घोळात उत्तम पालेभाजी साठवू शकत असत. बैल हा शेतकऱ्यांच्या जगण्याच्या केंद्रस्थानी होता. तो त्यांचा गुलाम म्हणूनच असे. त्याला उत्तम बडवून राबवून घेतले जाई. पण त्याने अधिकाधिक काम अधिक काळ करावे अशा स्वार्थापोटी त्याच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त उत्तम राखला जात असे. उदाहरणार्थ, गाजराचे किंवा रताळ्याचे पीक हे सहसा

बैलासाठी खाद्यान्न म्हणूनच शेतात काढले जात असे. किंवा हिरव्या चाऱ्यासाठी घास पिकवला जाई. या घासाच्या तुरेस्थानी निळ्या-जांभळ्या रंगाची सुंदर फुले डोलत असत. याची कोवळी भाजी फार चविष्ट असे. ती अधिक प्रमाणात खाल्ल्यास पोट फुगत असे. त्यास पोटात गुबारा धरणे म्हणत. ही घासाची भाजी मोफत सहज मुबलक मिळत असे. पालेभाज्या विकणे किंवा विकत घेणे ही संकल्पनाच नव्हती. हुलगा ; ज्यास कुळीथ असेही म्हणतात, हे सगळ्यात स्वस्त कडधान्य. उत्तम प्रथिनयुक्त. अंघोळीसाठी ओढ्यावर गेल्यावर धोतर किंवा तत्सम कापड वापरून मासोळ्या पकडता येत. त्यांना तिथल्या तिथेच बोर, बाभळ अशा झाडांच्या काटक्यांवर उत्तम भाजता येत असे. स्वच्छतेसाठी कपड्यांना किंवा अंगाला साबण लावला जात नसे. अंग दगडाने घासायचे आणि कपडे धुताना फार तर रिठ्या वापरायच्या, अशी पद्धत होती. अन्न मिळणे आणि मिळविणे दुष्कर आणि दुष्प्राप्य नव्हते.

पण मग घरोघरी ढेकणे असत. आपल्याला पुरेसे रक्तान्न मिळाल्याखेरीज ते झोपत नसत. त्यांचे अन्नग्रहण संपल्यावरच प्रत्येकाला दमलीभागली सुखाची झोप शक्य होई. रात्रभर गाडग्या-मडक्यांमधून उंदरांचा सुळसुळाट असे. उवा आणि लिखा सगळ्यांच्या अंगात आणि केसात असत. सदऱ्यांच्या आतून पांढऱ्या उवा असत. शौचविधी करण्यासाठी गोखाडीस जावे लागे. त्या विधीनंतर गुदद्वार स्वच्छतेसाठी दगड वापरणे सोयीचे मानले जात असे. तिथे, म्हणजे गोखाडीत अत्यंत घाण वास सतत असे आणि पायात वहाणा सहसा नसत. तिथून तसेच येऊन हातपाय न धुता घरात, गोधडीत शिरणे असे. शौचविधी केल्यावर अनेकदा बाहेर पडलेल्या मलात जंतांच्या अनेक वसाहती आश्चर्याने वळवळत असत. कोणीही कुठूनही कोणाच्याही घरात थेट सहज घुसू शकत असे. तंबाखू खाल्ल्यावर ती धुंकण्यासाठी उठून बाहेर जाण्याऐवजी बसल्या जागेवरून धुंकी प्रोजेक्टाइल पद्धतीने फेकण्याची प्रथा असे. खरुज, नायटे, गजकर्ण या आम गोष्टी होत्या. नारू असे. देवी असे. गोवर, कांजिण्या असत. जखम झाल्यास त्यावर मुतण्याची प्रथा होती. रक्तस्त्राव थांबविण्यासाठी मऊ माती जखमेवर टाकण्याची प्रथा होती. पुन्हा एकदा असे की यात गरीब-श्रीमंत असा भेद फारसा नव्हता. आणि हे वर्षानुवर्षे, शतकानुशतके चालत आलेले होते. फार तर मरीआईचा फेरा आला, महामारी आली, पटकीची साथ आली, अशा गोष्टी फक्त सांगोवांगी उरलेल्या होत्या. देवीच्या प्रकोपातून उरलेल्या लोकांच्या चेहऱ्यांवर आणि अंगांवर टिकल्या दिसत. काहींच्या डोळयात पांढरे फूल पडलेले दिसे. हातपाय वाकडे झालेली, लंगडी-पांगळी माणसे सहज दिसत.

आता सारे पुष्कळच बदललेले आहे. आता तुम्ही ओढ्याकाठी झिरा किंवा प्रमाणभाषेत सांगायचे तर झरा खोदू शकत नाही. त्या ठिकाणी आता इतका सडका वास असतो की ती कल्पनाही तुम्ही करू शकत नाही. विकतचे बाटलीबंद पाणी हा आपल्या सुरक्षित जगण्यासाठीचा एक हुकमी आधार हल्ली आपण मानतो. जेवण करताना शहरातील आपला फ्लॅट असो वा बंगला; आपण आपली सगळी दारे बंद करूनच जेवतो. कुत्री, मांजरे अशा फुटकळ प्राण्यांचा निष्कारण उपसर्ग आपल्याला पोहोचत नाही. ती आपण पाळलेली असल्यास अलाहिदा. ते तसे निदान मी ज्या सेमीअर्बन गावात राहतो, तिथे तितके प्रतिष्ठित नाहीय. ज्यांच्यात असेल ते त्यांच्या कुत्र्या-मांजरांना रस्त्यात सोडत नाहीत. ते

त्यांना त्यांच्या राहणीमानाच्या हिशेबात अगदी स्वस्तात मिळणारे टाकावू चरबीयुक्त गोमांस प्रेमपूर्वक खाऊ घालून लठ्ठ थुलथुलीत ठेवतात. त्यांचे खाणेपिणे, हिंडणेफिरणे, अंघोळपांघोळ आणि शौच-अशौच यांची उत्तम बडदास्त ठेवतात. कोणतीही भाजी किंवा आणखी काहीही ; यास बाजारमूल्य आहे. फुकट कोणीही कोणालाही काहीही देत अथवा घेत नाही. शेतकरी सुद्धा हल्ली भाज्या, फळे यांना अनेक इंजेक्शने देतात. साधे केळ सुद्धा हल्ली नैसर्गिक पिकलेले मिळत नाही. गाया-म्हशींना दुधासाठी इंजेक्शने देतात. सगळ्या प्रतिष्ठित दूधसंस्थातील दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ यांच्यात दुधाचा रंग फक्त असतो. सत्त्वयुक्त बाकी सारे काढून घेतलेले असते. सुवासिक रंग, सुवासिक फवारे असे सारे हल्ली उत्तम कृत्रिम उपलब्ध असते. साखर आणि रंग घातलेल्या गडद तपकिरी रंगांच्या म्हणजे कॉफीकलर अमेरिकन सोड्याच्या बाटल्यांनी -त्यास कोकाकोला म्हणतात- दुनियेतल्या साऱ्या लहान मुलांना लठ्ठ बनवित जमिनीतील शुद्ध पेयजलांचे स्त्रोत खलास करत आणलेले आहेत. अतोनात प्रमाणात तयार होणाऱ्या अमेरिकन डुकरांच्या केवळ फेकून देण्याच्या लायकीच्या चरबीस तिथल्या मल्टीनॅशनल कंपन्यांनी जगभर गि-हाईके तयार केलेली आहेत. उदाहरणार्थ, सामोआ नावाच्या देशात सारे आलबेल असताना तिथल्या लोकांना या चरबीची चट लावून लठ्ठ करत चाळीशीतच मरण पत्करण्याला भाग पाडले आहे. शक्य होईल त्या मार्गाने पैसा मिळवणे हेच एकमेव उद्दिष्ट प्रतिष्ठित झालेल्या या जमान्यात मानवी सौहार्द आणि भ्रातृभाव लयाला गेले आहेत. माओच्या चीनने कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारांना आदर्श टांग मारून हल्ली अशा अनेक बाबतीत अमेरिकेसही मागे टाकले आहे. प्लॅस्टिकचा चिनी तांदूळ सुद्धा मिळतो, अशी बोलवा आहे. कोणत्याही वस्तुसारखे काहीही तंतोतंत चिनी बनावटीचे कुठेही सहज मिळते. ते देशी बनावटीचे म्हणून लेबल ठेऊन आपली देशभक्ती शाबूत ठेवण्याची विद्या सुद्धा या चिनी बनावटीने तंतोतंत आत्मसात केलेली आहे. शस्त्रास्त्रे, औषधे, अन्नपदार्थ, खेळणी; अशा आणि यासारख्या साऱ्या बाबीत विक्री करताना समुद्रात खळबळ करून मासे पकडावेत तसे दुनियेतल्या गरिबांना पकडून, पिळून, चरकातून उसाला पिळून त्याचे चिपाड करावे तसे दुनियेतल्या तमाम गरिबांच्या जगण्याचे चिपाड करण्यात येत आहे. दुनियेतील मध्यमवर्गास भावनिक अफिमी अंमलात ठेवून बाकी गरिबांना नष्ट करून गरिबीचे निर्मूलन करण्याचा उद्योग प्रचंड जोरात आहे. नष्ट होणारा गरीब हा जात्यात आहे तर आपण फक्त सुपात आहोत, हे या मध्यमवर्गाच्या ध्यानात येत नाही. कारण तोच तात्पुरत्या भौतिक सुखाचा अफिमी अंमल. कापण्याच्या आधी डुकरास उत्तम खाऊपिऊ घातले जाते, तसे हे आहे. काही मुठभर लोक बाकी सगळ्या मानवजातीचे जिणे वेठीस धरून तिला पूर्णतः नाहीशी करण्याच्या तिठ्यावर घट्ट उभे आहेत. या पृथ्वीवर कुठेही गरीब असणे अलक्षित, घृणास्पद आणि नगण्य झाले आहे. जगण्यासाठीच्या साध्या अन्नास मोताद झालेली अलक्षित माणसे असंख्य आहेत. ते कोणतेही आवाज न करता गुप्तपणे जगतात आणि गुप्तपणेच मरतात. त्यांचा रुदनस्वर कुठेही व्यक्त होत नाही. पण म्हणून तो नसतो, असे नव्हे. हे रुदनस्वर आपल्या कानांच्या ऐकण्याच्या क्षमतेच्या वीस हट्र्झ ते वीस किलोहट्र्झ मर्यादांच्या पल्याड गेलेले असतात. किंवा; खरे तर आपण त्या स्वरांना त्या मर्यादांच्या पल्याड हाकललेले असते. किंवा ते ऐकू येणार नाहीत अशा रीतीने आपण

आपल्या ऐकू येण्याचा वर्णपट बदलून घेतलेला असतो. ते जे आणि जसे जगतात, तेच मुळात अतर्य आणि भयचकित करणारे असते. असो.

गावात शिरताना असे इतके उच्च कोटीचे विचार मनात आले नव्हते. पण एक प्रकारचे एकाकीपण आणि परकेपण मनात दाटून आले. आपले आता इथे कोणीही नाहीय आणि आपले असे इथे जे काही होते, ते सारे काळाने खाऊन टाकलेले आहे, असे मनात आले. मी इथे फारसे कोणालाही न सांगता आलो होतो. व्यक्तिगत असा कोणाशी संबंध फारसा उरलेला नव्हता. आमच्या भावकीतल्या ज्या इसमास फोन करून मी इथे आलो होतो, त्याला फोन केला. तो म्हणाला, 'तातडीचे काम निघाले म्हणून मला बाहेरगावी जाणे भाग पडले आहे. पण ज्यांच्याकडे वंशवृक्षाचे झाड आहे, त्यांना मी आपल्या कामाविषयी बोललेलो आहे. ते आपणास सहकार्य जरूर करतील.' आमच्या मळ्यातील त्यांच्या वस्तीवर मी गेलो तेव्हा ते गृहस्थ तिथे होते. ते थोरल्या घरातील होते. ते म्हणाले, 'असे कोणतेही झाड आमच्याकडे नाही. पण पेशवाईच्या अस्ताच्या सुमाराला आपला जानराव नावाचा पूर्वज इथे आला होता. तिथून आपला वंश इथे सुरू झाला. त्याच्या आधीचे त्यांना काहीही माहीत नव्हते. पण तितके तर माझे वडील माणकोजी सातपाटील यांनी मला माझ्या अगदी लहान वयात सांगितलेले होते. त्यामुळे त्या गृहस्थास धन्यवाद देऊन मी निघालो तेव्हा ते म्हणाले, 'तू मोठी कीर्ती मिळवलेली आहेस आणि आपल्या कुळीचे नाव काढले आहेस, याचा आम्हाला अभिमान वाटतो.' ते खोटे आणि औपचारिक होते आणि त्यात जीव नव्हता. शंभुराव याच्या खतपुराड वंशातील कोणी असा झेंडा लावावा याचे आश्चर्य आणि वैषम्य त्यांच्या नजरेत स्पष्ट दिसत होते. मी मुळात कसलाही झेंडा लावलेला नव्हता. पेपरात नाव छापून येणे आणि बातम्यात कुठे तरी कधी तरी नाव येणे, हे त्यांना फार थोर वाटत होते. आणि त्याचे दुःख त्यांना होते. माझ्या लहानपणी या लोकांनी आमची बांधबंदिस्ती, पाण्यासाठी रस्ता देणे यावरून केलेली अडवणूक मला आठवत होती. माझ्या निकटच्या भावकोत म्हणजे शंभुराव याच्या खतपुराड वंशात तर याहून वाईट परिस्थिती होती. त्यातले जे रस्त्यात दिसले त्यांनी, 'कव्हा आला?' असा पेटंट प्रश्न फक्त विचारला. मी वयस्क होतो आणि तरुण लोकांना माहीतही नव्हतो. ते मला फार बरे वाटले. पाटाच्या बारमाही पाण्याने बदललेल्या सुजट समृद्धीच्या या गावात मी अनोळखी झालो होतो, हे मला एखाद्या संरक्षक कवचासारखे वाटले. मी या गावातून माझ्या वयाच्या सोळाव्या वर्षी शिक्षणासाठी बाहेर पडलो, तेव्हा अतोनात दारिद्र्य आणि सततची सर्वप्रकारची भूक हे इथल्या जगण्याचे वास्तव होते. त्यानंतर मी स्वतःला मुळापासून इथून उपटून घेऊन बाहेर कायमचा रुजलो होतो. आता पाण्याच्या सोयीमुळे भौतिक समृद्धी आलेली होती. आता माझा इथे काहीही संबंध उरलेला नव्हता. मनात वाटले, आपल्या लहानपणीचे जुने, भुकेलेले गाव संपले याचे आपल्याला दुःख आहे की काय? पण तसे नव्हते. त्या जुन्या भुकेल्या गावात मी रुजलो नाही. मला ते आपले वाटले नाही. अन् आता तर हे पुरते वेगळे सुजलेले गाव ; याच्याशी आपला काय आणि कसा संबंध असू शकतो, असे मनात आले. माझ्या आईच्या नात्यातल्या अनेक स्त्री-पुरुषांनी मला भरभरून प्रेम दिले होते. तरीही मी इथे रुजलेलो नव्हतो. आता त्यातले कोणीही उरलेले नसेल. त्यांच्या पुढच्या पिढ्या असतीलच. पण त्यांना मी कोण हे कशासाठी माहीत असेल? आणि

मी तरी त्यांच्याशी कुठे आणि किती संबंध ठेवला होता? जगण्याच्या संघर्षात इथून बाहेर पडणे, ही माझी सगळ्यात तातडीची गरज होती. तेव्हाच मी त्या सगळ्यांच्या स्नेहल ओलीचा रस शोषून निर्मम बाहेर पडलो होतो. तेव्हा, आता आपले इथे कोणी उरले नाही, अशी तक्रार करायचा हक्क मला कुठे उरतो?

नंतर अगदी थोड्याच दिवसांनी मी करंजे या गावी गेलो. हे गाव आता सातारा शहराचा भाग झाले आहे. वाढत्या लोकसंख्येच्या दबावाखाली मोठी शहरे शेजारच्या बारक्या बारक्या गावांना गिळत असतात, त्यातला तो प्रकार होता. तिथे कोणी सातपाटील आहेत का, याची चौकशी केली तर म्हणाले, 'अशा आडनावाचे इथे कोणीही नाही. नजीकच्या भूतकाळात सुद्धा कोणी असतील असे वाटत नाही.' मी म्हणालो, भीमबाई सातपाटील म्हणून एक स्त्री होती. तिचा बाप दसरत सातपाटील हा या गावात स्थायिक झालेला होता. तो पानिपतच्या युद्धात लढून परत आला आणि इथे स्थायिक झाला, असा उल्लेख भीमबाई हिच्या आत्मवृत्तात आहे. ते म्हणाले, 'असेलही. पण इतक्या जुन्या गोष्टी आता कोणाला सांगता येणार? ते लोक कदाचित आणखी कुठे गेले असतील.' मला अँथनी ब्लॅकस्मिथ याने केलेल्या उद्योगाची आठवण झाली. मी जनगणनेचे अहवाल पाहिले. ते ब्रिटिशांची राजवट लागू झाल्यानंतरचे होते. त्यात या गावात सातपाटील आडनावाचे लोक होते, असा कुठेही धागा सापडला नाही.

वाटले, भीमबाईने आत्मवृत्त लिहिले होते की कादंबरी? म्हणून ते पुन्हा वाचले. अगदी बारकाईने वाचले. ते लेखन इतके सरळ, साधे होते की त्याविषयी असा संशय घेण्यास काहीही जागा नव्हती. तिच्या त्या आत्मवृत्ताचा धागा घेऊन काळात आणखी मागे जाण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून मी खराडी येथे गेलो. खराडी चंदननगर हे आता पुणे शहराचा भाग झाले आहे. तिथे फार दाट लोकवस्ती आहे. मी अशी अशी माहिती हवी, असे काही लोकांना म्हणालो तेव्हा त्यांनी मला महेशदादा पठारे यांना भेटण्याविषयी सुचविले. महेशदादा हे तिथले बडे प्रस्थ होते. मोठे जमीनदार होते. गावाचे पाटील होते आणि गुंठे-पाटीलही होते. आणि पुष्कळ जमीन विकूनही वाया न जाता आब राखून मातब्बर उरलेले होते. अजूनही त्यांच्याकडे बरीच जमीन होती आणि तिची किंमत अर्थातच कोटींमध्ये होती. त्यांची पारंपारिक तालीम होती. एक मोठे नवीन क्रीडासंकुल कोणा पठारे-पाटील यांच्या नावे तिथे वसविलेले होते. ते म्हणाले, 'या गावाची पाटीलकी पूर्वापार पठारे यांची आहे. हे गावच मुळी आमच्या पूर्वजांनी वसविले आहे. ही तालीम आमची पारंपरिक आहे. कुस्तीचा षौक आमच्यात अनेक पिढ्यांपासून आहे. आता तो जरा पातळ झालेला आहे. पण संपलेला नाहीय. भोसरी येथील लांडगे-पाटील मंडळी आमच्या नात्यातील आहेत. तिथेही तुम्हाला पठारे लांडगे तालीम दिसेल.'

'तुमचे पूर्वज इथे कधी आणि कुठून आले?' 'पेशवाईच्या सुद्धा आधी, बहुतेक शिवाजी महाराजांच्या सुद्धा

आधी, आमचा पूर्वज इथे आलेला आहे, असे सांगतात. अर्थात हे सांगोवांगी आहे. आमच्याकडे काहीही पुरावा नाहीय. पण आमचा पूर्वज वांबोरी येथून या गावी आलेला आहे असे वाडवडील सांगत आलेले आहेत.'

'वांबोरी?'

'हां. तुमच्या नगर जिल्ह्यातच आहे ही वांबोरी. हल्लीच्या राहुरी तालुक्यात. मी तिकडे जाऊन आलो. तिथे पठारे आहेत. पण ते पटारे आडनाव लावतात.'

महेशदादा मला एके ठिकाणी घेऊन गेले. ती ढासळलेल्या बुरुज आणि भिंती यांची खंडहर जागा होती. ती साऱ्या बाजूंनी नव्याने बांधलेल्या अनेकमजली इमारतींनी वेढलेली होती.

'हे असे कसे राहिलेले आहे? कोणाचे आहे?'

"जुन्या दफ्तरात ही जागा पेशवे सरकारच्या मालकीची म्हणून

दाखवलेली आहे. म्हणून सध्या ही सरकारी मालकीची मानली जाते.'

'इथे कधी काळी मोठी गढी असावी असे वाटते. मी वेरुळ येथे मालोजीराजे भोसले यांच्या गढीची जागा म्हणून दाखवली जाणारी एक जागा काही वर्षांपूर्वी पाहिली होती. तसा फलक तिथे होता. प्रत्यक्षात ती हागणदारीची जागा म्हणून वापरली जात होती. आता तर तीही तिथे उरलेली नाही. भोसले हे वेरुळचे पाटील, हे तुम्हाला माहीतच असेल. तिथल्या घृष्णेश्वराच्या देवळात भोसल्यांनी दिलेल्या दानांची माहिती कोरलेली आहे ; म्हणतात. मालोजीराजे हे छत्रपती शिवाजी राजाचे आजोबा, हे तुम्ही जाणता. त्यांचे ते सारे खंडहर होऊन आता लुप्त झाले आहे. तुमची ही खंडहर जागा सुद्धा काही दिवसांनी लुप्त होईल, असा माझा कयास आहे.'

"तसे होऊ नये असा आमचा प्रयत्न आहे. कारण इथेच शिवरामबावा नावाच्या संताची समाधी आहे. या समाधीसमोर पूर्वी एक विठ्ठल-रखुमाईचे देऊळ होते, असे सांगतात. ते जमीनदोस्त झालेले आहे. पण तिथल्या मूर्ती आमच्या घरी आहेत. त्या आमच्याकडे का आहेत, हे सांगायचे तर आम्ही इथले पाटील पूर्वापार आहोत, म्हणून परंपरेने ती आमच्याकडे आलेली असेल, असे मला वाटते. माघ शुद्ध बीजेच्या दिवशी इथे शिवरामबावांच्या नावाने मोठी जत्रा भरते. आम्ही त्यांच्या समाधीचा जीर्णोद्धार करणार आहोत. 'शिवरामबावा समाधी ट्रस्ट', या नावे एका ट्रस्टची नोंदणी आम्ही धर्मादाय आयुक्ताकडे केली आहे. सरकारने ही जागा ट्रस्टला द्यावी असे आमचे प्रयत्न आहेत. पुढे शक्य झाल्यास पना करण्याचा

विठ्ठल-रखुमाईचे मंदीर बांधून तिथे या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा आमचा इरादा आहे.'

समाधीची जागा होती. एक उघडा चौथरा होता. त्यावर मध्यभागी दगडात घडवलेल्या दोन पादुका होत्या. त्या शिवरामबावा यांच्या समजायच्या. चौथऱ्याखाली बावांची समाधी होती, अशी श्रद्धा होती.

महेशदादा उत्तम शिक्षित होते. दणकट मराठा होते. श्मश्रू करणारे गुळगुळीत होते. त्यांच्या बोलण्या-वावरण्यात त्यांच्या शब्दांचे वजन सहज विलसत होते. आपण म्हणतो, ते आपल्याला नक्कीच शक्य आहे, असा आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यात होता. ते म्हणत होते, ते सारे इथे होईल, यास काहीही अडथळा येणार नव्हता. त्यांच्या त्या आत्मविश्वासाने मी इतका पाघळलो की, साहेबराव आणि आरेनाबाई यांना, शिवरामबावांकडून, आपल्या मुलखाची आठवण म्हणून. असे तळाशी लिहिलेली विठोबा रखुमाईची मूर्ती माझ्याकडे आहे, असे त्यांना सांगण्याचे माझ्या अगदी ओठांवर आले. पण

ते मी मोठ्या प्रयासाने दाबले. मी स्वार्थी होतो. मला अधिक माहिती हवी होती.

सरळच होते. साहेबराव आणि आरेनाबाई यांचा शिवरामबावा यांचेशी संबंध होता. बावांची समाधी खराडीत होती. साहेबराव आणि आरेनाबाई कोणत्या तरी परक्या मुलखात गेले होते. ते खराडी मधूनच त्या परक्या मुलखात गेले होते. त्यांना आपल्या मुलखाची आठवण म्हणून बावांनी ती विठोबा-रखुमाईची मूर्ती भेट दिली होती. शिवरामबावांचे ठीक. त्यांची समाधी खराडी येथे होती. पण हे साहेबराव आणि आरेनाबाई कोण? ते कुठले कोण? महेशदादा म्हणाले, 'त्यांचा पूर्वज वांबोरी या गावाहून खराडी येथे आला होता.' सातपाटलांशी संबंध नसेल सुद्धा. पण या पठारे-पाटील मंडळींचा शिवरामबावांशी संबंध असेल. ते वांबोरीहून इकडे आलेत तर आपण तिकडे जाऊन यायला काय हरकत आहे, असे माझ्या मनात आले.

मी वांबोरीला गेलो. त्या गावात उतरून रस्त्यात हिंडताना हे मुळात आपलेच गाव आहे, हे सगळे लोक आपल्या ओळखीचे आहेत, ते आपले सोयरे आहेत, असे चमत्कारिकपणे माझ्या मनात उमटले. त्याला काहीही अर्थ नव्हता. माझ्या आयुष्यात मी पहिल्यांदाच त्या गावात गेलो होतो. ते गाव, तिथले लोक, माझ्या ओळखीचे; माझे सोयरे असण्याची काहीही शक्यता नव्हती. तरीही तसे मला वाटले. याचे कारण मी माझ्या पूर्वजांच्या दुनियेची मुळे शोधत होतो. आणि ती तिथे आहेत असे मला वाटत होते.

त्या गावातले रस्ते, तिथले वाडे, तिथले विठ्ठल मंदीर; हे सारे आपल्या ओळखीचे आहे, आपण पिढ्यान्पिढ्या इथे राहात आलेलो आहोत, असे माझ्या मनात उमटत राहिले. साल्पी या माझ्या जन्मगावात माझे काहीही आणि कोणीही उरलेले नाही, ही भावना कुठे आणि या वांबोरी या गावी मी आयुष्यात पहिल्यांदाच गेलो तर तिथे हे काय? हा कोणत्या जन्मीचा पसारा माझ्याभोवती घुटमळत आहे? वाटले, हे मूर्ख आहे. या गावात येऊन आपण जास्त भावनिक झालो आहोत. यापेक्षा याला वेगळे स्पष्टीकरण नाहीय. नेहमीप्रमाणे कोणीही सातपाटील तिथे नव्हता. एका माझ्या साल्पी गावाखेरीज कुठेही कोणताही सातपाटील मला भेटत नव्हता. तिथे पटारे होते. त्यांना त्यांचा कोणी पूर्वज खराडी येथे गेलेला माहीत नव्हता. मी महेशदादांनी मला सांगितलेले तिथे अनेकांना सांगितले. ते म्हणाले, 'असेल सुद्धा. आपण मराठे लोक. पुष्कळ कारणांनी पुष्कळ कुठे कुठे जात असतो आणि कुठे कुठे स्थिरावत असतो. पण त्याचा इतिहास असा काहीही नसतो. तो लिहिण्याची आपली पद्धत नाही. त्याला आपल्या नजरेत महत्त्व नाही. कारण, काय फरक पडतो? आपण कुठेही गेलो तरी आपला मराठधर्म असतोच.' अशा बिनतोड युक्तिवादापुढे मी नामोहरम झालो आणि नामुष्की घेऊन संगमनेर क्षेत्री परतलो.

हे सारे वर्तमान मी माझा ब्रिटीश मित्र आणि भीमबाई सातपाटील हिच्या द्वारा माझा नातेवाईक असलेला थोर समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ रिचर्ड लेसिंग यास ई-मेल द्वारे कळवत होतो. तो म्हणत होता,

"It seems you are going back in time. It is nice to explore one's roots. I am sure; you will learn something out of it. I know what you will know. But, I am not going to tell you that. I am holding it back for the time being. A creative artist like you will come to a very straight- forward conclusion.

Anyway, do me a favor and continue to tell me about your exploits in details, as you are doing at present. That might possibly help me, directly or indirectly, to understand your country and your people. Since your departure, I have been working very closely and in a disciplined manner on the early settlement of Maharashtra. My work and your exploits might complement each other. I shall continue to share my axioms and hypotheses with you and, I hope; you will do the same with your exploits.

इंग्लंडातून परतल्यापासून रिचर्ड लेसिंग याच्याशी जसा माझा संपर्क सुरू होता, तसाच तो अँथनी ब्लॅकस्मिथ याच्याशी देखील होता. ते दोघे एकमेकांपासून खूप वेगळे होते. त्यांची दुनिया एकमेकांना स्पर्श करणारी नव्हती. ते दोघे स्वतंत्रपणे मला भेटले आणि त्यांनी माझ्याशी आपले आपले नाते स्पष्ट केले. त्यातून त्या दोघांना आपण एकमेकांशी संबंधित आहोत हे कळले असेलच. तरीही त्यांच्यात तितका संपर्क सुरू झालेला नव्हता; नसेल, इतके ते एकमेकांपासून भिन्न होते. ते एकमेकांना भेटले असतीलच. पण त्यांच्यात संवाद सुरू झाला असावा, असे मला जाणवले नाही. पण माझ्याशी त्या दोघांचा स्वतंत्रपणे ई-मेलद्वारे संवाद असे. खेरीज कधी कधी 'व्हाटस्अप'वरून आम्ही एकमेकांशी व्हिडीओ-संपर्कदेखील करत असू. पण म्हणून त्यांचा एकमेकांशी तसा संपके होता किवा असावा असे मला जाणवले नाही. त्यापाठी कदाचित लोकप्रिय लेखकांविषयी रिचर्ड याची धारणा आणि विद्यापीठातील पढिक विद्वान मंडळीविषयी अँथनी याची धारणा; यांच्यातले अंतर कारण असेल. ते जे काय असेल ते असो. पण दोघांचाही माझ्याशी संपर्क होता. मात्र तो माझ्या बाजूने सुद्धा रिचर्ड याच्याशी अधिक मोकळा आणि सतत होता आणि अँथनी याच्याशी जरा औपचारिक आणि तितक्यास तितका होता, असे मला वाटते. याचे कारण कदाचित आमच्या जगण्यातील आर्थिक स्तराच्या भिन्नतेत असेल. रिचर्ड हा अगदी माझ्यासारखा गबाळा, मध्यमवर्गीय आणि आपल्याला आपल्या आयुष्यात काय करायचे आहे आणि काय करण्यातून आपल्याला आपल्या जगण्याचा आनंद मिळतोय, हे सापडलेला होता. अँथनी हा यशाच्या खुशामदीद जाजमात अडकून पडलेला होता. त्या जाजमाची त्याला सवय झालेली होती. त्याला तिथून खाली उतरून जमिनीवर यायचे होते. पण त्याला तसे करू दिले जात नव्हते. आणि त्याला स्वतःलाही त्याची भीती वाटत होती. म्हणूनच त्याला भारतात; एका अनोळखी देशात यायचे होते. इथेही त्याचे वाचक असतीलच. पण एक व्यक्ती म्हणून त्याला ओळखणारे तितके नसतील. ज्या गावाखेड्यांमधून त्याला हिंडायचे होते तिथे तर नक्कीच नसतील. त्याला महाराष्ट्रात येऊन उल्फीची अधिक माहिती घ्यायची होती. एक व्यक्ती म्हणून स्वतःविषयी तिने सारे तिच्या पुस्तकात उत्तम लिहिले होते. पण ती जिथे जिथे राहिली त्या जागा, ती ज्या लोकात जन्मली ते कोल्हाटी जातीचे लोक, त्यांच्या प्रथा, देवस्थाने, आचारपद्धती; कोल्हाटणींना ठेवणारे शेठ लोक, संगीत बाऱ्या, अंगाचे कसब वापरणाऱ्या स्त्रिया, अशा कितीतरी गोष्टी त्याला इथे येऊन प्रत्यक्ष पाहता आल्या असत्या. ते सारे पाहणे, अनुभवणे, त्या साऱ्याचे आंतरिकीकरण करणे ; यातूनच त्याला त्याच्या कादंबरीचा रस्ता दिसणे शक्य झाले असते. माझ्या मते, अर्थात, हे सारे वरवरचे आणि प्राथमिक. पुढे लिहिणाऱ्याचा ज्याचा

त्याचा रस्ता. तिथे लिहिणारे म्हणून आपण एकटे असतो. आणि प्रत्येक लिहिणाऱ्याचा रस्ता वेगवेगळा असतो. अन् तो इतका गुंतागुंतीचा असतो की, ज्याचा त्याला सुद्धा, काही एका मर्यादेनंतर, तो असा असा; असे सांगता येत नाही.

अँथनी आला आणि दक्षिण मुंबईतील सुप्रसिद्ध ताज हॉटेलात येऊन उतरला. त्याच्याशी माझी ठरलेली अपॉइंटमेंट संध्याकाळी सात वाजताची होती. त्या हिशेबाने मी संगमनेर येथून निघून नाशिक येथे बस बदलून निमआराम गाडीने दादर येथे पोहोचलो. तिथून लोकल घेऊन बोरीबंदर किंवा व्हिक्टोरिया टर्मिनस किंवा हल्ली ज्यास छत्रपती शिवाजी टर्मिनस म्हणतात तिथे उतरलो. तेव्हा संध्याकाळचे पाच वाजले होते. मला जोरदार भूक लागली होती. कारण सकाळी घरातून निघून जवळपास नॉनस्टॉप मी तिथे पोहोचलो होतो. मला त्या भागातील बडे मियाँ नामक सुग्रास सामिष भोजन देणाऱ्या जागेची आठवण झाली. ही जागा ताज हॉटेलच्या मागच्या बाजूस आहे, हे मला आठवले. तिथे गेलो तर ते बंद होते. ते संध्याकाळी उशिरा सुरू होऊन दीर्घ रात्रीपर्यंत चालू असते, अशी माहिती मिळाली. म्हणून रस्त्यावर तात्पुरते काही मिळते काय, अशा हिशेबाने पाहणी करताना मला अनेक हातगाड्यांवर बटाटेवडे आणि सामोसे मोठ्या प्रमाणावर तळले जात असल्याचे दिसले. त्यांचा वास तिथल्या दाट आणि उंच इमारतींनी कोंडलेल्या बंदिस्त आसमंतात घनदाट विहरत होता. मी एका गाडीजवळ गेलो आणि दिसते ते मिळेल काय अशी पृच्छा केली असता नकार मिळाला. तेव्हा आश्चर्य वाटून मी, असे का, असे का असे विचारले असता उत्तर आले की, हा माल कोणत्या तरी लग्नातल्या व-हाडासाठी बनविला जात होता. तो तिकडे तातडीने पाठविला जाणार होता. मी म्हणालो की, 'मी आपणास उचित दाम देण्यास तयार आहे, तर तुम्ही हे मला का नाकारता?' म्हणाले, 'वेळ नाहीय. आपण हला.' मी म्हणालो, 'तुम्ही हे रस्त्यावर बनवत आहात आणि रस्त्यावर उभ्या माणसास नाकारत आहात, हे तुम्हास शोभत नाही.' त्यावर त्यांनी खांदे उडविले आणि ते आपल्या विहीत कार्यात मग्न झाले. त्यामुळे मी नामुष्क होऊन विमनस्क उभा असताना माझा सेलफोन वाजला. तेव्हा सुबक आंग्लभाषेत कोणीतरी सांगितले की, 'मी ताज हॉटेलातून बोलत आहे. अँथनी ब्लॅकस्मिथ नामक एक इंग्रज पर्यटक आमच्याकडे उतरले आहेत आणि ते आपणाशी संपर्क करू इच्छितात. तर त्यांना आम्ही आपणाशी जोडून देऊ शकतो काय?'

'अवश्य जोडू शकता,' मी अत्यानंदाने औपचरिक म्हणालो.

'अरे कुठे आहेस तू, देबनाथ! मी किती आतुरतेने तुझी वाट बघतोय. इथल्या वापरासाठी वेगळा सेलफोन हे लोक मला अरेंज करून देतीलच. पण तोवर दम निघेना म्हणून तुझ्याशी या हॉटेलच्या काऊंटरवरून संपर्क करायचा मी सारखा प्रयत्न करतोय. कुठे आहेस तू आता?'

'तुझ्या हॉटेलच्या पार्श्वभागी पोहोचलेलो आहे. तू सातची वेळ दिली होती म्हणून वेळ घालवतोय.'

'तो अजिबात घालवू नकोस. लगेच ये. फ्रंटला ये. मी ह्या लोकांना सांगून ठेवतो. ये ये. वेलकम.'

हा साला माझ्या देशात येऊन मला वेलकम करत होता. पण ते ठीकच होते. ब्रिटीश

लोक अत्यंत फॉर्मल. आपण रोकठोक. हे उपचार आपल्या स्वभावात नाहीत. मी त्याने सांगितले तसा फ्रंटला गेलो. परिधानाच्या अंगाने सुटात नसलो तरी पायात बूट होते. मला अनवाणी मकबूल फिदा हुसेन याची आठवण झाली. पायात बूट नसल्याने त्याला अशा पंचतारांकित हॉटेलात प्रवेश नाकारण्यात आलेला होता. तसेच नाशिक येथील उद्योगपती देवकिसन सारडा यांनी त्यांच्या पायात चपला असल्याने त्यांना कोणत्या तरी अशाच हॉटेलात प्रवेश नाकारण्यात आल्याचे त्यांनी कुठेतरी पेपरात लिहिले होते; हे आठवले. मी दबकत आत शिरलो. मी अमुक अमुक आणि मला या या इसमास भेटायचे आहे, असे मी सांगितले. तेव्हा त्यांना ती कल्पना देण्यात आलेली होती, असे दिसले. एक इसम मला औपचारिक तत्परतेने खालीवर करणारा विद्युत पाळणा उर्फ एलेव्हेटरच्या समोर घेऊन गेला. तिथून थेट वर गेलो आणि नम्रतापूर्वक वाजविल्या गेलेल्या दारावरील घंटीचा प्रतिसाद म्हणून थेट अँथनीच सामोरा

आला. म्हणाला, 'तुझ्यासाठी मी एक सूट बुक केलेला आहे. तिथे जाऊन फ्रेश होऊन तू इकडे येऊ शकतोस.' मी गोंधळलो. म्हणालो, 'मी फ्रेशच आहे. पण मी इथे राहायला आलेलो आहे, असे माझ्या डोक्यात नव्हते.'

"ठीक तर. ये आत ये.'

तो फारच भपकेदार सूट होता. बैठकीची भली मोठी खोली. आत खासगीपण जपणारी बेडरूम. आणि बाकीचे सगळे. मी विदेशात गेलेलो होतो. पण सरकारी खर्चाने होणाऱ्या आमच्या व्यवस्था इतक्या भव्य ठिकाणी तिथेही नव्हत्या. मी स्वतःचा आब राखून तिथे, हे अगदी सहज आहे आणि हे आपल्या परिचयाचे आहे, असे दाखविण्याचा प्रयत्न करत बसलो.

तो म्हणाला, "What will you have?'

मी खेळकर स्वरात म्हणालो, 'यार भूक लागलीय फार. काही तरी लाईट असं खायला पाहिजे.'

हे म्हणताना मी सहजपणाचा आव आणला होता तरी मुळातून मी दबकलेलोच होतो.

अँथनीने तत्परतेने तिथला फोन उचलला. तो त्यात काहीतरी बोलला आणि तो माझ्यासमोर धरत म्हणाला, 'Order whatever you like.'

मी फोनात बोललो. म्हणाले, काय हवे? ओरिएंटल की कॉंटिनेंटल?

म्हणालो, 'थोडेसेच काहीतरी. इंडियन.' म्हणाले, “ओ.के. ओ.के.'

अँथनी म्हणाला, 'तू जरा लवकर पोहोचलास, हे बरेच झाले. कारण त्यामुळे आपल्याला आज एकमेकांशी बोलायला अधिक वेळ मिळेल. एरवी सात वाजता तू आला असतास तर मी तुला फार तर अर्धा तासच देऊ शकलो असतो.'

'का बरं?'

'आठ वाजता मला भेटण्यासाठी काही लोक येणार आहेत. ते माझे वाचक आहेत. वाचकांच्या भेटी मी सहसा टाळत नाही. मी जो काही आहे, तो त्यांच्यामुळेच आहे ना!'

'ठीक आहे ना.' मी उगी राहिलो. 'का रे? गप्प का झालास?' 'छे! छे! म्हणजे कारण असं नाही. उगीचच.' वाचकांची इतकी काळजी घेण्याच्या त्याच्या व्यावसायिक सहजतेने

मी जरा चकित झालो होतो. लिहिणारा तर मीही होतोच. लोकप्रियतेत त्याच्या

पासंगालाही पुरणारा नव्हतो हे खरेच. पण माझ्या वाचकांची इतकी काळजी मी करीत नव्हतो, हेही खरे. कदाचित हा व्यावसायिक वृत्तीतला फरक असेल. पण त्यात त्याला सांगावे असे काहीच नव्हते.

'बरं, कसा आहे तुझा कार्यक्रम ? किती दिवस काढले आहेस?

कुठे कुठे जायचे आहे?' मी उसन्या उत्साहाने विचारले. _ 'ते तू ठरव. गरज असेल तितके दिवस मी थांबू शकतो. पण हे सारे आपण उद्या बोलू ना! तू मागवलेस ते खा. तुझ्या सूटमध्ये जा. पाहिजे ती दारू मागव. जेवण कर आणि झोपी जा. उद्या सकाळी आपण भेटू.'

ही सरळ सरळ सूचना होती. तिथून निघून जाण्याची.

'थुक्स. अरे, ते खाणेही मी तिकडेच मागवून घेतो. भेटू उद्या. रात्रीसाठी शुभेच्छा तुला,' म्हणत मी उठलो. त्याने त्यास तोंडदेखला सुद्धा आक्षेप घेतला नाही. वुल्फीच्या नावाचा उच्चारही झाला नव्हता. पण तो वेगळा विषय होता. ते सगळे उद्यापासून सुरू करायचे असे ठरले होते.

मी माझ्यासाठी मुक्रर केलेल्या सूटमध्ये गेलो. खाणे आले. माणूस हा हत्ती असतो असे गृहीत धरून दिलेले खाद्य. ओरिएंटल. इंडियन. समोर आलेल्या बिलावर आकडा न बघता सही केली. अशा हॉटेलात अन्न हे खाण्यासाठी असण्यापेक्षा फेकण्यासाठी अधिक करून असते. बिल असतेच. तुमचे दिल दुखते का? तसे असेल तर इथे कशासाठी येता? मी तडक दारुची बाटली मागवली. मला आवडणारी ओल्ड मंक रम इथे असण्याची शक्यताच नव्हती. तितके कळत असल्याने, किंवा माझा तो जो काही समज गैरसमज असल्याने मी फोनवर झोकात सांगितले, 'एनिथिंग इन स्कॉच.' त्या ऑर्डरला सुद्धा तो फोनवरचा माणूस हसला असेल. दुनियेतल्या सगळ्या उत्तम समजल्या जाणाऱ्या महागड्या दारू इथे मिळत असतील. त्यात एनिथिंग इन स्कॉच मागणारा मूर्खच. माझ्याजवळ ओल्ड मंकची क्वार्टर होती. ती सोबत ठेवण्याची खबरदारी मी कायम घेतो. स्कॉच येईपर्यंत पुष्कळ वेळ जाईल या हिशेबाने मी तिचा कच्चा जोमदार गल्प घेतला. डोक्यात, मनात आणि काळजात एकाच वेळी तत्पर सत्वर उबदार गरम पसरलं. संध्याकाळच्या एकांतात मला त्याची चाह आणि सवय. त्यामुळे स्कॉच येईपर्यंत नियंत्रित तापमानाच्या त्या बंदिस्त थंड जागेत मी पुरेसा गरम झालो होतो. म्हणूनच बेअरा किंवा वेटर किंवा जे काही त्याला म्हणतात तो, दारू घेऊन आलेला ऐटबाज इसम ; त्याला मी विचारले की, 'माणसांना हत्ती समजण्याची प्रथा इथे असते काय?

हे मी ऐटबाज इंग्रजीत विचारले.' तो हसला. म्हणाला, 'का? का? काय झाले?' हे त्याने मराठीत विचारले.

'अरे! ताजमध्ये मराठी? अन् मी मराठी माणूस, हे तू कसं ओळखलस?'

'आपलं माणूस ओळखायला वेळ नाही लागत सर. मी मुळात अहमदपूर-उस्मानाबादकडचा.'

'पण इंग्रजी तर मोठ्या झोकात बोलतोस.'

'हॉटेल मॅनेजमेंट शिकण्यासाठी इंग्लंडात होतो. घरची जमीन विकून गेलो. तिथे इंग्रजीसकट बाकी युरोपियन भाषाही जुजबी शिकलो. जास्त नाही; खानपान, नम्रता इतकं असं ते असतं. इथं आल्यावर स्वतःचं हॉटेल टाकण्याऐवजी ही फाईव स्टार हॉटेलातली

नोकरी पत्करली. पगार बरा आहे. टिप चांगली मिळते. जमीन कोरडवाहू होती. तिच्यात काय पिकणार? आभाळाकडं हात करत उपाशी मरायचं काम. त्यापेक्षा हे बरं आहे.'

अरे बापरे! चार वाक्यात एक आयुष्यच उभं केलं त्यानं. तेही हसतमुखाने. नो ॲपरंट रिग्रेट्स.

'फारच चकचकीत आहे इथं सगळं.'

'सगळं परदेशातून- म्हणजे युरोपातून येतं इथं. अन्न, पाणी, भाज्या, फळं, मासे, मटण ; सारं.'

'अन् हवेचं काय करता?' तो हसला. उपरोध त्याच्या लक्षात आला.

"हवेचं काय करता येतं सर! त्या त्या देशाच्या हवेतच राहावं लागतं कोणालाही.' मी हसलो. तोही हसला.

तो गेल्यावर मी तातडीने समोर आलेली स्कॉच खोलली. रम काय अन् स्कॉच काय; काय फरक पडतो? एकांतात दारू प्यायलो की मी माझ्याशी फार कोमल आणि विव्हल होतो. तसा झालो आणि उलट सुलट विचार करीत नंतर त्याच्याही पल्याड जाऊन गुरंगटून झोपी गेलो.

अँथनीने हॉटेलकडून शोफरसहित एक मोठी कार हायर केली होती. फॉर्म्युनर नावाची. मी ते गाडीच्या मागे जाऊन वाचले. कारण गाडी बघून ती कोणती, हे मला काही केल्या कळत नाही. आणि कोणतेही नाव असले तरी त्याने मला काहीही फरक पडत नाही. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील रस्ते लक्षात घेऊन या कारची योजना करण्यात आलेली होती, असे शोफर याने मला सांगितले. शोफरचे नाव वीरू. आणखी एक सहाय्यक सोबत होता. त्याचे नाव सधन. दोन्ही नावे हिंदी वळणाची होती. साहजिकच मी त्यांच्याशी हिंदीत बोलू लागलो. ते हसले. वीरू म्हणाला, 'आम्ही मराठी. माझे नाव रवी. त्याचे वीरू केलेय. अन् हा सहादू. त्याचे सधन.' म्हटले, का, तर म्हणाले, 'हिंदी भारदस्त वाटतं. फजलुल्ला वाटतं.' 'हे आणखी काय? मौलाना फजलुल्ला? ते हसले, म्हणाले, 'ते काय नाय. एक आपलं, इंटरनॅशनल फालमफाल. दादा कोंडके स्टाईल.' दोघेही उत्साहाने रसरसलेले होते. कारची सेवा देणाऱ्या कंपनीत काम करत होते. हॉटेलने व्यवस्था केली होती. कार एखाद्या रणगाड्यासारखी भक्कम होती.अंगाला अजिबातही धक्के बसणार नाहीत अशी तिची रचना असावी.अँथनी निवांत होता. सधनच्या हातात itineraries ची कागदपत्रे होती. अँथनीच्या कामाचे स्वरूप, त्याला हव्या माहितीची व्याप्ती, ती मिळविण्यासाठीचे संपर्क माणसे, कलाकेंद्रे, राहण्यासाठीची हॉटेले, असा सारा तपशील त्यात होता. पहिला पडाव साल्पी. तिथे माझा उल्लेख होता. नंतर माझ्या नावापुढे optional असे लिहिलेले होते. इतक्या तपशिलाने एखाद्या हॉटेलने योजना करून द्यावी याचे मला फार आश्चर्य वाटले. पैसे घेतच असतील. पण इतकी तपशिलाने योजना करतात, हे विशेष. योजनेत साल्पी पुरता मी आवश्यक होतो. बाकी optional.

आम्ही साल्पी येथे गेलो. त्याला पठार दाखविले. भोवताली गर्दी होती. ती भली मोठी कार, तो दणकट गोरा परदेशी माणूस. आधी काही माणसे आली आणि ती घवाघवा वाढत गेली. मी आंग्लभाषेत अँथनीला पुष्कळ काय काय सांगत होतो. सधन सगळे रेकॉर्ड करत होता, उत्साहाने फोटो काढत होता. आता जे आणि जसे दिसते, तसे उल्फी असताना

नसेल. हा मुलूख उजाड होता. आता पाटाचे पाणी येऊन हे बागाईत झाले आहे. उल्फीच्या वस्तीची जागा नेमकी सांगता सुद्धा येणार नाही; असे काय काय मी बोलत होतो. तेवढ्यात, हा गोरा कशाला आलाय, तुम्ही काय बोलताय असे प्रश्न मला येत होतेच. त्यांना जमेल तशी उत्तरे देत मी वेळ ओढत होतो. खेरीज सधन आणि वीरू होतेच. तेवढ्यात एक जरा जबाबदार दिसणारे गृहस्थ म्हणाले, "पाव्हणे कुठचे म्हणायचे?' मी सांगितले. म्हणाले, 'गावात चला. आपण त्यांचा सत्कार करू. त्यांच्या बरोबर तुमचा पण करू. तुम्ही आमच्या गावचे भूषण. या निमित्ताने तुमचे सुद्धा पाय या गावच्या पांढरीला लागतील. धरमरायाचे देऊळ उघडायला सांगतो. दर्शन करा. देणगीची कुलूपबंद पेटी आहे तिथे. श्रद्धेने काय टाकायचे ते टाका.' नाही म्हणणे शक्य नव्हते. पण तितका वेळ देणेही शक्यच नव्हते. गाडीच्या वातानुकुलीत हवेतून बाहेर पडून अँथनी यास एक घंटा लोटला होता. तळपत्या उन्हात त्याची त्वचा वितळू लागण्याइतकी लाल दिसत होती. उन्ह, धूळ, कोरडी हवा यांचा इतका ओव्हरडोस पहिल्याच दिवशी मिळाला तर तो एक तर पळून जाईल किंवा त्याला इस्पितळात भरती व्हावे लागेल, असे मला वाटले. तो उत्साहात दिसत होता, पण उन्हाने भाजल्या जाण्याच्या त्रासिक छटा त्याच्या नकळत त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागल्या होत्या.

'ठीक आहे. जाऊया,' मी त्या जबाबदार इसमास म्हणालो.

आम्ही निघालो तेव्हा ते जबाबदार इसम आमच्या गाडीत बसू लागले.

मी त्यांना सुजनतेने म्हणालो, 'आपण आपले काही साधन आणले असेलच.'

'हाये की, मोटारसायकल आणलीय.'

'तुम्ही तिच्यावर बसून पुढे जा. ह्या रथाला बारके रस्ते वj. तुम्ही पुढे जाऊन व्यवस्था करा. आम्हाला थोडा वेळ लागेल.' हे त्या जबाबदार गृहस्थांना पटले.

दरम्यान मी अँथनी यास त्या गृहस्थाच्या प्रस्तावाविषयी सांगितले. तो म्हणाला, 'तू म्हणशील तसे.' म्हणालो, 'आपण हे टाळावे हे बरे. वेळ फार जाईल. मिळणार खास असे काही नाहीय. अशी माणसे तुला आता कैक भेटत राहतील. फार तर दगडी मंदिरातील गारवा अनुभवण्याची ही संधी आहे. पण तीही नंतर कैक मिळेल.' सधन आणि वीरू यांचेही मत माझ्यासारखेच पडले. अँथनी म्हणाला, 'ठीक. निघूया.'

आम्ही मुख्य रस्त्याला लागलो आणि बाहेर पडलो. गाडीतल्या गारव्याने अँथनी अधिक सुरक्षित आणि ताजातवाना झाला. तरीही अधिक कुठे लगेच जावे अशी त्यास इच्छा नव्हती. ते ठीक होते. त्या दिवशी ते संगमनेरला थांबले. पण माझ्या घरी नव्हे, itineraries मध्ये बुकिंगचा उल्लेख होता. मालपाणी क्लब. तिकडे ते उतरले. सकाळी निघताना मला फोन आला. अँथनी याने मी त्याच्यासाठी वेळ दिला म्हणून माझे आभार मानले. तो तिथून परस्पर निघून गेला. तो ये म्हणाला नाही. मी गेलो नाही. माझा फुकटात अधिक वेळ कसा घ्यावा असे त्याला वाटले असेल. आपल्याला तो प्रश्न नसतो. कोणाचाही कितीही वेळ घेण्यास आपणास काहीही दिक्कत वाटत नाही. अन् इतरांना देण्यासाठी सुद्धा तो आपल्याकडे विपुल असतो. आपल्या आणि युरोपी लोकांच्या मनांची घडणच मुळात बरीच वेगळी असते. पुढच्या कामात माझी त्याला गरज वाटली नसेल. ते ठीकच होते. पण मीही त्याला माझ्या घरी बोलावले नव्हते.

पंधरा दिवसांनी अँथनीचा विस्तृत मेल आला. तो हिंदुस्तान सोडून गेला होता. तो सहा दिवस जामखेड, बीड, गेवराई येथील कोल्हाटणीची घरे, अनेक चौफुल्यांवरची कलाकेंद्रे; अशा ठिकाणी राहिला. त्याने त्यांच्यावर भरपूर खैरात केली. त्या बाया तगड्या आहेत. पण त्या अत्यंत अस्वच्छ राहतात. त्या उघड्यावर आडोसा पाहून बेदिक्कत शौचाविधी करतात. त्या पुरुषांना मोहात पाडून लुटतात. त्या स्वस्त कृत्रिम सुगंधी द्रव्ये अंगास लावतात. पण तो वास त्यांच्या शरीरातील घामाच्या वासासमोर कायमच कच खातो. त्यांच्या निकट आपण गेलो की त्यांच्या अंगाला येणारा तो कुबट घामाचा वास आपल्याला नामोहरम करतो. एके ठिकाणी एक स्त्री अँथनी यास फार मोहक वाटली. त्या स्त्रीसही याचा लोभ पडला. एकशय्या करण्यासाठी ते एकत्र आले असता तिने तिचे वस्त्र सोडले असता इतका असह्य घामट वास सुटला की त्याची कामेच्छाच मावळली. त्यातले इंगित त्या स्त्रीस कळले नाही आणि ती त्यास अधिकच लगटू लागली तेव्हा उलट अधिकाधिक मावळतीच्या गर्तेत तो शिरत गेला. नंतर तिने त्याची कठोर निर्भर्त्सना केली. शब्द त्याला कळले नाही. पण अर्थ थेट घुसला. त्या स्त्रियांच्या जगण्याचा अभ्यास आपल्याला शक्य नाही. त्या अनेक इतक्या गलिच्छ जागांवर आपण अधिक काळ राहिलो तर हमखास मरून जाऊ. आपल्याला इतक्यात मरायचे नाहीय. जगणे सुंदर आहे असेच आपण मानतो. तिथले डास आणि पिसवा यांच्या चाव्यात जगणे हा केवळ नरकवासच होय. त्या नरकात मी राहणार नाही. हे लोक डुकराचे मांस खातात. ते काही गैर नाही. कारण मीही ते खातो. ती डुकरे स्वच्छ असतात. त्यांना खाण्यासाठी उत्तम अन्न दिले जाते. पण यांची डुकरे मोकाट हिंडतात. आणि मानवी विष्ठा हा त्या डुकरांच्या खाद्यान्नाचा मुख्य घटक असतो. अशा डुकरांना पकडून, त्यांना मारून हे लोक त्यांचे मांस खातात. मानवी विष्ठा खाणाऱ्या प्राण्याचे मांस खाणारे हे अत्यंत घाणेरडे लोक होत. मी तुझ्या देशाविषयी, तिथल्या माणसांविषयी, असे लिहितो यासाठी मला माफ कर. मला वेगळे लिहिताच येत नाही.

हिंदुस्तान ही एक भली मोठी मुत्री आहे असे पूर्वी निरादबाबू चौधरी यांनी लिहून ठेवले आहे. ते मी प्रत्यक्ष अनुभवले.

त्याच्या या मेलला मी खरमरीत उत्तर देऊ शकलो असतो. युरोपातील लोकही शौचाविधी केल्यावर स्वच्छतेसाठी दगड वापरत ही फार जुनी गोष्ट नव्हे. अन् हल्ली तरी काय ; दगडाची जागा कागदाने घेतलेली आहे; इतकेच. जे लोक रोज साधी अंघोळ करत नाहीत, त्यांनी स्वच्छतेच्या गमजा करू नयेत. तुमचे शेवाळलेले पिवळे दात तुमच्याविषयी काय सांगतात? फ्रान्स देश पायी हिंडताना सात्र आणि सिमॉन द बोव्हा पैसे वाचवायचे म्हणून उघड्यावर कुठेही झोपत. तेव्हा शौचाविधी केल्यावर स्वच्छतेसाठी कशाचा वापर करत, हे सांग. गरीब हा मुळात गरीब असतो. त्याच्यात इंग्लंडातला गरीब वेगळा आणि भारतातला वेगळा असे नसते. जगण्याचे स्तर भिन्न असतील फार तर. हिंदुस्तान हा फार मोठा देश आहे. म्हणूनच इथे गरिबांची संख्याही फार मोठी आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्या जगण्यातली दरी प्रत्यही वाढतच आहे, हे खरे आहे. तू मुंबईत मुकेश अंबानी याच्या घरी जाण्याची संधी साधलीस तर तू स्वतः किती गरीब आहेस, हे तुझ्या लक्षात येईल. कितीही वाईट स्थितीत तगून राहण्याच्या विद्येत हिंदुस्तानी गरिबांनी

केवळ असाधारणच म्हणता येईल अशा दर्जाचे प्राविण्य मिळविलेले आहे. अन् खाण्याचे काय ; चीन, कोरिया, थायलंड, फ़िलिपाइन्स ते सगळे इंडोचायनामधील देश; येथील नागरिक झुरळ, नाकतोडा, साप असे काहीही खातात.

मी हे काहीही त्याला कळवले नाही.

माझ्या देशातील गरीब हे तमाम दुनियेतील गरिबांपेक्षा गरीब आहेत, हे मी मान्यच करतो. पण तसे जगणे केवळ इथेच शक्य आहे. इथली हवा, पाणी आणि अन्न तशी संधी तुम्हाला देते. काही किमान गोष्टींची पूर्तता झाली की तुम्ही इथे जगू शकता. तसे बाकी दुनियेचे नाही. म्हणूनच जगाला मनुष्यबळ पुरविण्याचा मक्ता घेतल्यासारखे इथले लोक मानवी प्रजा निर्माण करतात. बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल, बांगला देश इथून उर्वरित भारतात आणि भारतातून दुनियेत असा त्यांचा प्रवास प्रत्यही चालत

आलेला आहे.

मी एके सकाळी एक भिकारीवजा इसम रस्त्यात खुरडत जाताना पाहिला होता. सकाळची वेळ होती आणि शरीर कार्यक्षम राहावे म्हणून मी रोजचा चालण्याचा भरघोस व्यायाम करून परत चाललो होतो. नित्य मद्यसेवनामुळे अंगात जी विषाक्त द्रव्ये तयार होतात, ती घामाद्वारे बाहेर घालविण्यासाठी प्रामुख्याने मी हा व्यायाम नियमित घेतो. त्याचा किती काळ मला उपयोग होईल हे मला माहीत नाही. कारण कधी तरी माझे शरीर माझ्या व्यसनांसमोर पराभूत होईलच. आणि ते आता फार दूर राहिले नाही, हे मला दिसतेय. तर त्या प्रभाती हा जो इसम; मी म्हणतो तो, रस्त्याने खुरडत चालला होता. तो शहराच्या बस स्टँडच्या दिशेने चालला होता. ते किमान दोन किलोमीटर दूर होते. त्याची-माझी नजरानजर होताच त्याला बघून माझे हललेले मन त्याने जाणले. म्हणाला, 'भाऊ तुम्ही मला उचलून उभा करता का?' त्याला उचलून उभा करायचा तर मला त्याच्या खांद्यात हात घालावे लागणार होते. तो अत्यंत कळकट इसम होता. त्याची त्वचा, त्याचा सदरा, टोपी, विजार; सारे मेणासारखे काळे झालेले होते. त्याच्या कपड्यांवर, त्याच्या त्वचेवर ही घाम, धूळ आणि पराकोटीच्या जीवनेच्छेने अंगातून स्रवणारे मूर्ख तेल यांनी तयार झालेली आणखी एक त्वचा होती. ती हलकेच सोलली असती तर तिच्याखाली त्याची मूळची त्वचा निश्चित दिसली असती. पण ते फार कठीण कर्म साहजिकच होते. त्याच्या जगण्याने त्याला पुरविलेले ते कवच काढणे अशक्यच होते. ती एक अशक्य भिंत होती आणि ती फक्त त्याचीच होती. तो बोलला तेव्हा त्याचे पिवळट दात मला दिसले. बोलण्यासाठी तोंड उघडताना त्याची जीभ आणि टाळू यांच्या दरम्यान लाळेची एक पारदर्शक तार मला दिसली होती. आपल्या आत तयार होणारी ओल काही केल्या बाहेर जाऊ द्यायची नाही अशी कोरफड ज्ञातीतील वनस्पतीसारखी समझदारी त्याने अंगीकारलेली असेल. मी त्याच्या त्वचेवरील ती भिंत, त्याच्या तोंडातील ती दृश्य लाळेची तार आणि त्याच्या डोळ्यातील पिवळी असहाय्यता, यांच्या समोर नामोहरम झालो. मी बोललो काहीच नाही. तिथून जवळ माझे घर होते. घरात उरलेले अन्न असतेच. मी दिसतील त्या सगळ्या पोळ्या, सापडेल ती शिळी भाजी, चटणी, लोणचे सापडेल त्या प्लॅस्टीकच्या पिशवीत घातले. घरातील पाण्याच्या फिल्टरखाली हाती येईल ती प्लॅस्टिकची बाटली धरून ती भरली. आणि ते सारे घेऊन मी पुन्हा रस्त्यावर गेलो. तेवढ्या

वेळात तो खुरडत साडेतीन हात चालला होता. माझ्या हातातील ऐवज त्याने दुरून ओळखला. तो मी घेऊन येईन असे त्याला आधीच कळले होते. मी ते त्याच्या समोर धरण्याच्या आधीच त्याने आपला हात पुढे केला. त्याने कोणत्याही प्रकारे कृतज्ञता व्यक्त केली नाही. तितके त्राणही त्याच्यात उरलेले नसेल आणि नव्हते. त्याने अगदी शांत मायेने त्या पिशवीवरून हात फिरवला. त्याच्याकडे अधिक पाहण्याची क्षमता माझ्यात उरली नव्हती. मी तिथून परतलो. त्यानंतर काही महिन्यांनी तो मला बसस्टँडवर भीक मागताना दिसला. त्यामुळे मी चकित झालो होतो. कारण तो तितके दिवस जगला होता. त्यानंतर आणखी काही महिन्यांनी तो मला तिथेच ; बसस्टँडवर पुन्हा एकदा दिसला. बसच्या बाहेरून हात करून खिडकीतून आत बसलेल्या लोकांकडे भीक मागताना तो मला दिसला. त्याचे ते भिक मागणे केवळ प्रतिकात्मक उरले होते. कारण भीक मागण्याची उर्जा देखील आता त्याच्यात उरलेली नव्हती. तो उभा होता, कारण तो बसलेला नव्हता. तो बसला असता तर तो उठून उभा राहू शकला नसता, इतका तो खंगलेला होता. भीक मागताना कोणी आपल्याला भीक घालील याचा विश्वास देखील त्याने गमावलेला होता. त्याचे हात, त्याची नजर कधीच या विश्वातून बाहेर पडलेली होती. तो केवळ सवयीने हात वर करत होता. भिक मिळण्याची अपेक्षा त्याने गमावलेली होती. तो शरीराने या दुनियेत होता पण मनातून तो इथे उरलेला नव्हता. भीक मिळण्याची, न मिळण्याची क्षिती त्याला उरलेली नव्हती. तरीही हात जमेल तितका उंचावून तो ती मागत होता. त्या नंतर तो मला दिसला नाही. पण तो ही दुनिया सोडून गेला असेल असे अजूनही मला वाटत नाही. जगण्यातले दैन्य माणसाला इतक्या सहजी सोडत असेल असे मला अजूनही वाटत नाही. किंवा दैन्यातल्या जगण्यातले अद्‌भुत आपल्या विचार करण्याच्या मर्यादेच्या फार पल्याड आहे असे मला वाटते.

त्याहीपेक्षा आणखी एक थोर माणूस मी पाहिलेला आहे. जगण्याची ही लढाई आपण हरलो आहोत, असे हात पुढे करून भीक मागणारा ते जाहीर करत असतो. ते तसे असतेच असे नाही. कारण केवळ भीक मागण्याचा धंदा करून करोडोंची माया जमविणारे भिकारीही या दुनियेत आढळतात. तरीही इतरांना फसविण्यासाठी का होईना; त्यांना आपण हरलो असे जाहीर करावे लागते. मी पाहिलेला हा दुसरा इसम या साऱ्याच्या पार पोहोचलेला होता. त्याने कशाहीसाठी भिक मागणेच नाकारले होते. हाही मला रोज फिरायला जाण्याच्या रस्त्यातच दिसला होता. रस्त्याच्या कडेची ती एक अत्यंत गलिच्छ जागा होती. कडेला असणाऱ्या तिथल्या उतरणीत दाट झाडी होती. झाडे प्रामुख्याने बाभळीची होती. उतरण संपताच खाली हिरव्या काळ्या रंगाच्या सडक्या प्राचीन पाण्याचे मोठे डबके होते. समोरच्या कारखान्यातील वापरून फेकलेले पाणी तिथे नित्यशः येत असे. येणारे पाणी आणि बाष्पीभवनाद्वारे हवेत सोडले जाणारे पाणी यांच्यातील समतोल साधत त्या डबक्याने आपली पातळी कधीही बदलू दिलेली नव्हती. खेरीज उतरणीवर रोज कोणीतरी आसपासच्या खानावळींतील उरलेले अन्न ओतून देत असे. कुजलेला पिवळा भात, विविध फळभाज्या आणि पालेभाज्या; असे ते असे. तिथे अनेक पक्षी, कुत्रे ते मोफत सडके अन्न खाण्यासाठी सतत येरझारे आणि घिरट्या घालत असत. तिथे टाकून दिलेले कपडे, चिंध्या असे विपुल असे. अनेक न्हावी त्यांच्या दुकानातील

कापलेले केस तिथे फेकत असत. खेरीज सडके कांदे, बाजारभाव मिळत नाही म्हणून फेकून द्यावे लागणारे टमाटे, वांगे असेही असे. सडण्यासाठी जे जे फेकावे लागते, ते सारे तिथे विपुल असे. आणि ते सारे सुखाने सडत असे. तिथल्या हवेतला कुजका वास कोणाच्याही नाकातले केस जाळण्याइतका प्रमाथी होता. काही मिनिटे तुम्ही त्या हवेत थांबला तर वांतीची भावना हमखास होईल, इतके ते सारे वातावरण अक्षरशः नरकासारखे होते. त्या हवेतच ज्यांचे जीवन फोफावू शकेल असे डास आणि चिलटे यांची तिथे भरमार होती. कुत्री आणि पक्षी यांच्याखेरीज तिथे कातारी, वडारी अशा गरीब जातीतील काही लोक सायकलींवर मोठ्या बादल्या घेऊन येत आणि तिथे टाकलेले अन्न, विशेषतः तो पिवळा भात बादलीत भरून नेत असत. ते तो त्यांनी पाळलेल्या डुकरांना खाऊ घालण्यासाठी नेत असत. एरवी सहसा मानवी विष्ठा हेच ज्यांचे प्रमुख खाद्यान्न असे, आणि जे त्यांना भरपूर भटकंती करून मिळवावे लागत असे, त्या डुकरांसाठी ती मेजवानीच म्हणायची. त्यातून पुष्ट होत अखेर मानवी मेजवानीचा विषय होणे हे अर्थातच त्यांचे भागधेय असे. एके दिवशी तिथे त्या उतरणीवर सकाळी आठ वाजता मी पहुडलेल्या स्थितीतला एक इसम पाहिला. माणूसच होता पण त्याची काहीही हालचाल दिसत नव्हती. कोणीतरी त्या कोणाला तरी मारून तिथे फेकून दिलेले आहे, अशी माझी भावना झाली. रस्त्यात भेटलेल्या एकाला तिथे नेऊन मी ते दृष्य दाखवले. तेव्हा त्याने हात झटकले आणि तो म्हणाला, 'हा माणूस मला माहीत आहे आणि तो मेलेला नाहीय.' तेव्हा मी चकित झालो होतो. नंतर रोज येताना आणि जाताना मी त्या पहुडलेल्या इसमास पाहात असे. त्याच्या जिवंत असण्याची लक्षणे मलाही दिसू लागली होती. एकदा मी जरा जास्त वेळ तिथे रेंगाळलो तेव्हा त्याने माझ्याकडे पाहिले सुद्धा होते. पण दुसऱ्याच क्षणी तुच्छतेने त्याने स्वतःची नजर माझ्या नजरेतून हटवली होती. तो तिथे चोवीस तास पहुडलेला असे. तो तिथे उपलब्ध असलेले अन्न, ते पक्षी आणि कुत्रे, यांच्याशी स्पर्धा करत खात असेल. तो तिथलेच ते सडलेले पाणी पित असेल. तो अहोरात्र त्याच सडलेल्या हवेत श्वासोच्छवास करत असेल. तिथले ते डास आणि चिलटे यांच्या चाव्यात जगत असेल. तरीही तो तिथे जिवंत होता. महिनोनमहिने जिवंत होता. तो तिथे सडत जाऊन मरून अखेरी त्या कुत्री आणि पक्षी यांचे भक्ष्य होईल, याविषयी माझ्या मनात यत्किंचितही शंका नव्हती. पण नंतर काही महिन्यांनी तो मला रस्त्यात चालताना दिसला. सगळ्या सुखदुःखांच्या पार तो जिवंत होता, महिनोनमहिने नरकात जगूनही तो जिवंत होता. सडके अन्न, हिरवे-काळे संपृक्त पाणी आणि डास-चिलटांनी नरक केलेल्या त्या क्रूर सडक्या हवेतही तो जिवंत राहिलेला होता. अत्यंत विपरित परिस्थितीतही जिवंत राहण्यात आपण हिंदुस्तानी लोक दुनियेत कोणालाही हार जाणार नाही, याची त्याला पाहून माझी खात्री झाली होती.

हे सगळे मी अँथनीला काय सांगणार? त्याचा माझा संपर्क तेव्हापासून तुटला तो तुटलाच.

सातपाटील लोकांचा शोध घेताना वांबोरी या गावाने माझ्यावर जे चेटूक केले ते तसे अन्यत्र कुठेही झाले नव्हते. अनुभव तर येतातच आणि पंचेंद्रियांनी कुथून कुथून अर्थ लावण्याचा प्रयत्न केला तरी त्यांचे काहीही स्पष्टीकरण देता येत नाही, असे अनुभव आपल्याला कधी ना कधी येतातच. ते फार क्वचित येतात, पण येतातच. वांबोरी या गावाने माझ्यावर जे चेटूक केले होते, त्याचे स्पष्टीकरण काही केल्या मला स्वतःला देता येईना. पण चेटूक तर होतेच. आणि उलगडा करण्याची इच्छा होती. किंवा उलगडा करण्याच्या इच्छेच्या पल्याडचे आकर्षण होते. म्हणून मी पुन्हा एकदा वांबोरीला गेलो. तर पुन्हा सगळा तोच आणि तसाच अनुभव. सगळे माझे आणि मी सगळ्यातला. मूर्ख होते सारे. ते रस्ते, देवळे, वाडे, माणसे ; सारी माझीच आणि मी त्यांचा. वैताग सारा. तो थकविणारा, वेधक आणि सुखद. पण चकित करणारा. आपल्या मन आणि मेंदू यांच्या विचार करण्याच्या चतुर्मित अवकाशात न सापडणारा. आणि तरीही होताच तो.

एका देवळात गेलो. मनोभावे दर्शन घेऊन तिथल्या सावलीत बाहेर पायरीवर बसलो. मी देवळात जाऊन देवाचे दर्शन घेण्याचा रिवाज कधीचाच सांडलेला. ज्याच्या असण्यावरच विश्वास हरपलेला, तिथे त्याचे दर्शन कशासाठी? इतरांसोबत मी ते अनेकदा घेतो. पण ते त्यांच्या भावना दुखू नयेत म्हणून. मला देवाचे आतून काहीही वाटत नाही. इथे तर मी एकटाच होतो. आणि मनोभावे दर्शन घेऊन पायरीवर विसावलो होतो. चेटूकच. किंवा क्लांत स्थितीतले मनाचे दुबळेपण. जगण्याच्या संघर्षात दुबळे आणि एकाकी वाटले की मला देवाची आठवण होते. की बाबा असशील तर बघ. सांग काही मार्ग. ही कदाचित आपल्या हिंदू असण्याची मर्यादा. किवा खरे तर माझी मर्यादा. अन् मी काय थकलोबिकलो नव्हतो. चेटकात होतो. चेटकात थकलो होतो. म्हणून तिथे देवाच्या दारी पायरीवर बसलो होतो. तेव्हा तिथे एक म्हातारेसे गृहस्थ आले. माझ्याकडे बघून छान प्रसन्नसे ओळखीचे हसले.

च्यायला! मेलोच. कसली ओळख? आधीच या गावाच्या ओळखीचे वाटण्याशी मी मुकाबला करतोय. त्यात हा म्हातारा कसला ओळखीचे हसतोय!

मी उठलो. त्यांना नमस्कार करून चालू पडलो. रस्त्यात एक बारव दिसली. चांगलीच मोठी ठाशीव बांधीव बारव होती. तिथे कोणीही नव्हते. पण बारव नांदती असण्याच्या खुणा होत्या. सकाळी पाणी वाहून नेल्याच्या खुणा पायऱ्यांवर होत्या. स्वच्छ हिरवे पाणी. पाचूसारखे निर्मळ. स्तब्ध.

'ही भानाईची बारव.'

कोणीतरी माझ्या पाठीशी बोलले. काहीसे दचकून पाहिले तर मघाचेच म्हातारबुवा.

'असं का? कोण ही भानाई?' मी त्यांना विचारले.

'वेश्या होती. आयुष्यभर वेश्यावृत्ती करून तिने पुष्कळ कमाई केली. म्हातारपणी तिला वाटलं, आपलं आता उरणार काय? मरण तर ठरलेलं. धनसंपत्ती काही सोबत येत नाही. एक वेश्या म्हणूनच आपलं नाव उरणार. तेही काही पिढ्या. पुढे काहीच नाही. आपलं नाव उरावं आणि आपल्या हातून सत्कर्म घडलेलं आहे असंही उरावं, म्हणून तिने स्वतःच्या खर्चाने ही बारव बांधून घेतली. म्हणून हिला भानाईची बारव म्हणतात. ह्या बारवेला बारोमास गोड पाणी असतं. या गावठाणात बाकी सारीकडे खारे पाणी. या एकाच

बारवेला गोड पाणी. म्हणूनच जेऊन जा पण पाणी मागू नका, असं इथले लोक म्हणायचे. हे सारं गाव या बारवेतूनच पिण्यासाठीचं पाणी भरतं. वांबोरी-वामाचारी; इथे पूर्वी वामाचार फार होता'

गृहस्थ नक्कीच गोष्टीवेल्हाळ होते.ओळखीची वगैरे फार गरज नसावी

त्यांना.

'तुम्ही इथलेच?'

'नाही. मी शेजारच्या ब्राह्मणी गावचा. बल्लाळ गुरुजी. माणिक नारायण बल्लाळ. पंचक्रोशीत सगळे माणिकगुरुजी म्हणतात मला."

'अच्छा, अच्छा.'

'तसा गुरुजी म्हणजे शिक्षकच होतो मी. आता निवृत्त. या वांबोरी गावात शिक्षक म्हणून काम करताना मी बराच काळ घालवलाय. इथली खडान्खडा माहिती आहे मला. वांबोरी आणि ब्राह्मणी ; माझ्यासाठी एकच. शेजारच आहे ना! सगळे मला माणिक गुरुजी म्हणून ओळखतात. एरवी सुद्धा ब्राह्मणाला गुरुजी म्हणण्याची पद्धत असतेच खेड्यात. ब्राह्मण गुरू. गुरुजी.

आम्हा बल्लाळांची बरीच घरे आहेत ब्राह्मणीत. शेती हाच आम्हा लोकांचा मुख्य व्यवसाय. हल्ली मुलेबाळे शिकून पुण्यामुंबईला जायला लागलीत. शेती करायला नको म्हणतात.'

'मग आता काय? गावी निघालात?' 'हां. चला की जवळच आहे इथून.' 'कशाला? - नाही म्हणजे, तुम्ही इतक्या आपुलकीनं-' 'छे! छे! असं काहीच नाहीय. चला, दोन घास खा माझ्या घरी.'

आश्चर्यच होते. मी कोण, कुठला, काय करतो; याची कसलीही माहिती त्या गृहस्थाला नव्हती. साधे माझे नावही त्याने मला विचारले नव्हते. ठीक आहे समजा, की माझा पोशाख नीटनेटका होता आणि मी शिकला सवरलेला दिसत होतो. तरीही इतक्या सहज अनोळखी माणसाला कोणी असं बोलावतं? या, दोन घास खा. अरे! कोण तुम्ही? काय जात? कुठून आलात? इतके तर पाहिजे!

'माझं साधं नाव सुद्धा तुम्हाला माहीत नाही. मी कोण, कुठला, काय करतोय-'

'गप्पांच्या ओघात होतं ते आपोआप. त्यात काय विशेष? तुम्ही या भागातले नाही आहात. पण ज्या पद्धतीने तुम्ही देवाच्या पायरीवर बसलात, त्याच वेळी माझ्या लक्षात आलं- अभ्यासक आहात तुम्ही. पुष्कळ लोक येत असतात. मलाही इतिहासाचा थोडाफार छंद आहे. पुष्कळ मोठमोठे लोक येऊन गेलेत माझ्याकडे. सेतुमाधवराव पगडी, वासुदेवशास्त्री खरे; दत्तो वामन पोतदार तर मुक्कामालाच होते-'

'अरे वा! काय सांगताय?' 'खोटं कशाला सांगू मी?' 'मला वांबोरीच्या इतिहासात रस आहे.' 'बोलू ना आपण. बघा. उपयोगच होईल.'

एव्हाना मी गुरुजींच्या सोबतीने चालू लागलो होतो. जवळच कुठेतरी त्यांनी आणलेली ऑटोरिक्षा थांबलेली होती. आम्ही चालत होतो. गुरुजी बोलत होते. रिक्षाशी पोहोचेस्तोवर त्यांनी बल्लाळ मंडळींच्या इतिहासाचा पूर्वरंग सुरू केलेला होता. अहमदनगरला निजामशाही होती, त्या काळापासून बल्लाळ हे ब्राह्मणीचे वतनदार.

त्यांच्या शिक्क्याशिवाय कोणताही प्रस्ताव निजामाच्या दरबारी मांडलाच जाऊ शकायचा नाही. पुढे सरकूच शकायचा नाही. जावळीच्या मोरे मंडळींपैकी एकजण ब्राह्मणीत होते. जमीनदार, वतनदारच होते ते. मोरे हे आदिलशाहीतले मोठे सरदार. ते शिंदखेडच्या जाधवराव यांचे सोयरे. पण इथे ते कनिष्ठ. त्यांना बल्लाळांच्या या अधिकाराचे वैषम्य वाटे. पण हात चोळत बसण्याखेरीज काहीही त्यांना करता येत नसे. एकदा या मोऱ्यांनी ब्राह्मणभोजन आयोजित केले. ब्राह्मणीमधले सगळे ब्राह्मण जेवायला बोलावले. जेवणे झाली. हात धुण्यासाठी ब्राह्मण बाहेर येऊ लागले. समोर नव्या घरासाठी पाया घेतलेला खड्डा होता. ब्राह्मण हात धुवायला लागला की लोटायचा पुढे आणि पडला की घाल दगड त्याच्यावर; अशा रीतीने त्यांनी एकूणएक ब्राह्मण मारून टाकले. त्यात बायामाणसेही सोडली नाहीत. मुलेबाळेसुद्धा. तशात एका गरोदर ब्राह्मण स्त्रीला चेडगावच्या पाटलाने वाचवले. त्याने तिला धान्याच्या कणगीत लपवले. नंतर तिला तिच्या माहेरी पाठवून दिले. आष्टी येथील देशपांडे हे तिचे भाऊ होते. तिथे तिला दोन जुळी मुले झाली. त्यांचे तिथे उत्तम शिक्षण झाले. अठरा वर्षे वयाची झाल्यावर ती मुले आपल्या मामांसोबत अहमदनगरला निजामाच्या दरबारात हजर झाली. पण तिथे त्यांचा अपमान करण्यात आला. परत आल्यावर त्यांनी आपल्या आईकडून सारी माहिती घेतली. ते ब्राह्मणीत आले. निजामाच्या दरबारी कायद्याने भांडून त्यांनी आपली इस्टेट, आपले हक्क परत मिळवले. नंतर त्यातला एक केंदळला गेला. एक ब्राह्मणीत राहिला. त्याची वंशावळ ब्राह्मणीत वाढली. म्हणजे, एकूण या सगळ्या प्रकारात मोरे अखेर अपयशीच झाले. ते अपयशी, आपशे, हापसे झाले. म्हणून त्यांचे आडनाव हापसे झाले. अशा रीतीने मोरे यांचे हापसे झाले. मुळातले ते जावळीचे. नाग हे त्यांचे कुलदैवत....

माणिक बल्लाळ गुरुजी एकूणच वेल्हाळ होते. ऐसपैस सज्जन देशस्थ ब्राह्मण. त्यांच्या बोलण्यात कसलाही विखार नव्हता. नेमकेपणाचे टोचणारे कसलेही टोक नव्हते. ते त्यांच्या दिसण्यात नव्हते आणि वागण्या बोलण्यातही. त्यांच्या घरी गेल्यावर त्यांची पत्नी, मुले, सुना, नातवंडे ; सारीकडे ऐसपैस आनंद होता. फारच सुस्वभावी आणि खूप साधेपणाने राहणारे लोक होते ते.

नंतर गुरुजी मला बल्लाळाईच्या मंदिराकडे घेऊन गेले. ओघाने देवळाचा इतिहास. या देवळात गर्भगृही कबर आहे. आणि ती दक्षिणोत्तर आहे. मुसलमानांच्या कबरी सहसा पूर्व-पश्चिम असतात. साडेतीनशे वर्षांआधी कधीतरी मुसलमानांच्या हल्ल्यापासून देवळाला वाचविण्यासाठी त्याच्या छताच्या चार कोपऱ्यांवर चाँद बसविले गेले होते. मध्ये घाईघाईने कबर घातली गेली होती. त्यामागे देवीची मूर्ती आहे. पूर्वी मूर्ती साधी दगडाची अनघड होती.आता नवीन घडीव बसवलीय. दर वर्षी चैत्र पौर्णिमेला जत्रा भरते. बल्लाळ म्हणजे गणपती. गणपतीची आई पार्वती. ती बल्लाळाई. तिच्या यात्रेत हिंदू आणि मुसलमान; दोन्ही धर्माचे लोक सहभागी होतात. पूर्वी पुजारी सुद्धा मुसलमानच होते. टकारी म्हणजे पाथरवट जातीचे मुसलमान होते हे पुजारी. सारी पूजाअर्चा, पोथ्या वाचणे, घटी बसविणे, रामायणाचे पारायण ; अशा कैक गोष्टी ते करायचे. आता तबलीगचे वारे आलेय. तेव्हापासून बदललेय सारे....

गुरुजी गोष्टींचा खजिनाच होते. सांगण्याची त्यांची पद्धतच अशी होती की तो सगळा

फक्त अधिकृत इतिहासच वाटावा. आपल्या मनात शंकेच्या कितीही पाली चुकचुकोत; गुरुजींसमोर त्यांचा उच्चार करायचा नाही, असे वाटे. अन् त्यांच्या दुनियेत खोटेपणाला मुळात वावच नव्हता. त्यांना स्वतःला कशाहीबद्दल कोणतीही शंका नव्हती. मग आपण तरी ती का घ्यावी? तो अधिकार आपण कुठून घ्यायचा? मुख्य म्हणजे, हा माणूस इतका सजन होता की मनातल्या मनात सुद्धा नको वाटले ते. या हिंदुस्तान देशाच्या सगळ्या खेड्यापाड्यात, सगळ्या जाती आणि धर्मात अशी माणसे जागोजागी भेटतात. त्यांच्या अगत्याचे, अकृत्रिम आतिथ्यभावाचे आपल्याला आश्चर्य वाटते. ते आपण त्यांच्यापासून तुटल्यामुळे. आपण स्वतःला त्यांच्यापासून अलग केल्यामुळे. खेड्यात जन्मलेला आणि वाढलेला मी मनाने आणि शरीराने पुरता शहरी मध्यमवर्गीय होऊन गेलो आहे. गुरुजींसारखी माणसे आपल्या असे होण्याला धडका देतात. ती आपल्याला नीट जिव्हाळ्याच्या जमिनीवर आणून बसवतात.

माणिक गुरुजींशी बोलताना -खरे तर त्यांचे बोलणे ऐकताना आणि अगत्य स्वीकारत भारावून जाताना सुद्धा- आपण कशासाठी आलोय आणि काय करतोय यांच्यामधल्या अंतराचा चलाख अचंबा

माझ्या मनात उतरलेला होता. म्हणूनच संधी साधून मी त्यांना म्हणालो,

'माझं नाव देवनाथ सातपाटील. मराठीत थोडंफार लेखन केलंय

मी. कादंबऱ्या वगैरे. वांबोरीला मी काही माहिती घेण्यासाठी-'

'अहो, वांबोरी हे सातपाटलांचंच गाव-' 'काय, सांगताय काय? मी तर तेच शोधण्यासाठी-'

'नाही; म्हणजे हे सातपाटील आडनाव असलेल्या लोकांचं गाव

नाही. तुमचं हे आडनाव जरा वेगळंच आहे. सहसा ऐकलेलं नाहीय-'

'हो, पण सातपाटलांचं काय सांगत होता तुम्ही?'

'सांगतो ना. महाराष्ट्रात कुठंही तुम्ही गेलात तरी तिथं पाटीलकी ही एकाच घराण्यात असते. हे तुम्हाला माहीत असेलच. वांबोरी हे असं महाराष्ट्रातलं एकमेव गाव आहे, जिथं पाटीलकी सात घराण्यात वाटलेली होती. त्या अर्थानं ते सात पाटलांचं गाव. त्याचाही एक इतिहास आहे. म्हणजे आधी एकाच घराण्यात होती पाटीलकी. त्यांचं आडनाव होतं एडके. ब्राह्मण होते हे एडके. या एडक्यांपैकी एक वेणूमाधव एडके म्हणून होते, ते १८५७ च्या बंडात तात्या टोपे यांच्या सोबत उत्तरेत गेले होते.'

'मला एकूण सगळं सांगा. ही सात पाटलांची काय गोष्ट आहे?'

मला त्यात रस होता. सात पाटील आणि सातपाटील; काही संबंध असू शकतो ना! माणिक गुरुजी यांनी त्यांचे निवेदन तात्काळ सुरू केले. ते अर्थातच वेल्हाळ होते.पण साररूपाने किंवा जरा नीटनेटकी करून त्यांच्याच शब्दात सांगायची ती गोष्ट, तर ती अशी:

बुन्हानुद्दीन निजामशहा नगरला राज्य करीत होता, तेव्हाची गोष्ट. त्याचे चार पठाण सरदार होते. ते अकरा वार उंच आणि तगडे. (आता, या इतक्या उंचीचे काय करायचे? हा वार साधारणतः एका या इतका, म्हणजे तीन फुटांचा. तेहतीस फुट उंचीची माणसे? कशी असतील?

अगदी अकरा फुट उंचीची सुद्धा? पण गुरुजी ते सांगत होते. शंका कुठून घेणार? उक्तीतील अतिशयोक्ती हा प्रकार सढळपणे वापरण्याची आपली पौराणिक परंपरा आहे. ती माणिक गुरुजी अनुसरत होते, असे समजायचे. अशा आणखी पुष्कळ गोष्टी या कहाणीत आहेत. त्या तशाच ठेवल्या आहेत. आपण आपल्या प्राचीन पौराणिक परंपरेचा आदरच केला पाहिजे ना! कल्पनारम्य अशी छानच होती ती! बाकी तारतम्य असतेच. ते वापरायचे!) नुसत्या बाहूंच्या पकडीत कोणाचीही मान मुरगाळून मारण्याइतकी ताकद या पठाण सरदारांच्या अंगी होती. ते रयतेवर फार जुलूम करीत. वांबोरी गावातल्या लोकांचीही त्यातून सुटका नव्हती. या छळामुळे लोक अगदी रंजीस आले होते, कंटाळले होते, थकले होते. त्या इतक्या आडदांड पठाणांचा प्रतिकार कोण आणि कसा करणार? आपला जीव आणि आपली अब्रू बचावून राहायचे वांझोटे प्रयत्न करत लोक कसेबसे दिवस कंठीत होते. तरीही असं असतंच ना, की असं कायम राहात नाही. ज्याला आरंभ असतो, त्याला अंतही असतोच. शेराला सव्वा शेर कोणीतरी भेटतंच. या चार पठाणांचा प्रतिकार करण्यासाठी वांबोरीतले सात जण एकत्र आले. शितोळे, पठारे, डुकरे, चौथे, तिडके, एडके आणि राहाणे अशी त्यांची आडनावे. पैकी डुकरे यांचे आधीचे आडनाव वेगळे ; आणखी काहीतरी असेल. पण ते डुकरासारखी धडक मारून समोरच्या माणसाला आडवं करण्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांच्या ठायी ती क्षमता असाधारण अशीच होती. बुटकेच होते ते. पण अत्यंत काटक आणि टणक. बाकीचेही बव्हंशी त्याच प्रकारचे होते. आपण मराठे लोक म्हणजे उंच तगडे असे कधी नव्हतोच. बुटके, चपळ आणि काटक; ही आपली खासियत. तर या सात जणांनी ठरवलं. पठाणाचा काटा काढायचा. पण काढायचा कसा? पठाण ताडमाड उंच. तगडे. हे बुटके, काटक. विचार सुरू झाला. डुकरे म्हणाले, मी मुसंडी मारून धडक देईन. मी उंच उडी घेऊन पठाणाच्या छातीला धडक देऊन त्याला पाडलं की तुम्ही तातडीने त्याच्यावर वार केले पाहिजेत. नाही तर पठाण मला दाबून मारतील. बाकीच्यांनी हमी भरली. शिस्तशीर योजना करण्यात आली. एकेक करून पठाण मारायचा. अन् कार्यवाही सुद्धा शिस्तीत केली त्यांनी. डुकरे मुसंडी मारत. पठाण कोलमडला की बाकीचे घाव घालत. या प्रकारे चारही पठाण चार ठिकाणी मारले त्यांनी. डुकरे अगदी रानडुकरासारखी धडक मारत. खरे तर आणखी वेगळी असेल ती. उंच उडी घेऊन धडक मारणे रानडुकरास सुद्धा मुष्कील. हे डुकरे ती मारत. म्हणून त्यांचे आडनाव डुकरे पडले असेल.

(हल्ली या डुकरे यांच्या वंशजांना आपले हे आडनाव आवडत नाही. ते फक्त पाटील असे आडनाव लावतात. इतिहासाची काही माहितीच नाहीय ना! इति माणिक गुरुजी.)

पहिला पठाण सडे-खडांबा फाट्यावर मारला. डुकरे यांनी अचानक मुसंडी मारत उडी घेत धडक दिल्यावर पडताना गुदगुल्या होऊन तो हसला. आणि हसतानाच तो बाकीच्यांच्या घावांना बळी पडला. त्या जागेवर एक पीराची समाधी आहे. त्याला हसोबा म्हणतात. तिथे दरवर्षी या हसोबाची मोठी यात्रा भरते. खूप भाविक जमतात. हसोबाला नवस करतात. बाकी पठाणही जिथे जिथे मारले गेले, तिथे पीरांची ठाणी आहेत. लोक या पीरांना भजतात. आपल्या लोकात देवांच्या संख्येला कोणतीही मर्यादा नसल्याने अडचण काहीच उरत नाही. असो. तर दुसरा पठाण वांबोरीच्या नगरवेशीजवळ मारला गेला.

तिसरा डोंगरगणच्या घाटात. चौथा नगरला भिस्तबागेत मारला गेला. अशा प्रकारे या सात जणांनी एकत्र येऊन लोकांची पठाणांच्या जुलमातून सुटका केली. मग वांबोरी गावातले लोक एकत्र आले. त्यांनी या वीरपुरुषांचा गौरव केला. या साती जणांना पाटीलकी देण्याचा ठराव गावपंचायतीने केला. आधी एडके एकटेच पाटील होते. त्यांनी गावपंचायतीच्या ठरावाला आनंदाने मान्यता दिली. तिकडे निजामशहा हादरून गेला. एवढे प्रबळ सरदार या लोकांनी कापून काढले म्हटल्यावर साहजिकच होते ते. निजामशहाने चौकशीचा आदेश दिला. या चौकशीत राहाणे हे फितूर झाले. त्यांनी बाकीच्यांशी गद्दारी करत निजामशहा यास माहिती दिली. पण सारे कळूनही निजामशहाने या लोकांना शिक्षा नाही केल्या. जबाब घेतले. पण त्याने पठाणांच्या अत्याचारांच्या कहाण्याही लोकांकडून ऐकल्या. म्हणून त्याने या लोकांना निर्दोष सोडले. पुन्हा या प्रकारे कायदा हातात घ्यायचा नाही, अशी तंबी दिली. इतक्या लोकांना दुखावून तो राज्य कसे करू शकत होता? त्यांना मारायचे तर आणखी हलकल्लोळ. त्याने हुषारीने योग्य तेच केले. बुन्हानुद्दीन तसा संयमीच माणूस होता. तर मग गावात इकडे राहाणे यांनी फितुरी केलेली. पण त्यांनी गावाची, या बाकी सहा जणांची माफी मागितली. सगळा विचार करून गावपंचायतीने त्यांना ती केली. पण त्यांना सोळा आण्यात फक्त एक आण्याची पाटीलको देण्यात आली. बाकी सहा जणांना प्रत्येकी अडीच आणे. सहा अडचे पंधरा. उरलेला आणा राहाणे यांना. असे एकूण सोळा आणे, म्हणजे एक रुपया. अशा प्रकारे इथे सात घराण्यात आलटून पालटून पाटीलकी देण्यात येई. पाटीलकीच्या अशा वाटपाचं महाराष्ट्रातलं हे एकमेव उदाहरण. या सात पाटलांपैकी एडके आणि तिडके हे जातीने ब्राह्मण. बाकी पाच- शितोळे, डुकरे, पठारे, चौथे आणि राहाणे हे मराठा. यांच्यातल्या काहींनी पुढे बरीच कर्तबगारी गाजवली. निजामशाही दप्तराचा नीट अभ्यास झाला तर आणखी बऱ्याच गोष्टी उजेडात येतील.पण आपल्या लोकांना इतिहासाची नीट माहिती नाही, ती शिस्त नाही, कुतूहलच नाही. म्हणून माझ्यापाशी असलेला खजिना मी इतस्ततः वाटत असतो. आता माझं वय झालंय. माझ्यासोबत हे सारे संपून जाईल. लिहिण्याची शिस्त मलाही नाही. या बाबतीत मी आणि माझे गुरू दत्तो वामन पोतदार अगदी एकमेकांसारखे आहोत. आता ते गेले. मीही जाईन. आणि हे भांडार असेच आवाज न करता वाहून संपून जाईल....

नंतर माणिक गुरुजी गेले. त्यांच्या जाण्याची बातमी मला त्यांच्या एका नातवाने कळवली. ते गेले आणि त्यांच्यासोबत त्यांची प्रतिभा, ऐसपैस वेल्हाळपण ; असे सारे गेले. पण त्यांच्या असण्याचा वेल्हाळ सुगंध माझ्या मनाच्या तळाशी कायम उरलेला आहे, असे मला वाटते.

मजा आला होता. माणिक गुरुजींसोबत मजा आला होता. आपण कशासाठी आलोय अन् काय करतोय यांच्या अंतरामधला मला वाटणारा अचंबा आतल्या आत जिरला होता. अन् काटेकोर इतिहासाचे काय! त्या प्रकारचा इतिहास लिहिणारे लोक आपण नाहीतच आहोत मुळात. प्राचीन काळात या भरतखंडात घडलेल्या महायुद्धाची आपल्या पूर्वजांनी महाकाव्ये केली. ती पिढ्यान्पिढ्या अनेक कलाप्रकारांमधून, म्हणजे; नृत्य, काव्य, नाट्य अशा अनेक कलांद्वारे जगभर -विशेषतः आशिया खंडात- सतत विस्तारत पुन्हा पुन्हा घडत

राहिली. ती सतत समकालीन आहेत. काटेकोर इतिहास हे करू शकला असता काय? अगदी अलीकडच्या काळात आपण बखरी, पोवाडे, लावण्या, भेदिके अशा अनेक पद्धतींनी इतिहासाचे जतन करत राहिलो. आपण इतिहासाला काव्य, कादंबरी अशा जिवंत कलाप्रकारात ओवत त्याला चिरंजीव आणि स्फुरणशील ठेवण्याची परंपरा असलेले लोक. माणिक गुरुजी त्याच परंपरेचे पाईक होते. खरे खोटे काय तुम्हाला समजायचे ते समजा. निवडायचे ते निवडा. नाहीतरी काटेकोर इतिहास तरी कुठे निखळ सत्य असतात? अन् त्यांच्यात पुन्हा सामान्य माणसांचा इतिहास कितीसा असतो? त्यापेक्षा इतिहासाने असे कलात्मक पातळीवर जाण्यात जोमदारपण आहे असेच म्हणावे लागते. गुरुजींची गोष्ट नोंदून घेताना माझ्या हातून एक चूक झालीय. शुकरे हे आडनाव गेले अन् त्याच्या जागी शितोळे आले. १८५७ त तात्या टोपे यांच्या सोबत उत्तरेत गेले ते वेणीमाधव शुकरे; एडके नव्हेत. पण झालेली चूक मी तशीच राहून दिलीय. म्हणून एडके आणि तिडके हे ब्राह्मण. शितोळे यांना ब्राह्मण कसे करणार? बाकी पठारे, चौथे, डुकरे, राहाणे. हे असे का? तर आपण काटेकोर इतिहास लिहीत नाही, याचा काहीतरी पुरावा असावा म्हणून! वाहव्वा जी व्वा!

माणिक गुरुजी यांनी केलेल्या दीर्घ निवेदनातून मला अनेक वेगवेगळी अनुमाने काढता आली. ती बरोबर की चूक हा प्रश्न वेगळा. अडलेले रस्ते त्यांनी खुले तर केले. बाकी सत्य काय ; ते नेहमीच हुलकावण्या देणारे असते. म्हणून हुलकावण्यांचेच जाळे तयार करायचे अन् त्यात सत्याला शोधायचे ही रीत जास्त बरी.

एक तर हे नक्की झाले की वांबोरी हे सात पाटलांचे गाव. त्यामुळे तेवढे दृश्य नाते सातपाटील या माझ्या आडनावाशी प्रस्थापित तर झाले. यात पुष्कळ शक्यता असतील, असू शकतात. या सात पाटलांच्या गावातून कधीकाळी बाहेर पडताना आपल्या गावाची आठवण म्हणून त्याने; म्हणजे आमच्या पूर्वजाने सातपाटील हे आडनाव घेतले असेल. या सात पाटलांपैकी कोणते तरी आमचे मूळ आडनाव असेल. त्यातले एडके आणि तिडके हे समजा ब्राह्मण असल्याने बाद. उरलेल्या पाचांपैकी एक आमचे मुळातले आडनाव असेल. आणखी एक मनात आले. सातपाटील असे चमत्कारिक आडनाव महाराष्ट्रात आणखी कुठेही नाही म्हणता म्हणता एके दिवशी श्रीरामपूर येथे मला पाचपाटलांचे एक घर दिसले. विजयराव पाचपाटील, ॲडव्होकेट. बी.ए., एल.एल.बी. दारावर पाटीच वाचली मी. वाटले, चला, आपल्या जातकुळीचे दुनियेत आणखी लोक आहेत. आता वाटते, या पाच पाटलांपैकी एक म्हणून त्यांच्याही पूर्वजाने पाचपाटील आडनाव घेतले असेल. शक्य आहे.

डुकरे, पठारे, शितोळे, चौथे आणि राहाणे यांच्यापैकी कोणते तरी एक आमच्या पूर्वजाचे आडनाव असले पाहिजे. तो शोधण्यासाठी एक दुबळा धागा आहे. तो दुबळा अशासाठी की माझा मलाच तो संशयास्पद वाटत आलेला आहे. तो म्हणजे देवकाची चौकशी. आम्हा सातपाटलांचे देवक सुरड. पण आमच्यातले अनेकजण ते सूर्यफुल असल्याचे सांगतात. त्यात कोणते बरोबर; काहीच सांगता येत नाही. सुरड हे एक गवत आहे. एका लग्नात देवक आणण्याचा विधी करतात तेव्हा मी ते पाहिले. भावकीतलेच लग्न

होते. 'आपल्या इथुल्लया कुरनातूनच आन्हलं आसन् ना आई ह्ये?' मी माझ्या आईला तेव्हा विचारले होते. माझ्या मातृभाषेत. पुढे शिक्षणाच्या निमित्ताने हळूहळू मी माझ्या

मातृभाषेपासून तुटत गेलो आणि प्रमाणभाषेच्या अरण्यात सुस्थिर झालो. असो. तर माझी आई तेव्हा मला म्हणाली, 'इथुल्लं नायी ते. कोकणातून आन्हित्यात.' आता बघा, या आमच्या देवकाचा संबंध कोकणाशी. म्हणजे आमचे पूर्वज मुळात कोकणातून इकडे देशावर आले असण्याची सुद्धा शक्यता आहे. ते आपल्या देशाची स्मृती म्हणून हे गवत देवक म्हणून घेऊन आले असतील. मग याच न्यायाने समजा; सूर्यफूल तर लॅटिन अमेरिकेतून इकडे आलेय. मग त्या देवकाचे लोक तिकडून इथे आले असे समजायचे? या मराठे लोकांच्या देवकांचे मला काहीही समजत नाही. खेरीज हल्ली बामणांसारखी आपापली गोत्रे सुद्धा मराठा लोक सांगतात. कश्यप, कौशिक, भारद्वाज अशी गोत्रे लावतात. सगळी ब्राह्मण लोकांपासून उत्पत्ती? अन् ज्यांना त्यांचे गोत्र माहीत नसेल त्यांना हे ब्राह्मण सरळ कश्यप गोत्र देऊन टाकतात. च्यायला, किती भार त्या कश्यप ऋषीवर? चंगेझखान होता की काय तो? नुसती शहाण्णव कुळे सुद्धा या लोकांना पुरी पडत नाहीत? याला काय म्हणायचे? हे कोणत्या प्रकारचे भावनिक दास्य?

कैक वर्षांआधी, म्हणजे सुमारे पंचेचाळीस वर्षांआधी मी लग्नाचा उमेदवार असताना आम्ही एक मुलगी बघायला गेलो होतो. शिवाजीराव बेंडे म्हणून एकजण होते. शिवाजीराव बेंडे-पाटील. त्यांची बहीण लग्नाची होती. ते म्हणाले, आमची कुळी थोरात. कवी ग. ह. पाटील आमच्या भावकीतले. तुमच्या कुळीचे काय? त्यांच्या या प्रश्नावर मी भयंकर गोंधळून गेलो. मला काहीच सांगता येईना. म्हणालो, माहीत नाही बुवा. ते मला काहीच माहीत नाही. नंतर देवकाचे काहीतरी निघाले. त्यांनी त्यांचे देवक सांगितले. म्हणाले, 'तुमचे काय?' सोबत असलेले माझे एक चुलतभाऊ म्हणाले, 'आमचे देवक सूर्यफुल.' मी गप्प राहिलो. नंतर चुलतभावाला मी म्हणालो की, 'आपले देवक सुरड असताना तू सूर्यफुल का सांगितलेस?' तो म्हणाला, 'सुरड कोणाला कळत नाही. अन् एक गवत तुमचं देवक म्हटलं की तिथंच तुमचा भाव खल्लास. त्यापेक्षा सूर्यफुल कसं ; घनसर वाटतं.' त्यामुळे हा देवकाचा धागा कुचकामी वाटतो मला. तरीही आपले देवक ते सुरड म्हणून चौकस राहण्याचा इरादा मी सोडलेला नाहीय.

१८६० च्या सुमाराला माझा आजा शंभुराव सातपाटील याचा साल्पी येथे जन्म झाला. त्याच्या बापाचे नाव रखमाजी. रखमाजीच्या बापाचे नाव जानराव. रखमाजीला पिराजी नावाचा एक धाकटा भाऊ होता. जानराव याच्या मागे मला माझ्या वंशवृक्षाकडे जाता येत नाही. कारण तेवढेच मला माहीत आहे. पण इतका जरी हिशेब काढला तरी आमचा पूर्वज दोनशेपेक्षा अधिक वर्षे आधी साल्पीत उतरला असेल, असा तर्क करायला वाव मिळतो. जानराव हा वेडपट होता आणि वेडाच्या भरात त्याच्या हातून एक खून झालेला आहे अशी एक वदंता आहे. कळत नाही, कसे आणि कुठून आले असतील माझे पूर्वज, या साल्पी गावात? कोणते धागे असतील त्यांचे इथे? असे सांगतात की जानराव हा पेशव्यांच्या फौजेत होता. पेशवे इंग्रजांशी युद्ध हरले तेव्हा अनेकांसारखा तो इथे आला. पण विस्तारला कसा? कुणब्याला जमिनीचा लोभ फार. पांढरीत पाटीलकी अन् काळीत विस्तार हे त्याच्या

आकांक्षांचे दोन स्तंभ.

माणिक गुरुजींनी सांगितलेल्या सात पाटलांच्या कथेचा काळ शोधण्यात फारसा अर्थ

नव्हता. उपचार म्हणून ते आपल्या निवेदनास काळाला बांधून घेत असले तरी काळाच्या बंधातून निसटण्याची वा कालातीत असण्याची प्रवृत्तीच त्यांचा निवेदनात प्रमुख. त्यांनी सांगितलेली गोष्ट ऐकून आणखी एक भुंगा माझ्या मनात सारखा गुणगुणतोय. त्याचा मला त्रास असा नाहीय. एक शक्यता म्हणून मनात येतेय फक्त. खात्री नसल्याने भुंगा आहे. एक तर माणिक गुरुजींची गोष्ट पार्थिव पातळीवर आणून तिला वापरणे मुष्कील. पण मग आम्हा सातपाटलांच्यात वाहात आलेल्या कहाण्यांना तरी कितीक पाया मानायचा? कितीक पाया आहे? सातपाटलांच्या घराण्यात एक मुसलमान स्त्री नांदून गेलेली आहे, अशी एक वदंता आहे. ती स्त्री म्हणजे एखादी पठाण वा अफगाण स्त्री तर नव्हे; असे माझ्या मनात येते. ती हे जे पठाण त्या सात लोकांनी मारले, त्यांच्या बायकांपैकी एक तर नसेल? ठीक आहे ना ; माझ्या नवऱ्याला मारलंस तू. लढाईत मरतोच कुणी ना कुणी. पण मी आता काय करू? मी जवान आणि खूबसूरत आहे, एकटी आहे. मी या मुलखात कुठे आणि कशी राहू? असे त्या एखाद्या स्त्रीने विचारले असेल? अन् ती गोरीपान धारदार नाकाची स्त्री आमची आदिमाता तर नसेल? शक्य आहे, अगदी शक्य आहे. गोरा रंग, धिप्पाड अंगयष्टी, धारदार नाक अशी शारीर वैशिष्टये तिच्यामधून वाहात आम्हा सातपाटलांमध्ये उतरत राहिली असतील. इथल्या भूमीतल्या अनेक संकरांनी आम्ही आता काळे, गोरे; दोन्हीही असलो तरी काही वैशिष्ट्ये कायम उरलेली आहेत. ती तिची देण असेल. तिला घेऊन, तिच्याशी लग्न करून आमचा आदिपुरुष या वांबोरी गावातून बाहेर पडला असेल. सात पाटलांच्या गावाची आठवण म्हणून त्याने हे सातपाटील आडनाव घेतले असेल. हे समजा असे असेल तर ते माझ्या जन्माच्या सुमारे साडेचारशे वर्षे आधी झाले असेल. तेव्हापासून या आदिमायेच्या अस्तित्वाचा जेनेटिक इतिहास आमच्यात वाहत आलेला असेल. गर्विष्ठ, भांडखोर, मिजासखोर, बढाईखोर, पटकन वर्दळीवर येणारे, अनुद्भूत तिडीक कायम डोक्यात असलेले, अशी जी सातपाटलांची प्रतिमा माझ्या मनात आहे, तिच्याशी हे सुसंगतच म्हटले पाहिजे.

समजा असेल तसे तर, कशी जगली असेल आमची ती आदिमाता? कशी उठली, बसली, वावरली असेल ती इथल्या लोकात? इथली भाषा शिकली असेल? की पश्तून भाषेतच बोलली असेल ती

आपल्या नवऱ्याशी अखेरपर्यंत? अन् तिचा नवरा -आमचा पूर्वज तिच्यासाठी तिची भाषा शिकला असेल? अन् बाकी दुनिया? कळलेच असेल ना कोणाला ना कोणाला तरी. की नसेल कळू दिले त्यांनी? मराठाच आहे ती, अशी बतावणी केली असेल? मुकी असल्याची बतावणी केली असेल? की पडदाशीन असेल कायमच ती? उच्च कुलीन सरदार घराण्यातील आहे अशी बतावणी करत? काहीतरी केले असेल, काहीतरी झाले असेल. पण आज सगळे सुरळीत झालेय. कुळीच्या मराठ्यांत आमच्या सोयरिका होतात. काहीच अडचण येत नाही त्यात.सातपाटलांच्या घराण्यातल्या स्त्रिया फक्त बोलतात. कुजबुजीच्या स्वरात. ती ही मुसलमानीण नांदून गेल्याची कहाणी. आमच्या आदिमायेच्या पहिल्याच सुनेला कदाचित हे कळले असेल. मुकेपणाची बतावणी करणाऱ्या सासूचे कोणते तरी स्वगत तिने ऐकले असेल. किंवा आपले अफगाण असणे, मुसलमान असणे स्वतः शी जपताना, अखेर एखाद्या आपल्या सुनेजवळ, एखाद्या कोमल क्षणी तिने उघड केले असेल?

हृदयात दाबायचे ते मोकळे केले की अधिक मोकळा श्वास घेता येतो. तसा तो घेण्यासाठी तिने ते केले असेल? अन् म्हणूनच नंतर ते असेच कोमल गुपित म्हणून आमच्यात प्रवाहित राहिले असेल?

हे समजा असे असेल तर ते फार सुंदर आहे, असे माझे मत. आपण सारे मराठे लोक मुळातच या देशात बाहेरून आलेले आहोत. किंवा या पृथ्वीवरील सगळे मानवी वंश आधी भटकेच होते ना! संधी मिळाली आणि योग्य जागा दिसली की ते ते त्या त्या ठिकाणी स्थिर झाले. पण उरलेले कैक भटके राहिले. ते अजूनही तसेच आहेत. ते मानवी प्रजातीचे सदस्यच आहेत. आणि मराठे म्हणताना मला ते आपल्या सगळ्या अठरा पगड जातींसबंधी म्हणायचे आहे. नुसते आजच्या मराठा जातीसंबंधी नव्हे. टोळयांनी आलेल्या आपल्या पूर्वजांकडे पुरेशा स्त्रिया नसतील. किंवा असल्या तरी अधिक स्त्रिया असण्याची हाव त्यांना असेल. भटक्यांना गायी जशा अधिक हव्या असत तशाच स्त्रियाही. तो काळ स्त्रियांकडे त्या प्रकारे पाहण्याचा होता. म्हणून त्यांनी स्थानिक स्त्रियांशी लग्ने केली असतील. टोळधाडीत असे शक्य असते. जेता संपत्ती म्हणून जशा गायी चाहत असेल तशाच स्त्रिया. महाराष्ट्र-कनोटक सीमावाद या विषयावर य. दि. फडके यांच्याशी बोलताना इतिहासकार बेंद्रे- जे मुळात मराठी होते आणि ज्यांनी फक्त कन्नड मध्ये लिहिले, ते- म्हणाले होते, 'सालेहो बेळगावची काय चर्चा करता? कर्नाटक मुळात नाशिकपासून सुरू होतो.' काय बोलणार? रामदेवराव यादव या देवगिरीच्या मराठा सम्राटाच्या दरबारात राजभाषा मराठी नव्हती. ती कन्नड होती. ज्ञानेश्वरी नीट समजावून घ्यायची तर प्राचीन कन्नड माहीत असणे गरजेचे असते. अभिनेता गणेश यादव हा माझा मित्र. त्याची बायको कन्नड. बंगलोरकडील उच्च अय्यंगार ब्राह्मण. ती एकदा म्हणाली, 'महाराष्ट्राला आमच्याकडे गंडुभूमी म्हणतात.' आता गंडू म्हणजे नवरा. म्हणजे महाराष्ट्र हा नवऱ्यांचा देश. आपले पूर्वज आक्रमक. नवरे. आपण गंडूचा गुंडा केला. पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा. ही आपल्यात रुजलेली म्हण. काय बोलता?

7

"प्रिय रिचर्ड,

आमच्याकडे हे जातीपातीचे फार आहे.

माणिक गुरुजींच्या भेटीच्या निमित्ताने कल्पनेच्या वारूवर स्वार होणे पुष्कळ झाले. ते सगळे मी तुला मेल करून पाठविले आहेच. एक गोष्ट मात्र खरी, ती व्यक्तिशः माझ्या बाबतीतली आहे. आपण भेटलो आहोत. मी मराठा आहे याचे तुला वेगळे विशेष जाणवले नसेल. म्हणजे असे की, असतात बुवा लोक अनेक वंशाचे; तसा हा आहे, अशीच तुझी धारणा असेल. पण महाराष्ट्रात मी कोणत्या जातीचा आहे, हे मला वेगळे सांगावे लागत नाही. म्हणजे, अगदी मला न ओळखणाऱ्या लोकांना सुद्धा माझी जात माझ्या चेहऱ्यावर लिहिल्यासारखी सहज कळते. मी टिपिकल मराठा प्रोटोटाईप दिसतो. अगदी म्हातारा झालेलो असलो तरी उत्तम भरदार अंगयष्टी, चालण्या-बोलण्यातील रग, खडकाळ चेहरा आणि भरघोस मिशा, हे सारे माझे म्हातारा होणे, माझ्या हाडांची कुरकुर, जगण्याविषयी मला आलेला कंटाळा; असे सारे झटकून टाकते. न ओळखणारे लोक मला सहज निवृत्त

मिलिटरी अधिकारी समजतात. नमस्कार मेजरसाहेब म्हणतात. मी लेखक आहे असे ज्यांना माहीत आहे ते, काय बुवा; या वयातही किती दणकट आहेत, असे म्हणून आश्चर्य व्यक्त करतात किंवा ते व्यक्त न करता आपापल्या मनात ठेवतात. पण ते न बोललेले आश्चर्य मला त्यांच्या चेहऱ्यात कायमच वाचता आलेले आहे. ते सारे मला सणसणीत मराठा समजतात. एवढेच नाही तर मी नक्कीच मराठा जातीयवादी असेन याची त्यांना केवळ मला बघूनच खात्री पटलेली असते. लोकांच्या नजरेत एखाद्या जातीशी आपले बांधलेले असणे, माझ्याइतके फार कमी लोकांच्या वाट्याला आलेले असेल. तुला खरे सांगायचे तर, माझ्या मते मराठा प्रोटोटाईप म्हणून माझ्याकडे बघणे अत्यंत चुकीचे आहे, असे मी मानतो. मी आतल्या आत तितका दणकट नाहीय, असे माझे प्रांजळ मत आहे. लोक समजतात तितका तगडा मी नाही आणि कधीच नव्हतो. अर्थात, मी तसा दिसतो याचा मला आयुष्यभर फायदाही खूप झाला. अनोळखी माणसेही माझ्याशी सहसा हमरीतुमरीवर येत नाहीत. आली तिथे मला कायमच माघार घ्यावी लागलेली आहे, हे गुपित केवळ मलाच माहीत आहे. माझ्या मते, छत्रपती शिवाजी राजाचे अनुयायी हे अस्सल मराठे. ते सारे सह्याद्री पर्वत रांगांच्या दोन्ही बाजूंच्या उतारावर राहणारे, कोकणातले हेटकरी आणि देशाकडच्या बाजूचे मावळे होते. ते बुटके, काटक, चपळ आणि जगण्यासाठीच्या सगळ्या गरजा किमान पातळीवर असलेले लोक होते. तीच त्यांची ताकद होती. त्यांची ती ताकद शिवाजी राजाने बरोबर हेरलेली होती. डोंगराच्या उतरणीवर जगताना, वावरताना जास्त उंची आणि वजन तुम्हाला परवडतच नाही. शरीराचा गुरुत्वमध्य जमिनीच्या जास्तीत जास्त जवळ असणे सोयीचे असते. अन्न, वस्त्र आणि निवारा यांच्या गरजा त्यांना किमान पातळीवर ठेवाव्या लागतात. म्हणूनच भीमथडी तट्टावर बसून ते सहज दूर दूरच्या मजला मारू शकत. मुक्कामाचे जागी हातातला भाला जमिनीत खोचायचा अन् आपला घोडा त्याला बांधायचा. त्या घोड्याच्या शेजारी हा योद्धा आनंदाने शयन करू शकत असे. तो चित्त्यासारखा चपळ आणि चार चार दिवस अन्न, पाणी न घेता उत्साहाने मजला मारू शकत असे. कठीण परिस्थितीत टिकण्याची, हल्ली ज्यांना कमांडो म्हणतात; तशा प्रकारच्या सैनिकीची विद्या अंगभूतपणे त्यांच्यात होती. ते खरे मराठे. कुवत करारी घेत भरारी रणशूरांच्या पट्ट्यांची, वळवळवणी ही व्यर्थ आमुच्या लांब जिभांच्या पट्ट्यांची, असे आमच्या एका कवीने मराठ्यांविषयी त्याच्या महाराष्ट्रगीतात म्हटले आहे, ते हे मराठे. ते मला पटते. राज्याभिषेक करण्याचे प्रसंगी शिवाजी राजाच्या क्षत्रियत्वाविषयी ब्रह्मवृंदांनी प्रश्न उपस्थित केले. हे सगळे वारंवार पुढे अनेक राजपुरुषांच्या बाबतीत झालेले आहे. त्याचे ओघाने आले की लिहितो. शिवाजी राजाच्या बाबतीत तसे होणे, हे मनाला सगळ्यात जास्ती झोंबते. यातून मार्ग काढण्यासाठी त्या श्रेष्ठ पुरुषाला राजपुतान्यातून बहुधा लाच देऊन सिसोदिया वंशाशी संबंध असल्याची सनद आणावी लागली. ती फार सन्मानाची होती असे नव्हे. राज्याभिषेक करण्यासाठी काशीच्या गागाभट्ट यास अतोनात द्रव्य द्यावे लागले. हे सगळे त्या काळाची परिस्थिती पाहता त्या श्रेष्ठ पुरुषास नाईलाजाने करावे लागले असेल. राजा शिवाजी हा फक्त मराठा. श्रेष्ठ मराठा. द्वारसमुद्रच्या होयसळ राजघराण्याचा वंशज. हे रा.चिं. ढेरे नावाच्या मराठी संशोधकाने सप्रमाण मांडलेले आहे. अर्थात, श्रेष्ठ कनिष्ठतेच्या

गोष्टी या भरतखंडात निरर्थक आहेत, इतके आम्ही साऱ्या जातीधर्माचे लोक एकमेकात मिसळून गेलेलो आहोत. मराठ्यांचा राजपुतांशी संबंध आहे का? आहे ना. पण तो जितका अफगाणिस्तानपासून श्रीलंका आणि सिंध, गुजरातपासून बांगलादेश इथपर्यंतच्या लोकांशी आहे, तितकाच तो आहे. राजारामशास्त्री भागवत नावाचा एक फार थोर माणूस महाराष्ट्रात होऊन गेला. तो कोल्हापूरचे राजर्षी शाहू छत्रपती आणि सयाजीराव गायकवाड तसेच बाळ गंगाधर टिळक यांचा समकालीन. त्यांच्या मते हा सगळा भरतखंड हा मराठ्यांचा. जो जो मराठा जिथे जिथे गेला तिथे तो रुजला. तिथला झाला. अगदी आपली भाषा सुद्धा सोडली त्याने. आपल्या मराठा असण्याची ओळख त्याने तिथे तिथे जिरवली. त्याची स्मृती म्हणून आम्हा मराठ्यांना हे भरतखंड एकत्र असण्याची चाह अनिवार. त्यासाठी कोणताही त्याग करण्यास आम्ही कायम तत्पर असतो. ही स्मृती सातवाहन राजांच्या कारकीर्दीपासून सुरू होते. कदाचित ती त्याच्या आधीपासून सुद्धा असेल. मराठ्यांचा आधुनिक इतिहास शिवाजी राजापासून सुरू करण्याची रीत आहे. तो खरा सातवाहनांपासून सुरू केला पाहिजे. इसवी सनाच्या आधी दोनशे आणि त्यानंतर दोनशे अशी एकूण चारशे वर्षे जवळपास सलग सातवाहनांची सत्ता या भरतखंडावर होती. सातवाहन राजांनी सुरू केलेला शालिवाहन शक आज भारतात तितका वापरात उरलेला नाही. पण इंडोनेशिया देशाच्या बाली, जावा, सुमात्रा यांजपैकी कोणत्या तरी एका किंवा अधिक बेटांवर आजही आचरिला जातो. महाराष्ट्रातील गोदावरी नदीच्या काठची प्रतिष्ठान ही जशी सातवाहनांची राजधानी होती, तशीच आजच्या पाकिस्तानातील पेशावर ही त्यांची उपराजधानी होती. मराठे देशभर पसरलेले होते. त्यांची देश बांधलेला ठेवण्याची स्मृती ही तेव्हापासूनची. ती तशीच कळत-नकळत त्यांच्यात अखंडित आहे. आता, सातवाहन हे आंध्रभृत्य म्हणजे आंध्राचे सेवक. आंध्र, तेलंगण ही वेगळी राज्ये आहेत. अगदी परवा परवा पर्यंत तेलंगी लोक स्वतःच्या भाषेला अभिमानाने महाराष्ट्री म्हणवून घेत असत. महाराष्ट्र म्हणजे त्रिमहाराष्ट्र. महाराष्ट्र, तेलंगण आणि उत्तर कर्नाटक. आज ती वेगवेगळी राज्ये आहेत. असूदेत. कालप्रवाहात दृक्पातळीवर गोष्टी बदलत असतात. त्यांना विरोध करायचे कारण नाही. अन् अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका हे वेगवेगळे देश आहेत. ते तसे आहेतच. ते असोत आणि उत्तम राहोत. त्यांना आपल्या मराठेपणाची स्मृती उरो न उरो, मराठ्यांना ती आहे ; कदाचित त्यांच्या नकळत ती असेल, पण ती आहे. बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो, असे आमच्या पांडुरंग सदाशिव साने नामक कवीने सांगून ठेवले आहे. मुद्दा मराठे आणि राजपूत संबंधाचा. मराठे हे जितके राजपूत आहेत, तितकेच ते जाट, आसामी, बंगाली, तमिळ, मल्याळी, कन्नड, उडिया आणि काश्मिरी किंवा भारतात जे जे आहेत ते सगळे आहेत. तरीही मराठ्यांना राजपुतांशी नाते असणे अधिक हवेसे वाटते, ते जास्त रुचणारे वाटते हे खरेच आहे. त्याला अजिबातही अर्थ नसला तरी ते खरे आहे, आणि ते नाकारता येत नाही. मिझाराजे जयसिंग हा औरंगजेबाचा चतुर वयोवृद्ध सेनानी प्रचंड मोठी फौज घेऊन महाराष्ट्रात आला होता आणि रणनीतीचा एक तात्पुरता भाग म्हणून राजा शिवाजी याने त्याच्यासमोर माघार घेतली होती, तो त्याच्या स्वाधीन झाला होता, त्या जयसिंग याने औरंगजेब यास लिहिलेल्या एका पत्रात म्हटले होते की, या मराठे

लोकांस आम्हा राजपुतांशी संबंध असण्याची चाह फार. सबब मी शिवाजीची एखादी पोर माझ्या मुलास करवून घेतो. तसे प्रत्यक्षात झाले नाही, पण मराठे लोकांची तशी चाह त्यात ध्वनित झाली आहे. आणि ती चुकीची म्हणता यावयाची नाही. शिवाजी राजाचे वडील शहाजीराजे यांनी सुद्धा आपण राजपूत आहोत असे अनेकदा ध्वनित केलेले आहे.

काही वर्षांआधी एक माजी मंत्री; जे मराठा आहेत, त्यांनी मला त्यांच्या घरी आवर्जून बोलावून घेतले. मला जाण्याची फार इच्छा नव्हती. कारण हे माजी मंत्री माझ्यासारखेच हेकट स्वभावाचे होते, असे मी ऐकून होतो. पण, आपण कधीही माझ्याकडे आलेला नाही आहात वगैरे आग्रह फारच प्रेमळ झाला, म्हणून मी गेलो. त्यांच्या घरात गेल्यावर काही वेळ जाऊ दिल्यावर ते म्हणाले, 'तुम्ही तुमच्या एका कादंबरीत माझे फारच हिणकस चित्रण केले आहे.' मी म्हणालो, 'मी असे काही केलेले नाहीय. कादंबरीत उभी राहणारी पात्रे वास्तवातून आलेली असतात, हे खरे आहे. पण त्यांचा कादंबरीत विकास होताना त्यांचा त्या तथाकथित वास्तवाशी संबंध संपतो. ती कादंबरीतल्या वास्तवात विकास पावतात. तिथे त्यांची जसे असण्याची निकड कथानकात असते त्या प्रकारे त्यांचा विकास होतो. तुमचे हे विधान

फारच भंपक आहे, असे मी मानतो.'

'कादंबरीत तुम्ही दादासाहेब देशमुख हे पात्र माझ्यावर बेतले आहे. ते करियारिस्ट असे आहे आणि ते स्वातंत्र्य चळवळीपासून अलिप्त होते, असे तुम्ही दाखवले आहे. मी स्वातंत्र्य चळवळीत होतो.'

"आपण असालच. पण त्या पात्राचे तसे नसणे हे माझ्या लेखनाच्या उजेडात आवश्यक होते.'

"पण मी चळवळीत होतो. आणि आम्ही राजपूत आहोत. माझे पूर्वज राजपुतान्यातून इकडे आले. ते पेमगिरीच्या किल्ल्याचे किल्लेदार होते.'

'असतील ना. पण बघा, ते पात्र देशमुख आहे. आपण पाटील आहात. पाटलांची अनेक कुळे देशमुखांपेक्षा श्रेष्ठ मानली जातात, हे मला माहित आहे. तसे काही आपल्या कुळाविषयी मला माहीत नाही. आणि पेमगिरीच्या किल्ल्याचे आम्ही किल्लेदार होतो, असे सांगणारे या भागातले किमान अठरा वेगवेगळ्या आडनावांचे मराठा लोक मला माहीत आहेत. पेमगिरीच्या किल्याचे महत्त्व काय; तर शहाजी राजे-भोसले यांनी निजामशाहीतील राजकारणाचा भाग म्हणून निजामी वंशातील एक पोरगे अकरा महिने तिथे आणून ठेवले होते. आपण राजपूत असालच. पण मनुस्मृतीचा निर्णय घ्यायचा झाल्यास राजपूत हे उग्र किंवा व्रात्य क्षत्रिय नेमके मला आता आठवत नाही. पण दोन्हीपैकी एक खास आणि मराठा हे शुद्ध क्षत्रिय असे दिसते. अर्थात मी हे काहीच मानत नाही. पण आपण ते मानत असाल तर आपल्याला ते माहीत असावे असे मला वाटते. आणि साधे बघा; क्षत्रियत्वाची कसोटी काय, तर पराक्रम. आधुनिक इतिहासात मराठ्यांनी अनेकदा राजस्तानात जाऊन राजपुतांना ठोकून काढले आहे. आपल्या शिंदे आणि होळकर यांच्या चढायांचा इतिहास आपणास माहीत असेलच. त्यांनी राजपुतांना तिकडे जाऊन ठोकून काढले होते. राजपुतांनी आपल्याकडे येऊन असे काही केल्याचे इतिहासात दिसत नाही. औरंगजेबाची फौज घेऊन मिर्झाराजे जयसिंग आला होता, त्याने

शिवाजी राजास शरणचिट्ठी घेऊन दिल्लीस नेले, हा इतिहास आहे. पण राजा शिवाजी त्यातून निसटला आणि त्याने सारे परत मिळवले, हाही इतिहास आहे. नंतर औरंगजेब स्वतः फौज घेऊन महाराष्ट्रात आला, त्याने संभाजी राजास पकडून हाल हाल करून मारले. नंतर तो सत्तावीस वर्षे महाराष्ट्रात ठाण देऊन राहिला आणि मराठ्यांशी लढता लढता मेला. पण त्याला मराठ्यांचा पराभव करता आला नाही. मराठ्यांशी लढतांना तो थकला आणि मेला. एवढा काळ तो इकडे राहिल्याने त्याची दिल्लीतील सत्ता ढिली झाली. नंतर मुघल साम्राज्य कोसळले, ते मराठ्यांच्या या पराक्रमामुळे कोसळले, हा इतिहास आहे. त्यामुळे मराठे हे फार श्रेष्ठ दर्जाचे क्षत्रिय आहेत, हे सांगण्यासाठी वेगळ्या पुराव्याची गरज नाहीय. आणि हे असे म्हणताना मी हल्लीच्या मराठा जातीतील लोकच क्षत्रिय आहेत असे मानत नाही. आपल्या सगळ्या अठरा पगड जाती, आपल्याकडचे मुसलमान; हे सारे शिवाजी राजाच्या आणि नंतरच्या मराठा सैन्यात होते. न्हावी, परीट, महार, मेहतर असे सारे लोक होते. अर्थात, आपल्या मराठा लोकांना राजपुतांशी संबंध असण्याची चाह फार जुनी आहे, हे खरे आहे. शहाजीराजे स्वतःला राजपूत म्हणवून घेत असत. किंवा अगदी अलीकडे विजयाराजे शिंदे यांच्या नंतर ग्वाल्हेरचे शिंदे राजपुतांशी सोयरिका करू लागले. त्याच्या आधीपर्यंत मराठा कुळातील वधू निवडून शिंदे यांची लग्ने चांभारगोंदिया किंवा हल्ली ज्यास श्रीगोंदे म्हणतात; त्या गावी लागत असत. शिंदे यांची कुळी राणोजी शिंदे यांजपासून सुरू होते. ते थोरल्या बाजीरावाचे सरदार, मुळात सातारा भागातील कण्हेरखेड गावचे पाटील. महादजी शिंदे हा श्रेष्ठ पुरुष ; जो केवळ राणोजी शिंदे यांच्या राजपूत खांडाराणीचा पुत्र होता, म्हणून त्यास दासीपुत्र मानून तेव्हा राहुरी येथील तनपुरे-पाटील यांनी त्यास आपली कन्या विवाहात दिली नव्हती. हल्ली शिंदे यांचे सोयरे आंग्रे, जे सुप्रसिद्ध कान्होजी आंग्रे यांचे वंशज ; ते शिंदे यांचे सोयरे म्हणून स्वतःस राजपूत समजून इतर मराठे लोकांस हलके मानतात. वस्तुतः आंग्रे हे आग्रे. हे आग्रे किंवा आगरी लोक हे मराठेच होत. त्यांनी युद्धात अनेकदा फार जोर प्रकट केल्याचे इतिहासात नमूद आहे. रामदेवराव जाधव याचा पुत्र बिंबदेव कोकणात गेला असता कोणा तरी म्हात्रे नामक आगरी इसमाने युद्धात फार शौर्य प्रकट केले, म्हणून त्यास राणे हा किताब देण्यात आला. हे महिकावतीची बखर नामक ग्रंथात नमूद आहे. हा राणे मंडळीचा मूळ पुरुष असण्याची भरपूर शक्यता आहे. पण राणे हेही स्वतःला राजपूत समजतात. तसे इतिहास त्यांनी लिहिल्याचे माझ्या वाचनात आहे. याला काय करणार? ज्यांना जसे वाटते तसे त्यांनी म्हणावे अथवा मानावे. त्यास आडकाठी कोण करणार? राजारामशास्त्री भागवत नावाचा एक फार थोर माणूस महाराष्ट्रात होऊन गेला. त्यांच्या मते हा सारा देशच मुळात महारठू. मराठा जिथे जिथे गेला, तो तिथला झाला.'

'आपण फारच ज्ञानी दिसता.'

'आपल्या म्हणण्यातील प्रच्छन्न उपरोधाच्या उजेडात सुद्धा सांगतो,

मी बऱ्यापैकी वाचलेले आहे. त्याला माझा इलाज नाही. लेखकाला आडवे तिडवे वाचावेच लागते.'

'दंभ फार आहे त्याचा तुमच्यात.'

"असेल. पण जे असेल-नसेल त्यात वांशिक श्रेष्ठत्वाचा अहंकार

त्या मानाने कमी असेल असे वाटते.'

'असेल-नसेल असे का?'

'कारण मीही मराठा जातीत जन्माला आलो. क्षत्रिय असण्याच्या ओझ्यातून माझीही सुटका नाहीय. मी तसा प्रयत्न अर्थातच करत असतो. आणखी एक सांगतो. आज भंगी किंवा मेहतर म्हणून ज्या जातीस म्हटले जाते, ते सारे लोक क्षत्रिय आहेत असे माझे मत आहे. प्राचीन काळापासून युद्धात हरलेल्या लोकांना अंकित ठेवून विष्ठा उचलण्यासारखी गलिच्छ कामे करायला लावण्याची रीत भरतखंडात आहे. युद्धात जिंकलेला आणि हरलेला यांच्या शौर्यात फारसे अंतर नसते, असे युद्धांचे सारे इतिहास सांगतात. तरीही हरतो, तो हरतोच. आणि त्याला किंवा त्यांना ती कामे करावीच लागतात. तुम्ही भंगी स्त्री-पुरुषांना बघा. ते तगडे आणि देखणे असतात. ते क्षत्रियांचे वंशज खासच आहेत.'

'अमर्याद ज्ञान दिसते आपल्या ठायी.'

'त्याला माझा इलाज नाही.'

आमच्यातला वाद आता विकोपाला जाईल अशी परिस्थिती उभी राहिली होती. पण नशिबाने तेवढ्यात त्या गृहस्थांचे काही प्रशंसक झुंडीने इथे प्रवेश करते झाले, आणि त्यांनी माझी त्या लोकांशी ओळख वगैरे करून दिली. तेव्हा त्यातील एकजण म्हणाले, "साहेब फार मोठे आहेत. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होता होता राहिले.' मी उठून उभा राहिलो आणि म्हणालो, 'मी निघतो.' ते माजी मंत्री गृहस्थ म्हणाले, 'आपण का निघालात? आपण बसा ना, मी म्हणालो, 'हे सगळे आपले निकटवर्ती आले आहेत. त्यांना आपण वेळ द्या. आपणाशी उत्तम चर्चा झाली, यासाठी धन्यवाद.' मी हात जोडले. त्यांनीही.

एकूण असे की इथल्या आजच्या मराठा नामक जातीतील लोकात आपण उच्च कुलीन असल्याचे सांगण्याची चाह फार आहे. याचे कारण त्यांना त्यासंबंधी कायमच काट्यावर उभे राहावे लागेल अशी परिस्थिती कायम निर्माण करण्यात आलेली आहे. नजीकच्या भूतकाळातील इतिहासात छत्रपती शिवाजी राजास जसे या प्रश्नास सामोरे जावे लागले, तसेच त्यानंतर पुन्हा पुन्हा घडले आहे. सातारच्या प्रतापसिंह छत्रपती यांचा अभिषेक वैदिक पद्धतीने न करता तो पुराणोक्त पद्धतीने करावा यासाठी नाना फडणवीस याने संबंधित ब्राह्मण यास मोठे इनाम देऊ केले होते आणि दिले होते. क्षत्रियाचा राज्याभिषेक वेदोक्त पद्धतीने होतो. शूद्राचा पुराणोक्त पद्धतीने; हे यातले गुपित होते. राजा शिवाजी याच्या वंशजांच्या सातारा आणि कोल्हापूर अशा दोन्ही ठिकाणांभोवती पेशवे यांनी; विशेषतः नाना फडणवीस याने, ब्राह्मण वतनदार सरदार यांचा वेढा निर्माण केलेला होता. या सरदारांनी अनेकदा छत्रपतींच्या या पीठांवर हल्ले केलेले आहेत. तेही समजा ठीक मानता येतील, की बाबा; जो सत्ताधारी आहे, तो तशी खबरदारी घेणारच. कारण राजे नामधारी आणि पेशवे सत्ताधारी हे इतिहासातील वास्तवच होते. पुढे कोल्हापूरच्या राजर्षी शाहू छत्रपती यांच्या क्षत्रियत्वाविषयी प्रश्न तेथील ब्राह्मण, पुरोहित, राजोपाध्ये आणि मुख्य म्हणजे विष्णू गोविंद विजापूरकर या गृहस्थाने उपस्थित केले, तेव्हा त्याकाळी प्रसिद्ध असलेले बाळ गंगाधर टिळक यांनी आपल्या केसरी या वृत्तपत्रातून कर्मठ बामणांची तळी उचलत, भोसले यांच्या कुळीवर क्षत्रियत्वाचे संस्कार झालेले आहेत, ही गोष्ट खरी आहे. पण छत्रपती शाहू यांचे जनक कुळ घाटगे; यावर ते संस्कार झालेले

नाहीत, सबब त्यांनी तसा आग्रह धरू नये, असे निसरडे विधान केले होते. टिळक यांना त्यांच्या देशविषयक कामासाठी सगळ्या प्रकारची मदत आणि विजापूरकर यांना त्यांच्या ग्रंथमालेसाठी आर्थिक अनुदान शाहूराजे देत होते, हे लक्षात घेतले पाहिजे. विजापूरकर हे टिळकांचे घट्ट अनुयायी. टिळक ब्रह्मदेशातील मंडाले येथील तुरुंगवासातून सुटून आल्यावर त्यांच्या स्वागताला गेलेल्या मोजक्या तीन लोकात हे विजापूरकर होते. टिळक यांचे समकालीन असलेले राजारामशास्त्री भागवत यांनी ब्राह्मण जातीचे लोक मराठा लोकांच्या क्षत्रियत्वासंबंधी वाद निर्माण करून महाराष्ट्र-धर्माचे नुकसान करत आहेत असे म्हटलेले होते. तरीही एकूण ब्राह्मण जातीत मराठ्यांना शूद्र मानण्याच्या धारणा कायम प्रतिष्ठित राहिल्या. अव्वल इंग्रजी आमदानीतील एक सुधारक मानले गेलेले ब्राह्मण गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी सुद्धा देशावरील पाटील आणि देशमुख हे शूद्र वर्गातील असतात असेच म्हटलेले आहे. त्यांच्या शब्दयोजनेतील देश म्हणजे आजचा पश्चिम महाराष्ट्र होय. संगमनेर; जिथे मी राहतो, तिथून जवळच असलेल्या कोतूळ नामक गावातील माझा एक देशमुख मित्र म्हणाला, 'अरे आपण स्वतःला फार श्रेष्ठ क्षत्रिय म्हणवतो अन् तसे पाहून सोयरिका करतो. पण कोतूळला आमच्या ज्या नोंदी आहेत, त्यात अमुक अमुक देशमुख ; शूद्र असेच लिहिलेले आहे.' म्हणालो, 'नोंदी ठेवणाऱ्या लोकांच्या नजरेत आपण शूद्रच. त्यांच्यावर संकटे आली किंवा आपल्याकडून त्यांना काही लाभ करून घ्यायचा असेल तेव्हा ते आपल्याला क्षत्रिय म्हणतात. परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली किंवा नंद कुळाच्या समाप्तीनंतर क्षत्रिय संपले अशी त्यांची मांडणी आहे. कारण त्यानंतर क्षत्रियांनी त्यांचे आचारधर्म सोडले म्हणून ते शूद्र झाले, असे ते म्हणतात. पण मग ब्राह्मणांनी त्यांचे असे कोणते आचारधर्म त्यानंतर पाळले, म्हणून ते ब्राह्मण उरले, असा प्रश्न कोणी त्यांना विचारतो का? याचे कारण आमच्यात शिक्षणाची परंपराच नव्हती. मग असे प्रश्न कसे पडणार आणि कोण विचारणार? मुळात हे सगळे हास्यास्पद आहे. इथल्या सगळ्या जाती एकमेकांत इतक्या मिसळून गेलेल्या आहेत की वेगळेपणाचा, शुचित्वाचा दावा कोणालाही करता येणार नाही.असो.'

प्राचीन सिंधू संस्कृती आणि महारठ्ठ लोक यांच्यात काही नाते असावे असे जे तुझे म्हणणे आहे, त्याचा पाठपुरावा करणारे माझ्या भाषेत तरी मला काही दिसलेले नाहीय. महारठ्ठांचे आहे ते मी सांगतो. त्यात

तपशिलाने काही लागले तर मी त्याचा जमेल तसा- म्हणजे पुष्कळच बरा अनुवाद करून मी पाठवीन..

महाराष्ट्र हे अरण्य, जे दंडकारण्य म्हणून प्राचीन काळी ओळखले जात होते. तिथे भोई, कोळी, भिल्ल अशा जातींची वस्ती प्राचीन काळी होती. वि. का. राजवाडे यांच्या मते आधी नागकुलोत्पन्न क्षत्रिय इथे आले आणि त्यांनी इथे स्वतःची राजवट प्रस्थापित केली. त्यानंतर हजारेक वर्षांनी आर्यकुलोत्पन्न क्षत्रियांचे इथे आगमन झाले. ते आधीच्या नागकुलोत्पन्न लोकांपेक्षा संस्कृतीने उच्च होते. या दोन क्षत्रिय कुळांच्या मिलाफातून इथे जी संस्कृती उभी राहिली ती महाराष्ट्री लोकांची प्राचीन संस्कृती. या आर्यकुलोत्पन्न क्षत्रियांच्या तीन मुख्य टोळ्या राजवाडे यांनी सांगितल्या आहेत. महाराष्ट्रिक, सुराष्ट्रिक आणि वैराष्ट्रिक. पैकी महाराष्ट्रिक किंवा महाराजिक टोळ्या या चीनच्या युनान प्रांतातून

हाकलल्या गेल्याने खाली उतरल्या आणि मगधाच्या राज्याच्या बाहेर रहिवसल्या. काही शतकानंतर त्या खाली आजच्या महाराष्ट्रात उतरल्या. झारखंड मधल्या पहाडिया आदिवासी जातीत आजही पत्नी पतीला महाराज म्हणून पुकारते आणि पती तिला महाराणी म्हणतो, असे राजवाडे नमूद करतात. तीच गोष्ट सुराष्ट्रिक आणि वैराष्ट्रिक टोळयांची. त्या वायव्य दिशेकडून आल्या. सुराष्ट्र आणि वैराष्ट्र हे कोणते देश हे मला समजत नाही. ते प्राचीन बाल्हिक देश आणि त्रिगर्त देश, म्हणजे हल्लीच्या पख्तून लोकांचा देश आणि भारत पाकिस्तान मिळूनचा पंजाब या प्रदेशाशी संबंधित असावेत. तिकडून त्या टोळया आलेल्या असतील. पठाण आणि मराठे यांच्यात नक्की नाते असले पाहिजे अशी एक मांडणी राजारामशास्त्री भागवत यांनी केलेली आहे. साधारणतः कोणतीही भाषा आपल्या शेजारच्या प्रदेशातल्या भाषेशी नाते सांगत असते. पण मराठे आणि पठाण हे भूगोलाच्या हिशेबात एकमेकांपासून इतके दूर असताना त्यांच्या भाषांमधील नाते हे सगळयात घट्ट आणि निकटचे आहे, असे भागवत यांनी म्हटले आहे. पण मग मराठीचे तितकेच घट्ट नाते असामी बंगाली आणि ओडिया या भाषांशीही आहे. त्याचे काय? हान वंशीय चिन्यांनी हाकलल्यानंतर मराठे लोकांच्या टोळया असाम, बंगाल, मगध, ओडिशा करून हळूहळू सरकत आज ज्याला महाराष्ट्र म्हणतो त्या प्रदेशात इकडे उतरल्या? आणि भाषिक संस्कार घेऊन किंवा करून उतरल्या? हान वंशीय चिन्यांनी युनान मधून हाकलले गेल्याचा पुरावा मराठी भाषेत उरलेला आहे. 'हान साल्याला' किंवा 'लय कुत्रीच्या आईवानी हानला' हे शब्दप्रयोग मराठीत मौजूद आहेत. त्यात हान वंशीय चिन्यांनी दिलेल्या माराची स्मृती कायम जतन केली गेलेली दिसते. हे असे मी एकदा एका भाषणात म्हणालो, तर ते संपल्यावर एकजण म्हणाले, 'अहो! हन, हनति हे संस्कृतात आहे ना. तिथून ते मराठीत आले असेल.' म्हणालो, 'आधुनिक मराठीची जननी; जी महारठ्ठी किंवा महाराष्ट्री भाषा आहे, ती संस्कृतपेक्षा जुनी. संस्कृत म्हणजे संस्कार करून तयार केलेली भाषा. तिच्यात हा धातू महाराष्ट्रीतून गेला, असे म्हणणे जास्त युक्त मानावे लागेल.' असामी भाषा मराठीच्या फार निकटची आहे, इतकेच नाही तर आसामच्या आसपासच्या प्रदेशात सुद्धा मराठीचे नाते आहे. मराठीतली आई जशी सिंधी भाषेत आहे, तशीच ती आसामी भाषेत आहे. मिझोरामच्या राजधानीचे नाव ऐझ्वाल आहे. त्याची फोड आई झवाल अशी आहे. आई तिथेही आहे. मराठीत झवणे हा शब्द स्त्री-पुरुषांच्या एकशय्येसाठी वापरला जातो. मिझो लोकांच्या भाषेत झवणे म्हणजे प्रेम करणे. ऐझवाल, आईझवाल म्हणजे त्या लोकांच्या भाषेत मातृप्रेमाचे मंदिर. हे मला आजच्या एका फार मोठ्या भाषाशास्त्रज्ञाने सांगितलेले आहे. १९६२ साली चिनी लोकांनी जेव्हा या प्रदेशावर आक्रमण केले तेव्हा ते या लोकांना सांगू लागले की, तुमचा भारताशी कसा संबंध असू शकतो? तुम्ही आणि आम्ही खूप एकमेकांसारखे दिसतो. भारतीय तुमच्यासारखे कुठे दिसतात? पण या लोकांच्या मौखिक परंपरेत अनेक गाणी होती, ज्यांच्यात चिनी लोकांनी त्यांच्या केलेल्या छळाच्या कहाण्या जतन केलेल्या होत्या. त्या त्यांनी चिनी प्रचारकांना सांगितल्या आणि म्हणाले, तुम्ही आम्हाला मारलेत आणि हाकललेत. या भूमीने आम्हाला आश्रय दिलेला आहे. ही भूमी, हा देश, हे लोक आमचे आहेत. तुम्ही परके आहात, शत्रू आहात. अर्थात, युनान हा शब्द ग्रीस या देशासाठीही इकडे वापरला जातो, हेही लक्षात घेतले पाहिजे. आयुर्वेद ही जशी प्राचीन

रुग्णचिकित्सा पद्धती भरतखंडात आज मौजूद आहे तशीच युनानी थेरपी सुद्धा. महाभारतातील भारतीय युद्धात त्रिगत देशातील शतानिक योद्धे कौरवांच्या बाजूने लढले आणि पराभूत झाले. हे फार कडवे योद्धे म्हणून त्याकाळी प्रसिद्ध होते. युद्धात जिंकले तरच उज्ज्वल मुखाने घरी जायचे, पराभूत झाल्यास मरण पत्करायचे, अशी त्यांची रीत होती. पण ते पराभूत झाले. तशा स्थितीत घरी बायकांना तोंड दाखवणे त्यांना शक्य नव्हते. आणि मरून जाण्याची सुद्धा इच्छा नव्हती, म्हणून ते सरकत सरकत युनान म्हणजे हल्ली ज्यास ग्रीस देश म्हणतात, तिथे गेले, अशी एक मांडणी आहे. ते

शतानिक कडवे म्हणूनच शतान, शैतान असे शब्द त्यांच्यासाठी, त्यांच्या निमित्ताने अरब जगतात रूढ झाले असण्याची शक्यता आहे. पाकिस्तान देशाचा सध्याचा अध्यक्ष इम्रानखान एखाद्या ग्रीक देवासारखा देखणा दिसतो, असे तो पूर्वी क्रिकेट खेळत असताना अनेक लोक म्हणत असत. त्याचे मूळही कदाचित त्रिगत देशातील शतानिक योद्धे आणि युनान उर्फ ग्रीस यांच्यातील नात्याशी असणे शक्य आहे. काही ज्ञानी लोकांच्या मते मराठे हे शक लोक होत. आंग्ल भाषेत ज्यांना तुम्ही स्किथियन किंवा सिथियन म्हणता ते. प्रख्यात दामोदर धर्मानंद कोसंबी यांचे वडील धर्मानंद कोसंबी हे एक मोठे विद्वान होऊन गेले. त्यांनी, 'हर हर महादेव' हा जो युद्धघोष मराठे लढताना उपयोजितात, तो मुळात शकांचा घोष होय, असे म्हटलेले आहे. शकांचे राज्य आल्यावर येथील ब्राम्हणांनी या महादेवाला टाळता येत नाही, म्हणून पुराणात त्याला शिव अथवा शंकर याचेशी जोडून टाकले, अशी त्यांची मांडणी आहे. आणखी काही लोकांनी पानिपत येथील तीन युद्धे ही मुळात आधी आलेले शक आणि नंतर आलेले शक यांच्यात झाली, असे म्हटलेले आहे. मराठे लोक हे उझबेक लोकांसारखे आहेत, अशी एक मांडणी ह्यूएन त्संग किंवा फाहियान किंवा अल्बेरुनी यांच्यापैकी कोणीतरी केलेली आहे. मराठीत जसा अरे हा शब्द आर्य या अर्थी रूढ आहे, तसाच खेड्यातल्या भाषेत सका हा शब्द रूढ आहे. 'च्यायसका कशाला रे?' असे ते सहज म्हणतात. मराठ्यांच्या शक असण्याची किंवा त्यांच्याशी संबंध असण्याची स्मृती अशी उरलेली आहे. स्त्रियांची नावे शकुबाई, सकुबाई, शकुंतला असण्यापाठी सुद्धा हीच स्मृती असेल. काही लोक मराठ्यांचा संबंध मंगोल लोकांशी लावतात. विवाह प्रथा, बाशिंग बांधणे, घोडेस्वारी, कुस्तीची प्रथा अशी कारणे ते देतात. खेरीज अंकमापन पद्धतीतील साम्ये असल्याचेही ते सांगतात. श्रीधर व्यंकटेश केतकर नावाचे एक मोठे विद्वान या भाषेत होऊन गेले. त्यांनी राजवाडे यांच्यापेक्षा अधिक थेट मांडणी केलेली आहे. त्यांच्या मते महाराष्ट्रातील पहिली सुसंस्कृत लोकांची वसाहत ही महार लोकांची होय. त्याच्या आधी इथे भिल्ल, कोळी, भोई आणि तत्सम रानटी लोक राहात होते. ते सारे आजही इथे आहेत. पण महार आले आणि त्यांनी युद्धात या लोकांचा पराभव करून त्यांना रानात पिटाळून लावले. आणि स्वतःची वसाहत करून नागरव्यवस्था उभी केली. त्यानंतर हजारेक वर्षांनी रट्ट लोकांच्या टोळयांनी इथे हल्ले केले. कुरुरट्ट, पुरूरट्ट, भरूरट्ट; अशा त्या टोळया होत. त्यांनी हल्ले करून महारांचा पराभव केला. पण त्यांनी महारांना पिटाळून लावले नाही.

त्यांच्याशी विवाहसंबंध केले. महार आणि रट्ट यांच्यातील असे एकत्र येणे इथे किमान हजार वर्षे चालू असावे, असे केतकर म्हणतात. त्यांच्या एकत्र यण्यातून महारट्ट, मरहट्ट

किवा हल्ली ज्यास मराठे म्हणतात, ते लोक निर्माण झाले असा संकेत ते देतात. हे सारे भारतीय युद्धाच्या किमान हजार वर्षे आधी झाले असे ते म्हणतात. त्या भारतीय युद्धात अश्मक नावाचा महारठ्ठी राजा कौरवांच्या बाजूने लढताना कामी आला, असा उल्लेख असल्याचे स्पष्टीकरण ते देतात. या अश्मक राजाच्या नावाने जो महाराष्ट्री प्रदेश ओळखला जातो. तो हल्लीच्या अहमदनगर आणि औरंगाबाद जिल्ह्यांचा प्रदेश आहे, अशी एक मांडणी आहे. महाराष्ट्र हा शब्दप्रयोग त्या मानाने नंतरचा. महारठ्ठी किंवा महाराष्ट्री भाषा अधिक जुनी. ती अश्मक, विदर्भ, कुंतल, अपरांत अशा देशात बोलली जात असे, असे मानले जाते. आज हे सारे भाग नव्या महाराष्ट्राचा भाग आहेत. महार हे अस्पृश्य कसे झाले आणि कधी झाले असा प्रश्न स्वतःस करून केतकर त्याचे थोडे संदिग्ध उत्तर देतात. की बाबा, नंतर यादव किंवा जाधव नावाचे क्षत्रिय उत्तरेतून आले, त्यांनी हा भेद निर्माण केला असेल, अशी एक शक्यता ते सुचवितात. मराठीतील एक प्रख्यात समाजशास्त्रज्ञ इरावती कर्वे यांनी, 'महार तिथे महाराष्ट्र' अशी महाराष्ट्राची एक मांडणी केलेली आहे. ती बरीचशी युक्त मानावी अशी परिस्थिती आहे. राजवाडे ज्यांना नागकुलोत्पन्न क्षत्रिय म्हणतात, त्यांना केतकर महार म्हणतात. आणि राजवाडे ज्यांना आर्यकुलोत्पन्न क्षत्रिय म्हणतात, त्यांना केतकर रट्ट म्हणतात. या दोन क्षत्रिय लोकांच्या मिलाफातून महारट्ट किंवा हल्ली ज्याला मराठे म्हणतात, ती जात निर्माण झाली असे अनुमान आहे. त्यामुळे या दोन क्षत्रिय जाती एकमेकांशी संबंधित आहेत अशा निष्कर्षाला यावे लागते. पण यातही अडचणी आहेत. आणि त्या इरावती कर्वे, त्रिंबक नारायण आत्रे यांच्यासकट अनेकांनी मांडलेल्या आहेत. म्हणजे अडचणी म्हणून त्यांनी तसे काहीही मांडलेले नाहीय. पण मला त्या त्यांच्या सांगण्यातून आणि माझ्या जगण्यातून, निरीक्षणातून दिसतात. साधारणतः मराठा आणि त्यातही कुणबी; हा बैलासारखे काम करणारा असतो, असे मला दिसते. मराठा आणि कुणबी यांच्यातील भेदरेषा फार पातळ आहे. 'कुणबी मातला आणि मराठा झाला' अशी म्हण पुणे शहराच्या लगतच्या भागात प्रचलित आहे. श्रीमंत कुणबी जातीच्या सोयरिका मराठा लोकांशी होतात, हे ती म्हण ध्वनित करते. कुणब्याच्या अंगी फार ताकद असते असे बाकीचे, ब्राह्मणांपासून चांभार महारापर्यंत सारे; किंवा अगदी फासेपारधी आणि तत्सम भटके लोकसुद्धा म्हणतात आणि तोही ते मान्य करतो, किंवा त्यांनी तसे म्हणणे त्यास आवडते, पण प्रत्यक्षात तो त्यांचा गुलाम म्हणून जगणाऱ्या मूढ बैलासारखा असतो, असे माझे निरीक्षण आहे. बैल जसा कुणब्याचा गुलाम, त्याच्या जगण्याचा आस; तसाच तो बाकी सगळ्या जातींचा गुलाम ; त्यांच्या जगण्याचा मूढ आस असतो. ते त्याला बळीराजा म्हणतात आणि त्याला खणतात. तो फक्त काम करतो आणि अन्न निर्माण करतो. बाकी सारे त्याने निर्माण केलेल्या अन्नावर जगतात आणि त्यास राजा; बळीराजा म्हणतात. हे बाकी लोक आपल्याला राजाच्या जागी ठेवतात; तसे म्हणतात, म्हणून तो खूष होऊन आणखी अधिक काम करतो. बैलाला गुलाम म्हणून वापरणाऱ्या मराठा शेतकऱ्यास व्यवस्था तिचा गुलाम म्हणून वापरते. बैलाला आपण गुलाम आहोत असे त्याच्या आयुष्यभरात जसे लक्षात येत नाही, तसेच मराठ्याचे. लोकांच्या नजरेत आपण बैल आहोत, हे त्याला कळत नाही. ते आपल्याला राजा म्हणतात, या स्वप्नात तो बैलासारखा राबत राहतो आणि मरतो. या अर्थाने क्षेत्र धारण करणारा म्हणून तो क्षेत्रीय आणि प्रसंगी

शस्त्र हाती घेणारा म्हणून तो क्षत्रिय असतो. तो कमी बोलणारा, किंवा सहसा न बोलणारा आणि मागे मागे राहणारा असतो. महार याच्यापेक्षा वेगळा आहे. परंपरेत बाकी सगळ्या जाती मराठ्याचे किंवा कुणब्याचे दोहन करणाऱ्या असतात, तसाच तोही आहे. पण महार हा साधारणतः पुढे येणारा आणि चौकस असतो, असे निरीक्षण इरावती कर्वे यांनी नोंदविलेले आहे, ते मला पटते. समाजव्यवस्थेत तळाशी वावरताना त्याला कदाचित असे सावचित्त राहावे लागत असेल सुद्धा. पण मराठ्यापेक्षा वेगळी अशी आणखी काही वैशिष्ट्ये महाराच्या ठायी असतात. महार हा गाणे-बजावणे करणारा, कलाप्रेमी असतो. त्या बाबतीत त्याची तुलना फक्त ब्राह्मणाशीच होऊ शकते. बामणाघरी लिवणं अन् महाराघरी गाणं-बजावणं, असा एक वाक्प्रचार आहे. कुणबी हा खास कलाप्रेमी नसतो. महार, गोंधळी, भराडी यांच्या कलांचे खेळ त्याला अनेक प्रसंगी योजावे लागतात. पण प्रेम किंवा चाहत म्हणून सहसा तो त्यांच्यात गुंतत नाही. युद्धाची परिस्थिती आली की कुणबी तलवार हाती घेतो. युद्धात पराक्रम गाजवून जगण्याची संधी मिळाल्यास मराठा होतो. अन् ते करताना मेला तर हुतात्मा होतो. त्याचे हुतात्मा होणे फार लवकर विसरले जाते.

हे सारे जातींचे सरासरी स्वभाव म्हणून मी तुला सांगतोय. बाकी सारे मराठे हे क्षत्रियच आहेत असे मी मानतो. अन् मराठे म्हणजे अठरा पगड जातींसकट सारे. म्हणूनच महार हे क्षत्रिय आहेत, याविषयी माझ्या मनात यत्किंचितही शंका नाहीय. विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न नावाचा एक ग्रंथ लिहिलेला आहे. त्यात त्यांनी महार जातीविषयी केलेली मांडणी राजवाडे आणि केतकर या आधी उल्लेख केलेल्या विद्वानांशी जुळते. शब्दयोजनेत थोडा फरक आहे इतकेच. ते तुझ्याही लक्षात येईल. त्यांचे म्हणणे असे: महार ही जात महाराष्ट्रात मुख्य बलुतेदार म्हणूनच नव्हे तर वतनदार म्हणून नांदत होती. महाराष्ट्राची पहिली वसाहत महारमांगांची असून पुढे ती मराठ्यांनी बळकावली असण्याचा पुष्कळ संभव आहे. मराठे इथे येण्यापूर्वी गावांचे जे वतनदार महार पाटील होते, ते मराठ्यांपुढे हार खाऊन त्याचे अव्वल बलुतेदार आश्रित होऊन राहिले. आजही गावाला लागून असलेल्या अस्सल प्रतीच्या जमिनी महारकी वतनाच्या आहेत. बऱ्याच गावांच्या पाटीलक्या या महारांच्या होत्या. विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांच्या पुस्तकात महारांच्या पाटीलक्या आणि त्यांचे लढाऊपण यांचे अनेक दाखले पुराव्यांनिशी दिले आहेत. ते बरीदशाही, जिजाबाई, राजाराम यांच्या काळापासून ते पेशवाईच्या काळातले आहेत. १८१८ साली पेशव्याच्या सैन्याचा सामना करताना कामी आलेल्या महार सैनिकांच्या शौर्याचे स्मारक असलेला विजयस्तंभ पुण्याजवळ भीमा कोरेगाव येथे मौजूद आहे. आजच्या भारतीय फौजेत जशी मराठा लाईट इन्फंट्री आहे तशीच महार रेजिमेंट सुद्धा आहे. खेड्यातील काही रीतीरिवाज जे अगदी परवा परवा पर्यंत टिकून होते, ते तुला सांगतो. त्यात महार हा या भूमीचा मूळ मालक आहे, आणि ही भूमी आपण त्याच्याकडून बळाने घेतलेली आहे, अशी मराठ्यांची अध्याहृत भावना दिसून येते. नवीन घर बांधल्यास वास्तुशांतीचे तोरण महाराने वाजत-गाजत आणून लावायचे असते. गावातल्या यात्रेत ग्रामदेवतेला बळी देण्याचा मान महाराचा असतो. पूर्वी रेड्याचा बळी देत. हल्ली बोकड देतात. लग्नाचे तोरण महाराच्या हस्ते बांधले जाते. मयतीच्या प्रसंगी

महाराने कैलासाला गेला असा शब्दोच्चार केल्यावरच दहनविधी पूर्ण होतो. भूमीचा मूळ मालक महार. म्हणून मयताच्या नातेवाईकांनी दहनानंतर कुवतीनुसार मयताच्या आयुष्यभराचे जागाभाडे म्हणून त्याला पैसे द्यायचे. लहान बाळास, नव्या नवरीस दृष्ट लागते, ती महारणीनेच मीठमिरची उतरून काढावी लागते. बेंदराचा बैल धरण्याचा मान महाराचा असतो. या सगळ्याला जोडून छत्रपती शिवाजी राजाच्या राज्याभिषेकाची एक गोष्ट सांगतो. त्या काळच्या राजकारणाचा भाग म्हणून त्याला आपला राज्याभिषेक वैदिक पद्धतीने करून घ्यावा लागला. त्यासाठी त्यास काशीच्या गागाभट्ट यास भरपूर लाच द्यावी लागली. त्यानंतर त्याने पुन्हा तांत्रिक रीतीरिवाजानुसार राज्याभिषेक करवून घेतला, हे इतिहासात नमूद आहे. ते त्यास त्याची आई जिजाबाई हिच्या आग्रहाखातर करावे लागले हेही नमूद आहे. या प्रसंगी त्यास एका महार स्त्रीशी विवाह करावा लागला आणि त्याने तो केला असे एक श्रेष्ठ अभ्यासक शरद पाटील यांनी नोंदवून ठेवले आहे. तांत्रिक विधीचा भाग म्हणून त्यास ते करावे लागले असे ते आणि इतर म्हणतात. मला ते वेगळे दिसते. जिजाबाई ही जाधवांच्या कुळातील म्हणजे राजकुळातील होती. या भूमीचा राजा होण्यासाठीचे प्राचीन विधी तिला अधिक नेटके माहीत होते. महाराष्ट्राची भूमी ही मुळात महारांची आहे आणि तिचा स्वामी किंवा राजा होण्यासाठी या भूमीचा म्हणजे महारणीचा स्वामी होणे, हा त्या लग्नविधीचा अर्थ होय, असे मला दिसते. शिवाजी राजाने आपल्या या महार पत्नीस बाकी सगळ्या पत्नींइतकेच सन्मानाने वागविले. आज बुलडाणा परिसरातील तिच्या माहेरीचे लोक स्वतःस राजपूत म्हणवून घेतात. त्यांच्या सोयरिका राजपूतांशीच होतात, असे मी ऐकले आहे.

आणखी एक वेधक गोष्ट सांगून हे माझे भरताड निवेदन संपवतो. आजच्या पाकिस्तानातील सिंध प्रांतात मुस्लीम महार राजपूत नावाचे लोक आहेत. ते संख्येने विपुल आहेत. त्यातले काही पाकिस्तानी पंजाब मधल्या सरायकी प्रदेशात आहेत. या लोकांचे फेसबुक पेज सुद्धा आहे. बलूचिस्तानातील मराठे, हरियानातील मराठे अशा शोध घेताना अचानक ते मला सापडले. अनेक पाकिस्तानी आणि हिंदुस्तानी मुसलमान स्वतःला राजपूत म्हणवून घेतात. हे सिंधी महार स्वतःला अभिमानाने महार राजपूत म्हणवतात. स्वतःला क्षत्रिय म्हणवताना ते राजपूत म्हणवत असतील, हे सरळच होय. कोण हे महार राजपूत? ते प्राचीन सिंधूसंस्कृतीचे सभासद असतील का? ती संस्कृती मुळात महार लोकांची असेल का? आर्य किंवा तत्सम रानटी लोकांनी त्या संस्कृतीचा विच्छेद केल्यावर तिथले महार खाली उतरून महाराष्ट्र नामक भूमीत उतरले असतील का? हे उतरलेले लोक महाराष्ट्री संस्कृतीचे आद्य संस्थापक असतील का? त्यांनाच रट्टांनी पराभूत करून त्यांच्याशी सोयरिका केल्या असतील का? त्यातून महारट्ट किंवा मराठे ही ज्ञाती निर्माण झाली असेल का? आणि सिंधमध्ये जे उरले तेच आजचे

मुस्लीम महार राजपूत असतील का?

मला प्रश्न पडतात रिचर्ड. मी तुझ्यासारखा समाजशास्त्रज्ञ नसल्याने मला नीट विश्लेषण करता येत नाही. पण प्रश्न असतात. ते मी तुझ्यासमोर मांडले आहेत. तुझ्या मांडणीला, आकलनाला खाद्य पुरविल असे काही यातून मिळाले असेल असे मला वाटते. काही प्रश्न उपस्थित झाल्यास मला विचार. माझ्या सांगण्यावर तू पूर्ण भरवसा ठेवणार नाही, याची

मला खात्री

आहे. पण मला वाटते, ते मी सांगावे, असे तूच मला सांगून ठेवलेले आहे. ते मी फार उत्साहाने करीत असतो, हे तुला दिसत असेलच. माझ्या प्रश्नांची उत्तरे तुला दिसली असल्यास कळव. ती स्पष्ट किंवा धूसर जशी असतील तशी कळव. बाको प्राचीन इतिहासात जाणे, हे निदान भरतखंडासाठी तरी, अंधारात उडी घेण्यासारखे आहे, असे माझे मत आहे. तुला काय वाटते, ते कळव.

8

'प्रिय रिचर्ड,

मी तुला आता अत्यंत वेधक वाटेल अशी एक गोष्ट सांगणार आहे. माझ्या मागच्या मेलला तू प्रतिक्रिया अजूनही दिलेली नाहीस, म्हणून मी तुझ्यावर रागावलेलो आहे. अर्थात, तुझ्या प्रतिक्रिया सुद्धा असतात तेव्हाही फार त्रोटक असतात, ही माझी तक्रार असतेच. मी ते तुला सांगितलेले आहे. तुझे म्हणणे असे की, मला ऐकणे आवडते. मी तुला सांगतो; फक्त ऐकणारी माणसे फार लबाड असतात असे माझे निरीक्षण आहे. आणि ते सॉक्रेटिस पासून आहे. ते तुम्हाला बारकासा प्रश्न विचारतात. तुम्हाला बोलते करतात. आणि प्राणीसंग्रहालयातील एखाद्या प्राण्याकडे पाहावे तसे तुमच्याकडे पाहतात. त्यांच्या नजरेत तुम्ही माणूस नसता. तुम्ही त्यांच्या कुतूहलाची पूर्ती करण्याची शक्यता असलेली एक वस्तू फक्त असता. आमच्याकडे तेंडुलकर नावाचे एक नाटककार होऊन गेले. ते या प्रकारे प्रश्न विचारून इतरांना बोलते करत असत. त्यांच्या नजरेत समोरची व्यक्ती फक्त एक वस्तू असे, हा माझा अनुभव आहे. मी सॉक्रेटिसला पाहिलेले नाही, तेंडुलकरांना पाहिले आहे. माणसांना वस्तू करणारे हे लोक मला ताप देतात. तसे तुही मला वस्तू म्हणून पाहतोस असे बऱ्याचदा माझ्या मनात येते. तसे झाले की मला तुझा राग येतो. तशाही स्थितीत ; ते मनात असतानाही, मी तुला हे सांगतो आहे, यावरून तू माझा उत्साह ताडू शकतोस. मी अगदी अलीकडेच बुलडाणा येथे गेलो होतो. तिथे रवींद्र इंगळे-चावरेकर नावाचा माझा एक मित्र राहतो. तो मुळात कवी आहे. पण गेल्या काही वर्षात नादावून जाऊन त्याने प्राच्यविद्या, भाषाशास्त्र, लिपीशास्त्र, इतिहास, संस्कृती या आणि अशा अनेक क्षेत्रात अतोनात काम करून ठेवले आहे. त्या साऱ्याला अजून प्रकाश मिळालेला नाहीय. त्याच्यापाठी त्याचे काही हट्ट असतील, कदाचित पुरेसा आत्मविश्वास नसेल किंवा आणखी काही असेल, पण त्याची त्याची म्हणून एक ठाम भूमिका इतिहास आणि संस्कृती यांजसंबंधी आहे. अनेकदा तो म्हणतो ते मला तितके पटत नाही. पण आपण विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाला त्याच्याकडे गोळीबंद उत्तरे असतात. ते समजा सोडू. पण प्राचीन लिपीविद्या आणि तिच्या प्रसाराचा इतिहास यांच्या संबंधी त्याने केलेली मांडणी तुलाही वेधक वाटेल असे मला वाटते. जगातली सर्वात प्राचीन लिपी ही सिंधू संस्कृतीची लिपी होय आणि बाकी साऱ्या लिप्या तिच्यातून उद्भवलेल्या आहेत असे प्रमेय तो मांडतो. अगदी सर्वात प्राचीन मानली गेलेली सुमेरियन लिपी सुद्धा तिच्यातून उद्भवली आहे, असे त्याचे म्हणणे आहे. त्याने लिहिलेल्या अप्रकाशित ग्रंथात त्याने हे सप्रमाण मांडले आहे.

माझ्या साऱ्या प्रश्नांना त्याने समर्पक उत्तरे दिलेली आहेत. तरीही मी त्या क्षेत्रातला

अभ्यासक नाहीय, ही माझी मर्यादा उरतेच. त्यामुळे ज्ञानी लोकांनी त्याचे काम पाहणे हाच पर्याय उरतो, असे मला वाटते. सिंधू संस्कृतीच्या प्राचीन लिपीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न जगभरातील अभ्यासकांनी केलेला आहे. त्यापैकी कोणताही अर्थ ज्ञानी लोकांना समर्पक वाटलेला नाहीय, असे मी ऐकलेले आहे. रवीने तो प्रयत्न केलेला आहे आणि तो वेधक आहे. मी इथे दिलेले चित्र नक्कीच तुझ्या परिचयाचे असेल, याची मला खात्री आहे. मध्यभागी बसलेला नायक आणि त्याच्या भोवताली हत्ती, मनुष्य, वाघ, महिष आणि गेंडा हे प्राणी आहेत. बाकी चारी बाजूंनी सिंधू लिपी आणि तिचा देवनागरी पर्याय असे त्याने मांडले आहे. स्वर, व्यंजन, काना, मात्रा, वेलांटी, उकार असे सारे त्यात आहे. हे सारे करतानाची विश्लेषक माहिती तो देतो. ती मला चिरेबंद वाटते. देवनागरी लिपी तुला जुजबी स्वरूपात माहीत आहे का? नसल्यास मी ती तुला सांगू शकेन.

किंवा ही मांडणी सिंधू आणि रोमन लिपी अशी करूनही मी तुला पाठवू शकेन. ते अर्थात रवीच करून देईल. यात अधिक वेधक भाग आहे तो, चित्राच्या खालच्या बाजूला मध्याशी लिहिलेले सिंधू लिपीतले लेखन- जे वरील नायकांच्या मुद्रेतूनच खाली घेतलेले आहे. त्याचे देवनागरी वाचन असे: 'ना क ना म मा र.' म्हणजे नाक नाम मार. त्याचा अर्थ, नायकाचे नाव मार असा रवी देतो. म्हणजे हे चित्र हे मार लोकांच्या नायकाचे आहे, असे त्याचे म्हणणे. या पार्श्वभूमीवर तो म्हणतो की, त्या काळी मार नावाचा एक वंश सिंधू संस्कृतीत अस्तित्वात होता.आणि व्यापाराद्वारे तो जगभर पोहोचलेला होता. इथे दिलेले हे चित्र मार या वंशनायकाचे आहे. आणि त्याच्या भोवताली जे पंचप्राणी आहेत, ते या मारवंशाची विविध कुळे आहेत. उदाहरणार्थ, हत्ती (अहिकुल), महिष (महिकुल), वाघ (वाघेला कुल), गेंडा (गोंड कुल), मनुष्य (हर वा हरी कुल) मार वंशाची अशी पंचकुळे त्या काळी विकसित झालेली होती. आणि या पाचही कुळांचा वंशनायक हा मध्यभागी बसलेला मार नायक होय. त्याचे असे म्हणणे चित्र पाहताना आपल्याला पटते. याच प्रकारे सिंधू संस्कृतीतील आणखी काही अशा लिपी-चित्रांचाही अर्थ त्याने लावलेला आहे. तोही मला वेधक वाटतो. सिंधू संस्कृती ही जगातील आद्य संस्कृती आहे आणि त्या संस्कृतीची ही लिपी, ही जगातील आद्य लिपी आहे, असे रवीचे म्हणणे आहे. सर्वात प्राचीन मानली

गेलेली सुमेरियन संस्कृती ही तिच्या नंतरची असे तो म्हणतो. सुमेरियन, खाल्डियन, ब्राह्मी, अरेबिक, चिनी जपानी, देवनागरी, रोमन ; अशा जगातील साऱ्या लिप्या तिच्यातून उद्भवल्या आहेत, असे त्याचे म्हणणे त्याने सप्रमाण त्याच्या या ग्रंथात मांडले आहे. त्याच्याही पुढे जावून सिंधू संस्कृती ही आरंभी म्हणजे, इतर कुळांचा विकास होण्यापूर्वी या मारवंशीय हर अथवा हरी लोकांची संस्कृती होती, असे तो म्हणतो. आणि या लोकांच्या नावावरूनच या प्रदेशाला महारठ्ठ म्हटले जात होते. यात मार+हर+छु अशी पदे आहेत. यात मार हे वंशवाचक, हर हे कुलवाचक आहे तर रछु चा अर्थ राष्ट्र असा आहे. परिणामतः मारहरठ्ठ म्हणजे मारहठ्ठांचा प्रदेश जो पुढे वर्ण विपर्यासाने महारठ्ठ असा झालेला दिसतो, असे तो मांडतो. त्याच्या मते, हर म्हणजे गाढव. मूलतः हे मारवंशीय हर वा हरी लोक गाढवांचा वापर करीत हिंडणारे आणि नदीकाठी सोय सापडेल तिथे तळ ठोकून ऋतुमानानुसार पशुपालन व फिरस्ती शेती करणारे लोक होते. अशा या लोकांचा देश म्हणजे मारहरछ वा महारठ्ठ. त्यांची भाषा मारहरठ्ठी किंवा महारठ्ठी किंवा महाराष्ट्री. ती सिंधू संस्कृतीची मूळ भाषा होती. संस्कृतीच्या उद्भवाच्या प्राचीला या महारठ्ठाचा विस्तार गांधार ते यमुनेपर्यंत होता. प्राचीन भरतखंडात सगळीकडे कमी अधिक फरकाने महारठ्ठी भाषा वापरात होती असे तो म्हणतो. असे त्याचे म्हणणे हे राजारामशास्त्री भागवत यांच्या म्हणण्याशी जवळ जाते. सगळा देश मुळात मराठ्यांचा. प्राचीन काळापासून जो मराठा जिकडे गेला, तो तिथे रहिवसला, तिथला झाला, असे ते म्हणतात. हे म्हणजे, व्यासोच्छिष्टम् जगतम् सर्वम्, या चालीवर, महाराष्ट्रोच्छिष्टम् भारतवर्षम् असे म्हणावे लागेल. या प्रकारचा अन्वय मनाशी धरून रवी उर्फ रवींद्र इंगळे-चावरेकर याने महारठ्ठी भाषेतील बावीसशे वर्षांपूर्वीचा उपलब्ध ज्ञात आद्यग्रंथ गाहासतसई किंवा संस्कृतात, गाथासप्तशती यातील गाथांचा जो अर्थ लावला आहे, तो केवळ अप्रतिम असाच आहे. हाल नावाच्या सातवाहन राजाने किमान सत्तर कवींच्या कविता गोळा करून हा ग्रंथ सिद्ध केलेला आहे. संस्कृत वर भर देऊन अर्थ लावणाऱ्या आधीच्या जोगळेकर किंवा केतकर या श्रेष्ठ अभ्यासकांपेक्षा रवी वेगळा आणि अधिक पटणारा, अधिक सुंदर अर्थ मांडतो. तो आंग्लभाषेत तुझ्यापर्यंत सगळ्या बारकाव्यांसकट पोहोचविणे माझ्यासाठी अशक्य आहे. रवी याने इतकेच काम केलेले नाहीय. हा त्याच्या एकूण लेखनाचा केवळ हिमनगासारखा भाग आहे. सिंधुसंस्कृतीचा विनाश, रानटी लोकांची भरतखंडातील आगमने, वेदविद्या, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास, जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था, अशा असंख्य विषयांवर त्याने खूप काम करून ठेवलेले आहे. त्याची चिकित्सा होऊन त्याला प्रकाश मिळणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

आता मी रवीला न विचारलेले किंवा नंतर माझ्या मनात आलेले तुला सांगतो. कारण त्याला काहीही विचारले असते तर त्याने त्या प्रश्नांची त्याला दिसणारी ठाम उत्तरे देऊन मला निरुत्तर केलेच असते, याची मला खात्री आहे. दीर्घकाळ एकाकीपणे अभ्यास करणाऱ्या आणि प्रतिसादाची कसलीही फिकीर न बाळगता काम करणाऱ्या कोमल, सुस्वभावी माणसाच्या ठायी सुद्धा काही एका टप्प्यावर जे काठिन्य येते, ते त्याच्या ठायी आले असावे असे मला वाटते. त्याला भिऊन सुद्धा कदाचित मी त्याच्याशी अधिक बोललो नसेन. पण तुला सांगायला काय हरकत? म्हणून सांगतो. हे सारे जे तो मांडतो, त्या

उजेडातच आहे. पण काहीसे वेगळे आहे. असे बघ; मार+हर म्हणजे मारहर म्हणजे महार. ठु म्हणजे राष्ट्र. महारठ्ठ म्हणजे महार लोकांचे राष्ट्र किंवा त्यांचा देश. म्हणजे महार लोक हे त्या संस्कृतीचे सभासद. या पद्धतीने विचार करता महार हे सिंधू संस्कृतीचे सभासद असावेत असे दिसते. त्यांची भाषा महारठ्ठी. तिथे किंवा भरतखंडातील इतर जागी आर्य किंवा तत्सम रानटी टोळयांनी आक्रमण केले म्हणून हे महार तिथून विस्थापित झाले. ते जास्त करून आजच्या महाराष्ट्रात आले आणि तिथे त्यांनी त्यांची नगरव्यवस्था म्हणजे संस्कृती उभी केली. तसे ते तुरळकपणे या भरतखंडाच्या इतर भागातही गेले असतील, पांगले असतील. ते सोबत अर्थातच त्यांची भाषा आणि संस्कृती घेऊन गेले असतील. आपण ज्याला आज महाराष्ट्र म्हणतो, तो दगडधोंड्याचा अवघड मुलूख. तिथे वस्ती मागायला आणखी कोण कशाला येतो? म्हणून या महार लोकांना तो सुरक्षित वाटला असेल. म्हणून जास्त संख्येने ते इथे आले असतील. इथे असलेल्या आदिवासींना त्यांनी रानात, डोंगरदऱ्यात पिटाळले असेल. आणि मैदानी प्रदेशात त्यांनी स्वतःची संस्कृती उभारली असेल. आक्रमक आर्य किवा तत्सम रानटी लोकांनी गंगा-यमुनेच्या सुपिक मैदानी प्रदेशात वसाहत केली असेल. सिंधपासून केरळ ते पलीकडून तामिळनाड वगळता आंध्र, ओरिसा, बंगाल, आसाम अशा प्रदेशात तुलनेने संस्कृत अशा महार लोकांनी जाऊन त्यांनी आपली भाषा आणि संस्कृती तिथे प्रतिष्ठित केली असेल. गंगा यमुनेच्या दुआबात गर्दी होऊन तिथले काही लोक पुन्हा या किनारी भागात नंतर आले असतील. पण ते तिथल्या स्थानिक भाषा आणि संस्कृती यांच्यात मिसळून गेले असतील. एखाद्या जागेत खूप मनुष्ये निर्माण झाली की ती भरलेल्या भांड्यातून पाणी बाहेर सांडावे तशी बाहेर सांडतात. या प्रकारे माणसे गर्दीच्या ठिकाणांवरून इतरत्र पांगली असतील. ही प्रक्रिया आजही आमचा उत्तर प्रदेश, बिहार आणि शेजारचा बांगला देश इथून होताना दिसते. भरलेल्या भांड्यातून सांडावी तशी तिथून सांडलेली लोकसंख्या उर्वरित भरतखंडात पसरत असते. असो. महाराष्ट्री भाषी महार सिंधु संस्कृतीच्या विनाशानंतर देशभर पसरले. दगडधोंड्याच्या मराठी मुलखात जास्त संख्येने आले आणि गंगा- यमुनेच्या दुआबातील लोकसंख्येच्या वाढत्या फुगाऱ्याने सगळीकडे बाहेर लोटले गेले असावेत. आज मराठी भाषेचे नाते आपल्याला साऱ्या भारतीय भाषांशी जे दिसते, त्याचे कारण हेच, असे मला दिसते. समजा मराठीला या प्रकारे केंद्रस्थानावरून काढून आणखी कोणतीही भाषा; समजा, बंगाली,ओडिया यांना केंद्राशी आणून सारे भरतखंड बंगाली होते किंवा ओडिया; असे कोणताही अभ्यासक म्हणणार नाही. ती जागा फक्त महारठ्ठीची आहे. आमच्या भरतखंडात सगळयात जास्त संख्येने बोलल्या जाणाऱ्या हिंदी भाषेवर सुद्धा म्हणूनच मराठीचा सगळयात जास्त प्रभाव आहे. उलटे म्हणणे- म्हणजे हिंदीचाच इतर भारतीय भाषांवर प्रभाव आहे- हे देशी भाषा संस्कृतोद्भव आहेत, असे म्हणण्याइतके अडाणीपणाचे होईल. या प्रकारची मांडणी जवळपास सगळया वास्तवांशी आणि ज्ञानी लोकांच्या विधानांशी सुसंगत होते. महार तिथे महाराष्ट्र हे इरावती कर्वे यांचे विधान त्यातून सिद्ध होते. हा सगळा देश मुळात मराठ्यांचा. मराठा हा जिथे जिथे गेला, तो तिथला झाला, हे राजारामशास्त्री भागवत यांचे विधान अर्थपूर्ण होते. गंगा-यमुनेच्या दुआबातून किंवा आणखी कुठून बाहेरचे लोक महाराष्ट्रात आले आणि ते इथल्या लोकात मिसळून गेले, हा

तर्क सिद्ध होतो. रट्टांनी इथल्या महार लोकांशी सोयरिका करून मराठा नामक जात निर्माण झाली असा तर्क करायला वाव मिळतो. उरलेले पराभूत महार गावकुसाबाहेर ढकलले गेले, हे कळते. या पराभूत क्षत्रिय असलेल्या इथल्या मूळ निवासी महारांना मराठा लोक जो मान देत, त्याचा अर्थ कळतो. विजयी आणि पराभूत यांच्या क्षात्रवृत्तीत फार कमी अंतर असते, हे सरळच होय. म्हणूनच मराठे परंपरेने महारांचा मान राखत असावेत असे मला वाटते. सिंधू संस्कृतीच्या विनाशानंतर जे महार तिथेच राहिले ते आजचे मुस्लीम महार राजपूत होत, असेही ध्यानात येते. सिंध आणि पाकिस्तानातील पंजाबचा सरायकी इलाखा येथे हे लोक मोठ्या संख्येने आहेत. सिंध मध्ये अधिक आहेत. त्यामुळे मुळात हे सगळे भरतखंड नगरवासी मार आणि कृषीजन हर म्हणजे मार+हर = मारहर म्हणजे महार लोकांचे, असा तर्क कितपत युक्त आहे? सिंधु संस्कृतीतील ना क ना म मा र म्हणजे नाक नाम मार असेल आणि नाक म्हणजे नायक किंवा नाईक असेल तर ते उपपद महार लोक लावत हे शिवकाल, पेशवेकाल यातील कागदपत्रात नेहमीच दिसते, किंवा ते उपपद अगदी भीमा-कोरेगाव येथील पेशवे विरुद्ध इंग्रज यांच्यातील युद्धात इंग्रजांच्या बाजूने लढलेल्या आणि कामी आलेल्या महार जातीच्या शिपायांच्या नावात सुद्धा दिसते. ती नावे तिथे इंग्रजांनी उभारलेल्या विजयस्तंभावर कोरलेली आजही मौजूद आहेत. सोमनाक कमलनाक, रामनाक येमानक, गोदनाक कोठेनाक, भागनाक हरनाक, गणनाक धर्मनाक, वीटनाक धामनाक याच प्रकारची ती नावे आहेत.

माझी मांडणी ही अर्थातच जरा अंदाजी स्वरूपाची आहे. पण रवीची गोळीबंद आणि महत्त्वाची. तुझ्यासारख्या ज्ञानी माणसाला जे तर्क करता येतील त्यात तुला अधिक संधी उपलब्ध व्हावी म्हणून माझा हा अडाणी तर्क सुद्धा मी मांडला आहे. हे सारे तुला वेधक वाटेल अशी मला आशा आहे. आमचे हे भरतखंड ही जगातल्या सा-या मानवी वंशांच्या घुसळणीची पुण्यभूमी आहे. म्हणूनच जगातल्या यच्चयावत मानवी वंशांची

वैशिष्ट्ये आमच्यात सहज दिसतात. आज अमेरिकेला आपण दुनियेचे म्हणतो. भरतखंडात हे सारे कधीच घडून गेलेले आहे, आणि प्रत्यही घडते आहे. वंशाच्या शुचित्वाचा कोणताही दावा इथे काडीच्याही उपयोगाचा नाहीय, हे स्पष्ट आहे. तरीही लोक तसे दावे करतात हेही आहेच. मी माझ्या मुळांचा शोध घेत गेलो तेव्हा सुद्धा मी ही घुसळण पाहिली- अनुभवली आहे.

माझ्या या मेलला रिचर्डने तातडीने उत्तर दिले.

My Dear Debnath,

I am favorably impressed, in fact fascinated and overwhelmed by the way your friend has tried to read and interpret the script of ancient Indus civilization. I guess, I understood what you intended to transpire. If my guess is right, and if my understanding is correct, this work of your friend may possibly impact and revolutionize the set and established ideas about pre-historic world. If his ideas stand to the test of intellectual churning of the archeologists and the experts in history of scripts, they may have a very

strong impact on the ancient history of the region that may stretch from,say; Latvia, Estonia to Egypt and other cultures in that region. Tell your friend, I am extremely eager to see him. Obviously, you will be the one to take me to him. I cannot and I don't want to disregard you as things stand. To me, you are a family and a major source or route to understand everything about the ancient history of the great Indian sub-continent. You have been constantly and exorbitantly telling me about your exploits, of your journey in to the past of your ancestry. That is interesting and enterprising. You will get somewhere to a point that will lead you to nowhere. You will realize this or probably must have;

I presume. In any case, that is a different issue and we will discuss that when we meet. We as a human race and species are mixed to a degree that is beyond our imagination. It is natural. It strictly follows laws of nature. The purity of a race or a clan is a completely laughable and ridiculos notion. Have you come to this conclusion? You must certainly have. In any case, this is a minor issue. The hypothesis proposed by your friend is paramount. I am planning to come to India as soon as possible. I am extremely eager to meet him andunderstand his ideas and hypotheses. Please understand, I am not undermining your friendship and kinship. That, in fact, for me, is the basis of all that is there to see and realize. I believe, your concerns have reached me. That has prompted me to plan this trip. Obviously we will be together in all that concerns our curiosity and the domains of enquiry. In the meanwhile, I shall revisit and sharpen my understanding of Devanagari script. Convey my regards to Ravi; your friend.

Your's Richard.

रिचर्डचे पत्र वाचून मला गंमत वाटली. तो पाल्हाळिक लिहिणारा नाहीय. त्याला म्हणायचे ते पुन्हा पुन्हा म्हणणारा तो नाहीय. पण त्याच्या या मेलमध्ये तसे झाले होते. कमीत कमी शब्दात नेमके ते सांगणे हे त्याचे वैशिष्ट्य. पण तो एक तर रवीच्या मांडणीने अतोनात प्रभावित झालेला होता. आणि हे सारे माझ्यामुळे त्याच्यापर्यंत पोहोचले याच्याविषयीची कृतज्ञता त्याच्या मनात होती. त्या दोन भावनांच्या मधल्या ओढाताणीत वेल्हाळ होऊन तो पाल्हाळिक झाला होता आणि स्वतःला पुनरावृत्त करत होता. मी रवीला त्याच्या पत्राचे कळवले. फार मोठी गोष्ट होती. रवीच्या मांडणीला तो फार मोठा आणि आस्थेवाईक प्रतिसाद होता. जगप्रसिद्ध ऑक्सफर्ड विद्यापीठातला एक ज्ञानी प्रोफेसर बुलडाण्यात राहून एकाकीपणे काम करणाऱ्या रवीस असा प्रतिसाद देतो, ही फार मोठी घटना होती. त्याचे गांभीर्य मी रवीपर्यंत पोहोचविले. म्हणालो, 'बाबा, उत्तम तयारी कर. आता तुला देवनाथ सातपाटील नामक प्राच्यविद्या क्षेत्रातील अडाणी माणसाचे कुतूहल शमन करायचे नाहीय. तर त्या ज्ञानक्षेत्रातील एका श्रेष्ठ माणसाशी संवाद

करायचा आहे. त्याच्या प्रश्नांना सामोरे जायचे आहे. तो प्रेमळ असला तरी धारदार आणि टोकदार आहे. थॉमस, रिचर्ड आणि आणखी कोणत्या तरी नावासाठी एकत्र टॉम, डिक आणि हॅरी असे म्हण्याची पद्धत इंग्रजी भाषेत आहे. या वाक्प्रचारात हे टॉम, डिक आणि हॅरी यांना ऐरेगैरे समजले जाते. त्यातला हा रिचर्ड किंवा डिक नाहीय. तो फार मोठा विद्वान आहे. तुला तलवारीच्या धारदार टोकावर चालायचे आहे.' रवी म्हणाला, 'अशा चालण्याच्या संधीची मी वर्षानुवर्षे वाट बघत आहे. तुमच्यामुळे मला ती मिळतेय ;' वगैरे.

ही गोष्ट खरीच होती. रवी गेली अनेक वर्षे काम करत होता. त्याच्या ज्ञानक्षेत्राच्या किंवा कामाच्या हिशेबात मी अडाणी माणूस. काही तरी वेगळे आहे; इतपतच समज असलेला. योगायोगाने अलीकडे मी त्याच्याकडे गेलो.आणि ते रिचर्डला कळविण्याची बुद्धी मला झाली. एक चांगला योग जुळून आला होता. रवीची मांडणी एका ज्ञानी पंडिताच्या समोर जाणार होती. ती त्या ऐरणीवर घासून-पुसून, तावून-सुलाखून निघण्याची शक्यता उभी राहिली होती. ज्ञानी रिचर्डचा प्रतिसाद उत्साहजनक होता. काही नवे दिसण्याच्या शक्यतेचा अधिकृत दरवाजा रवीसाठी आणि एकूण प्राच्यविद्येतील अनुत्तरीत प्रश्नांच्या सोडवणुकीतल्या घुसळणीसाठी खुला होण्याची गंभीर शक्यता उभी राहिली होती. मी अत्यंत उत्तेजित मनःस्थितीत होतो. रवीही असेलच. रिचर्डही होता.

पण रिचर्ड साला हलकट निघाला. आमच्या या पहिल्या मेलनंतर तीन महिन्यांनी तो मेला. अगदी थेट मेलाच. भरपूर संवाद, पत्रव्यवहार मागे ठेवून गेला. रवीच्या भेटीची उत्कटपणे तयारी करून खुशाल मेला. त्याच्या लेकीचा मेल आला. त्याचा मेल-आयडी वापरून.

My father, who intended to visit India, principally to meet you and a friend of yours working in the field of Archeology and the history of scripts , for which he had extensively prepared himself, passed away in his sleep, two days back. I felt it is my duty to communicate to you of the sad demise. I can imagine the pain and a sense of loss you will be in, with this news. As we all know, such happenings are beyond our powers. I know, you will be fully with us in this time of grief and sadness and that will certainly help us in overcoming the loss we have had.

9

मी भयंकर चिडलो. आधी रिचर्डवर आणि नंतर स्वतःवरही. वय झाले की आणि एरवी सुद्धा ; माणूस कधीही मरू शकतो, हे आपल्याला कसे नाकारता येईल? रिचर्डचे तितके वयही समजा झाले होते. पण मग इतकी सगळी तयारी करून मरायचे, याला काय

अर्थ आहे? रवीचे काम मला आधी कैक काळ माहीत होते. निदान काही वर्षे आधी नक्कीच माहीत होते. त्याची नेटकी माहिती घेण्याची बुद्धी मला इतक्या उशिरा का व्हावी? तीही फार नेटकी म्हणता यायची नाही, तरीही रिचर्डच्या कुतूहलाला तिने खाद्य पुरवले होते. ते मी त्याला पुष्कळ आधी कळवू शकलो असतो. पण आधी मीच नीट गांभीर्याने ते समजावून घेतले नाही, तर त्याचे कोणाला मी काय सांगणार? मी रिचर्डला ते कळविल्यावर तो नवे काही सापडण्याच्या कल्पनेने आणि अपेक्षेने फार उत्तेजित झालेला होता. त्यासाठी त्याने खूप तयारी केली होती. ते सगळे डोक्यात घेऊन खुशाल मेला तो. सगळाच अवमेळ.

डोके जरा शांत झाल्यावर मला वाटले, प्रत्येक उद्ध्रवाच्या प्रकट होण्याचे सुद्धा काही एक नशीब असते. नशीब नावाच्या गोष्टीला मी कायम क्षुद्र आणि हास्यास्पद मानत आलो. म्हणून नशीब याच्या ऐवजी मी त्याला फार तर योगायोग म्हणू शकतो. पण त्याने काहीही बदलत नाही. सत्याच्या प्रकट होण्याची वेळ यायला हवी. ती यायची तेव्हाच येते. लहान-मोठी किंवा बारकी बारकी सत्ये आपल्या जगण्यात सुप्त स्वरूपात कायमच उपस्थित असतात. त्यांच्या प्रकट होण्याचे काहीही नियम आपल्याला बांधता येत नाहीत, ही मनुष्य म्हणून आपली मर्यादा. तसे व्हावे अशी चाहत हे आपले मनुष्यपण. मी माझ्या पूर्वजांचा, माझ्या जनुकीय साखळीचा ; शोध घेत होतो आणि त्याचे वर्तमान मी रिचर्डला सांगत होतो, तेव्हा त्याने एकदा लिहिले होते, It is nice; you are going back in time. It is nice to explore one's roots. I am sure; you will learn something out of it. I know what you will know. But, I am not going to tell you that. I am holding it back for the time being. A creative artist like you will come to a very straight-forward conclusion. कोणता स्ट्रेट फॉरवर्ड कन्क्लयुजन? माणिक गुरुजींना मी भेटलो आणि त्यांनी जे सांगितले, ते अप्रतिम सुंदर आणि धूसर होते. तुमचे देवक यांच्याशी कुठे जुळते? तुम्हा सातपाटलांचे देवक वांबोरी येथील सात पैकी कोणत्या पाटलाशी जुळते? जे देवकच मुळात अनिश्चित, ते जुळण्याचा प्रश्न कुठे येतो? तिथे तुम्ही एका अनिश्चित प्रदेशात जाता. काहीही असेल किंवा नसेल. काय फरक पडतो? लग्नात जेवणाची पंगत बसली की अखेर कोणीतरी म्हणतो, माणकाचा दिवा आन सवर्णाची वात, अमक्यांनी ववाळळं तमक्याचं गाँत. प्रमाण मराठीत हे, माणिकाचा दिवा आणि सुवर्णाची वात, अमक्यांनी ओवाळले तमक्यांचे गोत्र असे म्हणता येईल. कोणते गोत्र? आडनाव हेच गोत्र. देवक हेच गोत्र. वैदिक ऋषींच्या गोत्रांचा कुठे संबंध येतो? मराठ्यात एकाच आडनावासाठी अनेक वेगवेगळी देवके असतात. गोत्र काय समजायचे? तरीही दाते पंचांग किंवा तत्सम अनेक ठिकाणी शहाण्णव कुळी मराठे, त्यांची देवके यांच्या सोबतीने गोत्रे देखील दिलेली असतात. बिलकुल अर्थहीन. पण ते सारे असते आणि अनेकांना ते अर्थपूर्ण वाटते. माणूस म्हणून आपल्या असण्याच्या साखळ्या याच्या फार पल्याड असतात. त्या कोणत्याही हिशेबात बसत नाहीत. हेच रिचर्ड मला सांगू बघत होता? मला हेच दिसेल असे त्याला म्हणायचे होते? मला दिसणारा हा उजेड आता मी कोणाला सांगायचा?

काही महिन्यांनी नाशिकच्या एका मित्राचा फोन आला. म्हणाला, 'अरे, तीर्थस्थळीच्या उपाध्यांकडे नाशिक किंवा त्र्यंबकेश्वरला तुझ्या पूर्वजांचे काही नोंदलेले असल्यास बघ, असे तू मला सांगितले होतेस.

आठवतं ना तुला? की विसरलास फार दिवस झाले म्हणून?'

'बोल. मिळालंय का काही?' 'मग? उगीच सांगतोय काय?' 'काय आहे?

'तू ये आणि स्वतःच पाहा. नाशिकमध्ये काही नाही मिळालं. पण त्र्यंबकला आहे. विशेष म्हणजे दोन वेगवेगळ्या काळातल्या नोंदी आहेत त्या. आपला मित्रच आहे तो. कस्तुरे म्हणून आहे. स्वतः त्याच्याकडं एक नोंद मिळाली. दुसरी आणखी एक त्याच्या भाउबंदाकडं. तीही त्याने स्वतः कडे आणून ठेवलीय. बोल. कधी येतोस?' गेलो आणि पाहिले.

पहिली नोंद होती: आरेनराव साहेबराव सातपाटील-देशमुख. पत्नी मर्दिनीबाई. गाव-खराडी. प्रांत-सुपे. कुळी-पठारे. देवक-सुरड. काळ-निजामशाही-आदिलशाहीचा. अहमदनगरला मलिक अंबर प्रधान झाला, त्याच्या जरा आधीचा. दुसरी नोंद होती: जानराव खंडोजी सातपाटील. पत्नी-सरुबाई. गाव-साल्पी. प्रांत-अहमदनगर. कुळी पठारे. देवक-सुरड. काळ-अव्वल इंग्रजी आमदानीचा. आमच्या घरातल्या विठोबा-रखुमाईच्या मूर्तीच्या तळाशी लिहिलेले होते, साहेबराव आणि आरेनाबाई यांना, शिवरामबावांकडून. आपल्या मुलखाची आठवण म्हणून. शिवरामबावांच्या आठवणीसाठी खराडीला दरवर्षी यात्रा भरते. उरलेल्या जागा भीमबाई सातपाटील यांच्या आत्मवृत्ताने भरल्या. खराडी, करंजे, साल्पी असा हा प्रवास जवळपास स्पष्ट. यांच्याही मागे जाऊन वांबोरी. कुळी, पठारे. माझ्या वंशाच्या वृक्षाचे मूळ वांबोरीत जाऊन पोहोचले. ते माणिक गुरुजी यांनी आधीच सांगितले होते. हे सारे खरे असले तरी सातपाटील हे आडनाव आज फक्त साल्पी येथील लोकच लावतात. बाकीचे नाहीत. का नाहीत? असतील. काही ना काही कारणे असतीलच. ती शोधून काय फरक पडतो? वांबोरीत असलेले लोकही आधी आणखी कुठून तरी तिथे गेलेले असतील. आपला वंशच भटका. म्हणजे नुसता सातपाटलांचाच नाही. एकूण मानवी वंशाचे म्हणतोय मी. समजा, सातशे वर्षे मागे जात मोकळ्या जागा मुश्किलीने शोधत, चाचपडत मी एक रेघ तयार केली. तरीही ती भल्या थोरल्या वृक्षाची कदाचित एक फांदीच फक्त. हा वृक्ष केवढा थोरला. अन् अशा अनेक वंशवृक्षांच्या फांद्या एकमेकीत घुसून मानवी नात्यांचे केवढे अफाट अरण्य उभे राहते, त्यातले आपल्याला किती दिसते? साहेबराव आणि आरेनाबाई यांच्या अफगाणिस्तानातील वंशजांनी तिथे सोयरिका केल्या असतील. त्यांचा तिथला गुंतवळा. ते एक अरण्य. उल्फीचे वंशज, भीमबाईचे वंशज ; त्यांची झाडे. त्यांची अरण्ये. आपल्याला किती थोडेसेच दिसते!

९६ कुळी मराठ्यांनी आपआपले देवक, कुळ आणि गोत्र जाणून घ्या.

गोत्र- आपला मुळ पुरुष म्हणजेच गोत्र. यांची संख्या ८ आहे. विश्वामित्र, जमदग्नी, भारद्वाज, गौतम, अत्रि, वशिष्ट, कश्यप आणि अगस्ती.

देवक- ज्याच्या मुळाशी आपली कुलदेवता वास करते ते देवक असते. वृक्ष,पर्ण, फुल,वेल, साळुकी किंवा मोराचे पीस, शस्त्र, इत्यादी. वंश-क्षात्र समाजात दोन वंश आहेत. १. सोमवंश; २. सूर्यवंश.

यापैकी ज्या कुळांनी एकत्रित येवून आपला समूह निर्माण केला ती कुळे ९६ आहेत, असे एक महाभाग सांगतो.

असे महाभाग आणखी खूप आहेत. ते प्रत्येकी वेगळी गोष्ट सांगतात. या ९६ कुळानुसार,

पठारे हे सूर्यवंशी, काश्यप गोत्री, कळंब, केतकी, हळद, सोने, वासुंदीवेल अशी देवके असलेले लोक आहेत, असे हा ज्ञानी सांगतो. कसलं काय? आमचे सुरड देवक यात कुठेही नाहीय. कसल्या शहाण्णव कुळीच्या बाता? अन् ज्या कुळींना कोणताही ऋषी गोत्रस्थानी सापडत नाही त्यांना देण्यात येणारा तो कश्यप यांचा मूळ पुरुष! किती उपकार करायचे किंवा केले असतील असे मानायचे कश्यपाने? कशासाठी हा अट्टाहास? माझा कोणताही वंश नाही. माझे कोणतेही कुळ नाही. मी या विश्वाच्या अवाढव्य गरगरत्या चक्रात माणूस म्हणून जन्माला आलेलो आहे, हेच केवळ एक सत्य. आणि ते असुंदर अजिबातही नाही. ते मला भयचकित करणारे सत्य आहे. का ते नंतर सांगतो.

मनुष्ये म्हणून आपली जागा या विश्वात केवळ नगण्य अशी आहे. त्यात कसले वंश आणि कसले कुलीन असणे? जात, धर्म, वंश यांना अर्थ तो किती? देव सुद्धा आपण एका भीतीतून किंवा या विश्वाच्या अवाढव्य असण्याच्या धारणेतून कोणता तरी नियंता मानण्याच्या नजरेतून निर्माण केलेली गोष्ट. फार तर देव हा मानवाने निर्माण केलेला युटोपिया असू शकतो. बाकी त्याला कसा अर्थ देणार? मुळात हे विश्व फार मोठे आहे. आपली पृथ्वी ज्या सूर्यमालिकेचा भाग आहे, ती एक सूर्यमालिका फक्त. अशा अनेक सूर्यमालिका मिळून आपली आकाशगंगा असते. अशा अनेक आकाशगंगा मिळून आपले विश्व असते. तिच्यातील एखाद्या ताऱ्याचा उजेड आपल्यापर्यंत यायला लाखो प्रकाशवर्षे लागतात. म्हणजे आपल्याला त्या ताऱ्याचा जो उजेड आज दिसतो, तो लाखो प्रकाशवर्षे आधीचा असतो. त्या ताऱ्याचा आजचा उजेड किंवा त्याचे आजचे वर्तमान कळायला आणखी लाखो वर्षे जावी लागतील. काळाच्या हिशेबाने हे सारे असाधारण आहे. आपल्याला दिसणारा आज हा खूप जुना आज असू शकतो किंवा आहे. भूत, वर्तमान आणि भविष्य या साऱ्या गोष्टी खूप चक्राविणाऱ्या आहेत. विश्वाच्या असण्याच्या या अद्‌भुताने आपल्याला नम्र केले पाहिजे. या विश्वात आपण किती नगण्य आहोत, हे आपण समजून घेतले पाहिजे. त्यात पृथ्वी नामक गृहावरील आपण एक नगण्य प्रजाती. बाकी सगळ्या प्रजातींना नमवून आपण आपली सत्ता इथे प्रस्थापित केलेली आहे असे आपल्याला वाटते. पण विश्वाच्या भव्य नकाशात आपल्याला बिंदू इतकी जागा मिळणे देखील मुष्कील. तिथे वंश, भाषा अशा अनेक गोष्टी आपण शोधतो, त्यांच्यासाठी भांडतो? मी माझा वंश शोधतो, म्हणजे काय शोधतो? मी माझ्या असण्याचे आधार शोधतो. का शोधतो? कालगतीच्या महान नकाशात अशा रेषांची लांबी किती? आणि त्यांना जागा किती? रेषा या मुळात सरळ रेषाच नसतात तर त्यांच्या असण्याला अर्थ काय? कालगतीत मी मागे पुढे किती होऊ शकतो? त्या काळाचे गणित एकूण भव्य काळाच्या हिशेबाने नगण्य आहे. हे मला दिसेल, असेच रिचर्डला म्हणायचे होते?

आपल्या पुराणांच्या नजरेत आपल्या विश्वाच्या आयुष्याचा हिशेब असा मांडला गेला आहे: ते सांगतात, जगाच्या उत्पत्ती, संरक्षण आणि लय यांना कारणीभूत अशा श्रीमहाविष्णूच्या नाभीकमलापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवाचे आयुष्य शंभर वर्षे आहे. त्यापैकी पन्नास वर्षे होऊन गेली. चार युगे एक हजार वेळा येऊन गेली म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो.

तेवढ्याच लांबीची त्याची एक रात्र असते. ब्रह्मदेवाच्या एका दिवसात १४ मनु होतात.

त्या एकेका मनुत ७१ महायुगे होतात. एका महायुगाची वर्षे ४३ लक्ष २० हजार आहेत. १४ गुणिले ४३,२०,००० = ६,०४,८०००० म्हणजे ६ कोटी ४ लक्ष ८० हजार वर्षे. याला ७१ ने गुणिले म्हणजे = ४,२९,४०, ८०००० याला गुणिले २ म्हणजे, ब्रह्मदेवाची एक दिवस/रात्र आपल्यासाठी ८,५८,८१,६०००० वर्षांची. अशी १०० वर्षे म्हणजे ८,५८,८१,६०००० वर्षे. त्यांना गुणिले ३६० = ३०९१,७३,७६,००००० म्हणजे ३०९१ अब्ज, ७३ कोटी ७६ लक्ष वर्षे होय. हे ब्रह्मदेवाचे म्हणजे ब्रह्माचे, ब्रह्मांडाचे; म्हणजे आपल्या विश्वाचे आयुष्य होय. इथे वर्षाचे दिवस ३६० मानले आहेत. ते ३६५ मानले तर आकडा थोडा बदलेल. पण आपल्या विश्वाच्या आयुष्याचा असा हिशेब पूर्वी कोणी कसा मांडला असेल, याचे फार आश्चर्य वाटते. त्यापाठीचे गणित समजत नाही. ते शोधले पाहिजे असे मात्र वाटते. १४ मनु, ७१ महायुगे; हे काहीच समजत नाही. पण ते अगदीच टाकून द्यावे असेही नाही. त्याचा आधुनिक विज्ञानाच्या निकषांवर गंभीर तलास केला गेला पाहिजे असे मनात येते. केवळ मूर्ख कल्पना म्हणून त्यास त्याज्य न मानता त्याचा नीट तपास करणे ही काही वेडगळ गोष्ट म्हणता यावयाची नाही.

अन् आता तर वैज्ञानिक म्हणतात, विश्व एक नाहीय. अनेक विश्वे आहेत. ती बृहद् काळात प्रत्यही निर्माण होत असतात. आणि संपतही असतात. त्यांची आकुंचने आणि प्रसरणे असतात. तसा त्यांच्या स्पंदनांचा स्पंदनकाळ असतो. तो अब्जावधी वर्षांचा असतो. त्यांच्या निर्मितीच्या क्षणी काही नॅनोसेकंदात ज्या घटना घडतात, त्यावरून त्यांचे फिजिक्स ठरते आणि त्या फिजिक्सचे नियम ठरतात. प्रत्येक विश्वाच्या फिजिक्सचे नियम वेगवेगळे असू शकतात. तेव्हा, विश्वाच्या आणि विश्वांच्या स्पंदनाच्या या भव्य फलकात आपली जागा किती? तर ती जवळपास शून्य. शून्यवत. तरीही मानवी प्रतिभेचे असाधारण असणे उरतेच. मानवी प्रतिभेने अशा कल्पना करणे आणि त्या कल्पनांचा पडताळा घेण्याचा प्रयत्न करणे हे थरारक आहे.

स्पंदन किंवा कंप पावणे हा या आपल्या विश्वातील सजीव आणि निर्जीव अशा वस्तुजाताचा स्वभाव असणे आणि तो आपल्याला दिसणे, कळणे किती थरारक आहे! स्पंदन हा वस्तुजाताचा पायाभूत स्वभाव मानून विश्वाचा आणि विश्वांचा विचार करणे अधिक ज्ञानस्फुरक होईल, असे मला वाटते.

मुळात मी माझ्या आयुष्याच्या या अपरान्हकाळी, हा कोणता हिशेब मांडायला बसलो आहे? आज मी माझ्या वयाच्या सत्तरीच्या उंबरठ्यावर असताना मी त्याला माझ्या आयुष्याचा अपरान्हकाळ म्हणतोय. दुपार सरलीय. संध्यासमय यायला अजून वेळ आहे. असा काळ का अपरान्हकाळ? पण तो तर प्रत्येक काळात माणसांना वेगळा वेगळा वाटत आलेला होता. बेचाळीसाव्या वर्षी मृत्यू आलेल्या माझ्या एका श्रेष्ठ सांस्कृतिक जनुकीय पूर्वजाला -तुकोबारायाला- त्याच्या कैक आधी जरा कर्णमुळे सांगो आली, असे वाटत होते. दुपार सरलीय अन् संध्याकाल अजून यायचाय असा हा काळ. ते माझे वाचन ठीक नसेल सुद्धा. किंबहुना, नाहीच आहे. पण समजा, माझ्या मनातील भावनिक हिशेबाने ठीकच की, हा माझा अपरान्ह काळ. खरे तर मी माझ्या संध्याकालाच्या उंबरठ्यावर उभा आहे, हे मला दिसतेय.

इथे मागे वळून पाहताना मला दिसते की, ह्या एका आयुष्यात मी किती आयुष्ये

जगलोय! प्रागैतिहासिक काळी माणसाचे जे जगणे असेल, त्याची बऱ्यापैकी सुधारित आणि सुरक्षित, पण त्यापासून फारशी न ढळलेली आवृत्ती, हे माझे बालपण असेल. मानवी जगणे जवळपास न बदलण्याच्या किंवा अत्यंत सावकाश बदलण्याच्या गावठी संस्कृतीचा मी सभासद होतो. लहानपणी मी गावात असताना गोखाडीत म्हणजे गावातील माझ्या भागातील लोक जिथे शौचाविधी करायला जात, तिथे मीही सतत गेलेलो आहे. मी त्या विधीनंतर दगडाने बोचा पुसला आहे. सूर्यप्रकाशात तापलेल्या दगडाचा उष्ण स्पर्श मी माझ्या गुदद्वाराशी अनुभवलेला आहे. मी माझ्या गुवाच्या पोहात जंत पाहिलेले आहेत. ते लालसर मोठे ते बारके पांढरे असंख्य वसाहतीच्या स्वरूपात पाहिलेले आहेत. त्या पोहासोबत बाहेर आल्यामुळे त्यांचे आश्चर्यचकित होऊन वळवळणे मी पाहिले आहे. मी घासाची भाजी चवदार म्हणून अतोनात खाऊन रात्री पोट फुगून ओकलेलो आहे. मी माझ्या बालपणी हुलगा किंवा ज्यास काही लोक कुळीथ म्हणतात, तो स्वस्त असल्याने अतोनात खाल्लेला आहे. मी चिखलाच्या किंवा भेंड्यांनी म्हणजे कच्च्या मोठ्या विटांनी बांधलेल्या घरात राहिलेलो आहे. मी पावसाची भिज, मातीच्या भिंतींना लोणा धरणे अनुभवलेले आहे. मी ढेकणांच्या अतोनात चाव्यात तग धरलेली आहे. ढेकणे तृप्त झाल्यावर सुखाचे दमले भागले झोपणे मी अनुभवले आहे. मी ओट्यावर झोपताना गारठ्यात लकवा खाल्लेला आहे. तांब्याच्या हंड्यात उकडलेल्या साबरकांड्याच्या साहाय्याने मी त्यातून बरा झालेलो आहे. मला रखरखीत उन्हाळे माहीत आहेत. त्या उन्हात मी दगडी देवळाच्या गारव्यात झोपलेलो आहे. मी दुष्काळात किमान अन्न खाऊन तगलेलो आहे. वरबाड्याचा पाला किंवा निवडुंगाची बोंडे खाऊन जगणे मी अनुभवलेले आहे. मी ओढ्याकाठी हाताने झिरा खणून त्यातले पाणी प्यालेलो आहे. मी माझ्या मामासोबत धोतर किंवा जुनेर फडके घेऊन ओढ्यातून चिंगळी मासे पकडलेले आहेत. त्या काळ्या आणि रुपेरी चिगळ्या आम्ही बाभळीच्या काट्यांवर भाजून मीठ-मिरची न वापरता खाल्लेल्या आहेत. मी ओढ्यातल्या डोहांमध्ये आणि विहिरीच्या पाण्यात मनसोक्त डुंबलेलो आहे. मी रिठ्या वापरून माझे कपडे स्वच्छ केलेले आहेत. मी काटेइंद्रावनाची बी खाऊन माझी पोटदुखी थांबलेली अनुभवली आहे. मी उवा अनुभवलेल्या आहेत. एकमेकींच्या केसातल्या काळ्या उवा मारणाऱ्या गावठी बाया जशा मी पाहिलेल्या आहेत तशाच मी स्वतः माझ्या सदऱ्याच्या आतून दिवसाढवळ्या मला चावत असलेल्या पांढऱ्या उवामुळे करवादून जाऊन कोण आपल्याकडे पाहतेय याची पर्वा न करता माझी छाती आणि इतर भाग खाजविलेले आहेत. खरुज, नायटे, गजकर्ण यांच्यापैकी खरुज मी टोकाची अनुभवली आहे. कपडा चांगला कोणता, तर तो मळखाऊ आणि जाडभरड असला पाहिजे; म्हणजे मळ चालेल, तो फक्त इतरांना दिसता नये कामा; अशा धारणा प्रतिष्ठित असलेल्या लहानपणात मी जगलेलो आहे. मी माझ्या वडिलांना त्यांच्या पायाच्या घोट्यांतील नारूचा लांबच लांब जिवंत दोरा काडीला गुंडाळून वेदना सहन करताना पाहिले आहे. मी लंगोट लावून मारुतीच्या देवळामागल्या तालमीत लहान-मोठ्या पोरांशी लढलो आहे. मांड्यांना कौल लावणे आणि कुस्तीतल्या लढतीतील विजयासाठी खार खाऊन जगणे,अतोनात मेहनत; तयारी करणे याचा मला अनुभव आहे. विजेचा प्रकाश नसलेल्या काळात सतत काजळी प्रसवणाऱ्या चिमणीवर नाक ठेऊन त्या उजेडात मी पुस्तके वाचलेली आहेत. ग्रामवस्तीतील

सार्वजनिक उजेडासाठीच्या कंदिलातून काही मित्रांच्या सोबतीने मी रॉकेल चोरलेले आहे. या स्तब्ध काळाचे बदलणे सुद्धा मी पाहिलेय. मी बसमधून पहिल्यांदा प्रवास केला, त्याचा थरार अजूनही माझ्या लक्षात आहे. नंतर कार, विमाने यांचा प्रवासही विपुल घडला. अजूनही विमानातून प्रवास करताना कोणत्याही क्षणी आपण खाली पडू शकतो, ही भीती माझ्या मनात कायम असते. विमानतळावरील किंवा मॉल मधले सरकते जिने अजूनही मला भिववितात.

उद्या उडत्या कार येतील, हवेत अन्न निर्माण होईल, हवेतून शुद्ध पेयजल निर्माण करता येईल आणि हवा किंवा पाणी यांना वाहनांचे इंधन म्हणून वापरले जाईल, हे मला दिसते. मानवी मूर्खपणातून अवाढव्य संहार झाला नाही तर पुढच्या पिढ्यांचे जगणे आजच्या पेक्षा अधिक सुखकारक असेल हे मला जाणवते. पण संहार टाळता येणे मानवी प्रजातीस कठीण आहे, हे या प्रजातीचा इतिहास पुष्टी देत असलेला स्वभाव लक्षात घेता मुश्कील आहे. त्या जाणिवेने मी कष्टी होतो. माझ्या अशा कष्टी होण्याला या दुनियेत काडीचीही किंमत नाही, या जाणिवेने अधिक तसे होते.

ही आपली पृथा; पृथ्वी तिच्या आवरणासकट एक निर्मम भूमी आहे. तिच्या असण्याचे सारे आविष्कार हे कायमच तिला स्वतःला प्रधान स्थानी ठेऊन प्रकट होत असतात, हे मला दिसलेले आहे. तिने असा स्वार्थभाव ठेवणे यात गैर काहीही नाही, कारण तो ठेवणे हा तिच्यातून उद्भवलेल्या सा-या वस्तुजाताचा धर्म असतो, हे मला दिसते. मग तिला एकटीला दोष कसा देणार? आपण तिची बाळे आहोत आणि आपले टिकणे हे कायमच आपल्या मनाच्या प्रधान स्थानी असते, हे तर तिनेच आपल्याला दिलेले, सांगितलेले ज्ञान असते ना! पृथ्वीचे सारे आविष्कार हे स्वतःला टिकविणा-या मादीचे असतात. त्यात तिला आई आणि आपल्याला लळा लावणारी ममताळू धरित्री म्हणून आपण आपल्याला फसवत असतो. या आईच्या छातीत पुन्हा पुन्हा नांगराचा फाळ घालून तिला आपण फळवत असतो, याचे काय? म्हणूनच पृथ्वी ही निर्मम आई. तिच्या सा-या आविष्कारात ती केंद्रस्थानी असते, हे आपल्या लक्षात येत नाही. ती अनेक प्रकारे प्रकट होते आणि तिच्या फलीकरणासाठीच फक्त नरांना ती जन्म देते. दोन्हीकडून ती आई असते. पण आपण निर्माण केलेला नर हा मुळात दुबळा आहे, हे तिला माहीत असते. कोणत्याही फुलातल्या स्त्रीकेसराच्या सशक्त देखण्या दांड्याभोवती पुंकेसराचे किती उत्सुक कोमल कोवळे ताजवे असतात! त्यातल्या एखाद्याच्याच नशिबी मीलनातील मृत्यू असतो. पुंकेसरांसाठी मृत्यू हे सत्य, जीवन हा अपवाद. तीच गोष्ट स्त्री-पुरुषांच्या संभोगात सहभागी होणा-या शुक्राणूंची. सरासरी तेहतीस कोटी शुक्राणू योनीमार्गात उतरतात आणि अहमहमिकेने धावतात. पैकी एकाला स्त्रीबीजात घुसण्याची संधी मिळते. तीही नेहमी नव्हे. किती तरी वेळा ते सारे मरत असतात. ते हजारो वेळा मरावेत आणि त्यांनी स्त्रीबीजापर्यंत पोहोचूच नये ही चलाखी हल्ली आपण शिकलो आहोत. तीही आजच्या कालगतीच्या टप्प्यावर भूमीला वाटत असलेल्या भावनांचा अविष्कार असेल. या भूमीतत्त्वाच्या नजरेत नर ही फक्त एक उपयोगाची वस्तू. मादी प्रधान. स्त्री प्रधान. पृथ्वी प्रधान, हेच सत्य. आपण ज्या पुरुषी किवा पुरुषप्रधान व्यवस्थेत जगतो, त्यामुळे आपल्याला नर म्हणून आपण श्रेष्ठ ; असा भ्रम वाटतो. तेही या भूमीतत्त्वाचे कार्य होय. अनेक प्राणी, त्यांच्या रीतीभाती

पाहिल्या तरी अंततः नर ही एक वस्तू; तो या पृथ्वीतत्त्वाने स्वतःला फलित करण्यासाठी निर्माण केलेली एक उपयोगी वस्तू फक्त ; हे आपल्या लक्षात येत नाही. पुरुषाला भूमी हवी असते, कारण तेच त्याच्या जगण्याचे सार्थक असते, हे त्याच्या जनुकांमध्ये भूमीनेच बिंबविलेले असते. भूमीने त्या तत्त्वाला त्यासाठीच निर्माण केलेले असते. स्त्री-पुरुषांच्या शारीरिक संबंधात वाटसरू थकतो तरी वाट संपत नाही, असे जे म्हणतात, त्यात भूमीतत्त्वाचे हे असाधारणत्वच अधोरेखित होत असते. म्हातारपणाची काठी असे शेतकरी आपल्या पोराला समजतो आणि नांगर धरण्यासाठी पुरुष हवा असे त्याला म्हणायचे असते, त्या पोराने प्रत्यक्षात आपल्या बापाला तो म्हातारा झाल्यावर जनावरांच्या गोठ्यात जागा दिल्याचे वास्तव मी अनेकदा पाहिलेले आहे. त्याची म्हातारी स्त्री तेव्हा आदळआपट करीत त्याचे जे काही करते, तेव्हा अनेकदा ती, ह्यो कव्हा दात वासून जातो; कोनला ठावकी असे म्हणताना मी वारंवार ऐकलेले आहे. स्त्री पोरांच्या संसारात अगदी बटकी म्हणून का होईना; जगते, पण पुरुषाला विकलांग, एकाकी पटकूर होऊन जगताना मी पाहिलेले आहे. शिकार करून जगणारे प्राणी आपल्या कळपातील म्हाताऱ्या निरुपयोगी नरास, खायला काळ आणि भुईला भार म्हणून जसे मारून टाकतात, तसेच माणसेही म्हाताऱ्या नरास अडगळीत टाकून त्याच्या मरणास निकट आणतात, हेही मी पाहिलेले आहे. आपण मनुष्ये-स्त्री असोत वा पुरुष, फार क्रूर आणि स्वार्थी असतो, असे माझे निरीक्षण आहे. त्याच्या पाठी या पृथ्वीवर आपले अवतरणे, हे आपल्याला भयप्रद वाटत असते आणि आपल्या क्रौर्यापाठी ते कारक असते, हे मला दिसते. आपण कायमच धास्तावलेलो असतो आणि सुरक्षेची चाह हा आपल्या जगण्याचा प्राईम मुव्हर असतो. सगळ्या क्रौर्यापाठी धास्ती ही सर्वात जास्ती कारक असते. धास्ती कधीही संपत नाही म्हणून क्रौर्य कायम आपल्या सोबत असते. आपण व्यक्ती म्हणून जसे क्रूर असतो, तसेच समूह म्हणून सुद्धा. काही मानवी समूह इतर काही मानवी समूहांचा उच्छेद करतात, यापाठी सुद्धा सुरक्षा हीच चाहत असते. दुसऱ्याचा किंवा दुसऱ्यांचा वंश उच्छेदून तिथे आपला वंश स्थापन करणे ; यापाठी हीच धास्ती असते. वाघ किंवा सिंह जेव्हा एखाद्या बछड्यांसह असलेल्या वाघिणीच्या किंवा सिंहणीच्या प्रदेशात जातात, तेव्हा ते तिच्या बछड्यांना मारणे हे आपले आद्य कर्तव्य मानतात. कारण त्यांना तिथे आपला वंश स्थापन करायचा असतो. ते क्रौर्य ते आपला वंश स्थापन करण्यासाठी प्रकट करतात, वाघीण किंवा सिंहीण त्यांचा प्रतिकार करते. पण घडायचे ते घडले की ती या नव्या नराशी रत होऊन जीव निर्माण करते. तिच्या ठायी तसा आपपरभाव नसतो. ती स्त्रीतत्त्व. प्राणी काय किंवा मनुष्ये काय; मादी कायमच सुंदर आणि आकर्षक असते. ती नराला आकषून घेते आणि वापरते. ती पृथा असते. ती त्याला वापरते, हे त्याला कळत नाही. तो आपण गाजवलेल्या शौर्याच्या कैफात राहतो, पण तो तिच्या नजरेत केवळ एक वस्तू असतो, हे त्याच्या ध्यानात येत नाही. जगातली सारी राजकारणे ही भूमीवर स्वामित्व मिळविण्याची असतात. आपला वंश टिकावा, वाढावा म्हणून नर ते करत असतात. पुरुषप्रधान दुनियेत पुरुषांना वाटते की आपण आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी ती करतो. पण त्यांच्याही पाठी स्त्रीतत्त्व किंवा भूमितत्त्व हेच कारक असते. आपल्या व्यास आणि वाल्मिकी या कवींना हे थोडे फार कळले होते असे म्हणता येईल. अन्यथा द्रौपदीमुळे महाभारत घडले

किंवा सीतेसाठी रामायण घडले असे त्यांनी सूचित केले नसते. सातपाटील कुलवृत्तांताचा हा खेळ मांडताना मी शीर्षके भली पुरुषांच्या नावे दिली असतील; पण प्रत्यक्षात सारा खेळ खेळणाऱ्या स्त्रियाच आहेत, असे मला दिसते. प्रेमभावना, नातेसंबंध, स्नेहभाव ही सारी भूमीतत्त्वाच्या अखंड नर्तनाची वेगवेगळी रूपे होत. स्त्री हा पृथ्वीचा सच्चा अंश होय. ती पुन्हा पुन्हा स्त्री निर्माण करते आणि तीच पुरुष निर्माण करते. तिला तिच्या असण्यासाठी, तिच्या असण्याचे नवे नवे उन्मेष पुन्हा पुन्हा प्रकट करण्यासाठी पुरुष गरजेचा असतो, म्हणून ती त्याला निर्माण करते. भूमीचे हे उन्मेष, तिचे हे राजकारण न समजता पुरुष आपणच सगळ्या घडामोडींचे स्वामी; अशा कैफात जगत असतो. अशा कैफात जगणाऱ्या पुरुषतत्त्वाला वापरत भूमी पुन्हा पुन्हा फुलत फळत नवे नवे उन्मेष प्रकट करत असते. वनस्पती, प्राणी असोत वा मनुष्ये ; आपण या पृथ्वीच्या पर्यावरणात प्रवेश केवळ तिने आपल्याला तशी परवानगी दिली म्हणून करत असतो. तुम्ही स्त्री असायचे की पुरुष ; हे तीच ठरवत असते. क्रोमोझोम्सच्या जोड्या कोण ठरवते, हे आपल्याला कुठे कळते? पुरुषावरच हे अवलंबून असते, असे आजचे विज्ञान सांगते. या विज्ञानाचा अधिक तलास घ्यावा लागेल. मी स्त्रीला केंद्रस्थानी आणतो, कारण ती तिथे आहे, हे मला दिसते. सारा खेळ तिचा असतो,असे माझे म्हणणे आहे. तुम्ही स्त्री होणार आहात हे एकदा आईच्या गर्भात ठरले की तुमची सुरक्षा निश्चित होते. बाई कितीही प्रतिकूल परिस्थितीत जगते, पुरुष दुबळा; त्याला जपावे लागते अशी समज गावठी बायात असते, ती उगीच नाही. पृथ्वीने स्वतःभोवती जे वातावरण निर्माण केलेले आहे, त्यात वायूंच्या सोबत विषाणू सुद्धा असतात. या पर्यावरणात जे जे येते, त्याला मारून टाकणे हा त्यांच्या जगण्याचा धर्मे असतो. ते कार्य कदाचित पृथ्वीने त्यांच्यावर सोपविलेले असेल. ते आपल्या पृथ्वीवरील जगण्याचे नियंत्रण करतात. ते नराला जास्त बाधक असतात. नारी किंवा माद्या ह्या पृथ्वीची रूपे. त्यांना ते तितके बाधक होत नाहीत. ते गावठी बायांना कुठून तरी आधीच कळलेले असते, हे आश्चर्यकारक होय. पृथ्वीच्या, मादीच्या, आईच्या बृहद् नर्तनाची ही रूपे कळणे पुरुष म्हणून, पुरुषप्रधान संस्कृतीचे सभासद म्हणून आपल्याला आणि आपल्यापेक्षाही अधिक जगात जे या ना त्या प्रकारे सत्तास्थानी आहेत, त्यांना कळली पाहिजेत. ही पृथ्वी सतरा वेळा आम्ही खतम करू शकतो आणि आम्ही ती पंचवीस वेळा खतम करू शकतो, या प्रकारची बलिष्ठ देशांची आण्विक पुरुषी आव्हाने हास्यास्पद आहेत. तुम्ही जे एकदा खतम केले ते पुन्हा काय आणि कसे खतम करणार? तुमच्या पुरुषत्वाची बाष्कळ आव्हाने म्हणूनच हास्यस्पद होत. तुम्ही एकदा खतम झालात की झालात. व्हालच तुम्ही. पण पृथ्वीतत्त्व उरेल, भूमी उरेल. ती आणखी कशाला तरी जन्म घालील. ती निर्विकार आहे. ती निर्मम आहे. ती आई असूनही तशी आहे. तुम्हाला खेळविणे हा तिच्या जगण्याचा धर्म आहे. पृथ्वीतत्त्वाचे हे नर्तन आपल्या पुरुषी जगातल्या व्यवहारात सत्तास्थानी असलेल्या लोकांना कळले तरच पुढे आपल्या पुढच्या पिढ्यांना जगण्याची संधी आहे. मी मातीच्या महत्तेला मानतो. मी तिच्यासमोर नतमस्तक होतो. तसे होण्यात माझा स्वार्थ सुद्धा असेलच. किंबहुना आहेच.

पृथ्वीभोवती वातावरण आहे, म्हणजे वायुंचे आवरण आहे. या वातावरणात फक्त वायू आहेत, असे दिसत नाही. त्यात व्हायरस किंवा विषाणू सुद्धा आहेत, हे मी आधी म्हणालो आहे. अर्थात तो फक्त मी

म्हणायचा प्रश्न नाहीय. त्यांचे असणे ज्ञानीजनांना उत्तम जाणवलेले आहे. ते मुख्यतः हवा आणि अनुषंग म्हणून पाणी आणि अन्न यांच्यात उपस्थित असतात. असंख्य प्रकारे प्रकटणारी, अमर्याद संख्या असलेली ती एक शक्तिशाली प्रजाती आहे आणि ती या पृथ्वीवरील पर्यावरणाची नियंती आहे असे माझे म्हणणे आहे. त्यांच्या या रोलसाठी पृथ्वीनेच त्यांना जन्माला घातले असेल हे सरळच आहे. पर्यावरणात वातावरण आणि सगळ्या सजीव, निर्जीव गोष्टी येतात. हे विषाणूच फक्त आपल्या जीवनाचे नियंत्रण करतात, असे मला दिसते. आपण म्हणताना मी मनुष्याचे बोलत असलो तरी ते पृथ्वीवरील सा-या सजीव आणि निर्जीव वस्तू आणि प्रजातींना लागू आहे, असे मला म्हणायचे आहे. पद्मावधी शुक्राणूंचा नाश किंवा मृत्यू झाल्यावर अनेक योग जुळून येत एक शुक्राणू स्त्रीबीजात प्रवेश मिळविण्यात यशस्वी होतो आणि बीजधारणा होते. असंख्य अडथळे पार करीत बाळ जन्माला येते. आणि ढुंगणावर चापटी खाताच ट्याहां असा ध्वनी प्रकट करीत ते पृथ्वीवरील हवेला, वातावरणाला आत घेत स्वतःला त्याच्याशी जोडते. सोबतीने हवेतील विषाणू सुद्धा त्याच्या फुफ्फुसात प्रवेश करतात. त्यांचा उद्देश त्याला मारणे हाच असतो. कारण विषाणू; जे वातावरणाचे स्वामी असतात, त्यांना या आगंतुकाचे येणे आवडत नाही. ते त्याच्या येण्यापासून जाण्यापर्यंत त्याच्या सोबत असतात. हा मधला काळ काही सेकंदांपासून ऐंशी, नव्वद, शंभर वर्षे किंवा अधिक, असा कितीही असू शकतो. ते त्याला इथून घालवण्यासाठी सतत कार्यरत असतात. ते त्याच्या पेशीच्या आत असताना सदैव जिवंत असतात आणि बाहेर वातावरणात निर्जीवाची लक्षणे प्रकट करतात. सजीवांच्या पेशीमध्ये शिरून त्यांना मारून टाकणे हे एकमेव ध्येय घेऊन या वातावरणात ते अजरामर जिवंत आणि मृत असतात. ते या पृथ्वीवरील वातावरणाचे अनभिषिक्त स्वामी असतात. आपल्यासारख्या आगंतुकांना इथून हाकलणे हेच त्यांचे जीवितकार्य असते. आपल्या मरणानिशी ते संपते. वातावरणातील या असंख्य आणि अजरामर जिवंत/ मृत विषाणूंशी संघर्ष हेच आपले जीवन असते. विषाणू समजा कितीही मेले असे मानले तरी आणखी पद्मावधी जिवंत असतातच. माणसांसकट सारे सजीव त्यांच्या दुनियेत जगत असतात. ही दुनिया त्यांची आहे. तिथे कोणत्या जात, धर्म, वंश आणि त्यांच्या अरण्यांच्या बाता? विषाणू हेच केवळ सत्य. बाकी सगळे भ्रम. तरीही मानवी प्रजातीवर प्रेम करावे अशीच ती आहे. विषाणूंशी लढा देणारी तिच्याइतकी श्रेष्ठ लढाऊ प्रजाती या पृथ्वीतलावर आणखी दुसरी नाही.

Strictly speaking, viruses can't die, for the simple reason that they aren't alive in the first place. Although they contain genetic instructions in the form of DNA (or the related molecule, RNA), viruses can't thrive independently. Instead, they must invade a host organism and hijack its genetic instructions. That said, it makes sense to talk of how long viruses can remain viable and capable of infection. Some - including the influenza virus, and HIV, the virus

responsible for AIDS - can't survive for more than a few hours outside a host organism unless kept under carefully controlled conditions. But others, notably the deadly smallpox virus, can easily remain infectious for years.

इतर कोणाही सारखा या विषाणूंशी संघर्ष करताना मी आता थकत चाललो आहे, हे मला जाणवते. हे खास वेगळे आहे असे मला वाटत नाहीय. विषाणूंसमोर आपण कधी ना कधी पराभूत होतच असतो. त्याला आपला या दुनियेतला मृत्यू म्हणायचे. मी सहसा स्वप्नात असतो. किवा माझे असणेच आता स्वप्नमय झालेले आहे. मला भास होतात. अनेकदा ते भास असतात, हे मला कळत नाही. किंवा भास आणि वास्तव यातला फरक सुद्धा कळत नाही. आणि वास्तव असे काहीही नसते, हे या एका जगलेल्या आयुष्यात मला उमगले आहे, असेही असेल. जगणे हा मुळात भ्रम असतो, हे योगवशिष्टाच्या पोथीत उगीच सांगितलेले नाहीय. वास्तवाची सगळी रूपे ही मुळात भ्रमांची वेगवेगळी रूपे असतात हे मला पटते. जगणे हाच मुळात भ्रम आहे हे मला पटते. मला खूप गोष्टी, खूप चित्रे कारण नसताना दिसतात. किवा कारणे असतील सुद्धा, ती मला कळत नाहीत. खूप रानटी लोक घोड्यांवर बसून कोणाच्या तरी, कोणत्या तरी तळावर हल्ला करताना मला दिसतात. अतोनात रक्तपात दिसतो. रडणारी मुले दिसतात. लढणाऱ्या बाया दिसतात. पण हरल्या की मूढपणे त्या आक्रमकांच्या अधीन होताना दिसतात. त्या त्यांच्या मुलाबाळांच्या मृत्युंकडे थंड नजरेने पाहताना दिसतात. मला सृजनाचे अंकुर दिसतात. ते इतके निर्मम निस्संग असतात की त्यांच्या असण्याने मी भयचकित होतो. कोणीतरी येतो आणि कोणाला तरी सांगतो, ह्या बाया माझ्या. खिल्लारे चालतात. कोणी तरी उभा राहतो आणि म्हणतो, हा वंश माझा. आम्ही स्वामी. तुम्ही माणसे आहात असे तुम्हाला वाटत असले तरी ते खरे नाहीय. तसे स्वतःला समजून जगण्याचा तुम्हाला अधिकार नाहीय. किंबहुना, हे आपणास सांगावे अशी कोणतीही जबाबदारी आमच्यावर नाहीय. धर्माने आम्हाला सांगितले आहे की ते लेसर ह्युमन आहेत. त्यांना कापण्यात काहीही पाप नाहीय. मनुष्य म्हणवून घेण्याची क्षमता असणाऱ्यांची इथे सद्दी आहे. धर्म तेच सांगतो. तुम्हाला आम्ही काही सांगावे असे काहीही कारण आम्हाला दिसत नाही. माकडे जशी लेसर बीइंग तसेच तुम्ही. तुम्ही आमच्या उपयोगाच्या वस्तू फक्त. तुमचा कशाहीसाठी वापर करण्यात कोणतेही पाप नाहीय. किंवा हे तुम्हाला सांगावे असे आमचा धर्म सांगत नाही. धर्मगुरुंनी आम्हास ते सांगितले आहे. बाकी प्रश्न कुठे उरतो? किंवा आमचे प्रश्न आम्ही सोडवू. तुम्ही नगण्य. उपभोगाच्या वस्तू फक्त. तुमच्या जगण्यावर तुमचा अधिकार नाही. किंवा असेलच तर तो आता तुम्ही गमावलेला आहे. यापुढे तुम्हाला काहीही सांगितले जाणार नाही. कारण त्यासाठी तुम्ही लायक उरलेले नाही आहात. खाण्यासाठी म्हणून माकडाच्या पिल्लाला माणसांनी पकडले तरी त्यांना ते तसे समजत नाही. आणि ती पिल्ले माणसांच्या गळ्याशी हात बांधून विश्वासाने येतात आणि धारदार शस्त्राखाली निमूट मरतात. तितकेच मूढ तुम्ही आहात.

माझ्या काळाचे हे स्वर ऐकताना मी सगळीकडून पळून जात मनाने कुठे तरी मूढपणे उभा राहिलेलो आहे. माझ्या मनाच्या आतली आणि बाहेरची दुनिया यांच्यातील ताण हे माझ्या लेखनाचे मूलद्रव्य होते. एक प्रकारची सततची आणीबाणी हा माझ्या जगण्याचा

आशय होता. माझे लिहिणे तिथूनच उगवत होते. माझ्या मनाच्या आतल्या दुनियेला बाहेरच्या जगातूनच सत्त्वाचा पुरवठा होत होता. ते सत्त्व आत घेऊन मी माझी आतली दुनिया उभारत होतो. आता बाहेरून काही आत येणे संपत चालले आहे. किंबहुना ते थांबलेच आहे. म्हणून माझी आतली दुनिया शुष्क पडत चालली आहे. भोवताली अनेक दारुण, निपुण, नृशंस, उद्दाम गोष्टी घडत आहेत. मला त्याचे काहीही वाटेनासे झाले आहे. कोणती तरी अपरिचित भाषा माझ्या कानांशी प्रमत्त वाऱ्याच्या दिशाहीन गोंगाटात तडफडणाऱ्या घंटांच्या नादासारखी रोरावत आहे. मी बोलतो आहे. पण माझे शब्द मला ऐकू येत नाहीत. माझ्या पूर्वजांचे त्यांच्या उत्तरकाली असेच झाले असेल. हे सगळे श्रीपती, साहेबराव, दसरत, जानराव, रखमाजी अन पिराजी, शंभुराव; यांच्या साखळीत मी तितका आणि तेवढा ठळक नसेन सुद्धा. पण जोमदार आणखी कोणीतरी असेल, इतके सातपाटलांच्या वंशाचे अरण्य. पुन्हा पुन्हा मरण पावून जन्मणारी प्रचंड साखळी, प्रत्येक टप्प्यावर तिला फूटलेळी फनगाडे; या सगळयांचे केवढे मोठे अरण्य. हे अरण्य नगण्य वाटावे असा विश्वाचा पसारा. कोण कधी, कुठे आला आणि गेला; काय फरक पडतो?

तरीही तो पडतो असे मानायचे आणि बिंदुतून सिंधूचा अर्थ लावायचा प्रयत्न करायचा, अणूचे अंतरंग जाणून आणि ते आधार मानून विश्वाच्या अमर्याद पसाऱ्याचा वेध घ्यायचा, या मानवी आकांक्षेचे काय करायचे? आणि अशी आकांक्षा गैरलागू नसते, हा मानवी संस्कृतीच्या ज्ञानसंचिताचा केवढा आधार आपल्याला असतो! पण ज्ञानाच्या प्रत्येक जाणिवेच्या क्षणी अज्ञाताचे किती थोरले अरण्य काही ज्ञानी माणसांना दिसते! या अरण्यालाच कदाचित ईश्वर म्हणावे लागत असेल.

: म्हणजे ज्ञानाच्या जाणिवेच्या प्रत्येक क्षणी अज्ञात दुनियेचे अरण्य माणसाला दिसत असते असे तुम्ही मानता आणि त्याला ईश्वर सुद्धा म्हणता.' 'मी 'कदाचित ईश्वर' असे म्हणालो.' 'काय फरक?' 'ते मला माहीत नाही.' 'तुम्हाला अज्ञात दिसते?' 'ज्ञानी लोकांना दिसते असे म्हणतात.' 'पण त्यांना तर साक्षात्कार होतो असे म्हणतात.' 'त्याला मी आक्षेप नाही घेणार.' 'साक्षात आकार त्यांना दिसतो; असे म्हणायचे?' 'असेल तसे कदाचित.' 'पण तो दिसणारा आकार त्यांना शब्दात सांगता येत नाही,

असेही म्हणतात.'

'असेलही तसे.' 'आता, 'असेलही' का?' 'मला नक्की माहीत नाही म्हणून. पण थोरल्या अज्ञाताची जाणीव होणे मी समजू शकतो. या अज्ञाताला कोणी ईश्वर म्हणत असेल तर त्याला माझा आक्षेप नाही.' 'तुम्हाला हा विधी अजूनही करायचा आहे?' 'आहे.' 'का?' 'विक्राळ अज्ञातापुढे नम्र होण्यासाठी.' 'तुम्हाला ज्ञान झाले आहे?' 'नाही.' 'अज्ञात कसे दिसले?' 'ज्ञानी लोकांच्या नजरेने पाहताना.'

'हे सगळे तुमच्या पूर्वजांचे तुम्ही सांगितले; त्यात ज्ञात किती अज्ञात किती?' 'बव्हंशी सारे अज्ञातच. मी काही धागे जोडले; इतकेच.' 'पण तुमच्याकडे तर वंशवृक्षाचे झाडच आहे ना!' 'आहे. पण चरित्रांचे तपशील नाहीत.' 'मग?' 'मी ते जोडले.' 'कशासाठी?' 'काही एक अर्थ लावण्यासाठी.' 'काय दिसले; दिसतेय?' 'मी एक रेघ तयार केली.' 'पण वंशवृक्षाचे अरण्य तर विराट; त्याचे काय?' 'काहीही नाही. त्याची जाणीव हीच अज्ञाताची जाणीव.' 'म्हणून तरी ईश्वर आहे असे म्हणता?' 'नाही.' 'का?' 'मला तो माहीत नाही.' 'विधी का

करायचा आहे?' 'अज्ञाताला सलाम करण्यासाठी.' 'तुम्हाला अज्ञाताची जाणीव झालेली आहे?' 'नाही. काही सूक्ष्म गवाक्षे किलकिली झालीत असे वाटते. पण तो माझा भ्रमही असू शकेल.' 'आपले जगणे हाच भ्रम असतो, असे तुम्हाला माहीत आहे?' 'होय. तसे पुष्कळांनी आधी सांगितलेले आहे.' 'तुम्हाला ते पटते?' 'मी गोंधळून गेलेलो आहे.' 'तरीही तुम्हाला हा विधी करायचा आहे?' 'मला खुंटीला टांगून घ्यायचे आहे.' 'का?' 'जगण्याच्या या कोलाहलात आणखी कोणताही रस्ता मला दिसत नाही म्हणून.'

◆ ◆ ◆